टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

ग्रंथसंशोधनप्रकाशनमंडळ-प्रकाशन : ६ वे

[ महाराष्ट्र-राज्य साहित्य-संस्कृति मंडळाचे अनुदान मिळालेला ]

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अर्थात्

## देवीकोश

खंड २ रा

लेखक

प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई

शके १८८९ ] दासनवमी, २२ फेब्रुवारी [ सन १९६८

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

प्रकाशक :

शि. द. धुपकर
वा. वा. भागवत
मन्त्री
ग्रंथसंशोधनप्रकाशनमंडळ
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

© सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

किंमत १२-५० रुपये

मुद्रक :
शां. दे. जोशी व वि. द. ढोरंगे
प्रतिमा मुद्रणालय,
टिळक रस्ता, पुणे २.

राष्ट्रपतींकडून २६ जानेवारी (प्रजासत्ताक-दिन) १९६८ ला

## वायुसेना पदक विभूषित

## स्क्वॉड्रन लीडर श्रीनिवास देसाई



भारतीय वैमानिक दलातून मातृभूमीची निस्सीम सेवा करीत असताना, दिनांक २७ जुलै १९६७ रोजी झालेल्या विमान अपघातात भूमातेच्या कुशीत चिरनिद्रित झालेल्या प्रिय पुत्राच्या चिरजीव स्मृतीस समर्पण

—लेखक

# प्रकाशकाचे निवेदन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथसंशोधन प्रकाशन मंडळाचे सहावे प्रकाशन—देवीकोश दुसरा भाग—मराठी जनतेच्या हाती देताना आम्हांस आनंद होत आहे. पहिला भाग दि. २१ ऑगस्ट १९६७ रोजी डॉ. जाकीर हुसेन, भारताचे राष्ट्रपति यांचे हस्ते प्रकाशित झाला. ह्या ग्रंथाचे संपादक— श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी या ग्रंथाच्या स्वरूपासंबंधीची माहिती पहिल्या भागाच्या विस्तृत प्रस्तावनेमध्ये दिलेली आहे. त्यावरून देवीभक्तांप्रमाणेच देवी उपासना-परंपरे-संबंधी संशोधनात्मक अभ्यास करणाऱ्यानाही हा ग्रंथ फार उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृतिक मंडळाने पाच हजार रुपये अनुदान देवीकोशाच्या तीन भागाच्या प्रकाशनासाठी मंजूर केले आहे. मंडळाच्या या साहाय्याबद्दल प्रकाशक ऋणी आहे.

पुढील भाग ( सुमारे पांचशे पृष्ठे—डेमी आकार ) विजयादशमी शके १८९० पर्यंत प्रसिद्ध करण्याचा संकल्प आहे.

ग्रंथ—संपादक श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी ग्रंथ-संपादनासाठी फार परिश्रम घेतले आहेत. ग्रंथामध्ये संकलित केलेल्या विविध माहितीवरून वाचकांना या विधानाची सत्यता पटून येईल. देवीसंबंधी इतकी विविध माहिती कोणत्याही ग्रंथांत एकत्र केलेली नाही. ह्या परिश्रमपूर्वक संपादनाबद्दल त्यांना सस्नेह धन्यवाद देत आहो.

ह्या ग्रंथामध्ये मांडलेली मते व इतर ग्रंथांतून घेतलेली अवतरणे इत्यादी-बाबतची सर्व जबाबदारी ग्रंथ-संपादकाची आहे. प्रकाशकावर त्यासंबंधी कसलीही जबाबदारी नाही.

प्रतिभा मुद्रणालयाने ग्रंथ-मुद्रणाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडली, त्याबद्दल त्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकाचे आभार मानून हे निवेदन पूर्ण करीत आहे.

प्रकाशक

मंत्री

ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

दासनवमी १८८९
२२ फेब्रुवारी १९६८

# ऋणनिर्देश

आदिशक्तीचे विश्वस्वरूप अर्थात् देवीकोश या ग्रंथाचा दुसरा खंड आज मी वाचकांच्या हाती देत आहे. या ग्रंथाच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन दि २३ ऑगस्ट १९६७ रोजी भारताचे राष्ट्रपति डॉ. जाकीर हुसेन यांच्या हस्ते समारंभ पूर्वक झाले, हा एक अपूर्व भाग्ययोगच म्हणावयाचा. स्वभाषेतून ग्रंथनिर्मिति व्हावयास हवी, यावरच राष्ट्रपतींनी त्या वेळच्या आपल्या अगदी छोट्या भाषणात विशेष भर दिला. ते म्हणाले—

'मै लेखक और विद्यापीठको दिलसे हार्दिक बधाई देता हूँ, इसलिये की यह एक मुश्किल और खासकर एक आदमीके करने जैसा नहीं है ऐसा काम किया है। ऐसे काम तो और जगह बहोत लोग मिलकर करते है। यहाँ तो लेखक महाशयने बडी मेहनत कि है और इसीलिये इनके कामकी कदर होनी चाहिये और हर राहसे मदद देनी चाहिये। एक साहबने तो मुझेही मददके लिये धमकी देदी मगर मेरे बगैरभी बहोतसे लोग है जो ऐसे कामको मदद करके देशको आगे बढा दे। मै आप सबको हार्दिक बधाई देता हूँ।'

ग्रंथाची पृष्ठसंख्या अपेक्षेपेक्षा वाढल्यामुळे मूळ योजनेत काहीसा बदल होणे अपरिहार्य झाले. ग्रंथ चार खंडात संपूर्ण होईल आणि प्रत्येक खंड सुमारे पाचशे पानांचे जातनाहिरेच राहील. उरलेला भाग व सूचि, इत्यादींचा समावेश चवथ्या खंडात होईल. सर्व ग्रंथ येत्या विजयादशमीपूर्वीच वाचकांच्या हाती देता येईल अशी खात्री मी आता बाळगू शकतो.

माझे वास्तव्य गोरेगाव (मुंबई) येथे असते व तेथील ग्रामदेवता 'श्री जनाबाई देवस्थानची' मी गेली अनेक वर्षे सेवा करीत आहे. श्री अंबेची प्रेरणाच या ग्रंथाला सर्वस्वी कारणीभूत झाली असणार, अशी माझी श्रद्धा आहे. या देवस्थानच्या विश्वस्तांनी या ग्रंथाला रु. ५०१ चा पुरस्कार दिला आहे. या सक्रीय प्रोत्साहनाबद्दल मी कृतज्ञ आहे. त्यांच्या भावना त्यांच्याच शब्दात येथे उद्धृत करणे वाजवी होईल.

"आपण पाठविलेल्या 'देवीकोशा'च्या (आदिशक्तीचे विश्वस्वरूप) दोन प्रती विश्वस्तांना मिळाल्या. हा ग्रंथ निर्माण करण्यासाठी आपण बरेच परिश्रम घेतले आहेत व त्याचे क्रमशः प्रकाशन करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे हे पाहून फार समाधान वाटले.

आपल्या पहिल्यानंतरच्या ग्रंथराजाची पातळी उच्च राखण्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे हे प्रकाशक लाभले, राष्ट्रपतींनी प्रथम खंडाचे प्रकाशन केले, महाराष्ट्र शासन सांस्कृतिक मंडळाने अनुदानास योग्य ग्रंथ ठरविला आणि मराठी साहित्यक्षेत्रातील नामवंत लेखकांचे अभिप्राय मिळाले याबद्दल, येथील श्री अयामातेने आपल्या प्रेरणामार्गाने एका साध्या सेवेकऱ्याकडून असा अपूर्व स्वरूपाचा, 'शक्तीचा सर्वांगीण विचार करणारा' ग्रंथ निर्माण करून घेतला याबद्दल आम्हाला धन्यता वाटत आहे

भारतामध्ये अनेक सामर्थ्यशाली व वैभवशाली शक्तिपीठ आहेत त्यांचा निर्देश या ग्रंथात झाला असल्याने त्या त्या पीठचालकांनी या शक्तिग्रंथाची दखल घेऊन उदारहस्ताने शक्तितत्त्वाच्या प्रचारास सर्वतोपरी द्रव्यसाहाय्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, असे आम्हास वाटते

आपल्या या उपक्रमास फूल ना फुलाची पाकळी मदत म्हणून देवस्थानचे वतीने रु ५०१ ( पाचशे एक ) चेक क्रमांक १९२६४८, युनियन बँक ऑफ इंडिया ( गोरेगाव ) ने पाठवीत आहे कृपया त्याचा स्वीकार करून पावती पाठवावी "

पहिल्या खंडाप्रमाणेच याही खंडाची अनुक्रमणिका सूचिवजाच आहे त्याने वाचकाची सोय होईलच सविस्तर सूचि चौथ्या खंडात दिली जाईल

या ग्रंथाच्या लेखनात व प्रकाशनात ज्याचे ज्याचे साह्य मला झाले त्याचा सविस्तर उल्लेख मी पहिल्या खंडातील 'ऋणनिर्देशात' केलाच आहे ते सर्व याही खंडाचे प्रकाशनातील श्रेयाचे भागीदार आहेतच त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक पुन्हा स्मरण करतो या खंडासाठी प्रस्तावना लिहिण्यास मीमांसातीर्थ प श्रीपाद शास्त्री किंजवडेकर यांनी संमति दिली व ती लिहून मला उपकृत केले आहे मुद्रितशोधक मित्रवर्य भागवत व प्रतिभा मुद्रणालयाचे आभार मानावयासच हवेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ यांचेही प्रोत्साहनाचे स्मरण करणे माझे कर्तव्य आहे

हा दुसरा खंड वाचकांचे हाती देताना त्यांचे अधिक प्रोत्साहन मिळेलच असा विश्वास व्यक्त करतो आणि तिसऱ्या व उरलेल्या ग्रंथ प्रकाशनाकरिता तूर्त त्यांचा निरोप घेतो !

• ७ टिळकनगर, गोरेगाव, मुंबई ६२
२२ फेब्रुवारी १९६८

प्र कृ प्रभुदेसाई

# अनुक्रमणिका


अर्पण ... ... .. .. पृ. १– २

प्रकाशकाचे निवेदन ... .. ... पृ. १

ऋणनिर्देश ... ... ... पृ. १– २

त्वरित-वाचन –प्रस्तावना– श्रीपादशास्त्री किंजवडेकर पृ. १– २४

देवता विषयाचा तौलनिक प्रमाणपुरस्सर ग्रंथ १; आगळे वैशिष्ट्य २; देवताशब्द-समूहवाचक-शक्तिवाचक ३; शक्तिउद्भव तेथे देवता ४; देवता-उपपत्तिविचार ६; देवतापूजा-उपासना-उपचार ७; यज्ञसंस्था ९; देवतापीठे-अर्थ-एकतत्व आणि एकात्मभाव १०; मंत्र-तंत्र-यंत्र मूलभूत अर्थ ११; मंत्र म्हणजे मनन ११; यंत्र विचार १३; यंत्र-मंत्र प्रयोजन १५; शक्तीचे अधिष्ठान यंत्र होय १६; तंत्रविचार १८; उत्क्रांति, समाजाची—देवतांची २१; आदिशक्तीचा संचार—पूर्व गोलार्धात २२; पश्चिम गोलार्धात २२; भारतीय एकात्मतेसाठी आवाहन २३; सर्व प्रादेशिक भाषांतून भाषांतराची आवश्यकता २४.

१. शक्ति तत्त्वज्ञान .. . ... पृ. १– ७१

शक्तीची व्याख्या व क्षेत्र १; ॐकार आणि श्रीबीज ३; शक्तीचे स्वरूप ७, शक्तीचे वेदवाङ्मयातील स्थान ८; वैदिक शक्तीचे बीज ९; शक्ति शब्दाचा निरनिराळ्या अर्थाने वापर १०; शक्ति आणि वेदान्त १५; शक्ति आणि शंकराचार्य १६; शक्ति व विविध संप्रदाय १८; शक्ति व पुराणे २०; शक्तीचे व्यक्तस्वरूप प्रत्येक देवता २२; शक्तीचा प्रभाव व कार्य २३; वैष्णववाङ्मयातील शक्तीचे स्थान २५; शक्ति व शैववाङ्मय २९; शक्ति व सांख्य शास्त्र ३१; शक्ति, मीमांसा व न्यायशास्त्र ३३; शक्ति व योगशास्त्र ३४; शक्ति आणि काश्मीर शैव संप्रदाय ३६; शिव-शक्ति एकरूपच ३९, शक्तीचे प्रकटीकरण ४०; शक्तीचे वर्ग ४२; शक्ति व अक्षरसमूह ४३; शक्तीचे वीरशैव संप्रदायातील स्थान ४५; शक्ति आणि चैतन्य संप्रदाय ५३, शक्तीचे पूजन ५५; शक्तिस्तोत्रे ५६; शक्तितत्त्वज्ञान-आधार ग्रंथ ५८, शक्ति व अणुशास्त्र ५९–७१; अणुशक्ति-उत्पादन व कार्य ५९, अणुशक्ति व भारतीय ऋषि—कणाद ५९; अणुशक्तिशास्त्र—परिभाषा ६०; अणुगर्भाची रचना ६३; अणुभार व अणुशक्ति ६४; अणुविभाजन ६५; किरणोत्सर्गी एकस्याचा उपयोग ६६; किरणोत्सर्ग म्हणजे काय? ६७; किरणोत्सर्गीय धोके ६८; अणुशक्ति-आंतरराष्ट्रीय समिती व तिचे कार्य ७०; अणुशक्ति संदर्भग्रंथ ७१.

२. शक्तिपीठ देवता ... ... ... पृ. ७२– ३७०

५१ आदिशक्तिपीठाची यादी ७२; श्रीराजराजेश्वरी ७४; अच्छरूमाता ७७; आदिशक्ति (चाफळ) ७८; अंबाभवानी (अमरावती) ८२; आंबेजोगाई ८७; जोगेश्वरी (मुगवली–राजस्थान) ९२; उग्रतारा; ९३; कन्याकुमारी ९५; कमला १०१; कात्यायनी १०२; कामाख्या (त्रिपुर सुंदरी) १०४; कामाक्षी ११९; कालीमाता (कलकत्ता) १२६; गडकाली १४४; कालीची प्रमुख मंदिरे १४७; गुह्येश्वरी १५१; गोवेप्रांतीय देवता १५६; विजयदुर्गा १५९; कामाक्षी (शिरोडे) १६०; नवदुर्गा–मडकई (गोवा) १६०; देवी माऊली १६५; महालक्ष्मी (बांदिवडे) १६७; लयराई १६७; जीनदानी १६८; ज्वालादेवी आणि जालंदर पीठ १६९; जालंदर–कांगडा पीठ १७४; तुकाई १७८; पटेश्वरी १८४; पैठणदेवता १८७; पुणेशहर शक्तिपीठे १९२; बनशंकरी १९९; शाकंभरी २०२; बहुचरा २०७; बिल्ई माता २१५; भवानी सीताकुंड २१७; भद्रकाली २२१; भ्रमराम्बा २२५; मुंबईशहर शक्तिपीठे २२६; मुंबादेवी २२६; काळबादेवी, गावदेवी २२८; दुर्गादेवी, प्रभादेवी २२९; बारासुखी २३०; महालक्ष्मी २३२; वैकुंठमाता २३३; महामयी २३५; मोहनीराज २३७; महाळसा २४६· महालक्ष्मी (डहाणू) २४९; महालक्ष्मी (कोल्हापूर) २५१; महालक्ष्मी–(गोरेपल्ले, कुंभळगड–उदेपूर, अणहिलवाड, दोडगद्दवल्लि, कुडाळ, वाई, माद्रे, झाशी) २६३; महीकावती २७१; मीनाक्षी २७४; मेगुती मंदिर २८२; यमाई २८३; ललिता २८९; वज्रेश्वरी २९५; वरदायिनी ३००; वाराणसी देवता ३०३; नवगौरी नावे ३०९; विंध्यवासिनी ३११; विंध्यवासिनी (कौशिकी) ३१६; विद्यादेवी ३१९; शांतादुर्गा ३२१; गोवा ख्रिस्तीकरण ३२६; शारदा ३३६; सप्तशृंगी ३४०; स्वाँगिआजी ३५२; हरसिद्धि ३५४; हर्षदमाता ३५७; हिंगुळा (१) ३५९; हिंगुळा (२) ३६५.

३. योगिनी आणि मातृका .. ... पृ. ३७१–३९५

योगिनी–उत्पत्ति ३७१, योगिनींची नावे ३७२, योगिनीमंदिर (भेडाघाट) ३७७; योगिनी मंदिर (खजुरहो) ३७९; जगदंबा मंदिर ३८०; मातृकास्वरूप ३८२; मातृकांची नावे–यादी ३८४; विष्णुनिर्मित मातृका ३८५; अष्टमातृका (ब्राह्मणी, वैष्णवी, ऐंद्री, चामुंडा, माहेश्वरी कौमारी, वाराही, योगेश्वरी) ३८६; ५२ अक्षरे–वर्णमाला व मातृका ३८९; मातृका मंदिरे ३९१.

४. मंत्र-तंत्र-यंत्रदेवता ... ... पृ. ३९६–४३३

मंत्रदेवता ३९६; मंत्र म्हणजे काय? ३९८; मंत्रांचे प्रकार–जाति ३९९; मंत्रसिद्धि कोणास होते? ४००; मंत्र, यंत्रदेवता ही निर्गुण-सगुण उपासनेचे द्योतक ४०३; वैदिक मंत्रांचा उपयोग ४०४; जैनपंथ व मंत्र; बौद्धपंथ व मंत्र ४०६; तंत्रदेवता ४०९; तंत्रग्रंथांचा उगम ४१०; तांत्रिकांच्या उपास्यदेवता ४११; जैन व बौद्धतंत्रे ४११; तांत्रिक व मतप्रचार ४१४; श्रीविद्या ४१५; तंत्रशास्त्राचे पोटभेद ४१६; तंत्रग्रंथ ४१७; तंत्रशास्त्र व पाश्चिमात्य ४१८; तांत्रिक मार्गियांच्या देवता–कालीनृत्या, कपालिनी, कुला, कुरुकुला, विरोधिनी, विप्रचित्ता, उग्रा–उग्रतारा, उग्रचंडा, तिरस्कारिणी, स्वप्नवाराहिका, संपत्सरस्वती, आदिनाथ वगैरे ४२०; यंत्रदेवता ४२३; श्रीविद्या-उगमनिकास ४२३; यंत्र म्हणजे काय? ४२४; उपासक व यंत्र ४२४; श्रीयंत्र ४२६; श्रीयंत्राचे स्वरूप व मांडणी ४२७; शक्तिपीठे व त्यांतील यंत्रस्थापना ४२९; आदिशक्तिप्रतीक–श्रीचक्र ४२९; प्रमुख यंत्रे ४२९; यंत्रकृति तंत्राचे पथ्य ४३०.

५. सामाजिक देवता ... ... ... ४३४–४८७

सामाजिक देवता–यादी ४३४; देवता व चातुर्वर्ण्य समाज ४३५; श्रीकरणीदेवी ४३६; एकवीरा ४४३; कन्यका परमेश्वरी; ४४६; कमळोविवी ४४७; कळसुबाई ४४८; चिक्काम्मा ४४९; वांकळमाता ४५४; मायाराणी ४५६; यल्लमा ४५८; रेणुकादेवी ४६१; रेणुकाक्षेत्र (माहूर) ४६७; रेणुका व परशुराम ४६८; परशुराम व अस्त्रविद्या ४७०; रेणुकेची मंदिरे ४७३; परशुराम व मातृभक्ति ४७५; लुंबिनी ४८२; सतीचे देवालय ४८३; सतीची संस्था–पुरातन ४८४; सती व पाश्चिमात्य ४८५; सतीची बंदी कोणी केली? ४८६; सती आत्मत्यागाचे व आत्म-बलिदानाचे प्रतीक ४८७.

शुद्धिपत्र ... . ... ... पृ. ४८८

अधिकारी विद्वानांचे अभिप्राय .. ... पृ. १–७

श्रीशृंगेरी जगद्गुरु महासंस्थान (म्हैसूर प्रांत), महामहोपाध्याय पंडित श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रवीड, वाराणशी; महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास, नागपूर; डॉ. ना. मा. खरे, नागपूर; भारतभारती (ज. मा. कायदे) मुंबई व कीर्तनरत्न लक्ष्मणबुवा निजामपूरकर, पुणे.

'आदिशक्तीचे विश्वस्वरूप' (आगामी खंडातील विषय) पृ. ८

। भूधरभूर्जानिर्विजयतेतमाम् ।

# स्वस्ति-वाचन ( प्रस्तावना )

आमचे मित्र प्रल्हाद कृष्ण देसाई ऊर्फ दादा यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि सुमारे सातआठ वर्षांत एवढ्या दीर्घकाल चिकाटीने व्यासंगपूर्वक एक ग्रंथ लिहिला आहे.

देवता हा विषय घेतला तर या विषयासंबंधीचे संपूर्ण विवेचन आणि तौलनिक दृष्टीने केलेली चिकित्सा यासह एवढा विस्तार मांडलेला असासारखा ग्रंथ आमच्या तरी अद्यापि पाहण्यात नाही. साहजिकच गाणपत्यांनी गणेश-पुराण, शैवांनी शिवपुराण, वैष्णवांनी विष्णुपुराण, शाक्तांनी शक्तीचे पुराण, सूर्योपासकांनी सौरपुराण अशी आपापल्या उपास्य देवतेची वेगवेगळी पुराणे वाचून, आपल्या आपल्या देवताचे जे ज्ञान संपादन करतील त्यात सहसा एक-वाक्यता आढळत नाही. गाणपत्यांनी गणेश हाच सर्वारंभी असून तोच जगाच्या उत्पत्ति, स्थिति-लयालाही कारण आहे असे वाटते, तर शैवांना शिव, वैष्णवांना विष्णु वगैरे त्या त्या उपास्य देवतेच्या बाबतीत नेमके हेच वाटत असते. वाटणे चूक नव्हे, परंतु सामान्य जिज्ञासूंचा याबाबत निश्चित गोंधळ होतो. देवताच्या उपाधीमध्ये जरी वैचित्र्य आढळले, तरी त्यांच्या मूलभूत तत्वात बदल होत नाही, फरक पडत नाही, हे तौलनिक दृष्ट्या आणि प्रमाणपुरस्सर विवेचन करणारा एकच एक ग्रंथ आजवर मराठीत उपलब्ध नव्हता आमचे मित्र श्री देसाई यांनी हा अद्‌भुत प्रयत्न करून हा ग्रंथ लिहिला हे या ग्रंथाचे एक मूलभूत वैशिष्ट्य होय

आजवरचे त्यांचे क्षेत्र पाहिले तर ते लेखनाला उपयोगी असे मुळीच नव्हते. त्या हाताला दंडुका व पिस्तुल यांची सतत सवय, त्या हातांनी लेखणी घ्यावी आणि ती सराईतपणे चालवावी हा एक वाङ्मयीन चमत्कारच म्हणावा लागेल.

या वैशिष्ट्याबाबत मात्र आमची उपपत्ति अशी आहे की, दंडुका खाली ठेवल्यानंतर समाजसेवेचा दंड हाती घेऊन जगदंबेच्या सेवेचे कंकण जे त्यांनी बांधले त्याचा परिणाम म्हणून जगदंबेनेच त्यांना ही प्रेरणा दिली असावी. एरव्ही हा ग्रंथ पाहता तो देसाई यांनी लिहिला असा विश्वास ठेवणे धाडसाचे वाटले असते पण आता तसे वाटत नाही.

## आगळे वैशिष्ट्य

अशा या विविध वैशिष्ट्यांनी विनटलेल्या अपूर्व ग्रंथाचा परिचय करून देण्याची कामगिरी त्यांनी मित्रभावाने सोपविली असल्यामुळे आम्हा सर्वांना आनंद झाला. मित्रभाव, निष्ठा आणि तगादा या सगळ्यांतून एकदम सुटका होण्याचा निश्चित मार्ग म्हणजे या ग्रंथाचा वाचकांना परिचय करून देणे, असे वाटल्याने या ग्रंथाच्या परिचयासाठी आम्ही उद्युक्त होत आहोत.

अशा या अपूर्व ग्रंथाचे नाव 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप' असे आहे. शक्ति हा शब्द या ग्रंथात देवता या अर्थाने वापरलेला आहे. आदिशक्ति म्हणजे आद्यदेवता आणि तिचा विश्वसंचार, विश्वामध्ये तिचा झालेला संचार, तो आद्यशक्तीचा विश्वसंचार होय. हा विश्वसंचार मूळ स्वरूपात न होता, मूळ देवतेच्या अनेक अंगोपांगांनी झाला. मुळात पाणी एकच परंतु विविध उपाधींच्या योगाने ते बहुरूप आहे असे वाटते. नदी, नाला, सरोवर, समुद्र इत्यादि विविध नावांनी ओळखले जाणारे पाणी हे मुळात एकच असते. तद्वतच अनेक नामाभिधानांनी अनेक ठिकाणी ओळखल्या जाणाऱ्या अनेक देवता, या आद्यदेवतेच्या मूळ स्वरूपापासूनच निघालेल्या आहेत, हा या ग्रंथातील एक महत्त्वाचा सिद्धांत आहे. या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी अनेक विषयांचा सोपपत्तिक प्रपंच या ग्रंथात लेखकाला करावा लागला. तो तसा करीत असताना अनेकांचे या विषयावरील मत समजून घेण्यासाठी मुलाखती, प्रवास, त्या त्या विषयावरील अगणित ग्रंथांचे परिशीलन हेही करावे लागले, आणि हे करीत असताना, विद्वान समजल्या जाणाऱ्या अनेकांचा लेखकाला जो प्रत्यक्ष अनुभव आला तो काही उत्साहप्रद नव्हता. ज्यांच्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करावी असे लेखकाला वाटले त्यांनी दुसऱ्याच दृष्टीने मार्गदर्शन केले. अनेकांनी या विषयावरील लेखन हे मृगजळासारखेच आहे असे सूचित केले, तर कित्येकांनी या सर्व खटाटोपाची गरजच काय, असाही सूर काढला. अशा या सर्व मार्गदर्शकांशी मुकाबला करीत करीत सर्वांशाने प्रतिकूल वातावरणात आणि सर्वस्वी एकाकी राहून हा ग्रंथ लिहिला गेला.

या ग्रंथात देवतांच्या अनुषंगाने आणि क्रम विकासाच्या दृष्टीनेही वैदिक देवतांचा परामर्ष ग्रंथकाराने घेतला आहे. या प्रकरणात वेदकाली ज्या ज्या देवतांना महत्त्व प्राप्त झाले होते, त्या त्या देवतांचा उल्लेख आहे. वेदकालीन देवता हा विषय महत्त्वाचा व इतर अनेक विषयांशी संबद्ध असा आहे. वेदकालीन देवता असे म्हटल्याबरोबर वेद व त्यांचा काळ आणि त्यांचा विस्तार इतक्या गोष्टींचा समावेश वेदकालीन या एका शब्दात होतो केवळ भारतीयांच्याच नव्हे,

तर मानवतेच्या इतिहासातील अत्यंत प्राचीन उपलब्ध असे हे वैदिक वाङ्मय असल्याने त्याला एक मानवी संस्कृतीच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. संस्कृतीचे विकास हे मानवी विकासाच्या समांतर असेच नेहमी होत असतात.

## समूहवाचक-शक्तिवाचक

त्या दृष्टीने पाहिले तर वैदिक देवतावरून त्या वेळच्या समाजस्थितीवर चांगलाच प्रकाश पडतो. देवता हा शब्द त्या वेळी समूहवाचक आणि शक्तिवाचक अशा दोन्ही अर्थांनी वापरला जात असे. अनेक देवांचा समुदाय ज्यामध्ये आहे त्या देवता. या अशा समूह-देवतांचा उपयोग यज्ञप्रक्रियेमध्ये होत असे. देवता म्हणजे काय ? तर आपल्यापेक्षा शक्तीने अधिक श्रेष्ठ ती देवता. उदाहरणार्थ इंद्र, वरुण, यम या सर्वांना देव असे मानतात. कारण मानवी शक्तीपेक्षा यांच्यामध्ये कितीतरी पटीने अधिक शक्ति आहे. अशा या शक्तिशाली देवतांचे पाठबळ आपणांस लाभावे, या देवतांच्या कृपाप्रसादाने पंचमहाभूतांनी आपापली कामे व्यवस्थित करावीत यासाठी या देवतांना शरण जाणे आणि त्यांच्या प्रसन्नतेसाठी विविध यज्ञयाग करणे हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. व्यवहारातसुद्धा आपल्यापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्या व्यक्तीला अनुकूल करून घेण्यासाठी त्याची स्तुति-स्तोत्रे आपण गातच असतो. ही त्या व्यक्तीची एका तऱ्हेने पूजाच होय. देशाचे व समाजाचे नेतृत्व करणाऱ्या माणसाची विभूति-पूजा आपण करीत असतोच. त्या दृष्टीने विचार केला तर वेदकालातील मानवांनी पंचमहाभूतांचेही नेतृत्व करणाऱ्या अग्नीला आपले पुढारी मानले, तर त्यात नवल नाही. व्यक्तीच्या नेतृत्वापेक्षा शक्तीचे नेतृत्व हे केव्हाही अधिक श्रेष्ठच असणार. मानवाच्या संस्कृतीत जशी आपल्या नद्यांनी भर घातली आहे, तशीच ती अग्नीनेही घातली आहे. अग्नीचा शोध हा मानवाचा सर्वांत पहिला शोध आहे, असे म्हटले जाते. या शोधाची जननी निसर्गच आहे. निसर्गाशी एकरूप होऊन आपली जीवनयात्रा चालू ठेवणारा आदिमानवाचा समूह त्याच निसर्गाच्या वरदहस्ताने पुढे पुढे इतका विकसित होत गेला की, त्याच्या त्या वेळच्या उच्चस्तरीय विकासाच्या कल्पना वेदवाङ्मयात आजही आपणाला पाहावयास सापडतात. प्रत्यक्ष उपलब्ध वेदवाङ्मयाच्या काळापेक्षाही अनेक शतके भूतकालात या उच्च संस्कृतीची बीजे अंकुरित होऊ लागली होती, यात वाद नाही. भारतीय उत्तर ध्रुवापासून भारतात ज्या वेळी प्रथम आले आणि पंजाबप्रांती स्थिर झाले त्या वेळेपर्यंतचा त्यांचा मधला काळ जो आहे तो अत्यंत संघर्षांचा आणि विकासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा होता. पंजाब प्रांतात ते स्थिर झाल्यावर ते स्वतःला आर्य म्हणवून घेऊ लागले आणि आर्य हा शब्द श्रेष्ठत्वाचा निदर्शक असल्याने अशा श्रेष्ठ गुणांनी युक्त असणाऱ्या माणसांचा समाज हा जिथे राहतो त्या प्रदेशालाही ते आर्यावर्त म्हणू लागले. आर्यावर्तांची

त्या वेळची सीमा ही ' मध्यमविंध्यहिमाल्योः । ' एवढी व्यापक झालेली होती. अर्थात् काही लोक प्रथम आले. त्यांच्यानंतर काही शतकांनी दुसरे लोक आले. त्यांच्या संस्कृतीचे व विचारांचे प्रतिबिंब आजच्या वैदिक वाङ्मयात उमटलेले आहे, असे काही संशोधकांचे म्हणणे आहे आणि त्यांच्या त्या म्हणण्याला पुरावा म्हणून, मोहेंजोदारो व हरप्पा येथील उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा देतात. तथापि, अंतर्गत पुरावे पाहता, प्रथम आलेल्या लोकांच्याच विकासाचे प्रतिबिंब वेदवाङ्मयात प्रतिबिंबित झाले आहे, असे मानले तरच आपल्या पौराणिक काल-गणनेची संगति लागू शकते. उत्खननातील अवशेषांवरून जो निर्णय घ्यावयाचा तो उभयपक्षीही घेता येईल. कारण याबाबत संशोधकांची बुद्धि ही आपणाला अनुकूल असा निर्णय देऊ शकेल व त्याचे समर्थनही करू शकेल. पण अंतर्गत पुरावा जो असतो तो आहे तसाच स्वीकारावा लागतो. अशा अंतर्गत पुराव्या-मध्ये शब्दांची गणना होते आणि नाशवंत उत्खननातील अवशेषांपेक्षा कितीतरी प्राचीन आणि स्वयंभू ते आहेत. वेदवाङ्मयाच्या दृष्टीने विचार केला तर ओम (ॐ) हा शब्द आपण घेऊ. हा शब्द मोहेंजोदारो व हराप्पा याच्या संस्कृति विकासाच्याही पूर्वी कितीतरी शतके, नव्हे सहस्रके अगोदरपासून अस्तित्वात असल्याची साक्ष आपले दार्शनिक ग्रंथ देत आहेत.

## शक्तिउद्भव तेथे देवता

हे सर्व चराचर ओम्कारापासूनच निर्माण झालेले आहे असे आपले ऋषि एकमुखाने सांगत आहेत. त्यांतील वैज्ञानिक कार्यकारणभावाचा सांगोपांग विचार करणे हे या ठिकाणी प्रस्तुत नाही. तरी पण वैदिक देवताच्या संदर्भात विचार करताना आपल्या ऋषींनी जिथून जिथून शक्तीचा उद्गम होतो, प्रादुर्भाव होतो त्याला त्याला देवता मानलेल्या आहेत. शब्द ही अशीच एक प्रचंड आणि विराट शक्ति आहे. या शक्तीपासूनच चराचराची निर्मिति झाली आहे, असे मंत्रद्रष्टे ऋषि जे सांगत आले, त्यातील तथ्यांशाची आता कोठे तोंडओळख पाश्चिमात्यांना होऊ लागली आहे. ' एकः शब्दः सम्यग्ज्ञातः स्वर्गे लोके कामधुग् भवति । ' हे शब्दशक्तीच्या बाबत केलेले वर्णन अतिशयोक्त नसून न्यूनोक्त आहे हे नेहमी लक्षात ठेवावे.

निसर्गाच्या सान्निध्यात निकटतम सहवासात निसर्गाशी एकरूप होऊन ज्या वेळी आपले भारतीय ऋषि विश्वाच्या बुडाशी असणाऱ्या सहागर्भ शक्तींना विचार करू लागले, त्याच वेळी त्यांच्या प्रतिभ प्रज्ञेतून जो त्यांना साक्षात्कार झाला तोच विश्वचक्राचे संचलन आणि प्रवर्तन करणाऱ्या पाच भौतिक शक्तींना देवतांचे स्वरूप देण्यास कारणीभूत झाला. स्थूल पंचमहाभूते ज्या एका मूळ

कारणातून निर्माण झाली ते मूळ कारण स्वभावतःच निरुपाधिक, अव्यक्त आणि म्हणूनच निर्गुण स्वरूपाचे असे आहे. ते 'सदसतः परम्' म्हणजे सताच्या आणि असताच्या पलीकडे असणारे असे आहे. 'सदसतः परम्' अशा या मूळ कारणालाच पुढे पंचतन्मात्रा या शब्दानी संबोधू लागले. उपाधिशून्य अशाही वस्तूचे वर्णन शब्दोपाधिने केल्याशिवाय ते बुद्धीच्या कक्षेत येत नाही एवढाच त्याचा आशय. आकार आणि मर्यादा या केवळ उपाधीनेच व्यक्त होत असतात. अमर्यादाला मर्यादा आणि निराकाराला आकार देण्याचे काम हे जरी उपाधी करीत असली तरी मूळ कारण हे आकार आणि मर्यादा याच्या पलीकडचे असते हे लक्षात ठेवले पाहिजे. मानवी ज्ञानाचा मार्ग हा उपाधीच्या राजरस्त्यानेच जातो. याचा अर्थ असा नव्हे की, त्या मूळ कारणाकडे जाण्यासाठी इतर मार्ग नाहीत. साक्षात् कृत-धर्माण ऋषींना या इतर मार्गांचे चांगलेच ज्ञान झाले होते. त्या मार्गांनी जाणे सर्वसामान्यांना जमण्यासारखे नाही, म्हणूनच आपल्या ऋषींनी हा सारा शब्दोपाधीचा प्रपंच घातला. सर्व व्यापक विष्णु ही देवता घ्या. वेदकाली ही देवता प्रमुख मानली जात असे.

'अग्निर्वै देवतानां अवमो विष्णु परम ।' 'ना विष्णुः पृथ्वीपतिः ।' इत्यादि श्रुतिवचने याची साक्ष देतील. अशा या सर्वाधार सर्वव्यापक प्रधान देवता विष्णु याचा सामान्यांना परिचय करून देताना त्याला नसलेल्या आकाराचीही कल्पना देण्यासाठी 'शांताकार' असे म्हणून पुन्हा 'गगनसदृश' असे म्हणावे लागले. ज्याला सीमा नाही अशा आकाशाला सुद्धा गगन शब्दाच्या उपाधीतच गोवावे लागले. वास्तविक 'गगनसदृश' म्हणजे काय याची निश्चित व्याप्ति किंवा बोध आपणाला होत नाही. जो बोध होतो तो एवढाच की, आकाशासारखे भव्य, प्रचंड, विराट असे काहीतरी त्या विष्णूचे स्वरूप असावे. पण हे भव्य, विराट आणि प्रचंड म्हणजे काय? त्याच्या सीमारेषा कोणत्या हे वरील शब्दानी सांगता येणे केवळ अशक्य आहे. शब्दांनी सांगता येणे अशक्य आहे हे महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्या त्या शक्तीच्या मूळ कारणापर्यंत किंवा सूक्ष्मतम अशा परिणामापासून बृहत्तम परिणामापर्यंत शब्दानी जाता येणे सर्वथैव अशक्य आहे. याजसाठी आपले उपनिषद्कार असे सांगतात

'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।' मन, वाणी आणि बुद्धि या त्रिपुटींचा जिथे प्रवेश होऊ शकत नाही असे ते मूळ कारण, अशी ती सत्तागर्भ शक्ति, ज्या वेळी शब्दांकित झाली त्याच वेळी त्या शक्तीला देवता असे म्हणू लागले. अशा शक्ति इंद्र, वरुण, यम, अग्नि इ० यथार्थ नावांनी ओळखल्या जाऊ लागल्या. मानवी प्रज्ञेचा केवढा विकास झाला होता याची गेल्या हजार दीड हजार वर्षांच्या सततच्या पारतंत्र्यामुळे आज आपणास कल्पना नाही. एकच शब्द

परंतु तो साक्षात कृतधर्माण ऋषींचा, त्या एका शब्दाने सारे शब्दब्रह्म ओतप्रोत होऊन गेले. ऋग्वेदातील नासदीय सूक्त ज्याच्या प्रज्ञेतून प्रकट झाले त्या सूक्तातील 'तदानीम्' हा एकच शब्द, ज्ञाताच्या कुंपणावरून अज्ञाताच्या असीम प्रदेशात आपणाला नेऊन जाणारा हा एकमात्र तदानीम् हा शब्द सेतुबंध आहे. शब्दबंध आहे असे म्हणा हवे तर. ज्ञाताला आणि अज्ञाताला जोडणारा हा शब्दबंध ज्या ऋषींने निर्माण केला त्या ऋषींची प्रज्ञा ही प्रज्ञेच्या पलीकडील आहे, असेच म्हणावे लागते.

## उपपत्ति विचार

वैदिक देवतांची उपपत्ति समजून घेण्यासाठी प्रथम पंचमहाभूते आणि त्यांच्या तन्मात्रा यांचा परिचय करून घ्यावयास हवा. हा परिचय काही एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच आपणास इंद्रियांच्या द्वारे होऊ शकतो. स्थूल पंचमहाभूतांतील काही भूते अशी आहेत की, ती आपणास डोळ्यांनी दिसत नाहीत तरी पण त्यांचे गुणधर्म हे कोणत्या ना कोणत्या इंद्रियांना प्रतीत होत असल्यामुळे आपण त्यांचे अस्तित्व विनातक्रार मान्य करतोच. वायु, आकाश ही दोन पंचमहाभूते आपणांस दिसत नाहीत आणि तरीही आपण त्यांचे अस्तित्व नाकारू शकत नाही. पंचमहाभूतापासून सर्व विश्वाची निर्मिति झाली, असा आपला सिद्धान्त आहे. चराचरातील अणुरेणूत ही पंचमहाभूते सामावलेली असतात, म्हणूनच प्रत्येक पदार्थ हा पांचभौतिक आहे हे आपल्या ऋषींनी सिद्ध केल्यानंतर मग त्यांची दृष्टि स्थूलाकडून सूक्ष्माकडे वळली आपले शरीर हेही पांचभौतिक आहे. असे त्यांना नंतर आढळून आले आणि समष्टीत असणाऱ्या स्थूल पंचमहाभूतांचे गुणधर्म आणि त्यांची मूळ कारणे शोधून काढण्याच्या दिशेने ते ज्या वेळी प्रयत्न करू लागले त्या वेळी निर्मितीच्या उलट क्रमाने त्यांनी आपला प्रवास सुरू केला. आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्नीपासून पाणी आणि पाण्यापासून पृथ्वी अशी ही पंचमहाभूते क्रमश: निर्माण झाली. पण ही अशीच का निर्माण झाली, उलट क्रमाने पृथ्वीपासून पाणी किंवा अग्नीपासून वायु अशी का निर्माण झाली नाहीत हे शोधून काढण्यासाठी भारतीय ऋषि–पाणी अशा शेवटच्या टोकापासून आकाशापर्यंत ज्या वेळी आले, त्या वेळी त्यांना या पंचमहाभूतांचा अनुलोम क्रम पटला. प्रतिलोम क्रमाने गेल्यानंतरच हा अनुलोम क्रम त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला आला अर्थात् हा अनुभव येण्यासाठी सुद्धा काही पिढ्यांची परंपरा निर्माण करावी लागली अशा या दीर्घकालीन परंपरेतून ज्ञानाच्या विशाल आकाशात पदार्पण करीपर्यंत जे जे त्यांना अनुभव आले, त्या अनुभूतींच्या आधारावरच त्यांनी

आपल्या देवताचा निश्चय केला. जीवनाला उपकारक आणि सजीवक अशा ज्या ज्या शक्तींचा परिचय त्याना झाला, त्या त्या शक्तींना ते वश करून घेण्याचा प्रयत्न करू लागले. अशा या प्रयत्नातूनच पुढे मानवव्यापी यज्ञसंस्था निर्माण झाली. उत्तरोत्तर यज्ञसंस्थेचा जसजसा विकास होत गेला, तसतसा अनुभवाचा प्रांतही व्यापक होऊ लागला. यज्ञाच्या निमित्ताने ज्या ज्या देवताना आवाहन करण्यात येई, त्या त्या देवता जर आपण पाहिल्या, तर त्या सर्व आपल्या जीवनाला नितांत उपकारकच असल्याचे आढळून येईल. विष्णु, इंद्र, वरुण, यम हे त्या वेळच्या यज्ञातील प्रमुख देव. याना आज आपण केवळ शब्दांनीच ओळखतो, पण त्या काळी या शब्दांनी प्रकट होणाऱ्या दैवी सामर्थ्यांचा प्रत्यक्ष सहवास भारतीयाना घडत असे. या सहवासाने ते उत्तरोत्तर अधिक प्रभावी, अधिक पराक्रमी, अधिक जयिष्णु आणि प्रभविष्णु झाले. ज्ञात शक्तीचे मूळ केंद्र हाती आल्यामुळेच मोठ्या अभिमानाने ‘ कृण्वन्तो विश्वमार्यम् ’ असा ते उद्घोष करू लागले. तात्पर्य, त्या वेळच्या यज्ञीय देवताचा विचार केला, तर त्यांना प्रसन्न करून घेण्याचे उपायही त्या त्या देवतांना अनुरूप असे होते.

उपासना—उपचार

आजच्याप्रमाणे त्या काळी षोडषोपचार पूजा प्रचारात नव्हती, तरी पूजेतील मुख्य तत्त्वदेवतेचा संतोष जेणेकरून होईल, तो प्रकार मात्र त्या वेळी निश्चितच प्रचारात होता. इंद्र, वरुण, यमादि देवतांना यज्ञामध्ये आवाहन करून त्यांना गंधमाल्य अनुलेपन इत्यादि उपचार अर्पण न करता पुरोडाश, सोमरस हविर्द्रव्य त्या त्या देवताना उद्देशून अग्नीद्वारा समर्पण करण्यात येत असे. ‘ अग्निर्मुखो वै देवः ’ अशी त्या वेळची श्रद्धा असल्याने त्या त्या देवताना प्रिय असे द्रव्य त्यांना उद्देशून अग्नीत टाकले जात असे. ते हुत होत असे म्हणून त्याला पुढे हविर्द्रव्य असे म्हणू लागले. आजच्या उपचारातील द्रव्ये ही हविर्द्रव्ये नसून ती मुख्यत. ग्रहणद्रव्ये असतात उदाहरणार्थ, आपण सध्या जी पूजा करतो, त्या पूजेत जे उपचार अर्पण करतो, ते देवांनी ग्रहण करावेत या उद्देशाने, म्हणून यांना ग्रहणद्रव्ये म्हणणे योग्य होईल. हविर्द्रव्ये ही साक्षात् अग्नीमध्ये प्रहुत होत असल्यामुळे ती एकदा समर्पण केली की, परत घेता येत नसत, याउलट ग्रहणद्रव्याचे आहे. देवासमोर ठेवलेले दूध, देवाने ग्रहण केले, तर ठीकच, न पेक्षा त्याच्या नावाने प्रसाद म्हणून आपण स्वत ही घेऊ शकतो. प्रसाद म्हणून का होईना, पण दिलेले परत घेण्याची क्रिया या उपचार द्रव्यामध्ये प्राधान्याने असल्यामुळे पुढे पुढे या द्रव्यांचे विडंबन होऊ लागले म्हणून आजच्यापेक्षाही वेदकालीन पूजापद्धति ही अधिक वस्तुनिष्ठ होती असे म्हणावे लागेल आजच्या

पूजेमध्ये आपण जी वैदिक सूक्ते उपयोगात आणतो, ती सर्व सूक्ते प्रथम यज्ञामध्ये विनियुक्त होती, हे लक्षात ठेवणे अगत्याचे आहे. कारण यज्ञामध्ये प्रथम त्याचा विनियोग जो झाला तो प्रत्यक्ष झाला. पूजेमध्ये सध्या होणारा विनियोग हा आनुमानिक म्हणूनच प्रत्यक्षापेक्षा थोडा दुर्बल होय. जे आपल्याला प्रिय ते धर्माशी जोडावे असा पूर्वीचा संकेत यज्ञसंस्थेने रूढ केला होता. त्याऐवजी यज्ञसंस्थेच्या अपकांतीच्या काळात आपल्याला प्रिय असेल ते धर्माशी नव्हे तर आपल्या प्रिय असणाऱ्या देवतेला अर्पण करावे असा संकेत रूढ होऊन बसला. पूर्वीच्या संकेतात त्यागाने धर्माची धारणा होत असे, तर नंतरच्या संकेताने व्यक्तीच्या त्यागाला संकुचित स्वार्थाचे अधिष्ठान मिळवून दिले. याचाच पराकोटीचा क्षुद्र परिणाम म्हणजे शाक्त तंत्रातील पंचमकाराचे विकृत विडंबन हे होय. वैदिक देवता आणि त्यानंतरच्या देवता यांच्यामध्ये महत्त्वाचा दुसरा फरक असा आहे की, वैदिक देवता ह्या सर्वांशाने सामष्टिक देवता असत. समाजकल्याणार्थ त्यांना आवाहन करून प्रार्थना करण्यात येई; तर त्यानंतरच्या देवता ह्या सर्वांशाने वैयक्तिक स्वरूपाच्या गणल्या गेल्या. व्यक्तीच्या स्वार्थासाठी या देवतांची पूजाअर्चा होऊ लागली. यातूनच अनेक देवतावाद निर्माण होऊन परस्पर कलहाचा अग्नि प्रज्वलित झाला व आज-तागायत त्याच्या ज्वाळा राष्ट्रहिताचा दाह करीत आहेत. वैदिक देवतांमुळे समष्टि जीवनाची दिशा आपणास मिळाली तर वैदिक देवतांना व्यक्तिजीवनाची मिळाली. समाजाच्या कल्याणापेक्षा व्यक्तीचे कल्याण हे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. त्याबरोबर समाजधारणा विस्कळीत व्हावी व त्याच्या मागे राष्ट्रही सर्वांगाने विकल आणि दुर्बल होत जावे हे सहजच होते. हा महत्त्वाचा फरक लक्षात घेतला असता वैदिक देवतांनी राष्ट्रकल्याणार्थ आपणाला कसे उद्युक्त केले हे लक्षात येते आणि आजची राष्ट्राची पातळी सर्व क्षेत्रांत सर्वांगाने खाली आली ती, उचावण्यासाठी पुनरपि त्याच यज्ञसंस्थेचे पुनर्जीवन राष्ट्रीय पातळी-वरून होणे अगत्याचे आहे असे वाटू लागते. यज्ञ हा शब्द देवपूजा, संगति-करण आणि त्याग या तीनही अर्थांनी युक्त असा आहे. म्हणजेच यज्ञात देवता-राधन, संगतिकरण म्हणजे संघटणा आणि त्याग या तीनही गोष्टींचा समावेश असलाच पाहिजे असा दंडक असे. याउलट आजच्या पूजाप्रकाराकडे पाहिले असता देवताराधन म्हणजेच स्वार्थाचे आराधन, त्यासाठी संगतिकरण म्हणजेच संघटण नव्हे तर विघटण आणि त्याग म्हणजे लाच, प्रलोभन हे प्रकार सुरू आहेत. या सर्वांचे कारण देवतावादाची गळची समष्टिक अशी बैठकच ढासळली गेली आहे हे होय. या दृष्टीने या ग्रंथातील वैदिक देवता हे प्रकरण महत्त्वाचे आहे.

## यज्ञसंस्था

यज्ञसंस्थेच्या द्वारेच त्या वेळी देवतांचे समाराधन होत असल्यामुळे त्या वेळी आजच्याप्रमाणे स्त्री देवतांचा समावेश झालेला नव्हता. त्यांची फारशी आवश्यकताही त्या काळी नव्हती. कारण पुरुष वा स्त्री हा भेद मूळ शक्ति-स्वरूपाचा नसून तो शक्तीने स्वीकारलेल्या माध्यमाचा आहे. लिंगभेद हा उपाधिजन्य असल्याने निरुपाधिक अशा शक्तितत्त्वाला त्याची गरजही नव्हती मूळ शक्ति ही केव्हा पुरुषरूपाने तर केव्हा स्त्रीरूपाने प्रकट होत असली तरी स्त्रीत्व अगर पुरुषत्व यापासून ती शक्ति मात्र सर्वथैव अलिप्त असते काष्ठाच्या रूपाने प्रकट होणारा अग्नि जरी 'काष्ठं काष्ठं प्रतिरूपो बभूव' असा असला तरी काष्ठ म्हणजे अग्नि नव्हे हे व्यवहारात आपण पाहतोच. राजा सिंहासनावर बसला म्हणजे राजसत्तेचा त्याला पाठिंबा मिळत असला, तरी केवळ सिंहासन म्हणजे राजसत्ता नव्हे हे आपण सदैव लक्षात ठेवले पाहिजे. याच कारणासाठी वैदिक वाङ्मयात ज्या अर्थाने आज आपण स्त्रीदेवतेकडे पाहतो, त्या अर्थाने स्त्री देवतांचे वर्णन आढळत नाही आर्धी स्त्रीदेवता हा शब्दप्रयोगसुद्धा तितकासा बरोबर नाही. कारण देवता ही मूळात स्त्रीही नसते अगर पुरुषही नसते, ती शुद्ध शक्तिस्वरूप असते आणि शक्ति ही अमूर्त असल्याने ती ज्या माध्यमातून प्रकट होईल त्या माध्यमाचे गुणधर्म आपण आपल्या सोयीसाठी म्हणून तिच्यावर लादतो एवढेच. देवता या शब्दाचा अर्थसुद्धा 'देवानां समूह इति देवता।' असा त्या काळी अभिप्रेत होता देवांच्या समुदायाला देवता म्हणत असत देवांना जी तेजोमय करते ती शक्ति ही त्या देवापेक्षा वेगळी असणार हे उघडच आहे. वातीमुळे ज्योत प्रकाशित होत असली तरी वात म्हणजे ज्योत नव्हे किंवा ज्योत म्हणजे वातही नव्हे. वात वेगळी, ज्योत वेगळी, वैदिक देवता आणि त्यानंतरच्या पौराणिक देवता यांच्यामध्ये असणारा मूलभूत फरक वाचकांनी जर लक्षात ठेवला तरच त्यांना आपल्या पौराणिक वाङ्मयातून समाजाच्या उत्कर्षापकर्षांचा इतिहास हा बरोबर कळू शकेल

श्रद्धा याच्या बरोबरच संशोधकाची वस्तुनिष्ठ अशी एक स्वतंत्र बैठक प्राप्त झाली आहे.

## देवता पीठे

या ग्रंथात देवताच्या निरनिराळ्या पीठाबाबत माहिती दिली आहे. त्या त्या पीठाच्या माहितीबरोबरच त्याच्या निर्मितीचाही इतिहास सांगितलेला आहे. अर्थात हा इतिहास प्रायः उपलब्ध माहितीवरून लेखकाने दिला आहे. पीठ याचा अर्थ मुख्य शक्तिकेंद्र असा आहे. जी शक्ति प्रथम ज्या केंद्रातून प्रगट झाली ते त्या शक्तीचे मूळपीठ किंवा आद्यमठ होत. अशा अनंत शक्तींची अनंत पीठे या विश्वामध्ये आहेत. ज्याला जेथून प्रथम साक्षात्कार झाला त्याला ते त्या शक्तीचे पीठ आहे असे वाटू लागेल. अनंत शक्तींच्या अनंत उपासकाना अशी अनंत पीठे उपलब्ध झाली आणि नंतर त्या त्या पीठाचा म्हणून एक विशिष्ट असा संप्रदाय निर्माण झाला. जसे, कालिका देवी-कलकत्ता, कामाख्या (आसाम), तुळजा भवानी, ज्वालामुखी, रेणुका, सप्तशृंगी, मीनाक्षी, कामाक्षी, इ० पीठांचे संप्रदाय आणि भिन्नत्व हे जरी आज आपणाला दिसत असले, तरी या सर्वांचे मूळ कारण मात्र एकच आहे.

## एकतत्त्व आणि राष्ट्रीय एकात्मभाव

मूळ एकतत्त्व असताना त्याचा विस्तार मात्र अनेकांगी का व्हावा याचा विचार केला तर हा अनेकविध विस्तार मूळ त्या तत्त्वाचा नसून त्याच्या अंगोपांगाचा आहे व त्याही अंगोपांगाचा विस्तार त्या त्या भक्तांच्या प्रकृति-धर्मानुसार, देशकाल व परिस्थिति याना अनुसरून झालेला आहे हे लक्षात घेतले म्हणजे संप्रदाय भिन्न असले तरी त्या सर्वांचे अधिष्ठान एकच असल्याने सर्व संप्रदायामध्ये भ्रातृभाव हा असला पाहिजे. पण ज्या वेळी विभिन्न संप्रदायामध्ये कलह निर्माण झालेले दिसतात, त्याचे कारण त्यांच्या बुडाशी असणाऱ्या एक-तत्त्वाचे विस्मरण हेच होय. या ग्रंथात प्रतिपादन केलेल्या अनेक विषयाच्या बुडाशी हे एकतत्त्वाचे प्रधानसूत्र लक्षात घेतले म्हणजे हा ग्रंथ वाचकाच्या बुद्धीला, श्रद्धेला आणि भक्तीलाही आवाहन करणारा असा आहे हे कळून येईल. इतकेच काय पण भक्ति, बुद्धि आणि श्रद्धा ही जरी बाजूला ठेवली असली तरी मुद्दा राष्ट्रीय एकात्मभावानी जी प्रबलतम अशी प्रेरणा आपणाला मिळते ती या ग्रंथाचे सर्वोच्च असे यश आहे; एकमात्र प्रयोजन आहे. एकात्मतेचा तुटलेला धागा पुन्हा एकजीव करण्यासाठी आजच्या काळात या ग्रंथाचा विशेष उपयोग होण्यासारखा असल्याने या ग्रंथाचे कौतुक सर्वांनी करावे असे मनःपूर्वक आग्रहाने वाटते.

## मंत्र–तंत्र–यंत्र

अशा या ग्रंथात आद्य देवतेच्या अनुषंगाने जे अनेक विषय या खंडात प्रपंचिले आहेत, त्यांत मंत्र तंत्र-यंत्र हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. सर जॉन वुड्रॉफसारख्या पाश्चात्य ग्रंथकारांनी ज्या विषयावर अभ्यासपूर्ण हजारो पृष्ठे लिहिली त्या विषयासंबंधीचे आमचे ज्ञान तुलनेने पाहता सामान्य ज्ञानाच्याही कक्षेत न येणारे असे आहे. मंत्र-तंत्र-यंत्र यांची माहिती शास्त्रशुद्ध जर हवी असेल तर ती सहसा कोठे मिळत नाही. या विषयाचा साक्षात्कार झालेले लोक भेटणे त्याहून कठीण. ते असतील तेथे जाणे हे प्रायः न परवडणारे. अशा परिस्थितीत या विषयावरचे ग्रंथ जे हाती आले त्यांचा चिचकत चिचकत उपयोग करून घ्यावा लागला. कारण ग्रंथात लिहिलेल्या माहितीचा लेखकाला साक्षात्कार आहे की नाही याची खात्री नाही. स्वतः प्रयोग करून पहावा तर त्यासाठीही योग्य मार्गदर्शनाचा जाणवणारा अभाव. अशा परिस्थितीत या विषयावर काही लिहिणे दुर्लभ. पण प्रस्तुतच्या ग्रंथकर्त्यांनी ते प्रस्तुत विषयावरचे प्रमाणभूत असे विवेचन म्हणून केलेले नसून त्या विषयीसंबंधी स्वतःचे प्रांजळ विचार मुमुक्षु मांडले आहेत. म्हणून त्या प्रांजळ विचारांनाही एक महत्त्व प्राप्त झाले आहे.

तसे पाहिले तर या विषयावर आपल्याकडे पुष्कळच ग्रंथ आहेत, नाहीत असे नाही. पण सामान्य जिज्ञासूंना त्या ग्रंथात ग्रंथाच्या रहस्यासह प्रवेश करणे हे कठीण आहे. पारिभाषिक शब्दांच्या अर्थापासून अडचणींना सुरवात होते. स्थूलार्थ एक वेळ लक्षात आला तरी त्या त्या अर्थांच्या सूक्ष्म छटा नि लहरी या लक्षात येत नाहीत. केवळ स्थूलार्थावरून अभिप्रेत असणारा अर्थ कळतोच असे नाही. अर्थातच आपण एक अर्थ समजावा आणि अभिप्रेत अर्थ दुसराच असावा अशी परिस्थिति निर्माण होते. उदाहरणार्थ मंत्र हा घेतला तर याचा निश्चित अर्थ कोणता हे जर न कळले तर मंत्राच्या सामर्थ्याचा साक्षात्कार होणे कठीण आहे.

## मंत्र म्हणजे मनन

मंत्र या शब्दाचा अर्थ 'मननात् त्रायते इति मंत्रः।' या व्युत्पत्तीवरून ज्याच्या मननामुळे रक्षण होऊ शकते तो मंत्र. म्हणजेच मंत्र या शब्दात मनन हाच मुख्य अर्थ अभिप्रेत आहे. उच्चार हा दुय्यम आहे. मननाला दृढता आणण्यासाठी अंशतः उपकारक ठरेल या दृष्टीनेच ज्याचे मनन केले जाईल त्याचे उच्चारण करणे हे चांगले. याचा अर्थ मोठ्याने शब्दाचा उच्चार करणे आवश्यकच आहे असा नव्हे. म्हणजे मंत्रामध्ये शब्दांना महत्त्व नसून

मननालाच महत्त्व आहे. ज्या अर्थाचे आपण मनन करू त्या अर्थाला शब्द-स्वरूप दिले म्हणजे तो मंत्र झाला असे आपण समजतो आणि या समजुतीने मनातील तो विशिष्ट अर्थ व्यक्त करणारे ते शब्द वारंवार उच्चारले म्हणजे तो त्या मंत्राचा जप झाला असे समजतो. पण मंत्रविज्ञानाच्या दृष्टीने हा खऱ्या अर्थाने जप होत नाही. जपामध्ये शब्दाच्या आवर्तनापेक्षा अर्थाच्या आवर्तनाला अर्थातच अधिक महत्त्व आहे. अर्थाचे आवर्तन मनाची एकाग्रता झाल्याशिवाय कदापि होत नाही. शब्दाचे आवर्तन मात्र मनाच्या एकाग्रतेवाचून होऊ शकते आणि ज्या आवर्तनात मनाची एकाग्रता नाही अशा शब्दोच्चारणात अर्थातच मनाची शक्तीही संक्रांत होणार नाही. शक्तिसंक्रमण अनेकाग्रचित्ताने होत नसून ते जेव्हा केव्हा होईल तेव्हा ते एकाग्रचित्तानेच होईल, हा मानसशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. तेव्हा मंत्राच्या बाबतीत लक्षात ठेवण्यासारखी महत्त्वाची गोष्ट ही की, शब्दोच्चारण अनेकाग्रचित्ताने होते, तर एकाग्रचित्ताने अर्थाचे चिंतन घडते. म्हणूनच मंत्रामध्ये उच्चारण अभिप्रेत नसून तदर्थभावन हे अभिप्रेत आहे. हा आशय लक्षात घेतला म्हणजे मंत्रात सामर्थ्य कसे निर्माण होते याची उपपत्ति आपल्या लक्षात येऊ शकेल.

मंत्राचे सामर्थ्य म्हणजेच मनाचे सामर्थ्य आणि मनाचे सामर्थ्य म्हणजे मनात चालणाऱ्या विचाराचे सामर्थ्य होय. हे विचार ज्या वेळी शब्द हे स्वरूप धारण करतात त्या वेळी ते स्थूलस्वरूप होतात. शब्दावाचून जे विचार ते सूक्ष्म विचार. *विचार शब्दाच्या उपाधीत आले म्हणजे ते स्थूल* झाले. अर्थातच स्थूलामध्ये सूक्ष्मापेक्षा शक्ति कमी असते, हे ओघानेच आले. शब्दस्वरूप मंत्राच्या उच्चारापेक्षाही अर्थस्वरूप अथवा विचारस्वरूप मंत्रात सामर्थ्य हे नेहमीच अधिक असते. विचाराचे प्रचंड सामर्थ्य लक्षात आणूनच भारतीय तत्त्ववेत्त्यांनी वाईट शब्दापेक्षा वाईट विचार हे अधिक धोकादायक आहेत असा विस्मयजनक सिद्धांत पाच सहस्र वर्षापूर्वी मांडला आहे. माणसाने सदैव चांगलेच विचार करावेत, याचे कारण हेच की, विचारांचे सतत चाललेल्या चिंतनाचे केव्हा ना केव्हा तरी आचारात वा उच्चारात पर्यवसान झाल्यावाचून रहात नाही. उत्कृष्ट विचाराचे सामर्थ्य कोट्यावधि अणुबॉम्ब किंवा हायड्रोजन बॉम्बपेक्षा अधिक आहे हे आता पाश्चात्य वैज्ञानिक मान्य करू लागले आहेत. किंबहुना संहारासंबंधी चाललेल्या उत्कृष्ट विचारांचे मूर्त स्वरूप म्हणजेच ॲटम बॉंब होत असे म्हटले तरी चालेल. ॲटम बॉंब हा स्वतः तयार झाला नाही; तर तो ज्या बुद्धीने तयार केला ती बुद्धि त्या ॲटम बॉम्बपेक्षाही श्रेष्ठ नव्हे तर काय? जो ज्याला निर्माण करतो तो त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ असतो हे उघड आहे. ॲटमची निर्मिति बुद्धीनी आहे. बुद्धीची निर्मिति ॲटमने केलेली नाही हा

कार्यकारणभाव लक्षात घेतला म्हणजे विचारातील सामर्थ्याचा थोडासा बोध होऊ शकेल

## यंत्रविचार

यंत्र शब्दाचा थोडक्यात अर्थ आकृतिविशेष असा आहे विशेष आकाराने निर्माण केलेल्या बहुविध आकृतींना यंत्र अशी पारिभाषिक संज्ञा मंत्रशास्त्रामध्ये रूढ आहे. श्रीयंत्र, दत्तयंत्र इत्यादि अनेक यंत्रे आपल्याकडे प्रसिद्ध आहेत प्रसिद्ध देवतांच्या ज्या वेळी प्राणप्रतिष्ठा केल्या जातात, त्या वेळी ही विशेष आकाराने निर्माण केलेली यंत्रे त्या त्या देवतांच्या पीठाखाली आधी प्रतिष्ठित केली जातात व नंतर त्या यंत्रावर इष्टदेवतेची प्रतिमा प्रतिष्ठित करतात. देवतेच्या दृष्टीने पाहिले असता तिची यथार्थ प्रतिमा त्या यंत्रातच सामावलेली असते अशी धारणा आहे. यंत्रात असणारी यथार्थ प्रतिमा मग स्थूल प्रतिमेच्या रूपाने बनविली जाते. देव कळा ही प्रतिमेपेक्षाही तिच्या यंत्रात लवकर जागृत होते असा उपासकांचा अनुभव आहे. मूर्ति आणि यंत्र यामध्ये यंत्र हे महत्त्वाचे असून मूर्ति ही आपल्या स्थूल दृष्टीच्या सोयीसाठी आहे. म्हणून परंपरासिद्ध गायत्रीचे उपासक गायत्रीच्या मूर्तीपेक्षाही यंत्राचीच उपासना करतात. दैवी तत्त्वही यंत्रात सामावले असते म्हणून यंत्राला मंत्रोपासनेमध्ये मूर्तीपेक्षाही अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे निरनिराळ्या देवतांच्या निरनिराळ्या प्रतिमा ज्या आढळतात त्यांची उपपत्ति ही यंत्राच्या सहाय्यानेच लागू शकते, काही देवता अष्टभुजा, तर काही द्विभुजा वा चतुर्भुजाही असतात.

अशा त्या अनेक देवतांच्या अनेक प्रतिमा आपण पाहतो, त्यांची विविध वाहने, विविध आयुधे ही कोणी निश्चित केली? विशिष्ट देवतेची प्रतिमा विशिष्ट तऱ्हेची का असावी, त्यांची वाहने अशी चित्रविचित्र का असावीत? बरोबरच त्या वाहनांचा उपयोग त्या देवतांना होतो काय? उदाहरणार्थ, मूषक म्हणजे उंदीर हे गजाननाचे वाहन समजले जाते आता गजाननाच्या ठिकाणी असणाऱ्या अचिंत्य शक्तीचा विचार करता त्या शक्तीला उंदीर हे वाहन खरोखरी साजेसे आहे का? गजानन बरोबरीच त्या उंदरावर बसू शकेल का? आणि बसला तर त्याचा भार उंदराला पेलेल का? असे अनेकविध प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात व्यवहारालसुद्धा ज्या गोष्टी आपल्या बुद्धीला पटू शकत नाहीत त्यांची पौराणिक उपपत्ति, ही त्या उपपत्तीमागे असणारा सूक्ष्म असा कार्यकारणभाव लक्षात न आल्यामुळे त्या उपपत्तीने आपले समाधान होत नाही उघड उघड असंभाव्य वाटणाऱ्या या घटना मानायला आपले मन तयार नसले तरी परंपरागत संस्काराच्या आधारावर आपण

त्या तशा शरीर धरून चालतो  पुराणात सांगितले आहे  हाच एक निकष लावून आपण आपल्या मनाची सोडवणूक करून घेऊ पाहतो  पण हे काही खरे समाधान नव्हे  पिठात पाणी घालून दुधाचा आभास निर्माण करण्याने गन्या दुधाबद्दल जितके समाधान लाभेल तितकेच हे समाधान असेल  यासाठी यज्ञाची उत्पत्ति कोठून का व कशी झाली याचा वस्तुनिष्ठ विचार जो प्राचीन ऋषि मुनींनी केला त्याचाच परिचय करून घेणे आवश्यक आहे  या ठिकाणी यासंबंधी सांगोपांग विवेचन करणे अशक्य आहे  लेखकाने यासंबंधीच्या केलेल्या विवेचनाला शास्त्रीय उपपत्तीचाही आधार आहे हे सांगण्याइतपतच येथे केलेल्या विवेचनाची दिशा किंवा कक्षा अभिप्रेत आहे

प्राचीन परंपरा लुप्त झाल्यामुळे  आज  अनेक शब्दांचे मूळ अभिप्रेत असणारे अर्थ कळेनासे होऊन बसले आहेत त्यामुळे मंत्रशास्त्रातील शास्त्रशुद्ध प्रक्रिया लक्षात येऊ शकत नाही  असे अनेक शब्द आहेत की ते ज्या मूळ अर्थाने निर्माण झाले त्या अर्थाची परंपरा खुंटल्यामुळे त्या शब्दांचे नुसते वाच्यार्थच शिल्लक राहिले  वाच्यार्थापेक्षाही अभिप्रेत असणारा अर्थ या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा असतो आपल्या उपासना पद्धतीत भूतशुद्धि, न्यासविधि, प्राण प्रतिष्ठा, अंतर्मातृकान्यास, बहिर्मातृकान्यास वगैरे अनेक गोष्टी आज कळेनाशा झाल्या आहेत न्यास शब्दाचा अर्थ घेतला तर तो नुसता ठेवणे असा आहे पण हे कशाचे ठेवणे हे बरोबर लक्षात न आल्याने न्यासविधि करूनही त्याचा उपयोग दिसत नाही  दिग्बंधन हा असाच एक शब्द आहे  आपण कर्म करीत असताना कोणत्याही स्वरूपाचे संकट येऊ नये म्हणून ज्या दिशा कडून संकट येण्याचा संभव असतो, अशा सर्व दिशांचे बंधन करावे असे सांगितले आहे हे दिशांचे बंधन केवळ संकल्पशक्तीच्या साहाय्यानेच करावयाचे आहे आणि संकल्पशक्ति चित्त निर्मल झाल्याशिवाय प्राप्त होत नाही केवळ मुखाने मंत्र म्हणून दिग्बंधन होत नाही  आणि म्हणूनच दिग्विमोचनही होऊ शकत नाही लक्ष्मण-रेषा हा असाच एक शब्द आहे लक्ष्मणाने जमिनीवर काढलेली रेषा ही लक्ष्मण-रेषा हा झाला केवळ शब्दार्थ पण रावणासारखा प्रचंड दैत्य, त्यालाही त्या रेषेचे उल्लंघन करण्याचे धैर्य झाले नाही  हा लक्ष्मणाच्या संकल्पशक्तीचा प्रभाव  भूतशुद्धि हा शब्दसुद्धा असाच आहे स्वतः शुद्ध झाल्याशिवाय, भूतशुद्धि होऊ शकत नाही

साहाय्याने प्रथम मनावर आणि नंतर मनाच्या साहाय्याने चराचरावर प्रभुत्व निर्माण करणारे शास्त्र हे परंपरेच्या अभावी आज अडगळीत पडल्यासारखे वाटावे हे सहजच आहे. भौतिक जीवन जगता यावे म्हणून आपण श्रम करतो आणि त्या श्रमाच्या मोबदल्यात आपण कसेबसे जगतोही. पण ते नुसते जगणे होय. पण जिवंत जाणिवेने जर जगावयाचे असेल, तर भौतिक प्रयत्नाबरोबरच आधिभौतिक प्रयत्नसुद्धा तितकेच जरूरीचे आहेत. आज अधिभौतिक प्रयत्न नसल्यामुळे मानवाचे जीवन पोकळ झाले आहे. आधारशून्य झाले आहे यासाठीच मंत्र-तंत्र यंत्राच्या परंपरेकडे वळणे जरूर आहे. आपल्या मनात जे असंख्य विचार निर्माण होतात, त्या प्रत्येक विचाराच्या प्रत्येक परमाणुगणिक आपली मन शक्ति ऱ्हास पावत असते या शक्ति-नाशाबरोबरच आपले भौतिक सामर्थ्यसुद्धा तेवढ्या प्रमाणात नाहीसे होते. अतिसूक्ष्मत्वामुळे आपल्या हे ध्यानात येत नाही एवढेच जो विचार कृतीत आला नाही, त्या विचाराने तेवढ्यापुरती मानसिक शक्ति नष्ट होते असा सिद्धांत आहे आणि असे कृतीत न येणारे असंख्य विचार आपण पावलापावला गणिक करीत असतो सवयीमुळे आपल्या ते ध्यानात येत नाही पण मंत्रोपासना करणाऱ्यास एकही विचाराचा परमाणु निरर्थक होणार नाही, याबद्दल कटाक्षाने जपावे लागते. त्याकरिताच मौनाचे महत्त्व सांगितले आहे मन संयम, वाक्-संयम आणि सर्वेंद्रिय-संयम जर साधला तरच मंत्र तंत्राच्या योगाने आपण स्थूलाबरोबरच सूक्ष्मावरही प्रभुत्व मिळवू.

असंप्रज्ञात समाधीमध्ये गेल्यानंतर जे एतद्विषयक म्हणजे यंत्र-तंत्र-मंत्रा संबंधी जे ज्ञान झाले तेच ऋषींनी लोककल्याणार्थ लिहून ठेवले. सूक्ष्म सृष्टीतील ज्ञान स्थूलसृष्टीत वावरणाऱ्या माणसांना म्हणूनच कळत नाही. व्यक्तीचे ज्ञान अव्यक्ताशिवाय पूर्ण होत नाही. म्हणून सूक्ष्म सृष्टीत म्हणजेच अव्यक्तातील पार्श्वभूमि समजून घेण्यासाठी या यंत्र-मंत्राच्या अर्थाकडे लक्ष दिले पाहिजे

यंत्राची निर्मिति ही सूक्ष्मातून झालेली आहे आणि ती नेहमीच तशी होते. ती कशी होते, केव्हा होते हे लक्षात घेतले म्हणजे मग यंत्राचे महत्त्व किती आहे हे लक्षात येते यंत्र हे एक आयतन आहे. आयतन म्हणजे आधार मंत्रातून निर्माण होणाऱ्या शक्तीचे यंत्र हे आधार आहे. जसे ज्योतीला निरंजनाचे, सूर्याला अवकाशाचे, पाण्याला सागराचे त्याचप्रमाणे. आता या दृष्टीने विचार केला तर सौरशक्तीचे आकाश हे यंत्रच म्हणावे लागेल फरक एवढाच की, आकाश आपणाला प्रत्यक्ष दिसते आणि सूर्यही तर मंत्राच्या बाबतीत शक्ति सूक्ष्म, तसे तिचे आयतनही सूक्ष्म. पण सूक्ष्म असले तरी आयतनावाचून मात्र शक्ति कार्यकारिणी होऊ शकत नाही एरव्ही 'हृ पद्,

वषट्' इत्यादि मंत्र म्हटले म्हणजे याच अर्थाच्या मंत्राचा पाठ घेतला तरी त्यांचा उपयोग होत नाही असा आपला अनुभव. उपयोग न होण्याचे कारण 'हू, फट्, स्वाहा व वषट्' इत्यादि मंत्रातून निर्माण होणाऱ्या शक्तीला पेलेल अशा यंत्राची निर्मिति झालेली नसते हेच होय. याबद्दलचे मूलगामी विवेचन कृष्ण-यजुर्वेद आयतन सूत्रामध्ये आहे.

या सर्वांचा मुख्य आशय हा की, यंत्र हे त्या त्या शक्तीचे अधिष्ठान होय म्हणजे त्या त्या शक्तीला अधिष्ठित करणारे प्रमुख असे आश्रयस्थान हे ओघानेच आले म्हणूनच अनेक देवतांबरोबर अनेक यंत्रेही निर्माण झालेली आहेत आणि ते योग्यच आहे तसे पाहिले तर व्यवहारातसुद्धा जिकडे तिकडे अनेकविध यंत्रे आपण निर्माण केलेली दिसतील यंत्रावाचून व्यवहारात एक पाऊलही आपले पुढे पडणार नाही फार काय, आपण बाजारात जातानासुद्धा भाजी आणावयाची म्हटले, तर ती ज्यात राहू शकेल अशी पिशवी घेऊन जातो पिशवी भाजीच्या रूपाने घनीभूत झालेल्या शक्तीचे एक यंत्रच होय पाणी पितांना आपण जे भांडे वापरतो तेही त्या जलशक्तीचे यंत्रच होय. प्रत्येक लहानमोठा पदार्थ आपण जेथे जेथे ठेवू ते ते स्थान त्या त्या पदार्थांचे यंत्रच म्हटले पाहिजे तात्पर्य, कोणतीही वस्तु घेतली तरी ती निराधार राहू शकत नाही हा व्यवहारात येणारा अनुभव लक्षात घेतला म्हणजे आध्यात्मिक क्षेत्रातील यंत्राची उपपत्ति आपल्या बरोबर लक्षात येऊ शकेल व्यवहार आणि अध्यात्म यात फरक एवढाच की, व्यवहारातील पदार्थ आणि त्याचे आश्रयस्थान या दोन्ही गोष्टी आपणाला प्रत्यक्ष दिसू शकतात, तर आध्यात्मिक क्षेत्रातील शक्ति आणि तिचे आश्रयस्थान या दोन गोष्टी सूक्ष्म असल्यामुळे स्थूल स्वरूपात दिसू शकत नाहीत विजेचा प्रकाश दिसत असला तरी तिचा प्रत्यक्ष प्रवाह मात्र दिसत नाही दिसणाऱ्या प्रकाशावरून न दिसणाऱ्या प्रवाहाचे आपण अनुमान करतो आध्यात्मिक क्षेत्रातसुद्धा ती ती दैवी शक्ति प्रत्यक्षात दिसत नसली तरी तिच्या परिणामावरून तिच्या अस्तित्वाचे अनुमान करावे लागते परिणाम प्रत्यक्ष तर शक्ति अप्रत्यक्ष आणि शक्तीचे अस्तित्व मान्य केल्यावर तिच्या आधाराचेही अस्तित्व आपोआपच मान्य करावे लागते आपण ज्या अर्थी जिवंत आहोत त्या अर्थी आपणामध्ये आत्मशक्ति अथवा चैतन्यशक्ति आहे हे आपोआपच सिद्ध होते आता ही आत्मशक्ति 'अणोरणीयान् महतो महीयान्' अशी विभु आणि सर्वव्यापक आहे परंतु ती ज्या वेळी प्रगट होते त्या वेळी कोणत्या ना कोणत्या माध्यमातूनच प्रगट होते हे माध्यम त्या त्या शक्तीचे यंत्र होय आपला देह याला भोगायतन असे एक नाव आहे. आत्मशक्तीचे भोग घेण्याचे साधन म्हणून या पांचभौतिक देहाची निर्मिति झाली. शरीर हे यंत्र आणि त्यामध्ये राहणारा

जो शरीरी म्हणजे आत्मा ती शक्ति अशी यंत्र आणि शक्ति यांची वैज्ञानिक उपपत्ति आहे ही उपपत्ति लक्षात घेतली म्हणजेच आपल्या देवताची प्रतिष्ठापना करते वेळी अगोदर यंत्राची प्रतिष्ठापना का करावी लागते हे लक्षात येईल.

यंत्राच्या माध्यमाने ज्या वेळी आपण एखाद्या शक्तीला वश करू पाहतो त्या वेळी त्या शक्तीला अनुरूप असे यंत्रही अगोदर निर्माण करावे लागते हे लक्षात घेऊन जर उपासकाने यंत्रमयी देवता प्रसन्न केली तर ती त्याला लाभदायक ठरते नपेक्षा आधारावाचून प्रकट झालेली शक्ति मिळेल त्या आधाराचा उपयोग करील इंधनाची व्यवस्था न करता प्रज्वलित केलेला अग्नि हा जसा मिळेल त्याचे भस्म करील, तद्वतच अविधि उपासनेने जागृत होऊ पाहणारी देवताशक्ति हिचेही आहे. ती प्रसंगी उपासकावरच उलटण्याचा संभव यामुळेच असतो समुद्रातून प्रचंड आगबोट जाऊ शकते पण लहानसा पाषाण मात्र बुडतो यात आगबोट का तरंगते आणि पाषाण का बुडतो याची जी वैज्ञानिक उपपत्ति आहे तीच यंत्र मंत्राचे बाबतीतही आहे पूर्ण सृष्टीतीलच कार्यकारणभाव सूक्ष्म सृष्टीतही तसाच असतो कार्यावरून कारणाकडे जाण्याचा मार्ग भौतिक शास्त्रज्ञ अनुसरतात, तर कारणावरून कार्याकडे जाण्याचा मार्ग अध्यात्मशास्त्रज्ञ अनुसरतात. एवढाच दोघामधे फरक आहे म्हणूनच आपल्याकडे यंत्र मंत्र-तंत्र याचा विचार हा अतिसूक्ष्म कार्यकारणभावावर आधारलेला असल्याने तो कार्यकारणभाव जसाच्या तसा समजून घेऊन उपासना केली तर आजही त्या त्या देवता ते ते यंत्र, ती ती यंत्रे आणि तंत्रे यांचा उपयोग केवळ वैयक्तिक पातळीवरूनच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवरूनही त्यांचा आजही उपयोग होण्यासारखा आहे

पूर्वा राजकारणामध्ये या मंत्र-तंत्राचा उपयोग ऋषिमहर्षींनी अनेक वेळा केलेला आहे विश्वामित्रासारखा तप सुंदर सम्राटाचे स्वागत वसिष्ठांनी जे आपल्या पर्णकुटीत त्याला शोभेसे केले तेही याच यंत्र मंत्र-तंत्राच्या बळावर होय आजही तंत्र विद्या भारतात लुप्त झाल्यामुळे भारतानी एक शक्ति नाहीशी झाल्यासारखी झाली आहे प्राचीन परंपरामध्ये त्या त्या राष्ट्राच्या अस्मितेचे बीज असते ते बीज ती ती राष्ट्रे प्राणपणाने संरक्षण करताना दिसतात भारतात मात्र आपल्या परंपराबद्दल आपण अत्यंत उदासीन आहोत या आपल्या औदासीन्याचा फायदा जगातील इतर राष्ट्रे घेतल्यावाचून कशी राहतील! आपल्या पूर्व परंपरांची आपल्याला ओळख होऊन पूर्ववत् आपल्या तपोभवाने भारत विलसू लागावा या दृष्टीने या यथामध्य लेखकाने यंत्र तंत्र-मंत्राच्या बाबतीत केलेला उहापोह अभिनंदनीय आहे.

तंत्र–विचार

आता मंत्र-यंत्रानंतर तंत्राचा विचार. यंत्राला स्थैर्य निर्माण करणारे ते तंत्र. यंत्राच्याद्वारे मंत्रामध्ये सामर्थ्य निर्माण करणारा जो अवांतर तपशील असतो त्याला तंत्र असे म्हणता येईल. एखाद्या मंत्राची उपासना ज्या विशिष्ट पारंपरिक पद्धतीने केली जाते त्या पद्धतीला तंत्र असे म्हणतात. तंत्र जर नसेल तर मंत्र-यंत्राचा सिद्धीचे दृष्टीने काहीही उपयोग नाही. किंबहुना मंत्र-यंत्रापेक्षाही एका दृष्टीने तंत्र हे प्रधान मानावे लागेल. आमच्या माहितीत असे अनेक लोक आहेत की, ज्यांना तंत्र माहीत नाही आणि तरीही गुरुचरित्र, सप्तशती इत्यादि ग्रंथांची, सप्ताह पारायण पद्धतीने उपासना करतात, परंतु त्याना त्यांचा अनुभव मात्र येत नाही; कारण एकच, तंत्राचा अभाव. गुरुचरित्र हे केवळ वाचावयाचे नसून ते विशिष्ट पद्धतीने वाचले तरच त्याचा उपासनेत अंतरभाव होतो. मंत्रातील सामर्थ्याकरिता विशिष्ट पद्धतीनेच उच्चारण व्हावे किंवा करावे असा नियम आहे. तो न पाळता ' मनःपूतम् समाचरेत् ' अशा पद्धतीने जर कोणताही मंत्र अगर ग्रंथ आपण वाचला अगर म्हटला तर त्याचा लाहसा उपयोग होत नाही. यासाठी आपल्याकडे गुरुपरंपरेचे महत्त्व मानले गेले आहे. आणि तंत्रविद्या ही बव्हंशी गुरुपरंपरेने चालत आलेली असल्याने तिचा ग्रंथामध्ये फारसा समावेश हेतुतःच केलेला नाही. कारण तंत्रविद्याही अधिकारी लोकांच्याच ताब्यात गेली तर तिने विश्वकल्याण करता येते व अयोग्य माणसाचे हाती गेली तर विश्वाचे अकल्याणही होऊ शकते; यासाठीच समाजातील जबाबदार लोकांनी ही तंत्र-विद्या मुद्दाम गुप्त राखली. ज्याची पात्रता वाढली असेल त्याला गुरुमुखातून मिळावी अशी व्यवस्था मुद्दाम करण्यात आली.

राष्ट्राच्या संरक्षणयोजनेत लष्कराइतकेच या तंत्रविद्येचे महत्त्व पूर्वी मानीत असत. चाणक्याचे मत याबाबतीत प्रमाण म्हणून मानता येईल. राजाचा प्रधान या मंत्र-तंत्र-यंत्रात प्रवीण असावा लागे. सगळ्याच गोष्टी शस्त्रबळाने होतात असे नाही. शस्त्रबळापूर्वी तंत्राचा वापर करण्यात येत असे. ही सर्व मूळ परंपरा लक्षात घेतली म्हणजे आज मंत्राचा जो अनुभव येत नाही त्याचे कारणही आपल्याला कळू शकेल. केवळ मंत्र हा बंदुकीच्या काडतुसाप्रमाणे आहे. नुसत्या काडतुसांनी शत्रुवध होत नसतो. यासाठी बंदुकीची गरज आहे. तसेच नुसत्या मंत्राने कार्यसिद्धि होत नसून तंत्राचीही तितकीच गरज आहे, हे अवश्य लक्षात ठेवावे.

यंत्र आणि तंत्र यात दुसरा महत्त्वाचा फरक हा की, यंत्राचा दिक् तत्त्वाशी संबंध असतो तर तंत्राचा कालतत्त्वाशी संबंध असतो. दिक्तत्त्वापेक्षा कालतत्त्व हे अत्यंत व्यापक असे आहे. त्यामुळे तंत्राचा उपयोग भविष्य काळातही होऊ शकतो;

तेव्हा दिक्तत्व आणि कालतत्त्व यांचा योग्य तो समन्वय घालून जर वर्तमानकाळी मन्त्राची उपासना केली तरच ती पुढे यथाकाल फलप्रद होईलच होईल. अशा या तन्त्राचा सविस्तर ऊहापोह येथे करणे शक्य नाही. कारण तन्त्रविद्या ही अनेक प्रकारची असून प्रत्येक मन्त्रागणिक ती बदलणारी आहे. ज्याला ज्या मन्त्राची उपासना करावयाची असेल त्याने त्या मन्त्राचे तन्त्र हे अधिकारी माणसाकडून समजून घेऊन मगच ती करावी. केवळ साधनसामुग्री असली तरी तिचा उपयोग कसा करावा हे जर माहीत नसेल तर त्या साधनसामुग्रीचा काहीही उपयोग होत नाही, हे व्यवहारातही आपण पाहतोच. आध्यात्मक्षेत्रांतही ते तितकेच लागू पडते. अशा या तन्त्र विद्येचा उल्लेख या मथात नामत लेखकाने केलेला आहे. त्याच्यावरून वाचकांशी जिज्ञासा अधिक जागृत झाली तरीसुद्धा फार मोठे कार्य होईल.

तन्त्रविद्येची परंपरा लुप्त झाल्यामुळे त्यामागे असणाऱ्या प्रचंड सामर्थ्यालाही आज राष्ट्र वंचित झाले आहे. आपली अस्त्रविद्या तन्त्रविज्ञानावर अधिष्ठित होती. कोट्यावधी रुपये खर्च करून प्रचंड संहारासाठी जो अणुबॉम्ब तयार केला त्याने संहार निश्चित होईल. पण शत्रूबरोबरच मित्राचाही संहार केल्याशिवाय रहाणार नाही उलट एकाद्या अस्त्राने जो संहार होईल तो केवळ शत्रूचाच होईल. मित्राचा होणार नाही हा अणुबॉंब आणि अस्त्र यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. केवळ मन सामर्थ्याच्या जोरावर विशिष्ट अशा अक्षराच्या उच्चारमात्रेकरून शस्त्राचे कार्य करणारी तन्त्रविद्या ही प्राचीन भारतीयांची फार मोठी देणगी आहे. अशा अपूर्व तन्त्रविद्येचा अभ्यास आपण केला नाही तरी पाश्चात्य राष्ट्रातील विद्वानाचे लक्ष या उपेक्षित तन्त्राकडे वळले आणि त्याचा सखोल अभ्यासही त्यांनी केला. अशा अभ्यासामध्ये प्रसिद्ध पंडित जॉन वुड्रॉफ यांची गणना अवश्य करावी लागेल. तन्त्रविद्येचे अचूक मर्म प्रगट करताना ते आपल्या तन्त्राचे तत्त्व ( प्रिन्सिपल ऑफ तन्त्र ) नामक मथात पुढील-प्रमाणे उद्गार काढतात

" Sadhana which is of three kinds, physical, verbal and mental, must be accomplished by the body, senses, and intellect according to present condition of the country, time and person These, however, are all now dead India which has for centuries eaten the bread of servitude to strangers, is to-day filled with persons born of parents to different castes, foreigners, defiled people and adherents of their religious faiths Bad and filthy habits and practices oppressions, license and prostitution prevail

In the impure body, lust, anger, pride, delusion and envy centered as upon a battle field. Restless are the persons, and doubting the heart. The circumstances, of the true render the carrying out of the Vaidik rites and disciples impossible. The Aryan life no longer exists in which every event from the conception in the womb to cremation of the body was accomplished by Vaidik Mantras. A hevenly body which through control of passion has become a suitable vehicle for the development of Brahma Knowledge according to Vaidik rules is now-a-days impossilde achivement."

(Principle of Tantra by John Wodroff, Ed. 1952, pp 102.)

हे उद्गार अत्यंत मननीय असेच आहेत. जॉन वुड्रॉफसारख्या पाश्चात्य पंडिताच्या चिकित्सक दृष्टिकोनातून तंत्रासंबंधीचे हे विचार प्रगट झाले आहेत. हे विचार प्रगट करताना या विचाराची पार्श्वभूमि जी उपनिषदे, त्यांचाही अभ्यास जॉन वुड्रॉफने केलेला असावा. कारण या विचारात उपनिषदात सांगितलेल्या मनाच्या वैज्ञानिक पृथक्करणाचाच काय तो अनुवाद आहे. जॉन वुड्रॉफ याने यात नवीन असे काहीही सांगितलेले नाही. फक्त भारताच्या वैचारिक परंपरेची ओळख पाश्चात्य जगाला यथार्थ स्वरूपात करून देण्याचा त्याचा हा एक प्रयत्न होता आणि तो प्रामाणिक होता. एवढ्यासाठीच जॉन वुड्रॉफ याचे अभिनंदन केले पाहिजे. तंत्रासारख्या सूक्ष्म आणि क्लिष्ट विषयाच्या अभ्यासात वर्षानुवर्षे खर्च करून भारतीयांचे विचारधन स्वभाषेच्या द्वारा पाश्चिमात्य जगाला देणाऱ्या जॉन वुड्रॉफसारख्या पंडिताचे खरोखरच कौतुक करावे तेवढे थोडे. त्याच्या वरील उल्लेखिलेल्या उद्गारात मनासंबंधी, वातावरणासंबंधी, देशकाल आणि पवित्र अंतर्बाह्य शुद्धता याविषयी त्याने प्रगट केलेले विचार अत्यंत महत्त्वाचे आणि भारतीय तंत्रशास्त्राचे हृद्गत प्रगट करणारे आहेत. तंत्रविद्या ही ज्या अनेक गोष्टींवर अवलंबून आहे त्यात प्रमुख मन, देशकाल आणि पवित्रता व वातावरण यांचा समावेश होतो. मागे सांगितल्याप्रमाणे दिक्तत्त्व आणि कालतत्त्व ही या देशकालादींचे संबंधित आहेत. तंत्रविद्येत या दोन्ही तत्त्वांचा एकाच वेळी उपयोग करता येणे हे महत्त्वाचे आहे. एकाच वेळी शरीराचे योगे दिक्तत्त्वात आणि मनाच्या योगे कालतत्त्वात संचार करण्याचे अद्भुत सामर्थ्य या तंत्रविद्येमुळेच प्राप्त होते. त्याचा व्यवहारातही उपयोग व्हावा या उद्देशाने कोणतेही कर्म करीत असताना आधी पंचांगशुद्धि करावी असे आपल्या शास्त्रकारांनी सांगितले आहे. भूतशुद्धि व इतर न्यासादि क्रिया या

तंत्रविद्येतूनच आपल्या दैनंदिन दिनचर्येमध्ये पाठाळीच समाविष्ट केल्या गेल्या आहेत ही पचांगशुद्धि म्हणजे शक्तिसंचयाचे महान केन्द्र होय शक्तिकेंद्र ( पॉवर हाऊस ) ज्याला म्हणता येईल असे आहे असे हे शक्तिकेंद्र जर अगोदर निर्माण केले असेल तरच त्या केंद्रातून पुढे जाता सिद्धीच्या सरिता प्रकट होतात

उत्क्रांति ! समाजाची–देवताची

या ग्रंथात अभ्यासू वाचकाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची चर्चा केली आहे आमच्या समजुतीप्रमाणे या विषयावर एकत्रित माहिती असणारा मराठीतील हाच ग्रंथ असावा. देवतावादाचा क्रमवार विचार करताना देवताच्या उत्क्रांतीबरोबरच तत्कालीन समाजाच्या आचारविचाराचाही आपणाला परिचय घडतो त्या वेळच्या सामाजिक आणि राष्ट्रीय उत्कर्षाच्या मूलभूत इतिहासाशीही देवतासंबंध आहे केवळ देवताच्या कल्पनेवरूनही त्या त्या राष्ट्राची वैचारिक प्रगति वा परागति ही आपणाला कळू शकते सेमेटीक पंथ हा ग्रासकरून पश्चिम गोलार्धातील, विशेषत युरोपातील, लोकाचा आहे सेमेटीक पंथ एकेश्वरी पंथ आहे त्याचा एकेश्वरी आणि भारतीय लोकही सर्व चराचराच्या बुडाशी एकच परमात्मशक्ति मानतात, परतु आपण भारतीय तत्त्व मानत असलो तरी युरोपीय लोकाच्या एकेश्वरी कल्पनेपेक्षा आपल्या एकतत्त्वाच्या कल्पनेत कितीतरी अधिक पटीने सर्वसमावेशक वृत्ति असल्याचेच आढळून येईल ' जे जे भेटले भूत ते ते मानीजे भगवत ' अशी भगवताची सर्वव्यापक कल्पना केल्यामुळे ती वस्तुनिष्ठ तर आहेच, परतु विज्ञानगम्य आणि परस्पर द्वेषाला थारा न देणारी अशी आहे अशा या भव्योदात्त तत्त्वप्रणालीमुळेच आजवर भारतावर जी जी धार्मिक आक्रमणे झाली ती सर्व पचनी पाडून आत्मसात करून पुन्हा ' कृण्वन्तो विश्वमार्य ' अशी भारतीय जिद्द बाळगू शकले

भारताबाहेरसुद्धा ! पूर्व गोलार्ध

आर्य शनीचा विश्वसंचार कसा झाला याचे विवेचन करताना लेखकाने परिश्रमपूर्वक जे संकलन केले आहे ते अत्यत मौलिक स्वरूपाचे असे आहे उदाहरणार्थ या ग्रंथातील बाली हे देवाचे बेट हे प्रकरण मूळातून संपूर्ण वाचण्या सारखे आहे ( ही प्रकरणे पुढील खडात येतील )

याहून अधिक महत्त्वाचे आणि भारतीय संस्कृतीचा विश्वविस्तार व्यक्त करणारे बाल्मीकीज संस्कृतीमधील विवेचन पुढील परिच्छेदात पहा

'धार्मिक आचारविचाराचे मंत्र जुन्या जवानीज अथवा बाली भाषेत आहेत. त्याला कविभाषा असे म्हणतात. ज्याला संस्कृत भाषेचे ज्ञान आहे त्याने हे मंत्र सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास त्याला असे आढळून येईल की, त्यातील प्रत्येक शब्द संस्कृत असून त्याचा अपभ्रंश तेथील भाषेत झालेला आहे. तेथील लोक शैवपंथीय असल्याने अर्थातच शंकरासंबंधी मंत्राचा भरणा जास्त आहे. आपण आता काही उदाहरणे पाहू.

ॐ प्रणम्य भास्कर देवम् । 'सर्वक्लेशविनाशनम् ।।
परमादित्यशिवार्थम् । भुक्तिमुक्तिवरप्रदम् ।।

हा मूळ संस्कृत मंत्र बाली भाषेत अपभ्रंश पावून आज त्याचे रूपांतर कसे झाले ते पहा.

Wong perenamia parenabiem
Sarwa kalesa winasajem
Perenamija raksa sanem
Beota Boeti para namem

हा दुसरा मंत्र पहा, गंगा सिंधु सरस्वती या नद्यासंबंधीचा आहे.

ॐ गंगा सरस्वती सिंधु. । विपसा कौशिकी नदी ।
यमुना महती श्रेष्ठा । शरयुश्च महानदी ।।
बाली भाषेतील त्याचा अपभ्रंश पहा.

Wang Ganga Sarasoewati Sindoe, Sepakorshi kivandem, Jamoe gama Jammanden Sawa joentja manandea .

कित्येक ग्रामीण पुजाऱ्याना याचा अर्थ मात्र सांगता येत नाही व विपरीत अर्थ सांगितला जातो. कसा तो पहा. गंगा सरस्वती या कोणी भारतामधील म्हणजे मूळ वसतीस्थानातील पवित्र नद्यांचे स्मरण आहे हे ग्रामीण पुजारी लोकांना माहीत नसल्याने ते कोणीतरी भयंकर राक्षस क्रूर राक्षस आहेत आणि त्यांचे निर्दालन करण्यास यमुना हा कोणी देव आला आहे असा अर्थ सांगतात. याचे कारण इतकेच की, जैमा हा त्याच्या ओळखीचा एक देव आहे.

पश्चिम गोलार्ध

आता पश्चिम गोलार्धातील देवता प्रकरणातील हा परिच्छेद पहा.

'...त्रेता, द्वापार, कलियुगाप्रमाणे चार युगाच्या कालमापनावर संपूर्ण श्रद्धा ठेवणारे गुरुकुल संस्था, सोम-भाग, इंद्र-गणेशादि देवतांचे पूजन करणारे

भारतीय, नृत्यकलेतील अंगविक्षेप नित्यश: कृतीत उतरविणारे, जन्म–मृत्यु व विवाहसंस्थेचे भारतीय नियम पाळणारे, सती देवीदासींच्या रूढी आचरणारे आणि भारतीय कथा-पुराणावर विश्वास ठेवून ते श्रद्धने ऐकणारा जनसमुदाय दक्षिण अमेरिकेमध्ये पाहिल्यावर कोणत्याही संस्कृतीतील सूज्ञ इसम आपले असेच मत प्रदर्शित करील की, भारतीय आर्यांनी अमेरिका हे खंड प्रथम शोधून काढून तेथे आपली वसाहत स्थापन केली.'

एकात्मतेसाठी आवाहन !

या व अशासारखे अनेक परिच्छेद या ग्रंथात पानोपानी सापडतात. केवळ ऐतिहासिक म्हणूनच नव्हे, तर राष्ट्रीय पुनर्जीवनाच्या दृष्टीने अलीकडच्या काल-खंडात राष्ट्राचे प्रबोधन करणारा एवढा समर्थ ग्रंथ आमच्या तरी पहाण्यात नाही. या ग्रंथाचा परिचय करून देण्यासाठी आम्ही उद्युक्त झालो खरे, परंतु यथार्थ परिचय होण्यासाठी अभ्यासूंनी हा ग्रंथ आरंभापासून शेवटपर्यंत क्रमाने तीन वेळा तरी वाचायास हवा. या ग्रंथात आलेल्या विषयांची नुसती नामावली जरी पाहिली तरी या ग्रंथाची व्याप्ति आपणाला कळून येईल.

भारतातील व्यासंगी विद्वानांची परंपरा हळूहळू कमी होत चालली आहे. प्राचीन परंपरेतील ऋषिमुनि आणि योगी, तपस्वी, ज्ञानी असे महापुरुष आज पाहण्याचे भाग्य लाभत नाही. अशा या उदित्त माहेश्वर वैभवाने विभूषित झालेल्या ज्या काही थोड्या विभूति आज आहेत, त्यात न्यायरत्न विनोद हे एक, श्रीमद्योगींद्रावर वासुदेवानंद सरस्वती, श्री गुळवणी महाराज, ज्ञानमूर्ति पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, साक्षात् दत्त श्री आत्मरंगरंजित रंगावधूत महाराज, गायत्री कृपापांग प्रकटीत आत्मवैभव श्रीविराजित मोरेश्वर नारायण तथा बाबा कीर्तिकर, एके काळचे राष्ट्रपति सर सर्वपल्ली राधाकृष्णन्, महामहो-पाध्याय दत्तो वामन पोतदार, म. म. मिराशी, म. म. बाळशास्त्री हरदास, वासुदेवशरण अग्रवाल, कविराज गोपीनाथ भार्गव पं. राजराजेश्वरशास्त्री द्रवीड आणि इतर असंख्य अशा विभूतींमुळेच महाराष्ट्राला आणि भारताला खरा मोठेपणा प्राप्त झालेला आहे. अशा मोठेपणात भर घालणारे आणखीही अनेक असतील. भारताची थोर वैचारिक परंपरा अक्षुण्ण राखण्याचे कार्य ज्यांनी ज्यांनी केले, त्याचे त्याचे जीवन हे एका व्यक्तीचे जीवन नसून ते राष्ट्राचे जीवन आहे. अशा राष्ट्र-जीवनाचा परिचय होण्यासाठी हा व अशासारखे ग्रंथ आजच्या तरुण पिढीने अवश्य अभ्यासिले पाहिजेत. चालू व भविष्य काळातील अनंत पिढ्यांना अनंत काळ स्फूर्ति देणारा असा हा प्रस्तुतचा ग्रंथ लिहून आमचे स्नेही कविराज ऊर्फ दादा देसाई, यांनी मराठी सारस्वतात फार मोठी भर घातली आणि या

विषयावर एकत्रित आजवर नसलेली माहिती परिश्रमपूर्वक संकलीत करून मराठी सारस्वतातील फार मोठी उणीव भरून काढली असे म्हणणे म्हणजे हा मितोद्‌गार होय. इतर कोणत्याही भाषांतून या स्वरूपाचा ग्रंथ नसावा असे म्हटले तरीसुद्धा चालेल. आजकाल कोशवाङ्मय विपुलतेने निर्माण होत आहे. त्या सर्वांत या ग्रंथाचे स्वरूप हे देवीकोशासारखे आहे. अशा स्वरूपाचा देवीकोश की, जो असंख्य भक्तांना पावलोपावली उपयोगी पडेल असा मराठीत तरी हा एकमात्र ग्रंथ आहे, हे या ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य होय.

## सर्व प्रादेशिक भाषांतूनही व्हावा

याकरिताच अभ्यासूंना, संशोधकांना, जिज्ञासूंना आणि भारताच्या आत्म्याची यथार्थ ओळख व्हावी असे वाटणाऱ्या असंख्य वाचकांना उपयुक्त व्हावे या दृष्टीने आम्ही तर असेही म्हणण्याचे साहस करू इच्छितो की, साहित्य ॲकेडमीने या व अशा स्वरूपाच्या ग्रंथांची सर्व प्रादेशिक भाषांतून भाषांतरे करून ज्ञानार्त लोकांसाठी अखंड पाणपोई उघडावी. भाक्रानानगल धरणापेक्षाही हे कार्य अधिक मोलाचे आणि अधिक चिरंजीवी असे आहे. भाक्रानानगल धरणाने नुसतीच क्षुत-पिपासा शांत होईल, पण ती क्षणिकच असेल. पण या उपरोक्त पाणपोईने मात्र सदासर्वकाळ आणि सर्व लोकांची तृष्णाही शांत होऊ शकेल. स्मृतिकारांनी सांगितलेल्या शासकीय कर्तव्यात ज्या इष्टापूर्त कर्मांची गणना होते त्यात हे इष्टतर आहेच, पण ते पूर्तही आहे. असो.

या ग्रंथरूपाने मराठी शारदेच्या चरणांवर लेखकाने वाहिलेली ही षोडश-परींची पत्री तिला खचितच प्रिय होईल. मराठी शारदेची यथोपचारांनी नव्हे तर प्रयत्नोपलब्ध उपचारांनी स्वयं लेखकाने महापूजा बांधली आहे. पूजा सांगतेकरिता पुष्पांजलि वाहताना लेखकाने आम्हांला पाचरण केले आणि आम्ही त्यात एक फुलाची पाकळी वाहिली. त्याने केलेल्या आरतीच्या सुरात आम्ही आमचा सूर शक्यतितक्या उच्च स्वराने मिळविण्याचा प्रयत्न केला इतकेच. बाकी ज्योत प्रज्वलित करून निरंजन धरण्याचे कार्य हे लेखकानेच केलेले आहे. शेवटी जाता जाता अपराधाबद्दल लेखकाने शारदेची जी प्रार्थना केली आहे त्या प्रार्थनेत आम्ही आमचाही एक सूर मिसळतो आणि 'त्वयिजातापराधानाम् त्वमेव शरणं मम ।' इतिलेखन सीमा...

अश्वलायन,
श्रीलाविहार कॉलनी
एरंडवणे, पुणे ४
३–२–१९६५

श्रीपादशास्त्री किंजवडेकर.

## श्री सप्तशृंग निवासिनी ( नासिक )



गीतासि चाध्यात्म निधानरम्या । अष्टादशाध्याय हस्तान्निभापि ॥

सघशक्ति श्रुत शील । सपूर्णं यत्र वैभव ।

धर्मान्वित भारतीय । अस्तुराष्ट्रमखण्डितम् ॥

गंगाधर


उलट फिरून पाहण्याचा प्रयत्न केलात तर नामप्रकाराच्या विचारदृष्टीने माझे स्वरूप डोळ्यांसमोर उभे राहील. मानवी जीवनक्रमात या विचाराचा अनुभव प्रत्यही येतो. जो प्रवाहपतीत आहे, तो त्या लाटेसरशी भरडला जातो. पण जो नेहमी विरुद्ध दिशेला वळतो तो सुखी होतो. ऋषीमुनींसारखे तपस्वी याच्या तडाख्यात सापडत नाहीत. जगन्नियत्या परमेश्वराचे निर्गुण नाम ॐकार आहे. आणि सगुण नाम हिरण्यगर्भ, विराट्शक्ति असून मायेचे निर्गुण नाम माया आणि सगुण नाम श्री असे आहे. घुणाक्षरन्यायाने ॐकार कसा तयार झाला हे पाहता येते. भूमीवर पीठ सांडलेले आहे अथवा पूर्वी धूळपाटीवर बारीक धूळ पसरून ठेवलेली आहे.* अशा ठिकाणी बारीक एखादा किडा शिरला, तर त्यांतून सुटका करून घेण्यासाठी तो सैरावैरा त्यामध्ये फिरत रहातो. सुटकेचा निश्चित मार्ग अज्ञानामुळे माहीत नसल्याने, मन मानेल तसा फिरत राहतो. याचा परिणाम असा होतो की, दुसऱ्या दिवशी आपण पहावे तेव्हा तेथे एक आकृति तयार झालेली असते, यालाच घुणाक्षर म्हणतात आकृति तयार व्हावयाला अनेक जोडबिंदूंची रेषा तयार व्हावी लागते. तेव्हा रेषा म्हणजे बिंदूच होत. हे बिंदु व रेषा व्यक्त होण्यास पीठ अगर पाटीचा आश्रय आहे, त्याविना ही आकृति आपणाला दिसलीच नसती. या कागदावर अक्षरांच्या आकृति आहेत, पण कागदाच्या आश्रयाविना त्या कोणाला दिसू शकणार नाहीत. लेखक या कागदावर अक्षरे लिहून ग्रंथ निर्माण करीत आहे, दुसरा कोणी त्यावर चित्रे काढील, रेघोट्या मारील, अगर दुर्गुण पसरण्याचा उपयोग करील. याचा अर्थ असा की, मूळ आश्रय जो कागद, त्याला वरच्या मजकुराचे सोयर-सुतक कोणत्याही प्रकारचे लागत नाही

हाच न्याय अनंत विश्वाचा पसारा आणि माया याला लागू पडतो धूळपाटीप्रमाणे अनंत विश्वाची पाटी पसरलेली आहे किड्याप्रमाणे माया त्यामध्ये शिरली आणि सैरावैरा पळत सुटली. पण ती पळून पळून किती पळणार ! पळणारा मनुष्य कितीही दमदार असला तरी शेवटी थकणारच आणि थांबणार. तसेच मायेचे झाले. ती पळ पळ पळाली पण अनंत विश्व काही संपले नाही आणि ती थांबली तिच्या थांबण्यामुळे धूळपाटीवरील किड्याच्या फिरण्याच्या आकृतीप्रमाणे, मायेच्या फिरण्याने जी आकृति अनंताच्या पटलावर तयार झाली, तीच ॐकार होय मायेच्या रेषाकृतोपाधीने बिंदु रेषा अक्षर रूप असे चार पाद तयार झाले व ॐकार बनला मायाशक्तीला ब्रह्मकटाह फोडून बाहेर जाता आले नाही.

* ग्रंथ लेखकाने आपल्या गावी धूळ पाटीवर अक्षरे गिरविलेली आहेत

ॐकाराची अष्टविकृति वर्णन करताना, भूमिरापोऽनलो वायु. । ख मनो बुद्धिरेव च। अहंकार इतीय मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।। तसेच सगुण मायारूपी श्री मुद्रा अष्ट प्रकृति आहे. तिचे वर्णन असे—कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणा स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा। ॐकाराची आकृति कापून जर आठ तुकड्यात विभागणी केली, तर त्यापासून श्रीची आकृति बनविता येते, इतके दोघामध्ये साम्य आहे. यास्तव ॐकारामधूनच श्री-बीज तयार झालेले असल्याने दोन्ही एकरूपच होत. म्हणजे कशी गमत झाली ते पहा. परमात्म्याच्या अनताच्या आश्रयावर मायेने चराचर सृष्टि निर्माण केली. तसेच ॐकाररूपी स्वयसिद्ध परमात्म्यावर श्री हे मायारूपही निर्माण झाले. तेव्हा दोन्हीही एक रूपच होत, असे समजण्यास हरकत नाही. ही साम्यता पहा—

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| माया = कीर्ति | वाक् | स्मृति | मेधा | धृति | क्षमा | श्री | नारी |
| ॐकार = वायु | अनल | मन | बुद्धि | आप् | भूमि | ख | अहं |



# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अर्थात्

# देवीकोश

## खंड २ रा

★


## शक्ति तत्त्वज्ञान


(१) क्षेत्र आणि व्याख्या
(२) शक्ति व वेदान्त वाङ्मय
(३) शक्ति व वेदान्त
(४) शक्ति व विविध वेदान्त संप्रदाय
(५) शक्ति व पुराण वाङ्मय
(६) शक्ति व वैष्णव वाङ्मय
(७) शक्ति व शैव वाङ्मय
(८) शक्ति व सांख्यशास्त्र
(९) शक्ति व मीमांसा, न्यायशास्त्र
(१०) शक्ति व योगशास्त्र
(११) शक्ति व काश्मीर तंत्र संप्रदाय
(१२) शक्ति व वीरशैव संप्रदाय
(१३) शक्ति व चैतन्य संप्रदाय
(१४) शक्ति व अणुशास्त्र


### शक्तीची व्याख्या आणि क्षेत्र

भारतीय अध्यात्मिक शास्त्रांमध्ये ब्रह्म आणि माया यांवरच सर्व भर दिलेला आढळून येईल. पण मायेने जे नाव आपल्याला घेतले आहे, तेच मुळी उद्बोधक आहे. जसे धर्मराज हा शब्द उच्चारला म्हणजे सत्त्वगुणी माणसाची मूर्ति डोळ्यापुढे उभी राहते, तेथे कोणताही दुष्ट विचार मनात नाही तद्वत् मायेने नाव घेतले आहे. मा = मिथ्या आणि या = जी, म्हणजे जी मिथ्या आहे ती माया ती सतत मोठमोठ्याने ओरडून सर्वांना सांगत आहे की, 'बाबांनो, मी खोटी आहे मी खोटी आहे' पण या तिच्या ओरडण्याकडे कोणी लक्ष द्यावयासच तयार नाही. मायेचे म्हणणे सरळ आहे की, जोपर्यंत माझे ओरडण्याकडे लक्ष न देला, तुम्ही माझे प्रवाहात वाहत जात आहात, तोपर्यंत माझे यथार्थ स्वरूप कोणालाच समजून येणार नाही. पण जर प्रवाहाच्या

# ग्रंथकर्त्याची विज्ञप्ति



भाली भास्कर भर्जनाम भरती भू-सेनके भाक्षिता ।
भडारा भडमाळिनें भरितमे भू-देवता भाउका ॥
भूतात्मा भरगच ग्रन्थि भजका, भामे भुमा का भुरा ।
भक्तानो भवभीतिला भिरकना भाडार-भाडे भरा ॥

देवीकोश, खंड २, प्रकाशन प्रसंगी माननीय के. के. शहा, नभोवाणी मंत्री,
भारत सरकार, दिल्ली, भाषण करीत असताना




*This book provides glimpses of what heights science had attained in this country. The definitions of Mantra-Yantra-Tantra, are worth under standing. They are appropriate and demonstrative the exact norms and forms we had established for acquiring knowledge.*

**K. K. Shah**

*Minister for*
*Information & Broad Casting*
*N. D.*

8th April 1968

उलट फिरून पाहण्याचा प्रयत्न केलात तर नामप्रकाराच्या विचारदृष्टीने माझे स्वरूप तावडतोब कळून येईल मानवी जीवनक्रमात या विचाराचा अनुभव प्रत्यही येतो. जो प्रवाहपतीत आहे, तो त्या लाटेखाली भरडला जातो पण जो नेहमी विरुद्ध दिशेला वळतो तो सुखी होतो ऋषीमुनींसारखे तपस्वी याच्या तडाख्यात सापडत नाहीत. जगन्नियत्या परमेश्वराचे निर्गुण नाम ॐकार आहे. आणि सगुण नाम हिरण्यगर्भ, चिराग्शक्ति असून मायेचे निर्गुण नाम माया आणि सगुण नाम श्री असे आहे घुणाक्षरन्यायाने ॐकार कसा तयार झाला हे पाहता येते भूमीवर पीठ सांडलेले आहे अथवा पूर्वी धूळपाटीवर रात्री धूळ पसरून ठेवलेली आहे.* अशा ठिकाणी रात्री एखादा किडा शिरला, तर त्यांतून सुटका करून घेण्यासाठी तो सैरावैरा त्यामध्ये फिरत रहातो. सुटकेचा निश्चित मार्ग अज्ञानामुळे माहीत नसल्याने, मन मानेल तसा फिरत राहतो. याचा परिणाम असा होतो की, दुसऱ्या दिवशी आपण पहावे तेव्हा तेथे एक आकृति तयार झालेली असते, यालाच घुणाक्षर म्हणतात. आकृति तयार व्हावयाला अनेक जोडबिंदूंची रेषा तयार व्हावी लागते. तेव्हा रेषा म्हणजे बिंदूच होत. हे बिंदु व रेषा व्यक्त होण्यास पीठ अगर पाटीचा आश्रय आहे, त्याविना ही आकृति आपणाला दिसलीच नसती. या कागदावर अक्षराच्या आकृति आहेत, पण कागदाच्या आश्रयाविना त्या कोणाला दिसू शकणार नाहीत. लेखक या कागदावर अक्षरे लिहून ग्रंथ निर्माण करीत आहे, दुसरा कोणी त्यावर चित्रे काढील, रेघोट्या मारील, अगर दुर्गुण पसरण्याचा उपयोग करील. याचा अर्थ असा की, मूळ आश्रय जो कागद, त्याला बऱ्या मजकुराचे सोयर सुतक कोणत्याही प्रकारचे लागत नाही


हाच न्याय अनंत विश्वाचा पसारा आणि माया याला लागू पडतो धूळपाटीप्रमाणे अनंत विश्वाची पाटी पसरलेली आहे किड्याप्रमाणे माया त्यामध्ये शिरली आणि सैरावैरा पळत सुटली पण ती पळून पळून किती पळणार? पळणारा मनुष्य कितीही दमदार असला तरी शेवटी थकणारच आणि थांबणार. तसेच मायेचे झाले. ती पळ पळ पळाली पण अनंत विश्व काही संपले नाही आणि ती थांबली. तिच्या थांबण्यामुळे धूळपाटीवरील किड्याच्या फिरण्याच्या आकृतीप्रमाणे, मायेच्या फिरण्याने जी आकृति अनंताच्या पटलावर तयार झाली, तीच ॐकार होय. मायेच्या रेषाकृतीपाथीने बिंदु-रेषा अक्षररूप असे चार पाद तयार झाले व ॐकार बनला मायाशक्तीला ब्रह्मकटाह फोडून बाहेर जाता आले नाही.

---

* ग्रंथ-लेखकाने आपल्या गावी धूळ पाटीवर अक्षरे गिरविलेली आहेत

ॐकाराची अष्टविकृति वर्णन करताना, भूमिरापोऽनलो वायुः । खं मनो बुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ।। तसेच सगुण मायारूपी श्री मुद्रा अष्ट प्रकृति आहे. तिचे वर्णन असे—कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा । ॐकाराची आकृति कापून जर आठ तुकड्यात विभागणी केली, तर त्यापासून श्रीची आकृति बनविता येते, इतके दोघामध्ये साम्य आहे. यास्तव ॐकारामधूनच श्री-बीज तयार झालेले असल्याने दोन्ही एकरूपच होत. म्हणजे कशी गंमत झाली ते पहा. परमात्म्याच्या अनंताच्या आश्रयावर मायेने चराचर सृष्टि निर्माण केली. तसेच ॐकाररूपी स्वयंसिद्ध परमात्म्यावर श्री हे मायारूपही निर्माण झाले. तेव्हा दोन्हीही एक-रूपच होत, असे समजण्यास हरकत नाही. ही साम्यता पहा—

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| माया = कीर्ति | वाक् | स्मृति | मेधा | धृति | क्षमा | श्री | नारी |
| ॐकार = वायु | अनल | मन | बुद्धि | आप् | भूमि | खं | अहं |



या अष्ट गुणांपैकी उदाहरणासाठी आपण एकदोन गुणांचे साधर्म्य पाहू कोणत्याही गोष्टीची अथवा कर्मांची सत्कीर्ति झाली म्हणजे ती कर्णापर्यंत पसरून श्रवण करणारांना आनंददायक वाटते. यामध्ये सौख्य संचार आणि आनंद या गोष्टी प्रामुख्याने घडतात. तद्वत वायूचा स्वभावधर्म सर्व दिग्गामी असून, स्पर्शमात्रेकरून शरीराला आनंद देणारा होतो यावरून कीर्ति आणि वायु हे समानगुणदर्शक ठरतात. तसेच निराकारत्व हा गुण दोन्ही ठिकाणी आहे मायेचा दुसरा गुण श्री घेतला तर त्यामध्ये शोभा, सौंदर्य, चराचर सृष्टीने शोभ यांचा व्यापकपणा आहे आकाश हे अनंतकोटीब्रह्मांडालाही वेढून पुरून शिल्लकच रहाते, इतके ते व्यापक आहे तसेच शोभा, सौंदर्य हे गुण सुद्धा आकाशामध्ये दिसून येतात वास्तव श्री आणि ख यांचे साम्य आहे, हे आपणाला कळते. याप्रमाणे इतर गुणांचेही समानत्व दाखविता येते.

एकादे लहान अजाणी मूल मूळ स्वरूपात मातेजवळ आले, म्हणजे ते सुंदर दिसण्यासाठी माता त्याला वस्त्रे लेववते, अलंकार घालते, अगर अन्य प्रसाधनांनी त्याची सुंदरता, आकर्षण वाढवीत असते एकादी भव्य इमारत अथवा दिवाणखाना भकास दिसू नये म्हणून त्यात निरनिराळ्या प्रकारचे सामान, सोफा, खुर्च्या, टेबले, हंड्या, झुंबरे, तसबिरी इ० आपण नेहमी लावतो व घराची शोभा वाढवितो तद्वत मायेने आपल्या हौसेखातर हे अनंतकोटीब्रह्मांड नानाविध चित्रविचित्र आभूषणांनी, सजवलेले आहे चंद्र सूर्यांची देदिप्यमान कुंडले, तारागणांचे मौक्तिक हार, चित्रविचित्र रंगांचे मेघांचे पडदे, वृक्षवल्लींची उपवने, समुद्र सरितांची जागोजाग सरोवरे, व अखिल सजीव सृष्टीची चित्रे मांडून, त्यांच्या कर्मरूप खानपानाचे साहित्य जवळ ठेवून निर्माण केलेले आहे ही माया केवळ आपल्या संतोषार्थ व विहारार्थ हे अनंत ब्रह्मांड सजवून, सुशोभित करून, आपल्या सच्चिदानंद घन परमात्म्य पतीसह वर्तमान, अनादिकालापासून हा महाप्रपंच चालवीत आहे. मायेने जर हा पसारा मांडला नसता तर हे महदाकाश शून्यच रहाते सामानाविणा दिवाणखान्याप्रमाणे भकास दिसले असते माणसाचा पसारा ज्या प्रमाणात कमीजास्त असेल, त्या प्रमाणात त्याला एक खोली, पाच खोल्या, पचवीस खोऱ्या, राजमहालाची जरूरी भासते तद्वत् या मायेला तरी, अनंत महाराजांविना आपला संसार नीटनेटका मांडण्यास, दुसरी भव्य जागा कोठची मिळणार? यावरून सूज्ञवाचक जाणू शकतील की ॐ रूप परमात्म्याचे आणि श्री बीजरूप मायेचे स्वरूप व संबंध निगडित आहेत ते कोणालाही अलग करता येणार नाहीत, एकावर दुसरा अवलंबून

असल्याने, त्याचे अस्तित्व निरनिराळे दाखविता येणार नाही. शिव आणि शक्ति ही एकरूप आहेत.

एकाला दुसऱ्याचा आश्रय घ्यावाच लागतो, ही गोष्ट आपण नित्य व्यवहारातील एका उदाहरणाने पाहू. तसे स्पष्टीकरण केल्याने हा सिद्धांत चटकन ध्यानी येईल. समजा, एका मोठ्या पाण्याच्या गंगाळ्यात काही तांदुळाचे दाणे टाकले, तर प्रथमत ते तळाला स्थिर बसतील. पण पाण्यात हात घालून जोरजोराने फिरविल्यास, त्याला गति दिल्यास, ते दाणे वर्तुळाकार फिरत राहतील. जोवर गति आहे तोवरच ते फिरत राहतील. खाली बसणार नाहीत, तसेच ते गंगाळ्याच्या आवरणाबाहेरही पडणार नाहीत. आवरण त्यांना बाहेर पडू देणार नाही. तद्वतच महामायेच्या गंगाळ्यरूपी आवरणात तांदुळा प्रमाणे असलेल्या असंख्य वस्तु, मायेने दिलेल्या गतीमुळे सतत परिभ्रमणात आहेत. ब्रह्मकटाहाच्या आश्रयाने त्या फिरत आहेत. हे परिभ्रमण अनंत काला पासून चालू आहे व चालू राहणार आहे. ज्याप्रमाणे गंगाळ्यात हात घालून पाण्याला गति दिली, तरी गंगाळ्याच्या आवरणावर परिणाम घडत नाही, तद्वत मायेच्या या महाशक्तीच्या वेगाचा परिणाम अनंत ब्रह्मांडावर होत नाही. गंगाळ्यातील पाणी व तांदळाचे दाणे ज्याप्रमाणे गंगाळ्याच्या आवरणाच्या आश्रित आहेत, तद्वत महामायेने रचलेली सृष्टि व त्यातील जीव हे जरी ब्रह्मकटाहाचे आश्रित असले, तरी त्याचा परिणाम त्याच्यावर होत नाही येथे रास्त शंका इतकीच येईल की, मायाशक्ति सतत कशी कार्यवाही आहे, तिला चालना कशी मिळते? याचे उत्तर असे की, मायाप्रभावात फिरत असणारे जीव अनेक प्रकारच्या कर्मवासना उत्पन्न करीत असतात, आणि कर्मवासनारूपी हे हात, ती गति कायम राखण्यास हातभार लावतात. झोपाळ्यावर दहा माणसे बसलेली आहेत एकाने जरी झोका थांबविला, तरी दुसऱ्याला लहर येते, आणि झोपाळा फिरतच राहतो त्याप्रमाणे सत्त्व-रज-तमोगुणी माणसे आपापल्या इच्छेप्रमाणे कर्म करीत असतात, आणि त्याचा शेवट चक्र चालू ठेवण्यात होतो अशी ही महामायाशक्ति परमात्म्य स्वरूपावर आश्रित आहे, भिन्नभिन्न स्वरूप आहे, म्हणजेच अनिर्वचनीय रूप आहे.

(स्वानंद साम्राज्य—ले. रामराव कृष्ण जठार, शके १८३६ चे आधारे वरील विवेचन आहे.)

मायाशक्तीचे क्षेत्र किती अमर्याद आहे, हे सारांशरूपाने आपण येथवर पाहिले या तत्त्वाचा उहापोह वेदान्त, सांख्य, मीमांसा, पुराणे यांनी कसा केला, ते सारांशरूपाने आता पाहणे आहे शक्तितत्त्वाची सुटसुटीत व्याख्या करणे, तिच्या अमर्यादित्वामुळे अत्यंत कठीण आहे. कारण—

( १ ) शक्तिसंबंधी कल्पना अथवा भावना ही फार संक्षिप्त आहे

( २ ) वस्तुमात्रातील शक्तीच्या प्रकटीकरणाविना शक्तीचा विचार करणे उचित ठरणार नाही.

आपल्या नेत्रासमोर वस्तुमात्र दिसते, पण त्यातील सुप्त शक्ति दिसत नाही वस्तुमात्राचा ठसा मात्र आपल्या मनावर उमटतो शक्ति नेहमी सुप्त असते, तरी आपणाला ती निराळी दाखविता येईल आणि तिची व्याख्या करणेही शक्य होईल. वस्तुमात्रापासून ती निराळी आहे, असे प्रतिपादन करता येईल.

शक्तीची सर्वसाधारण व्याख्या अशी की, शक्ति ही वस्तुमात्राची हालचाल सूचविते अथवा वस्तुमात्राची ती नैसर्गिक शक्ति होय. काही कार्य करण्यासाठी अथवा उत्पादन करण्यासाठी जी हालचाल करावी लागते, ती शक्ति होय एका वस्तुमात्रातून दुसऱ्यामध्ये रूपांतर होताना ही सुप्त शक्ति आपले प्रदर्शन करते, यालाच शास्त्रीय भाषेत कारण आणि कार्य असे नाव दिले आहे शक्ति शब्दाचे हे एक कार्य झाले, पण दुसरेही एक आध्यात्मिक कारण आहे.

सप्तपदार्थीकर्ते या शक्तीची व्याख्या 'शक्तिर्द्रव्यादिस्वरूपमव' अशी देतात, म्हणजे वस्तुमात्र हीच शक्ति होय काहींचे मत असे की, वस्तुमात्र आणि त्याचे गुण जसे निराळे आहेत, तसे कल्पनेपेक्षाही ही शक्ति निराळी आहे काहींच्या मते वस्तुमात्रातून शक्ति निराळी करता येत नाही आणि ती अविभाज्य आहे काहींच्या मते शक्ति आणि शक्तिमान याच्यामध्ये कोणताही फरक नाही (सांख्यमत) शक्तीचे दोन प्रकार कल्पिलले आहेत चित् ( अध्यात्मिक ) आणि अचित् ( वस्तुमात्र ) पहिल्याचा संबंध मनाबरोबर येतो, तर दुसऱ्याचा वस्तुमात्राबरोबर येतो

वरील कारणासाठी सर्व क्षेत्रामध्ये लागू होईल अशी व्याख्या करणे कठीण आहे ऐहिक आणि आध्यात्मिक कार्यामध्ये अनेकविध नावांखाली या शक्तीचा उपयोग केलेला आहे, परंतु प्रत्येक क्षेत्रामध्ये नामाभिधान वेगवेगळे आहे याची काही उदाहरणे अशी की, वनस्पति अथवा प्राणिशास्त्रामध्ये जीवनशक्ति हा प्रयोग आहे, वैशेषिक याला परमाणु शक्ति म्हणतात, रसायनशास्त्रज्ञांना ती उत्साही परमाणु आहे, पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांना ती उत्साह आहे, अध्यात्मवादी गृहस्थांना ती उत्तेजन देणारी आहे, बौद्ध तत्त्वज्ञान्यांना ती प्रज्ञापारमिता म्हणजे पूर्ण शहाणपण आहे, योगी लोकांना ती मानसिक शक्ति आहे, ध्येयवाद्यांना ती चेतना शक्ति आहे, अलंकारशास्त्रज्ञांना ती कवित्वबीज स्वरूप आहे, आणि आगमशास्त्रज्ञांना ती

प्रतिभास्वरूप आहे. शक्तीच्या वरीलप्रमाणे अनेकविध स्वरूपामुळे, तिच्यासंबंधी एकच व्याख्या बनविणे फार अशक्य आहे,हे वाचकांच्या ध्यानी येईल.

शक्ति-तंत्रकारांनी या चित् शक्तीला चैतन्य असे नाव दिले आणि मुख्य शक्तीला परा-शक्ति असे नाव दिले. हीच शक्ति अखिल विश्वातील हालचालींची सूत्रचालक असून, आपल्या शारीरिक व मानसिक प्रयत्नामुळे अनुमानता येते. शक्तितंत्रांनी या शक्तीची भरपूर स्तुतिस्तोत्रे गायिली असून, तिला आद्य शक्ति म्हणून मानले आहे, महामाता म्हटले आहे.

काहीजण शक्तीकडे नुसत्या ऐहिक दृष्टीने पाहतात. शाक्तांनी, शक्तिला दूरदृष्ट्या फार महत्त्वाचे स्थान दिले आहे, पण त्याबरोबर ऐहिक दृष्टिकोनाची वानही सांभाळली आहे. त्यांनी शक्तीचे विवरण आध्यात्मिक दृष्ट्या केलेले असून अखिल विश्व हे शक्तीचे प्रकटीकरण असे मानले आहे. वेदान्तीलोकांनी त्या परमेश्वराला सर्वशक्ति आणि परिपूर्ण शक्तिमान मानले आहे. शैव, सांप्रदायाप्रमाणे 'शक्तयश्च जगत् कृत्स्नम् ।' म्हणजे अखिल विश्व हे शक्तीचे प्रकटीकरण होय वाक्यपदीय ग्रंथकाराच्या मते, 'शक्तिमात्रा-समूहस्य विश्वस्यानेकधर्मिण. ।' म्हणजे विश्व जरी अनेक निरनिराळ्या वस्तुमात्रांनी भरलेले असले तरी ते समजण्याला अत्यंत कठीण अशा शक्तिसमूहांनी बनलेले आहे.

वरील विधानांना पोषक असे तंत्रकाराचे प्रतिपादन आहे. महाशक्ति काळवेळाच्या बंधनापलीकडे जाते आणि विश्वाचे दृश्य स्वरूप दृग्गोचर होते व त्याला व्यापून टाकते यामुळे जेव्हा आपण म्हणतो की, वस्तुमात्र हे शक्तीवर अवलंबून आहे आणि सर्व वस्तुमात्रामध्ये शक्ति काही अंशांनी वास करते, त्या वेळी आपण मूळपदावर येतो याचाच अर्थ असा की, वस्तुमात्राच्या मुळाशी शक्ति आहे.

अज्ञानाप्रमाणे ज्ञान ही सुद्धा एक शक्ति आहे. ज्ञानामुळे मन विकसित होते आणि अनुभव वाढत जातो, तर अज्ञानामुळे वस्तुमात्रावर आवरण पडते आणि त्याचे ज्ञान होत नाही. या शक्तीला आवरण शक्ति असेच नाव दिले आहे. मनाचा विक्षेप होतो म्हणून त्याला 'विक्षेप शक्ति' असेही म्हणतात आवरणामुळे वस्तुमात्राचे सत्य ज्ञान होण्यास प्रतिबंध होतो, यालाच 'माया-शक्ति' असे म्हणतात परंतु या मायेच्या मदतीविना परमेश्वराला आपले कर्तृत्व जरासुद्धा सिद्ध करता येत नाही. 'न हि तयाविना परमेश्वरस्य स्रष्टृत्व सिध्यति ।' (ब्र. सू. १-४-३ शं. भा.)

योगमार्गात शक्तीला प्राधान्य आहे. साधन करीत असताना मनाची शक्ति वाढीस लागते आणि सिद्धि प्राप्त होते, म्हणून मनन-शक्तीला महत्त्व आहे. चैतन्यशक्ति हीच परमेश्वराची खरी शक्ति होय. या सर्व विवरणाचे तात्पर्य एकच की, शक्ति सर्वत्र भरलेली आहे. काही वेळा ती वस्तुमात्रामध्ये सुप्त स्वरूपात असते आणि काही वेळा कार्यावर भासमान होते. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला, त्यातही आकर्षणशक्ति आहेच. अणूचा स्फोट होतो, त्यातही शक्ति आहेच. हिंदुतत्त्वाप्रमाणे अणु मात्र नाश पावत नाहीत, तर आपले स्वरूप बदलतात. यामुळे हेच सिद्ध होते की, शक्तीचा केव्हाही नाश होत नाही. या शक्तीचे स्वरूप निरनिराळ्या शास्त्रकारांनी प्रतिपादन केले आहे.

ज्योतिषशास्त्र हे मानवाचे निकटपणे ओळखीचे आहे. जन्म वेळी निरनिराळ्या राशीस्थानामध्ये वसलेल्या शनि, मंगळ, गुरु इ० सूर्यमालेतील ग्रहाच्या शक्तीचा परिणाम मानवाच्या जीवनावर सतत घडत असतो. गणितशास्त्राने त्याच्या हालचाली निश्चित करता येतात. या ग्रहाचे आकारमान कमीजास्त असल्याने त्याच्या शक्तीही कमीजास्त आहेत आणि त्या एकमेकाना शह-काटशह देत असतात. या शास्त्राप्रमाणेच इतर शास्त्रामध्ये शक्तितत्त्व अनुभवास येते. हे पुढील प्रकरणावरून ध्यानी येईल.

देवता अथवा दैविक शक्तींचा आरोप सतत केलेला आहे. जसे आकाशातील काळे मेघ म्हणजे वृत्र आणि इंद्राने या दैत्याचा नाश केला, तेव्हा भूतलावर पर्जन्यवृष्टी झाली. यज्ञकुंडासाठी लागणाऱ्या विटा-इष्टिका-यानासुद्धा देवता मानून, त्या सर्व विश्वव्यापी आहेत, असे मानले आहे. तसेच एकाच शब्दाचे अनेक अर्थ लावल्यामुळे, वाचकाच्या मनात घोटाळा निर्माण होतो. प्रजापति हा शब्द घ्या. काही वेळा तो वस्तुमात्र निर्माण करणारा आणि साक्षात् यज्ञच मानला आहे. दुसऱ्या वेळी त्याला संवत्सर नाव दिले असून, त्याला सप्तदश म्हणजे बारा महिने आणि पाच ऋतु यांचा निदर्शक मानला आहे. काही वेळा त्यालाच पुरुष, मृत्यु, नामरूप, मानस इ० नावांनी संबोधिले आहे, आणि यामध्ये चमत्कार असा की, विविध नावांनी संबोधिताना त्या नावाची व्युत्पत्तीही दिलेली नाही. यामुळे प्रजापति शब्दाचा नक्की कोणता अर्थ घेऊन विवरण करावे याचे कोडे पडते.

वरील प्रकारच्या संस्कारशास्त्रातील तपशील आणि मार्गदर्शन यातून मोठ्या मुश्किलीने बाहेर पडल्यावर उपनिषदाच्या शुद्ध वातावरणामध्ये आल्यावर आपणाला सुसंगत विचारप्रणालीची मांडणी आणि अनुभवजन्य ज्ञानावरून सर्वसाधारण तत्त्वाची मांडणी पाहावयास मिळते. वेदांतील ज्ञानापेक्षा, उपनिषदांतील तत्त्वज्ञानाची मांडणी पाहून, संशोधक एच्. एच्. विल्सन म्हणतात, " वेदापेक्षा उपनिषदांतील तत्त्वज्ञानाची विचारप्रणाली ही हिंदु-तत्त्वज्ञानाच्या बुद्धीची सर्वस्वी निराळीच बाजू दाखविते. "

दैविक शक्तीचे बीज आपणाला ऋग्वेदामध्ये पाहावयास मिळते. यामध्ये शक्तीचा उल्लेख सरळ सरळ कर्तृत्वशक्ति असा मिळत नाही; परंतु पंचमहाभूतांच्या प्रचंड हालचाली, मेघांच्या गर्जना, विद्युल्लतेचा कडकडाट आणि पर्जन्यवृष्टि, यांचा ऋषींच्या मनावर झालेल्या परिणामाने त्यांनी या प्रचंड शक्तीची कल्पना केली असावी. या नैसर्गिक हालचालींमागे असलेल्या शक्तीला त्यांनी वैदिक देवता असे मानले आणि तिला निरनिराळी नावे दिली. जसे इंद्र, वरुण, अग्नि इ० इ० प्रत्येक वैदिक देवतेची एका विशिष्ट दृष्टिकोनातून उभारणी केली आहे. तो दृष्टिकोण जर वगळला तर त्या पंचमहाभूतांची काहीच किंमत उरत नाही. आपण अग्नीचे उदाहरण घेऊ. ऋग्वेदामध्ये त्याची तीन कार्ये वर्णन केली आहेत — १ उष्णताशक्तीचे अस्तित्व. हे फक्त पाकशास्त्र अथवा होमहवनादि कार्यांत व्यक्त केलेले नसून, ते जठराग्नि, प्राणरक्षण आणि वनस्पतींची वाढ यासाठीही मानले आहे. २ वातावरणातील त्याचे कार्य म्हणजे विद्युल्लता उत्पन्न करणे आहे. ३ आकाशातील सूर्य, त्याचा प्रकाश व शक्ति व इतर ग्रहगोलांची

शक्ति. ही त्यांची वेगवेगळी कार्ये जर हिरावून घेतली, तर वेदात त्यांचे काहीच महत्त्व उरत नाही. तसेच इतर पचमहाभूतांच्या शक्तीसबधी म्हणता येईल या पचमहाभूतांच्या नैसर्गिक कार्यामध्ये एकएक शक्ति मानलेली दिसून येते जसे वरील अग्नीचे उदाहरणात दाहकशक्ति होय.

शक्ति शब्दाचा वापर ऋग्वेदामध्ये इद्राचे वर्णन करताना दहाबारा वेळा तरी केलेला आहे. काही वेळा तो अग्नि आणि अश्विन् शब्दाबरोबरही आहे या शक्ति शब्दाचा वापर करताना या चेतनाशक्तीचे दोन प्रमुख वर्ग मानलेले आहेत– ( १ ) प्रजोत्पादन व ( २ ) वनस्पति आणि प्राणिमात्र. वेदवाङ्मयामध्ये ह्या वर्गाच्या देवतांचा अर्थ इद्र, वरुण इ० देवतांची स्त्रीवाचक शक्ति असा आहे. त्या उत्पादक शक्तिदेवताही आहेत याचाच अर्थ ऋषींनी असा विशद केला की, त्या दैवी पुरुषवाचक व दैवी स्त्रीवाचक उत्पादक देवता आहेत ज्या प्रमाणे शिव शक्ति अथवा विष्णु-लक्ष्मी यांचे विश्वोत्पत्तीच कार्य चालते, त्याप्रमाणे वेदकाळात यांचे कार्य मानलेले आहे प्रा मॅकडोनेल आपल्या वेदिक मायथॉलॉजी ग्रथामध्ये म्हणतात की, " वेदामध्ये स्त्री-देवताना दुय्यम स्थान आहे आणि विश्वाच्या चालकत्वात त्यांचे कर्तव्य अगदी क्षुल्लक आहे. " अथर्व वेदामध्ये ह्यांचा उल्लेख आलेला आहे ( ७ ५ १ २ ) या देवतांची प्रार्थना आश्रय, सपत्ति आणि सतति मिळावी यासाठी केलेली आहे. ही प्रार्थना करताना त्याच बरोबर **सुनृत** देवतेचीही प्रार्थना केलेली आहे सायणाचार्यांनी याच **सुनृत** देवतेला **सरस्वती** म्हटले आहे " सुनृता प्रियसत्यवाग्रुपा देवी सरस्वती । " ( सायन ऋ १०–१४१–२ ) ऐतेरीय ब्राह्मण ( ३–३७ ) कौशितकी ब्राह्मण, यामध्ये ह्याचा उल्लेख आहे

वाक् देवतेचा उच्चार वेद आणि ब्राह्मणामध्ये अनेक ठिकाणी निर-निराळ्या अर्थाने करण्यात आलेला आहे प्रथमत ऋषींनी या देवतेचा सबध वेदिक ऋचाबरोबर आणलेला आहे इतकेच नव्हे तर ती ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेदाची माता मानली आहे ( ऋग्वेद १०–१२५ ). ऋषींनी याच देवतेला तात्त्विक स्वरूप देऊन ब्रह्माची उत्पादकशक्ति असे मानले आहे आणि हाच विचार पुढे वाढत गेला रुद्र, वसु, आदित्य इ० देवताना त्यांच्या कार्यात पुष्टि देणारी देवता असे मानू लागल्यामुळे ती एक मुख्य शक्तिदेवता मानली गेली ब्राह्मणग्रथात तिला प्रजापतीशेजारी बसविली असून निराळेच तिला नाते प्राप्त झाले आहे वाक् देवतेने मत्रांना जन्म दिला हीच कल्पना पुढे तत्रकारांनी वाढवून तिला मातृकाशक्ति हे नाव दिले शतपथब्राह्मणामध्ये म्हटले आहे की, सर्वव्यापी वाक्शक्तीमधून प्रजापतीने पाणी उत्पन्न केले ( ६–१–९ )

काम्यक उपनिषद ( १२–५ आणि २७–१ ) याचा खुलासा करताना वर्णन करते की, वाक् ही ब्रह्मप्रजापतीची पत्नी होती आणि त्याच्या संयोगामुळे सर्वांची उत्पत्ति होते. वाक् याचा संबंध मनाबरोबर आणला गेला. या ठिकाणी मानस हा पुरुष आणि वाक् ही स्त्री, यापासून वाणी असा अर्थ चालू झाला. याच्या ठिकाणी सुपीकता आणणे, त्याची वाढ करणे हे होय. शक्तीचे हे वर्ग ध्यानात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, कारण यातूनच पुढे सरस्वती, इळा, धिषणा इ० ह्या वर्ग देवताचा पाया घातला गेला आहे. सर्व प्रपंच, जननी जी आद्यशक्ति तिच्याच उदरातून पुढे विश्वाची वाढ कशकशी होत गेली, त्याचा पाया येथेच आढळून येतो. काश्मीर पंथीय तांत्रिक याच शक्तीला विमर्शशक्ति असे म्हणतात.

ह्या वर्गातील देवता सरस्वती हिचा वाग्बरोबर घनिष्ट संबंध आहे. ऋग्वेदामध्ये सरस्वतीचा उल्लेख इळा व भारती या नद्यांबरोबर केलेला असून ते एक त्रिकुट मानले आहे (ऋ. १–१४२–९ ३–४–८). वेदामध्ये ही एक नदी देवता, सरस्वतीचे स्वरूप म्हणून मानलेली आहे कारण याच नदीच्या किनाऱ्यावर आर्यांनी पंजाबात प्रथम वस्ती केली आणि होमहवन चालू केले. सूक्त. ७–९६–२ मध्ये असे वर्णन आहे की, पुरुगण या नदीच्या किनाऱ्यावर हिरवळीवर वसाहत करून असताना त्यांनीच प्रथम तिला देवीस्वरूप मानून जातीचे संरक्षण व्हावे व वसाहतीस प्रोत्साहन मिळावे म्हणून तिची प्रार्थना केली. या वेळी तिची बुद्धिदेवता म्हणून गणना केली जात नव्हती. गंगा, सिंधु, यमुना नद्याप्रमाणेच तिचा उल्लेख होत होता. असे असताना तिचा उल्लेख वाक् देवतेबरोबर कसा झाला आणि बुद्धिदेवता व वाक्देवता कशी मानली गेली, हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

वरील उत्क्रांतीचा उगम वर उल्लेखिलेल्याप्रमाणे तिच्या किनाऱ्यावर होत असलेल्या होमहवनादि कार्यांत आढळतो, त्या वेळी तिची प्रार्थना देवता म्हणून करीत असत. ऋ. २–३–८ मधील वर्णनात ती पूजकाची भक्तिभावना पूर्ण करते असे आहे, तर पुढे एके ठिकाणी तिजमुळे शुद्ध, पवित्र विचार उत्पन्न होतात असे म्हटले आहे. शेवटी सूक्त १०–३०–१२ मध्ये तिचा संबंध बुद्धि या शब्दाबरोबर आणला आहे वरील शब्दांचा खात्रीने विचार केला म्हणजे असे दिसून येते की, यज्ञसंस्थेच्या वाढत्या प्राबल्यसमयी ब्राह्मणकाळात जेव्हा मंत्राचे गूढार्थ सामर्थ्य वाढीस लागले होते, तेव्हा ही नदी देवता, इतर देवताप्रमाणे ह्या वर्गांत सामावली गेली आणि वाक् देवतेप्रमाणे तीही एक प्रमुख उत्पादकशक्ति बनली संशोधक डॉ. मूर आपल्या (Original Sanskrit Texts, Vol V, P 338) संस्कृत वाङ्मय टीका ग्रंथात वरीलप्रमाणेच कारणे देतो आणि ती बुद्धिदेवता कशी झाली याचे विवेचन देतो

तैत्तिरीय ब्राह्मणात सरस्वतीचा संबंध, देवतांचे वैद्य अश्विनकुमार यांजबरोबर आणलेला आहे (तै ब्रा २–६–४). मानुषाकृति निर्माण करण्यात तिचा वाटा आहे. कारण ती हाडे, मांस यांना एकत्रित करते, मनाची उत्पत्ति करते, शरीरात रक्ताची उत्पत्ति करते, व्यान वायूची शरीरात भरणी करते, गर्भाची वाढ करते, असे वर्णन असून एके ठिकाणी तर तिला ‘भिषक्’ संज्ञा दिली आहे. ही अनेक कामे करणारी देवता सर्वशक्तिमान व उत्पादक असलीच पाहिजे, म्हणून तिला बुद्धिदेवता संबोधिले आहे.

ऋग्वेदामध्ये तिला एकदा ‘अंबीतमा’ म्हणून संबोधिले आहे (ऋ. २–४१–१६) या ठिकाणी तिला जे मातृत्व दिले, त्यामुळेच ती अदिति,

पुरंध्रीप्रमाणे मातृ-देवता बनली असावी. सिंधु नदीलासुद्धा 'मातृतमा' नावाने संबोधिले आहे. अथर्ववेदामध्ये सुभगादेवी आणि मधुमतीदेवी ही नावे आलेली आहेत.

विष्णु पुराणात लक्ष्मी म्हणजे एक प्रमुख मातृ-देवता मानली आहे. ती कमलोद्भवा असून तिला वेदगर्भा, यज्ञगर्भा, सूर्यगर्भा, देवगर्भा आणि दैत्यगर्भा अशी नावे दिली आहेत. याचाच अर्थ ती एक प्रमुख विश्वउत्पादक मातापैकी आहे, असा अर्थ ध्वनीत होतो. याशाठीच तिला जगन्माता अशी उपाधी दिली. बंगालमधली याच स्वरूपाला जगद्धात्री असे नाव असून तिचे पूजन होत असते. मार्कंडेय पुराणात सरस्वतीला जगद्धात्री संबोधिले आहे, तर लक्ष्मीला अंबिका नावाने ओळख दिली आहे.

वेद-ब्राह्मण कालानंतर उपनिषदाचा चलतीचा काळ आला. सर्व विचारवंतांनी यज्ञयागाचे महत्त्व कमी लेखून ब्रह्म व माया यांचा विश्वउत्पत्तीच्या संबंधात सखोल अभ्यास करून नवीन तत्त्वप्रणाली चालू केली. यामुळे आजवर वाक् शक्तीसारखी देवता जी प्रजापतीश्रेष्ठ श्रेष्ठ मालिकेत होती, तिचे महत्त्व नष्ट होऊन तिची जागा प्राणशक्तीने घेतली. उदाहरणार्थ, कौशितकी उपनिषदामध्ये ( ३–८–९ ) प्राण याची व्याख्या प्रज्ञा अशी केली असून, वाक् ही त्यातील एक अंशात्मक शक्ति होय असे दिले आहे. वेद-ब्राह्मण काळातील स्मृति अर्थात एकदम नष्ट होणे शक्य नसल्याने, ह्यातील काही वाक् संप्रदाय जसे, प्रजापति म्हणजे संवत्सर इ० उपनिषदामध्ये आढळतात. ब्राह्मणकाळातील प्रणव, वाक्, गायत्री, मानस इ० शब्दाचे अर्थ थोड्याफार फरकाने उपनिषद-कारांनीही वापरलेले आहेत. शेवटी श्वेताश्वतर उपनिषद उत्पत्तीच्या वेळी मात्र वरील अर्धवट स्थिति संपून वाक् या इतर शक्ति म्हणजे इतर कोणी नसून 'सर्वशक्तिमान परमेश्वराची ती आत्मशक्ति असून ती त्याच्याच स्वरूपात सामावलेली आहे.' या निर्णयाप्रत प्रतिपादन आले. 'देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम्।' असे वचन आहे.

शक्तियोगात् ।' महार्थमंजिरी या ग्रंथाचा कर्ता महेश्वरानंद ज्ञानशक्तीचे उगमस्थान म्हणून श्वेताश्वतरामधील प्रमाण उद्धृत करतो, आणि भगवान् महेश्वराच्या त्रिविध शक्तींपैकी ती एक आहे, असे वर्णन करतो. तैत्तेरीय ब्राह्मण ( २–६ ) मधील ऋचा 'अस्ति ब्रह्मेति सेत् वेद ।' याचे विवरण करताना हा ग्रंथकार म्हणतो की विमर्शशक्ति ही प्रातिनिधीरूपणे सर्व प्राणिमात्रामध्ये भरलेली आहे. सत् शब्दाचे व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या विवरण करून, ती ती एक कर्तृत्वशक्ति आहे असे सिद्ध करतो. तंत्र ग्रंथातील शक्तितत्त्वाचा ही विमर्शशक्ति एकपरीने पायाच होय. याचप्रमाणे अभिनवगुप्त, क्षेमराज, जयरथ, शिवोपाध्याय इ० तांत्रिक ग्रंथकार उपनिषदामधून उतारे घेऊन शक्तितत्त्वाचा पुरस्कार करतात. तसेच वीरशैव अथवा लिंगायत ग्रंथकार शिवयोगी रेणुका अथवा भीरतीतर आर्य हे श्वेताश्वतरामधील उतारे जास्त प्रमाणात देतात.

तात्पर्य केन, कठ, मडुक्य, तैत्तेरीय, छांदोग्य, बृहदारण्यक इ० कोणत्याही उपनिषदाचा तात्त्विक विचार केला म्हणजे ब्रह्म आणि त्याची कर्तृत्वशक्ति याचा विचार केलेला आहे, असे दिसेल. शक्तीचा संबंध परम महेश्वर शब्दाबरोबर उपनिषदकारांनी 'देवात्मकशक्ति' या शब्दांनी व्यक्त केला आहे. शक्ति व शक्तिमान हे एकरूपच असून, शक्तिमानाचेच ते दृश्य स्वरूप आहे असा सर्व प्रतिपादनाचा आशय आहे.

वरील प्रतिपादनाव्यतिरिक्त संघशक्ति आणि शत्रूंवर घाव घालण्यासाठी लागणारी सैन्यशक्ति याचाही उल्लेख ऋग्वेदामध्ये मिळतो. राष्ट्राची सर्वांगीण तयारी करण्यासाठी, आणि स्वराज्य टिकविण्यासाठी व मिळविण्यासाठी या दोन्ही शक्तींची आवश्यकता आर्य लोकांना माहीत होती, हेच यावरून सिद्ध होत आहे. सैनिकाचे संघ कसे असावेत याचे वर्णन मिळते.

सहस्रं साकं अर्चत । सहस्रावधि जनसमुदाय एकत्रित येऊन स्तुति करीत असत, व परमेश्वराला आळवीत असत.

शता एन अन्वनोनवु । शेकडो लोक एकत्रित होऊन ईश्वराची स्तुति करीत, आणि त्याचे पाठबळ आपल्या कार्यात मिळवीत.

स्वराज्य अनु अर्चन् । स्वराज्य चालविण्यासाठी या प्रकाराने तयारी राष्ट्रामध्ये चाललेली आहे. ( ऋ. १।८०।९ )

प्रेह्यभीहि धृष्णुहि, न ते वज्रो नियमते ।
इन्द्रो वृत्र जया अपो, अर्चन्ननु स्वराज्यम् ॥ (ऋ. १।८०।३)

या ऋचेचा भावार्थ असा की, शत्रूवर हल्ला करा, पुढे व्हा आणि शत्रूवर चारही बाजूंनी प्रथम चढाई करून शत्रूला वेढून टाका. धैर्य धारण करून, याप्रमाणे प्रथम मोर्चा देऊन शत्रूवर आक्रमण करा. तुमची शस्त्रास्त्रे कधीही निर्बल असू नयेत, नेहमी सज्ज ठेवली पाहिजेत. यदा कदाचित् शत्रूने तुमच्यावर आक्रमण करून चारही बाजूने वेढून टाकले, तर त्यास ठार मारून टाका. लोकोपयोगी जलस्थाने प्रथम आपल्या ताब्यात आणून त्यावर सक्त नजर ठेवा. कारण शत्रु त्यामध्ये बिघाड करण्याची शक्यता अधिक आहे आणि हे कशासाठी करावयाचे, तर स्थापन केलेले, प्रयत्नांनी मिळविलेले स्वराज्य टिकविण्यासाठी प्रत्येकाने प्राणपणाने त्याचे रक्षण केले पाहिजे.

मरुत् देवतेच्या सर्वसूक्तामध्ये सैन्यासंबंधीचे विवरण अधिक आहे आपली सैन्यशक्ती वाढवा, ती शिस्तबद्ध असू द्या. सर्व विद्यामध्ये अत्यंत निष्णात असू द्या. रणावरील निरनिराळ्या हालचालींमध्ये पूर्ण वाकबगार असू द्या, असे बहुमोल मार्गदर्शन त्यामध्ये आहे.

वरील विषयाचे विवरण करताना वेदाचार्य श्री. दा. सातवळेकर म्हणतात की, स्वराज्य उत्तम रीतीने चालवावयाचे असेल तर जनतेची उत्तम संघशक्ति आणि संघटना असली पाहिजे. अनेक पक्ष-उपपक्ष निर्माण करून ते कलह माजवीत नसत. सहस्रावधी लोक एकत्र जमत, आणि त्या प्रार्थनेच्या वेळी विचारविनिमय करीत. स्वराज्याची कार्यपद्धति कशी असावी हे ठरवीत आणि नंतर तो विचार कायद्यामध्ये रूपांतरित करून स्वराज्य चालविले जात असे. सांप्रत रणांगणात सैन्याच्या ज्या हालचाली दिसतात, त्याचा उगम मरुत् सूक्तामध्ये आढळतो. यात त्यांना नरी संशय वाटत नाही.

## शक्ति आणि वेदान्त

वेदान्त शास्त्रामध्ये शक्तीचे स्थान अथवा महत्त्व किती, हे येथे पाहावयाचे आहे. याचा शोध घेण्यासाठी वेदान्त शास्त्रातील जाणकाराचे काय म्हणणे आहे, हे तपासावयास पाहिजे. शंकराचार्यांनी शक्तीचे विवरण करताना ती ऐहिक आणि पारलौकिक आहे, या दृष्टिकोनातून तिच्याकडे पाहिले आहे. तसेच ती दृश्य वस्तुविषयक आणि ब्रह्मापासून अविभाज्य आहे असे मानले आहे. यामध्ये त्यांनी अनुभवजन्य आणि अनुभवापलीकडील अशी दोन्ही मते मांडली आहेत.

बादरायण आपल्या वेद-सूत्रावरील भाष्यात (२-३-३८) असे प्रतिपादितो की, करणशक्तिर्बुद्धेर्हीयते कर्तृशक्तिश्चापद्येत ॥ याचा भावार्थ असा की, विश्वविषयक सर्व हालचालींचा कर्ता जर जीव नसून बुद्धि मानली, तर

शक्तीच्या विरुद्ध तो एक वादविवादाचा विषय होईल. याचा अर्थ असा की, जे खरोखर कारणीभूत आहे, साधनीभूत आहे, तेच प्रतिनिधी आहे, अशी खोटी समजूत होईल. प्रतिनिधीची शक्ति, कारणीभूताला बदली करणे ही क्रिया क्वचितच असंबद्ध ठरेल, नियमाला धरून होणार नाही. शंकराचार्य याच संबंधात पुढे असे म्हणतात की, प्रतिनिधि जरी कितीही शक्तिमान असला तरी कार्याच्या पूर्तीसाठी त्याला कोणाच्या तरी अधिक मदतीवर अवलंबून रहावे लागते. यावरून असे दिसेल की, करणशक्ति हीच श्रेष्ठ होय. येथे जरी करण आणि कार्य या दोन शक्ति सांगितल्या तरी याहून निराळ्या अनेक शक्ति आहेत.

शंकराचार्यांनी शक्तीचे विविध प्रकार मानलेले आहेत. जसे दृक्–शक्ति, सर्ग–शक्ति (उत्पन्न करणे), प्रवृत्ति–शक्ति (हालचाल), बीज–शक्ति (बीजातून वाढ होणे), दहन–शक्ति (अग्नीत दिसते), ज्ञान–शक्ति (जाणणे) इ० इ०. विश्वाच्या उत्क्रांतीपूर्वी, या शक्ति अव्यक्तामध्ये विलीन असतात, त्या वेळी त्या नामरूपविरहित असतात. उत्पत्ति हे इतर काही नसून, शक्तीचे प्रकटीकरण होय. जसे बीजामध्ये झाड उत्पन्न करण्याची शक्ति आहे, त्याच-प्रमाणे प्रत्येक वस्तुमात्रात कमीअधिक प्रमाणात सुप्तशक्ति असते, मग तो वाळूचा कण असो अथवा हत्तीसारखा अवाढव्य प्राणी असो. या सुप्तशक्ति अचाट सामर्थ्य प्रकट करू शकतात. ‘अणुशक्ति’ या प्रकरणात अधिक विवरण पाहता येईल.

[illegible] परमेश्वरशक्ति ही इतकी अमर्याद आहे की, दहन, प्रकाश, ज्ञान व मोठेपणा हे सर्व त्यामध्ये सामावलेले आहे. शंकराचार्यांनी जीव आणि ईश्वर यांचे विभिन्नत्व दाखविताना असे उदाहरण दिले की, अग्नि हा जर ईश्वरस्वरूप मानला तर त्यामधून निघणारी ठिणगी हे जीवस्वरूप होय. पुढे असे विवेचन केले की, या ठिणगीच्या ठिकाणीही अग्नीप्रमाणेच दहन–प्रकाशनशक्ति आहे. त्याचप्रमाणे जीव हे ईश्वरस्वरूप असल्याने, त्यानाही ज्ञान आणि मोठेपणा ईश्वराप्रमाणेच प्राप्त होतो; आणि याला ज्ञानैश्वर्यशक्ति म्हणतात. (वेदसूत्रे ३–२–५). परंतु जीवाचे हे मूळ स्वरूप अविद्या अथवा मर्त्य शरीरसंबंध यांच्या दडपणामुळे झाकून जाते. या मूळ ज्ञानाची प्राप्ति व्हावी असे वाटत असेल, तर जीवाने सर्व मायापाश तोडून निराळे व्हावयास पाहिजे. कार्यकारण-वादाचा विचारही आचार्यांनी यासंबंधात केला आहे, आणि त्याचा सारांश असा सांगितला आहे की, कारणस्यात्मभूता शक्तिः शक्तेश्चात्मभूतं कार्यम्। म्हणजे शक्ति ही कारणाची आत्मा आहे. तर ज्याला आपण कार्य अथवा परिणाम समजतो ते इतर काही नसून शक्तीचे प्रकटीकरण आहे. कारण आणि कार्य ही शक्तीचीच तत्त्वतः दोन एकमेकाला संबंधित अशी रूपे आहेत.

शक्तिवादाची दुसरी बाजू जी आधिभौतिक शक्ति त्यासंबंधी विचार करता असे दिसून येते की, वेदान्ती लोकानी ब्रह्म हा सर्वशक्तिमान मानला असून, तो अपरिमित आहे असे मत दिले आहे. अपरिमित म्हणजे ज्याला कसलेही मोजमाप लागू होण्यासारखे नाही. विश्वनिर्मिति हे कार्य प्रचंड असून कोणा मानवाला ते करता येणे केवळ अशक्य असे असले, तरी परमेश्वर ते लीलामात्र उत्पन्न करू शकतो. याचे कारण एकच की, परमेश्वरशक्ति ही अमर्याद आहे. सर्वशक्तिमान शब्दाची उकल वाचस्पतीने अशीच केली आहे, की ब्रह्म हे पंचभूतात्मक असून, पृथ्वी उत्पन्न करण्यास पुरेसे आहे. सर्वस्य जगत उपादान-कारण निमित्तकारण चेत्युपापदितम् । असे त्याचे वचन आहे.

शक्तिवादाकडे जेव्हा ज्ञानाच्या दृष्टिकोनातून आपण पाहतो, तेव्हा असे दिसून येते की, ज्ञान ही एक शक्तीच आहे. तिला ज्ञानशक्ति असे म्हणतात (वे. सू. २–२–९ ). ज्ञान आणि कर्तृत्व हे ब्रह्माचे स्वाभाविक गुण आहेत.

परमेश्वर प्रचंड विचित्र शक्ति आपल्या ताब्यात ठेवतो, हे कसे समजावे? " कथनुपगम्यते विचित्रशक्तियुक्त पर ब्रह्मेति । " (वे. सू. २–१–३० शंकर.). वेदांती लोकाचे याला उत्तर असे की, उपनिषदानी प्रतिपादन केल्याप्रमाणे परमेश्वर सर्वशक्तिमान आहे, असा विश्वास ठेवला पाहिजे. ते ग्राह्य मानले पाहिजे. नाना ढंगानी भरलेले हे विश्व उत्पादन करणाऱ्याजवळ तशीच विचित्र शक्ति असली पाहिजे, असे मानल्याविना दुसरा उपायच नाही.

माया–शक्ति ही ब्रह्मशक्ति होय. ब्रह्म्याची अंगभूत होय दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । असे भगवद् गीतेमध्ये वचन आहे. अद्वैत तत्त्वज्ञानी या मायेला अविद्या असे नाव देतात. विश्वाची उत्पत्ति करणारी ती परमेश्वराची एक प्रचंडशक्ति आहे. ती सदा कर्तृत्व करीत असते. स्वत ब्रह्म निर्विकल्प, निराकार आहे, असे मानल्यावर विश्वउत्पत्तीसाठी कोणाचा तरी आधार घ्यावयास पाहिजे. म्हणून मायाशक्तीचा आधार घेतला

शक्तिरहितस्य तस्य प्रवृत्त्यासम्भवात् ।
न हि तया विना परमेश्वरस्य स्रष्टृत्वं सिध्यति ॥
(वे. सू. १–४–३ शंकरभाष्य. )

वेदान्ती लोक प्रकृति आणि माया यांमध्ये फरक मानतात सांख्यशास्त्रा प्रमाणे प्रकृति ही पुरुषाहून निराळी आहे. कारण ती अचेतन आहे. ती स्वत निराळी शक्ति नाही किंवा तिला ब्रह्म्यापासून वेगळी काढता येत नाही.

याचाच अर्थ ती अनिर्वचनीय आहे. तिच्या शक्तीचे दर्शन घडविणे हे मानवी शक्तीपलीकडे आहे. या ठिकाणी माया ही परमेश्वराधीन आहे. सांख्याच्या प्रकृति-प्रमाणे स्वतंत्र नाही. याच कारणासाठी प्रकृति आणि माया यामध्ये फरक केला जातो.

माया ही स्थिर स्वभावाची नाही. दूर जाणारी नाश पावणारी, आहे. ज्याने स्वतः जीवात्म्याला जाणले, त्याची माया दूर झाली. अज्ञानाचे पटल नष्ट झाले म्हणजे माया नष्ट झाली. यासाठी मायापटल दूर झालेले योगी पुन्हा संसारचक्रात सापडत नाहीत. लाकडाची मोळी अग्नि जशी जाळून टाकतो, तसे ज्ञान मायापाश तोडून टाकते आणि जीवात्मा परम ब्रह्मरूपात विलीन होऊ शकतो. त्याच्या ब्रह्मस्वरूपाला जशी माया स्पर्श करू शकत नाही, वेगळी रहाते, तद्वतच ज्ञानाने संसारबंधनातून मुक्त झालेल्या जीवात्म्याला माया स्पर्श करीत नाही. ती त्याला सोडून जाते.

## शक्ति व विविध वेदान्त संप्रदाय

मागील प्रकरणातील विवरण फक्त शंकराचार्य-संप्रदायाचे झाले; पण त्या-व्यतिरिक्त आणिकही संप्रदाय आहेत. त्याचे थोडक्यात परीक्षण करावयाचे आहे. शंकराचार्य स्वतः अद्वैतमतवादी असल्याने शक्तीला निराळे अस्तित्व नाही, ब्रह्म आणि शक्ति एकरूप आहे. हेच त्याचे प्रतिपादन आहे.

श्रीकंठ नामक शास्त्रज्ञाने ब्रह्मसूत्रांवर शैवसांप्रदायाच्या दृष्टिकोनातून टीका लिहिलेली आहे. त्यामध्ये त्याने शंकराचार्यांच्या वरील मतास विरोध केला आहे. ब्रह्म शब्दाऐवजी त्याने परमशिव आणि शक्तिऐवजी उमा ही परमशिवाची जोडीदारीण मानली आहे. त्याच्या मताप्रमाणे निरतिशय ज्ञान व आनन्द ही शक्तीची ब्रह्माबरोबरची आवश्यक स्थिति आहे. ब्रह्माची शक्ति अमर्याद आहे. तो असे प्रतिपादन करतो की, विश्वनिर्मितीचे ब्रह्म हे भौतिक आणि पुरेसे कारण होऊ शकत नाही. कारण मग ते सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान असले पाहिजे. परंतु त्याच्या मते ब्रह्म परिपूर्ण नाही. त्याच्या म्हणण्याचा मुद्दा असा की, शिव-तत्त्वाचा मुख्य आधार स्तंभशक्ति ही आहे आणि पराशक्ति ही शिवस्वरूप असल्याने विभिन्न नाही. आपल्या प्रतिपादनासाठी त्याने शिवपुराण आणि वायुपुराणातील काही आधार घेतले आहेत. तो म्हणतो की, विश्वाची उत्पत्ति शिव आणि शक्ति यांच्या गूढ संयोगाने होते. दोघांचे स्वभाव एकच असून चंद्र आणि त्याचे किरण यांच्याप्रमाणे त्यांमध्ये फरक नाही. योगसांप्रदायाप्रमाणे शक्तिमान आणि शक्ति यांमध्ये ते फरक मानीत नाहीत. शिवाची परमशक्ति ही

आनदमय आहे. " परमशक्तिः आनन्दमय इत्युच्यते । " ती देशकालमर्यादेच्या पलीकडे आहे. तो आपल्या उमाभक्तीबरोबर असतो, इतकेच नव्हे तर उमा ही प्रणवस्वरूपी आहे असे तो मानतो.

वैष्णवसांप्रदायाच्या बहुतेक सर्व वेदान्त टीकाकारांनी या ना त्या स्वरूपात शक्तीचे अस्तित्व मान्य केले आहे. अद्वैतमतवादी रामानुज याने श्रीभाष्यात शक्ति ही ब्रह्माचा विशेष गुण म्हणून मानला आहे. रामानुज हा स्वत. जरी वैष्णव संप्रदायी होता, तरी त्याचे कुळदैवत म्हणून तो लक्ष्मी-नारायणाचे पूजन करीत असे. फक्त नारायणाची पूजा करीत नव्हता. यावरून तो शक्ति-उपासक होता, असे मानण्यास जागा आहे. तो वैष्णव असल्यामुळे ब्रह्माला काही वेळा पुरुषोत्तम या नावाने संबोधितो. हा पुरुषोत्तम सर्वज्ञाता, सर्वशक्तिमान असून सर्व उत्तम गुणांचा त्यामध्ये अंतर्भाव झालेला आहे, असे मानतो. सर्वज्ञ सर्वशक्तिः पुरुषोत्तमः सच्छब्दाभिधेय' । (वे. सू. १-१-१). विष्णुपुराणातील परा, अपरा आणि अविद्या या तीन शक्तींचा उल्लेख करतो. निर्गुण शब्दाची व्याप्ति देताना तो असे मांडतो की, पुरुषोत्तम हा निर्गुण आहे, म्हणजे जरी तो पवित्र गुणरहित आहे, तरी याचा अर्थ असा नव्हे की, तो सर्वगुणविरहित आहे. त्या पुरुषोत्तमाची शक्ति अचिन्त्य आहे. जीवात्मे आपली प्रतिमा आणि आकार स्वशक्तीच्या सामर्थ्यावर घेतात, आणि परमेश्वर हा त्याच्या निर्मितीमध्ये फक्त निमित्तकारण आहे. परमेश्वर अनेक गुणांनी युक्त असल्याने शक्ति त्याच्या मोठेपणाला कमीपणा आणीत नाही अगर मूलभूत परिणामाला विरोध करीत नाही. सर्वशक्तियोगो न विरुध्यते । (श्रीभाष्य, १-१-१ )

शंकराचार्यांच्या अद्वैत मताला श्रुतीचे विवरण करताना रामानुज पाठिंबा देतात. जो परमेश्वर जगाची उत्पत्ति करतो, तो प्रचंड शक्तीने भरलेला आहे. विश्व उत्पन्न करण्यासाठी त्याला कोणाची मदत लागत नाही, ' मी अनेकविध आहे ' या नुसत्या विचाराने, तो उत्पत्ति करू शकतो. जगदुपादानस्य ब्रह्मणः स्वव्यतिरिक्ताधिष्ठानान्तरनिवारणेन विचित्रशक्तियोगप्रतिपादनम् । इ० इ०.

अद्वैतवादी लोकांचे मुख्य प्रतिपादन असे की, जीव आणि ईश्वर ही एकरूप आहेत, त्यामध्ये फरक नाही. निंबार्क आणि श्रीनिवास यांच्या भेदाभेद-वादाप्रमाणे आणि ते द्वैतमतवादी असल्याने, जीवशक्ति आणि ईश्वरशक्ति यांच्या मर्यादेमध्ये ते फरक मानतात. तस्मात् सर्वज्ञ' सर्वचिन्त्यशक्तिः विश्वजन्मादिहेतु भगवान् वासुदेव' । ( निंबार्क भाष्य १-१-४ ). हा वैष्णववादी असल्याने सर्व शक्तिमान् परमेश्वराला तो वासुदेव या नावाने संबोधितो. त्याचे म्हणणे असे

की, सर्वशक्तिमान वासुदेवापासून जीव हा एक लहानसा अंश उत्पन्न झाला तेव्हा जीव आणि वासुदेव दोन्ही शक्तिमान आहेत. परतु फरक आहे. द्वैत आहे, ते असे की, जीव-शक्ति ही मर्यादित आहे आणि ती वासुदेवावर अवलंबून आहे. स्वतत्र नाही. परतु वासुदेवाची स्थिति तशी नाही. तो मूलत च सर्वशक्तिमान आणि तो सुद्धा अमर्याद शक्तिमान आहे सारांश असा की, जीव आणि शिव म्हणजे वासुदेव याच्या शक्तीमध्ये जर फरक आहे, तर ती एकरूप म्हणजे अद्वैत मानता येत नाही त्याचप्रमाणे, अंशो हि शक्तिरूपो ग्राह्य । एव परस्य शक्ति जीवोऽल्प शक्तिस्वतन इति श्रुते ॥ असे वेदान्त कौस्तुभकाराचे मत आहे, आणि ते निंबार्काच्या प्रतिपादनाला पाठिंबा देणारेच आहे. वेदसूत्तावरील आपल्या भाष्यात (३-२-२७) श्रीनिवास या टीकाकाराचेही प्रतिपादन वरील प्रमाणेच आहे.

रामानुज वरील सिद्धाताचा अधिक खुलासा करताना म्हणतो की, जीवाची शक्ति मर्यादित असल्याने ज्या वस्तु गूढ आहेत आणि पुष्कळ अतरावर आहेत, त्याची जाणीव होणे कठीण आहे. परतु उलट बाजूने विचार केला, तर असे दिसते की, परमेश्वर हा सर्वशक्तिमान, व त्याची शक्ति अमर्यादित आहे. त्यामुळे वस्तुमात्र कितीही दूरवर असल्या तरी त्याची जाणीव होणे त्याना सुलभ आहे विश्वाची उत्पत्ति कोणत्या तरी कारणामुळे झाली. ते नुसतेच शक्तिमान नसून, उत्पत्तीच्या क्रमाने काही नियमित धोरणाने चालविले जात आहे सृष्टीचा हा नियम आहे की, प्रत्येक कार्याला अथवा परिणामाला कारण आहे, आणि ते कारण शक्तिमान असते उत्पत्तिक्रमामध्ये ते कारण कोणते, याचा जेव्हा विचार केला जातो, तेव्हा ते सर्व शक्तिमान ईश्वरामध्ये, वासुदेवामध्ये, शिवामध्ये, ब्रह्मामध्ये अतर्भूत आहे, असे मानले जाते (वे. सू. १-१-३)

मध्वाचार्य विष्णुपुराणाच्या आधारे प्रतिपादन करतात की, ब्रह्म अथवा विष्णूची शक्ति ही सर्वसाधारण मानवी बुद्धीच्या फार पुढे आहे, म्हणजेच अमर्याद आहे. तर दुसरे एक टीकाकार विष्णुस्वामी असे प्रतिपादन करतात की, सर्व शक्ति ब्रह्मामध्ये केंद्रित झालेल्या आहेत त्याच्या व्यतिरिक्त शक्ति नाही सर्व शक्तीचा उगम तेथून होतो

अद्वैतमतवादी आणि द्वैतमतवादी यांचा शक्तीकडे पाहण्याचा वरील प्रमाणे निरनिराळा दृष्टिकोन आहे, याचे वरील त्रोटक विवरण आहे.

## शक्तीचे पुराणामधील स्थान

भारतीयांच्या पुराणग्रथामध्ये शक्तिवादाचे भरपूर स्पष्टीकरण आढळून येते. विष्णुपुराण, मार्कंडेय, देवीभागवत, कालिकापुराण, भागवत १०

ग्रयानी शक्तिवादाचे विवरण केलेले आहे. श्वेताश्वतर उपनिषदामध्ये सर्व-शक्तिमान ब्रह्मनचे विवरण आलेले आहे. ही ब्रह्मशक्ति स्वाभाविक आणि अचिन्त्य अशी आहे. शक्तयः सर्वभावानामचिन्त्यज्ञानगोचराः । ( १-३-२ ) विष्णु-पुराणकाराचे सर्वसाधारण मत असे की, परमेश्वर हा सर्व-शक्तिमान आहे. असे जरी असले, तरी एक शंका विचारण्यात येते की हा परमेश्वर जर निर्गुण आहे, शुद्धामधील शुद्ध आहे, आणि व्यक्तिभावरहित आहे, तर तो विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय या कार्यांमध्ये, मध्यस्थ म्हणून कसा वागतो ?

> निर्गुणस्याप्रमेयस्य शुद्धस्याप्यमलात्मनः ।
> कथं सर्गादिकर्तृत्वं ब्रह्मणोऽभ्युपगम्यते ॥ ( विष्णु. १-३-१ )

हा प्रश्न म्हणजे खरोखर असत्याभास आहे. परन्तु याचे उत्तरही तयार आहे. प्रत्येक वस्तुमात्रामध्ये शक्ति आहे. मग ती भासमान होवो अथवा न होवो. वाळूच्या कणात अगर बीजामध्ये शक्ति आहे. बीजामधून मोठमोठे वृक्ष तयार झाल्याचे आपण पाहतो. तसेच अतिसूक्ष्म असणाऱ्या अणु-परिमाणूंमध्ये केवढी भयंकर संहारक-शक्ति आहे, हे चालू युगातील हायड्रोजन बॉम्बसारख्या वस्तुमात्रातून भासमान झालेले आहे. मग अशा अतिसूक्ष्म वस्तूंमध्ये जर एवढी भयंकर शक्ति आहे, तर विश्व उत्पन्न करणाऱ्या परमेश्वरामध्ये शक्तीचे प्रमाण किती अमर्याद असेल, याची कल्पना करता येणार नाही. त्याने ही शक्ति कोणापासून उसनी घेतलेली नाही, तर ती मूळ स्वरूप आहे. ज्याप्रमाणे उष्णता ही अग्नीची शक्ति आहे, त्याचप्रमाणे ही त्याची स्वाभाविक शक्ति आहे. त्याच्या या शक्तीला **पराशक्ति** असे म्हणतात, कारण शक्तीला वश करून घेता येत नाही, जिंकता येत नाही, अथवा पगू करता येत नाही. परमेश्वरी तत्त्व हे गूढ आणि अनेकविध आहे, या मूळ सिद्धान्ताला पुराणकारांनी दुजोराच दिलेला आहे, व तो स्वतः शक्तिमान आहे हे सिद्ध केले आहे. यतो वा इमानि भूतानि जायन्ते ॥ हे श्रुतिवचन आहे.

परस्य ब्रह्मणः शक्तिस्तथेदमखिलं जगत् ॥ ( विष्णु. १-२२-५४ ) त्या महाशक्तीचे प्रकटीकरण म्हणजे अखिल विश्व होय. शक्तीचे ते व्यापक स्वरूप होय. परा, अपरा आणि अविद्या या तीन प्रकारच्या शक्ति आहेत. परा ही देवतांची शक्ति असून ती आपल्याच तेजामध्ये प्रकाशत असते. अपरा ही जीवशक्ति असून ती मूळशक्तीमधून आपली वाढ करून घेत असते. मग

सूर्यापासून निघणारे किरण आपली वाढ करून घेतात, त्याप्रमाणे होय  अविद्या शक्तीमुळे जीव गुरफटून टाकला जातो  याच शक्तीला मायाशक्ति असेही म्हणतात  तिचे कार्य म्हणजे सत्यस्थितीवर पडदा घालून विकृत भासविणे

शक्तीचे अस्तित्व प्रत्येक वस्तुमात्रामध्ये वसत असले तरी ते सर्वत्र सम प्रमाणातच असते असे नाही  पाषाणामधील शक्ति, मानवातील शक्ति, हत्तीसारख्या पशूमधील शक्ति याचे प्रमाण निरनिराळे असेल

अप्राणवत्सु स्वल्पाल्पा स्थावरेषु ततोऽधिका ।
सरीसृपेषु तेभ्योऽन्याप्यतिशक्ता पतत्रिषु ॥
पतत्रिभ्यो मृगास्तेभ्य स्वशक्त्या पशवोऽधिका ।
पशुभ्यो मनुजाश्चातिशक्त्या पुस प्रभाविता ॥
तेभ्योऽपि नागगंधर्वयक्षाद्या देवता नृप ।
शक्र समस्तदेवेभ्यस्तश्चातिप्रजापति ॥ (वि पु ६ ७ ६४ ६६)

मानवाच्या शक्तीपेक्षा देवादिकांची शक्ति मोठी  देवतामध्येसुद्धा इंद्र जास्त शक्तिमान  पण सर्वांमध्ये प्रजापति सर्वश्रेष्ठ, असा विष्णु पुराणातील वरील श्लोकाचा भावार्थ आहे

वैष्णव तत्त्वज्ञानाप्रमाणे शक्तीची तीन रूपे मानलेली आहेत  अतरग, ततस्था आणि बहिरग ही रूपे होत  विष्णुपुराणाने शक्तीची जी वर्गवारी केलेली आहे त्यामध्ये आणि वरील रूपात खूपच साम्य आहे  पराशक्ति, क्षेत्रज्ञाशक्ति आणि अविद्याशक्ति ह्याच क्रमाने अतरग, ततस्था आणि बहिरग शक्ति होय

प्रत्येक देवता ही निरनिराळ्या शक्तीचे व्यक्त स्वरूप होय, हे आपणाला कृष्णजन्म कथेवरून दिसून येईल  त्या ठिकाणी योगमाया शक्तीचे प्राबल्य होते प्रत्येक देवताच्या नावावरून शक्तीला नाव प्राप्त झाले आहे  जसे ब्रह्मापासून उत्पन्न झाली ती ब्राह्मी, विष्णूपासून वैष्णवशक्ति, शकरापासून माहेश्वरी इ० इ० मार्कंडेय पुराणकारांनी याचे वर्णन केले आहे ते असे,

आयाता ब्रह्मण शक्तिर्ब्रह्माणी साभिधीयते ।
माहेश्वरी वृषारूढा त्रिशूलवरधारिणी । (मा पु )
ब्रह्माणीत्यपरा शक्ति ब्रह्मणोत सगगामिनी ॥ (देवी भा )

याच पुराणात या शक्तीला आद्या, दुर्गा, वेदगर्भा, अंबिका, भद्रा भद्रकाली इ० नावांनी संबोधिले आहे यावरून असे दिसून येईल की,

पुराणकालामध्ये शक्तितत्त्वाची पुष्कळच भरभराट झाली आणि तिचे पूजन चालू झाले.

मार्कंडेयपुराणांतर्गत देवीमहात्म्य हे तर शक्तीचे प्रदर्शन म्हटले पाहिजे. या ग्रंथाचे पठण मोठ्या भक्तिभावाने भारतामध्ये सर्वत्र होते. या ग्रंथामध्ये प्रथमच प्रश्न करण्यात आला तो असा की,

तत् केनैतन्महाभाग यन्मोहो ज्ञानिनोऽपि ।
ममास्य च भवत्येषा विवेकान्धस्य मूढता ।। ( देवी महात्म्य )

बुद्धिमान जीवात्मा मायेच्या जंजाळामध्ये कसा फसतो किंवा असे समजण्यामध्ये काही समजुतीचा घोटाळा आहे काय ? मानवी जीवाना ऐहिक बाबतीत जरी तारतम्यबुद्धि दिलेली असली तरी ऐहिक विषयांच्या आवर्तातून ते बाहेर पडू शकत नाहीत. मनुष्य कितीही विद्वान आणि शहाणा असो, तो मायाजाळात अडकलाच जातो.

ज्ञानिनामपि चेतांसि परमा प्रकृतिः किल ।
बलादाकृष्य मोहाय प्रयच्छति महीपते ।। ( दे. भा. ५-३३-५२ )

मायेचा काही एक असा विशिष्ट प्रभाव आहे की, प्रत्येकाला ती अज्ञान सागरात बुडवून टाकते आणि तेथून जीवात्म्याला बाहेर निघणे अशक्य करून ठेवते. परंतु ही माया असे अडकविण्याचे कार्य करते, तसे निर्व्याज भक्तीने जर तिची आराधना केली, तर ती भवसागरातून सोडवणूकही करते आणि संसारातून मुक्त करते.

सैषा प्रसन्ना वरदा नृणां भवति मुक्तये ।। ( मा. पु. )

महामाया शक्तीचा स्वभाव आणि तिचे कार्य या विषयी नेहमी प्रश्न विचारण्यात येतात. महाराजा सुरथ याने हा प्रश्न ऋषींना विचारला असताना ऋषींनी त्याचे अनेक प्रकाराने समाधान केले आहे. ज्या शक्तीला आपण देवता मानतो ती शाश्वत आहे. अनादि आहे आणि दृश्य विश्व ही त्या शक्तीची मूर्ति आहे. शक्ति सर्वव्यापी आहे आणि उत्पत्ति व नाश याला जर कारणीभूत नाही, तर तिच्या अवतारांच्या अनेक कथा पुराणांतून आलेल्या आढळतात. ती जर शाश्वत स्वरूपाची आणि अविनाशी आहे, तर ती दुष्टांचा संहार करण्यासाठी अवतार कसा घेते ? जे कृत्य इतर देवांनाही करणे अशक्य असते, ते ती या अवतारामध्ये करते. या सर्वशक्तिमानाचे प्रथम प्रकटीकरण योगनिद्रा स्वरूपात झाले आणि तिने विष्णूवरही आपले मायापटल टाकले. ब्रह्मदेवाने तिची पहिली स्तुति करून विष्णूला मधु-कैटभ नाशाकरिता जागृत करावयास लावले.

देवानां कार्यसिद्ध्यर्थमाविर्भवति सा यदा ।
उत्पन्नेति तदा लोके सा नित्याप्यभिधीयते ॥

देवता साक्षात स्वरूप घेतात आणि त्याचा अवतार होतो, याविषयी कोणाची काही मते असली, तरी त्या रूप घेतात ही क्रिया मानवी स्वभावात भिनलेली आहे. अत्यंत निकडीच्या प्रसंगी तिने अवतार घेतलेले आहेत, ही सत्य गोष्ट आहे. वेदकाळापासून चाललेल्या देव आणि असुर युद्धामध्ये त्याच्या लढ्यात देवाची बाजू राखण्यासाठी तिने रूपे घेतलेली आहेत, असे पुराणकार सांगतात. महिषासुराच्या नाशाकरिता देवीने अवतार घेतला, ही कथा तर प्रत्येक भारतीयाला माहीत आहे. भगवत्या कृत सर्वं न किंचिदवशिष्यते ॥, म्हणजे मानवच नव्हे, तर सर्व देवानाही कळून चुकले होते की, त्या आद्यशक्तीचे कर्तृत्व सर्वांना कारणीभूत आहे. वामन-पुराणामध्ये कात्यायनी देवीच्या प्रकटीकरणाबद्दल असाच मजकूर आहे. या आद्यशक्तीलाच 'देवी भागवत' आद्यविद्या असे म्हणते.

सर्वचैतन्यरूपां तामाद्यां विद्यां च धीमही ॥ ( दे. भा. )

ती सर्व चैतन्यरूप आहे असे त्याचे प्रतिपादन आहे. तीच कार्याचे कारण आहे. शक्तिवादासंबंधी या पुराणकाराचे मत असे की, प्रकृति आणि पुरुष ही एकरूप आहेत. स्त्रय पुमांश्च प्रकृतिस्तावभिन्नौ परस्परम् ॥ (दे. भा. ९–३८–२८ ) असे वचन आहे. ब्रह्मवैवर्त पुराण, शक्ति ही मूळ प्रकृति असेच मानते. बृहन् नारदीय पुराणकार शक्ति ही विश्वाची उत्पादनकर्ती आहे, असे सांगून उमा, लक्ष्मी, गिरिजा, दुर्गा, भद्रकाली इ० देवतांची नावे देतात. ती अनेक रूपाने दिसली तरी एकच आहे, हे खालील श्लोकात दाखविले आहे.

सेयं शक्तिर्महामाया सच्चिदानन्दरूपिणी ।
रूपं बिभर्त्यरूपा च भक्तानुग्रहहेतवे ॥

सूत संहिता, यज्ञवैभव खंडामध्ये शिवाच्या आश्रयाने राहणाऱ्या एका परमा, माया, दुर्घटनरिणी आजरूपा या शक्तीचे तात्त्विक विवरण केलेले आहे. तसेच मातृका आणि मंत्रमाता याचे विवरण असून, स्थूल सूक्ष्म आणि सुसूक्ष्म असे तीन प्रकार सांगितले आहेत. जीवसृष्टीपासून शक्ति ही निराळी नाही याचे जोराने प्रतिपादन केलेले आहे. शिव शक्ति ज्याला एकरूप आहेत असे समजले, त्याला सर्वज्ञान झाले, असे पुराणकारानी शेवटी मत दिले आहे.

शिव आपले स्वरूप पाच प्रकारानी प्रकट करतो आणि ह्या प्रत्येक प्रकारात एक एक शक्ति दृग्गोचर होते. ( १ ) सद्योजात-सर्जनशक्ति, ( २ ) वामदेव-पालनशक्ति, ( ३ ) अघोर-संहारकशक्ति, ( ४ ) तत्पुरुष-तिरोभाव-शक्ति, ( ५ ) ईशान-अनुग्रहशक्ति ( सू. स. १४-२-५). तसेच शरीर-देह हे जर ब्रह्म मानले तर त्यामध्ये निरनिराळ्या शक्ति कोणत्या विशिष्ट भागात वास करतात. याचे वर्णन आहे. चित्-शक्ति-मूलाधार चक्राच्या ठिकाणी, माया शक्ति, मुख भागाचे शेवटील टोक, पराशक्ति ही नादरूप असून मुख भागाचे मध्यभागी असते, आणि बिंदुशक्ति ही दोन भुवयांच्या मध्यभागी असते, सरस्वती शक्ति जिभेवर, महालक्ष्मी हृदयकमलामध्ये आणि पार्वती रुद्राच्या ठिकाणी असते ( सू. स. ७-१७-२३ ). या सर्व विवेचनाचे सार इतकेच की, शक्तितत्त्व मानवाचे अगर जीवनसृष्टीचे शरीर देहात सर्वत्र विखुरलेले आहे आणि इंद्रियांचे कार्य त्या त्या शक्तीने चाललेले आहे. याला मानवशक्ति असेही म्हणता येईल.

## वैष्णव वाङ्मयातील शक्तीचे स्थान

विष्णुपुराण आणि वेदान्तसूत्रावरील वैष्णवविवरण या गोष्टीवरून वैष्णव पंथातील शक्तीचे स्थान यासंबंधी अनुमान करता येते. वैष्णव तत्त्वज्ञानामध्ये शक्तीला प्राधान्य आहे, असेच दिसून येते. या पंथाच्या दृष्टिकोनातून विचार केला असता असे दिसते की, शक्तीचे अस्तित्व सर्वशक्तिमान विष्णु अथवा कृष्ण यापुरतेच मर्यादित नसून त्याच्या शाश्वत जोडीदारीणीचाही समावेश त्या शब्दात आहे. या वाङ्मयात तिला देवत्व दिलेले असून, मूर्तस्वरूपही दिलेले आहे. वेदकाळामध्ये जरी लक्ष्मी ही विष्णूची शक्ती मानली होती, तरी पुढे महाभारत काळात श्रीकृष्ण भगवानाची राधा ही प्रेरक शक्ति मानलेली आहे. हीच गूढ-शक्ति ल्हादिनीशक्ति नावाने ओळखली जात होती. या तत्त्वज्ञानातील प्रधान तत्त्व असे की, सर्वशक्तिमान परमेश्वरापासून अणुरेणु स्वरूपात जीवसृष्टीची उत्पत्ति आहे. सर्वशक्तिमान ईश्वर आणि जीव यांचे संबंध दाखविताना सूर्य आणि त्याचे किरण यांची उपमा दिली जाते. सूर्य हा सर्वशक्तिमान तर अणुरेणु जीव हे त्याचे किरण होत. ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः । या गीते-मधील श्लोकात हाच अर्थ विशद करून सांगितलेला आहे.

प्राचीन पंचरत्न संहितेपासून आजतागायत कोणतेही वैष्णव वाङ्मय घेतले, तरी सर्वशक्तिमानाबरोबर लक्ष्मी अथवा राधा या शक्तिरूपात बरोबर वावरत आहेत, असेच दिसून येईल. सांख्यतत्त्वज्ञानामध्ये शक्ति आणि शक्तिमान

यामध्ये जसा फरक मानलेला नाही, तद्वत येथेही तो मानलेला नाही ब्राह्मण संहितेमध्ये ( ४–३७ ) असे वर्णन आढळते की, सर्वशक्तिमान ईश्वराला आनंद चिन्मयरस प्रतिभा कलांनी वेढून टाकलेला आहे गोलोकातील त्याचे वास्तव्य अनेक शक्तींनी वेढलेले आहे या आनन्दमय शक्तीच्या सहवासात तो नेहमी निजानन्दामध्ये मग्न असतो. शेषशायी भगवान स्वरूप म्हणजे त्याच्या आधार शक्तीचे स्थान असून प्रलयकाळी त्या ठिकाणी योगनिद्रा घेत राहतो आत्मना रमया रेमे त्यक्तकाल सिसृक्षया ॥ हा आत्माराम अथवा आनंद शक्तीसहवर्तमान आनंदाने कालक्रमणा करीत असतो

जयाख्य संहितेचे म्हणणे असे की, शक्तिमानाजवळ लक्ष्मी कीर्ति, जया आणि माया या चार प्रकारच्या शक्तींचा वास असतो

लक्ष्मी कीर्तिर्जया माया देव्यस्तस्याश्रिता सदा ॥ (८–७७)

चार शक्तींमध्ये अर्थातच लक्ष्मी ही प्रमुख मानलेली आहे कारण ती ऐश्वर्यशक्ति, परमेश्वराचे षड्गुण ऐश्वर्यांपैकी एक होय

राधा ही श्रीकृष्णाची शक्तिस्वरूप सहचारिणी होती कृष्णाविना तिला अस्तित्वच शिल्लक उरत नाही, इतकी ती एकरूप होती नारदपंचसूत्रामध्ये या दोघांचे संबंध वर्णन करताना असे दाखविले आहे की, कृष्ण भगवानाचे जे प्रिय होते, त्यामध्ये राधा प्रमुख होती वैष्णव वाङ्मयामध्ये राधेला फार मोठे स्थान दिलेले आहे ज्याप्रमाणे शैव पंथियामध्ये दुर्गाचे स्थान आहे, त्याप्रमाणेच या पंथामध्ये राधा देवीचे स्थान आहे यथा छन्दसि गायत्री दुर्गा शक्तिमतीष्वपि तथा राधा कृष्णपिपासु च ॥ (१–३८) नारायणाची पत्नी म्हणून तिला नारायणी हे नाव प्राप्त झाले, तर विष्णूची पत्नी म्हणून वैष्णवी नाव प्राप्त झाले आहे श्रीकृष्णाबरोबर सदैव आनंदमयी शक्तीमध्ये रममाण असणारी अखंड सर्वव्यापी शक्ति म्हणून राधेचा निर्देश केला जातो या देवतेची निर्मिती परमेश्वराच्या वामांगामधून झालेली आहे

रासेश्वरी च सर्वांशा सर्वशक्तिस्वरूपिणी ॥ (ना पंचसूत्र)

या ठिकाणी राधेचा उल्लेख रासेश्वरी या शब्दाने केलेला आहे म्हणजेच गोपींमध्ये प्रमुख अशी ही होती श्रीकृष्ण जर ब्रह्मस्वरूप मानले तर राधा ही ब्रह्मशक्ति होय म्हणजे मायेपासून निराळी होय मानवी मनाचा ताबा चालविणारा साक्षात् ती परमात्माच होय न कृत्रिमा च सा नित्या सत्य स्वरूपा यथा हरि । (ना प ) ती कृष्णामयी परादेवताच होय

गोपाळ-तापिनी उपनिषदामध्ये श्रीकृष्णाचा उल्लेख गोपीजनवल्लभ, रुक्मिणीकांत, रमामानसहंस या नावाने केलेला आढळतो. म्हणजे गोपी, रुक्मिणी, लक्ष्मी या शक्तिरूपांसह तो आढळतो.

अहिर्बुध्न्य संहितेमध्ये वैष्णव शक्तीसंबंधी बरीच माहिती दिली आहे. या संहितेची सुरवातच मुळी हरि-शक्तीला नमन करून करण्यात आली आहे. पंचबिंदु हरेः शक्तिं पंचकृत्यकरीं नुमः ॥ या ठिकाणी पंचकृत्यकर म्हणजे सर्ग-स्थिति-संहार-तिरोभाव आणि अनुग्रह, या पंच विकारासंबंधी असा आहे. तो भगवान आहे म्हणजे सहा ईश्वरी गुणानी युक्त असा आहे. तसेच तो वासुदेव आहे म्हणजे सर्व प्राणिमात्रामध्ये त्याचे वास्तव्य आहे.

षाड्गुण्यगुणयोगेन भगवान परिकीर्तितः ।
समस्तभूतवासित्वाद् वासुदेवः प्रकीर्तितः ॥( ११–२८ )

श्रीकृष्णाचे आयुध सुदर्शन म्हणजे या संहितेप्रमाणे ती त्याची शक्तीच होय. यानंतर षाड्गुण्य म्हणजे काय याचे विवरण केलेले असून, त्या एक प्रकाराने त्याच्या शक्तीच होत असे प्रतिपादिले आहे. या शक्तिरूपानेच अनादि ब्रह्म आपला आविष्कार करीत असते. षाड्गुण्य तत् परब्रह्म स्वशक्तिपरिबृंहितम् ॥ (अ. सं. ११–३२ ) शक्तीचे स्वरूप मूळ वस्तूवरून दिसत नसून, त्याचे कार्यावरून दिसून येते, हे आपण जाणतो.

स्वरूपे नैव दृश्यन्ते दृश्यन्ते कार्यतस्तु ताः ।

पुराणे आणि तंत्रग्रंथ परमेश्वराच्या ईश्वरी शक्तीसंबंधी जो अर्थ प्रतिपादितात, तोच अर्थ या संहितेने गृहित मानलेला आहे. ब्रह्म आणि शक्ति याचे संबंध विशद करताना त्यांनी चंद्र व त्याचे किरण याचे उदाहरण दिले आहे. चंद्रस्य चंद्रिकेवेयं शिवस्य सहजा शिवा ॥ परमेश्वराच्या या उत्साही शक्तीलाच स्वातंत्र्यशक्ति असे नाव दिले आहे. वैष्णवी शक्तीचे भव्यदर्शन घडविण्यासाठीच आनन्दा, स्वतन्त्रा, नित्या, व्यापिनी, पूर्णा, लक्ष्मी, श्री, पद्मा, कमला, विष्णु-शक्ति, कुण्डलिनी, अनाहता, गायत्री, माता अशा अनेक नावांनी तिला संबोधिले आहे. संहितेमध्ये शेवटी विश्वाच्या उत्पत्ति व लय स्थितीचा विचार केला असून, त्यामध्ये शक्तीचे कार्य कसे चालते, त्याचे विवरण केलेले आहे.

गौतमीयतंत्रामध्ये बीज आणि मंत्र की, ज्यावर श्रीकृष्णाचीच सत्ता चालते, याचा ऊहापोह केला आहे. श्रीकृष्ण जर बीज मानला तर त्याची ईश्वरी शक्ति माया अथवा प्रकृति ही गुणमयी होय. ती त्रिगुणांची बनलेली असून नेहमी नित्य स्वरूपात वावरत असते.

ईश्वरो जगतां बीजं शक्तिर्गुणमयी त्वजा ॥

हा परमात्मा नेहमी आठ दिव्यशक्तींनी वेढलेला असतो, आणि त्यामध्ये लक्ष्मी ही प्रधान शक्ति होय ही शक्ति अविनाशी असून तिला जगन्माता या नावाने संबोधिले आहे. शक्तीचे हे स्वरूप अत्यंत शुद्ध व पवित्र असून, जगातील उलाढालीने तिची चित्तवृत्ति डळमळत नाही कालचक्रादि कारणांचा तिजवर मुळीच परिणाम होत नाही सावलीप्रमाणे ती आपल्या मालकाचे मागोमाग राहते, आणि अवतारकाली, सीता, रुक्मिणीप्रमाणे प्रत्यक्ष रूपाने त्यांना साथ देते राघवत्वेऽभवत्सीता रुक्मिणी कृष्णजन्मनि ।

विष्णुपुराणामध्ये वैष्णवी शक्तीचे त्रैमूर्ति स्वरूप वर्णन केले आहे. सन्धिनी, संवित् आणि ल्हादिनी शक्ति अशी त्यांची नावे आहेत अस्तित्व, चेतना आणि आनंद ह्या ब्रह्माचे आविष्कार दर्शविणाऱ्या या तीन शक्ति होत ज्याप्रमाणे सर्व रसामध्ये माधुर्य हा उत्तम रस होय, तद्वत् वरील तीन शक्तींमध्ये ल्हादिनी शक्ति, ही राधास्वरूप, आनंदमयी अशी आहे ल्हादिनी या महाशक्ति सर्वशक्ति वरीयसी ॥

भागवतकारांनी शक्तीचे चित्र वरीलप्रमाणचे रंगविलेले आहे. वेदांत प्रतिपादनातील काही अंश जरी यामध्ये आला असला तरी शक्ति आणि शक्तिमान यांचाच ऊहापोह झालेला आहे परमेश्वराच्या स्वरूपाविषयी संपूर्ण निष्ठा यामध्ये दाखविलेली आहे ईश्वरी षड्गुणांनी युक्त असा जो भगवान् तोच एक सर्वत्र आहे, असा युक्तिवाद मांडलेला आहे त्याची शक्ति अमर्यादित व अविनाशी आहे याच प्रधान तत्त्वावर भागवतामध्ये प्रतिपादन केलेले आहे या भगवताच्या सर्व शक्ति आत्मभूत असून मायेबरोबर त्यांचा संबंध नाही यासाठीच त्या शक्तींना स्वरूपशक्ति असे संबोधिले आहे हा सर्वशक्तिमान आहे आणि अनेक शक्ति त्यामध्ये अंतर्भूत आहेत, हे दाखविण्यासाठी त्याला विविधशक्ति, आत्मशक्ति, अतर्क्यसहस्रशक्ति, स्वच्छन्दशक्ति, अनन्तशक्ति, उरुशक्ति, चिच्छक्ति, अखिलकारकशक्तिधर इत्यादि नावाने संबोधिले आहे उत्पत्ति, स्थिति आणि लय हे कार्य तो मायेला हाती धरून करीत असतो स्वशक्त्या मायया युक्तः सृजत्यत्ति च पाति च । ( भागवत ४–११–२६ ) तो मायातीत आहे, अगर मायेपासून वेगळाही आहे मायेने तो युक्त आहे अथवा निरहित आहे म्हणजेच त्याच्या सगुणनिर्गुण भेदामुळे ही स्थिति समजते

भागवतकारांनी श्रीकृष्णाचे वर्णन भरपूर केलेले आहे त्यातील रासक्रीडा हे प्रकरण म्हणजे योगमाया अथवा वैष्णवीशक्तीच गूढ प्रदर्शन होय त्यामध्ये भगवान् आपणापासून उत्पन्न झालेल्या दिव्य शक्तीबरोबर खेळ खेळत आहेत,

असे महत्त्वपूर्ण दर्शन घडविलेले आहे एक गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे की, या ग्रंथामध्ये राधाशक्तीचे नावही आढळत नाही इतरत्र असलेली वर्णने यामध्ये नाहीत.

## शक्ति व शैव वाङ्मय

शैवशक्तिवाङ्मय यालाच शैवागम असे संबोधिले जाते. यामध्ये शाक्ति वादाची अनेक मूलगामी तत्त्वाची माहिती मिळते. वेदान्तील श्रीकंठ भाष्याप्रमाणे शैवागमाचे दोन प्रमुख उपपथ आहेत पहिला काश्मीरवादी आणि दुसरा दाक्षिणात्यवादी. ज्याला सिद्धान्त तंत्र असे आणिक एक नाव आहे. वेदवाङ्मय आणि शैववाङ्मय यामध्ये शैवपथीय भेद मानीत नाहीत, कारण दोन्हींचा कर्ता शिव आहे, असे त्यांचे मत आहे वेद अपौरुषेय आहेत असे ते मानतात. त्यामुळे कोणतीही शंका न घेता वेदवाङ्मयाला ते शैवागम असेच मानतात. भाष्यकार असेही सांगतात की, शैवागमामध्ये दोन प्रकार आहेत. वेदवाङ्मय प्रकार हा द्विजासाठी आहे, तर इतर वाङ्मय सर्वांसाठी आहे (वेदसूत्रे भाष्य २–२–३८). वेदवाङ्मयामध्ये शिवाला रुद्र अथवा ईशान या नावाने उल्लेखिले आहे. तसेच त्र्यंबक, कृत्तिवास, पिनाकिन, कपर्दिन अशी नावेही आहेत. (वाज. स. ३–६१). यावरून एक गोष्ट आपोआप सिद्ध होते की, शिवपूजन भारतामध्ये अत्यंत प्राचीनकालापासून चालू आहे

तत्त्वाचाच प्रसार केला आणि शिवाद्वयवाद अथवा प्रत्यभिज्ञानदर्शन, या नावाने पुढे त्याचा उल्लेख होऊ लागला. दक्षिणेमध्ये शंकराचार्यांनी ज्याप्रमाणे उपनिषदे, ब्रह्मसूत्र, भगवद्गीता यांच्या आधारे अद्वैत मताचा पुरस्कार केला. तद्वतच काश्मीर प्रांती तेथील विद्वानांनी आगम ग्रंथाचा उपयोग करून, अद्वैत मताचा पुरस्कार केला.

वायुसंहितेवरून असे दिसते की, सर्वगणांनी शिवापासून शक्ति उत्पन्न होऊन उत्क्रांति होत गेली. प्रथम शक्ति उत्पन्न झाल्यावर नंतर माया तिच्या जोडीला आली. शिवापासून सर्व उत्पन्न झाले.

शक्ति प्रथमसम्भूता शान्त्यतीतपदोत्तर ।
ततो माया ततोऽव्यक्तं शिवाच्छक्तिमत प्रभो ।। ( वायु. स )

शक्तीपासून सृष्टीपर्यंतच्या सर्व गोष्टींची उत्पत्ति शिवतत्त्वापासून झालेली आहे शक्त्यादि च पृथिव्यन्ते शिवतत्त्वसमुद्भवम् ।। शिवपुराणान्तरगत वायवीय संहिता आणि उमासंहिता हा ग्रंथ शैवागमामध्ये प्रमाणभूत मानला जातो आणि शक्तिवादाची अधिकारवाणीने मांडणी करीत असल्याचे दिसते. केनोपनिषदातील उमा इंद्र कथेचा उल्लेख करून असे प्रतिपादन केले आहे की, सर्व देवांच्या शक्तीपेक्षा उमाशक्ति प्रमुख आहे. ही शक्ति महादेवी असून ती आदि देवता होय, तर शिव हे सर्वशक्तिमान असून चालकत्व करतात.

शक्ति साक्षान्महादेवी महादेवश्चशक्तिमान ( वायु स. ४–४ )

विश्व हेच मुळी शाक्त अथवा शैव स्वरूपात उगम पावलेले आहे कारण ते शिव आणि शक्तीच्या विश्वविषयक संयोगातून निर्माण झालेले आहे. शिवशक्तिसमुद्भुत्थं तु शाक्तं शैवमिदं जगत् ।। पुराणकारांच्या मते शिव आणि शक्ति यामध्ये मुळीच अद्वैत नाही ती एकरूपच आहेत ज्याप्रमाणे सूर्य आणि सूर्याचे किरण यांमध्ये फरक करता येत नाही, तद्वतच हा संयोग आहे. शिवाच्या अंगभूत अनेक शक्ति आहेत, त्यांपैकी विद्या अथवा अविद्या शक्ति होय वरील विवरणाचे सार सांगावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, न शिवेन विना शक्ति न शक्त्या च विना शिव । याचाच अर्थ असा की, शक्तीशिवाय शिवाचे अस्तित्व नाही, आणि शिवाशिवाय शक्ति असणार नाही ज्याप्रमाणे दिवस रात्र, वेळकाळ, पृथ्वीआकाश, वृक्ष लता या एकरूप जोड्या आहेत, तद्वतच शिव शक्ति होय सत्व, रज, तम या तीन गुणांनी युक्त अशी जी माया अथवा मूळ प्रकृति ती हीच शक्ति होय शैवापरा च चिद्रूपा शक्ति

प्रसवधर्मिणी ।। म्हणजे ती विश्वाच्या उत्पत्तीला कारणीभूत आहे, असे पुराणकार सांगतात. ज्ञानशक्ति, इच्छाशक्ति आणि क्रियाशक्ति या तीन प्रकारच्या दैविकशक्ति आहेत. क्रियाशक्तीच्या हालचालीमुळे नाद उत्पन्न होतो, आणि बिंदूपासून शिवस्वरूपाचे प्रत्यक्ष ज्ञान होते आपण जाणतो की, एकच शक्ति अनेकरूपा होते. पुराणकाराचे स्पष्ट मत आहे की, देवताचे स्वरूप ही शक्तीची स्वरूपे होत. जसे रुद्राणी, वैष्णवी, ब्राह्मणी, ऐन्द्री इ इ अखिल विश्वच मुळी शक्तीने व्यापलेले आहे.

शिवपुराणान्तर्गत उमासंहितेमध्ये, मार्कंडेय पुराणातील वर्णनाप्रमाणेच शक्तीचा ऊहापोह येथे केलेला आहे. उमादेवीची ओळख करून देताना तिने देवासमोर केलेले भाषण येणेप्रमाणे आहे

"मी सर्वश्रेष्ठ ब्रह्म आहे. मी प्रणव आहे, सर्व मीच आहे. मी ज्या वस्तुमात्रात अंतर्भूत नाही, अशी पृथ्वीतलावर वस्तूच नाही. मी जरी निर्गुण असले तरी जे वस्तुमात्र द्रव्य आहे, त्यामध्ये मी आहेच माझे गुण अवर्णनीय असून, मी अमर्त्य आहे. मीच कार्यकारणभावाने गोचर होते. सगुण व निर्गुण ही दोन्ही माझीच स्वरूपे होत. मी स्त्री व पुरुष दोन्ही आहे. कालिका, कमला, वाणी इ० देवता या माझ्याच शक्तीचे प्रदर्शन आहे"

पर ब्रह्म पर ज्योति प्रणवद्वन्द्वरूपिणी ।
अहमेवास्मि सकलं मदन्यो नास्ति कश्चन ।।
निराकारापि साकारा सर्वतत्त्वस्वरूपिणी ।
अप्रतर्क्यगुणा नित्या कार्यकारणरूपिणी ।। इ० इ० ।।

कारणाने आकलन होते. शक्ति ही दृश्य स्वरूपात अथवा स्पर्शनीय नाही तिचे अस्तित्व अनुमानावरून करावे लागते. वाचस्पतीने योगसूत्राचे विवरण करताना ( २–२३ ) हेच मत प्रतिपादन केले आहे. इतकेच नव्हे तर ती शक्ति, शक्तकारणाच्या आश्रयाने राहते. सा शक्ति शक्तकारणाश्रया । असे वचन आहे. शक्तीचा हा कार्यकारण भाव शास्त्रकारानी अधिक विशद करताना असे वचन दिले की, कारणशक्तित. कार्यं प्रवर्तते इति सिद्धम् । (तत्त्वकौमुदी). वस्तुकारणाच्या हालचालीवरून कार्याचे परिणाम दिसून येतात.

सांख्यसूत्रे आणि वृत्तीच्या ग्रंथकारानी विवरण करताना अनेक प्रकारच्या शक्ति ध्वनित केल्या आहेत. अविद्या ही एक शक्ति असून तिचा निर्गुण पुरुषाबरोबर काहीही संबंध नाही. नाविद्याशक्तियोगो नि संगस्य । पंच ज्ञानेंद्रिये आपली कर्तव्ये करीत असताना निरनिराळ्या शक्तींचे प्रदर्शन करतात. शक्तीच्या या कारणामध्ये जर फरक नसेल, तर निरनिराळे परिणाम दिसून येणार नाहीत. शारीरिक शक्तिसामर्थ्याबद्दल असे म्हणता येईल की, प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी जी सूक्ष्म सुप्त शक्ति असते, त्यांच्या एकीकरणामुळे भारी वजनाचे पाषाणही हलविता येतात कापसाच्या अति सूक्ष्म तनूचे एकत्रीकरण झाल्यावर, तो दोरखंड हत्तीलाही बंधनं घालू शकतो. यस्य स्वल्पा शक्तिरस्ति तस्य समुदायान्महच्छक्तिर्जायते । वृत्ति या सर्वांचा सारांश असा की, वस्तुमात्रामध्ये शक्ति असते आणि तिचे दर्शन अथवा जाणीव कार्यावरून होते.

सांख्यशास्त्रकारानी प्रकृतीचे विवरण करताना असे प्रतिपादिले की, ती अनेक शक्तींचा न संपणारा साठा आहे महत आणि इतर तत्त्वाना सतत शक्तीचा पुरवठा ती करीत असते. वस्तुमात्र आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेली शक्ति यांमध्ये ते भेदभाव मानीत नाहीत. शक्तिशक्तिमतोरभेद । असे त्याचे सूत्र आहे. उत्पत्तीला कारणीभूत असणारी जी आद्यशक्ति, अथवा अचेतन शक्ति, तीच प्रकृति होय काही वेळा तिलाच मायाशक्ति म्हटले आहे माया तु प्रकृतिम् । श्वेत, सांख्य आणि शाक्त यांचा प्रकृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अगदी वेगवेगळा आहे पहिल्याचे मत असे की, प्रकृति जरी शाश्वत आहे, तरी अजाण आहे आणि पुरुषाच्या आनंदासाठीच तिचा अवतार आहे. तर दुसरे असे म्हणतात की, ती चित्स्वरूप असून कार्याला प्रवृत्त करणारी महाशक्ति आहे. शाक्त जिला मूळ प्रकृति म्हणतात, तीच आद्यशक्ति होय सांख्यकार प्रधानशक्ति या शब्दाचा उपयोग करतात

प्रधानशक्ति योगाधेत् संगापत्ति । असे त्यांचे सूत्र आहे शंकराचार्य प्रपंचसार ग्रंथामध्ये या प्रधानाचा उल्लेख करतात आणि त्या मूळशक्तीपासून

ब्रह्मा-विष्णु महेश या तिघांची उत्पत्ति झाली असे मानतात (प्रपंच १–२), आणि प्रधानशक्ति व महाशक्ति ही एकरूपच मानतात. प्रधानमिति यामाहुर्या शक्तिरिति कथ्यते। असे दिसून येते की, शाक्ततंत्रकारांनी प्रकृति हा शब्द सांख्यशास्त्रातूनच घेतला असून ती परमोच्च दैविक शक्ति आहे, या सिद्धांतावर आपल्या शास्त्राची मांडणी केली. वरील सर्व विवरणाचा सारांश वर उल्लेखिल्या-प्रमाणे असा की, मूळ प्रकृतीला सांख्य, दैविक अथवा आध्यात्मिक शक्ति मानीत नसून, कार्यकारणभाव शक्ति असा मानतात, तर शाक्त तिलाच दैविक, आध्यात्मिक शक्ति असे मानतात.

## शक्ति, मीमांसा व न्यायशास्त्र

मीमांसा तत्त्वज्ञानाचा विचार करता शक्ति अथवा एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त करणारे कर्तृत्व याचा विचार अपूर्ववादाची चर्चा करताना केलेला आहे. होमहवनादि कार्य केले म्हणजे काही पुण्य पदरी येते आणि त्या पुण्याच्या योगाने स्वर्ग प्राप्त होतो. या क्रियेमध्ये होमहवन आणि स्वर्ग यांना जोडणारे कार्य, पुण्य करते. तेव्हा मध्यस्तरूपी हे पुण्य म्हणजेच अपूर्व होय. कार्यामुळे परिणाम घडवून आणणारे हे अदृष्ट म्हणजेच पापपुण्य मानले जाते. बौद्ध धर्मीयांच्या शून्य तत्त्ववादाचा विचार करताना कुमारिलभट्ट, शक्तीचे अस्तित्व मान्य करतो आणि कोणत्या कारणामुळे कोणते परिणाम घडतात, त्यासंबंधी ते एक गूढ तत्त्व असे मानतो.

कुमारिलभट्टाने शक्तितत्त्वाचा उपयोग केलेला आहे. या वेळी त्याने वाचाशक्ति, ग्राह्य-अग्राह्यशक्ति याचे निवरण केले आहे.

या बाबतीत नैय्यायिकाचे मत असे की, पदार्थामध्ये शक्तीचे अस्तित्व निराळे मानण्याचे कारण नाही. याच कारणासाठी विचारप्रतिपादनामध्ये शक्तीला अस्तित्व नाही जी शक्ति स्पर्शनीय नाही, स्पष्ट नाही, तिचे अस्तित्व कसे असू शकेल ? याचे तात्पर्य असे की, शक्ति हा पदार्थमात्राचा सहजस्वभाव आहे, त्यामध्ये वेगळेपण असण्याचे कारण नाही अग्नीची दाहकशक्ति अग्नीपासून निराळी नाही. दाहकपणाविना अग्नीची कल्पनाच करता येणार नाही, कारण दाहकपणा हा त्याचा नैसर्गिक स्वभाव आहे. त्यामुळेच अग्नि आणि दाहकशक्ति ही एकरूपच होत.

अद्वैतमतवादी शंकराचार्य आपल्या शरीरभाष्यामध्ये शक्तीचे विवरण करताना लिहितात, शक्तिश्च कारणस्य कार्यनियमार्थनल्पमाणम् । म्हणजे कार्य कारणभावावरून जाणवते असे प्रतिपादितात. याच भाष्यात ते पुढे लिहितात की, अविद्या अथवा माया म्हणजे श्रेष्ठ शक्ति असून आपण कोण आहोत याची जाणीव नसणाऱ्या जीवाना ती गुरफटून टाकते. विद्यारण्यस्वामी आपल्या पंचदशी ग्रंथामध्ये माया ही एक शक्ति असून अद्वैतवादाने तिचे फार विवरण केलेले आहे. आध्यात्मिक विद्या या अर्थाने शक्तीचा गौरव या ठिकाणी नाही

मीमांसक शक्तीला मूलत मानतात, तर नैय्यायिक तिला कारणत्व समजतात पण पदार्थांचे कारणत्व म्हणजेच शक्ति असे ते मानीत नाहीत कुसुमांजलीकारांनी ( कारिका १–१३ ) या मतभेदाचा उहापोह केलेला असून, कारणत्व म्हणजेच शक्ति असे प्रतिपादन केले आहे वरील विवरण संबंधात जयतभट याची न्याय-मंजिरी, हरिदासाची कुसुमांजली, मुक्तावली, शांकरभाष्य-वेदान्तसूत्रे, वात्स्यायनाची न्यायसूत्रे, वाक्यपदीय इत्यादि ग्रंथाचा आणि त्यातील मतप्रतिपादनाचा उहापोह जरी काटेकोरपणे केला, आणि दोन्ही पक्षांचे खंडणमंडण याचे मंथन पाहिले, तरी दोन्ही पक्षातील प्रधान फरक ध्यानी येण्यास वरील त्रोटक विवरण पुरेसे व्हावे, आणि यावरून शक्ति शब्दाचा अर्थ मीमांसकांनी कोणता घेतला याचे ज्ञान व्हावयास हरकत नसावी

## शक्तीचे योगशास्त्रातील स्थान

श्रीकृष्ण भगवान गीतेमध्ये योग शब्दाचे विवरण करताना सांगतात की, योग कर्मसु कौशलम् । ( २–५० ) म्हणजे योग या शब्दात शक्ति अंतर्भूत

आहे. योग या शब्दाचा अर्थ जरी परमेश्वर तत्त्वाबरोबर संयोग पावणे अथवा तादात्म्य पावणे असा घेतला, तरी ही स्थिति शक्तीशिवाय येणे अशक्य आहे. तंत्रशास्त्राप्रमाणे योगाचा प्रधान हेतू असा की, जीवात्म्याचे परमेश्वरतत्त्वाबरोबर तादात्म्य घडवून आणणे असा आहे, आणि ही स्थिति शक्तीविना घडणे कठीण आहे. पतंजलीने तर स्वच्छ असेच म्हटले आहे की, योग म्हणजे अशी एक यन्त्रणा आहे की, ज्यायोगे मानवी मनाच्या विविध कार्यावर मर्यादा घालता येते. कोणत्याही दृष्टिकोनातून जरी विचार केला, तरी योगामध्ये पारंगतता मिळविण्यास शक्तीची आवश्यकता आहे हे दिसून येते.

योगी पुरुषाचे अंतिम ध्येय जर ईश्वरप्राप्ति असेल, तर ईश्वर शब्दामध्येच शक्तीही अंतर्भूत आहे. पुरुष म्हणजे सर्वज्ञ असाच अर्थ केला जातो, म्हणजे त्याला पूर्णावस्थेचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. यत्र काष्ठप्राप्तिर्ज्ञानस्य स सर्वज्ञ:। असे व्यासभाष्यात वर्णन आहे. वाचस्पतीने ईश्वर शब्दाची व्याप्ति वर्णन करताना म्हटले आहे की, तत्र निरतिशयम् सर्वज्ञबीज। म्हणजे ज्ञानशक्ति ही एक ईश्वराची प्रमुख शक्ति आहे. हा सर्वज्ञ नित्यश: अनेक हालचाली करीतच राहतो. विश्वाची उत्पत्ति जरी त्याने आपल्यासाठी लील्या केली असली, तरी असंख्य प्राणिमात्रांना आनंद मिळावा हाही हेतु आहेच.

योगसूत्रावरील व्यासभाष्यामध्ये पुढे असे वर्णन आहे की, स्वरूप प्रतिष्ठा, तदानीं चितिशक्तिर्यथा कैवल्ये। चितिशक्ति ही पुरुषतत्त्वाची प्रतिनिधी आहे. योगसाधनाने सर्व मनोविकार नाहीसे झाले, ईश्वरतत्त्वामध्ये विलीन झाले, म्हणजे त्या ठिकाणी पुरुष आपले स्वरूप धारण करून उभा राहतो. योगाने प्राप्त झालेल्या या अवस्थेला वाचस्पति शाश्वत शुद्ध अवस्था असे नाव देतात, कारण त्या स्थितीतून तो मूळ स्वरूपाकडे परत येत नाही. न कुटस्थनित्या चितिशक्ति: स्वरूपाच्च्यवते। चितिशक्ति अवस्थेला पोहोचणे म्हणजेच अंतिम कैवल्यपदाला पोहोचणे होय. ही चेतनाशक्ति, जड शक्तीपेक्षा वेगळी आहे. एखाद्या मातीच्या गोळ्यापासून कुमार पाण्यासाठी घट निर्माण करतो, या ठिकाणी जडशक्तीचे अस्तित्व जाणवते, चेतनाशक्तीचा संबंध येत नाही. स्वस्वामीशक्त्यो। (यो. सू. २-२३). याचा अर्थ असा की, शक्ति दोन प्रकारची आहे, दृश्य आणि द्रष्ट. वरील उदाहरणात मातीचा गोळा ही दृश्य शक्ति मानली, तर घट ही द्रष्ट शक्ति होय.

योगसाधनाने प्राप्त होते तिला योगशक्ति नाव देतात. योगसूत्रातील विभूतिपाद या तिसऱ्या प्रकरणात योगसाधनाने कोणत्या शक्ति प्राप्त होतात याचे वर्णन केलेले आहे. योगी लोकांना एक अतींद्रिय ज्ञान प्राप्त होते, ज्यामुळे

ईश्वराचे सौंदर्यविषयक स्वरूप ते पाहू शकतात, अशी एक जाणीव आहे. योगशक्तीच्या सामर्थ्याने विश्वातील सर्व वस्तुमात्रावर ते ताबा चालवू शकतात. याच स्थितीला योगज-प्रत्यक्ष असे नामाभिधान असून, तो इंद्रियातीत ज्ञानाचे निदर्शक होय.

"नर करे तो नरका नारायण हो जाय" अशी एक उक्ति प्रचारात आहे. योग्य रीतीने मानसिक क्रियावर संपूर्ण ताबा ठेवता आला, तर मानवशक्ति कोणत्या परमोच्च पदापर्यंत पोहोचू शकते, याची अनेकाना नुसती कल्पनाही असत नाही. विश्वासाने असे प्रतिपादन केलेले आहे की, ज्याला आपले शरीर आणि विश्वाचे अवकाश याचे ज्ञान झाले, तो ईश्वरी कृपेने अंतराळामध्ये लीलया चलनवलन करू शकतो (यो. सू. ३-४२). या प्रकारची अद्‌भुत शक्ति तो संपादन करू शकतो. शारीरिक यातनेमध्ये मन हे अनेक अडथळ्यानी वेढून टाकलेले आहे. तेव्हा योगसामर्थ्यशक्तीने हे अडथळे जर दूर केले, तर परकाया प्रवेश करण्याचे सामर्थ्य मानवाला मिळविता येते. योगसूत्रामध्ये अशा प्रकारच्या अनेक सिद्धींचे विवरण केलेले आहे. योगसामर्थ्याने प्राप्त झालेली शक्ति खरोखरच अवर्णनीय आहे. पवित्र मंत्रांच्या पठणाने अथवा शुद्ध वनस्पतींच्या योगाने जशी परिणामकारक शक्ति दृग्गोचर होते, तद्वतच योगाने ती प्राप्त करता येते. 'योगसिद्ध्योऽप्यौषधादिसिद्धिवन्नापलपनीयाः ।' (स. सूत्र, ५-१२९) मानवी मन हे अनेक शक्तींचा साठा आहे आणि योगसामर्थ्याने त्यावर ताबा मिळविला, म्हणजे ते अनेक अद्‌भुत चमत्कार करू शकते. भारतामध्ये योगविद्येचा अभ्यास फार प्राचीन आहे. योगशास्त्रामध्ये जरी कुंडलिनीशक्तीचे महत्त्व असले, तरी योगसूत्रामध्ये तिचा उल्लेख नाही. तंत्रशास्त्रात मात्र भरपूर वर्णन मिळते. हिलाच कुल-कुंडलिनी नाव असून ही चित्‌शक्ति, शरीरातील मूलाधार चक्राच्या आधारे रहाते. कोणी या शक्तीला जीवशक्ति असेही म्हणतात. ती विद्युल्लेप्रमाणे तेजस्वी आहे. शंकराचार्यांनी या शक्तीचे वर्णन आनंदलहरी काव्यात केले. 'अवाप्य स्वां भूमिं भुजगनिभमध्युष्टवलय ।' योगमार्गी पुरुष योगसामर्थ्याने ही कुंडलिनीशक्ति जागृत करतो, आणि ती सुषुम्ना नाडीतून वर ब्रह्मरंध्रामध्ये आणून सहस्रारचक्रामध्ये रहात असलेल्या परमात्म्यस्वरूपाला पाववितो.

## शक्ति आणि काश्मीर शैव संप्रदाय

भारतामधील प्राचीन तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांमध्ये काश्मीरदेशीय शैवसंप्रदायाला एक निराळेच महत्त्व आहे. त्याला त्रिकशासन असेही नाव आहे. या संप्रदायाने शक्तितत्त्वाची तीन प्रमुख तत्त्वे मान्य केलेली आहेत.

( १ ) शिव हा सर्व कर्ता, सर्व ज्ञाता आणि सर्वांना आश्रयभूत असा असून, त्याला प्रकाश असे म्हणतात.

( २ ) पूर्ण आत्मस्वरूपाचे मानारूप अस्तित्त्व म्हणजे शक्ति होय.

( ३ ) अंश म्हणजे बंधनाच्या दास्यत्वात वागणारा जीवात्मा.

वरील तीन तत्त्वांपैकी दुसरे जे शक्तितत्त्व, त्याचाच प्रचार या संप्रदायाने हिरीरीने केलेला आहे. परन्तु याचे ज्ञान होण्यास प्रथम सांगितलेला शिव याचेही ज्ञान आवश्यक आहे. मालिनीविजयोत्तरतंत्राप्रमाणे शुद्धचेतना अवस्थेतील सर्वज्ञाता म्हणजेच शिव होय. तो सर्वव्यापी, सर्वज्ञाता, सर्व कर्ता, अनंत आणि अविभाज्य आहे.

तत्रेशः सर्वकृच्छान्तः सर्वज्ञः सर्वकृत् प्रभुः ।
सकलो निष्कलोऽनन्तः शक्तिरप्यस्य तद्विधा ॥ १७ ॥
( प्र. अधिकार )

यालाच अनेक नावांनी ओळखिले जाते, जसे परम शिव, परम शिव भट्टारक, भैरव इ० इ० याच्यामध्येच शक्ति अथवा माया कर्मकर्तृत्वाच्या नात्याने स्वस्वरूपात वास करते. ज्या वेळी या परम शिवाला असे वाटते की, आपण काही तरी करावे, त्या वेळी त्याच्यामध्ये सामावलेली ही शक्ति, इच्छातत्त्वाप्रमाणे जगन्निर्मितीला कारणीभूत होते.

या सा शक्तिः जगद्धातुः कथिता समवायिनी ।
इच्छा त्वं तस्य सा देवि सिसृक्षोः प्रतिपद्यते ॥ ( तृ. अधिकार )

मालिनीविजयकाराचे हे प्रतिपादनच प्रमाणभूत धरून, अनेक तंत्रकारांनी त्याचा ऊहापोह केलेला आहे. त्यांनी ठामपणे असे प्रतिपादन केले आहे की, शक्ति ही शिवाची इच्छाशक्ति असून ती त्याच्या स्व-स्वरूपातच विलीन झालेली असते. उत्पलदेव आपल्या ईश्वरप्रत्याभिज्ञा ग्रंथामध्ये या शक्तीची व्याख्या 'विमर्शस्वरूपा' अशी करतो; म्हणजेच ही शिवाची अविभाज्य चेतना-शक्ति असून त्यामध्ये प्रकटीकरण्याचे सर्व सामर्थ्य अन्तर्भूत आहे.

तस्याश्च सर्वमन्तर्भूतं निर्माणमभेदरूपेणास्ते ॥
( पंचम अधि. श्लो. ८ )

पुण्यानन्द याने विवरण करताना असे उदाहरण देतात की, एकाद्या सौंदर्यवान राजाने आपले स्वरूप आरशात पहावे, आणि त्याची जाणीव व्हावी,

त्याप्रमाणेच शिवाच्या शक्तीचे प्रकटीकरण मायारूपी आरशाने होते, तोपावतो त्याची जाणीव होत नाही. महेश्वरानंद आपल्या महार्थमंजिरी ग्रंथामध्ये एक पाऊल पुढे टाकून असे प्रतिपादन करतात की, परमशिव आपल्या स्वानंदामध्ये निमग्न झाल्यावर त्याच्यातून बाहेर पडणाऱ्या मधाच्या योगाने हृदयकमळ मधुरपणा पावते आणि जगन्निर्मितीची इच्छा प्रकट होते. स्वानंदाच्या योगाने होणारे शंकराचे हे उन्मुखीभवन जगन्निर्मितीला कारणीभूत होते; जसे बीजातील कोंब वृक्षवाढीस कारणीभूत होतो. यथा न्यग्रोधबीजस्थशक्तिरूपो महाद्रुमः। मालिनीविजयोत्तर वार्तिककाराचे म्हणणे असे आहे की, शक्ति आणि शक्तिमान हे विभिन्न नाहीत; त्यामुळे शक्तीचे प्रकटीकरण हे भेद मानण्याचे कारण नाही. शिवाचे अस्तित्व नसेल तर शक्ति असणारच नाही. यास्तव त्याचे स्वरूप हे शक्तियुक्त आहे असे मानता येते. अनुत्तरप्रकाशिकाकर्ते श्री. आद्यनाथ यांनी शक्तीची व्याख्या निराळी दिली आहे.

प्रकाशोऽनन्यतो भावः स्वातंत्र्योल्लासकेवलः ।
परिच्छिन्नात्मिका शक्तिः शंभोर्विश्वातिशायिनः ।। ( श्लोक ९ )

शक्ति ही विमर्श नसून अनन्यतः प्रकाशमान आहे असे तो मानतो. शिव हा सर्वस्वतंत्र असून तो स्वखुषीने आपल्यावर काही मर्यादा घालून घेतो. आणि सृष्टीविषयक वस्तुरूपाने दृश्य स्वरूपात व्यक्त होतो. हीच मायातत्त्वाची व्युत्पत्ति होय. ती शिवाची अगदी स्वतंत्र शक्ति आहे. अभिनवगुप्त जो अकराव्या शतकाचे सुरुवातीस होऊन गेला ( सन ९९३–१०१५ ) तो आपल्या तन्त्रलोक ग्रंथात शिवाखेरीज एक अधिक पाऊल पुढे टाकून वर्णन करतो,

अनुत्तरानन्दमयो देवो भोक्तेव कथ्यते ।
इच्छादिकं भोग्यमेव तत एवास्य शक्तिता ।। ( श्लोक १९० )

परमोच्च आनंद उपभोगणाऱ्या देवाला भोक्ता असे म्हणतात आणि इच्छादिक इतर गोष्टींना भोग्य असे म्हणतात. या गोष्टी करण्यासाठीच तो शक्ति धारण करतो. याच ग्रंथाचा टीकाकार जयरथ असे प्रतिपादन करतो की, 'शक्ति हीच स्वतः शक्तिमान आहे. तिच्या उत्क्रांतिवादाच्या स्थित्यंतरामुळे होणाऱ्या नामविषयक फरकामुळे ती विभाज्य आहे. निराळी आहे असे मानले जाते.'

वरील शैव ग्रंथकार व इतर यांच्या प्रतिपादनाचा आशय इतकाच की, विश्वातील लोकोत्तर कृतीचे मानसिक व भौतिक विवरण करणे होय. हे विवरण अचेतन जडसृष्टीचे नसून, पदार्थचलनशास्त्रदृष्ट्या, ती अव्यक्त आणि उत्साही

शक्तीला विपुल साठा असल्याने निदर्शक असते. या ठिकाणी एक प्रश्न असा उद्भवतो की, ही सचेतन शक्ति, रंग, गंध, सुख, दुःख इ० विषय ग्रहणशक्ति कशाप्रकारे व्यक्त होते ? ग्रंथकाराचे याला उत्तर असे की, सचेतन शक्तीच्या प्रकाशाला नेहमी प्रमातृत्वाची जाणीव असते. कारण त्याच्याशिवाय सत्य स्थितीची जाणीव वस्तुमात्राने होणार नाही. तर कोणतेही रंगरूप नसलेली अवस्तु म्हणजे अस्तित्व न दर्शविणारी वस्तु असे राहील. तच्च सदैव प्रकाशस्य प्रमातृत्वात् तदात्मतया च विना प्रकाशमानस्य अवस्तुत्वात् ॥ या दृष्टिकोणातून विचार केल्यास आपणाला शक्तीचे खरे स्वरूप जाणता येईल. आणि जगात दृश्यमान असणाऱ्या वस्तूंचे उत्पादक स्वरूप समजून येईल. (ईश्वरप्रत्यभिज्ञविमर्शिनी, पंचम आन्हिक, प्रथम अध्याय, श्लोक १० )

शिवाचे आतरिक मायास्वरूप वरीलप्रमाणे वर्णन केल्यावर, आणि माया म्हणजे त्याच्या परिपूर्ण स्वरूपाचे अमर्याद स्वातंत्र्य असे प्रतिपादन केल्यावर, तांत्रिकांच्या पुढे दुसरेच एक संकट उभे राहिले. ते असे की, शक्तीने परिपूर्ण भरलेल्या या तत्त्वाचा मेळ महत्त्वाच्या सत्यवस्तुपरिस्थितीच्या विचाराबरोबर कसा घालावयाचा ? शक्तिस्वरूपतेला निराळे अस्तित्व आहे, असे शस्त्र त्यांच्या हाती आले म्हणजे मग शिव-शक्ति ही एकरूप आहेत ही कल्पना नाश पावेल आणि शिवाबरोबर द्वैतभाव मानला जाईल. परंतु याचे उत्तर मालिनीविजयकारांनी प्रारंभी उद्धृत केलेल्या, ' या सा शक्तिर्जगद्धातु.' या श्लोकात देऊन ठेवलेले आहे. परमशिवाला आपण काही हालचाल करावी असे जेव्हा वाटते, तेव्हा त्याच्यामध्ये सामावलेली शक्ति, जगनिर्मितीस कारणीभूत होते आणि तिला जगद्धात्री असे म्हणतात. त्या दोघांचा समवायसंबंध आहे. ' नित्यसंबन्धः समवायोऽयुतसिद्धवृत्तिः । ' या वचनाप्रमाणे त्यांच्या नित्यसंबंधामुळे एकरूपाची कल्पना करता येते. जसे कार्य आणि कारण, परिमाणु आणि विशेष, यामध्ये एकत्रभाव आढळतो, त्याप्रमाणे समजावयास पाहिजे. कल्लटाचार्य नावाचा ग्रंथकार ९ व्या शतकात होऊन गेला. स्पंदकारिकेवरील आपल्या वृत्ति नावाच्या टीकाग्रंथामध्ये तो स्पष्टपणे असेच प्रतिपादन करतो की, शक्तिमान शिव आणि त्याची शक्ति, ही अभेद्य आहेत. त्यामध्ये द्वैतभाव तिळमात्र नाही. रामकंठ नावाचा दुसरा एक स्पंदकारिका टीकाकार १० व्या शतकात होऊन गेला. शिवशक्तीच्या या समवाय स्वरूपाला त्याने पूर्ण पाठिंबा दिला, इतकेच नव्हे तर शक्तीविना शिवाचे अस्तित्वच अशक्य आहे, असे प्रतिपादन केले. शक्ति आपल्याच स्वरूपात सामावलेली आहे, निराळी नाही, हे जेव्हा शिवाला समजून येते, तेव्हाच त्याला आपल्या पूर्ण ऐश्वर्याची कल्पना समजून येते. याचे नित्याचा व्यवहारातील उदाहरण म्हणजे, एकाद्याला अमूक एक वस्तु आपल्याला मिळावी याची इच्छा

झाली आहे, पण वस्तु मात्र अद्याप हाताात आलेली नाही, तोपावेतो *अंगभूत* विचारापासून इच्छाशक्ति निराळी दिसत नाही. परमेश्वरातील ही पराशक्ति, काहीतरी उत्पन्न करण्याची ही चेतना, ही स्वरूपभिन्न नाही. एकरूपच होय. विज्ञानभैरव तंत्रामध्ये भैरवाची सहचारिणी श्री देवीने त्याला हा प्रश्न विचारला असता भैरवाने हेच प्रतिपादन केले की, शक्ति त्याचेच स्वरूप असून, ती जगाची उत्पत्ति, धारणा आणि नाश याला कारणीभूत आहे, त्या दोघामध्ये अग्नि आणि दाहक शक्तीसारखे तादात्म्य आहे. तादात्मामनयोर्ध्यित्यं वन्हिदाहिकयोरिवः ॥

## शक्तीचे प्रकटीकरण

वरील विवेचनाचे तंत्रकारानी प्रकटीकरण कशा स्वरूपाने केले हे पाहणे योग्य होईल. शिव आणि शक्ति ही समवायी आहेत, हे मान्य केल्यावर आणि शक्तीविना जडसृष्टीची उत्क्रांति होत नाही असेही मान्य केल्यावर शक्तीला जास्त प्राधान्य आले; आणि शिवस्वरूप किंचित पडद्यामागे केले गेले. विश्वासंबंधी उत्क्रांतिवाद, योगशास्त्रातील धारणा, मंत्रातील शब्दसामर्थ्य, आणि अनेक प्रकारच्या दीक्षा या सर्वांचे सूक्ष्म निरीक्षण केले तर शक्तीच प्रमुख दिसते व शिवस्वरूपाची आठवण होत नाही; ते पुसट होत जाते.

अशा या शक्तिस्वरूपाचे प्रकटीकरण, मालिनीविजयोत्तरकारानी योग-शास्त्रदृष्ट्या केलेले आहे. योगसाधना साध्य होण्यासाठी अनेक मुद्रा अथवा *शरीराचे गूढ अंगविक्षेप त्याने वर्णन केले आहेत. एकूण २१ मुद्राची नावें त्याने* दिली आहेत. त्रिशुलम् शक्तिः, वज्रम् , दण्डः, खगेश्वरी, कराला, घण्टा, रोधा, अभिता, योगमुद्रा इ० इ० ही नावे आहेत.

तंत्रशास्त्रातील एक प्रमुख बाह्यस्वरूप म्हणजे शक्तीचे साम्य शून्याबरोबर मानणे होय. प्रणवादिसमुच्चारात् प्लुतान्ते शून्यभावनात् ॥ योगधारणेमुळे सर्व वृत्ति जेव्हा चेतनाशक्ति क्षेत्रामधून निघून जातात, आणि फक्त चित्–शक्ति शिल्लक रहाते. अशी या शक्तीला महाशून्य अवस्था म्हणतात.

शरीरनिरपेक्षिण्या शक्त्या शून्यमना भवेत् ॥ ( विज्ञानभैरव, ६९ परमेश्वराच्या सर्वव्यापी अविभाज्य स्थितीला चित्-शक्ति असे म्हणता येईल. याच शक्तीला विमर्शशक्ति असे दुसरे नाव आहे, अथवा परा-वाक्शक्ति असेही या विमर्शशक्तीचे विवरण अनेक तंत्रकारानी केलेले आहे.

इच्छा, ज्ञान आणि क्रिया ही शक्तीची तीन अंगे आहेत, असे मालिनी-विजयोत्तरकाराचे मत आहे. जी सर्व शक्तिमानाच्या आश्रयाने रहाते, आणि निर्मिती करण्याची इच्छा करते, ती इच्छाशक्ती होय. एखादी वस्तु अमुक

नाशाबरोबर येतो. अर्थात् वरील तीन शक्तींचा संबंध हिंदुतत्त्वज्ञानातील त्रिमूर्तींच्या कार्याबरोबर संबंधित आहे.

अकराव्या शतकामध्ये भट्टभास्कर नावाचा शिवसूत्राचा टीकाकार होऊन गेला. त्याने योनिवर्गाचे विवरण करताना वरील तीन शक्तींचा अनुनय केला असून त्यामध्ये आणिक अनाशक्तीचा समावेश केला आहे. योनिवर्गः कलाशरीरम् । जगामध्ये ज्या काही इतर शक्ति मानलेल्या आहेत, त्यांचे उगमस्थान या चार शक्तींमध्ये आहे असे तो प्रतिपादन करतो. या शक्ति म्हणजे साक्षात शिवशक्तीचे प्रकटीकरण होय. यांच्या युतीमुळे कलाशरीराची घडण तयार होते. शब्दाचे कारण या कला आहेत म्हणजेच वाक्शक्तीचे घटकावयव आहेत. वर्णीमध्ये अ पासून क्ष अक्षरापर्यंत समावेश आहे.

तासां वर्ग. समूह. स्यात् तच्छरीर कलासु च ।
अकारादिक्षकारान्ता' कलास्ता शब्दकारणम् ॥

माणसाचे स्वत.चे मर्यादित व्यक्तिमत्व या कला दिग्दर्शित करतात. जसे मी, हे माझे आहे. इ० ( अहं ममेदं इति ) शब्द जर व्यक्त करण्यास नसते, तर माणसाला आपले व्यक्तित्व मर्यादित करून घेता आले नसते, तर परमेश्वरासारखे ते अमर्यादितच राहिले असते. अलौकिक, अनुभवाच्या पलीकडे असणारी क्रियाशक्ति जेव्हा मातृकाशक्तिरूपाने प्रकट होते, त्यामध्येच या चार शक्तींचा उगम आहे.

इच्छा, ज्ञान आणि क्रिया हा शक्तींचा एक वर्ग. वामा, ज्येष्ठा, रौद्री हा दुसरा वर्ग, तर महामातृका म्हणून शक्तींचा आणिक एक तिसरा वर्ग मानलेला आहे. काही ठिकाणी यामध्ये सात नावे आढळतात, तर काही ठिकाणी आठ नावे आढळतात.

माहिषी ब्राह्मणी चैव कौमारी वैष्णवी तथा ।
ऐन्द्री याम्या च चामुण्डा योगीशी चेति ता मता. ॥

( मालिनी, २१-४ )

याप्रमाणे आठ नावे दिलेली आहेत या अष्टशक्तींचे वर्णन तन्त्राच्या आठव्या अधिकारामध्ये दिलेले आहे. या ठिकाणी शिव पद्मासनावर अधिष्ठित असून या आठ शक्ति त्याच्या सभोवार आहेत. त्या आसनाच्या टोकांना अनन्त, धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य आणि कर्णिका यांचे आधार आहेत. मालिनी-कार पुढे असे सांगतात की, या आसनस्थ शिवाच्या आठ दिशांना असणाऱ्या मातृकांना हवन करावे. त्यांची नावे थोडी निराळी दिली आहेत. ब्राह्मी, कौमारी,

वैष्णवी, चामुण्डा आणि योगीशी यांच्या बद्दल अग्नेया, वरुणानी, वायवी, नैऋति आणि कौबेरी अशी दिली आहेत या दुसऱ्या पाठात देवता शक्तींच्या ऐवजी चार दिशांची नावे घातली आहेत याचा अर्थ असा घ्यावयास पाहिजे, की देवता आणि दिशा यामध्ये संबंध प्रस्थापित करावयाचा आहे.

स्वच्छंद नावाचे एक फार जुने तंत्र आहे त्यामध्ये अशी कल्पना मांडलेली आहे की, देवतान्यासउपासनेसाठी भक्ताने पादन्यासशुभ्र आसनावर विद्यादेवीचे कमळ मांडावे, आणि ध्यानधारणेसाठी, त्याच्या पाकळ्यावर पुढीलप्रमाणे शक्तींची मांडणी करावी

वामा पूर्वदले न्यस्य ज्येष्ठा वन्हिदलाश्रिताम् ॥

म्हणजे पूर्व पाकळीवर–वामा, अग्नेय पाकळीवर–ज्येष्ठा, दक्षिण–रौद्री, नैऋत्य–काली, पश्चिम–कलविकरणी, वायव्य–बलविकरणी, उत्तर–बलप्रमथनी, ईशान्य–सर्वभूतदमनी यांची स्थापना झाल्यावर कमळाच्या मध्यभागी मनोन्मनीची स्थापना करावी (स्वच्छन्द, २, ६८–७०) शक्तींच्या मांडणीव्यतिरिक्त त्यावर अधिक विवेचन त्याने केलेले नाही या स्वच्छंदात, भैरवाची सहधर्मचारिणी जी भैरवी, तिचे किरण होत या शक्तींचे त्याने वर्गीकरण केलेले आहे, आणि वर्गीकरणामध्ये काही अक्षरसमूह मानलेले आहेत प्रत्येक वर्गाची एक एक देवता-शक्ति दिलेली आहे, ती येणप्रमाणे,

अवर्गे तु महालक्ष्मी कवर्गे कमलोद्भवा ।
चवर्गे तु महेशानी टवर्गे तु कुमारिका ॥
नारायणी तवर्गे तु वाराही तु पवर्गिका ।
ऐन्द्री चैव यवर्गस्था चामुण्डा तु सवर्गिका
एता सप्तमहामातृका सप्तलोकव्यवस्थिता ॥

(स्वच्छन्द, प्रथम पटल)

वरील श्लोकात जरी सात महामातृका आहेत असे शेवटी विधान असले, तरी प्रत्यक्षात मात्र त्या आठ आहेत त्यामध्ये मुद्दा वर म्हटल्याप्रमाणे योगीशी आणि ब्राम्हणी या नावाऐवजी वाराही आणि महालक्ष्मी यांची नावे आली आहेत हा भेद ध्यानात ठेवण्यासारखा आहे

शक्तीचे वरीलप्रमाणे तीन निरनिराळे विभाग वर्णन केले असले तरी आणखीही एक भाग आहे त्यामध्ये, अपरा अथवा घोरतरी २ परापरा अथवा घोरा, ३ परा अथवा अघोरा असा एक विभाग आहे या तीन शक्तींचे कार्य असे की, बंधनावस्थेमध्ये असलेल्या जीवात्म्याला एकतर अधोगतीला नेणे

अथवा त्याला सद्गति देऊन शिवधामाला पोहोचविणे. शक्तीच्या कार्यभेदत्वामुळे तिला ही निरनिराळी स्वरूपे प्राप्त झालेली आहेत. जी शक्ति रुद्र-शक्तीला कवटाळून बसून जीवात्म्याला इंद्रिय-गोचर वस्तूकडे आकर्षित करते, तिला **अपराशक्ति** असे म्हणतात. सुखदुःखाच्या संमिश्र फळाकडे आकर्षित करून, जीवात्म्याच्या अंतिम मुक्तपदाकडे जाण्याच्या मार्गात जी अडथळे उत्पन्न करते, ती **पराशराशक्ति** होय. जीवात्म्यांना शिवाच्या शाश्वत निवासस्थानाकडे नेणारी जी हितकर अथवा दयाशील शक्ति, तिला **पराशक्ति** म्हणतात. शक्तिवादाची ही प्रमुख भूमिका लक्षात ठेवण्यासारखी आहे.

शक्ति ( पराभट्टारिका )

- ज्ञान
  - ज्येष्ठा
- इच्छा
  - वामा
  - परा अथवा अघोरा
  - अपरा अथवा घोरतरी
  - परापरा अथवा घोरा
- क्रिया
  - रौद्री

ज्ञानशक्ति आणि क्रियाशक्ति यांचे संपूर्ण विवरण सुमारे २० पृष्ठात, सुधेंदु कुमारदास यानी केले आहे ( पृ. १०८–१२७ ). ते मूळ ग्रंथात पाहणे योग्य होईल. अनेक तांत्रिक ग्रंथकाराच्या विचार प्रणालीने मायावादाचे विवरणही अनेक पृष्ठात केलेले आहे, पण विस्तारभयास्तव फक्त त्याचा निर्देश केला आहे. तसेच मायावादाचे भोग्य वर्ग आणि भोक्तृवर्ग यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी मायेपासून उत्पन्न होणाऱ्या अनेकविध शक्तींची नामावली एका आलेखामध्ये रेखाटली आहे. ( एस्. के. दासकृत पुस्तक पृ. १४९ ). त्यामध्ये सांख्यकारांची प्रधानाशक्ति अथवा अव्यक्त यापासून क्रमाने धी, अहंकार, सात्त्विक, राजसिक, तामसिक, मानस आणि यांपासून पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये यांची वंशावळ असून, मायेची दुसरी बाजू विद्या, राग, नियति, आणि कला या वंशावळीने दाखविलेली आहे.

काश्मीरप्रांतीय शैवसंप्रदायामध्ये जी पराशक्ति, मातृकारूपाने मंत्रामध्ये अंतर्भूत आहे, तिलाही फार महत्त्व आहे. यामध्ये आश्चर्य वाटण्याजोगे काही अद्भुत नाही. तांत्रिक मंत्राचे उच्चार, करताना, वेद अगर शैव

वाङ्मयाप्रमाणे उच्चाराबरोबर अर्थाकडे लक्ष देणे आवश्यक असते. अध्यात्मिक क्षेत्रामध्ये दिलेले गूढविद्येचे मंत्रोपदेश आणि गूढ आचारविधि यांची वाढ शक्ति-तत्त्वज्ञानाबरोबर चूपन्न झालेली दिसून येते, असे आपल्याला मालिनी, स्वच्छन्द, विज्ञानभैरव तंत्रग्रंथांवरून आढळते. अभिनवगुप्त आणि क्षेमराज यांच्या टीकाग्रंथामध्ये प्राचीन मंत्रशास्त्रावरील अनेक ग्रंथांची नावे सापडतात; जसे तंत्रसद्भाव, श्रीकंठसंहिता, वामतंत्र, सिद्धसन्तान इ० इ०

शैवागम, पंचरात्र आणि बंगालदेशीय तांत्रिक पंथ यामध्ये मातृकांचा उल्लेख आहे. परंतु या पंथीयांनी मंत्रशास्त्राला आधारभूत असे शक्तिविचार सयुक्तिक व सुसंगत न मांडल्याने तर्कशास्त्रदृष्ट्या त्यातील अध्यात्म्याचा गाभा समजू शकत नाही. मातृका म्हणजे एक दैवी शक्ति आहे असे सांगून मंत्राचे निरनिराळे प्रकार वर्णन केले आहेत. पंचरात्रकर्ते मातृकशक्तीची तत्वज्ञानविषयक बाजू मांडण्याचा क्वचित् प्रयत्न करतात. याप्रमाणेच श्रीप्रश्नसंहिता, पद्मतंत्र, लक्ष्मीतंत्र, महानिर्वाणतंत्र, कामिकातंत्र इ. ग्रंथांनी मातृकाशक्तीचा जरी उल्लेख केला असला तरी संपूर्ण विवरण मात्र केलेले नाही.

वसुगुप्ताने आपल्या शिवसूत्रामध्ये मातृकाशक्तीचा उल्लेख प्रथमच केलेला आढळतो. ज्ञानाधिष्ठानम् मातृका: । अथवा, मातृका-चक्रसंबोध: । अशा प्रमाणे आहे. पहिल्या सूत्राप्रमाणे मातृका याचा अर्थ असा की, भेद आणि अभेद एकसूत्री ज्ञानाचे भांडार होय; म्हणजे भेदप्रथा आणि अभेदप्रथा याचे ज्ञान करून देणे. तसेच दुसऱ्या सूत्राप्रमाणे मातृकाचा संबंध मातृकाचक्राबरोबर दिलेला आहे; परंतु इच्छा, ज्ञान व क्रियाशक्तीबरोबर संबंध दाखविलेला नाही; तोच पुढे कल्लट याने आपल्या स्पंदकारिका वृत्तीमध्ये वर्णन केला आहे. रामकंठ मातृकाशक्तीचा संबंध विमर्शशक्तीबरोबर दाखवून, पराशक्तीपर्यंत त्याची लांबी वाढवितो. मातृकाशक्तीचा संबंध वाक्शक्तीबरोबर आहेच; पण त्यातल्या त्यात वैखरी वाणीबरोबर जास्त आहे. या सर्वांचा सारांश हाच की, वाणी आणि मंत्रोच्चार, यांमध्ये मातृकाशक्तीचा निकट संबंध आहे, हे दाखविणे होय.[1] मातृका सर्वमन्त्राणा मुख्यभूता भवेदिह ।

## शक्तीचे वीरशैव संप्रदायातील स्थान

प्रथम वीरशैव संप्रदायामधील मुख्य धार्मिक तत्त्वे कोणती आहेत हे पाहिल्याविना वरील विषयात प्रवेश करणे हिताचे होणार नाही. वीरशैव संप्रदायाला दुसरे नाव लिंगायत संप्रदाय असे आहे. शरीरावर लिंग धारण करणारे

१ टीप—[ योगिनी आणि मातृका प्रकरण अधिक माहितीसाठी पहावे. ]

म्हणून त्यांना लिंगायत म्हणतात. शिवाचा अनुयायी तो वीरशैव असा जरी वरवर अर्थ कोणी करीत असले, तरी शैवागम आणि सिद्धान्तशिखामणी या त्याच्या प्रमुख ग्रंथाप्रमाणे वीरशैव याचा अर्थ, जो शिव व जीव हे एकरूप आहेत अशा सर्वश्रेष्ठ ज्ञानामध्ये सदैव आनंदित असतो, तो होय. (सि. शि. ५, १५-१७). या संप्रदायाची स्थापना केव्हा झाली, यासंबंधी काहींची मते अशी की, सन ११६० चे सुमारास कल्याण येथील कळचुरी राजा बिज्जल याचे पदरी बसव नावाचा प्रधान होता त्याने या पंथाची स्थापना केली अथवा पुनर्जीवन केले. परंतु त्याच्या धर्मग्रंथाचा अभ्यास केल्यावर हे मत टिकत नाही.

या संप्रदायाचे साधारणपणे २८ धर्मग्रंथ आहेत. तेराव्या शतकामध्ये शिवयोगी-रेणुक नावाच्या गृहस्थाने सिद्धान्तशिखामणी हा प्रमुख लिंगायत ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्याने शैवागमाचे चार प्रकार सांगितले आहेत. शैव, पाशुपत, सोम, व लाकुल ही त्याची नावे होत.

शैवं पाशुपतं सोमं लाकुलश्च चतुर्विधम् ।
तेषु शैवं परं सौम्यं रौद्रं पाशुपतादिकम् ॥ २८ ॥
शैवं पुनश्चतुर्भेदं वामदक्षिणमेव च ।
मिश्रञ्चैव तु सिद्धान्तं तेषु सिद्धान्तमुत्तमम् ॥ २९ ॥

वरीलप्रमाणे शैवपंथीयांचे पुन्हा चार पोटभेद वाम, दक्षिण, मिश्र व सिद्धान्त याप्रमाणे आहेत. हे पोटभेद देण्याचे कारण असे की, प्रत्येकजण निरनिराळ्या शक्तीची उपासना करतो वामपंथीय शक्तितत्त्वाना प्राधान्य देतात, दक्षिणपंथीय शिवाच्या भैरव स्वरूपाला प्रधान मानतात, मिश्रपंथीय सप्तमातृका प्रधान मानतात, तर सिद्धान्तपंथी वेदप्रामाण्य मानतात.

याच्या सुभेदागम ग्रंथाप्रमाणे या पंथाच्या प्राचीन प्रचारकांची नावे रेवण, मरूल, एकोराम, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य अशी होती. शिवाच्या पंच स्वरूपातूनच यांची उत्पत्ति झाली. त्या पाच शिवाची नावे येणेप्रमाणे— सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान. या शिवांनी स्वतः शिष्यांना स्वमुखांनी वीरशैव संप्रदायाचा उपदेश केला. परंपरागत कथांवरून असे सांगितले जाते की, या पाच शिवांची स्थाने क्रमाने येणेप्रमाणे होती—श्रीशैलाच्या उत्तरेस कोलीपाक गावातील सोमेश्वरलिंगापासून रेवण, उज्जयनी येथील सिद्धेश लिंगापासून मरूल, मल्लिकार्जुन लिंगापासून एकोराम, हिमालयातील केदारनाथ

येथील रामनाथ लिंगापासून पंडिताराध्य, आणि वाराणसी येथील विश्वेश्वर लिंगा-पासून विश्वाराध्य. वरील निरनिराळ्या लिंगस्थानावरून असे दिसून येते की, एके काळी या संप्रदायाचे लोक हिमालयापासून दक्षिणेपर्यंत होते. पण कालांतराने त्याचा संकोच होऊन, सांप्रत ते फक्त दक्षिणेत कानडी आणि तेलगू प्रांतात आढळतात बसवपुराणाप्रमाणे वीर शंकरदास, यंकीदेव इ० मूलाचार्यांची नावे निरनिराळी आहेत तसेच चन्नबसवपुराणाप्रमाणे वीरशैवाचे पुरातन म्हणजे मूलाचार्य यांची आठ नावे निराळीच आहेत 'अनुभव-सूत्र' ग्रंथाचा कर्ता मायीदेव याने त्याचा गुरु संगमेश्वरापासून सोमानाथपर्यंत निराळीच पीठिका दिली आहे. या सर्वांचा अर्थ इतकाच की, बसवाचार्यांपूर्वी या संप्रदायाचे अनेक ख्यातनाम आचार्य होऊन गेले आहेत

या संप्रदायातील ग्रंथकारांनी काही शक्तितत्त्वे काश्मीरपर्यायी तंत्रशास्त्रा-तून घेतलेली दिसतात. जसे विमर्शशक्तीचा शिवाबरोबर काय संबंध होता, याचे विवरण घेतले आहे शिवयोगी रेणुका आपल्या ग्रंथाच्या प्रकरणात १०१ भाजन स्थळाचा उल्लेख करतो भाजनस्थळ म्हणजेच तिरोभाव शक्ति अथवा अव्यक्त शक्ति, जी विमर्शशक्तीचे आश्रयस्थान आहे

विमर्शाख्या पराशक्तिर्विश्ववैचित्र्यकारिणी ।
यस्मिन् प्रतिष्ठिता ब्रह्म तदिदं विश्वभाजनम् ॥

मरितोंटद आर्य यानेही आपल्या वीरशैव सांप्रदायिक ग्रंथामध्ये वसुगुप्ता च्या शिवसूत्रातील उतारे उद्धृत केलेले आहेत हा प्रचारक १४ व्या शतकात होऊन गेला, आणि कैवल्यसार हा ग्रंथ त्याने लिहिला याप्रमाणे वीरशैव व तांत्रिक यांचा संबंध प्रस्थापित करता येतो

लिंगतत्त्वाच्या धार्मिक भेदावरूनही काही पंथ वीरशैवामध्ये आलेले आहेत सुप्रभेदागमामधील ज्ञानपद पटल, कामिकामधील शिवानुज्ञा पटल, बिंदु नाद विचारसरणीमधील लिंगाचे विवरण, बिन्दुनादौ शक्तिशिवौ अव्यक्तेन प्रकीर्तिता । २०५, नमः शिवाय । या पंचाक्षरीमंत्राचे मनन, इ० गोष्टींवरून हे पंथ अस्तित्वात आले आहेत जंगम हे साक्षात् शिवस्वरूपात हिंडत असल्याने आणि ते गुरुस्थानी मानल्याने त्यांचे पूजन म्हणजे प्रत्यक्ष शिवाचे पूजन होय या ठिकाणी लिंगाचे हे जीवसंस्कृतीमधील साक्षात प्रतीक होय, असे ते मानतात जंगम हे लिंगायतांचे धर्मगुरू होत यांची रहाणी शिवाप्रमाणेच सदा भ्रमती, ब्रह्मचारी, अंगावर सदा अपुरे वस्त्र, भिक्षादेही वृत्ति असे असल्याने त्यांनाच शिव मानतात असे दिसते (रॉ. अे. सो (मुंबई विभाग) मासिक, १८६४–६६), परंतु सिद्धान्तशिखामणीकार मात्र जंगम याचा अर्थ शिव-योगी, म्हणजे

शिव आपल्या चित् आणि क्रियाशक्तीच्या सामर्थ्याने अखिल विश्व प्रकाशित करतो हे जाणणारे महात्मे होत, असा देतात.

जंगम हे चललिंगाचे उपासक असतात, म्हणून त्यांना जंगम म्हणतात. या समाजाचा असा नियम आहे की, प्रत्येक मनुष्याला गुरू असलाच पाहिजे. या नियमामुळे जंगम वर्गाचे महत्त्व जास्त आहे. याचे दोन प्रकार आहेत. एक गृहस्थ (विवाहित) आणि दुसरा विरक्त (ब्रह्मचारी). यामध्ये आणखीही पोटभेद आहेत. चारमूर्ति जंगम गावोगाव भटकत रहातात. महाराष्ट्रामध्ये विरक्त, पट्टदेवरू (धोतर नेसणारे), अय्या (विवाहित), चरती (नेहमी फिरणारे) असे भेद आहेत. गावच्या प्रमुख जंगमाला मठद्य्या म्हणतात. याला सरकारातून काही तनखा मिळतो आणि धार्मिक कार्याच्या वेळी भक्ताकडून काही देणगी मिळते. याचा पेहराव म्हणजे केशरी वस्त्र, गळ्यात रुद्राक्ष माळा, गळ्यात अथवा कमरेला शिवलिंग असते. ते सुवर्ण, रुपे अगर इतर धातूचे असून, बिल्वपत्रानी त्रिकाळ त्याचे पूजन करावे लागते. लिंग हरवले तर, यथाविधीने पुन्हा घाली पर्यंत भोजन वर्ज्य करावे लागते. लिंगायताव्यतिरिक्त इतराच्या घरी भोजन करावयाचे नाही, हा नियम कडकपणे पाळतात. भोजनानंतर थाळी पाण्याने धुवून ते पाणी तीर्थ म्हणून पितात. याप्रमाणे या जंगम गुरूची दिनचर्या असावी लागते.

या सांप्रदायाचे ग्रंथकर्ते संदर्भासाठी वेद व जाबाल, मैत्रेय, हंस आदि उपनिषदातील उतारे घेतात. असे जरी असले तरी श्वेताश्वतर उपनिषदावर प्रमुख भर आहे. याचे कारणही उघड आहे. ईश्वरवादी मताचा उगम झाल्यावर त्यांचा उच्चांक यामध्ये गाठलेला असून ब्रह्म म्हणजेच स्वतः शिव होय, असे प्रतिपादन वीरशैव संप्रदायाला पोषक असेच त्यामध्ये आहे. याच उपनिषदामधून वैष्णव व शिव पंथीयानीही पोषक उतारे घेतलेले आहेत. डॉ. भांडारकर आणि डॉ बार्नेट या संशोधकानी हेच मत दिले आहे. लिंगधारण आणि भस्मधारण ही दोन वैशिष्टे या संप्रदायात आहेत आणि त्याना आधार म्हणून वेदश्रुतीचा देतात. परंतु हे नेहमीच सत्य नसते या विधीला सोयीस्कर म्हणून मूळ अर्थाची ओढाताण केलेली आढळते. पी. टी. श्रीनिवास अय्यंगार आपल्या ग्रंथात याचे उदाहरण देतात ते असे की, 'अमृतस्य देवधारणो भुयासम्' (तै. उ., १-४१) याचा खरा अर्थ, 'देवा, मला ब्रह्मणपणा दे' असा असला तरी लिंगायत याचा अर्थ, 'देवा, मी देवधारणा (लिंग) करावी ना?' असा करतात. दुसरे भस्माविषयी, 'भूत्यै न प्रमदितव्यम्' (तै. उ. १-२-१), 'मोठ्याची हयगय करू नका' या अर्थाची उपेक्षा करून ते, 'विभूती लावल्याशिवाय राहू नका'

अशा त्याच्या मताला अथवा कृतीला जुळता असा अर्थ घेतात (Outlines of Indian Philosophy, P. 161). तसेच ऋग्वेद ७ व्या मंडळातील 'ऋचा पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते......' आणि श्रीरुद्र उपनिषदातील 'या ते रुद्रा शिवा ......' याच्या आधार ते घेत असले तरी, त्याचे लिंगधारण आणि विभूतीधारण आचार हे वैदिक नसून आगम काळातील आहेत, असे म्हणावे लागते.

शंकराचार्यांनी या पथांला वेदविरोधी का म्हटले ?

शिवयोगी रेणुका व इतर लिंगायत ग्रंथकारांनी अत्यंत परिश्रमपूर्वक जरी प्रतिपादन केले की, हा संप्रदाय वेदाच्या विरुद्ध नाही, अनुरूप आहे, तरी सर्वसाधारणपणे तो वैदिक नाही, इतकेच नव्हे तर वेदांना विरुद्ध प्रणाली धारण करणारा आहे, असे मानतात. बहुधा तो पंचरात्रपंथिया-प्रमाणेच आहे, हा समज शंकराचार्यांपासून उत्पन्न झाला आहे. कारण शंकराचार्यांनी आपल्या ब्रह्मसूत्रावरील भाष्यात असे विधान केले आहे की, 'प्रत्युरसामञ्जस्यात् ।' आणि हे विधान वीर-शैवसंप्रदायातील पशुपत उपपंथाला लागू पडते (२-२,३०–४१). भामती, रत्नप्रभा, न्यायनिर्णय यांचे लेखक, वरील विधान म्हणजे महेश्वर शैव संप्रदायाचे खंडण आहे, असेच मानतात. कारण या संप्रदायाचे जे चार पोटभेद आहेत शैव, कारुणिक, पाशुपत आणि कापालिक, त्यातच पाशुपताचा अंतर्भाव आहे. चन्ना वृषभेंद्रस्वामी आपल्या वीरशैव सर्वोत्कर्ष दीपिका ग्रंथामध्ये या विरोधाचे खंडण करताना म्हणतात, अप्पया दीक्षितासारख्यांनी पशुपत पथियाचे दोन भाग मानलेले आहेत, एक वैदिक पशुपत व दुसरा अवैदिक पशुपत. यामुळे वैदिक पशुपत हा लिंगायत संप्रदायी असून, शंकराचार्यांच्या वरील विधानाचा वादविवादात्मक संबंध, अवैदिक पशुपताबाबत आहे जो लाकुलिश संप्रदाय आहे, वीरशैव नव्हे. वीरशैव संप्रदायातील शिव, लिंगपूजा आणि सायुज्यमुक्ति यांच्या ज्या काही कल्पना आहेत, त्यांवरून असे दिसते की, पूजकाने आपण नमी व्हावे, शिव हा आपला परमेश्वरी मार्गदर्शक असून, आपला जीवात्मा हा त्यांच्या आज्ञा पालनकर्ता आहे, असे मानावे. म्हणजे वैदिक तत्त्वाप्रमाणे पूज्य आणि पूजक यांनी एकरूप व्हावे, ही शिकवण ते मानीत नाहीत. पूज्य आणि पूजक यामध्ये दुजाभाव कायम ठेवला आहे.

प्रेरकं शंकरं बुद्ध्या प्रेर्यमात्मानमेव च ।
भेदात्तं पूजयेन्नित्यं न चाद्वैतपरो भवेत् ॥ (सि. शि., १०)

सिद्धान्तशिरोमणीच्या वरील शिकवणीचा अर्थ असा की, पूज्य आणि पूजक यामध्ये भेद मानला जावा पुढे असे सांगितले आहे की, जर असा भेदभाव राहिला नाही, तर लिंगपूजा कोणी करणार नाही. लिंगपूजादिकमस्थो न चाद्वैत समाचेरत्॥ या द्वैतमानामुळेच अद्वैती प्रचारक शंकराचार्यांना या संप्रदायाविरुद्ध हत्यार उपसावे लागले

शिवपुराणान्तर्गत वायवीयसंहिता आणि स्कंदपुराणातील सूतसंहिता, लिंग पुराण आणि भविष्यपुराणातील काही भाग, हे अल्लामाप्रभुसंबंधी काही माहिती देतात आणि वीरशैव संप्रदायाची काही तत्त्वप्रणाली मांडतात, पण याचा उपयोग हा संप्रदाय केव्हा अस्तित्वात आला, हे मानण्याइतका नाही परंतु सूतसंहितेची सहाव्या शतकातील एक प्रत नेपाळ प्रांती प्रो बेंडाल याना मिळाली आहे, आणि यातील बरीच वचने कैवल्यसार, सिद्धान्तशिखामणी या वीरशैव ग्रंथात आढळतात तेव्हा हा पंथ त्यापूर्वीचा आहे असे मानण्यास जागा सापडते आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे, यांच्या धर्मग्रंथामध्ये अनेक वेळा योग वासिष्ठामधील उतारे घेतलेले आहेत आणि तो ग्रंथ तर सदैव अद्वैतवादाचा पुरस्कर्ता आहे

वीरशैव संप्रदायामध्ये आचाराने आणि पूजाप्रकाराने अनेक पोटभेद झालेले आहेत, जसे अनादि शैव, महा शैव, आदि शैव, अनु शैव, आन्तर शैव, प्रवर शैव, अन्त्य शैव, सामान्य शैव, मिश्र शैव, मुधा शैव आणि वीरशैव असे आचारभेदाने पंथ आहेत काही विष्णुपूजक, गणपतीपूजक, शिवपूजक, लिंग पूजक असाही भेद आहे याचा खोल विचार करण्याचे येथे कारण नाही वीरशैव संप्रदायाची ग्रंथसंपत्ती भरपूर आहे, आणि काहींची नावे वरील विवेचना मध्ये आलेली असल्याने पुन्हा द्विरुक्ति करण्याचे कारण नाही

या संप्रदायाची अवांतर प्राथमिक माहिती घेतल्यावर आता मुख्य जे शक्तितत्त्वाचे प्रतिपादन त्याकडे वळू या तांत्रिक ग्रंथामध्ये शक्तीचे अंतिम स्वरूप म्हणजे परम शिवाचा आंतरिक स्वभाव असून तिलाच विमर्शशक्ति असे नाव दिले आहे तांत्रिक आणि वीरशैव यांच्या तत्त्वज्ञानामध्ये बरेच साम्य असून तांत्रिकामधील अनेक उतारे, विचार आणि पारिभाषिक शब्द जसेच्या तसे घेतलेले आहेत जसे विमर्श, परामर्श इ० इ० शिवयोगीने शिव आणि शक्ति ही एकमताची असून तिला धर्मचारिणी म्हटले आहे म्हणजे पत्नीसारखी शिवाच्या इच्छेप्रमाणे वागणारी आहे, शक्तीच्या या शिवानुयायी स्वभावामुळे, अनुभवसूत्र ग्रंथाचा कर्ता मर्यादेव तिला 'शिवानुभूतिप्रतिमाकला' अथवा

' शिवप्रसादामल-विग्रहा ' या नावाने संबोधितो. ती ज्ञान आणि क्रिया यांमध्ये समतोल राखणारी आहे.

पुढील निवेचनामध्ये शैव ग्रंथकार म्हणतात की, ती शक्ति मायास्वरूपिणी आहे, म्हणजे स्वतःच माया आहे (सि. शि. २-२). अद्वैत तत्त्वज्ञानामध्ये शक्तीला ब्रह्माजवळ जे स्थान दिले आहे, त्यापेक्षा एक पाऊल पुढे टाकून वीरशैव, शक्ति म्हणजे महामाया, सुधामाया म्हणतात. याचाच अर्थ असा की, ही शुद्ध माया तामसविरहित आहे. माया म्हणजे अविद्या ही प्रणाली ते मानीत नाहीत. सांख्य शास्त्राची त्रिगुणात्मक माया असे मानीत नाहीत. त्याची ऊर्ध्व माया म्हणजे राजस व तामसविरहित सत्वगुणांनी युक्त अशी शुद्धोपाधी होय. चेतनाशक्तीविषयक ज्ञानामध्ये यामुळे ती कोणताही संशय उत्पन्न करीत नाही, आणि तिच्यावरच ती आधारित आहे (स्वश्रयामोहकरिणी). ही महामायाशक्ति स्वतःच त्रिगुणात्मक होते, आणि प्रेरक भोज्य आणि भोक्त स्वरूपात दिसू लागते ( सि. शि., २, ४०-४३ ). ही शक्ति आपला जोडीदार शिव याच्या विरहित कशी राहू शकते आणि उत्पादन करू शकते, याचे सखोल वर्णन ग्रंथकारांनी केलेले आहे. महामाया शक्तीची उत्क्रांति कशी होत गेली या संबंधी मरितोंतद आर्य याने भारतीय तत्त्वज्ञान, म्हणजे सांख्यशास्त्र आणि अद्वैत वेदान्त याच्या मताचा समन्वय फार उत्तम प्रकारे केला आहे. सांख्याची प्रकृति आणि अद्वैताची अविद्या याचे विवरण वीरशैवाच्या महामायेबरोबर उत्तम रीतीने साधण्याचा प्रयत्न केला आहे. तान्त्रिकाच्या विमर्शशक्तीला तो सत् चित् आणि आनंद या गुणाचा आरोप करून तिला ऊर्ध्व माया असे मानतो, किंवा चिद्वरा शक्ति असे म्हणतो. सिद्धान्तशिखामणीकार असे प्रतिपादन करतात की, सर्वप्रमुख शिव, या शक्तीमधून आपले स्वरूप धारण करतो आणि शुद्ध व अशुद्ध स्वरूपी जग निर्माण करतो. शुद्ध जग निर्माण करण्यासाठी ब्रह्म अथवा हिरण्यगर्भ याची उत्पत्ति करतो आणि त्याला अशुद्ध विश्वाची उत्पत्ति करण्यास आज्ञा देतो. या अशुद्ध विश्वात स्थिर आणि अस्थिर वस्तुमात्राची उत्पत्ति याप्रमाणे होते. नंतर ब्रह्म्याच्या विनंतीवरून आपल्या शक्तीमधून शिव ' प्रमथ ' म्हणजेच बुद्धिमान व शक्तिमान लोकांची उत्पत्ति करतो. यानाच गण अथवा शिवाचे प्रधानवर्ग म्हणतात. त्याना शिवशक्तीचे खरे ज्ञान असते, आणि साध्यासुध्या मायेविरहित ते असतात. विश्वाची उत्पत्ति आणि संहार ही कामे शिव आपल्या प्रातिनिधिक गणावर सोपवितो. ( सि. शि. २-२५-२६ ).

आता लिंगायत ग्रंथकार त्याना परमपवित्र असलेल्या लिंगाविषयी काय लिहितात ते पाहणे योग्य होईल. शिवलिंगाची पूजा ही भारतामधील फार प्राचीन आहे.

गोपिनाथराव ग्रंथकर्त्यांच्या मताप्रमाणे ती ख्रिस्तपूर्व तीन-चार शतकातील असावी पण वर्थ नावाचा लेखक म्हणतो की, ती प्राचीन द्रविड लोकात होती. इतकेच नव्हे तर ग्रीक संस्कृतीमध्ये होती. लिंगायत संप्रदाय लिंग याचा अर्थ अश्लील भावनेने केव्हाही घेत नाहीत, तर ते शिवाचे प्रातिनिधिक स्वरूप मानतात. सी. पी. ब्राऊन नावाचा लेखक म्हणतो, " भारतीय लोक लिंग याचा जो सर्वसाधारण अर्थ घेतात, तो या ठिकाणी अभिप्रेत नाही. जंगम लोक या लिंगाकडे एका उदात्त भावनेने पाहतात. कॅथोलिक पंथीय गळ्यामध्ये क्रॉस घालतात, आणि त्याच्याकडे ज्या श्रद्धाभावाने पाहतात, त्याच भावाने लिंगायत लिंगाकडे पाहतात." गैरसमजुतीने अनेक आंग्ल लेखकांनी या लिंगाचा विपरीत अर्थ केला आहे. पण तो बरोबर नाही एवढे मात्र खरे. त्या संप्रदायातील अर्थ फार सुंदर रीतीने वर्णन केला आहे. तो असा—लि म्हणजे वितळणे, आणि गम म्हणजे बाहेर जाणे. याचाच अर्थ असा की, जगातील सर्व प्राणिमात्र या लिंगामध्ये विलीन होतात, आणि पुन्हा तेथूनच उत्पन्न होतात. शिवयोगी रेणुका, लिंगाचा अर्थ देताना म्हणतो — ज्यामध्ये अत्यसमर्थी ब्रह्मा, विष्णु, महेश आदि देवता, आणि वेद, आगमासारखे धार्मिक ग्रंथ विलीन पावतात आणि पुन्हा उत्पन्न होतात, असे परमोच्च ब्रह्म म्हणजेच लिंग होय. अखिल विश्व या ठिकाणीच उत्पन्न होते, वाढते आणि नाश पावते यापेक्षा सर्वश्रेष्ठ तत्त्व कोणतेही नाही. यावरून असे अनुमान करता येते की, लिंगामध्ये स्त्री व पुरुष दोन्ही तत्त्वांचा समावेश आहे, म्हणजे प्रकाश आणि विमर्श अथवा शिव आणि शक्ति होय. तसेच ते नाद, कला आणि बिंदु याचे प्रतीक आहे. यासाठी ज्याला अंतिम मुक्ति पाहिजे त्याने लिंगपूजा केली पाहिजे. चिदाकार अथवा चिदानन्दमय असे लिंगाचे स्वरूप मानले म्हणजे त्याची बाह्यपूजा हे स्वरूप जाऊन मानसपूजेचे स्वरूप प्राप्त होते मानसपूजेचे स्वरूप शिवयोगी रेणुका याने फार सुंदररीतीने रेखाटले आहे, ते येणेप्रमाणे——

हे अनाद्यन्त, शाश्वत चितस्वरूप लिंग. जे परमशिवाने व्यापून टाकलेले आहे, ते भाव-पुष्पांनी पूजन करण्याचे आहे. भक्ताचे हृदयकमलाने घडणारे हे पूजन, यालाच प्राणलिंगाची आराधना अथवा पूजन असे म्हणतात. या पूजना मध्ये क्षमारूपी पाणी अभिषेक-सलिल होय, विवेकाचे वस्त्र, सत्याचे अलंकार, आत्मत्यागाचे पुष्पांचा हार, एकचित्त हे अत्तर, निष्काम बुद्धि हे तांदूळ, विश्वास हा धूप, सर्वज्ञान हा दिवा, अविद्येवर आधारित जो प्रपंच त्याचा नाश हेच बलिदान, मौन हाच घंटानाद, ऐहिक सुखाचा त्याग ही पानसुपारी, विषय भ्रांतीची टाळणूक म्हणजे प्रदक्षिणा, बौद्धिक शक्तिसामर्थ्यांवर जीवाम्याने लिंगा मध्ये एकरूप होणे, हाच नमस्कार होय. रेणुका जोराने प्रतिपादन करतो की, जो

कोणी वरीलप्रमाणे लिंगाची पूजा करीत नाही आणि फक्त बाह्यस्वरूपाची करतो, तो महामूर्ख होय. बसवाचार्यांनी लिंगाचे जे निरूपण केले आहे, त्यावरून त्याने वैषयिक अश्लील लिंगाचे वर्णन केले आहे असे म्हणता येणार नाही. वरील मानसपूजा करण्यासाठी निर्देशित केलेले स्वरूप फार उत्तम आहे आणि त्यावरच मन केंद्रित करणे उचीत होय.

## शक्ति आणि चैतन्य संप्रदाय

बंगाल प्रांती वाहणाऱ्या पवित्र गंगा नदीच्या किनारी नवद्वीप नावाचे गावी सन १४८५ साली जगन्नाथ–शचिदेवीच्या पोटी, देहावर शुभचिन्हे धारण केलेले एक मूल जन्माला आले, त्याचे नाव विश्वंभर, हाच पुढे चैतन्य महाप्रभू नावाने प्रसिद्ध झाला. गया मुक्कामी ईश्वरपुरी नावाच्या साधूने त्याला, 'गोपीजन-वल्लभाय नमः।' हा महामंत्र दिला. आणि त्या दिवसापासून तो कृष्णभक्तीत तल्लीन होऊन गेला. त्याचा संप्रदाय हळूहळू वाढला आणि शेवटी सन १५३३ साली जगन्नाथपुरी या ठिकाणी समुद्रकिनारी भजनयात्रा चालली असता, सागराच्या त्या नीलवर्णाचे दर्शन होताच, साक्षात् श्रीकृष्णाचे ते विशाल स्वरूपच आपणाला त्याच्या हृदयात समाविष्ट करून घेण्यासाठी पाचारीत आहे, अशी उन्मनी अवस्था त्यांना प्राप्त झाली, आणि आपले जड शरीर त्यांनी सागरात फेकून देऊन आपल्या आराध्य दैवताला आत्मार्पण केले.

चैतन्य महाप्रभूने कोणताही ग्रंथ लिहिलेला नाही ते कार्य त्याच्या शिष्यांनी केले. रूप गोस्वामी यांचा लघुभागवतामृत आणि कृष्णदास यांचा चैतन्य लीलामृत, हे या पंथीयांचे सर्वोत्तम ग्रंथ मानले जातात. त्यामध्ये शक्तीसंबंधी जे निरूपण केलेले आहे, त्याचा सारांश असा की, या संप्रदायाचे माध्व-मताशी बरेच घनिष्ट साम्य आहे. माध्व संप्रदायाचा मुख्य सिद्धांत असा की, विश्वात स्वतंत्र आणि अ–स्वतंत्र अशी दोन प्रमुख तत्त्वे आहेत. त्यापैकी परमात्मा हा स्वतंत्र शक्ति असून तो विष्णु या नावाने जगताला माहीत आहे. जीवात्मा हा परतंत्र आहे. ही दोन्ही तत्त्वे नित्य व अनादि असून दोन्हींमध्ये स्वभावतःच भेद आहे. चैतन्य संप्रदाय हाही द्वैतवादीच आहे. पण त्यामध्ये थोडासा फरक आहे. त्याच्या मताप्रमाणे श्रीकृष्ण हेच एक परमतत्त्व असून त्याच्या अनंत शक्ति आहेत. शक्ति आणि शक्तिमान याच्यामध्ये भेद असू शकत नाही, तसाच अभेदही सिद्ध होत नाही. या दोन्हींचा संबंध तर्काने अचिंत्य आहे. यासाठीच या मताला अचिंत्य भेदाभेद संप्रदाय असे दुसरे नाव मिळाले आहे.

या परमात्म्य तत्त्वाच्या ठिकाणी एकत्व आणि पृथक्त्व संभवतच नाही. ते विशुद्ध सत्वरूप आहे. रज आणि तम त्याला स्पर्श करू शकत नाहीत. ते स्वरूप

सान्त आणि अनंत आहे. आणिक एक शिष्य बलदेव विद्याभूषण यांनी संप्रदायाची तत्त्वे प्रतिपादन करताना असे सांगितले आहे की, परमात्म शक्ति ही स्वतंत्र असून, चैतन्यमय असून, जगाचे उपादान आणि निमित्त याला कारणीभूत आहे. आपल्या अचिंत्य शक्तिसामर्थ्याने ती शक्ति जगत्‌रूपाने परिणत होऊनही, स्वतः अविकृत राहू शकते. या परब्रह्माची जी शक्ति तीच प्रकृति अथवा माया होय. ती शक्ति मूळ शक्तीची आश्रित आणि वशवर्तिनी असते. वर म्हटल्याप्रमाणे परमेश्वर हा अनंत शक्तींनी संपन्न आहे, पण त्यामध्ये अंतरंगशक्ति, तटस्थशक्ति आणि बहिरंगशक्ति या प्रमुख होत.

अंतरंग शक्तीलाच चिच्छक्ति अथवा स्वरूपशक्ति असेही म्हणतात. या शक्तीचे तीन उपभाग कल्पिलेले आहेत. सत् अंशाने ती संधिनीशक्ति, चित् अंशाने ती संवित्‌शक्ति आणि आनंद या अंशाने ल्हादिनीशक्ति होय. या तिन्ही शक्तींची कार्ये अलग अलग आहेत. संधिनीच्या योगाने भगवान स्वतः सत्ता धारण करतो आणि इतरांना सत्ता प्रदानही करतो. संवित्‌च्या योगाने तो स्वतःला जाणतो व इतराना ज्ञानप्रदान करतो. ल्हादिनीच्या योगाने तो आनंदाचा स्वतः अनुभव घेत रहातो आणि इतरांनाही आनंद देत रहातो.

तटस्थशक्ति ही जीवशक्ति होय. अंतरंग आणि बहिरंग यांच्यामध्येही वसत असल्याने हिला तटस्थ हे नाव मिळाले आहे.

बहिरंग शक्तीलाच मायाशक्ति असे म्हणतात. ही जगताच्या निर्मितीला कारणीभूत होते. या शक्तीमुळेच जीवाच्या ठिकाणी अविद्या रहाते, आणि त्यामुळे भगवंताच्या मूळ रूपाला व आत्मसंबंधाला तो विसरतो. परमात्मा आणि जीव यांचे संबंध अग्नि आणि त्याची ठिणगी याप्रमाणे अनित्य आहेत. ते जाणणे म्हणजेच जीवाची मुक्तता संपादन करणे होय. जगत हे त्यांनी सत्य मानलेले असून सर्वज्ञ आणि सत्यसंकल्प श्रीहरीच्या बहिरंग शक्तीचाच तो विलास आहे, असे ते मानतात.

चैतन्य संप्रदायाने राधा तत्त्वाला श्रेष्ठतम महत्त्व दिलेले आहे. भगवंताच्या व्रजलीलांची आधारभूत अशी व्रजेश्वरी म्हणजेच राधा होय. महाभावस्वरूपा श्रीराधा ठाकुरानी । सर्वगुणखनी कृष्णकांताशिरोमणी ।। (चैतन्यचरितामृत) राधा ही श्रीकृष्णाचे ल्हादिनीशक्तीचे सारसर्वस्व आहे. ती महाभावस्वरूपा आहे. समस्त गुणाची खाण आणि सर्व कृष्ण-प्रियामध्ये श्रेष्ठ शक्ति आहे. ती कृष्णाची निजशक्ति असून, क्रीडामध्ये सहाय्यक आहे.

## शक्तीचे पूजन

भारतामध्ये शक्तीचे पूजन हे अत्यंत प्राचीनकाळापासून चालू आहे, हे अनेक गोष्टींनी दाखविता येते. इतिहास काळाच्या पूर्वीपासून म्हणजे हराप्पा व महेंजोदरो येथील संस्कृतीमध्ये त्याचे अवशेष मिळतात. त्यावरून त्या काळीही ते होते, हे सिद्ध होते. इतकेच नव्हे तर इजिप्त, बॅबीलोनिया, ग्रीस इ० देशातही ते समकालीन होते, असे आढळून आले आहे. काहींचे म्हणणे असे आहे की, आर्यांनी ते अनार्योपासून घेतले आणि आत्मसात केले. कसाही विचार केला तरी हे पूजन अत्यंत प्राचीन आहे, यामध्ये तिळमात्र संशय नाही.

प्राचीन जमातींनी शक्तीचे पूजन मूर्तस्वरूपात केव्हा आणि कसे चालू केले हा प्रश्न अत्यंत अवघड आहे. यास्काने या प्रश्नाचा उहापोह केला असून असे म्हटले आहे की, वेदकालामध्येही देवता या मानवी स्वरूपाच्या होत्या. पौरुषविधिकैरङ्गैः संस्तूयन्ते । (निरुक्त), असे त्याचे वचन आहे. पंचमहाभूताचा सृष्टीतील वस्तुमानावर जबरदस्त अधिकार आहे. याची कल्पना झाल्यावर, धार्मिक भावनेने त्या त्या शक्तींना मानवी रूप दिले गेले व त्याचे पूजन सुरू झाले, म्हणजे त्या त्या शक्तींना मूर्त स्वरूपांत आणले गेले. आदिशक्तीचे हे स्वरूप अखिल विश्वात दृग्गोचर झाले, आणि ते मातेच्या ममतेने विश्वाचे पालनपोषण सतत करीत असल्याने तिला मातृकाशक्ती हे नाव प्राप्त झाले. शक्तिपूजेचा पाया याप्रमाणे तयार झाला असला पाहिजे.

राजा सुरथ व समाधी वैश्य यांनी शक्तीचे पूजन केले, त्याचे वर्णन मार्कंडेय पुराणामध्ये आढळते. नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर त्यांनी दुर्गादेवीची मृण्मय मूर्ति करून पूजन केले आणि सामर्थ्य प्राप्त झाल्यावर पुन्हा राज्य जिंकून घेतले. तौ तस्मिन् पुलिने देव्याः कृत्वा मूर्तिं महीमयीम् ।। असे वचन आढळते. वृन्दावनातील गोपींनी कात्यायनीदेवीचे व्रत करून तिचे पूजन केले आणि श्रीकृष्ण भगवान् आपला पती व्हावा असा वर मागितला.

हेमन्ते प्रथमे मासे नन्दव्रजकुमारिका ।
चेरुर्हविष्यं भुञ्जाना कात्यायन्यर्चनव्रतम् ।। ( भागवत १० )

या प्रदेशात कात्यायनीदेवीचे पूजन प्रमुखपणे आजही केले जाते. कारण त्यांची अशी श्रद्धा आहे की, ती त्यांच्या इच्छा परिपूर्ण करील. तिचे नावच मुळी कामदा असे त्यांनी ठेवले आहे. या प्रकारच्या शक्तिपूजनाच्या अनेक कथा आहेत. विष्णूने अंबिकायज्ञ केला असा उल्लेख देवीभागवत ग्रंथामध्ये आढळतो. यज्ञ कर्तुं मनश्चक्रे अम्बिकाया रमापतिः ।, (दे भा. ३-१४-३०). भगवान् विष्णु हे शक्तिपूजक होते याचे आणखीही एक उदाहरण देता येईल. याच ग्रंथामध्ये असे सांगितले आहे की भगवान् विष्णु एकेसमयी सुधासिंधुसागरातील एका अमृतमय बेटावर गेले असता, त्यांना साक्षात् महामायेचे दर्शन झाले, आणि त्यांनी मंत्रोपदेश घेतला. आपल्या प्रत्येक अवतारामध्ये विष्णूने आपली एक एक सहचारिणी शक्तिस्वरूपात घेतलेली आढळून येते.

ध्रुवसंधी राजाचा पुत्र सुदर्शन याचाही इतिहास असाच आहे. अयोध्येच्या या सूर्यवंशीय राजाला, आपल्या पूर्व आयुष्यात अनेक कष्टे द्यावे लागले. शक्तिसामर्थ्यासाठी त्याला गुरुनी कामबीज मंत्राचा उपदेश दिला व सततच्या जपाने त्याचे शक्तिसामर्थ्य वाढल्यामुळे तो विजयी झाला. शत्रूनी जिंकून घेतलेले साम्राज्य त्याने पुन्हा परत मिळविले, आणि प्रसादमय मंदिर बांधून देवीची मूर्ति स्थापन केली. सुबाहु राजाने काशीपुरीत याप्रमाणेच दुर्गादेवी स्थापन केली.

साम्प्रतच्या काळी शिवाजी, रामकृष्ण परमहंस, अरविंद बाबू यांची अशी अनेक उदाहरणे देता येतील. ज्याला मातेच्या सामर्थ्याचे तत्त्व पटले, तो पूजा करीत आहे व करीत राहील, यात कोणालाही कोणताही संदेह नाही.

## शक्ति–स्तोत्र

शक्तिपूजनाचा विचार करता देवीसूक्ताने पठण हे एक प्रमुख मानले जाते. या पूजनामागील प्रमुख हेतु असा की, शक्ति ही अखिल विश्वाची सूत्रधार,

आहे, आणि तिच्या सत्तेने सर्व हालचाल होते. शक्तितत्त्वाच्या या जाणीवेमुळेच देव आणि ऋषि यांनी तिची स्तुतिस्तोत्रे गायिली आहेत. शिव, विष्णु, ब्रह्मा इ० देवांनीच या देवतेचे प्रथम पूजन चालू केले, कारण त्यांची खात्री होती की, ही शक्ति जनहितेच्छु असून, सर्व अडचणींचा परिहार करते व प्राणिमात्रांना सुख देते.

महाभारताच्या विराट पर्वांत ( अ. ८ ) युधिष्ठिर व इतर पांडव जेव्हा अज्ञातवासाचे दिवस कंठण्यासाठी, विराट नगरात प्रवेश करते झाले, त्या वेळी युधिष्ठिराने प्रवेशद्वारी असलेल्या दुर्गादेवीचे स्तोत्र गायिले आणि त्याचा अज्ञातवास निर्विघ्न पार पडो, अशी प्रार्थना केली. या स्तोत्रामध्ये आदिमायेने यशोदेच्या पोटी जन्म का घेतला, कंसाने तिला पाषाणावर आपटण्याचा कसा प्रयत्न केला; तिन्ही जगाच्या कल्याणासाठी सर्व देव तिचे पूजन करतात, तिलाच महिषासुर-मर्दिनी, काली, दुर्गा इ० नावाने संबोधितात, इ० इ० गोष्टींचा समावेश आहे. *या स्तोत्राने देवता प्रसन्न झाली; युधिष्ठिरासमोर साक्षात प्रकट झाली; आणि* " सर्वत्र विजयी होशील " असा आशीर्वाद दिला.

भविष्यत्यचिरादेव संग्रामे विजयस्तव ।
राज्यं निष्कंटकं कृत्वा भोक्ष्यसे मेदिनीं पुनः ॥

भगवान् श्रीकृष्णाच्या उपदेशाप्रमाणे, युद्धारंभी विजयास्तव, अर्जुनाने दुर्गादेवीची प्रार्थना केली, असे वर्णनही महाभारतामध्ये आहे ( भीष्मपर्व, २३ ).

ब्रह्मांड-पुराणामध्ये 'ललितासहस्त्रनाम' शीर्षकाखाली या उत्तम स्तोत्राची रचना पहावयास मिळते. भास्कराचार्यांसारख्या प्रसिद्ध तांत्रिक पंथियाने या रचनेवर सौभाग्यभास्कर नावाची टीका लिहिलेली आहे. श्रीविद्येचे अनुयायी ललिता अथवा अंबिका या लोकप्रिय देवतेचे पूजन करतात आणि तिचेच वर्णन या स्तोत्रामध्ये आहे. या अनुयायांची यादी भास्कराचार्यांनी दिलेली आहे. ती येणेप्रमाणे,

सांगितले असून तत्त्वसना, कुलकुंडालया, मूर्तामूर्त इ० अशी नावे दिली आहेत. श्रीविद्येसंबंधीचे वर्णन, दत्तात्रय व परशुराम यामधील संवादरूपाने हरितायनसंहितेमध्ये दिले आहे. श्रीविद्येसंबंधी अधिक खुलासेवार वर्णन आपणांला आनंदलहरी या श्रीशंकराचार्यांच्या स्तोत्रामध्ये पाहावयास सापडते. शंकराचार्य स्वतः अद्वैतवादी तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते असल्याने या स्तोत्राला एक आगळेच स्वरूप प्राप्त झाले आहे. याप्रमाणे संस्कृत वाङ्मयामध्ये अनेक देवींच्या स्तुतिपर स्तोत्रे आढळतील. बंगाल प्रांती पूर्वी सर्वानन्द नावाचे प्रख्यात तांत्रिक होऊन गेले. त्यांनी आपल्या साधनेच्या सामर्थ्यावर दशमहाविद्यांचे साक्षात् दर्शन घेतले आणि सर्वानन्द–तरंगिणी नावाचे उत्कृष्ट स्तोत्र तयार केले आहे. त्याप्रमाणे तांत्रिक पंथामध्ये कर्पुरादि स्तोत्राप्रमाणे अनेक शक्तींची स्तुतिपर स्तोत्रे आढळून येतात. आद्यशंकराचार्यांनी ४० वर देवीस्तुतिपर स्तोत्रे केली आहेत.

महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, एकनाथ, समर्थ रामदास यांनीही शक्तिवर्णनपर तुरळक स्तोत्ररचना केलेली आढळते.

---

टीप— शीख, महानुभव, वल्लभ पंथ इत्यादि अनेकांना अंतर्भूत करावयास पाहिजे होते, पण विस्तारभयास्तव टाळले आहे.

---

आधारभूत ग्रंथ—

१. स्वानंद साम्राज्य, ले. रा. कृ. जटार, शके १८३६, ग्वाल्हेर.

२. Doctrine of Shakti in Indian Literature by P. C. Chakravarti, 1940.

३. Shakti or Divine Power by Sudhendu Kumar Das, 1934.

४. The Lalita Cult by V. R. Ramchandran Dikshitar.

## अणुशक्ति : उत्पादन व कार्य

सन १९४० नंतर युरेनियमच्या अणुगर्भाचे विभाजन करून प्रचंड प्रमाणात शक्ति निर्माण करता येते, हा शोध लागल्यावर आणि डिसेंबर १९४२ चा फर्मीचा प्रयोग व १२ जुलै १९४५ साली अणुध्वमचा चाचणी प्रयोग अमेरिकेच्या न्यू मेक्सिको प्रांतात करण्यात आला अणुशक्तिशास्त्रात हा दिवस अतिशय महत्त्वाचा समजला जातो कारण त्या दिवशी अणुशक्तीचे महत्त्व सर्व जगाला समजून आले त्याच साली जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणुध्वमचा स्फोट केल्यावर या शक्तीचे विध्वंसक सामर्थ्य जगाला पुन्हा जाणवले. हजारो टन स्फोटक द्रव्याएवढी विध्वंसक शक्ति असलेल्या या अणुध्वमामुळे हिरोशिमा व नागासाकी ही दोन्ही शहरे अक्षरशः बेचिराख झाली. या स्फोटाच्या विध्वंसक कार्याची कल्पना मानवाला आल्याबरोबर त्याची प्रतिक्रिया सुरू झाली आणि ही शक्ति अशी मोकाट सुटू न देता, तिचा उपयोग शांततेसाठी करण्याचा त्यानी ठरविले. यानंतर मात्र संशोधकानी या दृष्टि-कोनातून कार्यास प्रारंभ केल्यावर, झपाट्याने प्रगति होत चालली आहे.

असे जरी असले तरी तत्पूर्वी युरेनियम धातु माहीत नव्हता असे मात्र नव्हे. सुमारे एक शतकापूर्वीच (सन १७८९) पिचब्लेंड या खनिजापासून युरेनियम धातु वेगळा करण्यात आलेला होता त्यातून रेडियम या मूळ तत्त्वाचा शोध लागलेला होता, पण प्रमाण अत्यल्प होते, इतके की, तीस लक्ष भाग युरेनियम खनिजातून एक रेडिअम मिळत असे.

याच्या पूर्वी प्राचीन भारतीय ऋषींनी अणु, रेणु, परमाणु यासारखे शब्द वापरात आणलेले आहेत. त्या शब्दाचा अर्थ सध्या आपण समजतो तोच होतो किंवा कसे हे जरी निश्चितपणे सांगता येत नसले तरी या शब्दाचा वापर त्यानी केला आहे हे मात्र खरे. कणादऋषि तर अणुरेणूंच्या कल्पनेने इतका भारावून गेला होता की, प्राण सोडता सोडता तो 'पिलव पिलव' असा जप करीतच स्वर्गवासी झाला त्या काली अग्नि अस्त्र, ब्रह्म अस्त्र यासारखी महाघातक अस्त्रे वापरली जात होती, असे पुराणइतिहासावरून दिसते, पण या शक्तीचा उपयोग केला जात होता किंवा कसे अगर या अस्त्राची वर्णने म्हणजे कल्पना शक्तीची भरारी आहे, हे कोडे अज्ञात असल्याने या शास्त्रात त्याची प्रगति कितपत झालेली होती याबद्दल निश्चित मत देता येत नाही. हा अधिक संशोधनाचा विषय आहे

आहे. ही दोन्ही खनिजे प्रामुख्याने मॅनाइट जातीच्या खडकाचे साहचर्यात आढळतात. याचा साठा भारतामध्ये बिहार प्रांतात सिंगभूम जिल्हा, राजस्थानातील अरवली पर्वताचा पट्टा यामध्ये आढळतो. पण ही खनिजे कमी प्रतीची मानण्यात येतात. कारण एक टन खडकात सुमारे दोन पौंड युरेनियम मिळते. पिचब्लेंड व युरॅनिनाइट खनिजामध्ये युरेनियम ऑक्साइडच्या रूपाने आढळते. याशिवाय कोलंबियन, टँटेलन, टिटॅनियम इ. धातूच्या खनिजामधूनही अल्प प्रमाणात युरेनियम आढळते.

अणुशक्ति संपन्न विश्व ही हास्यापद किंवा स्वप्नमयी कल्पना नाही. जड खनिजाचे शक्ति निर्मितीत रूपांतर होत आहे. युरेनियम, प्लुटोनियम व थोरियम यासारखी इंधने वापरून शक्ति निर्माण करण्याचे कार्य पाश्चिमात्य देशात चालू आहे. हळूहळू भारतातही अणुशक्तिनिर्मितीची केंद्रे उभारली जात आहेत. याविषयीचे ज्ञान होण्यास भरपूर तांत्रिक ज्ञानाची नितांत गरज आहे, पण थोडीशी बुद्धि चालविली तर विषयाचे आकलन होऊ शकेल. सांप्रतच्या या प्रबुद्ध जगात अणुशक्तीची प्राथमिक माहिती असणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे, असे समजून ही माहिती थोडक्यात शक्तीचा सर्वंकष विचार असलेल्या या ग्रंथात दिली आहे.

या शास्त्राचे ज्ञान होण्यास अणुगर्भाच्या रचनेच्या प्राथमिक माहितीची आवश्यकता आहे निरनिराळ्या मूलतत्त्वाची माहिती हवी, त्यांचे गुणधर्म माहित असावयास पाहिजेत, व त्यासंबंधीचे काही शब्दप्रयोगही पक्के ठसविले पाहिजेत, म्हणजेच ज्ञान सुलभपणे होईल.

१ अणु = ॲटम = एखाद्या मूलतत्त्वाचा सूक्ष्मकण अणूच्या एकस्थानी धनविद्युत भारवाहक असे प्रोटॉन किंवा धनकण असून त्याच्याभोवती ऋणकण किंवा इलेक्ट्रॉन, निरनिराळ्या कक्षात अत्यंत वेगाने फिरत असतात. या वीज सूक्ष्मकणाचे प्रमाण निरनिराळे असते एका मूलतत्त्वाचे अणूचे वजन सर्वदा सारखेच असते.

२. अणुभार = ॲटॉमिक वेट = अणूचे वजन

३. अध पतन = फॉल औट = अणुध्वमच्या स्फोटानंतर आकाशात फार उंचावर गेलेले धूलीकण हे काही कालानंतर भूपृष्ठावर हळूहळू खाली येतात.

४. अयॉन = अयॉन ( ION ) = विद्युत्भारवाहक हैड्रोजनच्या अणूचे वजन एक आहे असे धरून, त्याच्या किती पट एखाद्या अणूचे वजन आहे हे दर्शविणारा अंकअणु अथवा अणुसमूह

५. आण्विक रास = ॲटॉमिक पाईल = अणुभट्टी. यातून वीजनिर्मिति होते.

६. अल्फाकण = हेलियम मूल तत्त्वाचा अणुगर्भ; २ धनकण व २ शून्यकण यांच्या संयोगाने हा बनलेला असतो.

७. अल्फा किरण = अल्फा कणांचा भरधाव धावणारा प्रवाह.

८. ऑक्सिडेशन = प्राणवायूचे एकाद्या पदार्थाबरोबर एकत्र येणे, अथवा पदार्थांतून उद्रेजन किंवा हैड्रोजन वायूचे निर्मूलन करणे. अथवा अणुमधून ऋणकण कमी होणे, या क्रियेला ऑक्सिडीकरण म्हणतात.

९. कर्ब-द्वि-प्राणिल वायु ( कार्बन ) = कारबन डाय ऑक्साइड वायु.

१०. समस्थानी = आयसोटोप्स् = यालाच स्वस्थानीय अथवा किरणोत्सर्जी जुळी असेही म्हणतात. एकच अणु क्रमांक पण भिन्न अणुभार असलेल्या मूलतत्त्वास आयसोटोप किंवा एकस्थ म्हणतात.

११. कोबाल्ट = हा रौप्य वर्णाचा, टणक, आवर्तन सारणीतील २७ क्रमांकाचे मूलतत्त्व. हा धातु साधारणपणे लोखंडासारखाच दिसतो.

१२. गाभाकेंद्र = न्युक्लिअस = याला अणुगर्भ असेही म्हणतात. अणूचे केंद्रस्थान अथवा केंद्रशक्ति.

१३. गामा किरण = विघटणाच्या वेळी अस्थिर मूलाणूमधून निघणारे किरण. याच्या लहरींची लांबी, क्षकिरणाच्या लहरींच्या लांबीपेक्षा कमी असते.

१४. जड पाणी—हेवी वाटर = यालाच द्विजड पाणी असेही म्हणतात. शास्त्रीय नाव $D_2O$. या पाण्याचे गुरुत्व, गोठण किंवा उत्कलन बिंदु, ही साध्या पाण्यापेक्षा निराळी असतात. हे पाणी चव व वासरहित असते.

१५. जड जलघटक वायु = जड हायड्रोजन = यालाच ड्युटेरॉन म्हणतात. याचा अणुगर्भ १ धनकण व १ शून्यकण याचा अणुभार २ असून, त्यास ड्युटेरॉन किंवा द्वितरॉन म्हणतात.

१६. तिपट्या त्रिजड = ट्रिटियम = जलघटक वायूचे समस्थानी याचे अणुगर्भामध्ये १ धनकण व २ शून्यकण असतात. त्याचा अणुभार तीन असल्याने त्यास तिपट्या हे नाव आले. हायड्रोजनध्वममध्ये याचा अतिशय उपयोग होतो. हायड्रोजन हा एक जलघटक वायु आहे.

१७. थोरिअम = मोनोझाइट खनिजापासून, काळसर, करड्या रंगाचे तयार केलेले क्रमांक ९० चे मूलतत्त्व.

१८. नत्रवायु = नायट्रोजन = मूलतत्त्व क्रमांक ७. अदृश्य, वासरहित व रासायनिक प्रक्रियेमध्ये उत्साही नसणारा वायु. हवेमध्ये ⅘ भाग या वायूचाच असतो.

१९. प्राणवायु = ऑक्सिजन = मूलतत्त्व क्रमांक ८. वासरहित, अदृश्य वायु. हवेतील याचे प्रमाण ⅕ असल्याने हा भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. रासायनिक प्रक्रियेमध्ये भयंकर उत्साही आहे. जीवनशक्तीला याची अत्यंत जरूरी आहे.

२०. पचनीय घोट = टॉलरन्स डोझ = काहीही अनिष्ट परिणाम घडू न देणाऱ्या सह्यकिरणोत्सर्गाचे संशोधनकाळी ठरवून दिलेले प्रमाण.

२१. प्रतिप्रेरक = रिॲक्टर = अणुविभाजक यंत्र.

२२. प्लुटोनियम = मूलतत्त्व क्रमांक ९४. अणुक्रमांक ९२ च्या युरेनियमवर शून्यकणाचा मारा करून हे मूलतः तयार करण्यात येते. तुर्भे येथील अणुकेंद्रात हे मूलतत्त्व तयार करण्यात येत असते. अणुध्वमनिर्मितीच्या दृष्टीने युरेनियम २३५ इतकेच महत्त्वाचे.

२३. बीटा कण = अणुगर्भातून बाहेर पडणारे सूक्ष्मकण. यावर ऋण-विद्युत्‌भार असून या कणाचे वजन, धनकणाच्या अजमासे १/१८०० इतके असते. रेडिअमसारख्या किरणोत्सर्गी मूलतत्त्वातून हे कण सारखे बाहेर पडत असतात.

२४. बीटा किरण = बीटा कणाच्या मूलतत्त्वातून सतत बाहेर येणारा प्रवाह.

२५. मार्गदर्शक = ट्रेसर = मूलतत्त्वाच्या अस्तित्वाची चाहूल देणारा, त्या मूलतत्त्वाचा किरणोत्सर्गी समस्थानी.

२६. व्यूहाणु = मोलेक्यूल = स्वतंत्र अस्तित्व असू शकणारा मूलतत्त्वाचा सर्वांत लहान कण, ज्यामध्ये पदार्थाचे मूळचे गुणधर्म सापडू शकतात. साधारणपणे मूलतत्त्वाचे २ अणु एकत्र येऊन व्यूहाणु तयार होतो.

२७. मूलतत्त्व = एलेमेंट = कार्बन, तांबे, कथील, प्राणवायु, नत्रवायु, युरेनिअम्, प्लुटोनिअम इ० एकुण १०३ प्रकारची मूलतत्त्वे आहेत.

२८. युरेनिअम् = मूलतत्त्व क्रमांक ९२. टणक, रुपेरी वर्णाची धातु. पिचब्लेंड व युरेनिनाइट या खनिजांतून ऑक्साइडच्या रूपाने मिळतो. यांच्या बांधी इंधन म्हणून अणुभट्टीत वापरतात.

२९. धनकण = प्रोटॉन = धनकणावर धनविद्युत्‌भार असून, यांचे विभाजन ऋणकणाच्या साधारणतः १८०० पट असावे.

३० बीजसूक्ष्मतम कण = इलेक्ट्रॉन्स = हे कण अणुगर्भाच्या भोवती सतत फिरत असून त्याचे वजन धनकणाच्या १।१८०० असते.

३१. विघटण = विभाजन = फिशन = युरेनियमसारख्या मूलतत्त्वाने अणूवर शून्यकणांचा मारा केल्यास, त्या अणूचे साधारणतः दोन भाग होतात. या प्रक्रियेस फिशन किंवा विघटणक्रिया म्हणतात. या विघटणाच्या वेळी काही (१) शून्यकण बाहेर पडतात व भाराचे शक्तीत रूपांतर होते.

३२. विभाजन नियंत्रक यंत्र = मॉडरेटर = अणुभट्टीमध्ये घडून येणारी अणुविभाजनाच्या क्रियेला जड पाण्यासारख्या पदार्थांच्या सहाय्याने सौम्यकता येते किंवा नियन्त्रित करता येते, त्या पदार्थास हे नाव आलेले आहे.

३३. शून्यकण = न्यूट्रॉन = एक धनकण व एक ऋणकण एकत्र येऊन झालेला कण. यावर विजेचा भार अजिबात नसल्याने त्यास शून्यकण म्हणतात.

३४ संयुजा = व्हॅलन्सी = एकत्र राहणारी शक्ति किंवा संयोग पावण्याची शक्ति. हायड्रोजनची संयुज्यता एक आहे असे धरून इतर मूलतत्त्वाची संयुज्यता सांगितली जाते. अणुकण जितके ऋणकण देऊ शकतात किंवा घेऊ शकतात तितकी त्याची संयुज्यता असते.

अणुशक्ति-शास्त्रातील वरीलप्रमाणे ढोबळ परिभाषा ध्यानात घेतल्यावर अणुगर्भाची रचना पाहताना असे दिसून येईल की, धन, ऋण व शून्यकणाच्या मिश्रणाने तो तयार झालेला असतो. साध्या डोळ्यांना अणु सहसा दिसत नाही. अशा या अणूचा धनविद्युत्भार धारण केलेला अणुगर्भ हेच अणुशक्ति-उत्पादनाचे साधन होय. अणूचे सर्व वजन केंद्रस्थानी असते. विघटण क्रिया घडत असताना भाराचे शक्तीत रूपांतर होत असते. या शक्तीलाच अणुशक्ति असे म्हणतात. म्हणजेच अणूच्या विभाजनाने मिळणारी शक्ति होय. मूलतत्त्वाच्या अणुगर्भात असलेल्या धनकणाच्या संख्येवरून त्याचा अनुक्रमांक ठरतो व त्यात असलेल्या धन व शून्य कणांच्या संख्येवरून त्याचा ठरतो. उदाहरणार्थ, युरेनियम २३५=९२ धनकण+१४३ शून्यकण, अथवा युरेनियम २३८=९२ धनकण+१४६ शून्यकण हे प्रमाण असते

युरेनियमपासून अणुशक्ति मिळण्याच्या अनेक पद्धति आहेत. त्यापैकी एक सोपी पद्धत अशी की, शुद्ध ग्राफाइटच्या जाड ठोकळ्यात भोके कोरून त्यामध्ये युरेनिअमच्या कांबी ठेवणे. याला 'आण्विक रास' असे म्हणतात. मुंबई येथील तुर्भे केंद्रात अप्सरा नावाची जी अणुभट्टी आहे त्यामध्ये युरेनियमच्या कांबी इंधन म्हणून वापरतात. या कांबीवर शून्यकणाचा मारा करून युरेनिअमचे विघटिक वेगाने विभाजन करतात. हे ८ सेकंद, इतक्या अत्यल्पप्रमाणात घडून येते. परंतु आण्विक राशीमध्ये कदाचित १० सेकंद इतका वेळ लागला असता. हाच दोन्हींमध्ये फरक आहे.

युरेनियम अणुभट्टी चालू झाली, म्हणजे त्यांतूनच प्लुटोनियम मूलतत्त्व तयार होते. अणुभट्टीमध्ये युरेनिअम व प्लुटोनिअम या दोन्ही धातूंचा उपयोग करावा लागतो. युरेनिअमच्या कांबी इंधन म्हणून वापरल्यावर, त्या पुन्हा वापरता येणार नाहीत, इतक्या अवस्थेपर्यंत पोहोचल्यावर त्या भट्टीतून बाहेर

काढतात. पण या निरुपयोगी ठरलेल्या द्रव्यात प्लुटोनिअम व इतर विभाजनक्षम मूलतत्त्वे तयार झालेली असतात; आणि ती वेगळी करून उपयोगात आणली जातात. यासाठी तुर्भे येथे स्वतंत्र कारखाना उघडण्यात आलेला आहे. प्लुटोनियम हा युरेनिअमप्रमाणे विभाजनक्षम आहे. अशारीतीने अणुशक्तीचे उत्पादन चालू झालेले आहे.

एखाद्या मूलतत्त्वाच्या अणुगर्भातील धनकणांची संख्या सम असली तरी शून्य कणांची संख्या भिन्न असू शकते. युरेनिअम २३५ च्या अणुगर्भात धनकण ९२ व शून्यकण १४३ असतील, तर युरेनिअम २३८ च्या अणुगर्भात धनकण ९२ व शून्यकण १४६ असतील. यामुळे त्यांच्या वागणुकीमध्ये फरक पडतो. पी. यू. २३९, सी १२ वगैरे शब्दप्रयोग जेव्हा करतात, तेव्हा त्याचा विवक्षित अणुभार किती हे सांगितलेले असते. सी १२ म्हणजे १२ अणूच्या भार द्रव्यात ६ धनकण व ६ शून्यकण असतात. सर्वसाधारण तत्त्व असे की, हलक्या वजनाचे मूलतत्त्वांत धन–शून्यकण सम असतात. पण जड वजनाच्या मूलतत्त्वात धनकणांपेक्षा शून्यकण अधिक असतात.

अणुध्वमच्या निर्मितीसाठी युरेनिअम २३५ जास्त उपयोगी पडतो, तर प्लुटोनियमच्या निर्मितीसाठी युरेनिअम २३८ उपयोगी पडतो. अणुगर्भावर शून्यकणांचा मारा केल्यास, अणुगर्भ ते शून्यकण आपल्यामध्ये सामावून घेतो. त्यामुळे त्याचे नैसर्गिक स्थैर्य नष्ट होते व त्याचे विभाजन होते. त्यातून निरनिराळे कण बाहेर फेकले जातात व भाराचे रूपांतर शक्तीत होते.

भार आणि शक्ति या दोन्ही गोष्टी परस्परांपासून भिन्न आहेत, असे समजत असत. पण १९०६ साली सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडताना, भाराचे शक्तीत रूपांतर करता येणे शक्य आहे, असे मत आइन्स्टीनने व्यक्त केले व त्यांचा परस्परसंबंध दर्शविणारे एक सूत्र मांडले ते असे :– शक्ति = भार × (प्र$^2$) येथे प्र = प्रकाशाचा वेग सेकंदाला १८६०० मैल. समजा, आपण एक पौंड भार वजन घेतले, तर किती शक्ति निर्माण झाली ? शक्ति = १ पौंड × ९ × १०$^{२०}$ (हे १८६००० चे स्वरूप आहे) = ११ लक्ष किलोवॅट तास इतकी. याचाच अर्थ असा की, इतकी शक्ति निर्माण करण्यास फक्त १ पौंड युरेनिअम खर्ची पडले. साधारणपणे १०,००० रहिवाशियांना लागणारी वीजशक्ति एक वर्षभर पुरेल, इतकी तयार होते. केवढा कमी खर्च येतो ते सहज समजेल. कर्करोगासारख्या क्षेत्रात जेथे रेडिअमपासून तयार होण्याच्या शक्तीला एक लक्ष रुपये खर्च येई, तेथे आता ५०० रुपयांना कोबाल्ट धातु काम करू शकतो. याप्रमाणे अणुशक्तीचा उपयोग मानवाच्या सुखसोयींसाठी सर्वसाधारण क्षेत्रातही होत आहे.

अथवा २ लक्ष गॅलन गॅसोलिन खर्ची पडले असते. ह्याची किंमत पाच लक्ष डॉलर्स झाली असती

शक्ति निर्माण करणाऱ्या प्रति प्रेरकाचे निरनिराळे प्रकार आहेत. पाण्याच्या दाबाचा, उकळत्या पाण्याचा, धातुद्रवद्रवन जळणाचा, परमाणुवाढ करणारा इ. आहेत शक्तिनिर्मितीबरोबरच दुय्यम निर्मिती म्हणून किरणोत्सर्गी समस्थानी तयार होत असतात युरेनियमच्या १ पौंडाची किंमत सुमारे दीडशे रुपये पडते. साम्प्रत तारापूर ( ठाणे ) येथे अणुशक्ति केंद्र उभारीत आहेत. त्याचा खर्च सुमारे ५० कोटी रुपये अंदाजला असून त्यातून ३८० मिलियन वॅट शक्ति निर्माण होईल कोळशापासून निघालेल्या शक्तीची किंमत जर ४ पैसे असेल तर त्याची २ पैसेच येणार आहे. भारतात अधिक अणुकेंद्रे निर्माण व्हावयाची आहेत, ती याच कारणास्तव होय.

अणुशक्तीपासून किरणोत्सर्गी समस्थानी तयार करण्याचे ज्ञान अवगत झालेले आहे, आणि तेही अत्यंत महत्त्वाचे असेच आहे. समजा आपणाला सोडियम २४ हा सोडियमचा समस्थानी तयार करावयाचा आहे, तर सोडियम २३ ची पूड करून, ती प्रतिप्रेरकामध्ये एका भांड्यात ठेवली जाते. प्रतिप्रेरकाची कार्यवाही सुरू झाली म्हणजे काही शून्य कण यात शिरतात, आणि सोडियमचा अणुगर्भ या शून्य कणांना सामावून घेतो. त्यामुळे सोडियमचा प्रत्येक अणु सोडियम २४ होतो. म्हणजेच किरणोत्सर्गी सोडियम तयार होतो. सोडियम जितका वेळ प्रतिप्रेरकामध्ये राहील, तितके अधिक किरणोत्सर्गी सोडियम तयार होतील. गंधक, फॉस्फरस, लोह, आयोडिन, क्रोमियम, सोडियम अशा प्रकारची अनेक मूळ द्रव्ये आहेत, आणि त्यापासून अनेक प्रकारच्या किरणोत्सर्गी एकस्थ निर्माण करावयाचे कार्य भारतात चालू झालेले आहे

एकस्थाचा उपयोग— ( अ ) वेल्डिंग अगर ओतकाम झाल्यावर ते तपासण्यासाठी लागणारे कॅमेरे बनविणे.

( आ ) नदी अगर समुद्र यांच्या पाण्याच्या हालचालींचा अंदाज घेणे.

( इ ) समुद्रातील गाळ कोठे व कसा साचतो याची माहिती घेणे.

( ई ) बंदरातील पाण्याची खोली निश्चित राखणे.

( उ ) अणुबॉम्बचे चाचणी प्रयोग झाल्यावर दूषित किरणोत्सर्गी धुळीची हवेमध्ये वाढ होते व त्यातील कण हळूहळू भूपृष्ठावर अध पतन पावून, वनस्पति अथवा जलाशय दूषित करू शकतात. त्यामुळे त्या वस्तूंच्या खाण्यापिण्याने मानवी शरीरास इजा पोहोचते.

गायगर–मुलर–काऊंटर किंवा किरणोत्सर्ग मापक तयार केलेल्या इलेक्ट्रॉनिक यंत्राने दूषित धुळीचा शोध घेता येऊन त्यावर वेळीच उपाययोजना

करता येते. सांप्रत भारतामध्ये उत्तर प्रांती याप्रमाणे दहा केंद्रे निर्माण केलेली आहेत. या केंद्रांचा मार्गदर्शक म्हणून उपयोग होतो.

त्याचप्रमाणे या एकस्थाचा मार्गदर्शक म्हणून उपयोग केला जातो. काही वेळा कारणे सांगता येत नसली, तरी निरनिराळ्या पदार्थांचा अल्पसा का होईना, धान्यावर अगर वनस्पतीवर परिणाम होत असतो. ते पदार्थ वनस्पतीमध्ये शिरून त्यावर परिणाम करीत असतात. मार्गदर्शक यंत्रामुळे, ते कोठे जातात आणि किती काळ त्या ठिकाणी टिकतात, याचे मोजमापन करण्यासाठी, किरणोत्सर्गी अणु शेतात सोडल्यावर, ते वनस्पतीमध्ये प्रवेश मिळवितात आणि पदार्थांचा पाठलाग करतात.

'गायगर काऊंटर' सारख्या यंत्राने या पदार्थांचा मागोवा घेता येतो व त्यावर खत अथवा अन्य रसायनांचा मारा करून दूषित पदार्थांचे निर्मूलन करता येते. याप्रमाणे इतरत्रही ही पद्धत वापरून उपाययोजना करता येते. प्राणिशास्त्रात, वैद्यकशास्त्रात, कर्क रोगात, यांत्रिक झीज संशोधनात, मोटरटायरची झीज संशोधनात, सिगारेट बनविताना ती योग्य प्रमाणात कणखर बनविण्यात, कारखान्यातील भिन्न पदार्थांचे मिश्रणप्रमाण बरोबर ठरविण्यात, अन्नधान्याचे निर्जंतुकीकरण करून साठवणीस मदत करण्यास, पेट्रोलचे व्यूहाणू फोडून त्यापासून निरनिराळी द्रव्ये बनविण्यास वगैरे अनेक कारणासाठी या मार्गदर्शक यंत्राचा उपयोग करू लागलेले असल्याने निरोगी वातावरण बनविण्यास याचा उपयोग होत आहे.

किरणोत्सर्ग म्हणजे काय? ज्या मूलतत्त्वाच्या अणूची विघटणक्रिया सतत चालू असते व ज्यातून सतत किरणोत्सर्ग होत असतो, त्याना किरणोत्सर्गीय पदार्थ असे म्हणतात. हे पदार्थ तीन प्रकारचे किरण उत्सर्जित करीत असतात. त्यापैकी अल्फाकिरण हा धन विजेने युक्त असतो, बीटा किरण ऋणविजेने युक्त असतो आणि तिसरा गामाकिरण याचे साम्य क्ष किरणाबरोबर करतात. या किरणोत्सर्गी किरणांचे, मानवाचे व वनस्पतीसृष्टीचे जीवनावर निरनिराळे परिणाम होतात. पहिल्या दोन किरणांना अडथळा आणून त्यांच्या क्रियेला निरोध करता येतो. पण गामा किरण हा असा आहे की, सर्व पदार्थांतून तो आरपार जाऊ शकतो. क्ष किरण मानवाचे शरीरात प्रवेश करतात, पण अस्थींचा भेद करू शकत नसल्याने आपणाला छायाचित्रे घेता येतात. गामाकिरणाची गति अकुंठित असल्याने तो अस्थींमध्येही प्रवेश करून पलिकडे जातो. शरीरात प्रवेश केल्यावर तेथे असलेल्या अणूंमध्ये विद्युतभारित कणांचा संचय वाढत जातो आणि त्याचे निरनिराळे परिणाम होतात. काही वेळा हे गामाकिरण हानिकारक ठरतात, तर कर्क रोगासारख्या आजारात ते उपकारक ठरतात. या किरणांची गम्मत अशी आहे की, या

किरणांचा प्रवेश झाल्यावर शरीरात कर्क रोग उत्पन्नही होतो, पण काट्याने काटा काढावा या उक्तीप्रमाणे योग्य रीतीने आणि योग्य प्रमाणात त्यांचा उपयोग केल्यास कर्क रोगाचे निर्मूलनही होते. किरणोत्सर्गीय पदार्थांचा जीवसृष्टीला उपकारक उपयोग कसा होईल, यामध्येच शास्त्रज्ञ सांप्रत अधिक संशोधन करीत आहेत.

गामाकिरणांचा तांदुळ, भुईमूग वगैरे पिकांवर मारा केला असता असे दिसून आले की, ही धान्ये अधिक सकस व जास्त पीक देणारी होतात. तांदुळाचे पीक जे खाली पडून नाश पावते ते या प्रयोगाने ताठ उभे रहाते व कमी नुकसानकारक होते. भुईमुगाची शेंग अधिक दाणेदार व लवकर बनते. आंबा, पेरू, केळी, सफरचंद इ० फळांवर यांचा फवारा मारल्यास ही फळे अधिक टिकतात. धान्यसाठे किडा-मुंग्यांनी खाऊन नाश पावू नयेत म्हणून या किरणांचा उपयोग करण्यात येतो. शरीरावर गाठी, थायरॉइड ग्रंथी उठल्यास त्यांच्या उपचाराने आराम पडतो. अणुस्फोटाच्या सहाय्याने अग्निबाण लाख सहस्र फूट उंचीपर्यंत सोडून तेथील हवामानातील प्रवाहाचा शोध घेता येतो अगर निरनिराळ्या ग्रह-गोलांबरोबर संबंध जोडता येतो. दि. १८-१०-६७ रोजी रशियन शास्त्रज्ञांनी शुक्रावर अवकाशयान उतरविण्यात यश मिळविले आहे. १२९ दिवसात सुमारे २१ कोटी मैलांचे अंतर तोडून ते सुखरूप येथे उतरले असून त्या ग्रहावरील वातावरण, प्राणवायूचे प्रमाण, २८० सेंटिग्रेडपर्यंतचे उष्णतामान इत्यादि माहिती संदेशरूपाने आलेली आहे. यानंतर अमेरिकेनेही चंद्रावर माहिती मिळविण्यासाठी ग्रहगोल उतरविला आहे. हा सर्व अणुशक्तीचा प्रभाव आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. भारतामध्ये अग्निबाण सोडण्याचे ठिकाण दक्षिणेस थुंबा या गावी आहे.

किरणोत्सर्गीय धोके—किरणोत्सर्गीय किरणांपासून जसे फायदे आहेत, तसे धोकेही आहेत. सजीव प्राणिमात्राच्या स्नायूवर किरणोत्सर्गीय आदळतो, त्या वेळी जी प्रक्रिया घडते, त्याचे संशोधन झालेले आहे. या किरणांचा मारा झाला म्हणजे शरीरातील अणु फोडून निघतो आणि सूक्ष्मतम वीजकण कमी होतात. काही वेळा ते अधिकही होतात. या वेळी शरीरात जो पदार्थ तयार होतो, त्याला विद्युत्प्रेरित अयॉन असे म्हणतात. तो धन अथवा ऋण विजकण-युक्त असतो या अयॉनीकरणाने रक्तपेशी एक तर मृत होतील अथवा अस्वाभाविकपणे वागू लागतील. हा फरक अल्फा अगर बीटा कणांच्या माऱ्याने अधिक प्रखर होतो. रक्तपेशी नष्ट झाली म्हणजे कर्क रोग बरा होतो, कारण रोगाचे निर्मूलन झालेले असते. पण किरणांचा मारा फक्त रोगग्रस्त ठिकाणावरच व्हावयास पाहिजे. रोगग्रस्त विभागात कोबाल्टची एक सुई खुपसून ठेवल्याने त्यापासून होणाऱ्या किरणोत्सर्गामुळे कर्क रोगाच्या पेशी नष्ट होतात. हल्लीच नवे

तर कर्क रोग पेशी जर सर्व शरीरभर पसरल्या असतील, तर किरणोत्सर्गी सुवर्णाचे रसायन शरीरात टोचून त्या नष्ट करता येतात.

किरणोत्सर्गाने शरीरातील अणूच्या सूक्ष्मतम बीजकणाचे मांडणीत फरक घडवून आणणे, याचेच नाव मृत्यु होय. अणूची निर्मिती शरीरातील रक्त-निर्मितीच्या तांबड्या व पांढऱ्या पेशीवर अवलंबून असल्याने आणि रोगप्रति-बंधक पांढऱ्या पेशी नाश पावल्याने मृत्यु उभा रहातो. किरणोत्सर्गीय माऱ्याने मानवाचे केस गळून पडतात. त्याच्या माऱ्याने ज्या पेशी मृत होत नाहीत, त्या खासच दुर्बल बनतात आणि त्यांची रोगप्रतिबंधक शक्ति कमी झाल्याने कर्क रोगासारखा रोग निर्माण होतो.

किरणोत्सर्गीय पदार्थांच्या खाणीतील कर्मचाऱ्यांपैकी ५०% कर्मचारी या रोगाला बळी पडलेले असतात. कारण त्यांच्या फुप्फुसावर बीटा किरणांचा सतत मारा होत असतो. डोळ्यातील मोतीबिंदुसारखा रोग किरणोत्सर्गाने उत्पन्न होतो. रक्तातील पांढऱ्या पेशींची वाढ झाल्याने पंडुरोग उत्पन्न होतो. इतकेच नव्हे, तर प्रजोत्पादनावरही याचा परिणाम होतो, असे आढळून आलेले आहे. या व्यतिरिक्त खालीलप्रमाणे अधिक धोके संभवतात.

( १ ) प्रतिप्रेरकाचे संरक्षण-कवच भरपूर जाड नसल्यास, किरणोत्सर्गीय बाहेर पडून कर्मचारी वर्गात शिरतात.

( २ ) शीतवायु प्रेरकातून बाहेर जाणारी किरणोत्सर्गीय हवा, भरपूर उंचावर नेवून सोडतात. यातील हेतु असा की, पुन्हा भूमीवर येईपर्यंत त्यातील किरणोत्सर्गीय संपलेले असावेत. पण काही वेळा पावसाळी हवेत अगर तऱ्हेवाईक हवामानात, ते संपत नाहीत, खाली येतात आणि प्राणिमात्रांना धोका उत्पन्न होतो.

( ३ ) प्रतिप्रेरकातून निकालात निघालेले द्रव्य, किरणोत्सर्गी झालेले असल्याने, ते निर्जन वनात टाकले तरी शेकडो वर्षे त्रास देत रहाते. काही प्रतिप्रेरकातून निघालेली राख शिशाच्या पेटीत बंद करून सागरात खोल ठिकाणी टाकली, तरी कालांतराने आवरणाचा क्षय झाला, म्हणजे किरणोत्सर्गीय बाहेर पडून पाण्यात मिसळतील, ते लाटांवर पसरून मानवांना त्रास देतील अगर मत्स्यादिकांचे उदरात प्रवेश करून ते भक्षण करणाऱ्या मानवांना त्रास देतील.

( ४ ) अणुशक्ति केंद्र भडकून स्फोट झाला म्हणजे उद्भवणारी परिस्थिति अतिशय हानिकारक होईल.

( ५ ) अणुबॉम्बचा स्फोट झाल्यावर, आकाशात उंच गेलेले किरणोत्सर्गी समस्थानी कालांतराने अध:पतन पावतात आणि प्राणिमात्रांच्या खाण्यापिण्याच्या पदार्थांत शिरून मानव-शरीरात प्रवेश करतात.

( ६ ) ड्युटेरिअम वायु वापरून शक्ति निर्माण करता येते आणि ही शक्ति अणुध्वममध्ये वापरली तर अति भयंकर परिणाम होतात. सागरातील पाण्यापासून हा अमाप मिळण्याची शक्यता असल्याने याचा तोटा केव्हाही पडणार नाही. युरेनिअमपेक्षा या हलक्या द्रव्यातून जास्त कार्यक्षम शक्ति निर्माण होते. युरेनिअमच्या १ पौंड वजनातून जर १ कोटी १० लक्ष किलोवॅट तास शक्ति मिळेल, तर तेवढ्याच वजनाच्या जल-विघटक-वायूपासून ४ कोटी ६० लक्ष किलोवॅट तास शक्ति मिळेल. यास्तव या मूलतत्त्वातील धोकाही अधिक धोकादायक आहे.

सर्व जाणत्या राजकर्त्यांना व संशोधकांना हे पूर्णपणे पटलेले आहे की, अणुशक्तीचा उपयोग फक्त शांतताकार्यासाठी व्हावा, विध्वंसक कार्याकडे होऊ नये. हिरोशिमा व नागासाकी येथील दृश्य सर्वांच्या नेत्रासमोर तरळते आहेत. या शक्तीमुळे मानवाचे सुखसंवर्धन व्हावे, शांतता लाभावी, यासाठी सर्व राष्ट्रे प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत, अद्यापही प्रयत्न चालूच आहेत. ऑगस्ट १९५५ साली जिनेव्हा येथे परिषद भरून या गोष्टीचा साधकबाधक ऊहापोह झाला, आणि २३–१०–५६ रोजी ८२ राष्ट्रांच्या सभासदांनी संमती दिल्यावर, '**आंतरराष्ट्रीय अणुशक्ति समिति**' स्थापन करण्यात आली आहे. जगातील सर्व राष्ट्रे या समितीत अंतर्भूत नाहीत, त्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. हेतु इतकाच की, सर्व राष्ट्रांमध्ये या समितीचा अधिकार चालावा आणि अणुशक्तीचे संपूर्ण नियंत्रण व्हावे.

या समितीचे प्रत्यक्ष कामकाज पुढे दीडवर्षांनी सुरू झाले आणि तिचे संक्षिप्त नाव 'युरेटम कमिशन' असे ठेवण्यात आले आहे. सुमारे दोनसहस्र शास्त्रज्ञ या संस्थेमध्ये संशोधनाचे काम करीत आहेत. इटलीमधील इस्प्रा शहरी त्याचे प्रमुख केंद्र असून इतर देशातही शाखा आहेत. या कमिशनने आजवर ४२०० कोटी डॉलर्स खर्च केले असून सन १९७० साली त्याचे पहिले उत्पादन सुरू होईल. भूगोलातील सर्व देशात विजेची गरज दिवसेंदिवस वाढत असून सन १९६० साली जी २८ कोटी किलोवॅट तास होती, ती सन १९७५ साली ९० कोटींवर जाणार आहे. तेव्हा या संस्थेची किती नितांत आवश्यकता आहे हे लक्षात येईल. आजवर या संस्थेने जे कार्य अणुशक्तीबाबत केले आणि अधिकार प्राप्त करून घेतले त्यांचा सारांश असा,

( अ ) अणुशक्तीच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या द्रव्यांची सामुदायिक बाजारपेठ स्थापण करणे,

( आ ) कोठेही आणि कोणाशीही संशोधन व नोकरी करण्याचे स्वातंत्र्य असणे.

(इ) अणुशक्तीने वीज उत्पादन करून 'समता आणि कार्यक्षमता' या तत्त्वावर, सदस्य राष्ट्रांना पुरविणे
(ई) अणुशक्ति उत्पादनातील घातपातासाठी विमायोजना आयोजित करणे, आणि •
(उ) अणुशक्तिचा उपयोग फक्त शांततेच्या कार्यासाठी करणे

या कमिशनद्वारे अनेक व्यवसायासाठी संशोधन होणार आहे त्याचे उद्दिष्ट साम्प्रत खालीलप्रमाणे आहे

(१) समुद्राचे खारे पाणी गोड करून उपयोगात आणणे.
(२) कृषीव्यवसायाचे उत्पादन वाढविणे
(३) उद्योगधंद्यातील यंत्रसामुग्रीची झीज कमी करण
(४) खते व रसायनाचे उत्पादन वाढविणे
(५) शरीरावर उठणाऱ्या ग्रंथी, फोड, सूज याला विरोध करणे
(६) जहाज अगर अन्य जलद वहाने चालविण्यासाठी प्रेरकशक्ति उत्पादन करणे
(७) जगातील प्रमुख भाषांमध्ये—मराठीसुद्धा—या कमिशनच्या कार्याच्या वाङ्मयाचा प्रसार करणे इ० इ०.

अणुशक्तीविषयी माझ्या अल्पमतीप्रमाणे व सखोल अभ्यासाविना जो त्रोटक वृत्तांत वर देता आला आहे, तो अणुशक्तीची सर्वसाधारण कल्पना येण्यास पुरेसा वाटावा. शक्तितत्त्वाच्या सर्वांगीण विचार करणाऱ्या या ग्रंथामध्ये, आधुनिक जगातील अणुशक्ति निर्मितीची व तिचे इष्ट अनिष्ट परिणामाची कल्पना व्हावी, या हेतूनेच येथे ऊहापोह केलेला आहे

# शक्तिपीठ देवता

| | | |
|---|---|---|
| (१) श्रीराजराजेश्वरी | (१८) पटेश्वरी | (३५) मीनाक्षी |
| (२) अच्छलमाता | (१९) पीठजादेवी | (३६) मेगुती मंदिर |
| (३) आदिशक्ति (चाफळ) | (२०) पैठण देवता | (३७) यमाई |
| (४) अंबाभवानी (अमरावती) | (२१) पुणे शहर देवता | (३८) ललिता |
| (५) अंबेजोगाई | (२२) बनशंकरी | (३९) वज्रेश्वरी |
| (६) उग्रतारा | (२३) बहुचरा | (४०) वरदायिनी |
| (७) कन्याकुमारी | (२४) बिलईमाता | (४१) वाराणसी देवता |
| (८) कमळा | (२५) भवानीसीता कुंड | (४२) विंध्यवासिनी |
| (९) कात्यायनी | (२६) भद्रकाली | (४३) विद्यादेवी |
| (१०) कामाख्या | (२७) भ्रमरंबा | (४४) शांतादुर्गा |
| (११) कामाक्षी | (२८) मुंबई शहर देवता | (४५) शारदा |
| (१२) कालीमाता | (२९) महामयी | (४६) सप्तशृंगी |
| (१३) गुह्येश्वरी | (३०) मोहनीराज | (४७) स्वांगियाजी |
| (१४) गोवे प्रांतीय देवता | (३१) महालसा | (४८) हरसिद्धि |
| (१५) जीवदानी | (३२) महालक्ष्मी (डहाणु) | (४९) हर्षदमाता |
| (१६) ज्वालादेवी | (३३) महालक्ष्मी | (५०) हिंगुळा (१) |
| (१७) तुकाई | (३४) महिकावती | (५१) हिंगुळा (२) |

आद्यशक्तीच्या पीठांबद्दल जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करून देणारा ग्रंथ म्हणून 'देवीभागवत' ह्या ग्रंथाकडे अंगुलीनिर्देश करता येईल. दक्षयज्ञ प्रसंगी सतीने देहार्पण करण्यापूर्वी तिने शंकरांना सांगितले की, 'तिचा निवास निरंतर १०८ पीठांमध्ये राहील' ती समग्र यादी आपणाकडे उपलब्ध आहे (आदिशक्तीचे विश्वस्वरूप खंड १ पृष्ठे २०१ ते २९३ पहा). त्याव्यतिरिक्त "महापीठ निर्णय" ग्रंथाप्रमाणे ५१ पीठे दिलेली आहेत त्यांचाही इतिहास आपण पाहिलाच आहे (आदिशक्तीचे विश्वस्वरूप, खं १, पृ २७९–२९१) चार पीठांपासून आरंभ होत वाढत त्यांची संख्या एकावन्नपर्यंत झाली आहे. या दोन्ही याद्या सुमारे सातशे आठशे शतकापूर्वी तयार झाल्या असल्याने त्यातील अनेक पीठे आज अस्तित्वात नाहीत, काळाने त्यांना गिळले आहे किंवा त्यांची श्रेष्ठता नष्ट झाली आहे इतकेच नव्हे, तर या पीठस्थानाबद्दल एकवाक्यता नसल्याने, ही तितकी विश्वसनीय वाटत नाहीत, म्हणूनही मागे पडण्याचा संभव आहे. तरीही,

## ( १ ) श्रीराजराजेश्वरी

या देवीच्या नावाची उत्पत्ति ‘ दशमहाविद्या भुवनेश्वरी ’ या नावामध्ये आढळते. एका क्षेत्री या देवीचे जे वैभव वर्णन केले आहे, त्यावरून राजे-रजवाड्यांना जे वैभव उपभोगता येत नाही, त्यापेक्षा उत्तम वैभव भोगलेली व ब्रह्मा–विष्णु–महेशादि देवांच्या आसनावर विराजमान होणारी जी देवता ती राजराजेश्वरी होय, असा अर्थ निघतो. दशमहाविद्येपैकी भुवनेश्वरी ही चौथी शक्ति तिचेच एक नाव राजराजेश्वरी असे आहे. या देवीचे जे आसन दिले आहे त्यात ती पंच प्रेतासनावर उभी आहे, असे दाखविले आहे. ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि ईश्वर यांनी आपली प्राप्त कर्तव्ये सोडून दिली म्हणजे ते प्रेतरूप झाले असे समजतात. अशा वेळी भुवनेश्वरी देवता ८४ लाख योनींचे पालन त्याच्या प्रेतांवर उभे राहून करते तिच्या आसनाचे ब्रह्मा, विष्णु, रुद्र आणि ईश्वर हे चार पाय आणि त्यावर सदाशिव शवासारखा आडवा पडलेला असून त्याच्या अंकावर बसून अगर नाभीकमळांतून वर येऊन ही देवता प्राणिमात्राचे पालन करते, असा भावार्थ आहे.

कांची येथील कैलासनाथाच्या मंदिराला राजराजेश्वर असे नाव आहे. हे नाव पडण्याबद्दल असे अनुमान करण्यात येते की, आपली स्मृति मागे रहावी म्हणून राजेलोक ज्या वेळी अशी मंदिरे उभारीत, त्या वेळी, त्या काळात पल्लवराजा नरसिंहवर्मा ज्याला राजराजेश्वर हे उपनाव होते, त्याच्या नावावरून या मंदिराला हे नाव प्राप्त झाले असावे. तसेच कोलराजा पहिला राजराज याने तंजावर येथे भव्य मंदिर बांधले आहे. त्यालाही राजराजेश्वर म्हणूनच संबोधिले जाते. महिषासुरासारख्या राजराजेश्वराचा देवीने वध केला. ह्यावरून सहजच अशी शंका आल्याशिवाय रहात नाही की, राजराजेश्वरावर वर्चस्व गाजविणारी शक्ति तीच राजराजेश्वरी असावी काय ?

( मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, जानेवारी, १९६२, पृष्ठ २० ).

बागरमऊ ( जि० उनाव ) या उत्तरप्रदेशातील गावी राजराजेश्वरी देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. ही मूर्ति योगशास्त्रानुसार, वेदशास्त्रानुसार आणि तंत्रशास्त्रा-नुसार घडविलेली आहे, अशी तिची प्रसिद्धि आहे. तेव्हा ही मूर्ति प्रमाणभूत मानावयास हरकत नसावी. मूर्तीचे स्वरूप फारच आकर्षक आहे.

मुख्य मंदिराच्या दोन्ही बाजूंना शंकराची मंदिरे आहेत. पूर्वेकडील मंदिरातील लिंगमूर्तीमध्ये श्वेत, रक्त आणि पीत रंग दृगोचर होत असून, तेथे चंद्रबिंदूचाही भास उत्पन्न होतो. सामान्यतः अशा प्रकारचे अलौकिक शिवलिंग इतरत्र कोठे पहाण्यात येत नाही. पश्चिमेकडील मंदिरातील पूजनमूर्ति पंचमुखी,

चतुर्भुज, रक्तवर्णी, अष्टधातूंची बनविलेली आहे. हातामध्ये शूल, कपाळ, पाश, मुद्गर ही आयुधे आहेत.

मुख्य मंदिरामध्ये देवीच्या आसनभागी चतुर्दल मूलाधार कमळावर ब्रह्मा विराजमान असून, कमळाच्या प्रत्येक पाकळीवर 'वं श ष सं' ही बीजाक्षरे कोरलेली आहेत. पुढे स्वाधिष्ठान कमळावर 'बं भ म य रं ल' ही बीजाक्षरे कोरलेली असून, विष्णु अधिष्ठित आहे. यापुढे षोडशदल (विशुद्धाख्य) कमळावर 'अं' पासून 'अः' पर्यंत बीजाक्षरे असून सदाशिव अधिष्ठित आहे. निलवर्ण दशदल मणिपूर कमळावर, 'ड' पासून 'फं' पर्यंत बीजाक्षरे असून रुद्रमूर्ति अधिष्ठित आहे. शेवटी द्वादशदल (अनाहत) कमळावर 'क' पासून 'ठं' पर्यंत बीजाक्षरे असून ईश्वराची मूर्ति अधिष्ठित आहे. याप्रमाणे पाच प्रमुख देव देवीच्या आसनस्थानी आहेत. या पाच मूर्तींच्या मस्तकावर द्विदल (आज्ञा) श्वेतकमळावर ज्याच्या पाकळीवर 'हं क्ष' बीजाक्षरे आहेत. सदाशिव निद्रिस्त स्थितीत पहुडला असून, त्याच्या नाभीकमळातून एक उंच देठाचे कमळ वर आलेले आहे. याच कमळावर अष्टधातूची अंबिकेची मूर्ति अधिष्ठित आहे. मूर्तीचे स्वरूप नयनरम्य आकर्षक आहे. भैरवतंत्राप्रमाणे दशमहाविद्येपैकी चवथी शक्ति अगर विद्या जी भुवनेश्वरी तीच राजराजेश्वरी होय असे म्हटले आहे. याचा अर्थ ही देवता दशमहाविद्येपैकी एक झाली. या मूर्तीची घडण एका विशिष्ट पद्धतीने व कल्पकतेने केलेली असल्याने, सर्व प्रमुख देवतांच्या शिरी राहून ऐश्वर्य उपभोगणारी व पालन करणारी असल्याने, तिला राजराजेश्वरी हे नाव खरोखरीच शोभून दिसते.

(कल्याण शक्तिअंक, १९३४, पृष्ठ ६७०)

वऱ्हाडामध्ये मंडला जिल्ह्यात या देवीचे आणखी एक प्रसिद्ध स्थान आहे. परंतु ते निराळ्या अर्थाने! या देवतेबद्दलची एक आख्यायिका चित्तवेधक आहे. येथील देवीची मूर्ति पूर्वी मंडला व छत्तीसगड याच्या दरम्यान असणाऱ्या एका उंच टेकडीवर होती. त्या वेळी वऱ्हाड प्रांतावर निजामशहाचे आधिपत्य होते. एके दिवशी निजामशहाला दृष्टांत झाला की, देवीची ही मूर्ति तेथून हलवून जिल्ह्यामध्ये स्थापन करावी. राजा परधर्मीय असला तरी श्रद्धावान् असल्यामुळे त्याने तातडीने माणसे पाठवून दृष्टांताप्रमाणे देवीचा शोध लावला आणि मोठ्या आनंदाने जिल्ह्याच्या परिसरात एक मंदिर उभारून, त्या ठिकाणी तिची स्थापना केली. या देवीची व्यवस्था स्वतः निजाम आणि त्याचे वंशज जातीने ठेवीत असत. ही हिंदूंची देवता आणि ही मुसलमानांची देवता असा भेदभाव तो कधीच मानीत नसे.

अशी कथा प्रचलित आहे की, प्रत्येक युद्धावर निघण्याच्या वेळी निजामशहा या देवीचा कौल घेत असे. कौल घेण्याची पद्धत अशी होती की, देवतेसमोर एक तलवार ठेवली जाई आणि जयापजयाचे मोजमाप केले जाई. निश्चित जय मिळणार असे दिसल्यावर देवी ती तलवार मुठीवर उभी करी. एकदा सागर येथील मराठी सरदाराने मंडला किल्ल्यावर स्वारी करण्याचे उद्घोषित केले, तेव्हा नेहमीप्रमाणे निजामशहा कौल मागण्यास आला. पण या वेळी नेहमीची कौलरूढी सोडून राजाने देवीजवळ मागणी केली, 'जय व्हायचा असेल तर तलवार मुठीवर उभी राहिल्यावर ती माझ्या हातात पडावी.' तलवार मुठीवर उभी राहिली, परंतु ती निजामाच्या हाती पडेना. कदाचित् ही रूढीविरुद्ध केलेली उन्मत्तपणाची मागणी देवीला आवडली नसावी आणि म्हणून देवीने तलवार त्याच्या हाती दिली नसावी. दोनतीन वेळा हाच प्रकार घडल्यावर निजाम मनामध्ये दचकला आणि विजयाबद्दल स्वतःच साशंक झाला. रूढीप्रमाणे मिळालेला कौल आपल्या हिताचा आहे, इतकेही जाणण्याचे भान न राहून युद्ध न करताच त्याने किल्ला सोडून दिला. त्याच्या निराशी मनाने असेच लावून घेतले की, मराठ्यांविरुद्ध जय मिळायची आपणांला आशा नाही, तेव्हा आपल्या डोळ्यादेखत हा सर्वनाश न व्हावा, म्हणून गुपचुपपणे आधीच त्याने राज्यत्याग केला. सन १८७५ मध्ये राजा गोकुळदास आणि परमानंद चौधरी ह्यांनी बांधलेले हे मंदिर आजही भरभराटीला आले आहे. (मंडला जिल्हा गॅझेट, पृष्ठ २५१).

रामनाद (रामेश्वर) येथे सेतुपति नरेशाचे राजभवन आहे. त्यामध्ये श्रीराजराजेश्वरी देवीचे मंदिर आहे. तसेच नेपाळमध्ये बागमती नदीच्या काठी आर्यघाट नावाचे ठिकाण आहे. त्यापासून पाचशे फूट दक्षिणेला नवदुर्गा देवीचे देवालय आहे. या स्वरूपालाच या ठिकाणी श्रीराजराजेश्वरी असे म्हणतात.

(नेपाळ मार्गदर्शक)

अनुष्टुभ

श्रीराजराजेश्वरी देवी । श्रीविद्या तव मंदिर ।
बांगरमाऊ ग्रामातें । उनाव प्रांतीं उत्तर ॥ १ ॥
अन्यत्र तुलना नाहीं । अपूर्व मांडणी तऱ्हा ।
बुद्धि सर्वस्व वेंचोनी । रेखी आराखडा बरा ॥ २ ॥
देविच्या आसना मांडी । त्रैमूर्ति रुद्र ईश्वर ।
त्यानाहीं आसना देई । कमळासन सुंदर ॥ ३ ॥

बीजाक्षरे अनेकाहीं । लिहिली पद्मपाकळीं ।
पाच रूपें तयामाजीं । बीच तेजें प्रकाशिली ॥ ४ ॥
द्विदल पाकळी पद्म । उभने आसनातुनी ।
पहुडे त्यावरी सार । बीजाक्षर सुखासनी ॥ ५ ॥
शिवाच्या नाभि मूळाते । निर्मिले रक्तपद्म तें ।
अष्ट धात्रादिका देवी । अनिकाशिरीं शोभतें ॥ ६ ॥
मुख्य देवालया ठायीं । वामांगी दक्षिणेकडे ।
स्वयंभू शिवलिंगाचीं । शोभिली दिव्य मंदिरें ॥ ७ ॥
राजराजेश्वरी देवी । ऐश्वर्य मिरवितसे ।
जोडोनि करकमळाते । देवतेला नमितसे ॥ ८ ॥

( २ ) अन्ठरूमाता

उत्तर प्रदेशात विक्रमगढ जिल्ह्यात पथ्वीपूर गावापासून पाच मैल अंतरावर हे प्रसिद्ध स्थान आहे या भागातील अनेक घराण्याची ही कुल स्वामिनी असून तिचे भक्त लाखावर पसरलेले आहेत वसंतपंचमीला या ठिकाणी वार्षिक यात्रा भरते

या मंदिरासमोर पाण्याचे एक कुंड आहे त्याचे मोजमाप मिळत नाही किंवा करण्याचा कोणी प्रयत्न करीत नाही देवीची पूजा केल्यावर, नैवेद्य दाखविल्यावर आणि देवीला वंदन केल्यावर, प्रसाद घेण्यासाठी भक्ताला या कुंडावर यावे लागते तेथे आल्यावर पाण्यावर बुडबुडे येत असलेले त्याच्या दृष्टीस पडतात, आणि काही वेळाने त्याच बुडबुड्यातून त्याला प्रसाद वर येतो परंतु प्रत्येकाला एकाच प्रकारचा मिळतो असे मात्र नाही काही वेळा खोबऱ्याचे तुकडे, मनुका, धणे, गूळ, अगर एखाद्या फळाचा तुकडा प्रसाद म्हणून मिळतो एखाद्या फळाचा मोसम नसला तरीही त्याचा तुकडा प्रसाद म्हणून येतो त्याच कारणामुळे देवीचे माहात्म्य वाढलेले आहे, हे एक जागृतस्थान मानले जाते

नुकतीच घडलेली अशी एक कथा प्रचलित आहे की, एकदा दोन जावा-जावा देवीच्या दर्शनार्थ आल्या, आणि थोरल्या जाऊबाईने धाकटीची काही वस्तु तिच्या नकळत उचलली त्यावरून त्या दोघींचे भांडण झाले धाकट्या जावेला आपल्या थोरल्या जावेचाच संशय येऊ लागला, आणि तिने तसे तिला बोलूनही दाखविले पण ती कबूल होईना शेवटी धाकट्या जावेच्या

सांगण्यावरून थोरलीने देवीची शपथ घेतली. ती देवीला म्हणाली की, ' माते, मी जर ही वस्तु चोरली असेल तर माझे पोट फुटू दे. ' आणि चमत्कार काय झाला पहा! तिचे वाक्य संपते न संपते तोंच त्या बाईचे पोट दुखू लागले आणि तिला मरणावस्था प्राप्त झाली. अशा या शेवटच्या आणीबाणीच्या क्षणी तिने आपला गुन्हाही कबूल केला. पण व्यर्थ! शेवटी गुन्हा कबूल करण्याचा काहीही परिणाम झाला नाही. पश्चात्तापाचा काही एक उपयोग न होता त्या बाईचे पोट फुटले आणि तिला जग सोडून जावे लागले (श्री. सदानंद चेंदवणकर, नवशक्ति, मुंबई, दिनांक १५-१०-१९६२).

## (३) आदिशक्ति (चाफळ)

श्री समर्थ रामदासस्वामी यांनी टाकळी येथे गायित्री पुरश्चरण व तेरा कोटी रामनामाचा जप पुरा केल्यावर अनेक ठिकाणी संचार केला. त्या संचारामध्ये त्यांनी राष्ट्राची परिस्थिति अवलोकन केली, त्यामुळे त्यांना असे समजून चुकले की, राष्ट्राचा उत्कर्ष साधावयाचा असेल तर अनेक क्षेत्री शक्तिपीठे व श्रद्धास्थाने निर्माण केली पाहिजेत, आणि विस्कळीत झालेल्या समाजाचे एकीकरण केले पाहिजे, तरच यावनी सत्तेचे उच्चाटन करता येईल.

कालांतराने श्रीसमर्थ आपल्या घरी गेले, स्वबांधवांच्या भेटी घेतल्या, मातोश्रींची भेट घेऊन तिचा आशीर्वाद घेतला, आणि नंतर चाफळ (जि. सातारा) येथे प्रथम राम मंदिर बांधून कार्याची सुरुवात करण्याचे निश्चित केले. मंदिरासाठी जागेचा प्रश्न उपस्थित झाला. आपल्या शिष्यवर्गांपैकी श्री. आनंदराव देशपांडे प्रभृतींना त्यांनी जागेच्या शोधार्थ रवाना केले. चाफळवाडीचे देशमुख श्री. प्राणजी बाबर त्याकाळी एक बडे प्रस्थ होते. त्यांचा आसमंतात दरारा मोठा. शिष्यांनी त्यांची भेट घेऊन स्वामींची इच्छा त्यांना कळविली. देशमुखांनी जागा देण्याचे मान्य केले, परंतु गावात नव्हे, तर गावाबाहेर मांड नदीच्या पलीकडे चाफळ गावाची जी स्मशानभूमि आहे, त्या ठिकाणी त्यांना जागा दिली. कुंभारडोह ह्या नावाने ते ठिकाण ओळखले जात होते.

समर्थांनी प्राप्त परिस्थितीत ती जागा घेण्याचेही मान्य केले आणि अशा अमंगल क्षेत्रामध्ये मंगल मूर्तींची स्थापना करविण्याचे ठरविले. अनेक झुडुपे आणि कळकाची बेटे यांनी ती जागा व्याप्त होती. इतकेच नव्हे तर त्या ठिकाणी अनेक दगडांवर शेंदूर थापून म्हसोबा आदि देवतांची स्थापना झालेली होती. मंदिरासाठी जागा साफसूफ करतांना वृक्ष झुडुपे या लोकांनी तोडली पण या

शेंदरी म्हसोबाना कोणी हात लावण्यास धजेना तेव्हा स्वत समर्थ पुढे झाले, आणि स्वत त्या सर्व शेंदरी दगडाना उचलून जवळच्याच डोहात त्याना समाधि दिली पण त्या ठिकाणचा एक म्हसोबा उठण्यास तयार होईना नियोजित मगल स्थानीच राहण्याचा त्याने हट्ट धरला त्याने स्वामींना विनति केली की, 'याच क्षेत्रात मला कुठे तरी जागा द्या कोणत्याही प्रकारचा त्रास मी देणार नाही.' स्वामींनी त्याचे ऐकून घेतले आणि समति देताना सांगितले की, 'तू आम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास द्यावयाचा नाही तसेच वार्षिक उत्सवाच्या वेळी पालखीवरून ओवाळून टाकलेला भात आणि अर्धाशेर तादूळ वर्षातून फक्त एकदाच तुझा भाग म्हणून तुला दिला जाईल यावरच तू सतुष्ट असले पाहिजे' असा त्याच्याबरोबर करार करून घेऊनच स्वामींनी त्याला एका कोपऱ्यात जागा दिली

समर्थांचे शिष्य आणि गावकरी याच्या सहकार्याने मदिर तयार होत होते छत्रपति शिवाजीमहाराजाना या बाधकामाचा सुगावा लागला आणि त्यानी स्वामींना द्रव्यसहाय्य करण्याचे ठरविले महाराजानी स्वामींना तसे कळविले देखील! परतु लोकाश्रयावरच ते मदिर उभारावयाचे असून ते तसे पुरे होईलच, या आत्मविश्वासावर स्वामींनी ती मदत आभारपूर्वक नाकारली मदिर तयार होत आले, पण मूर्ति कोठून येणार ह्याचा कोणालाच सुगावा नव्हता प्रत्यक्ष स्वामींनाही माहीत नव्हते कोणा मूर्तिकाराला त्यानी तसा आदेशही दिलेला नव्हता समर्थ नेहमी आपल्या ध्यानमूर्तीची आळवणी करून विचारीत, "रामा, माझ्या जिवलगा, केव्हा येणार! कोठून येणार! आम्हा सर्वांच्या नेत्रांचे पारणे केव्हा फेडणार!"

लवे नेत्रपातें स्फुरे आनि न्हाटे।
दिनानाथ हा राम येणार आहे॥

रात्रदिवस याच विवचनेत स्वामी समर्थ असत चिंतामग्न असताना त्यांच्या नेत्रातून सदा अश्रु ओघळत स्वामी आणि त्यांचा शिष्यवर्ग दुःखित होता

अशा परिस्थितीत कऱ्हाड येथून रगनाथस्वामींचे उत्सवाचे निमत्रण आले समर्थपचकातील हे स्वामी असल्याने स्वामी समर्थांनी जाण्याचे ठरविले सो उत्सव रगनाथस्वामींच्या समाधिस्थ पितामहांचा होता उत्सवाहून सज्जना गड परत येताना ते अगापुरच्या रानात शिवनामी डोंगराच्या स्वयभू स्थानी आले हे स्थान कृष्णा नदीच्या तीरावर वसले होते नदीकाठी स्वामी

स्नान करून ब्रह्मयज्ञ करीत असताना एकदम त्यांच्या कानी आवाज आला, " श्रीपरशुरामचंद्राची मूर्ति येथे या डोहात आहे, ती काढून घ्यावी. " स्वामींना परमानंद झाला. ज्याबद्दल त्याना सतत चिंता लागून राहिली होती ती प्रत्यक्ष रामप्रभूनीच दूर केली. स्वामी लगेच डोहात उतरले आणि मूर्तींचा शोध करून त्यानी ती वर काढली. आश्चर्य असे की, परशुरामचंद्राच्या मूर्तीबरोबर आदिशक्ति जगदंबेची मूर्तीही त्यांच्या हाती लागली. स्वामींनी दोन्ही मूर्ति आपल्या झोळीत टाकल्या आणि शिष्यगणासह ते मार्ग आक्रमू लागले.

ह्या वेळी अंगापूर गावातील काही गुराखी मुले तेथे उपस्थित होती. त्यानी हा सर्व प्रकार पाहिला आणि डोहातील मूर्ति कोणीतरी नेत असल्याची वार्ता त्यानी गावप्रमुखाना दिली. चांगल्या कार्यात विघ्ने ही येणारच ! परंतु कर्तबगार पुरुष त्या सर्व अडचणीवर मात करून आपले कार्य पुरे करीत असतो. आपल्या गावातील मूर्ति परगावी जात आहेत, हे गावकऱ्याना सहन झाले नाही. चरे-गावच्या सुखठाण्याच्या रस्त्यावर त्यानी स्वामींना गाठले आणि मूर्ति नेण्यास विरोध केला. या गावातच या मूर्तींची स्थापना केली जाईल असेही त्याना कळविले. गावातील मूर्ति गावातच राहिल्या पाहिजेत असा त्यांचा हट्ट होता. स्वामी समर्थ ही व्यक्ति कोण आहे आणि त्या व्यक्तीची पारलौकिक योग्यता काय आहे याची त्याना अजिबात कल्पनाच नव्हती. गावकऱ्यांचा आग्रह पाहून स्वामींनी मूर्ति झोळीतून बाहेर काढल्या आणि या आपल्याबरोबर येणे शक्य नाही अशी मनाची समजूत करून घेऊन, मूर्ति तेथे जमिनीवर ठेवून दिल्या. मूर्तींना एकदा मनःपूर्वक अभिवादन करून स्वामी चाफळला परतले.

गावकऱ्यानी पाचपन्नास माणसे जमविली, चारपाच गाडे सजवून आणले आणि मूर्तींची वाजतगाजत मिरवणूक काढण्याच्या इराद्याने त्या मूर्तींना उचलून गाड्यावर ठेवण्यास ते सज्ज झाले. पण मानवाच्या दुराग्रहीपणाला नेहमीच फळ येते असे नाही. देवाच्या मनातील अंतरस्थ हेतु काही निराळाच असतो, आणि प्रसंगोपात्तच तो उघडकीला येतो. गावकऱ्यानी त्या मूर्ति उचलण्याचा बराच प्रयत्न केला, पण सर्वांचे श्रम व्यर्थ गेले. ज्या मूर्ति झोळीतून जात होत्या त्या जागेवरून हलण्यासही तयार होईनात, इतक्या त्या जड झाल्या ! शेवटी त्यातील काही जाणत्या भाविकाना कळून चुकले की, ज्या अर्थी या मूर्ति हलत नाहीत त्या अर्थी त्याना आपल्या गावी यावयाचे नसावे, त्यांना स्वामींबरोबरच जावयाचे असावे. हा योग्य विचार सर्वानाही पटला. तावडतोब त्यानी चाफळला माणसे पाठवून मूर्ति नेण्यास गावकऱ्यांची काहीच हरकत नसल्याचे कळविले.

समर्थांच्या हृदयसरितेत पुन्हा आनंदोर्मी उसळल्या. प्रभु रामचंद्रांची इच्छा आपल्याकडे येण्याची आहे, हे समजल्यावर त्यांनी आपला शिष्य भानजी गोसावी याला तेथे पाठविले. भानजीबुवांनी पूर्ववत् मूर्ति उचलून त्या झोळीत घातल्या आणि ते चाफळला आले. मंदिरामध्ये मूर्तींची स्थापना झाली. रामप्रभूंच्या शेजारी आदिशक्तीची मूर्ति फक्त याच ठिकाणी पाहावयास मिळते.

हे मंदिर बांधण्यास शके १५६७ मध्ये सुरुवात झाली आणि पहिला उत्सव शके १५७० साली झाला. मंदिर पूर्वाभिमुख असून, पन्नास पायऱ्या चढून गेल्यानंतर सभागृहात प्रवेश करता येतो. त्या वेळी मंदिर बांधताना मंदिराचा खर्च सुमारे एक लाख रुपयांच्यावर झालेला आहे. त्या काळी बाळाजी माडवगणे या नावाचे एक प्रख्यात सावकार चाफळ प्रांती होते. त्यांचा बराच हातभार या उभारणीस लागला असे जुने जाणते लोक सांगतात ( दासायन, अनंत रामदासी, पृष्ठ २०४–२०९, सातारा जि. गॅ. पृ. ४६०. ).

काहींचे म्हणणे असे की, अंगणापूरच्या डोहात जी आदिशक्तीची मूर्ति समर्थांना सापडली ती त्यांनी सज्जनगडावर पहिल्या दरवाज्याच्या आतील बाजूस स्थानापन्न केली. त्या ठिकाणच्या मूर्तीचे स्वरूप काळा पाषाण, २ फूट उंच, चतुर्भुज आहे. या मूर्तीचे वैशिष्ट्य असे सांगितले जाते की, मूर्तीची मान किंचित् डावीकडे वळलेली आहे. याचे कारण असे देतात की, मूर्ति स्थानापन्न केली तेव्हा मान सरळ होती. पण एका समयी समर्थ रामदास प्रचारार्थ गडावरून खाली निघाले आणि जाताना लहान मुले जशी घरामध्ये आईची अनुज्ञा घेतात, तद्वतच त्यांनी या मातेला विचारणा केली. अनुमतीदर्शक म्हणून मातेने मान वाकडी केली, ती तशीच कायम राहिली आहे. या मूर्तीला आंग्लाईदेवी असे म्हणतात. अंगणापूरचा अपभ्रंश म्हणून आंग्लाई झालेला आहे.

( ह. भ. प. हरीभाऊ कऱ्हाडकर )

भुजंगप्रयात

चला चाफळीं वंदु या आदिशक्ती ।
घरीं शोभली राममूर्ती सवे ती ॥
स्वयें रामदासे असे स्थापियेली ।
महा गूढ डोहांतुनी आणियेली ॥

## (४) अंबाभवानी (अमरावती)

कुंडिणपूर ही विदर्भ देशाची प्राचीन राजधानी होय. भीष्मक राजा येथे राज्य करीत असताना त्याची कन्या रुक्मिणी हिचा भाऊ रुक्मी याने तिला शिशुपालाला द्यायचा बेत केला. पण रुक्मिणीची आंतरिक इच्छा तिचा विवाह द्वारकेचा राजा श्रीकृष्ण याजबरोबर व्हावा अशी होती. एका ब्राह्मणाहस्ते तिने आपला मनोदय श्रीकृष्णाला कळविला आणि कुलाचाराप्रमाणे ती गावाबाहेरील अंबेच्या मंदिरात पूजनाला आली असता, श्रीकृष्णानी तेथून तिला न्यावे अशी इच्छा तिने ब्राह्मणाकरवी पाठविलेल्या त्या निरोपात व्यक्त केली. श्रीमत् भागवत ग्रंथातील याबाबतचा श्लोक असा की, पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा । यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात् ॥ (१०-५३-४२) पूर्वनियोजितस्थळी श्रीकृष्ण आले. तेथे गांधर्वविधीने त्यांनी रुक्मिणीचे पाणिग्रहण केले आणि एका विवरमार्गे ते निघून गेले अथवा शत्रूबरोबर दोन हात करून सर्वांसमोर तिला घेऊन गेले अशी ही लौकिक कथा आहे.

सांप्रत हे अंबाभवानीचे मंदिर अमरावती शहरात आहे. बांधणी जुनी असली तरी आठशे वर्षांपूर्वीची नाही. त्यापूर्वी तेथे कशा प्रकारचे मंदिर होते, याची माहिती उपलब्ध नाही, पण मूर्ति मात्र प्राचीन घडणीची आहे. मूर्ति साधारणत: तांदळा स्वरूपाची असून, कमरेच्या वरील भाग फक्त दगडावर आहे. मंदिराभोवती २६ फूट उंचीचा जुना भव्य तट आहे. पूर्वभागी असलेल्या प्रवेश दरवाज्याला अंबा दरवाजा म्हणतात. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर सात आठ पायऱ्या चढून सभामंडप व गाभाऱ्याकडे जाता येते. मंडपाच्या परिसरात बालाजी, राधाकृष्ण, रामलक्ष्मण, सीता, जगदंबा, शिव पार्वती यांच्या मूर्ती आहेत. सभामंडप लाकडी खांबावरच आहे. मंदिराच्या भिंती महाभारतकालीन चित्रांनी सुशोभित केलेल्या आहेत. पहाटे सनई-चौघड्याने सुस्वर आवाजात देवीला जागे केले जाते आणि नंतर वेदपठण व मंत्रघोषाचे निनादात पंचामृती पूजन होते. साधारणपणे ९ वारी साडी देवीला नेसविण्यात येते. नवरात्रामध्ये देवीचे तेज फारच आकर्षक असते. मुद्रा क्रुद्ध आणि शरीरातून घाम सुटल्याचा आभास निर्माण होतो. अष्टमीच्या रात्री महिष बळी दिल्यावर देवीच्या मुखावर प्रसन्नता येते. त्या दिवशी रात्रभर दर्शनार्थी लोकांची रीघ लागलेली असते.

शास्त्रकार, अंबा आणि अंबिका यामध्ये थोडा फरक करतात. विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे अंबास्वरूप हे शुभ्रवर्ण, व हातामध्ये पाश, पान, पद्म असून चवथा हात अभय असतो. परंतु लक्ष्मणसमुच्चय तंत्राप्रमाणे ती सिंहवाहिनी

त्रिनेत्री, अनेक अलकार धारण केलेली, चतुर्भुज, हातामध्ये खड्ग, ढाल, आरसा ही आयुधे असून चवथा वरदहस्त असतो. अंबिकेचे वर्णन या ग्रंथात इतरत्र आलेले आहेच.

ह्या मंदिराच्या दक्षिण बाजूस एका ओढ्याच्या पलीकडे एकवीरा देवीचे प्रख्यात स्थान आहे. तिला अंबाभवानीची लहान बहीण मानतात. असे सागतात की, पूर्वी या ठिकाणी एका ऋषीचा आश्रम होता आणि तो ऋषी अंबा-भवानीला गोष्टी ऐकविण्यासाठी त्या ठिकाणी बोलवीत असे. विवरमार्गे देवी तेथे जाई, गोष्टी ऐके आणि ती परत स्वस्थानी येई. या गोष्टीची स्मृति म्हणून ओढ्यापलीकडे देवीची स्थापना झालेली असावी पण या देवीला एकवीरा हे नाव का पडले हे मात्र उलगडत नाही. या एकवीरा देवीला काही वेळा ‘मोठी देवी’ असे भक्त संबोधितात. त्याबद्दल दुसरी प्रचलित कथा अशी की, नाल्यापलीकडे पूर्वी कोणी जनार्दनस्वामी नावाचे अंबाभवानीचे भक्त रहात असत. नाल्याला एके वेळी भरपूर पूर आल्याने, त्याना दर्शनाला येता येईना, आणि मनाला या गोष्टीची खत वाटू लागली. तेव्हा देवीने दृष्टान्त दिली की, तेथे जवळच विहिरीमध्ये माझी प्रतिमा अशरूपाने आहे, वर काढून त्याची स्थापना कर त्याप्रमाणे स्वामिनी या ठिकाणी देवीची स्थापना केली.

अंबाभवानीच्या क्षेत्रापासून सुमारे २५ मैलावर पूर्वेच्या बाजूला कुंडिणपूर नावाचे गाव आहे. श्री दसराम महाराजाना हे गाव वसविण्याचा आदेश प्रत्यक्ष पांडुरंगाने, आपली एक मूर्ति देऊन दिला. त्याप्रमाणे गाव वसला मंदिर झाले आणि ती विठ्ठलमूर्ति वर्धानदीचे तीरावर विराजमान झाली यामुळे याला विदर्भाची पंढरी म्हणण्याचा प्रघात पडला आहे, जेष्ठ एकादशीला रुक्मिणीची पालखी पंढरपूरला जाते आणि आषाढी एकादशीस तेथे पोहोचते ही वारी नियमित चालू आहे. त्या ठिकाणी नदीकाठी भीष्मक राजाचे स्मृतिमंदिर आहे. यावरून असे अनुमान निघते की, मुख्य शहराचा विस्तार लाबवर पसरलेला असून अमरावती-पर्यंत त्या शहराची सीमा भिडलेली होती कारण कुलदेवतेचे मंदिर गावाबाहेर असल्याचा उल्लेख मिळतो. या व्यतिरिक्त पुराव्याचे दुसरे ठिकाण म्हणजे, भोजकट हे गाव होय. हे गाव अमरावतीच्या पश्चिमेस असून, रुक्मीने या गावापर्यंत श्रीकृष्णाचा पाठलाग केला तेथे दोघाचे तुंबळ युद्ध झाले. रुक्मिणीच्या विनती वरून श्रीकृष्णाने या ठिकाणी रुक्मीचे प्राण पाट काढले आणि त्याला सोडून दिले. भोजकट या गावाचे सध्याचे नाव भातुकली (?) असे आहे या ठिकाणी रुक्मीचे मंदिर असून ते जैन सांप्रदायी लोकाच्या ताब्यात आहे. सोमनाथ-पासून ४० मैल ईशान्येला असणाऱ्या माधवपूर गावी त्याचा विवाह झाला, असे सांगितले जाते

(श्री नरहरशास्त्री काहे, डोंबिवली)

वरील संबंधाने सर्वत्र असा संशय आहे की, कुंडिणपुराचे स्थान कोणते ! अनेक स्थाने भीष्मकराजाचे कुंडिणपूर हेच असा हक्क सांगतात.

( अ ) आर्वी ( वन्हाड ) पासून ६ मैलावर कुंडलपूर नावाचे गाव आहे. हे स्थान उंच नदीच्या तीरावर वसलेले आहे. त्या गावी उंच टेकडीवर प्राचीन अंबिका मंदिर आहे. मूर्ति अदाजे चार फूट उंचीची असून, गाभाऱ्याला एक खिडकी आहे. याच खिडकीतून श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले, अशी कथा येथे दर्शनार्थी लोकाना सागण्यात येते. या गावी इतरही सुमारे २५ मंदिरे आहेत.
( कल्याण शक्तिअंक १९५७, पृ. २३७ )

( आ ) जिल्हा अमरावती तालुका चादूर तहशीलमध्ये, वर्धा नदीच्या काठी कौंडिण्यपूर नावाचे गाव आहे. हीच भीष्मक राजाची राजधानी होय असे कित्येकाचे मत आहे पण संशोधनाअंती असे आढळून आले आहे की, या नगरीचे प्राचीन नाव देवळवाडा असे असून तो गाव जमिनीत गाडला गेला आहे.
( Geographical History of Ancient India by Nandlal Day )

( इ ) दक्षिण महाराष्ट्रात कुंडल ( जिल्हा सातारा ) म्हणून एक गाव आहे. त्यालाही तेथील लोक भीष्मक राजाची राजधानी मानतात. कोणी कोणी वंशावळी देतात. परंतु याला सबळ पुरावा मात्र देत नाहीत. शिवाय भौगोलिक दृष्ट्या विचार करता ' हेच ते कुंडिणपूर ' हे मनाला पटत नाही.

( ई ) ज्ञानकोशकार सागतात की, अमरावती हे दुसरे एक गाव जिल्हा गुंतुर यामध्ये आहे. वस्ती सुमारे तीन हजार असावी. या गावाचे प्राचीन नाव धरणीकोट असून पूर्वीच्या बौद्धपंथीय आंध्राधिपतीची राजधानी होती. त्या काळचा एक प्रेक्षणीय स्तूप येथे दृष्टीस पडतो. उंची फक्त १४ फूट असली तरी त्याचा व्यास १३८ फूट असून आतील गोलाचा परीघ ५२१ फूट, तर बाहेरील गोलाचा परिघ ८०३ फूट आहे. संगमरवरी विटाचे बांधकाम प्रेक्षणीय आहे. साप्रत हे ठिकाण पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या ताब्यात आहे.

( उ ) महाराष्ट्र साहित्य पत्रिका जुलै १९६२ या अंकात कवि नरेंद्राचा किंवर, यासंबंधी ना. व. जोशी यांनी एक लेख प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये रुक्मिणी विवाहाचा भाग आला आहे. त्यातील तुटक तुटक भाग मुद्दाम उद्धृत करीत आहे.

अेतुर्दी महादाइसिं पुसिले : जी जी श्रीकृष्ण चक्रवर्ती रुक्मीणीदेवीसि श्रवणी काळी प्रेम सचारलें : सर्वेंशे भणतले : निश्चरेसुरें श्रीकृष्ण चक्रवर्तीचा गुणनाम श्रवणी वेधु संचारला : तैसानि प्रेमा सचरू जाला : वैदर्भदेशी

कौंडण्यपूर नगरी : तेथ सोमवंशी भीमकुराजा : तआची सुधामती राणी : पाच पुत्र जालेआ नंतरे रुख्मीणी देवी जन्मली : शाता वर्सांपासौनि तीस वर्सेपर्यंत सुदेवा ब्राह्मणाजवळी विद्याभासु केला......दिंडत किन्नरासहित कल्याण कीर्ति: वैदर्भासी आला : रुख्मीणी पाहोनी संतोखला : हा किन्नर पक्षी पूर्विचा वेदघोष नामें ब्राह्मण बोलिला : रुख्मीणी श्री कृष्णासी अंबिकाभुवनी माळ घाल्लिल : मग किन्नरे रुख्मीणी देवीचा अनादरू जाणौनि : श्रीकृष्ण चक्रवर्तीते वाखाणिलें : ते रुख्मीणीदेवी अभिमुख होऊनी आदेरेंसि आइकिलें: गुणगान श्रवणीं श्रीकृष्णाचा वेधु संचरला : कृष्णाची माळ घातली : अरीकडे किन्नराने उपशापु भणितले आणि कवच किटलें :

यावरून कौंडिण्यपूर, रुख्मीणीचे शिक्षण, विवाहाचे वय व स्थळ यांवर भरपूर प्रकाश पडतो. (पृ. १९–२३)

वरीलप्रमाणे हक्क सांगण्याच्या विरुद्ध असलेला खालील उल्लेख पहा.

(अ) त्रिविक्रमभटविरचित नळचंपू काव्यात कुंडिणपूरचा उल्लेख आहे. तो असा,

स्वःसौन्दर्यविडम्बि कुण्डिनमिदं सैषा नदी ।
सा चेयं वरदा स चायमनस्तेः पुण्याम्भसोसंगमः ॥ ६-७२

विदर्भा व वरदा नदीच्या संगमावर वसलेले गाव हे कुंडिणपूर होय.

(आ) चेदी शिशुपालराजाला द्यावयाची भीष्मक कन्या रुक्मिणी श्रीकृष्णाने कुंडिणपूरच्या अंबा मंदिरातून नेली. (Imperial Gazettee V, 315).

(इ) अंधकवि गुलाबराय महाराज म्हणतात की, 'अमरावती हे ठिकाण मी पसंत केले. ह्याचे कारण, पूर्वी या शहराला श्रीकृष्ण भगवानाचे पाय लागलेले आहेत आणि ते शहर पवित्र झालेले आहे.'

(ई) संशोधक श्री. दा. न. शिखरे दिनांक २८–४–६० रोजी आकाशवाणीवरून माहिती देताना म्हणाले की, 'श्रीकृष्णाचे स्वयंवर अमरावती येथे झाले.'

(उ) गुजराथी कवि श्री. वल्लभ धोला आपल्या गर्बा काव्यात या गोष्टीचा उल्लेख करतात, तो पुढीलप्रमाणे,

नृप भीमकनी कुमारी तम पूजे पामिया ।
रुक्मीण रमण मुरारी, मन गमतो स्वामीया ॥

भीमकन्या रुक्मीणीने तुझे (अरासुरी अंबेचे) पूजन केले व इच्छित वर मिळविला (Dave, Immortal India, Page 115). यावरून एवढाच निष्कर्ष काढता येईल की, विदर्भातून द्वारकेला परत जाताना, वाटेत श्रीकृष्ण-रुक्मिणीने अरासुरी अंबेचे दर्शन घेतले आणि तिच्याच कृपेने पुढे द्वारकेमध्ये त्याचा शास्त्रोक्त विधी पार पडला।

(ऊ) अमरावतीपासून जवळच असलेल्या कौंडिण्यपूर गावी प्राचीन संस्कृतीचे अवशेष शोधण्यासाठी व भीष्मक राजाची राजधानी कोणती हे निश्चित करण्यासाठी, नागपूर विद्यापीठाने श्री. मा. गो. दीक्षित यांची नेमणूक केलेली आहे. (लोकसभा, मुंबई, दिनांक १४-५-१९६२)

या मंदिरातून रुक्मिणीहरणाचा भाग एकनाथ महाराजांनी एका विशिष्ट रीतीने रंगविलेला आहे. त्याचा सारांश असा की श्रीकृष्ण त्या शहरी आल्यावर, शिशुपालाप्रमाणेच, त्याचीही पाद्यपूजा केली आणि त्याची शहरातून मिरवणूक काढली. घराण्याचे विवाहाचे चालीरीतीप्रमाणे विवाहापूर्वी म्हणून ती अंबाभवानीचे दर्शनास गेली, पण दुतर्फा सैन्याचे पाहाऱ्यातून. देवीचे पूजन झाल्यावर, इच्छितवराचे दान मागितले तेव्हा देवीने प्रकट होऊन फुलाची माला तिचे हाती दिली. रुक्मीणीला साहजीकच आपल्या मनकामना पूर्ण होणार, या आनंदाने तिने दिव्य हास्य केले, पण त्याचा परिणाम असा झाला की, सर्व पाहरेकरी व सैन्य आपले देहमान विसरले, पाषाणाचे पुतळ्याप्रमाणे हालचालविरहित झाले. एवढ्यात श्रीकृष्ण तेथे आले. रुक्मिणीने पुष्पमाला त्याचे गळ्यात घातली, पण श्रीकृष्णाला सरळ दोन हात करून, जरूर तर शत्रूला नामोहरम करून तिला न्यावयाचे होते, चोरून न्यावयाचे नव्हते. यासाठी मनाप्रमाणे वर मिळाल्यावर रुक्मिणी आनंदातिशयाने पुन्हा एकदा हसली, आणि त्याचा परिणाम सैनिक शुद्धीवर येण्यात झाला. पण कोणीच श्रीकृष्णाला प्रतिकार केला नाही. इतर राजानींही आपली शक्ति पणास लावली नाही. एकटा रुक्मी श्रीकृष्णापुढे गेला, पण त्याचा टिकाव लागला नाही. रुक्मिणीकडून त्याने प्राणदान मिळविले. यामुळे चिरमार्गी रुक्मिणी नेली हा कथाभाग गौण ठरतो

वरील पुराव्यांची उलटसुलट छाननी करता असे दिसून येते की, अमरावती ही जरी प्रत्यक्ष कुंडिणपूर नगरी नसली तरी, अंबाभवानीचे मंदिर म्हणजेच त्या वेळी राजधानीच्या सीमेवर असलेले ठिकाण होय, यात संशय राहू नये. श्रीकृष्णकाळापासून हे स्थान अस्तित्वात आहे आणि आजही ते जागृत

आहे. श्रीकृष्णाच्या लग्नाबरोबर जे वऱ्हाड आले, ते तेथेच स्थाईक झाले, म्हणून त्या प्रांताचे नाव वऱ्हाड असे पडले आहे.

शिखरिणी

विदर्भी देशाते वसलि नगरी कुंडिणपुरी ।
सदा सौख्यानंदा मिळत जनतें भीष्मक करी ॥
तयाची हो कन्या स्मरण करिते रुक्मिण तुझे ।
विवाही शत्रु गे हरण करितो धांव झणि गे ॥ १ ॥
कुळस्वामिनी तूं शरण रिघतां संकटि तदा ।
निमित्ते पूजेच्या आणविसी तिला मंदिरिं तुझ्या ॥
वधूच्या संकेतें हरण करितो कृष्ण कन्हय्या ।
अशी भक्ताला तूं व्यसन समयीं दाविसी दया ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

ऐशा भीष्मकराज कुंडिणपुरां आम्हीं जइं भेटतो ।
काळाने अमरावती नगर हे नामांतरीं पाहतो ॥
अंबामूर्ति अजूनी तीच दिसते विस्तीर्णशा मंदिरा ।
गांधर्वा विधिनेहि नेइ वधु ही अंबेस त्या वंदु या ॥ ३ ॥

* * *

## (५) अंबेजोगाई

तीक्ष्णखड्गधरां तद्वद्ध्ये योगेश्वरीमिमाम् ।
दीर्घजिव्हा मूर्द्धकेशिमरिरा खड्गश्च मण्डिताम् ॥
दंष्ट्राकरालवदनां, कुर्यान्चैव कृशोदरीम् ॥ (शक्तिसंगम तंत्र)

वरील वर्णन योगेश्वरी देवीचे आहे. पुष्कळ वेळा असा संभ्रम पडतो की, योगेश्वरी हे नाव बरोबर आहे की, या नावाचा अपभ्रंश जो जोगेश्वरी म्हणून झाला आहे, तो बरोबर आहे ! या बाबतीत अधिक संशोधन करता असे आढळून आले की, जोगेश्वरी या नावाची समर्पक उत्पत्ति आढळून येत नाही आणि हे नाव कसे आणि कोणत्या कारणामुळे प्रचारात आले याचाही उलगडा होत नाही. उलटपक्षी योगेश्वरी या नावाची व्युत्पत्ति आढळते. ती अशी.

प्रल्हादानंतर त्याच्या कुळात अंधकासुर नावाचा महाप्रतापी राक्षस जन्मास आला. तपःसामर्थ्याच्या जोरावर त्याने त्रैलोक्य जिंकण्याच्या ईर्षेने मला,

विष्णु, महेश यांचरोबर युद्ध चालू केले. शंकरांनी वासुकी, तक्षक व धनंजया-सारखे तीक्ष्ण नाग आपल्या कमरेभोवती गुंडाळले. एवढ्यात नील राक्षसाने हत्तीचे रूप धारण करून, शंकरावर हल्ला चढविला. शंकरांचा सेनापति नंदी याच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर तो स्वतः सिंह बनला आणि त्या गजाला त्याने ठार केले. गजाचे कातडे शंकरांनी आपल्या अंगावर पांघरले. शंकरांनी आपल्या बाणाने अंधकासुराला जखमी केले. त्यानंतर त्यांनी आपला त्रिशूळ त्याच्या पोटात खुपसला आणि त्याला नाचावयास लाविले. विष्णूने आपल्या चक्राच्या साहाय्याने इतर सैन्याचा समाचार घेतला. अंधकासुराच्या जखमेतून खाली गळणाऱ्या प्रत्येक रक्तबिंदूपासून एक याप्रमाणे अनेक राक्षस उत्पन्न होऊ लागले.[१] तेव्हा ही वाढती संख्या रोखण्यासाठी शंकरांनी आणि इतर देवांनी आपल्या तेजाने एक शक्ति उत्पन्न केली आणि तिने ते रक्त पावचून पर्यायाने राक्षसांची उत्पत्तीही बंद केली. शिवाच्या तेजापासून निघालेली शक्ति म्हणून तिचे नाव योगेश्वरी असे पडले. योगेश्वरी ही आठवी मातृकाच समजली जाते.

(Hindu Iconography, by T. A. Gopinath Rao, page 136.)

लक्ष्मणसमुच्चय तंत्राप्रमाणे या देवीचे स्वरूप दशभुजा, त्रिनयना, उजव्या बाजूकडील हातात शक्ति, खड्ग, डमरू व डाव्या बाजूकडील हातात घंटा, खेटक, खट्वांग व त्रिशूळ ही आयुधे (बाकीच्या हातातील आयुधे दिलेली नाहीत) असे आहे. सुरुवातीला शक्तिसंगमतंत्रातील जो उतारा दिला आहे, त्या वर्णनात आणि वरील वर्णनात बराच फरक आहे हे दिसून येईलच.

महाराष्ट्रात योगेश्वरी तथा जोगेश्वरी या देवींची दोन पीठे आहेत. एक अंबेजोगाई (मराठवाडा) व दुसरे जोगेश्वरी (मुंबई) हे होय. अंबेजोगाई हे महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक मानले जाते. देवीच्या नावावरूनच गावाला नाव प्राप्त झाले आहे. निजामशाहीत या गावाचा कायापालट मोमिनाबाद या नावाने झालेला होता. पण पुन्हा पूर्वीचेच नाव चालू आहे. हे स्थान जीवंती नदीच्या काठी असून, नदी गावाच्या मधून वाहते. चालुक्य घराण्याचे वंशज पंचमजैन या देवीचे परमभक्त होते. शहराच्या एका कोटाच्या भागात या देवीचे मंदिर आहे. गाभारा खडकात कोरलेला असून सभामंडप साधारणतः ९० × ४५ फूट असून तो दगडातच कोरलेला आहे. कारण त्याला दगडी खांब दिसतात. या ठिकाणी सन १२४७ सालच्या सिंघण राजाच्या वेळेचा एक शिलालेख दिसून येतो.

(Imperial Gazetteer, V, page 275.)

---

१ टीप— मीन पुराणातही याप्रमाणे राक्षसांची उत्पत्ति आढळून येते.

योगेश्वरीमहात्म्य ग्रंथात या देवतेचा अवतार दंतासुर वधासाठी झाला असे वर्णिले आहे. असे जरी असले तरी दुसरी दंतकथा अशी की, परळी येथील वैजनाथाच्या मनात कोकणातील योगेश्वरीबरोबर विवाह करावा असे आले व त्याप्रमाणे विवाह ठरला. मुलीकडील वऱ्हाड अंबेजोगाई मार्गे परळीला जावयास निघाले. वाटेत ते जयंती नदीच्या काठी विश्रांतीसाठी उतरले असता, पहाटे देवी लवकर उठेना आणि त्यामुळे विवाहाची वेळ टळून गेली. देवीला हा विवाह पसंत नव्हता म्हणून तिला आनंद झाला आणि त्या भरात तिने जोगाई येथेच कायम रहावयाचे ठरविले. ही सबंध कथा सुसंबद्ध वाटत नाही. कोकणातील देवीचे स्थान कोणते ते दिलेले नाही. विवाह पसंत नव्हता तर वऱ्हाड कशासाठी निघाले? आणि वाटेत इतर मुक्कामात कोठेही नापसंतीदर्शक वर्तणूक न दाखविता, फक्त शेवटच्याच मुक्कामी ती का व्हावी, हे उलगडत नाही. ही कोकणस्थांची देवता आहे व ती कोकणातून आली आहे, याचा संबंध प्रस्थापित करण्यासाठीच ही दंतकथा असावी, हे ना. गो. चापेकरांचे मत बरोबर दिसते.

प्राचीन काळी येथील मंदिर तीन शिखराचे होते व नंतर त्याचा जीर्णोद्धार झालेला आहे असे यादवकालीन शिलालेखावरून समजते. सन १७२० च्या सुमारास मंदिराचा जीर्णोद्धार पुन्हा नागोजी त्रिमळ व श्यामजी बापूजी यांनी केला आणि तसे करताना बरीचशी जुनीच सामुग्री वापरली, असे जुन्या कला कुसरीवरून दिसून येते. सभामंडप व शिखर सुमारे १८०० च्या सुमारास बांधण्यात आले. मंदिरासमोरील ओवऱ्या ग्वाल्हेर संस्थानचे प्रधान दिनकरराव राजवाडे यांनी सुमारे १८८० च्या सुमारास बांधल्या. महाद्वारासमोरील कुंडाला सर्वतीर्थ हे नाव आहे.

गाभाऱ्यामध्ये देवीची मूर्ति तांदळा स्वरूपाची असून फक्त कमरेपासून वरील भागच दृगोचर आहे. या तांदळ्याला तोंड, नाक, डोळे आदि अवयव आहेत. मस्तकावर अगन्चा मुकुट कोरलेला आहे. अंधाऱ्या गाभाऱ्यात गोड्या तेलाचा दिवा तेवत असतो. त्या दिव्याच्या प्रकाशात जेवढे देवीचे दर्शन घडेल तेवढेच घ्यावे लागते. दर्शनाच्या वेळी मूर्ति सजविलेली असते आणि वस्त्रालंकारांनी ती आच्छादित असल्यामुळे तीचे अवयव दिसत नाहीत. श्रीयुत साठे नावाच्या एका कोकणस्थ गृहस्थानी या देवीची प्रतिमा म्हणून एक संगमरवरी पाषाणाची मूर्ति तयार करून घेऊन ती आपल्या जन्मगावी पिरंदवणे (रत्नागिरी) येथे स्थापन केली आहे. ही मूर्ति चतुर्भुज असून दोन हातात तलवारी आणि एका हातात अंकुश अशी आयुधे आहेत.

येथील मूर्तीची रूपरेषा निश्चितपणे कळावी म्हणून लेखकाने जेव्हा या क्षेत्राला भेट दिली, तेव्हा असे दिसून आले की, देवीचा तादळा गाभाऱ्यामध्ये चार फूट उंचीच्या चबुतऱ्यावर असून तो साधारणतः ॐकार स्वरूपाचा दिसतो ३ फूट उंच व २ फूट रुंदीचा असावा. अगचे दोन नेत्र व ल्हानसर मुख असून सांप्रत त्यावर उपनेत्र बसविलेले दिसले. भाळप्रदेशावर पिंपळपान शोभत होते. या तादळ्यावर शेंदूर घालण्याची प्रथा असल्याने त्यावर जाड पुट चढले असण्याचा निश्चितच संभव आहे काही भक्तांची अशी समजूत आहे की, शेंदराच्या आवरणाखाली देवीचे शरीराचे अवयव दृग्गोचर आहेत, पण मूर्तीचे बारकाईने निरीक्षण केल्यास यात सत्यांश भासत नाही. कारण तादळा शिरकमळाचाच भाग असावा असे वाटते. क्षेत्रोपाध्याय काशिनाथ यांनीही याच मताला दुजोरा दिला.

या देवतेची माहिती देणारा 'योगेश्वरी माहात्म्य' नावाचा संस्कृत ग्रंथ आहे, पण तो पाहावयास मिळाला नाही. डॉ. ल. शा. कोळगावकर यांनी मूळ ग्रंथाच्या आधारे 'मनोहर अंबानगरी' नावाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे आणि ते वाचले असता वरीलप्रमाणे मूर्तीची माहिती मिळालेली असून शहरातील इतर स्थानांचीही माहिती त्यात आढळते. जोगाई येथील किल्ल्यात एक योगेश्वरीचे स्थान आहे, पण तेथे मूर्ति मात्र नाही. मंदिराची बांधणी हेमाडपंती थाटाची असून शिखरही त्याच प्रकारचे आहे मूर्ति व मंदीर पूर्वाभिमुख असून दक्षिण-उत्तर दिशांना प्रवेश मार्ग आहेत. मुख्य सभागृहातून गेल्यावर सहाय्यक गाभाऱ्यातून, नंतर मुख्य गाभाऱ्यात प्रवेश करता येतो. मंदिराचे दगडी गाव शिल्पयुक्त आहेत.

अंबेजोगाई हे फार प्राचीन क्षेत्र आहे आणि याच शहरी दासोपंतांनी आपला ग्रंथ पचीकरण सन १५८८ च्या सुमारास लिहिला. त्याचे १६ वे वंशजाजवळ ही गोधडी आज आहे. तिची रुंदी ३ फूट असून लांबी सुमारे ४० फूट आहे. याच गोधडीवर काळ्या शाईने ग्रंथ लिहिलेला पाहता येतो. नकाशाप्रमाणे कापडाखाली अस्तर शिवले असल्याने ती गुंडाळून ठेवता येते हे एक उत्कृष्ट हस्तलिखित लेखकाला पाहावयास मिळाले.

जोगाई येथे बन्सीलाल मारवाड्याच्या बागेत एका दगडावर शिलालेख कोरलेला आहे. तो सर्व मजकूर ४७ ओळींचा असून त्याची मिति शके ११५० सर्वधारीनामसंवत्सर अशी आहे. यादव सिंघण घराण्याचा सेनापति खोलेश्वर याने आम्रपूर ( अंबे ) येथील सकलेश्वराच्या देवालयास दिलेली दाने या शिलालेखात वर्णिली आहेत. शिलालेखातील मजकुराचा हा एक नमुना पहा.

तदेव महाराष्ट्र भाषापात्र लिख्यते। आम्रदेशे लघुबाऊची नाम ग्रामोदत ॥ तथा आत्रे देसु केजदेसु। औंस देसु उदगिरी ॥

(मराठी संशोधन पत्रिका, जानेवारी १९६२ । २३–२४)

यावरून असे दिसून येईल की अंबेजोगाई या गावाचे पूर्वीचे नाव आम्रपूर असे होते कदाचित् भरपूर आमराई असल्यामुळे आम्रपूर हे नाव पडले असावे

विवेक सिंधु या प्रख्यात धर्मग्रंथाचा कर्ता कवि मुकुंदराज याचा जन्म बाराव्या शतकात या गावी झाला त्याची समाधि याच गावी आहे

(औरंगाबाद जिल्हा गॅझेट, पृष्ठ ३७२)

कोकणस्थ अगर चिपळोणे ब्राह्मणाची काही घराणी या देवीची उपासक आहेत आणि त्याची ती कुलस्वामीनीच आहे श्री ना गो चापेकर आपल्या 'चित्पावन' ग्रंथामध्ये म्हणतात की, 'कोकणस्थ लोक हे देशावरून कोकणात गेले' हे दर्शविण्यासाठी देवीचा संबंध कोकणस्थांबरोबर जोडलेला आहे पण वास्तविक तो बरोबर नाही

सोळाव्या शतकात या क्षेत्री काही ब्राह्मण बारा वर्षे अनुष्ठान करीत होते त्याच वेळी श्रीसमर्थ रामदासस्वामी आपले प्रचारकार्य करीत असता त्या ठिकाणी आले आणि तेही अनुष्ठानाला बसले काही वेळाने एक यवन फकीर घोड्यावर स्वार होऊन सोबत त्याची पत्नी, २ कुत्री आणि २०–२५ कोंबड्या अशा परिवारासह तेथे प्राप्त झाला दुपारची वेळ होती तेव्हा तेथे झाडाखाली त्यांनी आपला तळ ठोकला त्याच्या पत्नीने तेथे चूल पेटवून स्वयंपाकाची तयारी चालविली तिने चुलीवर एक भांडे ठेवले आणि आपल्या जवळचा शिधा ती त्यामध्ये घालू लागली पण ते भांडे काही भरेना तेव्हा पतीच्या आदेशानुसार तिने सर्व कोंबड्या चिरून त्यात घातल्या कुत्री देखील टाकली, पण तरीदेखील भांडे काही भरेना तिने पतीला विचारले, 'आता आतमध्ये काय घालू?' फकिराने मंदिरातील ब्राह्मणांकडे दृष्टिक्षेप टाकला आणि म्हणाला, 'या ब्राह्मणांना कापून टाक' हे शब्द ऐकताच अनुष्ठानाला बसलेल्या ब्राह्मणांची गाळणच उडाली आणि त्यांनी तेथून पळ काढला स्वामी समर्थ सर्व प्रकार बारकाईने पहातच होते अंतर्ज्ञानाने त्यांनी हा सर्व अद्भुत प्रकार जाणला आणि शांत चित्ताने आपल्या स्थानी बसून राहिले, त्यांची मान तोडण्यास फकिराची पत्नी पुढे सरसावली स्वामींनी न कचरता आपली मान पुढे केली तत्क्षणात फार मोठे आश्चर्य घडले! ती बाई आणि इतर सर्व परिवार गुप्त झाला आणि त्या फकिराच्या जागी गुरु दत्तात्रय स्वतः उभे

राहिले. स्वामींना त्यांनी दर्शन दिले, त्यांच्या कार्याला शुभाशीर्वाद दिला आणि नंतर ते अंतर्धान पावले. (श्री. शंकरराव देव, समर्थांचे चरित्र, भाग पहिला)

देवतेच्या या जागृतावस्थेचा असाच एक अनुभव रझाकार चळवळीच्या वेळी आला आणि तो तेथील एका रहिवाश्याने प्रस्तुत ग्रंथकाराला कथन केला. त्या वेळी निजामीत हिंदूंच्या अनेक देवस्थानांना त्रास झाला, पण हे क्षेत्र मात्र बचावले. या क्षेत्रावर हल्ला करण्याच्या इरादाने काही यवन आले होते, पण जवळपास येताच त्यांना असे काही भयानक दृश्य दिसले की, ते तानडतोब माघारीच पळत सुटले आणि देवस्थानावरील निकट प्रसंग टळला.

ओवी

महाराष्ट्रांतील एक । शक्तिचें प्रमुख पीठ ॥
अंबेजोगाई नामे देख । मराठवाड्यांत वसतसे ॥ १ ॥
पाषाणाच्या गाभाऱ्यात । तांदळारूप भव्यमूर्त ॥
कटोत्तर देहभाग देख । दृग्गोचर होतसे ॥ २ ॥
योगेश्वरी अंबामूर्ति । भव्य तांदळा शेंदूर चर्चितो ॥
नेत्रमुख गात्रांकृति । ऐशी देवि पाहावी ॥ ३ ॥
अनेकांची कुलस्वामिनी । विशेषत चित्तपावन ब्राह्मणी ॥
कोकणस्थ चिपळोणे घराणीं । या पीठाला मानिती ॥ ४ ॥
योगेश्वरीचा अपभ्रंश । जोगेश्वरी असे नि शेष ॥
म्हणोनी दोन्ही रूपास । वंदन माझे सदा असे ॥ ५ ॥

जोगेश्वरी (मुगवली–राजस्थान)

मुगवली रेल्वे-स्टेशनपासून काही अंतरावर चंदेरी नामक गावी जोगेश्वरीचे एक प्रसिद्ध मंदिर आहे. त्याचे शिल्प कौशल्यपूर्ण असून देवी जागृत आहे, असा भक्तांचा विश्वास आहे.

या देवतेसंबंधी अशी सत्यकथा प्रचलित आहे की, हजारो वर्षांपूर्वी महाराज कूर्म हे चंदेरीचे शासक होते. त्यांच्या सर्वांगावर कोड होते. जंगलात एकदा शिकार करीत असताना त्यांना अतिशय तहान लागली. ते पाण्याच्या शोधात असताना त्यांना एक निर्मळ पाण्याचे सरोवर आढळले. त्यातील पाणी पिऊन त्यांनी आपली तृषा शमविली. पण थोड्या वेळाने त्यांना असे दिसून आले की, आपल्या अंगावरील रोगाचे निर्मूलन होत आहे.

ते पुन्हा एकवार पाणी पिण्यासाठी त्या सरोवरावर आले आणि पाणी पिणार इतक्यात पाण्यातून एक बारा वर्षांची कुमारी वर आली. महाराज तिच्याजवळ जाताच ती अदृश्य झाली. ह्या अद्भुत प्रकाराचा महाराजांना काहीच उलगडा होईना. त्या विचारात त्यांनी तेथेच आपला रात्रीचा मुक्काम ठोकला. रात्री स्वप्नात त्यांना ती कुमारी पुन्हा दिसली आणि म्हणाली, 'शिशुपाळाने केलेल्या यज्ञस्थळी प्रकट व्हावे अशी माझी इच्छा आहे. तरी त्या ठिकाणी तू मंदिराची बांधणी कर. मात्र एक गोष्ट लक्षात ठेव की, मंदिर तयार झाल्यावर नऊ दिवस त्याचे दरवाजे तू बंद ठेव म्हणजे मला तेथे येण्यास सवड मिळेल.' (याच आशयाच्या कथा या ग्रंथात इतरत्र आढळतील.)

महाराज घरी परतले आणि मिळालेल्या वृत्तांतानुसार त्यांनी मंदिर उभारले. कुमारीच्या आज्ञेप्रमाणे दरवाजेही बंद केले. तीन दिवस गेल्यावर महाराजांना आपला संयम आवरता आला नाही. त्यांनी दरवाजे उघडले. त्या तीन दिवसांच्या कालावधीत देवीचे फक्त मुखच त्या ठिकाणी तयार झाले होते. बाकी देह मात्र खडकातच राहिला होता. त्यामुळे आता फक्त देवीचे मुखच त्या ठिकाणी पाहावयास मिळते. ते तेजस्वी मुखकमल पाहण्यासाठी दूरदूरचे भक्त मुद्दाम येत असतात. (श्री. सदानंद चेंदवणकर, नवशक्ति, मुंबई, दि. १५.१०.१९६१)

इतर अनेक ठिकाणी जोगेश्वरीची मंदिरे आढळून येतात.

(६) उग्रतारा

चतुर्भुजा त्रिनयना मुण्डमालाविभूषिताम् ।
श्यामवर्णा मुक्तकेशीं खड्गेन्दीवरधारिणीम् ॥
कपालकर्तृकाहस्ता वरदानपरायणाम् ।
ततो ध्यायेत परानुग्रा प्रत्यालीढपदस्थिताम् ॥
(शक्तिसंगम तंत्र, १५।११)

शाक्तपंथीय उग्रादेवीचे स्वरूप चतुर्भुजा, त्रिनेत्री, मुंडमाळा धारण करणारी, श्यामवर्णी, मुक्तकेशी, खड्ग, कपाल, चाकू, कमल धारण करणारी, भीति उत्पन्न करणारी आणि प्रत्यालीढ म्हणजे पायावर पाय टाकून बसलेली असे आहे. या स्वरूपास माझे वंदन असो.

महिषी (जि. भागलपूर) या गावी उग्रतारा देवीचे प्रख्यात मंदिर आहे. हे एक प्राचीन शक्तिपीठ मानले जाते. या ठिकाणी सतीचा डोळा पडला

म्हणून हे ५१ पीठाच्या यादीमध्ये येते. तारादेवीच्या मस्तकावर 'अक्षोभ्य' म्हणजे सदैव उभारलेला नागफणा असून तिच्यासमवेत या ठिकाणी श्री एकजटा आणि नीलसरस्वती यांच्याही मूर्ति यंत्रावर आहेत. या तीनही देवता या ठिकाणी कुमारी स्वरूपात आहेत. त्याशिवाय महिषासुरमर्दिनी, काली, त्रिपुर-सुंदरी यांच्याही मूर्ति आहेत.

पूर्वी या क्षेत्री मंदिर नव्हते. दरभंगा महाराणीने आपल्या पतीचा कुष्ठरोग बरा व्हावा, म्हणून ती या देवतेला शरण गेली मनोभावे देवीची सेवा केल्यावर काही काळाने खरोखरीच तिच्या पतीचा कुष्ठरोग बरा झाला. या ऋणविमोचनार्थ राणीने त्या ठिकाणी एक सुंदर मंदिर बांधले आणि एक तलाव खोदला. सध्या या क्षेत्राची परिस्थिति बरी नाही. एकेकाळी भूकंपाचा धक्का बसल्याने त्याला अवकळा प्राप्त झाली आहे. या स्थानापासून सुमारे तीस मैल दक्षिणेला कात्यायनी देवीचे मंदिर आहे आणि तेहि जागृतस्थान मानले जाते.

तान्त्रिकाचे म्हणणे असे की, या ठिकाणी ब्रह्मर्षि वसिष्ठ ऋषींनी द्वितीय महाविद्या तारादेवीची आराधना करून तिला प्रसन्न करून घेतले.

(कल्याण शक्तिअंक, १९३४।६६९)

या देवीचे दुसरेही स्वरूप वर्णिलेले आहे. योगतन्त्राप्रमाणे ही देवी कमलासनावर उभी असून त्रिनेत्रयुक्त देह फणीभूषणांनी सजविलेला आहे. लघुस्तवामध्ये सांगितले आहे की, ही देवी शवासनावर बसलेली आहे. या देवीच्या स्मरणाने तुफानामध्ये सापडलेल्या व्यक्तीची सोडवणूक होते आणि राक्षस-पिशाच भय नाहीसे होते.

पूर्व रेल्वेवर मसदुमपूर ह्या स्टेशनच्या गावी तारादेवीचे मंदिर आहे. मंदिरासमोर एक जलाशय आहे. अशी दंतकथा प्रचलित आहे की, ह्या ठिकाणी कश्यप ऋषींनी तप करून देवी प्रसन्न करून घेतली आणि नंतर तिची स्थापना केली. नवरात्रामध्ये या देवीची यात्रा भरते या ठिकाणी विष्णु आणि कुबेर यांच्याही मूर्ति आहेत. तारा आणि उग्रतारा या दोन्ही एकरूपच समजाव्यात.

(कल्याण क्षेत्रअंक, १९५७।१५९)

बौद्धधर्मपंथामध्ये या देवीला महत्त्वाचे स्थान आहे. आर्यधर्मीच्या ॐ काराला ते 'तार' असे म्हणतात, आणि या 'तार' चे स्त्रीलिंगी स्वरूप म्हणजे तारा होय ओंकाराची ती पत्नी होय. बौद्ध धर्मात या देवीविषयक एकूण ३३ ग्रंथ असल्याचे ऐकीवात आहे. तारारहस्य, तारातंत्र, तारातन्त्र इ० इ०

महायान पंथाची ही प्रमुख देवता होय. आर्यधर्मातील अर्धनारी-नटेश्वर रूपाप्रमाणे येथे तार-तारका यांचे युगुल दाखवितात.

विद्यार्णव तंत्राप्रमाणे तारादेवता आठ प्रकारच्या आहेत. तारा, उग्रा, महोग्रा, वज्रा, नीला, सरस्वती, कामेश्वरी व भद्रकाली. तारा देवीचे मूर्तिविधान म्हणजे कृष्णवर्णा, त्रिनयन, दोन्ही हातामध्ये कमळपुष्पे, रत्नालंकार धारण करणारी व पादत्राणयुत आहे.

यांच्या दुसऱ्या एका हरियान पंथाची मणिमेखला ही देवी होय. लंका, श्याम वगैरे देशामध्ये ती 'सामुद्रीदेवी' या स्वरूपात पूजिली जाते (मुंबईशहरी या देवीचे एक मंदिर आहे.) (कल्याण शक्तिअंक, १९३४/५४७).

दिंडी

भागलपूरी ते महिष नाम ग्राम ।
उग्रतारेचे स्थान पुरातन ।।
सती नेत्र वदे पडत या ठिकाणी ।
तान्त्रिकाचे हें पूज्य पीठ मानी ।। १ ।।
श्री एकजटा आणि देवि तारा ।
नील सरस्वती देखु यत्र द्वारा ।।
शिरी देविच्या अक्षोभ्य भयद घोर ।
उग्रतारेला असो नमस्कार ।। २ ।।

* * *

(७) कन्याकुमारी

ततस्तीरे समुद्रस्य कन्यातीर्थमुपस्पृशेत् ।
तत्तोयं स्पृश्य राजेन्द्र, सर्व पापै प्रमुच्यते ।।

काली देवीने एका कुमारीचे रूप घेतले, कारण त्या राक्षसाचे मरण कुमारीच्या हातून होते. कुमारीचे रूप घेतल्यावर ती प्रथम दक्षिण समुद्रावर तप करण्यास गेली. बंगालचा समुद्र, अरबी समुद्र आणि हिंदी महासागर यांचे मीलन या स्थळी होते. पूर्वेकडे बंगालच्या समुद्रामध्ये उगविलेला सूर्य, पश्चिमेकडे अरबी समुद्रात अस्तास गेलेला ज्या रम्य स्थानावरून पहाता येतो, अशा रमणीय ठिकाणी तिने तपश्चर्या करण्यास सुरवात केली.

त्रिमूर्ति देवाला ही बातमी समजली आणि त्याला असेहि समजले की, कुमारी अतिशय सुंदर आहे. त्याने त्या कुमारीला लग्नाची मागणी घातली आणि तिनेही ती मागणी मंजूर करून त्याचा स्वीकार केला. नारदांना ही बातमी समजली. हे लग्न जर झाले तर दैत्यांचा नाश कोण करणार, अशी त्यांना काळजी पडली. कुमारीचे कौमार्य नष्ट झाल्यास ती राक्षसांचा वध करूं शकणार नाही. यास्तव नारदांनी लग्नाला मोडता घालावयाचे ठरविले. प्रथम ते त्या कुमारीकडे आले आणि तिचे मन वळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण काही उपयोग होत नाही असे दिसतात ते तिला म्हणाले, "लग्न करावयाचे असेल तर तूं एखाद्या सामर्थ्यसंपन्न वराबरोबर तरी कर. त्यांने काही अलौकिक गुण दाखविल्याशिवाय त्याला होकार देऊ नकोस.' ते पुढे म्हणाले की, काही दुर्मिळ वस्तु त्याला आणावयास सांगा. उदाहरणार्थ, डोळ्याशिवाय नारळ, देठाविना आम्रफळ, डोळ्याविना उंसाचा तुकडा, मागील बाजूला शिरा नसलेले विड्याचे पान, फूल न फाटता उघडलेल्या फुलांच्या पाकळ्या, इत्यादि इत्यादि. आणि त्या आणल्यावर मगच त्या त्रिमूर्तीबरोबर विवाह कर. एवढेच नव्हे तर या वस्तु जमविण्यास त्याला फक्त एकाच दिवसाची मुदत दे.' त्या भोळ्या मुग्धेला या उपदेशामागील कपटनीति समजली नाही. तिने याप्रमाणे त्रिमूर्तीला अट घातली. त्याने विवाहाचा दिवस निश्चित केला आणि मुहूर्तापर्यंत ह्या पाचही वस्तु जमवून आणून देण्याचे आश्वासन तिला दिले.

इकडे कुमारीने विवाहाची सर्व तयारी केली. इतकेच नव्हे तर ती स्वतःही वधूचा पोशाख अंगावर घालून तयार झाली. नारद पाळतीवर होतेच. रात्री फार उशीरा पण दिलेल्या मुदतीच्या आत त्रिमूर्ति परत येत असताना नारदांना दिसला. त्यांनी लगेच दुसरी युक्ति योजली. कोंबडा आरवला म्हणजे रात्र संपली आणि उजाडले असे आपण मानतो. त्याप्रमाणे त्यांनी तोंडाने तसा आवाज काढला. तो ऐकताच मुदत संपल्याची त्रिमूर्तीला जाणीव झाली आणि आता कुमारी विवाह करणार नाही हे उमजून तो तेथूनच परत फिरला. अशा रीतीने नियोजित विवाह टळला.

इकडे कुमारीने रात्रभर वाट पाहिली आणि शेवटी त्रिमूर्ति येत नाही, त्याने आपणाला फसविले; अथवा अट पुरी करता आली नाही, म्हणून आला नाही, असे समजून विवाहाची सर्व तयारी तिने उधळून टाकली. हातामध्ये रत्नांनी भरलेली जी ताटे होती ती समुद्रात फेकून दिली. शिजविलेले अन्नादि सर्व पदार्थ सागरात फेकले आणि आपण स्वतः त्याच वधूच्या पोशाखात पुन्हा तपश्चर्या करू लागली. सांप्रत तेथील समुद्रामध्ये विविध रंगाची वाळू दिसून येते आणि त्यामध्ये यवोदकाच्या आकाराचे दाणेही असतात. त्यापैकी काही दाणे अर्धे तर काही पूर्ण स्वरूपाचे असतात, याचा उगम वरील कथेमध्ये मिळतो. ( Book of Pilgrimage by S Narsinha Pillay ( Tamil ), 1956, Nagar Coil )

ह्यापुढील कथाभाग असा आहे—बाणासुराच्या कानी देवीच्या अनुपम सौंदर्याचे वृत्त गेले आणि त्याने देवीला लग्नाची मागणी घातली. देवीने ती नाकारली. नंतर बाणासुराने चिडून जाऊन तिच्यावर हल्ला केला. दोघांचे तुंबळ युद्ध झाले आणि देवीने बाणासुराला ठार मारले. ह्याप्रमाणे देवीचे अवतारकार्य पूर्ण झाले. भक्तांची अशी भावना आहे की, त्या ठिकाणी जे त्रिमूर्ति स्थाणुरूपाने वास्तव्य करून आहेत, ते पुन्हा केव्हातरी प्रकट होतील आणि त्या दोघांचा विवाह घडून येईल. ते केव्हा प्रकट होतील ह्याचा भरवसा देता येत नसल्याने देवी नेहमी वधूच्या पोशाख पेहेरून सिद्ध असते. कदाचित् हा विवाह कलीयुगा-अंती होईल, असे काही काही भक्त मानतात. देवीचा उत्सव इतर शक्तिपीठा-प्रमाणे नवरात्रातच होतो. ( कल्याण क्षेत्रअंक, १९५७ | ३१२ )

दुसरी एक कथा थोडासा फरक करून पण स्थूलरूपाने वरीलप्रमाणेच आहे. बाणासुराने तप करून शंकरांना प्रसन्न करून घेतले. शंकरांनी त्याला अमर होण्याचा वर दिला. परंतु त्या वरामध्ये अट एवढीच होती की, जर एखादी कुमारी त्याच्याबरोबर लढली, तर ती त्याला ठार करू शकेल. पुढे बाणासुराच्या छळामुळे देव-दानव त्रस्त झाले. ते विष्णूला शरण गेले. विष्णूनी त्यांना सांगितले की, 'समस्त भूतलावरील यज्ञकर्म थांबले असल्यामुळे हे संकट आलेले आहे. तेव्हा तुम्ही एक प्रचंड यज्ञ करा म्हणजे त्यामधून एक कुमारी बाहेर येईल व ती बाणासुराचा वध करील.' देवांनी त्याप्रमाणे यज्ञ केला आणि यज्ञकुंडातून कुमारीचा जन्मही झाला. पण आदिशक्तीचा अंश असलेली ती कुमारी तप करण्यासाठी दक्षिण समुद्रावर निघून गेली. आदिशक्ति पार्वतीचाच तो अवतार असल्यामुळे शंकरांची तिला वारंवार आठवण येऊन तपामध्ये व्यत्यय येऊ लागला. इतकेच नव्हे तर त्या तपाचरणाचाही तिला कंटाळा येऊ लागला.

नारदांनी हे वृत्त कैलास पर्वतावर शंकरांना कळविले आणि कुमारीचे दुःख निवारण करण्याबद्दल त्यांची विनवणी केली. शंकरांनी दक्षिणसमुद्रावर येण्याचे मान्य केले आणि त्यासाठी निश्चित दिवस ठरविला. नारदांनी त्याप्रमाणे कुमारीला कळविले. विवाहाची संपूर्ण तयारी ठेवण्यास सांगितले.

आदेशाप्रमाणे विवाहाची सर्व तयारी झाली आणि शंकर कैलास पर्वतावरून मार्गक्रमण करते झाले. परंतु इतर देवांना शंकराचे हे कृत्य आवडले नाही. कारण विवाह झाला तर बाणासुराचा वध होणार नाही आणि त्याच्यापासून होत असलेला त्रास चुकणार नाही, हे त्यांना पूर्ण ठाऊक होते. याकरिता त्यांनी ब्रह्मदेवांना विवाहस्थळी पाठविले आणि त्वरित उपाययोजना करण्यास सांगितले. ब्रह्मदेव शंकरांच्या पाळतीवर होतेच. मुहूर्ततिथि टळली असे सूचित करण्यासाठी शंकरांना पाहताच त्यांनी तोंडाने कोंबडा आरवल्याचा आवाज काढला. इतका आटापीटा करून देखील आपण वेळेवर पोहोचू शकलो नाही ह्याबद्दल शंकरांना मनस्वी दुःख झाले, आणि ते तसेच आल्यापावली परत फिरले. कुमारी जी नववधूचा पोषाख घालून उभी होती, ती अजूनही तशीच उभी आहे. (मीनाक्षी-कन्या, पं. महादेवशास्त्री जोशी)

सतीच्या देहाचा पृष्ठभाग या ठिकाणी पडला, म्हणून याला शक्तिपीठ म्हणतात. या मंदिराच्या उत्तर बाजूच्या अग्रहारात भद्रकालीची मूर्ति असून, ती कन्याकुमारीची सखी मानली जाते. या क्षेत्रीचे अतिप्राचीन नाव गंगैकोंड चोलपूरम् असे होते.

भारताच्या दक्षिण टोकावर जसे कन्याकुमारीचे शक्तिपीठ आहे तसेच रामेश्वराचे प्रसिद्ध शिवपीठ आहे. लंकेवर स्वारी करण्यापूर्वी, युद्ध यशस्वी व्हावे यासाठी, प्रत्यक्ष श्रीरामप्रभूंनी या शिवलिंगाची स्थापना केलेली आहे, इतके ते प्राचीन आहे. पूर्वी ह्या स्थानाचे नाव गंधमादन असे होते. पण कलियुगाच्या प्रारंभी तो पर्वत पृथ्वीच्या पोटात अंतर्धान पावल्यामुळे आता त्याचे नाव रामेश्वर असे झाले आहे.

ह्या मंदिराचा विस्तार वीस बिघे जमिनीवर असून चहूबाजूंनी उंच भिंतींचा कोट आहे. पूर्व गोपूर १० माळ्यांचे असून पश्चिम गोपूर ७ माळ्यांचे आहे. या परिसरात एकूण २२ तीर्थे आहेत. श्वेतनदीची उंची १३ फूट तर लांबी-रुंदी ९ × ८ फूट आहे. रामेश्वराचे लिंग स्फटिकाचे आहे. येथे रामेश्वर आणि पार्वती यांची दोन निरनिराळी मंदिरे आहेत. चांदीने मढविलेल्या एक हात लांबी-रुंदीच्या शाळुंकेवर काळ्या पाषाणाची पिंडी ठेवतात आणि यांचेच

दर्शन बहुधा सर्वांना घडते. काशीहून आणलेली गंगा येथे वाहण्याचा प्रघात आहे. ह्या वेळी मूळ लिंगाजवळ एक शुभ्र हिऱ्याची पिंडी मांडतात.

रामेश्वराच्या दक्षिण बाजूला पार्वतीचे भव्य मंदिर आहे. तिला ह्या ठिकाणी **पर्वत-वर्धिनी** असे नामाभिधान आहे. याच परिसरात हिंदोळ्यावर पार्वतीची दुसरी एक लहान मूर्ति आहे. भक्तांची अशी श्रद्धा आहे की, दिवस-भराच्या श्रमाने थकलेले, रामेश्वररूपी शंकर रात्री शेजारच्या पार्वतीच्या देवालयात–शयनगृहात–विश्रांतीसाठी येतात. म्हणजे त्यांची मूर्ति तेथे आणली जाते. शेजघरात सुवर्ण हिंदोळ्यावर दोन्ही मूर्ति एकत्र ठेवतात आणि त्यांची आरती केली जाते. ह्या वेळचा तेथील दर्शनसोहळा म्हणजे साक्षात् कैलास-दर्शनच होय असे भाविक मानतात. प्रातःकाळी रामेश्वराची मूर्ति पुन्हा पूर्व-स्थळी आणली जाते. पार्वती मंदिराशिवाय ह्या ठिकाणी दुर्गा, महाकाली, महालक्ष्मी या देवतांचीही मंदिरे आहेत. पति-पत्नींची एकत्र स्थापना आणि दिनचर्या फक्त ह्याच ठिकाणी पाहावयास मिळते. (कल्याण क्षेत्र अंक, १९५७|३७७, आणि माऊली पुणे, ऑगस्ट १९५०)

ललिता कल्ट या ग्रंथात व्ही. आर. रामचंद्रन् दीक्षितार म्हणतात की, गायित्रीदेवीच्या पाच प्रकारापैकी दुर्गा गायित्री ही कात्यायनी ऋषींची पत्नी असून, तिलाच कन्याकुमारी म्हणतात. या देवीचा मंत्र असा आहे, कात्यायनाय विद्महे, कन्याकुमारी च धीमहि । तन्नो दुर्गिः प्रचोदयात् ॥ (पृ. ४८).

पृथ्वी

मुखासुर नि बाण तो छळितसे प्रजेला जधीं ।
शिवास जन प्रार्थितां वदत कालिके तूं वधीं ॥
स्वयंभु वच मानुनी त्वरित ती कुमारी बने ।
वधास्तवहि पातली परि कशी विवाहीं रमे ॥ १ ॥
तुझी कुव्यकथा कुणी वदती देवते संप्रती ।
त्रिमूर्ति तुज देखतां तवहि ध्यास घेतो अती ॥
सजे नवरदेव नारद तयांसि सांगे पण ।
अर्धा त्वरित पांच वस्तु मिळवा कुमारी पण ॥ २ ॥
असाध्य-प्रिय-वस्तु साध्य घडतांचि रात्रींत ही ।
वरील तुज नोवरी ग्रथित आज रात्रींच ही ॥

मुहूर्त ममया उभी सजुनि रत्न-ताटें करी ।
सुवर्ण घटि वाट पाहत वधू घडीने घडी ॥ ३ ॥
बहू श्रमुनि वस्तु घेऊनि त्रिमूर्ति तो येतसे ।
तयास दचकोनि नारद मु-युक्ति योजितसे ॥
करीत स्वर कुक्कुटासम पहाट तो दावितो ।
सुरासुर वधास्तवें तर विवाह कीं टाळितो ॥ ४ ॥
विवाह वचनीं उभी सतत देवि तूं भाससी ।
मु-वेळ टळतां स्वयें उधळी रत्न ताटे दिशीं ॥
जलाब्धि-तळीं-नीकतां विविध आज रंगातही ।
मिळे रचित साक्ष, चंदन कुमारि कन्येसही ॥ ५ ॥
जलाब्धि-तळिं लोटिले मग सु-पक्व अन्नादिकें ।
अजी गवसते स्वरूपिं सिकितेंत त्रिह्यादिकें ॥
सु-रम्य बहु क्षेत्र दर्शन विना नसे पूर्णता ।
जर्धी कुणि कधीं फिरे, पुनित काशीयात्रेत त्या ॥ ६ ॥

शिखरिणी

कथा कोणी सांगे दुसरिं तव कन्ये नवनवी ।
पहा बाणासूरे तप करुनि शंभूस लववी ॥
वराते शंभू दे, अमर-पद लाभो अरिपुढे ।
परी मृत्यू येई, तुजसह कुमारी जरि लढे ॥ ७ ॥
घर-प्रार्थनेही असुर मद स्फुल्लिंग भडके ।
नसे त्राता देवां जगति बनवी त्यांसि मुडके ॥
तया सांगे विष्णू त्वरित तुम्हि यज्ञा जरि करा ।
कुमारी जन्मा ये वध करिल बाणासुर बरा ॥ ८ ॥
पुढे यज्ञीं आली शिवसत्ति स्वरूपे जरि वरी ।
विनालंबे गेली तपहि करण्या सागरतिरीं ॥
परी ती कंटाळे, विरहपण साहूं नच शके ।
सदा दृष्टीं भासे शिव करित पाणीग्रहणसे ॥ ९ ॥
सुरांचा तो हेर कथन शिव-कानीं करितसे ।
स्वयम् शांत-श्वासे शिवसाति शिवा रे श्रमतसे ॥

मुहूर्तों मी येतो वचन तुज देतों सुरवरां।
तयारी राहूं दे, कळवि तिज सारें करि त्वरां ॥ १० ॥
अती आटापीटें वधु पटपटां थाट पटवी।
स्वचित्ता शांतीनें शमवि स्मरुनि ती शुभघडी ॥
निघे शंभू वेळीं सु-घडि स्वनि कुक्कुट विघडी।
विरंची हा मोडी अवघड वधूची वर-घडी ॥ ११ ॥

* * *

## (८) कमला

कान्त्या काञ्चनसन्निभां हिमगिरिप्रख्यैश्चतुर्भिर्गजैः।
हस्तोत्क्षिप्तहिरण्मयामृतघटैरासिच्यमानां श्रियम् ॥
बिभ्राणां वरमब्जयुग्ममभयं हस्तैः किरीटोज्ज्वलाम्।
क्षौमाबद्धनितम्बबिम्बललितां वन्देऽरविन्दस्थिताम् ॥

ही देवता म्हणजे लक्ष्मीचेच एक स्वरूप आहे. कित्येकदा गजलक्ष्मी आणि कमला ह्यांच्या स्वरूपात साम्य आढळते. पण त्या दोन देवता निरनिराळ्या आहेत. कमळावर बसलेली, चतुर्भुज वरील दोन हातात कमळे धारण केलेली, दोन हत्ती आपल्या सोंडेमध्ये सुवर्णाचे घट घरून देवीला अभिषेक करीत आहेत, जिचे सुवर्णकांतियुक्त वदन शोभते आहे, असे ह्या देवीचे स्वरूप आहे. शक्तिपीठाच्या यादीमध्ये या देवतेच्या नावाचे एकही स्थान नाही, कारण ही देवी म्हणजे पार्वतीच्या अंशापैकी नव्हे. दशमहाविद्या म्हणून तांत्रिकांच्या ज्या देवता आहेत, त्यामध्ये सुंदरीचे रूप म्हणजे कमलादेवी होय असे म्हणतात.

ह्या देवीच्या नावाचे प्राचीन पीठ जरी नसले तरी या विसाव्या शतकात ते कानपूर येथे तयार होत आहे हे शहर इतिहासप्रसिद्धच आहे. साम्प्रत त्या शहरी पद्मपत व कमळपत सिंघाणिया या नावाचे दोन धनाढ्य व्यापारी रहात आहेत. त्यानी गोमती भागात या देवीचे प्रचंड शक्तिपीठ निर्माण केले आहे. सुमारे अर्धा मैल घेराच्या जागेवर हे स्थान वसले असून मुख्य मंदिर २००×१०० फुटाचे असावे. मंदिराचे सर्व काम कोटा येथील या वधूच्या मालकीच्या खगम रवरी दगडाच्या खाणीतून आणलेल्या शुभ्र दगडाचे होत आहे. कानपूर शहरी स्वतःच्याच कारखान्यात मंदिराला सोयिस्कर असा दगड लोखंडाच्या करवतीने कापून घेतल्यावर, सुदाम कुशल शिल्पकाराकडून त्यावर शिल्पाचा आराखडा तयार केला जातो आणि कारागीर नंतर त्यावर खोदकाम करतात. असे शिल्पाचे पाषाण तयार झाले, म्हणजे ते भिंतीला अगर छताला बसविण्यात येतात. याप्रमाणे

अनेक पौराणिक देखावे बनविण्याचे काम चालूच आहे. श्रीमान् शेट पद्मपत स्वतः दररोज सकाळी त्या ठिकाणी जातात आणि कामाची पाहणी करतात. आजवर तीस लाखाच्यावर खर्च आला असावा.

मंदिराच्या गाभाऱ्यात कमलादेवीची स्थापना केली असून, मूर्ति शुभ्र संगमरवरी पाषाणाची, चतुर्भुज आणि चार फूट उंचीची आहे. याशिवाय त्या ठिकाणी राधाकृष्ण, हनुमान यांच्या मूर्ति असून, एक शिवलिंगही आहे. अबूच्या पहाडावरील दिल्वारा मंदिरे अगर आग्रा येथे दयाळबाग भागात तयार होत असलेले राधास्वामीचे मंदिर ( सन १९१० पासून ) या धर्तीवर येथेही शिल्पकाम चालू आहे. तेव्हा संपूर्ण मंदिर तयार झाल्यावर ते एक विख्यात प्रेक्षणीय शक्तिपीठ होईल, यात शंका नाही. ( निवेदक, श्री. जे. डी. मुजुमदार, इंजिनीअर, कानपूर ).

संगमरवरी दगडावरील शिल्पकाम कसे चालते हे स्वतः लेखकाने आग्रा येथील दयाळबागेत पाहिलेले आहे. सन १९५६ साली तेथे एक शिल्पकार सहा फूट लांबीच्या संगमरवरी दगडावर घड आणि पाने यांनी युक्त अशी द्राक्षाची वेल आणि तिच्याच बाजूला एक कणसासहित बाजरीचे झाड कोरीत बसला होता. त्याला विचारले असता तो म्हणाला की, अडीच वर्षे सतत तो त्या दगडावर काम करीत आहे आणि ते काम त्याच्या हातून पूर्ण होण्यास आणखी काही महिने लागतील त्याची रोजची मजुरी तीन-चार रुपये होती. ह्यावरून असे शिल्प बनविण्यास काय खर्च होत असेल ह्याची वाचकानाच कल्पना करता येईल.

## ( ९ ) कात्यायनी

ह्या देवीच्या अनेक उत्पत्तिकथा आहेत. आपण त्यापैकी एकदोन पाहू. महिषासुर वधाच्या वेळी सर्वप्रथम देवांचा पराभव झाला. ते अतिशय खिन्न झाले. यावेळी अशा प्रसंगी कात्यायनमुनींना ही बातमी समजली. त्यांनी सर्व देवांना आपल्या आश्रमात बोलाविले, त्यांचे सर्वांचे तेजसामर्थ्य एकत्र केले आणि त्यात आपल्या तपश्चर्येचे तेज मिसळून त्यांनी एक देवी, दैत्यवध करण्याकरिता उत्पन्न केली त्या देवतेचे नाव कात्यायनी ठेवले गेले. कारण तिला कात्यायनमुनींनी उत्पन्न केली. या देवीचे स्वरूप दशभुजा दुर्गादेवीसारखेच आहे आणि या देवीचे वाहन सिंह हे आहे.

या देवीची मूर्ति त्रिनेत्र, चतुर्भुज, शख-चक्र-खड्ग-त्रिशूळ धारण करणारी. सिंहवाहिनी असावी, असे विद्यार्णव तंत्रामध्ये सांगितले आहे. ती महिषासुराला मारतेवेळी दशभुजा व सिंहारूढा असावी, असे मत्स्यपुराण सांगते. या देवीची प्रार्थना खालीलप्रमाणे,

एतत्ते वदनं सौम्यं लोचनत्रयभूषितम् ।
पातु नः सर्वभूतेभ्यः कात्यायनि नमोऽस्तुते ॥ (मार्कंडेय पु., ९१-२३)

हे कात्यादेवी तीन नेत्रांनी भूषित असलेले तुझे मुख सौम्य आहे. आम्ही तुला वंदन करतो. तूं सर्व भूतमात्रापासून आमचे रक्षण कर.

महिषासुराचा शोध घेत घेत कात्यायनी देवी विंध्याचल पर्वतावर आली, तशी अष्टभुजाही विंध्याचल पर्वतावर आली, स्थाईक झाली आणि विंध्यवासिनी नाम पावली. दुर्गादेवी विंध्यपर्वतावरच तपासाठी आली आणि तिने दुर्गम राक्षसाचा वध केला. या कथावरून एक अनुमान करता येते, की उत्तर भारता-मधून जेव्हा आर्य खाली दक्षिण भारतामध्ये प्रसरणकाळी सरकले, तेव्हाच पूर्वीच्या अनार्यांबरोबर त्यांना संग्राम करावे लागले. त्या वेळी शक्तिदेवतेची गरज जास्त भासली. याच सुमारास अनेक शक्तिदेवतांची निर्मितीही झाली असली पाहिजे. चंडमुंड हे सुद्धा विंध्याचलाच्या दक्षिण बाजूलाच राहणारे अनार्य वंशज होत. हा काळ निश्चितपणे कोणता, हे जर सांगता आले, तर अनेक देवतांच्या उत्पत्तीचा काळ निश्चितपणे समजू शकेल. या दृष्टिकोनातून संशोधन व्हावयास पाहिजे.

या देवीचे नाव पहिल्या चार शक्तिपीठामध्ये समाविष्ट झालेले आहे. उडियान, कामागिरी, कामाख्या व जालंदर ही जी पहिली शक्तिपीठे आहेत, त्यापैकी उडियान या ठिकाणी कात्यायनी देवीची स्थापना केलेली होती. त्या वेळी उडियान येथे स्वतंत्र राज्य होते आणि तेथे इंद्रभूति नावाचा राजा राज्य करीत होता. हा काळ महाभारतानंतरचा आणि बौद्धकाळाच्या दरम्यानचा असावा. कालांतराने हा भाग यवनांच्या सत्तेखाली गेला आणि हे पीठ नष्टप्राय झाले.

५१ शक्तिपीठाची जी यादी दिलेली आहे, त्यामध्ये या देवीला स्थान आहे. वृन्दावन अथवा केसजाल ह्या पीठामध्ये सतीचा केशकलाप पडला आणि म्हणून याला केसजाल हे नाव प्राप्त झाले. या ठिकाणचा भैरव म्हणून भूतेश अगर कृष्णनाथ आहे.

दुसरी एक उत्पत्ति आढळते. ती अशी की, महिषासुर दैत्याने सर्व भूतलावर आपली सत्ता प्रस्थापित केली. इतकेच नव्हे तर त्याने इंद्राचे इंद्रपदही हिरावून घेतले. नारदमुनींनी हे वृत्त कार्तिकस्वामींना सांगितले. स्वामींनी आपल्या तेजाने एक स्त्री निर्माण केली आणि तिला महिषासुराचे निर्दालन करण्यास सांगितले. कार्तिकस्वामींनी तिला उत्पन्न केली म्हणून तिचे नाव

कात्यायनी असे पडले. आपल्या वाहनावर बसून राक्षसाचा शोध करीत ती विंध्याचल पर्वतावर गेली. त्या ठिकाणी देवी व दैत्य यांचे घनघोर युद्ध झाले आणि देवीने दैत्याचा पराभव केला. ज्या ठिकाणी हे युद्ध झाले, ती समरभूमि ' कात्यायनीतीर्थ ' या नावाने प्रसिद्ध आहे.

स्रग्धरा

देवांना जिंकुनिया महिष असुर तो जाहला फार मत्त ।
ऐकोनी वृत्त कात्यायनमुनि तदा मानसीं दुःखी होत ॥
देवांची दिव्य तेजे जमवुनि समुहीं आपुलें तेज वाही ।
आश्चर्या वर्तिले हो त्वरित उगम घे देवि कात्यायनीही ॥ १ ॥

वसंततिलक

कात्यायनी तुज असे हरि वाहनातें ।
खड्गासवें कमळ-पुष्प चतुर्भुजातें ॥
तें स्निग्धहास्य शशिचें चिळसे मुखातें ।
चिंता हरि नमित मीं तुझिया पदातें ॥ २ ॥

* * *

(१०) कामाख्या

कामाख्या परमं तीर्थं, कामाख्या परमं तपः ।
कामाख्या परमो धर्मः, कामाख्या परमा गतिः ॥ १ ॥
तत्र गत्वा महापीठे, स्नात्वा लौहित्यवारिणि ।
ब्रह्महापि नरः सद्यो मुच्यते भवबंधनात् ॥ २ ॥
(देवीपुराण, १२–३२)

कामाख्या क्षेत्र प्रत्यक्ष धर्मस्थान असल्याने ते उत्तम गति देणारे व मोक्षदायक आहे. देवीच्या लाल पाण्यामध्ये एकदा स्नान केल्याने प्रत्यक्ष ब्रह्महत्येचे पातकही जळून जाते. या ठिकाणी भगवतीचा नित्य निवास असतो अशी भाविकांची श्रद्धा आहे.

शाक्तपंथामध्ये योनिपूजा ही सर्वश्रेष्ठ मानली असल्यामुळे हे पीठ शाक्त-पंथीय लोकांचे केंद्रस्थानच आहे. योनिपूजेचे महत्त्व पहा.

योनि साक्षात् भगवती, लिंग साक्षात् महेश्वर ।
तयोत्सुपूजनेन स्यात्, सर्वदेवतपूजनम ॥ १ ॥
(बृहद्धर्मसूत्र, २-१-३८)

भगरूपजगन्माता, सृष्टिस्थितिलयान्विता ।
दशविद्या स्वरूपात्मा, योनिर्मां पातु सर्वदा ॥ २ ॥
(योनिसूत्र)

शंकराच्या तप साधनेत कामदेवाने व्यत्यय आणला म्हणून त्यानी आपल्या तृतीय नेत्रानी कामदेवाला जाळून भस्मसात् केले. पुढे काही काळाने शिव पार्वती विवाहाच्या वेळी तो मंगल प्रसंग जाणून कामदेवाची पत्नी रति हिने मृत पतीची रक्षा शंकरापुढे ठेवून कृपावरदान देण्याची प्रार्थना केली त्या वेळी भोलानाथ प्रसन्न झाले आणि आपल्या अमृतमय दृष्टीने त्या रक्षेकडे पाहताच, कामदेव जिवंत झाला, पण त्याला पूर्वीचे दिव्य तेज प्राप्त झाले नाही ते तेज प्राप्त होण्याचा उपाय म्हणून शंकरानी त्याला मार्ग दाखविला की, पूर्वेला निलाचल पर्वतावर, ५१ पीठापैकी अद्याप एक पीठ गुप्त आहे, ते शोधून त्यावर मंदिर बांधल्यास तुला पूर्वतेज प्राप्त होईल कामदेव तात्डतोब त्या उद्योगाला लागला आणि जागा सापडल्यावर विश्वकर्म्याच्या सहाय्याने त्याने मंदिर उभारले मंदिराकृति पूर्ण होताच, शंकराच्या वराप्रमाणे त्याला पूर्वतेज प्राप्त झाले काम-देवाला पूर्व स्वरूप या ठिकाणी प्राप्त झाले वास्तवचच की काय या देशाला कामरूप असे नामाभिधान प्राप्त झालेले आहे.

तत्र रूप यत प्राप कामरूप ततोऽभवत् ॥
(कालिका पु, ५१-६७)

असाही एक प्रवाद आहे की, शंकर पार्वती कामतृप्तीसाठी या देशात येत असत म्हणून या देशाला कामरूप असे नाव प्राप्त झाले. दक्ष यज्ञामध्ये सतीने जाळून घेतल्यावर सुदर्शन चक्राने तिच्या देहाचे जे तुकडे झाले त्यापैकी योनिभाग या ठिकाणी पडला, म्हणून येथील देवीचे स्वरूप योनिरूप आहे. येथील मूर्तीची स्थापना केव्हा झाली याची माहिती उपलब्ध झालेली नाही, पण हजारो वर्षांचा काळ त्याला लोटला असला पाहिजे. राम अवतारापूर्वी ही देवी ह्या ठिकाणी होती असे नरकासुर आख्यानावरून दिसते

अंतराळामधून प्रवास करताना गौहत्तीजवळ पांढुरक्या वर्तुळाने वेढीव असे घनदाट ठिकाण दिसते. या उचवटयाला नीलाचलपर्वत असे नाव आहे. टेकडीच्या

पायथ्याशी गामाख्या रेल्वेस्थानक आहे. मंदिराकडे जाण्यासाठी सुमारे पाच मैल अंतर तोडावे लागते. भाविक लोक हे अंतर पायी तोडतात. प्रवासी व इतर दर्शनार्थी लोक लहानलहान टेकड्यावरील गर्द झाडींच्या मार्गाने मोटार वाहनांतून प्रवास करतात. मोटारीतून उतरल्यावर बाजारपेठ लागते. पूजासाहित्य तेथेच खरेदी करावे लागते.

दर्शनास जाण्यापूर्वी प्रवेश द्वारावर गटागटाने माणसे आत घेण्याची पद्धत असते. तत्पूर्वी तेथील तलावात हातपाय धुवावे लागतात. प्रवेशद्वारातून सुमारे २० फूट खोल खाली पायऱ्या उतरल्यावर कोरीवलेण्यांच्या स्वरूपात असलेल्या देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश होतो. अत्याधुनिक विजेचे पंखे व दिवे तेथे असले तरी अरुंद जागेमुळे आणि माणसांच्या दाटीमुळे जीव गुदमरून जातो आणि केव्हा एकदा दर्शन घेऊन बाहेर जातो, असे प्रत्येकाला वाटत असते. गाभाऱ्यात इतर अनेक देवतांच्याही मूर्ति आहेत. (श्री. श्रीनिवास देसाई, स्क्वॉड्रन लीडर ऑफिसर)

गुहेच्या प्रवेशद्वारी कामाख्या देवीच्या उत्सवमूर्तीचे दर्शन घडते, तिला कामेश्वरी असेही म्हणतात. मूळ स्वरूप आणि उत्सवमूर्ति अगदी भिन्न आहेत. भक्तांची अशी श्रद्धा आहे की, या ठिकाणी सिंहरूपाने विष्णु, शिवरूपाने शिव आणि पद्मरूपाने ब्रह्मा यांवर कामाख्या देवी अधिष्ठित आहे. तिला द्वादश हात असून षडामुखे, १८ नेत्र असे तिचे स्वरूप अष्टधातुनिर्मित दीड फुटाच्या उंचीच्या मूर्तीमध्ये रेखाटलेले आहे. या मूर्तीच्या दक्षिण बाजूला अष्टधातूची पंचमुखी व दहा हाताची वृषभारूढ शिवाची मूर्ति आहे. मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतरच गुहेमध्ये प्रवेश करून मूळ स्थानाचे दर्शन घेण्यात येते.

आसामप्रांतीय संशोधक डॉ. काकती यांनी या क्षेत्राची माहिती देणारा 'Mother Goddess Kamakhya' नावाचा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यांचे म्हणणे असे की, देवीचे मूळस्वरूप योनीरूप आहे. या देवीने पुढे अवतारकार्यासाठी अनेक रूपे घेतली आणि त्यापैकी तीक्ष्णकांता व ललितकांता ही रूपे जास्त प्रसिद्ध आहेत. भागा, सुभगा, चामुंडा, कराला व भीषणा या देवता देवीच्या अनुचरी होत. या ग्रंथकाराचे असेही म्हणणे आहे की, आसाम हा प्राचीन काळचा शाक्तपंथीय शैव प्रांत असून कामाख्या देवी ही अनार्यांची होती. नरकासुर, बाणासुर या प्रबळ दैत्यांचा आर्यांनी पराभव करून ही देवता आत्मसात केली (का. दा. नायक, अर्चना, दीपवाळी अंक, १९६२).

गाभाऱ्याच्या डाव्या बाजूला योनिरूप त्रिकोणी भाग एका खडकाला कोरलेला आहे. हेच देवीचे स्वरूप होय. मूळ मूर्ति ती हीच होय. जवळच एका

ल्हानशा खळग्यात सतत पाणी असते आणि महिन्यातून काही ठराविक दिवशी त्याला विशेष भरती येते.* भक्तांनी वाहिलेल्या फुलांच्या माळा बाजूला सारल्या तरच लोक त्या त्रिकोणाचे दर्शन घेऊ शकतात. देवीचे पूजन व वंदन झाल्यावर प्रत्येकजण ते पवित्र पाणी आपल्या डोळ्यास लावतो. देवीला मासिक पाळी येते अशी लोकांची श्रद्धा आहे आणि त्यामुळेच तेथील पाण्याला ' लोहित्य वारी ' असे म्हटले जाते. भक्तांना प्रसाद म्हणून ह्या पाण्यात वस्त्र भिजवून ते दिले जाते. देवीचे स्वरूप खडकातच कोरलेले असल्याने त्या ठिकाणी एखादा निर्झर असण्याची शक्यता आहे. शास्त्रात जरी येथील पाण्यात भिजवलेले रक्तवस्त्र प्रसाद म्हणून घ्यावा असे असले, तरी क्षेत्रस्थ ' बडा पुजारी ' वर्ग मात्र रेशमी लाल वस्त्राचे तुकडे गावोगावी पाठवितात. त्यामध्ये निर्माल्याची चार फुले असतात. क्वचित् देवीचे एखादे छायाचित्र पाठवून दक्षिणेची अपेक्षाहि करतात. ते जरी रक्तवस्त्र असले तरी तेथील पाण्यात भिजविलेले मात्र खासच नसते. प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाला असा प्रसाद एका बड्या पुजाऱ्याने पाठविला होता. त्यावरून वरील विधान करता येते.

कामाख्याटेकडीची उंची अंदाजे ८०० फूट असून पायथ्याला ब्रह्मपुत्रा नदीच्या कालव्याचा पाट वाहत आहे. ह्या देवस्थानच्या खर्चासाठी २३०० हजार एकर जमीन लावून दिलेली आहे. मुख्य मंदिराशिवाय आणखी १०-१२ मंदिरे येथे आहेत. ह्याच ठिकाणी बुद्धधर्मीय प्रमुख स्थान आहे. अर्धा मैल अंतरावर दुसरे ल्हानसे एक मंदिर बांधलेले आहे. त्या ठिकाणावरून ब्रह्मपुत्रा

---

* देव-देवतांचे मूर्तीतून पाणी वाहत असणे हा प्रकार भारतामध्ये नवीन नाही. गणपतीपुळे (रत्नागिरी) येथील श्रींचे नाभीकमळातून मधुर स्वच्छ पाणी वाहात असते आणि भक्तमंडळी त्याचा तीर्थ म्हणून उपयोग करतात. त्र्यंबकेश्वर येथील ज्योतिर्लिंगातून पाणी वाहात असते जेऊर ( सोलापूर ) येथील पुरातन शिव मंदिरात लिंगातून सतत पाणी वहात असते. श्रावणातील सोमवारी पाण्याचा जोर वाढतो, त्यावेळी साक्षात काशीची गंगामाईच अवतरते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. त्या वेळचे आणखी आश्चर्य असे की, पाण्याचा रंग पांढरट असून त्यामध्ये पांढरी वाळू, शिंपले वगैरेही सापडतात. या दिवशी गंगेच्या आगमनापूर्वी गाभाऱ्यात भयंकर आवाज होतो, म्हणून तेथे कोणी थांबत नाही ( पुरुषार्थ, देवता अंक, १९३३ ) जुवकेश्वर ( श्रीरंगम् ) येथील शिवलिंगाखालून पाणी वाहत असते. तसेच नेनेश्वर ( पुणे जिल्हा ) येथील शाळुंकेवरील बाणातून पाणी वाहत असते.

नदीचा विस्तीर्ण व रमणीय देखावा दिसतो. ( आसाम जिल्हा गॅझेट, कामरूप, पृष्ठे २२ व ९३ ).

या देवीच्या योनिपीठाला भीमादेवी असेही नाव आहे. देवीच्या परिसरातील एका काळ्या-निळ्या पाषाणाच्या सुळक्याला प्राचीन काळी देवता-स्वरूप मानीत. या देवीच्या जोडीदाराचे अगर रक्षकाचे ( भैरवाचे ) नाव उमानंद, शिवानंद, रावणानंद असून याचे स्थान एका पर्वतावर आहे. ह्यासंबंधी अधिक माहिती Indian Historical Quarterly, Vol. 1938, Pages 751-53 मध्ये पाहावयास मिळेल.

या देवीचे स्थान नरकासुर दैत्यासाठी विख्यात आहे. पुराणात नरकाची नावे कोणती असा प्रश्न नारदांनी एकदा श्रीविष्णूंना विचारला असता त्यांनी त्याचे उत्तर खालीलप्रमाणे दिले, नरक एकोणतीस प्रकारचे आहेत. ते पुढीलप्रमाणे,

( १ ) तामिस्त्र, ( २ ) अंध तामिस्त्र, ( ३ ) रौरव, ( ४ ) महारौरव, ( ५ ) कुंभीपाक, ( ६ ) काळसूत्र, ( ७ ) आसिपत्र, ( ८ ) सूकरमुख, ( ९ ) अंधकूप, ( १० ) कृमिभोजन, ( ११ ) सदंश, ( १२ ) तप्तसूर्मी, ( १३ ) वज्रकंटक, ( १४ ) शाल्मली, ( १५ ) वैतरणी, ( १६ ) पुयोद, ( १७ ) प्राणरोध, ( १८ ) विशसन, ( १९ ) लालाभक्षक, ( २० ) सारमेयादन, ( २१ ) अवीची, ( २२ ) अयःपान, ( २३ ) क्षारकर्दम, ( २४ ) रक्षोगणभोजन, ( २५ ) शूलप्रेत, ( २६ ) दन्दशूक, ( २७ ) अवटारोध, ( २८ ) पर्यावर्तन, ( २९ ) सूचीमुख. याप्रमाणे एकोणतीस नावे दिलेली आहेत. मानव भूतलावर राहत असताना जी बरीवाईट कृत्ये करतो, त्यास अनुसरून कोणत्या तरी एका नरकाची प्राप्ति त्याला होते आणि तेथील यातना त्याला भोगाव्या लागतात. मानवाने कोणते कर्म केले की कोणत्या नरकाची प्राप्ति त्याला होते, याचे संपूर्ण विवरण देवीभागवत ( ९-१० ) यामध्ये पाहावयास मिळेल.

नरकासुर हा विष्णूचा भूमीपासून झालेला पुत्र होय. त्याला वराह-पुत्र असेही म्हणतात. त्याने हळूहळू स्वकष्टाने आणि कर्तबगारीने आपले सैन्यबळ वाढविले आणि शेवटी धटकाला ठार करून कामरूपाचे राज्य मिळविले. तत्पूर्वी हा मैथिली येथील जनकराजाच्या आश्रयाला होता आणि भावी काळात केलेल्या कर्तबगारीचे धडे त्याने येथेच गिरविले. तेथे कर्तबगारीला वाव न मिळाल्यामुळे त्याने जनकराजाचा आश्रय सोडला आणि तो कामरूप प्रांती गेला. यास्तव त्याला जनकपुत्र असेही म्हटले जाते. नरकासुराने आपल्या जनानखान्यात १६००० तरुण मुली ठेवलेल्या होत्या. या मुलींच्या आक्रोशाकडून श्रीकृष्णाकडे

त्याची गाऱ्हाणी आली आणि त्याच्या विनतीवरूनच श्रीकृष्णाने नरकासुरावर स्वारी करून अश्विन वद्य १४ ला त्याचा वध केला यासाठीच त्या दिवसाला 'नरक–चतुर्दशी' म्हणण्याचा प्रघात पडला ह्या वधाची स्मृति म्हणून आजही तो दिवस भारतात सर्वत्र पाळला जातो पहाटे लवकर उठून मगल स्नान केले जाते आणि त्या समयी नरकासुराला प्रत्यक्ष मारल्याची कृति म्हणून महाराष्ट्रात पायाखाली कारट नावाच्या एका प्रसिद्ध वेलीचे फळ तुडविले जाते त्या फळाच्या अगावर लहान लहान काटे असतात. फळ आकाराने कोंबडीच्या अड्याच्या आकाराचे असते आणि आतील गर अतिशय कडू असतो ते फोडल्यावर त्यातील बिया मस्तकी धारण करण्याचा प्रघातही काही ठिकाणी दृष्टीस पडतो

नरकासुराचा वध केल्यावर श्रीकृष्णाने १६००० मुलींची सुटका केली आणि त्याच्या नातेवाईकाना त्याना घरोघर नेण्यास परवानगी दिली. पण आश्चर्य असे की, त्या तरुण कन्या दैत्याच्या जनानखान्यात राहिल्या असल्यामुळे त्या भ्रष्ट झाल्या असाव्यात या समजुतीने त्याचे नातेवाईक त्याना परत आपल्यामध्ये सामावून घेण्यास तयार होईनात. त्या मुलींची सोडवणूक करण्यासाठी त्याच्या नातेवाईकांनीच श्रीकृष्णाची प्रार्थना केली होती पण प्रत्यक्ष सोडवणूक केल्यावर मात्र त्यानीच त्या अभागिनींना दूर सारले अशा पेचप्रसगी स्वत श्रीकृष्णच पुढे झाले आणि त्या सर्व तरुणी तयार असल्यास त्याना आपल्या घरी ठेवण्याची तयारी त्यानी दर्शविली. त्याप्रमाणे त्या सर्व मुलींनी श्रीकृष्णाचा आश्रय घेतला यास्त स्त्रिया पुढे श्रीकृष्णाच्या १६१०८ स्त्रिया म्हणून वर्णिल्या गेल्या आहेत. वास्तविक त्या सर्व शरणार्थी म्हणून त्याच्याजवळ राहत होत्या आजच्या समाज सुधारणावादी पुढाऱ्यानी ह्यापासून बोध घेण्यासारखा आहे समाजसुधारणेचा श्रीगणेशा प्राचीन कर्मठ त्रेतायुगामध्ये प्रथम श्रीकृष्णानेच घालून दिलेला आहे, हे ह्यावरून दिसून येईल.

अशा ह्या कर्तृत्ववान नरकासुराची कामाख्या देवीवर अतिशय श्रद्धा होती तिचा तो परमभक्त होता त्याच्या भक्तीवर स्वत देवी प्रसन्न होती वेळ-प्रसगी प्रकट होऊन नरकासुराबरोबर ती सभाषण देखील करीत असे पण दोघाचे हे देवी भक्ताचे नाते आणि सौख्य नास्तिक बाणासुराला पाहवले नाही त्याला हा वृत्तान्त समजताच त्याने नरकासुराची भेट घेतली व त्याची निर्भर्त्सना केली दैत्याच्या स्वभावाचे वर्णन करून त्याला भडकाविले त्याने नरकासुराला असा कानमत्र दिला की, 'देवीसारखी सुदर, साक्षात् देव स्त्री ही उपभोगापुरती आहे. नुसती भापणापुरती नाही देवीबरोबर तू विवाह कर आणि तिच्या

तारुण्याचा बहर लुटून घे ' दुष्ट प्रवृत्तीची माणसे, ज्याना दुसऱ्याचे सुखमय जीवन पाहवत नाही, ती असाच अनाहुत उपदेश करून वेळप्रसगी एखाद्या इसमाच्या आयुष्याचा नाश करतात बाणासुराची कपटनीति नरकासुराच्या ध्यानात आली नसावी अगर स्वशक्तीच्या आणि देवीभक्तीच्या अहकाराने त्याला पछाडिले असावे ते काहीही असो पण नरकासुराने देवीला विवाहाची मागणी घातली दुर्जनाबरोबर प्रसग पडल्यास वेळ निभावून न्यावी लागते आणि युक्तीनेच त्याचा पाडाव करावा लागतो देवीला अतस्थ हेतु समजला तिने विवाहाला होकार दिला, पण तो दोन अटींवर त्या दोन अटी अशा—( १ ) मदिराप्रत जाण्यासाठी उत्तम मार्ग नव्हता तेव्हा नरकासुराने उत्तम पायऱ्या बांधून काढाव्यात आणि नदीकाठी यानेकरूसाठी उत्तम घाट बाधावा ( २ ) देवीला स्वत चे मदिर नव्हते, ते त्याने बाधून काढावे मात्र ह्या दोन्ही अटी त्याने एकसमयावच्छेदेकरून एका दिवसात पुऱ्या कराव्यात

माणसाला आपले उद्दिष्ट साध्य होत असेल तर वाटेल ते अचाट काम करण्यास तो तयार होतो आपल्या हातून ते पुरे होण्यासारखे आहे किंवा नाही याचा विचारही काही वेळा तो करीत नाही नरकासुराला आपल्या शक्तीचा अहकार होताच त्याने देवीच्या दोन्ही अटी मान्य केल्या लगोलग त्याने विश्वकर्म्याला बोलावून घेतले आणि कामास सुरुवात झाली दिवसभरात पायऱ्या तयार झाल्या आणि घाटही बाधून तयार केला वास्तव त्या पायऱ्यांना अद्यापही ' नरकासुराच्या पायऱ्या ' असे सबोधिले जाते मदिराच्या कामास सुरुवात झाली आणि दुसऱ्या दिवशी प्रात कालचा समय होण्यापूर्वीच मदिर पुरे होणार, असे दिसू लागल्यावर नरकासुराचा पण पूर्ण होऊ नये आणि विवाहाचा प्रसग येऊ नये म्हणून त्या दिवशी मदिरावर कळस चढविण्याच्या पूर्वीच कोंबडा आरवला आणि मुदत सपल्याची देवीने ग्वाही दिली वाघत तरी नरकासुराचा पराभव झाला आणि विवाह टळला नरकासुराने त्या कोंबड्याला धरले आणि त्याची मुंडी मुरगळून टाकली या क्षेत्रापासून आठ मैल अतरावर कुक्कुर कटा म्हणून एक स्थान दाखवितात तेथे हा कोंबडा मारला असे म्हणतात

वसिष्ठ ऋषींना नरकासुराच्या ह्या अधम कृत्याची वार्ता समजली आणि त्याना असे स्पष्ट दिसून आले की, यापुढे देवीचे पावित्र्य कायम टिकणार नाही कोणत्या ना कोणत्या तरी कारणाने नरकासुर अपमानाचा सूड घेईलच वास्तव देवीच्या सुरक्षिततेसाठीच त्यानी असा शाप दिला की, ' ह्यापुढे देवीचे पीठ गुप्त होईल '

त्वं यावज्जीविता पाप कामाख्यादि जगत्प्रभु ।
सर्वैः परिकरैः सार्द्धमन्तर्धानाय गच्छतु ॥
(कालिका पु. ३९।१८)

भावार्थ असा की, जोपर्यंत तू (नरकासुर) जिवत राहशील, तावत्काल देवी आपल्या परिवारासह या ठिकाणी गुप्तरूपाने वास करील. त्याप्रमाणे पीठ गुप्त झाले, ह्या ठिकाणी असेही घडले असण्याचा संभव आहे की, द्वापार युगापासून लोकाना ह्या पीठाची विस्मृति झाली असावी अगर त्यावर मातीचे थर चढून ते भूमीत गाडले गेले असावे. परंतु पुढील इतिहासावरून असे दिसेल की, अनेक वर्षे हे पीठ भूमीत गाडलेले होते.

कामरूपाच्या राजघराण्याचा जो इतिहास उपलब्ध आहे, यावरून असे दिसते की, नरकासुरानंतर त्याचा मुलगा भागदत्त हा महाप्रतापी निघाला. भारतीय युद्धात त्याने कौरवाच्या बाजूने भाग घेतला असल्याचे वर्णन मिळते तो शाक्तपंथीय होता आणि त्यानेच ह्या पंथाचा प्रसार भारतामध्ये प्रथम त्या भागात चालू केला असावा. ह्यापूर्वी ह्या पंथाचे वर्चस्व वायव्य भागात उडियान व स्वात या भागात होते. भागदत्ताचे वंशज या गादीवर अनेक शतके होते. त्याचे राज्यपद काळ-स्तंभ घराण्याने घेतले. या घराण्याला प्रलंभ व त्यागसिंहाने शह दिला कालांतराने नरकवंशीय ब्रह्मपद राजाने पुन्हा सत्ता हस्तगत केली. नंतर पाल व कुचवंश या ठिकाणी आले. विश्वसिंह हा कुचवंशीय राजा होता.

मध्यंतरी जरी ह्या पीठाची विस्मृति लोकाना झाली होती, तरी भाविक लोक दंतकथा ऐकून ह्या ठिकाणी येत, नवससायास करीत, आणि कित्येक लोकाच्या मन.कामना पूर्णही होत असत. पंधराव्या शतकाच्या सुरवातीला वर उल्लेखलेला विश्वसिंह, राज्याचा विस्तार करीत असता व शत्रूबरोबर युद्ध करीत असता त्याची व सैनिकांची चुकामूक झाली. त्या वेळी सैन्याचा ठावठिकाणा शोधण्यासाठी तो या टेकडीवर आला. वेळ भर दुपारची! आणि त्यातच घोड्यावरून रपेट मारून तो आला असल्यामुळे अतिशय थकला होता, म्हणून तो तेथे विश्रांतीसाठी थोडा वेळ खाली उतरला आणि एका झाडाखाली स्वस्थ पडून राहिला. तो तहानेने व्याकूळ झाला होता. पण जवळपास कोठेच पाणी दिसेना. म्हणतात ना की, इच्छा असली म्हणजे मार्ग सापडतो आणि सत्कार्य करीत असता देवही पावतो.

याच सुमारास एक वृद्धा हाती पूजेचे सामान व पाण्याचा तांब्या घेऊन तेथे उपस्थित झाली. ही कोण, कुठून व कशी आली याबद्दल राजाला कुतूहल वाटले. विश्वसिंहाने तिला पाणी मागितले आणि त्या वृद्धेने देवासाठी आणलेले पाणी आनंदाने त्याला प्यावयास दिले. 'तृषिताय जल यच्छ' ह्या उक्तीनुसार ती वागली. राजाने विचारल्यावरून ती वृद्धा म्हणाली, 'या ठिकाणी देवीचे पीठ आहे, अशी आमची श्रद्धा आहे. त्यामुळे आम्ही कधी कधी पूजा करण्यासाठी या ठिकाणी येतो. भक्तिभावाने ह्या स्थानी नवसासाठी घेतल्यास मनकामना पूर्ण होतात.' विश्वसिंह ह्या वेळी संकटातच होता आणि त्याला शत्रूवर विजय मिळवावयाचा होता. त्याने भक्तिभावाने त्या स्थानाला नवस केला की, 'या युद्धात जर माझा जय झाला तर येथे मी सुवर्णाचे मंदिर बांधीन.' तात्काळ ती वृद्धा अदृश्य झाली राजाला याचेही आश्चर्य वाटले. नंतर त्या युद्धामध्ये विश्वसिंह विजयी झाला आणि तो विजय तेथील देवीच्या कृपेनेच मिळाला अशी त्याची ठाम समजूत झाली.

राजधानीत परत आल्यावर त्याने पंडितांची सभा भरविली आणि आपला अनुभव त्याने त्यांना कथन केला. पंडितांना त्याने विनंती केली की, प्राचीन वाङ्मयाचे संशोधन करून त्यांनी त्या ठिकाणचा शोध लावावा त्याप्रमाणे पंडित कामाला लागले. तेव्हा त्यांना असे आढळून आले की, या ठिकाणी प्राचीन कामाख्या देवीचे पीठ असावे. राजाने उत्खनन करून मूळ मंदिर प्रकाशात आणले. नवसाप्रमाणे सर्व मंदिर सुवर्णाचे बनविण्याइतपत सुवर्ण उपलब्ध होईना. यास्तव राजाने साधे विटांचे बांधकाम करण्यास सुरवात केली. पण आश्चर्य असे की दिवसा पुरे झालेले बांधकाम रात्री पडून जावे आणि पुन्हा नवीन कामास सुरवात व्हावी. असे काही दिवस झाल्यावर विश्वसिंह देवीलाच शरण गेला आणि मार्गदर्शन करण्याची प्रार्थना केली. दृष्टांत देऊन देवता म्हणाली, 'तू सुवर्ण मंदिर बांधण्याचा संकल्प केलास आणि आता तुझे काम झाल्यावर, नुसते विटांनी बांधीत आहेस. तुझा संकल्प विसरलास काय? आवेशाचे भरात आणि कार्यसिद्धीवर दृष्टी ठेवून संकल्प केलास आणि आता तेवढे सुवर्ण उपलब्ध होत नाही, म्हणून प्रतिज्ञाभंग करीत आहेस. शेवटी प्रत्येक विटेमध्ये एक रती सुवर्ण घालून, विटा तयार कर, आणि त्यांनी बांधकाम पुरे कर म्हणजे तुझा संकल्प पुरा होईल.' असे देवतेने मार्गदर्शन केले. राजाने प्रत्येक विटेमध्ये एक एक रती सोने घालून विटा तयार केल्या आणि मंदिर बांधून तयार केले ह्याप्रमाणे देवीचे पीठ पुन्हा ऊर्जितावस्थेस आले

विश्वसिंहाने एकूण २१ वर्षे राज्य केले आणि सन १५३४ साली तो स्वर्गवासी झाला त्याच्या पश्चात त्याचा पुत्र मल्लदेव हा गादीवर आला. तो

पण या सर्व प्रकाराचा त्या तीर्थोपाध्यायांवर काहीही परिणाम झाला नाही इतकेच नव्हे, तर रक्षकांच्या मदतीने, कटु शब्दांनी टोचून मंदिरातून त्याला आणि बेगमेला बाहेर हुसकावून लावण्यात आले त्याच्या जमातीचाही अत्यंत वाईट शब्दांनी उपमर्द केला गेला कालीदासाला सर्वत्र अंधार दिसू लागला क्रोधाने तो बेभान झाला, बेफाम झाला आणि त्या प्रक्षुब्ध मन स्थितीत त्याने अल्लाच्या नावाने अशी घोर प्रतिज्ञा केली की, ' यापुढे सर्व हिंदु प्रतिकांचा आणि मंदिरांचा मी नाश करीन ' या दिवसापासून तो काळापहाड या नावाने प्रसिद्धीस आला सैन्यबळावर त्याने ओरिसा प्रांत जिंकून घेतला अनेक देवालये धुळीस मिळविली ह्या धामधुमीत कामाख्या मंदिरावरही दुर्दैव ओढवले काळा पहाडाने मल्लदेवाचा पराभव करून, कामाख्या मंदिराची सन १५५३ साली पुष्कळच नासधूस केली वेळीच पतितोद्धाराकडे धर्ममार्तंडानी पाठ फिरविल्या मुळे जो धर्मरक्षक ठरला असता, तोच धर्मभक्षक झाला ह्यावरून सांप्रतच्या समाजधुरीणानीही बोध घेण्यासारखा आहे काळापहाडने मूर्तीची जी विटंबना केली त्यासंबंधी उडिया भाषेत अनेक लोकगीते प्रचलित आहेत

(श्री चिं ग कर्वे, प्रसाद मासिक, ऑगष्ट १९६० )

मल्लदेवाने पुन्हा सैन्याची जमवाजमव केली आणि काळापहाडाचा पराभव करून राज्य हस्तगत केले सन १५६५ साली त्याने मंदिराचा पुन्हा जीर्णोद्धार केला त्या वेळी शुद्धीसाठी एकूण १४० नरबळी देण्यात आले

कामाख्याचरणार्चको विजयते श्रीमल्लदेवो नृप ॥ इ० इ०

जीर्णोद्धाराचा इतिहास सांगणारा एक शिलालेख या मंदिरात पाहावयास सापडतो. मंदिराचा जीर्णोद्धार केल्यावर केंदुकलाई नावाचा ब्राह्मण त्याने देवीच्या पूजेसाठी नेमला हा विप्र रत देवीभक्त होता, अतिशय भक्ति भावाने तो देवीची पूजाअर्चा करी ह्यामुळे देवी त्याच्यावर प्रसन्न होती दररोज सायंकाळी आरतीच्या वेळी देवी प्रकट होऊन घंटेच्या तालावर नृत्य करीत असे या गोष्टीचा परिस्फोट न व्हावा म्हणून तिने विप्राला आज्ञा केलेली होती पण दररोजचाच प्रकार घडल्यावर गुप्तता तरी किती दिवस राहणार ! हळूहळू ही गोष्ट मल्लदेवाच्या कानी गेली त्याने विप्राला बोलावून विचारणा केली प्रथम तो कबूल होईना पण शेवटी दंडाच्या भीतीने त्याने सत्य परिस्थिति सांगितली देवीपूजक नरनारायणाला म्हणाला, ' आरतीचे समयी देवी प्रकटरूप धारण करून नृत्य करते ही गोष्ट सत्य आहे पण इतरांना तिचे दर्शन होणार नाही कपटमार्गाने देवीचे दर्शन तुला दुर्लभ आहे आंतरिक श्रद्धा भक्तिभावाने देवीला शरण गेल्यास, ती भक्तिसुलभ, भक्तवत्सल जननी,

भक्ताचे अभिष्ट अवश्य पूर्ण करील यास्तव पूर्ण श्रद्धेने देवीला शरण जावे एवढेच माझे सांगणे आहे ' शेवटी राजाने स्वत उपस्थित राहू नये अशी त्याला कळकळीची विनती केली परतु राजा आपला हट्ट सोडीना, ' मी राजा, आणि देवी मला दर्शन न देता एका य:कश्चित पुजाऱ्याला दर्शन देते ? ' अशी द्वैतभावना त्याच्या मनात उत्पन्न होऊन पुजाऱ्याबद्दल राजाच्या मनात असूया निर्माण झाली अखेर त्याने दर्शन घेण्याचे ठरविले

एके दिवशी सायकाळी आरतीच्या वेळी देवीचे नृत्य चालले असता गवाक्षातून तिची नजर बाहेर लुकलुकणाऱ्या दोन नेत्राकडे गेली हा काय प्रकार आहे ते तात्काळ तिने जाणले आणि क्रोधावश होऊन तिने शापवाणी उच्चारली, ' ह्यापुढे राजवशामधील कोणाही इसमास माझे दर्शन घडणार नाही आणि कोणी तसा प्रयत्न केलाच तर राजवशच नष्ट होऊन जाईल ' गौप्यस्फोट केल्याचा वहीम पुजारी विप्रावर आल्यामुळे देवीने लगेच त्याचा वध केला धन्य तो पुजारी ! भक्तिभावाने पूजन केल्यामुळे त्याला नित्य देवीचे दर्शन घडत असे आजकाल अनेक शक्तिपीठामध्ये आणि मदिरामध्ये आपण पुजारी पाहतो पण ते पोटासाठी म्हणून हा ' धदा ' करतात त्याच्या ठायी ईश्वराबद्दल अनन्यभाव नसतो आणि म्हणून अशा या लोकानी देवपूजेचे कितीही अवडबर माजविले तरी त्याना देव कसा भेटणार ? काही लोक व्यगोक्तीने ' पुजारी ' ह्या शब्दाच्या समासाची फोड ' पूजेचे अरी ' अशी करतात ती अगदी योग्य आहे असेच मग वाटू लागते तरीही या नियमास कोणी अपवाद असतोच पण ते फारच थोडे !

कैंदुकलाईच्या अत झाल्यावर आणि राजवशास शाप मिळाल्यावर आस पासच्या पर्वतावरील शास्तपथीय साधु गोसावी याना राजाने मदिराचे पुरोहित नेमले आणि कुलगुरूचे सर्वाधिकार देऊन मदिराची व्यवस्था पाहण्यास सागितले हेच पर्वतीय गोसावी आजही मदिराचे ' बडे पुजारी ' म्हणून व्यवस्था पाहतात

मुसलमानी अमलात या मदिरावर पुष्कळ अनेक सकटे आली व अनेक वेळा नासधूस झाली पण सन १६६५ साली कुचबिहारच्या राज-नारायण महाराजानी पुन्हा जुन्या वळणावरच सुधारणा केली कुचबिहारची सत्ता सपुष्टात आल्यावर, आहोम राजवशाने या भागात सुमारे ४०० वर्षे राज्य केले त्यांची वृत्ति धार्मिक असल्याने त्यानी अनेक नवीन मदिरे बाधली व जुन्याचा जीर्णोद्धार केला कामाख्या मदिराचा अनेक वेळा जीर्णोद्धार, काठेवाडातील सोमनाथ मदिराप्रमाणे झालेला आहे या मदिराच्या परिसरात दसमहाविद्या

देवतांची मंदिरे या वंशानेच उभारली. काळाच्या ओघात आणि भूकंपादि नैसर्गिक आपत्तीने ही मंदिरे जीर्ण झाल्यावर, दरभंगा नरेश रामेश्वरप्रसादसिंह याने त्यांचा जीर्णोद्धार केलेला आहे.

या क्षेत्री कामाख्यादेवी कुमारी रूपाने विराजमान असल्याने या क्षेत्री कुमारीपूजन महत्त्वाचे मानले गेले आहे. दशमहाविद्या देवतांपैकी छिन्नमस्तादेवता या ठिकाणी 'शुभदुर्गा' नावाने प्रसिद्ध आहे. त्या देवीला वंदन करण्याचा मंत्र असा,

शुभदुर्गे महादुर्गे शुभपापप्रणाशिनी ।
नमस्ते शुभकामाख्ये तुभ्यं त्रैलोक्यपूजिते ।।

तसेच भक्तगण कामाख्या देवीला वंदन करतात,

कामाख्यावरदे देवी नीलपर्वतवासिनी ।
त्वं देवि जगतां मातर्योनिमुद्रे नमोऽस्तु ते ।।

कालिकापुराण व योगिनी तंत्रामध्ये या शक्तिपीठाची सविस्तर महती गायिली आहे.

कामदा, कामिनी, कामा, कान्ता, कामांगदायिनी ।
कामांगनाशिनी तस्मात्, कामाख्या तेन चोच्यते ।।
(कालिका पुराण, ६४–२)

भक्ताची इच्छा पूर्ण करणारी, शंकराची अतिशय आवडती, भक्ताला सदैव भुक्ति व मुक्ति देणारी, अशा कामाख्या देवीला माझा साष्टांग नमस्कार असो.

(श्री. दवे, Immortal India, प. महादेवशास्त्री जोशी, 'बाहुबली', आसाम गॅझेट आणि एका भक्ताने प्रत्यक्ष सांगितलेल्या माहितीच्या आधारे.)

या पीठाला कोणी कामेश्वर व महागौरीचे स्थान असे म्हणतात. या ठिकाणी दशमहाविद्येचे आद्यस्थान आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) भैरवी, (२) कामाख्या, (३) प्रचंडचंडिका, (४) छिन्नमस्ता, (५) मातंगी, (६) त्रिपुरा, (७) अंबिका, (८) बगळा, (९) भुवनेशी, (१०) धुमिनी (धुमावती.)

परंतु नेहमीची दशमहाविद्यांची नावे निराळी आहेत (दशमहाविद्या प्रकरण पहा). बुद्धधर्मीयांचे हाजो हे प्रसिद्ध स्थान येथेच आहे.

स्रग्धरा

देवांच्या संमतीनें गमन करितसे काम कैलास वाटे ।
श्रीसांबाच्या तपाला हिमगिरिवरली विघ्न आणावयातें ॥
ध्यानाला विघ्न होतां, उघडुनि तृतीया नेत्र जाळी तयातें ।
ज्या ठायीं जन्म घेई पुनरपि वदती कामरूप प्रदेशें ॥ १ ॥

भुजगप्रयात

गिरी नीलकुटी असाम प्रदेशीं ।
असे पीठ कामाख्य ते रम्य देशीं ॥
कुणी स्थापियेलें कुणा नाहिं ठावें ।
जरी शोध त्रेतायुगातींहि चाले ॥ २ ॥
नसे मंदिरीं देवतारूप कांहीं ।
सतींची पडे योनिमुद्रा इथेंही ॥
दिसे कोरिली मूळ पाषाण ठायीं ।
महामुद्र देवी स्वरूपांत राही ॥ ३ ॥
स्वयंभू सदा निर्झरा–वारि वाहे ।
प्रतीमास पाळी कुणी मानिताहे ॥
जई पूजिती भक्त ते देवतेला ।
प्रसादास देती रजोभास त्याला ॥ ४ ॥

पृथ्वी

वराह–सुत देवि पूजन करीत त्रेतायुगीं ।
स्वयें प्रकट होऊनी करित भाषणातें कधीं ॥
तयासि सुर–द्वेषि देत उपदेश बाणासुर ।
स्त्रिया रचित भोग्य वस्तु नरका तिला तू वर ॥ ५ ॥
कु मार्ग जरि जाणतो करित मागणी ती प्रती ।
मला घडिव घाट पायरि सु मंदिरा बांध कीं ॥
जरी करिशि सर्व हे दिवस एक रात्रींत ही ।
स्वीकार करितें तुला, पण अर्धी करी पूर्ण ही ॥ ६ ॥

प्रयत्न करि घोरसा समयिं विश्वकर्म्या करी ।
समाप्तिसमयीं उठेचि स्वर कुक्कुटाचा तरी ॥
जरी घडलि पायरी कळस ना चढे मंदिरा ।
विवाह चुकवोनि ती, पुढति शुभ हो मंदिरा ॥ ७ ॥

युथिका

मत्त होई नरकासुर या क्षणीं ।
वशिष्ठास समजे परि बातमी ॥
शुभ पीठ वदतो तरि होईल ।
शापवाणि बुझवी तव मंदिर ॥ ८ ॥

हरिणी

नच दिससि गे शापाने तूं युगानुयुगे जनां ।
उदरिं धरिते भूमी माता मुके जन दर्शनां ॥
समय सरितां शापाचा तो सु-भाग्य उजळिले ।
इसवि सनच्या पंधराशेचा सु-दीर्घहि काळ ये ॥ ९ ॥

शार्दूलविक्रीडित

कामाख्या गिरि विश्वसिंह लढतां तो पातला या स्थळां ।
तृष्णेने बहु पीडितां पुरचिते वृद्धा तयाला जळां ॥
आली कोठुनि कोण कीं वदतसे ही देवीची पीठिका ।
साक्षात्कार मिळे पहा प्रचित तू, वारीतसे संकटां ॥ १० ॥

शिखरिणी

जरी युद्धां आजी विजय मज देवी मिळत गे ।
सुवर्णानें तूझे खचित घडवी मंदिर बये ॥
जय प्राप्ती होतां म्हणुनि बघतां मंदिर निघे ।
विटेमाजीं सोनें मिसळुनी उभारी नविन गे ॥ ११ ॥

वसततिलक

काळापहाड जरि पूर्वि असेचि हिंदू ।
स्वीकारुनि यवनधर्म बने अहिंदू ॥
उध्वस्त मंदिर करी कुणी हो उठेना ।
गोतांस काळ पनला नव-दुर्गती ना ॥ १२ ॥

दैवे उभारित पुन्हा परि मल्लदेव ।
कंदुकलाई तव पूजनि विप्रदेव ॥
संध्यारती समयि ती प्रकटे स्वयेंचीं ।
घटेस ताल धरि नाचत देवि साची ॥ १३ ॥

भुजंगप्रयात

क्रमानेच ये वृत्त हे मल्लदेवा ।
म्हणे बोलवा रे तया विप्रदेवा ॥
खरें सांगता घेई हट्टास राजा ।
मला दावी रूप तें देवि राजा ॥ १४ ॥

नको रे नको हट्ट घेऊ असा हा ।
नसे देवि आज्ञा कुणा दाखवाया ॥
जरी ऐकशी ना बरें बोल माझे ।
दिसेना कधीं देवि यशास तूझें ॥ १५ ॥

मालिनी

रुचिर सदुपदेशा मानिना मल्लदेव ।
झडकरि मग आला आरती वेळि राव ॥
नयन जइ गवाक्षीं पाहि देवी तयाचे ।
कधिं न दिसत यशी देतसे शाप याचे ॥ १६ ॥

* * *

(११) कामाक्षी

रहस्य सम्प्रवक्ष्यामि लोपामुद्रापते शृणु ।
नेत्रद्वय महेशस्य काशी कांची पुरीद्वयम् ॥
(ब्रह्माण्डपुराण, ललितोपाख्यान ३५)

काशी व कांची हे भगवान शंकराचे दोन नेत्र समजले जातात, अशी गुप्त गोष्ट प्रत्यक्ष शंकरांनीच सांगितलेली आहे. या ठिकाणी सतीचा कंकाळ (अस्थिपंजर) पडला, म्हणून हे शक्तिपीठ मानले जाते. दक्षिण भारतामध्ये मद्रासपासून सुमारे ४५ मैल अंतरावर हे पीठ आहे. कांजीवरम् ह्या रेल्वे स्थानकाजवळ शिवकांची आणि तेथून तीन मैल अंतरावर विष्णुकांची ही स्थाने आहेत. कामाक्षी म्हणजे साक्षात् त्रिपुरसुंदरीचे स्वरूप मानले जाते

या देवीलाच कामकोटी म्हणतात, म्हणून हे कामकोटीपीठ या नावानेही प्रसिद्ध आहे.

या देवीच्या उत्पत्तीसंबंधी खालीलप्रमाणे कथा आढळून येते. एकदा शंकर आणि पार्वती यांची क्रीडा चालली असता पार्वतीने लीलया शंकराचे नेत्र झाकले. शंकराचे तीन नेत्र म्हणजे साक्षात् सोम, सूर्य आणि अग्निरूप असल्याने नेत्र झाकताच भूतलावर अंधःकार पसरला. सूर्याचा लोप झाल्याने सर्व धर्मकृत्ये थांबली, वनस्पति गोठून गेल्या आणि अग्नि आपले दहनाचे काम करीना. त्यामुळे जगाची अपरिमित हानि झाली. या अपराधास्तव शंकरांनी पार्वतीला आज्ञा केली की, तिने तावडतोब पृथ्वीवर जाऊन, तप करून पापाचे क्षालन करून घ्यावे. पतीच्या आज्ञेनुसार ती भूतलावर आली आणि कंपा नदीच्या काठी कांची येथे आम्रवृक्षाखाली तपश्चर्या करीत बसली. नित्यनेमाने ती शिवाचे एक लिंग तयार करी आणि त्याचे पूजन करीत बसे.

बराच काळ लोटल्यानंतर शंकरांना वाटले की, बहुधा पापाचे क्षालन झाले असावे. आता पार्वतीला परत आणण्यास हरकत नाही, पण तत्पूर्वी त्यांनी तिची परीक्षा घेण्याचे ठरविले. शंकर तपश्चर्येच्या ठिकाणी आले आणि त्यांनी आपल्या जटेतील गंगा सोडून अनपेक्षितपणे कंपा नदीला पूर आणविला. पाणी हळूहळू चढू लागले आणि पार्वती ज्या स्थानी बसली होती त्या ठिकाणी पोहोचले. वालुकालिंगाची पूजा नुकतीच कुठे संपली होती आणि पार्वती त्याचे रक्षण करीत होती. दुसऱ्या दिवशी नवीन शिवलिंग तयार करीपर्यंत ते शिवलिंग प्राणापलीकडे जपावयास हवे होते. पुराच्या पाण्याने लिंगाला वेढले. दुसऱ्या एखाद्या सामान्य स्त्रीने आपला जीव वाचविण्यासाठी पुराचे पाणी येताच तेथून पलायन केले असते, पण पार्वतीला आपल्या स्वतःच्या प्राणापेक्षा लिंगाचे महत्त्व अधिक वाटले. त्या लिंगाचे रक्षण करण्यासाठी तिने त्या वाळूलिंगास घट्ट मिठी मारली आणि ती तेथेच बसून राहिली. पाण्याच्या प्रवाहातून मारणे अगर तारणे आता फक्त एका शंकराच्या हाती आहे, अशी श्रद्धा मनात ठेवून तिने शंकराचा धावा केला. पाणी वाढतच होते. शेवटी प्रवाह तिच्या अंगावरून वाहू लागला, तरी तिने आपली जागा सोडली नाही. प्रवाह तिच्या अंगावरून गेल्यामुळे तिचा देह शुद्ध झाला होता. आता जास्त अंत पाहण्यात अर्थ नाही, नाहून परीक्षा घेताना खरोखरच भक्ताचा अंत व्हावयाचा. पार्वती तर ध्यानमग्न स्थितीत निश्चल बसून होती. काय होत होते याची तिला कल्पनाही नव्हती. शंकरांनी प्रवाहाचा वेग आवरता घेतला आणि थोड्याच वेळाने नदी पूर्वीच्याच संथपणाने वाहू लागली. यानंतर आकाशवाणी झाली की, ' प्रवाहाचा लोंढा निघून गेला आहे, तेव्हा पार्वती, तू

प्राप्त हो ' आकाशवाणी ऐकून पार्वती मानावर आली समोर साक्षात् शंकर उभे असलेले तिला दिसले. पतीच्या नितांत सेवेमुळे आणि संकटकाली त्याचा धावा केल्यामुळे त्याचे पुन्हा दर्शन घडले, या श्रद्धेतून पतीला पाहताच नेत्राश्रू घळघळ वाहू लागले. त्यांनी पार्वतीचा स्वीकार केला आणि तिच्यासह ते कैलास पर्वतावर निघून गेले

ज्या वाळूलिंगाची पूजा पार्वतीने केली, ते अद्याप तेथे सुरक्षित ठेवण्यात आलेले आहे एका लहानशा चौथऱ्यावर सुमारे दीड फूट ते उंच असून त्या लिंगावर आता चांदीच्या पत्र्याचे आच्छादन घातलेले असल्याने त्याचे रक्षण झालेले आहे हे लिंग वालुकामय असल्याने, या ठिकाणी जलाभिषेक करीत नाहीत परिमल द्रव्याचा लेप लिंगाला लावतात चमेलीचे अत्तर लावल्याने अभिषेकाचे कार्य होते, असे भक्तगण मानतात या शिवाच्या मागे आम्रवृक्ष आहे त्याच्या छायेखाली पार्वतीने शिवाची आराधना केली असल्याने त्याचे रक्षण करण्यात आले आहे झाडाच्या बुध्याचा घेर आठ फूट असून एकाच झाडावर निरनिराळ्या चवींचे आंबे पाहावयास मिळतात हा एक चमत्कार मानला जातो

दुसरी उत्पत्ति अशी की, महिषासुर दैत्य ज्या वेळी उत्तर भारतामध्ये महिषासुरमर्दिनी देवीबरोबर युद्ध खेळत होता, त्या वेळी या भागातील दोन दैत्य—कामासुर आणि मीनासुर—हे त्याच्या मदतीला धावून गेले देवीने दोघांबरोबर युद्ध केले आणि त्यांचे पाय पकडून त्यांना अंतराळात उडवून दिले ते दक्षिणेत ज्या ठिकाणी पडले आणि मृत्यू पावले त्या ठिकाणी देवी प्रकट झाली मरताना त्यांनी देवीला विनंती केली की, आमची स्मृति भूतलावर रहावी या कारणास्तव कांची आणि मदुरा येथे देवीची स्थापना करण्यात आली आणि त्यांना अनुक्रमे कामाक्षी आणि मीनाक्षी अशी नावे दिली (चण्डीकापुराण, अध्याय ७)

ततस्तु गौरीमुदिता हरे ।
पुरस्तत्रैव चैकाम्रतरोरधस्तात् ॥ (ब्रह्मांडपुराण)

वरील कथेमध्ये थोडासा फरक करून शंकरांनी पार्वतीला शाप दिला की, ' तू कुरूप होशील, पण विष्णूच्या कृपेने तुझा शाप संपेल आणि तुला तुझे पूर्व स्वरूप प्राप्त होऊन तू मजप्रत येऊन पोहोचशील ' असा मजकूर ब्रह्मांड पुराणामध्ये आढळतो त्याप्रमाणे ती आम्रतरूखाली तप करीत असता तिच्या आराधनेने विष्णु प्रसन्न झाले तिचे पूर्वस्वरूप त्यांनी तिला परत केले आणि कमनीय अशी सुंदर अक्षनयना बनविली याकरिता ती कामाक्षी या नावाने

प्रसिद्ध झाली. शंकर तिच्याबरोबर एकांबरस्वरूपाने राहिले. एकांबराचे भारतामधील हे सर्वश्रेष्ठ मंदिर आहे.

या गोष्टीची स्मृति म्हणून शंकर या क्षेत्री एकांबर या नावाने राहिले आणि पार्वती कामाक्षी या नावाने राहिली. (स्कंद, अरुणाचल, अध्याय ५.)

अशी कथा प्रचलित आहे की, प्रत्यक्ष ब्रह्मदेवानी या स्थानी येऊन तप केले. त्या वेळी देवी महालक्ष्मी स्वरूपात प्रकट झाली. तिने आपल्या हातात त्या वेळी कमळ धारण केलेले होते आणि ती कमळासनस्थ होती. विष्णूही तिच्याबरोबर होते. त्या स्वरूपात तिने ब्रह्मदेवाला दर्शन दिले. 'माझा वास निरंतर या ठिकाणी राहील,' असे त्यास आश्वासन दिले. भक्तांचा असा समज आहे की, ब्रह्मदेवाला ज्याप्रमाणे देवीचे दर्शन घडले त्याप्रमाणे भक्तिभावाने देवीची आराधना या क्षेत्री कोणी केल्यास त्यालाही देवीचे दर्शन घडेल.

शंकराचार्यांचे एक मठस्थान कांजीवरम् येथेच होते. तेथे वरदराज मंदिरात त्यांचे वास्तव्य होते. नंतर त्यांनी आपले पीठ शिवकांची येथे हलविले. शंकराचार्यांनी येथील मंदिर व शहर वसविण्याचा आलेख स्वतः तयार केला. तो श्रीचक्र आकृतीप्रमाणे होता. कामाक्षीचे हे मंदिर बिंदुस्थळी ठेविले होते. राजसेना राजाने त्या आकृतीप्रमाणे शहराची रचना केली. शहरातील इतर देवतांची मुखे कामाक्षीभिमुख ठेवून मंदिरे बांधली गेली. या प्रकारचा मंदिर बांधणीचा आलेख इतरत्र कोठे आढळत नाही. (अय्यर, पृष्ठ २५७)

कामाक्षी मंदिराचा परिसर सुमारे २५ एकर जमिनीवर पसरला आहे. मंदिराच्या गोपुराची उंची १८८ फूट असून, मंदिर व गोपुर कलापूर्ण आणि भव्य आहेत. मंदिराचा विस्तार १२०० X ८०० फूट असून सभामंडप शंभर खांबांवर उभारलेला आहे. विजयनगरकालीन कलाकौशल्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून याकडे बोट दाखविता येईल. मुख्य मंदिराच्या परिसरात अन्नपूर्णा, शारदा यांच्याही मूर्ति आहेत. देवीच्या मूर्तीसमोर एका पाषाणावर श्रीचक्र कोरलेले आहे. हे चक्र जमिनीपासून सहा इंच उंचीवर असून त्याचा घेर सुमारे चार फुटांचा आणि जाडी चार इंचांची असावी. घेराच्या मधील भाग पोकळ असून पोकळीचा अंत लागत नाही असे सांगतात. अशी श्रद्धा आहे की, हा पाषाण भूमीत पाताळापर्यंत गेलेला आहे. या यंत्रावर आद्यालक्ष्मी, विद्यालक्ष्मी, संतानलक्ष्मी, सौभाग्यलक्ष्मी, धनलक्ष्मी, वीर्यलक्ष्मी आणि विजयालक्ष्मी या अष्टलक्ष्मींचे न्यास कोरलेले आहेत. असे सांगतात की, देवीचे तेज कधी कमी होत असलेले शंकराचार्यांच्या नजरेस आले आणि त्यासाठी त्यांनी हे अष्टलक्ष्मीचक्र देवीपुढे ठेवले. त्यामुळे पूर्वतेज प्राप्त झाले.

दक्षिण भारतामध्ये या अष्टलक्ष्मीच्या नावाची दुसरीही एक कारिका प्रचारात आहे, ती येणेप्रमाणे,

गजलक्ष्मी, सामान्यलक्ष्मी, इंद्रलक्ष्मी, महालक्ष्मी, वीरलक्ष्मी, कोलारलक्ष्मी, लक्ष्मी व महीलक्ष्मी. या सर्वांमध्ये गजलक्ष्मी हीच जास्त लोकप्रिय आहे. महालक्ष्मीचे स्वरूपामध्ये मस्तकावर नेहमी मातु लिंग असते.

( भा. सं. को. १।२१४ )

काचीपेड्ड, काञ्ची, काची, काचीपुरम् अशी नावे या क्षेत्राला आहेत. पल्लवराजाचे कारकीर्दीत या ठिकाणी शैव, वैष्णव, जैन, बौद्ध या चारी प्रकारची मंदिरे होती, हे विशेष होय. महेंद्रवर्मा ( पहिला ) राजा ( सन ६०४-६३० ) याने गिरिगव्हरात खोदकाम करून अनेक मंदिरे बांधली, यामुळे त्याने 'चेट्टकरी' म्हणजे मंदिरे बांधणारा राजा अशी उपाधी घेतली होती. याचा मुलगा नृसिंहवर्मा ( ६३०–६६८ ) याने महाबलीपुरम् या क्षेत्री पाषाणात कोरलेली सात रथ मंदिरे बांधली, त्यांना पांडवमंदिरे म्हणतात नृसिंहवर्मा, दुसरा ( ६९७–७२२ ) या राजाने काची येथे कैलासनाथ व महाबलीपुरम् येथे अनेक मंदिरे बांधली.

असे म्हणतात की, चिनी प्रवासी ह्युएनत्संग याने या क्षेत्राला भेट दिली असून, असे वर्णन केले आहे की, या शहराचा विस्तार १४ मैलाचा असून, गौतमबुद्धाने येथे भेट दिली होती. आपल्या पंथाचा भरपूर प्रचारही केला होता सम्राट अशोक राजाने यास्तव या क्षेत्री अनेक स्तूप बांधले असून, सुमारे शंभर संघराम, आणि दहा सहस्र महायान पंथाचे भिक्षु येथे वास्तव्य करून होते.

यामुळेच या क्षेत्री तांत्रिकाचा फार मोठा अड्डा होता. पण पुढे आद्य शंकराचार्यांनी बौद्ध धर्मीयांचे उच्चाटन कार्य हाती घेतल्यानंतर क्रमाक्रमाने त्यांचे प्राबल्य कमी केले आणि देवीची पूजा वेदोक्त पद्धतीने अमलात आणली या साठीच मंदिरात त्यांनी श्रीचक्राची स्थापनाही केली

एकाम्राचे मंदिर पल्लव राजवंशाच्या वेळी बांधले गेले. पतंजली हे इसवी सन दुसऱ्या शतकात झाले. त्यांच्या पाणिनीच्या व्याकरण टीकेमध्ये या क्षेत्राचा उल्लेख आढळतो महाद्वारावरील गोपूर १८८ फूट उंचीचे असून, त्याला दहा माळे आहेत सभामंडप सहस्र खांबी असून, या क्षेत्रीचे वैशिष्ट्य असे की, शिवलिंगावर येथे जलाभिषेक होत नसून, फक्त परिमळ द्रव्याचा लेप लावला जातो

कामकोटी पीठ तयार झाल्यावर तंजावर येथील राजे प्रतापसिंह यांनी पीठाच्या शंकराचार्यांना निमंत्रण दिल्यावरून ते तिकडे गेले आणि स्वामींनी

तेथे कायम वास्तव्य करून राहावे म्हणून त्यांना कामाक्षीचे मंदिर बांधून दिले. काही काळाने स्वामींना कुंभकोणम् हे स्थान पसंत पडले. शके १७४३ साली सर्फोजी राजाने त्यांना कुंभकोणम् या गावी मठ बांधून दिला. याप्रमाणे कामकोटीपीठ पुढे पुढे सरकत गेले.

कामाक्षी ही वायुरूपिणी रुद्रशक्ति असल्याने, ती रोज रात्री कराल रूप घेऊन नगरसंचार करीत असे. रूप इतके भयंकर असे की, ज्याच्या नजरेस ती पडे, तो तात्काळ गतप्राण होई. केवळ छायेनेही बायका-मुले निश्चेष्ट पडत[1]; यामुळे नगरवासी भयभीत झाल्याने, शहर ओस पडण्याची वेळ आली. ही वार्ता शंकराचार्यांना समजल्यावर, त्यांनी मोठा यज्ञसमारंभ केला, व करुणा-स्तोत्रही रचले. त्यामुळे देवी प्रसन्न झाली आणि 'वर माग' असे म्हणताच, आचार्य म्हणाले, 'हे देवी, यापुढे तू माझे आज्ञेवाचून मंदिरातून बाहेर पडू नये व नगरसंचारही करू नये.' कामाक्षीने, 'तथास्तु' म्हटले आणि तिचा संचार बंद झाल्याने, लोकांचा उपद्रव नष्ट झाला. शंकराचार्यांचे हे उपकार भक्तगण आजही विसरलेले नाहीत. वार्षिक उत्सवाच्या वेळी देवीची पालखी नगर प्रदक्षिणेला निघतेवेळी, मंदिराचे महाजन प्रथम शंकराचार्यांच्या मूर्तीपुढे पालखी उभी करून, अनुज्ञा घेऊन मगच प्रदक्षिणेला बाहेर पडतात.

(मा. सं. को. २।२१२)

यावरून इतर क्षेत्री पालखी काही देवतासमोर अगर ठराविक स्थळी थांबवून, तेथे पूजाअर्चा करून अगर त्या त्या ठिकाणची योग्य संभावना करून ती पुढे जाते, ह्याचा अर्थ समजू शकतो. उदाहरणार्थ, गोरेगाव ( मुंबई ) येथील अंबादेवीची पालखी चैत्र पौर्णिमेस गावफेरीसाठी बाहेर निघते. निघतेवेळी प्रथम तिच्या शेजारी असलेल्या मातंगी मंदिरासमोर थांबविली जाते. हे मंदिर अंबादेवी स्थापन होण्यापूर्वीचे आहे म्हणून वडिलकीचा मान तिजकडे जातो. या ठिकाणी अंबादेवीची पूजा होते आणि नंतर पालखी निघते. याचा अर्थ हाच की, मातंगी देवीला भेट देऊन तिची अनुज्ञा घेऊन अंबादेवी गावफेरीला निघते. तसेच मार्गावर काही ठिकाणी पालखी थांबवून कोठे नारळ तर कोठे खणानारळाची ओटी द्यावी लागते. म्हणजे मार्गावरील त्या त्या देवतांचा भाग अर्पण करून निर्विघ्नमार्गाने ती पुढे जाते. आपण अनेक रूढि पाळतो, पण त्याचा अर्थ व त्यामधील इतिहास आपल्या ध्यानात आला तर त्या रूढी का आचराव्यात ह्याचा उलगडा होईल.

१ ग्रीक पुराणात गार्गान देवीची दृष्टि ज्यावर पडे, तो पाषाणरूप होत असे, अशी कथा आहे.

देशपरत्वे आणि स्थानपरत्वे अनेक रूढी असतील, त्याचा उलगडा त्या त्या परिस्थितीप्रमाणे करता येईल.

आद्य शंकराचार्य आपल्या धर्मप्रचारार्थ फिरत फिरत एकदा कैलास पर्वतावर पोहोचले. त्यानी शंकराची आराधना केली. नंतर त्याना पाच स्फटिक लिंगे त्या ठिकाणी मिळाली. त्यानी त्या लिंगाची स्थापना पुढीलप्रमाणे केली,

( १ ) शृंगेरी मठ–भोगलिंग ( २ ) केदारनाथ–मुक्तिलिंग ( ३ ) नेपाळ–वीरलिंग ( ४ ) कुंभकोणम्–योगलिंग ( ५ ) चिदंबरम्–मोक्षलिंग.

दक्षिण भारतामध्ये शंकराची पंचतत्त्वाची पाच लिंगे आहेत. ती येणेप्रमाणे,

( १ ) कांची–पृथ्वीतत्त्व, ( २ ) जंबुकेश्वर–आपतत्त्व ( ३ ) तिरुवन्न-मलाई–अग्नितत्त्व ( ४ ) कल्हस्ती–वायुतत्त्व, ( ५ ) चिदंबरम्–आकाशतत्त्व.

चेट्टी हा समाज कामाक्षी देवीचा उपासक आहे या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी आजवर पंधरा लक्ष रुपयावर खर्च केलेला आहे. नंबुद्रि ब्राह्मणवर्ग या देवीचा पुजारी आहे. एका ल्हानशा मंदिरात पांडवांची पूजा होते. रेणुकेचे मंदिर आहे. याच देवीला द्रविडिअन लोक मारीदेवी म्हणतात.

अशी वदता आहे की, या पीठामध्ये चौसष्ट योगिनींची माहिती आहे. हस्तलिखित पोथ्या आहेत, पण त्याचे संशोधन झालेले नाही.

शिवकांचीपासून विष्णुकांची हे निराळेच क्षेत्र आहे, हे आपण प्रथमच पाहिलेले आहे दोन्ही क्षेत्रे जवळजवळ असल्याने अनेक वेळा भक्ताचा गैरसमज होतो. तो तसा न व्हावा म्हणून मुद्दाम उल्लेख केलेला आहे.

या क्षेत्री १०८ शिवस्थळे, १८ विष्णुस्थळे आणि १००८ गणेशस्थळे असल्याचे सांगतात विष्णुकांचीत वरदराजाचे टेकडीवरील मंदिर व इ.स. ६७४ साली पल्लव राजानी बांधलेले कैलास मंदिरही पाहाण्यासारखी आहेत.

( कल्याण क्षेत्र अंक १९५७, अय्यरचा ग्रंथ, Immortal India, by Shri. Dave कल्याण शक्तिअंक १९३४ )

मंदाक्रांता

> प्राप्त कांची प्रथम उठतां ध्यासता काशि कांची ।
> कामाक्षीचें प्रथित स्थळ हें दक्षिणेला असेची ॥
> उत्पत्तीची अभिनव कथा देतसे स्कंद ग्रंथ ।
> भूपृष्ठाची अखिल जनता जाणते शक्तिपीठ ॥ १ ॥

एकेकाळी शिव आणि सती सोंगटी खेळ खेळे।
अग्नीसूर्या परिस नयना शंभुचे झाकियेलें ॥
तेणायोगे धरतिवरती लोपली धर्मकृत्यें।
प्रायश्चित्ता म्हणुनि शिव दे शापुनी त्या सतीतें ॥ २ ॥
कंपातीरीं तप मग करी वालुका लिंग पूजी।
कायाशुद्धी परिणत किती पाहण्या युक्ति योजी ॥
शंभू लोटी जलप्रलय तो ध्यानमूर्ती हराया।
सालुंकीला सति कवटळी, रक्षिण्या देवराया ॥ ३ ॥
स्वार्थी आशा नच उपजली आपुल्या रक्षणाते।
कायाशुद्धी प्रलय समयीं रक्षितां लिंग होते ॥
संतोषोनी शिव प्रकटतो स्वीकरी पार्वतीला।
कामाक्षीच्या परम सुखदा वंदितो मीं पदाला ॥ ४ ॥
पाही येथे तरुतलवटीं नाथ एकांबराही।
कामाक्षीच्या पदतळिं वसे श्रेष्ठ श्रीचक्र पाही ॥
कामाकोटी तुजसि नमितो शंकराचार्य आद्य।
स्वैराभावे गमन करण्या रोखितो देवि पाद ॥ ५ ॥

* * *

(१७) कालीमाता

देव्या ध्यानं प्रवक्ष्यामि सर्वदेवोपसेविताम्।
अञ्जनाद्रिनिभां देवीं करालवदनां शिवाम् ॥
मुण्डमालावकीर्णांसां मुक्तकेशीं स्मिताननाम्।
महाकालहृदम्भोजे स्थितां पीनपयोधराम् ॥
सद्यश्छिन्नशिरः खड्गवराभीतिकराम्बुजाम्।

(रुद्रयामल रहस्य)

भावार्थ असा की, कालीदेवींचे ध्यान मी सांगतो, की ती सर्व देवानी सेवित अशी आहे. तिचे शरीर काजळाच्या पर्वताप्रमाणे असून मुख कराल आहे. गळ्यात मुण्डमाला, केस मोकळे, ओठावर मंद स्मित असून, महाकालाचे हृत्कमलावर उभी आहे. स्तनभाग पुष्ट आहे. एका हाती रक्ताचे थेंब ठिबकत असलेले नरमुण्ड व दुसरे हाती तलवार आहे. दुसरे दोनही हात अभय व वरद मुद्रांकित आहेत.

पुराणांतरी या देवीचे वर्णन असे मिळते की, कृष्णवर्ण, चतुर्भुज, एका हाती तलवार, दुसऱ्यात नरमुण्ड आहे. गळ्यात नरमुण्डाची माला, कमरेला मृत माणसांच्या हाताची बनविलेली मेखला, रक्तनेत्र, मुखातून बाहेर आलेली लांब जीभ, मुख व हृदय रक्ताने माखलेले, एक पाय शिवाच्या छातीवर व दुसरा आपल्या मांडीवर ठेवून उभी आहे.

सा लोमास्थि स्वैरं पललमपि मार्जारमसि ते ।
परं चोष्ट्रं मेषं नरमहिषयोश्छागमपि वा ॥
बलिं ते पूजायामपि वितरतां विरलवक्त्रे वितरताम् ।
सतां सिद्धिः सर्वा प्रतिपदमपूर्वा प्रभवति ॥

(कर्पूरादिस्तोत्र १९).

याचा भावार्थ हा की, हे विरल वक्त्रे कालीदेवी, केश व अस्थी यांच्यासहित बोका, उंट, मेंढा, मनुष्य, रेडा व बकरा यांच्या मांसाचे पूजाविधानसमयी बलिदान करणाऱ्या साधकांना पावलोपावली अपूर्व सिद्धि प्राप्त होतात.

या सहा पशूंचे बलिदान करावयाचे, याचा आध्यात्मिक अर्थ असा की, क्रमाने लोभ, मत्सर, मोह, मद, क्रोध आणि काम या सहा रिपूंचे बलिदान करावयाचे, म्हणजे सिद्धि प्राप्त होतात.

कालीदेवी शिवाची पत्नी असून, तिचे ते उग्ररूप होय. या देवीचे वर्णन प्राणतोषिणी ग्रंथात पुढीलप्रमाणे दिले आहेत.

कालसङ्कलनात् काली सर्वेषामादिरूपिणी ।
कालत्वादादिभूतत्वादाद्या कालीति गीयते ॥

भावार्थ असा की, हे देवी, तू आपल्या ठिकाणी काळाचे संकलन करतेस. तू सर्वांना आरंभरूप असून, कालत्व म्हणजे ज्या गुणाचा स्वीकार करून काल उत्पन्न होतो, ते गुण तूंच आहेस. काळाचा प्रारंभही तुझ्यापासूनच होतो, म्हणून तुला आद्यकाली असे म्हणतात.

तंत्रालोकात या देवीची व्याख्या निराळीच देतात

काली नाम परा शक्तिः सैव देवस्य गीयते ।

भावार्थ असा की ब्रह्माची नित्य क्रियाशक्तिरूप जी पराशक्ति तीच काली देवी होय. दुसऱ्याही अनेक उत्पत्ति कथा आहेत. चंडमुंडाबरोबर जगदंबेचे युद्ध चालले असता, क्रोधाने तिच्या भुवया वर चढल्या, त्यातून या

देवीची निर्मिती झाली. (मार्कंडेय पुराण, ८७-५). दारूक नावाच्या असुराचे मरण केवळ स्त्रीच्या हातूनच होते. तेव्हा त्याला मारण्यासाठी शंकरांनी कंठातल्या विषातून या देवीला उत्पन्न केले (लिंग. पु., ३९-७२). महामायेच्या कुक्षीतून या देवीचा जन्म झाला (कालिका पु.). देवासुराच्या युद्धामध्ये देवांचा पराभव झाल्यावर सर्व देव ब्रह्मा-विष्णु-महेशांना शरण गेले. त्यांनी महाकालीची प्रार्थना केली असता, तिने ज्या बारा देवींची उत्पत्ती केली, त्यामध्ये काली पहिली होय. म्हणून ती आद्यकाली समजली जाते (बृहन्नीलतंत्र ४२).

तंत्राध्यायामध्ये कालीचे नऊ भेद सांगितले आहेत. दक्षिणाकाली, भद्रकाली गुह्यकाली, कामकळाकाली, धनकालिका, सिद्धिकाली व चंडिकाली यांप्रमाणे होत. यापैकी दक्षिणाकालीचे स्वरूप बंगालमध्ये लोकप्रिय आहे. ती कृष्णवर्णी, चतुर्भुज व विकटहास्य करणारी आहे. भद्रकाली ही क्षुधित खोल डोळ्यांची, काळ्या दातांची आणि सतत रडत मुग्न आहे. गुह्यकाली अथवा गुह्यकाली ही कृष्ण वस्त्रांकित असून सर्पशय्येवर पहुडली आहे. तिचे डोळे खोल, दात भयानक व जिव्हा लळलळती असून ती मद्यपान करीत असते. सिद्धिकालीचे स्वरूप दक्षिणाकालीप्रमाणे असून आपल्या खड्गाने चंद्रमंडळाला छिद्र पाडलेले असून त्यातून स्रवणाऱ्या अमृताने ती न्हाऊन निघत आहे. डाव्या हातामधील कवटीने ती अमृताचे प्राशनही करीत आहे. स्मशानकालीचे रूप म्हणजे कृशांगी, त्रिनेत्र, नग्न आणि मद्यपानाने धुंद असे आहे. रक्षाकाली हीच चतुर्भुज असून, तिच्या जटामधील केसांची बट स्वर्गाला स्पर्श करीत आहे. डावा पाय प्रेताच्या छातीवर व उजवा सिंहाच्या पाठीवर अशा अवस्थेत ती उभी असून गळ्यामध्ये नागफणी आणि कमरेभोवती व्याघ्रचर्म परिधान केलेले आहे. महाकाली ही आसनस्थ असून, गळ्यात मुंडमाळा आणि हातात अनेक शस्त्रे असतात.

करते आपल्या साधकाच्या कर्मबंधाचे प्रतिक म्हणून शवाचे हात तोडून, तिने आपल्या कमरेभोवती मेखला केली आहे गळ्यातील रुंडमाळा ही शब्दब्रह्माची प्रतीक वर्णमाला होय. निरुत्तर तंत्रात या माळेतील मुंडाची संख्या ५० सांगितली आहे यासंबंधी कामधेनु तंत्रामध्ये स्वयंकाळी देवी म्हणते,

मम कण्ठे स्थित बीज पंचाशद्वर्णमद्भुतम् ॥

माझ्या गळ्यात ५० वर्णांच्या रूपाने अद्भुत सृष्टीचे बीजमंत्र ठेवलेले आहे. या ठिकाणी कोणी साधक ५२ वर्ण आहेत अशी धारणा धरतात
(भा. सं. को २।३०२)

वरीलप्रमाणे स्वरूपाची माहिती घेतल्यावर, कालीमाता या देवतेचा इतिहास पाहण्यापूर्वी आपणाला प्रथम तुळशी शंखचूड याचा इतिहास पाहावा लागेल हा भाग पाहिल्यावर मगच कालीमातेचा सूत्रबद्ध इतिहास ध्यानी येण्यास मदत होईल

प्राचीन काळी धर्मध्वज राजा आणि त्याची पत्नी माधवी याना तुळशी नावाची कन्या झाली कार्तिक पौर्णिमेला तिचा जन्म झाला बालपण घरीच गेल्यावर आपल्याला उत्तम पति मिळावा म्हणून ती बदरी वनात गेली आणि तेथे तपश्चर्या करू लागली तिला आपल्या पूर्वजन्माची आणि शापाची आठवण होती अनेक वर्षे तपश्चर्या केल्यावर साक्षात् ब्रह्मदेव प्रकट झाले आणि त्यांनी तिला दर्शन दिले तुळशी ब्रह्मदेवाना म्हणाली, " पूर्वजन्मी मी गोलोकामध्ये तुळशी नावाची दासी होते तेथे भगवान श्रीकृष्णाची प्रिया, अनुचरी, प्रेयसी होण्याचे भाग्य मला लाभलेले आहे असे असताना एकदा रासक्रीडेच्या वेळी राधेने मला व श्रीकृष्णाला एकत्र पाहून शाप दिला की, ' माझा जन्म मानव योनीत घडेल ' शाप मिळाल्यावर मला त्याचा अर्थच समजेना कारण मी कोणतेही पाप अथवा अविचार केलेला नव्हता असे असता राधेने मला शाप का द्यावा ? मी करुणामय दीनदुबळ्या नेत्रानी गोविंदाकडे पाहिले पण, त्यानाही शापाबद्दल काही बोलता येईना गोविंदानी एवढेच आश्वासन दिले की, ' भारतभूमीत जन्म झाल्यावर काही दिवसानी माझा विवाह अशा पुरुषोत्तमाबरोबर होईल की, ज्यामध्ये श्रीकृष्णाचा अंश असेल ' याकरिता तिने ब्रह्मदेवाजवळ अशी प्रार्थना केली की, ' वरील विधानानुसार मला असा नारायणस्वरूप मानव दाखवा की, ज्याच्याबरोबर मी लग्न करू शकेन '

ब्रह्मदेव म्हणाले की, गोलोकातील श्रीकृष्णाचा सवंगडी सुदाम गोप राधेच्याच शापाने भूतलावर जन्मास आला आहे. त्याला शाप मिळण्याचे कारण असें की, त्या दोघांचा एकदा संवाद चालला असता सुदाम म्हणाला, 'श्रीकृष्णाचें अंतरंग फक्त मलाच समजते, इतर कोणालाही नाही.' राधा म्हणाली, 'तुझे हे म्हणणे मला मान्य नाही.' सुदाम्याला श्रीकृष्णप्रेमाचा अहंकार झालेला आहे, असें समजून तिने त्याला शाप दिला की, 'तुझा जन्म भूतलावर दानव योनींमध्ये होईल. तोच सुदाम गोप भूतलावर शंखचूड या नावाने जन्मास आलेला आहे आणि तोच तुझा पति होण्यास योग्य आहे.'

(ब्रह्मवैवर्त, कृष्ण अध्याय ३.)

नंतर तुळशीने शंखचूडाचा शोध चालविला आणि काही दिवसांनी तिला तो बदरी वनातच अचानकपणे भेटला. दोघांची पूर्वजन्मीची ओळख पटली, त्यांचा विचारविनिमय झाला, दोघांची मने जुळली आणि ती दोघे विवाहबद्ध झाली.

विवाहानंतर शंखचूडाची महती वाढली. तो फार प्रबळ झाला. भूमीवरील सर्व राजसत्ता त्याने हस्तगत केली आणि देवादिकांचे अधिकारही अपहरण केले. भूतलावर त्याला कोणीही शत्रु उरला नाही, संत्रस्त झालेले देव विष्णूकडे गेले आणि उपाययोजना करण्याबद्दल त्यांनी त्यांची प्रार्थना केली. विष्णु आणि इतर देव यांनी आपले सर्वाधिकार शंकराकडे सोपविले, त्यांनी शंकरांना एक अमोघ त्रिशूळ दिला आणि शंखचूडाचे निर्दालन करण्याबद्दल त्यांची विनवणी केली युद्धापूर्वी समेट झाला तर पहावा म्हणून शंकरांनी शंखचूडाला, सुंदर वनामध्ये पुष्पभद्रा नदीच्या किनारी, अक्षय वटाखाली भेटीसाठी निमंत्रण केले. नियोजित स्थळी भेट झाली दोघांनी समजूतदारपणे आपल्या कार्यांचा ऊहापोह केला. शंखचूड देवांबरोबर युद्ध करण्यास का प्रवृत्त झाला याचे कारणही त्याने शंकरांना निवेदन केले. शापमुक्त होऊन त्याला तात्काळ गोलोकाप्रत जावयाचे होते.

नाही असे जाणून ती समरांगणातून शंकराकडे गेली आकाशवाणीचा आशयही तिने त्यांना कळविला.

पुढे विष्णु आणि महेश यांचा विचारविनिमय झाला विष्णूने कृष्णकवचाचे हरण करण्याचे आणि तुळशीचे पातिव्रत्य भ्रष्ट करण्याचे काम पत्करले. शंकर स्वत युद्धास निघाले. श्रीहरीने कपटनीतीचा अवलंब करून, ब्राह्मणाच्या वेषाने शंखचूडाजवळ कृष्णकवचाचे दान मागितले. मोठ्या उदार मनाने दैत्याने ते प्राणरूप कवच अतिथीला दिले. त्यानतर श्रीहरि शंखचूडाचे रूप घेऊन तुळशीकडे गेले. आपला पति युद्धात विजयी होऊन आला, अशा भोळ्या समजुतीने तुळशीने त्या पतिरूपाचे स्वागत केले हास्यविनोद झाला आणि नतर त्या दोघांच्या प्रणयचेष्टाही झाल्या. कारण तुळशीला पतीच्या विजयाबद्दल आनद झाला होता यांप्रमाणे तुळशीचे शील भ्रष्ट करून श्रीहरि परतले

समरांगणावर शंकराचे शंखचूडाबरोबर युद्ध चालूच होते. शंखचूडाचे तेज कमी कमी होत चालले. शंकराच्या अस्त्रापुढे त्याची अस्त्रे फिकी पडू लागली अशा वेळी शंकरानी काली देवी उत्पन्न केली आणि दोघानी मिळून अमोघ त्रिशूळाच्या साहाय्याने शंखचूडावर अखेरचा हल्ला चढविला. कृष्णकवचाचे दान करून शंखचूडाने आधीच आपले प्राण देवाना अर्पण केले होते शरीरावर हल्ला होताच, प्राण नसलेले शरीर सावडतोन खाली कोसळले शंखचूड मारला गेला असे सागतात की, शंखचूडाच्या हाडापासून शंखाची उत्पत्ति झाली आणि म्हणून तो पूजनीय मानला जातो इतकेच नव्हे तर पूजेच्या वेळी देवावर शंखोदक घातले जाते, कारण तो विष्णूचाच अंश होता.

युद्ध करताना बेभान झालेली देवी विजयोन्मादात नृत्य करू लागली. मारलेल्या राक्षसाच्या मुडक्याची माळ तिने गळ्यात घातली, कित्येक राक्षसाचे रक्त ती प्याली आणि आपली संहारतृष्णा तिने भागविली राक्षसाची मुडकी हातात घेऊन ती नाचू लागली हे मानवसंहाराचे प्रतीकच मानले जाते काली देवीची प्रतिमा ह्याच स्वरूपात काढली जाते. अशी ही कालीदेवीच्या उत्पत्तीची कथा आहे.

काली नावाबद्दल एका पाश्चात्य लेखकाने खालीलप्रमाणे व्युत्पत्ति दिली आहे,

As in the western world, so in India, there was a constant tendency to convert names into persons, and then to frame for them a mythical history in accordance with their meaning Thus two

of the ever flickering tongues of the black pathed Agni were called Kali (the black) and Karali (the terrific), and these names became of Durga the wife of Shiv, who was developped out of Agni, and the bloody sacrificial worship was the result. (P. 11).

तात्पर्य, अग्नीच्या ज्योतीची जी अनेक नावे आहेत, त्यापैकी एक काली आहे आणि तेच नाव अग्नीपासून उत्पन्न झालेल्या दुर्गादेवीला देण्यात आले. अशा रीतीने नावे संबोधण्याचा प्रकार पाश्चात्य जगातही होत असे.

हा लेखक पुढे म्हणतो की, काली देवीचे हे ओबडधोबड भयानक स्वरूप पेलेन येथील आर्टिमिस देवतेसमान आहे. काही पुराणकाराच्या मते आर्टिमिस देवीचे स्वरूपच आशिया मायनर, ग्रीसमधून रोममार्गे बंगालमध्ये भक्तावरोवर आले असावे (पृ. १२). लोखंडी हुकाार टागून घेऊन बगडाना नवस फेडणे अगर देवदासी असणे, बकऱ्याचा बळी देणे अशासारख्या चालीरीती पूर्वी असीरिया, बॅबिलोन, फोनेशिया इत्यादि देशात इष्टर, नाना अस्टार्टे मंदिरातून चालत असत. त्याच साप्रत कालीदेवीसारख्या मंदिरातून आढळतात. पण इतरत्र तो प्रकार नाहीसा झाला आणि भारतामध्ये मात्र या ना त्या स्वरूपात शिल्लक राहिलेला आहे (पृ. २६).

(The Brahmins, Theists and Muslims in India, by John Campbell Oman).

कलकत्ता येथे कालीदेवीची एकुण चार मंदिरे आहेत.

(१) आदिकाली मंदिर—टोलीगंज बसनाक्यापासून सुमारे एक मैलावर, शहराच्या साधारणतः बाहेर हे काली मंदिर आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूला उच चबुतऱ्यावर एकादश रुद्र मंदिर आहे. या देवतेलाच कोणी शक्तिपीठ मानतात. या देवीला कोणी भद्रकाली असेही म्हणतात. (कल्याण क्षेत्रअंक, ५७–१७९)

(२) हुगळी नदीच्या काठ्यावर 'कालीघाट' या स्थानावर दुसरे मंदिर आहे.

(३) कालीघाटापासून सुमारे चार मैल अंतरावर दक्षिणेश्वर काली-मंदिर आहे.

(४) शामबजार (बहुबजार) मध्ये ठणठणीया कालीचे एक मंदिर आहे.

गंगा नदीच्या काठ्यावर भव्य घाट बांधलेला आहे. कालीदेवीचे मंदिर या घाटावरच आहे. म्हणून हा घाटाला कालीघाट असे म्हणतात. सतीच्या

उजव्या पायाची अंगुली या ठिकाणी पडली, म्हणून हे शक्तिपीठ मानतात. या स्थानाची देवी काली आणि भैरव नकुलेश अथवा नालिष हा आहे. शरिराचा अगदी शेवटचा अवयव—अंगुली—येथे पडली, म्हणून देवीला एकावन्न काली असेही म्हणतात. हे मंदिर केव्हा व कोणी बांधले, ह्याची सत्य हकिकत उपलब्ध नाही. पण सन १४९५ पासून कालीघाटावरील देवता आणि दक्षिणेश्वर येथील देवता ही दोन निरनिराळी क्षेत्रे आहेत असा उल्लेख मिळतो. यावरून ह्या मंदिराची स्थापना त्या कालापूर्वीची असावी असे अनुमान करण्यास हरकत नसावी.

या मंदिराच्या स्थापनेविषयी अशी कथा प्रचलित आहे की, कलकत्ता येथे पूर्वी जंगलगीर गोसावी नावाचा एक साधू रहात होता. प्राचीन मंदिर भूकंपाने नष्ट झाल्यानंतर एकदा त्याला स्वप्नात दृष्टांत मिळाला की, 'काली घाटावरील भूमीमध्ये एक देवता खाली गाडलेली आहे आणि लवकरच ती प्रकट होणार आहे.' स्वप्नात त्याला अशी सूचना दिली गेली की, 'एक आठवडाभर त्या भागात कोणी फिरकू नये, तोपर्यंत ती मूर्ति संपूर्णपणे प्रकट होऊन वर येईल.' दुसऱ्या दिवशी साधूने रात्रीच्या स्वप्नाचा संपूर्णत विचार केला आणि वाट पाहण्याचे ठरविले. पण मुदत पूर्ण होईपर्यंत त्याला धीर धरवला नाही. त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आणि दिलेल्या मुदतीच्या आतच तो स्वप्नात सूचित केलेल्या स्थळी गेला पाहतो तो काय आश्चर्य! त्या ठिकाणी देवीचे भव्य स्वरूप भूमीतून हळूहळू वर येत होते. साधारणत कमरेपासून वरचा भाग वर आलेला होता जंगलगीरला पाहताच मूर्तीचे उत्थापन थांबले. यामुळे जेवढे रूप वर आलेले होते तेवढेच आज काली मंदिरात वर्तमान आहे. पायाखालचा भाग दिसत नाही. येथील देवीचे स्वरूप दक्षिणेश्वर मंदिरासारखे नाही

भक्ताला दृष्टांत देऊन नंतर देवतेचे भूमीतून आगमन होणे असा प्रकार येथेच घडला आहे, असे नसून दक्षिण भारतामध्ये निंबर्गी (जि विजापूर) या गावीही तसेच घडलेले आहे. तेथे धनाई नावाची एक धनगर स्त्री रहात असे. तिला एकदा असे आढळून आले की, आपली गाय दुभती असूनही वेळेवर दूध देत नाही एकतर ते कोणी तरी काढून घेत असावे अगर एखादे वासरू बाहेरच्या बाहेर ते पीत असावे असा तिने तर्क केला पण या गोष्टीचा छडा लावताना तिच्या असे दृष्टोत्पत्तीस आले की, गाय बाहेर चरावयास गेली म्हणजे आपले दूध तेथे ती रानामध्ये एका वारुळावर सोडते या कारणामुळे धनाईला मुबलक दूध मिळत नव्हते. आता कारण सापडल्यावर तिने गायीला

घरात बांधून ठेवले आणि त्यामुळे वारुळावर दूध पडण्याचे थांबले. त्याचा परिणाम असा झाला की, धनाईला स्वप्नात दृष्टान्त झाला की, ' तुझी गाय ज्या वारूळावर दूध सोडीत आहे, त्या भूपृष्ठाखाली एक देवता असून तिला प्रकट होण्याची इच्छा आहे.* ' तिला असा आदेश मिळाला की, " तू त्या ठिकाणी एक मंदिर बांध. ते तयार झाल्यावर नऊ महिने त्याचे दरवाजे बंद ठेव म्हणजे त्यामध्ये देवता अवतरेल. ' धनाईने त्याप्रमाणे मंदिर बांधले आणि सूचनेप्रमाणे दरवाजे बंद ठेवले. बरेच दिवस गेले. पण धनाईची उत्सुकता आणि कुतूहल तिला स्वस्थ बसू देईना. जसे जसे दिवस वाढू लागले तसतशी उत्सुकता वाढू लागली. काही महिन्यानंतर मुदत पूर्ण होण्याच्या पूर्वीच तिने दरवाजा उघडला. त्यामध्ये तिला सीता-रामाची मूर्ति व शिवलिंग अर्धाकृति दिसले. सांप्रत त्या मूर्ति त्याच स्थितीत पाहावयास मिळतात. धनाईने ते मंदिर सन १४८० च्या सुमारास बांधले आणि सन १७३० च्या सुमारास भक्तांनी ते मंदिर वाढवून सभामंडप व सज्जे बांधले. कालीदेवींची वरील हकीकत आणि ही हकीकत दोन्ही समकालीन आहेत, हे विशेष होय ( विजापूर जिल्हा गॅझेट, २३।६६७ ).

शेंदुर्णी ( जळगाव ) तेथे भू-गर्भात त्रिविक्रमाचे मंदिर आहे. आठ-दहा पायऱ्या उतरून खाली दर्शनाला जावे लागते. तेथील मंदिर व मूर्ति मातीत गाडले गेले होते सुमारे इ. स. १७५० चे सुमारास त्या गावच्या तेली समाजातील कडुबा नावाच्या एका चारित्र्यवान पंढरीच्या भक्ताला स्वप्नात दृष्टान्त झाला की, ' माझी मूर्ति येथे गाडलेली आहे. ' कडुबाने खोदकाम केले. मूर्ति वर काढली आणि मंदिर बांधले ( पुरुषार्थ दिवाळी अंक १९६३ ).

मरी–होनावर ( उत्तर कानरा ) या ठिकाणी सन १६८५ मध्ये जोगपाया नावाच्या इसमाने जनार्दनाचे मंदिर उभारले आहे त्याची कथा अशी की, तो इसम एका जैन साधूच्या मृत्यूस कारणीभूत झाला आणि पापविनाश व्हावा,

---

*टीप— रत्नागिरीपासून २५ मैल अंतरावर गणपतिपुळे नावाचे गाव आहे तेथील मूर्ति-स्थापनेचा इतिहास असा की, तेथील केळकर उपनामे एका गृहस्थाची गाय रानात चरावयाला गेल्यावर नित्यक्रमाने एके ठिकाणी जाऊन त्यावर ती आपल्या दूधधारा सोडीत असे. काही दिवसांनी केळकरांना स्वप्नात दृष्टांत झाला की, ' मी येथे केतकी वनामध्ये पडून आहे, माझे मंदिर बांधले जावे. ' त्याप्रमाणे वरील जागेचा शोध करीत असता गायीने जागा दाखविली. त्या ठिकाणी खोदकाम केल्यावर गणेशाची मूर्ति आढळली आणि मंदिर बांधले गेले ( पुरुषार्थ, दिवाळी अंक १९६३ ).

म्हणून भक्ति करीत असता त्याला स्वप्नात दृष्टान्त झाला की, 'समोरच्या तळ्या मध्ये दोन मूर्ति आहेत, त्या बाहेर काढून स्थापना केल्यास पापनिरास होईल.' त्याप्रमाणे त्याने एक मूर्ति मठी गावी स्थापन केली आणि दुसरी लक्ष्मी-नारायण भटकळ येथे स्थापन केली. राजाने जनार्दन पूजेसाठी जमीन इनाम दिली. पुढे राजाला असे समजले की, मूर्तीचा एक हात तुटलेला असून तांब्याच्या तारेने सांधलेला आहे. यामुळे त्याने वर्षासन बंद केले, पण त्याच रात्री असा चमत्कार झाला की, स्वप्नामध्ये देव प्रकट झाला आणि त्याने राजाच्या श्रीमुखात दिली, परिणामत राजाचा गाल सुजला देवाच्या सामर्थ्याचा हा अनुभव घेतल्यावर राजाला चूक कळून आली आणि त्याने वर्षासन पुन्हा चालू केले (सारस्वत घराण्याचा इतिहास, ले. तल्मकी, पृ. १३४).

कालीदेवीचे स्वरूप अतिशय क्रूर आहे, असे पाश्चिमात्यांचे मत आहे मानवाची दुष्ट व रानटी आचरणाची कल्पना कितीही प्रगल्भ झाली तरी या देवीइतके क्रूर रूप त्याला निर्माण करताच येणार नाही. एका तंत्रग्रंथामध्ये या देवीचे असे वर्णन आढळते की, जबडा पसरलेला, अग्निसमान लाल नेत्र, कधीही न विंचरलेला असा पाठीवर सोडलेला कचसभार, चतुर्भुज, राक्षसांना ठार मारून त्यांच्या शिरकमळांची माळा कंठामध्ये मिरवीत असलेली, त्या मुंडक्यातून खाली गळणारे रक्त पिऊन मस्तवाल झालेली, कमलिनीच्या देठाप्रमाणे मृदु असलेल्या हातात तलवार परजित आहे, आकाशातील वर्षाऋतूतील मेघाप्रमाणे नीलवर्णी, कंठ रक्ताने माखलेला, कानामध्ये कुंडला प्रमाणे शोभणारी, दोन राक्षसाची मुंडकी, आणि हातात दोन मुंडकी घेतलेली, हसतमुख चेहरा, पण भेसूर भासणारी दंतपंक्ति, स्मशानात वास करणारी, आणि शंकराच्या छातीवर पाय देऊन उभी असणारी, इत्यादि इत्यादि

(मार्टिन पृष्ठ, १८५)

वरीलच्या विरुद्ध जाणकाराची खालील विचारसरणी पहा—

तंत्रविशारद ऑर्थर ॲव्हेलोनसाहेब या देवतेचे वर्णन करताना म्हणतात, 'उन्नत वक्ष स्थळ आणि कमरेखालील फुगवटा हा तिच्या श्रेष्ठ मातृत्वाचे निदर्शक होत ती श्रीमाता आहे विवस्त्र, सतत नेत्र, इतस्तत विखुरलेले केस, उग्र चेहरा असे भयाण ती रूप दाखविते उन्नत वक्ष स्थळाच्या भारामुळे, खाली वाकलेला कटीभाग सुवर्णाच्या कमरपट्ट्याने ती सावरून धरत आहे वक्ष स्थळातून येणाऱ्या दुधाने ती सर्व प्राणिमात्राचे पोषण करते याच अमृततुल्य पयाने ती साधकाना मुक्ति देते ती जरी विवस्त्र दिसत असली तरी पृथ्वीभोवतालच्या आवरणाचे वस्त्र ती नेसली आहे प्रत्येक कल्पाच्या अंती, जीवात्मे आपली शरीरे

सोडून देऊन ज्या प्रकारचे कर्म केले असेल त्याच गुणोपाधीने ब्रह्मरूपिणी स्वरूपात विलीन होतात. दुसऱ्या कल्पाचा आरंभ होईपर्यंत ते त्या ठिकाणी वास करतात, आणि त्या कल्पाला आरंभ झाला म्हणजे त्याच गुणोपाधीने म्हणजे कृतकर्मांच्या पापपुण्याचे गाठोडे घेऊन पृथ्वीवर पुन्हा अवतरतात. या महादेवीचा कटीभाग व प्राणिमात्राच्या उत्पत्तीचे जननस्थान, मेलेल्या जीवाच्या हाताची माला बनवून झाकलेला असतो. कारण बरेवाईट कर्म याच हातानी केलेले असते.

( ॲव्हेलोनकृत, कालीमन, पृष्ठे ४२-४४ )

श्री. न्यूमन यानी संपादित केलेल्या एका ग्रंथामध्ये देवताची निरनिराळी १८७ छायाचित्रे छापलेली आहेत त्यामध्ये कालीदेवीच्या स्वरूपाची तीनचार चित्रे आहेत. या ग्रंथकाराने काली देवीच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे. ते येणेप्रमाणे,

( १ ) काली देवीला अनेक हात असून अति दाहक अशा अग्निज्वाळाचे तिने आसन केलेले आहे. माणसाच्या उघड्या पडलेल्या पोटातील आतडी आधाशीपणे ती खात बसली आहे.

( २ ) काळरात्रीस्वरूप गडद काळे कपडे घातलेली, कटिभाग तुटलेल्या हाताच्या माळानी शोभनीत असलेली, रुंडमाळा कंठात धारण केलेली. शंकराच्या वक्षस्थळावर पाय ठेवून उभी असलेली, चतुर्भुज, एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात रक्ताचे भांडे घेतलेली, अनवधानाने पतीच्या शरीरावर पाय पडल्यामुळे लज्जायुक्त होत्साती दीर्घ जिव्हा बाहेर काढलेली, असे स्वरूप दाखविले आहे लेखक म्हणतो, ‘ तरीपण हे स्वरूप इतके भयानक नाही. ’

( ३ ) दोन भुजा आणि लवकर लोळणारा आणि मनात तिरस्कार, घृणा उत्पन्न करणारा स्तनभाग, वरवर पाहणाऱ्याला अत्यंत शांत दिसणारे, कमी भयानक वाटणारे स्वरूप, डावा पाय जरासा पसरलेला, कटाभोवती असलेला नागफणा एका हाताने चोपटीत असलेली, आणि एका नागाने कटी-भागावर वेढा घालून आपला जहरी फणा गर्भस्थानावर धरलेला असे स्वरूप दाखविले आहे. त्याच्या मताप्रमाणे हे स्वरूप जरी शांत भासत असले तरी ते भयंकर हानिकारक आहे. कारण ह्या स्वरूपात प्राणिमात्राच्या उत्पत्तीला आव्हान असून जगाची क्रिया रोखून धरण्याचा हेतु दाखविते. क्रेटन बेटातील एका देवीच्या चित्रात असाच एक सर्प देवीच्या मांड्याना वेढून बसलेला दाखविला आहे. दुसरा एक सर्प मॅक्सिकन देवीच्या शय्यावर आहे तर आणखी एक सर्प ग्रीक देवता गॉर्गन हिच्या कमरेभोवती विळखा घालून बसलेला आहे.

( न्यूमनकृत ग्रेट मदर )

कालीदेवीच्या एका बंगाली पुजाऱ्याने लेखकाला असा इतिहास सांगितला की, काली देवीच्या भव्य देहामुळे तिच्या पोटाचा आकारही मोठा आहे. पण तो आतून पोकळ आहे. वर्षांतून एकदा पुजाऱ्याकडून पोटाचा हा भाग उघडला जातो. त्या वेळी दरवाज्याची शिळा उघडतात त्या वेळी उघडणाऱ्याच्या नेत्रांवर अनेक घट्ट वेष्टणे असतात. नेहमीच्या सरावाने फक्त हातानीच काय ती क्रिया चालते. शिळा उघडल्यावर देवीच्या पोटातून एक मोठे कापडाचे गाठोडे बाहेर काढले जाते आणि त्यावरील अर्धेअधिक कापड सोडून घेतले जाते. देवीसाठी आलेली नवीन वस्त्रे पुन्हा त्यावर गुंडाळून पूर्वीचा आकार दिला जातो, आणि ते गाठोडे आतमध्ये ठेवले जाते. शिळा पुन्हा बंद केली जाते. हे कापडाचे गाठोडे पूर्णपणे उघडून कधीच पाहात नाहीत आणि पाहण्याची कोणी हिंमतही करीत नाहीत. कारण सर्व देवीभक्तांची अशी पूर्ण श्रद्धा आहे की, त्या गाठोड्याच्या मध्यभागी सतीचा अवयव-पदांगुली-ठेवलेला आहे. जुन्या कपड्याचे लहान लहान तुकडे केले जातात आणि भक्तजनांना प्रसाद म्हणून वाटतात. कोणी ते तुकडे दागिन्यांच्या पेटीत, तिजोरीत जतन करून ठेवतात. तर कोणी त्याचा ताईत बनवून गळ्यात धारण करतात. देवीच्या परिसरातील दरवाजे रात्री बंद असतात. आतमध्ये कोणालाही राहू दिले जात नाही.

कालीदेवीच्या उदरातील परमब्रह्मस्वरूप गाठोड्याचा वृत्तांत वाचला म्हणजे साहजिकच पुरी येथील जगन्नाथ मंदिराची आठवण येते. तेथेही या प्रमाणेच एक मूर्तीच्या उदरातून परमब्रह्मतत्त्व काढून दुसरीमध्ये ठेवण्याची रूढि आहे. ह्या जगन्नाथाच्या मंदिराचा पाया अनंतवर्मा कडरागा ह्याने घातला असे इतिहास सांगतो. या राजाने सन १०७८-११४७ पर्यंत राज्य केले. या क्षेत्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा यांच्या लाकडाच्या मूर्ति आहेत. ज्या वर्षी दोन आषाढ महिने येतील ( एक नेहमीचा व दुसरा अधिक मास ), तेव्हा ह्या मूर्ति बदलल्या जातात. या मंदिराचा प्रमुख पुजारी विद्यापतीच्या घराण्यातील वंशज असून, त्यानेच हे मूर्ति बदलण्याचे काम करावयाचे असते. गुप्तता राखण्यासाठी डोळ्यावर घट्ट वेष्टणे बांधून आणि हाताला कापड गुंडाळून, जुन्या जगन्नाथ मूर्तीच्या उदरातील 'परमब्रह्मतत्त्व' बाहेर काढून, नव्या मूर्तींच्या उदरात ठेवले जाते. कोणता पदार्थ काढला आणि कोणता ठेवला याचा गौप्यस्फोट न होण्याची अतिशय खबरदारी घेतली जाते. ह्या मूर्ति या ठिकाणी का आल्या, त्या लाकडाच्याच का आहेत इत्यादींबद्दलचा इतिहास फार मनोरंजक आहे. तो मूळ लेखात अगर अन्यत्र पहावा. ( चिं. ग. कर्वे, प्रसाद, ऑगस्ट १९६० ).

जगन्नाथाच्या उदरात जे परमब्रह्मतत्त्व ठेवण्यात येते त्याचा उल्लेख एके ठिकाणी मिळतो. तो असा की, भारतीय युद्धानंतर श्रीकृष्णाला बाण लागल्यावर

त्याने देहत्याग केला. शरीर अग्नीमध्ये ठेवल्यावर नाभीभागाव्यतिरिक्त इतर अवयव पंचमहाभूतांमध्ये विलीन झाले. अर्थात् अस्थींबरोबर हा न जळलेला भागही समुद्रात विसर्जन करण्यात आला. वहात वहात तो पूर्व किनाऱ्यावर नीलाचल पर्वताजवळ आला असता, त्या ठिकाणी इंद्रद्युम्न राजा तपश्चर्या करीत होता. त्याला दृष्टांत झाला की, 'माझा हा नाभीभाग व पार्थिव देहाचा अवशेष किनाऱ्यावर शोधून काढ आणि लाकडी मूर्तीमध्ये ठेवून, त्याची उपासना कर.' राजाने त्याप्रमाणे कृति केली. सांप्रतचे जगन्नाथाचे मंदिर १५ व्या शतकात गंगवंशीय राजा चोडंगदेव याने बांधले आहे, किंवा त्याच शतकाच्या अखेरीस राजा अनंग भीमदेव याने बांधले असे सांगतात.

मृतदेहाच्या अवशेषांची पूजा आर्य संस्कृतीमध्ये नाही. पाचव्या शतकात या क्षेत्री बौद्ध पंथियांचे वर्चस्व होते, तेव्हा जगन्नाथ हा देव मूळचा त्या पंथियांचा असावा; त्यावेळी बुद्धदेवाच्या दाताची रथातून मिरवणूक काढली जात असे, असे दिसते आणि तीच रथयात्रा सांप्रतही चालू असावी असे वाटते. वरील विवरणावरून परब्रह्मतत्त्वाचा उलगडा होतो.

(भा. सा. को. ३।५३०)

इतरत्र ज्याप्रमाणे नरबळीची रूढि होती त्याप्रमाणे काली देवतेलाही होती. कालिका पुराणातील रूढीसंबंधीचा एक भाग पहा. 'गेंडा अगर हरणाच्या मांसाचा नैवेद्य देवीला अर्पण केल्यास भक्त ५०० वर्षे आनंदीत राहतो. पण विधीपूर्वक एक नरबळी या देवतेला दिला तर एक सहस्र वर्षे आनंदित राहतो आणि तीन बळी दिल्यास तो एक लक्ष वर्षे आनंद उपभोगू शकतो. याप्रमाणे नरबळी अगर पशुबळी या देवतेला उपाहारासाठी दिल्यास ते रक्त अमृतासमान होय अशी भक्तांची श्रद्धा आहे, भावना आहे. बळी-मांसाचा नैवेद्य दाखविल्यानंतर तो प्रसाद ग्रहण करणे हे अमृतभोजन केल्या-प्रमाणे होय.'

बळी देताना जो मंत्र म्हणतात तो असा— "हे मेघांचा गडगडाट आणि विजेचा कडकडाट करणाऱ्या देवते, तुला माझा नमस्कार असो. हातामध्ये लोखंडाचा राजदंड धारण केलेल्या देवते, तुला माझा नमस्कार असो." उत्कर्ष व संपत्ति मिळविण्यासाठी राजे, त्यांचे प्रधानमंत्री, सल्लामसलतदार आणि मादक पदार्थांचा व्यापार करणारे व्यापारी यांनी नरबळी जरूर अर्पण करावा. त्या वेळी त्यांनी मंत्र म्हणावा की, "हे त्रिनेत्री देवते, तुला माझा नमस्कार असो. अत्यंत भयानक स्वरूप धारण करणाऱ्या देवते, कंठामध्ये रुंडमाळा आणि

हातात त्रिशूळ व कुऱ्हाड धारण करणाऱ्या देवते, तुला हा रक्ताचा नैवेद्य अर्पण करून मी नमस्कार करतो " एखाद्या शत्रूचा नाश व्हावा अशी प्रबळ इच्छा मनामध्ये उत्पन्न झाल्यास त्या गृहस्थाने आपल्या शत्रूच्या नावाने कालीदेवतेला बोकड अगर म्हशीचा बळी अर्पण करावा असे केल्याने शत्रूचा संपूर्णपणे नायनाट होतो अशी भक्ताची श्रद्धा आहे याच कारणास्तव दुर्गा पूजेच्या वेळी हजारो बकऱ्याचा बळी या देवतेला अर्पण केला जातो पुढे असेही सांगितले आहे की, बळी द्यावयाच्या प्राण्याचा रुंद पात्याची तलवार अगर तीक्ष्ण धारेची कुऱ्हाड याने फक्त एकाच घावांत प्राण घ्यावा

या वरील कारणासाठीच कालीदेवी हे शाक्तपंथीय लोकांचे प्रमुख पीठ मानले जाते देवीच्या साधकामध्ये दोन प्रमुख भेद आहेत एक कालीकुळ मानणारा व दुसरा श्रीकुळ मानणारा कालीकुळाचे साधक हे दिव्य आणि वीराभावाचे असतात श्रीकुळाचे साधक हे नित्य पूजा करणारे, ज्ञानप्राप्ती हेच ज्यांचे ध्येय आहे असे असतात काली, तारा, रक्तकाली, भुवना, मेदिनी, त्रिपुरा, त्वरिता, प्रत्यंगिरा आणि दुर्गा या नऊ देवता कालीकुळातील होत सुंदरी, भैरवी, बाला, बगळा, कमळा, धूमावती, मातंगी, सप्तरतिविद्या, मधुमति, महाविद्या या देवतांचा अंतर्भाव श्रीकुळामध्ये होतो या दोन्ही कुळातील देवता पैकी काही सत्वगुणात्मिका आणि काही रजोगुणात्मिका आहेत षट्कर्म साधनासाठी या देवतांची साधना करण्याचा प्रघात आहे

शारदातिलक ग्रंथामध्ये या षट्कर्म साधनाची माहिती खालील प्रमाणे आढळते

( १ ) ज्या कर्मांनी रोग, शत्रुकृति, मरणादि कार्ये आणि ग्रहांचे दोष नाहीसे होतात ती शांतिकर्मे समजावी ( २ ) वशीकरण शक्ति म्हणजे सर्वांना वश करून घेणे ( ३ ) ज्या प्रयोगाने दुसऱ्याची कार्यकरणशक्ति हरण केली जाते त्याला स्तंभन असे म्हणतात ( ४ ) मित्रत्वात, प्रेमसंबंधात संघर्ष, वितुष्ट निर्माण करणे याला विद्वेषण म्हणतात ( ५ ) एखाद्या माणसाला त्याच्या राहत्या जागेतून घालवून देणे अगर स्थानभ्रष्ट करणे याला उच्चाटन म्हणतात आणि ( ६ ) जी कर्मे केल्याने एखाद्या माणसाचे प्राण हरण केले जातात, त्याला मारण असे म्हणतात

देहो देवालय प्रोक्त, जीवो देव सदाशिव ।
त्यजेत् अज्ञाननिर्माल्य, सोऽहम् भावेन पूजयेत् ॥

कुलार्णव तंत्रामध्ये ह्याप्रमाणे वर्णन आढळते. शक्तिउपासनेत याप्रमाणे ज्ञान आणि कर्मकांड याचा संगम झालेला आढळून येईल.

कालीमातेच्या मंदिराच्या परिसरात **मुक्तकेसरी, रक्तांबरा** आणि **मुंडमालिनी** या देवतांच्याही मूर्ति आहेत. दुसऱ्या एका ठिकाणी **हजारभुजा** **कालीचेही मंदिर आहे.**

कालीमातेची इतर ठिकाणची मंदिरे पाहण्यापूर्वी कलकत्ता येथील तिसरे दक्षिणेश्वर कालीच्या मंदिराचे वृत्त आपण पाहू या. आपण वर पाहिलेच आहे की, दक्षिणेश्वर कालीचे मंदिर हे सन १४९५ पूर्वीचे आहे. रामकृष्ण परमहंसानी या देवीची ४० वर्षांवर अखंड सेवा केली. तपश्चर्येच्या शेवटी देवी प्रसन्न झाली आणि तिने रामकृष्णाना दर्शन दिले. रामकृष्णाच्या पश्चात् त्यांची पत्नी राणमणी हिने येथील मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि सध्या दिसत असलेले मंदिर दृश्य स्वरूपात आणले. रामकृष्णाचा पलंग, खडावा इत्यादि स्मृतिचिन्हे ह्या ठिकाणी जपून ठेवलेली आहेत. परिसराच्या भिंतीवर १२ शिवलिंगे स्थापना केलेली आहेत. कालीदेवीशिवाय ह्या ठिकाणी **सर्वमंगला** व **तारासुंदरी** यांच्याही मूर्ति आहेत. (कल्याण क्षेत्रअंक, ५७–१७९)

भगिनी निवेदिता या नावाची रामकृष्णाची एक परम शिष्या होती. अनेक वर्षे तिला स्वामींचा सहवास घडलेला होता. सन १८९९ साली 'काली, दि मदर' (Kali, The Mother) या नावाचे एक पुस्तक लिहून तिने ते प्रसिद्ध केले आहे. त्यामधील येथील कालीमातेचे वर्णन संक्षिप्तरूपाने खाली दिले आहे.

कालीदेवीचे स्वरूप म्हणजे माया व पुरुष यांचेच स्वरूप होय आणि याच कारणास्तव शिव हा कालीच्या पायाखाली असलेल्या स्थितीत दाखविलेला आहे. शरीर व आत्मा ही दोन भिन्न आहेत असेच तिला म्हणावयाचे आहे. मानवी संहार करीत असलेल्या आनंदमय स्थितीत तिचे तांडवनृत्य चाललेले आहे. आपल्या उग्र स्वरूपाचे दर्शन होण्यासाठीच तिने मुद्दामच तसे वातावरण निर्माण केले आहे. गळ्यामध्ये रुंडमाळा, हातामध्ये रक्तांकित तलवार, दुसऱ्या हातात नुकतेच तोडलेले राक्षसाचे मस्तक, त्यातून रक्त खाली गळत आहे असे, अजाणपणे आपल्या पतीच्या छातीवर उजवा पाय देऊन उभी आहे, पदस्पर्शाने शंकराना जाग येऊन त्यांनी आपली दृष्टि देवीच्या नेत्राना भिडविलेली आहे, आश्चर्य आणि लज्जा यामुळे देवीने आपली दीर्घ जिव्हा बाहेर काढलेली आहे. उजवा हात आशीर्वाद देण्यासाठी सदैव उत्सुक आहे. स्वरूप काळे व नग्न असले तरी दिसायला ते परम सुंदर दिसत आहे. केशकलाप मोकळा सुटलेला

असून तो तिच्या पाठीवर स्वैराचार करीत आहे. इ० इ० देवतेचे हे स्वरूप वास्तविक छायारूप आहे. तिचे काळे स्वरूप जन्ममृत्यूचे सत्यस्वरूपच दाखवीत आहे. परंतु शिवाला मात्र ती छायारूप भासत असून मातृस्वरूपच दिसत आहे. (काली, दि मदर, पृष्ठे ३४–३५.)

त्रिपुरारहस्यामध्ये वरील स्वरूपाबद्दल अधिक खुलासा आढळून येतो. शंकर आणि शंखचूड याचे युद्ध चालू असता, यश मिळण्यासाठी शंकरानी आदि-शक्ति त्रिपुरा देवीची स्तुति केली. त्यामुळे कालीदेवीची उत्पत्ति केली. त्रिपुराहुंकारेण काली समुत्पाद्य। युद्धाला निघण्यापूर्वी ती मदिरा पिऊन धुंद झाली आणि तशा त्या बेहोष स्थितीत कामासक्तही झाली. मैथुनासाठी तिने पतीची याचना केली. मनुनार्थे पतिं ययाचे। त्या वेळी त्रिपुरादेवीच्या आज्ञेने शंकरानी महाकाळाचे स्वरूप धारण केले. ते सुरा पिऊन मत्त झाले आणि नंतर त्यानी तिच्याबरोबर मैथुनाला सुरवात केली. तया सह मैथुन समारभे।

कामासक्त झालेली देवी किंचित् शांत झाल्यावर, देवानी शंखचूडाचा नाश करण्याची तिला प्रार्थना केली. त्याप्रमाणे देवीने तलवारीने अनेक दैत्यांचा वध केला. शंखचूडाला तिने ठार केले आणि त्याचे मांस भक्षण करण्यास तिने सुरुवात केली. विजयोन्मादात तिने तांडवनृत्य सुरू केले. त्या नृत्यामुळे अखिल ब्रह्मांड कंपायमान झाले आणि सर्वनाशाची भीति उत्पन्न झाली. तिला शांत करण्यासाठी सर्व देवानी त्या करालवदना देवीची प्रार्थना सुरू केली. त्यानी शेवटी महाकाळालाच तिला शांत करण्याबद्दल विनविले. नृत्य थांबविण्याचे सर्वांचे उपाय हरल्यावर महाकाळाने आपले शरीर राक्षसांच्या प्रेतांच्या ढिगाऱ्यात झोकून दिले. महाकालः तत्पादमूले शयनः। महाकाळाच्या छातीवर तिचा पाय पडला. ती लाजली आणि आश्चर्य आणि लज्जा यामुळे तिची दीर्घजिव्हा बाहेर आली. नंतर तिचे नृत्य थांबले. (त्रिपुरा रहस्य, अध्याय ४४)

तामीळ भाविक कालदेवीला कोरावई अथवा आयई नावाने संबोधितात. शत्रूवर विजय मिळावा म्हणून आयनार ही वन्य जमात या देवीचे पूजन करीत असे. 'शिलपादिकारम' या ग्रंथातील १२ व्या प्रकरणात संपूर्ण पूजाविधि दिलेला आहे. रात्री सर्वत्र सामसूम झाल्यावर या देवीचे पूजन करून नरबली अर्पण करीत असत. (ललिताकल्ट, ले. व्ही. आर्. रामचंद्रन्, दीक्षितार, पृ. ३)

नेपाळमध्ये खाटमांडू शहराच्या आग्नेय दिशेस १२ मैलावर दाक्षिणा-काली या नावाचे एक स्थान आहे. उच्च पर्वतराजीने वेष्टिलेले हे स्थान अत्यंत रमणीय आहे. मूर्ति चामुंडादेवीस्वरूपात असून मंदिरामध्ये ती एका उघड्या

चौकातच स्थापन केलेली आहे. रेडे, बकरी इत्यादि हजारो प्राणी या ठिकाणी बळी अर्पण करण्यात येतात. (नेपाळचा प्रवास, गायकवाड, पृ. ४४)

स्वामी अरविंदबाबू, सुभाषचंद्र बोस आदि अनेक राष्ट्रनेत्यानी आपले राष्ट्रकार्य सुरू करण्यापूर्वी, कालीदेवीची आराधना करून, तिचा आशीर्वाद मिळवून मगच कार्याला आरंभ केला आहे, असा उल्लेख त्यांच्या चरित्रामध्ये मिळतो.

अशा परमभक्तामध्ये गुरू गोविंदसिंह यांची निष्ठा वाखाणण्यासारखी आहे. शनिवार, ज्येष्ठ शु० ७ विक्रमसंवत् १७२३ साली यांचा जन्म पटणा या शहरी झाला त्यांच्या पिताजींचे नाव तेग बहादूर. सन १६६५ साली तेग बहादूर व त्यांचे शिष्य याना औरंगजेबाने कैद करून दिल्ली येथे नेल्यावर, प्रथम त्यांचे पाच नामवंत शिष्य दयाळ, भाई मतिदास इ० यांची हत्त्या उकळत्या पाण्याच्या कढईत टाकून अगर मस्तके करवतीने चिरून करण्यात आल्यावर, लक्षावधी हिंदूंच्यासमोर चांदणी चौकात औरंगजेब बादशहाच्या समोर आणि त्याच्याच आज्ञेने तेग बहादुराची मान तलवारीने उडविण्यात आली मरणसमयी तो बादशहाला म्हणाला, “सिर दिया, पर सार न दिया”, म्हणजेच शीर दिले पण धर्म सोडला नाही—देहाचा त्याग केला, पण सत्त्व दिले नाही.

असाच कडवा हिंदु पुढे सन १६८९ साली औरंगजेबाला भेटला त्याचे नाव छत्रपती संभाजी. राजाचा कनोजी दिवाण कवजी, याने दगाबाज पणाने राजांना संगमेश्वर येथील महालात पकडून दिल्यावर, त्याला तुळापूर येथे नेण्यात आले. राजकन्येचा स्वीकार केल्यास मरण चुकेल हे समोर दिसत असताना, “हाडाचा मराठा मरण पत्करील पण स्वधर्म सोडणार नाही” असे बाणेदार उत्तर दिल्यावर, संभाजींचे डोळे तापलेल्या सळयांनी फोडण्यात आले, आणि हालहाल करून ठार करण्यात आले.

पण असली स्वाभिमानी आहुती वाया जात नाही. तेग बहादुराच्या आहुतीमुळे त्याचा पुत्र गोविंदसिंह व शीख समाज यांना स्फुरण मिळाले, त्याचप्रमाणे संभाजीच्या क्रूर कत्तलीमुळे मराठयाना चेव आला व त्यांनी अनेक वर्षे औरंगजेबाबरोबर झुंज देऊन शेवटी सन १७०७ साली अहमदनगर येथे त्याला देह ठेवावा लागला.

आपले आध्यात्मिक बल वाढण्यासाठी प्रथम गुरु गोविंदसिंहाने हिमालयातील निर्जन गुहेमध्ये कालीदेवीची उपासना केली व तेथे त्याला तिच्या स्वरूपाचा साक्षात्कार झाला. काही दिवसांनी राष्ट्राच्या पुन्हा उत्थापनासाठी

होती. धर्मासाठी व राष्ट्रकार्यासाठी लोक मरण्यास तयार आहेत किंवा नाही हे त्यांना पाहावयाचे होते. थोड्या वेळाने गुरु त्या पाच यज्ञसमिधांना, म्हणजे दयाळ, हिंमत, मोहकम, धर्म आणि साहेबा यांना नव्या वेषात बाहेर घेऊन आले. त्यांच्या मुखांवर एक आगळेच तेज चमकत होते. प्रत्येक वेळी जो रक्ताचा लोंढा बाहेर आलेला होता, तो बळी दिलेल्या बकऱ्यांच्या रक्ताचा होता. गुरूने त्या पाच भक्तांना "पंच प्यारे" म्हणून संबोधिले आणि त्यांच्याच हाताने "खालसा" म्हणजे धर्मसाम्राज्याची स्थापना केली. प्रसाद म्हणून मिळालेल्या तलवारीच्या जोरावर गुरु गोविंदसिंहाने पुढे अचाट पराक्रम केला. आपले पाचही पुत्र अनन्वित हालाने शत्रूने ठार केल्यावर, वृद्ध माता व स्त्री यांचा क्रूरतेने अंत झाल्यावर, गुरू नांदेड येथे आले आणि तेथेच त्यांचा औरंगजेबाचा मुलगा कामबक्ष यांच्या हस्तकाने खून केला (दि. ७-१०-१७०८).

*शीख धर्माचे हे शेवटचेच गुरु होत. अंतसमयी त्यांनी आपल्या अनु*-यायासाठी 'दसग्रंथ' नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यामध्ये काली-देवीच्या साक्षात्कारासंबंधी स्वानुभव व प्रचिती 'चंडी चरितम्' या भागात वर्णन करून ठेवली आहे. तो भाग मुळातूनच वाचण्यासारखा आहे. काली-देवीच्या लीलांचे उत्तम वर्णन तेथे पाहावयास मिळेल.

(गुरू गोविंदसिंह, ले. बळवंत चट्ट यांच्या आधारे)

गोविंदसिंह हा अष्टपैलू होता. रणांगणात सैनिकांना आदेश देत असतानाही तो काव्य रचीत असे. फारसी, पंजाबी आणि व्रजभाषा तो जाणत होता. मंदिर–मशीद, पूजा–निमाज, पुराण–कुराण हा बाह्य फरक तो मानीत नसे. सर्वांची आंतरिक धारणा एकच आहे, असे तो प्रतिपादन करी.

कलकत्ता येथील प्रमुख कालीपीठाचा इतिहास आपण पाहिल्यावर आता इतरत्र तिची जी मंदिरे पसरलेली आहेत, त्यापैकी काही प्रमुख मंदिराची यादी त्रोटकपणे पाहू.

कालिदासाविषयी अशी कथा सांगतात की, लहानपणीच त्याचे माता-पिता त्याला सोडून स्वर्गवासी झाले. त्या अर्भक मुलाचे पालन एका गवळ्याने केले त्या देशाची राजकन्या अतिशय चतुर होती आपण फार चतुर आहोत असा तिला अहंकार होता, तो अहंकार घालविण्याकरिता राजाच्या प्रधानाने केवळ सूडबुद्धीने या १८ वर्षे वयाच्या निरक्षर गवळ्याबरोबर तिचे लग्न लावून दिले. अर्थात् त्याने राजाला याचा सुगावा लागू दिला नाही. उलट हा तरुण एक राजपुत्रच आहे असा त्याचा समज करून दिला

प्रथम भेटीतच राजकन्येला कळून चुकले की, आपला पति जरी सौंदर्यवान् असला तरी तो अज्ञानी आहे. आपल्यासारख्या सुसंस्कृत आणि सुशिक्षित मुलीला हा वर मुळीच योग्य नाही, याचे व आपले कधीही पटणार नाही हे तिला कळून चुकले, याच कारणास्तव राजकन्येने कालिदासाची निर्भर्त्सना केली आणि त्याला राजवाड्यातून हाकलून दिले. तिने त्याला असाही उपदेश केला की, 'तू कालीदेवीची आराधना कर आणि आपले आत्महित साध.'

जो मनुष्य मानी स्वभावाचा असतो, त्याला एखादे क्षुल्लक कारणही उपरती होण्यास आणि मानी जीवनाला कलाटणी देण्यास पुरेसे होते. अपमानाचा सूड घेण्याच्या आत्यंतिक तळमळीने तो वाटेल ती कष्टे सहन करण्यास तयार होतो आणि हरप्रयत्नाने आपली उन्नति साधून उच्च कोटीला पोहोचतो. महाकवि भूषणची हकीकतही अगदी तंतोतंत अशीच आहे. लहानपणी हा अतिशय आळशी होता. मोठ्या भावाने मेहनत करावी आणि याने दोन वेळा मस्त जेवावे आणि गावभर भटकावे हाच त्याचा दिवसाचा कार्यक्रम असे एकदा हा पानावर बसला असता त्याची भावजय म्हणाली, 'ऐतखाऊपणे गिळायचे आणि तेही वेळेवर यायचे नाही. जेवताना खोड्या काढीत बसायचे आणि अन्नावर टीका करावयाची हा तुमचा उद्योग. फुकट खायला मी म्हणते, लाज कशी नाही वाटत कोण जाणे!' हे शब्द त्याच्या जिव्हारी झोंबले. तो तडक पानावरून उठला त्याने विद्यार्जन केले. मोठा पंडित बनला आणि छत्रपति शिवरायाचे समग्र चरित्र त्याने संस्कृत श्लोकामध्ये तयार केले.

कालिदासानेही तेच केले राजकन्येने मार्गदर्शन केल्याप्रमाणे तो काली देवीची उपासना करण्यासाठी या क्षेत्री आला मनोभावे आणि पूर्णश्रद्धेने अनेक वर्षे त्याने या ठिकाणी कालीदेवीची आराधाना केली देवतेचा कौल मिळेना म्हणून शेवटी त्याने आपले शिरकमळ देवीला अर्पण करण्याचा निश्चय केला.

त्याने हातात शस्त्र घेतले आणि तो मानेवर वार करणार, इतक्यात कालीदेवी प्रकट झाली आणि तिने वरच्यावर त्याचा हात धरला. तिने हळूच त्याला ‘कालिदास’ अशी हाक मारली. त्याने वर पाहाताच त्याला साक्षात् देवीचे दर्शन घडले. त्याने आपली हकिगत तिला निवेदन केली आणि विद्वान् पंडित होण्याची आपली मनीषा तिच्याजवळ उघड केली कालीदेवीने ‘तथास्तु’ असे म्हणून त्याला वरदान दिले आणि ‘वाग्देवता सरस्वती सदैव तुझ्या जिव्हेवर वास करील’ असा त्याला आशीर्वाद दिला. नंतर देवी अंतर्धान पावली

देवीची कृपा झाल्यावर कालिदासाने विद्यार्जन केले आणि तो विद्वान पदाप्रत पोहोचला. आपला पति सुसंस्कृत झालेला आहे असे राजकन्येला समजताच तिने त्याला बोलावून घेतले आणि आपला स्वीकार करण्याची त्याला विनंती केली. कालिदास तिला म्हणाला, ‘हे राजकन्ये, तुझ्याच मातृवत् उपदेशामुळे मी या पदाप्रत पोहोचलो आहे. तू माझी साक्षात् गुरु आहेस, माता आहेस. तेव्हा मातेचा स्त्री म्हणून स्वीकार करणे कदापि योग्य नाही. तो माझा अध:पात ठरेल.’ या त्याच्या उत्तरामुळे सुसंस्कृत म्हणविणारी राजकन्या चिडली आणि तिने त्याला शाप दिला की, ‘तुझा मृत्यु एका स्त्रीच्याच हातून होईल.’

त्यानंतर कालिदासाने अनेक वर्षे काव्यरचना केल्यावर आपला मित्र आणि राजकवि कुमारदास याच्या निमंत्रणावरून त्याला भेटण्यासाठी तो लंकेमध्ये गेला. मित्राच्या घरचा ठिकाणा न मिळाल्यामुळे प्रथम तो एका वारांगनेच्या घरी गेला आणि त्या ठिकाणीच तो रमून गेला. इतका की, मित्राच्या घरी जाण्याचे देखील त्याच्या ध्यानात राहिले नाही. त्या ठिकाणी तो रहात असता राजाला असे समजले की, कालिदास लंकेमध्ये आलेला आहे, तेव्हा त्याचा शोध घेण्यासाठी त्याने एका श्लोकाचा अर्धा चरण बाहेर पंडिताना दिला आणि समस्यापूर्ति करण्यास सांगितले. कर्मधर्मसंयोगाने तो त्या वारांगनेच्या हाती आला. कालिदासाने ती समस्या पुरी केली. वारांगनेने तो पूर्ण श्लोक राजदरबारी सादर केला आणि आपणच स्वत तो पूर्ण केला असल्याचे खोटेच सांगितले. राजाने जाहीर केलेले बक्षीस ती वारांगना घेऊन आली केव्हा ना केव्हा तरी आपल्या पापकर्माचा घडा भरेल आणि कालिदास आपले बक्षीस हिरावून घेईल, असा विचार मनात आल्याने त्या दुष्ट स्त्रीने कालिदासाला ठार केले आणि राजकन्येचा शाप खरा केला.

राजाची समस्या अशी होती, ‘कमले कमलोत्पत्ति श्रूयते न च दृश्यते।’ आणि कालिदासाने समस्यापूर्ति अशी केली होती, ‘बाले तव मुखांभोजे कथ इंदीवरद्वयम् ॥’

ह्या चरणाचा मराठी अनुवाद असा,

कमळांत कमळोत्पत्ति ऐकिली नच पाहिली ।
मुख पद्मांतरीं बाळे, कमळे कृष्ण शोभली ॥

[ वारांगनेच्याच मुखकमळात दोन कृष्णकमळे ( म्हणजे दोन नेत्र ) विधात्याने उत्पन्न केलेली आहेत असा भावार्थ. ]

राजाने जरी बक्षिसाची पचवीस हजाराची रकम वारांगनेला दिली, तरी त्याला संशय आलाच की, ही वारांगना श्लोक कशी पुरी करणार? अधिक चौकशी करता त्याला खरा प्रकार समजून चुकला आणि त्याने तिला शिक्षा केली. डॉ. सतीशचंद्र भूषण यानी संशोधन करून कालिदासाची समाधी सिंहल द्वीपात माटर नावाच्या दक्षिण प्रांतामध्ये करिंदी नदीच्या मुखाजवळ अद्यापीही दाखविली जाते, असे प्रसिद्ध केले आहे.

अनेक विद्वानानी कालिदास हा आपल्याच प्रांतातील होता असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण कै. शि. म. परांजपे ( पुणे ) याच्या मताप्रमाणे तो मंदोसोर व विदिशा येथील होता ( चित्राव, भारत वर्षीय चरित्र कोश, पृष्ठ २५ ). कालिदासाचा काल साधारणत ३८७ ते ४१३ हा धरला जातो. पण हा कवि युगसम्राट चंद्रगुप्त ( दुसरा ) विक्रमादित्य याच्या आश्रयास होता, हे बहुधा सर्वमान्य झालेले आहे. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकातील विक्रमादित्याच्या आश्रयाला तो नव्हता, असे श्री. मा. वि. मिराशी, आपल्या 'संशोधन मुक्तावली, सर तिसरा' यामध्ये म्हणतात.

मध्यप्रदेशात धार शहराजवळ सरोवराच्या काठी, एका लहानशा टेकडीवर कालीदेवीचे मंदिर आहे. सन १४०० च्या सुमारास ते बांधले गेले आहे. मंदिराचे शिल्प हेमाडपंती असून मंदिराचा प्राकार विस्तीर्ण आहे. धारच्या राजेसाहेबांनी या मंदिराच्या खर्चासाठी जहागीर जमीन दिलेली आहे.

मिदनापूर ( बंगाल ) भागात रूप-नारायण नदीच्या मुखाजवळ तुमलुक नावाचे बंदर आहे. या ठिकाणी कालीदेवीचे एक पुरातन मंदिर आहे मंदिराभोवती ६० फूट उंचीच्या एका कौशल्यपूर्ण भिंतीचा कोट बांधलेला आहे. देवीची मूर्ति स्वयंभु पाषाणात कोरलेली असून, ती शंकराच्या मांडीवर विराजमान झालेली दाखविली आहे मंदिराच्या परिसरात केळी कदर नावाचा एक वृक्ष

आहे. त्याच्या दर्शनाने आणि आराधनेने वाझ बाईलाही मनोवाञ्छित संतति प्राप्त होते, अशी भक्तांची भावना आहे.

आसाम प्रांतातील वन्य जमातीच्या वस्तीत कालीदेवीला 'काली बारी' या नावाने संबोधतात. कालीबारीची अनेक मंदिरे त्या भागात आहेत. जतिया भागात फलीजोर हे एक शक्तिपीठ मानले जाते. भाविकांना असे सांगितले जाते की, सतीचा पाय या ठिकाणी पडला असल्याने हे पीठ तयार झाले आहे. तसेच जैनपूर (सिल्हेट) येथे कंठ पडला. या स्थानी देवीच्या मूर्ति म्हणून खडकाचे उभे स्वाभाविक सुळके दाखविले जातात. प्रत्यक्षात मूर्ति नाहीत आणि मंदिरेही नाहीत. सरस्वती आणि लक्ष्मीपूजा उत्सव येथे साजरे केले जातात. (सिल्हेट जिल्हा गॅझेट, भाग २)

दक्षिण भारतामध्ये गोकाक येथे धबधब्याच्या ठिकाणी पूर्वी अनेक मंदिरे होती. त्यामध्ये एक कालीदेवीचे प्रेक्षणीय मंदिर होते. हातातील आयुधामध्ये घिनघडीची जाडजूड गदा, कर्णफुले, मस्तकावर जाडशी साखळी, दुसऱ्या हातामध्ये ढाल, मुसळ, पायाजवळ एक श्वान मूर्ति आणि एक माणूस नगारा वाजवीत आहे असे स्वरूप होते. या मंदिराला लागून जवळच्याच दालनात कालीदेवीची तांडवनृत्य समयीची एक मूर्ति होती.

(बेळगाव जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५३८.)

पाटण (काठेवाड) येथे कालीदेवीचे जागृत स्थान आहे. रात्री शयनाच्या वेळी देवीच्या मुखात पानाचा विडा कुटून घालतात आणि सकाळी तो प्रसाद म्हणून भक्ताने खाल्ला, तर त्याचे मुख रंगत नाही. काही वेळा देवीला मद्य देतात आणि ते तोंडातील लहानशा छिद्रामधून शरीरात जिरते. श्रीमती चिमणाबाई गायकवाड यांची या गोष्टीवर श्रद्धा बसेना. त्यांनी परीक्षा घेण्यासाठी आणि सत्य शोधण्याच्या हेतूने आपल्या उजव्या हाताची दोन बोटे देवीच्या मुखात कोंबली. कोणाचाही उपदेश तिने मानला नाही. पण ती बोटे तिच्या घशात घालण्याच्या इराद्याने देवतेने तिची बोटे आपल्या तोंडात घट्ट दाबून धरली. बाईला कळा असह्य झाल्या. शेवटी सयाजीराव आणि इतर मंडळी यांनी देवीची प्रार्थना केली आणि बाईला क्षमा करण्याबद्दल देवीला विनविले तेव्हा कोठे चार पाच तासांनी त्या बोटांची आणि बाईची सुटका झाली.

(श्री. दाजी पणशीकर, मुंबई.)

कालीदेवीचा भक्तवर्ग शाक्तपर्थीय आहे, हे आपण वर पाहिलेच आहे शक्तीचे जे उपासक ते शाक्त अशी शाक्त या शब्दाची व्याख्या आहे यामध्ये दोन प्रमुख पथ आहेत एक दक्षिणापथी व दुसरा वामाचारी दक्षिणपथीय सात्विकपणे शक्तीचे पूजन करतात आणि देवीचे स्वरूप शांत असेच मानतात या पथीयाना उत्तरकौलिक, समियन इत्यादि नावाने पण ओळखतात

वामाचारी लोक तंत्रमार्ग, आगम, मंत्रशास्त्र, पूर्वकौल, वाममार्ग उपासना या मार्गांनी अनेक जाणारे असून त्याचे पूजाविधि अवैदिक आणि सभ्या आर्यधर्माला असंमत असेच आहेत नाथपंथाच्या जोगी लोकानी शाक्तपंथाची स्थापना केली असे समजले जाते आपण मागे पाहिलेच आहे की, नरकासुराचा मुलगा भागदत्त याने शाक्तपंथाचा प्रचार धडाडीने भारतात केला नाथपंथीयांनी शिव पार्वतीचे संवादरूप असे ग्रंथ लिहिले त्यानाच तंत्रग्रंथ अशी संज्ञा प्राप्त झाली आहे पूजा, न्यास, मुद्रा, बीजमंत्र वगैरे अनेक विधि असून, त्याच्या देवता सुद्धा निरनिराळ्या आहेत त्याना दशमहाविद्या असे संबोधिले जाते तारा, षोडशी, कमळा इत्यादि त्या दशमाविद्या होत या देवतांची पूजा, पटलें, मंत्र, सहस्रनाम पद्धतीबीजे, कवचे, न्यास, मुद्रा, होम, बळी या अनुक्रमाने केली जाते स्त्री रूपाला शक्ति आणि पुरुषरूपाला भैरव असे म्हणतात स्त्रियाची पूजा करताना ते अतिशय अश्लील मार्गाने म्हणजे प्रत्यक्ष योनीची पूजा करून—करतात प्रेतावर देवीची आसन मांडून बसणे, हाडाच्या व दाताच्या माळा गळ्यात घालणे, अशा प्रकारचे विधि कृपा संपादन करण्यासाठी ते आचरतात जारण-मारणादि षट्कर्मे साधने ते उपयोगात आणतात तांत्रिक असे मानतात की, वातावरणातील परिमाणु देवतेची उपासना लवकर फलद्रूप होते त्याच्या साहाय्याने ते वाटेल तो चमत्कार घडवून आणू शकतात पण त्याची उपासना चुकली किंवा तंत्रामध्ये जराही फरक पडला तर या देवता साधकाच्याच नाशाला कारणीभूत होतात, कपाळी, कराला, कौशिकी, कांतारवासिणी, ब्राह्मी, नरसिंही, काळी, कुमारी या देवतांची पूजा वामाचारी पथीय करतात प्राण्याच्या मांसाचा व कधीकधी नरबळी अर्पून नरमांसाचा नैवेद्य दाखवितात देवीवर मद्याचा अभिषेक करतात आनंदा भैरवी, त्रिपुरा सुंदरी, ललिता या देवता त्याच्या समजुतीप्रमाणे मद्याच्या सागरात राहत असून, रत्नखचित राजमहालात, मऊ मऊ कोचावर आणि रुईच्या कापसाच्या गाद्या गिरद्यावर लोळत असतात स्त्री, ही देवीरूप असून, मातृशक्तीचा अंग असल्याने त्याचा असा दंडक आहे की, प्रत्येक भक्ताने स्त्रीरूप व्हाले पाहिजे ते निरनिराळी चक्रे व यंत्रे काढून त्याची पूजा करीत असतात या पूजाप्रकाराला ते वामाग असे म्हणतात

(श्री सहस्रबुद्धे, जगातील धर्मपंथ, पृष्ठ १४०)

शक्तिपूजेचा प्रसार भारतामध्ये फार प्राचीन काळापासून चालू आहे. पुरुष व प्रकृति या मूळ सिद्धांतावर अनेक तर्क करून शेवटी शिव हा पुरुष आणि भवानी प्रकृति त्यांनी मानली. या पूजनाचा प्रसार जसजसा वाढत गेला तसतसा तत्संबंधीचा भाग महाभारतामध्येही समाविष्ट केला गेला. इतकेच नव्हे, तर आपल्याला असे दिसून येईल की, भगवान श्रीकृष्ण आणि युधिष्ठिर यांनीही शक्तिदेवीला वंद्य मानले आहे. बौद्धधर्माचा लय झाल्यावर आर्यधर्माची घडी पुन्हा नीट बसवितांना शिवोपासक रजपूत जातीने शक्तिदेवीची आराधना केली आहे. कुलदेवता कराला आणि काली यांना वंदन करून त्यांचा कौल घेऊन मगच ते युद्धाला निघत असत. रजपुतांचा वारसा नंतर मराठ्यांनी पुढे चालविला. शिवाजीराजे प्रतापगडावरील भवानीदेवीचा कौल-प्रसाद घेतल्याशिवाय कोणतेही अवघड कार्य अंगावर घेत नसत. सतराव्या शतकामध्ये मुकुंदराज कवीने दोन सुरस देवीकाव्ये रचली आहेत. शक्तिदेवीच्या कृपेने सर्व कामना सिद्धीस जातात, असे त्याने प्रतिपादिले आहे. समर्थ रामदासांनी तुळजास्तवनपर काव्य केले आहे. यानंतर मात्र शक्तिपूजनाचा प्रसार सर्वत्र चालू झाला.

वामाचार पंथाचे श्रेष्ठत्व काही कमी नाही. पण त्याचे आचरण करण्यास अतिशय ज्ञानी आणि अति उच्च पदी पोहोचलेले भक्त पाहिजेत. हे श्रेष्ठत्व न समजल्यानेच काही अपुऱ्या ज्ञानाचे भक्त त्याचे हिडीस प्रदर्शन करतात. श्रेष्ठपणा बाजूला सारून, त्याला विकृत स्वरूप देऊन आणि प्रत्यक्षात त्याचे तसे विकृत आचरण करून स्वैरपणा मात्र अतिशय बोकाळला आहे. या विषयावरील सर आॅर्थर ॲव्हेलोन यांचे वाङ्मय अवश्य वाचावे. तसेच जी तंत्रशास्त्रे यांनी विषयाला वाहिलेली आहेत, ती वाचकांनी अधिक सविस्तर माहितीसाठी पहावीत. हा विषय एवढा मोठा आहे की, त्यावर अनेकांनी ग्रंथनिष्पत्ति केलेली आहे. दोन मार्गांतील मूळ भेदच दाखविण्याचा हा इवलासा यत्न आहे.

ललित

तो सुदाम गोप हरिचा सखा । राधिका सखी तुळसि नायिका ॥
प्रेमबंधनीं रमति नाचतां । शापिलें त्वरें मधुनि राधिका ॥ १ ॥
शापवाणीनें उपजती पुन्हां । शंखचूड नी तुळसि रूप ना ।
पूर्व जन्मिचें स्मरण अंतरीं । शंखचूड तो तुळशिला वरी ॥ २ ॥
मत्त जाहला असुर भूपरीं । पार्वतीपती समरिं पाचरी ॥
धाडिलें पुढें शिवगणांप्रती । मक्षिकापरी असुर भक्षिती ॥ ३ ॥

दैत्य-कंठ हा कवच रक्षितें । पातिव्रत्यही पतिस तारितें ॥
विप्र हो हरी कवच हारितो । शखरूपिंही तुळसि भ्रष्टितो ॥ ४ ॥
दैत्य जीविचे कवच हारितां । सैन्य धूर्जटी लोटि पूर्णतः ॥
सर्व देवता असुर जिंकितां । कालिकेपदीं गव्त खालतां ॥ ५ ॥
आदिशक्ति ही व्यसनिं धांवतें । कालिदेवता त्वरित निर्मितें ॥
संकटें त्वरें समयिं वारितें । शक्तिपीठ हें नमति भक्त तें ॥ ६ ॥

अनुष्टुभ्

कालीमाता महादेवी । कालीघाटावरी पहा ॥
शाक्तपंथीय हे पीठ । म्हणोनि गाजते सदा ॥ ७ ॥
जंगलगिर गोसावी । स्वप्नीं दृष्टांत देखितो ॥
भूमि भेदोनि ये देवी । जागृतावस्थि पाहतो ॥ ८ ॥
उरूच्या उर्ध्व भागिची । विशाला रौद्ररूपिणी ॥
जबडा उघडा मोठा । ताम्राक्षी मुक्तकेशिनी ॥ ९ ॥
मेघकांती नीलवर्णी । नररुंडाचि कुंडला ॥
भीतियुक्ता दंतपंक्ती । दीर्घजिव्हाहि लागुला ॥ १० ॥
मारिली असुरा रक्तें । ओघळे बिंदु खालतें ॥
प्रचंड जड सृष्टीला । चघळे मुख सारिखें ॥ ११ ॥
रुंडमाळा गळां शोभे । पताका विजय स्मृती ॥
यावत्र मस्तका कोणी । वर्ण माळाचि मानिती ॥ १२ ॥
रक्तांकिता अर्ध बाहू । नटवी कटि मेखला ॥
महाप्रलय कालीचे । आश्रय-स्थान हें जिवा ॥ १३ ॥
दशभुजा दशपद्मा । आयुधे घेतसे करा ॥
उग्ररूप तुझें देवी । अभक्तां भिववी सदा ॥ १४ ॥
उत्पत्ती-लय जीवाची । स्वरूपीं घडते तुझ्या ॥
अखंड सिद्धि कार्यातें । म्हणोनी कालि हे वदा ॥ १५ ॥
दक्षिणेश्वर स्थानिंची । कालिदेवी दुजी असे ।
म्हणोनी दक्षिणा-काली । नाम हें पावली असे ॥ १६ ॥

मन्दाक्रान्ता

काळी देवी भयावह महा रूप विक्राळ दावी।
सम्यग्रूपे पुरुष प्रकृती द्वय सादृश्य दावी ॥
स्वानदाने हरण करिते जीव नृत्ये करोनी।
रुंडामाळा मिरवित गळा खड्ग हातीं धरोनी ॥ १७ ॥
श्रीशंभूच्या हृदयिं-पद गे ठेविता जाण नाहीं।
त्वत्स्पर्शानें शिव प्रकृतिही चेतनारूप होई ॥
एकाग्राने नयन मिटति, एकमेकांसि ठायीं।
सर्वांभूर्ती दहशत तुझी दाविशी ठायि ठायीं ॥ १८ ॥
दीर्घोजिव्हा सहज युवती दावितें लाज-भाव।
आशीर्वादांकित कर सदा हे अनिच्छा स्वभाव ॥
पृष्ठाभागीं कच पसरती वायुरूपास दावी।
काळीदेवी शिवप्रकृतिही आणि माया वदावी ॥ १९ ॥

पृथ्वी

अनेक भजती तुला अखिल भारती भक्तही ।
कधीं न विसरे पुणी फिरत देश कार्यांतही ॥
सदा नत सुभाष तो परमहंस दास्या करी ।
तसाच अरविंद तो श्रमत योगिराजा हरी ॥ ७३ ॥
उपास्य तव रामकृष्ण करि दक्षिणा-कालिके ।
स्व-पत्निसह काळ चाळिसहि वर्ष तादात्मकें ॥
प्रसन्न मग तू तथा सतत रक्षणाला उभी ।
तुझीच करि चाकरी, नमित मी तयांच्या पदीं ॥ ७४ ॥
महाकविहि कालिदास तव मालवी जन्मला ।
स्वपितृहिन पोरका गवळिया घरीं वाढला ॥
सुगासि शिशुच्या मुकें लवहि नाहीं संस्कारिता
वयात अठरा वरी, अवचिता नृपाची सुता ॥ ७५ ॥
वधू प्रथम भेटिलाच करि धीट धिक्कार ती ।
तुझ्यासम पति नको मजसी मूर्ख तूही अती ॥
त्वरें हकलुनी दिले, शयनगार धडावले ।
सुसंस्कृत करी तुला यजनिं कालिका चांगलें ॥ ७६ ॥
वरास्तव तुला खरा स्तवित कालिदासा कसा ।
तपाचरणि धुंदसा अढळ जागिं बैसे जसा ॥
प्रसन्न जइ होईना, " हवनिं शिर अर्पी " वदे ।
झणिं वरद-हस्ता ती उठवि कालि दासा वदे ॥ ७७ ॥

चार दिशांना चार मुखे असून प्रत्येक मुखाच्या ठिकाणी दोन दोन हात आहेत. मूर्तीला एकूण आठ हात आहेत. पुजाऱ्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणालाही मंदिरात प्रवेश करू देत नाहीत. पशुपतिनाथ व केदारनाथ मिळून एक ज्योतिर्लिंग समजले जाते. महिषाचे मस्तक या क्षेत्री, तर शरीर केदारनाथ येथे आहे, असे वर्णन शिवपुराणात मिळते. मंदिराचे शिल्प लाकडी आणि चिनी संस्कृतीचे भासते.

खाटमांडू शहरात हनुमानधोका अगर मंदिरचौक हा भाग देवालयांनी अतिशय गजबजलेला आहे. या भागात फिरत असताना असा भास होतो की, आपण साक्षात देवनगरीतच फिरत आहोत. देवालयांप्रमाणे घरेही लाकडावरील कोरीव शिल्पाने मढवलेली दिसतात. खांब, तुळया अगर छते, सर्व भाग लाकडावरील शिल्पाने सजविलेला दिसेल. अनेक ठिकाणी लाकडावरील कोरीव मूर्ति शेंदराने माखलेल्या दिसतील. 'जुधा सडक' अगर नवा रस्ता हा भाग माणसांनी अतिशय गजबजलेला असतो. अशा ह्या महत्त्वाच्या ठिकाणी काली-देवीची एक भव्य कातीव मूर्ति आपणांस पाहावयास मिळते. या देवीला सहा हात असून त्रिशूळ, चक्र, पानपात्र इत्यादि आयुधे तिने धारण केलेली आहेत. डाव्या हातात राक्षसांची दोन मुंडकी आणि उजवा हात अभय असा आहे. पायाखाली राक्षसाचे शव असून, गळ्यात रुंडमाळा आहेत. चेहरा उग्ररूप भासतो. (Illustrated Weekly, Bombay, 13-4-62, P. 36.)

पशुपतिनाथाच्या ईशान्येस सुमारे पाव मैलावर गुह्येश्वरी देवीचे मंदिर आहे. पशुपतीनाथाच्या पूर्वेकडे बागमती नदी वाहत असून त्यावरील पुलावरून पलीकडे गेल्यावर, उत्तरबाजूला पाषाणाच्या पायऱ्या चढून या स्थानाप्रत पोहोचता येते. दुसरा मार्ग पशुपतीश्वराच्या पश्चिम बाजूने बाजारभागातून गेल्यावर प्रथम उत्तर दिशेकडे वळून, मग पूर्वेकडे चालत गेल्यास या स्थानी पोहोचता येते.

देवीचे स्थान अतिशय पुरातन असून, दक्षयज्ञाच्या वेळी सतीचा गुह्य (गुद) भाग या ठिकाणी पडल्यामुळे या पीठाला गुह्येश्वरी हे नाव प्राप्त झाले. (क्षेत्रोपाध्याय जरी अशी पीठिका सांगत असले तरी प्रत्यक्ष एकावन्न पीठांच्या यादीमध्ये या नावाचा उल्लेख नाही.) ही देवी अष्टभुजा स्वरूपात आहे. शेंदूर माखून रक्तरंगी झालेली आहे. हिला कोंबडी, बकऱ्याचा बळी अर्पण करतात. मंदिरासमोर एक गुप्त जलकुंड आहे. कुंडाच्या मध्यभागी एका बारीक छिद्रा-मधून पाण्याचा प्रवाह सारखा बाहेर वाहत असतो. या छिद्रावर तांब्याचा

कलश ठेवून त्यामध्ये देवीची मूर्ति ठेवून त्या कलशाची पूजा केली जाते. काही-जण अशी कथा सांगतात की, पशुपतिनाथ मंदिरात राहण्यास आल्यावर कालीदेवी गुह्येश्वरी या ठिकाणी एकटी गुप्तरूपाने वास्तव्य करून पशुपतिनाथाची सेवाचाकरी करू लागली. पशुपतीनाथांना हे वर्तमान समजताच, ती गुप्तरूपाने राहिली म्हणून तिला त्यानी गुह्यकाली या नावाने संबोधिले.

या कुंडाजवळच भैरवनाथाचेही लहानसे मंदिर आहे. त्या मूर्तीजवळ समस्त ऐश्वर्य देणारी, रक्षण करणारी आणि अभिष्ट वरदान करणारी गौरीची मूर्ति आहे. या दोन्ही देवताचे षोडशपूजन केल्याने 'सालोक्यमुक्ति' म्हणजे देवलोकात निरंतर निवास मिळतो, अशी भाविकाची श्रद्धा आहे.

(नेपाळचा मार्गदर्शक, ले. महेश्वरशास्त्री हेबळे, नेपाळ.)

हे स्थान बागमती नदीच्या किनारी असल्याने नदीवरील घाटाला गुह्येश्वरी घाट असे म्हणतात. सर्व नेपाळी प्रजा या देवीची पूजक आहे. नवरात्राचा उत्सव होतो, त्या वेळी नेपाळ-नरेश आपल्या कुटुंबातील मंडळींसह आधी बागमती नदीमध्ये शुचिर्भूत होऊन नंतर देवीच्या भेटीस येतात.

(कल्याण, शक्तिअंक १९३४/६२८.)

मत्स्येंद्रनाथ ही एक नेपाळची राष्ट्रदेवता मानली जाते. वैशाख शु० १ या दिवशी पाटण शहरातून या देवतेची मिरवणूक काढतात. याच शहरी मूर्तीचे स्थान आहे. नग्नमूर्ति एका कावळीत गुंडाळून रथावर ठेवून तो रथ वाजत-गाजत मिरवीत जातो. मिरवणूक-मार्गावर जेथे रथ थांबतो, तेथे मूर्ति कावळी-तून बाहेर काढतात आणि भक्ताना तिचे दर्शन देतात आणि नंतर पुन्हा ती गुंडाळून ठेवतात. एक महिन्याच्या फेरीनंतर मूर्ति आपल्या स्वस्थानी येते.

नालंदा, ओदंतपुरी, विक्रमशीला येथील बौद्ध मठाधिपतींची सन ११९७ च्या सुमारास मुसलमानांनी कत्तल केल्यावर, उरलेले धर्मगुरू आपल्या धर्मग्रंथासह नेपाळात पळून गेले. तेथे त्यांनी मठ-मंदिरे बांधली आणि आपला जीवनक्रम सुरू केला. एकट्या खाटमांडू शहरातच ३०० हून अधिक मठ अस्तित्वात आहेत. त्यामधून सुमारे ३०,००० हस्तलिखित पोथ्या उपलब्ध आहेत. (नेपाळचा प्रवास, ले. संपतराव गायकवाड, पृष्ठे २४-२९.)

गुह्येश्वरी हे जसे शक्तिपीठ मानले जाते, तसे ५१ पीठापैकी मुक्तिनाथ हे एक पीठ आहे. पीठाच्या यादीमध्ये याला गंडकी पीठ म्हटले आहे. या ठिकाणी गंडा अगर कपोलभाग पडला असा उल्लेख असून, शक्ति गंडकी अगर चंडी व भैरव, चक्रपाणी असा दिलेला आहे. मुक्तिनाथ हे क्षेत्र कागबेणी नदी-पासून सहा मैलांवर आहे. या ठिकाणाजवळ गुसाईंकुंड या नावाचे प्रख्यात

जलसरोवर आहे. यामध्ये १०८ झऱ्याचे पाणी येते, असा समज आहे. वास्तविक हे कुंड अनेक हिमनद्यांनी (Glaciers) वेढिलेले आहे आणि म्हणूनच त्याला झरे म्हटले असावे. या कुंडापासूनच गंडकी नदीचा उगम होतो. तळ्याच्या काठावर एक खडकाचा उभा सुळका आहे, त्यालाच स्वयंभु लिंग म्हटले जाते. गंडकी नदीचा उगम झाल्यावर आणि ती थोडी पुढे वाहत गेल्यावर 'कालीगंडक' नावाचे ठिकाण आहे. त्या ठिकाणी उत्तमोत्तम शाळिग्राम सापडतात.

पीठनिर्णयाप्रमाणे जरी गंडकीदेवी येथील शक्ति असली तरी प्रत्यक्षात मात्र ती ज्वाला-मायी देवी आहे. ती चतुर्भुज असून आसनस्थ आहे. उजव्या हातात अक्षमाला, डाव्या हातात कमळ आणि पुढील दोन हात आपल्या वक्षःस्थळावर आडवे ठेवलेले, मस्तकावर मुकुट, कानात कुंडले असे देवीचे स्वरूप आहे. (Nepal, by P Landon, Vol II, Page 37)

वसंततिलक

गुह्येश्वरी पशुपती जवळीच पीठ ।
नेपाळ देश नृपती तव भक्त श्रेष्ठ ॥
सुस्नात होउनि अर्धा सरिता तटाकीं ।
पूजी नृपाल नवरात्रिंहि वशरीती ॥ १ ॥
ज्वाळामयी प्रमुख पीठहि मुक्तिनाथ ।
मत्स्येंद्रनाथ मिरवीत रथोत्सवात ॥
त्या वज्रयोगिनिहि, गंडकि, गुह्यकाली ।
वात्सल्यदेवि, तव पाद नमीत भाळीं ॥ २ ॥

## (१४) गोवे प्रांतीय देवता

डिसेंबर १९६१ साली गोवे प्रांताची भारत सरकारने सैन्य पाठवून मुक्तता केली ४५० वर्षांचे त्या प्रांताचे पारतन्त्र्य संपुष्टात आले हा प्रांत जसा वनश्रीबद्दल प्रसिद्ध आहे, तसाच तो देवस्थानासाठीही प्रसिद्ध आहे. भारतामध्ये इतस्ततः विखुरलेल्या अनेक घराण्यांच्या कुलदेवता या प्रांती आहेत गोवा शहरा पासून सुमारे १८–२० मैल अंतरावर हा देवस्थानाचा टापू आहे मंगेशी, म्हाडदोळ, केरी, नागनाथ, कवळे, शिरोडे इत्यादि गावात या देवतांची स्थाने आहेत. या सर्व देवता एकाच टापूत का व कशा आल्या हा इतिहास पाहण्यासारखा आहे.

सह्याद्रिखंड, मंगेश महात्म्य, एषनोवेन यांचा ग्रंथ, गौडसारस्वत ब्राह्मणांची कुलदैवते, कुडाळदेशकर इतिहास, कोकण आख्यान, शांतादुर्गा संस्थानचा इतिहास, इत्यादि अनेक नामांकित ग्रंथात या गोष्टीचा उल्लेख असून परस्परविरोधी मते त्यामध्ये दिसून येतात. या सर्वांचा सारांश असा की, प्राचीन काळी परशुरामाने गौड प्रांतातून (बंगालमधून) ६६ ब्राह्मणांची कुळे आणून, त्याची या प्रांती वसाहत स्थापली. तोवर साधारणतः हा प्रदेश निर्जन होता. अपरांत प्रांतात त्याने कोकणस्थ ब्राह्मणाची वसाहत स्थापना केलेली होती. पण ही वसाहत स्थापन करण्याच्या वेळी त्याला त्याचा व्हावा तसा उपयोग झाला नाही, म्हणून त्याने परदेशातून घराणी आणली असे हे मथकार प्रतिपादतात. अर्थात् त्या कुळांनी येताना आपल्याबरोबर आपल्या कामाक्षी (कामाख्याचा अपभ्रंश), शांतादुर्गा, महाळसा, महालक्ष्मी इत्यादि देवता आणल्या, आणि त्यांची स्थापनाही केली. ज्या भागात परशुरामाने ६६ कुळे वसविली तो भाग आज साष्टी या नावाने ओळखला जात आहे. कालांतराने आपापसातील यादवीमुळे येथील शांतता नष्ट झाली. पुढे पोर्तुगीजांनी ह्या देवता भ्रष्ट करू नयेत म्हणून त्यांना श्री. सोंधेकर-देसाई यांच्या मुलुखात नेण्यात आले. त्या वेळी सध्याचा देवस्थानचा टापू देसाईंच्या राज्यात मोडत असल्याने, पूर्वीच्या जागेतून स्थलांतर झाल्यावर त्या देवता या ठिकाणी आल्या आहेत. शेवटी पोर्तुगीजांचा प्रवेश प्रथम साष्टी भागात झाला आणि नंतर सु-व्यवस्थेसाठी, सोंधेकरांनी आपला मुलूख ३० सहस्र रुपये खंडणी घेऊन गोवेकर पोर्तुगीजांच्या ताब्यात दिला. पर्यायाने ही देवस्थाने त्यांच्याच ताब्यात गेली. हे स्थलांतर सोळाव्या शतकाच्या मध्यास झाले असावे. पोर्तुगीजांनी अनेक अत्याचार केले व हिंदु बाटवून आपल्या धर्मात ओढले.

भारतीय सांस्कृतिक कोश भाग ३ मध्ये प. महादेवशास्त्री येथील इतिहास देतात, तो असा की, विजयनगरचा सुभेदार तिमोजा याने सन १५१० च्या सुमारास पोर्तुगीज सरदार अल्बुकर्क याचे साहाय्याने गोवा प्रांत जिंकून घेतला, पण पुढे पोर्तुगीजांनीच तो बळकावला, आणि तोही कायमचाच! प्रथम पोर्तुगीजांनी पूर्वीच्या मुसलमान शिपायांची कत्तल करून, त्यांच्या स्त्रियांना बाटवून, पोर्तुगीज शिपायांबरोबर विवाह करून दिले. विहिरींत पाव टाकणे, घरात हाडे टाकणे अशाप्रकाराने बाटवाबाटवी जोरात सुरू केली. सन १५३८ साली तेथे बिशपची गादी स्थापन झाली. आणि दोन वर्षांतच बादशाही फर्मान निघाले की, हिंदूंची मंदिरे नष्ट करावीत. त्याप्रमाणे अनेक मंदिरे पाडून त्यांच चौथऱ्यावर प्रार्थना मंदिरे उभारण्यात आली. सेंट फ्रान्सीस झेविअरकडे धर्मप्रसाराचे काम आल्यानंतर, रानतुरच्या दियेगु रुद्रिगीश किल्लेदाराने एका रात्रीत

२८० देवळे जमीनदोस्त केली. सन १५६० साली इन्कीझिशनची स्थापना झाल्यानंर हिंदूच्या छळाला सीमाच उरली नाही. हिंदूनी मिळकती विकून जावे ( १५६० ), आपले धर्मग्रंथ नष्ट करावे ( १५६७ ), धार्मिक संस्कार करू नयेत ( १५७३ ), कोणतेही वाहन हिंदूनी वापरू नये ( १५७४ ), गोव्यात कोणी हिंदु आल्यास त्याचा शिरच्छेद करावा, याप्रमाणे बादशाही आज्ञापत्रे निघत होती. सतराव्या शतकात तर कहरच झाला. प्रत्येकाने पोर्तुगीज भाषा बोलली पाहिजे. शेंडी राखणाराने वार्षिक आठ रुपये कर भरावा, प्रत्येक हिंदूने प्रार्थना मंदिरात उपस्थित राहिलेच पाहिजे इ० इ०. ही आज्ञा न पाळणाराना भयंकर शिक्षा होत असत. अर्थात ही वागणूक फक्त पोर्तुगीज हद्दीत मिळत असे. यामुळेच त्या मुलुखातील हिंदु आपले वाडाविस्तार व देवाच्या मूर्ति घेऊन सोंधेकर देसायाचे मुलखात आले आणि तेथे मंदिराची स्थापना केली. तीच सांप्रतची मंदिरे होत.

परंतु वरील वसाहतीसंबंधीचा व देवताचा इतिहास खरा नव्हे, असा दावा श्री. वा. अ. बांदेकर करतात. ते लिहितात, ' गौड हे नाव पडण्याचे कारण ते गंगाकिनारी गौड प्रांती राहणारे होते म्हणून होय. सह्याद्रिखंड व मंगेश-महात्म्य यामध्ये ' परशुरामाने गौड ब्राह्मण आणले ' असे म्हटले आहे. ' शेणवी अगर सारस्वत आणले असे म्हटलेले नाही. ६६ कुळाऐवजी त्याने ९६ कुळे आणली. म्हणून शहाण्णवी–शेणवी असा अपभ्रंश झालेला आहे. परशुरामकाळी मुळी जातिसंस्थाच नव्हती, हे इ. स. १९२० साली मत लिहिणाऱ्या एथनोवेनला माहीत असावयास पाहिजे होते. सह्याद्रिखंडातील माहिती एकोणिसाव्या शतकातील मध्यकाळाची आहे. त्यानंतर अनेक पुरावे उपलब्ध झालेले आहेत, आणि याचकरिता एथनोवेन यानी जुने आधार घ्यावयास नको होते. गोव्यातील ब्राह्मण परशुरामाने आणले हे खरे नाही, म्हणून सह्याद्रिखंड विश्वसनीय मानता येत नाही. हा मत सन १८७७ साली लिहिला गेला. कै. गणपतराव पळेकर यांनी ' कुडाळदेशकर ' ज्ञातीचा संबंध गौडां-बरोबर जोडला, पण तो बरोबर नाही कारण आख्यान ही पोथी विश्वासनीय मानता येत नाही आणि श्री. पळेकर यांनी तर आपली सर्व भिस्त याच पायावर ठेविली आहे. '

रा. बांदेकर पुढे म्हणतात, ' सन १०१७ साली महमद गझनीने हिंदुस्थानवर प्रथम स्वारी केली आणि गंगा किनारीचे गौडेश्वर पाल याचे राज्य उध्वस्त केले. त्या वेळी या राजाचा मांडलिक ' माभत ' नावाचा एक ब्राह्मण संस्थानिक होता. गौडेश्वर पालचे राज्य उध्वस्त झाल्यावर, माभताने काही

निवडक लोकांसह दक्षिणेत पळ काढला आणि कदंब राजाच्या आश्रयाने तो राहिला. हा काश्यप गोत्री ब्राह्मण असून त्याच्या समवेत इतर १३ घराणी होती. ती सर्व देवगड भागातील हिंदळे या गावी राहिली. हीच घराणी कुडाळ देशकर (कुडाळ प्रांती राहणारी) म्हणून प्रसिद्धीस आली. सामंत हेच नाव रूढ झाले.' (ज्ञानकोश, क--५३२)

यावरून निष्कर्ष निघतो तो असा की, (१) परशुरामाने काही गौड कुळे आणली, ती गौड अथवा शेणवी झाली (२) सामंतांबरोबर तेरा कुळे आली, ती कुडाळ देशकर झाली. (३) पंजाबमधील काही सारस्वत कुळे मागाहून आली, ती सारस्वत घराणी झाली आणि (४) बंगाल प्रांतातून या देवता आलेल्या नाहीत असे म्हणण्याचे एक कारण म्हणजे बंगाल प्रांत हा शक्तिपूजक आहे. काली, कामाख्या या त्याच्या प्रमुख देवता होत मग या ठिकाणी नेवाशे येथे उत्पन्न झालेली महाळसा तेथे कशी गेली? रा. कनयालाल मुनशीसारखे आधुनिक विद्वान आपल्या 'भगवान परशुराम' या ग्रंथामध्ये तर स्वच्छपणे म्हणतात की, परशुराम कालीन आर्यावर्ताच्या वेळी, बंगाल प्रांत सर्व नद्यांचे मुखांनी वेष्टिलेला होता, मानव वस्ती जवळजवळ नव्हतीच. मग एवढे सुधारलेले मानव व देवता तेथे कोठून असणार? शांतादुर्गा, महालक्ष्मी ही आदिशक्तीची सौम्य रूपे त्या प्रांती असण्याचा संभव कमीच. या कारणासाठी परशुरामाने आणलेल्या गौड ब्राह्मणांबरोबर या देवता इकडे आल्या, हे प्रतिपादन आधारभूत आणि विश्वासनीय मानता येत नाही या प्रांतातील दोन प्रमुख देवतांचा--महाळसा आणि शांतादुर्गा देवतांचा--इतिहास इतरत्र वर येऊन गेलाच आहे आता उरलेल्या देवतांचा वृत्तांत थोडक्यात खालीलप्रमाणे पाहू

### विजयदुर्गा

या देवीचे मंदिर केरी गावी आहे. देवीचे स्वरूप अष्टभुजा महिषासुरमर्दिनीचेच आहे. सांप्रत या मंदिराची व्यवस्था त्या गावचे प्रसिद्ध सावकार श्री दादा वैद्य यांच्या घराण्याकडे आहे. काही कऱ्हाडे ब्राह्मणघराण्यांची व पदे घराण्याचीही ही कुलदेवता आहे देवीने महिषासुर दैत्यावर विजय मिळविला अथवा रणांगणावर या देवीचे स्तवन केले असता विजय प्राप्त होतो म्हणून हे नाव आले असावे एरव्ही या नावाची उत्पत्ति मिळत नाही

सारांश इतकाच की गोवे प्रांतातील अनेक देवतांची नावे जरी निरनिराळी असली तरी साधारणत स्वरूप अष्टभुजा देवीचेच दिसून येते इतर मंदिराप्रमाणे हे मंदिरही चारशे वर्षांचे जुने असावे असे भक्तमंडळी सांगतात

### कामाक्षी

शिरोडे ग्रामी या देवीचे स्थान आहे. प्रथमतः ही देवी साष्टी महालातील राय गावी होती. पण पोर्तुगीज छळाच्या वेळी, सन १५६४ च्या सुमारास शिरोडे येथे स्थलांतर झाले. सह्याद्रिखंडाच्या आधारे या देवतेच्या उत्पत्तिविषयी अशी कथा प्रचलित आहे की, अग्निमुख नामे एका ब्राह्मणाने आसाम येथील कामाख्या देवीला प्रसन्न करून घेतले, आणि गोवे प्रांती येऊन गुणाकर नावाचा आपला पुत्र राक्षसाने मारला आहे, तो परत मिळवून द्यावा अशी प्रार्थना केली. त्याप्रमाणे देवता आली आणि पुत्र परत देववीला, यास्तव अग्निमुखाने तिची स्थापना केली. वनश्रीने युक्त असे हे क्षेत्र रम्य आहे. मंदिरही सुंदर बांधणीचे असून गाभाऱ्यावरील कळस (घुड) दुमजली आणि शिखर अष्टकोनी आहे. कळसाचा भाग सुवर्णाच्या पत्र्याने मढविलेला आहे. गाभाऱ्यात जाताना रूपेरी पत्र्याने मढविलेले दरवाजे दिसतात व आतमध्ये देवी रौप्य सिंहासनावरच आहे. देवीची मूर्ति चतुर्भुजा महिषासुरमर्दिनीची असून हातात त्रिशूळ, खड्ग, चक्र आणि चवथ्या हाती राक्षसाचे मुंडके आहे. देवीच्या उजवा पाय, पायाखाली असलेल्या महिषाच्या पाठीवर असून महिषाचे शीर तोडलेले नाही. देवीचे वाहन मागील बाजूस उभे आहे. ही मूर्ति पचरसी धातूची, सुमारे दीड फूट उंचीची आहे. भक्ताचे स्वप्नात दर्शन देऊन अमूकच एक वस्तु मागून घेणे, थकलेल्या भक्तास नावेतून उतार देणे, दर्शनेच्छुला पंढरपूर क्षेत्रीचा देखावा दाखविणे इ० इ० देवीविषयक अनेक कथा प्रचलित आहेत.

पांडुरंग लाडू शिरोडकरानी ' श्री कामाक्षी महात्म्य इतिहास ' हा ग्रंथ शके १८४९ साली प्रसिद्ध केला आहे. देवीची उत्पत्ति, स्थलवर्णन, दैनंदिन कार्यक्रम आणि बारा महिन्यातील उत्सवाची यादी त्यामध्ये आहे. चैत्र नवरात्र अश्विन नवरात्र, वसंतोत्सव, इ० उत्सव भव्य प्रमाणावर साजरे केले जातात. देवीच्या सेवकवर्गात अभिषेकी, पुजारी, पुराणिक, कीर्तनी, फैरेकर (केरकचरा काढणे) भावीण, मालदार, मशालदार, इलामतदार (चामर धरणारा) नृत्यांगना, मृदंगी, टाळदार, वाजत्री, भाट, घाडी, वेताळाचा गुरव, परीट, न्हावी इ० समावेश आहे.

### नवदुर्गा–मडकई (गोवा)

परशुरामाने गोवा प्रांताची वसाहत करण्यासाठी दहा गोत्रांची ६६ कुळे आणून झाडझाडोरा साफसूफ करून वसाहत केली. शेतावर काम करण्यासाठी जे कुणबी आणले होते, तेच पुढे गावडे नावाने प्रसिद्ध झाले. त्या वेळी

ग्रामसंस्था स्थापन करण्यात आल्या. वंशपरंपरेने जमिनी कुळाकडे असत. ग्रामाधिकाऱ्यास 'गावकर' नावाने संबोधित, आणि महसुलाची व्यवस्था पाहणारास कुलकर्णी म्हणत तसेच ग्रामकार्यास मदतनीस म्हणून न्हावी, परीट, लोहार, सुतार, चांभार, वैद्य इ० वर्गांचाही समावेश केलेला असून, त्यांच्या निर्वाहाची सोय करून दिलेली होती.

प्रथम साष्टी महालातील गावडी या ठिकाणी देवीची स्थापना एक ग्रामदैवत म्हणून करण्यात आली ती केव्हा झाली हे नक्की सांगता येत नाही. पण कालांतराने पोर्तुगीजांचा अमल या भागावर आल्यावर, तेथील प्रजेचे छळ होऊ लागले व मंदिरे उध्वस्त होऊ लागली. हा काळ सन १५६० च्या सुमाराचा असावा. यावेळी देवतेच्या संरक्षणासाठी तिला तेथून हलवून तिच्या महाजनांनी तिला सांप्रतच्या मडकई या गावी आणले. तेथील मंडळाच्या सहाय्याने या ठिकाणी तिचे मंदिर उभारण्यात आले. येथील मंदिर डोंगराच्या पायथ्याशी असून पश्चिमाभिमुख आहे. मंदिराचा घुमट (घूड) गोल व उंच आहे, त्यामुळे फार लांबून त्याची शोभा दिसते आजूबाजूला वनश्रीही सुंदर आहे. त्यामुळे स्थान रमणीय आहे मंदिरासमोरती तळवडी असून ३२ पायऱ्या चढून मंदिरात प्रवेश करता येतो मंदिराचे सभागृह व अग्रशाळा असून मूळ पुरुषाची लहानसर देवळीही आहे

भागात अधिक आहेत. शिवाय पालखीवाहक महाजन निराळे आहेत. वैष्णव संप्रदाय या ठिकाणी शक्तिपूजेमध्ये भाग घेणारा असणे, हा दुर्मिळ योग इतरत्र पाहावयास मिळत नाही. संस्थानच्या मालकीची शेतीवाडी असून त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर देवस्थानाचा खर्च चालतो

या क्षेत्राचे आणिक वैशिष्ट्य येथील उत्सवात आहे वर्षातून २० ते २५ उत्सव निरनिराळ्या दिवशी केले जातात, पण प्रामुख्याने त्यामध्ये वैष्णवाच्या तिथि-वाराचाच भरणा जास्त आहे. मूर्ति शक्तिदेवतेची उत्सवतिथि मात्र वैष्णव धर्मियांच्या आहेत. याचे कारण एकच की, महाजनामध्ये वैष्णव पंथीयांचा अधिकार अधिक आहे आषाढी-कार्तिकी एकादशी, वामनद्वादशी, ऋषीपंचमी, चैत्र वद्य पक्षात वसंतपूजा व भाद्रपद महिन्यात शुद्ध पक्षात भजनी सप्ताहाचा उत्सव, अश्विन वद्यपक्षात हरिजागर इ० इ० उत्सव केवळ वैष्णव पंथीयांचे यथे साजरे होतात दसराही साजरा होतो. पण येथील महोत्सव कार्तिक व ४ पासून १० पर्यंत चालतो रोज निरनिराळे विधि आणि कार्यक्रम आखले जातात शेवटी ५, ६, ७ हे दिवस प्रमुख होत

पाचवे दिवशी उत्सवमूर्ति पालखीतून दुतळे वाड्यावर सोनारकुळाच्या घरी जाते पूजाअर्चा झाल्यावर सोन्याचा नैवेद्य होतो आणि सायंकाळी मंडपात परत येते रात्री नाटकाचा कार्यक्रम आटोपल्यावर सुमारे पहाटे ३ वाजता रौप्य पालखीतून पुन्हा मिरवणूक निघून, देवतळेकडे जाते. त्या ठिकाणी पालखी पोहोचल्यावर मूर्तीला पाण्यामध्ये सांगडी जोडून त्यावर ठेवलेल्या रथामध्ये ठेवतात आणि नौकाविहार सुरू होतो तळ्यामध्ये ठिकठिकाणी कमानीवर दिवे लावलेले असतात त्यामधून नौकाविहार होताना आणि दिव्याचे प्रतिबिंब पाण्यामध्ये अनेक ठिकाणी लखलखत असताना भक्तांना अमाप आनंद लुटता येतो किनाऱ्यावर दारूकाम सुरूच असते हा अपूर्व सोहळा पाहण्यास हजारो भक्त मुद्दाम येत असतात पहाटे पाचच्या सुमारास पालखी परत मंदिरात येते.

सहावा दिवस हा प्रमुख दिवस होय या दिवशी देवीच्या सर्व महाजनांच्या घरी उपाराची (उपहार-नैवेद्य) तयारी चालू असते सकाळी इतर भाविक देवीच्या मंदिरात सामान्य (तांबूळ, नारळ, सुपारी इ० पदार्थ) घेऊन येण्यास सुरुवात होते श्रीचे चरणी वाहण्यासाठी भक्तांची रीघ लागलेली असते अभिषेक सतत चालूच असतो वाद्यांच्या गजरात तुलाभारही होत असतो हा दिवस महापर्वणीचा असल्याने भाविक आपण केलेले नवस याच दिवशी फेडतात मंदिराच्या परिसरात अनेक वस्तूंची दुकाने असून बाजारात भक्तांची खरेदी चालूच असते. भक्तमंडळी नवे नवे उंची कपडे अलंकार घालून दर्शनाला येत असतात असा

या नयनमनोहर देखाव्यात महाजनमंडळी आपले उपार मोठ्या मिरवणुकीने आणतात. अनेक पक्वान्नांनी भरलेली ताटे महाजन स्वत. मस्तकी धारण करून मिरवत येतात. तो दिवस उपवास पाळतात. या वेळेपावेतो मूर्तीचे अभिषेक संपलेले असतात. देवींना पोषाख कुमारिका स्वरूपाचा घालून नंतर महाजनाचे उपार ओळीने मूर्तीपुढे मांडतात. उपारामध्ये मध्यभागी भाताची शुभ्र मूद, त्यावर निरनिराळ्या आकाराचे वडे, शाकभाज्या व पक्वान्ने यांची कुशल मांडणी केलेली असते. सर्व उपार जमा झाल्यावर वाद्य आणि घंटेच्या गर्जनेत मोठ्या भक्तिभावाने ते देवीला समर्पण केले जातात. आयुरारोग्याची प्रार्थना झाल्यावर हा अपूर्व सोहळा संपतो. बाहेर निघताना ते उपाराचे शेष साहित्य, सोमा मूळपुरुषाच्या प्रीत्यर्थ उजवे बाजूचे खिडकीतून बाहेर झाडतात, आणि घरोघर परततात. घरोघर त्या दिवशी अन्नसंतर्पण होते. आणि आनंदाची गोष्ट अशी की, कोणताही वर्णभेद न मानता हरिजनासह सर्वांचे एकत्र भोजन होते. मंदिरात एकत्र केलेल्या उपाराचा ढीग सुमारे दीड दोन खंडीचा होतो. त्याची वाटणी देवीभक्तजनात केली जाते देवीचे गर्भगृह धुवून साफ केले जाते.

रात्रौ १० च्या सुमारास नाटक सुरू होते. त्या वेळी उत्सवमूर्तीची पालखी स्नानासाठी, मंदिराचे प्राकाराबाहेरील तळ्यावर जाते. ती जागा शृंगारून ठेवलेली असून पालखीचा रागण करणारा, कळशांच्या घटातून देवीला स्नान घालणारा व देवीस मंगलस्नान घालणारा सोनार, हे ठराविक मानकरी आपली कामे करतात. मंगलस्नान झाल्यावर मूर्ति रथामध्ये ठेवून, तो रथ सजविला जातो पहाटे चारचे सुमारास नाटक संपल्यावर, नाटकातील पात्रे मूर्तीसमोर येऊन नाचून जातात. सुमारे पाच वाजता आरती होते लोखडो नामक गावडा देवीवर अक्षता टाकतो, गाऱ्हाणे घालतो आणि नंतर पालखीची मिरवणूकसोहळा सुरू होतो. दारू उडत असते, मंगलवाद्यांचा गजर होत असतो. भक्तमंडळी देवींच्या नावाचा जयघोष करीत असतात. हरिजनासह सर्व गावकरी या सोहाळ्यात सहभागी होऊन, मंदिराच्या परिसरात पालखीची मिरवणूक चालत असते. तो आनंद अवर्णनीय असतो. सकाळी ८ च्या सुमारास तो रथ डोंगरावर सुशोभित केलेल्या ठराविक स्थानी नेऊन ठेवतात व सर्वजण घरोघर परत जातात. या सर्व सोहाळ्यात देवाजवळ मशाल धरण्याचे काम अस्पृश्य करीत असतो

सातव्या दिवशी डोंगरमाथ्यावर विश्रांतीसाठी ठेवलेला रथ आरती करून ल्याजम्यासह नाचवीत अवघड उतरणवाटेने खाली येऊन देवीच्या पादुका असलेल्या ठिकाणी सुमारे १२ वाजता येतो तेथे पूजन होते. या ठिकाणचे वैशिष्ट्य असे की, जागेचा ईसाई धर्मपंथीय मालक, रथवाहकांना व इतरांना

पेज वाढतो आणि देवीबद्दल आपला आदरभाव व्यक्त करतो. नंतर गावातील ठराविक मार्गाने मिरवणूक मूळ मंदिराकडे येते मार्गामध्ये अनेक स्त्रिया, नीट पोषाख करून देवीला पंचारती करतात मंदिरामध्ये अनेक ब्राह्मण सुवासिनी व महाजन सुवासिनी मातीचे दिवज घेऊन तयार असतात त्यामध्ये कित्येक स्त्रिया नवस घेतलेल्या असतात. पालखी आल्यानंतर देवीच्या पेटत्या ज्योतीने एक एक दिवज लावले जातात व मंदिरासभोवार पालखीप्रदक्षिणा वाद्यांच्या गजरात चालू होते हरिजन सुवासिनीही शृंगार करून दिवज घेऊन सामील होतात याप्रमाणे प्रदक्षिणा झाल्यावर उत्सवमूर्ति मंदिरात नेतात सर्वांनी देवीची प्रार्थना केल्यावर हा समारंभ संपतो

दुपारची जेवणे आटोपल्यावर रथ पुन्हा सजवितात, समोर कलावंतिणींचे नाच गायन सुरू होते आणि भौस लोकांचा उत्साह नाच गाण्यात, स्वतः उघडे नोडके होऊन हातवारे करण्यात ओसंडत असतो गावकर मंडळीही या कार्यात सामील असतात व एक प्रकारे धुंदी चढलेली असते एक दोन प्रदक्षिणा झाल्यावर रथ थांबला म्हणजे भाविकांची झुंबड रथावर पडते आणि गुढीचा प्रसाद मिळण्यासाठी तुटून पडतात मारामारीचे प्रसंगही येतात त्यापैकी शूर जवान गुळ्या ओढू लागतो आणि अब्दागीरावर झेप घालून खाली कोसळतो असे धाडस करण्यात काही वेळा गुळ्यांची टोके त्याचे शरिरात शिरून जखमाही होतात अब्दागीराचे तुकडे करून देवीच्या पायावर वाहणारा शूर वीर समजला जातो तीर्थप्रसाद घेऊन सर्वजण घरोघर जातात

श्री देवीची मूर्ति मंदिरात नेवून दोल्यावर ठेवतात रात्रौ पूजाअर्चा होते त्यास 'सभापूजा' म्हणतात दारू पिणे, मांस मच्छर खाणे हे निषिद्ध होते, पण पुढे त्याचा सरास उपयोग होऊ लागला आणि मिरवणुकीत मारामारी होऊ लागल्याने रथावरून गुळ्या ओढण्याचा प्रकार बंद करण्यात आला सन १९४२ साली आता मानकऱ्यांकडून देवी खाली उतरून घेतात व झोंबाझोंबी होऊ देत नाहीत रात्रौ सर्वांस प्रसाद वाटल्यावर हा उत्सव समाप्त होतो

( विष्णु वासुदेव कामत–तारकर, पणजी गोवा यांच्याकडून )

हा उत्सव-समारंभ जरा सविस्तरपणे लिहिण्याचे कारण एकतर उत्सवातील चालीरीति माहिती व्हाव्यात व दुसरे महत्त्वाचे कारण असे की, या उत्सवाचे साम्य बाली बेटात होणाऱ्या तीन दिवसांच्या दोला उत्सवाबरोबर आहे, हे ध्यानात होय दोन्ही ठिकाणचे हे साम्य वाचकाचे औत्सुक्य खासच जागृत करील

## नवदुर्गा–कन्याळ–रेडी–वेंगुर्ला

गोवे प्रांती मडकई गावाजवळ, गावस नावाचे लहानसे गाव आहे. त्या ठिकाणी प्रथम या मूर्तीची स्थापना झालेली होती. ती स्थापना कोणी केली व केव्हा केली याला इतिहास उपलब्ध नाही. पण मूर्तीचे स्वरूप पाहिले म्हणजे ती दहाव्या शतकापूर्वीची असावी असे निश्चयाने म्हणता येईल.

पधराव्या शतकात पोर्तुगीज लोकांनी हिंदूचा छळवाद मांडला. अनेक मंदिराचे विध्वंसन केले आणि धर्मांतर सुरू केले. या कृत्याची भीति घेऊन नामत–गावसकर मंडळींनी ती देवी सुरक्षिततेसाठी तेथून उचलून, ब्रिटिश मुलखात, अगर सोंधेकर देसायाच्या मुलखात गडयाच्या डोईवरून आणली. वेंगुर्ले गावी या देवीची स्थापना व्हावी असा त्या मंडळीचा मूळ उद्देश होता. मार्ग-क्रमण करीत असताना विश्रांतीसाठी मंडळी रेडी गावी थांबली आणि साहजिकच मूर्ति खाली जमिनीवर ठेवली. विश्रांतीनंतर मंडळी जेव्हा पुढे निघाली, तेव्हा मूर्ति जागेवरून हलेना आणि उचलणे अशक्य झाले. हा काय प्रकार आहे याची उमज पडावी म्हणून मानकऱ्यांनी ग्रामदेवतेला–माउलीला कौल लावला. तेव्हा असे समजले की, ' देवी पुढे जाण्यास तयार नाही, याच गावी स्थापना व्हावी अशी तिची इच्छा आहे. ' नंतर कन्याळ भागात भक्तांनी जागा खरेदी करून तिचे मंदिर उभारले आणि मूर्तीची स्थापना केली. आज तागायत ती या क्षेत्री नांदत आहे.

पुरुष शिकारीसाठी फिरत फिरत या गावी आला. त्या वेळी गावात मनुष्यवस्ती नसून, सर्वत्र जंगल पसरलेले होते. त्या वेळी वाटसरू शिकारी रात्रीच्या वेळी जंगलात राहण्याची वेळ आलीच, तर झाडावर चढून बसत आणि रात्रीची धोक्याची वेळ घालवीत असत. त्याप्रमाणे नागवस एका झाडावर चढून बसला होता. भयंकर अंधार सर्वत्र पसरलेला व भीतिदायक वातावरण निर्माण झालेले. अशा वेळी त्याच्या समोर एक दिव्य स्त्री रात्री प्रकट झाली व म्हणाली, 'या गावची मी रक्षकदेवता आहे, पण मला रहावयास नीटशी जागा नाही तू या गावी वसाहत कर, आणि मला रहाण्यास जागा बांधून दे. तुझ्या प्रयत्नात मी तुला सर्व तोपरी सहाय्यकारी होईन, आणि इच्छित मनोरथ पूर्ण करीन नागवसने ही गोष्ट मान्य केल्यावर, देवीने सांगितल्याप्रमाणे तो तिच्या मागोमाग गेला आणि देवीने आपले स्वयंभु ठिकाण दाखविले देवता नंतर गुप्त झाली.

दुसरे दिवशी गावी परत आल्यावर घडलेला वृत्तांत त्याने मंडळींना सांगितला त्याने वसाहत करण्यास जाण्याची तयारी करताच कामत नावाचे गृहस्थ त्याबरोबर गेले. त्या दोघांनी तेथे वसाहत केली आणि कालांतराने देवीचे मंदिरही उभारले इतर दहा बारा देवतांची ग्रामरक्षक म्हणून परिसरात स्थापना करण्यात आली काही वर्षांनी राणे घराण्यातील आणखी एकदोन पुरुष तेथे वसाहतीसाठी आले. यामुळे देवीचे एकूण चार मानकरी तयार झाले आणि आजतागायत तेच व्यवस्था पाहतात

या देवीची जागृतपणाची आख्यायिका अशी प्रचलित आहे की, पोर्तुगीजांनी या प्रदेशी प्रवेश केल्यावर, तेरेखोलपर्यंत त्यांनी आक्रमण केले पुढील आक्रमणासाठी आणि रेडीगावी जाऊन लोकांचे धर्मांतर करण्यासाठी आणि मंदिर उध्वस्त करण्यासाठी, तेरेखोल किल्ल्यावर तोफाही डागण्यात आल्या दुसरे दिवशी आक्रमण होणार ते कसे टाळावे म्हणून देवीला कौल लावण्यात आला 'अधार' वाहू लागला व त्याने भक्तांना सांगितले की, 'घाबरण्याचे मुळीच कारण नाही कोणीही भितीने गाव सोडू नये तीन दिवसात देवी भीतीचे निवारण करील' आणि आश्चर्य असे की, तिसऱ्या दिवशी तोफेचा गोळा मंदिरात पडताच सहस्रावधी गांधीलमाशा तेथे उत्पन्न झाल्या आणि थवेच्या थवे, तेरेखोलच्या दिशेने थैमानत निघाले पोर्तुगीजांनी हे महा भयंकर संकट टाळण्यासाठी, किल्ल्यातून पोबारा केला आणि पुन्हा मंदिर विध्वंसनाचा उपद्व्याप केला नाही

दुसरा एक अनुभव असा सांगतात की, देवस्थानाची शुद्धि करण्यासाठी वाराणसीहून मुद्दाम ब्राह्मण बोलाविण्यात आले वेदमंत्रांचा उच्चार ऐकण्यास

ज्याना धार्मिक अनुज्ञा नाही, अशा मंडळींना मंदिराबाहेर ठेवण्यात आले. या वेळी एका भक्ताच्या अंगात देवीचा संचार झाला आणि त्याने नारळ आकाशात फेकताच, परतेवर त्याचे तुकडे झाले. या मुहुर्तावर देवीची शुद्धि व्हावी असा त्याने आदेश दिला. ब्राह्मणांनी हा चमत्कार पाहिला आणि त्याच मुहुर्तावर सर्व विधि पार पाडला, तोही सर्व मंडळींना मंदिरात प्रवेश देऊन हे विशेष होय.

महालक्ष्मी ( बांदिवडे ).

अंतरूज महालात हे क्षेत्र आहे. तिरहुतहून ही मूर्ति प्रथम साष्टी महालातील कोलवे गावी वसविली गेली आणि नंतर पोर्तुगीज धर्मछळाच्या वेळी ती सांप्रतच्या गावी आली आहे. ज्याप्रमाणे महिषासुरमर्दिनी देवीची उत्पत्ति या ग्रंथामध्ये दिली आहे, तद्वतच ती गो. सा ब्रा. कुलदेवते या ग्रंथात दिलेली आहे ( पृ. ७७ ), पण ती बरोबर नाही. समुद्राचे मंथन झाले त्या वेळी या देवतेची उत्पत्ति झाली असे म्हणता येते. कारण देवीची मूर्ति हातात मातुलिंग, गदा, खेटक, पानपात्र या आयुधांची असून बाजूला सिंह आहे. याचाच अर्थ असा की, ही चतुर्भुजा कोल्हापूर येथील महालक्ष्मीप्रमाणे आहे. तेव्हा महिषासुरमर्दिनीची उत्पत्ति दिली आहे, ती बरोबर नाही.

एक वाक्य आहे, ' चिरे तव नेती मुळेवरी ' म्हणजे तुझी वस्त्रे डोंगरावरील मूळ स्थानाला नेतात. याचाच अर्थ असा घ्यायचास पाहिजे की, देवीचे मूळ स्थान डोंगरावर असून पायथ्याला हे रूप नंतर स्थापन केलेले आहे. ' वट-वृक्षातळी येता, वर्णिती सप्तभगिनिंचे ल्ळे " सप्तभगिनी हा प्रयोग फक्त सप्त-मातृकांना लागू होतो आणि वैष्णवी ही एक त्यातीलच मातृका आहे. त्यावरून ही देवता म्हणजे सप्तमातृकातील एक होय असे अनुमान काढता येते.

वैशाख शु. ५ ला या क्षेत्री भव्य यात्रा भरते. एका पुरातन वटवृक्षा-खाली वर्षभर साठवून ठेवलेली वाळलेली लाकडे पेटविली जातात आणि निखारे खदिरांगारासारखे तप्त झाले म्हणजे अनेक भक्त उघड्या पायांनी त्यावरून चालत जातात, पण त्यांना कोणत्याही प्रकारची इजा पोहोचत नाही व हीं सर्व देवीची कृपा समजली जाते. यासाठीच एक जागृत देवस्थान म्हणून याला बोलवाला आहे.

वरील देवींच्या स्थानाव्यतिरिक्त मंगेशी, नागनाथ इत्यादि दुसरी अनेक प्रेक्षणीय देवस्थाने या प्रांतात आहेत. मंदिरांची व्यवस्था जरी काही संस्था पाहात असल्या, तरी गोवे सरकारचे त्यावर नियंत्रण होते. भक्तांनी करावयाच्या धार्मिकविधींच्या खर्चाचे तक्ते प्रत्येक मंदिरात लावलेले आहेत. यामुळे कोणी भक्त, पुजारी अगर पंडे लोकांकडून फसविला जाण्याची शक्यता कमी आहे. मंदिरे स्वच्छ आणि व्यवस्था उत्तम असल्याने, भक्तांना एक प्रकारचा आनंद उपभोगावयास मिळतो. प्रत्येक देवस्थानाचे अनेक सेवेकरी नेमून दिलेले आहेत. ते आपापली कामे चोख पार पाडीत असतात. अनेक सेवेकरी, कलावंतिणी वार्षिक यात्रेच्या वेळी अगर देवाची पालखी निघाल्यावर पालखीपुढे नृत्य करून देवीची सेवा करतात. प्रत्येकाने आपल्या उभ्या हयातीत एकदा तरी या देवस्थानचा टापू पहावा, असाच तो आकर्षक आहे प्रत्यक्ष लेखकाचाच असा अनुभव आहे.

## (१५) जीवदानी

विरार ( जिल्हा ठाणे ) गावाजवळ एका डोंगरमाथ्यावर हे क्षेत्र आहे. ते चढून जाण्यास कठीण आहे. एक मार्ग पायऱ्यांचा तर दुसरा स्वाभाविक डोंगरचढण-उतरणीचा आहे. हे एक जागृत स्थान मानले जाते.

या देवीच्या उत्पत्तीची कथा अशी दिली आहे की, ' डोंगराच्या पायथ्याला एका अंत्यजाच्या शेतामध्ये एक गाय दररोज चरावयास जात असे. अनेक दिवस झाले तरी शेतमालकाला चराईबद्दल पैसे मिळेनात. एके दिवशी

सायंकाळी गाय चरून परत जात असता तो तिच्या मागोमाग गेला, कारण त्याला त्या गाईचा धनी शोधून काढावयाचा होता. ती गाय सरळ डोंगरमाथ्यावर गेली आणि एके ठिकाणी थांबली. एवढ्यात अचानक एक बाई तेथे प्रकट झाली. हीच गाईची मालकीण असावी अशा समजुतीने त्याने त्या गाईबद्दल त्या बाईला विचारले. आपणच त्या गाईची मालकीण आहोत असे त्या बाईने त्याला सांगितले. नंतर त्या अंत्यजाने मागील सर्व दिवसांचे चराईचे पैसे तिच्याजवळ मागितले. त्या स्त्रीने लगेच कमरेला अडकविलेल्या पिशवीतून पैसे बाहेर काढले आणि ते त्याच्या हाती देणार एवढ्यात अंत्यज ओरडला, ' बाई, मी अंत्यज आहे. मला शिवू नकोस. '

हे शब्द ऐकताच त्या स्त्रीला काय वाटले कोणास ठाऊक ? किंवा त्या अंत्यजाची सावली तिच्यावर पडून ती अपवित्र झाल्यामुळे म्हणा, ती स्त्री एकदम गुप्त झाली. बाई दिसेनाशी होताच गाईनेही कड्यावरून खाली उडी मारली. या गोष्टीची स्मृति म्हणून या डोंगरमाथ्यावर मंदिर बांधले गेले. आपल्या जीवाचे दान देणारी म्हणून जीवदानी हे नाव आले असण्याची शक्यता असावी, असे बोलले जाते.

डोंगरमाथ्यावर १०–१२ चौरस फुटांचा सपाट भाग एका कपारीखाली असून मध्य भागी एक छिद्र असून पैपैसा त्यामध्ये वाहतात. साधारणतः ३०–४० माणसे एके वेळी येथे राहू शकतील. सपाट भागाच्या बाजूला कडा तुटलेला आहे. मंदिर अथवा देवता येथे नाहीत. एक लहानसा तांदळा मात्र आहे, त्याचे पूजन भक्त करतात, असे कळते.

( ठाणे जिल्हा गॅझेट, १४।३८२ )

मंदिरामध्ये प्रत्यक्ष देवीची मूर्ति नाही. कारण या ठिकाणी ती अंतर्धान पावलेली आहे. मध्यभागी एक खाडा भूमीमध्ये आहे. त्याच छिद्रामधून देवी अंतर्धान पावली असा समज रूढ असल्याने, देवीला अर्पण करावयाचा पै-पैसा त्या छिद्रातून आत टाकतात. डोंगर चढताना काही ठिकाणी गाईच्या वासराच्या आकृति खोदवलेल्या दिसतात, तर काही ठिकाणी नुसत्या वासराची पाऊलेच कोरलेली दिसतात. अनेक जातींचे भक्त दूर अंतरावरून देवीच्या दर्शनाला येतात.

### (१६) ज्वालादेवी आणि जालंधर पीठ

पिण्डजिव्हा चलज्ज्वाला शिवा ज्वालामुखी तथा ।
एताश्चान्याश्च देवेश सोऽसृजन्मातरस्तदा ॥ (मत्स्य पु. १७८।३२)

पिंडजिव्हा, चलज्वाला, शिवा आणि ज्वालामुखी या चार व आणिकही अनेक माता शिवाने निर्माण केल्या

पंजाब प्रांती कांग्रात नौदान या रस्त्यावर व एका डोंगरमाथ्याच्या उतरणीवर आणि बिआस नदीच्या जवळपास ते आहे हे पीठ महाभारतकालीन असून, त्या ग्रंथामध्ये ह्याचा निर्देश मिळतो तसेच शिवपुराण आणि देवीभागवत या पुराणामध्येही तो मिळतो प्राचीन काली या ठिकाणी फार मोठी वस्ती असावी कारण अनेक जुन्या मोडक्या घरांचे अवशेष अद्यापीही या ठिकाणी आढळतात या ठिकाणी प्रामुख्याने क्षेत्रीय पुरोहितांची वस्ती दिसते त्यांना भोजकी असे म्हणतात ते व्यवहाराला प्रामाणिक नाहीत, असा लोकप्रवाद बाहेर आहे

प्राचीन काळी या क्षेत्रात जालंधर नावाचा राक्षस फार प्रबळ झालेला होता शंकरांनी त्याच्यावर पाषाणाचा वर्षाव करून त्याला ठार केला त्या वेळी त्या दैत्यमुखातून भयंकर ज्वाळा निघाल्या त्यामुळे हे स्थान निर्माण झाले, अशी पौराणिक उत्पत्ति आहे परंतु येथील पुजारी ब्राह्मणांनी अशी कथा पसरविली आहे की, बाराव्या शतकात दक्षिणेमधील एका ब्राह्मणाला दृष्टांत झाला की, 'पंजाबमध्ये गर्द वनश्रीच्या ठायी हे स्थान आहे त्या ठिकाणी देवीची स्थापना करावी दृष्टांतानुसार तो ब्राह्मण या प्रांती आला आणि खुणेवरून ते ठिकाण शोधून काढून त्याने तेथे देवीची स्थापना केली

जालंधर दैत्याला शंकरांनी ठार केल्यावर त्याचा विस्तीर्ण देह भूमीवर पालथा पडला त्या अवाढव्य देहाचे मस्तक वैजनाथ येथे पडले आणि नाभी कांग्रा येथे पडली एक भुजा त्रिलोकनाथ येथे तर दुसरी ज्वालामुखी येथे पडली त्याचे पाय कांग्रान या गावी पडले साधारण ४८ कोसांचा प्रदेश त्याच्या देहाने व्यापलेला होता मरताना त्याने आपली इच्छा व्यक्त केली की, 'या प्रदेशात कोणी मृत्यु पावल्यास त्याची सर्व पापे नाहीशी व्हावीत' वास्तव आजही ही पंचक्रोशी फार पवित्र मानली जाते (याचा अर्थ जवळही असेल की, ४८ चौरस मैलाचा टापू या राक्षसाच्या भ्रमतीसाठी होता )

ज्वाला मंदिराची बांधणी साधीसुधी असून, ती सर्व मुसलमानी धाटणीची भासते त्याचे वैशिष्ट्य म्हणजे मंदिराच्या आतील गाभ्यास सुवर्णाचा मुलामा चढविलेला आहे त्याचप्रमाणे छताचा भागही सुवर्ण मुलाम्याचा आहे आता तो मुलामा किंचित् काळसर होत चालला आहे, ही गोष्ट अलाहिदा सरदार खड्गसिंगाने या मंदिराला चमत्कृतीपूर्ण चांदीचे दरवाजे बसविले असून, त्या

उत्कृष्ट नमुन्याचा उपयोग लॉर्ड हार्डिंज यांनी अन्य ठिकाणी केलेला आहे, इतका तो वैशिष्ट्यपूर्ण आहे

या ठिकाणी देवीची मूर्ति नाही भूमीतून निघणाऱ्या ज्वाळा हीच देवी मानली जाते गाभाऱ्यात ज्वाला निघण्याच्या ठिकाणी एक तीन चौरस फुटाचे कुंड असून सभोवार फरसबंदी आहे भूगर्भातील ज्वालाग्राही वायु हळूहळू वर सरकत असतो आणि अनेक ज्वालांनी वर येत असतो येथून अनेक ज्वाला वर येत असतात पश्चिम बाजूकडून चार, कोपऱ्यातून एक व उजवीकडे एक याप्रमाणे ज्वाला दिसतात कधीकधी या ज्वालांची संख्या तेरापर्यंतही जाते ज्वाला आपोआप विझतात आणि काही वेळाने पुन्हा पेटतात मागील बाजूच्या विहिरीमधून दोन ज्वाला येतात ज्वालांच्या समोर एक कालदेवीची लहानशी मूर्ति ठेवलेली आहे पण ती या क्षेत्राची अधिष्ठात्री नव्हे काही भक्त देवीपूजनानंतर या कुंडामध्ये दुधाचा भोग चढवितात त्या वेळी ह्या ज्वालांचे इकडून तिकडे तरळणे फार गमतादार दिसते इतकेच नव्हे तर त्या भांड्यातून दूध ज्वालांवर ओतले जाते, त्या भांड्यामध्ये ज्वाला शिरतात व दूध तेथेच ज्वालारूप होते ते भांडे बाहेर घेतले तरी काही वेळा ज्वाळा त्यामध्ये दिसतात दुधाचा पूर्ण ग्रास घेतल्यावरच ज्वाला शांत होते हा चमत्कार पाहण्यासाठीच अनेक भक्त दुधाचा भोग देत असतात

भक्तांची अशी भावना आहे की, कुंडामध्ये समोर ज्या ज्वाला दिसतात त्यांपैकी पहिल्या तीन महालक्ष्मी, महाकाली, महासरस्वतीची रूपके असून बाकीच्या या नवदुर्गास्वरूपी होत

अशी दंतकथा प्रचलित आहे की, यवनी आक्रमकाच्या भीतीमुळे एके वेळी क्षेत्र सुरक्षित राखण्याच्या हेतूने भक्तांनी देवीचे कुंड व गाभारा पाण्याने पूर्ण भरून टाकला परंतु आदिमायेची शक्ति इतकी अफाट की तेवढ्या पाण्यातूनही ज्वालांचे वरती उफाळणे चालूच राहिले

सन ७८८ च्या सुमारास सुल्तान फिरोजशहा तारघेक याने नागरकोटवर स्वारी केली त्या वेळी त्याला प्रथम शिवपार्वतीला तोंड द्यावे लागले तेथे लोकांना त्याच्या असे निदर्शनास आणले की, पूर्वी अलेक्झांडरने स्वारी केली त्या वेळी त्याने त्याची पत्नी नौशाबा हिचा पुतळा मागे ठेवला होता त्यालाच लोकांनी ज्वालामुखी हे देवीचे नाव दिले सुल्तानाने नगरकोटची देवीची मूर्ति फोडून त्याच्या तुकड्यांना गोमांस माखून, पोत्यामध्ये ते तुकडे भरून, ती पोती ब्राह्मणाच्या गळ्यात अडकवून राजरस्त्याने त्यांची धिंड काढली त्या ठिकाणी १३०० ग्रंथ होते त्यांपैकी तत्त्वज्ञान, ज्योतिषविषयक ग्रंथांचा पर्शियन भाषेत

त्याने भाषांतरे करवून घेतली आणि त्याना "Arguments of Feroze" असे नाव दिले. (Studies in Indian History by Elliot Dowson, P 71)

एके काळी हे देवस्थान अतिशय श्रीमंत होते, ह्याचा उल्लेख अनेक इतिहासकारानी केलेला आहे. प्रसिद्ध बखरकार फेरिस्ता म्हणतो, 'सन १००८ साली सुलतान महमुदाने ज्या वेळी हे देवस्थान लुटले, त्या वेळी त्या लुटीत सात लक्ष सुवर्ण दिनार, ७०० मणाचे सोन्या चांदीचे पत्रे (१ मण = ८० पौंड), २०० मण शुद्ध सोन्याच्या लगडी, २००० मण अशुद्ध चांदीचे पाट, आणि सर्व जातींची २० मण रत्ने, ज्यामध्ये हिरे, मोती, पाचू, माणिक इत्यादींचा समावेश होता.'

प्राचीन काळी या क्षेत्री अश्वमेध यज्ञ झालेला होता. त्या वेळी वज्रेश्वरी देवीची स्थापना केलेली होती. ती मूर्ति अद्याप पहावयास मिळते. गझनीच्या महमुदाने मंदिराची लूट केल्यानंतर, ते उध्वस्त केले होते आणि त्यावर मशीद उभारली होती. पण देवीच्या भक्तगणानी, मुसलमानाचा जोर कमी झाल्यावर मशीद पाडून पुन्हा मंदिर उभारले आहे राजा तोडरमलबरोबर अकबर बादशहाने सुद्धा या क्षेत्राला भेटी दिल्याचा आणि तिला वंदन केल्याचा उल्लेख मिळतो. रणजितसिंहाने पंजाबप्रांत स्वतंत्र केल्यानंतर मंदिराचे कळस पुन्हा सोन्याच्या मुलाम्याचे बनविले. याप्रमाणे अन्यधर्मीय सहिष्णु राजानी देखील या देवीचे महत्त्व मानल्याचा उल्लेख आढळतो

या क्षेत्राच्या ठिकाणी ज्वालामुखी वज्रेश्वरी व चिंतपूर्णी ही देवीची स्थाने १५–२० मैलाच्या परिसरात असल्याने जो त्रिकोण घडतो तो शक्तिस्थानामध्ये महत्त्वाचा समजला जातो. येथील रूढि अशी आहे की, या त्रिकोणात कोठेही केलेले नवस चिंतपूर्णीचे मंदिरात फेडले जातात, पण चिंतपूर्णीचा नवस मात्र याच ठिकाणी फेडावा लागतो. ज्वाला व वज्रेश्वरी याना आराम करण्यासाठी पलंग आहेत, पण चिंतपूर्णी ही कुमारीरूप असल्याने तिला लहानमुलाप्रमाणे टोपलीत निजवितात. या ठिकाणी भक्तमंडळी जो प्रसाद वाटतात तो भव्य कढईत शिरा तयार करून वाटण्याची रूढि आहे.

शक्तिकेंद्राच्या त्रिकोणाला एक आगळेच महत्त्व असते, याचे कारण उघड आहे. शक्तियंत्रे ही बहुधा त्रिकोणाकृति तयार केली जातात आणि यंत्राच्या त्रिकोणाप्रमाणे क्षेत्राची मांडणी ज्या स्थळी असेल त्याला साहजिकच महत्त्व प्राप्त होते.

तुकाराम महाराजाचे परात्पर गुरु राघवचैतन्य यानी या देवीचे स्तोत्र रचले आहे. त्याचा भावार्थ असा की, कोण्यानधी देवाचे दैदिप्यमान मुकुट जिच्या चरणी सदैव झुकलेले आहेत, कोण्यानधी चन्द्रसूर्याप्रमाणे तेजस्वी मण्यां मुळे जिची वेणी शोभिवत झालेली आहे, कल्पांतीच्या क्षोभामुळे जिने जांभई देताच, सहस्त्रावधी ज्वाळा वर उफाळून निघालेल्या आहेत आणि त्या भयंकर ज्वाळामुळे अक्राळविक्राळ दिसणाऱ्या मुखात सकळ भूतमात्र लहानशा घासाप्रमाणे सामावलेला आहे अशी ही देवता आमुचे रक्षण करो

या ठिकाणी ज्याप्रमाणे खडकाच्या भेगातून ज्वलनशील वायूचा उद्रेक होतो आणि ज्वाळा सदैव ज्वलनशील असतात तसाच प्रकार अमरकंटक क्षेत्री ज्वालेश्वर या ठिकाणी पाहावयास मिळतो भूभागातून वायु सतत येत असतो आणि काडी पेटवून लावली असताच तो पेट घेतो मत्स्यपुराणातरीची कथा अशी की ( १८८–८० ), शंकराने जी तीन पुरे जाळली त्यापैकी एक या क्षेत्री पडले म्हणून असा चमत्कार घडत असतो या क्षेत्री स्नान केल्याने स्वर्ग प्राप्ति आणि प्राणदान केल्यास जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका होते असे पद्म पुराणात वर्णन मिळते ( १–१५–६९ )

अबुल फजल आपल्या 'ऐने अकबरी' मध्येही याचा उल्लेख करतो मंडला शहरी ( वऱ्हाड ) गुड्डु धीमर पंडा याच्या घरी सिंहवाहिनी देवीची मूर्ति बसविलेली आहे पूर्वी हा पंडा आपली स्वतःची जिव्हा कापून देवीला रक्त अर्पण करीत असे. काही दिवसानी ती कापलेली जीभ पुन्हा साधून जाई, पण

कालांतराने ही पद्धत बंद पडून आता तो पंड्या आणि त्याचे काही वंशज आपल्या मनगटांतून रक्ताचे काही थेंब काढून ते देवीला अर्पण करीत असतात.
(मंडला जिल्हा गॅझेट, पृष्ठ २५०).

जालंदर–कांगडा पीठ

कांगडाच्या परिसरातील प्रदेशाला पूर्वी कीरग्राम अथवा किराताचा प्रदेश म्हणत असत. ऋग्वेदामध्ये शंबर हा इंद्राचा शत्रु असे वर्णन आहे. तो याच भागाचा राजा होता. रावी आणि बियास या दोन नद्यांतील पहाडी मुलुखावर त्याचे आधिपत्य होते आणि याच नद्यांमधील सपाटीच्या प्रदेशावर दिवोदासाचे अधिराज्य होते. हे दोघे परस्परांचे हाडवैरी होते. याच शंबराला पुढील परंपरेत जालंदर असे नाव मिळाले. युद्धामध्ये या ठिकाणी जालंदराचा कान गळून पडला म्हणून कानगडा–कानगडा–कांगडा नाव आले, अशी एक लोकव्युत्पत्ति देतात.

कांगडा शहर सुमारे २३५० फूट उंचीवर असून, बाणगंगा आणि माझी या दोन नद्यांच्या मध्यभागी वसलेले आहे. एका बाजूला जुने कांगडा (ज्याला नगरकोटकी म्हणतात) व दुसऱ्या बाजूला नवे कांगडा अशी मांडणी आहे. असे सांगितले जाते की, भारतीय युद्धानंतर सुशर्मांचंद या राजाने नगरकोटकी शहराची वसाहत केली. सहाव्या शतकातील एका दुसऱ्या जालंदर राजाचीही हीच राजधानी होती. (भा. सं. को. २–२०८). कांगडापासून २१ मैलांवर ज्वालादेवी मंदिर आहे. चिंतपूर्णी सुमारे तेवढ्याच अंतरावर आहे.

ज्याप्रमाणे अकबर बादशहाने या स्थानाला भेट दिली, त्याप्रमाणे सन १३६० साली फिरोझ तघलक यानेही या स्थानाला भेट देऊन तिच्या जागृतपणामुळे त्याने स्वतः सुवर्णाची छत्री देवीवर धरली होती, असे प्रसिद्ध आंग्ल इतिहासकार इलियट आपल्या 'हिंदुस्थानचा इतिहास' यामध्ये वर्णन करतो.

डोंगरमाथ्यावर असल्याने आणि भोवती संरक्षणार्थ लहानशी भिंत अथवा कोट असल्याने या देवीला 'नागर-कोटकी' असेही संबोधिले जाते. उषा-अनिरुद्ध विवाहाच्या वेळी अनिरुद्धाने कोटवती देवीची प्रार्थना केल्याचे महाभारतात नमूद केलेले आहे. तेव्हा कोटकी आणि कोटवती एकच की काय असा संशय येतो, कारण दोघींचा अर्थ एकच निघतो.

जालंदर पीठामध्ये सतीचा स्तनभाग पडला आणि शक्तिपीठ तयार झाले. दुसरा भाग अर्बुदाचलावर पडला असे तंत्रशास्त्र सांगतात. यामुळे या ठिकाणी साक्षात् देवीचे वास्तव्य आहे, असे मानतात. याच कारणासाठी प्राचीन काळी

या ठिकाणी व्यास, जमदग्नि, वसिष्ठ, मनु, परशुरामादि ऋषींनी तपश्चर्या केली आणि तारादेवीची उपासना केली. या पीठाची अधिष्ठात्री देवता काळी, तारा, त्रिपुरा आणि वज्रेश्वरी या होत. वज्रेश्वरीला विद्यादेवी असेही नाव आहे. भारतीय स्त्रिया ज्याप्रमाणे आपला स्तनभाग पदराखाली झाकून घेतात, त्याप्रमाणे येथे स्तनरूपी देवताही झाकून ठेवलेली असते. देवीच्या फक्त मुखवटयाचे दर्शन पाहणाऱ्याला घडते.

या देवीव्यतिरिक्त या परिसरात विश्वमुखी, अंबिका, जालपा, आशापूर्णी, चामुंडा, तारिणी इत्यादि अष्टभुजा देवताच्याही मूर्ति आहेत. तसेच व्यास, मनाली, जमदग्नि, परशुराम याचे आश्रम आहेत. यामुळेच ज्वाला आणि जालंदर पीठाला महत्त्व आलेले आहे.

गझनीच्या सुल्तान महमदाने कांग्रा येथील मंदिर लूटून अमाप संपत्ति नेली हे आपण वर पाहिलेच आहे भारतामध्ये एके काळी सुवर्णाचा धूर निघत असे, असे आपण वारंवार ऐकतो, पण त्यानंर आजच्या तरुण पिढीचा सत्य माहितीच्या अभावी विश्वास बसत नाही. गझनीच्या महमदाने सोमनाथाचे मंदिर लूटून किती संपदा परदेशी नेली, याचे वर्णन याच ग्रंथात इतरत्र पाहावयास मिळेल. तेव्हा या संदर्भात आणखी एक उदाहरण नमूद करणे योग्य वाटते.

पूर्वी मुल्तान येथे एक श्रीमंत आदित्य मंदिर होते. ते मुसल्मानांनी लुटले. त्यासंबंधी इतिहासकार इलियट लिहितो (पृष्ठ २०३), 'सन ७१२ च्या सुमारास ज्या वेळी महमद कासीमने मुल्तान जिंकले, त्यावेळी त्याला असे समजले की, आदित्य मंदिराच्या पायाभरणीमध्ये द्रव्य पुरलेले आहे. आदित्याची सुवर्णाची मूर्ति फोडून त्याने पाया खणून काढला. त्या वेळी त्याला सुवर्णकणांनी भरलेले ५० ताब्याचे हडे मिळाले सर्व सुवर्णमूर्तीचे वजन २३० मण आणि इतर वस्तु मिळून त्याने एकूण १३,२०० मण (१ मण = ८० पौंड) सुवर्ण स्वगृही नेले' प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएन सॅंग या मंदिराचा उल्लेख करतो. राजेरजवाडे ज्या वेळी या देवीच्या दर्शनाला जात तेव्हा रत्नाची ताटेच्या ताटे भरून ते ती देवाला अर्पण करीत मंदिर लुटल्यानंतर त्या ठिकाणी मशीद उभारली गेली. भक्तांनी पुन्हा तेथे मंदिरे उभारले, पण औरंगजेबाने ते पाडून पुन्हा त्या ठिकाणी मशीद उभारली

भारताच्या श्रीमंतीचा हा आणखी एक पुरावा पहा –

शहाजहान बादशहाच्या वेळी साम्राज्यलक्ष्मी शिखरावर विराजमान झालेली होती. ताजमहाल, आग्रा व दिल्ली येथील लाल किल्ले त्या वेळीच

बांधले गेले. दिल्ली येथे भूगर्भामध्ये दोन विस्तीर्ण हौद धनसंचय भरण्यासाठी तयार करण्यात आले होते. त्यांची लांबी ७० फूट, रुंदी ३० फूट आणि खोली ३० फूट होती. आत जाण्यास गुप्तरीतीने प्रवेशमार्ग असून पृष्ठभागी रक्षकांची राहण्याची सोय केलेली होती. राजाचा विलासी रंगमहाल सुवर्णाच्या पत्र्यांनी मढविलेला असून त्यामध्ये रत्नजडित बिलोरी आरसे, छतावरही त्याच प्रकारचे आरसे असून त्यांना सुवर्णाच्या झालरी व मोत्यांची तोरणे असत.

राजाचे मयूर सिंहासन सहा भरीव पायांचे आणि हिरेमाणकांनी मढविलेले असून ते सजविण्यासाठी ५५० पौंड लालमणी, माणिक, रक्तमणी, मोती, हिरे, पन्ना, मरकतमणी वापरलेले होते. एकूण सुवर्णाचे वजन सुमारे २५०० पौंड होते. त्याची किंमत सुमारे ५३ कोटी 'होती आणि ते घडविण्यास सात वर्षे लागली होती. दिवाण-ई-खास राजदरबारच्या महालात १०३ चांदीच्या आणि ५ सुवर्णाच्या खुर्च्या होत्या. बादशहाचे स्नानपात्र ७×५ असून त्याची किंमतच १० अब्ज रुपये होती. शाही महालात मुलाखतीच्या वेळी जी तबके वापरली जात त्यासाठी २५ टन सोने व ५० टन चांदी वापरलेली होती. त्यांची किंमत १५ कोटी रुपयांहूनही जास्त होती. याशिवाय राण्यांचे अनेक हिऱ्यामोत्यांचे अलंकार होते ते निराळेच. राणीजवळ एक हिरा तर नारळाएवढा मोठा होता.

शहाजहान बादशहा आपली संपत्ति दिल्ली, ग्वाल्हेर, असीरगड, आग्रा येथील किल्ल्यामध्ये विभागून ठेवी. असा अंदाज केला जातो की, त्याच्याजवळ १७ टन सोने, १११६ टन चांदी, ८० पौंड हिरे, १०० पौंड लालमणी, १०० पौंड पन्ने, ६०० पौंड मोती व २००० रत्नजडित मुठीच्या तलवारी होत्या. कोणी एका संशोधकाने सन १९५२ साली ब्रिटिश साम्राज्याची दौलत १,५०,००,००,००० डॉलर्स केलेली आहे, तर शहाजहानची दौलत १०,००,००,००,००,००० रुपये असल्याचे सांगतात.

एकदा त्याने एक उत्कृष्ट हिरा एका सुवर्णाच्या मेणबत्तीवर बसवून तो मक्केच्या पैगंबरला भेट दिला. त्याचे वजन १४ पौंड होते. सर थॉमस रो म्हणतो, "विजापूरच्या राजाने एकदा नजराणा दिला. त्यामध्ये ३६ हत्ती व ५० घोडे होते. पैकी दोन हत्ती सुवर्णशृंखलांनी सुशोभित केलेले होते. त्या सुवर्णाचे वजन ४ मण २५ शेर होते. घोड्यावरील साजांची किंमत ५० लाख रुपये होती."

ही सर्व संपत्ति त्याने कोठून जमविली? त्याने अनेक हिंदू मंदिरे लुटली. अमीरउमरावांजवळील संपत्ति क्षुल्लक कारणावरून सरकारजमा केली. रयतेच्यामध्ये

प्रजाजनांची लूट केली तहनाम्यासाठी गोवळकोंडा जहागिरीकडून हिरेमाणकांच्या २०० पेट्या घेऊन पुन्हा ३० कोटींची लूट मिळविली इत्यादी मार्गांनी त्याने पैसा गोळा केला (अनिल, अमृत मासिक, नोव्हेंबर १९६२)

परकीय अमलाखाली जाण्यापूर्वी भारत देश याप्रमाणे धनवान देश होता. आता सुमारे १२०० वर्षांनतर सन १९४७ साली तो पुन्हा स्वतंत्र झालेला आहे. आजच्या ताज्या रक्ताच्या तरुणांनी ही उदाहरणे डोळ्यासमोर ठेवून भारतमातेला पूर्ववैभव प्राप्त करून द्यावे हीच त्या धनलक्ष्मीची मनीषा आहे.

(कल्याण शक्तिअंक, पृष्ठ ६९३, क्षेत्र अंक, ५७।६८, जम्मू धर्मकोश, ७।५०, अमृतसर जि. गॅ., पृष्ठ २४८-५९, मुल्तान जि गॅ, पृ. ३३५.)

भारतामध्ये प्राचीन काळी जशी श्रीमंत देवालये होती, तशी काही प्रमाणात सांप्रतही आढळतात कामाख्या, काशी, नाथद्वारा, गुजराथ प्रांतातील काही मंदिरे, मुंबई शहरातील माधवबाग, मुंबादेवी, दक्षिण प्रांतीची कामाक्षी, मीनाक्षी, तिरुपती-व्यंकटेश्वर इ० अनेकांची नावे घेता येतील. त्यापैकी आपण तिरुपती येथील व्यंकटेश्वर देवाल्याची संपत्ति थोडक्यात पाहू.

मद्रास शहरापासून ९० मैल अंतरावर असलेल्या व २८०० फूट उंचीच्या दीड मैल चौरस डोंगरपठारावर हे स्थान आहे दररोज देवापुढे द्रव्यरूपाने व देणगीरूपाने भक्तगण देतातच पण नुसते सुवर्ण दागिने सुमारे २०० तोळेपर्यंत येतात हत्ती, घोडे, गाई वगैरे संस्थानची मालमत्ता आहे. सन १९६२ साली या संस्थानचे वार्षिक उत्पन्न १। कोटी रुपयांचे होते या क्षेत्री दर्शनार्थी स्त्रीवर्गाने डोक्यामध्ये फुलांच्या वेण्या घालून जावयाचे नाही, कारण तसे केल्याने देवाचा अपमान होतो, असे मानण्यात येते. इतकेच नव्हे तर या क्षेत्री अशीही रूढि आहे की, महिलावर्गाने आपले वेणीदान या क्षेत्री करून मगच मूर्तीचे दर्शन घ्यावे यामुळे दरवर्षी सुमारे १४ टन केस गोळा होतात आणि इतरत्र ते वगावनासाठी पाठविले जातात

येथे येणाऱ्या संपत्तीचा आधुनिक पद्धतीनेच उपयोग केला जातो आणि काळाची पावले ओळखून निश्चस्थ वागत असतात देवस्थानचे स्वतंत्र विद्यापीठ असून, ते 'व्यंकटेश्वर विद्यापीठ' या नावाने ओळखिले जाते कला, स्थापत्य, विज्ञान, वैद्यकीय, महिला विद्यालय अशा संस्थांचे काम चालते याशिवाय प्राचीन विद्यासंस्था, वस्तुसंग्रहालय, अनाथासाठी उपयुक्त संस्थाही चालविल्या

जातात. यात्रेकरूंची ने-आण करण्यासाठी आणि मालवाहतुकीसाठी १०० च्या वर वाहने आहेत. त्याचे वार्षिक उत्पन्न सुमारे ७५ लक्ष रुपयांचे आहे.

यात्रेकरूंच्या इच्छेप्रमाणे या ठिकाणी मूर्तीची पूजा बांधली जाते आणि त्यासाठी सव्वा रुपयापासून महापूजा अडीच हजारापर्यंत केली जाते दसऱ्याच्या वेळी ब्रह्मोत्सव फार धुमधडाक्याने साजरा करण्यात येतो आणि यात्रिकांची रीघ लागलेली असते. (पुरुषार्थ, दिवाळी अंक १९६३ )

मंदाक्रांता

ज्वालादेवि सचित गमते रूप अद्भूत तुझे।
अग्नीज्वाळा अवनितळही भेदुनीया पराजे ॥
येथे मूर्ती नच दुजी वसे ज्योतिरूपाचि देवी।
अर्पी कोणी पय तिज जरी त्यामध्ये तेवतेही ॥ १ ॥
नांदे येथे बहुत वरुपे शक्तिचे पीठ मोठे।
वामाभाग स्तन पडतसे देविचा पूर्वि येथे ॥
तारादेवी सहित त्रिपुरा पाहि जालंधराते।
शक्तीना या नमन करितो देवि वज्रेश्वरीते ॥ २ ॥

(१७) तुकाई

या देवीचे मूळस्थान तुळजापूर येथे आहे प्रमुख देवता तुळजाभवानी-पासून थोड्या अंतरावर घाटशीला आहे त्या ठिकाणी हे स्थान आहे. या देवीच्या उत्पत्तीसंबंधीची कथा अशी की, प्रभु रामचंद्र दक्षिणेत जनस्थानी आपल्या वनवासाच्या काळी रहात असता रावणाने सीतेला कपटाने पळवून नेले. रामायणातील हा कथाभाग सर्वश्रुतच आहे. सीता गेल्यामुळे राम अतिशय दुःखी झाले आणि 'सीता, सीता' करीत रानावनातून धाय मोकलीत तिच्या शोधार्थ हिंडू लागले. याच वेळी त्यांचा जनस्थानी असलेला मुक्काम हल्ली सोलापूर-तुळजापूरमार्गे दक्षिणेकडे येत असता सीतेचा शोध माणसांनाच नव्हे तिरहुना झाडाझुडुपांना विचारूनही त्यांना लागला नाही. ते वेड्यासारखे मार्ग आक्रमीत होते रामाची ही विकल स्थिति पाहून पार्वतीला त्यांची दया आली आणि सीतास्वरूपाचे निदान दर्शन तरी त्यांना व्हावे म्हणजे त्यांचे मन यत्किंचित् तरी शांत होईल असा विचार करून तिने स्वत. सीतारूप व्हावयाचे ठरविले. असे न करण्याबद्दलच्या पतींना आदेशाही तिने ऐकला नाही

तुळजापूर क्षेत्री पर्वतमाथ्यावरील एका शिळेवर पार्वती स्वतः सीतास्वरूप बनून उभी राहिली. थोड्याच काळात रामप्रभु त्या ठिकाणी आले. शिळेवर उभे असलेले ते स्वरूप पाहून प्रभूंच्या मनात थोडी चलबिचल झाली, पण लगेच अंतर्ज्ञानाने त्यांना सर्व खरा प्रकार समजून चुकला. शावकाशपणे ते त्या स्वरूपाजवळ गेले आणि तिला म्हणाले, 'तू का इथे?' हा प्रश्न त्यांनी आदिमाया पार्वतीला केला होता. पुढे सर्व खुलासा झाला आणि रामप्रभु पुनरपि मार्गस्थ झाले. "तू का इथे?" या शब्दाचा अपभ्रंश पुढे 'तुकाई' असा झालेला आहे. ज्या ठिकाणी पार्वती उभी होती त्या ठिकाणी खडकावर तिची पावले उमटलेली दिसतात. आता तेथे मंदिर आहे.

तुकाई नावाबद्दल रामदास वर्णन करतात ते असे,

> केची तूं कोण तूं काई। नाम ते कोणते तुझे।
> म्हण रे मीच तुकाई। जा तुम्हां वर दीधला॥
> मनाची कामना होती। सीता शुद्धी तुम्ही करा॥

तुकाईने लक्ष्मणाला बसल्या जागी लंकेचे दर्शन घडविले, तेव्हाच देवीवर आणि तिच्या आशीर्वादावर त्याचा विश्वास बसला.

(मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. पांगारकर, खंड ३, पृ. १९०)

ही कथा शिवपुराणातून घेतलेली असावी. रुद्रसंहिता (द्वितीय खंड) अध्याय २४ मध्ये, या कथेचा मूळ गाभा आलेला आहे. त्यामध्ये एवढेच आहे की, शिव सती वृषभावरून सहल करीत दंडकारण्यातून जात असता त्यांना राम-लक्ष्मणाची जोडी दिसली. राम, सीतेचा वियोग घडल्यामुळे शोक करीत होते. शिवाने त्यांना नमस्कार केला कारण राम हे साक्षात विष्णु आणि शेषशायी यांचे अंशरूप होते. सतीचा या गोष्टीवर विश्वास बसेना. तेव्हा शंकरांनी सतीला रामप्रभूंची परीक्षा घेण्यास सांगितले. ती सीतास्वरूप बनून रामापुढे उभी राहिली. श्रीरामाने तिला त्वरित नमस्कार केला. त्यांनी तिला तावडतोब ओळखले आणि 'शंकर कोठे आहेत?' असे म्हणून त्यांची चौकशी केली. 'हे नवीन रूप कोणत्या कारणास्तव घेतले' असा त्यांनी तिला उलट सवाल केला. पण तुकाई अगर रामवरदायिनीच्या उत्पत्तीसंबंधी काही नाही. पुढील आविष्कार कोणीतरी एखाद्या भक्ताने केला असावा

श्रीएकनाथ महाराजांनी या प्रसंगाचे वर्णन केले आहे ते फारच बहारीचे आहे, असे वाटल्यावरून ते मुद्दाम देत आहे.

श्रीरामप्रभूंना अतिशय शोकमग्न पाहून पार्वतीदेवींना फारच आश्चर्य वाटले आणि त्या शंकरांना म्हणाल्या,

तुमचे झालिया अज्ञापन । क्षणार्धे छळीन रघुनंदन ।
शिव म्हणे तो सावधान । सुखें छळणा तूं करी त्यासी ॥ ३८ ॥

पार्वतीने सीतारूप घेऊन श्रीरामाची परीक्षा घेण्याचे ठरविले.

लक्ष्मण राहिला धरोनी मौन । मग सीता सीता जल्पे रघुनंदन ।
तव कृत्रिम सीता धावोन । सावधान म्हणे रघुनंदना ॥ ५४ ॥
मी जवळीच उभी असतां । व्यर्थ कां धावा धावा म्हणा सीता ।
स्त्रीविरहे रडता पडता । लाज सर्वथा नये तुम्हां ॥ ५५ ॥

पण अखंड सावधान असणारे परमब्रह्म श्रीराम चित्तसावधान असल्याने सीतारूप घेणाऱ्या जगदंबेला त्यांनी मनोमय तात्काळ ओळखले.

श्रीराम म्हणे तूं कां आई । तेची नाम लोकांचे ठायीं ।
अद्यापी राहिलेसे पाहीं । म्हणती तुकाई जगदंबा ॥ ६४ ॥
तुकाई नामे निदान । ते जगदंबेचे निजस्थान ।
अद्यापी पूजिती जन । अति पावन दंडकारण्यीं ॥ ६५ ॥
श्रीराम वरदायिनी माता । तुकाई म्हणती राम वाक्यार्था ।
पुढें काय वर्तली कथा । सावधान श्रोतीं परिसावी ॥ ६६ ॥
हासोनी बोले रघुनंदन । माते तुज आलो लोटांगण ।
तुवां माझें न करावें छळण । मी अनन्यदीन शिवाचें ॥ ६७ ॥
श्रीराम म्हणे पुढती तिसी । एकलें सांडोनी शिवासी ॥
सीतारूपे छळावयासी । तूं कां आलीस जननी ये ॥ ६९ ॥
ऐकोनी श्रीरामाचें वचन । सीतेची स्वरूपता सांडोन ।
उमा घाली लोटांगण । श्रीराम सर्वत्र छळेना ॥ ७० ॥

सर्वज्ञाता परब्रह्म श्रीराम वेड्यापिस्यासारखे झाडा-दगडांना का कवटाळतो, याचा पार्वतीमाईला खुलासा होईना. तेव्हा श्रीरामाने तिला उत्तर दिले.

तुझें अंगी ज्ञानाभिमान । न मानोनी शिवाचे वचन ।
माझे करूं आलीस छळण । तुज आपण केविं सांगो ॥ ८२ ॥
नाहीं पती-वचनी कर्तव्यार्थ । नाही गुरुवचनी भावार्थ ।
तुज सांगो नये गुह्यार्थ । श्रीरघुनाथ बोलिलें ॥ ८३ ॥

भक्त उद्धारावयाकारणे । रडणे पडणे अडखळणे ।
पर्वतो-पर्वती धावणें । आणि आलिंगणे वृक्षासी ॥ ९५ ॥
उमे जाण तू निश्चित । माझे पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदा शिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥ ९६ ॥
( श्रीएकनाथ, भावार्थ रामायण, अ. २० )

वरील वर्णनाला पोषक असेच वर्णन संत तुलसीदास आपल्या रामायणामध्ये ( बालकांड ) करतात.

जोरि पाणी प्रभु किन्ह प्रणाम । पिता समेत लीन्ह निजनाम् ।
कहेउ बहोरि कँहा वृषकेतू । विपिन अकेलि फिरहु केहि हेतू ॥

श्री. गो. मो. कर्लेकर यानी सन १९०७ साली 'भजनी भारूड' नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे त्यामध्ये पृष्ठ क्रमांक २७ वर जे भारूड दिले आहे, त्यात या देवीचा उल्लेख आहे, तो असा—

माझे दयाळे तुकाराई । तुझे तुळजापुरी ठाणे ॥

यावरून असे निश्चित म्हणता येईल की, तुकाई देवीचे मूळस्थान तुळजापूर हेच होय.

श्री. खरे यानी आपल्या 'चार दैवते' या पुस्तकात पृष्ठ १७८ वर असे म्हटले की, 'आठ ऑक्टोबर १७०० साली ताराबाईच्या मुलगा शिवाजी याने पराड्याच्या अधिकाऱ्याना एक सनद दिली, ती सध्या उपलब्ध आहे त्यातील आज्ञेप्रमाणे राताजन तर्फेतील आळनापूर हा गाव तुकाई देवीच्या दैनंदिन खर्चाकरिता इनाम दिला आहे हा गाव इनाम देण्याचे कारण, 'श्रीतुकाई तुळजापूर हे मूळपीठ बहुत जागृत, स्वामीचे कुलदैवत, येथील पूजाउत्सव ताम्राच्या धामधुमीकरिता चालत नाही. हे राज्य श्रींच्या पदाने, तेथील पूजा यथासांग चालली पाहिजे.'

वरील विधानाने 'हेच मूळपीठ होय' या विधानास आधार मिळतो.

तुकाई देवीची अनेक मंदिरे इतरत्र पसरलेली आहेत त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील खेड व रोती ही स्थाने प्रमुख होत. खेड येथे देवीच्या नावावरून एका भागाला तुकईवाडी असे नाव पडले आहे हे मंदिर बरेच जुने असले पाहिजे, असे त्याच्या बांधणीवरून दिसते. मंदिर पूर्वाभिमुख असून बारा खांबाचा सभामंडप आहे. हे खांब भिनघडणीचे, मध्यभागी चौकोनी आणि वरील भाग निमुळता होत गेलेला

असे आहेत. सभामंडपाची तक्तपोशी दगडाचीच आहे. मूर्तीवर चार बुरुजाचा लहानसा कळस असून तो शोभिवंत दिसतो. (पुणे जिल्हा गॅझेट, १।२४२)

अंबा तुकाई-महात्म्य या नावाचे एक पुस्तक रा. बापू गोखले यांनी प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, तुकाई देवीचे मूळ ठिकाण कौंडणपूर (पुणे) जवळील रामकडा हे आहे. याची कारणे त्यांनी दिली ती अशी की, (१) त्या ठिकाणी एक सीताकुंड आहे. (२) रामकडा आहे आणि (३) देवतेला तुकाई अंबा असे म्हटले जाते.

तुकाई देवीचा इतिहास यासंबंधात येथे आलेला आहे. त्यावरून रा. गोखले यांचा निष्कर्ष हास्यास्पद वाटतो. सीताकुंडे भारतामध्ये अनेक ठिकाणी आहेत तशीच तुकाईची मंदिरे आहेत याचा अर्थ ती मूळ स्थाने होऊ शकत नाहीत. रे मार्टीन यांनी श्रीरामप्रभूचा लंकेला जाण्याचा जो मार्ग दिला आहे, त्यामध्ये ते नाशिकहून, गोदावरी काठाने सोलापूर तुळजापूरकडे गेले असा क्रम आहे मग ते कौंडणपूरच्या परिसरात कसे आले? याचा अर्थ इतकाच की, २० दिवसांच्या काळात घाईघाईने मथलेखन केल्यामुळे त्यांना पूर्ण संशोधन करण्यास वेळ मिळालेला नसावा आणि साधनेही उपलब्ध झालेली नसावीत पण लेखकाची या प्रकारची विधाने मात्र वाचकांना घोटाळ्यात टाकतात

मराठवाड्यात नांदेडजवळ तुकईचा माळ म्हणून एक ठिकाण आहे पण या ठिकाणी तुकाईच्या नावाचा परस्पर संबंध नाही ते नाव का आले असावे याचा इतिहास रम्य आहे. सन १८२३ च्या सुमारास नांदेडजवळील येहळेगांवी सत्पुरुष तुकारामाचा जन्म, काशीनाथपंत या यजुर्वेदीय देशस्थ ब्राह्मणाच्या पोटी झाला उमरखेडचे चिन्मयानंद हे त्यांचे गुरू, म्हणून त्याला तुकाराम चैतन्य म्हणतात लहानपणापासूनच त्याचा ओढा परमेश्वराकडे असल्याने आणि तो जगव्यवहाराला सोडूनच वागत असल्याने लोक त्याला 'वेडा तुक्या' म्हणत पण त्याचे भक्त मात्र त्याला तुकामाई अगर तुकई म्हणत तो गळ्यामध्ये मंगळसूत्र व हातात बांगड्या भरीत असे[1] म्हणून त्याला तुकामाई म्हणत असत ही तुकामाई गोंदवलेकर महाराजांचे गुरु होत त्यांनी सन १८५७ साली समाधी घेतली तुकामाईचे वास्तव्य या माळावरच असल्यामुळे त्याला तुकईचा माळ असे नाव आले असावे महाराष्ट्रात तुका वाणी, तुका विप्र, तुका-सुंदर, तुका पांडुरंग, तुका नर्दे, तुका नागनाथ, तुका ब्रह्मानंद असे अनेक तुका झाले आहेत

(श्री गोंदवलेकर महाराज चरित्र, पृष्ठ ३७ ते ४०)

---

१. अंध कवि गुलाबराव महाराजही हा वेष धारण करीत असत.

क्वचिच्छिष्टाः क्वचिद्‌भ्रष्टा क्वचित् भूतपिशाचवत् ।
नानारूपधरा योगिनो विचरंति महीतले ॥

योग्याचे जे वर्णन श्लोकात केलेले आहे, ते संपूर्णपणे तुकामाईला लागू होते. झाडाखाली, उन्हा-पावसात चिलीम ओढीत स्वारी आत्मानंदात असे. समर्थ गोंदवलेकर महाराजांना कृपाप्रसाद करण्यापूर्वी, त्यांची कडक परीक्षा घेतली. त्यातील एक प्रसंग असा की, एकदा काही मुले वाळवंटावर खेळत असताना गुरूंच्या आज्ञेवरून एक खड्डा करून, त्या सर्वांना त्यात घातले आणि वर माती लोटली. आज्ञेप्रमाणे महाराज त्या खड्ड्यावर काही वेळ थयथय नाचले सुद्धा. काही वेळाने मुलांच्या पालकांना हा अघोरी प्रकार समजला आणि त्यांनी गोंदवलेकरांना चोप देण्यास सुरवात केली पुन्हा आज्ञा केल्यावरून महाराजांनी खड्डा उकरून मुलांना सुखरूप वर काढले. यामुळे महाराजांची गुरुनिष्ठा वाढली.

गुरु चरित्राच्या पोथीमध्ये 'अंबा आरोग्य भवानी' असा शब्दप्रयोग झालेला आहे. एका कुष्ठी ब्राह्मणाला श्रीदत्तात्रयांनी आदेश दिला की, वरील ठिकाणी गेल्यावर तो व्याधिमुक्त होईल. परळी वैजनाथ पंचक्रोशीत तुकाई नावाचा डोंगर आहे आणि अनेक आयुर्वेदिक औषधींने ते क्षेत्र समृद्ध आहे. भोळा शंकर या ठिकाणी वैद्यनाथ या नावाने राहण्यास कदाचित् हेच कारण झालेले असावे. आजही या क्षेत्रातून अनेक वैद्यराज वनौषधी तेथून घेऊन जातात. तेव्हा अंबा आरोग्य भवानी म्हणजे कोणती देवता नसून वरील तुकाई डोंगरालाच उद्देशून तो शब्दप्रयोग केलेला असावा. याला तुकाई का म्हटले, याचे कारण सापडत नसले, तरी त्या डोंगरावर एकादी या देवीची मूर्ति असावी आणि त्यावरून शब्दप्रयोग रूढ झाला असावा (पुरुषार्थ, दिवाळी अंक १९६३)

वरील संबंधात एक खुलासा अवश्य केला पाहिजे. जी देवी तुकाई या नावाने प्रसिद्ध आहे, त्याच उत्पत्तीतून आणखी एका देवीची उत्पत्ति दाखविलेली आहे. घाटशिळेपुढे जी मूर्ति आहे, तिला रामवरदायिनी असे म्हणतात कारण रामप्रभूंना दर्शन देऊन त्यांची मन शांति देवीने केली या ठिकाणी रामेश्वर, लक्ष्मणेश्वर यांचीही मंदिरे आहेत तसेच उत्तरेला रामदरी नावाची पर्वतदरी दाखविली जाते. श्रीरामचंद्राचा लंकागमनाचा जो नकाशा उपलब्ध आहे, त्यावरून ते तेथे आले असले पाहिजेत असे निश्चित म्हणता येते

सीतास्वरूप पार्वतीलाच रामप्रभूंनी 'ये माई' अशी हाक मारली, म्हणून यमाई देवी तयार झाली, अशी त्या देवीची उत्पत्ति सांगण्यात येते तेव्हा या दोन्ही देवता एकरूपच मानाव्यास पाहिजेत. कारण त्यांची उत्पत्ति एकच आहे. (यमाई पहा.)

पृथ्वी

करा श्रवण ती कथा तुकई–देवि कसि घडे ।
सिता–हरणि दु:खिता फिरत राम तो साकडे ॥
सिता–सम स्वरूप देवि सजली तया कारणे ।
जरी रमविणेचि हेतु परि ओंगळे वागणे ॥ १ ॥
वदे निरखिताचि राम सति–देवि ' तू का इथे ? ' ।
म्हणोनि अभिधान हे वदति लोक तुकाई ते ।
पदा युगुल मंदिरा परिस आज पश्चाद्वारी ।
तुकाइ जन पूजिती परिसरीच तुळजापुरी ॥ २ ॥

(१८) पटेश्वरी

देवी पाटण ( जिल्हा गोंडा, अयोध्या प्रांत ) येथे हे शक्तिस्थान आहे हे अतिशय प्राचीन आहे या देवतेची स्थापना महाभारतकाली कर्ण राजाने केली. दुसरा चंद्रगुप्त याने मंदिराचा जीर्णोद्धार केला पंधराव्या शतकात रतन नाथाने येथे एक शिवालय बांधले, पण ते औरंगजेब बादशहाने उध्वस्त केले भक्तजनांनी पुन्हा जीर्णोद्धार केला आणि आता तेथे दुर्गामूर्तीची स्थापना केलेली आहे पाटण या गावी मूर्तीची स्थापना केली म्हणून पटेश्वरी हे नाव झालेले आहे आता पटेश्वरी म्हणूनच दुर्गामूर्ति तेथे आहे

सांप्रत हे क्षेत्र नाथसांप्रदायी लोकांच्या व्यवस्थेखाली आहे त्यांचेच येथे वर्चस्व चालते येथील यात्रा चैत्र नवरात्रामध्ये भरते या वार्षिक यात्रेच्या वेळी महिषी, बकऱ्या व डुकरे बळी दिली जातात त्या भागात हे जागृत स्थान मानले जाते (जेम्स धर्मकोश, ४–६१३ )

आर्या

देवि पाटण ग्रामीं कर्णानं पूर्वी देवि स्थापियली ।
नामे पटेश्वरी ती शक्तिपीठा परीस मानियली ॥ १ ॥
चैत्राच्या नवरात्री नेपाळी आणि अवधि–जन जमती ।
बारामासहि दाटणीं दुर्गा मंदिरिं नाथ–जन करिती ॥ २ ॥

(१९) पीठजादेवी

पैठण शहरी प्रतोलीच्या बाहेर भव्य प्रासादामध्ये पीठजादेवीचे मंदिर आहे, असल्याचे होते या देवीच्या उत्पत्तीबद्दलची कथा अशी पूर्वी पैठण येथे

इसवी सनापूर्वी सातवाहन राजे राज्य करीत होते त्यांनी शूद्रक नावाच्या एका अचाट बलशाली माणसाला शूद्राचा कोतवाल नेमला. कोल्हापूर भागात त्या वेळी कोल्हासुर आणि मयासुर नावाने दैत्य वस्ती करून होते मयासुर राक्षसाने राहूच्या रूपाने राजा आणि राणी या दोघांवर माण्याची मोहिनी घातली आणि एके दिवशी राणीला घेऊन तेथून पलायन केले.

जे शूद्रकाचे शत्रु होते त्यांनी ही सुवर्णसंधी साधून राजाचे कान फुंकले त्यांनी राजाला सांगितले की, 'हे काम शूद्रकाचेच आहे. त्यानेच राणी-साहेबांना पळवून नेले असले पाहिजे.' राजाने आपल्या नोकराची कर्तव्यनिष्ठा लक्षात न घेता त्या असत्य आणि दुष्ट वचनावर भरवसा ठेवून शूद्रकाला फाशीची शिक्षा सुनावली. शूद्रकाने आपल्या हितशत्रूंचे कपट ओळखले आणि त्याचेच दात त्याच्याच घशात घालण्याचे ठरविले. त्याने राणीचा शोध लावण्यासाठी राजाकडून काही दिवसांची मुदत मागून घेतली आणि तो कामास लागला

सांप्रत पोलिसखाते ज्याप्रमाणे शिकारी कुत्र्याच्या मदतीने गुन्ह्याचा तपास लावते, त्याप्रमाणे शूद्रकाने आपल्याजवळ असलेल्या कुत्र्यांचा या कामासाठी उपयोग करावयाचे ठरविले त्याने त्या कुत्र्याच्या साहाय्याने कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरापर्यंत मयासुराचा माग काढला. आता देवतेच्या साहाय्याविना पुढे शोध लागणे अशक्य आहे असे वाटल्यावरून त्याने तीन दिवस देवीची आराधना केली रात्री त्याला स्वप्न झाला। आणि त्याप्रमाणे त्याने चवथ्या दिवशी मंदिरात मोठा होम केला. त्या होमाचा धूर मयासुर लपून बसला होता तथपर्यंत पोहोचला आणि त्या धुरामुळे त्याला त्या जागी राहाणे अशक्य झाले प्रथम या होमाचा नाश करण्यासाठी मयासुराचा बधु कोल्हासुर पुढे आला. त्याच्याबरोबर झालेल्या चकमकीत शूद्रक बेशुद्ध पडला, पण त्याच्यावर देवीची कृपा असल्यामुळे थोड्याच वेळात तो शुद्धीवर आला या वेळी देवीने त्याच्या हाती एक खड्ग दिले त्याच्या साहाय्याने नतर शूद्रकाने कोल्हासुरास पराजित केले त्याने त्याला पकडून त्याचा बधु मयासुर याचा शोध केला आणि मयासुराला ठार करून त्याच्या तावडीतून राणीची सुटका केली नतर पैठणला जाऊन त्याने राजाला त्याची राणी परत दिली

शूद्रकाचा हा अचाट पराक्रम पाहून राजा त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्याने आपले अर्धे राज्य शूद्रकाला बक्षीस दिले आपली पट्टराणी महालक्ष्मी देवीच्या कृपेनेच परत मिळाली असे समजून राजाने पैठण येथे महालक्ष्मीचे एक मंदिरही बांधले.

पण पुढे काही वर्षांनी राजालाच अवदसा आठवली. त्याची मति चळली त्याने शहरातील सर्व तरुणी आणि उपवर कन्या याना एकत्र जमवून त्या सर्वांबरोबर विवाह केला आणि त्याना आपल्या जनानखान्यात कोंडून ठेवले. या नीच कृत्यामुळे सर्व शहरात हाहा कार उडाला आणि राजाचा कपट नीतीने सूड घेण्याची प्रवृत्ति बळावली या वेळी एका भक्ताने पीठजादेवीला प्रसन्न करून घेतले आणि तिला सकट निवारण्याची प्रार्थना केली देवीने स्वत राजकन्येचे रूप धारण केले आणि अपघाताने राजाला ठार केले कालातराने शूद्रकही कालीदेवीकडून मायेने मारला गेला

जैन प्रभुसूरी नावाच्या ग्रथकाराने ‘ विविध तीर्थकल्प ’ नावाचा ग्रथ लिहिलेला आहे त्यामध्ये वरील कथाभाग आलेला आहे असे, रा गो ह खरे आपल्या ‘ महाराष्ट्राची चार दैवते ’ या ग्रथामध्ये म्हणतात ( पृष्ठ ३२ )

राजशेखरने ‘ चतुर्विंशति प्रबध ’ या नावाचा ग्रथ लिहिलेला आहे, त्यामध्ये वरील कथा थोडया फरकाने आली आहे आणि ती अधिक प्रकाश टाकणारी असल्याने साराशरूपाने येथे दिलेली आहे

शूद्रकाची निवड कशी झाली ? सातवाहन राजाने एकदा शहरातील माणसे एकत्र जमविली आणि त्यांच्यातर्फे एक भला मोठा दगड उचलण्याची पैज लाविली स्वत राजाने तो दगड गुडघ्यापर्यंत उचलून दाखविला पण त्याच्यावर काही तो त्याला नेता येईना राजाचा हा पराक्रम पाहून एकामागून एक अनेक वीर पुढे झाले, परतु डोक्यापर्यंत तो दगड कोणीच उचलू शकला नाही या वेळी शूद्रक ब्राह्मण या गर्दीत उभा होता तो पुढे सरसावला आणि त्याने अल्गद तो दगड वर उचलून उच उडविला असे सागतात की, शूद्रकाने तो दगड उच उडविल्यावर अतराळातच त्याचे तीन तुकडे झाले एक तुकडा बारा कोसावर पडला, दुसरा तुकडा शहरालगतच गोदावरी नदीच्या पात्रातील नाग-ह्रद येथे पडला आणि तिसरा तुकडा तेथे जवळच चवऱ्यावर पडला शूद्रक ब्राह्मणाचे हे अचाट सामर्थ्य पाहून राजाने त्याला प्रतिष्ठानचा न्यायाधिकारी नेमले

पुढे दैत्याने राजाच्या राणीचे अपहरण केले, शूद्रकाने दैत्याला ठार करून तिला परत आणले, शूद्रकाला अर्धे राज्य मिळाले, आणि राजाने शहरातील तरुणींबरोबर विवाह केला, हा कथाभाग तोच आहे

पीठजादेवी राजकन्यारूपाने राजवाड्यात आल्यावर, तिने आपल्या मुखावर पदर ओढून घेतला होता. राजाला ही सुदर स्त्री कोण असावी याचा

सुगावा न लागल्यामुळे त्याने तिला धरले आणि तिच्या मुखावरचा पदर दूर सारला. तो काय आश्चर्य ! राजाला ते रूप एखाद्या कृत्येसारखे भासले आणि तिच्या भीतीने तो पळत सुटला. राजा पुढे आणि राजकन्यारूपी देवी मागे, याप्रमाणे सर्व शहरातून धिंड निघाल्यावर राजाचा नाईलाज झाला आणि शेवटी त्याने नागन्हदामध्ये उडी मारली पाण्यात बुडाल्यावर मग काय, त्याचा आयुष्यक्रमच संपला. ( औरंगाबाद जिल्हा गॅझेट, पृष्ठ ३७४ )

वर जो दगड उचलण्याचा खेळ निवेदन केला आहे, त्याची प्रचीती आजही महाराष्ट्रात पहावयास मिळते. वजन उचलण्याची आधुनिक साधने खेडोपाडी उपलब्ध नसल्याने दगडाच्या निरनिराळ्या आकाराच्या लहानमोठ्या गोट्या, मंदिर अगर चावडीसमोर ठेवलेले असतात आणि कसरत करणारी माणसे त्याना उचलण्याचा सराव करीत असतात लेखक लहानपणी पुण्याजवळ येरवडा गावी रहात असता मारुतीच्या देवळासमोर अशा गोट्या पडलेल्या त्याने पाहिल्या आहेत. वार्षिक यात्रेच्या वेळी त्या उचण्याची चढाओढ होत असे, हेही त्याने अनेक वर्षे अनुभवले आहे

(२०) पैठण देवता

दक्षिण भारतामधील पैठण हे शहर फार प्राचीन आहे याचेच पूर्वीचे नाव प्रतिष्ठान असे होते. सम्राट अशोक राजाच्या शिलालेखात या नगरीचा उल्लेख 'पत्तेनिक' असा आढळतो निर्णयसिंधुकार कमलाकर भट्ट आणि शिवाजी राजाना राज्याभिषेक करणारे गागा भट्ट हे मूळचे या क्षेत्रीचे ब्राह्मण. पहिल्या शतकात इजिप्शिअन लेखक पेरिप्लस याने भारताचा व्यापार ग्रीस, रोमबरोबर कसा चालत होता, याचे वर्णन केलेले आढळते तो म्हणतो की, दक्षिणेत पैठण आणि तगर ही दोन व्यापारी शहरे फार महत्त्वाची होती त्या वेळी भडोच येथून पैठण येथे जाण्यास साधारणत वीस दिवसाचा प्रवास करावा लागे तेथील गोमेद दगडाची निर्यात वरील देशात होत असे उत्तम कापडही निर्यात होत असे. शातवाहन राजे सर्व दक्षिणेचा कारभार याच शहरातून पहात असत, पण पुढे चालुक्य व राष्ट्रकूट राजवंशानी तेथून राजधानी हलविली

शालिवाहन राजासंबंधीची दंतकथा उद्बोधक आहे कोणी एक ब्राह्मण कन्या पैठण शहरी एका कुंभाराच्या घरी येऊन राहिली कालांतराने शेष नावाच्या नागाचे तिजवर प्रेम जडले आणि दोघाचा विवाह होऊन त्याना जो पुत्र झाला तोच शालिवाहन होय. तो कुंभाराच्या घरीच वाढला लहानपणचा खेळ म्हणून तो मातीचे हत्ती, घोडे, शिपाई खेळण्यासाठी बनवीत असे आणि घरात साठा करून ठेवी. त्याच वेळी नर्मदा नदीपलीकडे विक्रमराजाने आपला शक सुरू

सुरू केला होता. असे असता एका ज्योतिषाने त्याला भविष्य सांगितले की, ' तुझा प्रतिस्पर्धी जन्मला आला आहे आणि तो वाढत आहे ' त्याचा शोध घेण्यासाठी त्याने पुढील उपाययोजना राजाला सुचविली ' हत्तीच्या शिरोभागी एक पत्रिका लिहून त्यावर या हत्तीचे वजन कळवा किंबहुना युद्धाला तयार व्हा ' असा मजकूर घालून त्याला दक्षिणेत संचारासाठी पाठवावा, म्हणजे प्रतिस्पर्ध्याचा शोध लागेल

फिरत फिरत तो हत्ती पैठण शहरापर्यंत आल्यावर या मुलाने ती पत्रिका वाचली आणि हत्तीला अडविले त्या हत्तीचे वजन काढण्यासाठी त्याने अशी युक्ती योजिले की, प्रथम हत्तीला नावेत घालून, ती नाव गोदावरीमध्ये सोडून पाण्याची पातळी नावेवर रेखांकित केली नंतर हत्तीच्या ऐवजी त्यामध्ये वाळूची पोती त्या रेषेपर्यंत भरून, त्याचे वजन केले विक्रमाला हत्तीचे वजन येणे प्रमाणे कळविले गेले पण यामुळेच विक्रमाला आपला प्रतिस्पर्धी सापडला आणि त्याचा नाश करण्यासाठी, पैठणवर त्याने स्वारी केली शहरावर चिंता पसरली असता, शेष नागाने जावयाला अमृत आणून दिले आणि ते मातीच्या चित्रावर सिंचन करताच सर्व पशुसैन्य जिवंत झाले त्या सैन्याच्या सहाय्याने शालिवाहनाने विक्रमावरोबर युद्ध केले आणि आश्चर्य असे की, तो विजयी झाला याच शालिवाहनाने आपल्या या स्मृतीचा दक्षिण भारतामध्ये शक सुरू केला आणि आजतागायत तो चालू आहे (तीर्थरूप महाराष्ट्र, महादेवशास्त्री जोशी, पृ ९८ )

संत एकनाथ महाराज ज्या गोपाळकृष्ण मूर्तीची पूजा करीत होते, ती मूर्ति पाहण्याचे भाग्य लेखकाला लाभले आहे महाराजांचा वंशज नरहरपंत यांनी असे सांगितले की, ती पंचरस धातूची मूर्ति कोणी एका ब्राह्मणाने महाराजांना अर्पण केली, पण त्या मूर्तीच्या मनात महाराजांजवळ राहावयाचे आहे किंवा नाही, हे पडताळून पाहण्यासाठी महाराजांनी त्या मूर्तीच्या उजव्या अभयमुद्रा हस्तावर गूळखोबरे ठेवून प्रसाद मागितला की, ' जर मूर्तीच्या मनात मजघरी रहावयाचे असेल तर स्वहस्ते प्रसाद खाली सोडून मजला मिळावा ' जेथे भाव आहे तेथे देव आहे, हा नेहमीचा अनुभव या ठिकाणीही अनुभवास आला निर्जीव मूर्तीने आपला उजवा हात खाली केला आणि तो प्रसाद महाराजांच्या हाती पडला तीच मूर्ति आजही नाथाच्या मंदिरात पूजनास आहे

दक्षिण भारतात पैठण हे फार विख्यात क्षेत्र आहे एके काळी ही राजधानी होती आणि या राज्याचा विस्तार तापी नदीपर्यंत झालेला होता या राज्याचा व्यापार नाणघाटमार्गे खाली नालासोपारा बंदरातूनही परदेशांशी चाले अनेक विद्वान पंडित येथे वस्ती करून होते शास्त्रार्थ शुद्धिपत्रासाठी

याच नगरी आले होते आणि बाल्यपात रेड्याकडून वेद वदविण्याचा अलौकिक चमत्कार त्याने 'इयेचि ये भूमीत' केला होता. दुर्गादेवीच्या भयंकर दुष्काळात या क्षेत्राची अतिशय वाताहात झाली आणि येथील धर्मपंडित काशीला गेले आणि तेथेच स्थायिक झाले. हे क्षेत्र महाराष्ट्रकवि एकनाथ यांच्याबद्दल प्रसिद्ध आहे.

जैनसाधु प्रभुसूरी १४ व्या शतकाच्या प्रारंभी होऊन गेले. त्यांनी 'कल्प प्रदीप' या नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यामध्ये असे वर्णन आढळते की, सातवाहन राजवंशाने अनेक उत्कृष्ट कार्ये केली असून आपला मुलूख भडोच शहरापर्यंत वाढविला होता राजा स्वतः जैनधर्मीय बनला. त्याने अनेक 'चैत्य' अगर मंदिरे बांधली. एकट्या प्रतिष्ठान शहरी त्याने ६८ स्थाने निर्माण केली होती. (औरंगाबाद जिल्हा गॅझेट, पृष्ठ २७३.)

इतिहास असे दाखवितो की, कथळा (खानदेश) येथे खतत पायावर उभे राहून कुराण धर्मग्रंथाचे पठण करणारा मुसलमान साधु निजामुद्दिन याने पुढे पैठणास जाऊन तेथील योगिनीच्या सुप्रसिद्ध कालीमंदिरावर हल्ला चढवून, देवीची मूर्ति आणि मंदिर उध्वस्त केले आणि भक्तगणाची कत्तल केली त्यानंतर त्याच स्थानावर त्याने धर्मप्रसाराठी आपला मठ स्थापन केला दुसरे एक मौल्ना साहेब--जजरी बख्शचे सहकारी--यानी पैठण येथील रेणुकेचे मंदिर पाडून तेथे दर्गा स्थापन केला याप्रमाणे परप्रांतीय आणि परधर्मीय धर्मप्रसारकारानी निर निराळ्या वेषाखाली देश पोखरण्याचे आणि आपापल्या धर्माची प्रतिष्ठा वाढ विण्याचे काम केले (इतिहासाची पुनरावृत्ति होते हेच खरे आजहि देश पोखर ण्याचे काम भारतीय हिंदूचा परदेशावर निष्ठा असलेला एक पक्ष करीतच आहे ) हा इतिहास जरी सर्वविश्रुत असला तरी आणि क्वचित् काही ठिकाणी त्याची पुनरावृत्ति होत असली, तरी हिंदुधर्मीय मात्र काही शहाणपणा शिकत असल्याचे दिसून येत नाही त्याच्या सख्येला गळतीच लागलेली आहे आता त्याच्या जोडीला ईसाई धर्मप्रचारक आले आहेत राजदंडाने ही दुर्दशा थांबेल तेव्हाच आर्यधर्माचा सूर्य उगवला असे मानता येईल आणि भारत दीर्घकाळाच्या दास्यातून मुक्त झाला असे खऱ्या अर्थाने म्हणता येईल

मुसलमान साधूच्या निरनिराळ्या अनेक जाती आहेत अवलीया, नकीब, नजीब, अम्द, अबदाल, अवताद, गौस व कुतुब अशा चढत्या श्रेणी आहेत मुसलमान राजसत्तेच्या काळी काझींना ज्या अनेक सनदा दिलेल्या होत्या, त्यांमध्ये हिंदूच्या मूर्ति फोडणे हे काम त्याना सांगितले असल्याचे नमूद केलेले आहे इलियट--डौसन इतिहास भाग ७, पृष्ठ २८४ वर स्वच्छ म्हटले आहे की, 'फकिराने तत्त्वत भिक्षेवर उपजीविका केली पाहिजे पण वस्तुत ते डाकाइट असत अशा या फकिराची सख्या त्या वेळी या देशात आठ लाख असल्याचे आढळते ' (दासायन, पृष्ठ १४५--१४६ )

या प्राचीन वैभवशाली राजधानीचे ऐश्वर्य किती होते, यासबधी एक कथा उपलब्ध आहे, ती अशी, "एकदा पेशवे सैन्याचा तळ या गावाजवळच पडलेला होता तेथील एका गर्भश्रीमत व्यापाऱ्याला वाटले की, पेशवे सरकाराच्या मुलीला आपल्या घरी बोलावून तिचा सत्कार करावा यासाठी तिला हळदी कुकवाच्या निमित्ताने बोलावणे पाठविण्यासाठी त्याने आपला ज्येष्ठ चिरंजीवास पाठविले पेशव्याना थोडेसे आश्चर्य वाटले असल्या घरी जाणे इष्ट किंवा अनिष्ट, आपल्या इभ्रतीस, प्रतिष्ठेस ते शोभण्यासारखे आहे किंवा नाही, याचा प्रथम शोध घेण्याकरिता त्यांनी त्या मुलाजवळ उलट निरोप पाठविला, 'आमच्या

छावणीपासून तुमच्या घरापर्यंत चांदीच्या रुपयांनी भरलेल्या पिशव्यांची पायघडी पसरली तर आमची मुलगी आपल्या घरी अवश्य येईल.' मुलगा घरी आला आणि त्याने पेशव्यांचा निरोप वडिलांना कळविला. पेशव्यांना ताबडतोब 'होकार' न दिल्याबद्दल वडिलांनी मुलाला दोष दिला आणि पेशव्यांना त्याच्या सराई उलट निरोप धाडला, 'एकाच शिक्क्याचे रुपये आपणास हवे असतील तर पायघडीची व्यवस्था करण्यात थोडा अवधी लागेल, परंतु कोणत्याही शिक्क्याचे रुपये चालत असतील तर ताबडतोब व्यवस्था करण्यात येईल.' हा निरोप मिळाल्यावर पेशव्यांची खात्री पटली. त्यांनी आमंत्रण स्वीकारले आणि मुलीला त्या व्यापाऱ्याच्या घरी पाठविले. (भक्तिसुमने, ले. कालेलकर, पृष्ठ ५३).

त्या सावकाराने पेशव्यांना मुलीबरोबरच आपले घरी नेले, आणि रुपयांच्या राशीवर बसवून त्यांचे पूजन करून, ती सर्व संपत्ती त्यांना अर्पण केली. पण दाता जसा उदार त्यापेक्षा श्रीमंत जास्त उदार, आणि हेच प्रजादक्ष राजाचे कर्तव्य असावयास पाहिजे. श्रीमंतांनी त्या संपत्तीचा स्वतःसाठी उपयोग न करता, सावकाराला आज्ञा केली की, या संपत्तीतून पैठण येथील गोदावरील नागघाट दुरुस्त करून घ्यावा. श्रीमंत माधवराव पेशवे आणि त्यांचे मंत्री नाना फडणवीस, या उदारतेने जनतेला जागवीत होते. म्हणूनच त्यांची नावे इतिहासात अजरामर राहणार आहेत. (तीर्थरूप महाराष्ट्र, ले. महादेवशास्त्री जोशी, पृ. १०२)

वरील सावकाराप्रमाणेच थंशी, लड्डू, चानोळे या नावाचे आणखी सावकार या शहरी होते. राघोबादादा पेशवे यांचा तळ या शहराजवळ पडला असता रसद संपल्यामुळे, चानोळे सावकारांनी दररोज सव्वा लक्ष रुपये याप्रमाणे सव्वा महिना राघोबाच्या सैन्यासाठी खर्च केले. या सावकारांच्या रुपयांच्या गोणी इतस्ततः पडलेल्या असत. ज्याप्रमाणे मोठ्या धान्यपेठेत, धान्याच्या गोण्या सुगीच्या दिवसात रस्त्यावरही पडलेल्या असतात, त्याप्रमाणे असत. रस्त्याने जाणाऱ्या [illegible] त्या पोत्यांच्या ढिगाला अडखळत, तेव्हा सहज उद्गार निघत 'चार मेस्यांची संपदा'. असा होता भाग्यवान भारत

वरील कथेप्रमाणे सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत बडोद्याचे प्रसिद्ध सावकार श्री. माधव मेराळ यांनी बैलगाड्यांमध्ये रुपये भरून त्यांची रांग आपल्या वाड्यापासून सरकार वाड्यापर्यंत लावली होती हे प्रसिद्धच आहे. महाराजांनी ती निव्वळ परीक्षाच घेतली होती. त्यामुळे ही एवढी संपत्ति पाहिल्यावर गायकवाडांची तोंडे मनाला उलट विरविण्यास लावली आणि ती लक्ष्मी परत केली ही गोष्ट निराळी. पण महाराजांच्या या क्षणिक हौसेखातर सरकारी तिजोरीला कित्येक लाखांचे व्याज भरावे लागले. कारण संपत्ति

बाहेर काढण्यापूर्वीच व्याजाचा करार झालेला होता की, संपत्ति वाड्यातून बाहेर पडली की व्याज सुरू होईल

पैठण शहरी एकनाथ महाराजांनी स्वतः बांधलेल्या नाथ मंदिरात श्रीकृष्णाची पावले दिसतात नदीकाठी एकनाथांच्या पादुका असलेले मंदिर आहे या शहरातील मंदिरांची सविस्तर माहिती औरंगाबाद जिल्हा गॅझेट पृष्ठ ३५५–३५८ वर पाहाता येईल या स्थानाचे सांप्रतचे महत्त्व एकनाथषष्ठीला पाहावयास मिळते. नाथांचा रांजण त्या दिवशी अनेक भक्त पाणी ओतून भरीत असतात, पण नाथांच्या वंशजाची कावड त्यामध्ये ओतल्याशिवाय तो भरून वाहात नाही. हा चमत्कार पाहाण्यास अनेक भक्त जमत असतात

या क्षेत्राची महती वर्णन करताना एकदोन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत कृष्णदयार्णव या प्रसिद्ध मराठी कवीला अंगावर कोड फुटले. ते जाण्यासाठी अनेक उपाय केले, पण ते व्यर्थ गेले शेवटी एकनाथ महाराजांनी दृष्टांत दिला की, श्रीमद्भागवत दशम स्कंधावर टीकाग्रंथ तयार केल्यावर रोगाचे निर्मूलन होईल. संताच्या वचनावर संपूर्ण विश्वास ठेवून कृष्णदयार्णवांनी टीका सुरू करताच हळूहळू प्रभाव दिसू लागला आणि टीका पुरी झाल्यानंतर कोड नाहीसे झाले

अशीच एक प्राचीन कथा आहे बाण कवीच्या समकालीन मयूर नावाचा एक कवी होता एकदा बाणाच्या घरी गेला असता, बाण व त्याची पत्नी यांचा काही संवाद चालला असता, याने मध्येच तोंड घातले आणि काही वाक्ये उच्चारली त्याच्या स्त्रीला वाचासिद्धि होती, तिने लगेच शापवाणी उच्चारली, 'तुझ्या अंगी महारोग जडेल' आणि त्याप्रमाणे घडले. मयूर कवि हा सूर्योपासक होता, तेव्हा त्याने आपल्या इष्ट देवतेची प्रार्थना केली आणि 'सूर्यशतक' नावाचे स्तुतिपर काव्य लिहिले, परिणाम असा झाला की, तो रोगमुक्त झाला गुरुचरित्र ग्रंथात अशा रीतीच्या रोगमुक्त झाल्याच्या कथा पाहण्यात येतात

(तीर्थरूप महाराष्ट्र, महादेवशास्त्री जोशी, पृ ९८)

## (२१) पुणे शहर शक्तिपीठे

इ स. ६९३ साली पुणे शहर हे अवघे दहा बारा झोपड्यांचे गाव होते. यामध्ये ब्राह्मणवर्गाची दोन घरे होती गावच्या चारी दिशांना ग्रामदेवता म्हणून खंडोबा, हनुमान, नारायणेश्वर व पुण्येश्वर ह्या देवता होत्या. या झोपड्यांच्या दक्षिणेला पाऊण मैलावर जोगेश्वरी ही ग्रामदेवता होती व तिच्याजवळून अखिल ओढा वाहात असे पुढे तो मुठा नदीला मिळत होता या झोपड्या मुठा नदीच्या

काठी म्हणजे सध्याच्या कसबा पेठेतील भागातच होत्या. क्रमाक्रमाने गावाची दक्षिणेकडे वाढ झाली. कारण उत्तरेकडे नदीचे पात्र होते.

राष्ट्रकूट वंशातील कृष्ण राजा याच्या दानपत्रात या शहराचा उल्लेख 'पुण्य विषय' असा आहे (इ. स. ७५८). पुढे पुनक विषय झाले, नंतर पुनवडी झाले (इ. स. ९९३) आणि शेवटी पुणे हे नाव कायम झाले. शहराला यादवांच्या वेळचा तट होता. कुंभार वेस, मावळ वेस, केदार वेस अशा मोठ्या डौलदार वेशी होत्या. मुठा नदीवर घाट आणि त्यावर मंदिरे होती. ती यादवांच्या वेळची हेमाडपंथी बांधणीची होती, पण मोगलांच्या अमदानीत ती फुटली. कसबा पेठेत केदारेश्वराचे मंदिर होते. त्याचा पुजारी रामभट राजर्षी नावाचा दशग्रंथी ब्राह्मण होता, तो बाटविला गेला आणि आश्चर्य असे की, तोच पुणे शहराचा मुख्य काजी झाला, मुजावर झाला. त्याचेच वंशज पुणे शहराचे प्रमुख काजी बनले.

(ब. मो. पुरंदरे, राजा शिवछत्रपति)

इ. स. १२९० च्या सुमारास मुसलमानी अमल चालू झाल्यानंतर दिल्लीहून चार फकीर या गावी फिरत फिरत धर्मप्रचार करीत आले. त्या वेळच्या आक्रमणात्मक धोरणानुसार त्यापैकी शेख सल्लाह याने पुण्येश्वर आणि शेख हिसाने नारायणेश्वर यांच्या मूर्ति मंदिरातून बाहेर फेकून दिल्या आणि त्या ठिकाणी आपले दर्गे स्थापन केले. हे दोन्ही दर्गे आज पुण्यातील नवा पूल भागात एक आणि दगडी पुलाजवळ दुसरा असे उभे आहेत. पुण्येश्वर या शंकराच्या स्थानावरूनच कदाचित् पुणे हे नाव या गावाला मिळाले असावे.

(Poona And Suburbs by K. M. Kumthekar, 1910)

गावाचा विस्तार वाढला तसे जोगेश्वरी देवीचे स्थान बदलले आणि ते गावाच्या मध्यभागात आले. अनेक जीर्णोद्धार होऊन आता त्याला सध्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. मंदिराला तांबडा रंग दिला म्हणून या स्थानाला 'तांबडी जोगेश्वरी' असे नाव पडले, असे रा. गायकवाड आपल्या 'पुणे शहर वर्णन इ. स. १८८८' या ग्रंथामध्ये लिहितात. सध्या मंदिराचा विस्तार जरी वाढलेला दिसत असला तरी मूळची देवी एका लहानशा घुमटीतच आहे. देवीला चार भुजा असलेल्या दिसतात, पण अगावर शेंदुराची पुटे चढलेली असल्याने हातात कोणती शस्त्रे आहेत हे मात्र कळत नाही. मंदिराच्या पुजाऱ्या-

करून लेखकाला असे समजले की, मूळ मूर्ति सुमारे अडीच फूट उंचीची असून, हातामध्ये आयुधे उजवीकडे वरती डमरू, खाली राक्षसाचे मुडके आणि डावीकडे वरती त्रिशूळ आणि खाली गदा अशी आहेत. देवीच्या परिसरातच विष्णु, महादेव, गणपती आदि इतर देवतांच्या मूर्ति आहेत. पूर्व बाजूला दोन मोठ्या दीपमाळा होत्या. पण आता तो रस्ता वाढवीत असल्याने त्या नाहीशा होतील अथवा कदाचित् झाल्यादेखील असतील. लेखकाने पुणे येथील नूतन मराठी विद्यालयामध्ये इंग्रजी सातवीचे शिक्षण घेताना ( सन १९२४ ) त्या दीपमाळा पाहिलेल्या आहेत.

जोगेश्वरी ही एक प्रमुख ग्रामदेवता मानली जाते. शहरातील कोणत्याही भागात लग्न अगर मौंजीबंधन झाले तर प्रथम अक्षत याच देवीला दिली जाते आणि त्यानंतर ती पुणे शहराची मूळवस्ती जी कसबापेठ तेथील गणपतीला दिली जाते. या देवतेशिवाय पुणे शहरात दुसरी दोन स्थळे आहेत. शुक्रवार पेठेत काळी जोगेश्वरी आणि दुसरी पिवळी जोगेश्वरी.

*( Poona Gazetteer, Page 316 )*

जोगेश्वरी हा योगेश्वरी शब्दाचा अपभ्रंश आहे. योगेश्वरी देवीची उत्पत्ति कशी झाली हे याच ग्रंथात पौराणिक देवता प्रकरणामध्ये आपण पाहिलेले आहे.

( २ ) पर्वती हे दुसरे शक्तिपीठ होय. हे स्थान मुंईसपाटीपासून २६१ फूट उंच असून शहराच्या दक्षिणभागी एका टेकडीवर आहे. रा. गायकवाड आपल्या ग्रंथात म्हणतात की, ' बाळाजी विश्वनाथ यांनी पेशवेपद स्वीकारल्यानंतर नेहमी सातारा शहरी जाऊन छत्रपतींचे दर्शन घेणे त्यांना कठीण जाऊ लागले. कारण कामाचा पसारा दिवसेंदिवस वाढतच होता. याकरिता छत्रपतींच्या पादुका त्यांनी आणविल्या आणि त्या पर्वती टेकडीवर स्थापन केल्या. त्यामुळे या स्वामीनिष्ठ सेवकास महाराजांचे दर्शन पादुका स्वरूपात घेणे सुकर झाले. काही वर्षांनी बाजीरावाने पेशवाईची वस्त्रे धारण केल्यावर त्याच ठिकाणी त्याने एक शिवलिंग स्थापन केले. अशी समजूत आहे की, आजतागायत छत्रपतींच्या पादुका त्या शिवलिंगाखाली आहेत '

या मंदिराच्या स्थापनेविषयी दुसरी कथा अशी. पार्वती देवींचा पुरातन तांदळा या ठिकाणी होता. गावचा गुरव प्रत्यही येऊन देवीची पूजाअर्चा करीत असे. एके दिवशी कर्मधर्मसंयोगाने बाळाजी बाजीरावाची पत्नी गोपिकाबाई हिने

मोती महालातून त्या टेकडीवरून उतरत असणाऱ्या गुरवाला पाहिले. बाईने त्याच्याजवळ सर्व चौकशी केली तेव्हा तो म्हणाला, 'देवीचे हे प्राचीन स्थान आहे आणि ही देवी नवसास पावते.' या वेळी स्वतः गोपिकाबाई पायाच्या दुखण्याने पछाडलेल्या होत्या. देवीला त्यांनी नवस केला. देवी नवसाला पावली आणि बाईंचे दुखणे बरे झाले. पंतप्रधान बखरीप्रमाणे या मंदिराचे बांधकाम बाळाजी बाजीराव पेशवे यांनी शाहू महाराजांच्या अनुज्ञेने शके १६७२ साली सुरू करून ते चार वर्षांत पुरे केले, तर वॉटसन गाईडप्रमाणे हे बांधकाम इ. स. १७४९ मध्ये चालू होऊन इ. स. १७५६ साली पुरे झाले. म्हणजे या दोन्ही माहितीत एकवाक्यता तर नाहीच, पण उलट वर्षभराचा फरक पडतो. या मंदिरासाठी अंदाजे १० लक्ष रुपये खर्च झाला होता. नवस पूर्ण झाल्याने याप्रमाणेच अनेक मंदिरे भारतात उभारली गेली आहेत.

सहृयाच्याच शेजारी मूळ तादळास्वरूप पार्वती देवीचे स्थान आहे. देवदर्शन आणि व्यायाम या दोन्ही गोष्टी साधण्यास सेवानिवृत्त नोकर व अनेक भक्त प्रत्यही मंदिरास भेट देत असतात.*

शेवटच्या बाजीराव पेशवा याने या जागी दक्षिणेकडील बाजूस एक राजवाडा बांधणीकरिता घेतला होता, पण तो पूर्ण होऊ शकला नाही. इतकेच नव्हे तर झालेले काही थोडथोडके बांधकामही वीज पडून नाश पावले. दिनांक ५ नोव्हेंबर १८१७ रोजी मराठे आणि इंग्रज यांची खडकी येथे अखेरची लढाई झाली. त्या वेळी या ठिकाणी नसून बाजीरावाने युद्धपरिस्थितीचे दुर्बिणीच्या साहाय्याने निरीक्षण केले होते. श्रावण महिन्यात पेशवे सरकार दक्षिणा देण्यासाठी ब्राह्मणांना याच क्षेत्री जमा करीत आणि दक्षिणा वाटीत. त्यास रमणा म्हणत. आजपावेतो रमण्याभोवतीच्या जाडजूड भिंतींचे अवशेष पाहता येतात, पण नवीन घडणीत तेही नामशेष होणार आहेत.

नाव आले. येथे शृंगे याचा अर्थ शिखरे, हे मुद्दाम ध्यान्यात ठेवावयास हवे, नाहीतर गैरसमज व्हायचा ! नाशिक जिल्हा गॅझेट जेव्हा बनविले त्या वेळी याचे संशोधन झाले होते, पण सात शिखरे मात्र काही आढळली नाहीत. फक्त चारच शिखरे आढळली. त्या वेळी त्या संशोधकांच्या असेही ऐकिवात आले की, सप्तशृंगी देवीचे चतुःशृंगी हे नावही प्रचारात होते. पुणे येथील देवीचे मूळपीठ हेच असल्याने, त्या देवीलाही चतुःशृंगी हेच नाव मिळाले आहे. बारकाईने पाहिले तर सध्या हे मंदिर ज्या ठिकाणी आहे, त्याच्या आसमंतात टेकडीला चार शिखरे नाहीत. पण डोंगरमाथा चौरसपाट असल्याने चतुःशृंगी नाव आले असावे, असे काही प्रतिपादितात.

नवरात्रामध्ये या ठिकाणी मोठी यात्रा भरते उत्सवमूर्ति म्हणून मूळ देवीच्या पुढे एक धातूची मूर्ति ठेवतात. या देवीचे पुजारीपण व व्यवस्था अनगळ उपनाव असलेल्या घराण्याकडे आहे. येथील एक पुजारी गोविंद चिंतामण अनगळ, हे रेसकाला शाळेत भूगोल शिक्षकही होते. मंदिराचा पांढराशुभ्र कळस अतिदूरवरूनही दिसतो. यात्रेच्या वेळी या ठिकाणी होमहवन केले जाते. त्या वेळी नवसप्रीत्यर्थ अनेक कोंबड्या नवऱ्या पायथ्याच्या परिसरात बळी दिल्या जातात. हे हवन अष्टमीच्या दिवशी होते हवनकुंडाजवळ देवीचे वाहन जो सिंह त्याची एक प्रतिकृति उभी आहे. शहरवाढीमुळे आता पायथ्यापर्यंत वस्ती झालेली आहे आणि टेकडीच्या पायथ्यापर्यंत जाण्यासाठी रस्त्याची व्यवस्था झालेली आहे प्रस्तुत ग्रंथाचा लेखक त्याच्या लहानपणी ( जवळजवळ १९२० साली ) तो इतर तालीमसंघातील ' दौडी ' बरोबर चतुःशृंगी देवीच्या दर्शनासाठी जात असे शहरातील अनेक तालीमसंघ त्या वेळी भल्या पहाटे एकत्र निघत, वाटेत जाताना देवीच्या नावाचा जयघोष करीत आणि साधारणपणे उजाडण्यापूर्वी दर्शन घेऊन परत येत त्या वेळी उत्पन्न झालेले विशुद्ध वातावरण उत्साहवर्धक आणि आनंददायक असल्याने फार मौज वाटत असे. नवरात्रामध्ये देवीचे दररोज दर्शन आणि पळण्याचा भरपूर व्यायाम ( त्यास ' दौड ' असे म्हणत ) ह्या दोन्ही गोष्टी साधत असत आजच्या तरुणांमध्ये ते दृश्य मात्र दिसत नाही.

भुजंगप्रयात

चला पुण्यग्रामीं पहा देविंना हो ।  
पहा पर्वती आणि जोगेश्वरी हो ॥  
वसे गावशींवे चतुःशृंगी देवी ।  
क्रमाने तयाची कथा वर्णिली ही ॥ १ ॥

इंद्रवंशा

जोगेश्वरी प्राचिन ग्रामदेवता ।
आहे सह्याद्र्या शतकावरी स्थिता ॥
शेंदूर भाळीं तिज भक्त वाहती ।
जोगेश्वरी लाल म्हणोनि बोलती ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित

ग्रामासंनिध उंच टेकडि असे दीपगृहाचे परीं ।
नाना-पत्नि विलोकि कोणि यजिता क्षेत्रास देविसरी ॥
शाहूने मग मंदिरा उभविलें, आमात्य भार्येस्तव ।
स्थापि शंकर-पार्वती-गणपती-विष्णूस पूजेस्तव ॥ २ ॥

शिखरिणी

चतुःशृंगी देवी नवस करितां पावसी सदा ।
पहा वृद्धा-शिष्यास्तव अवतरे दुर्लभ-पदा ॥
तुझ्या आशीर्वादें बहुत धन शेटी मिळविलें ।
म्हणोनी वास्तुला तव स्मरणिं त्याने उभविलें ॥ ३ ॥

* * *

(२२) धनशंकरी

खड्गं घंटां त्रिशूलं लिपिविशदतरं बिभ्रतीं दक्षहस्तैः ।
पात्रं शीर्षं सुखेटं डमरुकमनिशं वामहस्तैस्त्रिनेत्राम् ॥
सिंहस्थां तारहारांगदमणिमुकुटां शोभयंतीं प्रसन्नाम् ।
वन्दे पूर्णेन्दुबिंबां प्रतिरुचिरमुखीं शंकरीं शंकरेशाम् ॥

शौनकाने प्रश्न केल्यावर स्कंद या स्थानाचा वृत्तांत कथन करतात की, एकदा अगस्ती ऋषि आपली पत्नी लोपामुद्रा हिच्यासह तीर्थाटन करीत असताना एके ठिकाणी त्यांना राजा सुद्युम्न ध्यानस्थ बसलेला आढळला. राजाने नेत्र बंद असल्यामुळे साहजिकच त्याला ऋषीच्या आगमनाची चाहूल लागली नाही आणि त्यामुळे त्याने मुनिवर्यांचे आगतस्वागत करून त्यांना आसन दिले नाही. परंतु अगस्तींना तो आपला अपमान वाटला आणि राजाने हेतुत:च आपले नेत्र बंद ठेवून आपला अपमान केला असावा, या गैरसमजुतीने त्यांनी त्याला शाप दिला, ' तू हत्ती होऊन भूमीवर फिरशील '

पृथ्वीवर भ्रमण करीत असताना नारदांना अगस्ती ऋषींची ही उन्मत्त वागणूक कळली. अगस्तींना प्रायश्चित्त देण्याचे त्यांनी ठरविले. अन्यायाचे परिमार्जन करणे हे साधुपुरुषाचे लक्षण समजले जाते. मग अन्याय करणारा कितीही मोठा असो. वैकुंठी जाऊन ऋषींची ही वागणूक त्यांनी विष्णूच्या कानावर घातली आणि काशीमधून त्यांना हुसकावून लावण्याची मागणी केली.

कथं काश्या बहिर्गच्छेत्काशीवासप्रियः स तु ॥ २-२॥

ऋषीला लालूच दाखविण्यासाठी त्यांनी त्याला असे वचन दाखविले की, काशी, कांची, अवंतिका इत्यादि सात क्षेत्रांत साधना केल्यास भक्तांना नुसती मुक्ति मिळते. पण,

करवीरं निरुपाक्षं श्रीशैलं पांडुरंगकम् ।
तिलकं सेतुबंधश्च भुक्तिमुक्तिप्रदानि षट् ॥ १-२७ ॥

दक्षिणेकडील या क्षेत्रामध्ये भुक्ति आणि मुक्ति दोन्ही मिळतात. तेव्हा त्यांना दक्षिणेत पाठवावे. पण हे व्हावे कसे? ऋषीला काशी सोडण्यास उद्युक्त करावे कसे?

इच्छा असली, की मार्ग सापडतो आणि युक्ति फार कामी येते. अनेक उपायांनी कार्यसिद्धि करून घ्यावी लागते. नारद विंध्यपर्वताकडे गेले आणि त्यांनी मेरुपर्वताच्या अनेक रहस्यमय कथा त्याला सांगितल्या. शेवटी ते त्याला म्हणाले की, ' सर्व देवांनी केलेल्या स्तुतीमुळे मेरुपर्वताला अहंकार चढला आहे. भूतलावरील सर्व पर्वतांमध्ये मीच तेवढा उंच असून बाकी सर्व पर्वत नीच आहेत अशी त्याची समजूत आहे. तेव्हा तू जर मनात आणशील तर त्याचे गर्वहरण करू शकतील ' इतके सांगून नारद निघून गेले.

वाढल्या गवताच्या गंजीवर अग्नीची ठिणगी पडल्यावर ती पेटण्यास काय वेळ लागतो? नारदानी सांगितलेली मेरूपर्वताबद्दलची बनावट हकीकत खरी मानून विंध्यपर्वत वाढू लागला. त्याचा परिणाम असा झाला की, उत्तरेकडे चंद्रसूर्यांची गती कुंठित होऊन यज्ञयाग बंद पडतील की काय अशी भीती वाटू लागली आणि सर्वत्र हाहाःकार उडाला.

तेन नोदेति भगवान् कर्मसाक्षी दिवाकरः।
हव्यकव्यादिकर्माणि तेन लुप्तानि भूतले ॥ २-८१ ॥

यज्ञयागादि धार्मिक कृत्ये बंद पडण्याच्या भीतीने सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले आणि वेळीच उपाययोजना करण्याची त्यानी त्याला विनंती केली. ब्रह्मदेवाने त्याना विष्णूकडे पाठविले. ते विष्णूकडे आल्यावर त्यानी त्यांना सांगितले की, 'तुम्ही काशी क्षेत्री अगस्ती मुनींकडे जाऊन त्याना आपले दुःख निवारण करण्याची विनंती करा. कारण त्याच्याशिवाय दुसरा कोणीही तुमचे दुःखनिवारण करू शकणार नाही. तसेच त्याना दक्षिणेकडील क्षेत्राचे महत्त्व पटवून द्या म्हणजे ते काशी सोडण्यास उद्युक्त होतील.'

वरीलप्रमाणे देवाची विनंती ऐकून अगस्ती ऋषी आपल्या पत्नीसह दक्षिणेकडे निघाले.

वाराणशी सोडताना अगस्ती आपली पत्नी लोपामुद्रेला म्हणाले,
विंध्याद्रिवृद्धिरस्तंभार्थेन त्याज्या काशी मया प्रिये ॥ ३-४९ ॥

ते विंध्यपर्वताजवळ आले असता तो दुर्लंघ्य आहे असे त्यांना आढळून आले. त्यांनी पर्वताला सांगितले की, 'मला दक्षिणेकडे जावयाचे आहे. तेव्हा तुझी उंची कमी कर आणि मला मार्ग दे.' सप्तसागर पिऊन टाकणाऱ्या या ऋषीची कीर्ति विंध्याचलाला माहीत होती.

मार्ग आक्रमण करीत करीत अगस्तीमुनी कोल्हापूर येथे आले असता महालक्ष्मीचे रम्य स्थान त्यांनी पाहिले.

करवीरपुरं प्राप्य महालक्ष्मीनिकेतनं ॥ ३–२३ ॥

त्यांनी तिची आराधना सुरू केली. अखेर देवी प्रसन्न झाली आणि त्यांना म्हणाली,

विद्यते शंकरीक्षेत्रं तिलकारण्यमध्यगं ।
तत्र वासस्तथा कार्यो जगत्कल्याणहेतवे ॥ ३–५८ ॥

'माझ्या येथील क्षेत्राप्रमाणेच दक्षिणेला तिलक वनात तुम्ही जावे आणि श्रीशंकरी (वनशंकरी) क्षेत्री राहावे.' पूर्वी तेथे शंभर वर्षांचा दुष्काळ पडला असता देवीने आपल्या देहातून शाकभाजी निर्माण करून आणि पाताळामधून हरिद्रातीर्थाचे पाणी आणून लोकांचे रक्षण केले आहे, म्हणून तिचे नाव शाकंभरी ( शाकान् बिभर्ति इति ) असे पडले आहे.

पुरा हि शतवार्षिक्याऽनावृष्ट्या सकला मही ।
यद्रक्षितं प्राणिजातं शाकान्नैश्च स्वदेहजैः ।
शाकंभरीति विख्याता ततः श्रीजगदंबिका ॥ ३–६१ ॥

विजापूर जिल्ह्यातील हा भाग आजही पाण्यासाठी दुष्काळीचा म्हणून समजला जातो. पाताळातून आलेल्या पाण्यावर तेथे झाडेझुडपे आणि भाजीपाला तयार झाल्यावर आणि त्या क्षेत्राचा उत्कर्ष पाहिल्यावर दैत्यांनी तेथील लोकांना त्रास देऊन त्या क्षेत्राची नासधूस करण्यास सुरुवात केली. तेव्हा देवीने वाघावर स्वार होऊन आपल्या नऊ कोटी सखींसह दैत्यावर चाल केली आणि त्यांचा निःपात केला. देवीचा हा पराक्रम पाहून सर्व देवांना अतिशय आनंद झाला आणि त्यांनी हरिद्रातीर्थ व तैलतीर्थ यांच्यामध्ये सिंहारूढ मूर्तीची स्थापना केली. वरील वृत्तांतावरून संदर्भ जोडावयाचा झाला तर असे म्हणावेसे वाटते की, या देवीचे मूळ नाव शाकंभरी असावे आणि ती वनामध्ये राहिली म्हणून वनशंकरी हे नाव तिला मागाहून प्राप्त झाले असावे.

आराधना केलीस तर तुला शांति लाभेल ' त्याप्रमाणे राजाने आराधना केली. त्याला देवीचे साक्षात् दर्शन घडले आणि म्हणून त्याने मंदिर उभारले.

या मंदिरातील नागरी लिपीमध्ये लिहिलेला एक शिलालेख असा

' श्री देवीचरणीं तत्पर परशुराम नारायण जनगळ, शालीवाहन शके ६०३ '

याचा अर्थ असा की, या गृहस्थानी मंदिराचा प्रथम जीर्णोद्धार केला असावा ईश्वर देवालयातील एका खांबावर कन्नड लिपीमध्ये लिहिलेला सन १०१९ सालचा एक शिलालेख आहे तो असा

' राष्ट्रकूट घराण्याचा राजा भीमदेव, सेवक सेनगोव नागवर्मय्या यानी लढाईत जे शौर्य दाखविले त्याच्या स्मरणार्थ हा खांब उभा केला आहे. '

राष्ट्रकूट घराण्याचे हे शासन कल्याण येथील असून जगदेकमल्ल (दुसरा) याच्या वेळचे असावे. आणखी एका खांबावर ' साहसभीमिमनेवेगंडे, कीर्तिम ल्पने, शके ९४६, रक्ताक्षीनाम संवत्सरे ' असा उल्लेख असून तो जगदेकमल (पहिला) याच्या वेळचा असावा यावरून उघडच दिसते की, हे फार प्राचीन क्षेत्र आहे

मंदिराचा परिसर चौकोना असून साधारणत तो १५०×१०० चौ. फुटाचा असावा चारी बाजूना इमारती व मध्यभागी ६०×१०० चौ फूट आकाराचा चौक आहे प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दोन्ही बाजूना ओवऱ्या असून डाव्या बाजूला जेवणघर व उजव्या बाजूला यात्रेकरूंच्या राहण्याची सोय करण्यात आली आहे प्रवेशद्वारासमोर एक विस्तीर्ण हरिद्रातीर्थ तलाव आहे आणि त्याच्या काठी दोन लहान लहान मंदिरे आहेत

मंदीरात प्रवेश केल्यावर चौकातून जात असताना दोन गरुडस्तंभ उभे असलेले दिसतात उत्सवप्रसंगी त्यांच्यावर दीपाची आरास केली जाते. गाभाऱ्यामध्ये सिंहवाहिनी देवता असून सिंहाचे पुढील दोन पाय अंदाजे दीड फूट उंचीच्या चबुतऱ्यावर ठेवलेले दिसतात या वाहनावर देवी आरूढ झाली असून तिने आपले दोन पाय सिंहाच्या पाठीवर सोडलेले दिसतात. सिंहाच्या गळ्यात घंटमाळा आहेत चबुतरा, सिंह व देवी या सर्वांची उंची साधारणत चार फूट आहे. देवीचे स्वरूप आकर्षक दिसते

सत शाकंभरी देवी भुजाष्टकविराजिता ।
चापांकुशौ पानपात्र बाण पाश त्रिशूलकम् ॥

डमरुं चंद्रहासं च दधाना सिंहवाहना ।
दुर्गमं दानवं दन्तुमट्टहासं मुहुर्व्यधात् ॥ ७–९४ ॥

ती अष्टभुजा असून तिच्या हातात मशाल, त्रिशूळ, तलवार, डमरू, ढाल व असुराचे मुंडके असून तिचे उरलेले दोन हात सिंहाचा लगाम धरण्यात गुंतलेले आहेत. मूर्तीच्या भोवती उंच प्रभावळ आहे.

दुर्गादेवीच्या अनेक नावांपैकी कांतारवासिनी हे एक नांव असून बनशंकरी या नावामध्ये तेच अंतर्भूत असावे. महाभारतामध्ये अर्जुनाने समरपूर्व देवीची जी स्तुति केली त्यामध्ये ' दुर्गा कान्तारवासिनी ' असा उल्लेख आढळतो. त्यामुळे कान्तारवासिनी हीच बनशंकरी असावी. या देवीच्या स्तुतीपर ' श्री शाकंभरी ( बनशंकरी ) माहात्म्य ' नावाच्या पोथीत ही माहिती उपलब्ध असून पार्वतीचे नाव आदिमाया शांकरी असे दिले आहे.

प्राचीनकाळी चंड दैत्याने या देवीची सेवा करून अभयपद मिळविले आहे. त्याच्या नावाने एक लिंग स्थापन करण्यात आले असून प्रथम पूजेचा मान त्याला दिलेला आहे. देवीची पूजा नंतर केली जाते. तैलतीर्थ व तिलकवन ही नावे दुर्गम दैत्याला दिलेल्या वरदानामुळे आलेली आहेत. या देवीने शंभासुर नावाच्या दैत्याचा वध केला असाहि उल्लेख पुराणात आढळतो. अश्वत्थाम्याने या देवीची आराधना केली आणि त्याला देवीने दर्शन दिले असे म्हटले आहे. वरील गोष्टीचा विस्तृत वृत्तांत या देवीच्या पुराणात दिलेला आहे. या क्षेत्राच्या आसमंतामध्ये मलापहारीतीर्थ, हरिद्रातीर्थ, तैलतीर्थ, पद्मतीर्थ, रंगतीर्थ, अगस्तीतीर्थ, भानुतीर्थ, कोटीतीर्थ, नागेशतीर्थ, विष्णुपुष्करिणी, इत्यादि अनेक तीर्थे आहेत. त्यांचा त्रोटक इतिहास या देवीच्या विस्तृत पुराणात दिलेला आहे.

हिंदुपंचांगाप्रमाणे शाकंभरी देवीचे नवरात्र अथवा उत्सव पौष शु० अष्टमीपासून चालू होतो आणि पौर्णिमेला समाप्त होतो. या ठिकाणी वार्षिक उत्सव पौष महिन्यातच होतो आणि प्रत्येक दिवशी खालीप्रमाणे पूजा केली जाते.

अष्टमी—अष्टसिद्धी देणारी अष्टभुजास्वरूप देवी.

नवमी—नऊ करोड सखीसह असलेली व नवरत्नांनी विभूषित नवदुर्गास्वरूप देवी.

दशमी—दश दिक्पालांनी पूजिलेली व रावणाविरुद्ध रामाला संतोष देणारी आदिशक्ति, आदिमाया शांकरी.

एकादशी—एकादश रुद्र नित्य पूजीत असलेली देवी.

द्वादशी—द्वादश आदित्याना सिद्धि देणारी देवता.

त्रयोदशी—त्रयोदश विश्वदेवता नित्य पूजन करीत असलेली देवता.

चतुर्दशी—चतुर्दश इंद्रदेवाना सिद्धि प्रदान करणारी, प्रणवस्वरूपिणी आणि चतुर्दश मनूचे नियंत्रण करणारी देवता. या दिवशी असंख्य प्रकारच्या भाज्या, वागड्या व तिळाचे पदार्थ यांनी पूजासंभार व अनेक भाज्यांचा नैवेद्य अर्पण करतात, त्यास 'पल्लेय इब्बा' म्हणतात.

पौर्णिमा—पूर्णानंद स्वरूपिणी अथवा पूर्णानंद दायिनी देवता या दिवशी ब्राह्मणसुवासिनींना बोलावून, सचैल स्नान घालून, देवतास्वरूप मानून त्याना भोजन घालयाचे. नंतर ऐपतीप्रमाणे वस्त्रालंकार व वायने देऊन त्यांची बोळवण करावयाची. असे केल्याने देवता प्रसन्न होते. या दिवशी रथोत्सव होतो व लक्षावधी यात्रेकरू त्यात भाग घेतात.

या मुख्य उत्सवाशिवाय या क्षेत्री श्रावण महिन्यात लक्ष बिल्वार्चन, आश्विन महिन्यात दीपाराधन व नवचंडी होम, कार्तिक महिन्यात दीपोत्सव हे उत्सव होतात.

या देवीचे पुजारीपण शुक्ल यजुर्वेदीय कण्वशाखीय ब्राह्मण वर्गामध्ये आहे. त्यांची सहा घराणी असून ती आलटून पालटून पुजारीपण करतात. सर्व वर्गामध्ये या देवीचे भक्त आढळतात. परंतु विशेषत देवांग वर्गाची ही कुल-स्वामिनी आहे. या मंदिरात रात्री कोणाला राहू देत नाहीत.

देवस्थानच्या परिसरात पोळ्या भाजणे, कुटणे असर दळणे बंद असल्याने तांदूळ, डाळ, गव्हाचे पीठ इत्यादि जिन्नस जायने घेऊन स्वयपाक तयार करून नैवेद्य अर्पण करतात

पद्मपुराण आदिखंड अध्याय २८ आणि महाभारत वनपर्व अ. ८८ यामध्ये शाकंभरी देवीचा उल्लेख आढळतो.

शाकंभरीति विख्याता त्रिषु लोकेषु विश्रुता ।
दिव्यं वर्षसहस्रं हि शाकेन किल भारत ॥ १४ ॥

देवी भागवतामध्ये या देवतेचा उल्लेख आढळतो, पण त्या ठिकाणी शाकंभरी आणि शताक्षी यांच्या नावाने मिश्रण आढळते. ते येथे पहा.

शताक्षी सा श्रुतो जाता देवी भगवती शिवा ।
अनंताक्षीमयं रूपं दर्शयामास पार्वती ।
स्वादूनि फलमूलानि भक्षणार्थं ददौ शिवा ॥
नानाविधानि चान्नानि पशुभोज्यानि यानि च ॥ ४६ ॥
शाकंभरीति नामापि तद्दिनात्समभून्नृप ।
शाकंभरि शिवे नमस्ते शतलोचने ॥ ६९ ॥

हुबळीपासून पाच मैलावर अमरगोल या गावी बनशंकरी मंदिर असून ते जखनाचार्य यांनी बांधले हे गृहस्थ अतिशय धार्मिक आणि मंदिर उभारण्यात प्रख्यात होते ते पंधराव्या शतकात होऊन गेले त्यांचा इतिहास असा सांगतात की, पूर्वाश्रमीचे हे क्षात्रवर्णाय होते. त्यांच्या हातून एका ब्राह्मणाचा वध झाला आणि त्या पातकाचे क्षालन करण्यासाठी त्यांनी अनेक देवालये बांधली. दुसरे असेही एक मत आहे की, जखनाचार्य हे विश्वकर्म्यांचे पांचाळवंशीय शिष्य होते. गुरूकडून इमारत बांधणीशास्त्र शिकून झाल्यावर, आपल्याला ही विद्या कितपत साध्य झाली हे पाहण्यासाठी त्यांनी प्रथम हे देवीचे मंदिर बांधले. ह्यामुळे मंदिराचे शिल्प अत्युत्कृष्ट झाले आहे.

इ. स. १५३८ च्या सुमारास यांनी देवगिरी येथे यल्लम्मा मंदिर बांधले आहे.

गदगपासून सात मैलावर लक्कुंडी नावाचे एक गाव असून त्या ठिकाणी जखनाचार्य यांनी ५० मंदिरे बांधलेली आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणून बसवण्णा, चंद्रमौलेश्वर, गणेश, गोकर्णेश्वर, काशीविश्वेश्वर, माणकेश्वर, नीलकंठेश्वर, कुमारगिरीश्वर यांचा उल्लेख करता येईल या मंदिरातून काही शिलालेखही आढळतात. असा हा कर्तनगार पुरुष होऊन गेला

(धारवाड जिल्हा गॅझेट, पृष्ठ, ६५०, ७६८)

करजगी ( धारवाड ) जवळ देवी-होसुर या गावी वनशंकरीचे देवालय असून, त्यामध्ये चार प्राचीन शिलालेख आहेत. चिक्केरूर येथे एक मंदिर असून इ० स० १०५३ सालचा शिलालेख तेथे आढळतो. इलकल ( विजापूर ) येथे या देवीचे मंदिर असून तेथे पौष महिन्यात यात्रा भरते, ह्या वेळी काही घराण्यात नैवेद्यासाठी ६० भाज्या करतात, तर कोठे राजलादेवी अगर राजराजेश्वरी देवीच्या नावे कुलधर्म केला जातो

वसंततिलक

> दुर्गास्वरूप दिसते वनशंकरी ही ।
> शाकंभरी म्हणुनि पूजित भक्त पाहीं ॥
> या देवते प्रमुख मानिलि कन्नडानीं ।
> पीठें अनेक दिसती, नमितो तया मी ॥ १ ॥

* * *

(२३) बहुचरा

> इति प्रभाष्य तं देवि माया भगवती भुवि ।
> बहुनाम निकेतेषु बहुनामा बभूव ह ॥ ( श्रीमत् भागवत् )

बहुतेर दैत्याचा वध या देवीने केला म्हणून तिला बहुचरा नाव प्राप्त झाले असे भागवतकाराचे म्हणणे आहे. बहुचरा देवीचे प्रमुख पीठ काठेवाडामध्ये गायकवाडाच्या पूर्वीच्या कडी प्रांतात मेहसाणाजवळ व कडीपासून सुमारे २३ मैलावर वसलेल्या चुवाळ या गावी आहे. चुवाळ हे एक रेल्वे स्टेशन-सुद्धा आहे. देवस्थानाकडे जाताना मार्गात एका मोठ्या तलावावरून जावे लागते. देवस्थानच्या परिसराला विटाचा तट बांधलेला असून २८० X २७५ चौ. फूट असा तटाचा घेर आहे. त्याच्या भिंतीमध्ये निशाणबाजांसाठी झरोके ठेवलेले आहेत. हौद्यासह हत्तीवरील माहुताला आत शिरता यावे, एवढा मोठा तटाचा दिल्ली दरवाजा आहे.

या देवीच्या उत्पत्तीसंबंधी एक कथा आपण वर पाहिली. पण आणखीही काही आख्यायिका आहेत त्यांचा थोडक्यात परामर्ष घेऊ या एकदा चारण जातीच्या काही स्त्रिया सम्वळपूर गावाहून चुवाळकडे चालल्या असता मार्गात काही कोळी लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांना लुबाडण्याचा प्रयत्न केला स्त्रीसमुदायामध्ये बहुचरा, बूत आणि बहुला या नावाच्या तीन बहिणी होत्या त्यांपैकी बहुचरेने एका दरोडेखोराच्या हातातून तलवार हस्तगत

केली आणि त्या तलवारीने आपल्या छातीवरील दोन्ही स्तनभाग कापून टाकले. असे कृत्य करण्यामागे तिचा हेतु आत्मबलिदान करून शीलसंरक्षण करण्याचा होता. आपल्या बहिणीची ती स्थिति पाहून, बूत आणि बहुला यांनीही आत्मबलिदान केले. छातीवरील भयंकर जखमेमुळे रक्तस्राव झाला आणि त्या तिन्ही बहिणी तावडतोब गतप्राण झाल्या. या तिन्ही बहिणींनी आपले शीलरक्षण केले आणि म्हणून त्या पुढे देवीपदाप्रत पोहोचल्या. त्यांच्या प्रतिमांची पूजा होऊ लागली. चुवाळ गावी बहुचरा, कोटजवळ उनेज या गावी बूत आणि सिहोरपासून १५ मैलांवर असणाऱ्या धाकळकु या गावी बहुला यांच्या प्रतिमा देवता म्हणून पूजल्या जातात. ज्या ठिकाणी बहुचरा देवीने आत्मबलिदान केले त्याच ठिकाणी बहुचरा देवीच्या नावाने एक तांदळा पुरलेला आहे आणि त्यावर मंदिर उभारलेले आहे. (" रासमाळा " लेखक–फोर्बस्, पृष्ठ ४२६.)

भागवतकार आणखी एक उत्पत्ति देतात. कंसाच्या हातातून देवकीची मुलगी दगडावर आपटताना निसटली. ती वर अंतराळामध्ये गेली आणि बहुचरा या नावाने चुवाळ या गावी अवतरली. (भागवत १०–४–१२.) मार्कंडेय ऋषि आपल्या ' नारायण स्तुति ' मध्ये लिहितात.

मयूरकुक्कुटवृते, महाशक्तिधरेऽनघे ।
कौमारीरूपसंस्थाने नारायणि नमोऽस्तु ते ॥

याचा अर्थ असा की, ' जी नारायणी-योगमाया देवकीच्या मुलीच्या अंशाने या ठिकाणी येऊन राहिली, तिला माझा नमस्कार असो.' यावरून असे दिसेल की, मार्कंडेय मुनीही भागवतकाराचाच पाठपुरावा करतात, पण विंध्यवासिनी देवीची उत्पत्ति पाहिली तर ती याच प्रकरणातून झालेली आढळून येईल. म्हणजे कंसाच्या हातातून योगमाया निसटून अंतराळात गेली आणि तेथून विंध्यपर्वतावर जाऊन अष्टभुजारूपाने राहिली. तुलनात्मक दृष्टया विचार केला तर हीच उत्पत्ति खरी मानावी लागेल. कारण बहुचरेसारखी हिला अन्य उत्पत्ति नाही.

या देवीची आणखी एक उत्पत्ति अशी की, काली गावाची गवळ्याची काही मुले, रानात खेळत असताना त्यांनी एक लहानसा कोनाडा तयार केला. त्यामध्ये त्यांच्या बालसमजुतीप्रमाणे एक दगड देवी म्हणून बसविला. महाराष्ट्रात लहान मुली ज्याप्रमाणे भातुकलीचा खेळ खेळतात, सर्व ' खोटाखोटा ' स्वयंपाक आपणच करतात व जेवतात, त्याप्रमाणे या मुलांनी आपल्या घरातून तांदूळ, गाजर आणून भात शिजवून देवीला गोडाचा नैवेद्य दाखविला, पूजाविधि पूर्ण करण्यासाठी त्यांनी एका रेड्याला देवीसमोर आणले

आणि वरग्वारिया नावाच्या वृक्षाच्या एका फांदीने, त्याची मान तोडण्यासाठी ती फादी रेडयाच्या मानेवरून फिरविली. निर्हेतुकपणे पण भक्तिभावाने केलेली ही पूजा देवीने स्वीकारली आणि पूजेचा माझ्याकडून स्वीकार झाला हे दर्शविण्यासाठी ह्या वृक्षाची फांदी जरी रेडयाच्या मानेवरून फिरविली होती, तरी त्याची मान तुटली आणि खाली पडली. अर्थात् मुलानी याचा अर्थ असा केला की, देवीने बळी मान्य करून घेतला आहे आणि साक्षात् देवी कोनाड्यात अवतरली आहे.

कार्ली गावचा राजा त्या वेळी तेथून जात असताना त्याला ही गोष्ट समजली. झालेली सर्व हकीकत मुलांनी राजाला निवेदन केली. सत्याची प्रचीति पाहाण्यासाठी त्याने देवीजवळ मागणी केली की, 'मुलानी या मडक्यात जो भात शिजविला आहे तो सर्व सैनिकाना पुरावा' प्रत्यक्ष देवताच प्रसन्न असली म्हणजे कुठल्याच गोष्टीची ददात पडत नाही. याचा अनुभव आजही अनेक धार्मिक उत्सवाच्या वेळी भक्ताना प्रसाद देताना येतो. जानेवारी १९६१ साली गोरेगावला अंबाबाई देवस्थानात भक्ताच्या सहाय्याने लेखकाने शतचंडी यज्ञ केला. शेवटच्या रात्री १० पर्यंत हजारो भक्तानी महाप्रसाद घेतला, तरी दुसऱ्या दिवशी १०० माणसाना पुरेल इतका अन्नप्रसाद शिल्लक राहिला. त्याचप्रमाणे तो थोडासा भातही सर्व सैनिकाना पुरला, इतकेच नव्हे तर काही थोडा भात मडक्यात शिल्लक राहिला! बहुत लोकाना अन्न पुरले म्हणून बहुधा बहुचरा असे नाव पडून, त्या ठिकाणी मंदिर उभारले गेले.

( रॉलिसनकृत 'रासमाला', पृष्ठ ९८–९९ )

चुवालगावी या देवीची एकूण तीन मंदिरे आहेत. पहिले आद्यस्थान सुमारे १५ × १९ चौ. फुटांचे असून वरग्वारिया या नावाच्या वृक्षांनी ते वेष्टित आहे. इ.स. ११५२ साली सध्याचे मंदिर मंगळराज याने बाधले. या गृहस्थाच्या नावावरून मंगळपूर हे गाव जवळच वसविलेले आहे. दुसरे मंदिर अंदाजे १२ × १० चौ. फूट असून सुलुसनामे कोणी मराठी फडणवीसाने ते बाधलेले आहे. या गृहस्थाचे संपूर्ण नाव आणि मंदिर बाधणीचे साल मात्र मिळत नाही. असे जरी असले तरी गायकवाडीतील तो एक नोकर होता हे मात्र निश्चित होय. तिसरे मोठे मंदिर आणि प्रमुख पीठ इ. स. १७७९ च्या सुमारास, बडोदा-नरेश श्री. मानाजीराव गायकवाड यांनी बाधावयास घेतले आणि चार वर्षांनी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले.

हे तिसरे मंदिर बांधण्यास तसेच सबळ कारण झाले चमत्कार दाखविल्याशिवाय कोणी देवाला मानीत नाहीत हा अनुभव नेहमीचाच आहे स्वतः मानाजीराव गायकवाड एका असाध्य रोगाने जर्जर झाले होते अनेक नामांकित वैद्यांचे औषधोपचार झाले, पण गुण येईना त्यांना एकदा कोणीतरी सांगितले की, त्यांच्याच राज्यातील बहुचरा देवस्थान अतिशय जागृत असून तिची भक्ति केली असता भक्ताच्या मन कामना पूर्ण होतात देवीची ही कीर्ति ऐकल्यावर आपल्या रोगमुक्ततेसाठी गायकवाड स्वत जातीने त्या क्षेत्री गेले आणि त्यांनी देवीला नवस केला की, 'मी रोगमुक्त झाल्यास तुझे एक मंदिर बांधीन.' माणसाच्या नशिबातील भोग संपलेला असला आणि त्याने मनोभावे देवीची कृपा संपादन करण्याचा यत्न केला, म्हणजे त्याला जरूर फळ मिळते मात्र त्याने आपली सर्व मदार त्या देवतेवरच सोपविलेली असली पाहिजे. मानाजीरावांवर थोड्याच दिवसात देवीची कृपा झाली आणि त्यांचा तो असाध्य रोग नाश पावला त्यांनी नवस केल्याप्रमाणे सव्वालाख रुपयांपेक्षाही जास्त खर्च करून बहुचरा देवीचे मंदिर उभारले त्या मंदिराचे उद्घाटन सन १७८३ साली झाल्याचे तेथील शिलालेखावर कोरलेले आहे

मुख्य देवालयाच्या गाभाऱ्यात एका उंच चबुतऱ्यावर भव्य कोनाड्या-मध्ये देवीचे प्रतीक यंत्र बसविलेले आहे त्याला 'बाला यंत्र' असे म्हणतात ते यंत्र स्त्रीच्या योनीच्या आकाराचे आहे या स्थानावर 'अंगी' म्हणजे रुप्याची एक चौकट असून, त्यावर कोंबड्यावर बसलेली देवी दाखविलेली आहे या चित्रामुळेच बहुचरा देवीची जी प्रतिमा बाहेर विकली जाते अगर घरोघरी लावली जाते, त्यामध्ये हेच रूप दाखविलेले असते, मूळस्थानी असलेल्या बालायंत्राचे नव्हे वहानावर बसलेल्या कोंबड्याविरहित बाजूला दोन कोंबडे दाखविलेले आहेत अंगीमध्ये दोन स्वरूपे दर्शविलेली आहेत एक वर आणि दुसरे खाली वरच्या स्वरूपाला अंगीवरच वस्त्रे, भूषणे आणि पुष्पे लेववतात तोच प्रकार खालील स्वरूपावर होतो या आकर्षक चांदीच्या अंगीमुळे, बहुशी भक्त हेच देवीचे मूळरूप मानतात

नित्यक्रमाच्या पूजेत सकाळी काकडआरती, वेदघोषाने होते आणि त्या वेळी देवीला दही-दूध-तूप वाहतात या पूजेच्या वेळी अंगीवर कुंकू आणि फुले वाहतात नंदादीप सतत जळत असतो काकडआरतीच्या वेळी 'बल भोग' म्हणजे गोड शिरा ठेवून नैवेद्य दाखवितात सकाळी १० वाजता पुन्हा दुसरा नैवेद्य होतो सायंकाळी सप्तशतीचा पाठ झाल्यावर देवीला स्नान आणि महानैवेद्य होतो मंदिराची व्यवस्था चोख रहावी म्हणून गायकवाड महाराजांनी सन १८५०

साली नारायण माधव हा दक्षिणी ब्राह्मण पुजारी म्हणून नेमला. पूर्वी येथे स्फटिकाचे यंत्र होते. ते जीर्ण झाल्यामुळे त्यावर आता सुवर्णाचा पत्रा जडविलेला आहे.

पूर्वी या देवस्थानच्या व्यवस्थेत कमाली आणि रजपूत या जमातींचे प्राबल्य फार होते. कमालींचा दावा असा की, भंडासुर दैत्याने पृथ्वीवर जेव्हा धुमाकूळ घातला तेव्हा त्याच्या नाशासाठी देवीने त्याना उत्पन्न केले आहे. यावर रजपूताचे म्हणणे असे की, अल्लाउद्दीनाने या देवस्थानावर जेव्हा हल्ला करण्याचा बेत रचला तेव्हा काही सैनिक देवीच्या चमत्कारामुळे पळून गेले आणि काही तेथेच स्थाईक झाले. तेच हे कमाली होत. देवीच्या चमत्काराबद्दलची हकिकत अशी की, अल्लाउद्दीन ( दुसरा ) याने पाटण, अनहिल्वाड वगैरे गुजराथचा भाग जिंकून घेतला आणि त्यानंतर अनेक मंदिराची मोडतोड करण्यास सुरुवात केली. सिद्धपूर येथे रुद्रमाला मंदिर उध्वस्त करून त्याने आपला मोर्चा चुवाळ येथील बहुचरा मंदिराकडे वळविला. या देवीचे वाहन कोंबडा हे असल्याने अनेक कोंबडे देवीच्या परिसरात पाळलेले असत. यापैकी बहुतेक प्राणी भक्तांनीच देवीला अर्पण केलेले असत. अल्लाउद्दीनाचा सायंकाळचा तळ देवस्थानापासून थोड्या अंतरावर पडला व दुसऱ्या दिवशी बहुचरा देवीचे मंदिर तोडण्याचे त्याने ठरविले. त्या सायंकाळी सैनिकानी देवीचे अनेक कोंबडे पकडले आणि त्याची रसोई करून खाल्ली. चारदोन प्राणी जेवढेच निसटले, तेवढेच बचावले. मानवाने मनामध्ये योजिलेली सर्व कार्ये नेहमीच पूर्ण होतात असे नाही. दैवाचे पाठबळ नसेल तर ती पूर्ण होणे विघ्नामुळे नेहमी अशक्यच होते. येथे तर दुसऱ्या दिवशी देवीचे मंदिरच उध्वस्त होणार होते. देवतेने आपले सत्व राखणे आवश्यक होते, तरच येणारे संकट टळणारे होते. पहाटे नेहमीप्रमाणे जे कोंबडे मरणाच्या कचाट्यातून सुटले होते, त्यानी सवयीप्रमाणे बांग दिली. देवीने आपला चमत्कार दाखविला आणि सैनिकाची पोटे फोडून अनेक मृत कोंबडे जिवंत होऊन बाहेर आले. सर्व सैनिक घाबरून उठले आणि पळत सुटले. अल्लाउद्दीनाला हे वृत्त समजताच देवीच्या जागृतीची खात्री पटून देवीवर त्याची निष्ठा बसली. आपले सर्व सैन्य त्याने परत नेले. त्या वेळी जे सैनिक मागे राहिले तेच कमाली होत, असे रजपुताचे म्हणणे आहे पुढे ते देवीचे सेवेकरी बनले.

रजपुताची हकिकत अशी की, पाटणचा चावडावंशीय राजा आणि कालींचा सोलंकीवंशीय राजा याच्या घराण्यात सोयरिक ठरली त्या काळी मूल जन्मण्यापूर्वीच अशा सोयरिका ठरत असत, असे यावरून सिद्ध होते. पण कर्मधर्मसंयोगाने दोन्ही राजाना मुलीच झाल्या या वेळी कालींच्या राजाने लबाडी

करून आपल्याला मुलगा झाला आहे अशी बतावणी केली. त्या मुलीला तो नेहमीच मुलाच्या पोशाखात मिरवू लागला. ठरल्याप्रमाणे कालांतराने विवाहविधि पार पडला आणि नवरामुलगा काही दिवस मुलीच्या घरी राहावयास गेला. पण आईबापाविना तेथे त्याला करमेना, म्हणून तो स्वगृही येण्यास निघाला. मार्गात त्याला हे देवस्थान लागले. तेथे आल्यावर श्रमाने दमल्यामुळे, तो तळ्याकाठी विश्रांतीसाठी बसला. तेथे त्याच्या दृष्टीस एक चमत्कार पडला. एका कुत्रीने त्या तळ्यात उडी मारली आणि काही वेळाने ती बाहेर आली त्या वेळी तिचे रूपांतर कुत्र्यामध्ये झाले होते. नंतर एक घोडी पाणी पिण्यासाठी आत उतरली. काही वेळ पाण्यात घालविल्यावर ती वर आली तेव्हा तिचेही रूपांतर घोड्यामध्ये झालेले त्याने पाहिले. त्या नवऱ्यामुलाला म्हणजेच मूळच्या राजकन्येला वाटले की, आपणही या पाण्यात स्नान केल्यास आपल्यालासुद्धा कायमचे पौरुषत्व प्राप्त होईल, म्हणून तिनेसुद्धा त्या तळ्यात उडी मारली आणि खरोखरीच तिचे एका पुरुषामध्ये रूपांतर झाले. या चमत्कारामुळे व कृपेमुळे सोलंकी रजपुतांची या देवीवर श्रद्धा बसली आणि ते तिचे सेवक बनले.

श्रीमत् भागवतामध्ये अशाच अर्थाची एक कथा आहे. ती अशी की, स्वायंभु मनूचा पुत्र प्रियव्रत याची कन्या देवहुती कर्दम ऋषींना दिली. वृद्धपणा आला तरी त्यांना पुत्रसंतान नव्हते. कडक पातिव्रत्याने ती पतीची सेवा करीत होती. आपल्याला संतान नाही यास्तव पत्नी दुःखीकष्टी असते हे दिसून आल्यावर त्यांनी तिला एका जलाशयात बुडी मारण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने करताच देवहूती एकदम तरुण सुंदर झाली, पण पति वृद्ध राहिला, नंतर तिच्या आग्रहास्तव त्यानेही जलाशयात उडी मारली व तोही तरुण दिसू लागला. यानंतर त्यांना ९ मुली झाल्या या ठिकाणी जलाशयातील पाण्याचा गुण आहे, अगर ऋषींच्या आयुष्यभराच्या तपश्चर्येचे ते सामर्थ्य आहे, हे जरी निश्चितपणे सांगता येत नसले तरी विवक्षित जलाशयात शिरल्यावर पूर्वरूपे बदलत होती, एवढे ध्यानी येण्यास पुरेसे आहे. ( स्कंद पुराण, अ. २ ).

रजपूत आणि कमाली या दोन सेवकवर्गांत उत्पन्नाच्या वाटणीवरून नेहमी तंटे होत आणि प्रत्येकजण आपल्याला अधिक वाटा मागत असे. एकदा हे प्रकरण सयाजीराव गायकवाड यांच्यापर्यंत गेले. दिव्य करून हे भांडण सोडविण्याचे त्यांनी ठरविले. स्वतः राजाच्या उपस्थितीत लोखंडाचा तप्त गोळा साध्या हातात घेऊन पांच पावले चालत जावयाचे असा दिव्याचा प्रकार होता. कमाली जातीने हे दिव्य पार पाडले, पण रजपुतांना ते धाडस करवेना तरीही नंतर इतर पुराव्यावरून १० आणे वाटा रजपूत आणि ६ आणे वाटा कमाली असा राजांनी ठरवून दिला.

नवरात्रामध्ये या क्षेत्री मोठी यात्रा भरते नवमीच्या दिवशी रेडा बळी म्हणून दिला जातो. नमाली सेवकानी तो रेडा आणावयाचा आणि ' छाचर ' म्हणजे यज्ञकुंडाजवळ तो उभा करावयाचा नतर त्याला हळद-कुंकू वाहून फुलाच्या माळा घातल्या जातात मंदिरातील जळता पलिता आणून तो छाचर जवळ ठेवल्यावर रेड्याने तो हुंगला म्हणजे मग देवीला बळी मान्य आहे असे समजून त्याची मान तोडण्यात येते रक्ताचा टिळा प्रथम देवीला आणि नतर मानकऱ्याला लावला जातो पवित्र रक्त म्हणून काहीजण ते आपल्या समईही ठेवतात पण रेड्याने जर तो पलिता हुंगला नाही तर त्याचा फक्त एक कान कापून, देवीला त्याचे रक्तार्पण करून नतर त्याला सोडून देतात. कारण देवीला तो बळी मान्य नाही असे मानण्यात येते चैत्र व अश्विन पौर्णिमेलाही यात्रा भरते. या देवीच्या नवसाने झालेल्या मुलाचे नाव ' बेचर ' असे ठेवतात.

इ. स. १७१४ साली अहमदाबाद येथे वल्लभभाट नावाचा ब्राह्मण रहात असे या बहुचरा देवीचा तो परमभक्त होता. त्याने देवीच्या स्तुतीपर अनेक कविता रचल्या आणि त्या सकलित करून ' बहुचरा पुराण ' या नावाने प्रसिद्ध केल्या. मात्र तो या देवीला दुर्गादेवीस्वरूपच मानीत असे.

तसेच जुनागडच्या एका सस्कृत पडिताने ' बालाचरितम् ' नावाचे सस्कृत काव्य रचले आहे या २१–२२ श्लोकाच्या काव्यात, कालरी व पाटण राजा यांचीच वरील कथा थोड्याफार फरकाने गोविलेली आहे. त्यामध्ये तो ' गुर्जर देशाचा राजा ' असा फरक करतो, आणि स्त्रीरूप मुलाचे नाव चद्रप्रभा आणि नतर देवीच्या कृपेने पौरुषत्व प्राप्त झाल्यावर त्याचे नाव चद्रहास असा कथाभाग देतो (आकाशवाणी, गीर्वाणप्रबोधिनी, दि. २५–८–६१ )

चुवाळ या मूळ पीठापासून ८ मैलावर दत्रोज या गावी बहुचरा देवीचे स्थान आहे. या ठिकाणी ती कोळी लोकांची कुलदेवता मानली जाते यानाच कोणी ' ठाकूर ' असेही म्हणतात येथे नवरात्रामध्ये रेड्याचा बळी दिला जातो कानजी राठ ( राऊत ) यावर या देवीची कृपा कशी झाली, गावच्या पाटलाचा खून करूनही तो मालक कसा बनला, याचा मनोवेधक इतिहास रासमाळेत दिला आहे, तो वाचकानी मुळातच वाचावा

जगन्नाथ कुबेरजी पड्या नावाचा नागर ब्राह्मण गुजराथमध्ये कोटपासून ६ मैलावरील नानीबोरू गावी शके १६८० साली जन्मला मोठेपणी विद्या जनासाठी या बहुचरा देवीचे ४० दिवस तप करून कडकडीत उपोषण केले

इतक्या उग्र आणि श्रद्धेने घेतलेल्या तपाला फळ आले आणि देवतेने सगुण स्वरूपात दर्शन देऊन इष्ट वर मागण्यास सांगितले. लक्ष्मी ही चंचल म्हणून तिला मागून न घेता, ब्राह्मणाने विहितधर्म जी विद्या ती मागितली. देवीने 'तथास्तु' म्हणून गुप्त झाली कोणत्याही कार्यात भगवताचे अधिष्ठान असल्याविना, मानवाच्या आकांक्षा केव्हाही पूर्णस्वरूप होत नाहीत, हे नित्य तत्त्व माहीत असल्यानेच ब्राह्मणाने देवतेचा आशीर्वाद घेतला आणि पुढे तो गाढा संस्कृत पंडित झाला.

फिरता फिरता तो पेशवे दरबारी आला असता, चतुर नाना फडणिसांनी त्याच्या शीघ्र कवित्वाची परीक्षा घेतली प्रश्न असा होता की, श्रीकृष्ण शयनावर लोळत असताना गाढव का रे कुबेर? पंडिताने लगेच संस्कृत पंक्ति रचून उत्तर दिले. त्याचा भावार्थ असा की, कोणी एक गृहस्थ पत्नीसह गंगा किनारी गेला असता, तेथे वटवृक्षाखाली, पूर्णशय्येवर एक गाढव आरामात झोपलेले पाहून तो गृहस्थ म्हणाला, वटवृक्षाचे पानावर भगवान झोपतात ही कथा प्रसिद्ध आहे, पण येथे तर गाढव लोळत आहे. पण तो लगेच पुढे खुलासा करतो, की यात आश्चर्य कसले गंगेच्या पवित्र ओघाचे नुसते दर्शन झाले असल्यामुळे गाढवाला हे भाग्य लाभले आहे (विद्याधर गोखले, कौस्तुभ १९६४)

गायकवाड सरकारने या देवस्थानच्या खर्चासाठी म्हणून बेचर, दोदीवाडा आणि सखळपूर ही तीन गावे इनाम दिलेली आहेत सन १८८० च्या सुमारास या तीन गावाचे मिळून उत्पन्न पंचवीस सहस्र रुपये होते आता तर ते अनेक पटींनी वाढलेले असेल याशिवाय मंदिरातील दैनंदिन उत्पन्न आणि यात्रेकरू रूपाने पैसा जमा होई तो निराळाच देवस्थानचा सेवकवर्गही तसाच मोठा होता मंदिराची व्यवस्था ठेवण्यासाठी व पूजेसाठी २५ कामगार, ३२ कामगार पहाऱ्यासाठी, २४ गावकामगार, इतकी माणसे असून शिवाय मोफत दवाखाना, औषधे, नागरगीचा व उत्सव यासाठी बरीच रक्कम खर्ची पडत असे.

वरील सर्व इतिहासावरून असे अनुमान काढता येईल की, बहुचरा व बाला या दोन्ही देवता एकच होत (बडोदा स्टेट गॅझेट, भाग ७, पृष्ठे ६०९-६१५)

गुजराथ प्रांती अहमदाबाद, सुरत इत्यादि शहरी भागात व ग्रामीण भागात या देवतेची अनेक मंदिरे आहेत तेथे मोठ्या भक्तिभावाने देवीची पूजाअर्चा केली जाते.

वसंततिलक

त्रीकन्यका बहुचरा नि बहुल, यूत
मार्गामध्यें अडविल्या करण्यास लूट ॥
प्राणार्पणा करिति शीलहि रक्षणातें ।
या कारणे मिळत लाभहि पूजनाते ॥ १ ॥
निर्दाळिला असुर तूं बहुतेर नामा ।
ठावे जना बहुचराजि म्हणोनि नामा ॥
कीं बालके सहज स्थापित मूर्ति तूझी ।
देवत्व देऊनि तयां करितेस राजी ॥ २ ॥
कोणी वदे हपटितां नवबाळ कंसे ।
त्याच्या करीं निसटुनि स्थळिं या विलासे ॥
नांदे चुवाळ शुभ ग्रामिंहि देवता ही ।
मीं वंदितो बहुचराजि तुझीं पदे हीं ॥ ३ ॥
अल्लाउद्दीन न धजे करण्यास घात ।
कुक्कुट वाहन तुझे पळवी समर्था ॥
योनिस्वरूप तव मूर्तिहि यंत्रधारी ।
वंदीत नित्य तुज गुर्जर-बंधु नारी ॥ ४ ॥

* * *

## ( २४ ) बिलईमाता

धामतरी ( जि. रायपूर ) हे प्राचीन क्षेत्र असून त्या ठिकाणी बिलईमाता देवीचे मंदिर आहे. एका वेड्यावाकड्या पाषाणावर देवीची मूर्ति कोरलेली आहे. त्या पाषाणावर काही अक्षरेही आहेत, पण त्याचे वाचन करणे अजूनही शक्य झालेले नाही. हा मूर्तीचा पाषाण भूगर्भातून वर आला असावा असा लोकाचा विश्वास आहे. भाविकाची अशी श्रद्धा आहे की, मानवाचा आकार जन्मानंतर जसजसा वाढत जातो, तद्वत् हा पाषाणही वाढत आहे. पाषाण वाढणे हा प्रकार भारतामध्ये काही आश्चर्याचा किंवा नवीन नाही. गणेशाचा इतिहास पाहाताना आपण पाहिले आहे की, कासरगोड येथे गणपतीची मूर्ति वाढून ती दहा फूट उंच झाली आहे. हिमालय पर्वतही वाढत असल्याबद्दल शास्त्रज्ञ सांगतात.

बिलई या शब्दाचा अर्थ मांजर असा होतो, पण देवीला बिलईमाता हे नांव का आले याचा मात्र उलगडा मिळाला नाही. या ठिकाणी पूर्वी नरबळी

अर्पण करीत असत. सध्याचे मंदिर पोवनार नावाच्या गृहस्थाने बांधलेले आहे. माघ महिन्यात या देवीची यात्रा भरते. दसऱ्याच्या दिवशी शिलंगणाची मिरवणूक या देवीपर्यंत येते. बलोदा बझार तहसीलामध्ये निल्हैगड या नावाचा एक किल्ला असून त्याच्या आसपास भैना या वन्य जमातीची वस्ती आहे.

या देवतेसंबंधीची चमत्कारकथा मोठ्या गमतीची आहे. पूर्वी भैना नामक वन्य जमातीची मुले शिकारीसाठी रानात जात, पशुपक्षी मारीत आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करीत. त्यांच्या नेहमीच्या जाण्यायेण्याच्या वाटेवरच देवीचे हे स्थान होते. एके दिवशी शिकारीला जात असताना मुलांनी देवीला नवस केला की, ‘ जर आम्हाला एक टोपलीभर पक्षी मिळाले, तर आम्ही आमच्यापैकी एकाचा बळी तुला देऊ. ’ अर्थात् हा नवस त्यांनी सहज चेष्टेने केला होता, मनापासून नव्हे.

धर्मधर्मसंयोगाने थोड्याच वेळात टोपलीभर पक्षी त्यांना मिळाले. यामागे देवाची कृपा समजा अथवा अन्य कोणतेही कारण घ्या. परत येताना देवीचे मंदिर दिसताच त्यांना आपल्या नवसाची आठवण झाली. त्यांच्यामध्ये चुळबुळ सुरू झाली ते आपापसात विचारू लागले की, ‘ बोललेल्या नवसातून आता सुटका कशी करून घ्यायची ? ’ उच्चारलेल्या प्रत्येक शब्दाची किंमत प्रत्येक माणूस ठेवत असे, हा त्या काळचा विशेष. सावकाराकडे मिशीतील एक केस गहाण ठेवला, तरी सावकार लागेल तेवढी रक्कम कर्जाऊ देत असे. या व्यवहारात केसाची किंमत नसून, माणसाच्या शब्दाची किंमत असे तो काळ आता स्याला गेला, त्यांनी बरेच डोके खाजविले, परंतु उपाय सापडेना. शेवटी एका लबाड नि धूर्त मुलाने आपल्या हजरजबाबी वृत्तीने त्यावर तोडगा काढला आणि आपली मान देवीपुढे तुकविली त्याच्या सोबत्यांना हा काय करीत आहे हेच कळेना. ते गोंधळले नि विचारात पडले त्या मुलाने एक गवताची काडी घेऊन ती तरवारी-सारखी मानेवर फिरविली. त्या लबाडाची खात्री होतीच की आपल्या कृत्याने मानेला काहीही अपाय होणार नाही आणि देवीचा नवसही पूर्ण होईल. पण झाले उलटेच ! गुरूची विद्या गुरूलाच फळली. ‘ चिंती परा ते येई घरा ’ या म्हणीचा ततोतत प्रत्यय आला. देवीने आपल्या सत्त्वाचे प्रदर्शन त्यांना दाखविलेच. त्या क्षुद्र तृणपात्याने अक्षरशः ‘ पात्या ’चे काम केले आणि त्या मुलाची मान तुटून खाली पडली. मग मात्र त्याच्या मित्रगड्यांची घाबरगुंडी उडाली आणि त्यांना आश्चर्याचा जबर धक्का बसला. सर्वांनी भक्तिभावाने देवीची प्रार्थना केली आणि ‘ त्या मुलाला क्षमा करावी ’ असे अनन्य भावाने विनविले. मुलाला जीवदान मिळविण्यासाठी एक प्रकारे आपल्या वाग्बुद्धीला अनुसरून त्यांनी देवीला साकडेच घातले.

देवीने आपला प्रभाव दाखविलाच होता मोठी ज्ञानी म्हणविणारी माणसे देखील संकटाच्या वेळी देवीला नवस करतात, पण त्याचे काम झाल्यावर मग मात्र त्यांना नवसाचा विसर पडतो येथे त्या लहान मुलाने बाल्बुद्धीला अनुसरूनच चेष्टेने बोललेला नवस फेडण्यासाठी गवताच्या काडीने का होईना, पण आपली मान कापून देवीला दिली, अशी मनाची समजून करावयाची होती व नवस फेडल्याचे समाधान मिळवावयाचे होते, ही सर्व बाब परिस्थिति लक्षात घेऊन देवीने त्या मुलाला जीवदान दिले तो मुलगा उठून उभा राहिला आणि प्रसन्न होऊन आपल्या मित्रमंडळींसमवेत आपल्या घरी गेला देवता आपला जागृतपणा अशा रीतीने केव्हा केव्हा कारणपरत्वे प्रकट करीत असतात आणि म्हणूनच भक्तांचा त्या देवतावर असलेला विश्वास नि श्रद्धा अधिक वृद्धिंगत होते

(रायपूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ २८८)

## (७५) भवानी सीता कुंड

अग्निक्षेत्रे कृष्यमाणे अश्वमेधे महात्मन ।
निधिना सुप्रयत्नेन तस्मात् सा समुत्थिता ॥

(ब्रह्मांड पुराण, १६४-७७)

देशामध्ये दुष्काळ पडला, फार जर अवर्षण झाले अगर आगामी संकटाची सुमती सूचना मिळाली, तरीही भारतामध्ये यज्ञ करण्याचा प्रघात होता अशा परिस्थितीतही अवर्षणाचे निवारण करण्यासाठी अनेकांनी यज्ञ केले, हे सर्व विदुतच आहे दिनांक २० आक्टोबर १९६२ साली भारताचा शेजारी चीन याने भारताच्या उत्तर सीमेवर आक्रमण केले त्या वेळी आक्रमकांना मागे हटविण्यासाठी अनेक ठिकाणी शक्तिदेवीची प्रार्थना करण्यात आली तसेच मन्यूसूक्त व सप्तशतीचे पाठ करून यज्ञामध्ये हवन करण्यात आले या धार्मिक विधीचा प्रधान हेतु शत्रूने केलेले आक्रमण हटविण्यासाठी दैवी पाठबळ मिळविणे हाच होता कालमानाप्रमाणे त्या विधींच्या कृतीमध्ये आणि आचारामध्ये थोडासा फरक पडलेला आहे हेही खरेच प्राचीन काळी निमीच्या राजवंशात ह्रस्वरोम नावाच्या राजाचा पुत्र सीरध्वज हा अतिशय महापराक्रमी राजा होऊन गेला ह्या वेळच्या प्रचलित चालीप्रमाणे यज्ञभूमि तयार करीत असता जमीन सुवर्णाच्या फाळाने नांगरीत असत अशी जमीन नांगरीत असता फाळाचा धक्का भूमी-कन्या सीता हिला लागून ती वर आली ते क्षेत्र म्हणजे आजचे जनकपूर होय सध्या या ठिकाणी "उर्विजा" नावाचे यज्ञकुंड दाखविले जाते त्यापूर्वीचा असाही प्रवाद आहे की, धर्मध्वज राजाची कन्या वेदवती हिने तप केल्यावर तिला

महादेव प्रसन्न झाले आणि त्यांनी तिला इच्छीत वर दिला की, भूमीवर तिने जन्म घेतल्यावर तिला विष्णुवंश असलेला पति मिळेल याशाठी वेदवतीने या ठिकाणी जन्म घेतला अशीही एक कथा आहे

वरील क्षेत्री ज्याप्रमाणे सीतादेवींचे सन्धात यज्ञकुंड उपलब्ध आहे तद्वत पांडव कालातील द्रौपदी कुंडही उपलब्ध झालेले आहे फरुखाबादपासून सुमारे २५ मैल अंतरावर असणाऱ्या कंपिल्या गावी हे आढळून आले आहे प्राचीन काळी पांचाल देशाची कंपिला ही राजधानी होती राजा द्रुपद याचा राजवाडा जरी धुळीला मिळाला असला तरी तो भाग सामंत द्रुपद कोट्या नावाने ओळखला जातो त्याच भागात हे लहानसर कुंड आहे असे म्हणतात की, अर्जुनाने खाली पाण्यात पाहून वर जो मत्स्यभेद केला, ते ठिकाण हेच होय उत्तर प्रदेश सरकार या क्षेत्राचा जीर्णोद्धार करणार असून, पांडवाची स्मृति कायम राखणार आहे (महाराष्ट्र टाईम्स, १९-९-१९६४)

प्राचीन मैथिली म्हणजेच आजचे जनकपूर होय या क्षेत्री पूर्वा सीता मंदिराचा जीर्णोद्धार शके १८३३ साली टिकमगडची महाराणी वृषभानू हिने केला आणि सुंदर मंदिर बांधले त्यालाच आज जानकी-महाल असे म्हटले जाते राम, लक्ष्मण आणि दशरथ यांचीही मंदिरे तेथे आहेत, (कल्याण क्षेत्रअंक ५६।१५१) जवळच चंद्रशेखर पर्वतमाथ्यावर सतीचा दक्षिण बाहु पडला असून, शक्तिपीठ तयार झालेले आहे याला भवानीचे स्थान असे म्हणतात या स्थानाची प्रसिद्धी अशासाठी आहे की, येथील सीताकुंडातून आणि आसपासच्या काही खडकामधून अग्निज्वाळा निघतात कदाचित् या अद्भुत चमत्कारामुळे या स्थानाला महत्त्व आलेले असावे

सीतादेवींचे चरित्र वाचताना आपण नेहमी ऐकतो की, तिला दिव्य करावे लागले तेव्हा दिव्य म्हणजे काय आणि त्याचे प्रकार कोणते हे आपण येथे पाहू स्कंदपुराणामध्ये दिव्याचे खालीलप्रमाणे प्रकार दिलेले आहेत

(कौमारिका खंड, अध्याय ४४)

(अ) शपथ —भद्रादित्य, गुरु व माता यांच्या पायावर हात ठेवून शपथ घेणे आणि खरे सांगणे शपथ घेणाऱ्याची अशी निष्ठा असते की, मिथ्या शपथ घेतल्यास, त्याचा लवकर नाश होतो

(आ) कोश —आदित्य, अग्नि, उग्र देवतांची आयुधे यांना स्नान घालून ते पाणी प्रतिपक्षी अगर एखाद्या खटल्यातील वादी प्रतिवादीला पिण्यास

घालयाचे. असे केल्यास तीन ते सात दिवसांच्या काळात गन्यागोम्याचा निर्णय मिळतो.

(इ) धट :—याचा अर्थ तागडी अगर तराजू. यज्ञीय वृक्षाचे सात हात लांबीचे दोन भाग घेऊन, ते चार हात अंतरावर जमिनीमध्ये पुरायचे. नंतर खैर किंवा शिसवीचे लांब लाकूड घेऊन, त्याच्या दोन्ही टोकांस तराजूची पारडी बांधून, ते त्या दोन खांबावर ठेवायचे. इतकी सर्व तयारी झाल्यावर संशयित आरोपीला एका पारड्यात बसवून, दुसऱ्या पारड्यात माती टाकून दोन्ही पारडी समतोल करावयाची. नंतर संशयित माणसाला पारड्यातून खाली उतरवून त्याच्या मस्तकावर एक पत्रिका ठेवावयाची. त्या पत्रिकेत लिहिलेले असते, ' हे तुले, मला दोषमुक्त कर. ' ही पत्रिका मस्तकावर ठेवल्यावर त्या इसमाला पुन्हा पारड्यात बसवायचे. या वेळी त्या संशयिताचे वजन वाढले तर तो दोषमुक्त आहे, असे समजण्यात येई.

(ई) विष :—एखाद्या माणसाची त्याच्या खरे खोटेपणाबद्दल परीक्षा घ्यावयाची असली तर ' सत्याचा जय हो ' असे शब्द उच्चारून त्याला विष पिण्यास द्यावयाचे. या विषामुळेही संशयित मूर्च्छित झाला नाही, अगर त्याचे वमन झाले नाही म्हणजे तो शुद्ध आहे असे समजावयाचे.

(उ) अग्नि :—संशयिताला काहीही खावयास न देता त्याला स्नान घालून, पूर्वाभिमुख उभे करून, त्याच्यासमोर सात मंडले तयार करावयाची. हाताला अश्वत्थाची पाने बांधून, आठ अंगुली गोल लोखंडाचा तापलेला गोळा हातात ठेवून त्याने प्रार्थना करावयाची की, ' माझे कृत्य अगर माझे मन पापी नसल्यास हे अग्निदेवा, तू शांत हो. ' तो गोळा हातात ठेवून हळूहळू ती सात मंडले फिरल्यानंतर हाताला जर कोणतीही इजा झाली नाही तर तो शुद्ध समजला जातो.

(ऊ) तप्तमाष—एका वाटोळ्या भांड्यात तेल उकळवून त्यात सुवर्णाचे उडीद टाकून ते भांडे अग्निमंत्राने संशयिताच्या डोक्यावर ठेवावयाचे. संशयिताने आपल्या हाताच्या बोटाने त्या उकळत्या तेलातून एक एक उडीदाचा दाणा बाहेर काढावयाचा. बोटाला कोणतीही इजा झाली नाही, तर तो मनुष्य शुद्ध समजला जाई.

(ए) फालदिव्य — लोखंडाचा फाळ अग्निमंत्राने तापवून तो संपूर्ण लाल झाल्यानंतर संशयिताच्या जिभेवर फिरवावयाचा आणि नंतर गायीचे शुद्ध

तूप त्यावर चोळल्यानंतर जर जिभेला कोणत्याही प्रकारची इजा झाली नाही तर तो मनुष्य शुद्ध असे समजावयाचे.

**( ऐ ) तांदूळदिव्य—** रात्रभर तांदूळ भिजवून सकाळी संशयिताला स्नान घालून तांदूळ खावयास देऊन पूर्वेकडे मुख करून उभे करावे. त्यानंतर पिंपळाच्या पानावर तांदूळ थुंकल्यावर, जर थुंकीमध्ये रक्त नसेल तर तो शुद्ध समजला जाई.

**( ओ ) अग्निदिव्य —** अग्नि पेटवून त्यावरून चालत जावयाचे. इत्यादि अनेक प्रकार आहेत.

जुलै १९६२ च्या सुरवातीस नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या गावी एका वडारीण बाईने आपले चारित्र्य शुद्ध आहे, हे दाखविण्यासाठी उकळत्या तेलातून एक सोन्याची अंगठी काढून दाखविली. तिच्या हाताला कोणत्याही प्रकारची इजा झालेली नव्हती. ही कृति अनेक जणांच्या उपस्थितीत झाली.

( केसरी, पुणे. १०–७–१९६६ ).

अग्निकाष्ठ भक्षण करून अग्नीत प्रत्यक्ष उडी मारून सीतामाईने दिव्य केले, त्या वेळी सीतामाईंनी आत उडी मारताच अग्नीच शीतल झाला. याचा अर्थ असा की, सीतामाईचे पातिव्रत्य इतके तेजस्वी होते की, ज्वलंत अग्नि तिच्या स्पर्शाने शांत झाला. याच अग्नीने हनुमानाच्या शेपटी रूपाने लंकेत हजारो घरे जाळल्याने त्याने त्याला जी अशुद्धता आलेली होती, तीही सीतामाईच्या स्पर्शाने नाहीशी झाली. पतिव्रतेचे तेज इतके जाज्वल्य की, तिच्या स्पर्शाने अग्निदेवाची अशुद्धता नाहीशी झाली. भारतीय स्त्रीचे श्रेष्ठत्व याच गुणाने प्रस्थापित होते.

चितगाव ( आसाम ) हे एक रेल्वेस्टेशन आहे. जवळच पहाडावर एक कुंड आहे. त्यातील पाणी नेहमी गरम असते. अग्नि पाण्याजवळ नेला, तर पाण्यातून वाफा इतक्या निघतात की, कुंडातील पाणी पेट घेईल की काय अशी भीति वाटू लागते. तसेच धोलपूर रेल्वेस्टेशनपासून ४० मैलावर अंगाई स्टेशन-जवळ एक सीताकुंड आहे. ते अतिशय म्हान आहे, तरी त्यातील पाणी केव्हाही आटत नाही, अशी त्याची ख्याति आहे. इतरत्र पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने या लहानशा प्रवाहातून एका लहानशा भांड्याने पाणी काढून ते घरोघर नेले जाते. ( कल्याण क्षेत्रअंक, १९५७, पृष्ठ १०६ ).

सीतेच्या नावावर एक उपनिषद आहे. त्याला सीतोपनिषद असे नाव आहे. त्यामध्ये सीतातत्त्वाचा ऊहापोह केलेला आहे. सीता ही प्रणव-शक्ति, सर्व

क्रिया-शक्ति, आदिमायेची गुण-शक्ति असून ती हरि-हरास प्रिय आहे. तिच्या भक्तीमध्ये दोन्ही विरोधी पंथ भेदाभेद करीत नाहीत.

पृथ्वी

सितोपनिषदांतरीं कथियले सिता-तत्त्व हे।
सिता प्रमुख देव-वेदमधि लोकमाई वदे॥
तुझीच गुणप्रकृती भगवती क्रियाशक्ति ही।
असे प्रणव-प्रकृती परम आद्य-शक्तीच ही॥ १॥
द्वी-लोचन सुशोभती कमल नील-पद्मासरी।
निलांबरहि धारिणी वदन चंद्रमाचे परी॥
सदा करुण वर्षिणी, हरि-हरांस ती वंदिनी।
सदा सुफल-दायिनी नमित राम-प्रीया झणीं॥ २॥

स्रग्धरा

सीताकुंडा विलोकी प्रमुखपद सदा मानिती शाक्तपंथी।
नांदे तें चित्तगांवी गिरिवर-शिखरीं रम्य उत्तुंग पंक्ती॥
अग्नीज्वाळा प्रदिप्ता सतत शिखर जे तेचि देवी स्वरूप।
पाषाणीं पृष्ठभागीं उफळुनि अणखी येत ज्वाळा अनेक॥ ३॥

* * *

## (२६) भद्रकाळी

भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम। भद्रं शुद्धात्मविज्ञानं भद्रलोकानुरूपं मंगलं च या कलयति जनयति इति भद्रकाली। दक्षस्य दुहिता भद्रकाली संभवत्। भद्रकालि नमस्तुभ्यं महाकालि नमोऽस्तु ते॥

(हठयोगीविरचित भगवत्गीता भाष्य, पृष्ठ ८७–८८ आणि अर्जुनकृत दुर्गास्तोत्र, तैतरीय अरण्यक.)

या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी एक कथा अशी की, दशमुख रावणाची माता कैकसी ही शिवलिंगाची नित्य पूजा करीत असे. तिचा पुत्र रावण यानेही उग्र तपश्चर्या करून शंकराना प्रसन्न करून घेतल्यावर त्याच्यापासून आत्मलिंगाची प्राप्ति करून घेतली, एवढ्यावरच तो संतुष्ट झाला नाही. शंकर प्रसन्न आहेत,

असे पाहून त्याने आदिमाया पार्वतीसारखी सुंदर पत्नी आपल्याला असावी अशी इच्छा प्रदर्शित केली. भोळ्याभाबड्या शंकरांनी सरळ 'पार्वतीलाच घेऊन जा' असे त्यास सांगितले. मोठ्या आनंदाने आत्मलिंग घेऊन आणि पार्वतीला आपल्या स्कंदावर बसवून रावण लंकेकडे निघाला.

शंकरांनी भोळ्याभावाने दैत्यांना वर द्यावेत आणि ते वर देवांच्या अंगावर येतले की ते सर्व झेंगट विष्णूंनी निस्तरावे ही नित्याचीच बाब होती. आदिमाया पार्वती रावणाकडे गेल्याचे संकट सर्व देवांना पडल्यावर ते विष्णूकडे गेले आणि त्यांनी सर्व वृत्तान्त त्यांना निवेदन केला पार्वतीची सुटका आता कशी करावी. त्याबद्दल विचारविनिमय सुरू झाला. शेवटी विष्णूंनी ती कामगिरी आपल्या शिरावर घेतली. भगवानांनी एका विप्राचे रूप घेतले आणि रावण लंकेच्या मार्गावर असतानाच त्याला गाठले.

या वेळी पार्वती रावणाच्या स्कंदावर होती तो विप्र रावणाजवळ येऊन त्याला म्हणाला, 'अरे ए वेड्या, स्कंदावरून तू कसले 'ध्यान' वाहून नेतो आहेस ! त्या स्वरूपाचे फक्त एक वार मुखावलोकन तरी करून पहा' रावणाला या बोलण्यातील खोंच समजली नाही कारण आपल्या खांद्यावर पार्वतीच आहे ह्याबद्दल त्याला पूर्ण खात्री होती रावण लक्ष देत नाही, असे पाहाताच विष्णूरूपी विप्राने पुनश्च वरील शब्द उच्चारले. एखादी गोष्ट कोणी पुन: पुन्हा सांगू लागला म्हणजे मनात संशय निर्माण होतो त्याप्रमाणे रावणाच्या मनातही संशय उत्पन्न झाला आणि पार्वतीला खाली उतरवून तो तिचे मुखावलोकन करू लागला तोच काय आश्चर्य ! अहो, 'रावण न्याहाळुन । पाहे तिचे वदन ॥ तव ते कुलक्षण । अत्यंत कुरूप देखिली ॥' रावणाला तर सुंदर मदनमंजिरी हवी होती. अशा कुरूप स्त्रीचा त्याला हव्यास नव्हता तात्काळ त्याने त्या कुरूप स्त्रीचा म्हणजे पार्वतीचा त्याग केला आणि तिच्याकडे ढुंकूनही न पाहाता तो लंकेची वाट चालू लागला आणि मग ! 'मग माधवें तया स्थळी । स्थापिली माता भद्रकाली ॥' अशा रीतीने गोकर्ण महाबळेश्वरी प्रथमत: भद्रकालीची स्थापना झाली. (शिवलीलामृत, अध्याय तिसरा)

### भद्रकालीची मूर्ति कशी असावी ?

रूपाने सुंदर, अठरा हात, तीन नेत्र, चार सिंह ओढत असलेल्या रथात बसलेली आणि तिचे आसन अग्निदासनरूपी असलेले, हातामधील आयुधे अनुक्रमे अक्षमाला, त्रिशूळ, खड्ग, चंद्र, बाण, धनुष्य, शंख, पद्म, स्रुक्, स्रुव, कमंडलु, दंड, शक्ति, अग्नि, कृष्णाजिन, पाणी, रत्नजडित भांडे आणि एक हात अभय (विष्णुधर्मोत्तर पुराण)

महाराष्ट्रातील नाशिक नगरीत भद्रकालीचे मंदिर आहे. प्रथम ही देवता एका जंगल क्षेत्रामध्ये होती. परंतु मुसल्मानी अमदानीत विध्वंसाच्या भयास्तव ती गावात आणली गेली. साम्प्रतचे मंदिर सन १७९० च्या सुमारास सरदार गणपतराव दीक्षित–पटवर्धन यांनी ३०,००० रुपये खर्च करून बांधले. देवीच्या खर्चासाठी वार्षिक अडीचशे रुपयाचे उत्पन्नही त्यांनी लावून दिले. या मंदिराचे वैशिष्टय असे की, याला कळस अथवा घुमटाचा भाग वगैरे काही नाही. ही साधी दोन मजल्याची इमारत आहे. या इमारतीमध्ये ७० × ८० चौ. फुटाचा सभामंडप असून समोवार स्त्रियांना बसण्यासाठी सज्जा आहे. मंदिराला कळस नसण्याचे कारण असे देतात की, बाहेरून पाहणाऱ्याला हे मंदिर आहे अशी कल्पना न यावी आणि त्यायोगाने होणारा मंदिराचा नाश टळावा.

देवीची मूर्ति वरील प्रकारच्या वर्णनाची नसून, एक फूट उंचीची आणि तांब्याची आहे. ती अष्टभुजास्वरूप असून वाघावर बसलेली आहे. या मुख्य मूर्तीच्या दोन्ही बाजूंना अडीच फूट उंचीच्या पाषाणाच्या मूर्ति आहेत या देवींना उत्सव नवरात्रामध्ये असतो.

गावावर एखाद्या संसर्गजन्य रोगाची छाया पसरली म्हणजे या देवतेचा पूर्वी ग्रामदेवतेसारखा उपयोग करीत रोगराई पसरली म्हणजे मंदिरात सप्तशतीपाठ आणि होम हवन होई. गावातून पैसा व धान्य जमवून एका बैलगाडीवर अडीच मण तांदुळाचा भात ठेवीत केळीचे चार खुंट त्या बैलगाडीला बांधून, त्यापैकी एकाला बकरी बांधून ठेवीत भातावर हळद, कुंकू, केशर वगैरे पेरून उदबत्ती लावून चार कोपऱ्यात आणि मध्यभागी एक असे पाच काकडे पेटवून ठेवीत

गावची वतनदार मंडळी, अंगात वारे येणाऱ्या मांग स्त्रीला स्नान घालून हिरवे लुगडे-चोळी नेसवून, डोक्यावर कुंकवाचा मळवट भरून, पाच केळी, नारळ, सुपारी, पाने यांनी तिची ओटी भरीत आणि ती ओटी तिच्या कमरेला घट्ट बांधून टाकीत. गाडीला चार बैल जुंपल्यावर मिरवणूक चालू होई त्या मिरवणुकीत अग्रस्थानी वाजंत्री वाजविणारे असत, त्याच्या मागे देवीचा संचार अंगात असलेली ती मांगीण आणि तिच्या मागे अन्नाची गाडी असे या वेळेचा विशेष असा की, मांगणीचे तोंड मागे गाडीकडे असे आणि ती मागच्या पावली पुढे सरकत असे. गाडी गावाबाहेर गेल्यावर ती एखाद्या चव्हाट्यावर यावे गाडीतील भात महार-मांग घेऊन जात बकरीसुद्धा तेच नेत आणि नंतर लोक आपापल्या घरी परतत ती मांगीण आणि गाडीवाला मात्र रात्रभर त्या ठिकाणी राहात आणि सकाळी परत येत. नंतर सर्वांना भोजन मिळे आणि शेवटी रोगप्रतिबंधनार्थ अथवा रोगप्रतिकारार्थ गावशीवेवर तुपाची धार सोडली जाई

या प्रमुख देवतेशिवाय नाशिक शहरी चित्रघंटा, गंगेची रेणुका, गोंधऱ्याची भगवती, टिकापूरची कालिका, महालक्ष्मी इत्यादि देवताची मदिरे आहेत (नाशिक जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५२० )

काठेवाडात द्वारका शहरी एका भद्रकाली मदिरात मूर्ति नसून, तेथे फक्त यत्राची पूजा होते तसेच द्वारकाधीशाच्या मदिरबाधणीत कळसावरील चौथ्या त्रिकोणात भद्रकाली यत्राची स्थापना केलेली आहे, पण मूर्ति नाही कारण यत्र हे मूर्तितत्त्व असून मूर्ति हे नतरचे स्वरूप आहे, अशी मानना आहे

( श्रीमत् शकराचार्य द्वारकापीठ )

आद्य शकराचार्यांनी शृंगेरी येथे शारदामूर्ति, तशी येथे भद्रकाली स्थापन केलेली आहे

वरगळ ( हैद्राबाद ) या ठिकाणी भद्रकाली देवीची एक विशाल मूर्ति आहे ती ९ फूट उच आणि ९ फूट रुद अशा विशाल आणि भव्य देहाची आहे असे भव्य स्वरूप इतरत्र क्वचितच पाहावयास मिळते देवी राक्षसाच्या शवावर चढलेली असून तिने आपला एक पाय खाली शवावर सोडलेला आहे, असे हे स्वरूप आहे एकूण परिस्थितीवरून हे महिषासुरमर्दिनीचे रूप दिसते परतु तिचे प्रचलित नाव मात्र भद्रकाली हेच आहे काकतीय राजवशाची ही कुलदेवता होती ( कल्याण क्षेत्रअक १९५७, पृष्ठ ३३८ )

पीठ निर्णयग्रथाप्रमाणे जनस्थान ( नाशिक ) येथे सतीचा चिबुक भाग पडला आणि शक्तिपीठ निर्माण झाले असे आहे परतु येथे देवीशक्ति भ्रामरी असून भैरव विकृत अथवा विकृताक्ष आहेत येथे देवीशक्ति भद्रकाली आहे हा ठळक फरक या ठिकाणी आढळतो.

वसततिलका

लकापती सतत आचरितो तपाते ।
शभू प्रसन्न दिसता मिळवी मतीतें ॥
मार्गांत विष्णु तिजला मग सोडवितो ।
त्या भद्रकालि स्वरूपा मग स्थापिजे तो ॥ १ ॥
देई विशुद्धपर ज्ञानहि भद्रकाली ।
कोणा गमे क्वचित दक्ष–सुकन्यका ही ॥
ठाके उभा रणि धनजय युद्ध घाई ।
स्तोत्रा तुझेंचि रचुनी नमितो पदेंही ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

सीता पंचवटी नि नासीक चलां, त्या पुण्यक्षेत्री महा ।
दीक्षित-पटवर्धनें बसविली ती भद्रकाली पहा ॥
आहे अष्टभुजा स्वरूप तिजला व्याघ्रावरी बैसिली ।
काली पावत नाम भद्र करितां, ती देवि मीं वंदिली ॥ ३ ॥

* * *

(२७) भ्रमरांबा

मल्लिकार्जुनसंज्ञश्चावतारः शंकरस्य वै ।
द्वितीय. श्रीगिरौ तात भक्ताभिष्टफलप्रदः ।
(शिवपुराण, ४१-४२)

पीठनिर्णयाप्रमाणे श्रीशैल पर्वतावर ग्रीवा पडली असे वर्णन मिळते. पण तुमल्या श्रीपर्वतस्थानी दक्षिण कर्ण पडला असेही वर्णन मिळते. श्रीपर्वत कृष्णा नदीच्या दक्षिणेस नळमालूर पर्वताच्या रांगेमध्ये आहे. या ठिकाणी मल्लिकार्जुन हे शिवक्षेत्र असून, देवी भ्रमरांबा ही आहे. पीठनिर्णयाप्रमाणे येथील शक्तीला सुंदरी आणि भैरवाला सुंदरानंद असे नाव आहे. ज्ञानदमंगलपाठ किंवा पीठ निर्णयपाठ कोणताही घेतला तरी हे शक्तिपीठ आहे एवढे खरे. भ्रामरी देवीचे जन्मस्थान येथे दिले आहे.

शिवपुराणाप्रमाणे येथे शिवक्षेत्र का स्थापन झाले ह्याचे कारण असे की, कार्तिकेय आणि गणेश याना पृथ्वीची प्रदक्षिणा करण्यास सांगितल्यावर गणपति प्रथमत पृथ्वीप्रदक्षिणा करून आला आणि त्याचा विवाहही होऊन गेला. कार्तिकेय नंतर आले. त्यांना गणेशा विवाहाचे वृत्त समजल्यावर ते तपश्चर्या करण्यासाठी क्रौंच पर्वतावर निघून गेले. पुत्रप्रेमामुळे कार्तिकेयाचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी शिवपार्वती दोघेही त्या ठिकाणी गेले. कार्तिकेय त्यांच्यापुढे निघून गेला आणि शैल पर्वतावर जाऊन राहिला. तेव्हा शिव-पार्वती यांनी ज्योतिर्मय स्वरूप धारण करून दोघे त्या ठिकाणी राहिली. मल्लिका म्हणजे पार्वती आणि अर्जुन म्हणजे शंकर. दोन्ही ज्योति एकत्र असल्यामुळे मल्लिकार्जुन हे नाव तयार झाले अमावास्येच्या दिवशी शंकर आणि पौर्णिमेच्या दिवशी पार्वती या क्रमाने ती दोघे या क्षेत्री वास करतात आणि त्या वेळी त्यांना त्यांचा पुत्र भेटतो, यास्तव हे ज्योतिर्लिंग प्रसिद्ध आहे.

येथील देवीला भ्रमरांबा हे नाव मिळण्याचे कारणही हेच असावे की, पार्वतीचे पौर्णिमेला या ठिकाणी भ्रमण होत असावे. या पर्वतावर एकही वृक्ष नाही असे समजते. शिवपीठाच्या मागील बाजूसच पार्वतीचे मंदिर आहे. तीच भ्रमरांबा होय. येथील मूर्तीचे वर्णन किंवा मंदिर बांधणीचा काल यांची माहिती लेखकाला मिळालेली नसल्यामुळे ती येथे देता देता आली नाही. (कल्याण क्षेत्र अंक १९५७, पृ. ३३१.)

## (२८) मुंबई शहर शक्तिपीठे

सांप्रत मुंबई हे जगातील पहिल्या प्रतीचे शहर मानले जाते. मूळ कुलाबा कोट भागातील हे शहर आता उत्तर दिशेस पंचवीस तीस मैलापर्यंत विस्तार पावले आहे. मूळची अनेक खेडी त्यात समाविष्ट झाली असून अधिक खेडी समाविष्ट करण्याची जिद्द संपलेली नाही. शहराची लोकवस्ती सन १९६१ च्या शिरगणतीनुसार चाळीस लक्षावर गेली आहे. इंग्रजांना पोर्तुगीजांनी आंदण दिलेले हे बेट गेल्या चारशे वर्षांत या भरभराटीप्रत पोहोचले आहे

शहराच्या अफाट विस्तारावरूनच वाचकांना कळून चुकेल की, या शहरी अनेक प्रभावी शक्तिपीठे असली पाहिजेत आणि वाचकांची ही कल्पना अगदी शंभर टक्के खरी आहे प्रत्येक खेड्यातून जरी एक एक शक्तिपीठ म्हटले तरी त्यांची संख्या भरपूर भरेल. खेड्याच्या मानाने शहराची लोकवस्ती सघन असल्यामुळे या भक्तिस्थानाचा उत्कर्षही चांगला झालेला आहे. अनेक धार्मिक लोकांची या भक्तिस्थानावर अपार श्रद्धा आहे. आता क्रमाक्रमाने आपण काही देवतांच्या शक्तिपीठांच्या इतिहासाचे समालोचन करू या.

### (अ) मुंबादेवी

या देवीचे मूळस्थान म्हणजे सध्याच्या बोरीबंदर रेल्वेस्टेशनचा भाग होय. साधारणत. या भागापर्यंत सागराचे पाणी भिडलेले असल्यामुळे त्या ठिकाणी कोळी लोकांची वस्ती होती. त्यामुळे हिला कोळी समाजाची प्रमुख देवता मानतात. एके काळी कोळी समाजाचे मुंबईत फार प्राबल्य होते. कारण ते आद्य वसाहतवाले होते. या देवीच्या नावासंबंधी एकवाक्यता नाही या देवीच्या उत्पत्ती संबंधाने खालील कथा प्रसिद्ध आहेत.

कथा पहिली— कोळी समाजात मुंगा नावाची एक पराक्रमी बाई होऊन गेली तिच्या स्मरणार्थ हे मंदिर स्थापन केले आहे. कालांतराने 'मुंगा' या शब्दाचा अपभ्रंश 'मुंबा' असा झाला असावा आणि या देवीच्या नावावरूनच शहराला 'मुंबई' हे नाव आले असावे.

कथा दुसरी— सिंधु संस्कृति हळूहळू पश्चिम किनाऱ्याने दक्षिणेकडे सरकली आणि त्यांच्या देवता हिंगलज आणि महामायी या पण त्यांच्याबरोबर आल्या. मह्य म्हणजे मोठी आणि मयी म्हणजे पृथ्वी असा ह्याचा मूळ अर्थ असून महामायींचा अपभ्रंश 'म्हमई' व 'मुंबई' असा झाला असण्याची शक्यता वाटते.

कथा तिसरी—पुराणांतरी एक कथा उपलब्ध आहे ती अशी. मुंबारक-दैत्याने पृथ्वीवर बराच धुमाकूळ घातला. त्याच्या वधाकारणे ब्रह्मा, विष्णु, महेशादि देवांनी एक देवी आपल्या तेजाने निर्माण केली ह्या देवीने मुंबारक दैत्याचा नाश केला. दैत्याच्या नावातील पहिली दोन अक्षरे घेऊन देवीचे नाव 'मुंबा' असे ठेवण्यात आले. तिच्याच नांवावरून या शहराला पुढे 'मुंबई' हे नाव मिळाले. या 'मुंबा आई' च्या नांवावरून नक्कीच या शहराला 'मुंबई' असे नामाभिधान प्राप्त झाले असावे.

काही संशोधकांचा असा आक्षेप आहे की, पुराणग्रंथ हे फार जुने नाहीतच. ख्रिस्ताब्द पूर्व आणि नंतरच्या ब्राह्मणकालातील कथा ह्यात पुराणरूपाने संग्रहीत झालेल्या आहेत. एक संशोधक म्हणतात की, 'आठव्या शतकात सर्व पुराणांवर संस्करण झालेले आहे.' भविष्य पुराणामध्ये तर मोंगल सम्राटांच्या कथा आहेत. असो, येथे फक्त मुंबारक दैत्याबद्दलच विवेचन करावयाचे आहे. इ. स. १३१८ च्या सुमारास यादव घराण्याकडून अल्लाउद्दीनाने देवगिरीचा किल्ला जिंकला आणि आपले राज्य स्थापन केले. कोकण प्रांताची सत्ता दृढ करण्यासाठी त्याने आपला सरदार मुबारकखान यास पाठविले. त्या वेळच्या धर्म प्रसार करण्याच्या कृतीस अनुसरून त्याने अनेक मंदिरांचा विध्वंस आरंभिला. या मुबारकखानालाच पुराणकारांनी मुंबारक दैत्य ठरविले आणि 'ब्रह्मदेवाच्या वरामुळे तो उन्मत्त झाला' अशी पुस्ती जोडली. या ठिकाणी 'दैत्य' शब्दाचा लक्ष्यार्थ इतकाच की त्या त्या वेळची दुष्ट प्रवृत्तीची माणसे होत.

सांप्रत आपण जे बोरीबंदर स्टेशन पाहातो, त्याची सुधारणा सन १८५० पासून 'आस्ते कदम' चालू झाली. ३१ ऑक्टोबर १८५० रोजी मुंबई–ठाणे रेल्वेचे काम सुरू झाले आणि १६–४–१८५३ रोजी पुरे झाले. जगन्नाथ शंकरशेट हे रेल्वेबोर्डाचे संचालक होते. त्यांनीच बहुधा ही देवता भुलेश्वर भागी नेली. कामाला सुरुवात करताना मुंबादेवीच्या मंदिराची अडचण होऊ लागली. ते मंदिर हलविणे आवश्यकच होते. कोळी समाजाच्या संमतीने ते मंदिर तेथून हलवून भुलेश्वर भागात नेण्यात आले. मंदिराच्या जागेची भरपाई म्हणून नवीन बांधकामास लागणारा बराचसा पैसा सरकारने दिला आणि मंदिर तयार झाले. कोळी समाजाने या मंदिराची व्यवस्था हाती न

घेतल्यामुळे शेवटी सरकारने ती श्री पांडुरंगशेट पांचाल या गृहस्थाकडे दिली देवीच्या मंदिरासमोर पेशवेकालीन वाड्यासारखा जो भाग दिसतो तेथे श्री. जगन्नाथ शंकरशेट ह्यांनी बालाजी मंदिर बांधलेले आहे मुंबादेवीची मूर्ति अष्टभुजा अंबादेवीची असून पार्श्वभागी पंचमुखी महादेव उभे आहेत पूर्वी जरी पांचाळ यांच्याकडे सर्व व्यवस्था होती तरी त्यांच्यामागे त्यांच्या वंशजांना ती नीट सांभाळता न आल्यामुळे आता ती गुजराथी समाजाकडे देण्यात आलेली आहे. मंदिरास लागूनच एक विस्तीर्ण तलाव होता पण सन १९५६ च्या सुमारास तो बुजवून टाकण्यात आला

## ( आ ) काळबादेवी

पूर्वी ही देवी माहिम येथे होती महिकावती या राज्याचे माहिम हे राजधानीचे शहर होते. मुसल्मानी अमल चालू झाल्यावर, या राज्यावर जेव्हा मुसलमानी आक्रमणे होऊ लागली, तेव्हा या देवीच्या सुरक्षिततेसाठी एका सरदाराने इ स १२६२ च्या सुमारास तिला या राज्यातून नेऊन पश्चिमेकडे काळबादेवी या भागात स्थापन केले, असा ऐतिहासिक उल्लेख पुढे मिळतो पुढे ब्रिटिश अमदानीत जेव्हा या शहराची नीटनेटकी मांडणी होऊन भरभराट सुरू झाली तेव्हा या देवीचे मंदिर रस्तारुंदीच्या कारणास्तव पुन्हा मागे सरकले. सांप्रत दिसत असलेले मंदिर त्यामुळे सरकारी खर्चाने बांधले गेलेले आहे. त्या वेळी या मंदिराची सर्व व्यवस्था के रघुनाथ जोशी या गृहस्थाकडे होती देवीच्या परिसरात महालक्ष्मी, काळबादेवी आणि महासरस्वती अशा तीन मूर्ति आहेत आता या मंदिराची व्यवस्था आणि पुजारीपण श्री रांडे कुलोत्पन्न घराण्याकडे आहे मुंबईतील हे एक प्रमुख शक्तिपीठ आहे. देवीच्या नावावरून काळबादेवी नावाचा शहराचा एक मोहल्लाच बनलेला आहे

## ( इ ) गावदेवी

सन १७५० च्या सुमारास श्री बाबाजी म्हात्रे या गृहस्थांना दृष्टांत झाला की, ' मी एका झाडाखाली विनवारसाची अशी पडलेली आहे. तेव्हा मला शोधून माझे मंदिर बांधावे ' दुसरे मत आहे की, एकदा एक पांथस्थ ब्राह्मण एका झाडाखाली बसला असता, वाळलेल्या पानांच्या ढिगाऱ्यांतून कोणाचा तरी कण्हण्याचा आवाज त्याच्या कानी आला त्याने पाला बाजूला केल्यावर त्याखाली त्याला देवीची मूर्ति दिसली त्याने तत्क्षणी त्याच जागी तिची स्थापना केली आणि तिचे एक लहानसे मंदिर उभारले सांप्रत दिसत असलेले मंदिर जीर्णोद्धारानंतर बांधलेले आहे. असा इतिहास मिळतो की, सन १८२१ नंतर श्री पुतळाजी बाळाजी, श्री गंगाधर भिकाजी इत्यादी प्रभु ज्ञातीच्या गृहस्थांनी

मंदिराला देणग्या देऊन आजचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे मुख्य मूर्तीच्या उजव्या बाजूला शीतळादेवीची मूर्ति आहे शीतळादेवीची मूर्ति आकाराने ओबडधोबड असून अदाजे दीड फूट उचीची आहे. गावदेवी आणि शीतळा देवींच्या मूर्तीच्या मध्यभागी गणपतीचा लहानसा तादळा आहे.

गावदेवीची मूर्ति म्हणजे एक भलामोठा तादळा असून तो अदाजे चार फूट घेराचा आणि दीड फूट उचीचा आहे. समोरील बाजूला दोन डोळे खोदलेले असून तो शेंदुराने माखलेला असतो तेव्हा मूर्ति म्हणजेच शेंदूरचर्चित मला मोठा तादळा हेच या देवीचे खरे स्वरूप आहे

या परिसरात उपमंदिरे म्हणून दत्तात्रय आणि नर्मदेश्वर महादेवाची स्थाने आहेत. समोरच पाण्याचा लहानसा जलाशय आहे. पण गैरव्यवस्थेमुळे त्यातील पाणी निरुपयोगी झालेले आहे. गावदेवी मदिराची बाधणी साधी घराच्या बाधणीसारखी असून देवालयातील सभागृह प्रशस्त आहे.

## ( २ ) दुर्गादेवी

मुंबईतील कुंभारवाडा विभागात हे देवस्थान आहे सुमारे १५० वर्षापूर्वी काशी कानड या पूजासाहित्य विकणाऱ्या ज्ञातीने हे मंदिर उभारले सन १८७५ च्या सुमारास सुप्पा मल्लप्पा या तेलगू ठेकेदाराने या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि ते आजच्या स्थितीप्रत आणले. मंदिरात कालिका, दुर्गा व शीतळा या देवताच्या प्रमुख मूर्ति असून आजूबाजूला तेलगू समाजाची वस्ती असल्यामुळे तेथे सुंधुलम्मा, मरिअम्मा, पोचम्मा इत्यादी देवताच्या मूर्तीही ठेवलेल्या आढळतात

## ( ३ ) प्रभादेवी

या देवतेची स्थापना प्रथम प्रतापबिंब याच्या कारकीर्दीमध्ये माहिम भागात दहाव्या शतकात झाली एकदा एक पाथस्थ दुपारच्या कडक उन्हाच्या तापामुळे विश्रांतीसाठी एका झाडाखाली बसला असता, वाळलेल्या पानाच्या ढिगाऱ्याखाली ही मूर्ति त्याला आढळली त्याने त्याच झाडाखाली त्या मूर्तीची स्थापना केली आणि तिचे लहानसे मदिर उभारले पुढे मुसलमानी अमदानीत मूर्ति भ्रष्ट होऊ नये अगर ती विद्रूप होऊ नये, यासाठी कोणीतरी तिला जवळच्या विहिरीमध्ये ठेवून दिले. हा काळ साधारणपणे चौदाव्या शतकातील असावा

आजपासून अदाजे साडेतीनशे वर्षापूर्वी एका प्रभु गृहस्थास दृष्टात झाला की, ' विहिरीत मूर्ति आहे. तिला वर काढून तिची मंदिरात स्थापना करावी ' आदेशाप्रमाणे मूर्ति वर काढली गेली आणि तिची लहानशा मदिरात स्थापना

झाली. त्यानंतर शके १६३७ च्या सुमारास समस्त पाठारे प्रभु ज्ञातीची मंडळी एकत्र झाली. आणि त्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार करून सांप्रत दिसत असलेले मंदिर बांधण्यात आले. वरील आशयाचा लहानसा शिलालेख या मंदिरात आहे.

मंदिराचा परिसर १००×६० चौ. फुटांचा असून गाभाऱ्याच्या वर कळस आहे. सभागृह नाही म्हटले तरी चालेल. बाकीच्या दुसऱ्या ओवऱ्यात शंकर, लक्ष्मीनारायण आणि भैरव यांच्या मूर्ति आहेत. मंदिराची व्यवस्था श्री. जयानंद कीर्तिकर विश्वस्त आणि श्री. गजानन श्रीधर जोशी, पुजारी हेच पाहातात. सतत दोन पिढ्या पुजारीपण त्यांच्याकडे आहे.

देवीची मूर्ति तीन फूट उंचीची असून, ती चतुर्भुज आहे. हातात कमळ, अक्षमाला, आणि बाकीच्या दोन हातांपैकी एक हात अभय आणि दुसरा वरद आहे मूर्ति जरी काळ्या पाषाणाची असली तरी आजवर अनेक वर्षे तेलाचा पक्का रंग दरवर्षी लावत असल्याने आता ती रंगीत झाली आहे. अनेक शेंदूर-चर्चित मूर्ति इतरत्र आहेत, पण पक्क्या रंगाची ही अशी पहिलीच मूर्ति लेखकाच्या पाहण्यात आली आहे. या देवीच्या उजव्या बाजूस चंडिका आणि डाव्या बाजूस कालिका देवीच्या मूर्ति आहेत त्याही रंगविलेल्याच आहेत

या देवीची वार्षिक यात्रा पौष पौर्णिमेला भरते आणि हाच दिवस शाकंभरी नवरात्रातील शेवटचा दिवस आहे. प्रभु ज्ञातीने मंदिर बांधले आणि व्यवस्था आपल्या हाती ठेविली म्हणून 'प्रभादेवी' हे नाव आले. पण मूळत देवीचे नाव हे नाही देवीच्या शांत स्वरूपावरून आणि यात्रेच्या दिवसा-वरून असे विधान करावयास हरकत नाही की, मूळत या देवीचे नाव शाकंभरी असावे. कारण तिचे वाघ सिंह यापैकी कोणतेच वाहन नाही आणि हातामध्ये आयुधेही नाहीत यावरून माझ्या विधानाला पुष्टीच मिळेल. हे मंदिर मध्य मुंबई भागात वरळीजवळ आहे. ज्या विहिरीमध्ये ही मूर्ति आढळली, ती देवा-ल्यासमोरील जागा आता सरकारने रस्त्यासाठी वापरात आणल्यामुळे, ती विहीर आता बुजविण्यात आली आहे

## (ङ) चारामुची

मुंबईतील परळ भागात गोलंजी टेकडी रस्त्यावर या देवीचे स्थान आहे. परळ गावचा ग्रामदेवी चंडिकादेवी आहे. तसेच शेजारी व्याघ्रेश्वरी देवीचेही प्राचीन मंदिर आहे.

व्याघ्रेश्वरी देवी म्हणजे वाघावर उभी असलेली, म्हणून तिला व्याघ्रेश्वरी हे नाव आले असावे. परन्तु मूर्तीचे निरीक्षण केले असता, ती शेंदूरचर्चित

असून तिला चार भुजा दिसतात. दोन भुजा वर दिसत असून दोन तिच्या वस्त्रनेसणीत झाकून जातात. पायाजवळ दोन रक्षकांच्या मूर्ति उभ्या आहेत. मस्तकावर मुकूट आहे. तेथील व्यवस्थापक श्री. वसंत नारायण म्हात्रे म्हणाले की, त्याच्या पूर्वजांनी देवीची स्थापना केलेली असून, त्याची स्वतःची ही आता दहावी पिढी आहे. सन १९४० च्या सुमारास एका गुजराथी धनिकाने या मंदिराचा गाभारा संगमरवरी दगडांनी सुशोभित केला असून बाहेर लहानसा सभामंडपहि बांधला, असे येथील नामफलकावरून समजते. मंदिर स्वच्छ असून मंदिराचे स्थान रम्य आहे. वाघ वाहन असलेल्या कात्यायनी देवीचेच हे स्वरूप असावे.

बारामुखी देवीचे देवालय सन १९३६ च्या सुमारास झाले असावे. या वेळी अशी गोष्ट घडली—ती टेकडी फोडून शिवडीकडे रस्ताबांधणीचे काम चालू असता, ही अवाढव्य मूर्ति तेथे आढळून आली. कर्मधर्मसंयोगाने देवीच्या शरीराला कोठेही धक्का लागलेला नसल्याने, ती शाबूत आहे. एरव्ही ती मूर्ति संग्रहालयात गेली असती. परंतु गानकऱ्यांनी मंदिर बांधून तेथेच देवीची स्थापना केली. चंडिका व बारामुखी यांची व्यवस्था परळकर घराणे पाहते.

लेखकाने मूर्तीचे बारकाईने निरीक्षण केले असता, सकृद्दर्शनी असे दिसते की, बौद्धशिल्पाच्या नर्तनाचा हा एक देखावा आहे. पाषाणाची उंची ९।१० फूट असून अंदाजे पाच फूट रुंद आहे. या मूर्तीचे साधारणतः दोन भाग पडतात. एक तीन फूटापर्यंतचा ओबडधोबड खालचा भाग आणि दुसरा घडीव शिल्पाचा वरील भाग. मध्यभागी खालपासून वरपर्यंत अशा तीन मूर्ति असून, पहिल्या मूर्तीच्या मस्तकाच्या बाजूने, डाव्या-उजव्याबाजूला दोन दोन मूर्ति कोरलेल्या आहेत. तेव्हा वरील भागात सात मूर्ति आणि खालील बाजूस उजवीकडे तीन व डावीकडे दोन मिळून पाच होतात. अशा रीतीने एकूण बारा मूर्ति होतात.

या स्त्रीमूर्ति नाहीत. ह्याचे कारण (१) मूर्तीचे वक्षःस्थळ उन्नत नाही, (२) त्याच्या अंगावर वस्त्रालंकार नाहीत, (३) कानात कर्णफुले किंवा इतर दागिने नाहीत. एखादा नर्तक ज्याप्रमाणे एखादाच सुवर्णाचा अलंकार गळ्यामध्ये घालतो किंवा हाताच्या मनगटावर बांधतो त्याप्रमाणे या मूर्तीच्या अंगावरील अलंकार आहेत. शिवाय विशेष सांगायचे म्हणजे या मूर्तीच्या हातापायांच्या हालचाली निव्वळ एखाद्या नर्तकासारख्याच आहेत. खालील बाजूस एका मूर्तीच्या हातात मोरचिंगासारखे वाद्य असून दुसऱ्या मूर्तीच्या हातात सतार आहे. तेव्हा या सर्वांचा एकवटपणे विचार जर केला तर सर्व देखावा निव्वळ

नर्तनस्वरूप आहे. देवीस्वरूप दिसत नाही. असे जरी असले तरी एक सुंदर आणि भव्य शिल्प म्हणून मूर्ति पाहण्यासारखी आहे.

## (८) महालक्ष्मी

चौदाव्या शतकाच्या प्रारंभी मुसल्मान राज्यकर्ते महाराष्ट्रात हिंदूंच्या देवळांचा विध्वंस करीत होते हे वर आलेच आहे. त्या वेळी मुंबईच्या ताडदेव भागात महालक्ष्मीची मूर्ति होती आणि आसपासची वस्ती तिची पूजक होती. मुसल्मानी आक्रमकांचा हल्ला होताच आपले उच्चाटण होणार असे तिला दिसताच, महालक्ष्मीने बाजूच्या समुद्रामध्ये उडी घेतली. तिच्या दोन्ही बहिणींनी देखील तिला साथ दिली. (या ठिकाणी असेही घडले असण्याची शक्यता आहे की, देवीच्या मूर्तींचा विध्वंस होऊ नये म्हणून कोणी भक्ताने त्यांना समुद्रतळी सुरक्षित ठेवले असावे.)

मुसल्मानी अमलाला उतरती कळा लागल्यावर मुंबई प्रांती इंग्रजांनी आपली सत्ता बळकट केली होती. सन १७२७ च्या सुमारास प्रांताधिकारी हॉर्नबी याने वरळीचा बंधारा (Love Grove Dam) बांधावयास घेतला. त्यासाठी दगडांची गरज होती. वाहतुकीचे उत्कृष्ट साधन म्हणून त्या काळी जहाजांचा उपयोग करीत. त्याप्रमाणे दगडांनी भरलेली जहाजे येऊ लागली. शेकडो माणसे काम करीत होती आणि त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी श्री. रामजी शिवजी प्रभु नावाचे स्थापत्यविशारद होते. अनेक जहाजे रिकामी झाली. पण पाण्याच्या जोरामुळे कामात अडथळे येऊन पाया घालणे अशक्य झाले. इंजिनिअरसाहेबांनी आपले सारे कसब पणाला लावले. अगदी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण उपयोग होईना. ते अतिशय चिंतातुर झाले. त्याच दिवशी रात्री त्यांना स्वप्नात देवीने दृष्टांत दिला की 'आम्हाला वर काढा, आमची स्थापना करा, म्हणजे आपले काम सुरळीत चालू होईल.' रामजी मोठे भाविक होते. देवीने दिलेल्या दृष्टांतावर त्यांचा एकदम विश्वास बसला.

त्यांनी हा वृत्तांत आपल्या वरिष्ठांना आणि हाताखालील माणसांनाही सांगितला. सर्वांची मदत घेऊन मूर्तींचा शोध करण्याचे त्यांनी ठरविले. नंतर त्या पाण्यात एक मोठे थोरले जाळे टाकले. आश्चर्याची गोष्ट अशी की, जाळ्यातून पाषाणाच्या त्या जड मूर्ति वर आल्या. नंतर सर्वांनी मिळून त्या देवतांची स्थापना केली. ह्या कथाभागातील दैवी चमत्कार असा की, त्या मूर्ति जाळ्यातून वर येताना जाळ्याचे धागे मुळीच तुटले नाहीत आणि त्या मूर्तींची स्थापना झाल्याबरोबर बंधाऱ्याचे काम विनाविघ्न सुरळीत चालू झाले. हा सर्व ईश्वराच्या लीलेचाच चालताबोलता पुरावा होय.

महालक्ष्मी मंदिराचे बांधकाम १७६१-१७७१ या दहा वर्षांत पुरे झाले असावे. एकट्या श्री. रामजी प्रभु यांनीच ८०,००० रुपये खर्च केले असे समजते. मंदिरापुढील तलाव सन १८२४ च्या सुमारास शेठ तुळशीदास गोपाळदास यांनी अंदाजे ४०,००० रुपये खर्च करून बांधला आहे. सध्या देवीच्या मंदिराची, व्यवस्था विश्वस्त मंडळातर्फे चालते. सेवानिवृत्त न्यायाधीश नारोट विश्वस्त म्हणून सर्व देखरेख उत्तम रीतीने करतात. असे समजते की, सध्या या मंदिराचे वार्षिक उत्पन्न दोन ते अडीच लक्ष रुपयांच्या वर आहे नवरात्रामध्ये या क्षेत्री फार मोठी यात्रा भरते. त्या वेळी अनेक भक्त देवीच्या दर्शनाला येत असतात आणि देवीनामाच्या जयघोषाने ते क्षेत्र दुमदुमून जाते.

('मुंबई वर्णन' एका बखरीतील उतारा, श्री चिं ग. कर्वे)

या ठिकाणी मध्यभागी महालक्ष्मी, उजवीकडे महाकाली आणि वामभागी महासरस्वती यांच्या मूर्ति आहेत. शिखराची उंची ९० फुटांच्या आसपास आहे. हे मंदिर बांधल्यानंतर काही काळाने याच परिसरातील एक श्रीमान व्यापारी धाकजी दादाजी याने ७५,००,००० रुपये खर्च करून एक शिव-मंदिर बांधले आहे आणि त्याने नाव धाकलेश्वर असे ठेवले आहे. मंदिराच्या आसपासच्या परिसरात मधुरेश्वर, रामेश्वर, हरिनारायण, विक्रमादित्य यांचीही लहान लहान मंदिरे आहेत. विश्वस्त मंडळाच्या वतीने श्री. घनश्याम आत्माराम सातवळेकर हे गेली चाळीस वर्षे मंदिराची व्यवस्था पहात आहेत.

पाहिले असता सागराची भव्य, दिव्य आणि रम्य अशी शोभा दिसते. सागरात असलेल्या दर्यावर्दी लोकांना आणि बोटींच्या प्रवाशांनाही या मंदिराचे दर्शन घडू शकते. याच कारणासाठी पूर्वी कोळी समाज या देवतेचा भक्त होता. त्या-काळी कोळी लोक प्रथम देवीला नमस्कार करूनच आपल्या होड्या दर्याच्या लाटांवर सोडीत असत. अनेक ठिकाणी दर्यावर्दी लोकांत ही रूढि आढळून येते.

अशी कथा प्रचलीत आहे की, पेशवाईच्या काळात सरदार सखारामबापू शेणवी आणि चिमणाजी अप्पा हे या देवीचे भक्त होते. चिमणाजी अप्पाने वसईच्या किल्ल्याच्या मोहिमेत या क्षेत्राचा उपयोग आपली राखीव कुमक ठेवण्यासाठी केला होता. ती मोहीम यशस्वी झाल्यावर त्यानेच या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि सखारामाच्या वंशजाकडे देवस्थानची सर्व व्यवस्थाही सोपविली. या कारणामुळेच खाजगी मंदिराची व्यवस्था श्री. बाबू देऊ शेणवी या गृहस्थाकडे आहे. देवीचे मंदिर लहानसेच आहे.

देवीची मूर्ति पाषाणाची असून वाघावर बसलेली, चतुर्भुज आणि दीड फूट उंचीची आहे. सकाळी एकदा पूजा झाल्यानंतर सर्व दिवस त्या मूर्तीवर मुखवटा घालून ठेवतात आणि तो फक्त मुखवटाच शृंगारलेला असतो. त्यामुळे मूळ मूर्तीचे दर्शन भक्तांना घडतच नाही. या मूर्तीच्या मागील बाजूस शेंदूरचर्चित भैरव व जरीमरीचे पाषाण आहेत. भैरवाच्या पाषाणाला सुपाऱ्या लावून कौल घेतला जातो. या देवीची वार्षिक यात्रा महाशिवरात्रीच्या दिवशी भरते. चतुर्भुज, व्याघ्रासन आणि हातातील आयुधे यावरून हे कात्यायनी देवीचेच स्वरूप असावे असे वाटते. वैरुटमाता या नावाची व्युत्पत्ति मिळालेली नाही. या कदाचित् देवीच्या उच्च स्थानावरून तिला कोळीसमाजाने हे नाव दिले असावे असे वाटते. मूळ मंदिराच्या बाजूला पाताळेश्वर महादेवाचे मंदिर आहे.

शिखरिणी

महालक्ष्मीचे बहु सुरस चातुर्य कथितो ।
शकाते चौदाव्या यवन करि मूर्ती विकल तो ॥
स्वकाया रक्षाया त्वरित उडि घे सागर तळीं ।
महाकाळी मोहे सरस्वति सवें साथ दिधली ॥ १ ॥

आर्या

सतराशें सत्ताविस सालीं त्या आंग्ल राजकर्त्यांनीं ।
वरळी-शीव शिवेवरी बंधारा योजिला मनीं त्यांनीं ॥ २ ॥

राशीवरती राशी, दगडांच्या ओतिल्या जहाजांनीं ।
व्यर्थ प्रयत्न परी हो, उद्दिष्टा अडविलेंचि देवींनीं ॥ ३ ॥

वसंततिलक

स्वप्नांत देवि वदते मग रामजीला ।
स्थापत्य-शास्त्र-सु-विशारद त्या प्रभूला ॥
जाळेंचि टाकुनि जलीं वरि घे अम्हांला ।
उद्दिष्ट साध्य घडते न विलंब त्याला ॥ ४ ॥

शुद्ध कामदा

जमवुनी जनां स्वप्न सांगतो । करुनि यत्नही देवि काढितो ॥
वसविति तया आजच्या स्थळा । रामजीप्रभू धन्य जाहला ॥ ५ ॥

शिखरिणी

महालक्ष्मी पूजी वणिक धनसंपन्न जनही ।
महाकाली मानी अखिल जन क्षत्रीय रणिंही ॥
अधिष्ठात्री विप्रा प्रति सरस्वती देवि वदती ।
परी सारी रूपें रचित जगदंबा स्वरूप ती ॥ ६ ॥

स्रग्धरा

मुंबादेवी कुळींची निपध जनपदां, मुंबई मध्यभागीं ।
शक्तीचें पीठ मानी अखिल जन सदा काळ्बादेविलाही ॥
दुर्गा देवीस भेटा, स्थळ विदित असे नाम कुंभारवाडा ।
वंदावी गांवदेवी आणिरही परभादेवि वैकुंठमाता ॥ ७ ॥

## (२९) महामयी

सप्तशती ग्रंथाप्रमाणे या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी की, गंगानदीच्या पश्चिम तटावर आणि सध्याच्या बंगाल–नागपूर लोहमार्गावर दिसणारा स्टेशन आहे, त्याच्या जवळपास मेधा[1] ऋषीचा आश्रम होता. स्वारोचित मन्वंतरात चैत्रवंशातील सुरथ नावाचा राजा राज्य करीत होता त्या वेळी त्याच्या दुष्ट प्रधानाने कोलाविध्वंसी राजाच्या मदतीने राजाला पदच्युत केले आणि त्याची सर्व संपत्ति हरण केली. वर्तमानकाली त्याप्रमाणे मध्य आशियात गजे अगर

१ रुद्रयामल ग्रंथाप्रमाणे मेधाऋषी म्हणजे वसिष्ठ ऋषीच होत.

पतसचीव याना पकडून अगर ठार करून सेनापति राजाचे अधिकार आपणाकडे घेत असल्याचे दृश्य प्रत्यही दिसून येते, त्याप्रमाणे त्या दुर्बल राजाला बाजूला सारून प्रधानाने आपणाकडे अधिकार घेतला होता राजा नेहमी ईश्वरचिंतनात निमग्न असल्याने प्रधानाचे डावपेच त्याच्या लक्षात आले नाहीत शेवटी प्राण रक्षणाकरिता शिकारीच्या निमित्ताने तो वनात निघून गेला आणि वनात हिंडता हिंडता मेधा ऋषींच्या आश्रमात पोहोचला एवढा राज्याधिपति राजा, पण बिचारा एका झाडाखाली आपला मुक्काम ठोकून कालक्रमणा करीत होता

काही दिवसानी समाधी नावाचा एक वैश्य त्या ठिकाणी आला हा गृहस्थ एके काळी फार धनवान होता. परतु त्याची पत्नी आणि पुत्र यानी कट रचून त्याची सर्व सपत्ति आपल्या ताब्यात घेतली होती आणि त्याला देशोधडीला लावले होते. राजा जवळ येताच समाधी राजाला म्हणाला,

विहीनश्च धनैर्दारै पुत्रैरादाय मे धनम् ।
वनमभ्यागतो दु खी निरस्तश्चाप्तबन्धुभि ॥ १–२७ ॥

'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या न्यायाने ते दोघे समदु खी असल्या-मुळे त्याची चटकन् मैत्री जमली आपल्या दु खाच्या निवारणाचा उपाय विचारण्यासाठी ते दोघेही मेधा ऋषींच्या आश्रमात आले आणि उभयतानी आपला सर्व वृत्तात त्याना निवेदन केला ऋषींनी त्याना सागितले की, 'तुम्ही जगदबेची आराधना करावी प्रसन्न झाल्यावर तीच या बाबतीत योग्य मार्गदर्शन करील.' गुरुआदेशानुसार त्यानी जवळपासची माती गोळा करून तीपासून आदिमायेची मूर्ति तयार केली आणि भक्तिभावाने तिची आराधना चालू केली शुद्धाचरण, उपोषण आणि मनोभावे भक्ति करीत असल्यामुळे त्याना लवकरच देवता प्रसन्न झाली आणि तिने त्याना इच्छित वर दिला देवीच्या कृपेने त्या दोघानाही त्याचे पूर्ववैभव प्राप्त झाले (सप्तशती मथ)

ज्या मातीच्या मूर्तीची त्यांनी आराधना केली तीच देवी पुढे महामयी या नावाने विख्यात झाली मह। म्हणजे मोठी आणि 'मयी' हा 'मही' या शब्दाचा अपभ्रश असल्यामुळे ही एक भू देवताच होय असे म्हणायास हरकत नाही ही देवता पुढे सिंधु सस्कृतीच्या लोकानी आत्मसात केली आणि मग पुढे ती त्याचीच देवता म्हणून ओळखली जाऊ लागली बलुचिस्तान भागी असलेली हिंगुळा देवी या लोकाचीच देवता होती

सिंधु सस्कृतीचा प्रसार कालांतराने खाली दक्षिणेकडे होत गेला आणि पश्चिम किनाऱ्याने या देवताही खाली सरकल्या. यामुळे कोकणप्रांती हिंगुळा

आणि महामयी देवींची मंदिरे दिसतात. महामयीचे मूळस्थान मात्र वर सांगितल्याप्रमाणे दिघवारा स्टेशनजवळच असल्याचे मानतात, तेच शक्तिपीठ होय. सध्या त्या स्थळी अंबिकेचे मंदिर आहे. त्या देवीलाच महामयी या नावाने ओळखतात. हे जरी शक्तिपीठ असले, तरी पीठनिर्णय ग्रथाप्रमाणे झालेल्या यादीमध्ये याचा समावेश झालेला दिसत नाही.

असे समजते की, मंगळूरपासून आठ मैलावर पुलिनी नदीच्या काठी पोळली गावी महामयींची सुमारे ८ फूट उचींची मृण्मय मूर्ति बसलेल्या स्वरूपात आहे. मूर्तीला अनेक भुजाही आहेत. राजा सुरथ आणि वैश्य यांची कथा याच क्षेत्री घडली असा स्थानिक लोकांचा समज असून त्याप्रमाणे यात्रिकांना या मूळ पीठाची उत्पत्ति सांगत असतात. ( श्रीमत् शंकराचार्य, द्वारकापीठ )

ओवी

सप्तशतीग्रंथीं निरुपिली । कथा सुरस राजवळी ।
समाधी वैश्यासह व्यसनकाळीं । वनांतरीं पातला ॥ १ ॥
ऋषी वचन परिसोनी । महामयी रूप आणोनि लोचनीं ।
त्या आद्यशक्तिच्या आराधनीं । उग्र तपासी बैसले ॥ २ ॥
अंबिका प्रसन्न जाहली । त्यांचीं संकटे निवारिलीं ।
प्रथीत दीघवारा स्थळीं । त्या महामयीला वंदितो ॥ ३ ॥

## (२०) मोहनीराज

प्राचीन काळी देव-दानवांनी समुद्रमथन केले असे आपण नेहमी ऐकतो आणि वाचतो. पण समुद्रमंथन करावयाला कारण काय घडले, हे मात्र आपल्यापैकी फारच थोड्या जणांना ठाऊक असते. तेव्हा आपण आता ती गोष्ट प्रथम पाहू. देवांचा राजा इंद्र हा एकदा मोठ्या थाटामाटाने आपल्या ऐरावतावर बसून राजधानीमधून फिरत चालला होता. त्याच्या मार्गामध्ये दुतर्फा त्याचे अनेक मांडलीक राजे आणि प्रजा उभी होती. ठिकठिकाणी ऐरावत थांबे आणि मांडलिक राजे व प्रजाजन राजराजेश्वराला अहेर म्हणून हिरे-माणकांचे रत्नजडित हार, महावस्त्रे अगर अमोल रत्ने अर्पण करीत होते. मोठ्या वैभवाने मिरवणूक चालली होती.

वसले धन देऊ शकणार ! परंतु या सुवर्णक्षणी महात्म्यानी दिलेले एकादे प्रतिकात्मक फूलही पृथ्वीमोलाचे असते. इतरांप्रमाणे आपणही इंद्राचा सत्कार करावा, या शुद्ध हेतूने त्यांनी एक फुलाची माळ इंद्राला अर्पण केली. पण मनुष्य श्रेष्ठ पदावर पोहोचला, की इतराकडे तुच्छतेने पाहण्याची त्याला सवयच जडते जणू ! आपल्याला सन्मानाने वागविण्याच्या भावनेकडे तो पाहातच नाही मुळी ! इंद्रदेवही ऐरावतावर बसलेला असल्यामुळे तो ह्याला अपवाद कसा ठरेल ? दुर्वास ऋषींची योग्यता माहीत असूनसुद्धा, ती माळ पाहून, असल्या ह्या क्षुद्र अहेराबद्दल त्याने वक्रोक्त भावनेने किंचित् हास्य केले. पण त्या हास्याचा परिणाम मात्र महाभयंकर झाला.

इंद्रासारख्या उच्च पदस्थ राजा उपहासात्मक दृष्टीने हसला, हे दुर्वास ऋषींच्या ध्यानात आले. त्या हसण्यामागे आपला अपमान करण्याचा अगर तुच्छता दर्शविण्याचा इंद्राचा इरादा असल्याचे त्यांना कळून चुकले. त्याचा संताप अनावर झाला. राजाने याप्रकारे मुनीजनाचा अपमान करावयास नको होता, असे त्यांना वाटले. तात्कालीन त्यांनी इंद्राला शाप दिला, ' हे मदोन्मत्त राजा, तुझी सर्व संपत्ति नाहीशी होईल. ' तानडतोब त्या शापाचा परिणाम झाला. देवाचे खजिनदार—अर्थव्यवस्थाप्रमुख मंत्री कुबेर—याजकडील सर्व धन अदृश्य झाले आणि सागराच्या तळाशी जाऊन पडले. ही बातमी समजताच इंद्राला अतिशयच दु ख झाले. पण आता त्याचा काय उपयोग ? ' अब पछताये क्या होय ? जब चिडियाँ चुग गयी खेत । ' पश्चात्तापाचा आता काहीही उपयोग होण्यासारखा नव्हता.

या किंवा इतर पौराणिक कथावरून असा निष्कर्ष निघतो की, त्या काळी देव, ऋषि आणि मानव याचे प्रत्यक्षात संबध वारंवार येत असत. त्याची बोली-भाषा होई देव मानवाच्या संकटप्रसंगी मदतीला येत. इंद्रावर स्वारी झाली, तेव्हा दशरथ राजा त्याच्या मदतीला गेला होता. ग्रीक पुराणातही असे प्रसंग आढळतात. कृत, द्वापार युगात या गोष्टी घडत. मग कलीमध्ये क्वचित् प्रसंगी घडत असतील, तर आश्चर्य वाटण्याचे वा असत्य म्हणण्याचे कारण नाही.

सर्व देव भगवान विष्णूकडे गेले आणि त्यांनी त्याना सर्व वृत्तांत कथन केला. त्यानंतर त्यांनी उपाय सांगितला की, ' देव दानवानी क्षीरसागराचे मंथन करावे म्हणजे सर्व संपत्ति पुन्हा बाहेर येईल. ' ह्याचसाठी मंदार पर्वताची रवि आणि वासुकी सर्पाची दोरी करून देवानी आणि दानवानी समुद्रमंथन केले. त्यातून चौदा रत्ने बाहेर निघाली त्या रत्नापैकीच अमृत हे एक रत्न होय.

या अमृताची देव-दानवामध्ये करावयाच्या वाटणीची कठीण कामगिरी मोहिनीरूप विष्णूंनी आपल्याकडे घेतली. अमृताची ज्या स्थानी वाटणी झाली, ते स्थान अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे हे गाव होय, असे पुराव्यावरून सिद्ध झाले आहे.

विष्णूंनी घेतलेले मोहिनीचे स्वरूप अतिशय सुंदर आणि आकर्षक होते. देव आणि दानव तिच्या मुखाकडे पाहातच बसले नि तिने जी जी गोष्ट करण्यास सांगितली ती ती गोष्ट करण्यास सिद्ध झाले. या संबंधात ज्ञानेश्वर वर्णन करतात ते बहारीचे आहे. स्त्रीसौंदर्य व स्त्री-सुख हेच सर्वांच सुख अशी दैत्यांची धारणा कशी होती यावर चांगलाचप्रकाश टाकलेला आहे.

स्त्रिया गायिले आयकावे । स्त्रीरूप डोळां देखावें ।
सर्वेंद्रियें आलिंगावें । स्त्रिये ते चि ॥
फुरवंडी कीजे अमृतें । ऐसे सुख स्त्रिये परौतें ।
नाहींच म्हणोनी चित्तें । निश्चयो केला ॥

मोहिनीने देव आणि दानवाची वेगवेगळी पंगत बसविली. कपटनीतीचा अवलंब करून ती फक्त देवानाच अमृत वाढत होती. सर्व राक्षस तिच्या अलौकिक रूपसौंदर्यावर लुब्ध झाल्यामुळे, तिच्या कपटी कृतीकडे त्यांचे लक्षच नव्हते. परंतु यापरत राहू सावध होता. त्याच्या लक्षात ही कपटनीति आली आणि हळूच कोणाच्या लक्षात येणार नाही अशा रीतीने, तो देवांच्या पंगतीत जाऊन बसला. त्यामुळे त्याला अवीट अमृताचा लाभ मिळाला.

राहूचे शीर मात्र अंतराळात कायमचे वास्तव्य करून राहिले आणि ग्रहोभोगती उपग्रह म्हणून मिरवू लागले. आपल्या वधास चंद्र कारणीभूत झाला या जाणिवेने राहू चंद्राचा द्वेष करू लागला. त्याने उभयतांचे कायमचे हाडवैर सुरू झाले. जेव्हा जेव्हा चंद्र तावडीत सापडतो तेव्हा तेव्हा राहू चंद्रावर आक्रमण करतो. त्याचा अर्धा पुरा भाग करतो. यामुळेच आपल्याला चंद्राला ग्रहण लागल्याचे दिसते. अशी ही चंद्रग्रहणाची पौराणिक उपपत्ति आहे. (पण सांप्रतच्या विज्ञानयुगात ही उपपत्ति मान्य होण्यासारखी नाही )

(कथाकल्पतरू, स्तबक ५ )

महाल्या क्षेत्राचे प्रामुख्याने तीन भाग पडतात. महाल्या क्षेत्र या ठिकाणी अमृत-वाटणी झाली. दुसरा शांडिल्य क्षेत्र या ठिकाणी प्रवरा नदीस सरस्वती गुप्तरूपाने मिळते व ती शांडिल्य ऋषींची तपोभूमी होय. तिसरा मधुमेश्वराचे देवालय. देवीभागवत ग्रंथात (स्कंद ७।३०) मोठ्या स्थळी मुकुटेश्वरी व महाल्या स्थानी महाभागादेवी, ही स्थाने याच ठिकाणी आहेत. बहुधा महाल्या देवीलाच महाभागा म्हटले असावे. प्रवरा नदीच्या काठी एक दहा-वीस पाषाणांची रास दाखवून, तेच मुकुटेश्वरी देवीचे स्थान समजले जाते. अर्थात मूळचे मंदिर उध्वस्त झाले असून, ते अवशेष आहेत. प्रवरा घाटावर संत ज्ञानेश्वर आणि स्वामी चक्रधर यांनी ज्या मोहिनीराजाचे दर्शन घेतले, ते मूळ मंदिर उध्वस्त झालेले असून, सांप्रतचे गावातील मंदिर हे नवीन आहे. परंतु असे सांगतात की, प्राचीन मंदिराची पश्चिम बाजूची भिंत उध्वस्त झाली नाही आणि त्यामध्येच शिवालय सुरक्षित राहिले. या शिवालयाजवळ घडीव दगडी कुंड मिळून आले आहे आणि दानवांनी याच कुंडात अमृत लपवून ठेवले होते अशी आख्यायिका आहे.

(प्र. न. मोहिते, जामखेड, केसरी २३।१।६४. )

शंकरानी राहूच्या कंठनाळातून ज्या ठिकाणी अमृत बाहेर काढले ते स्थान सांप्रत मधुमेश्वर मंदिराजवळ दाखविले जाते. विष्णूने राहूचा शिरच्छेद केल्यावर सुदर्शन चक्र लक्ष्मीतीर्थाजवळ पडले असल्याची जागा दाखवितात. या ठिकाणी भगवान विष्णूबरोबरच लक्ष्मीची मूर्ति आहे. 'प्रवरा महात्म्य' या ग्रंथात म्हटले आहे की, 'गंगास्नान आणि प्रवरापान' इतके या प्रवरेचे जल पुण्यकारक आहे

तेव्हा अमृत विटे जे देखोनी । तो अवतार घेतला मोहिनी ।
तेणें असुरा सुरापानी । अमृतदानी देवासीं ।। २३३ ।।

तेथ चोरूनी घेतां अमृतभासा। तेथ निवटला राहुचा घसा।
तया कदंबावरी महाळसा। वास निवास पैं केला॥ २३४॥

संत एकनाथांनी महालया मोहिनीचे केलेले वर्णन असे आहे. राहूचे डोके ज्या ठिकाणी पडले ते गाव डोके अथवा टोके म्हणून प्रसिद्ध आहे. जेथे काया पडली ते सांप्रतचे कायगाव. गोदावरी तीरावर ही गावे समोरासमोर आहेत

होळकराचे सरदार गंगाधर यशवंत चंद्रचूड यांना नेवासे गाव इनाम मिळाल्यावर आणि देवीच्या कृपेने फितुरीच्या आरोपातून मुक्तता झाल्यावर त्यांनी सांप्रतचे मंदिर बांधले. पूर्वी असा दृष्टांत झाला की, नदीकाठच्या जुन्या मंदिरातील मूर्ति गाड्यावर ठेवून, बैल यदृच्छया जिकडे जातील आणि चाक जेथे मोडेल तेथे मंदिर बांधावे, म्हणून सांप्रतचे मंदिर येथे आले. सहा वर्षे बांधकाम चालून सहा लक्ष रुपये खर्च आलेला आहे.

(पुरुषार्थ, देवता अंक, १९६२.)

वरील कृत्याची स्मृति म्हणून नेवासे येथे प्रवरा नदीच्या काठी मोहिनीराज ऊर्फ महाळसा मंदिर उभारले गेले. मुसलमानी अमलापूर्वी या मूर्ति कोट भागातील मंदिरात होत्या. या मंदिरावर औरंगजेबाचा हल्ला होणार अशी कुणकुण लागताच पुजारी-बडवे मंडळींनी देवीच्या मूर्ति प्रवरा नदीत वाळूमध्ये गाडून टाकल्या आणि त्यामुळेच त्यांची विटंबना टळली. औरंगजेबाने मंदिर उध्वस्त करून त्यावर मशीद उभारली. कालांतराने पेशवाईच्या काळात सरदार चंद्रचूडांना या देवतांनी दृष्टांत दिल्यावर, त्यांनी त्या वर काढल्या आणि सांप्रत दिसत असलेले मंदिर उभारून त्यामध्ये मूर्तींची स्थापना केली. मंदिराचे कला-कौशल्य प्रेक्षणीय आहे. उत्तराभिमुख महाद्वारातून पायऱ्या चढून वर गेल्यावर सभामंडपात प्रवेश होतो. सभागृहातील एका भिंतीवर समुद्रमंथनाचा देखावा चितारलेला आहे

गाभाऱ्यातील उंच सिंहासनावर मोहिनीराजाची उभी मूर्ति स्थापन केलेली आहे. ती वाळूच्या शीळेची असून प्रत्यक्ष विश्वकर्म्याने बनविली आहे अशी भक्तांची भावना आहे. मूर्तीची उंची सुमारे साडेचार फूट आहे. हातांमध्ये शंख, चक्र, गदा व अमृतकलश असून आपल्या उजव्या पायाचा दाब तिने राहुदैत्याच्या शरीरावर दिला आहे. ही मूर्ति अर्धनारीनटेश्वरासमान आहे. म्हणजे मुकुटाखाली कपाळावर एका बाजूला चंदन तर दुसऱ्या बाजूला कुंकू लावतात. उजवीकडील वस्त्रालंकारांत सदरा, धोतर असा थाट असतो,

तर डाव्या बाजूला केशरभार, मंगळसूत्र, कंचुकी, साडी, चोळी ही वस्त्रे असतात. कानात कर्णफुले, नाकात नथ आणि मस्तकी योनीलिंग आहे. नेवाशीला काही वेळी धोतर व काही वेळा लुगडे असते. तेथील पुजारीबाईंनी लेखकाला असे सांगितले की, मंगळ-शुक्र-रविवारी मूर्तीला कुंकवाचा मळवट भरला जातो, तर सोमवारी भोलानाथाप्रमाणे आडवे गंध, आणि बुधवारी विष्णूप्रमाणे उभे गंध लावण्याची रूढि आहे. वारकाईने निरीक्षण केल्यावर ही मूर्ति अर्धनारीनटेश्वर स्वरूपात न दिसता पण मोहिनी स्वरूपातच दिसते, असे लेखकाला वाटते

लक्ष्मीची दुसरी मूर्ति मोहिनीराज मूर्तीच्या डावीकडे निराळी आहे आणि ती बसलेल्या स्वरूपात आहे. नारद व ब्रह्मा यांच्याही मूर्ति गाभाऱ्यात आहेत सर्व मूर्ति एकाच स्थापनेच्या वेळी बसविण्यात आल्या असाव्यात.

या मूर्तीची स्थापना माघी पौर्णिमेला झाली असल्यामुळे त्या दिवशी वार्षिक यात्रा भरते. दूरदूरचे अनेक भक्त त्या वेळी एकत्र येतात. अग्निकुंडात अग्नि प्रज्वलीत करून ती कुंडे आपल्या हातात घेऊन अनेक भक्त आनंदाने नाचत असतात. पण त्यांच्या हाताला कोणत्याही प्रकारची इजा होत नाही, असा अनेकांचा अनुभव आहे.

नेवासे क्षेत्री रा त्र्यंबक रामचंद्र गडवे नावाचे वृद्ध क्षेत्रोपाध्याय भेटले असता ते म्हणाले की, प्रवरा महात्म्य हा १३ अध्यायी संस्कृत ग्रंथ आणि महाल्या महात्म्य हा १८०० श्लोकांचा ग्रंथ माझ्या संग्रही आहे, पण आर्थिक परिस्थितीमुळे त्याचे पुनर्मुद्रण मी करू शकत नाही या दोन्ही ग्रंथात क्षेत्राची सविस्तर माहिती आलेली आहे त्याचे म्हणणे असे की, नेवाश्यापासून १८ कोसावर वृद्धेश्वराचे मंदिर आहे, तेथपर्यंत देवदानवांच्या भोजनपंक्ति बसलेल्या होत्या. अमृत काढून घेतल्यानंतर राहूदैत्याचे शीर रतनगड (अकोला) या गावी पडले आणि त्याची स्मृति म्हणून त्या ठिकाणी राहूचे मंदिर उभारण्यात आले आहे. नेवाश्यापासून ते ३८ कोस दूर आहे समुद्रमथनानंतर दानवांच्या हाती अमृतकुंभ लागल्यावर ते दंडकारण्यात या ठिकाणी पळून आले, म्हणून अमृत वाटणी या गावी झाली या क्षेत्रीची यात्रा माघी पौर्णिमेपासून पाच दिवस होते आणि देव दानवांच्या पंक्तीची स्मृति म्हणून अद्यापही या क्षेत्री पाच दिवस जेवणाच्या पंक्ति रस्तोरस्ती होतात भोजनात पक्त भात, डाळवांगे आणि मेथीची भाजी हे तीन पदार्थ कालमानाप्रमाणे वाढतात आणि याचा खर्च भक्तमंडळी करतात जेवणावळीचा नवस फेडण्यास पाच सात वर्षे आधी नंबर लावावा लागतो, नाहीतर वेळी पाळी मिळत नाही इतकी गाढ श्रद्धा आजही

या ठिकाणी पाहावयास मिळते. या पाच दिवसात गाकरी अन्न शिजवीत नाहीत. या भंडाऱ्यातच प्रसाद ग्रहण करावा लागतो.

आता एका गोष्टीचा खुलासा इथे करणे अत्यावश्यक आहे. काहींच्या मते ही मूर्ति मोहिनीराजाची आहे, तर काही म्हणतात ती महालसा देवीची आहे. या क्षेत्राचे प्राचीन नाव 'निधिनिवास' असे आढळते. सर्व देवांचा निवास असलेली नगरी म्हणजे निधिनिवास अगर कुबेराच्या द्रव्यनिधीमुळे गाजत असलेली नगरी म्हणजे निधिनिवास अगर अमृतनिधीची वाटणी म्हणजे निधि-निवास या तिन्ही अर्थांनी निधिनिवास हे नाव आले असावे. येथील 'लाडमोड' टेकडीचे उत्खनन केल्यावर असे आढळून आले आहे की, ही नगरी सुमारे वीस हजार वर्षांपूर्वीची असावी. इतकी प्राचीनता या क्षेत्रास लाभलेली आहे. डॉ. सांकलिया म्हणतात की, उत्खननात येथे सापडलेले अवशेष एक लक्ष वर्षापूर्वीचे असावेत. (श्री. शंभुराव देवळे, लोकसत्ता, दि. २५-२-१९६२).

(१) 'महालसा' हे नाव ज्ञानेश्वर महाराजांच्या राजवाडेकृत व माडगावकरकृत प्रतींमध्ये आढळते. परंतु साखरेकृत पोथीत 'महाल्या' असाच पाठ आहे. यथा.

महाराष्ट्र मंडळी । श्री गोदावरीच्या कूळीं ।
तयाच्या दक्षिण ठिगीं । श्री महालया असे ॥ १८०३ ॥
तेथें महेशान्वयें संभूतें । श्री निवृत्तीनाथ सुतें ।
केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥ १८०५ ॥

(ज्ञानेश्वरी, अध्याय १८)

याचा भावार्थ असा की, यदुवंशातील रामदेवराय यादवांच्या काळी नेवासे येथील महाल्या मंदिरात ज्ञानदेवांनी गीतेवर मराठी भाषेचा साज चढविला. (साखरेकृत ज्ञानेश्वरी)

(२) महानुभाव पंथाचा प्रसिद्ध ग्रंथ 'लीळाचरित्र' यामध्ये या देवते संबंधी असलेला उल्लेख असा.

'साधे म्हाळसी पाहूं गेली । तंव तियेचें अळंकार फेडिले असे ।
मागुती गेली, तंव शृंगारू केला असे । पाटाऊ साऊला नेसली असे ।
पादाऊ चोळी फाकरें भरली असे ।
सोनयाचीं सानथडे, भवरीं या मागु नाकी मोती देखिली असे ।

(३) पंढरपूर येथील मन्मथस्वामीच्या कागदपत्रात ' श्री महाल्सा देवी ' असाच उल्लेख आढळतो. (श्री. खरे, ' चार दैवते ', पृष्ठ १११ ).

(४) ' आन्हिक सूत्रावली ', पृष्ठ १४९ वरील हा उल्लेख पहा

प्रवरातीर निवासिनी निगम प्रतिपन्ने ।
पारावार विहारिणी नारायणी नमोस्ते ॥

या ठिकाणी नारायणी म्हणजे महाल्सा असा अर्थ अभिप्रेत आहे.
(श्री श्री वा वैद्य, ' केसरी ', पुणे, दि १४ २ ६१ )

(५) ज्ञानेश्वराच्या ' भावार्थ-दीपिके 'मध्ये खालीलप्रमाणे उल्लेख मिळतो

गोदावरीचवळी निवासस्थान । जेथें जगाचे जीवनमूळ ।
श्री महाळया वसे ॥

(६) गोपाळ या कवीने श्री महाल्या देवीचे माहात्म्य रचिले आहे त्यातील उल्लेख असा

प्रवरेचिया दक्षिण तीरीं । जगदेश्वरी मूळ माया ।
सत्क्षेत्र निधिनिवास । माधव म्हणते महालया ॥
(श्री त्रि स कामत, अमृत मासिक, जून १९६१ )

यावरून असे दिसून येईल की, मूळ नाव महाल्या असून कालांतराने ते महाळसा या नावाने रूपांतरित झाले ते काहीही असले तरी मोहिनीराज म्हणजे महालसा होय, हे निश्चितपणे म्हणता येते महाल्सा देवीची उत्पत्ति या प्रकारे झाल्याचे वाचकाना समजून येईल

नेवासे येथे गावाच्या पश्चिमेस अर्ध्या मैलावर ' ज्ञानदेवखांब ' या नावाचा एक खांब आहे पूर्वीच्या पडक्या मंदिराचाच हा अवशेष असावा हा खांब उंचीला साडेचार फूट असून जमिनीत तो बराच खोल गाडला गेलेला आहे या खांबावर सात ओळींचा शिलालेख असून त्यावर इ स १२९० ही नोंद केली आहे असे मानतात की, याच खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी आपला ग्रंथ सांगितला (अहमदनगर जिल्हा गॅझेट, पृ ७२९ )

शहराच्या पश्चिम दिशेला सुमारे १ मैल अंतरावर प्रवरा काठी पूर्वी रामेश्वर मंदिर होते आणि तेथील खांबाला टेकूनच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीचे कथन केले कालांतराने ते मंदिर पडले, पण तो खांब मात्र उभा होता, त्यावर

शिलालेखही आहे. आक्रमक वृत्तीमुळे कालांतराने त्या जागेवर इस्लाम धर्मीयांनी हक्क सांगितला. त्यावर मशीद आली आणि शेवटी काही धार्मिक हिंदूंच्या प्रबळ विरोधामुळे-बोर्ड दरबार होऊन ते स्थान परत हिंदूना मिळाले. ताब्यात आल्या वर सन १९४७ साली प्रथम दहा चौरस फुटाचे साधे दगडी देवालय, कृ. मा. जोशी वकील, नेवासे, यांनी उभारले आणि सातशे वर्षे उघड्या असलेल्या त्या ज्ञानेशाच्या खांबाला आच्छादन मिळाले. नंतर स्थानिक व इतर भक्तांनी समिती बनवून तेथे मंदिर उभारण्याचे ठरविले आणि त्याच्या पायाची कोनशिला ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांच्या हस्ते २८–३–४९ रोजी बसविण्यात आली मंदिराचे काम पूर्ण झाल्यावर झाल्यावर पुन्हा त्यांच्याच हस्ते दि. ७–४–६६ रोजी मंदिरावर सुवर्ण कळस चढविण्यात आला पूर्वीचा गाभा व आच्छादन गाभारा म्हणून राखण्यात येऊन मागील बाजूस विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ति बसविलेल्या आहेत गाभाऱ्याच्या बाहेर उजवीकडे शिवलिंग आणि डावीकडे ज्ञानेश्वर मूर्ति बसविलेली आहे ७० X ७० चौ फुटाचे नवीन बांधणीचे भव्य सभागृह आहे आणि बाजूला भव्य मोकळा प्राकार राखलेला आहे या मुख्य मंदिराच्या मागील बाजूस एका इमारतीत ज्ञानेश्वर ग्रंथालय व जाली तुकाराम महाराजांचा पुतळा बसविलेला आहे. यात्रिकांच्या सोयीसाठी आठ खोल्या बांधल्या आहेत मंदिराचे शिखर सुमारे ३० फूट उंचीचे आहे. मंदिराची वास्तु व व्यवस्था पाहिली म्हणजे मन प्रसन्न होते आणि वाटू लागते की, त्या शांत शांत वातावरणात उरलेले आयुष्य व्यतीत करावे. तात्पर्य इतकेच की, ज्या ठिकाणी ज्ञानेश्वरी सांगितली गेली ते आता भव्य ज्ञानेश्वर मंदिर झाले आहे आणि ते मोहिनीराज मंदिरापासून मैलभर लांब आहे लेखक येथील सभागृहात काही वेळ बसला असता मनात असे विचार तरळून गेले की, ज्ञानेश्वर महाराज आताही त्या भाग्यशाली खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगत आहेत आणि भक्तमंडळी तल्लीन होऊन गेली आहे आणि अमृतवाणीचे सुधारसपान करीत आहेत प्रसिद्ध संत कवि यांची ही कुळस्वामिनी, तो वर्णन करतो,

त्या योग्या अयोग्या जाणितले । देव दैत्य समजावले ।
ज्या अमृत विभागिले । म्हाळसा देवी ॥

अश्वधाटी

क्षीरार्णवा दैत्य-देवादिकें मंथुनी अमृते काढिती ते पहा ।
प्राप्ति घडे, तत्क्षणीं ते घडे, अमृताच्या घडे, युद्ध घेती महा ।
हाती सुरा येत देवांचिया, गांवि नेवासिं या, तेथ ज्ञानेश्वरा ।
ज्ञानेश्वरी निर्मितो दिव्य तो, भक्तही तारितो, मंथ हा ईश्वरा ॥ १ ॥

मालिनी

समजति जरि कोणी मोहिनीराजरूप ।
उचित वदति ज्ञानी म्हाळसेचे स्वरूप ॥
नयन रुचिर मूर्ति, उंच पांचा फुटीला ।
करि धरित गदेला, शंख चक्रादिकाला ॥ २ ॥
जनमदिवस येतो, माघिच्या पौर्णिमेला ।
जनगण समुदाये येतसे उत्सवाला ॥
करि धरुनि प्रदीप्त, अग्निकुंडासि भक्त ।
थय थय थय नाचे, वंदितो देवि रूप ॥ ३ ॥

(२१) महाळसा

या देवीची उत्पत्ति कोणत्या प्रसंगी झाली हे आपण वर मोहिनीराजाच्या वृत्तात वाचत असताना पाहिले आहे. गोवे प्रांती म्हाडदोळ या गावी, म्हाळसा देवीचे एक प्रमुख पीठ आहे. मूर्ति काळ्या पाषाणाची असून आता ती बरीच जीर्ण झालेली दिसते. म्हणजेच तिची घडण वा उत्पत्ति फार प्राचीन असावी. अवयवांच्या झीजेमुळे पूर्ण स्वरूप ओळखणे कठीण जाते. म्हारदोळ येथे मूळ मूर्ति हलविल्यावर सन १५६७ साली कॅप्टन रुद्रिगिस याने फोडून तिचे तुकडे केले साम्प्रतची मूर्ति नवीन बसविलेली दिसते. तरी पण तीही आता जीर्ण झाली आहे. सन १९४० च्या सुमारास प्रस्तुत ग्रंथाचा लेखक या मंदिराच्या परिसरात तीन दिवस वास्तव्य करून होता. त्या वेळी आसपासची मंदिरेही त्याने पाहिलेली आहेत. लेखकाची ही कुलदेवता असल्याने विशेष कुतुहलाने त्याने सर्व निरीक्षण केले आहे.

गंडकी शिळेची देवीची मूर्ति चतुर्भुज असून तिच्या पायाखाली राक्षसाचे शव आहे. हातामध्ये त्रिशूल, घंटा, खड्ग ही आयुधे आहेत. एका डाव्या हाती तिने असुराचे मुंडके धरले असून, त्याच्या नुकत्याच तुटलेल्या मानेतून

रुपात होत आहे नाजूला असलेली एक श्वानसम दिसणारी आकृति ते रक्तबिंदु चाटीत आहे तिच्या मस्तकावर मुकूट विराजमान आहे मंदिर जुने असून, त्याची बांधणी सुमारे दीड दोनशे वर्षांपूर्वीची दिसते मंदिराच्या परिसरात भक्तासाठी राहण्याची सोय केलेली आहे

असे सांगितले जाते की, आठव्या शतकात श्री म्हाळ पै नावाचे ऋग्वेदी अश्वलायन शाखेच्या कौशिक गोत्री, गौड सारस्वत ब्राह्मणाने वेरणे गावी प्रथम या देवतेची स्थापना केली देवीच्या कृपेमुळेच त्या ब्राह्मणाचा पुढे ऊर्जितकाळ आला आणि तो राष्ट्रकूटवंशीय राजा ध्रुव याच्या सैन्यात सेनापती पदापर्यंत आरूढ झाला यामुळेच खर्चासाठी कायम उत्पन्नाची व्यवस्था तो करू शकला नवव्या शतकात कदंब राजवंशाने या देवीला, म्हाळ पै प्रमाणे आपली कुलस्वामिनी मानली आणि शके ११८८ साली, देवालयाच्या परिसरात 'विष्णुयाग' केला असा पुरावा उपलब्ध आहे त्यानंतर शिलाहार, यादव, यांनीही या देवतेच्या प्रसादाने अनेक पराक्रम केले, असे शिलालेखावरून आढळते म्हाळ पै (चवथा) व त्याचा पुत्र विठ्ठल पै यांना या देवतेच्या रक्षणासाठी पोर्तुगीज सत्तेबरोबर अपूर्व संघर्ष केला म्हणून गाभाऱ्यात त्याच्या स्मारक मूर्ति बसविण्यात आल्या आहेत

पण पुढे १६ व्या शतकात फिरंग्याच्या धर्मछळामुळे, इतर अनेक देवतांबरोबर या देवीचेही स्थलांतर वेरणे येथून मराठी सत्तेखाली असलेल्या म्हारदोळ या गावी करण्यात आले, आणि सांप्रतही ते तेथेच स्थिर आहे

(व्यंकटेश पै, पुरुषार्थ देवता अंक, १९६१)

राहू दैत्याच्या कंठनाळातून शंकरानी अमृत काढून घेतल्यावर त्याचे धड प्रवरा-गोदावरी संगमावर पडले आणि मोहिनी त्यावर पाय देऊन बसली, असे दृश्य नेवासे येथील मंदिरात दिसते परंतु म्हारदोळी ते स्वरूप नसून दुसरेच आहे सह्याद्रिखंड, ७।५१७ यातील वर्णन असे,

त्याप्रमाणे दर्शविल्या जागेवर ( वेरणे गावी ) खोदले असता मूर्ति सापडली आणि मंदिर उभारले गेले ( गौ. सा. ब्रा. कुलदेवता, पृ. ५८ ).

पेशवाईतील एक मुत्सद्दी रामचंद्रबाबा सुखठणकर याने पेशवे सरकारातून हा म्हाडदोडवाडा श्रीस मोकासा ( इनाम ) देवविला आहे. श्रीचे मंदिर भव्य आहे व सुडास ताम्रपट्टा बसविलेला आहे. बाजूला भव्य धर्मशाळा असून परिसरात अनेक परिवार-देवता आहेत. त्यामध्ये श्रीसंकष्टी, चौसष्ट योगिनी, कालभैरव, सहस्रपाल इ० आहेत. ही देवता श्रीविष्णूचाच अवतार असल्याने रामजन्मोत्सव, अक्षय्य तृतीया, वसंतोत्सव, इ० उत्सव, देवीच्या अनेक उत्सवांबरोबरच साजरे केले जातात. माघ महिन्यात मोठी यात्रा भरते व शिबिकोत्सव, लालकोत्सव समयी पालखीच्या मिरवणुकीच्या वेळी सेवेकरी कलावंतिणींना ताफा नाचत असल्याचे लेखकाने पाहिलेले आहे. देवीचे वार्षिक उत्पन्न सुमारे पंचवीस हजार रुपयाचे आहे.

कऱ्हाडे ब्राह्मणाच्या अनेक घराण्यांची ही कुलदेवता आहे, तशी लेखकाचीही आहे. सांखळी येथील श्री. नारायण श्रीनिवास बाक्रे नावाच्या एका पुजाऱ्याने ' महाळसा पंचरत्न ' या नावाची एक पोथी तयार केली आहे. त्यामध्ये या देवीचे श्लोक, स्तवन, सहस्रनाम आणि अष्टक व काही स्तोत्रे दिलेली आहेत. अनेक भक्त येथे येऊन कुलदेवतेचे दर्शन घेऊन आपले नवस फेडून परत जातात. आसपासच्या भागात रम्य वनश्री असल्यामुळे हे स्थळ प्रेक्षणीय झाले आहे. पैठण. नादुरा, देवी होसूर इत्यादि क्षेत्री या देवीची मंदिरे आहेत.

कामदा

महाळसे तुझ्या जन्मिची कथा । वर्णिली पुराणांतरीं तथा ।
देव-दानवे रत्न सागरा । काढि मंथुनी दिव्य अमृता ॥ १ ॥
विष्णु मोहिनीरूप घेतसा । देव-दानवां वाढितो रसा ।
विश्वमोहिनी रूपसुंदरी । शत्रु-मित्रही भाळले तरी ॥ २ ॥
कलहाविना तो विभागतां । असुरां सुरा, देव अमृता ।
तीच मोहिनी आज या जगीं । देवि महाळसा नाम पावली ॥ ३ ॥

अनुष्टुभ

महाळसे महादेवी । कसा मीं विसरूं तुला ।
कुलस्वामिनी तूंतें । मत्कुळीं मानिती सदा ॥ ४ ॥

गोमांतकीं रम्य प्रांतीं । महाडदोळ जे स्थळ ।
निवाडिसी त्या क्षेत्रातें । उभयाया वास्तु सुंदर ॥ ५ ॥
विस्तार भव्य विस्तिर्ण । जीर्ण मूर्ती सभोवती ।
चतुर्हस्ता करीं घेई । त्रिशूळ, घट, खड्ग ती ॥ ६ ॥
पदातळीं तुझ्या देखू । असुर-शव भेसूर ।
वामहस्तीं तुझ्या शोभे । दैत्य चंडासुर शिर ॥ ७ ॥
आश्रित श्वान घोटाळे । रक्त बिंदु टिपावया ।
ऐसे हे रूप देवीचें । भक्त येती भजावया ॥ ८ ॥
रामनौमी नवरात्री । शिवरात्री जनोत्सव ।
प्रसिद्ध उत्सवा जाणें । वंदोनी करि मीं स्तव ॥ ९ ॥

## (३२) महालक्ष्मी ( डहाणू )

डहाणू ( जि. ठाणे ) जवळ १८ मैलावर निवळवेडे नावाचे गाव आहे त्या ठिकाणी हे स्थान आहे. रहदारीचा मोठा राजमार्ग असल्याने रहदारी वाहने येथे मंदिराजवळ थांबतात. मूळपीठ डोंगरावर असून त्याची उंची अदाजे १४०० फूट आहे. वर चढून जाण्यास पायवाटेचा मार्ग पण कठीण आहे. या ठिकाणी देवीचा लहानसर तादळा असून पाण्याचे टाकेही आहे आणि वरील भागी सुळक्याप्रमाणे दिसणारे शिखर आहे. नीट निरीक्षण केले तर हा सुळका दक्षिणेतील देवालयाप्रमाणे गोपुराच्या कंगोऱ्याप्रमाणे दिसतो केवळ सुळका ५० ६० फूट उंच असावा. सहासात तरी कंगोरे दिसण्यात येतात. चैत्र पौर्णिमेच्या रात्री ह्याच शिखरावर निशाण लावण्याचा प्रमुख कार्यक्रम होतो.

पण या वरील अवघड जागी सहसा कोणी जात नाहीत. या शिखराच्या पायथ्याला साप्रतच्या मुख्य देवीचे मंदिर आहे. सुमारे २००–२५० वर्षांपूर्वी कोणीतरी याची स्थापना केली आणि आता जीर्णोद्धार होऊन ते चांगल्या स्थितीत दिसते. आजूबाजूला दोनतीन मोठ्या धर्मशाळा आहेत. पण यात्रेच्या दिवसाव्यतिरिक्त त्या बहुधा मोकळ्या असतात. या मंदिराचा गाभारा पश्चिमाभिमुखी आहे, म्हणजेच मुख्य टेकडीवरील मंदिराकडे मुख आहे. सभामंडप, पगुड, दीपमाळा वगैरे सर्व काही आहे.

गाभाऱ्यात मूर्ति गाभाऱ्यात जाऊन जवळून निरखिता आम्ही देवीचा फक्त मुखवटा दर्शनी आहे. तो सुमारे दोन फूट उंचीचा लांबट चेहऱ्याचा असून शेंदूरचर्चित आहे. अगचे नेत्र आणि कान आहेत. मस्तकावर चांदीचा मुकुट

आणि कुंडले शोभेसाठी ठेवतात. मागील बाजूस पाषाण भव्य आहे. सुमारे तीन फूट उंचीचा व तितक्या रुंदीचा ओबडधोबड आहे. याच पाषाणाला दर्शनी मुखवटा कोरून काढलेला आहे. मुखवट्याशिवाय मागील पाषाणाचा भाग वस्त्रांनी झाकलेला असतो, पण पुजाऱ्याचे परवानगीने वस्त्र बाजूला करून तो पाहता येतो. या मुखवट्यासमोर चांदीचे सिंह व जय-विजय मूर्ति मांडलेल्या असतात, पण मुख्य मूर्तीबरोबर त्याचा संबंध नाही. देवीचे छायाचित्रात मात्र ते सर्व मूळचेच दिसते.

या मंदिरापासून टेकडीवरील ठिकाण सुमारे तीन मैल लांब असावे. पौर्णिमेच्या रात्री १२ वाजता पुजारी या मंदिरापासून निशाण घेऊन एकटा निघतो, वरच्या मंदिरात धार्मिक विधि करतो आणि नंतर शिखरावर निशाण रोवतो. हा सर्व विधि होण्यास सुमारे तीन तास लागतात. वरचा मार्ग बिकट असल्याने दिवसाही तिकडे सहसा कोणी जात नाही आणि याच कारणास्तव रात्री एकट्याने जाऊन निशाण लावणे हा दैवी चमत्कार समजला जातो.

मूळस्थान टेकडीवर असताना, पायथ्याजवळ मंदिर का? अशी चौकशी करता एका भक्ताने असे सांगितले, की, पूर्वी एक आदिवासी गरोदर स्त्री वार्षिक यात्रेच्या वेळी नियमाप्रमाणे वर दर्शनाला जात असता पोटात कळा आल्या आणि पुढे जाणे अशक्य झाले. देवीचे दर्शन चुकणार म्हणून तिने मातेचीच प्रार्थना केली, त्या वेळी दृष्टान्ताने देवीने तिला सांगितले की, पायथ्या-पाशी मी आहे. तेथे दर्शनास ये. श्रमाने श्रांत झालेली असताना तिला हा दृष्टान्त झाला. गडबडून ती शुद्धीवर आली आणि पायथ्याजवळ येताच तिला वरील मूर्तीप्रमाणे तेथे दर्शन झाले. पुढे या ठिकाणी मंदिर उभारले गेले.

वरील प्रकारावरून एक सर्वसाधारण नियम ध्यानी येतो तो असा की, वणी येथील सप्तशृंगी, औंध येथील यमाई, मांढरची यमाई, पुण्याची चतुःशृंगी, यांचा इतिहास पाहिला तर तोही वरीलप्रमाणेच आहे. मूळ स्थाने ज्या ठिकाणी जरी उंच डोंगरावर असून चढण्यास कठीण आहेत त्या ठिकाणी पायथ्या जवळ, त्याच देवीची मंदिरे आढळतात. त्यांच्या स्थापनेचा, इतिहास वरील प्रकारच्या अथवा सदृश कारणाने सजलेला आहे. तेव्हा या सर्वांचा भावार्थ असा समजतो की, मूळस्थानापर्यंत सर्वच भक्तांना पोहोचणे अशक्य होते, त्या वेळी कोणी भक्त, सर्वांच्या सोयीसाठी, सहजपणे दर्शन व्हावे या हेतूने पायथ्याजवळ मंदिर उभारतो आणि त्याला भक्तिभावाचा साज चढवितो यामध्ये मंदिर स्थापन करणाराचा कोणताही स्वार्थ नसल्याने त्याला दोषी म्हणता येणार नाही. किंबहुना त्याचा हेतु उच्चच असतो. पण 'भक्तासाठी मी खाली

येते, अमुक ठिकाणी येते ' या सूत्राचा उपयोग अनेक मंदिराबाबत अनुभवास येतो हे मात्र खरे आहे, म्हणून थोडेसे विवरण या ठिकाणी केले आहे

हे स्थान फार जागृत मानले जाते आसपासच्या वन्य जमाती आणि वारली, दुबळी इ० जाती या देवतेच्या उपासक आहेत देवीची यात्रा चैत्र पौर्णिमेला भरते या वेळी दूरदूरच्या हिंदुभक्तांप्रमाणे गुजराथी, पारशी व मुसलमान भक्तही तेथे येतात आणि देवीला पूजाभोग अर्पण करतात डहाणू रेल्वेस्टेशनपासून देवीच्या मंदिरापर्यंत मोटार-वसने जाता येते

सप्तशृंगी पीठाप्रमाणे या ठिकाणीही शिखरावर निशाण रोवणे हे एक दिव्य समजले जाते देवीचा पुजारी अगर गावचा पाटील या उभयतांपैकी ज्याला देवीची अनुज्ञा असेल तोच हे निशाण लावू शकतो इतर कोणीही हे काम करण्यास धजत नाहीत पौर्णिमेच्या यात्रेच्या दिवशी, शुभ्र चांदण्यामध्ये हा ध्वज लावण्याचा कार्यक्रम हजारो भक्तांच्या उपस्थितीत केला जातो सन १८७२ साली अशी गोष्ट घडली की, मन्या पाटील निशाण लावण्यास शिखरा वर चढला आणि त्याचा तोल सुटून तो खाली पडून तत्काळ गतप्राण झाला त्यानंतर तीन वर्षांचा काळ लागला, पण देवीची आज्ञा नसल्याने दुसऱ्या कोणी निशाण चढविले नाही त्यानंतर मन्या पाटलाचा पुतण्या याच-- कृष्णा त्याचं नाव-- ध्वज लावण्याची आज्ञा झाली आणि तो ध्वज लावू लागला त्याच्या अंगात देवीचे वारे येत असे ठाणे भागातील हे एक प्रभावी शक्तिपीठ मानले जाते (ठाणे जिल्हा गॅझेट, पृष्ठ २१९)

## (२३) महालक्ष्मी (कोल्हापूर)

क्षेत्रं वै करवीराख्यं क्षेत्रं लक्ष्मीविनिर्मितम् ।
तत्क्षेत्रं हि महत्पुण्यं दर्शनात् पापनाशनम् ॥
(स्कंद पुराण, सह्याद्रि खंड २, २४ २७)

महालक्ष्मीच्या उत्पत्तीची कथा आता आपण प्रथमत पाहू गरुडाचल या नावाचा एक ब्राह्मण होता तो भृगुकुलोत्पन्न असून त्याला माधवी या नावाची कन्या होती एकदा तो तिच्याकरिता वरशोधनार्थ हिंडत असता सहजगत्या विष्णूच्या राजप्रासादात आला विष्णूनी त्याचे यथोचित स्वागत केले आणि त्यास बसावयास आसन दिले तो ब्राह्मण विष्णूला त्या मुलीबद्दलची सर्व हकीगत सांगत असता ती मुलगी तेवढ्यात बाल्यस्वभावाला अनुसरून आणि शिष्टाचाराच्या सर्व मर्यादा बाजूला ठेवून विष्णूच्या शेजारी पलंगावर जाऊन बसली विष्णुपत्नी तेथे होतीच तिला या पाहुण्या मुलीचे हे वर्तन सहन झाले नाही त्या वेळी

मत्सरापोटी आलेल्या क्रोधाच्या भरात त्या मुलीच्या बालवयाकडे आणि त्या वेळच्या परिस्थितीकडे लक्ष न देता लक्ष्मीने तिला शाप दिला की, ' तू अश्वमुखी होशील. '

गरुडाचलाला लक्ष्मीची ही वर्तणूक रुचली नाही. उच्चपदस्थ व्यक्तीने क्रोधावश होऊन गरिबाची अशी छळणूक करणे योग्य नव्हे असे त्याला वाटले. या ठिकाणी अपराध करणारी एक लहान, अजाण आणि निष्पाप बालिका होती आणि बालाची वागणूक निर्हेतुक असल्याने ती नेहमीच क्षम्य असते. कोणतेही कारण नसताना त्या मुलीला शाप दिला असल्याने त्याला साहजिकच राग आला आणि त्याने उलट शाप दिला की, ' तू हत्तीण होशील. ' त्या शापाचा त्वरित परिणाम होऊन लक्ष्मी हत्तीणीच्या स्वरूपात भूतलावर अवतरली. त्याच स्वरूपात ती गरुडेश्वर तीर्थाच्या ठिकाणी गेली आणि पापक्षालनार्थ तपश्चर्या करू लागली. देहानी शुद्धि झाल्यानंतर तिला महादेव प्रसन्न झाले आणि त्यांनी तिला शापमुक्त केले. त्यानंतर लक्ष्मीचे नाव महालक्ष्मी असे त्याने ठेवले.

एकदा इंद्र व महिषासुर यांचे युद्ध एक शतकापर्यंत चालले होते. शेवटी महिषासुर इंद्रपद बळकावून बसला. आपली ही दुर्दशा शंकराना सांगितल्यावर ते क्रोधाने थरथर कापू लागले. त्या वेळी त्यांच्या नेत्रामधून अतिदिव्य तेज बाहेर पडून त्याने देहरूप धारण केले. ती एक अतिरूपवान मदनमंजिरी बनली. सर्व देवांनी आपापली शस्त्रे तिच्या हातात अर्पण केली. यानंतर देवीने एक अति निकट असे हास्य केले. त्या हास्याच्या आवाजाने दशदिशा दुमदुमल्या, पृथ्वी कंपायमान झाली आणि पर्वतही थरथरले. ही भयंकर गर्जना म्हणजे आपल्याला दिलेले आव्हानच समजून महिषासुर सुसज्ज होऊन त्या देवतेबरोबर दोन हात करण्यासाठी समरांगणात उतरला. त्या वेळी त्या देवतेने महिषासुर आणि इतर उरल्यासुरल्या दैत्यानाही ठार केले. ही जी देवता या ठिकाणी उत्पन्न झाली, तिचे नाव महालक्ष्मी असे ठेवले गेले.

सप्तशृंगी देवीलाही अठराच भुजा आहेत. तेव्हा या एका साम्यावरून ती सुद्धा महालक्ष्मीचेच स्वरूप असावे की काय अशी शंका येते कारण सप्तशृंगी हे नाव भौगोलिक स्थानपरत्वे आलेले आहे, उत्पत्तीपरत्वे नव्हे. दोन्ही देवींची आयुधे प्रायः तीच आहेत.

येथे हे लक्षात ठेवावयास पाहिजे की, लक्ष्मीच्या हत्तीण स्वरूपाचे नाव गजान्तलक्ष्मी आहे, महालक्ष्मी नव्हे. ही दोन्ही स्वरूपे वेगवेगळी आहेत

एके ठिकाणी रैरभ दैत्याच्या नाशाकरिता महालक्ष्मीचा अवतार झाला असा उल्लेख आढळतो. (स्कंद पुराण, नागर, ८५)

करवीर महात्म्य, देवी भागवत, मत्स्यपुराण, पद्म पुराण, ब्रह्मांड पुराण आदि ग्रंथात या क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रातील काही प्रमुख शक्तिपीठांपैकी हे एक मानले जाते पुराणकारांच्या माहितीप्रमाणे, या प्रांती पूर्वी कोल व चोल या वन्य जमातींची वस्ती होती कोल म्हणजे कोळी समाज असे समजण्यास हरकत नाही. त्यांच्या वस्तींना कोलागड, कोळवण, कोलाचार, कोलापूर अशी नावे होती. त्यापैकी कोलापूर या वस्तीचे पुढे अपभ्रंशाने कोल्हापूर या नावात रूपांतर झाले कानडी भाषेत 'कोल्हू' म्हणजे कमळ होय या शहरी पूर्वी अनेक तळी होती. त्यापैकी काही आजही दिसतात त्यामध्ये उमलणाऱ्या असंख्य कमळांमुळे कमळांचे आगर असा जो भाग तो कोल्हापूर या नावाने प्रसिद्ध झाला असावा, असे काहींचे मत आहे. तिसरी एक व्युत्पत्ति अशी की,

हरिवंशामध्ये यदुवंशीय वृद्ध चित्रक असे सांगतो की, हर्यश्वाचा मुलगा यदु हा एकदा जलक्रीडा करीत असता नागलोकीच्या धूम्रवर्ण राजाने त्याला पाताळात नेले आणि स्वागत करून आपल्या कन्या विवाहात दिल्या. राजाने या गोष्टीस संमती दिली कारण कन्यांचे पुत्र राजपुत्र होणार होते. पुढे त्याला पाच पुत्र झाले आणि वयात आल्यावर त्यांना विंध्यपर्वताच्या दक्षिणेकडे मानवांची वसाहत करण्यासाठी पाठविण्यात आले. त्याप्रमाणे मुचकुंदाने नर्मदाकाठी माहिष्मती नगरी वसविली, हरिताने समुद्रकिनारा रक्षणाचे काम घेतले, सारसाने क्रौंचपुरी वसविली आणि पद्मवर्णाने वारणा नदीकाठी करवीर नगर वसविले याच कारणासाठी या भागाला पद्मावत हे नाव पडले असावे पुढे श्रीकृष्ण आणि बलराम जरासंधाच्या भयाने या भागात येऊन गोमांतक पर्वतावर गनिमी काव्याने त्याला जेरीस आणले आणि त्या वेळी त्यांना परशुरामाने करवीर नगरीत मार्गदर्शन केले, असे पुराणे सांगतात

ब्रह्मदेवाचा मानसपुत्र कोल्हासुर व त्याचा पुत्र करवीर यानी देवाचा सूड घेण्यासाठी या शहरातील मंदिराचा विध्वंस केला आणि लोकांचा छळ केला. शेवटी देवाच्या विनंतीवरून शंकरानी करवीराला ठार केले आणि त्याच्या स्मरणार्थ शहराचे नाव करवीर असे ठेवले.

आपल्या पुत्राचा वध झाला हे अर्थातच बापाला आवडले नाही आणि हे सर्व महालक्ष्मी देवीमुळे झाले, अशा समजुतीने त्याने देवीला प्रसन्न करून घेऊन तिने १०० वर्षेपर्यंत आपले स्थान सोडावे असा वर मागून घेतला देवता नष्ट झाल्यावर कोल्हासुराने शहर लुटले आणि मंदिरे पाडली देवानी विष्णु-ब्रह्मदेवाकडे तक्रार नोंदविली, पण देवीच्या वचनबद्धपणामुळे त्याना काहीही करता येईना शेवटी मुदत संपण्याच्या सुमारास देवीने स्वत रुद्रभैरव, काळवेताळ, सिद्धबटुकेश्वर इ० बरोबर घेतले आणि अठरा आयुधानी सज्ज होऊन कोल्हासुरावर स्वारी केली घनघोर युद्धानंतर देवीने कोल्हासुराला ठार मारले आणि त्याच्या अंतिम इच्छेप्रमाणे करवीर शहराचे नाव कोल्हासुर = कोल्हापूर असे ठेवले. (Temples & Legends of Maharashtra by M S Mate )

पीठजादेवीची कथा पाहिली तर कोल्हासुराच्या पूर्वीही येथे महालक्ष्मीचे मंदिर होते आणि शूद्रकाने येथे येऊन देवीची उपासना केलेली आहे. मुख्य मुद्दा इतकाच की, हे क्षेत्र अतिशय प्राचीन आहे काहींच्या मते ते इसवी सनापूर्वी तीन सहस्र वर्षांइतके जुने आहे

वशिष्ठपुत्र विलीपायकुर या नावाचा राजा येथे होऊन गेला त्यानंतरचा अधिकृत इतिहास म्हणजे चालुक्य घराणे, शिलाहार घराणे व यादव घराणे याचा होय चालुक्य राजघराण्याच्या वेळी कर्णदेवाने महालक्ष्मीचे मंदिर प्रथम सन ६३४ मध्ये उभारले आणि त्याला सुमारे १४०० वर्षांचा काळ लोटला असावा महाकाली आणि महासरस्वतीची मंदिरे साधारणत बाराव्या शतकात यादवकालात उभारली गेली तात्पर्य, हे मन्दिर निमान दोन सहस्र वर्षांपूर्वीचे तरी असावे. या क्षेत्री श्रीमहाविष्णु महालक्ष्मीरूपाने राहिले, वास्तव याला मातृका क्षेत्र असेही मानले जाते. (पुरुषार्थ, देवता अंक, १९६१ )

त्यासंबंधीचे अनेक ताम्रपट मिळालेले आहेत त्या सर्वांचे परिशीलन करून इतिहाससंशोधक श्री ग ह. खरे आपल्या 'महाराष्ट्रातील चार दैवते' या ग्रंथात म्हणतात, 'या देवीचे प्राचीनत्व ऐतिहासिक पुराव्यांवरून फार तर आठव्या शतकापर्यंत नेता येते. पण तत्पूर्वी किती शतके ते अस्तित्वात होते, हे समजण्यास पुरावा उपलब्ध नाही.' (पृष्ठ ५१ ). शीलाहार राजघराण्याने या

देवीला आपली कुलस्वामिनी मानली होती. तेव्हा त्याच वंशातील गंडादित्य या राजाने सांप्रत दिसत असलेले मंदिर बांधलेले असावे.

त्यानंतरच्या मुसलमानी अमदानीत देवीच्या मूर्तीचे संरक्षण करण्यास फार प्रयास पडले. पांडवांना ज्याप्रमाणे १२ वर्षे वनवास पत्करून १ वर्ष अज्ञातवासात काढावे लागले, त्याचप्रमाणे या मूर्तीच्या इतिहासातही तिला अनेक वेळा अज्ञातवास आल्याचे दिसून येते. त्या वेळी कधी भुयारात तर कधी किल्ल्या कपारीत तिला वास्तव्य करावे लागले. अशा पळापळीमुळे पूर्वीची मूर्ति गहाळ झाल्याने नवीन तयार करून बसविण्यात आली आहे, असे काही जणांचे म्हणणे आहे. या विधानाला पुरावा म्हणजेच मूर्तीच्या स्वरूपात झालेला बदल हा होय. पूर्वीच्या वर्णनाबरहुकूम आताची मूर्ति दिसत नाही. सोळाव्या शतकात मराठ्यांची सत्ता आली तरी अनेक वर्षे तिचे नष्टचर्य संपले नव्हते. मध्यंतरी संभाजी महाराजांनी या देवीची राजमुद्रा तयार करून घेतली होती. शेवटी राजारामाची पत्नी ताराबाई हिने कोल्हापूर शहरी आपला स्वतंत्र सुभा स्थापन केल्यावर, या देवीचे महत्त्व घरोघर पोहोचले असे म्हणावेसे वाटते.

(श्री यशवंत रामकृष्ण, नवशक्ति)

दक्षिणेत मुसलमानी अमदानीत निजामशाही, कुतुबशाही आदि अनेक शाही घराणी झाली. त्यांच्या पदरी अनेक हिंदु राजकारणी झाले, पण कोणाचेही लक्ष या क्षेत्राकडे गेले नाही. शेवटी २६ सप्टेंबर १७१५ साली कोल्हापूरच्या संभाजी महाराजांनी फर्मान काढले, ते असे,

'श्री महालक्ष्मी वास्तव्य करवीर हे अनादि क्षेत्र. त्यास आवांतराचे योगास्तव बहुत दिवस पूर्वी देवालय सोडून, पुजाऱ्याचे घरी होती. त्यास पूर्वी राज्याधिकार, विजापूर आदिकरून स्वस्त झाले थोर थोर नामांकित गृहस्थ होते परंतु पूर्वस्थळी श्रीची स्थापना कोणी केली नाही. सांप्रत काळी देश उद्वस, राज्य स्वस्थ नसता श्रीने आपणास (सावगावकर) साक्षात्कारे प्रेरणा करून आपले स्थळी बैसावे हे इच्छा झाली. हे वृत्त पूर्वी स्वामिस आपण विदित केले. स्वामिनी राजश्री सिदोजी हिंदुराव घोरपडे मामलेदार यास श्रीचे स्थापनेविषयी आज्ञा केली व त्यावरून मशारनिल्हे करवीरास येऊन मन्मथनाम संवत्सरी आश्विन शुद्ध विजयादशमी शुक्रवारी (२६-९-१७१५) पूर्वस्थळी स्थापना केली.'

हे पत्र श्री नरहरीभट शिवरामभट सावगावकर यास ८ नोव्हेंबर १७२३ साली लिहिलेले आहे. (श्री ग ह खरे, 'चार दैवते', पृष्ठ २७)

कोलापूरं महास्थानं यत्र लक्ष्मी सदा स्थिता ।
मातु पुरं द्वितीय च रेणुकाधिष्ठित परम् ॥ (देवी भागवत)

पूर्वी होता कोल्हासूर । म्हणौन नाम कोल्हापूर ॥
तेथे लक्ष्मीचा अवतार । तुम्ही पहा ॥ (दासायन, पृष्ठ १८०)

याप्रमाणे कोल्हापूर या नावाबद्दलची माहिती मिळते

आता थोडे मंदिराचे वर्णन पाहू महालक्ष्मीचे मंदिर शहराच्या मध्यभागी आहे मंदिराचा प्राकार विस्तृत असून पश्चिमाभिमुख आहे. चारी दिशाना जरी प्रवेश दरवाजे असले तरी पश्चिमेकडील दरवाज्याला महाद्वार असे म्हणतात. या दरवाज्यातून आत प्रवेश केल्यावर फरसबंदीवरून काही अंतर चालावे लागते त्यानंतर गरुडाची मूर्ति असलेल्या गरुड मंडपात जाता येते त्याच्यापुढे गणेश मंडपात प्रवेश केल्यावर त्या ठिकाणी आपण भैरव, चामुंडा, लक्ष्मी, हयग्रीव, जैनयक्ष व यक्षी यांच्या मूर्ति पाहातो याशिवाय नलरामादि जैन तीर्थंकार आणि रूद्रादिकांची सुद्धा शिल्पे आपल्याला दिसतात मंदिराची इमारत दुमजली आहे या ठिकाणी महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती यांची मंदिरे व सभामंडप आहेत हे सभामंडप वेगवेगळे असले तरी या सर्वांना जोडणारा एक सभामंडप असून त्याला जोडमंडप असेच म्हणतात.

जोडमंडपाच्या पूर्वेस महालक्ष्मीचा मंडप आहे त्या मंडपात शिरताना प्रथम जय विजयाच्या मूर्ति आपल्याला दिसतात त्याच्या उत्तरेस दोन खोल्या असून त्याचा उपयोग भांडारगृह आणि वस्त्रगृह म्हणून केला जातो पूर्वेकडे मुख्य मंदिराच्या गर्भगृहाचा दरवाजा असून त्यातून प्रवेश केल्यावर आपण देवी महालक्ष्मीच्या गाभाऱ्यात पोहोचतो दक्षिणेला लाकडाच्या मेघडंबरीत महालक्ष्मीची मूर्ति अधिष्ठित झालेली आहे दक्षिणेला देवीचे शेजघर आहे. मूर्ति काळ्या पाषाणाची असून सुमारे तीन फूट उंच आहे. महालक्ष्मी चतुर्भुज असून महाळुंग ( मातुलिंग ), गदा, ढाल व पानपात्र ही आयुधे तिच्या हातात आहेत आणि मुकुटावर लिंग आणि योनी यांच्या आकृत्या आहेत मूर्ति मागील बाजूस वामाकृति आणि पुढील बाजूस सिंहाकृति आहे. जानेवारी १९५५ मध्ये या देवीवर वज्रलेप करण्यात आला आणि काही जीर्ण भागांची डागडुजी करण्यात आली हे काम सुमारे तीन महिना चालले होते

या वज्रलेपामुळे देवीच्या स्वरूपात किंचित् फरक झालेला दिसून येतो, आता मस्तकावर नागफणा व त्याखाली लिंग आणि योनीभाग आहे मागील बाजूला चार फूट उंचीची चांदीची प्रभावळ आहे चाराव्या शतकातील हेमाद्रि

आणि चौदाव्या शतकातील सूत्रधार मंडळ हे दोघेही सांगतात की, देवीच्या खालच्या उजव्या हातात पानपात्र आणि खालच्या डाव्या हातात श्रीफळ किंवा बेलफळ होते. हेमाद्रि आपल्या चतुर्वर्ग चिंतामणीमध्ये लिहितात.

> दक्षिणाध. करे पात्रमर्ध्वे कौमोदकी ततः ।
> वामोर्ध्वे खेटकं धत्ते श्रीफलं तदधः करे ।
> बिभ्रति मस्तके लिंगं पूजनीयां विभूतये ॥

या वर्णनाप्रमाणे उजव्या खालच्या हाती पानपात्र व डावे खालचे हाती श्रीफळ असावयास पाहिजे. शिवाय या वर्णनात मस्तकावर नागफण्याचा उल्लेख नाही. रत्नरूप व रूपमंडण ग्रंथाप्रमाणे हेच वर्णन आहे. असे असता वज्रलेप झाल्यावर या वर्णनाप्रमाणे पानपात्र व श्रीफळ दिसून येत नाही. मूर्तीचे पूर्वीचे रूप अगर वज्रलेप तयार झालेले रूप त्यामध्ये या वर्णनाबरहुकूम मूर्ति नाही. म्हणून काहींचे असे अनुमान आहे की, पळापळीच्या काळात मूळ मूर्ति एक तर गहाळ तरी झाली असावी किंवा तोडली तरी गेली असावी आणि त्या जागी नवीन बसविली गेली असावी.

जोडमंडपाच्या उत्तरेस महाकालीचा मंडप आणि त्यामध्ये श्रीचक्राची आकृति आहे. पश्चिम बाजूस मंदिराबाहेर पडण्यास दरवाजा आहे. या मंडपातून मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केल्यावर लाकडी मेघडंबरीमध्ये असलेल्या मूर्तीचे दर्शन घडते जोडमंडपाच्या दक्षिणेस महासरस्वतीचा मंडप, बाहेर जाण्यास दरवाजा आणि समोर देवीचा गाभारा दिसतो. जोडमंडप आणि वर वर्णन केलेले इतर चारही मंडप, यातील खांबाचा दर्शनी भाग चौरस असून नक्षीकाम केलेला आहे.

जोडमंडपातच सुमारे ८० खांब असून, बाकीच्या चारी मंडपांमध्ये साधारणः तितकेच असावेत. या सर्व खांबांच्या चक्रव्यूहामध्ये नवीन माणूस गोंधळून न गेला तरच नवल ! सर्व खांब मोजणे सर्वस्वी अशक्य होते. याच कारणाकरिता 'ते खांब मोजले तर मरण येते.' असा प्रवाद बाहेर प्रसृत झालेला असावा. महालक्ष्मीच्या प्रदक्षिणेची जी ओवरी अगर मार्ग आहे, तो साधारणपणे स्वस्तिकाच्या आकाराचा असून, आपल्याला थोडा कष्टकोनातून प्रदक्षिणा घालावी लागते आणि त्याच वेळी २४ ठिकाणी बाहेर आलेली खांबांची टेपरे चुकविता चुकविता नवख्या माणसाच्या नाकी नऊ येतात त्यातून

त्या मार्गावर पणतीचा अंधुकसा उजेड. प्रस्तुत ग्रंथाचा लेखक आपल्या पित्याबरोबर पुण्याहून लहानपणी राजापूर तालुक्यातील ताम्हाने या जन्मगावी जातयेत असता, या देवीच्या दर्शनाला गेलेला आहे. देवीला प्रदक्षिणा घालताना मिळालेला 'प्रसाद' सुद्धा त्याने पेढ्यांच्या प्रसादाइतकाच आवडीने खाल्ला आहे! फरक इतक्याच की, पेढ्यांचा प्रसाद हातावर मिळतो आणि 'तो' दुसरा 'प्रसाद' डोक्यावर टेंगळांच्या रूपाने मिळालेला आहे. सारांश, हे सर्व स्वानुभवाचे बोल आहेत. आता प्रदक्षिणेच्या मार्गात विजेचे दिवे लावलेले आहे. या मंदिराच्या बांधणीचे वैशिष्ट्य असे की, माघ महिन्यात जेव्हा सूर्य पश्चिमेला मावळतो, त्या वेळी सायंकाळी काही वेळ सूर्याचे किरण देवीच्या मुखकमळावर पडतात. हे दृश्य फारच मनोहारी असते. एवढ्या विस्तीर्ण प्राकारात आणि अनेक मंदिरे परिसरात असताना हा विशिष्ट हेतु साध्य करणे हा अतिकुशल आणि पूर्वकाळच्या प्रगत स्थापत्यशास्त्राचा चालताबोलता पुरावा होय. या किरणांचे स्नान झाल्यावर देवीची खास पूजा, आरती होते. त्या वेळी अनेक भक्त उपस्थित राहण्याचा नियम करतात.

मराठवाड्यात परळी वैजनाथाचे मंदिर आहे. डिसेंबर महिन्याचे २१ दिनाकाच्या सुमारास, प्रातःकाळी, पूर्व दिशेच्या गवाक्षामधून गाभाऱ्यासमोरील चार दरवाजे ओलांडून बालसूर्याचे किरण वैजनाथाच्या शाळुंकीवर पडतात. अर्थात् मंदिर पूर्वाभिमुख असल्याने येथे प्रातःसमयीचे किरण मूर्तीवर पडतात, तर महालक्ष्मीचे मंदिर पश्चिमाभिमुख असल्याने सायंकाळी पडतात. भारतामध्ये इतरही मंदिरात याप्रमाणे क्वचित् असे शिल्प साधलेले आहे.

वरीलप्रमाणे तीन प्रमुख मंदिरांव्यतिरिक्त, देवीच्या प्राकारात अनेक तीर्थे आणि लहान लहान मूर्ति आहेत. आरसादेवी, फांटाकाढी, वीणादेवी, मावळकरी, कात्यायनी, गौरीशंकर, त्र्यंबकेश, गारेचा गणपती, हरिहरेश्वर, दत्तात्रय, मुक्तेश्वरी, शांकभरी, कुंडलेश्वर, ज्योतिबा, घाटीदरवाजा, नवग्रह मंदिर, विठोबा, राई–रखमाबाई, काशीविश्वेश्वर, मुद्गलेश्वर, राधाकृष्ण, पंचगंगेच्या ओवऱ्या (शिवा, भद्रा, भोगावती, कुंभा व सरस्वती या पाच नद्या एकत्र वाहतात म्हणून पंचगंगा असे म्हणतात.) कार्तिकेय मंदिर, बुधबृहस्पति, शुक्रमंदिर, धोपदायी, नृसिंहाची देवळी, विष्णूचा गाभारा, गोकर्णेश्वर, लक्ष्मी–नारायण, महाकाळकात, मल्हारी, अतिबलेश्वर, गारेचा राधाकृष्ण, काळभैरव, गारेची सिंहवाहिनी, अष्टभुजा तुळजा भवानी, इंद्रसभा, नारायणस्वामींच्या पाच ओवऱ्यामधील एकमुखी दत्त या देवता आहेत. प्रत्यक्ष गावात हरप्त मनकर्णिका, काशीकुंड, रंकाळ तलाव आणि त्यावरील अनुगामिनी देवी,

पद्मतळे, वारुणतीर्थ, कपिलातीर्थ, कोटीतीर्थ, नव्या बुधवार पेठेतील प्रत्यंगिरा ऊर्फ फिरंगाई देवी, रविवार पेठेत एकवीरा, यल्लमा अशी अनेक प्रेक्षणीय क्षेत्रे आहेत. त्यासर्वांचा नामनिर्देश केला आहे. सविस्तर वर्णन जागे अभावी करता येणे अशक्य आहे. कोल्हापूर गॅझेटीअरमध्ये असे आहे की, येथे सुमारे २५० मंदिरे आहेत.

अनेक भक्ताना या महालक्ष्मीचे साक्षात् दर्शन झालेले आहे आणि कृपा प्रसाद मिळाला आहे, अशापैकी एक श्री नारायणस्वामी नावाचे दिव्य पुरुष सतराव्या शतकात होऊन गेले. त्याचा जन्म शके १६५० च्या सुमारास होऊन समाधी काळ शके १७२७ चैत्र असा आहे. नृसिंहवाडीला त्याची समाधी आहे. दत्तकृपा झाल्यानंतर ते कोल्हापूरजवळ कात्यायनी मंदिरात देवीची सेवा करीत असत. त्या वेळी महालक्ष्मीच्या मंदिरात एक ब्राह्मण १२ वर्षे सतत सप्तशती ग्रंथाचे पारायण देवीच्या दर्शनासाठी करीत असता, एके वेळी देवी साक्षात् प्रगट झाली. पण 'देव देतो आणि कर्म नेते' या म्हणीप्रमाणे देवीचे ते कोटी सूर्यसम तेज ब्राह्मणाला सहन झाले नाही आणि तो मूर्च्छित पडला.

कोटिसूर्यप्रभं तेजोऽकस्माद्विष्वक् प्रकाशितम् ।
तन्मध्येत्तोऽब्रवीद्देवी वरं ब्रूहीति तं द्विजम् ॥ २-७ ॥
दृष्ट्वा दिव्यं महालक्ष्मीस्वरूपं तन्महाप्रभम् ।
प्रणम्य भक्तिभावेन साष्टांगं सादरं मुनि ॥ २-१२ ॥

भक्ताला दर्शन देण्यासाठी अवतरलेल्या देवीचा निरुपाय झाला आणि अन्य मार्ग शोधण्याच्या हेतूने, ती तडीच कात्यायनीच्या मंदिरात आली. नारायणस्वामींना दर्शन दिले. मागितले नसता दर्शन का दिले आणि कार्य काय याबद्दल फार मार्मिक संवाद देवी व भक्त यामध्ये झाला. देवीच्या सांगण्यावरून नारायस्वामी महालक्ष्मीच्या मंदिरात तिजबरोबर गेले, ब्राह्मणाला जागृत केले आणि दर्शन घडविले.

नारायणस्वामींना वर मागण्यास सांगितले असता, 'मला स्वतः नृसिंह-सरस्वतीकडून गुरोपदेश मिळावा' असा वर मागितला आणि देवीने तो पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला. नारायणस्वामींचे भजन ऐकाने म्हणून देवता त्यांच्या समोर पाटावर येऊन बसत असे आणि देहभान विसरून देवता भजनात तल्लीन होत असे, असे अनुभव नारायणस्वामींच्या चरित्रात पाहावयास मिळतात आणि ते मुळातूनच वाचणे श्रेयस्कर आहे. (नारायणस्वामींचे चरित्र, लेखक ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे, प्रकाशक पृ. गुळवणी महाराज, पुणे १९६२).

महालक्ष्मीला दोन बहिणी आहेत असे मानतात एक कात्यायनी ही वाळिंगे टेकडीवर असून दुसरी टेंबलाई अगर त्र्यबुली ही टेंबलाई टेकडीवर आहे भोसले घराण्याची ही कुलस्वामिनी मानतात १९६२ च्या सप्टेंबर महिन्यात कोल्हापूर दत्तक प्रकरण उपस्थित झाले राजाने आपली बहीण पद्मादेवी कदमबांडे याचाच मुलगा दत्तक घ्यावा व नागपूरकर भोसल्याचा वशाज रद्द समजावा, यासाठी कोल्हापूर येथील सहस्रावधी महिलानी, डोक्यावर पाण्याचे हडे घेऊन मिरवणूक काढली आणि ती या टेंबलाई मदिरापर्यंत आली तेथे विजयमाला राणीसाहेब होत्या त्यानी देवीची पूजा केली आणि त्या महिलांनी देवीच्या मस्तकावर पाण्याचे सर्व हडे रिकामे केले सकटकाळीच देवीची आठवण होते

या टेंबलाई देवीसबधी दुसरी एक सुरम्य कथा आहे ती अशी की, ही कौंडिण्यमुनींची शापित पत्नी सत्यवती होय प्राचीन काळी करवीर शहरी एक देवीभक्त ब्राह्मणजोडपे होते आणि सेवेचे फळ म्हणून देवीने त्याना एक कन्या दिली तिचे नाव त्र्यबूली असे ठेवण्यात आले या मुलीचा जन्म झाल्या बरोबर सर्वत्र लख्ख प्रकाशझोत पडला आणि या अलौकिक कृतीमुळेच ती देवी मानली गेली ती सदा महालक्ष्मीच्या सेवेत निमग्न असे

महालक्ष्मीने इतर देवांच्या सहाय्याने कोल्हासुरासह असख्य दैत्यांचा नाश केला, पण त्यापैकी दोन रक्ताक्ष व कामाक्ष तेथून निसटले शुक्राचार्यांना हकीगत सागून राक्षसाचे सकट निवारण करण्याची विनती केली गुरूच्या आज्ञेवरून त्या दोघानी कपिलेश्वर महादेवाची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घेऊन त्यांच्याकडून 'योगदड' नावाची दैवीशक्ति असलेला एक काठी मिळविली त्या दडाची अशी अद्भुत शक्ति होती की, ज्याच्या मस्तकावरून तो उजवीकडून डावीकडे फिरविला जाई, त्याचे रूपातर त्वरितच शेळीमध्ये होत असे विरुद्ध बाजूने फिरविल्यास पूर्वस्थिति प्राप्त होई याप्रमाणे सामर्थ्यसपन्न झाल्यावर ते दोघे दैत्य देवीच्या मदिरात आश्विन पौर्णिमा दिनी आले आणि महालक्ष्मीच्या सभागृहात देव व भक्तगण जमल्यावर त्यांनी त्याच्यावर योगदड फिरविल्याने सर्वांचे रूपातर शेळ्यामध्ये झाले याप्रमाणे त्यांनी शत्रूवर सूड उगवला

पुढे त्या शेळ्यांना खाऊन फस्त करण्याचे राक्षसानी ठरविले त्र्यबूली देवीला ही वार्ता कळताच देवांना बधमुक्त करण्याचे तिने ठरविले तिने एका म्हातारीचे रूप घेऊन एका टोपलीत पुष्कळ वजनदार पाषाण भरून राक्षसांच्या मार्गावर बसली राक्षस आणि शेळ्या मार्गाने जात असता ती वजनदार टोपली आपल्या मस्तकावर देण्याची राक्षसांना विनती केली त्यांनी हातातील योगदड

खाली ठेवला आणि टोपली उचलण्यास वारस्ताच म्हातारीने शितापीने तो योगदंड ताब्यात घेतला आणि सर्व शेळ्यावर उलट बाजूने फिरविताच देवाना व भक्ताना पूर्वरूप प्राप्त झाले व राक्षसाना शेळ्या बनविले.

या देवतेने इतके अलौकिक कार्य केले असताही तिची पुढील समारंभामध्ये दखल कोणीच न घेतल्यामुळे ती रागावून साम्प्रतच्या ठिकाणी जाऊन बसली. महालक्ष्मीने स्वत. पाचारण केले, तरीही ती आली नाही, तेव्हा स्वत· महालक्ष्मी त्या क्षेत्री गेली आणि तिची समजूत घातली. या भेटीची स्मृति म्हणूनच की काय पंचमीच्या दिवशी देवीची पालखी टेंबलाई क्षेत्री आणतात आणि दोन्ही देवतांची भेट होते.

पालखी मिरवणुकीच्या वेळी एक रूढि अशी आहे की, भक्तगण देवीला प्रदक्षिणा घालीत असताना कौलाच्या खापऱ्या अथवा दगडाच्या उतरंडी रचतात. कारण त्यांची अशी समजूत आहे की, या प्रकारे जो भक्त उतरंड रचील त्याचा पुढील वर्षांचा संसार देवता सुखाने चालविते.

(सदानंद चेंदवणकर, नवशक्ति, ९–१०–६४).

कोल्हासुर दैत्याचा वध देवीने येथून जवळच असलेल्या ज्योतिबा डोंगरावर केला. कोल्हापूरपासून वायव्येस ९ मैलांवर एक सहस्र फूट उंच टेकडीवर हे ठिकाण आहे. येथील देवता म्हणजे केदारलिंग ज्योतिबा, त्याला साक्षात् शंकर मानतात. नावजी साया या गृहस्थाने प्रथम लहानसे मंदिर बांधले होते. ते मोडकळीस आल्यावर सन १७३० च्या सुमारास राणोजी शिंदे यांनी साम्प्रतचे मंदिर बांधले. ते ५७' × ३७' × ७७' या मापाचे आहे. या ठिकाणी दुसरी दोन-तीन मंदिरे आहेत. राणोजींनी यमाईचेही एक मंदिर बांधले आहे. याचा आकार ४७' × ४७' × ४९' असा आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी त्यांनी दोन जलाशय बांधून ठेवलेले आहेत (कोल्हापूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ २९९)

भक्तांची अशी भावना आहे की, अद्यापिही ज्योतिबा दररोज कोल्हापूर येथे महालक्ष्मीच्या दर्शनास घोड्यावर स्वार होऊन जात असतो या प्रवादाची प्रतीति येते ती अशी की, देवस्थानामध्ये जो ज्योतिबाचा टांगधद घोडा आहे, तो टांगधद असला तरी काही वेळा त्याला दरदरून घाम आलेला दिसतो व टेरावर रपेट मारून आल्यावर जसा घोड्याला दरदरून घाम आलेला आपण पाहतो, तद्वतच हे सर्व घडत असते अर्थात् प्रत्यक्ष देव घोड्यावरून जाताना कोणालाच दिसत नाही हे मात्र खरे. (श्री. नरहरशास्त्री खांडे, सौदामिनी).

महालक्ष्मीच्या तारकाकृति देवालयाचे वैशिष्ट्य म्हणून असे सांगता येईल की, दक्षिण, उत्तर व पूर्व बाजूच्या मंदिरांना, मंडपातून आत किंवा बाहेर जाण्यास रस्ते आहेत, पण महालक्ष्मीच्या मंदिराला मंडपातून गाभाऱ्यात गेल्यावर, पुन्हा त्याच रस्त्याने परत जोडमंडपात यावे लागते, तरच कोणी मंदिराबाहेर जाऊ शकेल. पूर्वी राजदरबारी असा रिवाज होता की, एखादा मानकरी राजाला मुजरा करून पाठ फिरवून परत येऊ शकत नसे. मुजरा केल्यावर ज्या राजाकडे पाहून तो केला असेल, त्याच दिशेने राजाकडेच तोंड करून दहाबारा पावले मागे जाऊन मग तो परत फिरू शके. हा नियम आजही अनेक भक्त पाळताना दिसतात. (श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी या प्रकारचा रिवाज सन १९११ चे राजदरबाराचे वेळी दिल्ली येथे पाळला नाही, म्हणून ब्रिटिश सरकारचा त्यावर रोष झालेला होता.) त्याप्रमाणे येथे भक्ताने देवीला नमन केल्यावर तिचा योग्य तो मान राखूनच परतावे असा हेतु असावा. दुसरा एक अर्थ असा की, लक्ष्मी नेहमी घरातच राहावी, तिला बाहेर जाण्यास अनेक वाटा असू नयेत. कारण एका द्वाराचे रक्षण करणे सोपे, पण अनेक द्वाराचे रक्षण करणे महाकठीण या हेतूने ही योजना केली असावी. याच संदर्भामध्ये दुसरी एक कथा आहे. ती ऐकविण्याचा मोह अनावर होतो आहे.

निजामसाहेबाजवळ गडगंज संपत्ति असल्याचे सर्वश्रुतच आहे. अनेक वर्षे सुमारे ७५ च्या वर या कथेला झाली. एके रात्री राजद्वारावर पहारेकरी पहारा करीत असता मध्यरात्रीच्या सुमारास सुवर्णालंकारांनी युक्त अशी एक तेजस्वी स्त्री दरवाज्यावर आली आणि बाहेर जाऊ लागली. पहारेकऱ्याने तिला हटकले आणि राजाचा परवाना विचारला. कारण परवान्याविना कोणालाही आत किंवा बाहेर न सोडण्याची पहारेकऱ्यांना सक्त ताकीद होती. स्त्रीला परवाना दाखविता येईना. पण निजामसाहेबांनी मला तोंडी सांगितले आहे, असे तिने सांगितले. तेव्हा 'साहेबांना भेटून त्यांना विचारून खात्री करून मी येतो. तोवर तू अशीच उभी रहा' अशी त्या पहारेकऱ्याने तिजकडून शपथ घेवविली आणि तो निजामसाहेबांना विचारण्यास आत गेला. घडलेला सर्व वृत्तांत राजाने पहारेकऱ्याकडून लक्षपूर्वक ऐकल्यावर तो मनात सर्व काही समजला. त्याने त्या पहारेकऱ्याचा प्रथम शिरच्छेद केला. तात्पर्य एवढेच की, एक दरवाजा असल्यामुळे राजवाड्याबाहेर जात असलेल्या लक्ष्मीचे रक्षण करता आले. पहारेकऱ्याचा शिरच्छेद करण्यामागील राजाचा दूरदर्शीपणा खरोखरीच कौतुकास्पद आहे. पहारेकरी परतला नाही आणि त्याला शपथ दिल्यामुळे, ती स्त्री ऊर्फ लक्ष्मी राजवाड्या बाहेर जाऊ शकली नाही. (श्री. मोरेश्वर घोटे, मुंबई)

श्रीतत्त्वनिधि ग्रथाप्रमाणे आठ महालक्ष्मींचा एक सघ सांगितला आहे. त्या सघातील देवताची नावे पुढीलप्रमाणे ( १ ) द्विभुजालक्ष्मी, ( २ ) गजलक्ष्मी, ( ३ ) महादेवी, ( ४ ) श्रीदेवी, ( ५ ) वीरलक्ष्मी, ( ६ ) द्विभुजा-वीरलक्ष्मी, ( ७ ) अष्टभुजा वीरलक्ष्मी, ( ८ ) प्रसन्नलक्ष्मी. असे जरी असले तरी याच ग्रथात इतरत्र अष्टलक्ष्मींची नावे याहूनही वेगळी असल्याचे दिसून येईल. (मीनाक्षी पहा)

स्कदपुराणातर्गत ' देवी महात्म्य ' व ' मूर्तिरहस्य ' प्रकरणामध्ये महालक्ष्मीची मूर्ति कशी असावी ते पहा—

मातु लिंगं गदां खेटं पानपात्रं च बिभ्रती ।
नाग लिंगं च योनिं च बिभ्रती नृप मूर्धनि ॥

तसेच ' नित्य कर्मसग्रह ' पोथीप्रमाणे ती कशी असावी ते पहा.

धृत्वा श्रीमातु लिंगं तदुपरि च गदां खेटकं पानपात्रम् ।
नाग लिंग च योनिं च शिरसि धृतवती राजते हेमवर्णा ॥

देवीला वज्रलेप झाल्यावर जे रूप तयार झाले ते नागफणायुक्त याच कारणाकरिता केले असावे. कोल्हापूरशिवाय इतर स्थानी महालक्ष्मीची मूर्ति नेहमयाची असली, तर ती विष्णु पत्नी लक्ष्मी हिच्यासमान असावी, म्हणजे चतुर्भुज मूर्तीच्या हाती शख, चक्र, गदा, पद्म इत्यादि आयुधे असावी. कर्नाटकात दोड्डगद्दवल्लि या गावी याप्रमाणे मूर्ति आहे.

महालक्ष्मीच्या इतरत्रही काही ठिकाणी मूर्ति आहेत. त्यापैकी आता काही पाहू.

( अ ) गोरेपल्ले ( जिल्हा अनतपूर )—येथे महालक्ष्मीचे मदिर आहे. या मदिरात सहा कन्नड-सस्कृत लेख असून कोणी काय देणग्या दिल्या याचा उल्लेख आहे.

( आ ) कुभलगड ( उदेपूर )—येथे मामादेव मदिराच्या प्राकारात अन्नपूर्णेचे मदिर आहे. परतु मूर्ति, कमळधारी, द्विभुजालक्ष्मी, दोन्ही बाजूना हत्ती असून ' शिवस्य प्रिया लक्ष्मी ' अशा वर्णनाची मिळते

( इ ) अणहिलवाड ( गुजराथ )—सिद्धराज सरोवराच्या तीरावर सिद्धराज जयसिंह या राजाने ( १०९३–११४२ ) कोल्हापूर पीठाप्रमाणे महालक्ष्मीचे पीठस्थान निर्माण केलेले आहे. त्या ठिकाणी पूर्वदिशेला महालक्ष्मी, दक्षिणेला कोळा, पश्चिमेस कपालभैरव आणि उत्तरेस महाकाली अशी स्थाने निर्माण केली आहेत. पण कोल्हापूर येथील नावे निराळी आहेत. त्याचा खुलासा ' सरस्वती

पुराण ' ( हस्तलिखित प्रत, भांडारकर संस्था, पुणे ) देते. कोल्हापूर येथे पूर्वेला महालक्ष्मी, व उत्तरेला महाकाली आहेत आणि दक्षिणेला महासरस्वती आहे. तेव्हा कोल्हा म्हणजे महासरस्वती असावी. पश्चिम बाजूला कंकाळभैरव पाहिजे. पण कोल्हापूर येथे तो नाही, परंतु गणेश-मंडपात भैरवचामुंडा मूर्ति आहेत. तेव्हा कंकाळऐवजी भैरव नाव आले असावे.

( ई ) दोड्डगद्दवळ्ळि ( जि. हसन )—येथे वर म्हटल्याप्रमाणे महालक्ष्मीचे मंदिर आहे. हे जरी कोल्हापूर पीठासारखे असले तरी पश्चिमेला भूतनाथ ( भैरव ) आणि दक्षिणेला विष्णु यांची स्थाने आहेत एवढाच फरक आहे. या क्षेत्राची माहिती देणारे १९ शिलालेख तेथे आहेत. या स्थानाला दक्षिण काशी या नावाने संबोधतात.

( उ ) कुडाळ ( रत्नागिरी )—येथे उत्तराभिमुख महालक्ष्मीचे मंदिर आहे.

( ऊ ) वाई ( सातारा )—येथे सरदार रास्ते यांनी पेशवे काळात महालक्ष्मीचे मंदिर उभारले असून हातात शस्त्र, चक्र, आयुधे आणि मस्तकावर योनिलिंग व नागफणा आहे.

## ( ए ) महालक्ष्मी—मांद्रे. ता. पेडणे, गोवा.

या देवीचे स्थान तेथील एक रहिवासी श्री. देवमांद्रे यांचे घरातच आहे. पश्चिमेस सागराची निसर्गरम्य शोभा, दक्षिण-पूर्वेला नदीचा झुळझुळ वाहणारा प्रवाह आणि उत्तरेला डोंगरमाथा असल्याने पहाणाराचे मन प्रसन्न होते. याची पीठिका अशी सांगितली जाते की, या घराण्यात पूर्वी सन १३८२ मध्ये कृष्ण केशव नावाचे देवीभक्त जन्माला आले. नित्यनेमाने कोल्हापूर येथील अंबाबाईच्या दर्शनास ते जात असत. त्या वेळी राजमार्ग नसल्याने, रानावनातून काट्याकुट्यातून पायी प्रवास करून ते परतीला येत असत. वयाचे सुमारे ७५ वे वर्षी त्यांनी मातेला प्रार्थना केली की, ' आई जगदंबे, वृद्धापकाळामुळे आता गात्रे विकल झाली असल्याने यापुढे प्रत्यक्ष दर्शनास मुकण्याचा योग आला आहे. ' अनन्यभावाने ध्यानस्थ होऊन देवीसमोर बसून वरील प्रकारे प्रार्थना चालली असता नेत्राश्रु घळघळा ओघळत होते. त्या स्थितीत असताना त्यांना दृष्टान्त झाला की, 'मंदिराच्या पूर्वबाजूस एक पंचरशी धातूची लहानशी देवीची चतुर्भुज मूर्ति आहे, ती घरी नेऊन स्थापन करून, तिचे पूजन केले असता, मला येथे पावेल, प्रत्यक्ष येण्याची गरज नाही.' या भक्ताच्या मागण्यावरून देवीने असाही आशीर्वाद दिला की, तुझे वंशात पुरुष अथवा स्त्री जी कोणी जन्माला येतील, त्याने देवीचे तीर्थ दिले असता, कोणालाही विषबाधा होणार नाही. ' या दृष्टांताप्रमाणे कृष्ण

नेशवाना देवीची मूर्ति मिळाली आणि घरी आणून तिची स्थापना सन १४५७ मध्ये झाली. याचाच अर्थ असा की, पाचशे वर्षांचा काळ लोटलेला आहे. या मंदिराला कडीकुलूपही कधी लावीत नाहीत. विषारी जनावराचा दंश अथवा अंगावर विषार उठला असता, या देवीचे तीर्थाने तो रोगमुक्त होतो, असा अनेक डॉक्टर वैद्याचा आजवरचा अनुभव आहे.

देवीचे गर्भगृह ११×११ चौ फूट असून, ११ फूट उंचीच्या दगडी चौथऱ्यावर मूर्तीची स्थापना आहे. मूर्ति अतिशय लहान असल्याने, इतर शृंगार अधिक भासतो. सहा फूट लांबीच्या कातीव लाकडाच्या आसनावर मूर्ति असून, बाजूला शंकर गजानन, लक्ष्मी नारायण याच्या मूर्ति आहेत. देवी चांदीच्या पत्र्याने मढविलेल्या सिंहमुखी आसनावर आरूढ आहे. या मूर्तीच्या हाती गदा, महाळुंग, पद्म व चक्र ही आयुधे असून चक्राला ' जळते खापर ' असे म्हणतात. देवीचा प्रसाद घेताना याच खापराला पटकुळीचे ५२ फुलाचा प्रसाद होतो. हा कौल अनेक वेळा सत्य होतो अशी भावना आहे

( डॉ स. स गानसकरकडून, गोरेगाव ).

## (ऐ) महालक्ष्मी (झांशी)

नारीशक्तीची प्रकर्षाने जाणीव करून देणारी राणी लक्ष्मीबाई शक्तिपूजक होती काय? होय, असेच निश्चित उत्तर आहे.

झाशी शहरी दक्षिण दरवाज्याच्या बाहेरील बाजूला एक मोठा तलाव असून त्यामध्ये महालक्ष्मीचे टोलेजंग मंदिर आहे. राणी स्वत या देवतेची निस्सीम भक्त असल्याने, एके वेळी हिने अलौकिक वैभव उपभोगिले. पावसाळी दिवसात देवीच्या दर्शनास होड्यातून जावे लागे. तटाच्या परिसरात गणपति, विष्णु इ. देवताची मोठी देवालये होती या सर्वांचा खर्च सरकारी खजिन्यातून होत असे

पूर्वी अनेक राजेरजवाडे देवीचे भक्त असत आणि दर्शनाला जात. अनेक श्रीमंतानी मंदिरे बांधलेली आहेत आणि तेही दर्शनाला जात. सर्वसाधारण माणसे तर नेहमीच पायी रखडत दर्शनाला जातात पण या बाईचा थाट काही औरच. ' ना देखिला ना ऐकिला ' या प्रकारचा असे, आणि म्हणून तर त्याचे वर्णन करण्यासाठी या देवीचा इतिहास देत आहे. मागे कधी झाला नाही आणि पुढे कधी घडेल ही आशाच करावयाला नको, असे वैभव होते.

राणी साहेबाचा नित्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे असे. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे ' शक्तिने मिळती राज्ये ' हे सूत्र बाईंनी तंतोतंत आचरणात आणलेले होते, पहाटे उठून कसरतशाळेत जाऊन जोर, जोडी, मलखांब,

करावा, घोड्यावरून भरपूर रपेट करावी, त्याला कुपणावरून, खंदकावरून उड-विण्याची सवय करावी, अनेक कसरती त्याजकडून करवून घ्याव्यात, इसी-करूनही फेरफटका करावा आणि सुमारे आठच्या वेळी परत यावे. शरीरातून घामाचा निथळा झाल्यामुळे उत्तम खुराक खाता आणि थोड्या विश्रांतीनंतर स्नानास जावे. दररोजच्या स्नानाला १५ ते २० हंडे गरम पाणी लागे, पण आठवड्याच्या नहाणाच्या प्रसंगी हेच प्रमाण दुपटीतिपटीवर जाई. अत्तर, गुलाब पाणीसारखे सुवासिक द्रव्य अनेक वाटल्या लागे. हे सुवासिक गरम पाणी, एका नळीच्या द्वारे स्नानघरातून बाहेर एका हौदामध्ये सोडलेले असे आणि त्या पाण्यावर पाच पन्नास इतर बायकांचे न्हाणे सहज होई. स्नानानंतर शुभ्र चंदेरी पातळ परिधान करून, भस्मार्चन करून बाई आसनारूढ होत रुप्याचे तुळशी वृंदावन समोर ठेवून पूजन झाल्यावर, पार्थिव लिंगाचे पूजन होत असे. या वेळी शंकर गानप्रिय असल्याने सरकारी गवई गात असे, पुराणिक पुराण सांगत असत. हा कार्यक्रम चालू असला तरी सरदार व आश्रित सुमारे दीडशेपर्यंत या वेळी बाईंना आणि देवाना मुजरे करण्यासाठी येत असत सर्व गोष्टींवर राणींचे इतके बारीक लक्ष असे की, एखादा मानकरी उपस्थित झाला नाही, तर लगेच दुपारी त्याची विचारणा होई. भोजनोत्तर थोडी विश्रांती वामकुक्षी होत असे

दर मंगळवारी आणि शुक्रवारी राणीसाहेब मुलांसहवर्तमान खाशा स्वारीने देवीच्या दर्शनाला जात. तो सोहळा तर अपूर्वच समजला पाहिजे कधी मेण्यातून तर कधी घोड्यावर स्वार होऊन स्वारी निघे मेण्यातून जाताना स्त्रियांचा पेहराव असे. पांढरे शुभ्र पातळ, अंगावर फक्त मोत्यांचे दागिने, कमरेस काळ्या किंवा जरीचा दुपेटा आणि त्यास तलवार लटकलेली या वेळी ती गौरवर्णं उंची मूर्ति साक्षात् गौरीप्रमाणे भासत असे ज्या वेळी घोड्यावर बसावयाचे, त्या वेळी पुरुषवेष म्हणजे अंगात आंगव्याची बंडी, पायजमा, डोक्यास टोपी आणि त्यावर पागोट्याची वेणी असून बत्तीच्या पदराचा जर पाठीवर लोळत असे. या पोषाखातही राणी फारच सुंदर दिसत असे. मेणा चालू झाला म्हणजे रूपसुंदर चार दासी चार कोपऱ्याला सूर धरून दवडत असत. वयाने १५–१६ वर्षांच्या, तारुण्यमदाने रसरसलेल्या या दासी निघण्यापूर्वी जामदारखान्यात जाऊन सोने, मोती, हिरे यांच्या दागिन्यांनी नखशिखांत भूषून निघत. भरजरीच्या चोळ्या आणि हिरव्या-तांबड्या रंगाच्या पैठणी नेसलेल्या, पायांत भलेभक्कम रुप्याचे तोडे आणि तांबडेलाल जोडे, हातात रुप्याच्या चवऱ्या अशा थाटात मेण्याबरोबर असत. मेण्यावर चवऱ्या रिरधीत असत.

स्वारीच्या आघाडीवर डंका-निशाण, रणवाद्ये गर्जत असत. निशाण-काठीच्या मागे सुमारे २०० विलायती शिपाई व त्यामागे १०० स्वार असत. याशिवाय मेण्याबरोबर घोड्यावर स्वार झालेले कारभारी, मुत्सद्दी, मानकरी, कुलगुरु आणि शिबंदी असे. अनेक ग्रामस्थही या अपूर्व मिरवणुकीत सामील होत असत. मिरवणूक चालू झाली म्हणजे शिंगे, कर्णे वाजत, बंदुकीचे आवाज निघत आणि किल्ल्याच्या बुरुजावरील चौघडा निनादू लागे. हा इशारा मिळताच देवीच्या मंदिरातील चौघडा प्रतिसाद देई. स्वारी पुन्हा परत येईपर्यंत याची झिपरी झडप असे. ही मिरवणूक शहरातून बाजाररस्त्याने जात असताना अनेक नागरिक मुजरे करीत, अनेक सुहासिनी ओवाळीत आणि अनेक मनापासून राणीचे हित-चिंतन करीत. मंदिरात मातेचे दर्शन झाल्यावर आणि पुजारीवर्गाकडून मंत्रोक्त आशीर्वाद घेतल्यावर, त्याच इतमामात स्वारी किल्ल्यामध्ये परत येई. रात्रीने आपले साम्राज्य पसरल्यास मशाली पेटविण्यात येत.

मंदिरामध्ये नंदादीप, महापूजा, महानैवेद्य, चौघडा, गायक, नर्तकी, धर्मशाळा याची उत्तम व्यवस्था होती. याच्या कायम खर्चासाठी दोन गावचे इनाम तोडून दिलेले होते. इंग्रजाविरुद्ध लढाईमध्ये विजय मिळावा म्हणून मोठ्या श्रद्धेने नवचंडी-शतचंडी याग केले. ब्रह्मावर्त-काशी येथून सुमारे १०० ब्राह्मण आणलेले होते. सर्व कार्य यथाविधि झाल्यावर पूर्णाहुतीच्या वेळी बारा रुपयाचे धोतरजोडे आणि वीस रुपयांची पागोटी, शिवाय दक्षिणा प्रत्येक ब्राह्मणाला स्वहस्ते देऊन आशीर्वाद घेतले. पूर्णाहुतीच्या वेळी सर्व झाशीकराना भोजनाचे मुक्तद्वार उघडले होते. या मंदिरामध्ये एकूण चार वेळा सहस्र ब्राह्मणभोजने घातली. प्रत्येक वेळी चार चार आणे दक्षिणा दिली आणि मोतीचूर लाडवाचे पक्वान्न वाढले.

इतके सर्व केले, पुण्यसंचय केला, पण मागील कर्मभाग पूर्वसंचित शिल्लक असल्याने, ज्या वेळी झाशी पडली, राणी परागंदा झाली, तेव्हा इंग्रज शत्रूने, शुक्रनीतीमध्ये सांगितल्याप्रमाणे, सर्व शहराची लुटालूट केली. महालक्ष्मीचे मंदिर त्यातून सुटले नाही. देवीच्या अंगावरचे कपडे गेले, दागिने गेले आणि सर्व वैभव लयाला गेल्याने ती एक 'लंकेची पार्वती' बनली. महालक्ष्मीचे तेज मावळले होते. माणूस इरेला पेटला, विजयाने धुंद झाला म्हणजे तो काय काय करील याचा भरवसा नसतो. राणीने इंग्रजाची खोडी केली असेल, पण ग्रथालयाने काय केले होते ? अनेक दुर्मिळ ग्रंथ, त्यांची हस्तलिखिते, लाकडी पेट्यांत सुरक्षित ठेवलेली होती. त्या पेट्या जाळल्या आणि ग्रंथांची पाने वायुराजाने रस्तोरस्ती उडवून दिली. इस्लामी संस्कृतीमधील काही धर्मांधांनी ज्याप्रमाणे हिंदु मंदिरां-पासून वर्तणूक केली, तशीच या सुसंस्कृत म्हणविणाऱ्या इंग्रजांनी(ही) केली. येथेच

नव्हे तर ब्रह्मावर्त शहरीही तेच केले. श्रीमंताचा संपत्तीने भरलेला राजवाडा लुटून त्याला आग लावली, शहराचे तट व दरवाजे फोडले, राममंदिर पाडून त्यातील मूर्ति रस्त्यावर फेकून दिल्या, बाजीरावांनी आपली प्रिय पत्नी सरस्वतीबाईच्या स्मरणार्थ असंख्य रुपये खर्चून बांधलेले सरस्वतेश्वराचे मंदिर पाडून, शिवलिंग उपटून टाकले. इतकेच नव्हे तर मंदिराचे संगमरवरी दगडही काढून नेले, मंदिराचा मागमूसही ठेवलेला नाही (माझा प्रवास, लेखक विष्णुभट गोडसे)

या मंदिराची हकिगत वाचून बोध घ्यावयाचा तो असा.

(१) राष्ट्राचे धुरीणत्व घेण्यासाठी राणीची बलोपासना आणि शक्ति-देवीची उपासना किती तीव्र होती,

(२) ऐश्वर्य लाभल्यावर मानव ज्याप्रमाणे त्याचा उपभोग घेतो, तद्वत् तोच उपभोग शक्तिदेवतेलाही देणे योग्य होय.

(३) भारताजवळ किती वैभव होते, आणि त्याचा उपभोग कसा घेतला जावा याचे चित्र सतत दीपस्तंभासारखे चालू आणि भावी पिढ्यापुढे रहावे.

(४) शत्रू कोणत्याही संस्कृतीमधील असो, तो विजयी झाल्यावर किती उन्मादाने वागून, अनेक मूल्याची कशी धूळदाण करतो हे समजल्याने प्रत्येकाने किती दक्ष रहावयास पाहिजे, हे ध्यानी यावे. तरुण पिढीने यातून योग्य तो बोध घ्यावा.

(ओ) महानुभावी वाङ्मयप्रमाणे चक्रधराच्या लीळा ग्रंथामध्ये महाराष्ट्रात खालील ठिकाणी महालक्ष्मी मंदिरे आहेत, असा उल्लेख मिळतो— पैठण, वडेठाण, अष्टि, बीड, हिवरळी, भातापुरी, नव्हेग्राम, खिडुगा, राजणगाव, मिरी, भोकर, आपेगाव, अवळगाव इत्यादि इत्यादि. पण या ग्रंथातरचे आश्चर्य असे की, भक्तांना तो कोणती आज्ञा करतो ती पहा—

**माता कोल्हापुरा न वचावे । तिथें स्वाभिमानिये स्थाने ॥**
**साधकासी विघ्न करिती ॥**

महानुभाव पंथाचे लोक देवीविरोधक दिसत नाहीत. मग 'मातापूर-कोल्हापुराला जाऊ नये आणि देवीचे दर्शन घेऊ नये, साधकाच्या मार्गात विघ्ने येतात' असे त्यांनी का म्हणावे, ते कळत नाही.

कोल्हापूरक्षेत्री महालक्ष्मीचे स्वरूप अत्यंत आकर्षक असे वाटते परमेश्वरी शक्तीच्या ह्या स्वरूपाची मानव अतिशय आनंदाने व उत्साहाने आराधना करीत असतो. तिच्या सान्निध्यात राहून मानवास एक आगळेच विश्व निर्माण करता

येऊन त्या विश्वांत रममाण होऊन जाता येते. देवीच्या प्रेममय कृपाकटाक्षाने मनुष्यास निरतिशय शांति-समाधानाची प्राप्ति होते, पण हे सर्व मिळण्यास या जगन्मातेच्या ठायी दृढविश्वास आणि नितांत श्रद्धा मात्र असली पाहिजे.

अभंग

दक्षिण भागीं पवित्र । नामे कोल्हापूर क्षेत्र ।।
कोल चोल वस्ती जुनी । केली अनार्ये जनांनीं ।।
कोल जन नामवरी । नाम आले कोल्हापुरी ।।
जगदंबा महालक्ष्मी । महाद्वारीं वंदावी ।। १ ।।
पुराणांत दिली कथा । कोल्हासूर दैत्य होता ।।
करवीर त्याचा पुत्र । छळी जनासी सर्वत्र ।।
तया वधाया कारणे । जगदंबा जन्मा घेणे ।।
दैत्य स्मृतीचे कारणे । नाव करवीर घेणे ।। २ ।।
कधि अवतार झाला । नाही कुणि जाणितला ।।
म्हणोनि तूं अनाद्यंत । भक्त समस्त मानीत ।।
पाच सहस्रा वर्षांवरी । जन्मकाळ कोणी धरी ।।
नको आम्हां पंचाईत । कृष्णसुत हा वदित ।। ३ ।।

द्रुतविलंबित

यवन दैत्य जई करि राज्य ते । लपविली तव मूर्ति कुठें कुठें ।।
कधिं भुयारी कधी गावि कोंडली । हरविली परि मूर्ति पळापळीं ।। ४ ।।
निरखिताचि स्वरूप गमे तुजे । मुख किरीट कुणां गमतो दुजे ।
नरतनू इव देहिस पालट । विधिलिखीत चुके नच दुर्घट ।। ५ ।।

पृथ्वी

सदा कमळपद्म आसनींच वास आहे तुला ।
सहस्र नयना गदा-परशु-पद्म-घंटा शुला ।।
सुदर्शन-सुदंड-शक्तिमसि कुंडिकाधारिणी ।
तुवां असुर सैरभा वधियला महालक्ष्मी ।। ६ ।।
स्वरूपहि प्रगाढसे सजविले तुजे लक्ष्मी ।
अरक्त-वसनात आसनहि पुष्प पद्मासनीं ।।

धरीत अठरा भुजा अमित शस्त्र ती तोलुनी ।
किरीट शिरिं चंद्रकोर सहिता, तुला मीं नमी ॥ ७ ॥

अनुष्टुभ

सिंहासन तुझें शोभे । उंची तीन फुटी उभे ।
स्वरूप साजरी मूर्ती । उंचीला चार फूट ती ॥ ८ ॥
पाषाण मूर्तीही काळी । महालुंग गदा धरी ।
पानपात्र आणि ढाल । आयुधें शोभती करीं ॥ ९ ॥
अंगाच्या किरिटीं कोरी । योनिची आकृती वरी ॥
मृगेंद्र दृष्टी सामोरी । वामावर्तीच देखिती ॥ १० ॥
फणी नागाकृती मोठी । प्रभावळ प्रभावटी ॥
अनेक जडित रत्ने । रिचयितही कोदणें ॥ ११ ॥
सभामंडप विस्तीर्ण । असंख्य स्तंभ उभवी ॥
कलाकुसरी पूर्ण । सुनक शिल्प शोभवी ॥ १२ ॥
जय नि विजय मूर्ती । तव द्वारीच तिष्ठती ॥
आकर्षुनी मने घेती । सभा मंडपि डोलती ॥ १३ ॥
माघमासीं अस्तकाळीं । रविकिरण झाकळी ॥
त्या तेजे न्हातसे देवी । आरक्त कांती पालवी ॥ १४ ॥
वासंतिक शारदीय । प्रमुख उत्सव तुझें ॥
नवस कामना देवी । भक्ताची पुरवितसे ॥ १५ ॥
मराठमोळ वीरांची । अंबा स्फुरणदायिनी ॥
जय भवानी जय अंबा । घोषानें शत्रू ठेचिती ॥ १६ ॥

गीति

कात्यायनी तव स्वसा वाळिगे नाम टेकडि राहे ।
दूजीहि टेंबलाई देवी नांदेचि टेंबलाई स्थळे ॥ १७ ॥
गिरी शिखर ज्योतिबांचें, कोल्हासुर मरणस्थान दुष्टांचे ॥
सर्वा पाप विनाशा, स्नान करावेच पंचगंगेचे ॥ १८ ॥

युथिका

महालक्ष्मीस घडो नित दर्शना । महालक्ष्मीस असो नित वंदना ॥
महालक्ष्मी चरणिं विनती सदा । कृष्णसूत नमावि शिर या पदा ॥१९॥

## (३४) महीकावती

ही अतिप्राचीन म्हणजे रामायणकालीन देवता आहे. रावणाचे राज्य जरी लंकेत असले, तरी त्याचे सीमेवरील पहारेकरी फार लांबवर पसरलेले होते. हे अहिरावण, महिरावण यांच्या कथावरून दिसून येते. ते सर्वच कुटुंब इकडे असले पाहिजे. कारण त्याच्या भगिनी शूर्पणखा व त्राटिका याही त्याच्याबरोबर दंडकारण्यातच होत्या. रामलक्ष्मणांना या रावणांनी पकडून महिकावतीच्या मंदिरात बळी देण्यासाठी त्यांना आणण्यात आले. परंतु स्वामिभक्त हनुमानाला हा वृत्तांत समजताच तो त्या घोर आणि अवघड मंदिरात एकटाच शिरला. त्याने देवीला तिच्या स्थानावरून उपटून तिला पालथे पाडले आणि रामलक्ष्मणांना सोडविले, इत्यादि पौराणिक कथा सर्वांना विदितच आहेत.

असे हे शक्तिपीठ आहे तरी कोठे? पालघर (जि. ठाणे) या रेल्वे स्टेशनावर उतरून पश्चिम दिशेला सुमारे दीड मैल गेल्यावर केळवे माहिम या नावाचा गाव आहे. त्या गावी ही देवता आहे मंदिर आणि पालघर त्यामध्ये खाडीचा भाग येतो त्यामुळे ओहोटीच्या वेळी ताग्यामधून खाडीपार होता येते. या भागास पालघर गावाचा स्मशानभाग म्हणतात. खाडीपलीकडील रेठा-मारल्या भागात थोडीशी वस्ती आहे.

प्राचीन मंदिर कालांतराने नामशेष झाले असून तो सर्व भाग आता सागराच्या पाण्याने व्याप्त आहे. काही वर्षांपूर्वी त्या मंदिराचा पाया व एक खांब पाण्यात लांबवर दिसत होता सांप्रतचे मंदिर हे नवीन बांधणीचे असून त्याची व्यवस्था श्री. पारायणे नावाच्या गृहस्थाकडे आहे. त्याच्या संग्रही या स्थानाबद्दल जुने कागदपत्र असल्याचेही समजते. मंदिरातील गाभाऱ्यात देवीच्या मूर्तीचे फक्त मुखच पाहावयास मिळते आणि मागील बाजूस, मंदिराच्या बाहेर सुमारे दहापंधरा फूट अंतरावर सागराच्या कडेला देवीचे पाय दिसतात. याचे कारण असे देतात की, हनुमानाने देवीला पालथे पाडले. परंतु तिला कोणीच सरळ करू शकले नाही. कारण देवीचा आकार अतिशयच भव्य होता. यास्तव देवीचा देह जमिनीत गाडलेला असून मुख गाभाऱ्यात आणि पाय समुद्र किनारी दिसतात.

तसेच त्या विवराजवळ अहिरावण व महिरावण यांचे मारुतीबरोबर युद्ध झाले ते विवर-सांप्रत जे पाण्याने भरलेले असते-पाहावयास मिळते. मारुतीने आणलेली प्रचंड शीळा आणि मूळ देवस्थानचे भग्नावशेष, खाडीच्या पात्रात पाहावयास मिळतात.

या पौराणिक कथेमधील शंका अशी की, राम-लक्ष्मण आणि हनुमान याची भेट दक्षिण चंपानगरी भागात झाली तसेच राम-रावण युद्धाच्या वेळी आपल्या शत्रूला नेस्तनाबूत करण्यासाठी, दशमुख रावणाने, अहिरावण–महिरावणाची मदत घेतली. त्या राक्षसानी रामलक्ष्मणाना उचलून आपल्या देवते समोर बळी देण्यासाठी नेले. मातृकादेवीच्या मंदिरात त्याना बंदिस्त केले आणि हनुमंताने, तेथून त्याची सुटका केली

याचा संदर्भ लावायचा तर असे म्हणता येईल की, अहिरावण, महिरावण हे माहिम प्रांताचे रावणाचे सुभेदार असावेत. प्रत्यक्ष युद्धामधे सहाय्या साठी लंकेमध्ये गेले आणि राम लक्ष्मणाचे हरण करून परत आपले प्राती येऊन, मातृकादेवीसमोर त्यास उभे केले. हनुमंताने या स्थळी येऊन आपल्या रामप्रभूची सुटका केली

महिकावती ही मूळ मातृकादेवी होय आणि या देवीला नरबळी देण्याची चाल होती, हे आपणाला 'नरबळी' या प्रकरणात दिसून येईल. याचसाठी रामलक्ष्मणाला या ठिकाणी आणण्यात आले असावे. हे एक जागृत स्थान मानले जाते.

महिकावती नगरी प्रसिद्धीला येण्याचे कारण म्हणजे एके काळी ते राजधानीचे शहर होते. गुजराथमधील अणहिलवाड पाटण, येथील सोलंकी अगर चौलुक्य वंशानंतर तेथे प्रतापबिंब हा राजा शास्ता होता. येथे 'बिंब' हे त्या राजाचे आडनाव होय. सन ११३८ च्या सुमारास त्याने अनेक मराठे सरदाराना–केशवराव, आनंदराव, गंभीरराव इत्यादींना १०००० ची फौज देऊन उत्तर कोंकणप्रांत शिलाहाराकडून जिंकून घेण्यासाठी पाठविले. या सरदाराना गोत्रावळी असून त्याच्या योगेश्वरी, कालिका, ललिता, कुमारिका इत्यादि निरनिराळ्या कुलदेवता होत्या. ते सोमवंशीय, सूर्यवंशीय व शेषवंशीय असल्याचे सविस्तर नमूद केलेले आहे.

या सरदारांनी पैठणमार्गे दमणमध्ये प्रवेश करून नंतर ठाणे राजधानीतील यशवंतराव शिलाहाराचा पराभव केला विजयानंतर प्रतापबिंब कोंकणात आला आणि त्याने माहीमच्या रम्य वनश्रीमध्ये राजधानी स्थापन केली, पण ती फार काळ टिकली नाही कारण सुरतेच्या उत्तरेस असलेला लाट देश राष्ट्रकूट घराण्याने जिंकून घेतल्यावर प्रतापबिंबाला त्याने वसईच्या खाडीच्या दक्षिणेलाच कोंडून ठेवले त्या वेळी त्याच्या सत्तेत वाळकेश्वर–बाणगंगेपर्यंतचा सर्व मुलूख होता. या राजाने एक उत्कृष्ट गोष्ट केली, ती म्हणजे मुंबई बेटात वसाहत वसविली. शिलाहारांच्या आपापसातील दुहीमुळे हा प्रदेश उध्वस्त आणि

निर्मनुष्य झाला होता तेव्हा बिंबाने ६६ कुळे—त्यामध्ये २७ सोमवंशीय, १२ सूर्यवंशीय, ९ शेषवंशीय—वाणीउदीम करणारी माणसे, लाड, गुर्जर, वैश्य, पाचाळ, दैवज्ञ, घोडेल, मोढ इत्यादि मंडळी गुजराथमधून आणली. तसेच पैठण येथे सोमवंशीय राजे त्याचे स्नेही असल्यामुळे, त्याने तेथून शास्त्री, पंडित, वैदिक, आचार्य, उपाध्ये मंडळींना आणले आणि त्यांना वृत्ति नेमून दिल्यामुळे उत्पन्नही वाढले आणि राज्याला थोडेसे स्थैर्यही आले. ६६ कुळे आणली म्हणून या भागाला साष्टी हे नाव मिळाले

कान्हेरी येथे काळभैरवी जोगेश्वरीच्या ठिकाणी सिद्धाश्रम पाहून आणि पुरातन काळी तेथे राजधानी होती हे जाणून, त्या काळी काही वेळ प्रतापबिंबाने वस्ती केली त्यानंतर त्याने आपली राजधानी माहीम मुंबई येथे आणली.

मुंबई प्रांती येऊन राज्यकारभार पाहू लागल्यावर त्याने महिकावती भागातील बरीचशी दैवते व नावे या नवीन भागास दिली जसे सितळादेवी, वाळुकेश्वर, काळकादेवी, महालक्ष्मी, ही दैवते व मुगभाट, जांभूळवाडी, पणसवाडी, माहिम ( पूर्वीचे नाव नेवाळे ), वरळी ( वडराई ) इ० इ० यातील काही दैवते नंतर दक्षिणेकडे सरकलेली दिसतात सन ११४७ साली तो स्वर्गवासी झाल्यावर त्याचा पुत्र महिबिंब याने ६५ वर्षे राज्य केले. सन १२१२ साली तो परलोकास गेला. त्याने चौलच्या भोजराजाचा पराभव केलेला होता. त्यानंतर त्याचा सरदार केशवदेव याने १२ वर्षे राज्य केले आणि त्यापुढील काळात यावनी अमल चालू झाला शेवटी वडनगरच्या निकामलिकने सन १३४८ साली मराठ्यांचा पराभव केला आणि मराठी सत्ता संपुष्टात आली

हाच भाग केशवाचार्यांनी जी बखर लिहिली तीमध्ये आला आहे. त्याच बखरीचा आधार घेऊन इतिहाससंशोधक श्री. वि का राजवाडे यांनी 'महिकावतीची बखर' हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाच्या लेखकाने मोठ्या महत्प्रयासाने ती बखर मिळविली पण त्यामध्ये देवीच्या नावाचा साधा उल्लेखही आढळला नाही. तेव्हा या उदाहरणावरून नुसत्या दीपकावरून देवीस कसे धरायला होते, हे ध्यानी आले

बखरीतील वरील वृत्तातावरून एवढे मात्र निश्चितपणे म्हणता येते की, दहाव्या शतकाच्या पूर्वी काही मराठ्यांची घराणी पाटण अणहिलवाड या ठिकाणी वस्ती करून होती, चालुक्यवंश आणि निंब घराणे ही त्यांच्यापैकी होत. चालुक्यांनी गोव्यातील कदंब राजघराण्याशी सोयरीकही केलेली होती आणि त्यामुळेच त्यांना उत्तर कोंकणावर स्वारी करून प्रांत काबीज करण्याची इच्छा झाली. ही घराणी लाट देशात केव्हा व कशी गेली त्याचा अजिबात उलगडा होत नाही.

(३५) मीनाक्षी

नानायोगिमुनींद्रहृन्निवसतीं नानार्थसिद्धीप्रदाम् ।
नानापुष्पविराजितांघ्रियुगुलां नारायणेनार्चिताम् ॥
नादब्रह्ममयीं परात्परतरां नानार्थतत्त्वात्मिकाम् ।
मीनाक्षीं प्रणतोऽस्मि सन्ततमहं कारुण्यवारानिधिम् ॥
(श्री शंकराचार्य)

'दयेचा सागर, अनेक ऋषिमुनींच्या हृदयात निरंतर वास करणारी, अनेक सिद्धि प्राप्त करून देणारी, पदयुगुले पुष्पांच्या ढिगान्याखाली झाकून गेलेली, प्रत्यक्ष नारायण पूजा करीत असलेली, स्वतः नादब्रह्म असलेली आणि परात्पर असून जी श्रेष्ठ आहे, अशा मीनाक्षी देवीला माझा नमस्कार असो.'

या देवीच्या जन्माबद्दल अनेक कथा आहेत. त्यापैकी काही खाली दिलेल्या आहेत.

प्राचीन काळी विद्यावती नावाच्या अप्सरेने उग्र तपश्चर्या करून पार्वतीला प्रसन्न करून घेतले आणि तिच्याजवळ असा वर मागितला की, 'प्रत्यक्ष आदिमायेने माझ्या पोटी जन्म घ्यावा.' पार्वतीने ही गोष्ट मान्य केली आणि तिला सांगितले की, 'तू मानववंशात जन्म घे, म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल.' त्याप्रमाणे विद्यावतीने दक्षिणेतील चोलवंशीय राजा शूरसेन याच्या पोटी जन्म घेतला. जन्मानंतर तिचे नाव कांचनमाला असे ठेवण्यात आले. कांचनमाला उपवर झाली आणि शूरसेनाने तिचा विवाह पांड्यवंशातील मलयध्वज राजा बरोबर करून दिला या राजास अनेक रायका आणि रखेल्याही होत्या. परंतु इतक्या स्त्रिया असूनही त्यास एकादी पुत्राची प्राप्ति झाली नाही तेव्हा पुत्र प्राप्तीसाठी त्याने पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याचे योजिले.

यज्ञाची पूर्वतयारी झाली मोठ्या गाजावाजाने आणि समारंभाने तो यज्ञ पूर्ण होत आला पूर्णाहुतीच्या वेळी यज्ञकुंडातून एक कमळपुष्प वर आले

आणि त्यातून एका सुंदर बालकाचे आगमन झाले. हे बालक म्हणजे एक मुलगी होती. तिचे नेत्र सुंदर, तरल आणि कमळासारखे टपोरे होते. या मुलीचे नाव ईश्वरी ऊर्फ तटातका असे ठेवण्यात आले. ही मुलगी म्हणजे एक देवी अवतार असल्यामुळे तिला तीन स्तन होते. मलयध्वजाला ही एकुलती एकच मुलगी असल्याने त्याने आपले सर्व राज्याधिकार यथाप्रकाश या मुलीच्या स्वाधीन केले. राजपुत्राप्रमाणे आपणही मुलुखगिरी करावी आणि पराक्रम गाजवावेत, या हेतूने तिने सैन्यासह राजधानीबाहेर कूच केले. अनेक राजेरजवाड्यांना नाक घासायला लावून तिने आपले सैन्य उत्तरेला कैलास पर्वतापर्यंत नेऊन भिडविले.

रुद्रगणाचा सेनापति नंदी सामन्याला उभा ठाकला. पण थोड्याच वेळात त्याचा पराभव झाला. नंदीचा पराभव झाल्याचे वृत्त ऐकताच साक्षात् शंकरांनी कंबर कसली, पण युद्धाला सुरुवात होणार इतक्यात ईश्वरीला आपल्या पूर्व जन्माचे स्मरण झाले. ती स्वत म्हणजेच गतजन्मीची शंकराची पत्नी आदि मायाच होती पतीला समोर युद्धासाठी पाहाताच तिचे धैर्य खचले दोघांची दृष्टादृष्ट होताच त्यांना एकमेकांची ओळख पटली आणि युद्धास मग तिथेच स्वाभाविकपणे पूर्णविराम मिळाला आपला पति लाभताच तिला अखंड पति-सहवासाची स्त्रीसुलभ ओढ लागली आणि परत राजधानीस जाण्याचे नाकारून तिने कैलासावर राहण्याचे ठरविले. परंतु शंकरांना हे रुचले नाही त्यांनी तिची समजूत घालताना तिला म्हटले, 'तू सध्या मनुष्यरूपाने भूतलावर अवतरली आहेस तेव्हा तुला हा अवतार पूर्ण केलाच पाहिजे तू मदुरेला परत जा. मी तेथे सुंदरेश्वर रूपाने येऊन तुजबरोबर विवाह करीन आणि तेथेच वास्तव्य करून राहीन 'शंकराचे हे आश्वासन ऐकल्यावर कोठे तिला समजूत पटली आणि ती परत मदुरेला आली याच कारणास्तव मीनाक्षी मंदिरात सुंदरेश्वराचेही देवालय आहे. तिचे नेत्र मीनासारखे तरल असल्यामुळे ती मीनाक्षी या नावाने विख्यात झाली

('मीनाक्षी-कन्या' प महादेवशास्त्री जोशी).

'हलस्य महात्म्यम्' आणि 'भिरुविलायादल पुराणम्' (तामीळ) यामध्ये मीनाक्षीचे वर्णन आढळते. प्राचीन काळी या प्रांताला कदंब-वन म्हणत असत यास्तव मीनाक्षीला कदंब–वनवासिनी असेही दुसरे एक नाव आहे यासंबंधीची कथा अशी मनवूर गावचा धनराज नावाचा श्रीमंत व्यापारी, या वनभागातून परत येत असताना एके ठिकाणी शिवलिंगाची पूजा करीत बसलेले इंद्रदेव त्याला दिसले आपल्या गावी परत आल्यावर त्याने ही गोष्ट –एक अद्भुत गोष्ट म्हणून– पांड्यवंशीय राजा कुलशेखर याला कळविली. राजा ईश्वरभक्त असल्याने त्यालाही आश्चर्य वाटले आणि याची प्रचिती घेण्यासाठी त्वरितच तो त्या वनात गेला

धनराजाने सांगितलेल्या नि स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेल्या त्या जागेवरील पूजा संपलेली होती. त्यामुळे राजाला कोणीच दिसले नाही, पण पिंडीचे सूक्ष्म निरीक्षण करता त्या पिंडीवर पंचामृत स्नानाच्या वेळी घातलेल्या मधाचे तुषार खाली गळत गेलेला तुटक मार्ग त्याला दिसला राजाने इतरत्र पुष्कळ शोध केला. पण व्यर्थ ! इंद्रदेव त्याला काही भेटले नाहीत मधाचे थेंब खाली सांडलेले सापडले, म्हणून त्या गावाचे नाव मदुराई असे ठेवण्यात आले. मंदिराचा घेर निश्चित करण्यासाठी त्याने एक युक्ति योजली एका सर्पाला दूध प्यावयाला देऊन त्याने त्याला सोडून दिले तो सर्व जमजसा आणि जेरढथा क्षेत्रातून फिरला तेवढे क्षेत्र राजाने मंदिरासाठी निश्चित केले शेवटी एका विवक्षित जागी तो सर्प वेटोळे घालून रुसला त्या जागी राजाने मीनाक्षीचे मंदिर उभारले

सुंदरेश्वर-मीनाक्षी औपचारिक विवाह झाल्यावर ती दोघे एकांतात बसली असता शंकराची दृष्टि तिच्या स्तनभागावर पडली त्याबरोबर तिचा तिसरा स्तन पूर्वीच्या वरानुसार नष्ट झाला तसेच या दोघांच्या विवाहाच्या वेळी अमाप अन्न शिजविले होते. अनेक भक्तांनी प्रसाद घेतल्यावर जे अन्न शिल्लक राहिले त्याचे काय करावे ही पंचायत पडली तेव्हा शिवाचा उपासक गुंडोदर तेथे आला आणि त्याने सर्व अन्न खाऊन टाकले एवढे अन्न खाऊनही त्याची भूक शमली नाही. म्हणून अन्नपूर्णादेवी स्वतः तेथे प्रकटली आणि तिने त्याची क्षुधा शांत केली या कृत्याची स्मृति म्हणून सभामंडपात एक खांब दाखविला जातो त्याला 'अन्नकुली' असे म्हणतात

मीनाक्षी मंदिराच्या परीसरात एक तळे असून त्याभोवतालच्या सज्जात देवतांच्या लीलांची ६४ रंगीत चित्रे काढलेली आहेत अनेक प्रसंगाचे वर्णन त्या चित्रांतून दिसते या ६४ कथांचे सविस्तर वर्णन श्री पी व्ही अय्यर यांनी लिहिलेल्या 'दक्षिण भारतातील मूर्ति' या ग्रंथामध्ये दिलेले आहे [1] त्यातील एक कथाभाग नमुन्यादाखल देवीच्या उत्पत्तीसंबंधी आहे, तो येणेप्रमाणे

अनेक यज्ञ करून मिळविलेल्या पुण्याईच्या बळावर नहुष राजाला इंद्रपद प्राप्त झाले, साहजिकच इंद्रपत्नी शची ही त्याची नायको बनली कारण इंद्रपदा वरील व्यक्ति जरी बदलली तरी पत्नीपद मात्र कायम तिजकडे राहते, पण ती पत्नी म्हणून त्याच्याबरोबर नांदावयास तयार होईना कारण तिला शंभर टक्के आशा होती की, आज ना उद्या नहुषाचे पुण्य संपेल आणि आपला पूर्वपति इंद्र आपल्या पदावर विराजमान होईल यांनीने नहुषाला नकार देताच ता

---

१ टीप—१२ व्या शतकात पांड्यवंशीय राजा सुरेंद्र याने ८००० जैन धर्मीयांचा छळ केला व त्यांची चित्रेही चितारलेली आहेत

तिच्या पाठीस लागला. शची पुढे आणि नहुष मागे अशी ती दोघे पळू लागली. पळता पळता दोघेही कदंब वनात आली. इंद्रपद गेल्यामुळे कर्मधर्मसंयोगाने इंद्रही याच वनात येऊन शिवलिंगाची आराधना करीत बसला होता. त्याची पूर्ण खात्री होऊन चुकली होती की, या तपश्चर्येचे फळ म्हणून आपले इंद्रपद आपल्याला परत मिळणारच. शिवाच्या आराधनेमुळे त्याच्या पातकाचा नाश झालेला होता आणि शचीचा पाठलाग केल्यामुळे नहुषाचे पाप वाढले होते. इंद्र व त्याची पत्नी शची या उभयतांची भेट झाल्यावर ती दोघे स्वस्थानी गेली. ज्या शिवलिंगाची इंद्र पूजा करीत होता तेच सुंदरेश्वर या नावाने प्रसिद्ध झाले.

(History of Indian and Eastern Architecture)

भारतामध्ये मीनाक्षीचे मंदिर हे शिल्प आणि भव्यता याबद्दल प्रसिद्ध आहे. फेर्गोसनसारखे प्रवासी या क्षेत्राला मुद्दाम भेट देतात ते याच कारणासाठी. असे जरी असले तरी या मंदिरावरही यवनांची वक्रदृष्टि पडली होतीच. दिल्लीचा बादशहा मलिक अल्लाउद्दीन याने सन १३१० च्या सुमारास दक्षिणेवर स्वारी केली, त्या वेळी त्याने देवालयाचा गाभाऱ्याशिवाय इतर सर्व भाग पाडून टाकला.

विजयनगरच्या साम्राज्याचा नाश झाल्यावर, तेथील अनेक सरदारांनी जिंजी, तंजावर, मदुराई इ० भागात आपली छोटी छोटी राज्ये स्थापन केली आणि ते शासक बनले. तामीळ भाषेत शासक याला नायक हे अभिधान लावतात, त्यामुळे ते नायक बनले. कालांतराने म्हैसूर प्रांताचा सेनापती कपन उदयार याने मुसलमानांबरोबर सतत ५० वर्षे युद्ध देऊन, शेवटी त्यांना पिटाळून लावले. मदुरा मंदिराचा बाह्य भाग जरी यवनांनी उध्वस्त केला होता, तरी गाभारा सुरक्षित होता, यामुळे सेनापतीला मानसिक समाधान मिळाले. त्याने या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची कामगिरी तिरुमलाई नायकावर सोपविली आणि त्यानेही तन मन धन अर्पण करून ती पुरी केली. याबाबतीत सांप्रतच्या मंदिराचा शिल्पकार त्यालाच मानतात. असे सांगतात की, हे बांधकाम पूर्ण होण्यास १२० वर्षांचा कालावधी लागला असून सुमारे १ कोटी २० लक्ष रुपये खर्च आला आहे. सन १६२८–३५ पर्यंत हे शिल्पकाम सुमंत शीरमूर्ती यांच्या नेतृत्वाखाली झाले आहे. येथील शिल्पाची तुलना प्राचीन ग्रीक शिल्पांबरोबर केली जाते, कारण रचना आणि सौंदर्य यांचा इतका सुंदर मिलाफ अन्यत्र पाहावयास मिळत नाही. सांप्रत भारत सरकारचे लक्ष या प्राचीन शिल्पाकडे गेले असून सन १९६० साली गोपूर व इतर दुरुस्तीसाठी वीस लक्ष रुपये मंजूर केले आहेत.

पुढे १६ व्या शतकात तिरुमल नाईक (सन १६२३–५९) घराण्याने सांप्रत दिसत असलेले मंदिर बांधले. एकूण २२ गिघे जमिनीवर सर्व मंदिराचा पसारा असून ८४७ × ७३० चौ. फुटाचा चौरसचौरस भाग आहे. मूर्तीच्या

संरक्षणासाठी, देवालयासभोवती २० फूट उंचीची भिंत बांधलेली आहे. मंदिराच्या परिसरात एकूण १४ गोपुरे असून सर्वांत उंच गोपूर ११ माळ्याचे आहे व त्याची उंची १९० फूट आहे. मध्यभागी सहस्रखांबी सभामंडप आहे. ( प्रत्यक्षात मात्र ८८५ खांब आहेत. ) प्रत्येक खांब कुरुंदी दगडाचा असून त्यावर अति कुशलतेने कोरीव काम केलेले आहे. या सभामंडपाला 'अयराकल' असे म्हणतात. हे पडण्याचे कारण असे की, अयरा नायक व मुडाली नाईक यांनी तो सन १५९० साली बांधला तिरुमल नायकाने त्याच्या आधी बांधलेल्या या मंडपात अनेक सुधारणा केल्या. खांबाप्रमाणेच मंदिरालाही कुरुंदी दगडच वापरलेला आहे.

मंदिराच्या प्रवेशद्वाराला अष्टशक्ति मंडप असे म्हणतात. कारण त्यामध्ये अष्टशक्तींची चित्रे कोरलेली आहेत. ज्ञानशक्ति, बलशक्ति, बुद्धिशक्ति, इच्छाशक्ति इत्यादि मीनाक्षीच्या उपशक्ति असून त्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतात, असा अनेकांचा अनुभव आहे.

या अष्टशक्तींची नावे खालील प्रमाणे आहेत

श्री, भू, सरस्वती, प्रीति, कीर्ति, शांति, तुष्टि आणि पुष्टि अशा मानलेल्या आहेत. अनुक्रमे त्या संपत्ति, पृथ्वी, विद्या, प्रेम, कीर्ति, शांति तृप्ति व बळ यांच्या देवता होत त्या मंदिराप्रमाणेच दक्षिणेतील इतर मंदिरातही यांच्या मूर्ति आढळून येतात या चतुर्भुज असून, वरच्या दोन्ही हाती कमळे, व खालचे दोन हात अभय वरद मुद्रा दाखवितात. दीप्ति, सूक्ष्मा, जया, भद्रा, विभूति, निर्मला, अमोघा, व वितुष्णा याप्रमाणे अष्टशक्तींचा दुसरा एक पाठ आहे. ( भारतीय सांस्कृतिक कोश, भाग १, पृ. ३१७ )

मीनाक्षीची मूर्ति कलापूर्ण असून तिचा नेत्रभाग अतिशय सुंदर आहे. भक्तांची अशी निष्ठा आहे की, ज्याप्रमाणे जलातील मासा आपल्या संततीचे रक्षण एका साध्या दृष्टिक्षेपाने करतो, तद्वतच आपल्या भक्तांचे रक्षण मीनाक्षीदेवी केवळ एका कृपाकटाक्षाने करते. चंडिका पुराणाप्रमाणे या देवीने मीनासुर दैत्याचा वध केला म्हणून तिला मीनाक्षी हे नामाभिधान मिळाले.

देवीची मूर्ति संपूर्ण उभी असून, द्विभुजा आहे. एका उंच संगमरवरी चबुतऱ्यावर कमळातून उत्पत्ती झाली हे दर्शविण्यासाठी तिचे दोन्ही पाय कमळा मध्ये आहेत. डावा हात खाली असून, उजव्या हाती एका ल्हानशा चबरीवर पोपट बसलेला आहे. मेहरपी कमान नक्षीदार व कलापूर्ण शिल्पाची आहे. एका बाजूस गणपति आणि दुसरे बाजूस सरस्वतीच्या मूर्ति असून, कमानीवर दोन किन्नर दाखविले आहेत. मुलायम शिल्प असल्याने मूर्तीकडे पाहात रहावेसे वाटते.

पूर्वेकडील गोपुरामधून भक्तगण मंदिरात प्रवेश करतो इंद्राने वृत्राचा वध केल्यावर त्याच्यामागे जी ब्रह्महत्या लागली तिला चुकविण्यासाठी इंद्राने

याच प्रवेशदरवाजातून मंदिरात प्रवेश केला आणि तो कमल सरोवरामध्ये लपून राहिला. भक्ताने मंदिरात प्रवेश केल्यावर अनुक्रमे नगारा मंडप, मीनाक्षी नायकम मंडप, अंधेरामंडप, पुरुषमृगमंडप इत्यादि मंडपामधून गेल्यावर मीनाक्षी देवींच्या महामंडपात जाता येते. सहस्रमंडपामध्ये मनुष्याच्या आकाराच्या अनेक शिवभक्तांच्या मूर्ति असून देवतांच्याही मूर्ति आहेत. त्यापैकी वीणाधारी सरस्वतीची मूर्ति फारच रम्य आहे. शतमंडपातील खांबावर नायक वंशातील राजांची आणि राण्यांची चित्रे कोरलेली आहेत. सुंदरेश्वर मंदिराच्या बाहेरील बाजूस कदंब वृक्षाचे झाड असून याच वृक्षाखाली सुंदरेश्वरांनी पार्वतीचे पाणीग्रहण केले असे सांगतात. मीनाक्षी-कल्याणमंडपात दरवर्षी चैत्र महिन्यात मीनाक्षी-सुंदरेश्वर विवाहसमारंभ साजरा केला जातो. (कल्याण, क्षेत्रअंक, ५७।३८४.)

दक्षिण प्रदक्षिणेच्या वाटेवर डाव्या बाजूला पाच अखंड पाषाणाचे जे स्तंभ आहेत, त्यांना ' संगीत स्तंभ ' म्हणतात. प्रत्येक स्तंभावर एक वाघ आणि अनेक लहान लहान मूर्ति कोरलेल्या आहेत. प्रत्येक स्तंभाजवळ पुन्हा अखंड शिळेचे लहान लहान सात स्वरस्तंभ असून, त्यावर पाषाणाने अगर हातोडीने आघात केल्यास निरनिराळे सुरेल स्वर यात्रिकांचे कान मोहून टाकतात.

(पुरुषार्थ मासिक, दिवाळी अंक, १९६३).

अशी एक कथा प्रचलित आहे की, तिरुमल नायक एकदा कफ विकाराने आजारी असता सर्व वैद्यकीय उपचार त्याजवर करण्यात आले, परंतु गुण येईना. त्या वेळी मीनाक्षी देवीने त्याला स्वप्नात येऊन दृष्टांत दिला की, ' मुख्य सभामंडपाच्या शेजारी दुसरा सभामंडप बांधून त्यामध्ये राजसचिवालय हलविल्यास, तो असाध्य रोग बरा होईल. ' नायकाच्या घरात पूर्वीपासूनच देवीची उपासना चालू होती. त्यामुळे दृष्टांतावर पूर्ण विश्वास ठेवून मंदिराच्या पूर्व बाजूला दुसरा मंडप त्याने बांधला आणि त्याचे नाव ' पुदु-मंडप ' असे ठेवले. त्या मंडपाचा व्याप ३३०×१०५ चौ. फूट असून मंडपात १२४ कलापूर्ण खांब आहेत. हे खांब उरुंदी दगडाचे असून वीस फूट उंचीचे आहेत. त्या सर्व खांबावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे.

सुंदरेश्वराला सोकालिंगम असेही एक नाव आहे. हा देव मूळचा द्रविडी लोकांचा असून, आर्यांनी तो आत्मसात केला असे दिसते. सुंदरेश्वराचा विवाह मीनाक्षीबरोबर झालेला आहे. काहींचे म्हणणे असे आहे की, मीनाक्षी ही पूर्वजन्मीची राक्षसीण होती आणि युद्धात ठार झाल्याने पुढील जन्मी ती मानव कुळी जन्माला येऊन मान्यता पावली. (या विधानाला पुरावा मात्र मिळत

नाही ). आर्य व द्रविडीअन संस्कृतींचे मिश्रण म्हणून हे उदाहरण दिले जाते, असे वाटते.

याच संदर्भात पुढील कथाभाग उपयोगी पडण्यासारखा आहे. अलहन राक्षस या नावाचा मीनाक्षीचा भाऊ होता. सध्या त्याचे ठिकाण मीनाक्षीच्या जवळपासच आहे. मीनाक्षीच्या विवाहाचा जो लग्नसोहळा दरवर्षी साजरा करतात, त्या प्रसंगी या भावाला निमंत्रण देण्यात येते. पण मूळ कथेत तो ज्याप्रमाणे लग्नप्रसंगी उशीरा आला होता, त्याप्रमाणे येथेही तो एक दिवस उशीरा आणला जातो. त्या वेळी त्याचा मुक्काम गावाबाहेर होतो. तेथील त्याच्या तीन दिवसाच्या वास्तव्यात गावकरी पूजासाहित्यासह तेथे जातात आणि त्याची पूजाअर्चा करतात. आर्य, अनार्य आणि दैत्य यांच्या मिश्रणाचा हा समारंभ, उदाहरण म्हणून दाखविला जात असावा. गावाबाहेर जेथे तो उतरतो, तेथे कालीमातेचे लहानसे मंदिर आहे. तीन दिवसांच्या पूजनानंतर अलहन राक्षस परत आपल्या स्वस्थानी जातो. (मद्रास जिल्हा गॅझेट, १९०६ )

असले पाहिजेत त्या पंथाचे ते आदिशक्तीचे स्वरूप होय. मथुरेमध्ये वसुधरा या पृथ्वी मातेच्या मंदिरात देवीच्या हातात माशाची जोडी आहे. जयपूरजवळील रायर या गावी केलेल्या उत्खननामध्ये हातात मासे धरलेल्या देवतांच्या विपुल आकृत्या सापडलेल्या आहेत. जैन धर्मात जी आठ शुभचिन्हे दाखविली आहेत, त्यापैकी मीन हा जास्त फलोत्पादन करणारा आणि प्रवासी वृत्ति वाढविणारा प्राणी मानलेला आहे. चीनमध्ये मीन-यँग या जोडीने सर्व प्राणिमात्राची उत्पत्ति केली असे मानतात. त्यांच्या हातातही दोनदोन मासेच आहेत. न्यू गिनीमध्ये न्यू फोर्ट या गावी सार्वजनिक शयनगृहात झोपण्यासाठी ज्या जागा आहेत, त्यांना मासे अगर सर्प या जलचर प्राण्यांच्याच पात्राकृति बसविलेल्या आहेत. अशी अनेक उदाहरणे त्या ग्रंथात रा. दीक्षित यांनी दिली आहेत. मीन संस्कृतीचा हा सर्व पसारा पाहिला म्हणजे भारतातील केवळ मीनाक्षीचे मंदिर प्रथित का, याचा उलगडा आपोआप होतो. मानवी जीवनाला या इतिहासाचा बहुमोल उपयोग आहे, हे निराळे सांगण्याची गरज नाही. शाक्तपंथीयांच्या पंचमकारातही मीन आहेच.

अभंग

विद्यावती नामे अप्सरा होती । जावोनी वनात तप करी ॥
पार्वती प्रसन्न, देती झाली वर । इच्छिले, सत्वर उदरीं येई ॥
उदरीं यावया, आई भूमीतळीं । जन्म घेई कुळीं मानवाचे ॥
चोळवंशी होता शूरसेन राजा । जन्म घे स्वकाजा त्यांचें पोटीं ॥ १ ॥
पांड्यवंशी राजा, मलयध्वज नामा । त्यासवें कांचना लग्न करी ॥
पुत्र प्राप्तीस्तव, पुत्रकामेष्टीला । करितो यज्ञाला राजा तेव्हां ॥
यज्ञकुंडामाजीं प्रज्वळली ज्योत । मानवी स्वरूप तेची होई ॥
तटातका ईश्वरी ठेवियले नाम । कुळीचें भूषण मानियेलें ॥ २ ॥
नृपकन्यकेला पुत्ररूप मानी । करीं दिले त्यांनीं अधीकार ॥
राजपुत्रासम इच्छि पराक्रम । सैन्य जमवोन, जाई दुर्गीं ॥
राजे-राजपुत्र अनेक जिंकोन । संग्रामी घेवोन, मुक्त केले ॥
आगेकूच करी जातसे उत्तरीं । कैलास शिखरीं भिडलीसे ॥ ३ ॥
शिवगण आला, मोड त्याचा केला । नंदी नमविला, ईश्वरीनें ॥
उमानाथ आले, सामोरी प्रत्यक्ष । देखिताची भक्ष, लज्ज गेले ॥
चमत्कार मोठा समयासी झाला । गर्व तो अचला, धैर्यमेरू ॥
पूर्वस्मृती आली ईश्वरी पाहतां । चरण रज माथा धरतेना मी ॥ ४ ॥

विवाह ठरला सुंदरेश्वरासी । धूर्जटी रूपासी त्याच ठायीं ।।
जन्मावरी नेत्र, तरल मीनासरी । म्हणोनी ईश्वरी मीनाक्षी ही ।।
परतोनी दोघे मदुरेसी येती । मंदिरीं नांदती आजवरी ।।
मदुरा मीनाक्षी मोठे शक्तिपीठ । कृष्णसुत त्यासी नमितसे ।। ५ ।।

भुजंगप्रयात

सहस्रावरी ते सभामंडपाला ।
उभे स्तंभ ते सांवरीती छताला ।।
अती रम्यसे शिल्प नेत्रांस करपी ।
पुदु-मंडपा नाम तोही तसाची ।। ६ ।।
तडागामध्ये देवीमूर्ती जयाच्या ।
चहूं बाजूंनी वेष्टितो मार्ग साचा ।।
चितारीत मार्गावरी भव्य चित्रे ।
कलाकार रेखाटिती भक्तिमात्रे ।। ७ ।।
उभ्या अष्टलक्ष्मी तुझ्या द्वारिं आहे ।
तुझें रूप खांबावरी कोरिले हे ।।
तसे कोरिती देविरूपा छताला ।
प्रणिपात मीनाक्षी शक्तीपीठाला ।। ८ ।।

## (३६) मेगुती मंदिर

कर्नाटकामध्ये बदामीपासून १६ मैलावर अईहोळ या नावाचे एक फार प्रसिद्ध स्थान आहे. कारण याला पूर्वेतिहास आहे. परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली हे सर्वांना विदित आहेच. या हत्येमुळे या शूर ब्राह्मणाच्या पदरी जी पापाची पुंजी साठली, तिच्या क्षालनार्थ तो मलप्रभा नदीतरील या क्षेत्री आला तेथे तपश्चर्या केल्याने आणि मलप्रभेच्या पवित्र जलस्नानाने तो पुनीत झाला असे म्हणतात नदीच्या पात्रात ज्या ठिकाणी त्याने तपश्चर्या केली तेथे खडकावर उमटलेली त्याची पावले अद्यापही यात्रेकरूना दिसतात. त्या ठिकाणी परशुरामाच्या परशूच्या आकाराचा एक डोंगराचा कडाही आहे. नदीमध्ये स्नान करताना तो 'आई आई होळी' असे म्हणत असे. त्यावरून या क्षेत्राचे नाव अईहोळ असे पडले. फाल्गुन व. ७ ला या क्षेत्री यात्रा भरते.

जवळच एका टेकडीवर मेगुती देवीचे मंदिर आहे. ते द्रविडीअन बांधणीचे असून, पूर्वी चारी बाजूंना भिंतींची तटबंदी होती. पण आता ती पडून गेली आहे. या मंदिराच्या पूर्व बाजूला एक शिलालेख आहे. त्यावर 'पुलकेशी दुसरा, शके ५५६' असा मजकूर आहे. या लेखातच 'महाराष्ट्र' हे नाव प्रथमतःच लिहिलेले आढळून येते या टेकडीवर दुसरी अनेक मंदिरे आहेत. त्यामध्ये एक दुर्गादेवीचेही मंदिर आहे

हे क्षेत्र प्रसिद्धीला येण्याचे दुसरे कारण म्हणजे येथील गुहा आणि शिल्प. आपणाला माहीतच आहे की, भारतातील गुहेमधील शिल्प हे बौद्धकाळ, जैनकाळ आणि ब्राह्मणकाळ यामधील आहे. एकाच ठिकाणी तिन्ही काळातील शिल्प वेरूळप्रमाणे याही ठिकाणी पहावयास मिळते. इतर ठिकाणी हा अपूर्व संगम मुळीच पहावयास सापडत नाही. बौद्धकाळात झालेली शिल्पाची सुरुवात परिणत होत होत, ब्राह्मण व जैन काळात कशी सुधारत गेली याचे मार्मिक दर्शन याही ठिकाणी होऊ शकते. एका गुहेच्या दरवाज्यावर 'विक्रमादित्य चालुक्य सन ६५०–६८०' असा उल्लेख आहे. काही ठिकाणी दरवाजावर विष्णु, गरुड, सर्प यांच्या आकृत्या आहेत गुहेमध्ये दहा हाताचा सदाशिव पार्वतीबरोबर नृत्य करीत असलेला दाखविला आहे. तसेच अर्धनारी-नटेश्वर, भृंगी इत्यादि आकृत्याही गुहेत आहेत.

या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, सर्वसाधारणपणे मातृका या सात समजल्या जातात आणि त्यांचीच प्रतीके सर्वत्र असतात पण येथील गुहेमध्ये त्या आठ आहेत (विजापूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५४७)

परशुराम-रेणुका चरित्र अगाध आहे. भारतातील सर्व प्रांत त्यांच्यावर आपला हक्क सांगतात आणि स्मृतिचिन्हे दाखवितात परशुरामाचे दुसरे एक स्थान आसाममध्येही आहे परशुरामाने तेथेच आपला परशु धुतला म्हणून ते प्रसिद्ध आहे. सादिया (लखीमपूर) शहरापासून ४० मैलांवर एक ब्रह्मकुंड आहे. ते क्षेत्राप्रमाणे मानतात अशी दंतकथा प्रचलित आहे की, क्षत्रियांची हत्या केल्यावर परशुरामाने आपला परशु या कुंडामध्ये धुतला. यासाठी ते पवित्र मानले गेले आहे. आनर्त, शर्यात देशांतही तो वावरलेला आहे ब्रह्मपुत्रा नदीवर याच अर्थाने एक क्षेत्र आहे.

उभी असताना 'तू भाइये!' या शब्दाऐवजी प्रभुरामचंद्रांनी पार्वतीला अनुलक्षून 'ये माई' असे शब्द उच्चारले, असा हा दळार परथ आहे. याच-करिता ती यमाई या नावाने प्रसिद्ध झाली. यमुनाचलावरील देवता म्हणून यमाई असा अपभ्रंश होण्याचाही अधिक संभव आहे. एरा भोगलेकालीन सरकारी आज्ञापत्रात या क्षेत्राचा उल्लेख मूळपीठ असा केलेला आहे

तुळजापूर येथे अरण्यबुवाच्या मठात रामवरदायिनी देवीची मूर्ति आहे. ही मूर्ति अष्टभुजा महिषासुरमर्दिनीच आहे. पायाखाली महिष असून बाजूला सिंह उभा आहे. त्रिशूळाने दैत्याचा वध आणि मारलेल्या राक्षसाचे मुटके हातात, वगैरे वगैरे सर्व रूप त्याच देवीचे आहे. रामाचे सांत्वन करण्यासाठी ती प्रकट झाली म्हणून रामवरदायिनी झाली. म्हणजे मागे म्हटल्याप्रमाणे एकाच प्रकरणातून तीन देवतांची उत्पत्ति झाली आहे.

मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड १) मध्ये पागारकर म्हणतात की, महाराष्ट्रात जी आदिमाया आदिशक्तीची प्रमुखस्थाने आहेत, त्यामध्ये माहुरची रेणुका ऊर्फ यमाई या देवतेचे एक स्थान आहे. या देवीला यमाई नाव देण्याचे कारण ते असे देतात की, कर्नाटक प्रांती रेणुका देवीला यल्लम्मा नावाने ओळखतात. यल्लम्मा शब्दाची उत्पत्ति येळअम्मा = ये अम्मा = यमाई अशी ते देतात पुढे असेही म्हणतात की, महाराष्ट्रात हिलाच यल्लम्मा अथवा एकवीरा म्हणतात (पृ. ४३२) मजजवळ असलेल्या माहितीवरून मी नम्रपणे असे म्हणतो की यल्लम्मा शब्दाची व्युत्पत्ति 'याळू = सात आणि अम्मा = माता = सप्तमातृका' अशी असताना 'ये अम्मा' हे म्हणणे बरोबर नसल्याने 'रेणुका हीच यमाई' हे विधान सयुक्तिक वाटत नाही तेव्हा यमाईचे मूळपीठ तुळजापूरच समजणे रास्त होईल.

भारतीय संस्कृतिकोश, भाग ३ यामध्ये पृ० ५६७ वर यल्लम्मा म्हणजे यमाई असाच उल्लेख आहे आणि त्याचे प्रमुख ठाणे सौंदत्ती येथे आहे असे म्हटले आहे याचाच अर्थ त्यांनी यल्लम्मा देवीला यमाई असे मानले आहे कै० पागारकरांनी रेणुकादेवीला यमाई मानले, तर येथे यल्लम्मा देवीला यमाई मानले जात आहे औंधशहरी असलेल्या देवीच्या क्षेत्राला मूळपीठ अथवा यमाई असे म्हणतात तेव्हा असे म्हणावे लागते की, रेणुका आणि यल्लमा याना यमाई संबोधणे हे इतर पुराव्यावरून तितकेसे बरोबर होणार नाही ये माई = यमाई, अगर यमुनाचलावरील देवी म्हणून यमाई हीच उत्पत्ति बरोबर दिसते.

मूळपीठ यमाई देवीचे मंदिर सातारा जिल्ह्यातील औंध शहराजवळ आहे सुमारे आठशे फूट उंच असलेल्या या स्थानाला जाण्यासाठी दगडाच्या पायऱ्या

बांधलेल्या आहेत माथ्यावर देवीच्या रक्षणासाठी १२ फूट जाड आणि १५ फूट उंच असा तट बांधलेला असून त्यामध्ये पाच बुरूज आहेत साधारणत हे स्थान डोंगरी कोट किल्ल्याप्रमाणे भासते तीस चौरस वारांचा हा सपाट भाग आहे मंदिराचा गाभारा सोडून सभामंडप ३०×२० चौ फुटाचा आहे यमाईची मूर्ति म्हणजे चतुर्भुजादेवी अदाजे पाच फूट उंचीची असून ती साडेतीन चौ फुटाच्या चबुतऱ्यावर बसविलेली आहे ती काळया पाषाणाची आहे हातामध्ये त्रिशूळ, गदा, नाग व पानपात्र अशी आयुधे दिसतात या मूर्तीच्या खालीच त मूळपीठ म्हणून एक लहानसा तादळा आहे मूर्ति भव्य असल्याने लहान मुलाना तर ती भयानकच वाटत येथील काही भक्त या देवीला यमुताई असेही म्हणतात यावरून देवीच्या उत्पत्तिबद्दलच्या कोड्याचा किंचित् उलगडा होतो कारण या देवीची उत्पत्ति यमुनाचलपर्वतावर झाली म्हणूनच तिला यमुताई म्हणत असावेत साहजिकच यमुताइचा यमाई असा अपभ्रश होणे शक्य आहे तेव्हा तुळजापूर प्रमाणेच ही रामवरदायिनीची मूर्ति येथे यमाई या नावाने विख्यात झाली

मंदिरासमोर ६० फूट उंच व पायाजवळ पधरा फूट व्यासाची भव्य दीपमाळ आहे त्या दीपमाळेवर १७६ दीप पाजळण्याची सोय आहे औंधचे भूतपूर्व राजे भवानराव प्रतिनिधि हे व्यायामपटु व बलविद्याव्यासगी असल्यामुळे ते स्वत रोज सकाळी पायऱ्या चढून वर जात आणि तेथे देवीचे पूजन करीत सातारा शिंगणापूरपर्यंतचा टापू येथून पाहता येतो असे सागतात की, औरंगजेब दक्षिण भागात स्वारीवर असता आणि तेथील मंदिराचा नाश करीत असता कालातराने तो या क्षेत्री पोहोचला पण मंदिराचे कलापूर्ण शिल्प पाहून त्या मंदिराचा नाश करण्याचा आपला बेत त्याने बदलला देवीनेच त्याला सद्बुद्धि दिली असेच म्हटले पाहिजे त्यापूर्वीच जेजुरी येथील देवीच्या साक्षात्काराचा अनुभव त्याला आलेलाच होता तो कितीही कट्टर मूर्तिभजक असला तरी अत्यत धार्मिक प्रवृत्तीचा असल्याने त्याला या ठिकाणी काहीतरी अद्भुत वाटले असले पाहिजे आणि म्हणूनच त्याच्या मनातील दुष्ट हेतूचा नाश झाला तात्पर्य, दुष्मनही काही वेळा परिस्थितीनुसार दयाबुद्धीने वागतो आणि आपल्या कट्टर शत्रूनाही दुवा मिळवितो (सातारा जिल्हा गझेट, पृष्ठ ४५०)

यमाईचे दुसरे मंदिर औंध शहरात आहे संस्थानचा राजदरबार या मंदिराच्या सभागृहात भरे हे देवीचे मंदिर केव्हा व कोणी बाधले आणि त्यास किती खर्च आला याबद्दलच्या माहितीचा शिलालेख तेथे आहे हे मंदिर श्री भवानराव प्रतिनिधि यानीच बाधले आहे महाराष्ट्रात या देवतेची अनेक मंदिरे आहेत त्यापैकी एक तुळजापूर देवीच्या परिसरातही आहे तेथे गोंधळी वर्ग या देवीचा पुजारी आहे

येथील भूतपूर्व हरथानाधिपती श्री. भवानराव श्रीनिवासरावांनी 'कीर्तन सुभनहार' या नावाचा ग्रंथ रचून प्रसिद्ध केला आहे. (आवृत्ति दुसरी, १९२९) ते स्वतः उत्तम कवि आणि कीर्तनकार होते. या ग्रंथाच्या मांडणीची सुरुवात त्यांनी आपले पूर्वज श्री. त्रिंबक कृष्ण कुलकर्णी, मु. किन्हई यांच्या चरित्राने केलेली आहे. त्यामध्ये यमाई देवीच्या साक्षात्काराचा वृत्तांत दिलेला आहे. तो वाचनीय आणि उद्बोधक असल्याने सारांशरूपाने येथे देण्यात येत आहे.

त्रिंबकराव हे किन्हई गावचे कुलकर्णी होते. ते या देवीचे भक्त असल्यामुळे किन्हई ते औंध हा सुमारे वीस मैलांचा प्रवास करून ते देवीच्या दर्शनास येत आणि तिची आराधना करीत. माणसाचे मन खंबीर असले आणि कुठल्याही गोष्टीवर श्रद्धा आणि ती करण्याचा त्याचा दृढनिश्चय असला म्हणजे त्याची सर्व कृत्ये योजिल्याप्रमाणे पूर्ण होतात 'वागवी पाङुळा पायांविणे' या उक्तीप्रमाणे देवताच त्याचा निश्चय पूर्ण करीत असते, असा अनुभव प्रत्यक्ष लेखकाला अनेक सार्वजनिक कार्यांत आणि याच ग्रंथरचनेत आलेला आहे. 'प्रतिदिनीं जावें किन्हईहूनी मूळपीठ औंधाला' असा त्रिंबकरावाचा कडक नियम होता. असा त्याचा कार्यक्रम अनेक दिवस चालू होता. आता देवता प्रसन्न व्हावयाची वेळ आली. पण त्याअगोदर हा भक्त आपल्या परीक्षेत कसा काय उतरतो हे पाहण्यासाठी तिने त्याच्या घरात एक प्रसंग उत्पन्न केला

त्रिंबकरावाचे कुटुंब गरोदर होते. घरात वडिलधारी दुसरे कोणीच नाही. कोल्हापूरला त्याची वडीलबहीण होती, पण नेमकी त्याचवेळी ती अतिशय आजारी झाली होती. तापाने नुसती फणफणली होती त्यामुळे ती त्रिंबकरावाकडे कुटुंबाच्या बाळंतपणासाठी येऊ शकली नव्हती. अखेर त्रिंबकरावाच्या पत्नीचा प्रसूतीसमय समीप येऊन ठेपला. तिला असह्य वेदना होऊ लागल्या अशा वेळी त्रिंबकराव किन्हईहून औंधला वीस मैल पायी चालत जाऊन यमाई देवीचे दर्शन घ्यावयाचे होते. तेव्हा त्यांची पत्नी मोठ्या काकूळतीला येऊन त्यांना म्हणाली, 'दर्शनाला जाण्याचा आपला नियम मजकरिता आपण दोन दिवस सोडावा. ही माझी पहिलीच खेप असल्यामुळे मला पूर्वानुभव नाही. घरात तुमच्याशिवाय दुसरे कोणीच नाही. तेव्हा मी प्रसूत होईपर्यंत आपण मजजवळ थांबावे त्र्यंबकरावाची परिस्थिति 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली. न जावे तर दर्शनाला जाण्याचा आपला नियम मोडतो आणि जावे तर पत्नीची परिस्थिति नाजूक आणि करुणाजनक झालेली. त्यांनाही असेच वाटले की देवी आपले सत्त्व पाहत असावी. शेवटी त्यांनी विचार केला की, देवीवर

संपूर्ण विश्वास ठेवावयाचा पण आपला नियम चुकवावयाचा नाही. देवीचे पाठबळ असल्यानर पत्नीच्या केसालाही धक्का लागावयाचा नाही, असा त्याचा विश्वास होता. दुसरे दिवशी पहाटे गुपचूप ते देवीच्या दर्शनाला, नलराजा वना· मध्ये आपली पत्नी दमयंतीला सोडून गेला त्याप्रमाणेच निघून गेले.

त्रिंबकरावाच्या पत्नीचे दुर्दैवच म्हणावयाचे, कारण त्रिंबकराव तेथे देवीच्या पूजेत इतके निमग्न झाले की, परत घरी येण्याची त्याना शुद्धच राहिली नाही. त्या दिवशीच काय पण दुसऱ्या दिवशीही ते घरी परतले नाहीतच. असेच समजले पाहिजे की देवीनेच त्यांचे मन आकर्षून घेतल्यामुळे ते भानावर नव्हते. दोन प्रहरी प्रसूतिवेदना वाढल्या आणि ती केव्हा प्रसूत होईल ते सागता येईना. त्या वेदना असह्य झाल्यानर अखेर उपाय म्हणून त्याच्या पत्नीने देवीलाच हाक मारली आणि तिचा धावा केला,

जगदंबे अंबाबाई। कां करुणा तुज नाहीं ?
तुजवांचुनी कोणी नाहीं।
धांवत येई। धांवत येई॥
जगदंबे अंबाबाई। सोडवी अनाथा पाही॥
जगदंबे अंबाबाई॥

देवाच्या परीक्षेत भक्त उतरला म्हणजे कोणाच्या तरी रूपाने अवतार घेऊन तो भक्तांची कार्ये पूर्ण करतो. कारण तेथे देवता आपले खरे स्वरूप दाखवू शकत नाही. जगदंबेने कोल्हापूरच्या त्रिंबकरावाच्या बहिणीचे रूप घेतले आणि पिवळ्या घोडीवर बसून ती त्याच्या घरी आली. येताना प्रसूतीचे आणि इतर बाळबाळंतीणीचे सर्व सामान बाळगुटी, साजूक तूप, डिंक, मेथीचे लाडू, लोणचे आणि इतर आवश्यक ते पदार्थ तिने आपल्याबरोबर आणले होते. 'नन्स' अगदी वेळेवर आल्या म्हणून त्रिंबकरावाच्या स्त्रीला परमावधीचा आनंद झाला आणि कसनी सुईण लाभल्याने ती सुखरूपपणे बाळंत झाली.

हे वृत्त कोणीतरी औंधला त्रिंबकरावाना कळविले आणि त्याना सांगितले की, 'तुम्हाला मुलगा झाला आहे.' एव्हाना स्वारीचे ध्यान उतरले होते. ते धावतच किन्हईला आपल्या घरी आले. मालक घरी येत आहेत, हे समजताच कपडे घेऊन ते धुण्याच्या निमित्ताने यमाई देवी नदीवर गेली. त्रिंबकरावांना त्यांच्या बायकोने घडलेला सर्व वृत्तांत निवेदन केला. त्रिंबकरावाना खात्री होतीच की, बहीण अतिशय आजारी असल्याने ती येणे सर्वस्वी अशक्यच होते, म्हणून ते त्या स्त्रीच्या शोधाकरिता नदीवर गेले. पाहातात तो कपडे तसेच पडले आहेत

आणि त्या स्त्रीचा मात्र पत्ता नाही. अखेर सर्व खरा प्रकार त्यांच्या ध्यानात आला, त्यांचे अंतःकरण उचंबळून आले. देवीचे आपल्यावरील हे प्रेम पाहून त्यांच्या नयनांवाटे झराझरा अश्रू ओघळू लागले. आपल्या घरात फक्त आपल्या पत्नीला मात्र दर्शन घडले, आपल्याला घडले नाही याबद्दल वैषम्य वाटून ते परत औंधला गेले आणि देवीसमोर दर्शनासाठी ठाण मांडून बसले. साक्षात देवीच्या दर्शनाचा हट्टच धरला जणू! भक्तांची दुर्दम्य इच्छाच देवीने पूर्ण केली आणि प्रकट होऊन त्यांना दर्शन दिले. (पुढील कथाभाग सप्तशृंग-वासिनी देवी पहा.)

मार्डी

जइ पायरी आठशे चढावी । कुळदेवी मग औंधची पहावी ।
वदती कुणी मूळपीठ यासी । तटबंदी चहुबाजू रक्षणासी ॥ १ ॥
अति उत्तुंग दीपमाळ शाही । शत नि सत्तर दीप पाजळेही ॥
किती व्यास विशाल घेर घेई । करि मी वंदन देवीला यमाई ॥ २ ॥

सोलापूर शहरापासून १० मैल अंतरावर मार्डी नावाचे गाव आहे. तेथील देवीला 'मार्डीची यमाई' असे म्हणतात. येथील प्राचीन अवशेषावरून हे गाव प्राचीन काळी कर्मराजाची राजधानी असावी, असे वाटते मार्कंडेय ऋषींनी त्या क्षेत्री तपश्चर्या केली, तेही एक ठिकाण दाखविण्यात येते. असे संभवते की, मार्कंडपूर या नावावरून मार्डी हा अपभ्रंश झालेला असावा.

अकराव्या शतकाच्या अखेरीस या गावी विप्रदास सरस्वती नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले माहूर येथील रेणुकेचे ते निस्सीम भक्त होते. प्रतिवर्षी पायी माहुरगडची यात्रा करीत असत. पण कालांतराने वृद्धापकाळामुळे चालणे अशक्य झाल्याने दर्शन अंतरणार म्हणून त्यांना अत्यंत खेद झाला. देवीची केलेली एक-निष्ठ उपासना कधी वाया जात नाही भक्तांची विकल स्थिति मातेने जाणली आणि दृष्टांत दिला की, 'तू तेथेच मला स्थापन कर मी तेथे येते' यामुळे विप्रदासांनी देवीची स्थापना केली आणि ते एक जागृत स्थान बनले.

आता या क्षेत्रीचे वैचित्र्य असे की, देवीची मूर्ति रेणुका मातेची म्हणून स्थापन केलेली असली, तरी सर्वजण यमाई या नावाने संबोधितात बरे, यमाई नाव कसे आले म्हणून भक्तांना विचारले, तर 'श्रीरामचंद्रांनी सीतारूप पार्वतीला ये माई म्हटले, त्यामुळे हे नाव आले', अशीच दंतकथा सांगितली जाते म्हणजे या दोन भिन्न गोष्टी एकत्रित गोवलेल्या आहेत, हे कोणाच्याही लक्षात येईल वार्षिक यात्रा, पार्वतीच्या इतर स्वरूपाप्रमाणे चैत्र महिन्यातच होते

अर्वाचीन वाङ्मयामध्ये काही ठिकाणी रेणुका देवीलाच यमाई म्हणण्याचा प्रघात आढळतो. तो याचारख्या प्रचलित वाग्संप्रदायावरच आधारित असावा. यल्लम्मा देवीला ही उपाधी लागलेली आढळते. इतके कशाला, जोतिबा क्षेत्री रामलिंगाचा संबंध तेथील यमाई मंदिराबरोबर लावला जातो म्हणजे यमाई ही परशुरामाची माता असा भावार्थ दाखवितात. यमाई देवीच्या वरील विवरणावरून रेणुका म्हणजे यमाई हा शब्दप्रयोग बरोबर नाही, हे वाचकांच्या ध्यानी येईल.

## (२८) ललिता

या देवतेच्या उत्पत्तीबद्दलची एक कथा अशी आहे की, पार्वतीला शंकराच्याबरोबर विवाह करावयाचा होता आणि त्यासाठी कैलास पर्वतावर बसून तिने शंकरांची आराधना चालविली होती. शंकर ब्रह्मानंदात निमग्न असल्यामुळे कामवासना जागृत होईना आणि पार्वतीकडे त्यांचे लक्षच जाईना. देवांची सभा भरली असता नारदांनी सुचविल्याप्रमाणे इंद्राने या कामी मदनाची खास नेमणूक केली. इंद्राने मदनाला कानमंत्र दिला की, हरप्रयत्नाने त्याने शंकराच्या शरीरात प्रवेश करावा, म्हणजे ते लवकर विवाहास तयार होतील. मदनाने देवकार्य म्हणून ही कामगिरी मान्य केली. पार्वतीचे अनुनय करणे चालूच होते. कैलास पर्वतावर गेल्यावर मदन आपला बाण शंकराना मारणार, इतक्यात शंकरांना अंतर्ज्ञानामुळे मदनाची चाहूल लागली. क्रोधायमान होऊन त्यांनी आपला तृतीय नेत्र उघडला आणि मदनाचे भस्म करून टाकले. ( स्कंदपुराण, कौमारिका खंड, अध्याय २४ ).

मदनाची पत्नी रति हिला हा वृत्तांत समजल्यावर ती विलाप करू लागली. शेवटी गणपतीला तिची दया आली. त्याने शंकराकडे तिच्यासाठी रदबदली केली, पण काहीच उपयोग झाला नाही. गणपतीने मदनाच्या शरीराच्या रक्षेतून एक मानवाकृति तयार केली. आपल्याबरोबर खेळावयास सजीव बालक असावे म्हणून गणपतीने त्या मूर्तीत प्राण घातला आणि तो त्याबरोबर खेळू लागला. ज्याअर्थी त्या बालकाचा देह निर्माण झाला, त्या रक्षेमध्ये क्रोधाचा अंश असल्याने, ते बालक दैत्यरूपाने वाढू लागले. गंगातटी त्याने १० हजार वर्षे तप केल्यावर शंकर त्याला प्रसन्न झाले. हा भंडासुर दैत्याने अमर होण्याचा वर सांबाजवळ मागितला, पण तो त्याला मिळाला नाही. त्याने पुन्हा तपश्चर्या चालूच ठेवली. शंकर त्याला पुन्हा प्रसन्न झाले आणि 'एक त्रिमूर्तिव्यतिरिक्त इतर कोणाकडूनही तुला मरण येणार नाही' असा त्यांनी त्याला वर दिला. तरीही त्याचे समाधान झाले नाही. त्याने तपश्चर्या चालूच ठेवली. शेवटी त्याला

देवादिकाकडून, पशु, पक्षी, कीटक व अस्त्रे यापासून संरक्षण दिले, आणि निर्भय केले. (त्रिपुरा रहस्य, अध्याय ३५)

या ठिकाणी एक गोष्ट वाचकांनी लक्षात आणावी की, तपःसामर्थ्याने जे मिळेल त्याजवर संतुष्ट न राहता, आपल्याला जे पाहिजे तेच मानव मिळवू शकतो. फक्त तेथे निर्धार पाहिजे, निष्ठा पाहिजे आणि क्लेश सोसण्याची तयारी पाहिजे.

अमरत्वाचा वर मिळाल्यावर भंडासुर अतिशय उन्मत्त झाला आणि त्याने पृथ्वीतलावर धुमाकूळ घातला. त्याच्या नाशार्थ प्रत्यक्ष इंद्राला तप करावे लागले. तेव्हा परा-शक्ति देवीरूप धारण करून भूतलावर अवतरली आणि तिने ह्या दैत्याचा नाश केला. या देवीरूपालाच **ललितादेवी** असे संबोधिले जाते. या देवतेचा जन्म होण्यासाठी स्वतः ब्रह्मदेवाने यज्ञ केला आणि त्यामधून परा-शक्ति रूपधारी बनून ललितादेवीच्या रूपाने प्रकट झाली. वचन असे 'तन्मध्ये तु महादेवीमुदयार्कसमप्रभाम्' पुढे शंकराचे रूप कामेश्वर याजबरोबर तिचा विवाह झाला म्हणून ती कामेश्वरी नावाने प्रसिद्ध झाली.

शक्तितत्त्वामध्ये अनेक पायऱ्या आहेत, त्यापैकी पराशक्ति ही चवथी पायरी होय. केनोपनिषदामध्ये उमा हैमवती रूपाने शक्तिदेवाच्या पुढे प्रकट झाली असा उल्लेख मिळतो. याबद्दलची कथा अशी की, एकदा देव-दानवाच्या युद्धामध्ये देवांना जय मिळाला. वास्तविक तो विजय त्यांना ब्रह्म-शक्तीमुळे मिळाला होता. पण देवांच्या हे ध्यानात आले नाही आणि हा जय आपल्या स्वतःच्या शक्तीमुळे मिळाला याबद्दल त्यांना अहंकार जडला. अर्थात् ब्रह्मदेवाला ही त्यांची प्रौढी रुचली नाही. त्याने यक्षरूप धारण केले आणि तो देवांच्या पुढे प्रकट झाला.

या यक्षाला पाहून सर्व देवांना आश्चर्य वाटले. हा कोण, कुठला आणि या देवांच्या वातावरणामध्ये कोठून उपटला हेच त्यांना कळेना. त्याची चौकशी करण्यासाठी प्रथम अग्नीला पाठविण्यात आले. यक्षाने अग्नीपुढे एक वाळलेली गवताची काडी टाकली, पण ती त्याला जाळता आली नाही. आणि तोंड करून तो परत गेला. त्यानंतर इंद्राने वायूला पाठविले. पण आपल्या प्रचंड सामर्थ्याच्या जोरावरही त्याला ही काडी इकडची तिकडे हलविता येईना. त्या नंतर प्रत्यक्ष इंद्र चौकशीसाठी त्या ठिकाणी आला. तेव्हा तो यक्ष गुप्त झाला, आणि त्या स्थानी उमा हैमवती देवी प्रकट झाली. तिने सर्वांना सांगितले की, 'माझ्या शक्तीशिवाय देवांना काहीही करता येणार नाही. आता तुम्ही अग्नि आणि वायु यांच्या उदाहरणावरून हे पाहिलेच आहे. ज्या काडी सर्व भिया पडतात त्या

ब्रह्मशक्तीमुळेच घडतात, हे ध्यानी असू द्यावे.' भागवतकार म्हणतात की, पराशक्तीच यक्षरूपाने देवाची परीक्षा पाहण्यासाठी खाली उतरलेली होती. यासंबंधीचा हा श्लोक पहा.

प्रादुरासीत् कृपापूर्वा यक्षरूपेण भूमिप ।
कोटिसूर्यप्रतिकाशं चंद्रकोटिसुशीतलम् ॥

ललितादेवीची अनेक स्थाने आहेत. त्यापैकी एक नैमिषारण्यामध्ये आहे. नैमिषारण्य हा शब्द आपण पोथी पुराणातून व कथाप्रवचनांतून ऐकतो. तेव्हा हे नैमिषारण्य होते तरी कोठे हे पाहणे योग्य ठरेल. आज उत्तर भारतामध्ये लखनौ शहर प्रसिद्ध आहे. त्या शहरापासून काही अंतरावर आणि बालामाऊ जंक्शनपासून सोळा मैल अंतरावर ' निमासर ' अथवा नैमिषारण्य रेल्वे-स्टेशन आहे. त्याच्या समोवार प्राचीन काळी हे अरण्य होते. त्याला हे नाव का पडले त्याची कारणेही मोठी गमतीदार आहेत

( अ ) वराह पुराणामध्ये गौरमुख व वासुदेव यांचा संवाद दिलेला आहे. त्या संवादात वराहदेव गौरमुखास सांगतो की, ' या अरण्यात निमिषार्धात दानवांचा नाश केला म्हणून याला नैमिषारण्य हे नाव प्राप्त झाले. हे वन पुढे ब्राह्मणांना फार प्रिय होईल ' अशी भविष्यवाणीही तो वदला

( आ ) वायुपुराणातील हकिकत अशी की, एकदा अनेक मान्यवर ऋषि ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्यांनी त्यांना प्रश्न केला की, ' तप करण्यास योग्य जागा कोणती ? ' तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले की, ' हे ऋषिजनांनो, हे मनोमय चक्र आता मी फेकतो. ते जिकडे जाईल त्याच्या मागोमाग तुम्ही जावे आणि ते जेथे थांबेल नि खाली पडेल, ती जागा तप करण्यास योग्य आहे असे तुम्ही समजावे. ' त्याप्रमाणे ते सर्व ऋषि त्या चक्राच्या मागोमाग गेले. ज्या स्थानी ते चक्र पडले ती जागा निमिषारण्य या नावाने प्रसिद्ध झाली.

( इ ) निमिष नावाच्या ऋषीने या ठिकाणी तपश्चर्या केली म्हणून त्या स्थळाला नैमिषारण्य हे नाव प्राप्त झाले.

( ई ) निमिष या नावाचे एक फल आहे तापसी आणि ऋषिजनांना खाण्यास ते योग्य असल्यामुळे त्यास नैमिषारण्य हे नाव पडले.

( अवधानीकृत भाष्य, पृष्ठ २४ ).

देवकार्यं सुसंपाद्य जगाम श्रीपुरं पुन ।
यत्र श्रीनगरे पुण्ये ललिता परमेश्वरी ॥ ( ललिता स्तोत्र )

याचा अर्थ भंडासुराबरोबर युद्ध झाले, तो मारला गेला आणि ललिता देवी श्रीनगर येथे स्थानिक झाली. या पुराणाप्रमाणे श्रीनगरचे प्राचीन नाव अतरतदीया, परमेश्वरीपुरी, भगमालापुरी आणि नित्यक्लिन्नपुरी अशी होती. मेरू पर्वताची चार शिखरे मानलेली असून, त्यापैकी एकावर ब्रह्मलोक, दुसऱ्यावर विष्णुलोक, तिसऱ्यावर शिवलोक आणि चवथ्यावर श्रीपुर अथवा श्रीनगर हा भाग ४०० योजने लांबी-रुंदीचा आहे. याचाच अर्थ असा की, ललिता पुराणाप्रमाणे तिचे प्रमुख स्थान श्रीनगर येथे असावयास पाहिजे, पण आजतरी असे स्थान लेखकांच्या वाचनात आलेले नाही ( ललिता कल्ट, ले. व्ही आर राम चंद्रन दीक्षितर, पृ. २४ ).

प्राचीन काळी ज्याप्रमाणे नैमिषारण्य तप.साधनेसाठी उपयोगात आणीत, त्याप्रमाणे ते विसाव्या शतकातही त्याच हेतूने उपयोगात आणले जात आहे हे खालील इतिहासावरून वाचकाच्या ध्यानात येईल. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरकाळी श्रीमहाराज अथवा गोंदवलेकर महाराज या नावाचे एक सत्पुरुष सातारा प्रांती होऊन गेले. वयाच्या पधराव्या वर्षापासूनच गुरूच्या शोधार्थ अखिल भारतात त्यानी प्रवास केला होता. अनेक दिवस ते नैमिषारण्यात वास्तव्य करून होते. सन १८६० च्या सुमारास स्वातंत्र्याच्या समरात पराभूत झालेले श्री. नानासाहेब पेशवे त्यांना तेथे भेटले. त्यांची मंडळी नेपाळ राज्यात होती. पण ब्रिटिश सरकारच्या दडपणामुळे त्यांना नेपाळमध्ये आसरा मिळाला नाही म्हणून ते या ठिकाणी आश्रयाला आले होते महाराजाना ही त्यांची सर्व हकिकत समजल्यावर त्यानी नानासाहेबाना एका ब्रह्मगट गुहेत राहावयास जागा दिली गत इतिहासाबद्दल किंवा आलेल्या अपयशाची खत न बाळगता रामनाम-जपामध्ये उर्वरित आयुष्य व्यतीत करण्याचा उपदेश केला. ‘ आपण येथे अगदी निर्धास्त अन् निर्भय होऊन राहा. ’ असे त्यानी नानासाहेबाना सांगितले.

या ठिकाणी नानासाहेब सन १९०६ पर्यंत राहात होते त्यांचे सेवक अयोध्येहून सामान आणीत असत. त्या गुहेत सुंदर पलंग आणि सामानसुमान होते. तसेच जवळ जडजवाहीर, हिरे, मोतीही होते. त्यांच्या समाचारासाठी मधून मधून महाराजही येत. ‘ आपल्या अंत समयी मी आपल्याजवळ असेन ’ असे आश्वासन पेशव्यांना महाराजांनी दिले होते. त्यामुळे १९०६ साली नानासाहेब एक आठवडा तापाने आजारी असता रात्रंदिवस महाराज त्यांच्या

उदासी बनून होते. अखेर नानाची घटिका भरली आणि महाराजांच्या मांडीवर मस्तक ठेवून ते चिरनिद्रिस्त झाले. त्यांची उत्तरक्रियाही महाराजांनीच केली (श्री. गोंदवलेकर महाराज चरित्र, पृ. २२१ ).

स्वातंत्र्य-युद्धातील या नरसिंहाचा शेवट कसा झाला याचा इतिहास ब्रिटिश इतिहासकार कसाही देवोत, खरा प्रकार काय घडला तो वर दिला आहे. तसेच श्री. तात्या टोपे गरुडेश्वरा असत, अच्युदानंद व्यायामशाळेचे चालक इत्यादि लोक त्यांना भेटत असत, असे श्री. दादा पेंडसे ( गोरेगाव ) म्हणतात. नानासाहेबांनी या अरण्यात योगसाधनेत आयुष्य घालविले. आजही या ठिकाणी अनेक तापसी योगसाधनेत निमग्न झालेले दृष्टीस पडतात.

ललितादेवीच्या मंदिराच्या बाजूने एक नदीचा प्रवाह वाहत जातो. जवळच एक सरोवर आहे. त्याला चक्रतीर्थ असे म्हणतात. ललितादेवीची मूर्ति बनविताना ती चार हाताची असावी आणि त्या चार हातात आरसा, शस्त्र, फळ आणि कमळाची छडी असावी. मूर्ति नेहमी उभी असून तिच्या अंगावर अनेक अलंकार असावेत. ( Elements of Hindu Iconography by T A Gopinathrao, page 359 )

चतुर्भुजे चंद्रकलावतंसे । कुचोन्नते कुंकुमरागशोणे ॥
पुंड्रे तु पाशांकुशपुष्पबाणहस्ते । जगदेकमाता तुभ्यं नमस्ते ॥

( ब्रह्माण्डपुराण, उपसंहार ८ )

फाल्गुन महिन्यात या देवीची यात्रा भरते त्या वेळी दूरदूरचे हजारो भाविक येत असतात. एके काळी या निमिषारण्यामध्ये साठ हजार ऋषि तप साधना करीत असत आणि त्यांनी केलेल्या वेदमंत्राच्या घोषाने समग्र अरण्य दुमदुमून जात असे. अशा या पुण्यकारक अरण्याचा पसारा फार मोठा होता. त्याची स्मृति म्हणून यात्रेकरूंनी या अरण्याची परिसीमा ८४ कोसांची ठरविली आहे. या मर्यादेत फिरत असताना अभयवट, ललितादेवी, क्षेमकायादेवी जानकीकुंड, व्यास शुकदेव स्थाने, गोमतीनदी, सूतजींचे स्थान इत्यादि क्षेत्रांचे दर्शन घडते

( कल्याण, तीर्थांक, १९५७, पृष्ठ ११० )

ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये या देवीचे सविस्तर आख्यान दिलेले आहे. बहुधा तेच आख्यान पोथीरूपाने निराळे छापलेले आहे ब्रह्माण्डपुराणामध्ये ( ४४ पैकी ४० प्रकरणी ) स्तोत्ररत्नात हयग्रीव अगस्ति संवाद चालू असता त्यामध्ये या देवीच्या नावाने त्रिशतस्तोत्र आलेले आहे. ललितासहस्रनाम, ललिताहृदय इत्यादि मजकूर प्रसिद्धच आहे. श्री वामन रामकृष्ण पुणेकर यांनी याचे छन

१८०९ साली ललितापोथी प्रसिद्ध केलेली आहे. तसेच याच देवीचे भवानी-सहस्रनाम या नावाचे एक स्तोत्र आहे. आद्यशंकराचार्यांनीच ललिता-त्रिशती स्तोत्र लिहिले असून या देवीची ३०० नावे दिली आहेत.

पीठनिर्णयाप्रमाणे निमासर हे ललितादेवीचे शक्तिपीठ नव्हे. त्यात तिचे शक्तिपीठ प्रयाग हे दिले आहे. सतीची हस्तांगुलि या ठिकाणी पडली म्हणून ते शक्तिपीठ मानले आहे. या शहरी ललितेची दोन मंदिरे आहेत. एक गावात आणि दुसरे अक्षयवटाच्या शेजारी. त्यापैकी शक्तिपीठ कोणते हे निश्चित नाही.

या देवीची आणखी एक उत्पत्ति ललितादेवी या नावाने आहे. तिचे वर्णन ' मातृदेवता ' या प्रकरणात पहावे.

मंदाक्रांता

कैलासातें तप सतिपती आचरी उग्र मोठें ।
विघ्नें आणी रति-पति तयें दंड व्हाया तयातें ॥
अग्नीरूपा तृतिय नयनीं सांब कामास जाळी ।
भस्मांशातें गणपती स्वयें बाळ जन्मास घाली ॥ १ ॥
त्या बाळानें पुढति करूनी साधना शंकराची ।
ख्याती झाली समरिं लढुनी क्रूर भंडासुराची ॥
त्रैलोकींची छळित जनता, लोळवी देवराया ।
देवेंद्राच्या तपिं अवतरे ती पराशक्ति माया ॥ २ ॥
चारी हातीं कमळ कुसुमें इक्षुदंडा धरीत ।
त्याचे जोडी नवरत्नफळां, आरसाही सुरेख ॥
चापल्यानें समरिं लढुनी मारि भंडासुरातें ।
त्या रूपाला वदति ललिता वंदितों मी तियेतें ॥ ३ ॥

इंद्रवज्रा

ते नैमिषारण्य बहू पुराणे । निरूपणीं शौनकसूत गाणें ।
कथा पुराणे कथिलीच ठायीं । निमासरा आज वदा सदांही ॥ ४ ॥
ते शक्तिपीठ ललनी समीप । देवी पहावी ललिता प्रसुस ॥
यात्री करी नेम परिक्रमातें । श्रद्धायुतें पुण्य फळास येतें ॥ ५ ॥

## (२९) वज्रेश्वरी

'वज्रेश्वरी महात्म्य' या नावाची पोथी दिगंबरस्वामींनी लिहिलेली आहे आणि ती मुंबई वैभव छापखान्यात छापून प्रसिद्ध झालेली आहे. त्यामध्ये या देवीच्या उत्पत्तीची कथा आलेली आहे. त्याचा सारांश असा. प्राचीन काळी वज्रेश्वरी भागात घनदाट जंगल होते. तानसा नदीच्या या भागात पूर्वी उमसुर दैत्य राजा होऊन गेला. सिंहमार व कलीकाळ हे त्याचे दोन पराक्रमी पुत्र होते. नेहमीप्रमाणे सत्तेने धुंद होऊन हे दैत्य सर्वत्र धुमाकूळ घालू लागताच ऋषि-मुनींना यज्ञयागादि कर्मांत त्याचा त्रास होऊ लागला. त्यांच्या कार्यात वारंवार दैत्यांची आडकाठी येऊ लागल्यामुळे देवीची कृपा संपादन करण्यासाठी त्यांनी एक यज्ञ आरंभिला.

आणावया त्रिचंडी भूमीवर। त्यांनी यज्ञ आरंभिला॥

या यज्ञाचे ऋत्विज वसिष्ठमुनि होते. यज्ञसमारंभ सुरू झाला आणि देवताना मंत्रोच्चारानी आवाहन करण्यात येऊ लागले. सर्व देवताना हवनभाग मिळाला, पण काही चुकीमुळे म्हणा किंवा इतर कशामुळे म्हणा, इंद्राला आवाहन करण्याचे आणि हविर्भाग देण्याचे राहून गेले. वसिष्ठानी हे हेतुपुरःस्सरच केले असले पाहिजे, असे समजून इंद्र कोपायमान झाला.

इंद्र झाला कोपायमान। मम नामे कां न दिलें हवन?
आतां निश्चयें मी विध्वसीन। हा त्रिचंडी याग॥
वसिष्ठावरी सोडिला वज्र। पार्वतीनें गिळिले समग्र।
म्हणोनि वज्रेश्वरी नाम। पार्वती ही पावली॥

इंद्राने वसिष्ठावर वज्र फेकले. ते पार्वतीने गिळले म्हणून तिला वज्रेश्वरी हे नाव प्राप्त झाले. अशी ही त्रोटक कथा आहे.

पश्चिम रेल्वेवरील वसई या स्टेशनपासून अठरा मैल अंतरावर हे स्थान आहे. मोटरबसने या क्षेत्रापर्यंत जाता येते. गावाचे नाव वडवली असे असून वस्ती खेडुतांचीच आहे. मंदिर लहानशा टेकडीवर आहे. त्यामुळे पायऱ्या चढून वर जावे लागते. तेथून आसपासचा देखावा अतिशय रमणीय दिसतो. मुख्य गाभाऱ्यात तीन मूर्ति आहेत. मध्यभागी वज्रेश्वरी, उजव्या बाजूला सावित्री सरस्वती आणि डाव्या बाजूला लक्ष्मी-भार्गव मूर्ति उभ्या असून भव्य आहेत. समोर लहानसा सभामंडप आहे. देवीचे स्वरूप तितकेसे रेखीव नेटनेटके दिसले नाही. तिच्या एका हातात तलवार आहे.

वसईचा पाणकिल्ला फार जुना. प्रथम तो सन १५३४ च्या सुमारास गुजरातच्या बहादूरशहा याने बांधला. पोर्तुगीजांनी वसई प्रांत घेतल्यावर त्यांनी तो बळकट केला आणि आपल्या धर्मप्रसाराचे केंद्रच तेथे केले. मराठ्यांची सत्ता प्रबळ झाल्यावर चिमाजी आप्पा पेशव्यांनी सन १७३९ साली त्यावर हल्ला चढवून तो काबीज केला. स्वारी करण्यापूर्वी चिमाजीने देवीचे दर्शन घेतले आणि कौल-प्रसाद मागितला असता दृष्टांत मिळाला की, ज्या बाजूने कबुतरांचा थवा किल्ल्यावरून येईल, त्या बाजूने हल्ला केल्यास निश्चितपणे जय मिळेल. देवीचा दृष्टांत खरा ठरला आणि स्वारीमध्ये यश आले

चिमाजीअप्पा करी स्वारी । वसईच्या पाणकिल्ला निर्धारी ॥
जय पावता उभारी । अंबेचे भव्य देवालय ॥

किल्ल्यावर जय मिळाल्यावर चिमाजी अप्पाने आपला सुभेदार शंकराजी केशव याच्या हस्ते वज्रेश्वरी देवालयाचा जीर्णोद्धार करून सांप्रत दिसत असलेले मंदिर उभारले. मंदिराच्या खर्चासाठी पेशव्यांनी सालीना रु. ९८० ची देणगी दिली होती व ब्रिटिश सरकारनेही ती चालू ठेवली होती. पेशव्यांचे एक सरदार गोपाळ वासुदेव तथा नानासाहेब चांदवडकर, नाशिक, यांनी ५२ पायऱ्या व दीपमाळ नंतर बांधून काढली. दीपमाळेच्या आतील बाजूने वर चढून गेल्यावर आसमंतातील देखावा प्रेक्षणीय दिसतो. मंदिरामध्ये जी घंटा आहे त्यावर 'नेवासे १८८४' अशी अक्षरे आहेत. या ठिकाणी पूर्वी जेजुरीच्या खंडेरायाच्या प्रमाणे बगाडाचा नवस फेडला जात असे

कै. गणपतराव गायकवाड यांच्या मृत्यूनंतर बडोदे संस्थानच्या गादीवर यांचे बंधु खंडेराव गायकवाड आले (सन १८५६–७०). स्वारीला मूलबाळ नसल्याने, मुंबई सरकारबरोबर बोलणी करण्यासाठी येताना वाटेत वज्रेश्वरी येथे देवीचे दर्शन आणि तेथील सत्पुरुष उपाराममहाराज यांचे दर्शन घेण्यासाठी ते थांबले. या प्रवासाचे सविस्तर वर्णन गायकवाड सरकारच्या रोजनिशीत (सिलेक्शन्स नं. [illegible] पृ. ६६–६७) मध्ये आलेले आहे. त्यातील भाग असा —

“महाराज हत्तीवरून श्री वज्रेश्वरी मातेच्या नजीक तयार करून ठेवलेल्या डेऱ्यात आले. सायंकाळी दिवाणसाहेबांसह महाराजांनी देवीचे दर्शन घेतले. चिंचपेटी, मोत्यांचे पेंडे, नथ, हार आणि मागील बाजूस भरगच्चीचा चांदवा इ० वस्त्रालंकार देवीस अर्पण केले. कायम चौघड्याची व्यवस्था करून, त्यासाठी रु. ६०० ची सनद सहीशिक्क्यानिशी करून, नवसरी महालाने ती

आरती करावी, अशी व्यवस्था करून देवीपुढे ठेवली नंतर सरकार स्वारी तालदानात परतून टेम्यात परत आली. देवीचे सभामंडपाचे काम झुकून, पडण्याच्या बेतात झाले होते, ते नीट करण्यासाठी आणि चौघड्याची नवीन जागा बांधण्यासाठी, रुपये हजार, ब्राह्मणदक्षिणा रु. ४००, संत सखारामबावाचे पुढे रु १००० आणि तेथील अग्निहोत्री ब्राह्मणाला रु. १०० मिळून रु ६५०० मंजूर केले. मात्र यातील पाच हजार, मुंबईला गेल्यावर ते नाना शंकरशेट याना देऊन कामाची व चौघड्याची नेमणूक सुपूर्त त्याजकडे करावयाची म्हणून बोलण्यात आले"

आता हे काम नाना शंकरशेटकडे कसे आले त्याचे जास्त विवरण करण्यास अनाठायी होणार नाही असे वाटते. सन १८५० साली गणपतराव गायकवाड यांनी जेव्हा मुंबईला प्रथम भेट दिली, तेव्हा सरकारस्वारींची सर्व व्यवस्था नाना शंकरशेट यांनीच केली होती इतकेच नव्हे, तर ठाकूरद्वार येथील स्वतःच्या वाड्यात महाराजांचे अपूर्व स्वागत केले होते त्या प्रसंगाचे वर्णन नारो रघुनाथ मंत्रिणे ४०० ओव्यात केले आहे व ते फार गोडके आहे

हिंदुमाजी नानाशेट । करणे जयाचे सुभट ।
नराधिपाची घेऊनी भेट । सदना कारणें आमंत्रिले ॥
महाली विस्तीर्ण आरसे । अगणित उजळती गलासे ।
वाळसदें झुंबराचें प्रकाशे । सदन शोभू लागले ॥
सदना भोवते बागाईत । दीपदान केले बहुत ।
कित्येक लावले रस्त्यात । हंड्या वाळसेद ठायीं ठायीं ॥
दिवाणखाना अती विस्तीर्ण । सभा बैसली परिपूर्ण ।
बहु आदरे अर्पून । यथाविधी सत्कार पूजिले ॥
सुवर्ण मोतियाचे हार । शिरीं बांधिला शिरपेंच थोर ।
उत्तमोत्तम गुलाब अत्तर । पानदानासहित दिधलें ॥ इ० इ०

गायकवाड सरकारावर नानांचे हे संबंध लक्षात घेऊनच महाराजांनी सभामंडपाची कामगिरी नानांवर सोपविली असावी
( नाना शंकरशेट चरित्र, ले प बा कुलकर्णी, पृ १६० )

याच नाना शंकरशेटनी सन १८०० साली सात हजार रुपये खर्च करून भक्तांच्या सोयीसाठी, वज्रेश्वरी येथे एक धर्मशाळा बांधली होती गुंजेश्वर, वाळकेश्वर, घोडबंदर, शहापूर येथेही नानांनी धर्मशाळा बांधलेल्या

होत्या. पुणे येथे वेताळ पेठेतील आपल्या वाड्यापासून पर्वतीचे पायथ्यापर्यंत, उत्तम सडक बांधली आणि कलेक्टर साहेबांनी त्याचे नाव 'जगन्नाथ शंकरशेठ रस्ता' असे ठेवले. मुंबई शहराच्या जडणघडणीत या महापुरुषाचा वाटा फार मोठा आहे.

या देवळाच्या परिसरात गरम पाण्याची अनेक कुंडे आहेत. असे सांगतात की, यज्ञाच्या वेळी जमलेल्या ऋषिमुनींसाठी ही कुंडे पूर्वी उत्पन्न केलेली होती. येथे नदीमध्येही ही कुंडे आहेत. काहीजणांची अशी भोळी समजूत आहे की, देवीने ठार केलेल्या राक्षसाचे ते रक्त असावे. वडवलीच्या शिवेवर अकोली गावीही असली कुंडे आहेत. सध्या या कुंडातील पाणी आरोग्याला उत्तम म्हणून भक्तजन नेहमी वापरीत असतात. इतकेच नव्हे तर या ठिकाणी एक आरोग्यकेंद्र उघडण्याचा महाराष्ट्रसरकारचा विचार आहे. काही गृहस्थांनी खाजगी आरोग्यकेंद्रे उघडलेली आहेत.

सांप्रत हे स्थान तेथून एक मैलावर असलेल्या गणेशपुरी या क्षेत्रामुळे अधिक प्रसिद्धीस पावले आहे. यज्ञसमारंभासाठी जी देवमंडळी या ठिकाणी उपस्थित होती, त्यांची राहण्याची व्यवस्था या ठिकाणी केलेली होती. हल्ली ज्याप्रमाणे वार्षिक अधिवेशनांच्या जागांना काही प्रथितयश पुढाऱ्यांची नावे देण्यात येतात, ( उदा० मोतीलाल नगर, लो. टिळक नगर इ० इ० ) त्याचप्रमाणे त्या वसाहतीला गणेशाच्या नावाने गणेशपुरी हे नाव दिले होते. या ठिकाणी एक शंकराचे मंदिर कल्याणचा सुभेदार श्री. रामजी महादेव बिवलकर याने सन १७६० ते ७२ या काळात बांधले. इमारतीच्या दगडांचे नीट निरीक्षण केले तर ते पूर्वीच्या मंदिरांचे असावेत असे दिसते. ( ठाणे जिल्हा गॅझेट, पृष्ठ ३७४ )

गणेशपुरी येथे २५ । ३० वर्षांपूर्वी स्वामी नित्यानंद या नावाचे एक आधुनिक संत येऊन राहिले होते. ते पहाटे तीन वाजताच उठून गरम पाण्याच्या कुंडात स्नान करीत, देवीला नमस्कार करून येत आणि मगच आपल्या नित्य-कर्माला सुरवात करीत. स्वामी पराकोटीस पोहोचले असल्याने त्यांचे वागणे लोकांना विचित्र वाटे. त्यांच्या भाषणातील गूढार्थ मी मी म्हणविणाऱ्या अनेकांना उमगत नसे. त्यांनी काही चमत्कारही केले आहेत. त्यांनी गणेशपुरीचा कायापालट केला. दवाखाना, शाळा, धर्मशाळा इत्यादि सर्व सोयींनी गणेशपुरी युक्त केली. प्रत्यही अनेक भक्त त्यांच्याकडे जात. पण केवळ आशीर्वादापलीकडे त्यांनी कोणालाही काही दिले नाही. सन १९६१ साली त्यांनी समाधी घेतली.

आपल्या मृत्यूची चाहूल त्यांना आधीच लागली होती म्हणून त्यांच्या निवासू माळ्याला त्यांनी अगोदरच खड्डा तयार करण्यास सांगितले होते देवी आणि तिचा हा जणू उजवा हातच असा हा एक भक्त, अशा दोघांच्या दर्शनाचा लाभ भक्तांना मिळत असे लेखकालाही त्यांचे आशीर्वाद लाभलेले आहेत

ओवी

वज्रेश्वरीस वदी दिगंबर । लिहावया चरित्र समग्र ।
मागे बुद्धी कुशाग्र । मग आरंभ करीतसे ॥ १ ॥
त्रेतायुगी वसिष्ठमुनी । त्रिचंडी आणावया भुवनीं ।
योजुनी वज्रेश्वरी भूमी । चंडियाग आरंभिला ॥ २ ॥
सर्व देवासी पाचारिले । परि इंद्रदेवा विसरले ।
कोपायमान ते झाले । निश्चय केला विध्वंसा ॥ ३ ॥
इंद्रे पाणी घेतले शोषून । वसिष्ठ दर्भाचा करूनि बाण ।
पाताळगंगा आणून । उष्णतीर्थेही निर्मित ॥ ४ ॥
मग देवेंद्र पाठवी आधिव्याधी । ऋषीमुनीस द्यावया उपाधि ।
वसिष्ठ निर्मित वनौषधी । हरावया व्याधीतें ॥ ५ ॥
देवेंद्र कोपे अग्नीसमान । वसिष्ठावरी सोडी वज्र महान ।
पार्वतीनें गिळिले तत्क्षण । भक्त रक्षण करावया ॥ ६ ॥
म्हणोनी उमा हीच वज्रेश्वरी । नाम पावली महेश्वरी ।
शरणागताची साह्यकारी । तारीतसे निजदासा ॥ ७ ॥
उजवे बाही सावित्री । दक्षिणे लक्ष्मी भार्गव वसती ।
महालक्ष्मी नामें बोलती । भक्तकाजार्थी राहिल्या ॥ ८ ॥
चिमाजी आप्पा करी स्वारी । वसईच्या पाणकिल्ल्यावरी ।
दोन वेळ फिरे माघारी । तरी जिंकीन म्हणेन मी ॥ ९ ॥
वज्रेश्वरीचे वंदोनी चरण । कोटकिल्ला जिंकीला जाण ।
आधेचे देवालय बांधोन । पुण्यग्रामीं परतला ॥ १० ॥
नित्यानंद स्वामी परम समर्थ । गणेशपुरी वर्तत ।
भक्तांचा करिती कायापालट । महान परमहंस जाणा ॥ ११ ॥
धन्यधन्य श्री वज्रेश्वरी । धन्यधन्य गणेशपुरी ।
भक्तांचा थोडा मंदिरीं । कृष्णसुतासह वंदितसे ॥ १२ ॥

## (४०) वरदायिनी

प्राचीन काळची कथा आहे ही. एकदा भगवान विष्णूच्या कानेतून अतिशय घाम सुटला आणि त्यापासून दुर्दम नावाच्या राक्षसाचा जन्म झाला. मोठेपणी तो प्रबळ झाल्यावर सर्व देवतांना पीडा करू लागला. तेव्हा विष्णूंनी सर्व देवांना सांगितले की, ' आदिमायेव्यतिरिक्त इतर कोणीही या दैत्याचा वध करू शकणार नाही. ' देवांचे इप्सित पूर्ण होण्यासाठी त्यांनी सर्व देवांना ' ॐ ऱ्हीं क्लीं श्रीं भगवती वरदायिन्यै नमः । ' या मंत्राचा जप करण्यास सांगितले. याप्रमाणे देवांनी देवीची अनेक वर्षे आराधना केल्यावर आदिमाया प्रकट झाली आणि तिने देवांना सुयोग्य वर दिला. तिने दुर्दम दैत्याचा वधही केला. देवांना इच्छित वर देणारी देवी म्हणून विष्णूंनी तिचे नाव श्रीवरदायिनी असे ठेवले आणि आजच्या गुजराथ प्रांती कलोलजवळ रुपाळ नावाच्या गावी तिची स्थापना केली. यास्तव या देवीला कोणी रूपावती असेही म्हणतात.

अशीही एक कथा प्रचलित आहे की, श्रीरामप्रभु वनवासकाळी अरण्यातून फिरत असता ते अर्बुदारण्यात शृंगी ऋषींच्या आश्रमाप्रत आले. ऋषींनी त्यांची सर्व हकिकत ऐकून घेतली आणि या देवीच्या स्थानाला भेट देण्यास सांगितले. ' तिच्या कृपेने पुढील आयुष्य सुकर होईल ' असा त्यांना सल्ला दिला. ऋषींच्या सल्ल्यानुसार रामप्रभूंनी देवीचे दर्शन घेतले आणि काही दिवस तिची आराधनाही केली. देवी प्रसन्न झाल्यावर तिने रामाला एक ' अजय बाण ' अर्पण केला आणि कोणाही देवीभक्ताविरुद्ध त्याचा अचूक उपयोग होईल असा आशीर्वाद दिला. रामाने या बाणाचा रावणवधासाठी उपयोग केला आणि देवीकृपेमुळे अर्थातच तो विजयी झाला. त्याचप्रमाणे पांडवही आपल्या वनवासकाळात तेथे आले होते आणि त्यांनी देवीची आराधना केली होती. त्यांनी देवीजवळ असा

नवस केला होता की, ' आमचा अज्ञातवासाचा काळ निर्विघ्नपणे पार पडला तर आम्ही सोन्याच्या पळीने तुझ्यापुढे होम करू.' तिच्या कृपेने त्यांचा अज्ञातवासाचा काळ विनासंकट पार पडल्यावर पांडवांनी या क्षेत्री येऊन मोठा होम केला. त्या वेळी जी सुवर्णाची पळी त्यांनी वापरली ती अद्याप तेथे आहे आणि यात्रेकरू ती मुद्दाम पाहतात. रामचंद्राला आणि पांडवांना देवीने वरदान दिल्यामुळे तिचे वरदायिनी हे नाव सार्थ असल्याचे पुनश्च एकदा प्रत्यास आले. (राम आणि पांडव यांच्या भेटींना इतरत्र मात्र कोठे आधार मिळालेला नाही.)

देवीच्या मंदिरासमोर एक विस्तीर्ण तलाव आहे. त्यातील पाण्याचे एक वैशिष्ट्य असे की, तूप तेल वगैरे चिकट आणि तेलकट पदार्थांने माखलेले कपडे त्यात धुतले असता त्यांचा चिकटपणा निघून जातो.

या देवीसंबंधात एक ऐतिहासिक कथा आहे की, पाटणचा राजा करण सिंह स्वर्गवासी झाल्यावर त्याची राणी मृणालदेवी हिने काही दिवस राज्य कारभाराचा गाडा हाकला. परंतु आपला प्रबळ शत्रु जगातूनच नाहीसा झाल्याचे समजताच धारा नगरीचा राजा यशोवर्मा याने पाटणवर स्वारी करण्याची तयारी करून तो चाल करून आला. यशोवर्म्यापुढे आपला मुळीच टिकाव लागणार नाही, उलट अनेक सैनिक नाहक बळी जातील या विचाराने आणि हा प्रसंग टाळण्याच्या इराद्याने राणीने आपला लहान मुलगा सिद्धराज याला घेतले आणि ती परागंदा झाली. यशोवर्म्याला आयतेच फावले! त्याने पाटणवर हल्ला केला आणि अमाप लुटालूट केली भरपूर खंडणीही वसूल केली. आपल्या प्रजेचे झालेले हाल ऐकून राणीला अतिशय वाईट वाटले आणि तिने यशोवर्म्याचा सूड घेण्याचे ठरविले. इतकेच नव्हे तर तिने आपले हे उद्दिष्ट साध्य होईपर्यंत अन्नपाणी देखील वर्ज्य करण्याचे ठरविले. राणीचा मुक्काम या वेळी वरदायिनी मंदिराच्या आसपासच होता.

'उद्या एक शेणाचा किल्ला तयार कर, त्याची पूजा कर आणि तो पेटवून दे अशा रीतीने शत्रूचा प्रतीकात्मक प्रतिकार झाला म्हणजे मातेने अन्नग्रहण करण्यास प्रत्यवाय नाही. पुढे माझ्या कृपेने खरोखरच शत्रूचा पराजय होईल.'

दुसरे दिवशी राजपुत्राने रात्रीचा सर्व वृत्तांत आपल्या आईला सांगून देवीच्या आज्ञेप्रमाणे किल्ला तयार करून तो पेटवून दिला. त्यानंतर त्याच्या आईने आपला उपवास सोडला. पुढे राणीने आपले पूर्वीचे काही सैनिक जमविले. इतरांनीही तिला मदत केली, त्यामुळे आणि देवीच्या कृपेने, आपला इच्छित सूड तिने यशोरम्यांवर उगवला आणि त्याचा दणदणीत पराभव केला त्यानंतर आपला पुत्र सिद्धराज याला तिने पाटणच्या गादीवर बसविले. देवीच्या कृपाप्रसादाने आपल्याला आपले राज्य परत मिळाले हे राजपुत्र विसरला नाही त्याने सहस्रावधी रुपये खर्च करून मंदिराचा जीर्णोद्धार केला तेच शिल्प आपण आज पाहतो

देवीची मूर्ति शुभ्र पाषाणाची नि चतुर्भुज असून तिच्या हातात लक्ष्मी-सरस्वतीच आयुधे आहेत. नवरात्रामध्ये या देवीची वार्षिक यात्रा भरते. 'श्रीवरदायिनी महात्म्य' या नावाच्या या देवीच्या स्तुतीपर ग्रंथ उपलब्ध आहे त्यामध्ये वरील हकीकत आलेली आहे. गुजराथ प्रांती हे एक प्रभावी शक्तिपीठ मानले जाते. (कल्याण, शक्तिअंक १९३४, पृष्ठ ६६३)

पृथ्वी

कलोळ नगरा परीसरिं रूपाळ ते ग्रामही ।
पुराणप्रिय देवि श्री वरदायिनी पीठही ॥
समस्त सुर आर्तभावि नमुनि जपा मंत्रिलें ।
स्वयें प्रकटुनी तुवां असुर दुर्दमा मारिलें ॥ १ ॥
सुरास वरदान दे, वरदायिनी नाम ये ।
कथा वदति राम शृंगि मुनि भेटती ते स्वये ॥
प्रदान करिसी तदा अजय बाण रामा वरें ।
दशाननही रावणा हनन-कार्जि कामास ये ॥ २ ॥
वनीं फिरत पंडु पुत्र तुजला स्वयें प्रार्थिती ।
सरोच निर्विघ्न तो समय अज्ञ-वासाप्रती ॥
तसेंच भवतां तुला हवन पचपरीतुनी । (पळी)
करित परिपूर्णतादि वचना पुरा अर्जुनी ॥ ३ ॥

स्तवीत जयसिंह पाटण-नरेश तो संकटीं।
तुझ्या वरदहस्तीं तूं सतत त्याप्रती तारती ॥
तया स्मरणिं जीर्ण मंदिर तुझे उभारीतसे।
स्मृतीस तर आजही हवन-पंचवही दिसे ॥ ४ ॥

## (४१) वाराणसी देवता

वाराणसी हे भारतवासियांचे अति पवित्र क्षेत्र मानले जाते. धर्माने ज्या सात नगरी पुण्यशील मानल्या आहेत त्यामध्ये 'काशीकांचीअवंतिका' या क्षेत्राचा समावेश केलेला आहे. पवित्र गंगामातेच्या काठी वसलेले शहर आणि काशीविश्वेश्वरासारखी प्रसिद्ध देवता, या जोडसंगमामुळे दुधात साखर पडली आहे आणि म्हणूनच हे क्षेत्र सर्वांना प्रिय व्हावे यात काय नवल ? वाराणसी आणि विश्वेश्वर ही जोडी अनंतकाळ एकत्र राहिल्यावर त्यांना अहंकार जडला की, आपली जोडी अभेद्य आहे. पण गर्वाचे घर खाली हे वचन प्रसिद्धच आहे. त्याप्रमाणे येथेही घडले.

एके वेळी वाराणसी भागात अती भयंकर दुष्काळ पडला, अवर्षण झाले आणि लोकांचे अतोनात हाल होऊ लागले. यात्रेकरूंनी येजा थांबली. आता यावर काय उपाय करावा, यावर विचारविनिमय करण्यासाठी सभा भरली आणि या दुर्धर प्रसंगातून निभावून नेणारा कोणी उत्तम शास्ता या शहरी आणावा असे ठरले. ब्रह्मदेवाने ही कामगिरी आपल्याकडे घेतली. त्या वेळी जवळच एका पर्वतावर दिवोदास नावाचा तापसी मोक्षप्राप्तीसाठी साधना करीत होता. ब्रह्मदेवाने या कामी त्याचीच निवड केली. आत्महितापेक्षा लोककल्याण अधिक महत्त्वाचे म्हणून त्याने ही कामगिरी आपल्या शिरावर घेतली, परंतु त्याने ब्रह्मदेवाला एक अट घातली. त्याने असे पाहिले की, विश्वेश्वराचे महत्त्व या ठिकाणाहून कमी केल्याशिवाय बाहेरून येणाऱ्या यात्रेकरूंची रीघ थांबणार नाही आणि त्यावर जे लोक उदरनिर्वाहासाठी अवलंबून होते ते कामधंदा करून स्वतःच्या पायावर उभे राहणार नाहीत. दुष्काळ हटविण्याचा आणि संपत्ति वाढविण्याचा तो उत्तम मार्ग होता. यासाठी त्याने ब्रह्मदेवाला विनंती केली की, विश्वेश्वराला काही वर्षे वाराणसीतून बाहेर न्यावा. ब्रह्मदेवाने ही गोष्ट मान्य केली.

या कामी ब्रह्मदेवाने एक शक्कल लढविली. मरीचि ऋषि मंदार पर्वतावर तप साधना करीत होते आणि त्यांना वर देण्याचा समय प्राप्त झाला होता. ब्रह्मदेवाने विश्वेश्वराला विनंती केली की, 'आपण मजबरोबर मंदार पर्वतावर

चलावे.' भोळ्या शंकराला ब्रह्मदेवाचे हे कपट उमगले नाही आणि त्यांनी वाराणसी सोडली. ते दोघे प्रथम मंदार पर्वतावर गेले, ऋषींना वरदान करविले आणि तेथून ब्रह्मदेवाने त्यांना थेट कैलास पर्वतावर नेले काही काळ त्यांनी तेथेच वास्तव्य करावे आणि वाराणसीला परतू नये अशी विनंति केली. याप्रमाणे वाराणसी आणि विश्वेश्वर यांची ताटातूट झाली साक्षात देवाचे वास्तव्य हलल्यावर विश्वेश्वराचे महत्त्व कमी झाले अशीच समान कथा अर्वाचीन काळातही एक घडलेली आहे.

वासुदेवानंदसरस्वति श्री टेंबेस्वामी यांनी नरसोबाच्या वाडीला दत्तो-पासना केली आणि त्यांचे लग्न झालेले असताही ते माणगावी आपल्या घरी परत जाईनात. तेव्हा दत्तात्रयांनी त्यांना दृष्टांत दिला की, 'माणगावी आमच्या मूर्तीची तुम्ही स्थापना करावी त्या ठिकाणी आम्ही सात वर्षे वास्तव्य करू' याप्रमाणे स्वामींनी माणगाव (गोवा) या ठिकाणी दत्तात्रयाची स्थापना केली त्या क्षेत्राची नंतर इतकी ख्याति झाली की, नरसोबाच्या वाडीला जाण्याऐवजी लोक माणगावीच जाऊ लागले आणि काही अशी तरी वाडीचे महत्त्व कमी झाले. पण दिलेली मुदत भरताक्षणीच पुन्हा दृष्टांत देऊन दत्तात्रयांनी ते क्षेत्र सोडताच, माणगाव येथील वर्दळ कमी झाली आणि पोटभरू लोकांची चलती नष्ट झाली (श्रीटेंबेस्वामीचरित्र, श्री श्रीपादशास्त्री किंजवडेकर.)

दिवोदासाने कारभाराचे सुकाणू हाती घेतल्यावर त्याने दुष्काळनिवारणाच्या आपल्या कल्पना अमलात आणल्या कर्मधर्मसंयोगाने पर्जन्यवृष्टीही लवकर झाली आणि अल्पावधीतच सर्वत्र सुबत्ता झाली पण या सुधारलेल्या परिस्थितीचे श्रेय दिवोदासाकडे गेल्यामुळे इतर देव त्याचा द्वेष करू लागले आणि त्यांनी नंतर त्याला सहकार्य देण्याचे नाकारले दिवोदास स्वत तपसाधनेने उच्च कोटीला पोहोचलेला असल्यामुळे सर्व देवांची कामे तो स्वत च करू लागला याप्रमाणे देवांचे आणि पर्यायाने शंकराचे दिवोदासाला निस्तेज करण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले दिवोदासाची कार्यपद्धति लोकांना आवडली आणि विश्वेश्वराकडे कोणी पहाण्यासही तयार होईना यामुळे शंकरांना परत वाराणसीला जाता येईना.

ब्रह्मदेवानीच शंकरांना बाहेर नेले होते आणि सर्व स्थिरस्थावर झाल्यावर परत आणण्याचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला नाही दिवोदासाला बाहेर काढण्यासाठी ब्रह्मदेवांनी विप्राचे रूप घेतले आणि एका यज्ञसामग्रीची त्याजजवळ मागणी केली दिवोदासही काही मेल्या आईचे दूध पिघालेला नव्हता त्याने एकाच नव्हे तर दहा यज्ञांना पुरेल एवढी सामग्री त्या विप्राला उर्फ ब्रह्मदेवाला दिली. कोणतेही उणेपण राहू दिले नाही. त्यामुळे निराश होऊन ब्रह्मदेव परत

गेला. ज्ञानकोश ( काशी ) ग्रंथामध्ये यासंबंधी आणि इतर देवता व घाट यासंबंधी उत्तम विवरण आहे, ते जिज्ञासूंनी मुळातूनच वाचावे.

शेवटी शंकरानी युक्ति योजली. त्यांनी गणेशाची स्तुति केली आणि त्याला प्रसन्न करून घेतले. दिवोदासाला काशी क्षेत्रातून बाहेर काढण्याची कामगिरी त्यानी गणेशावर सोपविली. गणेशाने गुणेश नावाचा एक तेजस्वी कुमार उत्पन्न करून त्याला दिवोदासाकडे पाठविले. गुणेशाने वाराणसीच्या एका भागात वस्तान बसविले आणि लोकाना आपल्याकडे आकृष्ट करून घेतले. साहजिकच दिवोदासाचे महत्त्व कमी होऊ लागले. एकदा स्वतः दिवोदास गुणेशाच्या भेटीस आला आणि त्याच्या रूपाला पाहून तोही मोहीत झाला. दिवोदास आपल्या पूर्ण कह्यात आला असे ध्यानी आल्यावर गुणेशाने त्याला नगराबाहेर काढले. यानंतर काशीविश्वेश्वर परत स्वस्थानी आले आणि त्यांना अंमल चालू झाला.

पुराणकाराचे म्हणणे असे की, वाराणसी शहर दिवोदासानेच वसविले. पीठनिर्णय ग्रंथाप्रमाणे या क्षेत्री सतीचे कुंडल पडले आणि शक्तिपीठ निर्माण झाले. हे विशालाक्षीचे मंदिर असावे. यादीप्रमाणे येथे काळभैरवाचेही मंदिर आहे. या क्षेत्री गंगा नदीवर अनेक घाट आहेत. तसी अनेक अन्नछत्रे आणि मंदिरेही होती. आपल्या आयुष्याचा शेवट या ठिकाणी होऊन देहही या ठिकाणी पडावा या हेतूने अनेक वृद्ध त्या ठिकाणी येऊन राहात. त्यांची निर्वाहाची सोय या अन्नछत्रामध्येच होई. ही अन्नछत्रे आणि त्यांतून होणारे अन्नदान अतिशय पुण्यकारक समजले जात असल्यामुळे अनेक धनवान गृहस्थ ती चालवीत असत. इतिहासात एक कथा उपलब्ध आहे, ती अशी. थोरले माधवराव पेशवे यांना एकदा तेथे अन्नदान करण्याची इच्छा झाली. पण मुसलमानी अंमलात तेथे जाणे धोक्याचे असल्याने तेथील ब्राह्मणांनीच त्यांना कळविले की, ' सरकारस्वारीने जातीने या ठिकाणी उपस्थिति ठेवणे धोकेदायक आहे. ' पेशव्यानी ब्रह्मवृंदाचे म्हणणे मान्य केले, परस्पर अन्नदान करण्याची व्यवस्था केली आणि एका लक्षाचे ब्राह्मणभोजन घातले. त्या वेळी ब्राह्मणांना भोजनदक्षिणा म्हणून दोन दोन पैसे दिले असल्याचे दप्तरीत नमूद केले आहे. अर्थात् त्या काळच्या दोन पैसात आणि आजच्या दोन नया पैसात जमीन-अस्मानाचा फरक आहे, हे निराळे सांगायलाच नकोच !

नानारत्नविचित्रभूषणकरि हेमाम्बराडम्बरि ।
मुक्ताहारविलम्बमानविलसद्वक्षोजकुम्भान्तरि ।।

। काश्मीरागरुवासिताङ्गरुचिरे काशीपुराधीश्वरि ।
भिक्षां देहि कृपावलम्बनकरि माताऽन्नपूर्णेश्वरि ॥ (शंकराचार्य)

जिच्या हातांमध्ये सर्व प्रकारची रत्ने जडविलेली आश्चर्यकारक भूषणे आहेत, अंगावर आणि सिंहासनाच्या प्रभावळीवर सुवर्णाचे भरजरी वस्त्र शोभत आहे, भरजरी वस्त्रांच्या समूहाने जी युक्त आहे, अथवा शोभून दिसते आहे, वक्ष स्थळावर मौक्तिकहार रुळत आहेत, केशर, कस्तुरी, अगरु, चंदन यांची उटणे अंगाला लावल्यामुळे अंगकांति उजळून निघाली आहे, अशी काशीनगरीची अधिष्ठात्री आणि भक्तजनांना कृपेचा आधार देणारी तू माता अन्नपूर्णे, मला भिक्षा घाल ज्ञान वैराग्याच्या सिद्धीसाठी आई तू मला भिक्षा घाल याप्रमाणे शंकराचार्यांनी स्तुति करून भिक्षेचा वर मागितला आहे ही विश्वेश्वराची अर्धांगी व विश्वाची अधिष्ठात्री असल्याने काशीमध्ये विश्वेश्वराचे दर्शन घेतल्यावर दुसऱ्या क्रमाकाने या देवीचे दर्शन घेण्याची रूढि आहे

(सुबोध स्तोत्रसंग्रह, ले पांडुरंगशास्त्री गोस्वामी)

या देवीला अन्नपूर्णा नाव का आले ते पाहण्यासारखे आहे एक दिवस शिव भिक्षेला गेला असता त्याला भिक्षा मिळाली नाही, आणि त्याला भिक्षा न मिळणे हेही नारदाचे कारस्थान होते क्षुधाक्रांत शिव परत आल्याबरोबर पार्वतीने त्यांना सुग्रास अन्न वाढले, त्याने तृप्त होऊन, ‘ तू अन्नपूर्णा हो ’ असा वर दिला असे सांगतात की, काशीक्षेत्रातील सर्वांचे भोजन झाल्याविना ही देवता नैवेद्य ग्रहण करीत नाही याच कथेचा आधार घेऊन चांद्रसेनीय कायस्थ समाजातील काही सग गृहिणी आपला पति प्रवासाहून परत येण्याच्या वेळी, या देवीची मनोभावे करुणा भाकतात देवीच्या मस्तकावर पिवळ्या अक्षता वाहतात आणि प्रार्थना करतात की, ‘ घरी येणाऱ्या पाहुण्याची (पतीराजाची) क्षुधा शांत करून रक्षण कर ’ (भारतीय सांस्कृतिक कोश भाग १, पृ १०६)

आहे. या देवतेचा विशेष म्हणजे नवरात्रामध्ये येथे अन्नकोट रचला जातो आणि सर्वांना त्या अन्नाचा प्रसाद वाटला जातो

येथील दुसरे वैशिष्ट्य असे की, नेहमीची अन्नपूर्णेची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे, पण दुसरीही एक सुवर्णाची उत्सवमूर्ति आहे. ती साधारण दीड फूट उंच असून एका हातात थाळी घेऊन शिवाला अन्नदान करीत आहे, असे सपूर्ण शिल्प आहे. दिवाळीच्या तीन दिवसाच्या उत्सवामध्ये ती भक्तांच्या दर्शनासाठी उचावर मांडतात

काशी क्षेत्री काशीदेवीचे मंदिर असून ते जेष्ठेश्वर मंदिरापासून थोड्या अतरावर आहे. जवळच सप्तसागरकूप आहे. वाराणसी शहरात निरनिराळ्या भागात एकूण ९ दुर्गा मंदिरे आहेत (कल्याण, क्षेत्र अक १९५७|१२३)

वाराणसी येथील देवतांचा इतिहास पाहात असता, विश्वेश्वराची माहिती दिली नाही, तर तो अपुरा होईल यास्तव या ग्रंथाच्या विषयकक्षेबाहेर जाऊनही ती देत आहे. भारतातील प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगापैकी विश्वेश्वर हे एक प्रमुख शक्तिपीठ आहे. भारतीयांचा तो एक मानबिंदु मानला जातो. असे असूनही अनेकदा हा मानबिंदु शत्रूनी पायाखाली तुडविला असून ते स्थान भ्रष्ट केले आहे. भारत स्वतंत्र झाला तरीही तो कलक पूर्णतः धुवून टाकता आलेला नाही ही गोष्ट धार्मिक प्रवृत्तीच्या भारतीयांच्या मनाला सारखी टोचणी देत असते हे मंदिर कितीदा उध्वस्त झाले आणि पुन्हा त्यास त्याची पूर्वप्रतिष्ठा मिळवून देण्याचे कसकसे प्रयत्न झाले हे इतिहास वाचल्याने पूर्णतः ध्यानात येईल.

सन १४९४ साली सिकदर लोदीने ते देवालय सपूर्ण उध्वस्त केले, पण निराकार देवही आपला प्रभाव लोकाना समयानुसार दाखवितो आणि आपले अस्तित्व त्याना मानावयास लावतो सर्वांना ते समजते असे नाही. पण विवेकांना ते कळूनही आकळत नाही, समजूनही उमजत नाही हे मंदिर उध्वस्त झाल्यानर एका दीर्घकालीन अवर्षणाचे सकट त्या गावावर कोसळले. सर्वत्र अन्नान्नदशा झाली आणि रोगराई पसरली हिंदूबरोबरच मुसलमानांचेही अतिशय हाल झाले, त्यानाही जाणीव झाली की, कदाचित् मंदिर नष्ट केल्याबद्दल ही शिक्षा असावी त्याच्यामध्ये वैचारिक मथन सुरू झाले

कारण समजल्यावर मुसलमानी राज्यकर्त्यांचीही हिंदु देवाच्या अस्तित्वाबद्दल खात्री पटली. राज्यकर्त्यांनी शास्त्रीबुवांना त्या उध्वस्त ठिकाणी अनुष्ठान करण्यास परवानगी दिली. विश्वेश्वर सत्वास जागले आणि शास्त्रीबुवांची निष्ठा पाहून संतुष्ट झाले. थोड्याच दिवसात भरपूर पर्जन्यवृष्टी होऊन सर्वत्र आबादीआबाद झाली. देवाच्या जागृतावस्थेच्या या दृढ प्रत्ययानंतर सन १५६९ साली पुन्हा मंदिर उभारले गेले. पण तेही अल्पायुषीच ठरले कारण त्यानंतर १०० वर्षांनी औरंगजेबाने पुन्हा ते तोडून त्या जागी मशीद उभारली.

सध्या आपण जे विश्वेश्वराचे मंदिर पाहातो ते राणी अहिल्याबाई होळकर हिने सन १७८३ साली बांधले आहे. मूळ मंदिराची जागा मशिदी-खाली आणि ज्ञानवापी मंडपात गडप झालेली आहे. म्हणजे सध्याचे मंदिर त्याच्या मूळ स्थानावर नाही. याच कारणास्तव ज्ञानवापीतील पाणीही पवित्र मानले जाते. (*Dave, Immortal India, page 6*). सन १९५८ साली काही हिंदुधर्मीयांनी या ठिकाणी सत्याग्रह करून हालअपेष्टा, दंड व कारावास सोसून ज्ञानवापी मंडपात धार्मिक विधि करण्याचा आपला हक्क मान्य करून घेतला आहे. पण मूळ जागा कबज्यात आलेली नाही.

या क्षेत्रातील आणखी एक प्रमुख देवता म्हणजे काळभैरवाचे स्थान होय. हा कालीदेवीचा जोडीदार मानला जातो. या काळभैरवाला अठरा हात असून गळ्यात रुंडमाळा, कानात व बाहूवर सर्पभूषणे, मस्तकावर सर्पांचे वेटोळे, हातात तरवार आणि रक्ताचे भांडे, असे त्याचे रूप आहे. वाराणसी क्षेत्राचा हा राखणदार समजतात. यास्तव याचे पूजन केले जाते. दक्षिणेत या देवाची अनेक गावी मंदिरे दिसतात. काही ठिकाणी मानवाकृति मूर्ति असते, तर इतर काही ठिकाणी एकाद्या दगडाला शेंदूर थापून तीच मूर्ति पूजतात. सर्पभूषणे वापरणारा हा देव एखाद्याला सर्पदंश झाल्यास त्याचे विष उतरवितो आणि मरण टाळतो असा सर्वत्र समज आहे. या श्रद्धेमुळेच खेडेगांवी, भाविक श्रद्धाळु जनता सर्पदंश झालेल्या मनुष्याला देवाच्या गाभाऱ्यांत नेऊन ठेवतात, तेथे तेलाचा अगर तुपाचा दिवा लावतात आणि दुसरे दिवशी तो पूर्ण बरा झाल्यावर त्याला घरी आणतात.

स्वकष्टार्जित उत्पन्नावर त्याचे स्वाभिमानाने पोषण चालते होते. या गावी ज्या ठिकाणी सध्या पर्णकुटी बगला आहे, त्या टेकडीवर एका गुहेत एक प्राचीन शिवालय आहे, आणि बाजूला एका ओवरीत भैरवाची मूर्ति आहे. या मूर्तीच्या गाभाऱ्यात माणसाला नेऊन ठेवल्यावर तो दुसऱ्या दिवशी शुद्धीवर येत असे, हे लेखकाने अनेकदा पाहिले आहे. त्या काळात जसा सर्पदंश झालेला माणूस तेथे ठेवला असता तो सहसा दगावल्याचे एकही उदाहरण दिसले नाही. त्या मूर्तीच्या छातीवर दोन भोके असून त्यामध्ये सुपाऱ्या ठेवून देवाचा कौल घेत. प्रश्न विचारल्यावर उजवीकडील सुपारी पडली तर कार्य यशस्वी होईल असे समजत आणि डावीकडील पडली तर कार्य अयशस्वी होईल असे मानीत.

काशी क्षेत्राचे तीर्थोपाध्याय वे. मू. लेलेशास्त्री (नाना फडणीस वाडा) यांनी निवेदन केले की, तेथील वाराही देवीची मूर्ति अति विशाल आहे सुमारे सहा फूट तरी उंच असावी. या देवतेचे पूजन ब्राह्ममुहूर्तावर होते आणि दर्शनेच्छु भाविकाला त्याच समयी दर्शन घडू शकते. कारण सूर्योदयानंतर मंदिराचे दरवाजे बंद होतात. भगवान विष्णूने जे वराहाचे रूप घेतले होते, त्याचेच हे प्रतीक होय. या देवीच्या भव्य मुखामध्ये एक लहान बालकही दाखविलेले आहे

वाराणसी क्षेत्र हे नवगौरी यात्रेबद्दल प्रसिद्ध आहे. ज्याला या यात्रेचे व्रत घ्यावयाचे असेल, त्याने प्रतिमास शुद्ध द्वितीयेला ही यात्रा करावयाची असते सर्व स्थाने तेथेच असल्यामुळे त्यांना भेट देऊन त्यांचे यथाविधि पूजन करणे सोयीचे असते. खाली दिलेल्या क्रमाने या गौरींना भेट द्यावयाची असते

(१) मुखनिर्मालिका गौरी—गायघाट, हनुमान मंदिराजवळ.
(२) ज्येष्ठा गौरी—कर्णघंटा मोहल्ला, जेष्ठेश्वर मंदिराजवळ.
(३) सौभाग्य गौरी— विश्वनाथाच्या मंदिरात
(४) शृंगार गौरी—विश्वनाथाच्या मंदिरात
(५) विशालाक्षी गौरी—मीर घाटावर
(६) ललिता गौरी—ललिता घाट.
(७) भवानी गौरी—कालिका गल्ली
(८) मंगला गौरी—लक्ष्मण बाळा घाटावर
(९) महालक्ष्मी गौरी —लक्ष्मीकुंडाजवळ

नवगौरींच्या यात्रेप्रमाणे नवरात्रीच्या दिवसात आणखी एक यात्रा केली जाते ती येणेप्रमाणे.

(१) शैलपुत्री—अलईपूर स्टेशनच्या उत्तर दिशेला
(२) ब्रह्मचारिणी—दुर्गाघाट
(३) चंद्रघंटा—चौकाच्या पूर्वस एका गल्लीमध्ये.
(४) कूष्मांड दुर्गा—दुर्गाकुंडाजवळ, दुर्गामंदिर.
(५) कात्यायनी—संकटा घाटावर, आत्मवीरेश्वर मंदिराजवळ
(६) कालरात्री—कालिका गल्लीमध्ये
(७) महागौरी—अन्नपूर्णा मंदिराजवळ
(८) स्कंदमाता—जैतपूरजवळ, वागेश्वरी नावे प्रसिद्ध आहे.
(९) सिद्धदात्री—सिद्धमाता गल्लीमध्ये

(कल्याण, शक्तिअंक ३४/६५५)

मत्स्यपुराणात शेवटी स्वमुखाने ईश्वर पार्वतीला वाराणसीचे महत्त्व सांगतात ते असे

इदं गुह्यतमं क्षेत्रं सदा वाराणसी मम ।
सर्वेषामेव जन्तूनां हेतुर्मोक्षस्य सर्वदा ॥
अकामो वा सकामो वा अपि तिर्यग्गतोऽपि वा ।
अविमुक्ते त्यजन् प्राणान्मम लोके महीयते ॥ ३० ३० ॥

भावार्थ असा की, हे पार्वती, वाराणसी हे माझे गुह्यतम क्षेत्र आहे. या ठिकाणी सर्व जीवजंतूंना मोक्ष प्राप्त होतो इथे माझे ध्यान करणाऱ्या भक्ताचा योगाग्नि नित्य प्रदीप्त राहतो आणि देवानाही दुर्लभ अशा परम कैवल्याला तो प्राप्त होतो सकाम असो वा निष्काम असो, अथवा तिर्यग्योनीतीलही जीव असो, जो वाराणसी क्षेत्री प्राणत्याग करतो, तो शिवलोकी विराजमान होतो मानवी जीवांना हेच परमस्थान, हेच परममंगल, हेच परब्रह्म आणि हेच परमपद होय त्रिभुवनाचे सार असलेली वाराणसी माझी नगरी असल्याने नाना प्रकारचे लोक, नाना प्रकारची दुष्कृत्ये केल्यावर येथे वस्ती केली असता आणि माझी श्रद्धायुक्त अंतःकरणाने सेवा केली असता पापाचे निर्मूलन, होऊन तेजस्वी बनतात, तपस्वी बनतात

इंद्रवज्रा

विख्यात वाराणसी क्षेत्र वंदू । आर्याजना श्रेष्ठचि मानबिंदु ॥
देवी विशालाक्षिहि शक्तिपीठ । ती अन्नपूर्णाहि वसे इथेंच ॥ १ ॥

> बाराही लिंगात असे प्रमुख। विश्वेश्वराचे शिवपीठ श्रेष्ठ॥
> येथे करावी नवगौरि यात्रा। वदोनि काळा करि पूर्ण यात्रा॥ २॥
> गंगा तटाकी बहु घाट पाही। पवित्र कुंडा मणिकर्णिका ही॥
> त्या सारनाथास अवश्य भेटा। वंदोनिया भारत देवि माता॥ ३॥

* * *

## (४७) विंध्यवासिनी

> नन्दगोपगृहेजाता यशोदा गर्भसम्भवा।
> ततस्तौ नाशयिष्यामि विन्ध्याचलनिवासिनी॥

(मार्कंडेय पुराण, ११।४२.)

> गच्छ देवि व्रजं भद्रे गोपगोभिरलङ्कृतम्।
> रोहिणी वासुदेवस्य भार्याऽऽस्ते नन्दगोकुले॥ ७॥
> अन्याश्च कंससंविग्ना विवरेषु वसन्ति हि।
> देवक्या जठरे गर्भम शेषाख्य धाम मामकम्॥ ८॥
> तस्य निकृष्य रोहिण्या उदरे सन्निवेशय।
> अथाहमशभागेन देवक्या, पुत्रता शुभे॥
> प्राप्स्यामित्वं यशोदायां नन्दपत्न्या भविष्यसि॥ ९॥

(श्रीमद्भागवत)

प्राचीन काळी मथुरेचा राजा कंस याने आपली बहीण देवकी आणि तिचा पति वसुदेव यांना कैदेत टाकले कारण नारदांनी त्याला असे सांगितले होते की, 'देवकीच्या पोटी जन्मास येणारा आठवा गर्भ तुझ्या नाशास कारणीभूत होईल' याप्रमाणे ती पतिपत्नी बंदीगृहात दिवस काढीत असता एक दिवस नारद त्यांना भेटावयास आले आणि त्यांचा सुटकेचा मार्ग म्हणून त्यांना देवीभागवत ग्रंथाचे पारायण करावयास सांगितले. पण त्यांना बंदीगृहात तसे करणे शक्य नव्हते त्यामुळे त्यांनी आपले गुरु गर्गमुनी यांना बोलावून घेतले. गर्गमुनींनी त्यांना सांगितले की 'हे पारायण विंध्यवासिनी देवीच्या सान्निध्यात केल्यास ते त्वरित फलदायी होईल' हे ऐकून 'ही जबाबदारी आमच्यासाठी कृपया आपणच आपल्या शिरावर घ्या' अशी त्या पति-पत्नींनी मुनिवर्यांना विनंती केली. गर्गमुनींनी त्यांची विनंती मान्य केली ते स्वतः विंध्यवासिनी येथे गेले आणि कडक उपासना करून त्यांनी देवीला प्रसन्न करून घेतले. देवीने

त्याना वरदान दिले की, देवकीच्या पोटी स्वत भगवान अवतार घेऊन तिचा आणि तिच्या पतीची सोडवणूक करतील.

देवीने दिलेल्या आशीर्वादाप्रमाणे कृति करणे भगवान नारायणाला अपरिहार्यच ठरले त्या वेळी त्यानी योगमायेला बोलावून घेतले आणि वर श्लोकात दिल्याप्रमाणे पुढील कार्यक्रम ठरविला देवकीचा सातवा गर्भ हा शेषाचा अंश असेल त्याला तेथून काढून रोहिणीच्या उदरात नेवून ठेवायचे, स्वत योगमायेने नंदाची स्त्री यशोदा हिच्या उदरी गर्भधारणा करावयाची आणि भगवान विष्णूनी स्वत देवकीच्या उदरी प्रवेश करावयाचा प्रसूतीनतर यशोदा आणि देवकी याच्या बालकाची अदलाबदल करावयाची येणेप्रमाणे एकूण सर्व कार्यक्रम निश्चित करण्यात आला

कृष्णदयार्णव आपल्या दशम स्कंधावरील टीकेमध्ये याचे वर्णन करतात

सकर्षणाच्या आकर्षी । आज्ञा केली ते अभिवंदुनि ।<br>
तेथासुनि योगजननी । सावधानी वर्तत ॥ ७६ ॥<br>
तेंचि समर्था योगमाया । यथोक्त संपादूनि कार्या ।<br>
यशोदा जे नंदजाया । तिची तनया झाली ॥ ७७ ॥<br>
निमित्त करोनी यशोदेशी । जन्मली प्रभूचे आज्ञेसरशी ।<br>
गर्व्हीं ते सर्वदेशीं । सर्व कार्यासि सादर ॥ ८० ॥

याप्रमाणे भगवान विष्णूच्या आज्ञेवरून योगमायेने नंदाची पत्नी यशोदा हिच्या उदरी जन्म घेतला आणि स्वत भगवान विष्णु देवकीच्या उदरी जन्मास आले. वसुदेवाने आपल्या मुलाचा प्राण वाचविण्यासाठी यमुनानदीच्या पाण्यातून धाडसाने चालत जगर पोहत जाऊन पलतीर गाठला आणि आपला मुलगा यशोदेजवळ ठेवून तिची मुलगी देवकीजवळ आणून ठेवली देवकी प्रसूत झाली हे कसाला कळताच तो नेहमीप्रमाणे तेथे आला आणि त्या मुलीला त्वेषाने य शोधान ओढून धरून ठार करण्यासाठी दगडावर आपटणार इतक्यात काय झाले कृष्ण दयार्णव वर्णन करतात,

तयेतें कस जव झपटी । तव पिटोनि मुष्टि निसटली ॥ ८२ ॥<br>
सवेग केलें उत्प्लवन । ठेली देवता होऊन ।<br>
प्रकटविलें मूळचे ध्यान । ते पाहती नयन कसाचे ॥ ८३ ॥<br>
अष्टभुजा सायुध । देवीरूपें धरिलें सद्य ।<br>
प्रकट ठेली सदायुध । जे अगाध योगिनी ॥ ८४ ॥

याप्रमाणे अष्टभुजा देवीची उत्पत्ति झाली. योगमाया कंसाच्या हातातून निसटली, ती वर अंतराळी जाऊन तेथून विंध्यवासिनी या क्षेत्री प्रकट झाली. तेथेच तिची स्थापना करण्यात आली. रा. दवे आपल्या 'अमर भारत' ग्रंथामध्ये म्हणतात की, हीच देवी गुजराथमध्ये चुवाळ येथे बहुचरा या नावाने प्रसिद्ध झाली. पं. महादेवशास्त्री जोशी म्हणतात की, हीच देवी मरीआई रूपाने दक्षिणेत प्रकट झाली. परंतु या दोघांचेही म्हणणे बरोबर दिसत नाही. कारण अष्टभुजा आणि विंध्यवासिनी ही दोन निरनिराळी स्थाने त्या ठिकाणी आहेत. शिवाय या दोघांनी आपले केवळ मत म्हणून ही विधाने केली आहेत. त्यांना पुष्टि देणारे पुरावे किंवा संदर्भ दिलेले नाहीत.

सप्तशति ( वैकृतिक पृष्ठ ११-१२ ) ग्रंथाप्रमाणे योगमायेचे हे स्वरूप एकानंशा या नावानेही ओळखले जाते. 'देवक्यजनयत् विष्णु यशोदा तां तु कन्यकाम्।' ( हरिवंश ). भावार्थ असा की, देवकीने भगवान् विष्णुरूप कृष्णाला जन्म दिला आणि यशोदेने योगमायेला अंशरूपाने कन्येचा जन्म दिला. प्रजापतीचाही या कन्येमध्ये अंश असल्याने आणि कृष्णाच्या रक्षणार्थ तिचा अवतार झाला असल्याने एकानंशा ही योगमायाच होय.

भारतीय पुराणकारानी ज्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवानच्या जन्मकथेचा अद्भुत इतिहास दिलेला आहे, तत्सादृश इतिहास सनपूर्वी पाचशे वर्षांच्या ग्रीक पुराणात आढळतो. पर्सिऊस ही देवता, माता डेएन व पिता झ्यूउ पासून निर्माण झाली. आर्गोस प्रांतीचा राजा आक्रीसिऊस हा भाडखोर व स्वार्थी वृत्तीचा ( कंसाप्रमाणे ) होता. ज्युपिटर देवतेने त्याला पूर्वसूचना दिली की, नातवाच्या हातून त्याचा मृत्यु होईल. हे टाळण्यासाठी त्याने आपली मुलगी डेएन हिला तळघरात कोंडून ठेविले, पण त्याची ही उपाययोजना फसली. युक्तिप्रयुक्तीने झ्यूसने तिची तळघरात भेट घेतली आणि काही दिवसानी तिला पुत्ररत्न प्राप्त झाले. आक्रीसिऊसला ही वार्ता समजल्यावर त्याने मुलगी आणि नवबालक याना पेटाऱ्यात कोंडून, तो समुद्रात लोटून दिला. ' देव तारी त्याला कोण मारी ' आणि या ठिकाणी तर साक्षात पर्सिऊस देवच होता. कर्मधर्मसंयोगाने ती पेटी एका कोळ्याला सापडली. त्याने ती घरी आणली व त्या बालकाचे पालन-पोषण केले. मुलगा मोठा कर्तृत्ववान झालेला ऐकून, राजाने निराळीच युक्ति योजिली. त्याने मुलाला बोलावून घेतले व त्या काळी महाप्रबळ अशा मेडुसा राक्षसिणीचा वध करण्याची कामगिरी त्यावर सोपविली. हेतु हा की, तो परस्परच मारला जाईल. या राक्षसिणीचे वैशिष्ट्य असे होते की, शत्रूने तिजकडे पाहिले, म्हणजे तात्काळ तो पाषाणरूप होत असे. पर्सिऊसच्या हितचिंतकानी हे गुह्य त्याला आधी सांगितले व निवारण्याचा उपाय म्हणून त्याला चकचकीत ढाल लढण्यासाठी दिली. पर्सिऊसने पाठ फिरवून, पण ढालीतील प्रतिबिंबाकडे पाहून तिजवर हल्ला केला आणि तिचा वध केला, रक्ताने ठिबकत असलेले शीर घेऊन तो वडिलांकडे आला. पुढे ज्याप्रमाणे मल्लयुद्धात श्रीकृष्णाने कंसाचा वध केला, त्याप्रमाणे एका थालींपिक स्पर्धेच्या वेळी, पर्सिऊसने एक थाळी फेकून राजाचा वध केला याप्रमाणे देवतेचा शाप खरा ठरला. याप्रमाणे अनेक भारतीय कथांमध्ये ग्रीकपुराणकथांचे साम्य आढळते.

भारतीय संस्कृति आणि इतर संस्कृतांमध्ये अनेक वेळा साम्य आढळते, त्यातीलच हे उदाहरण पहा. श्रीकृष्णाचा नाश करण्यासाठी कंसाने जे अनेक राक्षस पाठविले, त्यामध्ये एकाने महाबळ ज्योतिषाचे सोंग घेऊन तेथे प्रवेश केला आणि बाळाचे अवगुण वर्णन करून, त्याचा लवकर घात करणेन इष्ट असे मत्प्रमान त्याने वर्तविले. इराणी संस्कृतीमध्ये त्याचा देव झरतुष्ट्र यांच्या जन्मवेळी तशीच हकीकत घडलेली आहे इराणमधील मिडिया प्रांती, रये नामक गावी याचा जन्म नोरदादच्या नववर्षदिनी झाला तेथील प्रजा अनेक जुलमाना कटाळलेली होती आणि यातना सहन करीत असता, सुमारे तीनशे वर्षांपूर्वी एका कृपमाला याचा पुढली ( ज्ञानदेव-रेड्याची कथा पडताळून पहावी ) आणि

या देवाच्या आगमनाची सूचना दिलेली होती. त्यामुळे याच्या जन्मवेळी दानवांचा राजा अहिरमन पाताळात लपून बसला होता. योगायोग असा की, याचे जन्म-वेळी काही अशुभकारक चमत्कार घडून आले. बापाने असल्या शंकांचे निरसन करून घेण्यासाठी एका ज्योतिषाला-दोरासरून नामक मांत्रिक-हकिगत सांगून उपाय विचारला. ज्योतिषी हा अहिरमनचा दोस्त असल्याने त्याला समजून चुकले की, सर्वांना शासन करून, दुःख नाहीसे करणारा तोच जन्माला आलेला आहे. महाबळ ज्योतिषाप्रमाणे त्याने बापाला सांगितले की, या मुलाचा त्वरित नाश करून टाक, नाहीतर मानवावर फार मोठे संकट प्राप्त होईल. बापाने ते सर्व खरे मानून, प्रल्हादाप्रमाणे त्याला अग्नीच्या भट्टीत फेकले, पशूंनी पायांखाली तुडवावे म्हणून गोठणीवर ठेवले, इतकेच नव्हे तर खवळलेल्या लांडग्यांच्या तोंडी देण्याचाही प्रयत्न झाला, पण श्रीकृष्णाच्या चरित्राप्रमाणे हाही प्रत्येक वेळी संकटातून पार पडला आणि वाचला. इतके झाल्यावर मात्र पितार्जींना वाटले की, बाळ देवाचाच अवतार असला पाहिजे, म्हणून त्याने त्याचे योग्य रीतीने संगोपन केले आणि पुढे तो धर्म-प्रसारक झाला. ऋग्वेदामध्ये या पुण्यपुरुषाचा उल्लेख स्पितमा असा असून, त्याच्या पित्याचे नाव पुरुष्याम व मातेचे नाव भादोग्धवा असे आहे. (भा. सं. कोश ३।७०३)

अष्टादशभुजा देवतेच्या हातांतील आयुधे येणेप्रमाणे—मणिमाळा, कमळ, बाण, तलवार, वज्र, गदा, चक्र, त्रिशूळ, कुऱ्हाड, शंख, घंटा, पाश, शक्ति, दंड, ढाल, धनुष्य, पानपात्र व कमंडलू. याप्रमाणे तिच्या अठरा भुजांमध्ये ही अठरा आयुधे आहेत. तिचे आसन कमलासनावर असून ती सर्वेश्वरी होय.

सौवर्णाम्बुजमध्यगां त्रिनयनां सौदामिनीसंनिभाम् ।
शंखं चक्रवराभयानि दधतीमिन्दोः कलां बिभ्रतीम् ॥
ग्रैवेयाङ्गदहारकुण्डलधरामाखण्डलाद्यैः स्तुताम् ।
ध्यायेद्विन्ध्यनिवासिनीं शशिमुखीं पार्श्वस्थपंचाननाम् ॥

विंध्यवासिनीदुर्गा मूर्तीच्या वरील वर्णनात ती सुवर्ण कमळासनस्थ असून त्रिनेत्री, चतुर्भुज, दोन हातांत शंख व चक्र, एक वरद आणि एक अभय आहे. अंगावर चंद्रहार, अंगद, दंडामध्ये बाजुबंद, कानात कुंडले आणि इतर अलंकार आहेत. वाहन म्हणून बाजूला सिंह उभा आहे. ती चंद्रमुखी आहे. इंद्रादि देवांनी तिची स्तुति केलेली असून अशा रूपाने मी ध्यान करतो.

(Elements of Hindu Iconography by T. A. Gopinath Rao, Vol. II, Page 380).

विंध्यवासिनी ही महाराष्ट्रातील क्षत्रिय ज्ञातिसमाजाची कुलस्वामिनी असून तिच्यासंबंधी काही मजकूर ‘ क्षत्रिय संजीवनी ’ च्या १९५० च्या अंकात आलेला आहे. त्यामध्ये असे वर्णन आहे की, ‘ देवीसंबंधी वेडयावाकडया कल्पना समाजात आहेत. कोणी म्हणतात ती विधवा आहे अगर कुमारी आहे. म्हणून काही घरी तिला पांढरे वस्त्र करतात, तर कुंकू हळद वाहत नाहीत इ० ’ या देवीची स्थाने महाराष्ट्रात अनेक गावी आहेत, पण त्यांना मूळ ठिकाणे म्हणता येणार नाहीत.

देवीभागवताच्या दशम स्कंदामध्ये या देवीच्या वर्णनपर काही श्लोक आहेत त्यामध्ये असे म्हटले आहे की, स्वायंभु मनूने पृथ्वी उत्पन्न करण्याच्या पूर्वी क्षीरसागराच्या किनारी शंभर वर्षे उग्र तपश्चर्या केल्यावर देवी प्रकट झाली आणि इच्छित कार्य पुरे होईल असा वर दिला व ती विंध्यपर्वतावर गेली

स मनु क्षीरसिन्धोश्च तीरे परम पावने । देवीमाराधयामास

विंध्यवासिनी क्षेत्री एकूण तीन शक्तिस्थाने आहेत

( १ ) विंध्यवासिनी ( कौशिकी )— हे स्थान गंगानदीच्या तटावर बाजारवस्तीमध्ये आहे. विंध्याचल हे उत्तर प्रांतात एक रेल्वेस्टेशन आहे विंध्य पर्वत हा पूर्व पश्चिम असून विंध्याचल हे पूर्वेकडील टोकाजवळील स्थान आहे गाभाऱ्यामध्ये सुमारे अडीच फूट उंचीची सिंहारूढ मूर्ति आहे या कौशिकी देवीलाच विंध्यवासिनी असे म्हणतात मुख्य मंदिराच्या पश्चिमेस, पण त्याच परिसरात बारभुजादेवी व धर्मध्वज ही स्थाने आहेत मुख्य देवीचे मंदिर पश्चिमाभिमुख असून, मधल्या चौकात मंगळधारी व शुक्रवारी बंगाली भक्त हजारो पशूंची हत्या करून, मुंडक्यातील रक्ताची धार देवीवर धरीत, असे ‘ माझा प्रवास ’ वर्णनात गोडसे भटजी लिहितात

( २ ) महाकाली—विंध्याचलापासून सुमारे दोन मैल अंतरावर काली खोह या नावाचा भाग आहे त्या ठिकाणी हे स्थान आहे. मूलत ही चामुंडा देवीच होय

( ३ ) अष्टभुजा—महाकालीपासून पुढे १ मैल अंतरावर डोंगरमाथ्यावर अष्टभुजा देवीचे स्थान आहे वर जाण्यास पायऱ्या बांधून काढलेल्या आहेत विंध्यवासिनी गंगानदीच्या एका तीरावर, तर ही दुसऱ्या बाजूस आहे अशी दंतकथा सांगतात की, प्रभु रामचंद्र वनवासात असताना या अष्टभुजा देवीची त्यांनी स्थापना केलेली आहे. मूर्ति फार उंच आहे जवळच ‘ सीतामाईका रसोडा ’ या नावाची एक गुहा दाखवितात आणि या ठिकाणी सीता स्वयंपाक

करीत असे, असे सांगतात. हातभर उंचीचे जांभळी रंगाचे शिवलिंग जवळच असून, रामचंद्रांनी त्याचे पूजन केले होते, असे पंड्ये सांगतात. (कल्याण, क्षेत्रअंक १९५७, पृष्ठ १३९).

शक्तिपीठाच्या यादीमध्ये या क्षेत्राची गणना केलेली नाही. या क्षेत्रात शक्ति-त्रिकोण होतो, व तो वरील तीन देवतांच्या वास्तव्यामुळे होय.

असे एक मत आहे की, विंध्यपर्वताच्या दुर्लंघ्य भागात या कौशिकी देवीची स्थापना निषाद, किरात, भिल्ल व शबर या वन्य जमातींनी केली. कारण त्या जमातींचे लोक या देवीचे भक्त होते. नवरात्रामध्ये हे लोक जो उत्सव करीत, त्याचे नावही 'शबरोत्सव' असेच आहे. पूर्वी या ठिकाणी देवीला नरबळीही दिला जात असे. या देवतेची स्थापना विंध्य पर्वताच्या ठिकाणी का झाली याबद्दलची पौराणिक कथा अशी. शिवाचा पार्वतीबरोबर विवाह झाला तेव्हा तिचा वर्ण सावळ्या रंगाचा होता. यामुळे कधी कधी थट्टेने आणि प्रेमानेही शंकर तिला 'काळी, काळी,' असे चिडवीत पण पार्वतीला हे प्रेमाने चिडविणेही सहन झाले नाही. तिने मनात निश्चय केला की, आता गौरवर्णी झाल्याशिवाय पतीला आपले मुख दाखवायचे नाही. असे ठरवून एक दिवस ती अचानक कैलास पर्वतावरून निघून घनदाट विंध्य पर्वतावर गेली आणि तिने उग्र तप आरंभिले. अखेर ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि त्यांच्या कृपाप्रसादाने तिच्या शरीरावरील काळी त्वचा, साप कात टाकतो त्याप्रमाणे, शरीरापासून अलग झाली. त्यामुळे जे काळे रूप निघून गेले ती कौशिकी देवी झाली आणि जे मूळरूप उरले ते गौरवर्णी असल्याने गौरी हे नाव पडले. यामुळे कौशिकी देवीची स्थापना तेथे करण्यात आली आणि गौरी शंकराकडे परत गेली. (प. महादेवशास्त्री जोशी, 'विवेक,' दसराअंक, १९५८).

कौशिकीची उत्पत्ति जरी वरीलप्रमाणे दिली असली तरी थोड्याफार फरकाने हीच कथा कौशिकी आणि कालिका देवी यांचा इतिहास पाहताना आढळून येईल (कालिका पहा) तेथे 'उमादेवीच्या कोशापासून दोन देवता निर्माण झाल्या असे वर्णन आहे. त्याच कौशिकी आणि पार्वती होत,' असेही म्हटले आहे.

कच्छ भागात भेटपासून चाळीस मैलांवर विनजन नावाचे एक भग्न शहर असून त्या स्थळी पडीक स्थितीत अनेक प्राचीन स्थळे आहेत. सांप्रत त्यांची पूर्ण दुर्दशावस्था आहे. या क्षेत्री कानफाटे गोसावी वर्गाचे प्रस्थ फार मोठे आहे. या ठिकाणी मार्कंडेय ऋषींनी विंध्यवासिनी देवता स्थापन केली असे काही लोकांचे मत आहे. (कच्छ गॅझेट, पृष्ठ २५३)

महाराष्ट्रातही चिपळूण (जि. रत्नागिरी) या गावच्या शेजारील डोंगरातही एक देवीचे स्थान आहे. तीस 'विंध्यवासिनी' म्हणतात.

विबुधप्रिया

यदि तो वसुदेव शोधित मुक्तिचा निज मार्ग ना ।
येत नारद त्यासि सागत अधिके करि प्रार्थना ॥
मुक्तिचा मुनि मार्ग दाविती देवि-पाठ करावया ।
विंध्यवासिनी देविपूजन कार्यपूर्ती घडावया ॥ १ ॥
मुक्त ना मुळि मी मुनिवर स्वीकारा मम कार्य हें ।
विंध्य देवीस गर्ग पूजित आचरी तप घोर हे ॥
पूजनी मग देवि पावत, देत त्या वर इष्ट हा ।
कृष्ण जन्मुनी, कंस मारूनि, सोडवी वसुदेव हा ॥ २ ॥

पृथ्वी

जया समयिं देवकी प्रसवते मुला गोकुळीं ।
तदाच मथुरालयीं प्रसवते यशोदा मुली ॥
मुलास वसुदेव तो उलट पालटाही करी ।
असा अमर जाहला तनय देवकीचा तरी ॥ ३ ॥
चमत्कृति कशी दुजे दिनिंहि जाहली जाणतां ।
करीं धरुनि कंस तो हपटितो जइं बाळकां ॥
विजेसम कशी सुटे त्वरित अंतराळात जा ।
पुढें प्रकट नामरूप जगतात अष्टभुजा ॥ ४ ॥

भुजंगप्रयात

असे आदिशक्तीच ही योगमाया ।
पहा जन्मली कंसप्राणा हराया
तया जाणिती अष्टभुजा स्वरूपा ।
नमस्कार माझा तया देविरूपा ॥ ५ ॥

* * *

(४३) विद्यादेवी :

प्राचीन काळी मथुरा भागात मधुदैत्य राज्य करीत होता. तो अतिशय प्रबळ असल्याने त्याला त्याच्या शक्तीची घमेंड चढली. त्या घमेंडीच्या उन्मादात त्याने प्रत्यक्ष श्रीप्रभुरामचंद्रांना युद्धाचे आव्हान दिले. रामचंद्रांनी त्याचे पारिपत्य करण्यासाठी शत्रुघ्नाला पाठविले. त्याप्रमाणे शत्रुघ्नाने त्यावर स्वारी करून त्याला आणि त्याचा पुत्र लवणासुर या दोघांनाही युद्धात ठार केले. मधुदैत्यामुळे या शहराला मथुरा हे नाव आले.

प्राचीन काळात या प्रदेशात एकूण बारा प्रख्यात वने होती. त्यांची ही नावे पहा. (१) मधुवन, (२) तालवन, (३) कुमुदवन, (४) बाहुलावन (५) काम्यवन, (६) खादिरावन, (७) वृंदावन, (८) भद्रवन, (९) भंदिरावन, (१०) बेलवन, (११) लोहवन व (१२) मोहवन

(श्री. दवे, 'इम्मॉर्टल इंडिया' पृष्ठ ९०)

येथील प्रमुख शक्तिपीठ म्हणून विद्यादेवीने स्थान दाखविले आहे. याच देवीला कोणी बरसाना देवी असेही म्हणतात. हे स्थान एका उंच टेकडीवर असून देवीची मूर्ति विशाल आहे. विशेषतः तिच्या नेत्रांतील तेजज्योति अतिशय प्रभावशाली आहेत. विद्यादेवीचे भारतातील हे एकमेव स्थान आहे, असे मानतात. या क्षेत्री होलिकोत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

(कल्याण, शक्तिअंक १९३४ पृष्ठ ६४२.)

पीठनिर्णयाच्या यादीमध्ये वृंदावन क्षेत्राचा समावेश केलेला आहे. या ठिकाणी सतीचा केशकलाप पडला, म्हणून हे शक्तिपीठ झाले. तेथील देवता उमा, कात्यायनी आणि भैरव भूतेश किंवा कृष्णनाथ आहे. वृंदावन हे मथुरेजवळच आहे. तेव्हा या दोन शहरांच्या दरम्यान हे प्राचीन पीठ असावे, परंतु निश्चित स्थाननिर्देश नाही. खुद्द वृंदावन हे कृष्णामुळे वैष्णवांचे पीठ मानतात आणि त्यावर शाक्तपंथीय आपला हक्क सांगत असावेत. पण दुसरा पाठभेद असा की, 'उमावने केशजालं भूतेशः परभैरवः ।' उमावन हा भाग देवीकोट या नावाने ओळखला जातो आणि तो या दोन शहरांच्या मध्ये आहे. या क्षेत्री सतीचे केस पडल्याने क्षेत्राचे नाव केशजाल असे पडले असावे.

(Royal Asiatic Society Journal, Bengal, 1948)

इतिहास असे वृत्त देतो की, कंसाची बंदिशाळा ज्या जागी होती, तो भाग ओसाड आहे. हा टेकडीवजा भाग देवीकोट अथवा केशवटिका या नावाने ओळखला जातो. भगवान श्रीकृष्णाच्या जन्मस्थानाची जी स्थित्यंतरे झाली

ती पाहिल्यास आणि इतर धर्मियांच्या इष्ट देवतांच्या स्थळांबरोबर त्यांची तुलना केल्यास आपल्या श्रद्धास्थानांचे झालेले धिंडवडे आपण स्वस्थपणे बघे पाहतो, ही दुर्दैवाची गोष्ट आपल्या ध्यानी येईल. नव्हे ही गोष्ट ध्यानी यावी म्हणूनच इथे त्यापैकी काही भाग नमूद करीत आहे.

कृष्णजन्म झालेली बंदिशाळा कालौघाने नाश पावली आणि अनेक वर्षे या गोष्टीकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. पण गुप्तवंश शासनाधिकारी झाल्यावर त्याने भगवान श्रीकृष्णाच्या जन्मस्थानी स्मृति म्हणून केशवजीचे मंदिर उभारले. पुढे मुसलमानी अमदानीत गझनीचा महंमद हे मंदिर पाहून आश्चर्याने इतका थक्क झाला की, त्याच्या मुखातून असे उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडले. ' एक कोटी दिनार खर्च करूनही असली कलाकृति निर्माण व्हायची नाही. निष्णात नि नामांकित कामगार जरी कामाला लाविले तरी वीस वर्षांच्या कालावधीत असले अलौकिक कार्य पुरे करता येणार नाही.' परंतु सांगायची गोष्ट अशी की, इतकी प्रशंसा करूनहि त्याने ते मंदिर धुळीला मिळविलेच. इतर देवालयेही पाडून त्यातील सोन्याचांदीच्या कलाकृति आणि तीन कोट दिनार किंमतीची लूट त्याने मायदेशी नेली.

नंतर काही वर्षांनी बंगाल प्रांतातील सेन राजवंशाने त्या जागेचा ताबा घेतला आणि तेथे श्रीकृष्णाचे मंदिर उभारले. पण तेही यवनांच्या धर्मवेडाला बळी पडले. भाविकांच्या भक्तीने पुन्हा उचल खाल्ली आणि त्या ठिकाणी देवालयाची निर्मिति झाली. पण औरंगजेब बादशहाने ते पाडून त्याच्या अर्ध्या-भागावर मशीद उभारली. आजच्या स्वातंत्र्योत्तर काळातही ती मशीद मोठ्या ' डौलाने ' आहे त्याच ठिकाणी उभी आहे. ज्या श्रीकृष्णाला मोठा महामानव म्हणून जग आज ओळखते, ज्याने सांगितलेल्या गीतेची सर्वत्र आज पारायणे होतात, त्या श्रीकृष्णाच्या मंदिराच्या जन्मस्थानाची ही लाजिरवाणी नि दुर्दैवी कहाणी आहे. ( आता विषय निघालाच म्हणून नमूद करतो की, याच संदर्भा-मध्ये इंग्रज लोक आपल्या लाडक्या शेक्सपीअर कवीचे अगर युद्धामध्ये विजयी झालेल्या पंतप्रधान चर्चिलसाहेबाचे लहानसे झोपडे जपून ठेवण्याचा किती आटोकाट प्रयत्न करतात हे पाहणे खासच उद्‌बोधक ठरेल. )

सुदैवाने मशिदीशेजारील अर्ध्या भागावर तरी कोणी महाभागाने लाल पाषाणाचे, ओरिसा स्थापत्यशैलीचे मंदिर उभारले आहे. प्रचंड संगमरवरी शीळेवरील खोदकाम चालू आहे. तेथील उत्खननामध्ये सापडलेले कंसाचे प्रचंड सिंहासन तेथील मंदिरामध्ये ठेवले आहे आणि अर्ध्या भागावर मात्र ती मशीद आपला टेंभा मिरवीत आहे. ' यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ' हे

श्रीकृष्णाचे ब्रीदवाक्य ध्यानात आणून वरील इतिहास ही धर्माची ग्लानी नष्ट करण्यास कारणीभूत झाला, तरी श्रीकृष्णाचे उद्दिष्ट साध्य झाले असे म्हणता येईल. (श्री. शंकर आर. सारडा, 'महाराष्ट्र टाईम्स', मुंबई, १८-७-६२)

वसंततिलक

नादे प्रमुख मथुरा नगरींत पीठ ।
शोभे कलाकुसरि मंदिरिं देवीरूप ॥
तेजस्वि ज्योत नयनीं जन रक्षणाते ।
विद्यावती नमन मी करितों पदातें ॥ १ ॥

* * *

## (४४) शांतादुर्गा

श्रीशांता विजयप्रदा विजयते दुर्गा सदां तां भजे ।
शुद्धाशांतियुतां कृता हरिहरौ कृत्नाधिस्ते यया ॥
शांतायै च नमो नमो न हि परं यस्या ममालंबनम् ।
शांताया: खलु किंकरोऽस्मि रमता तत्पादयोर्मे ॥ (महेश्वरभट)

गोमांतकातील जुवारी नदीच्या काठी निसर्गरम्य पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या केळोशी गावात 'देवळाचे भाट' या नावाने परिचित असलेल्या ठिकाणी श्रीशांतादुर्गेचे देवालय होते. नारायण, ईश्वर, ग्रामपुरुष, गणेश, भगवती व क्षेत्रपाळ अशी परिवार देवतेही होती. हल्ली हा भाग सासष्टी विभागातील मुरगाव तालुक्यात येतो. कै. रा. भि. गुंजीकर यांच्या 'सारस्वत मंडळ' मधावरून असे दिसते की, परशुरामाने काही सारस्वत घराणी येथे आणून त्यांना अग्रहार दिल्याने ती या प्रांती स्थाईक झाली. नंतर कान्यकुब्ज मुलखातून काही सारस्वत आले. त्यांपैकी शिवशर्मा, कौशिक गोत्री, ब्राह्मण केळोशी येथे राहिला त्यानंतर या क्षेत्री देवीची स्थापना झालेली होती. सन १५६६ च्या सुमारास अ. शेणै मोने यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. पोर्तुगीजांनी मंदिरासंबंधी निरनिराळी आज्ञापत्रे निघू लागल्यावर त्यांच्या छळाला कंटाळून आणि पवित्र देवतांना विटंबना शिपायांच्या हातून न व्हावी या उद्देशाने शांतादुर्गा व [illegible] यांच्या मूर्ति हलविण्यात येऊन दि. २९-११-१५६६ पूर्वी त्यांचे स्थलांतर पूर्ण करण्यात आले.

कवळे गावी आल्यावर गावाबाहेर डोंगराच्या पायथ्याच्या जवळ असलेल्या हरिजन वस्तीत जागा निवडण्यात येऊन मूर्तीची स्थापना करण्यात आली. देवीचे क्षेत्र केळोशीप्रमाणेच रम्य आहे हा योगायोग होय. तेथील हरिजनांनी मंदिर उभारण्याच्या कामी जी मदत दिली त्याच्यासाठी माघ शु. ६ दिवशी या मडळींना देवीची साडी, खण, नारळ इ० देऊन गौरव करतात. ही प्रथा गेली ४०० वर्षे अव्याहत चालू आहे. केळोशी गावी देवीचा मुख्य जत्रोत्सव माघ शु. ५ होत असे आणि नवीन कवळे गावी तोच दिवस पाळण्यात येतो. मूर्तीचे स्थलांतर झाल्यावर फिरंग्यांनी केळोशी येथील मंदिर उध्वस्त केले आणि मंदिराच्या जमिनीही जप्त केल्या, असा उल्लेख पोर्तुगीजांच्या दप्तरात मिळतो.

मंदिर रचना—देवस्थान पूर्वाभिमुख असून दोन्ही बाजूंना प्रशस्तशा भव्य धर्मशाळा आहेत. समोर प्रवेश दरवाजा आणि त्यावर नगारखाना आहे. तेथे त्रिकाल चौघडा वाजत असतो मंदिरासमोर उंच दीपमाळ असून उत्सवाच्या वेळी दीपांनी ती अलंकृत करतात. तटाच्या बाहेरील बाजूस एक विस्तीर्ण तलाव आहे. देवालयाचे गाभाऱ्यात पट्टासनावर शांतादुर्गा देवीची चतुर्भुज रमणीय पाषाणाची मूर्ति असून, तिच्या समोर लहान सहा इंची आकाराचे शिवलिंग आहे. देवीची मुद्रा 'युद्धशांतिमुद्रा' या प्रकारची असून हातामध्ये हरि-हराची मस्तके आहेत. वरील दोन भुजांमध्ये परशु आणि नाग ही आयुधे आहेत

पूर्वीच्या परिवार देवता येथेही आहेत. देवालयाच्या डावीकडे नारायण, गणेश, समोरील बाजूस पारिजातक वृक्षाचे पारावर भगवती व दोन पादुका, दीपस्तंभासमोर क्षेत्रपाळ आहे. पाठीमागील बाजूस एक मोठी शीळा असून तिला म्हारवाची शीळा म्हणतात. देवालयाच्या समोर खालच्या बाजूस मूळ पुरुष शिवशर्मा यांची लहानशी घुमटी आहे. त्याचीही पूजाअर्चा दररोज होते दक्षिण बाजूस काही अंतरावर स्मार्त सांप्रदायी सारस्वत ब्रह्मवृंदाचे गुरु गौडपादाचार्य यांचा मुख्य मठ आहे असे सांगतात की, मूळ मूर्ति पठाणांनी चोरून नेल्यानंतर, सन १९०१ साली कृ. ल. गायतोंडे यांजकडून नवीन मूर्ति तयार करून घेण्यात आली आणि तिची स्थापना केली.

शांतादुर्गा नाव का? प्राचीन काली शिव आणि विष्णु यांचे घनघोर युद्ध सुमारे दोन सहस्र वर्षांवर चाललेले होते. विष्णु आपले सुदर्शन चक्र वापरीत, तर शंकर आपले पशुपत अस्त्र वापरीत. या दोन्ही शस्त्रांच्या खणखणाटाने सर्व भूमंडळ हादरून जात असे आणि विश्वाचा अंत होतो किंवा कसे, याची सर्वांना काळजी लागली. शतकानुशतके हे महायुद्ध

चालणे योग्य नव्हे, कारण दोघांची पालनसंहाराची कार्ये अडून राहू लागली. शिवाय या दोन मोठ्या देवांच्या सततच्या युद्धामुळे, मानवाला वाईट आदर्श मिळेल. यासाठी ब्रह्मदेवाने आपल्या दिव्य तेजाने एक आदिशक्ति जगदंबा निर्माण केली आणि भूतलावर पाठवून दोन्ही देवामध्ये सलोखा घडविण्यास सांगितले. दोन्ही देवामध्ये शांतता नांदावी हा मुख्य हेतु यामध्ये होता. त्याप्रमाणे ती देवता भूतलावर अवतरली. समरभूमीवर जाऊन दोन्ही योद्ध्यांच्या मधोमध उभी राहून तिने उपदेश करण्यास सुरवात केली.—

यो वै विष्णु. स वै ब्रह्मा। यो वै ब्रह्मा स वै शिवः।
यो वै शिव. स वै सर्व.। लोकस्य सचराचरम् ॥
तेनायं क्षम्यतां क्रोधो हतो नामा नेयात्मन.।

(स्कंद पुराण, अंबिका खंड)

याचा भावार्थ असा की, विष्णु तोच ब्रह्मा, ब्रह्मा तोच शिव हे सर्व एकरूप असल्याने यांच्यामध्ये भेद नाही. तेव्हा एकरूप असल्याने त्यांनी युद्ध करणे उचीत नव्हे. उजव्या हाताने विष्णु आणि डाव्या हाताने शिव यांना तिने आवरून धरले, दोघांची सृष्टिनियमातील कार्याची त्यांना पुन्हा आठवण करून दिली, उपदेश केला व युद्ध थांबविण्यास भाग पाडले. या ठिकाणी जगदंबेने युद्ध थांबवून शांतता प्रस्थापित केली म्हणून देवीचे नाव शांतादुर्गा असे ठेवण्यात आले. याचा लाक्षार्थ असा घेता येईल की शैव आणि वैष्णव यांचा जो उभा दावा अद्यापही अनुभवाला येतो, त्यामध्ये समेट घडून यावा यासाठी हे रूपक तयार केले असावे. देवीने त्यांना असेही सांगितले,

यो ब्रह्मा सो हरिः प्रोक्तो। यो हरि. स महेश्वरः।
या काळी सैव कृष्ण. स्यात्। यः कृष्णः सैव कालिकः ॥
देवदेवीसमुद्दिश्यं न कुर्यादनन्तरं क्वचित्।
तत्भेदो न मन्तव्य शिवशक्तिमयं जगत् ॥

भावार्थ असा की ब्रह्म तोच हरि व महेश्वर होय. तसेच जी काली तोच कृष्ण आणि कृष्ण तीच कालिका होय. मनामध्ये देव आणि देवी यामध्ये कधीही भेदभाव बाळगू नये, कारण सर्व विश्वच शिवशक्तीमय आहे. कथेची स्मृति म्हणून शांतादुर्गाची मूर्ति वरीलप्रमाणे बनविलेली आहे.

देवीच्या हातातील प्रतिकाचा अर्थ नीट न समजल्यामुळे कोणी कोणी हे चंडमुंडवधाचे स्वरूप मानून मूर्ति चंड-मुंडांच्या समजतात, शुंभ निशुंभ-वधाचेही प्रतीक मानतात. शांतामुनीस वरप्रदान करण्यास अवतरली असे

समजतात, अगर विरहानलाने पार्वती शंकरांना शोधीत असता, व्याघ्ररूपाने तिला विनोदाने घाबरविणारे रूपही मानतात. पण हे सर्व समज बरोबर नाहीत, व मूर्तिशिल्पाला धरूनही नाहीत. तत्त्वतः आदिमायेची ही रूपे जरी असली तरी व्यवहारदृष्ट्या ती एक नव्हत. महाविष्णूचे मत्स्य, कच्छ इ. दहा अवतार झाले, तरी रामाचे देवालय ते कृष्णाचे म्हणणे उचित होणार नाही. तद्वत मूळ स्वरूप जरी एकच असले तरी शांतादुर्गा म्हणजे चामुंडा अथवा अष्टभुजा म्हणता येणार नाही.

**शैव-वैष्णव वाद**—विष्णु आणि शंकर यांचे मीलन देवीने ज्याप्रमाणे केले, तद्वत् आद्य शंकराचार्यांनी हे भेद मिटविण्याचे कार्य केले आहे. शैव-सांप्रदायाचे गुरू श्रीगौडपादाचार्य यांचा प्राचीन मठ मडगाव येथे होता. नंतर शांतादुर्गा देवीच्या सान्निध्यात केळोशी व नंतर कवळे येथे तो स्थापन झाला. या सांप्रदायाचे अनेक मठ, काशीमठ, ब्रह्मावर्तमठ, नाशिकमठ, वाळकेश्वरमठ, खानापूर, साखळी, सोनवडे, गोळवण, सदाशिवगड इ० होते व आहेत. शैव सांप्रदायाच्या प्रचारास तोंड देण्यासाठी मध्व सांप्रदायांनी पर्तगाळी, गोकर्ण इ० ठिकाणी मठांची स्थापना केलेली होती. यामुळे या दोन सांप्रदायांमध्ये तक्रारी होत असत. आद्य शंकराचार्यांनी यावर तोड म्हणून पंचायतनपूजा चालू केली. या पंचायतनामध्ये विष्णु, शंकर, गणेश, देवी व सूर्य या पाच देवांचे पूजन होते. सर्व समाजाने ही पंचायतनपूजा करावी असा दंडक त्यांनी घालून दिला. सवड मात्र एवढी ठेवली की, वैष्णवाने विष्णूची मूर्ति मध्यभागी मांडून इतर चार बाजूला मांडाव्यात, तर देवीभक्ताने देवी मध्यभागी व इतर चार दिशांना मांडाव्यात. हेतु हा होता की, सर्व पंथीयांनी इतर देवतांचीही पूजा करावी आणि वैरभाव टाळावा. पण यामध्ये आश्चर्य असे की, पंचायतनपूजा तर करावयाची, इतरांच्या देवांनाही पूजावयाचे पण पूजन संपल्यावर भांडण चालूच रहाते. याचे कारण एकच की, समजूनउमजून पूजन होत नाही आणि व्यवहारात भेद विसरले जात नाहीत. पूजन वेगळे आणि व्यवहार वेगळा असा प्रकार होतो.

**सारस्वत**—या देवीचे स्थान म्हणजे सारस्वतवर्गाचे प्राबल्य होय. कारण मुखटणकर, वैद्य, धोंदे, रामाणी, रेगे, गायतोंडे, मोंडकर, साखरदंडे इ० धारा यांगड या देवीचे कुळावी होते. तेव्हा सारस्वत म्हणजे कोण हे पाहणे ओघानेच आले आहे. श्री. अ. का. प्रियोळकर यांचे प्रामाणिक मत आहे की, सरस्वती नदीच्या किनारी राहणारे जे ब्राह्मण ते सारस्वत होत. या नदीचा निर्देश ऋग्वेद, महाभारत व मनुस्मृति यामध्येही आढळतो. ही नदी हिमालयात उगम पावून पतियाळाजवळ विनशन येथे वाळवंटात अदृश्य होते,

असे पाश्चात्य संशोधक मॅकडोनल्ड व कीथ याचे म्हणणे आहे गौड हे नामाभिधान बंगाल प्रांताला असल्याने, एक वेळ अशी समजूत होती की, गौडसारस्वत हे बंगालमधून सर्वत्र पसरले असावेत पण या सरधारा संशोधक रिस्लेसाहेब लिहितात की, 'बिहार प्रांतात पचगौड ब्राह्मणात काही पोटजाती आढळतात परतु त्याचे पूर्वज पजाबमधील सरस्वतीच्या तीरावर रहात असून तेथून स्थलांतर झालेले असावे '

'मिथिला तैरभुक्तिश्च वैदेही नैमिकाननम् ।' (मिथिला खड) मिथिला देशाच्या बारा नावापैकी तैरभुक्ति हा एक प्रांत आहे (विष्णुपुराण) त्याचाच अपभ्रंश तीरभुक्ति अगर तिहोत्र झालेला असावा आणि या प्रांतातून परशुरामाने सारस्वताचे स्थलांतर गोमांतकामध्ये केले यावरून त्रिहोत्र म्हणजे बंगालमधील तिरहुत नव्हे हे उघड आहे एकदा कान्यकुब्ज देशातून काही सारस्वत मडळी रामेश्वराच्या यात्रेसाठी गेली त्यामध्ये देवशर्मा वत्सगोत्री, लोकशर्मा कौंडिण्यगोत्री आणि शिवशर्मा कौशिक गोत्री हे प्रमुख होते रामेश्वरहून परत येत असता मार्गामध्ये गोमांत क्षेत्री त्याना ईश्वरी साक्षात्कार झाल्याने ते तेथेच राहिले आणि पूर्वीच्या सारस्वत मडळीत मिसळून गेले कालांतराने येथून त्याचा विस्तार झाला पण याचा अर्थ सारस्वत दक्षिणेकडील द्रविड देशातून आले, असा मात्र करता येणार नाही ना गो चापेकराच्या मते सारस्वत पूर्वी कास्पियन समुद्रा जवळ रहात असावेत आणि तेथून समुद्रमार्गे आले हेही बरोबर दिसत नाही

महाभारताच्या शल्यपर्वाच्या ५१ व्या अध्यायात असा उल्लेख आहे की, वृत्रासुराचा वध करण्यासाठी आपल्या अस्थि देणारा दधिच ऋषि याला सारस्वत नावाचा पुत्र होता बारा वर्षांचे अवर्षण पडल्याने सर्व ऋषीमडळी इतस्तत पागून गेली पण सारस्वताने आहारासाठी सरस्वती नदीतील काही मासे नियमाने खाऊन आपला जीव जगविला तेथेच राहून वेदाध्ययन करून देव व पितर याचे तर्पणकार्य चालू ठेवले अवर्षणाचा काळ सपल्यावर, सर्व ऋषिजन पुन्हा परत आले सारस्वताजवळून वेदविद्येची शिक्षण घेतली आणि नतर बंगाल, बिहार व दक्षिणेकडे त्याचे स्थलांतर झाले असावे 'सह्याद्रि खडाच्या' मताप्रमाणे,

पश्चात् परशुरामेण ह्यानीता मुनयो दश ।
त्रिहोत्रग्रामनिलयश्चैव पचगौडांतरे स्थिता ॥ (उत्तरार्ध, अ १)

भावार्थ असा की यज्ञयागासाठी परशुरामाने या सारस्वत ब्राह्मणांना दक्षिणेत गोमांतक प्रांती नेले या विधानाला महाभारतामध्ये आधार मिळतो

ततः शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे ।
सहसा जामदग्न्यस्य सोऽपरान्तमहीतलम् ॥ ( शांतीपर्व, अ ४९ )

परशुरामाने या सारस्वतांना केव्हा आणले याचा उल्लेख कोठे मिळत नाही. परशुरामाचा काल ह सनापूर्वी अडीच हजार वर्षांचा धरतात, पण आधुनिक संशोधक रा गो भांडारकर व डॉ भाऊ दाजी यांचे म्हणणे असे की, सारस्वत व इतर वैदिक ब्राह्मण दक्षिणेकडे सातव्या शतकात आले येणे प्रमाणे सारस्वतांचे स्थलांतराचा त्रोटक सारांश आहे

## गोवाप्रांताचे ख्रिस्तीकरण

सन १५१० साली विजापूरच्या आदिलशाहाकडून गोवा प्रांत पोर्तुगीजांनी जिंकून घेतल्यानंतर आणि क्रमाक्रमाने त्यांचा अमल दृढ झाल्यानंतर, हिंदु मंदिरे व लोक यांच्यावर वक्रदृष्टि झाली १२ जानेवारी १५२२ साली बिशप दूमी याने पोर्तुगालच्या राजाला पत्र पाठविले त्याचा सारांश असा की,

'आपल्या या बेटातील देवळे पाडून त्या ठिकाणी चर्च उभारली गेल्यास परमेश्वराची सेवा अधिक होईल त्याला या बेटात राहावयाचे असेल, त्याने ख्रिस्ती होऊनच रहावे लागेल, व जे राजी नसतील त्यांनी बेट सोडून जावे ' (पृ १२) याप्रमाणे २८ जून १५४१ पर्यंत गोवा बेटातील हिंदूंची सर्व देवालये नष्ट करण्यात आली, असा उल्लेख सरकारी लेखात आहे तिसवाडी भागातील आगाशी, करमाळी, चोडणे, जुवे, नेवरे, तळावली इ० सुमारे ३५ गावातील १६० देवालये उध्वस्त करण्यात आली मंदिरे पाडण्याचे काम अव्याहत चालूच होते सन १५६७ साली कप्तन दियोग फेर्नांदिस काही लोकांना धरून देवळे उध्वस्त केल्यावर लिहितो,

'आज सोमवार दि १७ मार्च रात्री मी सासवाळ गावी गेलो व तेथील बंदराजवळ असलेले देऊळ व धाड, परमेद, नारायण, गणपती ईश्वर, अजासिनी व नरसिंह यांची देवळे मोडून टाकली सासवळगावचे मोठ देऊळ म्हणजे सातेरीचे होते जेसुइटाच्या मठातील पाद्र्यास कळवा की, *साष्टीतील* देवालयांपैकी तीन चतुर्थांश देवळे नष्ट करण्यात आली आहेत ' ( पृ १०३ )

दिनांक ६ एप्रिल १५६७ च्या पत्रात रायतुरच्या किल्ल्याच्या कप्टन दियोगू फेर्नांदिस म्हणतो, 'काल दि ५ रोजी किल्ल्यातून मध्यरात्री निघून मी साजेंव येथे गेलो आणि देवळास आग लावली मग वेरड्यास जाऊन एक देऊळ जाळले वाटेत कुंकळ्ळी येथील देवालय जाळले आंबेलीचे देवालय व आणखी एक देवालयाची अशीच स्थिती केली पुढे चिकोळणच्या देवालयास

आग लावून चिंचणीचे फार मोठे देवालय जाळले. आजपावेतो अठ्ठावन गावांतील देवालये व मूर्ति मोडून टाकली. मुरगावची मशीदही जमीनदोस्त केली.' याप्रमाणे इ. स. १५६७ साली २८० देवालये पाडून टाकण्यात आली. कवळशी येथील 'बावलपीरच्या' मंडप्याचाही नाश करण्यात आला. याच साली अनू शेणवी याने उभारलेले शांतादुर्गादेवीचे मंदिर याच कॅप्टनने जाळून टाकले व संस्कृत, मराठी ग्रंथ जळून गेले. (पृ. १०३).

साष्टी भागातील सर्व देवालये नष्ट करून इतिहासात आपले नाव अजरामर (!) रहावे असे त्याला वाटत असे. जेसुइट पाद्री ज्योर्जि कालदैर याने लिहिले आहे की, 'कॅ. दियोगु आपल्या तलवारीच्या मुठीने हिंदूंच्या मूर्तींची तोंडे फोडून टाकी.'

साष्टी प्रांतात चाललेले भंजनाचे लोण बारदेश प्रांतीही पोहोचले आणि तेथील पाद्री फॉसिस्कन याने हिंदूंची सर्व देवालये इ. स. १५६७ साली उध्वस्त केली. या सर्वांचा परिणाम असा झाला की, नष्ट केलेल्या हिंदूंच्या मंदिरस्थानावर चर्चे उभारण्यात आली आणि देवस्थानाकडे खर्चासाठी असलेल्या जमिनी चर्चेच्या खर्चाकडे सोपविल्या गेल्या. देवालयाचे बाटलेले महाजन त्या त्या चर्चेचे 'कोंफादी' झाले, संस्कृत मंत्राच्या ऐवजी लॅटीन मंत्र आले. नामदेवाच्या अभंगाचे सामुदायिक गायन बंद होऊन खिस्ताची स्तोत्रे आली आणि नव खिस्ताचे ताडे गाताहून मिरवू लागले.

आंबोली, धाणवली, चिंचणी, कुडतरी, दाभोळी, लोटली, मुरगाव, वेळशी, संखवाळ, वेरणे इ० साष्टी महालातील सुमारे ६० गावातील अंदाजे २१० देवालये उध्वस्त करण्यात आली. तसेच बारदेश भागात हळदोणे, कादोळी, नागवे, पालये, सांगोळडे, शिरोडे इ० ४० गावातील सुमारे १७५ देवालये उध्वस्त झाली. (पृ. १०१)

पोर्तुगीजांचे जुलमी कायदे— सन १५४२ साली गोवे प्रांती सेंट फान्सिस झेवियर या गृहस्थाचे आगमन झाले. याच्याच मृत प्रेताचा सोहळा दर वर्षी गोव्यात होत असतो. खिस्त्यानी हिंदूंच्या देवतांचा तिरस्कार करावा असा त्याचा उपदेश असे. हिंदूंचा धर्म म्हणजे केवळ सैतानाची पूजा म्हणून नव खिस्त्यांची मुले पूर्व धर्मांतील मूर्तींचा उच्छेद करताना पाहून त्याला निरतिशय आनंद वाटत असे. ब्राह्मण समाज हा आगगाडीचा डब्यांना पुढे नेणारे इंजिना-प्रमाणे असल्याने तो सदैव त्याचा तिरस्कार न करील तरच नवल. याच्याच प्रेरणेने मिगेल व्हाज पाद्री सन १५४५ साली पोर्तुगालमध्ये गेला आणि राजा-कडून खालीलप्रमाणे आज्ञापत्रक घेऊन आला :—

(१) गोवा बेटात हिंदूना मूर्तिपूजेस बंदी करावी.

(२) हिंदूना त्यांचे धार्मिक उत्सव करू देऊ नये.

(३) पुराण अथवा कीर्तन करण्यास परवानगी नसावी.

(४) सरकारी नोकऱ्या हिंदूना देऊ नयेत.

(५) हिंदूना मंदिरे बांधून देऊ नयेत अगर जुन्यांची डागडुजी करू देऊ नये

(६) पाषाण, लाकूड, धातूच्या मूर्ति कारागिरांनी करू नयेत.

(७) हिंदूना त्यांचे सण व उत्सव साजरे करू देऊ नयेत.

(८) एखाद्या हिंदूच्या घरात देवमूर्ति आहेत असा संशय आल्यास, घरात शिरून त्याचा नाश करावा.

(९) हिंदूनी खिस्ती धर्माचा स्वीकार करावा, अन्यथा प्रांत सोडून जावे.

(१०) खिस्ती धर्माच्या प्रसारास विरोध करणाऱ्या ब्राह्मणांना हद्दपार

गोव सोडाच, पण आम्ही पकडून, बंदिशाळेत टाकून, सैतानाने पछाडलेल्या त्या हिंदूंच्या देवस्थानाच्या आचार्यांची, मठाध्यक्षाची आणि नगरातील श्रीमंत हिंदूंची शारीरिक मारखाली जी लाडगेतोड आम्ही करतो, तिच्या भयामुळे अनेक ठिकाणच्या हिंदु देवालयाचे पुजारी तेथील मूर्ति घेऊन, गोमांतकाबाहेर पळून जात आहेत त्यांची सर्व संपत्ति आम्ही हिसकावून घेतो, मूर्ति फोडून टाकतो, देवालये पाडून टाकतो, चाबकाच्या फटकाऱ्याखाली त्यांची शरीरे सोलून सोलून काढतो आणि आम्हाला यामुळे उदंड यश येत आहे फार काय! जर का हे ब्राह्मण लोक तेवढे मार्गे मार्गात आडवे येते ना, तर मी साऱ्या हिंदुस्तानभर बोलता बोलता खिस्ती धर्माचा प्रसार करू शकलो असतो यासंबंधीचा मूळ वृत्तान्त 'Os Hindus Do Goa Ripublica Portuguesa' या पोर्तुगीज भाषेतील ग्रंथामध्ये मिळू शकेल (सोनेरी इहा पाने, ले वि दा भास्कर)

सन १५८१ साली कायदा झाला की, हिंदुजमातीमधील बाप नसलेल्या चौदा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलास व बारा वर्षे पूर्ण झालेल्या मुलीस खिस्ती धर्माधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात यावे या एकाच कायद्यामुळे खिस्त्यांची संख्या भराभर वाढली

३० डिसेंबर १५५९ रोजी मानुयल नूनीस या अधिकाऱ्याने पोर्तुगालच्या राणीस पत्र लिहिले त्यात म्हटले आहे की, हिंदुजनता खिस्ती व्हावी यासाठी करण्यात आलेल्या गाजावाजामुळे या बेटातील हिंदु पळून गेले आहेत पाद्री लोक हा विषय दांडगाईने व अविकाराने हाताळतात व विजरई त्यास मदत करतो जेसुइट पाद्री हिंदूंना अनेक रीतीने त्रास देत असतात, सक्तीने त्यांच्या शेंड्या कापतात, गोमांस भक्षण करावयास लावतात आणि चालीरीती विरुद्ध वागणूक करण्यास भाग पाडतात या त्रासामुळेच अनेक हिंदु पळून गेले आहेत आम्ही करीत असलेले कार्य योग्य आहे किंवा नाही यासंबधर्माधिकाऱ्यांचा अभिप्राय घेण्यासाठी विजरई कोन्स्तातीनू ब्रागास याने सर्व पंथीयांची एक सभा घेतली त्यामध्ये त्या श्रेष्ठ धर्ममार्तंडांनी स्पष्टपणे घोषित केले की, परिणामाकडे लक्ष न देता सक्तीचा उपयोग करणे धर्माला नाही ( पृ ११७ )

सार्गीची नगरमध्ये खालील वर्णन आढळते

"गावचा गाव धरून बाटविला बाप मेला म्हणजे घरात प्रेत असता त्याची पोरे जी असतील ती नेऊन बाटवावी ऐसा उपद्रव मांडिला मग लोक कष्टी झाले पळून कोणी दक्षिण प्रांती जाऊन राहिले नियाकर्म लोप झाला देवधर्म बुडाला ब्राह्मणांची तीर्थेने लोपली देवालये फोडतोड केली आपली देवळे फिरंगियाने बांधली फिरंगी धर्म चालवावयास लागले मुल्कात ब्राह्मण फिरता

कामा नये. कोणी गृहस्थाने काही कार्य, होम, उद्यापने आरंभिली म्हणजे गृहस्थाचे घर अवघे धरावे. सेजारीपाजारी त्यात सापडले त्यासही धरावे. नदीकष्टी करावे. वदिखानियात कुजवावे अशा अनर्थ माडला . (पृ १२० ).

फ्रान्सीस झेव्हीयर याने केलेल्या छळाचा पाढा ' सोसायटी ऑफ जीझस ' समोर वाचला तो येणेप्रमाणे :—

बाप्तीस्मा दिल्यावर या नव्या खिश्चनानी आपापल्या घरी जाऊन आपली नायका-मुले आणून त्यानाही खिश्चनधर्माची दीक्षा दिली. सगळी देवळे पाडून, मूर्ति फोडून टाकाव्या अशा सरकारी नियम केल्यावर, ज्यानी मूर्तिपूजा केली, तेच मूर्ति फोडताना पाहून मला फार आनंद होत असे. त्याचे वर्णन करण्यास मजपाशी शब्द नाहीत. इन्कीझिशनला ज्यानी प्रतिकार केला, त्या स्त्रियाना तुरुगात टाकण्यात आले, त्याच्यावर पाशवी अत्याचार करण्यात आले आणि पाखडी समजून त्याना जिवत जाळण्यात आले. ( Christian Proselytism in India, जे. एम्. सी. पारेख ). फ्रँकाईस पायार्ड नावाचा फ्रेंच प्रवासी वर्णन करतो की, हिंदु लोकाना त्याचे दाट गाधकामध्ये भिजवून, एकत्र चालविण्यात येई. नतर शर्टना आग लावण्यात येई व शेवटी ' कॅपो सक्टो लाजारो ' येथे इतराचे समोर जिवत जाळण्यात येई ( The Voyage of Francas Pyrad by Albert Grey, Vol II, 1888 )

गुन्हेगाराचे हात पाठीमागे बाधावयाचे, नतर मनगटाभोवती एक दोरी बाधून, त्याला जमिनीपासून वर उचलून, पायाला एकादे जड वजन बाधून, मनाला येईपर्यंत टागून ठेवावयाचे. अधून मधून त्याला धक्के देऊन पहावयाला लावावयाचे. या धक्क्याने प्राणांतिक वेदना व्हाव्यात. पायाला बांधलेली वजने, कैदी ज्या प्रमाणात प्रतिकार करील, त्या प्रमाणात वाढवीत जावयाचे. या प्रकारचा छळ दोन वेळा ' मिझेरिअर्स ' म्हणून होईपर्यंत चालत असे

हा आणखी एक प्रकार पहा—पकडून आणलेल्या हिंदूला एका लाकडी तिकाटण्यावर पालथे पाडण्यात येई. त्या तिकाटण्याच्या शिडिल असतात तसले धारदार पायठण असत. कैद्याची मान तिकटण्याच्या बाहेर लोंबत टेविली जाई कपाळावर आणि मानेवर लोखडाची पट्टी दाबून त्या माणसाला हालचाल करणे अशक्य केले जाई. मासामध्ये खोल रुतेल, अशा तीक्ष्ण धारदार दोरीने हात आणि तगड्या घट आवळून जात कापडाची एक चिंधोटी घेऊन तिने नरडी आवळली जाई नतर पाण्याचे एक भांडे घेऊन त्यातील पाणी त्या माणसाचे तोंडात थोडे थोडे सोडण्यास येई. या प्रकाराने तो माणूस

अतोनात गुदमरला जाई मधून मधून नरडीभोंवतीचा पाश वाजला काढून, त्या माणसाला अपराध कबूल करण्याविषयी आज्ञा देण्यात येई या शिक्षेनी तीव्रता पाण्याची किती भांडी संपली यावर गणली जाई काही वेळा ही भांडी सहा ते आठपर्यंतही जात (Goa Inquisition by A K Priyolkar, P 153)

पोर्तुगीजांचा हिंदुधर्मियांवरील या अपूर्व छळवादाचा अल्पसा पाढा येथे वाचण्याचा उद्देश इतकाच की, (१) परधर्मियांनी आपल्या धर्मप्रसाराच्या वेळी किती पराकोटीचे अमानुष अत्याचारी वर्तन केले, याचे दिग्दर्शन सांप्रतच्या पिढीला व्हावे (२) शाब्बास, शाब्बास आहे, त्या गोवेकर हिंदुबांधवांची की, अशाच्याही अत्यंत कठीण परिस्थितीत परधर्मियांबरोबर त्यांनी मुकाबला केला आणि आपल्या आर्यधर्माचे रक्षण सतत चारशे वर्षे केले, पवित्र देव देवता वाचविल्या आणि शेवटी स्वातंत्र्य संपादन केले धर्म आणि देवता यांच्या रक्षणा साठी जीव कुरवंडून टाकला खरोखर ते धन्य होत. धन्य होत !

वर्षभर लहानसहान उत्सव चालूच असतात. त्यांचे प्रकार असे.

( १ ) संस्थानच्या खर्चाने होणारे वार्षिक उत्सव,

( २ ) संस्थानच्या महाजन व भाविक भक्तांनी भांडारात ठेवलेल्या रकमेतून होणारे उत्सव,

( ३ ) पूर्वापार चालत आलेले काही घराण्यांचे उत्सव, त्यांचे वंशज येऊन स्व-खर्चाने साजरे करतात.

याप्रमाणे पालखी उत्सव, शिबिकोत्सव, लालखोत्सव, पूजोत्सव, नौकारोहण, महारुद्रोत्सव इ० उत्सव चालू असतात.

**देवस्थानचा सेवकवर्ग**— दक्षिणेत अनेक श्रीमंत देवालयांप्रमाणे येथेही निरनिराळ्या कामांसाठी सेवकवर्ग आहे आणि तो ठराविक कामे करीत असतो—

१. **घैसास**— गणपती पूजन, पुण्याहवाचन, पंचांगवाचन इ०.

२. **अभिषेकी**— आवर्तने, एकादष्णी, अभिषेक, लघुरुद्र इ०.

३. **पुजारी**— श्रीस मंत्रोक्त स्नान घालणे, पूजा बांधणे, नैवेद्य अर्पण इ०.

४. **जोतकार**— नंदादीप प्रज्वलित ठेवणे, रात्रौ मंदिरात शयन करणे.

५. **पुराणिक**— दररोज तासभर पुराण सांगणे.

६. **हरिदास**— आरती व शिबिकोत्सव-प्रसंगी कीर्तन करणे.

७. **देवळी ( पैरेकरी )**— घंटा व नगारा वाजविणे, रांगोळी घालणे इ०.

८. **शिपाई**— स्वारीच्या वेळी चांदीच्या काठ्या घेऊन चालणे.

९. **कलावंती**— दररोज संध्याकाळी आरतीच्या वेळी आणि काही ठराविक प्रसंगी नृत्य करणे.

१०. **मृदंगी-टाळकर**— हरिदास व कलावंती यांना साथ करणे.

११. **सारंगीवाला**— कीर्तन व गवई गाण्याच्या वेळी साथ करणे.

१२. **घडशी**— चौघडेवाला, सकाळी पाच, दुपारी अकरा आणि सायंकाळी सहा वाजता चौघडा वाजविणे.

१३. **वाजंत्री**— दुपारी व सायंकाळी आरतीच्या वेळी व इतर समयी, वाद्ये वाजविणे.

१४. **इलामतदार**— अबदागीर, छत्री, पताका घेऊन श्रीच्या स्वारीच्या वेळी हजर असणे.

१५. मशालजी— सायंकाळी नौबतीच्या आणि आरतीच्या वेळी मशाली प्रज्वलित करून हजर असणे.

१६. परीट— श्रीच्या स्वारीच्या वेळी पायघड्या घालणे.

१७. न्हावी— श्रीच्या स्वारीच्या वेळी आरसा दाखविणे.

१८. भाविका— दोन प्रहरी महापूजेसमयी व नवरात्रोत्सवात मोर्चेल टाळणे. (पृ. १३१–३२)

संस्थानचे उत्पन्न जर चांगले असेल अगर भाविक भक्तांकडून वार्षिक भांडारात जर मोठी रक्कम जमा होत असेल, तर असा सेवकवर्ग असल्याने, मंदिराचे वैभव उठावदार दिसते आणि नैमित्तिक कामे व्यवस्थेशीर पार पडतात. पण ज्या ठिकाणी मोठी आवक नसेल तेथे हा सर्व इतमाम राखणे परवडणारे नाही.

## देवतांचा प्रसाद

आपली गाऱ्हाणी इष्टदेवतेला कथन करून त्याचा उलगडा करून घेण्याची पूर्वापार रूढि या प्रांतात आहे. अर्थात या गोष्टी श्रद्धेच्या आहेत. संमती दर्शक प्रसाद ( कौल ) मिळावा म्हणून ठराविक प्रथा पाळली जाते. कोकण प्रांती ही प्रथा अजूनही अनेक ठिकाणी आचरणात येते, यास्तव थोडा अधिक खुलासा करीत आहे.

पाटला ( पटकुळी ) झाडाच्या नावाच्या फुलाच्या पाकळ्या व कळ्या ( काही गावी भात गोटेही लावतात ) देवताचे प्रतिमेस पाण्यात भिजवून लावतात. या क्षेत्री ग्राम पुरुषाच्या प्रतिमेस लावतात. प्रसाद लावण्याची ४९ स्थाने असून ( काही ठिकाणी कमी जास्त असतात ) त्या त्या स्थानाची ठराविक परिभाषा असून, त्याना अनुलक्षून निकाल आहेत. सकाळचे पूजन झाल्यावर रात्री आरतीपर्यंत लावतात, पण काही खास वेळी त्यानंतरही रात्री लावतात. परिभाषेनंतर जशा पाकळ्या खाली पडतील त्याप्रमाणे निकाल म्हणजे प्रश्नाची उत्तरे समजण्यात येतात. या प्रसादासाठी ख्रिस्ती जमातही येते. हिंदु पद्धतीने कौल लावल्यानंतर जर तेथे कोणी ख्रिस्ती आला तर कौल मिळत नाही असे मानतात आणि आपला कौल झटकून प्रथम त्याचा कौल लावून त्याचे काम केले जाते. हिंदूचा कौल नंतर पुढे चालू होतो.

कौल घेत होते, पहाट झाली तरी निश्चित कौल मिळेना. इतक्यात माझी आई राधाबाई मुलीजवळ बसलेली असता डोळ्यावर झापड आली आणि तेवढ्यात तिला शेजारची सुहासिनी स्त्री हातात लामण दिवा घेऊन घरात फिरत असलेली दिसली. आईने हटकताच ती म्हणाली, 'तुझी मुलगी आजारी आहे असे समजले म्हणून पाहण्यास आले. घाबरू नको. सकाळी तिला बरे वाटेल' असे सांगून ती निघून गेली. अर्थात पहाटेचे वेळचे स्वप्न खरे ठरले आणि सकाळी मुलीचा ताप उतरला. मातापित्याची हीच भावना झाली की, देवी स्वत मुलीला पाहण्यास आली आणि त्यामुळे उतार पडला.

नारोराममंत्री—या देवालयाच्या वैभवाच्या आणि संपन्नतेच्या स्थितीला हे गृहस्थच कारणीभूत आहेत. शाहू छत्रपतीच्या वेळी हे मंत्री होते (सन १७१३). आपणाला प्राप्त झालेले वैभव व मानमरातब शांतादुर्गा देवीच्या कृपाप्रसादाने मिळाले आहे, याची सतत जाणीव त्यांना होती. त्यांचा शिक्काही तसाच होता 'श्री शांतादेवी भक्तस्य नारोराम मंत्री' असा असे दैवत एका साध्या देवळीत आहे, तेव्हा भव्य मंदिर बांधावे अशी त्यांना प्रेरणा झाली जागा निश्चित केल्यावर आराखडा आणि बांधकामाची व्यवस्था त्यांनी केली. सन १७३० च्या सुमारास बांधकामास सुरुवात झाली असावी आज दोनशे वर्षांनतरही मंदिराचा आराखडा व कलापूर्ण बांधकाम पाहिले म्हणजे त्याचे कौतुक करावेसे वाटते. या मंत्र्याप्रमाणे सरदार रामचंद्र मल्हार सुखठणकर, पेशवाईतील एक थोर मुत्सद्दी यानीही भरपूर देणग्या दिलेल्या आहेत. देवालयाच्या मागील बाजूस त्यांनी एक अग्रशाला सन १७४६ च्या सुमारास बांधली (पृ. १७०) यांच्यामुळेच या देवस्थानाला अनेक आज्ञापत्रे पेशव्याकडून मिळालेली आहेत, त्यांना शिक्के असे म्हणतात अगर मोकासा म्हणतात या देवीला सातेरी या नावानेही ओळखतात

सातारा गादीचे श्रीछत्रपति शाहूमहाराज यांचा मंत्री नारोराम शेणवी, यांनी बाजीराव पेशव्याकडून सन १७३९ साली अमृतपडी नंदादीपादि उर्जे करिता मौजे कवळे हा गावचा मोकासा मिळविला नंतर पेशव्याचा मर्दनगडचा सुभेदार सौंधेकर देसाई याच्याकडून तो कायम करून घेतला आणि भांडणतंटा मिटविला (गौड सारस्वत ब्राह्मण कुलदैवते, पृ. १०९)

श्री शांतादुर्गा सेवा समिती स्थापन झालेली असून त्यामार्फत देवस्थानची सुधारणा करण्यात येत आहे. २४ गाळ्यांची नवीन अग्रशाळा बांधून झाली असून महाद्वाराचाही जीर्णोद्धार झालेला आहे मंदिराच्या छपराचे, प्रदक्षिणा मार्गाचे वगैरे दुरुस्तीची कामे होत आहेत सेवा समितीने सन १९६६

साली चारशे वर्षे पूर्ण झाली म्हणून महोत्सव केला आणि त्या निमित्त 'श्री शांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथ' प्रसिद्ध केला आहे. सुमारे २५० पृष्ठांच्या या ग्रंथात देवस्थानची भरपूर माहिती आहे आणि ती आधारभूत धरूनच वरीलप्रमाणे त्रोटक वृत्त दिलेले आहे (पृष्ठ क्रमांक याच ग्रंथातील म्हणजे 'श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि महोत्सव ग्रंथ' यातील समजावीत )

कवळे येथे जरी या देवीचे प्रमुख स्थान असले, तरी या देवतेच्या प्रतिमा अनेकांनी आपापल्या गावी वसविलेल्या आहेत खडेपार, कुंकळये, गोठण, माशेल, तिवरे, पालये, धारगळ, कदोळी, नेरूर, वादोडे, मूळगाव, अमोणे, कातरपे, नरडे, धूडा, परोडे कोळंब, कालापूर इ० गावी मंदिरे आहेत.

शांतादुर्गा संस्थानचे महाजन अगर वागड कौशिक गोत्री १२ आणि वत्सगोत्री २ मिळून १४ आहेत. त्यांची नावे क्रमाने—शिरोडकर, पिसुर्लेकर, वैद्य, सुखठणकर, भांडारकर, धोंदे, रामाणी, श्रीधर पै, रेगे, शिणाणी, गायतोंडे, सावरदडे, वर्दे, पाणदीकर याप्रमाणे होत. संस्थानच्या कारभारी मंडळावर या घराण्यातील व्यक्तींनाच निवडून घेण्याचा अधिकार आहे, इतरांना नाही (पृ १९३) संस्थानचे वार्षिक उत्पन्न ३५ ते ४० हजार असून वार्षिक खर्च सुमारे ३० हजारापर्यंत आहे.

'देवी चरित्रामृत' या नावाचा एक ग्रंथ श्री. विष्णु रंभाजी शेलडेकर यांनी प्रसिद्ध केला आहे प्रथम सप्तशतीचे प्राकृत काव्य देऊन नंतर एक अध्याय हरिहराच्या युद्धाबद्दल जोडलेला आहे. त्यामध्ये या देवतेसंबंधी संपूर्ण माहिती मिळू शकते. रामनवमी, वसंतपूजा, नवरात्र-दसरा, कोजागिरी शिवरात्री, भव्य प्रमाणावर साजरे केले जातात.

मालिनी

समर हरि-हराते पूर्वि झाले अपार।
सतत सतत चाले वत्सरे दो हजार॥
पशुपत शिव फेंकी, विष्णु श्री चक्र फेंकी।
क्षणीं क्षणीं मनिं धास्ती, नाश पावे धरित्री॥ १॥
रणिं मग जगदंबा पाठवी तो विरंची।
त्वरित प्रकट झाली विष्णु-मायामध्येंची॥
कर धरित तयाचे टाळिते घोर घाता।
हरि हर करि शांता, पावली नाम शांता॥ २॥

वसंततिलक

दोघांहि देत उपदेश पहा कसा तो।
ब्रह्माचि विष्णु समजे, शिव विष्णु ना तो॥
तो सांब सर्व जगतीं, सचराचरा ही।
क्रोधा कसे धरितसा, धरि शांतता ही॥ ३॥
पापाणि शिल्प करुनी वसवीत मूर्ती।
दोन्ही करांत परशु-फणि नाग हातीं॥
दावित विष्णु-शिव-मस्तक दोन्हि हातीं।
नांदे प्रतीक समरीं घडवीत शांती॥ ४॥

शार्दूलविक्रीडित

श्रीशांता विजयप्रदा विजयते दुर्गा हृदां मी भजे।
केले शांत हरी-हरां समरिं ते क्रोधाग्नि जी वारिजे॥
शांतेच्या पदिं मीं सदा नमुनिया घाली नमस्कार हा।
शांता सेवक हा तुझा बहु रमे पादांबुजी नम्र हा॥ ५॥

स्रग्धरा

शांते माते सुतेजे भव भव भवनीं पोहता श्रांतलो ना।
साहा भाहा ग्रहांच्या खर-दर-दरदीं सोसवेना शरां ना॥
हा हा पाहा सदा तें मृतिकतिमतिला भासले सत्य मूर्ते।
तारी तारी करी घे सुरवर-वरदे धांव हा भृत्य भर्ते॥ ६॥

* * *

(४५) शारदा

कटाक्षे दयार्द्रां करे ज्ञानमुद्राम्।
कलाभिर्विनिद्रां कलापैः सुभद्राम्॥
पुरस्त्रीविनिद्रां पुरस्तुंगभद्राम्।
भजे शारदाम्बामजस्रंमदम्बम्॥ (शंकराचार्य)

'विद्येची अधिष्ठात्री देवता सर्वत्र दयार्द्र दृष्टि असणारी, हातामध्ये ज्ञानमुद्रा धारण करणारी, शुभदायक केशकलाप असणारी, सर्व विद्या

पारंगत अशी, सदा जागृत असणारी, जिच्या समोर तुंगभद्रा नदी वाहत आहे, अशा शारदा देवीचे मी सतत भजन-पूजन करतो.'

दक्षिण भारतामध्ये कोप्पा (जि. कडूर) येथे तुंगभद्रा नदीच्या काठी शृंगेरीचा प्रख्यात मठ आहे. या जहागिरीची परिसीमा ८×६ चौरस मैल असून म्हैसूर प्रांतातील एक प्रेक्षणीय ठिकाण म्हणून ते प्रसिद्ध आहे. या मठाचे आद्य शंकराचार्य (सन ७८८ ते ८२०) असून आचार्यांची कीर्ति अखिल भारतात उत्तरमीमांसा आणि वेदांत यांचा श्रेष्ठ पुरस्कर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या अगोदर अनेक शतके पराकोटीची ग्लानी हिंदु-धर्मावर बौद्ध धर्माच्या प्रसाराने आली होती. बौद्ध तत्वाचे खंडण करून शंकराचार्यांनी जैनसमुदायाची निष्क्रियता घालविण्यासाठी आणि त्याच वेळी सनातन हिंदुधर्माची तत्त्वे लोकांना पटवून देण्यासाठी भारताच्या चारी दिशांना त्यांनी प्रवास केला आणि काश्मीरपर्यंत अनेक मठसंस्था स्थापन केल्या आपली मते लोकांना समजावून देण्यासाठी त्यांना त्या त्या देशातील भाषा शिकाव्या लागल्या. गौड पादाचार्य हे त्यांचे अध्यात्मिक गुरु होते. त्यांनी संस्कृत भाषेत अनेक टिकात्मक ग्रंथ आणि स्तोत्रे लिहिली आहेत. शंकराचार्यांचे नाव माहीत नाही असा माणूस भारतात सापडणेच अशक्य होय. (जेम्स, धार्मिक कोश १२-७६).

विजयनगरचे राजे हरिहर आणि त्यांचे पाच बंधू यांनी शके १२६८ साली या मठाच्या खर्चासाठी म्हणून नऊ गावांचे उत्पन्न लावून दिले.
(अय्यर, पृष्ठ ११८)

शृंगेरी येथे मठ स्थापन करण्याचे कारणही अद्भुत आहे. याबाबत पुढील कथा प्रचलित आहे. एकदा एका गरोदर बेडकीचे सूर्यतापापासून रक्षण करण्यासाठी आपले पिढीजात वैर विसरून एका नागाने आपल्या फण्याची सावली तिच्यावर धरली. ते दृश्य आचार्यांनी पाहिले. या दृश्याने आचार्यांच्या मनाची पकड घेतली आणि अशी निर्वैर नांदत असलेली जागा त्यांनी आपल्या मठाकरिता निवडली. मठाला शृंगेरी हे नाव देण्याचे कारणही तसेच आहे. या मैथापासून ९ मैलावर सुप्रसिद्ध ऋष्यशृंग मुनींचा आश्रम ज्या टेकडीवर होता ती जागा आहे. याच ऋषींच्या कृपाप्रसादाने दशरथ राजाला पुत्रप्राप्ति झालेली होती, तेव्हा त्या ऋषींवर्यांचे नाव आपल्या आश्रमाला देण्याचे आचार्यांनी ठरविले. शंकराचार्यांनी चार प्रमुख मठसंस्था स्थापन केल्या. त्या येणेप्रमाणे- (१) शृंगेरीमठ-शारदादेवी, (२) द्वारकामठ-भद्रकाली, (३) जगन्नाथपुरी-विमला, (४) बद्रीकाश्रम-पूर्णगिरी. आजपावेतो शृंगेरीच्या मठावर ३५ आचार्य होऊन

गेलेले आहेत. विद्यारण्यस्वामींनी पूर्वीची चंदनाची शारदेची मूर्ति विसर्जन करून नवीन सुवर्णाची मूर्ति स्थापन केलेली आहे. आजमितीला शृंगेरीला इतर माळीव मंदिरे दिसतात.

विजयनगरच्या महाराजांनी या मठाच्या खर्चाची कायम व्यवस्था करून ठेवली आहे, हे वर आलेच आहे. हे साम्राज्य शके १२५८ साली पहिला हरिहर याने स्थापन केले. पूर्वीचे जे किष्किंधा नगर तेच याची राजधानी होती. सायन आणि माधव हे दोघे राजमंत्री होते. पण पुढे त्यांनी अध्यात्ममार्गात प्रवेश केल्यावर ते अनुक्रमे सायणाचार्य आणि विद्यारण्यस्वामी या नावाने प्रसिद्धीला आले. त्यांनी १५० संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकी 'देव्यपराध स्तोत्र' हे अतिशय प्रसिद्ध आहे. सायणाचार्यांनी अनेक ग्रंथावर टीकात्मक भाष्ये लिहिलेली आहेत. (श्री. चिं. ग. कर्वे, 'प्रसाद' मासिक, १९६१)

शारदेच्या मूर्तीशिवाय इतर मंदिरातील वेणुगोपाल आणि श्रीनिवास यांच्या हिरेमाणकाच्या मूर्ति प्रेक्षणीय असून, तेथे एका मोत्यावर नंदीची आकृति कोरलेली दाखविण्यात येते. ते शिल्प उत्कृष्ट आहे. या ठिकाणचे नवग्रह मंदिरही प्रेक्षणीय आहे. त्याला बारा शिल्पयुक्त खांब असून, त्यांच्या माथ्यावर सिंह आणि स्वार यांच्या आकृति आहेत. सिंहाच्या मुखात उत्कृष्ट पाषाणाचे तेजस्वी गोळे ठेवलेले असून सिंहाच्या मुखातून खाली न पडता ते फिरू शकतात. या ठिकाणी प्रत्येक खांब म्हणजे एक एक राशी मानली असून कालमानाप्रमाणे त्या त्या खांबावर पडलेले सूर्यकिरण सिंहमुखीच्या गोळ्यावर परिवर्तन पावतात. तोंडातील गोळ्यावर शनि, गुरु, शुक्र, चंद्र आदि ग्रहांची प्रतिमात्मक चित्रे बसविली असून सूर्यप्रकाशात ग्रहमाला कशी फिरते याचे दृश्य पाहावयास मिळते. ही कलाकृति बुद्धिगम्य आहे. (अय्यर, पृष्ठे ३६०-६२.)

या मठामध्ये अनेक ताम्रपट आणि शिलालेख आहेत. त्यावरून असे दिसून येते की, पुणे येथील पेशवे या पीठावरील आचार्यांना धार्मिक विधींच्या वेळी अग्रपुजेचा मन देत इतकेच नव्हे, तर त्या वेळच्या मुसलमान राज्यकर्त्यांनाही या पीठाबद्दल आदरभाव होता, असे दिसून येते. म्हैसूर नबाब हैदरअलीखान याने त्या वेळच्या गादीवरील वारसाला हत्ती, घोडे यांचा नजराणा करून त्यांचा सन्मान केला होता. एके वेळी शृंगेरीहून राजधानीला भेटीस नेल्यावर त्याने खर्चासाठी दहा सहस्र रुपयाची मंजुरी दिली. हैदरचा मुलगा टिपू-सुलतान यानेही वडिलाचा वारसा पूर्ण श्रद्धेने चालविला. एकदा एका लुटारूच्या टोळीने स्वामींचा मठ लुटला, त्या वेळी लिहिलेल्या सांत्वनपर पत्रात तो म्हणतो, 'हसद्भिः क्रियते कर्म, रुदद्भिरनुभूयते' म्हणजे 'ज्यांनी हे दुष्कृत्य हसत हसत

केले आहे, ते रडत रडत दुष्कृत्याची फळे भोगतील.' टिपूसुलतान हा या मठाचा मोठा चाहता होता. राज्यामध्ये सर्वत्र आबादीआबाद व्हावी, शांतता नांदावी आणि युद्धकाळी शत्रूवर विजय मिळावा यासाठी येथील धर्मगुरूंना तो नेहमी देवीजवळ प्रार्थना करण्याची विनती करी. एका प्रसंगी तर त्याने ब्राह्मणाकरवी सहस्रचंडी यज्ञ करवून त्यांना सतत चाळीस दिवस सुग्रास भोजन घातले व शेवटी भरपूर दक्षिणाही दिली, असे इतिहासात नमूद केले आहे.

( पुराणवस्तु खाते अहवाल, म्हैसूर सरकार, सन १९१६, पृष्ठ ७४–७५ )

या पितापुत्राची हिंदुदेवतेबद्दलची ही आदरणीय वृत्ति, उदात्त नि अनुकरणीय व अभिनंदनीय आहे. आजच्या मुसलमानांनी त्याचा बोध घ्यावा असेच त्यांचे आचरण होते. यामुळे जातीभेद वाढीला लागणार नाहीत आणि एकात्मताही साधता येईल. परधर्मीयांबद्दलची सहिष्णुता हीच खरी एकात्मता म्हणता येईल.

शार्दूलविक्रीडित

शुद्ध ब्रह्मचि सार आद्य वदती व्यापून राही जगा ।
वीणा–पुस्तक–धारिणी अभयदा अज्ञान नाशी जवा ॥
माळा ती स्फटिकांचि हातिं विलसे, पद्मासनीं वास तो ।
देई बुद्धि अतां सदा भगवती त्या शारदे वंदितो ॥ १ ॥

मंदाक्रांता

धर्मो कार्यी अविरत रतें, शंकराचार्य आद्य ।
चारी धामे उभवुनि स्वयें चालवी धर्मकार्य ॥
धर्मग्लानी विफल करण्या आणिली बौद्धपंथें ।
शृंगेरीला प्रथम उभची पीठ हें शारदेचे ॥ २ ॥
या पीठाचे स्थल निवडण्या गोष्ट अद्‌भूत झाली ।
भक्षासाठीं फिरत असतां मंडुकीं ग्लानि आली ॥
वासुकी हा उभवुनि फणा चंडतापा निवारी ।
त्या दृश्याला बघुनि ठरवी क्षेत्र हें पुण्यकारी ॥ ३ ॥
आदीमूर्ती बनविल स्वयें स्वामिनी चंदनाची ।
विद्यारण्यें पुनरपि तया स्थापिली कांचनाची ॥
पीठां पूजी विजयनगरीं हिंदुसम्राट राजे ।
तैसे पूजी हयदर-टिपू यापनीं वीर राजे ॥ ४ ॥

पृथ्वी

सरस्वति स्वरूप ही ग्वचित शारदा शोभते ।
करी स्फटिक-माळ शुभ्र-घट अमृता दाविते ॥
समस्त जन भारती ममजलीच विद्यावती ।
विशुद्ध पर भावनें नमित शारदा मीं अती ॥ ५ ॥

दिनांक २०–१०–६७ रोजी या पीठाचे शंकराचार्य गोरेगाव (मुंबई) देवीचे दर्शनाला आले असता ग्रंथाचा प्रथम खंड लेखकाने श्रींना अर्पण केल्यावर श्रींचा अभिप्राय आला तो असा:—

मायाशक्तिः अक्षरं, आकाश इत्यादि नामभिः निरूच्यमाना या देवी तस्याः स्वरूपं पुराणेतिहासादिषु विवृतं समस्ति, तत्स्वरूपं सर्वमपि महता प्रयत्न विशेषण एकत्र सङ्कलितं ग्रंथकृद्भिः । एतद्दृष्ट्वा प्रमोदामहे वयम् । अनेन प्रयत्न-विशेषण देवीस्वरूपं जिज्ञासमानानां अत्यन्तमुपकारोभवत्येवेति ॥

(४६) सप्तशृंगी

आदिशक्ति आदिमायेचे मूळस्थान म्हणून भारतामध्ये या पीठाची प्रसिद्धी आहे. या पीठाची स्थापना नक्की केव्हा झाली याची मूळ कल्पना कोणालाच नाही. पण एक प्रचलित दंतकथा सांगतो. मार्कंडेय ऋषींनीं या ठिकाणी एकदा घोर तपश्चर्या केली आणि देवी प्रसन्न झाल्यावर तिने सांगितल्याप्रमाणे त्यांनी या ठिकाणी देवीच्या मूर्तीची स्थापना केली असे सांगतात. या देवीला दररोज नित्यनेमाने ते पुराण सांगत असत, असा उल्लेख मिळतो. याची स्मृति म्हणून पीठाच्या समोरील डोंगराला मार्कंडेयाचा डोंगर असे म्हणतात.

या बाबतीत दुसरी एक उत्पत्ति अशी. पूर्वीच्या काळात पृथ्वीवर दैत्यांचे प्राबल्य झाल्यावर त्यांचा नाश करण्यासाठी ब्रह्मा-विष्णु-महेश या तिघांनी एक शक्ति निर्माण केली. नंतर त्या शक्तीची त्यांनी चार स्वरूपात विभागणी केली आणि त्या चार भागांची स्थापना सप्तशृंगी, कोल्हापूर, मातापूर व अंबेजोगाई या चार ठिकाणी केली. यासाठीच त्यांना चार प्रमुख पीठे मानतात. या चारी स्थानावरुन दैत्यांचा प्रतिकार केला जाऊ लागला आणि अशा प्रकारे दैत्य-संहाराचे सत्र चालू झाले. सप्तशृंगी देवीने दोन बलाढ्य दैत्यांचा वध केल्यावर महिषासुराबरोबर तिची गाठ पडली. देवीने दैत्यरूपी रेड्याचे मस्तक तरवारीने तोडल्यावर तो दैत्य राक्षसरूपाने प्रगटला. देवीच्या सामर्थ्याचा प्रत्यय आल्याने तो पुरा भयभीत होऊन प्राण वाचविण्यासाठी धूम पळत सुटला. पळता पळता

तो डोंगरावरील एका खडकाशी अडखळला पण गमत अशी की, त्या धक्क्यामुळे महिषासुराला काहीच झाले नाही उलट त्या खडकाला एक मोठे भोक पडून तो त्या भोकातून आरपार निघाला हे भोक पडलेला खडक अजूनही आपल्याला तेथे पाहावयास सापडतो (नाशिक जिल्हा गॅझेट)

तिसरी एक उत्पत्ति आहे ती अशी रामरावण युद्धात लक्ष्मण बेशुद्ध पडलेला असताना त्याला शुद्धीवर आणण्यासाठी हनुमानाने द्रोणागिरी पर्वत उचलून आणला परंतु त्या डोंगराचे काही तुकडे मार्गात पडले सप्तशृंगीची टेकडी म्हणजे त्या तुकड्यापैकीच एक तुकडा होय असे मत डब्ल्यु रॅमसे सी एम् यांनी व्यक्त केले आहे (Indian Antiquary II Pages 161–64)

कथापुराणातून हा द्रोणागिरी पर्वत अयोध्याच्या पलीकडे आहे, असे कथाकार सांगतात आणि मार्गात एखादा तुकडा पडणे शक्य आहे, पण भौगोलिक परिस्थिति पाहता द्रोणाचल अथवा द्रोणागिरी हा दक्षिण भारतामध्ये तामीळ नाड प्रांती आहे याबाबत संशोधकांचे एकमत प्रस्थापित व्हावयास पाहिजे.

वरील उत्पत्तींपैकी साधारणत पहिली उत्पत्ति खरी मानावी लागेल कारण दुसरी उत्पत्ति ही सर्वसाधारणपणे बहुतेक देवींच्या बाबतीत आढळते महिषासुराला मारणारी महिषासुरमर्दिनी ही निराळी देवी आहेच तिसरी उत्पत्ति ही केवळ सप्तशृंगी टेकडीच्या अस्तित्वाबद्दल आहे, देवीबद्दल नव्हे

सप्तशृंगी देवीचे स्थान स्वयंभु आहे असे मानतात याबद्दलची दंतकथा अशी प्रचलित आहे की, अनेक शतकापूर्वी एक धनगर आपली गुरे चरावयासाठी या डोंगरावर नेत असे एके दिवशी त्याला खडकाला फार मोठे मधमाशांचे मोहोळ लागलेले दिसले ते काढण्याच्या प्रयत्नात तो असता, त्याने मोहोळात काठी खुपसली आणि बाहेर काढली, तेव्हा त्याला टोकाला शेंदूर लागलेला दिसला मधाचे पोळे काढून झाल्यावर देवीचे रूप दृग्गोचर झाले आणि म्हणून स्वयंभु म्हटले जाते याचा अर्थ इतकाच घेता येईल की, देवीची मूर्ति तेथे पूर्वी होतीच, पण पूजनात नसल्याने पोळ्याने झाकून टाकली गेली होती

(मधुकर देशपांडे, नाशिक)

सप्तशृंगी देवीचे स्थान नाशिकजवळ सुमारे तीस मैल अंतरावर आहे नाशिकहून वणी-कळवण मार्गे मोटारबसने पायथ्यापर्यंत जाता येते या ठिकाणची उंची ५२५० फूट म्हणजे सुमारे मैलभर असून ती दोन टप्पे घेऊन गाठता येते पहिला टप्पा साधारणपणे ३५०० फूटावर असून नंतर दुसरा टप्पा लागतो वर चढण्यास दगडी पायऱ्या बांधलेल्या आहेत, पण चढणीला त्या

कठीणच ठरतात. प्रत्येक पायरी चार फूट लांब व एक फूट रुंदीची आहे. अशा या उंच ठिकाणच्या पायऱ्या चढताना शहरी लोकांचा जीव तर नुसता मेटाकुटीस येतो. त्यामुळे संस्थानच्या विश्वस्तांनी वर जाण्यासाठी डोलीची व्यवस्था केली आहे. या संदर्भात एक कथा पहा. नाशिक शहरातील तिळभांडेश्वर मंदिराजवळ कोणी गिरमाजी कान्हेरे या नावाचे गृहस्थ राहत होते. त्यांचे सुपुत्र रुद्राजी व कृष्णाजी यांनी प्रत्येक पायरीच्या मोबदल्यात एकेक सोन्याचे कडे मजुरांना देऊन या पायऱ्या तयार करून घेतल्या आहेत. पायऱ्यांवर या गृहस्थाच्या नावाचा उल्लेख मिळतो.

शके १६९० साली जेष्ठ महिन्यात हे पायरी-बांधणीचे काम सुरू झाले आणि शके १६९१ साली चैत्र महिन्यात हे काम पुरे झाले. पायऱ्यांवर ठिकठिकाणी राम, लक्ष्मण, हनुमान, राधाकृष्ण, कासव यांच्या आकृति आढळतात पायथ्यापासून तो थेट मंदिरापर्यंतच्या पायथासपाटीपर्यंत पायऱ्या बांधलेल्या आहेत. या पायऱ्यांचे काम झाल्यावर पायथ्याशी एक धर्मशाळा व एक लहानसे देवीचे मंदिर बांधून प्रवाशांना विश्रांति घेण्याची सोय केलेली आहे.

मध्यसपाटीपासून वर देवस्थानापर्यंतच्या पायऱ्या आधीच बांधून पूर्ण झालेल्या होत्या. पेशव्यांचे एक सरदार खंडेराव दाभाडे यांची पत्नी या देवीची भक्त होती मध्यसपाटीपासूनचा वरचा भाग चढण्यास अतिशय दुर्गम असल्याने तिने शके १६५७ साली या ठिकाणी पायऱ्या बांधल्या. या पायऱ्यांची एकूण संख्या ४७२ आहे. वरच्या पायऱ्या तयार झाल्यानंतर ५८ वर्षांनी खालच्या पायऱ्या बांधून पूर्ण झाल्या

मध्यसपाटीवर काही घरे, धर्मशाळा आणि कोळी लोकांच्या झोपड्या आहेत. हीच या ठिकाणची आज वस्ती होय. या सपाटीवर कालीकुंड ( २१' × २४' ), सूर्यकुंड ( २४ × १५' ) व दत्तात्रयकुंड ही कुंडे आहेत याशिवाय सरस्वती, लक्ष्मी, तांबुल, अमालय व शीतल अशी जलतीर्थेही आहेत. बडोद्याचे कोट्याधीश सावकार मैराळ आणि नाशिक येथील सरदार चांदवडकर यांनी बांधलेल्या दोन धर्मशाळा या ठिकाणी दिसतात. परंतु दुरुस्तीअभावी त्या म्हणाव्या तितक्या चांगल्या स्थितीत नाहीत पूर्वी या ठिकाणाहून तीन मार्गांनी देवस्थानापर्यंत जाता येत असे. उत्तरेचा मार्ग भयंकर दुर्गम चढणीचा, पूर्वेला साठ पायऱ्यांचा मार्ग आणि तिसरा मार्ग म्हणजे पायऱ्या बांधलेला आणि सध्या उपयोगात असलेला मार्ग होय या दक्षिणेकडील नांदुरी ( ता. कळवण ) या गावाकडील सोप्या नि सुगम मार्गामुळे पहिले दोन मार्ग आता थोड्या प्रमाणांत उपयोगात आहेत.

पायऱ्या चढताना प्रथम गरुड, शीतलतीर्थ, कूर्मतीर्थ आणि गणेश यांच्या भव्य मूर्तीचे दर्शन घडते. या मंदिराला लागूनच गणेशतीर्थ आणि थोडे वर गेल्यावर शिवतीर्थावर निवळ पाणी तर भगवतीतीर्थावर तांबूस पाणी दिसते. या तलावातील माती लाल असल्याने स्त्रिया तिचा उपयोग घराला लाल रंग देण्यासाठी करतात.

येथील अतिप्राचीन स्थान म्हणजे गाभाऱ्यात कोरलेली अठरा हातांची देवीची भव्य मूर्ति आणि तिच्या रक्षणासाठी सभोवार कोरलेली मेहरपी चौकट. पेशवाईच्या काळात सरकार स्वारी नवरात्रामध्ये एक दिवस या क्षेत्री येऊन देवीला पूजा बांधीत असे. अठराव्या शतकात ब्रह्मेंद्र दादा असतानाची ही कथा आहे. त्या वेळी दाजिबा नावाचा एक सैनिक अनेक वर्षे त्या ठिकाणी राहात होता. बरीच वर्षे सेवा केल्यावर देवीच्या प्रचारकार्यासाठी आणि त्यायोगे काही सुधारणा करता आल्या तर पहाव्या, या उद्देशाने बाहेर जाण्याचे त्याने ठरविले. त्याने देवीची यथासांग पूजा केली आणि प्रसाद म्हणून देवीच्या मुखातील विडा बरोबर घेतला. तो घेण्याचे कारण असे की, बाहेर जाण्याची जेव्हा त्या सैनिकाने देवीजवळ परवानगी मागितली, त्या वेळी हा विडा देवीच्या तोंडातून खाली पडला होता. देवीने जणू काही कौलच दिला असे समजून, तो विडा घेऊन दाजिबा बाहेर पडला होता. अनेक शहरी फिरून नंतर तो बडोदा येथे नरकोर-नारायण, माधवराव मैराळ यांच्या वाड्यात पोहोचला.

मैराळ घराणे आतिथ्यशील म्हणून प्रसिद्धच आहे. भर दुपारची भोजनाची वेळ आणि अतिथी ऐन सदरेवर आलेला. लगेच दारी आलेल्या अतिथीला—दाजिबाला—भोजनाचे निमंत्रण दिले गेले. पण दाजिबाला देवीने काय स्फूर्ति दिली कोणास ठाऊक? दाजिबा म्हणाला की, 'जर प्रत्यक्ष घरातील मालकीणबाईंनी येऊन मला निमंत्रण दिले तरच मी येऊ शकेन.' परंतु दुर्दैवाने घरातील मालकीणबाई अर्धांगाच्या विकाराने पछाडलेल्या होत्या. त्यांना अजिबात चालता येत नव्हते. कोणी तरी अतिथीचे म्हणणे बाईंच्या कानावर घातले. वास्तविक अशा हेकेखोर अतिथीबद्दल बाईंच्या मनात तिरस्कार उत्पन्न व्हावयास हवा होता. पण ते राहिले बाजूलाच! एवढ्या औत्सुक्याने गृहस्वामिनींकडून निमंत्रणाची अपेक्षा करणारा हा अतिथी कोण आहे हे पाहाण्यासाठी त्या अपंग बाई तशाही स्थितीत मेण्यात बसून बाहेर आल्या. त्यांनी स्वतः अतिथीला भोजनाचे निमंत्रण दिले. दाजिबाने मालकिणीची अपंग स्थिति पाहिली आणि तो एकदम उद्गारला, 'माझी आई अशी अपंग कशी?' हे शब्द ऐकताच बाईंच्या नेत्रातून टचकन् पाणी वाहू लागले आणि हुंदके देत देत त्यांनी आपली

सर्व हकीकत अतिथीला सांगितली. त्या देवीभक्ताचे अंतःकरण बाईच्या विकल परिस्थितीने द्रवले.

दाजिबाला देवीच्या प्रसादाच्या विड्याची आठवण झाली. त्याने तो विडा आपल्या फडक्यातून बाहेर काढला. विडा पूर्ण वाळून गेला होता. तरीपण देवीचे भक्तिभावे स्मरण करून आणि ' ही बाई पूर्णपणे बरी होवो ' अशी देवीची मनातल्या मनात मनोभावे करुणा भाकून त्याने तो विडा सप्तशृंगी देवीचा प्रसाद म्हणून बाईंना खावयास दिला. मोठ्या भक्तिभावाने बाईंनीही तो विडा भक्षण केला आणि आश्चर्य असे की, काही मिनिटातच बाई पूर्णपणे बऱ्या होऊन आपल्या पायानी चालू लागल्या. सर्वत्र आनंदीआनंद झाला. अनेक लोक दाजिबाची आणि देवीची स्तुति करू लागले. या वेळी देवीची सेवा सोडून आपला प्रचाराचा हेतु दाजिबाने भैराळाना कळविला. देवीचा विडा खाल्यावर बाईंना बरे वाटले, यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. देवदयेच्या साम्राज्यात अशी अनेक उदाहरणे प्रत्यही घडत असतात. तुकाराममहाराज, तापाने फणफण-लेल्या आपल्या मुलाला देवाचे साधे तीर्थच देत असत. शेगावचे गजानन महाराजानी देशमुख नामे आर्त शिष्याला आपले चरणतीर्थ दिले व त्याचा रोगपरिहार झाला. प्रत्यक्ष कुबेर प्रसन्न झाल्यावर मग कोणत्या गोष्टींची उणीव भासणार? भैराळ आपल्या पत्नीसह स्वतः सप्तशृंगी गडावर गेले. त्यानी इथूनच बांध-कामाचे साहित्य गडावर चढवून मध्यसपाटीवर धर्मशाळा बांधली आणि वार्षिक खर्चासाठी १५० रुपयांची व्यवस्था केली. ( निवेदक–दादा पेंडसे, गोरेगाव ).

तितकी शिरे त्या ठिकाणी आढळली. याच देवीचा एक अवतार पुणे येथे चतुःशृंगी ठिकाणी झालेला आहे आणि यामुळे त्या देवीलाही तेच नाव का मिळाले याचा मात्र उलगडा होतो. सप्तशृंगीचा उल्लेख ब्रह्मवैवर्त पुराणात आलेला आहे. मुंबई शहरातील नवविवाहीत जोडपी ज्याप्रमाणे हँगिंग गार्डन-मध्ये फिरावयास जातात व झाडाझुडपांनी युक्त अशी एकांताची जागा जास्त पसंत करतात, त्याप्रमाणे शंकर श्वशुरगृही असता कामुक क्रीडेसाठी सात-शृंगी पर्वतावर गेल्याचा उल्लेख मिळतो ( अध्याय ४६।१६-१० ). पण भौगोलिक परिस्थितीवरून हा भाग हिमालय पर्वताच्या परिसरात असावा, दक्षिणेतील सप्तशृंगी ग्रामच नव्हे ! असे वाटते.

बाजूने केव्हा व कसा वर चढतो हे रहस्यामधी माणसे उपस्थित असून देखील त्याना अजिबात कळत नाही. पौर्णिमेच्या चांदण्या रात्रीत हा समारंभ उरकला जातो. या वतनी घराण्यात हे निशाण लावण्यासाठी अद्यापपर्यंत पुरुषाची वाण पडलेली नाही, ही एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट[1] आहे.

भोकरधन ( औरंगाबाद ) जवळ वाड या गावी एक अष्टादशभुजा देवीचे स्थान आहे. एका डोंगराच्या २५ पायऱ्या चढून गेल्यावर गुहेमध्ये प्रवेश घडतो. गुहा १० × २० आकाराची असून पार्श्वभागाच्या भिंतीवर मूर्ति कोरलेली आहे. मूर्तीचे स्वरूप सप्तशृंगी सारखेच भव्य असून, अठरा हातात आयुधे आहेत आणि शिडी लावून पूजा करावी लागते. नवरात्रामध्ये उत्सवाच्या वेळी गुहेसमोर तात्पुरता मंडप घातला जातो. हे फार प्राचीन स्थान आहे असे म्हणतात. ( बापूजी देव वकील, भाजी गल्ली, औरंगाबाद ).

सप्तशृंगी देवीला अठरा हात आहेत. पण याहून जास्त हात असलेली दुसरी एक देवीची मूर्ति उपलब्ध आहे. ग्वाल्हेरमध्ये बजरंगड नावाचे एक स्थान आहे. तेथे वीस भुजा असलेली देवीची मूर्ति आहे. मूर्ति लहानच आहे. पण आश्चर्य असे की, मूर्तीला मंदीर नाही. वीस भुजांमध्ये वीस आयुधे असून मूर्ति अतिप्रेक्षणीय आहे. ( ग्वालीयार गॅझेट, IV, पृष्ठ २१९. )

विंध्य प्रदेशात एके ठिकाणी १०८ हाताची देवीमूर्ति उपलब्ध आहे. देवीचे मानवमुख सर्वपरिचित आहे, पण दक्षाचे मुख ज्याप्रमाणे बोकडाचे दाखवितात, त्याप्रमाणे दक्षिणेत एके ठिकाणी देवीचे मुख मेंढीचे असून पाय मात्र सिंहमुख असुराच्या मस्तकावर आहेत.

( प. महादेवशास्त्री जोशी, विवेक, दसरा अंक, शके १८८० )

या क्षेत्राचे दुसरे महत्त्व म्हणजे मच्छिंद्रनाथाची समाधी होय. या कारणास्तव नाथपंथीयांचे हे श्रेष्ठ पीठ आहे. भारतामध्ये नाथपंथीयांनी कोणत्याही स्थळी साधना केली तरी या क्षेत्री येऊन तिची पूर्तता केल्याशिवाय या साधनेला फल लाभत नाही. मच्छिंद्रनाथाची उत्पत्ति कशी झाली, याबद्दल संत श्री ज्ञानेश्वर म्हणतात,

> क्षीरसिंधु परिसरीं । शक्तीच्या पूर्ण कुहरीं ।
> नेणो कैं श्री त्रिपुरारी । सांगितलें जें ॥ १७५१ ॥

---

१ टीप—ठाणे जिल्ह्यातील डहाणू येथील महालक्ष्मीचे गोर्षी अगर निशाण उभारले जाते.

ते क्षीर कल्लोळा आंतु । मकरोदरीं गुप्तु ।
होता तयाचा हातु । पैठे झाले ॥ १७५२ ॥
तो मच्छेंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगी ।
भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण झाला ॥ १७५३ ॥

(ज्ञानेश्वरी, अध्याय १८ वा)

क्षीरसागराच्या काठी शंकर-पार्वती रतिक्रीडेत रममाण झाली असता एकाएकी शंकर ध्यानमग्न झाले आणि त्यांच्या नेत्रातून अश्रु ओघळू लागले. पार्वतीने याचे कारण विचारता ते म्हणाले, 'ज्या ज्या वेळी मी हे असे परमेश्वराचे ध्यानचिंतन करतो, त्या त्या वेळी माझे हृदय हे असे हेलावते.' हे गुह्यज्ञान आपल्यालाही समजावे म्हणून पार्वतीने शंकराजवळ आग्रह धरला, तेव्हा शंकरानी सांगण्यास सुरवात केली. पार्वतीने ते बहुमोल ज्ञान काही वेळ अतिशय लक्ष देऊन ऐकले. शंकर सांगत असता ती 'हूं हूं करून' हुंकार देत होती. पण काही वेळाने विषय जसजसा गूढ आणि अनाकलनीय होत गेला, तसतसा पार्वतीला तो समजणे कठीण झाले. हळूहळू ती झोपेच्या आधीन झाली. अर्थात् तिच्याकडून येणारे हुंकार थांबले.

शंकर स्वमुखाने पार्वतीला गुह्यज्ञान सांगत आहेत हे वृत्त समजल्याबरोबर विष्णु घाईघाईने त्या ठिकाणी आले आणि जवळच सूक्ष्मरूपाने माशाच्या उदरात राहून ते गुह्यज्ञान ऐकू लागले. पार्वती निद्रिस्त झाली आहे आणि तिने हुंकार द्यावयाचा बंद केला आहे हे पाहताच त्यांनी स्वतः हुंकार देण्यास प्रारंभ केला. कारण त्यांनी तसे केले नसते, तर शंकरानी सांगण्याचे बंद केले असते. काही वेळाने सर्व काही सांगून संपल्यावर शंकर ध्यानामधून जागे झाले. पाहतात तो पार्वती झोपी गेलेली! मग हुंकार कोण देत होते याचा विचार करता विष्णूचे कपट त्यांच्या ध्यानात आले. त्यांनी विष्णूला माशाच्या उदरातून बाहेर येण्यास फर्माविले. आपण चोरूनमारून या गोष्टी ऐकल्या, याचे वैषम्य वाटून विष्णु बाहेर येण्यास घाबरू लागले. त्यांची बाहेर येण्याची हिंमत होईना, तेव्हा शंकरानी आपला त्रिशूळ मत्स्याच्या उदरी मारला. वास्तविक या आघाताने विष्णूचा प्राण जावयाचा, पण फक्त कानाला त्रिशूळ लागल्यामुळे तो मात्र फाटला. नंतर नाईलाजाने ते बाहेर आले. मत्स्याच्या पोटातून ते रूप बाहेर आले म्हणून त्याला मच्छिंद्रनाथ हे नाव मिळाले. विष्णूचा कान फाटला होता म्हणून या पंथीयांना 'कानफाटे जोगी' असे म्हणतात.

हाच भाग ज्ञानेश्वरांनी स्कंद पुराणातून घेतलेला असून त्यामध्ये थोडा बदल केलेला आहे. त्यांनी म्हटले आहे की, ते ज्ञान शंकर पार्वतीला सांगत

असताना समुद्राच्या लाटावर तरगत असताना, मत्स्याच्या उदरामध्ये गेले आणि त्या ठिकाणी गुप्तरितीने वास करून राहणाऱ्या विष्णूना मिळाले. ह्याच पुराणात पुढे म्हटले आहे की, ब्रह्मदेव क्षीरसागराच्या काठी बसले असता त्या ठिकाणी एक मोठा मासा आला व त्याना म्हणाला, 'माझ्या मातेने माझ्या पित्याच्या आज्ञेवरून मला या ठिकाणी टाकलेले आहे. अनेक वर्षे झाली, मी या जलामध्ये पडून आहे. आज तुमच्या दर्शनाने आणि ज्ञानाने मी संपन्न झालो आहे. तेव्हा कृपा करून या मत्स्ययोनीतून माझी सुटका करावी.' ब्रह्मदेवाना त्याची दया आली. त्यानी त्यास मानवी शरीर देऊन मत्स्येंद्रनाथ असे त्याचे नाव ठेवले. नतर त्यानी कैलास पर्वतावर जाऊन शकराची आराधना केली. (नागरखड, अध्याय २६३)

यानतर मत्स्येंद्रनाथ फिरत फिरत समुद्रगिरीला आले. या वेळी गात्रे शिथिल झालेला आणि अवयव तुटून निकामी झालेल्या चौरगीनाथाला त्याचे दर्शन होताच तो पूर्णपणे बरा झाला या पथात जे नवनाथ आहेत त्यांची मालिका येणप्रमाणे, (१) आदिनाथ, (२) मत्स्येंद्रनाथ, (३) गोरक्षनाथ, (४) गैनीनाथ, (५) निवृत्तिनाथ, (६) ज्ञाननाथ (ज्ञानेश्वर), (७) सत्यमलनाथ, (८) गैनीनाथ, (९) उद्बोधनाथ (१०) केसरीनाथ, (११) शिवदिननाथ (१२) नरहरीनाथ (१३) महिपतीनाथ इत्यादि, इत्यादि (चरित्र आणि काव्य—जोशी)

या पथीय गोसाव्यामध्ये अनेक आखाडे आहेत आखाडे म्हणजे सांप्रदाय असा अर्थ घ्यावयाचा उत्तर भागतामध्ये महाकालपर्वणी अगर कुंभमेळ्याच्या वेळी अनेक साधु एकत्र येतात तेव्हा मानपानाच्या निमित्ताने त्यांच्या सांप्रदायामध्ये भांडाजगी उडते वेळप्रसगी खूनही पडतात त्या आखाड्यांची नावे येणेप्रमाणे, (१) अघोरी, (२) वाळकेऱ्या, (३) अरण्य, (४) अवधूत, (५) आनंद, (६) आश्रम, (७) इड, (८) उदासी, (९) कानफाटा, (१०) गोदड, (११) गगनपर्थी, (१२) डगर, (१३) नगागिरी, (१४) निरजनी (१५) निर्वाणी, (१६) पुरी, (१७) भराडी, (१८) भारती, (१९) राऊळ (२०) वन, (२१) सरस्वती यप्रमाणे हे २१ आखाडे आहेत (ज्ञानकोश, भाग ६)

ही कर्मभूमि आहे. देवीचे जागृत पीठ आहे आणि भक्ताचे आश्रयस्थान आहे, ते वरील कारणासाठीच होय.

या देवीच्या प्रमुख स्थानाशिवाय वणी या पायथ्याच्या ठिकाणी एक लहानसे सप्तशृंगी देवीचे मंदिर आहे. वणी हे पूर्वी राष्ट्रकूट घराण्याची तालुक्याची राजधानी होती. मुसलमानी अमदानीत या ठिकाणी गणपत जनार्दन या नावाचा एक तनखेदार होऊन गेला. त्याने तलाव आणि महालक्ष्मीचे मंदिर बांधले होते. कालांतराने त्या तलावाचा नाश झाला आणि मंदिरातील मूर्ती नाशिक शहरी हलविण्यात आली. पुढे सन १७८० साली गोपिकाबाई व नानासाहेब पेशव्यांचा नहिरादार श्रीधर लक्ष्मण शेणवी याने पूर्वीच्या महालक्ष्मी मंदिराच्या जागी सप्तशृंगीनिवासिनी देवीचे मंदिर बांधले. जे भक्त दुर्बल असून गडावर जाऊ शकत नाहीत, त्यांना दर्शन घेता यावे म्हणून देवीने या ठिकाणी अवतार घेतला या असे सांगतात. हे मंदिर मोपे लोकांच्या व्यवस्थेखाली आहे. (नाशिक जिल्हा गॅझेट)

पंधराव्या शतकात महाराष्ट्रात यरकराज नावाचे कवी होऊन गेले. त्यांनी गुरुजापुरी चंडीची उपासना केल्यावर पंधराव्या दिवशी देवी कुमारी रूपाने प्रकट झाली आणि तिच्या आदेशानुसार या क्षेत्री त्यांनी देवीचे अनुष्ठान सुरू केले. तिसऱ्याच रात्री माता अंबा प्रसन्न झाली आणि त्याने ब्रह्मज्ञान मागून घेतले. हरि स्वतःचा अनुभव 'बालबोध' या ग्रंथात वर्णन करतात,

> कृपा वत्सल भवानी । करें स्पर्शिलें वदनी ।

आणि त्याचवेळी दुसरा चमत्कार म्हणजे साक्षात् शंकर प्रगट झाले.

> जो ब्रह्म मूर्ती आकारू । तोही प्रसन्न झाला सिद्धेश्वरू ।
> मस्तकीं ठेविला करू । द्विज येथ ॥

सप्तशृंगी स्थानाचें महत्त्व वर्णन करतांना कवी म्हणतात,

> जे ब्रह्मी ब्रह्म सचिली । चाडोनी विश्वाकार झाली ।
> ती मोटकी मामवली । सप्तशृंगी ॥ १३ ॥
> सप्तचक्रे आदिमते । तें शृंग अधिदैवतें ।
> चाटिका मातृका येथें । शपत्र चर्ही ॥ १४ ॥

या ठिकाणी सप्तशृंगी शब्दाची व्युत्पत्ति कवीने निराळीच लावली आहे. सप्तशृंगे म्हणजे कुंडलिनी-मार्गिकेतील सात चक्रे होत. या चक्रभागिनेतील

मातृकांचाही निर्देश या ठिकाणी आहे. तेव्हा ही ब्रह्ममाया सप्तशृंगी देवता असून चक्रे म्हणजे कुंडलिनीतील चक्रे होत. म्हणजेच याचा अर्थ असा की, डोंगराच्या शिखराबरोबर नानाचा संबंध नसावा. कवीराजांनी आपल्या काव्यात 'वाटिका मातृका' हा उल्लेख महत्त्वाचा केला आहे. त्याच्या ' बालबोध ' ग्रंथाचे तीन खंड असून ओवीसंख्या ५२८० आहे. (महाराष्ट्र वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ला, पृ. ५१०)

श्री. न. र. क्षीरसागर आपल्या ' परलोकविद्या ' ग्रंथात या देवीच्या दृष्टांताचा एक उतारा देतात. पुरीपीठस्थ शंकराचार्य (भारतीशास्त्री) यांना माधवनाथ महाराजांनी सांगितले की, या क्षेत्री देवीपठणाचे पुरश्चरण केल्यास, देवता साक्षात् दर्शन देईल. त्याप्रमाणे शास्त्रीबुवांनी सुरुवात केली आणि शेवटच्या दिवशी पाठ चालू असता, अचानक एक दहा-बारा वर्षांची तेजस्वी कन्यका त्या ठिकाणी येऊन तिने प्रसादाचे दूध मागून घेतले, प्राशन केले आणि निघून गेली. या कन्यकारूपात देवीने दर्शन दिले, पण भक्ताने त्या दृष्टीने पाहिले नाही म्हणून दर्शनसुखाला आणि भेटीला ते अंतरले.

(पुरुषार्थ, दिपवाळी अंक, १९६३)

आर्या

सप्तशृंगी देवी तव उत्पत्ति कथा कुणी सांगे ।
मार्कंडेय मुनीवर तव प्राप्तीस्तव तपाचरणिं लागे ॥ १ ॥
तापे अघोर निशिदिनीं, घेऊनि वरदान स्थापना करितो ।
नांदे स्वयें तुजपुढें, दुर्गम उत्तुंगसा गिरीवर तो ॥ २ ॥

अनुष्टुभ

नासिक-कळवणी मार्गे । आद्य पीठ गडां चढा ॥
दुर्घट पायरी मोठी । चढतां जीव धापला ॥ ३ ॥
बिकट वाट चालाया । भक्तांना रुखरी किती ॥
जागृत स्थान देवीचे । देखतां नेत्र तोषती ॥ ४ ॥

भुजंगप्रयात

अती भव्यसे देवते रूप तुझे ।
भुजा दाविती दिव्य अष्टादशा हे ॥
वरी शोभली भव्य गुंफेत माया ।
दशाधीक फूटांहुनी उंच काया ॥ ५ ॥

दिसे एक कर्णावरी हस्त ठेला ।
गमे ऐकसी वारिसी संकटाला ॥
ध्वजस्तंभीचा दुर्घटा मार्ग मोठा ।
परी वंशिचा पुत्र रोवी झपाटा ॥ ६ ॥
प्रभातीं तुझें रूप बाला परीचे ।
युवारूप तारुण्य मध्यान्हीं साचें ॥
रवी अस्तकाळीं गमे शांत वृद्धा ।
दिसो येत रूपें असे ज्ञास्त श्रद्धा ॥ ७ ॥

उपजाति

पाही दुजा सन्निध देवता या । गजानना वंदुनि कालीकाया ॥
मच्छिंद्र नादेंचि समाधी रूपे । सरोवरें ताम्र-हरित पापे ॥ ८ ॥

ओवी

देवीभक्तांची सत्यनिष्ठा । हेंची पुण्यभूमी वरिष्ठा ॥
मूळरूपाची प्रतिष्ठा । नित्य येथें नांदली ॥ ९ ॥
म्हणोनि योगिया कर्मभूमि । भारतीयांनीं मानिली मनीं ॥
कर्मभूमी आणि लक्ष्मी । मह्जीवन दुर्मिळ ॥ १० ॥

पृथ्वी

तुला परम गुह्यज्ञान दिधलें जइं शंकरें ।
तदा लपुनि मत्स्यपोटीं तर विष्णु ऐकी वरे ॥
हुकारिं मती थांवतां, त्वरित विष्णु हुंकार दे ।
परी उमगतां शिवां, त्रिशुळ पोटिं मोचून दे ॥ ११ ॥
न अंत करितो जिना, त्रिशुळ कान फाडी वरा ।
स्वयें प्रकटला हरी भिवुनि क्रोध कोपाहरा ॥
घडे प्रसव मत्स्यपोटिं म्हणुनीच मच्छिंद्र हा ।
म्हणोनि अभिधान नाथ-जनिं कानफाटे पहा ॥ १२ ॥
असा द्वितिय नाथ तो फिरत पातला या स्थला ।
वरा त्वरित आहला तुटित गात्रि चौरंगि हा ॥
पुढें गुरुपरंपरें मिळत ज्ञान-निश्चलिला ।
सदैव शिव-आदिनाथ-नवनाथ त्यांनीं तुला ॥ १३ ॥

प्रथा दिसत घंटि लोळकहि काढुनी ठेविती ।
समाप्त जइं आरती करित मांज वेळांस ती ॥
कवाड पुरतें पुरें नच दिसे तुझ्या मंदिरा ।
कुणा कधिंहि वास ना घडत रात्रि त्या मंदिरा ॥ १४ ॥
सु भक्त नवनाथ पंथिजन मानिती क्षेत्र हें ।
अजूनि नवनाथ मंदिरीं तुला स्तवीती वरें ॥
अमासदिनीं पौर्णिमे जमुनि सर्व रात्रीसही ।
कधीं स्तविती भेटुनी करुनि नाद घंटेसही ॥ १५ ॥

(४७) स्वांगिआजी

भारत पाकिस्तान सीमेवर जेसलमेर नावाचे शहर आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळी हे एक संस्थान होते. तेथील राजघराण्याची ही कुलस्वामीनी त्या शहरी या देवीचे मंदिर आहे. या देवतेला स्वांगिआजी हे नाव का आले ते आता पाहू.

प्राचीन काळी मगध देशाचा राजा जरासंध याने घोर तपश्चर्या करून देवाना प्रसन्न करून घेतले आणि आपला सतत विजय व्हावा असा त्याच्याजवळ वर मागितला. त्या वेळी देवानी त्याला एक त्रिशूळ प्रसाद म्हणून दिला त्या त्रिशूळाच्या पूजनाने जरासंधाच्या शब्दकोशातून पराभव हा शब्द पार निघून गेला. द्वारकेतील यदुवंश या त्रिशूळाला फार भीत असे आणि जोपर्यंत तो त्रिशूळ शत्रूजवळ आहे, तोपर्यंत आपली मात्रा चालणार नाही हे प्रत्यक्ष श्रीकृष्णही जाणून होते. हरप्रयत्नाने तो त्रिशूळ हस्तगत करण्याचे सर्व प्रयत्न विफल झाल्यावर श्रीकृष्णानी कालीदेवीची उपासना आरंभिली. अनेक दिवस विधियुक्त उपासना झाल्यावर आणि देवी प्रसन्न झाल्यावर त्रिशूळ आणून देण्याची यदुराजाने तिला प्रार्थना केली. दुष्टाचा संहार करण्याच्या कामी यदुवंश झटत असल्याने, देवीने ही कामगिरी मोठ्या आनंदाने पत्करिली

देवीने आपले स्वरूप सात स्त्रियामध्ये विभागले. श्री दत्तात्रयाचा अवतार धारण करणारे श्री नरसिंहसरस्वती दिपवाळीचे समयी आपले अनेक ठिकाणचे भक्ताचे घरी मूळ स्वरूप विभागून भेट देऊ शकतात, तर श्री कृष्णाप्रमाणे देवतानाही अनेक रूपी होणे खासच अवघड नाही त्या सात स्वरूपांसह देवीने जरासंधाच्या महालात प्रवेश केला मानवाला योगसामर्थ्याने आपले शरीर विभागता येते आणि अनेक ठिकाणी आपली उपस्थिति दाखविता येते तेव्हा

मानवाना जी गोष्ट अशक्य नाही ती देवतेला सहजच शक्य होऊ शकते. तात्पर्य, स्वांगियाजी देवीने आपले शरीर सात स्त्रियांमध्ये विभागले यात नवल वाटण्याचे मुळीच कारण नाही. जरासंधाच्या राजवाड्यात प्रवेश केल्यावर त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी त्या त्रिशूळासाठी शोधाशोध चालविली. काही दिवसांच्या शोधाशोधीनंतर अखेर त्याना तो त्रिशूळ सापडला आणि देवीने तो त्रिशूळ यदुवंशाकडे आणून दिला. पुढे जरासंधाचा पाडाव झाला ही गोष्ट निराळी सांगणे नकोच! कालिकादेवीने मानवी स्त्रीचे सोंग घेऊन त्रिशूळ हस्तगत केला म्हणून कालिकादेवीलाच त्यांनी स्वॉगियाजी हे नाव दिले आणि तिला कुलदेवता मानली. याप्रमाणे यदुवंशाची ही कुलदेवता झाली. हिंदी भाषेत स्वॉग याचा अर्थ सोंग असा आहे. देवीचे स्वरूप म्हणजे फक्त त्रिशूळच होय.

ही देवता जेसलमीर घराण्याकडे कशी आली याचा इतिहासही मनोरंजक आहे. यदुवंशाने जरी अमाप कीर्ति मिळविली असली, तरी आपसातल्या यादवीमुळे त्याचा शेवट अत्यंत वाईट रीतीने झाला, हे इतिहासात नमूद झालेले आहे. श्रीकृष्णाला अष्टनायिकापासून ७५ च्या वर पुत्र होते. त्यांतील दोन मुलगे यादवीनंतर उत्तरेकडे निघाले. त्यांपैकी गज नावाच्या मुलाने गझनीपर्यंत प्रवास करून तेथे आपले राज्यही स्थापन केले होते. इतकेच नव्हे तर राजधानीसाठी त्याने जे शहर वसविले त्याला आपलेच नाव देऊन गझनी हे नाव रूढ झाले.

आणखी एक मत असे की, हे शहर इ. ११८० साली वसविले गेले. सीमेवरील संरक्षणफळी म्हणून शहराची बांधणी मजबूत आहे. भोवती ३ मैल लांबीचा दगडी कोट असून चारी दिशाना प्रवेश दरवाजे आहेत. कोटाच्या आतील बाजूस मजबूत किल्ला असून त्याला ९९ बुरुज आहेत. किल्ल्यावर टिकमजी (नारायण), भगवतीची मंदिरे असून राजप्रासाद, जैन तीर्थंकरांची मंदिरे आहेत. ताडपत्रांवरील जैन ग्रंथसंग्रहालयामुळे या शहराला अधिक महत्त्व आहे.

## (४८) हरसिद्धि

या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी. एकदा कैलास पर्वतावर शंकर व पार्वती विश्रांतीच्या वेळी खेळ खेळत असता चंड व प्रचंड या पृथ्वीतलावर प्रबळ झालेल्या दोन राक्षसांनी कैलासापर्यंत येऊन थैमान घातले. नगरप्रमुख रक्षणदार नदी याने त्यांना आवरण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्याला त्यांच्या पुढे माघार घ्यावी लागली. हे वृत्त समजताच विश्रांतीच्या वेळेचा आणि रंगात आलेल्या डावाचा भंग झाल्यामुळे भगवान् शंकर कोपायमान झाले आणि स्वतःच्या तेजाने त्यांनी एका देवीची उत्पत्ति केली. तिला त्या राक्षसांचा बंदोबस्त करण्यास सांगितल्यावरून तिने त्या दोन्ही दैत्यांचा नाश केला (अवन्ती महात्म्य) त्यानंतर ती शंकरापुढे येऊन उभी राहिली, तेव्हा शंकर तिला म्हणाले,

> हरस्त्वामाह हे चंडि संहृतौ दुष्टदानवौ ।
> हरसिद्धिरतो लोके नाम्ना ख्यातिं भविष्यति ॥

प्रत्यक्ष शंकरानीच तिचे हरसिद्धि हे नाव ठेवले आहे.

स्कंद पुराणाप्रमाणे भिन्न भिन्न कल्पात या नगरीची नावे कनकशृंग, कुशस्थळी, अवंती, पद्मावती, कुमुदवती, अमरावती आणि विशाला याप्रमाणे होती.

या देवीचे प्रमुख पीठ उज्जैन येथे आहे. उज्जैन हे नाव येण्यापूर्वी या नगरीचे नाव अवंतिपुरी असे होते. येथील विक्रमादित्य राजा प्रसिद्ध आहे. शनिमहात्म्यामध्ये त्याचीच कथा आलेली आहे. तेथील भूतपूर्व वेधशाळाप्रमुख रा. आपटे, उज्जैन नाव येण्याचे कारण असे देतात की, जैन संप्रदायाचा आद्य संस्थापक जिन हा होय. याने सुरू केलेली धार्मिक परंपरा तिला जैन असे म्हणतात. या परंपरेत एकूण २४ प्रमुख तीर्थंकर होऊन गेले. त्याला अनुलक्षून जैन शब्दाचा अर्थ क्वचित् २४ तीर्थंकर असा केला जातो. तेव्हा जैन म्हणजे चोवीस आणि उत् म्हणजे उत्तरेकडील, म्हणून २४ अक्षावरील विषुववृत्ताच्या उत्तरेकडील जे स्थान ते उज्जैन असे या शहराला नाव प्राप्त झाले असावे

उज्जैन शहरात रुद्रसागर या नावाचा तलाव असून त्याच्या काठी हे मंदिर आहे. सुमारे वीस पायऱ्या चढून वर गेल्यावर प्रवेश दरवाजातून मंदिराच्या परिसरात जाता येते. प्रवेशद्वाराच्या बाजूला सुमारे वीस फूट उंचीचा भिंतीचा कोट दृष्टीस पडतो. सभामंडपात सुमारे दोन भव्य दीपमाळा असून नवरात्र उत्सवामध्ये त्यावर सहस्त्रावधि दिवे पाजळले जातात. पुढे गेल्यावर हरसिद्धीच्या मंदिराप्रत पोहोचता येते. गाभाऱ्यात श्री यंत्राची पूजा केली जाते. या ठिकाणी सतीचा केहुनी उर्फ कूर्पर (कोपर) हा भाग पडला, म्हणून याला एक शक्ति-पीठ मानले आहे. पीठनिर्णयाप्रमाणे येथील देवीचे नाव मंगला अथवा मंगलचंडी असे असावयास पाहिजे, पण ते तसे नाही. त्याचप्रमाणे येथील भैरवाचे नावही कपिलेश्वर नाही. यामुळे आनंदमंगलाचा पाठ कोणी मात्र मानतात आणि हे शक्ति पीठ कोमाय उर्फ उजानी (जि. बरद्वान) असावे असे म्हणतात. पण सर्व साधारणपणे उज्जैन हेच पीठ मानले जाते.

पूर्वी या शहरी विक्रमादित्य राजा राज्य करीत असून या देवतेचा मोठा भक्त होता. त्याची अशी प्रामाणिक समजूत होती की, संपन्न व उत्तम राज्य-व्यवस्था या देवीच्या कृपेमुळे चाललेली आहे. तो इतका देवीभक्त होता की, दर बारा वर्षांनी तो आपले मस्तक देवीला अर्पण करीत असे. देवी त्याला प्राणदान करी आणि त्याचे मस्तक पुन्हा शिरावर जाऊन बसे. अकरा वेळा त्याचे कापलेले शिर धडावर जाऊन बसले परंतु बाराव्या वेळी मात्र त्याचे शिर त्याला परत मिळाले नाही आणि त्याचे अवतारकार्य संपले. या अलौकिक कथेची स्मृति म्हणून गाभाऱ्यातील एका कोपऱ्यात अगर बाहेरील बाजूस शेंदूर फासून रंगविलेले पाषाणाचे अकरा मुंडके दिसतात. दुर्दैव हेच की या जगावेगळ्या अलौकिक भक्तिकथेला इतिहासाची जोड मिळालेली नाही. परमार वंशीय राजांची ही कुल-स्वामिनी होय. दशनाम गोसावी हे देवीचे पुजारी आहेत.

(कल्याण, शक्तिअंक १४।६।३६)

या प्रमुख मंदिराव्यतिरिक्त या शहरात चौसष्ट योगिनी मंदिर, नगरकोटी आणि दीड मैल अंतरावर गढकाली ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्याचप्रमाणे पोरबंदर जिल्ह्यात कोनराज भानी या देवतेचे एक मंदिर आहे

सिद्धराज जयसिंह पाटणनरेश याने गुजराथमधील सरस्वती तीर्थाच्या ठिकाणी सहस्र शिवलिंगे आणि १०८ हरसिद्धीची पीठे निर्माण केलेली आहेत. (सरस्वती पुराण, अध्याय १६, पृष्ठ १३६). तसेच सौराष्ट्रात हर्षदमाता नावाचे एक देवीपीठ आहे. ते द्वारकेजवळ एका पर्वतावर आहे. त्या ठिकाणी अशी कथा प्रचलित आहे की, विक्रमादित्य राजाने देवीची आराधना केल्यावर ती प्रसन्न झाली आणि आपल्याबरोबर त्याने तिला उज्जैन येथे नेले. दोन्ही क्षेत्रामधील यंत्रामध्ये मात्र बरेचसे साम्य आढळते. देवी ऐवजी तेथे यंत्राचीच पूजा होते. यामुळे दिवसा देवीचा मुक्काम उज्जैन येथे आणि रात्री या ठिकाणी असतो असे भक्त मानतात. (कल्याण, श्रेत्रअंक १९५७, पृष्ठ २१६)

उज्जैनचा महाकाळ प्रसिद्ध आहे. कारण १२ ज्योतिर्लिंगापैकी तो एक आहे.

बडोदे शहरी मांडवी भागात वडीयाली पोळाच्या नाक्यावर अंबाजीचे एक मंदिर आहे. वास्तविक ही हरसिद्धि देवता असून, तिला अंबाजी हे नाव मिळालेले आहे. उज्जैनचा राजा विक्रमादित्य यांची ही इष्टदेवता आहे, हे आपण वर पाहिलेच आहे. या देवीचा वेताळ हा मदतगार होता. या दोन देवतांच्या साहाय्यानेच विक्रमादित्याने अचाट पराक्रम आणि अनेक परोपकारी कृत्ये केलेली आहेत. त्या राजाचा मृत्यु येथेच झाला. सिंहासनावर हरसिद्धि माता विराजमान असून दोन्ही बाजूंना दुसऱ्या दोन देवता आहेत. चैत्र शुद्ध ५ ला देवीचा पाटोत्सव मोठ्या धूमधडाक्याने होतो. (कल्याण, शक्तिअंक, पृष्ठ ६७१)

विक्रमादित्याचा मृत्यु बडोदे येथे झाला, असा वरील क्षेत्रातील लोकांचा दावा आहे. पण आपण मात्र त्याचा मृत्यु उज्जैन येथील मंदिरात झाला असे वर पाहिले आहे. ही दोन्ही विधाने शक्तिअंकातीलच आहेत. तेव्हा पुराव्या-अभावी सत्य परिस्थिति समजणे फार कठीण आहे.

इंद्रवंशा

होती पुरी उज्जयिनी प्रथीतशी । श्री विक्रमादित्य सदा जना शशी ॥
क्षिप्रातटीं सन्निध ज्योतिर्लिंगाच्या । पादारविंदी हरसिद्धी देविच्या ॥३॥
देवी कुलस्वामिनी राजवंशिचे । राजा पदानिष्ठ सदैव मूर्तिचें ॥
अर्पी शिराते परि येत मागुतें । वंदीत तेशा हरसिद्धि देविते ॥ ४ ॥

(४९) हर्षदमाता

सौराष्ट्रामध्ये वर्तु नदीच्या उत्तर तीरावर, मियानीजवळ गांधवी नावाचे खेडे आहे मूळ द्वारकेपासून हे स्थान साधारणत १० मैल अंतरावर आहे. हे गाव ल्हान ल्हान टेकड्यांचे बनलेले असून यांना 'ककू टेकड्या' असे म्हणतात. ककू हे नाव या टेकड्यांना येण्याचे कारण असे, एकदा शंकर आणि पार्वती यांचे अतिशय कडाक्याचे भांडण झाल्यावर शंकरावर रागावून पार्वती कोंबड्याचे रूप धारण करून या भागात येऊन लपून बसली होती म्हणून या टेकड्यांना ककू हे नाव प्राप्त झाले आहे या टेकड्यावर हर्षदमातेचे देवालय आहे. या मंदिरावरून दूरवरची समुद्रावरची जहाजांची वाहतूक दिसू शकते

या देवतेसंबंधी अशी कथा प्रचलित आहे की, फार पूर्वी हर्षदेवी म्हणजे या टेकड्याच्या मागने जाण्याचे टाळीत असत कारण असे घडले होते की, ज्या काही नावाड्यांनी या टेकड्याच्या मागने जाताना देवीचे मंदिर पाहिले होते तिथा मंदिरापासून ती जहाजे दिसू लागतील अशा समुद्रातील ठिकाणी आली होती, त्या वेळी ती तात्काळ समुद्रात बुडाली होती म्हणून जहाजांच्या संरक्षणार्थ काही नावाडी मंदिरावरून न जाता थोडासा वळसा घेऊनच प्रवास करीत असत परिणामत त्यांना अधिक वेळ लागे पण क्वचित् प्रसंगी सर्वस्व गमावण्याचा धोकाही पत्करावा लागे

ही अट मान्य केली हा हा म्हणता हा वृत्तान्त सगळीकडे पसरला आणि समारंभाची तयारी सुरू झाली साधारणत जितक्या पायऱ्या होत्या त्याहूनही अधिक रेडे जमविण्यात आले. सर्व तयारी पूर्ण झाल्यावर व्यापाऱ्याने देवीला खाली उतरण्याची विनंती केली देवी खाली येण्यास निघाली एकेक पाऊल ती हेतुत च सावकाश टाकीत होती या तिच्या 'आस्ते कदम' चालण्यामुळे जमविलेले सर्व रेडे संपले अधिक होते तेही संपले पण तरीही देवी पायथ्यापर्यंत पोहोचलेली नव्हती व्यापाऱ्याला वाटले की, हा बनाव देवीने मुद्दामच घडवून आणलेला आहे परंतु या बनावामागे भक्ताची कसोटी पाहण्याचाही तिचा हेतु असावा असा त्या व्यापाऱ्याला संशय आला याकरिता त्याने सर्व रेडे संपल्यावर त्याने आपल्या घराण्यातील एक एक माणूस, मुले, मुली, स्त्री याप्रमाणे बळी दिली आणि शेवटी आपले बलीदान करण्याचे योजिले तत्पूर्वी शेवटची विनंती म्हणून देवतेला तो इतकेच म्हणाला, 'भक्ताला वचन देऊनही तू पायथ्यापर्यंत येऊ शकली नाहीस माझ्या घरातील मंडळींचा बळी मी पूर्वीच दिला आहे आणि आता माझाही प्राण तुला अर्पण करतो पण हे झाल्यावर तरी संतुष्ट हो आणि आपले स्थान पायथ्याला घेऊन ये, म्हणजे नावाड्याचा जीव भांड्यात पडेल' इतके बोलून त्याने आपले बलीदान केले

केवळ लोककल्याणार्थ व्यापाऱ्याचा हा निर्धार पाहून देवी संतुष्ट झाली आणि व्यापाऱ्यासह सर्व मंडळींना तिने प्राणदान दिले भाव तेथे देव आहे आणि निर्हेतुक सेवा करणाऱ्यास तो अवतार घेऊन भक्ताचे रक्षण करतो, याची वारंवार प्रचीति येते ती अशाच प्रकरणावरून ! त्यानंतर देवता पायथ्याजवळ निरंतर निवासासाठी राहिली सर्वांनी तिला सुंदर मंदिर बांधून दिले व्यापाऱ्याचा वंश अखंड या भूवरी वाढेल असा देवीने त्याला आशीर्वाद दिला वास्तविक हे महाकालीचे स्वरूप आहे परंतु नावाड्यांचे अपघात टळले, देवी स्वत खाली आली, जगदुशहा व त्याच्या मुलामाणसांना जीवदान मिळाले या सर्व सामूहिक आनंदाने जनता हर्षोल्लसित झाली आणि त्या दिवसापासून देवीला हर्षदमाता म्हणू लागले देवीचा पायथ्याजवळ निवास झाल्यामुळे टेकडीवरील स्थान निस्तेज झाले आणि अपघात होण्याचे संकट कायमचे टळले

(काठेवाड जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४२९)

असे सांगतात की, उज्जैनच्या विक्रमादित्य महाराजांनी या देवतेची उपासना केली होती आणि देवी प्रसन्न झाल्यावर तिला आपल्या राजधानीच्या ठिकाणी नेले होते त्यामुळे या देवतेचे वास्तव्य दिवसा उज्जैन येथे व रात्री या मूळ ठिकाणी असते असे भक्त मानतात येथे मूर्तीपुढे यंत्राची पूजा होते

(कल्याण, क्षेत्रअंक १९५७, पृष्ठ ४१६).

## (५०) हिंगुळा ( १ )

या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी शंकराना पार्वती व गंगा या दोन स्त्रिया होत्या गंगेसह शंकर क्रीडा करण्यासाठी म्हणून वायव्य देशात, ह्या वेळी जंगलात असलेल्या 'वाल्हीक' वनात गेले (म्हणजे पूर्वीचा बाल्हिक देश असावा) लिंग पुराणामध्ये म्हटले आहे की, शंकर रावणाच्या भयाने कैलास सोडून त्या ठिकाणी गेले पण ते कोठे गेले हे मात्र पार्वतीला मुळीच माहित नव्हते पुष्कळ दिवस झाले तरीही ते परत येईनात तेव्हा पार्वतीने त्याचा शोध घेण्याचे ठरविले आणि गुप्त वेशाने फिरत फिरत ती या स्थळी आली तेथे तिला शंकर गंगेसह सापडले या कृत्याच्या स्मरणार्थ तेथे मंदिर बांधले गेले आहे हिंगुळा नदीच्या तीरावर हे देवीचे स्थान आहे म्हणून देवीला हिंगुळा हे नाव आले असावे (कथाकल्पतरु, स्तबक १४)

देवी भागवत स्कंद ७।३९ व ब्रह्मवैवर्त पुराण, कृष्णजन्मखंड ७६।९१ यामध्ये या देवीची माहिती ओझरतेपणे आलेली आहे

ज्या वेळी भारताच्या सीमा काबूल, कंदाहारपर्यंत भिडलेल्या होत्या त्या वेळी हे शक्तिपीठ भारतामध्येच होते, परंतु कालांतराने ऐतिहासिक विभाजने होत गेल्यावर सध्या हे पीठ बलुचिस्तानमध्ये म्हणजे पर्यायाने पाकिस्तानच्या हद्दीत गेले आहे कलात शहराच्या दक्षिणेस सुमारे वीस ते पंचवीस मैल अंतरावर काही टेकड्या 'हरगोनी टेकड्या' म्हणून ओळखल्या जातात, त्यामध्ये हिंगोळी नदीचा उगम झालेला आहे दक्षिणेकडे सुमारे ३०० मैल प्रवाह वाहात गेल्यावर कराची शहराच्या वायव्येस सुमार १०० मैल अंतरावर स्तेन मिआनी या उप सागराला ही नदी मिळते मार्गात मक्रान टेकड्यामधून प्रवाह जात असताना या देवीचे स्थान आहे या स्थानाची उंची अदाजे १३०० फूट असून पीठाप्रत पोहोचण्याचा मार्ग अतिशय अवघड व दऱ्याखोऱ्यामधून जाणारा आहे

येथपर्यंत येतात. देवालयाच्या बाजूची उंच शिखरे साहाजिकच पर्वतावरील रम्य वनश्रीने वेष्टिलेली आहेत. या ठिकाणच्या मंदिराबाबत कलाशिल्प व सौंदर्य यांची अपेक्षा करणेच चूक ठरेल. कारण शिल्पकामाचे कारागीर व साहित्य नेणे हेच मुळात कठीण. त्यामुळे देवीची मूर्ति एका खडकाच्या भव्य कपारीत बसविलेली आहे. हिंदुधर्मपद्धतीचे दोन लहानसे घुमट येथे बांधलेले आहेत. देवीच्या समोर व तिच्या दोन्ही बाजूंना कठडा बांधलेला आहे. शेंदूरचर्चित अशा काही काठ्या देवीजवळ तयार ठेवण्यात येतात आणि क्वचित प्रसंगी प्रवासी त्यांचा उपयोगही करतात. काठीच्या मदतीशिवाय मार्गावरून चालणे कठीण जाते. कपारीची उंची विशेष नाही. त्यामुळे पुजारी अगर यात्रेकरू यांना मान वाकवूनच आत प्रवेश करावा लागतो. इतर ठिकाणच्या या देवतेच्या मूर्ति पाहता येथेही मूर्ति अष्टभुजा महिषासुरमर्दिनी देवीची असावी, असे अनुमान करता येते.

या ठिकाणी एका गोष्टीबाबत थोडेसे अधिक लिहितो. भारतामध्ये अशी बरीचशी काही पवित्र स्थाने आहेत (उदाहरणार्थ, गाणगापूर येथील दत्ताच्या पादुका) की, ज्या ठिकाणी मान वाकवून किंबहुना सरपटत जाऊनच गाभाऱ्यात प्रवेश करावा लागतो. हे असे का याबद्दलची काही कारणे संभवतात. ती ही अशी —(अ) सद्‌गुणी आणि शुद्ध चारित्र्याच्या माणसानेच आत प्रवेश करावा, (आ) परशत्रूपासून देवतांचे रक्षण व्हावे, (इ) अशा बिकट मार्गातून आत जाण्याचे धाडस तो खरीखुरी निस्सीम भक्ति करणाराच करील, इतर बाहेरूनच दर्शन घेऊन जातील, त्यायोगे मंदिराचे पावित्र्य जतन करून ठेवता येईल, हा हेतू असावा. नाशिक येथील पंचवटीतील सीतागुंफेत अशाच लहान दरवाजातून प्रवेश होतो. विंध्यप्रदेशात चुनार येथील दुर्गादेवीच्या मंदिरात एका लहानशा खिडकीतूनच प्रवेश करावा लागतो. या भावनेवर आधारलेली इतर धर्मीयांची ही उदाहरणे पहा—

समरकंद येथे कुराणाची एक पोथी टेबलावर ठेवलेली आहे. जो कोणी यवन या टेबलाच्या खालून, टेबलाला धक्का न लावता पलीकडे जाऊ शकेल, त्याच्या पाठीचे सर्व रोग बरे होतात. गुर्जरबंधूंचा महिलावर्ग पुत्रप्राप्ति व्हावी अशी मनीषा असल्यास, एखादा जैन साधु प्राणांतिक उपोषणाने मरण पावल्यास त्याच्या अंतयात्रेच्या वेळी त्याच्या ताटीखालून सरपटत जातात. बडोदे शहरी एका यवन फकीराच्या नावाची एक भोके असलेली फरशी आहे. त्याच्या छिद्रातून कोणीही भक्त सहज जाऊ शकतो, पण चोरी करणारा इसम जाऊ शकत नाही. जपानमध्ये नारा या प्रसिद्ध शहरी एक बुद्ध मंदिर असून तेथे मंदिराच्या भव्य खांबामध्ये एक वर्तुळाकार भोक आहे. त्यामधून आरपार जाणारा मनुष्य पुण्यवान प्राणी समजला जातो. (जेम्स, धर्मकोश).

ऋग्वेद काळात अपाला नावाच्या एका स्त्रीने आपल्या कमरेखालील भाग व्याधिमुक्त करण्यासाठी इंद्रदेवाची प्रार्थना केली, तेव्हा त्याने तिचे सर्व शरीर आपल्या रथाच्या चाकातून दोनतीन वेळा बाहेर काढले, तेव्हा ती स्त्री संपूर्ण रोगमुक्त झाली. (ऋग्वेद, ८ मंडळ)

या देवीच्या स्थानाजवळच एक गणपतीचे मंदिर आहे. याबाबतची कथा अशी आहे. एकदा पांडवानी राजसूय यज्ञ करण्याचे योजिले. देवता स्थापन झाल्यावर यज्ञाचा अश्व सर्व राजाकडून विजयपद घेण्यासाठी सोडला गेला. तेव्हा तो फिरत फिरत या स्थानाजवळून जात असताना गणपतीने त्याला अडविले आणि बांधून टाकले. या अश्वाचे रक्षण करण्यासाठी प्रत्यक्ष अर्जुन त्याच्याबरोबर होता. गणपतीने आपला घोडा का अडविला याचे कारण अप्रत्यक्षरीत्या शोधावे म्हणून त्याने देवीला विचारले असता तिने सांगितले की, 'राजसूय यज्ञाच्या आरंभी पांडवानी गणपति पूजन केलेले नाही ते करण्याचे तसेच राहून गेले आहे. त्यामुळे गणपति चिडला असल्याने त्याने घोड्याला अडवून ठेवले आहे.' द्रौपदी देवीच्या मध्यस्थीने आणि अर्जुनाने गणेशाची विनाशर्त क्षमा मागितल्यावर त्या यज्ञाश्वाची सुटका झाली आणि त्याचा प्रवास पुढे चालू झाला

(कथाकल्पतरु, स्तबक १४)

ब्रिटिश रियासतीच्या वेळी जेव्हा भारताने विभाजन झालेले नव्हते तेव्हा कराची शहरापासून आपापल्या सहकार्यांने यात्रेकरू टोळीटोळीने या क्षेत्राप्रत गात गात मियानी या ब्रिटिश राज्यात असलेल्या गढरी यात्राकर वसूल केला जाई तेथे जाऊन आलेल्या भक्तांनी ज्या गोष्टी पाहिल्या त्यांची नोंद झालेली आहे त्यापैकी हे काही अनुभव पाहा—

(१) हाजी अब्दुल गनी या नावाचा यात्रेकरू म्हणतो, 'मंदिराच्या बाजूला एक विहीर आहे त्यामधील पाणी केव्हा केव्हा उसळी मारून वर येते नदीच्या पावसाळी पाण्याप्रमाणे ते किंचित् गढूळसे दिसते पाणी जेव्हा उसळी मारी तेव्हा आवाज ऐकू येई या चमत्कारामुळे मानित हिन्दु यात्रिक या विहिरीला फुले, सुपारी, नारळ, लवंग, वेलदोडे, बदाम इत्यादि अर्पण करीत ज्यावेळी पाण्याने लवकर उसळी मारली नाही तर त्याची प्रार्थना करीत, 'गंगामाते, लवकर वर ये, आम्हाला दर्शन दे आणि आमचे पापक्षालन कर' अशी प्रार्थना केल्यावर पाण्याने उसळी मारली म्हणजे पुन्हा फुला नारळांनी पूजा करीत नंतर त्या वस्तु वर काढून घेत आणि प्रसाद म्हणून भक्षण करीत

त्या वेळी विहिरीच्या पाण्यातून एक तलवार वर आली आणि तोच देवीने दिलेला प्रसाद असे समजून उमप्रभूने ती घेतली. या कृपाप्रसादामुळे त्याने दक्षिण भारतावरही स्वारी करून आपली सत्ता गाजवून नेली. तो प्रसाद मिळाल्यावर उमप्रभु सर्वत्र विजयीच होत गेला.

या देवतेचे स्थान जरी पोथीपुराणामध्ये अंतर्भूत होते, तरी प्रत्यक्षात ते अनेक दिवस अज्ञातच होते. ते शोधून काढण्याची महत्त्वाची कामगिरी एका धाडसी ब्रिटिश प्रवाशाने केली. नदीच्या मुखापासून काठाकाठाने तो वर मस्कत नदीच्या उगमाकडे जात असताना मार्गात त्याला या क्षेत्राचा शोध मकान टेकड्यामध्ये लागला. त्या ठिकाणी अनेक दगडावर त्याला देवीला बळी दिलेल्या पशूचे रक्त सांडलेले दिसले आणि त्या अनुरोधाने त्याला हे स्थान निश्चित करता आले. यासंबंधीची सविस्तर हकीकत जेम्स धर्मकोशात ( भाग ६, पृष्ठ ७१८ ) यात दिलेली आहे. जिज्ञासूनी ती अथपासून इतीपर्यंत अवश्य वाचावी.

कै. गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी त्यांच्या दर्पण मासिकात या देवीसंबंधी माहिती लिहिताना म्हणतात की, हिंगुळा पुराणात असे वर्णन आहे की, लंकेहून रावणावर विजय मिळवून आल्यावर श्रीरामचंद्रप्रभु या देवीच्या दर्शनाला गेलेले होते. प्रथम वेळी त्यांचे देवीच्या दूतांबरोबर युद्ध झाले आणि त्यात त्यांना माघार घ्यावी लागली. नंतर श्रीरामांनी देवीची मनोभावे प्रार्थना केली आणि दर्शन देण्याची विनंती केल्यावरच, तिच्या कृपाप्रसादाने त्यांना देवीचे दर्शन घडू शकले. श्रीरामचंद्र ज्या मार्गाने या क्षेत्राप्रत गेले, त्या मार्गावर अनेक तीर्थे उत्पन्न झाली आणि अव्याहत त्या त्या ठिकाणी यात्रेकरू आदरभाव अर्पण करीत असतात. प्रथम कराची शहराजवळ रामबाग, पुढे गोरख तलाव व तुंग भैरव ही स्थाने. हब नदी उतरल्यावर अगम्य आणि देवीच्या दूतांनी श्रीरामाचा पराभव केला ते क्षेत्र भैरूमलख, भवानीची विहीर, हनुमंताची राई या ठिकाणावरून पुढे गेले म्हणजे लक्ष्मणाने बाण मारून सीतामाईसाठी उत्पन्न केलेले पाण्याचे ठिकाण लखभूरद आहे. नंतर सीतेचे कुवे तीर्थ असून, राजा गोपीचंद यांचे देऊळ आढळते. यालाच मुसलमान लोक ' पीरकब्र ' म्हणतात. तेथून काही अंतरावर सोमयानी क्षेत्र असून नंतर गुरुचेल्याचा रण हे क्षेत्र आहे. याचे महत्त्व वर्णन करताना सांगितले जाते की, मार्गावर पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने, गुरु शिष्य दर्शनाला जात असता, शिष्याने गुरुजवळ पाणी मागितले, पण गुरूने ते त्याला न दिल्याने, त्याचा अंत झाला. अर्थात् गुरूचे हे वर्तन देवीला आवडले नाही आणि तिने त्याच्या तुमडीतील सर्व पाणी शोषून घेतले. यामुळे गुरूचाही अंत झाला. वास्तव हे नाव पडलेले आहे. पुढे मार्गावर सात कुंडे लागतात, त्यांना रामकूप म्हणतात.

येथील महत्त्व असे की, नारळ ठेवून देवीला प्रार्थना केली म्हणजेच कुंडातून प्रवाह बाहेर येतो आणि भक्ताला पाणी मिळते एरव्ही प्रवाह बाहेर सतत वाहत नाही शतद्वीपाजवळ मस्तान नदीच्या काठी अकरा कूप आहेत असे देवीचा पुजारी वर्ग सांगतो

कराची शहराच्या वायव्य दिशेला सुमारे ५० मैलावर या देवीचे क्षेत्र पहाडावर आहे रेतीची मैदाने व डोंगराची शिखरे यातून मार्ग काढावा लागतो वाटेत पाणी क्वचितच सापडते आणि मिळेल तेही मचूळ असते रस्त्यातून कोठे कोठे गधकाचे खडकही दिसतात. मार्ग दुर्घट असल्याने देवीचे गोसावी पुजारी भक्ताना नेण्यासाठी कराची व इतर शहरापर्यंत येतात त्यानाच आघवे म्हणतात ठट्टा या शहरी एका गृहस्थाला बादशाही सनद असून त्याला काही करभार देऊन आघवे येऊन जातात. या गृहस्थाच्या ठिकाणाला हिंदूचा पीर असे नामाभिधान आहे.

देवीचे मंदिर लहानसेच खडकात कोरलेले आहे. इतर क्षेत्री मंदिरावर जय विजयाच्या मूर्ति मांडलेल्या असतात पण या पहाडी देवतेने आपले जय विजय म्हणून दोन पर्वतशिखरेच निवडली आहेत आणि त्याना जय विजय संबोधतात या मार्गावर सात दरवाजेही आहेत, पण तो मार्ग अतिशय कष्टदायक असल्याने, तिकडे सहसा कोणी जात नाही मंदिराच्या आसमंतात सूर्य, चंद्र, ग्रह, महिषासुर याची स्थाने आहेत या ठिकाणी आघवे सागतील त्याप्रमाणे क्षौर मुंडणादि धार्मिक विधि करावा लागतो भारतीय शास्त्रकारानी ८४ लक्ष योनी मानलेल्या असून त्या तरुन जाण्यासाठी मानव-देह दिलेला आहे त्याचे प्रतीक म्हणून या क्षेत्री चवऱ्याऐंशी पाषाण चढून पार व्हावे लागते येथील सर्व यात्रा झाल्यावर ' अतीत ' कुंडात स्नानविधि झाल्यावरच यात्रा पूर्ण होते

या देवीला हिंगळजामाता, कालीमाता, महामाया, नानीबिबी अशी अनेक नावे आहेत भाटिया आणि वाणिया लोकांची काही वस्तीही आहे

(दर्पण, मे १८४०, पृ ४८-५१)

निवारण्यासाठी स्वतः श्रीरामचंद्र आलेले असावेत आणि म्हणून या लहान लहान तीर्थांची निर्मिती झाली असावी.

ही देवता सिंधु संस्कृतीमधील मानली गेली आहे. याचा अर्थ आर्यांच्या पूर्वीपासूनच तिची स्थापना झालेली असावी आणि आर्यांनी शक्तिपीठामध्ये तिचा समावेश केला असावा. सिंधु संस्कृति जसजशी दक्षिणेकडे सरकली, तसतशी दक्षिणेकडे या देवतेची मंदिरे दिसू लागली आणि ती पश्चिम किनाऱ्यावर पसरली. सौराष्ट्रातील आशापुरी देवीचे भक्त या देवीचेही भक्त आहेत. भावसार शिंपी समाज, मध्यप्रदेशातील जोगी समाज, पंचमहालकडील पेटल्या समाज, गुजराथमधील रावळ घराणी, जोधपूरकडील खडी ही गुराखी जमात, निमाड-कडील जादुगार जमात आणि काही वन्य जमाती या देवीच्या उपासक आहेत. बलुचिस्तानमधील यवन समाज या देवीला 'नानी बिबी' या नावाने ओळखतो. कुशान वंशाने या देवीचे चित्र आपल्या नाण्यावर घेतले होते. सिरिया, पर्शियाकडील नानिआदेवी व बॅबिलोनमधील नना देवी, ही नावे म्हणजे हिंगुळा देवीच्या नावाचाच अपभ्रंश असावा असे दिसते. सनपूर्व सहाव्या शतकापासून या देवीची उपासना तिकडे चालू होती. भारतात शक व कुशाण राजवंश या देवीचे उपासक होते. चाफळ खोऱ्यात निनाई नावाची क्षुद्र देवता आढळते, ती हीच असावी. ( जेम्स, धर्मकोश ).

वसंततिलक

श्री सांब रावण भये तरि एकदांही ।
गंगेसहीत लपला निबिडा वनींही ॥
वांच्छीत पार्वति तदा शिवरूप भेट ।
शोधाहि शोध करितां शिवभेटि होत ॥ १ ॥
वायव्य देशिं वन वाळहिका असेची ।
तें आद्यरूप तव हिंगुळजे तिथेंची ॥
यज्ञाश्व तो फिरत जाय वनीं क्रमानें ।
तूं सोडवी अडविता गण नायकानें ॥ २ ॥
वायव्य देशिं बलुची जनस्थान आहे ।
हिंगोळ नाम सरिता अजि वाहताहे ॥
तेथें प्रवाह तटिं हिंग्लज देवी पाहे ।
नानीबिबी म्हणुनि यावनि जाणती हे ॥ ३ ॥

## (५१) हिंगुळा (२)

वर आपण पाहिलेच आहे की, सिंधु संस्कृति दक्षिणेकडे सरकल्यावर त्या संस्कृतीची देवताही त्या भागात आली आणि अनेक ठिकाणी तिची मंदिरे उभारली गेली. त्यापैकी दोन प्रमुख स्थानांचा उल्लेख या ठिकाणी करण्याचे योजिले आहे. कारण त्याला पूर्व इतिहास आहे.

( १ ) नवनाथ पोथी अध्याय ४ मध्ये असे वर्णन आहे, की नाथ संप्रदायी मत्स्येंद्रनाथ यांनी रामेश्वराला भेट दिली. येथे त्यांनी साक्षात् हनुमानाचे दर्शन घेतले, त्याच्याबरोबर सख्य जोडले आणि प्रचार करीत करीत दक्षिण किनाऱ्यावरून उत्तरेकडे प्रवास करीत असताना एका निबिड अरण्यामध्ये आले. त्या ठिकाणी त्यांना हिंगुळा देवीचे स्थान आढळले. या स्थानाच्या रक्षणासाठी अनेक शाकिणी, डाकिणी पहारा यावर होत्याच. त्यांनी नाथाची योग्यता ओळखली नाही आणि त्यांना देवीकडे जाऊ देण्यास विरोध केला. त्यानंतर दोघामध्ये युद्ध झाले आणि नाथांनी त्या स्त्रीवीरांना कोणतीहि जखम न करता केवळ आपल्या अस्त्रविद्येने विवस्त्र करून पिटाळून लावले. पराजित व फजित झालेले हे पहारेकरी पळतच देवीकडे गेले आणि तिला झालेला वृत्तांत कथन केला. देवीला हा अपमान सहन झाला नाही आणि ती स्वतः युद्धास निघाली. देवी व नाथ या दोघांचे तेथे घनघोर युद्ध चालू असता शंकर त्या ठिकाणी प्रकट झाले आणि त्यांनी परस्परांची ओळख करून दिली. दोन्ही पक्ष शंकरांचेच सेवेकरी, त्यांनी आपसात युद्ध करणे बरे नव्हे म्हणून शंकरांनी सख्य निर्माण केला. या वेळी हिंगुळादेवीने मत्स्येंद्रनाथांना स्पर्शशक्ति हे दिव्य साधन दिले. हे स्थान कोणते असावे याबाबतची निश्चित अशी माहिती उपलब्ध नाही पण पोथीमध्ये या युद्धानंतर नाथांनी अडूळ ( रत्नागिरी ) या ठिकाणी भेट दिली असा उल्लेख आहे. त्यामुळे असे म्हणता येते की, हे स्थान गोव्याच्या दक्षिणेस कोठेतरी जंगलात असावे.

( २ ) चौल ( कुलाबा ) या ठिकाणी हिंगुळा देवीचे एक स्थान आहे. चौल हे अतिशय प्राचीन स्थान आहे. याला पूर्वी चंपावती अथवा रेवतीका क्षेत्र म्हणत असत. गावाची नावे परिस्थित्यनुरूप कशी बदलत जातात याचे चौल हे उत्तम उदाहरण आहे. रेवतीका क्षेत्र असे नाव येण्याचे कारण असे की, बलरामाची पत्नी रेवती हिला हे गाव फार आवडले. त्यानंतर कित्येक दिवस ती या ठिकाणी राहिली. म्हणून या गावाला रेवतीका क्षेत्र हे नाव पडले सन १५० साली ग्रीक प्रवासी टॉलेमी याने या गावाला भेट दिली होती, त्या वेळी त्याने याचे नाव सिमुला तथा टिमुळा असे दिले आहे पण त्याच वेळी

केनरी गुहेमध्ये याचे नाव चिमुला असे लिहिले गेले आहे. सन ५२५ मध्ये ज्या वेळी ग्रीक व्यापारी भारताबरोबर व्यापार करीत असत, त्या वेळी ते या गावाला 'सिमोर' असे म्हणत, पुढे चिनी व्यापारी आल्यावर सन ६४२ साली याला चिमोला असे संबोधतात. अकराव्या शतकात अरब व्यापारी याला सैमूर अगर जैमूर असे म्हणत. या इतिहासावरून असे निश्चित म्हणता येते की, भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार या बंदरातून चालत असे आणि हा व्यापार अनेक देशांबरोबर निगडीत होता. बाराव्या शतकात शिलाहार घराणे या ठिकाणी राज्यव्यवस्था पाहू लागले. शिलाहार घराण्याच्या दुसऱ्या दोन शाखा ठाणे ( उत्तर कोकण ) आणि कऱ्हाड या ठिकाणी होत्या. त्याच वेळी या गावाला चेमुली हे नाव आले. सन १४७० साली एक रशियन प्रवासी ( निकितीन ) भारतामध्ये आला असताना या शहराला तो चिविल असे म्हणतो, आणि त्यानंतर मात्र चौल हेच नाव कायम राहिले आहे.

( कुलाबा जिल्हा गॅझेट, पृष्ठ २७२ ).

शिलाहार वंशातील एका राजाने या गावाला प्रतिकाशी बनविण्याचे ठरविले आणि दृष्टांताप्रमाणे हे काम एका रात्रीत पुरे करण्याचे योजिले. परंतु ब्रह्मदेवाला ही महत्त्वाकांक्षी योजना मान्य झाली नाही. त्याने हिंगुळा देवीला कोंबड्याचे रूप देऊन उजाडण्याच्या पूर्वी बराच काळ आधी आरविण्यास लावले. तरीही तेवढ्या कालावधीत ३६० देवालये बांधून पूर्ण झालेली होती. तसेच मंदिरापुढे तलावही तयार झाले होते. कालांतराने जरी बरीच स्थाने नष्ट झाली असली तरी अद्याप ६० मंदिरे सुस्थितीत असल्याचे समजते. कोणाला हा कथाभाग जरी अतिरंजित वाटला, तरी त्या राजाचे कर्तृत्व ध्यानी येण्यास पुरेसा आहे.

दहाव्या शतकात किंवा किंचित त्यापूर्वीही व्यापारानिमित्त गुजराथमधून काही भंडसाळी ज्ञातीमधील घराणी या स्थळी आली. कारण परदेशाबरोबर याच बंदरातून व्यापार चालत असे. साहजिकच हा समाज आर्थिक दृष्ट्या सु-स्थितीत असल्याने आणि हिंगुळा ही त्यांची कुलदेवता असल्याने त्यांनी येथे दत्त टेकाड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात देवीचे मंदिर बांधले. सुदैवाने अद्यापही ते सुस्थितीत आहे. शिलाहाराच्या पूर्वी हंसध्वज आणि मुखध्वज राजांची हीच राजधानी होती. पंधराव्या शतकात पोर्तुगीजांनी भारतात आपले पाऊल ठेवल्यावर आणि या भागाचा ताबा मिळविल्यावर त्यांनी येथील अनेक मंदिरांची मोडतोड केली. त्या मोडतोडीची झळ या मंदिरालाही लागली. पण पुढे आंग्रे घराण्याची सत्ता प्रस्थापित झाल्यावर त्यांनी या देवाल्याची डागडुजी

केली हे मंदिर उंचावर असल्याने सुमारे ५०० पायऱ्या चढून वर जावे लागते मंदिर व आसपासची वनश्री रमणीय असल्याने प्रेक्षणीय स्थळात याची गणना होते देवीची मूर्ति अष्टभुजा महिषासुरमर्दिनीचीच आहे. कोंबडा ओरडताना तोंड वर करतो, त्याप्रमाणे मुख ऊर्ध्व दिशेकडे आहे

(श्री भगवत रामकृष्ण, नवशक्ति, मुंबई)

प्रतिकाशी निर्माण करण्याची प्रतिज्ञा ज्याप्रमाणे या ठिकाणच्या राजाने केली, त्याच संदर्भात दुसऱ्या एका ठिकाणचा वृत्तांत पाहाणे योग्य होईल. शिवणी (वऱ्हाड) जिल्ह्यात अष्टा नावाचे एक गाव आहे त्या क्षेत्री तीन हेमाडपंती मंदिरे उभी आहेत या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणून असे सांगता येईल की, मंदिराच्या दगडाचे सांधे लोखंडाच्या पट्ट्यांनी एकमेकात जखडून टाकलेले आहेत त्या भागात हेमाडपंताविषयी असलेली समजूत मात्र वरीच अतिरंजित दिसते ते असे समजतात की, हेमाडपंत हा एक बडा जादुगार होता त्याची माता जन्मत च वारली असल्याने आणि मातृसुखाला तो पारखा झाला असल्याने त्याला नेहमी असे वाटे की, पूर्वजन्मी आपण फार पापे केली असली पाहिजेत तेव्हा या पापाचे क्षालन करण्याच्या हेतूने आणि हा कलंक धुऊन टाकण्याच्या दृष्टीने त्याने एका रात्रीत २५००० मंदिरे बांधण्याचा अतिशय धाडसी विचार योजला पण हे काम दैवी मदतीशिवाय होणे अशक्य वाटल्याने त्याने सिलोनच्या राजाची मदत घेण्याचे ठरविले, कारण मर्त्यलोकावर त्याचे वजन होते या विचाराने तो सिलोनला गेला पण त्याच्या दुर्दैवाने सिलोनचा राजा रोगाधीन असल्याचे त्याला दिसून आले तेव्हा आपल्याजवळील मंत्रजाळ या विद्येने त्याने राजाला रोगमुक्त केले आणि आपला मंदिरे उभारण्याचा हेतूही त्याला निवेदन केला केलेल्या उपकाराची फेड करण्याच्या विचाराने राजाने आपले वजन खर्च करून सूर्याला काही काळ आपली गति बंद करण्यास विनविले त्यायोगे हेमाडपंताला भरपूर वेळ मिळून तो आपली प्रतिज्ञा पूर्ण करू शकेल असे त्याने सूर्याला सांगितले मित्रावरील प्रेमास्तव सूर्याने ही गोष्ट कबूल केली[1] या रीतीने हेमाडपंताने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आणि संकल्पाप्रमाणे २५००० मंदिरे बांधून काढली अर्थात् कालांतराने ती सर्व मंदिरे पडली आणि आता त्यांपैकी फक्त तीनच सुस्थितीत आहेत

(शिवणी जिल्हा गॅझेट, पृष्ठ १९८)

---

१ टीप — एका ऋषीला शाप मिळाला की, तो सूर्योदयापूर्वी मरण पावेल तेव्हा ऋषीपत्नीने सूर्याची गति रोखली होती, अशी एक पौराणिक कथा आहे

या ठिकाणी हेमाडपंताविषयी असलेले अज्ञान तर ठळकपणे प्रत्ययास येतेच, पण सूर्याची गति बंद करायला लावणारा हा प्रतापी राजा कोण या-बद्दलही थोडेसे आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. तेव्हा या कथेमागे काही रूपक असावे असे निश्चितपणे म्हणता येते. पण ते रूपक काय असावे याचा मात्र उलगडा मला झाला नाही व कोणी करूनही दिला नाही.

सोलापूर शहरी मास्तर पेठेत एक महिषासुरमर्दिनीचे मंदिर आहे आणि मूर्तीही तीच आहे. पण त्या देवीचे नाव मात्र हिंगुळांबिका असे बोलले जाते. हिंगुळा येथील अंबिका असा त्याचा अर्थ असावा. नेमचंद क्षीरसागर या भावसार पंथीय भक्ताने शके १८२२ साली हे मंदिर बांधले व मूर्ति स्थापन केली. मूळ हिंगुळा क्षेत्राचे भावसार शिंपी समाज हा भक्त असल्याने, त्याने हिंगुळा नाव देणे स्वाभाविकच आहे. तुळजापुरी अरण्यबुवाचा मठ हा भावसागर पंथीयांच्या ताब्यात आहे आणि त्यामध्ये हिंगुळा देवी अधिष्ठित आहे. तेव्हा नाव कुळस्वामिनीचे पण रूप तुळजापूर भवानीचे, असा योग आल्याने हे जोडनाव प्राप्त झाले असावे. येथील देवीचा वार्षिक उत्सव नवरात्रामध्ये साजरा होतो आणि १२ बकरे बळी दिले जातात. वरीलप्रमाणे हिंगुळा देवीच्या मूर्ति अष्टभुजा महिषासुर-मर्दिनी स्वरूप असतात, असा निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय नाही.

चौल या गावी हिंगुळा मंदिरांच्या व्यतिरिक्त रामेश्वर, दत्तात्रय, सोमेश्वर, महालक्ष्मी इत्यादि मंदिरे आहेत. या भागात अनेक ठिकाणी बुद्धगुहा दिसून येतात. माणगावाजवळ कुडा या ठिकाणी २६ व पाली येथे २८ लेणी आहेत.
(कुलाबा जिल्हा गॅझेट, पृष्ठे ३०९, ३३२, ४४६)

हिंगुळा देवीचे वर्णन जरी विवरणामध्ये बरेच आले असले तरी तिच्या मूळ स्वरूपासंबंधी काही लिहिलेले नाही. मूळ ठिकाणी मूर्ति आहे एवढेच वर्णन आहे. तेव्हा या देवतेची मूर्ति कोणत्या स्वरूपाची असावी, हे निश्चित करण्यासाठी या ग्रंथातील इतर विवेचनाकडे पाहावे लागेल. सोलापूर येथील हिंगुळांबिका देवीच्या मूर्तीचे वर्णन आहे. तेथे ती अष्टभुजा आहे हे लेखकाने समक्षच पाहिलेले आहे. चांदला-परमेश्वरी देवीचे वर्णन वाचताना असे दिसून येते की, नारायणमुनींनी हिंगुळा देवीच्या मूळ ठिकाणी तपश्चर्या केली (त्या ठिकाणी काश्मीर प्रांती म्हटले आहे पण ते बरोबर नसावे) आणि तेथून देवता त्यांच्याबरोबर गेली. भीमा–कागिणा संगमावर तिचे जे स्वरूप नंतर बसविले आहे, तेही अष्टभुजा आहे. तसेच स्वरूप सन्नती (चितापूर) या ठिकाणी आहे. तेही चतुर्भुजा पण सिंहवाहिनी आहे. त्यावरून असे अनुमान करता येते की, मूळ क्षेत्रीची मूर्ति सिंहवाहिनी चतुर्भुजा अथवा अष्टभुजा असावी. तसेच पार्वतीने

हिंगुळा देवीचे स्वरूपात शंकराना शोधून काढले. याचा अर्थही असाच घ्यावयाचा पाहिजे की, हिंगुळा नदीच्या उगमाजवळ तिची मूर्ति स्थापन झाली म्हणून पार्वतीच्या त्या स्वरूपाला हिंगुळा हे नाव प्राप्त झाले.

शार्दूलविक्रीडित

तेजः पुंज सुमित्र वायुसुतही जोडोनि मित्रापरी ।
सेतूबंध त्यजोनि उत्तरादिशें मच्छिंद्र मार्गा धरी ॥
हिंगूळा घनदाट काननिं रिघे मार्गीं जई चालतां ।
देवीरक्षक द्वारपाल लढती नाथांसवें देखतां ॥ १ ॥

पंचचामर

विरोध दाविवां तयांसि नाथ कोपतो अती ।
रणांत अष्टभैरवादि वीर लोळवी किती ॥
फजित वीर होऊनि रणांतुनी पळे घरीं ।
सदां चढाई डाकिनी अणीक शांखिणी करी ॥
कशास युद्ध स्त्रीसवें ? विचार फक्त तो करी ।
सलज्ज नारिदूत होत, देत बातमी खरी ॥ २ ॥

वसंततिलक

ऐकोनि वृत्त उमजे मनिं हिंगुळा ही ।
मच्छिंद्रनाथ समरीं लढतो स्वयें ही ॥
देवी स्वयें प्रकटतां चरणां धरीतो ।
घे स्पर्शशक्ति वर मागुनि आपणा तो ॥ ३ ॥

आले गुर्जर भंडसालि कुलही व्यापारवाढीस्तव ।
संपत्ती जमवोनिही उभविती तें हिंगुळा मंदिर ॥
आहे संप्रति साठ मंदिर उभें ह्या चौल ग्रामीं महा ।
ऐशीं जाऊनि देवि-पाद-कमळा घाला नमस्कार हा ॥ ५ ॥

# योगिनी आणि मातृका

मायभूमीवर झालेले परकीय आक्रमण एकटा सेनापती परतवून लावू शकत नाही त्यासाठी संपूर्ण सुसज्ज सैन्याची आवश्यकता असते, परकीय अंमलाखाली पिचत पडलेला देश जेव्हा एखादा नेता मुक्त करू इच्छितो, तेव्हा त्याला जनसमुदायाचे संपूर्ण पाठबळ अवश्य असते. ही जी परिस्थिति मानवी राज्यात दिसून येते, तद्वतच ती देवयोनीमध्येही अस्तित्वात आहे. शिवाचे रक्षण आणि कार्य त्याचे रुद्रगण करतात. इंद्राचे देवगण म्हणजेच त्याचे सैनिक होत. पिशाच्चयोनीतही हाच प्रकार आढळतो वेताळ अगर शाकिणी यांच्यामागे त्यांचा सैनिकी ताडा असतो. दत्तभक्तांचा असा अनुभव आहे की, नरसोबाची वाडी अगर गाणगापूर या क्षेत्री एखाद्याने अपकृत्य केले, कुविचारी आचरण केले तर दत्तात्रयाच्या योगिनी त्याचा पाठपुरावा करतात आणि अशी अपकृत्ये करणाऱ्या व्यक्तीला कडक शिक्षा देतात, त्याच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी आणतात. याचप्रमाणे आदिमाया पार्वतीचे जे सैन्य आहे त्याला योगिनी हे नाव आहे. हे सैन्य ती आपल्या मन सामर्थ्याने, योगबलाने पंचभौतिक परिमाणुशक्ति आणि चैतन्यशक्ति यांना एकत्रित करून उत्पन्न करू शकते आणि त्याचा आपल्या इच्छेनुसार संक्षेपही करू शकते.

आदिमायेला दुष्ट दैत्यांच्या संहाराच्या वेळी अनेक वेळा अनेक रूपे घ्यावी लागली आणि त्या त्या वेळी तिला आपल्या खास विश्वासू गणाचीही गरज भासली या ग्रंथातील देवतांचा इतिहास वाचताना आपण पाहिलेच आहे की, युद्ध चालू झाल्यानंतर अनेक देवतांची निर्मिति जरूरीप्रमाणे झालेली आहे. योगसामर्थ्याने (चैतन्यशक्तीमधून) त्यांची उत्पत्ति झाली म्हणून त्यांना योगिनी हे नाव आले असावे. मानवदेहातील योगसामर्थ्याच्या जोरावर हवेतील परमाणुशक्तीवरही ताबा मिळवू शकतो, त्यांच्या करवी आपली कामे करून घेऊ शकतो असा तंत्रशास्त्राचा सिद्धांत आहे. त्याच प्रकारच्या सामर्थ्याने आदिमायेने योगिनींची उत्पत्ति केलेली आहे. योगिनींची देखील विशिष्ट परिस्थिति वाचकांनी ध्यानात घेतली म्हणजे योगिनी आणि मातृका या मुळात एक नव्हेत हे त्यांना कळून येईल. मातृका हे योगिनींचे परिणत स्वरूप आहे, तर योगिनी हे मातृकांचे मूलस्वरूप म्हणता येईल.

योगिनी तंत्रामध्ये चौसष्ट योगिनींची उत्पत्तीची कथा खालीलप्रमाणे आहे. एकदा प्रलय झाला आणि सर्व ब्रह्मांड नष्ट झाले. पृथिव्यादि पंचमहाभूते व महेश आणि महेशानी एवढीच फक्त शिल्लक राहिली. स्वतःच निर्माण केलेले

ब्रह्मांड नष्ट झाल्याने शिवाला राहावयास जागाही उरली नाही, यासाठी त्याने आपली शक्ति महेशानी हिला राहण्यासाठी ठिकाण निर्माण करण्यास सांगितले. महेशानीला या गोष्टीचा राग आला व ती त्याला टाकूनही बोलली. निर्मितीमध्ये शक्ति सहाय्य देत नाही असे पाहिल्यावर शिवाला क्रोध आला आणि त्याने आपल्या शरीराचे भस्म करून घेऊन, त्यामधून घोर नावाचा राक्षस उत्पन्न केला, (शिवाचे एक नाव घोर असेही आहे) आणि अणिमादि अष्टसिद्धि त्याला दिल्या. शिवाचे शोधात महेशानी पश्चिम दिशेकडे गेली असता, तिला ते राक्षस दिसले. घोरानेही महेशानीला पाहाताच तो तिचा अनुनय करू लागला. त्या वेळी महेशानी त्याला म्हणाली की, ' युद्धात मला जिंकल्याविना मी तुला वरणार नाही.' दोघांचे तुमुल युद्ध झाले. पत्नीच्या सत्वरक्षणासाठी शिवाने लघुरूपाने तिच्या शरीरात प्रवेश केला, तेव्हा घोराचेही तिजपुढे काही चालेना. शेवटी महेशानी घोराला म्हणाली, ' ज्या अर्थी तू माझ्या प्राप्तीचे प्रयत्न चालविले आहेस, त्या अर्थी तू प्रत्यक्ष शिवच आहेस, हे मी जाणले आहे. ब्रह्मानंदाची प्राप्ति करून देणारे माझे भव्यरूप मी तुला दाखविते.' पाहता पाहता महेशानीने भयानक रूप धारण केले. त्या वेळी तिच्या तेजोमंडळातून एक एक किरणा गणिक, तेजस्वी युयुत्सु व गर्जना करणाऱ्या अनेक स्त्रिया प्रगट झाल्या, त्याच योगिनी होत.

दुसरी उत्पत्ति अशी की, वाराणसी क्षेत्री प्राचीन काळी दिवोदास राजा राज्य करीत असता सर्वत्र समृद्धि आणि सौख्य लोकांना मिळत गेल्याने ते विश्वेश्वराला विसरले आणि त्या राजाचीच भक्ति करू लागले. विश्वेश्वराच्या ठिकाणी शंकराना सूक्ष्मरूपाने जाऊन राहाणे अगत्याचे होते, नाहीतर एरव्ही त्या श्रद्धास्थानावरचे लोकांचे लक्ष उडाले असते. पार्वतीला देखील ही लोकांची वृत्ति आवडली नाही, तेव्हा हरप्रयत्नाने पुन्हा अधिष्ठान प्रस्थापित करण्याचे त्यांनी योजिले. शंकराचे महत्त्व प्रस्थापित करावयाचे म्हणजे दिवोदासाचे महत्त्व कमी करावयास पाहिजे होते यासाठी पार्वतीने आपल्या योगसामर्थ्याने योगिनींचा एक तांडा उत्पन्न केला आणि त्याना वाराणसी येथील लोकांना बुद्धिभेद करण्यासाठी पाठविले. त्या योगिनींची नावे येणेप्रमाणे.

गजानना, सिंहमुखी, गृध्रास्या, काक-तुंडिका, उष्ट्र-ग्रीवा, हयग्रीवा, वाराही, शरभानना, उलूकिका, शिवारावा, मयूरी, विकटानना, अष्टवक्त्रा, कोटराक्षी, कुब्जा, विकट लोचना, शुष्कोदरी, ललज्जिव्हा, श्वदंष्ट्रा, वानरानना, ऋक्षाक्षी, केकराक्षी, बृहत्तुंडा, सुराप्रिया, कपालहस्ता, रक्ताक्षी, शुकी, श्येनी, कपोतिका, पाशहस्ता, दंडहस्ता, प्रचंडा, चंडा, चंडविक्रमा, शिशुघ्नी, पापहन्त्री, काली, रुधिरपायिनी, अहाहारा, कामाक्षी, मृगाक्षी, विद्युत्प्रभा

या वेताळांस योगिनी वाराणशी येथे वास्तव्य करू लागल्यापासून दिवोदासाचे महत्त्व कमी झाले आणि लोकांचा ओढा पूर्ववत् विश्वेश्वराकडे वळला. या योगिनींची नावे पाठ केल्याने डाकिणी, शाकिणी, राक्षस आणि भूतयोनी यापासून यत्किंचितही भय राहात नाही. तसेच सर्वसिद्धि प्राप्त होतात, असे फल सांगितले आहे. (स्कंदपुराण, काशीखंड अध्याय ४५.)

वाराणशी येथे जरी वरील योगिनींची स्थापना झालेली असली तरी त्या क्षेत्राच्या रक्षणासाठी आणखीही देवता तेथे आहेत. एकदा अगस्ती ऋषींनी कार्तिकस्वामींना प्रश्न केला की, 'वाराणशी क्षेत्राचे रक्षण कोण कोण करते, ते कथन करावे.' त्या वेळी स्वामींनी देवता, योगिनी आणि शक्तींची लिंगे यांची जी माहिती सांगितली ती खालीलप्रमाणे

देवतांची नावे येणेप्रमाणे आहेत.

विशालाक्षी, ललिता, विश्वभुजा, वाराही, शिवदूती, ऐंद्री, वज्रहस्ता, कौमारी, माहेश्वरी, ब्राह्मी, नारायणी, विरूपाक्षी, शैलेश्वरी, चित्रघंटा, चित्रग्रीवा, भद्रकाली, हरसिद्धि, महासिद्धि, निगडभंजनी, घनटंकारा, अमृतेश्वरी, त्रिलोकसुंदरी, महालक्ष्मी, कौर्मिशक्ति, भीमचंडी, छागवक्त्रेश्वरी, तालजंघेश्वरी, चर्ममुंडा, महारुंडा, चामुंडा, स्वप्नेश्वरी. (स्कंदपुराण, काशीखंड ७०).

वरील देवताव्यतिरिक्त पार्वतीच्या शरीरकोशापासून ज्या अधिक शक्ति उत्पन्न झाल्या त्यांचीही स्थापना याच क्षेत्री केलेली आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे,

वरीलप्रमाणे योगिनी आणि देवता या जरी क्षेत्ररक्षणाथ असल्या तरी आणखी १४ प्रमुख शिवलिंगे, १४५ इतर शिवलिंगे आणि २२५ तीर्थे रक्षणासाठी ठेवलेली आहेत, त्यांची नावे मूळग्रंथामध्येच पहावी.

चौसष्ट योगिनींची ही एक यादी पहा. यांतील नावे इतरापेक्षा निराळीच दिसतील,

कुलेशी कुलनन्दा च वागिशी भैरवी तथा ।
उमा श्री. शांतया चंडा धुमाकाली करालिनी ॥ ४२ ॥
महालक्ष्मी. च कंकाली रुद्रकाली सरस्वती ।
याग्वादिनी च नकुली भद्रकाली शशिप्रभा ॥ ४३ ॥
प्रत्यंगिरा सिद्धलक्ष्मी अमृतेशी च चंडिका ।
खेचरी भूचरी सिद्धा कामाक्षी हिंगुला बला ॥ ४४ ॥
जया विजया च अप्यजिता नित्या पराजिता ।
विलासिनी तथा घोरा चित्रा मुग्धा धनेश्वरी ॥ ४५ ॥
सोमेश्वरी महाचंडा विद्या हंसी विनायका ।
वेदगर्भा तथा भीमा उग्रावैचा च सद्गतिः ॥ ४६ ॥
उमेश्वरी चंद्रगर्भा जोत्स्ना सत्या यशोवती ।
कुलिका कामिनी काम्या ज्ञानवत्यथ डाकिनी ॥ ४७ ॥
राकिनी लाकिनी चाथ काकिनी शाकिनीत्यपि ।
हाकिनीति चतु षष्टी शक्तय सिद्धिदायका ॥ ४८ ॥
(मन्त्रमहोदधी, व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई.)

योगिनींची संख्या अमर्याद आहे. तरी साधारणत ती ६४ ही मानली जाते. श्रावण महिन्यात पिठोरी अमावास्येने एक व्रत आचरण्यात येते. त्यामध्ये माय योगिनींचीच पूजा केली जाते त्या योगिनींची नावे येणेप्रमाणे,

दिव्ययोगी, महायोगी, सिद्धयोगी, गणेश्वरी, प्रेमाक्षी, डाकिनी, काली, कालरात्री, निशाचरी, झंकारी, रौद्रवेताली, भूतली, भूतडामरी, उर्ध्वकेशी, विरुपाक्षी, शुष्कांगी, नरभोजनी, मट्टारी, वीरभद्रा, धूम्राक्षी, कलहप्रिया, राक्षसी, घोररक्ताक्षी, विश्वरूपा, भयंकरी, चंडिका, वीरकौमारी, वाराही, मुंडधारिणी, भ्रामुरी, रौद्रझंकारी, भीषणा, त्रिपुरांतिका, भैरवध्वंसिनी, क्रोधी, दुर्मुखी, प्रेतवाहिनी, खट्वांगी, दीर्घलंबोष्टि, मालिनी, मंत्रयोगिनी, चक्री, कालाग्नी, मदणी, कंकाली, भुवनेश्वरी, कटकी, कीटिनी, रौद्री, यमदूती,

कपालिनी, घोराक्षी, कार्मुकी, काकदृष्टि, अधोमुखी, मुंडाग्रधारिणी, व्याघ्री, किंकणी, प्रेतभाविणी, शल्यभाविणी, कामाख्या, उड्डाणी, योगपीठिका, महालक्ष्मी, एकवीरा, काळरात्री.

याप्रमाणे ६६ योगिनींची नावे दिलेली आहेत. (मंत्रराज)

वरील दोन-तीन याद्या देण्याचा प्रधान हेतु असा की, योगिनींची संख्या अमर्याद आहे आणि त्यांची नावेही निरनिराळी आहेत हे वाचकांच्या ध्यानी यावे. प्रचारात मात्र त्यांची संख्या ६४ हीच धरली जाते. योगिनी मंदिरामध्ये प्रायः ६४ मूर्ति आढळून येतात.

पुराणकारांच्या मतांप्रमाणे वरील उत्पत्ति दिलेली असली तरी एक आधुनिक कवि—दासगणू—काय म्हणतात ते पहा,

कोल्हासुरांनीं अगणित । कन्यका कारागृहात ।
ठेविल्या त्या समस्त । तुवां अंबे सोडविल्या ॥ ८१ ॥
त्याच तुझ्या कृपें भल्या । पुढे चौसष्ट योगिनी झाल्या ।
जनांस पावूं लागल्या । इच्छा त्यांची पुरविण्यास ॥ ८२ ॥

दासगणूविरचित ‘ओवीबद्ध स्तोत्रे’ (प्रसिद्धी शके १८८३) यामधील महालक्ष्मी स्तोत्रातील वरील ओव्या आहेत. मोहिनीराज, अंबिका आणि इतर स्तोत्राचाही समावेश त्यामध्ये आहे. लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे कोल्हासुर राक्षसाने बंदीवान केलेल्या मुली, त्यांची सुटका झाल्यावर योगिनी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. लेखकाचे विधान हे मूळ उत्पत्तीच्या परस्परविरुद्ध आहे. मानवी कुळात उत्पन्न झालेल्या या कन्यका योगिनी पदाप्रत का आणि कशा पोहोचल्या याचे विवरण त्यांनी केलेले नसल्यामुळे त्यांच्या मतावर विश्वास ठेवणे योग्य होणार नाही. बंदीखान्यातून सुटलेल्या कन्यका योगिनी होतात हेच प्रमाण धरावयाचे म्हटले, तर श्रीकृष्णाने नरकासुराच्या बंदीखान्यातून सोडवणूक केलेल्या १६१०८ कन्यकांना देखील योगिनीच समजावे लागेल परंतु त्यांना कोणीही योगिनी म्हटलेले नाही. असो

‘योगिनीहृदय दीपिका’ या ग्रंथामध्ये योगिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आढळते. योगिनी तत्त्वाचे मर्म जाणण्यास शंकराशिवाय दुसरा कोणीही समर्थ नाही

मानुषीं हृदयं मर्त्यो वेत्ति नैकोऽपि तत्त्वत ।
योगिनीहृदयं ज्ञातुं क' समर्थ शिवं विना ? ॥

'अत्र तु योगीनाम् समस्तवस्तुगमयायाः संबंधस्तेन भावत इति योगिनी।' योगमार्गाने मानव आपली अध्यात्मिक प्रगति करीत असताना इथेतील अणु-परिमाणुसंबंध साधून त्याच्या चैतन्यशक्ति वाढविण्यास सहाय्यभूत होणाऱ्या माध्यमाला 'योगिनी' असे नाव दिले आहे. 'योगिन्याः योगाः शिवसम्बंधो नित्यं विद्यते।' पार्वतीच्या शक्तिअंशाने उत्पन्न झाल्यावर जगताला प्रकाशभूत होणाऱ्या आणि ब्रह्मा, विष्णु, रुद्रादि देवांमध्ये अंतर्भूत असलेल्या लहानमोठ्या पंचभौतिक परिमाणयुक्त चैतन्यशक्तीला 'योगिनी' असे संबोधितात. शिव-पार्वती संबंधामुळे योगिनींचा संबंध शिवापर्यंतही पोहोचतो.

वर्गाष्टकनिविष्टाभिः योगिभिश्च संयुता।
योगिनी रूपमास्थाय राजते विश्वविग्रहा॥

अ, क, च, ट, त, प, य, श वर्णमालेतील अष्टवर्ग योगिनी स्वरूपात अंतर्भूत आहेत आणि त्यामुळेच या योगिनी विराट विश्वरूप घेऊ शकतात. डाकिनी, राकिनी, काकिनी, शाकिनी, हाकिनी, याकिनी आणि इतर योगिनी या मातृकांचे मूलस्वरूप होय. 'डाकिन्यादिभिः मातृका स्थूलरूपिणिः।' असे वचन आहे.

'शक्तेरेतैः षड्भिरक्षरैः, विद्याया योगिनीत्वम्।' शाक्तपंथीय जेव्हा जेव्हा योगिनींचे पूजन करतात तेव्हा योगिनी-तत्त्वाची सहा बीजाक्षरे त्रिकोणा-मध्ये अंतर्भूत करून ते त्या यंत्राची पूजा करतात अगर षट्चक्राधिष्ठित मातृकाशक्तींची पूजा करतात.

गौरी, पद्मा, शची, मेधा, सावित्री, विजया, जया।
देवसेना स्वधा, स्वाहा मातरो लोकमातरः।

यांची पूजा ज्याप्रमाणे यज्ञादि शुभकार्यामध्ये मांडलेल्या स्थंडिलावर होत असते, तद्वत् वास्तुपूजेच्या वेळी मंडपाच्या वायव्य दिशेला आणि शुभ कार्यामध्ये मंडपाच्या नैर्ऋत्य दिशेला जगदंबा अंश स्वरूपिणी ६४ योगिनींची पूजा केली जाते. यामुळे मनोवांछित फळ प्राप्त होते. ६४ योगिनींची रूपे ही दुर्गादेवींचीच स्वरूप आहेत. देवी स्वतःच म्हणते की, 'एकैवाहं जगत्यत्र द्वितीया का ममापराः।' (सप्तशती) (कल्याण, नारीअंक ४८।६२)

(१) श्री नरसिंहसरस्वतीरचित गुरुचरित्र, अध्याय १९ मध्ये खालील उल्लेख आहे.

अमरेश्वर सन्निधानीं। वसती चौसष्ट योगिनी।
पूजा करावया माध्यान्हीं। गुरुजवळी नित्य येती॥

गुरूला नमन करून आपल्याबरोबर त्यांना जलमंदिरात घेऊन जातात. त्याची विधियुक्त पूजा करतात, भोजन देतात आणि परत औदुंबरखाली आणून सोडतात.

योगिनी आल्या पूजेसी । गंगेमध्ये येता कैसी । बाढ झाली अपार ।
पाणी दुभंगून तेथ । गुरुसी नेती पूजनास । पूजन करिती मंदिरात ।
मग आणोनी सोडती ॥

( २ ) दीक्षित महाराज म्हणून नृसिंहवाडीत एक सत्पुरुष होऊन गेले, त्यांनी चौसष्ट योगिनी स्तोत्र रचले असून त्यामध्ये त्यांची नावे दिलेली आहेत योगिनी या देवकन्या असून त्या श्री वासुदेवानंदसरस्वतींच्या प्रमुख भगिनी असल्याने, देवाच्याबरोबर त्यांचीही पूजा व्हावी असे त्यांनी तेथील पुजारी-वर्गाला सांगितले आहे.

( श्री नृसिंहसरस्वती दीक्षितमहाराज चरित्र, लेखक शंकरस्वामी, पृ ३५८ )

( ३ ) मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका तथा ।
उल्का, सिद्धा, संकटा च योगिन्येता प्रकीर्तिता ॥

वरील योगिनी या दुर्गादेवीच्या परिचारिका म्हणून सांगितलेल्या आहेत, पण दुसऱ्या एका पाठाप्रमाणे त्यांची नावे निराळी आहेत. ती अशी,

मार्गिनी, कर्पूरतिलका, मलय गंधिनी, कौमुदिका, भेरुंडा, माताली, नायकी, जया किंवा शुभाचारा याप्रमाणे आहेत

( भारतीय सांस्कृतिक कोश, भाग १, पृ ३१६ )

योगिनींचे एक प्रख्यात स्थान भेडाघाट ( जबलपूर ) जवळ जेथे नर्मदा नदीवरील धबधबा आहे, त्या ठिकाणी आहे धबधब्याचे ठिकाण म्हणून ते अतिशय रम्य आहे योगिनी या काही वेळा दुर्गादेवीच्या परिचारिका मानल्या जातात सन १९३४ च्या ' शक्ति अंका ' मध्ये दुर्गादेवीचे जे छायाचित्र छापले आहे त्यामध्ये दुर्गादेवी वाघावर बसून चाललेली असून नऊ दहा परिचारिका तिच्यासमवेत चाललेल्या दाखविल्या आहेत कोणी झारा घालीत आहे, तर कोणी अब्दागिरी धरलेली आहे आदिशक्तीचे सैन्य म्हणून योगिनींचे कार्य सांगितल्यावर अशा रीतीने मालकिणीची सेवा करणे यामध्ये अनुचित असे काहीही नाही

भेडाघाटावरील मंदिर बाराव्या शतकात म्हणजे सुमारे ११५६ साली बांधले गेले यावरून एक निष्कर्ष काढता येतो की, त्या काळी मातृपूजेचे स्त्री

देवतांची पूजा चालू होती. असे समजते की, त्या वेळी एकूण चौसष्ट योगिनींची पाच मंदिरे उभारली गेली. त्यांपैकी एक खजुराहो येथे उभारले गेले. या मंदिराच्या वर्णनाचे वैशिष्ट्य म्हणून असे सांगता येईल की, चौकोनी दगडाच्या आकारात, आतील बाजूने उघडया वर या योगिनी मूर्तींची भाविक स्थापना करीत असत. तसेच या ठिकाणी हवा, पाऊस यांच्यापासून रक्षण व्हावे म्हणून निवारणार्थ मस्तकावर कशीतरी आच्छादन टाकून आसरा घेता यावा अशा प्रकारची जागा उपलब्ध नाही. हे मंदिर तेवर या गावी आहे. याला पूर्वी त्रिपुरी म्हणत. ही कलचुरी राजवंशाची राजधानी होती.

या ठिकाणी एकूण ८२ मूर्ति बसविलेल्या असून त्या त्या मूर्तींच्या खाली त्या त्या देवतेचे नाव कोरलेले आहे. मूर्तींना आकार मानवी स्त्रीसारखा असून शिल्प उत्तम कोरीव आहे. या मूर्तींची उंची स्त्रीच्या सर्वसाधारण उंचीएवढीच आहे. या मूर्तींची घडण तंत्रशास्त्रानुसार केलेली आहे. त्यामुळे सर्व मूर्ति प्रमाणबद्ध दिसतात. इ. स. १५६४ साली मोंगल सरदार असफखान याने राणी दुर्गावती हिचा पराभव केल्यावर येथील काही मूर्तींची मोडतोड केलेली होती. त्यामुळे आज पाहाताना काही मूर्ति अपूर्ण स्वरूपात दिसतात.

या क्षेत्री काही शिलालेखही आढळतात. त्याचे परीक्षण केले असता त्यामध्ये कलचुरी घराणे व जयसिंह यांची नावे दिसून येतात. योगिनी मंदिराच्याच शेजारी गौरीशंकराचेही मंदिर आहे. राजा गोकुळदास याने प्रवासी लोकांच्या सोयीसाठी एक धर्मशाळा बांधलेली असून राजे रघुनाथराव भोसले यांनी मंदिराच्या दैनंदिन खर्चासाठी एक संबंध गाव इनाम दिलेला आहे. येथे कार्तिक पौर्णिमेला यात्रा असते. (बिलासपूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ १३७)

पुराणांतरी अशी एक कथा आहे की, श्रीप्रभुरामचंद्रांनी राज्याच्या स्वीकृतीनंतर एकदा एक अश्वमेध यज्ञ केला. त्या प्रसंगी यज्ञाश्व फिरत फिरत या क्षेत्री आल्यावर एकदम गुप्त झाला. जवळच असलेल्या डोहात तो खेचला गेला आणि तेथूनच पाण्यात गुप्त झाला. शत्रुघ्न आणि हनुमान हे दोघे त्या घोड्याचे रक्षक म्हणून होते. हा झालेला प्रकार त्यांना नवीनच होता. घोड्याचा शोध घेण्यासाठी म्हणून ते दोघेही त्या डोहात शिरले आणि एका गुप्त प्रवेशमार्गे बरेच आत गेल्यावर त्यांना योगिनींचा वाडा दिसला. वाडा भव्य आणि रमणीय होता. एका प्रशस्त दालनात मंचकावर एक रूपसंपन्न स्त्री विराजमान झालेली होती आणि अनेक दासी तिची सेवा करण्यात गढून गेल्या होत्या

शत्रुघ्न आणि हनुमान या दोन रामसेवकांना पाहिल्याबरोबर त्या स्त्रीला कळून चुकले की, आपण पकडलेला घोडा हा श्रीप्रभुरामचंद्रांचाच आहे.

झालेल्या बुद्धीचे परिमार्जन करण्याच्या हेतूने त्या स्त्रीने त्वरितच आपले आसन सोडले आणि त्या वीरांचे आदरातिथ्य केले. थोडा वेळ इकडचे तिकडचे बोलणे केल्यानंतर त्या स्त्रीने त्यांना यज्ञाश्व तर परत दिलाच, परंतु दक्षिणा म्हणून आणखी एक अमोघ शक्ति त्यांना दिली. ती जाताना म्हणाली, 'पुढील मार्गक्रमण करीत असता मार्गात एक महान् शिवभक्त हा रामाचा घोडा अडवील. त्या वेळी तुम्हाला या शक्तीचा उपयोग होईल.' नंतर शत्रुघ्न आणि हनुमान घोडा घेऊनच भूतलावर आले आणि पुढील मार्ग आक्रमण करण्यास त्यांनी सुरुवात केली (पद्मपुराण, पाताळ अध्याय ३८)

आर्या

गौरीशंकर शिखरीं पौराणिक योगिनी किती वसती।
स्त्रीतनु समान आकृति योगीजन सेवुनि सदा ध्याती ॥ १ ॥
धो धो जलौघ ओती प्रपात ज्यांचि नर्मदा सरिता।
तें स्थान जबलपुरा सन्निधही वास योगिनी करिता ॥ २ ॥
चौरस पाषाणाच्या प्राकारीं मूर्ति च्यायशीं दिसती।
उत्तम कोरिव शिल्पही, योगिनींना सदा असो प्रणती ॥ ३ ॥

योगिनीमंदिर (खजुराहो)

मध्य भारतामध्ये छत्रपूर संस्थानच्या हद्दीत आणि झाशी–माणिकपूर रेल्वेमार्गावर हरपालपूर नावाचे स्थानक आहे. तेथून जवळच खजुराहो हे क्षेत्र आहे. इ. स. ९ ते १३ व्या शतकापर्यंत हे राजधानीचे शहर होते. चंदेल वंश या ठिकाणी सत्ता गाजवीत होता. सन ९५० ते १०५० पर्यंत हे राजधानी बांधणीचे काम हळूहळू चालले होते.

राजवाडा आणि इतर इमारती यांव्यतिरिक्त या क्षेत्री एकूण ८० मंदिरे बांधलेली होती आणि ती २ × १॥ मैलाच्या टापूत तीन निरनिराळ्या समूहात विभागलेली होती. उत्तरेकडील गटातील सुमारे ३० मंदिरे अद्यापही कशीबशी उभी असून बाकीची जमीनदोस्त झालेली आहे. हर्ष, यशोवर्धन आणि ढंग राजे यांच्या कारकीर्दीमध्ये ती उभारली गेली असे मानले जाते. कारण ते तिघेही शिल्पकलेचे अतिशय भोक्ते होते. ही राजघराणी 'मनिया' या देवीची उपासक होती. पन्ना येथील प्रसिद्ध खाणीतील सुंदरी दगड आणून सर्व इमारतींचे काम झालेले आहे. येथील शिल्प इतके अप्रतिम आहे की, भारतामध्ये तसे शिल्प अन्यत्र सापडणे कठीण आहे. या शिल्पकामासाठीच आज हे क्षेत्र प्रसिद्ध आहे. या क्षेत्राला सहस्रावधि प्रवासी नित्य भेट देत असतात.

या गावाला खजुराहो हे नाव येण्याचे कारण असे दिले जाते की, पूर्वी या भागात खजुराची झाडे पुष्कळ होती. इतकेच नव्हे तर या वृक्षसंपत्तीचे प्रतीक म्हणून राजधानीच्या दिल्ली दरवाज्यावर दोन्ही बाजूना सुवर्णाचे खजूर वृक्ष बसविलेले होते.

वर जी अनेक मंदिरे उभी आहेत म्हणून सांगितले त्यामध्ये चौसष्ट योगिनींचे एक मंदिर आहे. शिवसागर तलावाच्या तीरावर एका खडकावर ते बांधलेले असून १०४ × ६० चौ फूट अंगणाच्या सभोंवार एकूण ६५ पैकी आता फक्त ३५ ओवऱ्या शिल्लक आहेत. बाकीच्या काळाच्या उदरात गडप झाल्या आहेत. प्रत्येक ओवरीवर लहानसे शिखर असून तिचा खालील भाग चैत्यस्वरूप ( बौद्ध स्वरूप ) खिडक्यांनी सुशोभित केलेला आहे. एकेकाळी या ओवऱ्याना दरवाजे होते आणि त्यामुळे आतील मूर्तींचे उत्तमप्रकारे संरक्षण होत असे. परंतु आता भिंतीमध्ये बिजागऱ्या बसविल्याची खूण म्हणून फक्त भोके अस्तित्वात उरली आहेत एकूण ओवऱ्यापैकी पूर्वेचे प्रवेशद्वार असलेली मोठी ओवरी व इतर उरलेल्यापैकी प्रत्येक देवतेसाठी एक एक याप्रमाणे ६५ ओवऱ्यांचा आरा खडा दिसतो.

या ठिकाणी योगिनी या कालीदेवीच्या दासी अगर परिचारिका मानल्या गेल्या आहेत. कालीदेवी ही आदिशक्तीचेच एक स्वरूप असल्यामुळे मंदिरसंस्थापकांना ही कल्पना मानवली असावी ६४ मूर्तीपैकी आता फक्त तीन शिल्लक उरलेल्या आहेत. ( १ ) महिषासुरमर्दिनी, ( २ ) माहेश्वरी आणि ( ३ ) तीन मुखाची ब्राह्मी त्याही आता आपल्या मूळ जागेवर नसून त्या तिघींना एकत्र एका मोठ्या ओवरीत आणून टाकलेले आहे या मूर्तीव्यतिरिक्त बाकीच्या ६१ मूर्ति चोरापोरी गेल्या असाव्यात अथवा नाश पावल्या असाव्यात. यामुळे ' चौसष्ट योगिनी मंदिर ' हे आता फक्त ' नाव ' उरले आहेत प्रत्यक्षात तेथे मूर्ति मात्र तीनच आहेत ' कान गेले आणि भोके उरली ' अशी मराठी भाषेत एक म्हण आहे, ती येथे यथार्थपणे लागू पडते.

## जगदंबा मंदिर

येथील कंदरीय महादेवाचे मंदिर पूर्णस्थितीमध्ये उभे आहे या मंदिराचे शिल्प प्रेक्षणीय आहे. या मंदिराच्या शेजारीच जगदंबा मंदिर आहे. वास्तविक पूर्वीचे हे विष्णुमंदिर होते आणि त्याची खूण म्हणून आजही दर्शनी दरवाज्यावर विष्णूचीच मूर्ति असलेली दिसते परंतु मध्यंतरीच्या काळात कोणीतरी विष्णूची मूर्ति त्या ठिकाणाहून हलविली आणि त्याऐवजी ओबडधोबड मुखी लक्ष्मीची मूर्ति आणून बसविली. परंतु मूर्तीच्या ओबडधोबड आकारामुळे पुढे पुढे लोकांना

ती लक्ष्मीची मूर्ति आहे याची ओळख न राहून त्यांपैकी एका देवीभक्ताने तिच्यावर काळा रंग चढविला आणि त्यामुळे आता ती जगदंबा या नावाने ओळखली जाते. या कलियुगात मानवाचीच स्थित्यंतरे होतात असे नाही, तर देवताच्या ललाटी देखील हे असे कधी कधी लिहिलेले असते, त्याचे हे एक एक उत्कृष्ट आणि तितकेच मजेशीर उदाहरण आहे.

हे मंदिर ४२ × ७३ चौ. फूट क्षेत्रफळाचे असून मंदिराच्या चारी कोपऱ्यात इतर देवताना स्थाने मिळालेली आहेत. एका कोपऱ्यात यमाची मूर्ति आहे तर दुसऱ्या ठिकाणी, त्रिमूर्ति शिव उभा उभा आहे. या शिवाच्या मूर्तीला आठ हात आहेत.

इतर ठिकाणी वराहाची एक भव्य आकृती आहे. ६ फूट उंच आणि ९ फूट रुंद अशी ही आकृती असून तिच्या सर्वांगावर देवताची चित्रे कोरलेली आहेत. त्यामध्ये ब्रह्मा, विष्णु, महेश, सूर्य, सरस्वती, गंगादेवी, नागदेव, अष्ट-दिक्पाळ, नवग्रह, पृथ्वीदेवी इ० चित्रे आहेत. हिंदु पुराणामध्ये वराहाचे स्वरूप म्हणजे तिसरा अवतार मानला गेलेला आहे. पाण्यात बुडालेली पृथ्वी आपल्या सुळ्याच्या साहाय्याने त्याने वर काढली अशी पुराणांतरी हकिकत आहे. तेच मूळ स्वरूप शिल्पकाराने दाखविले होते आणि वराहाच्या सुळ्यावर पृथ्वीचे स्वरूप दाखविले होते. परंतु कालांतराने सुळ्यावरील हे स्वरूप खाली पडले अथवा पाडले गेले आणि आता त्या स्वरूपाचे तुकडे वराहाच्या पायाजवळ पडलेले दिसतात. तसेच या तुकड्यांजवळ एका नाग स्त्रीचा पुतळा भूमीवर लोळण घेत असलेला दिसतो. बाकीच्या अनेक मंदिरामध्ये चतुर्भुजालय, पार्श्वनाथालय ही छोटी छोटी मंदिरे आहेत.

पडक्या मंदिरातील अवशेष एका ठिकाणी संग्रहीत करण्यात आले असून त्यामध्ये नागदेवता, विष्णु, कार्तिकेय, शिवपार्वती, हरिहर इत्यादि अनेक शिल्पशास्त्रदृष्ट्या उत्तमोत्तम अशा कलाकृति आहेत. येथील शिल्प पाहण्या-साठीच अनेक शोधी आणि कलाप्रेमी प्रवासी या स्थानाला भेट देत असतात.
( खजूरहो मार्गदर्शक, लेखक धम्मा ).

साकी

मध्ययुगांतील शिल्पकला ही पहा खजूरहो गांवीं ।
पहा येथील पाषाणावर उत्तम चितारलेली ॥ १ ॥
शिवविष्णुसह चौसट योगिनी, ऐशीं मंदिर होतें ।
एकमष्ट गेल्या, तीन राहिल्या धन्य कार्यगती तें ॥ २ ॥

विष्णु गेला, लक्ष्मी आली, श्यामवर्ण बनविली।
जगदंबाही तीच मानिली, भक्तजनांनी नमिली ॥ ३ ॥

येथील राजांना चंदेल वंशीय असेही म्हणत. त्यापैकी लक्ष्मण वर्मन राजाने लक्ष्मण मंदिर बांधले आणि गाभाऱ्यात मूर्ति मात्र कनोजचा राजा देवपाल याजकडून मिळविलेली त्रिमुख विष्णूची बसविली आहे. वराह, विष्णु व नरसिंह असे त्रिमुख आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर लक्ष्मीची मूर्ति व बाजूला ब्रह्मा आणि शिव यांच्या मूर्ति आहेत. द्वारस्तंभावर समुद्रमंथनाचा देखावा असून विष्णूचे अवतार व इतर वेलबुट्टी कोरलेली आहे. मध्यप्रदेश, गुजरातमध्ये त्रिमुख विष्णूच्या मूर्ति प्रचारात होत्या त्याचे हे एक आणखी उदाहरण आहे

पहारपूर जि. राजशाही येथील उत्खननात या मूर्तिशाठी कोनाडी व मूर्ति आढळून आल्या आहेत. या मूर्ति ज्या मंदिराच्या पायामध्ये मिळाल्या ते मंदिर ५००×३०० चौ. फू लांबी रुंदीचे व १०० फूट उंच होते. कळसामध्ये तीन गोलाकार गच्च्या होत्या आणि त्या प्रदक्षिणामार्गावर अनेक देवतांच्या आणि बौद्धांच्या मूर्ति कोरलेल्या होत्या सहाव्या शतकात राजा धरमपाल याने हे मंदिर उभारले होते, असे समजून आले आहे.

( Archaelogical History of India, P. 64 )

## मातृका

ब्राह्मी माहेश्वरी चैव कौमारी वैष्णवी तथा।
वाराही च तथेन्द्राणी चामुंडा सप्तमातरः ॥

आदिशक्तीची जी अनेक रूपे आहेत, त्यापैकी मातृका हे एक स्वरूप आहे. त्यांची संख्या 'सप्तमातृका' अशी जरी सर्वसाधारणपणे रूढ असली, तरी ती तितकीशी बरोबर नाही, हे आपल्याला पुढील विवेचनावरून कळून येईल मातृकांच्या व्युत्पत्तीसंबधानेही एकमत आहे असे नाही

दैत्यकुळात प्रल्हादाचा जन्म झाला आणि त्याने जरी ईश्वरभक्ति करून स्वतःपुरती जीवनमुक्ति मिळविली असली तरी त्याचे दैत्यकुळ तसेच राहिले. अंधकासुर हा त्याचाच वंशज होय तप सामर्थ्याने तो महाप्रबळ बनला. सर्व भूतलावर अधिराज्य स्थापून त्याने देवानाही 'त्राहि भगवन्' करून सोडले. सर्व देवाधिदेव आणि देवता शंकरांना शरण गेले आणि त्यांनी त्यांना 'आमचे रक्षण करा' अशी विनती केली. तो महाप्रबल बलासूर आपल्या अगाध्या शक्ती मुळे इतका मदोन्मत्त झाला होता की, सर्व देवता कैलास पर्वतावर गेल्या आहेत

असे समजताच हा देखील कैलासपर्वताप्रत पोहोचला आणि प्रत्यक्ष शंकरानाच त्याने युद्धाचे आव्हान दिले. जो चढला तो पाडलाच पाहिजे, त्याशिवाय एरव्ही मनचाला जगणे दुरापास्त होऊन त्याचे रक्षण होणे कठीण, असा विचार करून शंकरानीही त्याचा कपाळमोक्ष करण्यासाठी कंबर कसली. वासुकी, तक्षक, धनंजय यांसारखे महाभयंकर नाग त्यांनी कमरेभोवती गुंडाळले आणि इतर शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन ते युद्धाला निघाले

अंधकासुराचा जोडीदार नीलराक्षस याने हत्तीचे रूप धारण केले शंकराच्या अंगावर तो धावून जाणार, हे शंकरांचा सेनापति नंदी याच्या ध्यानी येताच त्याने सिंहाचे रूप धारण केले आणि त्या गजाला यमसदनास पाठविले. नंदीने त्या गजाची कातडी सोलून काढली आणि ती शंकराना परिधान करावयास दिली नंतर प्रत्यक्ष शंकर आणि अंधकासुर यांची चकमक झडू लागली शंकरानी अनेक बाण सोडून अंधकासुराला जखमी केल्यावर त्याच्या शरीरातून रक्तबिंदु खाली गळू लागले आणि त्याचा परिणाम असंख्य राक्षसगण उत्पन्न होण्यात झाला. इतक्यात शंकरानी त्रिशूळ फेकून दैत्याला त्यावर उचलून घेतले आणि नाचावयास लागले. विष्णु आपल्या सुदर्शनचक्राद्वारे अनेक राक्षसगणांचा समाचार घेतच होते. दैत्यसैन्याचा वाढता जोर पाहून आणि पुन्हा पुन्हा होणारी त्यांची उत्पत्ति पाहून आपली फळी मजबूत करण्यासाठी देवतांनी आपापल्या तेजसामर्थ्याने एक एक शक्ति निर्माण केली. शिवापासून निघाली ती योगेश्वरी, ब्रह्मापासून ब्राह्मी, महेश्वरापासून माहेश्वरी, कुमारस्कंदापासून कौमारी, विष्णूपासून वैष्णवी, वराहापासून वाराही, इंद्रापासून ऐंद्री आणि यमापासून निघाली ती चामुंडा शक्ति होय ह्याच सप्तमातृका होत. त्यांनी दैत्याच्या शरीरातून गळणारे रक्त पिऊन टाकले त्यामुळे दैत्याच्या शरीरातून गळणारे रक्त जमिनीवर पडण्याचे थांबल्यावर राक्षसांची पुनरुत्पत्ति बंद झाल्यामुळे त्याचा पूर्णतः पाडाव झाला

(Elements of Hindu Iconography by T A Gopinath Rao Vol I, Part II, Page 186)

मत्स्यपुराणात हीच कथा थोडी निराळी दिलेली आहे तप सामर्थ्याने मनळ झाल्यावर अंधकासुर कैलास पर्वतावर गेला आणि निर्लज्ज बनून आदिमाया पार्वतीचेच हरण करण्याचा प्रयत्न करू लागला पत्नीच्या रक्षणार्थ अर्थातच शंकर पुढे सरसावले आणि अवंती नगरीतील महाकालवनामध्ये त्या दोघांचे दारुण युद्ध झाले शंकराच्या बाणांनी दैत्याचे शरीर विद्ध झाल्यावर

त्याच्या शरीरातून रक्त गळू लागले आणि त्या रक्ताद्वारे अनेक राक्षस उत्पन्न होऊ लागले. त्या अनेक राक्षसांचे पारिपत्य करण्यासाठी शंकरांनी आपल्या आत्मतेजाने मातृगण उत्पन्न केला. त्यांतील मातृकांची नावे पुढीलप्रमाणे.

माहेश्वरी, ब्राह्मी, कौमारी, मालिनी, सौपर्णा, वायव्या, शाक्रि, नैऋती, सौरी, सौम्या, शिवदूती, चामुंडा, वारुणी, वाराही, नरसिंही, वैष्णवी, चलच्छिखा, शतानंदा, भगानंदा, पिच्छिला, भगमालिनी, बाला, अतिबला, रक्ता, सुरभी, मुखमंडिका, मातृनंदा, सुनंदा, विडाली, शकुनी, रेवती, महारक्ता, पिलीपिच्छिका, जया, विजया, जयंती, अपराजिता, काली, महाकाली, दूतीसुभगा, दुर्भागा, कराली, नंदिनी, आदिति, दिति, मारी, मृत्यु, कर्णमोटी, ग्राम्या, उलुकी, घटोदरी, कपाली, वज्रहस्ता, पिशाची, राक्षसी, भुशुंडी, शांकरी, चंडा, लांगली, कुटभी, खेटा, सुलोचना, धुम्रा, एकवीरा, करालिनी, विशालदंष्ट्रिनी, श्यामा, त्रिजटी, कुक्कुटी, वैनायकी, वैताली, उन्मत्ता, उदुंबरी, सिद्धि, लेलिहाना, केकरी, गर्दभी, भृकुटी, बहुपुत्री, प्रेतयाना विलंबिनी, क्रौंची, शैलमुखी, विनता, सुरसा, दनु, रंभा, मेनका, सलिला, चित्ररूपिणी, स्वाहा, स्वधा, वषट्कारा, धृति, जेष्ठा, कपर्दिनी, माया, विचित्ररूपा, कामरूपा, संगमा, मुखेविला, मंगला, महानस्ता, महामुखी, कुमारी, रोचना, भीमा, सदाहासा, मदोद्धता, अलंबाक्षी, कालपर्णी, कुंभकर्णी, महासुरी, केशिनी, शंखिनी, लंबा, पिंगला, लोहिता, सुखी, घंटारवा, दंष्ट्राला, रोचना, काकजंघिका, कंपिनी, परकंपिनी, मोहना, कंपना, क्ष्वेला, निर्भया, बहुशालिनी, सर्पकर्णी, एकाक्षी, विशोका, नंदिनी, ज्योत्स्नामुखी, रभसा, निकुंभा, रक्तकंपना, अविकारी, महाचित्रा, चंद्रसेना, मनोरमा, अदर्शना, हरत्पापा, मातंगी, लंबमेखला, अबला, वंचना, काली, प्रमोदा, लांगलावती, चित्ता, चित्तजला, कोणा, शांतिका, अघविनाशिनी, लंबस्तनी लंबसटा, विसटा, वासचूर्निनी, स्खलंती, दीर्घकेशी, सुचिरा, सुंदरी, शुभा, अयोमुखी, कटुमुखी, क्रोधिनी, अशनी, कुटुंबिका, मुक्तिका, चंद्रिका, बलमोहिनी, सामान्या, हासिनी, केविदारी, समाख्वी, शंकुकर्णी, महानादा, महादेवी, महोदरी, हुंकारी, रुद्रसुसदा, रुद्रेशी, भूतडामरी, पिंडजिव्हा, ज्वलज्ज्वाला, शिवा, ज्वलामुखी इ०.

याप्रमाणे श्रीशिवशंकरांनी १९० मातृकांचा मातृगण उत्पन्न केला. त्या मातृगणाने अंधकासुर दैत्याचे रक्त प्राशन करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो निष्फळ ठरला आणि त्यामुळे असुरांची पुनरुत्पत्ति थांबेना. तेव्हा श्रीविष्णूने आपल्या शक्तीने शुष्करेवती या नावाची एक शक्ति उत्पन्न केली. या शक्तीने अंधकासुराचे रक्त प्राशन केल्यावर मगच अंधकासुराचा नाश झाला.

मातृकांचे अंगीकृत कार्य संपल्यावर त्या इतस्ततः फिरू लागल्या आणि भक्ष्याचा शोध घेऊ लागल्या. परंतु उदरभरणास काहीही मिळेना. तेव्हा त्यांनी त्यांना पितृरूप असलेल्या श्रीशिवशंकरांकडे खाद्यपदार्थांची मागणी केली. परंतु पिता तरी इतक्या कन्यकांना एकदा दोनदा नव्हे, तर सतत अन्न कोठून आणि कसा पुरविणार ? यामुळे स्वतः पिताच असमर्थ ठरल्यावर मग मात्र त्या संपूर्ण मातृगणांनी त्रैलोक्यातील जीवसृष्टीचे भक्षण सुरू केले. देवांना काळजी पडली की, जर या ययांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली नाही, तर काही कालावधीत संपूर्ण पृथ्वी निर्मनुष्य होईल. मग शंकरांनी स्वतःच नृसिंहाचे रूप धारण करून काही अघोर मातृगण उत्पन्न केला. मुखापासून वागीश्वरी, वक्षःस्थळापासून माया, गुह्यस्थानापासून भवमालिनी आणि अस्थीमधून काळी ( शुष्करेवती ) असा मातृगण उत्पन्न केला. विष्णूनेहि आपल्या शक्तींनि आणखी काही मातृका उत्पन्न केल्या आणि त्या शिवनिर्मित कन्यकांच्या मदतीस दिल्या. विष्णुनिर्मित मातृका येणेप्रमाणे:—

पाताळलोकी जे दिसेल ते भक्षण करण्यास मातृकांनी सुरुवात करताच शंकरांनी नृसिंहाचे रूप धारण केले आणि त्यांनी या मातृकांची नाशकशक्ति तेवढी हरण केली.

रामाने रावणवधानंतर बिभिषणाला लंकेचे राज्य दिले आणि प्रभु आयोध्येला निघून गेले. परंतु नंतर सहस्रमुख रावणाने लंकेवर हल्ला केला. रावणाचे पारिपत्य करण्यासाठी राम अयोध्येहून परत आले. परंतु त्यांची रावणापुढे काही डाळ शिजेना. शेवटी नारदांच्या सल्ल्यावरून सीतेला आणविण्यात आले. सीतेने विराट स्वरूप धारण केले. तिने अंग झाडल्याबरोबर तिच्या रोमरंध्रातून अनेक मातृका उत्पन्न झाल्या. त्यांची एकूण संख्या २०५ आहे. परंतु स्थलाभावी येथे यादी देण्याचा मोह आवरावा लागत आहे. (अद्‌भुत रामायण, अध्याय २३ वा, मराठी भाषांतर श्रीयुत विष्णुशास्त्री बापटकृत.)

प्रथमारंभी सांगितल्याप्रमाणे मातृकांची एकूण संख्या सात धरतात. परंतु शिवस्वरूपातून निघालेली योगेश्वरी त्यांत मिळविली म्हणजे त्यांची संख्या आठ होते. कोणी योगेश्वरीऐवजी चर्चिकाचे नाव जोडून ही संख्या आठ करतात; तर दुसरे कोणी या सर्वांच्या पुढे आणखी एक नारसिंहाचे नाव जोडून ही संख्या नऊ करतात. याच कारणास्तव काही ठिकाणी मातृकांची संख्या आठ दिसते. उदाहरणार्थ, एहोळ येथील शिल्पामध्ये मातृकांची छायाचित्रे आठ आहेत.

मातृकांची संख्या आठच का असावी ह्याचा खुलासा वराहपुराण करते, तो असा. मानवी शरीरामध्ये जे अनेक गुण व दुर्गुण आहेत त्यांपैकी आठ प्रमुख दुर्गुणांचे या आठ मातृका प्रतिनिधित्व करतात.

काम—योगेश्वरी, क्रोध—माहेश्वरी, लोभ—वैष्णवी, मद—ब्राह्मणी, मोह—कौमारी, मत्सर—ऐंद्री, पैशुन्य—चामुंडा, असुया—वाराही, याप्रमाणे या आठ मातृका आठ दुर्गुणांचे प्रतिनिधित्व करतात.

सुप्रभेदागम तंत्राप्रमाणे या मातृकांच्या मूर्ति बसलेल्या स्वरूपांत असाव्यात. प्रत्येकीचे दोन हात, एक अभय आणि दुसरा वरद असून इतर हातांत आयुधे असावीत. कुंभकोणम्, एलोरा, बेलूर, अमरकंटक, एहोळ इत्यादि ठिकाणी मातृकांच्या मूर्ति असून त्यांच्या रक्षणासाठी एका बाजूला वीरभद्र व दुसरीकडे गणेश यांच्या मूर्ति कोरलेल्या आढळतील. बेलूर येथील शिल्प एलोरापेक्षा बरेच उजवे आहे. जेथे मातृकांची मंदिरे असतील, तेथे तेथे मूर्ति मानवस्वरूप आणि बसलेल्या स्थितीत आढळतात. आता या मातृकांचे स्वरूप थोडक्यात पाहू.

(१) ब्राह्मणी— चतुर्मुखी, सुवर्णवर्णी, पुढील हात अभय आणि वरद, आणि मागील दोन हातांत शूल आणि अक्षयमाला, हंसवाहन, रक्तकमलासनावर आरूढ, पितांबरवस्त्र, करंडक-मुकुट आणि कायम वस्तिस्थान-पलाशवृक्षाखाली. हे वर्णन अंशुभेदागमतंत्राप्रमाणे आहे. पूर्वकारणागम आणि विष्णुधर्मोत्तरपुराण हे दोन थोडे निराळे वर्णन देतात. रूपमंडणतंत्रामध्येही असेच वर्णन आहे.

(२) वैष्णवी— एकमुखी, श्यामवर्णी, दोन हात अभय व वरद दुसऱ्या दोन हातांत शंख व चक्र ही आयुधे, उन्नत वक्षःस्थळ, सुंदर मुख, रेखीव नेत्र, पीतवस्त्र, किरीटमुकुट, गरूडवाहन, विष्णूचे सर्व अलंकार धारण करणारी, कायम निवासस्थान राजवृक्षाच्या तळी. देवीपुराणात यापेक्षा थोडे निराळे वर्णन आहे.

(३) ऐंद्री— एकमुखी, त्रिनेत्री, चतुर्भुजा, रक्तवर्ण, दोन हात अभय व वरद आणि दुसऱ्या दोन हातांत वज्र आणि शक्ति ही आयुधे, गजवाहन, किरीटमुकुट, अनेक अलंकार धारण करणारी, कल्पक-वृक्षाच्या तळी वास करणारी. हे वर्णन अंशुभेदागमतंत्राप्रमाणे आहे, परंतु विष्णुधर्मोत्तरपुराणाप्रमाणे या मातृकेला एक सहस्र नेत्र असून सुवर्णवर्णी, सहा हात व त्यांमध्ये कमळ असावे असे वर्णन आहे.

(४) चामुंडा – त्रिनेत्री, चतुर्भुज, श्यामवर्ण, दोन हात अभय आणि वरद आणि दुसऱ्या दोन हातांत शूल व कपाल ही आयुधे, भरपूर व दाट केशकलाप, पद्मासन आणि गळ्यात मुंडक्यांची माला यज्ञोपवीतासारखी घातलेली, औदुंबर-वृक्षाच्या तळी वसतिस्थान. हे अंशुभेदागमतंत्रानुसार आहे. विष्णुधर्मोत्तराप्रमाणे तिचे वर्णन, प्रेतासनावर बसलेली, उग्ररूप आणि दातांचे सुळे बाहेर आलेले, कृश शरीर, खोलगट नेत्र, उदर सदाचेच रिकामे, दहा हात आणि दहा हातांत मुसळ, कवच, बाण, अंकुश, खड्ग, खेटक, पाश, धनुष्य, दंड व परशु ही आयुधे असे आहे.

(५) माहेश्वरी— पंचमुखी, चतुर्भुजा, शुभ्रवर्णी, दोन हात, एक अभय आणि दुसरा वरद, वृषभवाहना, किरीटमुकुटावर चंद्रकोर, आणि बिल्व-वृक्षाखाली वसतीस्थान असावे.

(६) कौमारी— ही षड्मुखी असून ती कुमार अथवा स्कंदाचे स्त्रीरूप होय. चतुर्भुजा, शुभ्रवर्णी, दोन हात, एक अभय व दुसरा वरद, मोरवाहन व ध्वजाचे चिन्हही तेच, याचिकयुक्त मुकुट आणि औदुंबरवृक्षाचे तळी कायम निवासस्थान. देवी-माहात्म्य ( ८१–१६३ ) यामध्ये मातृकेचे वर्णन असे की,

' कौमारी शक्तीहस्ता च मयूरवरवाहना ।' ही रक्त-वस्त्र परिधान करते आणि शूलही धारण करते असे मत्स्य पुराणात सांगितले आहे.

(७) वाराही— चतुर्भुजा, नीलमेघवर्णा, वराहमुखी, दोन हात, एक अभय आणि दुसरा वरद, दुसरे दोन हातात हल व शक्ति ही आयुधे, मस्तकावर प्रवाळयुक्त करंडमुकुट, विशाल उदर, गजवाहन व गजध्वजांकित, कल्पवृक्षाच्या तळी कायम वसतीस्थान.

(८) योगेश्वरी—चतुर्भुजा, शुभ्रवर्णा, दोन हात, एक अभय आणि दुसरा वरद, त्रिनेत्री, वृषभवाहना, चंद्रकोरयुतमुकुट, बिल्ववृक्षाच्या तळी कायम वसतीस्थान.

( T. A Gopinath Rao, Page 383-86 )

देवीपुराणान्तर्गत ' दुर्गाकवच ' या स्तोत्रामध्ये या मातृकांचे वर्णन आलेले आहे. तेथेही आठच मातृका दिलेल्या आहेत. परंतु योगेश्वरीचा उल्लेख ईश्वरी या नावाने केलेला आहे. या मातृकांचे कार्य ' दैत्यानां देहनाशाय ' हेच दिलेले आहे. या मातृकांनी निरनिराळ्या दिशाकडून होणाऱ्या आघातापासून संरक्षण करावे, अशी त्यांची प्रार्थना केली आहे. याशिवाय त्या स्तोत्रामध्ये शिरा, ललाट, भुवा, नासिका, कपोल, दंत, हृदय, जाध इत्यादि अवयवांच्या रक्षणासाठी एक एक मातृका दिलेली आहे. अहंकार, मन, बुद्धि तसेच रस, गंध, रूप याच्याही रक्षणासाठी मानलेल्या मातृका दिलेल्या आहेत.

या संदर्भात ' योगिनी हृदयदीपिका ' यातील योगिनीसंबंधीचा भाग असा की,

ज्ञातृज्ञानमयाकारमनन्तान्मन्त्ररूपिणी ।
तेषां समष्टिरूपेण पराशक्तिस्तु मातृका ॥ १ ॥
न तस्यं कार्यं कारणं च विद्यते । न तत्समश्चाभ्याधिकश्च दृश्यते ।
परस्या शक्तिः विविधैव श्रूयते । स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥ २ ॥
वाचकाक्षरसंयोगात् कथिता विश्वरूपिणी ।
तेषां समष्टिरूपेण पराशक्तिं तु मातृकाम् ॥ ३ ॥

या वचनाचा सारांश असा की, पंचभौतिक परिमाणुशक्ति आणि चैतन्यशक्ति यांनी नित्य युक्त असलेली जी ती योगिनी. या शब्दाचा पारिभाषिक, तांत्रिक व रूढ असा आशय या ठिकाणी आहे आणि या अर्थानेच तो येथे योजिलेला आहे. तसेच षट्चक्राधिष्ठित मातृशक्तीची आद्य जननी म्हणूनही योगिनी या शब्दाचा अर्थ आहे. मातृकांचे स्वरूप दृग्गोचर नाही. ते ज्याला

त्याला आपल्या ज्ञानशक्तीच्या जोरावर पाहाता येईल चैतन्यशक्तीचे सूक्ष्मातिसूक्ष्म किंबहुना अदृश्य स्वरूप म्हणजेच योगिनी आणि योगिनींचे परिणत स्वरूप म्हणजेच मातृका होत नरसोबाची वाडी येथे श्रीदत्तगुरूच्या सान्निध्यात ज्या चौसष्ट योगिनी अदृश्य स्वरूपात वावरतात, त्याचा संबंध तांत्रिक परिभाषेत चौसष्टकला म्हणजेच चौसष्ट सूक्ष्मशक्ति याच्याबरोबर असल्याने त्या चौसष्ट शक्तींना योगिनी हे नाव दिलेले आहे.

मातृकाचे एक स्वरूप आपण वर पाहिले याला दुसरीही बाजू आहे सर जॉन वुड्रफ तथा ऑर्थर ॲव्हेलोन हे तत्रशास्त्राचे अधिकारी म्हणून समजले जातात कलकत्ता येथील कालीदेवीच्या गळ्यात राक्षसाच्या मस्तकाची रूडमाळा दाखविलेली आहे कालीदेवीचा इतिहास पाहाताना आपणाला दिसून आलेच आहे की, शरत्चूडाबरोबर झालेल्या युद्धात तिने अनेक दैत्यांचा नाश केला आणि त्या मारलेल्या दैत्याच्या मस्तकाची माळ करून ती आपल्या गळ्यात धारण केली परतु याच गोष्टीचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून सर जॉन वुड्रफ असे विवरण करतात की, ही रूडमाळा म्हणजे एक रूपक आहे संस्कृत स्वर व्यंजनाची वर्णमाला ५२ अक्षराची आहे या मालेमध्ये 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतची अक्षरे येतात परतु जो 'ज्ञ' म्हणजे ज्ञाता झाला, त्याला अवांतर गोष्टींची जरूरी नसते किंबहुना 'ज्ञ' पर्यंत जाण्यासच इतर वर्णांची आवश्यकता असावी लागते, यामुळे या वर्णमालेत "ज्ञ" ची गणना करीत नाहीत आणि त्या सर्वांची संख्या ५१ मानली जाते ही वर्णमाला म्हणजेच मातृका होत

काही शक्ति भैरवाच्या सहधर्मचारिणी म्हणून मानलेल्या असून, त्या याच्या किरणापासून उत्पन्न झालेल्या आहेत या शक्तींचे वर्गीकरण करताना काही अक्षरसमूह मानलेले असून, प्रत्येक वर्गाची एक एक देवताशक्ति मानलेली आहे त्याचे वर्ग आणि देवता येणेप्रमाणे—

अवर्गे तु महालक्ष्मी, कवर्गे कमलोद्भवा ।
चवर्गे तु महेशानी, टवर्गे तु कुमारिका ।
नारायणी तवर्गे तु, वाराही तु पवर्गिका ।
ऐन्द्री चैव यवर्गस्था, चामुण्डा तु शवर्गिका ॥
एता सप्त महामातृका सप्तलोकव्यवस्थिता ॥ (स्वच्छन्द, प्रथम पटल)

वरील उताऱ्यात जरी सात महामातृका आहेत असे सांगितले असले तरी मत्स्यात मात्र त्या आठ आहेत ब्राम्ही योगिनी आणि ब्राह्मणी या नावा

ऐवजी येथे वाराही आणि महालक्ष्मी यांची नावे आली आहेत. हा पाठभेद ध्यानात ठेवण्यासारखा आहे.

या मातृकांच्या मूळ रूपाचीच पुढे अक्षरमाला व वर्णमाला तयार होते. ज्याचे स्वरूप पुढे विस्तार पावते, त्याच्या मूळ स्वरूपाला मातृका हे नाव दिलेले आहे. एक माता अनेक मुलांना जन्म देते, वृक्षाच्या एका बीजापासून अनेक बीजे तयार होतात, एक मच्छी सहस्त्रावधि अंडी घालून प्रजा निर्माण करते, म्हणजे एका मातृस्वरूपापासून अनेकांचा विस्तार होत जातो. त्या मूळस्वरूपालाच मातृका असे म्हटले जाते. ह्याच कारणास्तव सर जॉन वुड्रॉफ म्हणतात की, मातृकांच्या प्रतिकात्मक असलेली ही माला आदिमाया कालीच्या गळ्यात बांधलेली आहे.

अक्षरवर्ण मालेतील क पासून जी वर्णमाला आहे, त्या प्रत्येकाला देवता मानून तंत्रकारांनी त्या त्या देवतांचे वर्णन केलेले आहे. उदाहरणार्थ च आणि ट वर्णांचे वर्णोद्धार तंत्रातील हे वर्णन पहा—

> तुषारकुन्दपुष्पाभां, नानालंकार भूषिताम् ।
> सदा षोडशवर्षियां, वयाभरकरां पराम् ॥
> शुक्लवस्त्रावृतकटिं, शुक्लवस्त्रोत्तरीचिणिम् ।
> वरदां शोभनां रम्यामष्ट बाहु समन्विताम् ॥

भावार्थ असा की, तुषार अथवा कुंद कांतीच्या विविध अलंकारांनी भूषित असलेली, सोळा वर्षे वयाची, सदैव अभय आणि वरदा मुद्रा दाखविणारी, पांढरे वस्त्र नेसलेली आणि पांढरे उत्तरीय धारण करणारी, सुंदर आणि एकूण आठ हात असलेली ही चकारात्मक देवी, ध्यानपूर्वक दहा वेळा वरील मंत्राचे पठण केल्यास भक्तांना इच्छित वरप्रदान करते—

वर्णोद्धार तंत्राप्रमाणे टकारमूर्तीचे वर्णन पहा—

> मालतीपुष्पवर्णाभां पूर्णचंद्रनिभेक्षणाम् ।
> दशबाहुसमायुक्तां सर्वालंकारसंयुताम् ॥
> परमोक्षप्रदां नित्यां सदा स्मेरमुखीं पराम् ।
> एवं ध्यात्वा ब्रह्मरूपां तन्मंत्रं दशधाजपेत् ॥

भावार्थ असा की, टकार देवता दशभुजा, सर्वलंकारभूषित नित्य हास्यमुख, मालती पुष्पाचा वर्ण आणि पूर्ण चंद्राप्रमाणे नेत्र असलेली आहे. हिचा दहा वेळा जप करावा.

मधुराद्वैताचार्य व गुलाबराव महाराज चरित्रांत ( पै, मिलिंद ) या मातृकांविषयी उल्लेख आहे पण तो शरीरातील कुंडलिनी शक्तींनी जी आधारचक्रे आहेत, त्यांना अनुलक्षून आहे. तो असा—

आधारीं त्या चार मातृका । देव गणपती असे ॥
स्वाधिष्ठान चक्रीं सहा मातृका । ब्रह्मदेव तेथे असे ॥
मणिपुरावरी दहा मातृका । लक्ष्मीपती राहतसे ॥
अनाहत चक्रीं मातृका बारा । शूलपाणी शिव वसे ॥
विशुद्धिच्या चक्रीं मातृका सोळा । आज्ञाचक्री असती दोन ॥
(पृ. ४९)

महाराजांनी हे काव्य वयाच्या चवदाव्या वर्षी केले आणि कुंडलिनी शक्ति जागृत करीत असताना त्या त्या चक्रावर मातृकांची स्थापना केलेली आहे[1]. योग शास्त्रात या मातृकांचा नेमका अर्थ कोणता, हे जरी लेखकाला विशद करता येत नसले, तरी असा अर्थ जाणकारांनी सांगितला की कुंडलिनी जागृत करण्याचे मार्गात जी चक्रे वर महाराजांनी वर्णन केली आहेत त्या प्रत्येकावर जी बीजाक्षरे आहेत, त्यानाच मातृका म्हटले आहे. जसे आधारी चक्र चार पाकळीचे कमळ असल्याने त्याचे प्रत्येक पाकळीवर एक एक बीजाक्षर आहे. जे या शास्त्रातले ज्ञाते आहेत, त्यांच्या जवळ या सर्व चक्रांचा अतिशय सुंदर, काटेकोर आलेख तयार असून त्यायोगे ते जिज्ञासूंच्या शंकांचे निरसन करू शकतात, हे लेखकाने अनुभवले आहे ज्या अर्थी गुलाबराव महाराज इतक्या बालवयात हे सर्व जाणत होते, त्या अर्थी त्यांनी शक्तिदेवीची उपासना केलेली असली पाहिजे असे मानण्यास हरकत नसावी

हेच गुलाबराव महाराज नंतरच्या आयुष्यात आपणाला ज्ञानेश्वर महाराजांची कन्या म्हणवून घेत आणि लुगडे, चोळी, बांगड्यांचा पेहराव करीत असत. याचाच अर्थ ते स्वतः शक्तिरूपिणी बनत असत, असा घेतला तर योग्य होईल. काली मातेची उपासना करणारे रामकृष्ण परमहंसही हातात कंकणे घालीत असत. गेल्या शतकात काही शक्तिपूजक महाराष्ट्रातही कंकणे घालीत असल्याचे लेखकाला सांगण्यात आले आहे. या व्यक्तींना सर्व जगच शक्तिमय दिसे आणि देवीच रूपात ते आनंदमय असत हाच त्याचा मतितार्थ होय

१ टीप— शक्ति आणि तत्त्वज्ञान प्रकरणातील पृ. ४३ पहा.

मातृकाभेद या नावाचे एक तंत्र आहे. कलकत्ता येथील संस्कृत विद्यालयासाठी श्री. चिंतामणी भट्टाचार्य यांनी ते संपादित केले आहे. 'मातृकाभेद' या नावातील 'मातृका' या नावावरून वाचकांची फसगत होण्याची शक्यता आहे. या तंत्रामध्ये सृष्टितत्त्वाची उत्पत्तीपासून लय होण्यापर्यंतची क्रिया, राजशासनाचे नियम, वैद्यक व विज्ञान यांची माहिती, योग व मनतंत्राचे विवेचन, देवतांची उत्पत्ति व पूजन, अनेक भुवनांचा विचार, स्त्री पुरुषांचे संबंध, वेदोक्तकर्मापेक्षा तंत्रमार्ग सर्वांना उपलब्ध व सुलभ कसा ह्याचे विवरण आणि विशेषत पंचमहाभूतांचे खनिज पदार्थांपासून सोने, चांदी, पारा कशी बनविता येतात यांची माहिती दिलेली आहे. थोडक्यात हे तंत्र किमयाविद्येचा अभ्यास सांगते. यावरून असे दिसेल की, मातृका या देवतांबरोबर या तंत्राचा मुतराम् संबंध नाही हे वाचकांनी ध्यानी धरावे.

गोरेगांवातील एक शक्तिउपासक श्री. दादा पेंडसे यांनी आणखी एक व्युत्पत्ति सांगितली. नाशिक जिल्ह्यामध्ये पूर्वेला सप्तशृंगी तर पश्चिमेला ब्रह्मगिरी पर्वत आणि त्र्यंबकेश्वर ही क्षेत्रे आहेत. या दोन क्षेत्रामधील अंतर ५१ मैल आहे. नवनाथ पंथातील नाथांनी कोठेही गुरुदीक्षा घेतली तरी त्यांना त्र्यंबकेश्वर–सप्तशृंगी ही परिक्रमा ५१ वेळा करावी लागे. याच भूमीमध्ये साधना केली असता त्यांना सिद्धि प्राप्त होत असे, म्हणून या भूमीला कर्मभूमी असे म्हटले जाते सप्तशृंगी येथील आदिमायेची साधना केली जात असल्याने या ५१ संख्येला मातृका म्हणून मानले गेले

मातृकांच्या संख्येबद्दल ते म्हणाले की, पूर्वी भास्करराय नावाचे एक महान शाक्तपंथी होऊन गेले त्यांच्या मते मातृकांची संख्या १,६४,००० असून त्यांची नावेही त्यांना अवगत होती. पण सांप्रत त्यांची नोंद कोठेही आढळत नाही असे जर आहे तर ही संख्या खाली ७–८ पर्यंत का आली? ह्याचे कारण इतकेच देता येईल की, एवढी असंख्य नावे प्रचारात रूढ ठेवणे अशक्य वाटल्याने ज्या ज्या साधकाला जी जी प्रिय वाटली ती ती त्याने रूढ केली. ही संख्या आठापेक्षा जास्त आहे हे आपल्याला शिवनिर्मिती मातृकांच्या नावावरून समजू शकते

मातृका या शिव व विष्णुनिर्मित आहेत. त्या शिव व विष्णु यांची प्रतीके आहेत किंबहुना मातृका या त्या देवतांची नारीशक्ति आहेत. याचसाठी त्यांच्या मुखांची संख्या त्या त्या देवतेप्रमाणे आहे. कौमारीची सहा मुखे अगर माहेश्वरीची पाच मुखे हीच त्यांची साक्ष देते तसेच ती यांची म्हणजे त्या त्या मूळ

प्रकृतीचीच आहेत. येणेप्रमाणे मातृकाची उत्पत्ति व त्याचे कार्य याचे हे थोडक्यात स्वरूप आहे.

मातृकाची कल्पना भारतामध्ये आहे असे नाही भारताच्या शेजारी तिबेट देश, जरी बौद्धधर्मीय असला तरी त्याच्या धर्मातही मातृकाची पूजा होते. तेथेही गौरी, चौरी, चाडाळी, वेताळी, प्रमो, पुष्काशी, शोनामा आणि घासमारी या आठ मातृका आहेत.

मेडिटरेनियन वश मातृकाची पूजा करीत असे त्याची नावे येणेप्रमाणे, ऑग्झिनी, डेरव्होनी, निस्काई, मेरी, मॅथोनी, मेट्रिस आणि कॉडूव्हि ही होत. काही काळ या देवता ब्रिटन आणि कोलोनमध्ये अतिशय लोकप्रिय होत्या. वेल्समध्ये याना 'सेवन मामन्स' या नावाने संबोधित असत काही संशोधकाचे असे मत आहे की, केल्टिक व ट्युटोनिक हे युरोपातील जे प्रसिद्ध वंश होते आणि अजूनही आहेत, त्याच्याही पूर्वीच्या देवता याच असाव्यात सारांश इत काच की, सप्तमातृका या भारताप्रमाणे इतर देशातही रूढ होत्या

या मातृकाच्या अनेक मंदिरापैकी एक मंदिर नर्मदा नदीच्या तीरावर मांधाता पर्वतराजीमध्ये आहे. या क्षेत्री अनेक देवस्थाने आहेत आणि मुख्य प्रदक्षिणा घालण्यासाठी सुमारे तीन मैल चालावे लागते. या ठिकाणी कुबेर भंडारी या स्थानाजवळ मातृकाचे मंदिर आहे. नर्मदानदीचा प्रवाह येथे नावेत बसून ओलाडावा लागतो, आणि मगच आपल्याला ब्राह्मी, वाराही, चामुंडा इत्यादि मातृकाचे दर्शन होते.

दक्षिणेत धनुष्यकोटी–मद्रास लोहमार्गावर अय्यमपेठ या नावाचे एक स्थानक आहे या स्थानकाच्या जवळच चक्रपल्ली या गावी सात मातृकाचे मंदिर आहे. अधकासुरवधाच्या वेळी ज्या मातृका उत्पन्न झाल्या त्याच या ठिकाणी वास्तव्य करून आहेत अशी भक्ताची श्रद्धा आहे. या मातृकादेवींच्या मंदिराच्या परिसरात सात शिवलिंगे आहेत, त्यामुळे मातृका आणि शिवलिंगे याच्या जोड गोळ्या लगेच नजरेत भरतात (अय्यर, पृष्ठ ८१) मातृकाच्या छायाकृति साधारणत मानवाच्या आकाराच्या असतात

तारापूर (जिल्हा बुलढाणा) या गावी देवीचे एक प्राचीन स्थान आहे. मंदिर विटाचेच बांधलेले आहे. सभागृहाच्या आतील बाजूस जो सज्जा आहे त्यामध्ये ब्राह्मी, वैष्णवी, माहेश्वरी आदि सप्त मातृकाच्या मूर्ति आहेत. या मंदिरामध्ये काही प्राचीन शिलालेखही आहेत नवरात्रामध्ये या ठिकाणी यात्रा भरते (बुल्ढाणा जिल्हा गॅझेट, पृ. ४९८)

पुण्यापासून २६ मैल अंतरावर ७०० फूट डोंगरमाथ्यावर यवतेश्वर नावाचे एक ठिकाण आहे. या मंदिराचे शिल्प तेराव्या शतकातील आहे. मुख्य मंदिराच्या सभोवार ओवऱ्या असून त्यामध्ये अनेक मूर्ति बसविलेल्या आहेत त्यापैकी १० ओवऱ्यामध्ये मातृकांच्या मूर्ति आहेत माणसाचा सहज हात न पोहोचावा इतक्या उंचावर त्यांची मांडणी केलेली असून अनेक ठिकाणी मूर्तींची पुनरावृत्ति झालेली आढळते. याचे कारण असे संभवते की, एक मूर्ति फुटली, नाश पावली, तर दुसरी कृति तेथे शिल्लक रहावी. या मूर्ति मानवी आकाराप्रमाणे विशाल आहेत. ऐंद्री, वाराही चामुंडा, वैष्णवी, कौमारी, माहेश्वरी व ब्राह्मी या सप्त मातृका तर आहेतच, पण आठवी मातृका गणेशी अथवा विनायकी दाखविली आहे. कदाचित् आसमंतात अष्टविनायकाची स्थाने आहेत, त्याचा प्रभाव शिल्पकारावर पडलेला असावा.

पहिला बाजीराव पेशवा याचे गुरुजी ब्रह्मेंद्रस्वामी यानी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला, यामध्ये या शिल्पाचाही केला आणि सुमारे एक लाख रुपये खर्च करून सन १७३७ चे सुमारास हे काम पूर्ण केले

(प्र. ल. सासवडकर, केसरी पुणे, ११-२-६४)

एके वेळी देव-दानवाच्या युद्धप्रसंगी शंकराच्या अंगातून ज्या घर्मधारा निघाल्या त्या भिमाशंकर ( पुणे ) या ठिकाणी पडल्या आणि त्याच्या परिसरात जी विश्रांति स्थाने लढाईच्या धुमश्चक्रीच्या वेळी होती, त्या कोकमठाण, मातुळठाण भामाठाण, नागठाण, बादाठाण, प्रतिष्ठाण, याही ठिकाणी घर्मबिंदु पडल्याने या सर्व ठिकाणी मातृका निर्माण झाल्या. यास्तव ही क्षेत्रेही मातृकास्थाने म्हणून प्रसिद्ध आहेत. (गोदावरी महात्म्य, ले. दासगणू, पृ ७३)

टिळकवाडा ( बडोदा राज्य ) या गावी एक सप्तमातृकाचे मंदिर आहे. या मंदिराशेजारीच तिळकेश्वर महादेवाचेही मंदिर आहे.

बेटवा व बेश ( जिल्हा भेलसा ) या दोन नद्यांच्या संगमापासून चार मैलांवर उदयगिरी या नावाचे क्षेत्र आहे. डोंगरांमधील लेण्यासाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे. तेथे एका लेण्यामध्ये सप्तमातृकांच्या मूर्ति खोदलेल्या आहेत.

मातृका या फार प्राचीन आहेत, या विधानाला पुरावा मोहेंजोदरो येथील उत्खननामध्ये आढळतो. या उत्खननात मातीच्या लहान लहान अनेक पुतळ्या सापडल्या आहेत. एकीच्या अंगावर तर भरपूर अलंकार असून तिच्या डोक्यावर पंख्याच्या आकाराचा मुकुट आणि दोन्ही बाजूला खुपाटण्याप्रमाणे मातीचे पेले ठेवलेले आहेत. या पेल्यामधून त्या काळी जाळलेल्या धुपाचे डाग अद्यापीही

या पेल्यावर दिसून येतात. त्या पुतळ्या जरी किंचित् विद्रूप झालेल्या असल्या तरी त्या मातृकाच्या निदर्शक होत, असे मानावयास भरपूर जागा आहे

मध्य पूर्वेतील इराक शहरी वस्तुसंग्रहालयामध्ये सप्त मातृकांच्या मूर्ति ठेवलेल्या आहेत. समरा येथील उत्खननामध्ये त्या आढळल्या. असे मत आहे की, त्या मूर्ति सनपूर्व सहा हजार वर्षांपूर्वीच्या असाव्यात. एकाच बैठकीवर या मूर्ति नसून अलग अलग आहेत. या मूर्तीचे जे छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे (पुणे, केसरी ७–५–६७), त्यामध्ये काही मूर्ति उभ्या तर काही गुडघे टेकून उभ्या आहेत. चार मूर्तींच्या मस्तकावर आच्छादन असून तिन्हींच्या वर काही दिसत नाही. यावरून असे अनुमान काढता येते की, हराप्पा येथील संस्कृतीच्या पूर्वीही या मूर्ति अस्तित्वात होत्या. त्या देशातूनही सप्त मातृकाबद्दल धार्मिक भावना वसत होती, याचीच साक्ष त्या मूर्ति देत आहेत.

वैदिक हिंदूंच्या विवाहादि संस्कारामध्ये मातृकाचे पूजन देवक ठेवताना करावे असे शास्त्रवचन आहे आणि ती रूढि आजही प्रचलित आहे. मुख्य देवताच्या पूजनाच्या वेळी त्याच्या परिवार देवताचे पूजन होणे हे क्रमप्राप्तच आहे.

सारंगा

साम्निध्य ज्या नर्मदेच्या प्रवाहास ।
माधांत नामे गिरी उंच माथ्यास ॥
विख्यात चामुंड, ऐंद्रि, कुमारीस ।
वंदितसे मातृका सप्त–देवींस ॥ १ ॥

---

# मंत्र–तंत्र–यंत्रदेवता

## मंत्रदेवता

मंत्रशक्ति ही मन सामर्थ्यावर अवलंबून असून मन हे पंचमहाभूतांतर्गत अव्यय तत्त्वाचे सूक्ष्म अंग आहे. काही शब्दसमूह विशिष्ट प्रसंगी वापरले अगर उच्चारले तर ते दुसऱ्याच्या अंगी सामर्थ्य उत्पन्न करू शकतात. उदाहरणार्थ, ज्याप्रमाणे 'जय भवानी, जय अंबे' अथवा 'हरहर महादेव' हे परवलीचे शब्द उच्चारले म्हणजे समरभूमीवर मराठ्यांना एक प्रकारचा चेव चढत असे आणि दुप्पट—नव्हे अगणित पट उत्साहाने ते आपल्या शत्रूवर तुटून पडत असत. तसेच 'अल्ला हो अकबर' या शब्दाने यवनी रक्त सागरासारखे उसळ्या घेत असे. त्याचप्रमाणे मानवाने काही एका विशिष्ट शब्दसमुच्चयाचा उच्चार केला म्हणजे पशुसृष्टि अगर इतर जीवसृष्टीवर त्याचा परिणाम होतो. दि. ४-११-६६ रोजी वर्तमानपत्रात बातमी आली की, नाशिकजवळ एका गावी 'वडा' शब्द उच्चारला, म्हणजे एक गाय शब्द उच्चारणाराच्या मागे मारण्यासाठी धावते, कदाचित् तो शब्द तिला आवडत नसावा, चीड आणीत असावा. मंत्रशक्ति ही प्रकाशमय आहे. शब्दसमूह उच्चारणाऱ्याला त्या शब्दाचा अर्थ समजो वा न समजो, परिणाम व्हावयाचा तो होतोच. त्याप्रमाणे मंत्रोच्चारापासून ही जी एक शक्ति मानवाला प्राप्त होते, तिलाच मंत्रसिद्धि असे म्हणतात.

काही वर्षांपूर्वी अवकाशातून विद्युत्शक्तीचे अस्तित्व आहे, हे जर कोणास सांगितले असते, तर ते त्यास पटले नसते. परंतु रसायन आणि पदार्थ-विज्ञान या दोन शास्त्रांच्या साहाय्याने प्रयोगशाळेत निरनिराळे प्रयोग केल्यावर रेडिओ, दूरध्वनि या यांत्रिक साधनांच्या निर्मितीने या शक्तीच्या अस्तित्वाची जाणीव करून देता आली. योगविद्येत पारंगत असलेला इसम आपल्या मनोवहा नाडीवर ताबा चालवून काही काळ हृदयक्रिया थांबवू शकतो. एका विवक्षित ठिकाणच्या नाडीतून वाहणारा रक्तप्रवाह बंद करू शकतो. प्रो. एकनाथ मूर्ति किंवा ताराबाई हे सर्कशीमध्ये काम करीत असता लेखकाने असा एक प्रयोग पाहिला आहे की, तळहातावर बंदुकीने गोळी मारली तर ती शरीरात न शिरता चपटी बनून खाली पडे. रक्तवाहिन्या बंद करण्याची जी सिद्धि त्यांना प्राप्त झाली होती, त्यावरच ही क्रिया त्यांना करता येत असली पाहिजे. योगविद्या-विशारदांना मात्र यात काही नावीन्य दिसत नाही. काही चमत्कार भासत नाही पण इतरांना मात्र हा चमत्कार जरूर तोंडात बोटे घालावयास लावतो.

मानवाने मानसिक सामर्थ्य वाढवून भूलोकावरील जडसृष्टीची मने आकर्षून घेतली म्हणजे जसा तो त्यावर ताबा गाजवू शकतो, तद्वतच प्राणी सृष्टीवर देखील गाजवू शकतो त्या सृष्टीतील इतर प्राण्यांबरोबरच वाघ, सिंह, सर्प इत्यादी हिंस्र प्राण्याना देखील तो आपल्या मनाप्रमाणे वागवू शकतो रमण महर्षींचे उदाहरण तर अगदी अलीकडील आहे. त्यांच्या बैठकीच्या ठिकाणी एक वाघ नेहमी त्यांच्या सान्निध्यात असे, असे सांगतात जडसृष्टीतील उदाहरणे तर आपण नेहमी पाहतोच चंद्रप्रकाश जितका जास्त पडेल तितकी सागराला अधिकाधिक भरती येते कारण ती शक्ति सागराचे पाणी आकर्षून घेत असते भरतीच्या परिणामावरून ती शक्ति आपल्याला कळू शकते असे सांगतात की, लांडगा जर शेळीच्या अंगाला स्पर्श करून नेला तर तो शेळीला आकर्षित करतो आणि मुकाट्याने ती शेळी त्या लांडग्यामागे चालत जाते एकदा एक मनुष्य मगरीच्या भयामुळे झाडावर चढून बसला त्याची वाट पाहात ती मगर त्या झाडाखाली आपल्या भक्ष्यावर सतत लक्ष ठेवून बसली त्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी इतरांनी पुष्कळ प्रयत्न केले दोरीचे साहाय्य घेऊन त्यांनी त्याला दुसऱ्या वृक्षावर येण्यास सांगितले पण

पाश्चिमात्य लोक ज्याला मेस्मेरिझम्, स्पिरीट मेसेज अगर प्लँचेटविद्या असे म्हणतात ती विद्यासुद्धा मंत्रशास्त्राचाच एक भाग आहे. एकाग्रतेच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवून, दुसऱ्याच्या मनावर ताबा मिळवून ते प्रयोग करीत असतात. अनेक वेळा ते यशस्वी होतातच. म्हणजे त्यांना ती मंत्रसिद्धि प्राप्त झालेली असल्याने ते यशस्वी प्रयोग करू शकतात.

परंतु मंत्र आणि मेस्मेरिझम ( इच्छाविनिमय ) हे एक नाहीत असे ध्यानात असावे. कारण उघडच आहे. मंत्राचा अर्थ जरी साधकाला माहीत नसला, तरी त्याच्या पठणाने फलप्राप्ति होते, पण इच्छा-विनिमयाचे प्रयोगात इच्छुकाची भावना लक्षात घ्यावी लागते. कारण ही एक जीवशक्ति आहे. मंत्र ही परमेश्वराची शक्ति आहे आणि यासाठीच मंत्रावर विश्वास ठेवणे म्हणजे परमेश्वराचे वर्णावर विश्वास ठेवण्यासारखे आहे.

ज्याप्रमाणे साक्षात् ईश्वर कधीच कोणाला दिसत नाही पण त्याच्या अस्तित्वाची जाणीव अनेक वेळा अनेक प्रसंगी होते.

हेच अगदी ताजे उदाहरण पहा. कोल्हापूरपासून २० मैलांवर बाहुबलीचा २८ फूट उंचीचा, उत्तम शिल्पाचा पुतळा चार वर्षांपूर्वी बसविलेला आहे. या पुतळ्यावर दि. २०–१०–६६ पासून सतत तीन आठवडे, दुपारी १०–३० ते १ पर्यंत आकाशातून केशरमिश्रित चंदनाचा अभिषेक होत असतो. या ठिकाणी दिगंबर पंथी जैन साधु सुमतभद्र यांचा आश्रम आहे. हा चमत्कार पाहण्यास आजुबाजूचे हजारो नागरिक येत असतात आणि नेत्रांचे पारणे फेडून घेतात. सतत तीन आठवडे, ठराविक वेळी अभिषेक होणे, यालाच ईश्वराच्या अस्तित्वाचे प्रतीक मानावे लागते. वैज्ञानिक दृष्टीकोनातून याला उत्तर सापडणे कठीण. तो दयाघन परमात्मा, अशा अनेक रूपाने आपले अस्तित्व दाखवीतच असतो. ( नवशक्ति, दि. ९–११–६६ ).

तद्वतच प्रयोगाच्या परिणामांवरून मानवाला मंत्रशक्तीची जाणीव होते. त्या विद्येचा लोप झाला असे म्हणणे बरोबर नाही. फक्त सामर्थ्य कमी झाले इतकेच.

मंत्र म्हणजे काय ?—एखाद्या गुह्य गोष्टीचे ज्ञान मिळविणे आणि त्यावर काही शब्दसमूहांच्या साहाय्याने ताबा मिळविणे, हाच मंत्र या शब्दाचा अर्थ आहे. विशिष्ट शब्दसमूहाचा उच्चार करून देवतांचे आवाहन करणे, अगर नाना प्रकारची वर्णयोजना करून नाना प्रकारची इष्ट फळे प्राप्त करून घेणे, ज्या क्रियेने घडते अगर घडविता येते त्याला मंत्र म्हणावे. अशा वर्णांची व शब्दसमूहांची रचना आपल्या ऋषींनी पूर्वीच करून ठेविली आहे.

**मंत्रांचे प्रकार**—ज्या मंत्राचा उच्चार मोठयाने केला जातो तो व्यक्तजप होय. ओठातल्या ओठात उच्चार हळू करावयाचा, इतका की, तो दुसऱ्यांना मुळीच ऐकू जाणार नाही, अशा प्रकारे केलेल्या जपाला उपांशुजप असे म्हणतात. तिसरा प्रकार म्हणजे मनातल्या मनात मंत्राचा उच्चार करावयाचा, त्याला मानसजप असे म्हणतात.

**मंत्रांच्या जाति**—मंत्राच्या तीन जाति आहेत. बीजमंत्र, मूलमंत्र व मालामंत्र. मूलमंत्र म्हणजे जो शब्दसमूह जाणकाराने तयार केला त्याला मूलमंत्र असे म्हणतात. ज्या जपाचे पठण अथवा मनन माळेच्या सहाय्याने केले जाते त्याला मालामंत्र असे म्हणतात. बीजमंत्राची उत्पत्ति पुढीलप्रमाणे. वेदाचा बीजमंत्र ऐं बीज हा आहे. वेदग्रंथाच्या आरंभीच्या स्वरानी हा बनविलेला आहे. 'अग्निमीळे' (ऋग्वेद) यातील सुरवातीचा 'अ' स्वर, 'इषेत्वोर्जेत्वा' (यजुर्वेद) यातील 'इ' स्वर, 'अग्न आयाहि वीतये' (सामवेद) यातील 'अ' स्वर आणि 'शन्नोदेवीरभिष्टय' (अथर्ववेद) यातील अनुस्वार, हे चार स्वर म्हणजे अ + इ + अ + अनुस्वार मिळून 'ऐं' बीज तयार झाले. त्याचप्रमाणे ॐ, ईं, क्लीं, श्रूं, ऱ्हीं इत्यादि बीजे, मूलस्वराने तयार झालेली आहेत.

प्रत्येक देवतेचे बीजमंत्र निराळे आहेत. जसे, गं गणपते, ऱ्हीं माया, श्रीं लक्ष्मी, क्रीं काली, दुं दुर्गा, हुं छिन्नमस्ता, धूं धूमावती इत्यादि इत्यादि. 'हुं फट्' हे शब्द मंत्राच्या शेवटी असतील, तर तो पुरुषमंत्र जाणावा आणि 'स्वाहा, स्वधा' असतील, तर स्त्रीमंत्र जाणावा. 'नमः' शब्द असेल, तर तो नपुंसकमंत्र जाणावा. यासंबंधी एक मंत्र असा—

वषडन्ताः फडन्ताश्च पुंमांसो मनवः स्मृताः ।
वौषट् स्वाहान्तिका नार्यो हुं नमोऽन्ता नपुंसकाः ॥

पुरुषमंत्राचा उपयोग वशीकरण, उच्चाटण, रोधन इ० इ० साठी केला जातो, तर स्त्रीमंत्राचा उपयोग रोगशांति, दुःखनिवारण यासाठी केला जातो.

दहा अक्षरांपर्यंतच्या मंत्राला मूलमंत्र असे म्हणतात. वीस अक्षरांपर्यंतच्या मंत्राला पिंडमंत्र असे म्हणतात आणि वीस अक्षरांपेक्षा जास्त अक्षरे असणाऱ्या मंत्राला कर्तरीमंत्र असे म्हणतात.

आहे. इतनाऐवजी कोणी अधिक जपसंख्या अगर पाठसंख्या सांगतात. पण सिद्धि मिळण्याच्या दृष्टीने ते इष्ट नव्हे, हे वाचकांनी ध्यानी असू द्यावे.

**मंत्रसिद्धि कोणास होते?**— मंत्रसिद्धि होण्यास साधकाला अतिशय कडक व नियमबद्ध आचरण ठेवावे लागते. ब्रह्मचर्य, शुचिर्भूतपणा व इंद्रियनिग्रह या तीन गोष्टींवर प्रामुख्याने भर द्यावा लागतो. तनमनधनकरून देवतांची आराधना करणे आवश्यक असते. मंत्रसिद्धीच्या प्राथमिक अवस्थेत साधकाला अतिशय त्रास सोसावा लागतो. देवता साधकाला भिवनितात. अनेक संकटे कोसळतात. शेवटी शेवटी हा त्रास इतका पराकोटीला पोहोचतो की, त्यामुळे वैतागून हा मार्ग सोडून द्यावा असे साधकाला वाटू लागते. पण या प्राथमिक अवस्थेतच या जन्मीच्या व पूर्वजन्मीच्या पापाचा नाश झाल्याशिवाय तो दुसऱ्या अवस्थेत जाऊ शकत नाही. पुष्कळ दिवस धूळ खात पडलेला एखादा तांब्या आपण उचलला नि त्यावरील धूळ झटकून टाकली की तो जसा लख्ख होऊन पूर्वतेजाने चकाकू लागतो, तद्वतच जसजशी जपसंख्या वाढत जाते, तसतशी आत्म्यावरील पापाची व दुष्कृत्याची जळमटे निघून जाऊन आत्मा पुनरपि चकाकू लागतो. याचाच अर्थ तो दैवी इष्टात मिळण्यास पात्र होतो आणि मग दुसऱ्या काळात इष्टात होतात. तदनंतर हरवलेले काहीतरी गवसल्यामुळे कधी नव्हे, इतका उत्साह, उल्हास आणि समाधान वाटू लागते. मराठवाड्यात राक्षसभुवन येथे एक शनीचे मंदिर आहे. मंदिरातील मूर्ति भव्य आहे. एकदा तेथे एका साधकाने शनीची उपासना चालविली असता, प्राथमिक अवस्थेत त्याच्यावर कर्कश शब्दांचा भयंकर मारा झाल्यामुळे घाबरून तेथून तो पळूनच गेला, असे उदाहरण प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाला ठाऊक आहे. तेव्हा गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे,

> अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
> दयाभूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ (अध्याय १६, श्लो २)

अशी साधकाने आपली वर्तणूक ठेविली पाहिजे तरच निसाव्या शतकात देखील मंत्राचा प्रभाव पडू शकेल. हनुमान, दत्तात्रय, शाबर (शंकराचे भिल्लस्वरूप), कप्पालिक (नाथ संप्रदाय), गरूड इ० इ० अनेक देवतांचे मंत्र प्रचलित आहेत. साधकाने त्याच्या उपास्य देवता प्रसन्न करून घेतल्यावर मग त्यांच्या सामर्थ्यावर अगर साध्या रामनाम जपावरसुद्धा पोटशूळासारख्या रोगांचे उच्चाटन करता येते, असे एक उदाहरण गोरेगाव (मुंबई) येथे घडल्याचे प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाच्या पाहण्यात आले. डॉक्टरांने देखील आशा सोडून दिली होती असा तो रोगी त्या साधकाने अवघ्या आठ दिवसांत ठणठणीत बरा केला.

मंत्रशास्त्रासंबंधी विवेचन करताना न्यायरत्न विनोद एके ठिकाणी म्हणतात, 'भारतवर्ष हे मंत्रविद्येचे माहेरघर आहे. भारतीय संस्कृतीमध्ये विस्तारलेला 'मंत्रमहार्णव' हा असीम व अजोड ग्रंथ आहे. मंत्र या धातूचा मूळ अर्थच 'आवाहन करणे' असा आहे. वैदिक मंत्रांनी निरनिराळ्या देवतांना आवाहन करतात. हे आवाहन इष्ट फलाच्या सिद्धीसाठी अथवा अनिष्टाच्या निवारणार्थ केलेले असते. मंत्राच्या उच्चाराने आवाहित देवता उपस्थित होतात आणि अपेक्षित फलाची सिद्धि करून देतात.

'मननत्राणसंयुक्तो मंत्र इत्यभिधीयते ।' या विद्यारण्य स्वामींच्या सूत्रामध्ये अतिशय गुढार्थ भरलेला आहे. मंत्र या शब्दातील मन या घटकांगावरून मंत्रविद्या ही मननिष्ठ आहे, विचारनिष्ठ आहे. म्हणजेच या विद्येचे अधिष्ठान बौद्धिक, वैचारिक आहे, हे आपोआपच सिद्ध होते. मंत्रविद्येने देवतांचे आवाहन, तंत्रविद्येने आत्मकल्याण आणि परोपकार व यंत्रविद्येने भौतिकावर स्वामित्व गाजविता येते. मंत्रशक्तीने मनावर परिणाम होऊन एकाग्रता साधता येते.

महाभारतामध्ये नल-दमयंतीचे आख्यान प्रसिद्ध आहे. स्वयंवराच्या वेळी अग्नि, वरुण, यम व इंद्र हे देव आलेले होते आणि त्यांच्या सांगण्यावरून नलराजाने त्यांच्या विवाहासंबंधीची दूताची कामगिरी उत्तमप्रकारे बजावल्यामुळे त्या प्रत्येक देवाने नलराजाला एक एक वर दिला होता. पुढे ऋतुपर्ण राजाबरोबर नलराजा सारथी बनून आल्यावर कर्कोटक नागाने दंश केला असल्याने दमयंती नलराजाला ओळखू शकली नाही. पण तो नलच आहे असा संशय दृढ झाला. देवांनी दिलेल्या वरांची दमयंतीला माहिती असल्याने, तिने नलराजाला सर्व शिधा देण्यास दासीला सांगितले, पण पाणी आणि अग्नि न देण्याची आज्ञा केली. दासीने त्याप्रमाणे व्यवस्था केली. अनेकवेळा मागणी करून पाणी व अग्नि मिळेना तेव्हा नलाने अग्नीची प्रार्थना करताच तो चुलीमध्ये अवतरला आणि घागरींच्या मुखावर हात ठेवून वरुणाला आवाहन करताच, घागर पाण्याने भरून निघाली. नंतर नलराजाने स्वयंपाक केला आणि त्या एका गोष्टीवरून दमयंतीची नलराजाबद्दल खात्री पटली.

तात्पर्य इतकेच की, मंत्राचे आवाहन केल्याबरोबर नलराजाला अग्नि मिळाला आणि पाणीही मिळाले. पण ते सामर्थ्य सांप्रतच्या पुरोहितवर्गात नसल्याने, मंगल कार्यासमयी कलशपूजन करतात. आधी तो पाण्याने भरून

ठेवतात आणि नंतर यजमानाला कलशमुखावर हात ठेवून वरुणाचे आवाहन करतात. मंत्रसामर्थ्य गेले आणि फक्त कृति शिल्लक राहिली आहे.

श्रीमत् शंकराचार्य याबाबत लिहितात.

मंत्राणां पल्लवो (भूः भुवः स्वः) वासः मंत्राणां प्रणवः शिरः।
शिरपल्लवो युक्तो मंत्रः कामदुघो भवेत्॥

विधियुक्त मंत्रसिद्धि व्हावी अशी इच्छा असल्यास त्यासाठी वरील पथ्ये पाळावयास पाहिजेत. पल्लव म्हणजे प्रणवाशिवाय मंत्राचा जप झाल्यास पूर्ण सिद्धि प्राप्त होत नाही.

गोरेगावी आम्ही (प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाने) शतचंडी यज्ञ केला. त्या वेळी हीच शास्त्रीय चिकित्सा नि चर्चा प्रथम झाली. 'पल्लवयुक्त पठण झाले तर त्याला बराच वेळ लागतो, त्याला ब्राह्मण जास्त लागतील. कारण सप्तशतीच्या प्रत्येक मंत्राचे पठण पल्लवाने करावयाचे म्हणजे त्याला वेळ लागणारच' इ० गोष्टींची चर्चा आम्ही चार जाणकार मंडळींनी आपापसात केली होती. त्या वेळीच या पल्लवाचे महत्त्व समजून चुकले. यावरून समजून येईल की, पल्लवयुक्त सप्तशती ग्रंथाचे पारायण क्वचितच होते.

भारतामध्ये देवतांचे पूजन हे वेदकालापासून चालू आहे, हे खालील वाक्यावरून स्पष्ट होईल.

देवताना हरादीनां पुष्पादिनार्चनम्। (गोविंदराज)

अत प्रतिमास्वेवैतत्पूजनविधानम्। (मेधातिथी)

देवतानां अर्चनं पुष्पाद्यैः। (सर्वज्ञनारायण)

देवतायतनानि कम्पन्ते, देवप्रतिमा हसन्ति, रुदन्ति। (षड्विंश ब्राह्मण).

रामायणकाली रामानेच रावणवधाच्या वेळी रामेश्वर लिंगाची स्थापना केल्याचे आपण वाचतो. कृष्णयुगात कृष्णाने रुक्मिणीचे हरण एका अंबेच्या मंदिरातून केले, हेही आपण वाचतो.

अरण्यकालीन ऋषींनी प्रतिकोपासना मार्ग प्रचारात आणला असे समजले जाते. राज्याराज्यांतील वैमनस्य आणि अशांततेचा काळ यांना टाळून अध्यात्माचे मनन करण्यासाठी त्या ऋषींनी अरण्यवास पत्करला. वसिष्ठ,

वाल्मिकीसारख्या ऋषींनी आपले आश्रम स्थापले आणि त्यात आपला निवास करून त्यांनी मनन चालू केले त्यातूनच अरण्यके निर्माण झाली.'[1]

आपल्या इष्ट देवताची स्वरूपे ऋषींनी ठरविली आणि त्याप्रमाणे त्यानी त्या त्या मूर्तीचे वर्णन ज्यात केले असे श्लोक तयार केले. देवताचा आरोप यंत्रावर केला आणि त्याप्रमाणे पुढे आपले मनन चालू केले. म्हणजे यंत्राची त्यांनी निर्गुण उपासना आरंभिली. यामधूनच यंत्रनिर्मिती झाली. पण मानवामधील मनोदौर्बल्यामुळे ध्यानविरहित देवतेचे ध्यान, पूजा समाप्त होईपर्यंत टिकून राहणे आणि त्या वेळेपर्यंत मनाची एकाग्रता राहणे हे कठीण झाल्यामुळे ध्यानसहित देवताच्या मूर्ति अस्तित्वात आल्या असाव्यात. अशा मूर्ति मृण्मय, वालुकामय अगर पाषाणमय तयार होऊ लागल्या आणि त्यांचे ध्यान करणे सुलभ वाटल्यामुळे त्यांचाच जास्त प्रसार होत गेला असावा

'यंत्रमंत्रमयं प्रोक्तं मंत्रात्मा देवतैव हि ।'

या सूक्तप्रमाणे मंत्राची सिद्धि करावयाची तर वाङ् शक्तीची पूजा केलीच पाहिजे. मंत्रामध्ये गूढरूपाने वसत असलेली देवता यंत्राशिवाय अथवा ध्यानमूर्ती शिवाय सिद्ध होत नाही.

---

१ टीप— ग्रंथातील हा भाग लिहिला जात असताना सांप्रत भारतामध्ये जी निरनिराळी आंदोलने होत आहेत, यात गोहत्याबंदीसाठी चळवळ आहे, विद्यार्थ्यांच्या त्यांच्या काही मागण्यासाठी दंगली आहेत, सीमावादासाठी निदर्शने चालूच आहेत, अमका एक लोखंडी कारखाना आमच्याच भागात चालू झाला पाहिजे हा हट्ट आहे. इ० इ० त्यांची आठवण होते. या सर्वांमुळे राज्यशासन खिळखिळे होत आहे आणि याला कोणी वास्ता नाही की काय असा संशय निर्माण होत आहे. राजसत्तेसाठी जनतेच्या पुढाऱ्यातच स्पर्धा चालू असून दुसऱ्याचे पाय ओढण्याचे काम चालू आहे अशा वेळी प्राचीन भारतीय ऋषींनी कौटिल्य अगर चाणक्यासारख्या तत्ववेत्यानी एकान्तामध्ये जाऊन जे मनन केले आणि आध्यात्मिक बळाच्या जोरावर ज्या सुधारणा घडवून आणल्या तशा कायमस्वरूपी सुधारणा घडवून आणण्याची वेळ आलेली आहे. भारत मातेच्या एखादा तरी सुपुत्राला अशी बुद्धि झाली, तरी देशात शांतता नांदेल, पण विनोबा भावे, प्रभुदत्त ब्रह्मचारी, करपात्रिजी महाराज हे सर्व साधु समजले जाणारेही या ना त्या प्रकारे प्रत्यक्ष राजकारणात भाग घेत असल्याने चिंतन, मनन करण्यास त्यांना वेळच मिळत नाही चालू परिस्थितीवर मात करणारे एखादे अरण्यक तयार करणे हीच आजची निकडीची गरज आहे.

वैदिक ग्रंथामध्ये अनेक मंत्र आहेत आणि त्याचा उपयोग निरनिराळ्या कारणास्तव केला जातो अगर करता येण्यासारखा आहे हे खालील संक्षिप्त वृत्तांतावरून दिसून येईल.

ऋग्वेद— श्वापदापासून असलेली भीति नष्ट करणे, सर्पदंश, वृश्चिक दंशाचे निवारण क्षयरोग विनाश, कोर्टकचेरीमधील कामामध्ये सफलता, कुष्ठरोग निवारण, मूत्ररोग निवारण, कारागृहातून मुक्तता, भगेंद्र निवारण इत्यादि इत्यादि.

यजुर्वेद— द्रव्यप्राप्ति, शत्रुउच्चाटण, संकटनाश, मूळव्याध नाश, पापनाश, बंधनमुक्तता, अपमृत्यु निवारण, पर्जन्यवृष्टि, भयनाश, दृष्टिदोषनाश, त्र्यंबकाचे दर्शन, भूताखेताचे उच्चाटण इत्यादि इत्यादि.

सामवेद— हिंसादोषनिवारण, गर्भरक्षण, सर्व भीतींचा विनाश, शत्रू भीतीचा विनाश, नेत्ररोगाचे निर्मूलन, बुद्धिवर्धन इ० इ०.

अथर्ववेद— ज्वर, अतिसार, अतिमूत्र, नाडीव्रण याचे निवारण, जलोदर, श्वेतकुष्ट, गंडमाळा यांचे शमन आणि गाई, म्हशी इत्यादि पशूंचे रोगनिवारण इत्यादि, इत्यादि.

प्राचीन काळी मंत्राचे सामर्थ्य केवढे प्रचंड होते याचे एक उदाहरण नमूद करण्यास हरकत नसावी. युवनाश्व नावाच्या राजाने पुत्रप्राप्तीसाठी एकदा मोठा यज्ञ केला वसिष्ठादि ऋषि त्या वेळी उपस्थित होते. यज्ञ संपूर्ण होण्याच्या समयी, राजा रात्री यज्ञशाळेत झोपलेला असता त्याला अकस्मात अतिशय तहान लागली आणि नकळत त्याने वेदीवरील मंत्रप्रोक्षण होत असलेला कलश उचलला आणि सर्व पाणी प्राशन करून, पुन्हा जाग्यावर ठेवला. दुसऱ्या दिवशी सकाळी वसिष्ठांनी कलश रिकामा पाहिला आणि चौकशी करता त्यांना समजले की, राजाने कलशातील जल प्राशन केलेले आहे. ऋषींना आश्चर्याचा धक्का बसला. कारण ते जल राजस्त्रीसाठी होते. शेवटी ऋषि राजाला म्हणाले, 'राजा, तुझ्या या अनपेक्षित कृत्याने मोठा घात झालेला आहे. पुत्रप्राप्तीसाठी प्रसाद म्हणून ते जल तुझ्या पत्नीला द्यावयाचे होते, ते तू स्वत प्राशन केल्यामुळे आता तुझ्या उदरीच पुत्राची प्राप्ति होईल' काही महिन्यांनी राजाचे पोट मोठे दिसू लागले आणि पूर्ण दिवस झाल्यावर, वसिष्ठांनी राजाचे पोट पाषाणाने चिरून पुत्रपिंड बाहेर काढला पोटावरून हात फिरवताच ते पूर्ववत् झाले. या मुलाचे पालन राणीने केले नाही, तेव्हा इंद्रदेव प्रत्यक्ष तेथे आले आणि त्यांनी आपली अमृतमय अंगुली त्याच्या मुखात देऊन त्याची वाढ केली. या प्रकाराने मुलाचे पोषण झाल्याने मुलाचे नाव मांधाता असे ठेवण्यात आले. पुढे हा महापराक्रमी राजा होऊन गेला. येथवर हा मंत्रोदकांना प्रभाव पडला.

मंत्राने अग्नि प्रदिप्त करणे—यज्ञयागामध्ये जो अग्नि लागतो, त्यामध्ये सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणून मंत्राने अग्नि प्रदिप्त करणे हा समजला जातो. दुसरा मार्ग लाकडावर मंथन करून अग्नि तयार करणे, तिसरा मार्ग सूर्यभिंगातून, सूर्याच्या किरणांच्या माध्यमाने तयार करणे आणि कनिष्ठ मार्ग म्हणून घरातून अग्नि घेणे, याप्रमाणे मार्ग आहेत.

मंत्राच्या सहाय्याने अग्नि प्रदिप्त करणारे काही महाभाग अद्यापही भारतामध्ये आहेत. वे. मू. केळकर (रत्नागिरी) यांनी एक प्रसंग लेखकाला निवेदन केला. एका कर्मठ वैदिकाने विधिपूर्वक सर्व नियमांचे पालन करून मंत्राने अग्नि प्रदिप्त करण्याचा प्रयत्न केला, पण यश येईना. तेव्हा दुसऱ्या वैदिकाने काय कमी पडते ते त्याला दाखविले. मुखाने उच्चारलेले मंत्र आणि अग्निकुंड यात कोणतेही माध्यम त्याने अवलंबिलेले नव्हते. जसे एका टोकापासून दुसऱ्या टोकास वीज जाण्यास तांब्याच्या तारेचे माध्यम असते, तद्वत् गरज होती. तेव्हा दुसऱ्या वैदिकाच्या मार्गदर्शनाप्रमाणे मंत्र म्हणणाराने हातामध्ये दर्भांची दोरी धरली आणि तिचे दुसरे टोक कुंडात ठेवले. याचा योग्य तो परिणाम झाला आणि त्या दिवशी मंत्राने अग्नि कुंडात प्रदिप्त झाला. अर्थात् या गोष्टीला दहापाच वर्षे लोटलेली आहेत. सारांश इतकाच की, धार्मिक नियमांचे काटेकोरपणे पालन करता आले तर आजही मंत्रसामर्थ्य आपला प्रभाव दाखविते, हे समजून येईल.

सिद्धीसाठी मंत्र व यंत्रे यांची पूजा केली जाते. वीसायंत्र व ज्वरनधनयंत्र यांचा याबाबतीत प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. जैनांचे जे चोवीस तीर्थंकर झाले त्या प्रत्येकाची शासनदेवता निरनिराळी होती आणि त्या त्या देवतेला प्रसन्न करण्यासाठी निरनिराळे मंत्रही होते. सरस्वती देवीचे सोळा व्यूह आहेत आणि त्या प्रत्येकाची अधिष्ठात्री देवता व मंत्र आहेत.

**बौद्धपंथ**—या पंथाचेहि दोन प्रमुख भाग आहेत. एक हीनयान व दुसरा महायान. हीनयान पंथाचे आणखी १८ उपपंथ आहेत आणि त्यांचा प्रसार दक्षिणेकडे, विशेषतः सिलोन, यावद्वीप, बालीबेट भागात जास्त झालेला आहे. महायान पंथामध्ये माध्यमिक व वज्रायन अगर मंत्रायन हे दोन उपपंथ आहेत आणि त्यांचा प्रसार तिबेट, चीन, श्याम या भागात जास्त झालेला आहे. या मंत्रायन उपपंथामध्येहि आणखी नऊ पोटभेद आहेत. पद्मसंभव याने मंत्रायन उपपंथाचा प्रसार जास्त केला. या पंथाच्या तारा व **वज्रवाराहि** या प्रमुख देवता असून हीनयान पंथाची *मणिमेखला* देवी ही देवता होय. *नीलसरस्वतीची* उपासना प्रथमतः वसिष्ठ मुनींनी मानससरोवराजवळ चालू केली आणि सांप्रत ती तिबेट व चीन या देशात चालू आहे. या पंथाने मंत्रविद्येची दीक्षा तांत्रिक वर्गाकडून घेतली असल्याने तो पंथ मूर्तिऐवजी यंत्रेच जास्त वापरतो

गोरेगाव (मुंबई) येथील एक सत्पुरुष कम्मुवाला हे प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाच्या चांगले परिचयाचे आहेत. या कम्मुवालाने कुराण व बायबल या अनुक्रमे मुसलमान व ख्रिश्चन यांच्या धर्मग्रंथातील काही सूत्रांचे पठण केले आहे आणि त्यायोगे ते असाध्य दुखण्यावर इलाज, भयनिवारण, संकटमुक्तता इत्यादि उपाययोजना करू शकतात त्यांची कीर्ति आजूबाजूस बरीच पसरली आहे. त्यांच्याकडे लालबागचे बडे अधिकारी, वकील, बॅरिस्टर, डॉक्टर इत्यादी बडी बडी व मान्यवर माणसे नेहमी येत असतात व आपले संकटनिवारण करून घेत असतात वरील कम्मुवालाविषयी माहिती देण्याचा हेतु एवढाच की, मुसलमान आणि ख्रिश्चन या धर्मांमध्येही मंत्रशक्ति मानतात हे सिद्ध करणे हा होय. फकीर लोक मुसलमानी कुराण धर्मग्रंथातील सूक्ते म्हणून, ताईत बनवून ते काही जणांना त्यांच्या संकटनिवारणार्थ देतात, हे वाचकांपैकी काहींना ठाऊक असेलच.

पण आता शेवटी आपल्यापुढे असा प्रश्न उभा राहातो की,

या मंत्रशक्तीचा लोप का झाला? त्याचे उत्तर असे आपण वर पाहिलेच आहे की, मंत्राची सिद्धि प्राप्त होण्यास अनेक गुण साधकाच्या अंगी

असावे लागतात. मंत्राचे पावित्र्य दृढ राहण्यासाठी प्रत्यही अनेक नियम त्याला आचारात पाळावे लागतात. याचाच अर्थ त्याला आपली इंद्रियशक्ति कायम ठेवावी लागते व वेळ प्रसंगी वाढवावीसुद्धा लागते. प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाच्या माहितीत असा एक मांत्रिक आहे की, त्याला एकाद्या माणसाचे संकट निवारण करावयाचे असल्यास गायत्री अगर त्याच्या इष्ट देवतेचा अमुक एका संख्येचा जप करावा लागतो. याचाच दुसरा अर्थ असा की, त्याला त्याच्या अंगी असलेल्या सिद्धीचे सामर्थ्य वाढवावे लागते आणि नंतरच प्रयोग करावा लागतो. पथ्यपाणी पाळण्यासंबंधी असेच एक उदाहरण लेखकाने अनुभविले आहे. वायंगणी–खोरपाटण ( जि. रत्नागिरी ) येथे लेखकाचे नातेवाईक श्री दिनकर बाळकृष्ण ठाकुरदेसाई या नावाचे एक गृहस्थ आहेत. सर्पदंशावर मंत्रसामर्थ्याने ते औषध देतात डॉक्टरांच्या आवाक्याबाहेर गेलेल्या रोग्यावर देखील ते अचूक इलाज करू शकतात पांच-दहा मैलाच्या परिसरातील रोगी त्यांच्याकडे येतात पण आतापर्यंत त्यांनी जेवढ्या म्हणून रोग्यावर इलाज केला आहे, तेवढ्यापैकी एकही रोगी दगावल्याचे उदाहरण ऐकिवात नाही पण ही सिद्धि कायम ठेवण्यासाठी त्यांना दोन नियम अतिशय कटाक्षाने पाळावे लागतात. ( १ ) विटाळशी बाईच्या कांकणांचा आवाज जेवताना न ऐकणे, ( २ ) जेवताना मध्येच दिवा न विझणे. या दोहोंपैकी एक जरी गोष्ट घडली तर हातातील घास तसाच टाकून ते पानावरून उठून जातात. अर्थातच त्यांच्या घरातील मंडळी त्यांच्या नियमाचा भंग होणार नाही याकडे विशेष लक्ष पुरवितात हे सर्व सांगण्यामागील भूमिका एवढीच की, मंत्रसिद्धि असणाऱ्या माणसाला आपल्या आचरणात किती शुचिर्भूतपणा पाळावा लागतो ते वाचकांच्या ध्यानी यावे

पण आजच्या धकाधकीच्या काळात अनेक कारणांमुळे हे नियम पाळणे अशक्य झाले आहे उदाहरणार्थ, ठाकुर-देसायांचा ' जेवताना विटाळशी बाईच्या कंकणांचा आवाज कानी पडता कामा नये,' हा नियम घ्या पूर्वीच्या काळी हा नियम पाळणे एक वेळ शक्य होते कारण पूर्वीची घरे मोठी असत त्यांना मागे पुढे पडव्या, ओटा, स्वयंपाकघर, माजघर, शेजघर, कोठार इत्यादी अनेक कप्पे असत त्यामुळे एखादी विटाळशी बाई असलीच तर ती दूरवर जाऊन बसू शके, पण आजच्या १० × १० च्या एखाद्याशा खुराड्यात हा सर्व व्यवहार जमणे कसे शक्य आहे ? तुम्हीच सांगा ! असेच इतर नियमांसंबंधी म्हणता येईल नियमांचे पालन न होणे, एकाग्रता न साधणे, साधनांवर रोग्यांचा विश्वास न बसणे या प्रमुख गोष्टी मंत्रशक्तीचा लोप होण्यास कारणीभूत आहेत यापेक्षा दुसरे एक कारण असे की, मंत्रविद्येचे सामर्थ्य अंगी नसूनही काही ' बुडबुडे मांत्रिक ' आपल्या अंगी मंत्रविद्या असल्याचा बहाणा करून

लोकांना फसवितात. अशा वेळी हे दांभिक मान्त्रिक लोकांना लुबाडून आपला कार्यभाग मात्र चांगलाच साधून घेतात. असे हे मांत्रिक गावोगावी व घरोघरी लोकांना लुबाडून आपली पोटे भरत असल्यामुळे लोकांचा या शास्त्रावरील विश्वासच अजिबात उडाला आहे. अर्थात लोकांची जर या शास्त्रावरील श्रद्धाच नाहीशी झाली, तर त्या शास्त्राचा लोप होण्यास कितीसा उशीर लागणार! परंतु तरीही संपूर्ण मंत्रशास्त्र साफ बुडाले आहे असा मात्र याचा अर्थ नव्हे आणि असे पहा की, सांप्रतच्या काळातील माणसांची वागणूक कशी आहे,

असत्येन मुखं दग्धं । हस्तौ दग्धं प्रतिग्रहात् ।
परस्त्रीभिः मनो दग्धं । कुतः सिद्धिः कलियुगे ॥

मानवाचे मन, मुख व हात याप्रमाणे अपवित्र असल्यावर सांप्रतच्या कलीयुगामध्ये मंत्राला सिद्धि कशी प्राप्त होणार ? सर आर्थर अव्हेलॉन म्हणतात की, वर्णसंकरामुळे ब्राह्मणाची पवित्र कुळेही नाहीशी होत असल्याने मंत्रविद्या जगणे अशक्य होत आहे.

मराठी भाषेतील अथपासून इतिपर्यंत या शास्त्राचा उहापोह करणारा व माझ्या पाहण्यात आलेला ग्रंथ म्हणजे ‘ मंत्रशास्त्र ’ ( लेखक योगेश्वरानंदतीर्थ शंकराचार्य, पुरी; तथा श्री. त्र्यंबक भास्कर खरे ) हाच होय. तेव्हा वरील संक्षिप्त वर्णन त्याच ग्रंथाच्या आधाराने केले आहे. त्या ग्रंथामध्ये वैदिक मंत्र, आगमोक्त मंत्र, तंत्रोक्त मंत्र, पौराणिक मंत्र, मंत्राची व्याख्या, जैन-बौद्ध संप्रदायातील मंत्र, मंत्रशक्ति, यंत्रे व त्याची मांडणी, मंत्रे आणि फले, कलियुगात साध्य होणारे मंत्र, गायत्री यंत्राचे मंत्र व त्याचे रहस्य, साबरमंत्र, साधुपुरुषांनी दिलेले सिद्धमंत्र, मंत्रसिद्धि झाल्याची लक्षणे, इ० इ० अनेक विषयाचा उहापोह केलेला आढळून येईल. या ग्रंथामध्ये गायत्री यंत्र, सावित्री यंत्र, बगळामुखीयंत्र, वीराकर्षणीयंत्र, वेताळयंत्र, प्रसूतियंत्र, कापालिकयंत्र, पंचकोणयंत्र, कुबेरयंत्र, वरुणयंत्र, गणेशयंत्र, कामदेवयंत्र, घंटाकर्णयंत्र, दत्तात्रययंत्र इ० अनेक यंत्रे दिली असून वाचाबंदी, बुद्धिनाश, हस्तपादक्रियाबंदी, हरवलेल्या वस्तूचा शोध, कुष्ठरोगनिवारण, कर्णमूलाचा नाश, शत्रुनाश, इ० इ० अनेकांवर उपाययोजना सांगितली आहे. तो सर्व भाग जिज्ञासूंनी मुळापासून अवश्य वाचावा. विस्तारभयास्तव अधिक उहापोह करता येत नाही. या शास्त्राचे दिग्दर्शन करण्यासाठीच हे प्रकरण आहे. ‘ मंत्रशास्त्र ’ ग्रंथातील बरीचशी माहिती मंत्रमहोदधी आणि मंत्रमहार्णव या ग्रंथांच्या आधारे दिलेली आहे. हे दोन्हीही ग्रंथ व्यंकटेश्वर मुद्रणालय, मुंबई यांनी छापून प्रसिद्ध केलेले आहेत.

## तंत्रदेवता

श्रुति, स्मृति, पुराणे ही जशी आर्यांची धर्मशास्त्रे आहेत त्याचप्रमाणेच तंत्रशास्त्र हेही एक शास्त्रच आहे. ऋग्वेदादि चार वेदानंतर हा पाचवा वेदच मानतात. इतके हे शास्त्र महत्त्वाचे आहे. पुराणकाळानंतर या शास्त्राचा जास्त प्रसार झाला असावा कारण पुराणात याचा क्वचितच उल्लेख मिळतो. योग साधनेमध्ये वैदिक मार्ग व तांत्रिक मार्ग हे दोन्ही मार्ग आचरिले जातात. वैदिक मार्ग हा तांत्रिक मार्गापेक्षा भिन्न आहे. वैदिकाचे ज्ञानमार्ग, मूळसिद्धांत संप्रदाय हे सर्व काही वेद होत. चिन्मय पुरुष हाच योगेश्वर आणि तो सर्व काही जाणतो, पाहतो आणि आपणाकडे आकर्षून घेतो अशी त्याची श्रद्धा आहे. परंतु तंत्रशास्त्रात मोक्षाचा मार्ग योगेश्वरीच्या साधनाने प्राप्त होतो. ही देवता स्वयंप्रकृति, शक्तिमयी, संकल्परूपिणी आणि उत्पत्ति-लय संहाराची अधिष्ठात्री मानली आहे. या देवतेची प्राप्ति होण्यास संकल्पशक्तीचे रहस्य, कार्यपद्धति व तंत्रशास्त्र याचे ज्ञान पाहिजे. तंत्रमार्गाचा प्रधान हेतु शक्तिपूजा हा असून तिच्याच कृपेमुळे सर्व काही प्राप्त होते असे तांत्रिकाचे म्हणणे आहे.

कौल पंथाचा उगम बंगालमध्ये, १२ व्या शतकात राजा बल्लाळसेन याने केला. आचार विनयादि नऊ गुणांना अनुसरून त्याने ब्राह्मणांचे तीन वर्ग केले. तेराव्या शतकात मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाल्यावर तिने हिंदूंचा फार छळ केला. तेव्हा या ब्राह्मणांनी त्याचा प्रतिकार केला. पुढे पंधराव्या शतकात देवीवर श्रद्धा या पंथाचे प्रमुख नेमन्यायवर, त्याने कामाख्या देवीची उपासना केली आणि या पंथाचे अधिक ज्ञान मिळविले.

कुल शब्दाचा अर्थ मूलाधार चक्र असा केला जातो. तेव्हा यामरधीने जे शास्त्र ते कौल होय. महानिर्वाण तंत्रात याचा अर्थ असा दिला की, जीव, प्रकृति, दिक्, काल, आकाश, पृथ्वी, आप, तेज व वायु यांना कुल म्हणावे.

कुलं शक्तिरिति प्रोक्तमकुलं शिव उच्यते।
कुलेऽकुलस्य सम्बन्धः कौलमित्यभिधीयते॥ (सौभाग्य भास्कर)

याचा अर्थ असा की, कुल म्हणजे शक्ति व अकुल म्हणजे शिव होय. ज्या ठिकाणी अकुलाचा संबंध, यालाच कौल असे म्हणतात.

न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः।
अन्योन्यं च प्रवर्तेते अग्निधूमौ यथा प्रिये॥
(कौलज्ञान निर्णय, ७-८-९)

शिवावाचून शक्ति नाही आणि शक्तीवाचून शिव नाही असा अग्नि-धूम याप्रमाणे संबंध आहे.

योनीची प्रत्यक्षरूपाने पूजा करणाऱ्याना कौल म्हणतात. यामध्ये दोन पंथ आहेत. पूर्व कौल आणि उत्तर कौल. पहिले श्रीचक्राच्या अंतर्गत असलेल्या त्रिकोणाची अर्थात योनीची पूजा करतात, तर दुसरे सुंदर तरुणीच्या वास्तव योनींची पूजा करतात.

या कौलमार्गीयाची अशी श्रद्धा आहे की, स्त्री हेच सर्वस्व आहे.

स्त्रियो देवा. स्त्रियः प्राणाः स्त्रिय एव हि भूषणम् ।
स्त्रीणां निन्दा न कर्तव्या न च ताः क्रोधयेदपि ॥

स्त्रिया या देव आहेत, त्या प्राण आहेत, त्याच भूषण आहेत. स्त्रियांची निंदा करू नये आणि स्त्रियाना रागही आणू नये.

तन्त्रपंथाचा उगम कसा झाला याबद्दल अनेकजण विचारतात. या तन्त्रशास्त्राचा उगम शिव-पार्वती संवादात झालेला दिसून येईल. पार्वतीने प्रश्न विचारावेत आणि शंकरानी त्यांची उत्तरे द्यावीत, असे तन्त्रपंथाचे लिखाण झाले आणि आधुनिक युगातही ते लिखाण चालू आहे, असे आर्थर ॲव्हेलोन यांचे म्हणणे आहे. कोणी कोणी याचा उगम दत्तात्रयाकडे नेतात, पण ते बरोबर नव्हे. वेद, धर्म, शास्त्र या निगमापासून हे शास्त्र निराळेच मानतात. या शास्त्राचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हे शक्तिपूजेचे शास्त्र आहे. प्रामुख्याने विष्णु व लक्ष्मी याना आधारभूत मानून शक्तीची पूजा करावयास हे शास्त्र सांगत नाही, तर शिव-पार्वती या जोडप्यावर आधारभूत अशी या शास्त्रातील पूजा असते. पुराणशास्त्राप्रमाणे या शास्त्रामध्ये सृष्टीची उत्पत्ति, लय, देवतांची पूजा, दैवीसिद्धि प्राप्त करून घेणे आणि ब्रह्मतत्त्वात विलीन होऊन जाणे या गोष्टी आहेत. पण त्याची मांडणी चमत्कारिक व गूढ स्वरूपाची आहे. ती साधारणपणे धर्म, विज्ञान, वैद्यक इ० विषयावर आधारलेली असते.

कैलास पर्वतावर शिवशंकर तन्त्रपथ सांगतात आणि गणपति ते प्रथम उतरून घेतात, असे जॉन वुड्रॉफ साहेबाचे म्हणणे आहे आणि म्हणूनच या विद्येत गणेशालाही महत्त्व प्राप्त झालेले आहे. सर्व मंगलकार्याच्या आरंभी नवग्रह, मातृका यांजबरोबर गणेशाचेही पूजन झाले पाहिजे, असा तांत्रिकाना आदेश आहे. गणेशाबरोबर त्याच्या शक्ति तीव्रा, ज्वालिनी, नंदा व भोगदा यांचेही पूजन करावे लागते. केवळ शारदातिलक ग्रंथात एकाच महागणपतीच्या चारशे बाळीस ध्यानमूर्तीचे विवरण केलेले आहे. तांत्रिक लोक गणेशाबरोबर शक्तीचीही पूजा

करतात आणि त्या समयी दोन्ही मूर्ति विवस्त्रच असतात. क्रोधमंत्र, शनिविनायकमंत्र, लक्ष्मीगणेशमंत्र इ० इ० यांचे पठण प्रामुख्याने होते.

गाणपत्यतंत्रात महागणपति, विरिगणपति, शक्तिगणपति, विद्यागणपति, हरिद्रागणेश, उच्छिष्टगणेश, लक्ष्मीविनायक, हेरंब, वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज इ० गणपतींची रूपे उपास्य ठरलेली आहेत (मेरुतंत्रप्रकाश). कित्येक गणपति त्यांच्या स्त्रियांसह रतिक्रीडेच्या अवस्थेत असतात. सर्वसाधारणपणे गजाननाचे वाहन उंदीर असे आपण मानतो, पण हेरंबाचे वाहन सिंह आहे. महागणपतीच्या हाती रत्नकुंभ तर विरिगणपतीच्या हाती मद्यपूर्ण नरकपाल असते.

गणपतीप्रमाणे इतर देवतांचीही तंत्रे आहेत व रूपे आहेत. वैष्णव तंत्रात विष्णूचे अनेक अवतार व अनेक रूपे या देवता मानलेल्या आहेत. शारदातिलक तंत्रात त्यांचे तपशीलवार वर्णन आहे. लक्ष्मी, वासुदेव आणि लक्ष्मीनारायण ही प्रमुख रूपे असून हरिहर, नृसिंह, रामकृष्ण, हयग्रीव, गोपालकृष्ण इ० रूपेही आहेत.

भारतामध्ये अनेक तंत्रकार होऊन गेले आहेत. गौडपादाचार्य, शंकराचार्य, सुंदराचार्य, सुभगानंद, भास्करराय, अप्पय्यादीक्षित, देवनाथ ठाकूर इ० अनेक नावे आहेत.

जैन तंत्रे—हा धर्म जरी निवृत्तिवादी असला तरी मंत्रसाधनेच्या द्वारा चमत्कार दाखविण्याची प्रवृत्ति बळावल्यामुळे अनेक देवतांची उपासना सुरू झाली आणि या देवतांना तीर्थंकरांच्या सेविका मानल्या गेल्या. यामुळे जैन तांत्रिकही शक्ति-सिद्धान्त मानतात हे सिद्ध होते. या तंत्रात व इतरांत अनेक गोष्टी जरी समान असल्या तरी पंचमकाराचा प्रयोग मात्र गाळलेला आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून यांच्या साधनेला प्रारंभ झालेला असून चमत्कारकथा प्रसृत व्हायला प्रारंभ झाला आहे. मानव-देवसुरी, मानतुंगसुरी, शांतिसुरी, धर्मघोष, जिनप्रभ, यशोविजय, मेघविजय इ० तंत्रकार होऊन गेले आहेत. यांचे सर्व मंत्र 'ह्' या अक्षराने सुरू होत असल्याने या तंत्रमताला 'हादीमत' म्हणतात. या पंथात सरस्वती, अंबिका, कुबेरा, पद्मावती, सिद्धायिका, इंद्राणी, निधिप्रभा, अंकुशा आणि चक्रेश्वरी तांत्रिक देवता आहेत.

बौद्ध तंत्रे—अलौकिक शक्तींच्या प्रदर्शनाचा मोह आणि सहजजीवनाची प्रतिक्रिया, या कारणांमुळे या पंथातही तंत्राचा विकास झालेला आहे. डॉ. विनयतोष भट्टाचार्य यांच्या मते स्वत. गौतमबुद्धही तांत्रिक तत्त्वाचा

पुरस्कर्ता होता. इसवी सनाच्या प्रारंभीच्या कालात या तत्त्वाची विशेष चर्चा सुरू झालेली दिसते. मंजुश्री मूलकल्प हा त्याचा प्रथमचा या विषयावरील ग्रंथ होय. शाक्यमुनी आणि मंजुश्री यांच्या संवादामधून या ग्रंथाची निर्मिती झाली असून मंत्रसाधना, यक्ष-यक्षिणी, साधनेतील स्त्रीचे महत्त्व, मुद्रा, मंडल, अभिषेक, अभिचार इ० अनेक बाबींचे यामध्ये विवरण आढळते. शाक्यमुनी स्वतःच म्हणतात की, ' शिवाने ज्या मार्गाचा उपदेश केला, त्याचाच उपदेश मी करीत आहे. ' याचा अर्थ असा की, त्यांच्या तंत्रग्रंथावर शैवाचा प्रभाव आहे. बौद्ध तांत्रिकांनी रचलेली तंत्रे बुद्धोक्त समजली जातात. ती संस्कृत भाषेतच आहेत.

त्यांचे तंत्रग्रंथाची यादी सुमारे ७५ पर्यंत असून, प्रमोद महायुग, संवरोदय, वाराही, डाकिनीजाल, साधनमाला, ज्ञानसिद्धि, तारा, त्रैलोक्य विजय, कुरुकुल्ला, योगिनी संचार, यमांतक, मंजुश्री, हयग्रीव, मायाजाल, निष्पन्न योगाचार, महाकाल इ० त्यांची नावे आहेत. या तंत्रामध्ये सात आचार सांगितले आहेत. सर्वांत वेद अथवा वेदाचार उत्तम होय. वेदाचारापेक्षा वैष्णवाचार, शैवाचार, दक्षिणाचार, वामाचार, सिद्धान्ताचार, कौलाचार हे क्रमाक्रमाने श्रेष्ठ होत, पण कौलाचारापेक्षा काहीही श्रेष्ठ नाही, असे कुलार्णव तंत्रातील एका श्लोकात वर्णन आहे. यांचे आचारपद्धतींचे सविस्तर वर्णन या तंत्रातील श्लोकामध्ये आढळते.

या शास्त्रात दीक्षा ही अपरिहार्य असून, त्याविना मंत्रजप, पूजा, होमहवन इ० सर्व गोष्टी विफल ठरतात. आगम ग्रंथात या दीक्षेचे अकरा प्रकार सांगितले आहेत—कला, एकतत्त्व, त्रितत्त्व, पंचतत्त्व, नवतत्त्व, छत्तिसतत्त्व, पद, मंत्र, वर्ण, भुवन व केवलभुवन इ० होत. यानंतर अभिषेकाचे स्थान येते आणि तो गुरूने शिष्याचे मस्तकी व शरीरावर करावयाचा असतो. त्यामध्येही क्रमाक्रमाने प्रकार आहेत. शाक्ताभिषेक, पूर्णाभिषेक, क्रमदीक्षाभिषेक, साम्राज्याभिषेक, योगदीक्षाभिषेक व महापूर्णदीक्षाभिषेक इ० त्यांची नावे आहेत. तांत्रिकाचा दैनंदिन पूजाविधि अनेक आचारविचारांचा असून कष्टप्रद आहे. शेवटी चक्रपूजा हा महत्त्वाचा विधि ते करतात. पौर्णिमा, संक्रांती, चतुर्दशी, अष्टमी या दिवशी रात्रौ सामूहिक रूपाने ही पूजा केली जाते. या पूजेच्या वेळी साधक ( पुरुष ) आणि शक्ति ( स्त्रिया ) वर्तुळाकार बसतात, म्हणून चक्रपूजा म्हणतात. यांना भैरव-भैरवीही म्हणतात. चक्रस्वामी आपल्या शक्तीसह मध्यभागी बसतो, त्याजजवळ मद्यकुंभ व इतर पूजासाहित्य असते आणि येथेच खानपानादि व्यवहार होतात.

नित्या— तंत्रशास्त्रात नित्या या देवतांचा एक प्रकार आहे. नित्याषोडशिकार्णव या ग्रंथामध्ये खालीलप्रमाणे यादी दिलेली आहे.

तत्रादौ प्रथमा नित्या महात्रिपुरसुंदरी ।
ततः कामेश्वरी नित्या नित्या च भगमालिनी ॥
नित्या छिन्नाभिधा नित्या भेरुंडा वन्हिवासिनी ।
महाविद्येश्वरी दूती त्वरिता कुलसुंदरी ॥
नित्या नीलपताका च विजया सर्वमंगला ।
ज्वालामालिनिका चित्रेत्येव नित्यास्तु षोडश ॥

शाक्तपंथामध्ये दशमहाविद्या यांचे जसे पूजन होते आणि महत्त्व आहे, त्याचप्रमाणे नित्या देवतेचेही आहे. वर वर्णन केल्याप्रमाणे यांची संख्या सोळा आहे. ज्योतिष शास्त्रदृष्ट्या ज्याप्रमाणे पंचांगाची पाच प्रमुख अंगे आहेत आणि एका पक्षाचे पंधरा दिवस मानतात, तद्वत् शाक्त हे पक्षाचे सोळा दिवस मानतात आणि प्रत्येक दिवसासाठी एक एक नित्या देवतेचे पूजन सांगितलेले आहे. त्या त्या दिवशी ती ती देवता श्रेष्ठ असते आणि ती कर्तुमकर्तुम् शक्ति बाळगीत असते

आपण नेहमी व्यवहारात पाहतो की, आठवड्याचे सात दिवसांच्यासाठी निरनिराळ्या देवतांचे महत्त्व सांगितलेले आहे. सोमवारी–शंकर, मंगळवार-शुक्रवार–देवी, गुरुवार–दत्तात्रय, शनिवार–हनुमान इ० इ०. आपण जरी दररोज देवीचे पूजन करीत असलो तरी मंगळवार व शुक्रवारी विशेष महत्त्व आहे नवरात्राच्या नऊ दिवसात त्याहून विशेष आहे अमावास्येच्या दिवशी मांत्रिकानी काही विधि केला, तर फलप्राप्ति लवकर मिळते इ० इ०

त्याचप्रमाणे शाक्तपंथामध्ये नित्यांचे पूजन सांगितलेले आहे आणि त्या त्या दिवशी ती ती देवता प्रसन्न असल्यास भक्तांच्या सर्व मन कामना पूर्ण करू शकते.[1]

तंत्रशास्त्राचा अभ्यास हा काही साधासुधा विषय नव्हे. नुसती पुस्तके वाचून अगर मंत्रपठण करून तो आत्मसात करता येण्याजोगा सहजसाध्य विषय नव्हे. त्याला गुरुपरंपरेची आवश्यकता आहे तांत्रिक साधना स्मशानभूमीमध्ये केल्याने लवकर सिद्धि का प्राप्त होते, त्यातील सार काय इ० इ० मर्म गुरु मुखातूनच ऐकावयास पाहिजे हे शास्त्र व त्यातील आचार वर्णभेदरहित असून स्त्री व पुरुष या दोघांसाठी सारखेच आहेत षट्चक्र व कुंडलिनी-जागृति यासाठी या शास्त्राचा अभ्यास आवश्यक मानला जातो कलीयुगामध्ये कर्म कांडालाच खरे महत्त्व आहे. त्यानेच मोक्षप्राप्ति होते, अशी समजूत असल्याने

टीप— तंत्रशास्त्र आणि शाक्त मार्गाच्या अधिक प्राथमिक ज्ञानासाठी भारतीय संस्कृति कोश, खंड ४ वा पहावा

या शास्त्राने कर्मकांडाचाच विस्तृतपणे उहापोह केलेला आहे. हे शास्त्र आणि त्याचे पारंपारिक विचार व प्रथा म्हणजेच हठयोग-मार्गदर्शन होय. ती साधना प्राप्त होण्याचे साधन म्हणून हे शास्त्र आचरावे लागते. अंतिम साधना व त्याची उपासना हे मंत्रशास्त्राचे साध्य होऊ शकते. राजसिक, तामसिक व सात्विक साधना याच मार्गाने साधता येते.

तान्त्रिकामध्ये प्रामुख्याने तीन मतप्रचार आढळतात. ते कोणते ते पाहू.

( १ ) **समयमतवादी**— वैदिक मार्गाने श्रीविद्येची उपासना करणारे.

( २ ) **कौलमतवादी**— श्रीविद्येची उपासना महामायायंत्र, शबरतंत्र याप्रमाणे करणारे.

( ३ ) **मिश्रमतवादी**— वरील दोन्ही मार्गातून आवडतील ती तत्त्वे आचरून उपासना करणारे.

कौलमतवादी लोक मद्य-मांसाचा उपाहार, बीभत्स दुराचाराने देवतांचे अर्चन, मंत्रजप व अनुष्ठान करतात. हे लोक वाममार्गी म्हणून ओळखले जातात. ब्रह्मांडपुराण, ललितासहस्रनाम या ग्रंथांतून कौलिनी, कुलयोगिनी, महातंत्रा, महामाया इत्यादि तान्त्रिक शब्दांचा वापर झालेला आढळतो. आगमग्रंथामध्ये चक्रसंकेत, तंत्रसंकेत व पूजासंकेत हे तीन संकेत त्रिपुरादेवीच्या पूजनाचे म्हणून दिलेले आहेत. कुलार्णव, ज्ञानार्णव व बहुफलप्रद तंत्रांना महातंत्रा या नावाने संबोधतात. मद्य, मांस, मीन, मुद्रा व मैथुन हे पंचमकार होत. वाममार्गाचारांना पंचमकार का प्रिय वाटतात, त्याचे हे श्लोकबद्ध विवेचन पहा.

( १ ) सुरा पनी है चंद्रकी, कलासुधाके स्रवसे ।
पान सुरा योग्य है, छुडावे काला रससे ॥

( २ ) तांको मांस खावे, धर्मबुद्धीको बढावे ।
पदवीको पावे, जगदंबिका रिझायके ॥

( काम, क्रोध, लोभ यांना विवेकरूपी खड्गाने वध करावा आणि त्यांचे निर्मूलन करावे असा अर्थ. )

( ३ ) मीनको प्रेमसे पकावे और खावे खूप ।
बुद्धिको बढावे, यम फिकरमे ना हरे ॥

( द्वेष, मद, मत्सर, मान, सन्मान या भावांना ज्ञानजाळ्यात पकडा आणि शिजवून ते खा व पचवून टाका असा भावार्थ. )

(४) ब्रह्मरूप पावकमें आठको पकाय देवें ।
बारबार आहार करके, भूतलमें विहारी है ॥
(आशा, तृष्णा, घृणा, भय, लज्जा, कोप इत्यादि मुद्राचे मांस शिजवा आणि ब्रह्मरूपात पचवून टाका असा भावार्थ.)

(५) सुषुम्णा है नाम ताको सुंदरी समझिये ।
बारबार नववधु शशांक वदनीको भजिये ॥
(शरीरातील सुषुम्णा, कुंडलिनी यावर केलेले हे एक रूपक होय)

पञ्चमकाराचे आध्यात्मिक रहस्य वरीलप्रमाणे सारांशरूपाने दिले आहे. परंतु याचा संपूर्ण उलगडा श्रीस्वामी तारानंदतीर्थ व श्रीभास्करराय यांनी अनुक्रमे कौलोपनिषद, श्रीरहस्यारहस्य यामध्ये केलेला आहे, तो जिज्ञासूंनी अवश्य वाचून पाहावा.

वरीलप्रमाणे पञ्चमकार प्रत्यक्ष सांगितले आहेत, तरी त्यांना पर्याय अथवा अनुकल्पही दिलेले आहेत. ते क्रमाने पुढीलप्रमाणे समजावेत. (१) नारळाचे पाणी, (२) लसूण, आले, मीठ, गव्हाच्या लोंब्या, (३) लाल मुळा, वांगी, (४) तांदूळ, (५) मीलनाला उपयुक्त होईल, याप्रमाणे नेत्रमोडीने पुष्प समर्पण या उपचारांनीही पञ्चमकार पूजन होते.

तन्त्रशास्त्रामध्ये श्रीविद्या ही प्रमुख मानली जाते. ही विद्या ललिता, राजराजेश्वरी, षोडशी, महात्रिपुरसुंदरी, बाला व पञ्चदशी या नावानेही प्रसिद्ध आहे. श्रीविद्या ही तृतीय महाविद्या षोडशी हिचे परिणत स्वरूप आहे. या विद्येलाच ताराविद्या असेही म्हणतात. ब्रह्मविद्या अगर ब्रह्ममयी विद्या ती हीच होय. 'श्री' शब्द उच्चारताच साधारणत त्याचा अर्थ 'लक्ष्मी' असा केला जातो. पण हरिनाथसंहितेप्रमाणे अगर ब्रह्मांडपुराणाप्रमाणे या शब्दाचा अर्थ महात्रिपुरसुंदरी असा घेतला जातो एकदा श्रीमहालक्ष्मीने या महात्रिपुरसुंदरीची आराधना केल्यावर ती प्रसन्न झाली व तिने महालक्ष्मीला वरदान दिले त्या वरदानामुळे श्रीचा महालक्ष्मी असा अर्थ रूढ झाला या महात्रिपुरसुंदरीचे तत्त्व प्रतिपादन करणारी जी विद्या तीच श्रीविद्या होय या ठिकाणी श्री हा शब्द श्रेष्ठता अगर पूज्यतादर्शक वापरलेला आहे ज्याप्रमाणे आपण देवांची नावे घेताना श्री हा शब्द वापरलेला आहे. उदाहरणार्थ, श्रीविष्णु, श्रीशिव, श्रीकाली, श्रीदुर्गा इ० इ० आत्मज्ञान साधनेसाठी कर्मकांडादि मार्ग कष्टमय असल्याने श्रीविद्येची उपासना जर गुरुकृपेने प्राप्त झाली तर त्याला आत्मज्ञानप्राप्ति

लवकर होते. कर्मकांडामध्ये भोगाचा त्याग करावा लागतो. पण या विद्येच्या उपासनेत तो करावा लागत नाही.

यत्रास्ति भोगो न च तत्र मोक्षः । यत्रास्ति मोक्षो न च तत्र भोगः ॥
श्रीसुंदरीसेवनतत्परायणाम् । भोगश्च मोक्षश्च करस्थ एव ॥

श्रीविद्या ही आत्मशक्ति आहे. ती ललिता, कामेश्वरी या नावानेही प्रसिद्ध आहे. कामेश्वरी ही महाकामेश्वराच्या अंकावर विराजमान झालेली आहे. उपाधिरहित शुद्ध आत्मा हाच महाकामेश्वर होय. कामाख्या येथील देवतेला तांत्रिक लोक कामेश्वरी हेच नाव देतात. शिवाचे नावही त्यांनी कामेश्वर हेच ठेवले आहे. कामेश्वरी देवीच्या चार हातात पाश, अंकुश, इक्षुधनु व पंच पुष्पबाण ही आयुधे आहेत. ही आयुधे असण्याचे तसेच एक कारण आहे. या चार आयुधांना तसाच एक अर्थ आहे तो पहा. पाश म्हणजे छत्तीस रोगांचे निदर्शक चिन्ह, अंकुश म्हणजे द्वेष, इक्षुधनु म्हणजे मन आणि पंचबाण म्हणजे शब्द, रस, स्पर्श, रूप, गंध या पांच तन्मात्रा होत. आत्मशक्तीचे जगदंबिका असेही एक नाव आहे.

श्रीविद्येची शक्ति ही गुणत्रयात्मक रूप असल्याने तिला त्रिपुराशक्ति असेही म्हणतात. वामकेश्वर तंत्राप्रमाणे श्रीविद्येची ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति व इच्छाशक्ति ही तीन रूपे होत इच्छाशक्ति हा शिरोभाग, ज्ञानशक्ति हा मध्यभाग व क्रियाशक्ति हा अधोभाग होय. त्रिपुरा हा शब्द रूढ होण्याचे दुसरेही एक कारण आहे. मानवी शरीरात इडा, पिंगळा व सुषुम्ना अशा तीन नाड्या आहेत आणि त्यांचे वास्तव्य मन, बुद्धि व चित्त या तीन पुरांमध्ये आहे. यास्तवच या शक्तित्रयीला त्रिपुरा असे म्हणतात. तसेच ती ब्रह्मा, विष्णु व महेश या तिघांची आई म्हणून, ऋक्, यजु व साम या तीन वेदांची माता म्हणून व अंतीच्या प्रलयकाळी भूर्लोक, भुवर्लोक व स्वाहालोक या तीन लोकांना गिळंकृत करणारी शक्ति म्हणून तिचे नाव त्रिपुरा असे रूढ झाले आहे.

(वैदिक देवता हे प्रकरण पहा)

असल्याने शंकराच्या पाच मुखांपैकी मध्य मुखातून ते बाहेर आले असे मानतात. शिवतंत्रांची एकूण संख्या २८ असून विष्णुतंत्रांची ६४ आहे. तसेच रथक्रांताची ६५ व अश्वक्रांताची ६४ राधातंत्रे आहेत. या राधातंत्रामध्ये प्रामुख्याने विष्णूची उपासना होत असल्याने पंचोपासना या नावाचा या वैष्णवाचा जो नित्य विधि आहे, त्यामध्ये शिव, विष्णु, सूर्य, गणेश व देवी यांची पूजा होते. ही पूजा नित्यनेमाने केल्यास साधकाची भूतशुद्धि होते म्हणजे शरीरातील सर्व इंद्रियांचे शुद्धिकरण होते. (शंकराचार्यांची पंचायतन पूजा ती हीच होय.)

तंत्रमार्गावर काही विवेचन करणाऱ्याला सर आर्थर ॲव्हेलोन या तंत्रशास्त्रातील अधिकारी पुरुषाला विसरून चालणार नाही. भारतीय अतिरथीमहारथींनी या शास्त्रावर जेवढे संशोधन केलेले नाही आणि ग्रंथनिष्पत्ति केलेली नाही, तेवढी या एकुलत्या एका विद्वानाने केलेली आहे. कलकत्ता येथील एका न्यायालयामध्ये ते न्यायाधीश असताना त्यांनी या शास्त्रावर संशोधन केले व ग्रंथनिष्पत्ति केली. त्यांच्या संशोधनाचा सारांश खालीलप्रमाणे होय.

कलियुग सुरू होण्यापूर्वी, धार्मिक अनाधुंदीच्या काळामध्ये पर्वतप्राय धार्मिक ग्रंथांचा नाश झाला आहे. काही तंत्राचार्यांच्या मते या ग्रंथांची संख्या एक लक्षावर होती. अद्यापीही कैलास पर्वतावर गणपति नित्य नवी तंत्रे तयार करून ती भूतलावर पाठवीत असतो. ॲव्हेलोनसाहेबांनी केलेल्या संशोधनात ज्या तांत्रिक ग्रंथांची नावे त्यांना उपलब्ध झाली, त्यांची संपूर्ण ३१३ तंत्रांची यादी त्यांनी प्रसिद्ध केली आहे. परंतु स्थलाभावी ती सर्व यादी या ठिकाणी देता येणे अशक्य आहे. ती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

(Principle of Tantras, 1952 Ed Pages 572–84)

भारतीय तंत्रकाराच्या ग्रंथाचे समालोचन करताना ते पुढे म्हणतात, 'वामकेश्वर तंत्राप्रमाणे ६४ तंत्रग्रंथ होते.' ज्ञानकोशकाराच्या माहितीप्रमाणे तंत्रग्रंथांची संख्या १९२ होती. श्रीमत् शंकराचार्यांनी ६४ तंत्रग्रंथांचा उल्लेख केलेला आहे. सम्मोहन तंत्रकार म्हणतात की, 'काल्पयोय तंत्राप्रमाणे ६४ शाक्ततंत्रे, ३२७ उपतंत्रे, ८ यामल, ४ डामरस, २ कल्पलता व कित्येक संहिता, चुडामणी, अर्णवे, पुराणे, उपवेद, काक्षपुटाजविसर्विधी व चिंतामणी इतकी ग्रंथसंपत्ति होती.' वैष्णवगांची ७५ तंत्रे, यामल व कल्पादि शास्त्रे आहेत. शैवपर्यायांची ३२ तंत्रे, यामल व डामरस आहेत. गाणपत्यांची ३० तंत्रे, उपतंत्रे व कल्प आहेत. बौद्धवर्गांची कल्पद्रुम, कामधेनु, सूक्ते, कर्मे, अवरस, पुराणे व शास्त्रे अशी तंत्रग्रंथांची निर्मिति आहे.

वरील ग्रंथापैकी सम्मोहन तंत्राप्रमाणे जी ग्रंथसंख्या दिली आहे, तीच आर्थरसाहेब प्रमाणभूत मानतात या तंत्रामध्ये पार्वती, दुर्गा, भवानी, काली या प्रमुख देवता असून पशुहत्त्या त्यांना प्रिय आहे यातील मंत्रांचा बीजमंत्र युक्त असून शुद्ध शब्दोच्चारावर त्याची फलप्राप्ति अवलंबून आहे कलीयुगाच्या अंतापर्यंत ही तंत्रविद्या रहाणार असून सर्व धार्मिक विधि याच शास्त्रानुसार सतत होत रहाणार आहेत अशी धार्मिकांची श्रद्धा आहे

तंत्रकौमुदी, शक्तिसंगम, रुद्रयामल तंत्र, शक्ति व शाक्त, तांत्रिकांची मूळ तत्त्वे इत्यादि ग्रंथांची निष्पत्ति अँव्हेलोनसाहेबांनी केलेली आहे

संशोधक एच्. एच्. विल्सन आपल्या 'निबंध व व्याख्याने' या ग्रंथात या शास्त्रासंबंधी लिहितात की, वेदशास्त्र आणि धर्मशास्त्र यांजवर आता तंत्रग्रंथांचा पगडा बसला असून या शास्त्राचा आता छपाईने प्रसार होत आहे बंगाल प्रांतात, तर दोन तृतीयांश धार्मिक विधि याच शास्त्रानुसार आचरिले जातात कर्मकांडादि ज्ञानमार्गाचे विधि आचरण्यास फार काळ लागतो आणि चालू युगात, तर उद्योगी माणसाच्या वाट्याला वेळ अजिबात येत नाही तेव्हा कलि युगात याच शास्त्रांना जास्त प्रसार होणार आहे. शाक्तपंथीय हे ब्राह्मणग्रंथ अतिशय पूज्य मानतात दक्षिणाचारी शाक्तपंथीयांची तंत्रे शुद्ध व वेदप्रमाण असतात, तर वामाचारी पंथीयांची शूद्राप्रमाणे भासतात उपनिषदांमधील ज्ञानमार्ग आणि कर्ममार्गापेक्षा तंत्रशास्त्रातील भक्तिमार्ग काही ठिकाणी श्रेष्ठ मानला जातो या मार्गामध्ये फक्त शिव पार्वतीची उपासना आहे प्रत्येक शक्तीला दोन स्वरूपे असतात, दोन बाजू असतात, एक शुभ्र बाजू व दुसरी काळी बाजू किंवा एक क्रूररूप व दुसरे शांतरूप होय जसे, आदिशक्तीची उमा व गौरी ही शांत स्वरूपाची बाजू असेल, तर दुर्गा व काली ही क्रूर स्वरूपाची बाजू होईल हाच प्रकार इतर शक्तिदेवतांच्या बाबतीत आढळून येईल याचाच अर्थ असा की, दक्षिणाचारी हे शांत स्वरूपाचे उपासक तर वामाचारी हे क्रूर स्वरूपाचे उपासक होत

*काही पाश्चिमात्यांची ही मते पहा*

(१) तांत्रिकांचा प्रधान हेतु जादुटोणा करणे हा होय — वार्ड

(२) तांत्रिकाचा तमाशा, जादुटोणा व न्यास म्हणजे शुद्ध मूर्खपणाच ! — हॉड्सन

(३) शिव शक्ति उपासनेच्या खटपटीत पार्श्वभूमीवर तांत्रिकांचा जादु टोणा हा काही चांगलीत नसलेला व गलिच्छ असा आहे

(४) तांत्रिकमार्ग हा पूर्ण मूर्खपणाचा आणि गोंधळ अंधश्रद्धेचा असून दुष्टपणाचा आणि हास्यास्पद समजुतींचा मासलाच आहे.

जी वरील विधाने या लोकांनी केली, ती अर्थातच या विषयाचे संपूर्ण ज्ञान करून न घेता त्यांनी केली आहेत. या शास्त्राचा गूढार्थ त्यांना उमगता तर ते अशी हास्यास्पद विधाने कदापि करतेना. मूळ ग्रंथांचे निरीक्षण न करता कोणते तरी अशुद्ध भाषांतर पाहून ही विधाने केली असावीत. त्यांची ही विधाने पूर्णतया असत्य आहेत हे खालीलप्रमाणे आर्थर ॲव्हेलोनच्या मतावरून दिसून येईल.

ॲव्हेलोनसाहेब याबाबत म्हणतात की, ' युरोपियन विद्वानांनी तांत्रिक ग्रंथ मुळांतून वाचलेले नाहीत व त्यांनी आपली टीका दुय्यम अगर नकली अहवालावरून केलेली आहे. ' तेव्हा याप्रमाणे सोनाराकडून कान टोचविले गेल्यामुळे आता त्याबाबत जास्त विवरणाची मुळीच गरज नाही.

कृष्णानंद आगमवागीश हा आगमेश्वरीतील श्रीधाम-नवद्वीप या गावाचा राहणारा असून त्याने सन १६०७ च्या सुमारास तंत्रसार हा ग्रंथ लिहिलेला आहे. कृष्णानंद स्वतः आगमेश्वरी देवीचा उपासक असून तो तांत्रिक मार्गाने तिची उपासना करीत असे.

काही पाश्चिमात्यांची मते जी वर दिलेली आहेत, ती अगदीच बिनबुडाची आहेत असे म्हणता येणार नाही. सन १९१२ पासून आठ वर्षे लेखक पुणे नजिकच्या येरवडा या खेडेगावी रहात असे व तेथून पुण्याला शाळेत पायी येत असे. आणखीही बरीच मुले बरोबर असत. तेव्हा या खेडेगावी अगर रस्त्यावर ' मदारी खेळ ' पाहण्याचा योग नेहमी येई. खेळ चालू असता त्याची पुंगी एकदम बंद पडे, अथवा पाडली जाई. त्या वेळी तो म्हणत असे की, ज्याने ती पुंगी बंद पाडली आहे त्याने पुढे यावे. पण हे आव्हान कधी स्वीकारले जाई, कधी नाही. मग तो उलटसुलट काही क्रिया करी, उडीद फेकून मारी, लिंबू कापून दिशांना टाकी, तेव्हा पुंगी वाजणे पुन्हा चालू होई. त्या वेळी प्रेक्षकांना वाटे की, लोकांना भुलविण्यासाठीच हा प्रकार असावा, यात सत्य काही नाही. पण या ग्रंथाच्या मांडणीस सुरुवात केल्यावर, निरनिराळ्या व्यक्तींबरोबर चर्चा करण्याची वेळ आली असता एकाने सांगितले की, तो प्रकार सत्यच आहे, खोटा नाही. ती एक पिशाचसाधना विद्या आहे. रात्री स्मशानात बसून ती साध्य करावी लागते. ती तात्काळ फळ देणारी व जोरदार शक्ति आहे. शक्तिदेवतेच्या आराधनेने अथवा मंत्र-सामर्थ्याने प्राप्त होणाऱ्या शक्तीपेक्षाही ती जाज्वल्य आहे. त्याने असेही सांगितले की, ती विद्या त्याने आत्मसात् केलेली

होती, पण त्या विद्येने युक्त असलेल्या माणसाचा शेवट चांगला होत नाही, तेच पिशाच्च त्याचाही बळी घेतल्याविना राहत नाही. यास्तव त्याने तिचा त्याग केला आहे. ही शक्ति कितीही शक्तिमान् असली तरी शेवट चांगला होत नसल्याने ती त्याज्य मानावी लागते. पण मंत्र-शक्ति अथवा तंत्र-शक्ति यांचा परिणाम वाईट होत नाही, सतत कायम राहतो. हा यातील मुख्य भेद ध्यानात ठेवणे जरूर आहे.

सारांश असा की, अशाच काही प्रयोगावरून पाश्चिमात्यांनी आपली मते मांडली असण्याचा संभव आहे, हे नमूद करणे अवश्य आहे.

शक्तिसंगम तंत्राप्रमाणे (लेखक विनयतोष भट्टाचार्य) या तांत्रिक मार्गीयांच्या देवता खालीप्रमाणे आहेत.

(१) काली-नृत्या

श्यामवर्णा महाभीमा घोरदंष्ट्रा करालिनी ।
मुण्डमाला विभूषाढ्या दक्षिणे खड्गं प्रबिभ्रती
तर्जनीं धारयन्ती वामे नृत्यन्ती प्रेतभूमिषु ॥

श्यामवर्णा, उग्र चेहरा, कमरेभोवती मुण्डमाळा, उजव्या हाती तरवार, डाव्या हाती तर्जनी, स्मशानात नृत्य करणारी, असे या देवीचे ध्यान आहे. याचाच अर्थ असा की, काली अगर महाकाली देवीला नेहमी चार हात असतात. पण या ठिकाणी मात्र तिला दोनच भुजा आहेत. म्हणजे ही देवता त्या कालीपेक्षा भिन्न आहे.

(२) कपालिनी

श्यामवर्णा, विवस्त्र, केशकलाप विस्तारलेला, चंद्रमुखी, चतुर्मुण्डोपरिगता, हातामध्ये शंख व काकणे असलेली आणि चार हातापैकी एका हातात तरवार, दुसऱ्या हातात त्रिशूळ, तिसरा हात अभय व चौथा हात वरद असे हिचे स्वरूप आहे.

## (४) कुरुकुला

शवावर विराजमान, मुंडमाला धारण करणारी, चतुर्भुजा, कपाल, तरवार, चेटक व कात्री ही चार आयुधे चार हातांत असणारी असे हिचे स्वरूप आहे. गळ्यात कपालमाळा, जीभ व सुळे बाहेर आलेले, व्याघ्रचर्म परिधान करणारी आणि केशकलाप ज्वालेप्रमाणे वर तळपणारा. हिला काही वेळा उड्डीयान कुरुकुला असेही म्हणतात.

## (५) विरोधिनी

त्रिनेत्रा, उग्रमूर्ति, चार हातात त्रिशूळ, नागफणी, घंटा व डमरू धारण करणारी व शवासनी. असे सांगतात की, जर एखादे वेळी चार लोकांनी एकाद्या माणसाला घेरला तर त्याची सुटका जर त्याने या देवीचे स्मरण केले तर होते.

## (६) विप्रचित्ता

त्रिनेत्रा, पुष्ट वक्षःस्थळे धारण करणारी, विवस्त्र, मुक्तकेशी, दीर्घजिव्हा, जिच्या मुखातून रक्त खाली ओघळत आहे अशी आणि तिच्या चार हातामध्ये तरवार, कपाल, त्रिशूळ आणि मस्तक आहे. या देवतेचे वैशिष्टय असे की, एका घावातच ती शत्रूचा नाश करते.

## (७) उग्रा अथवा उग्रतारा

त्रिनेत्रा, मुण्डमाळा धारण करणारी, मुक्तकेशी, चार हातात खड्ग, कमळ, कपाल व चाकू ( किंवा कातरी ) हे धारण करणारी, असे हिचे स्वरूप आहे. या देवीचे समग्र विवेचन दशमहाविद्या या प्रकरणात आलेले आहे.

## (८) उग्रचंडा

या मूर्तिः षोडशभुजा भद्रकालीति विश्रुता ।
तथैव मूर्तिर्बाहुभ्यामपराभ्यां तु बिभ्रती ॥
दक्षिणाधो गदां वामपाणिना पानपात्रकम् ।
सूरापूर्णं च शिरसा मुंडमाला विलेशयम् ॥
भिन्नञ्जनचयप्रख्या प्रचंडा सिंहवाहिनी ।
रक्तनेत्रा महाकाया युक्ताष्टा दशबाहुभि. ॥

भावार्थ असा की, ही शक्तिपर्याय देवता, भद्रकालीप्रमाणेच असून दोन भुजा अधिक आहेत. तिच्या या अधिक हातामध्ये एकात गदा व दुसऱ्यात मदिरापात्र आहे. गळ्यात नरमुंडाची माला असून मस्तकावर नागफणा आहे.

ती सिंहारूढ, प्रचंड देह, अठरा भुजा व काळे नेत्र यामुळे भयंकर उग्र दिसते यासाठी हे नाव आले असावे. कौशिकी, शिवदूती, शाकंभरी, ईश्वरी, महोदरी या तिच्या सख्या होत. (वी. के. शाडआ, प. गोडे स्मृतिग्रंथ, पृ. ५१४)

## (९) तिरस्कारिणी

या नावाची एक देवता आहे. या देवीची उपासना केल्यामुळे स्वत अंतर्धान पावणे किंवा दुसऱ्याची शरीरे त्यांना दृग्गोचर होऊ न देणे, ही विद्या साध्य होते.

## (१०) रत्नप्रवाराहिका

या देवीची आराधना केल्यास जनसमूहावर ताबा ठेवता येतो आणि कीर्ति व लौकिक प्राप्त होतो.

## (११) संपतसरस्वती

या देवीची उपासना केली असताना, गरिबालाही लक्ष्मी प्राप्त होते.

## (१२) पथिसाद

या रुद्रदेवीची आराधना केली असता, रानावनातून अगर धोकादायक मार्गावरून चालले असता संरक्षण होते, प्रवास निर्वेध होतो आणि अपघाताचा संभव राहात नाही.

(वरील देवताशिवाय उग्रप्रभा, दीप्ता, नीला, घना, बलाका, मात्रा, मुद्रानित्या, मिता, कृष्णमातंगी, आर्द्रपटेश्वरी इत्यादि अनेक तांत्रिक देवता आहेत त्या 'तन्त्रदेवता' या प्रकरणात पाहाव्यात)

वरीलप्रमाणे या शास्त्राचे विवरण येथे जरी सारांशरूपाने केले असले व वाचकांना तंत्रमार्गाची रूपरेषा समजण्यास पुरेसे असले, तरी काही प्रश्नांची उत्तरे त्यांना येथे आढळणार नाहीत उदाहरणार्थ —

(अ) हिंदुतंत्रे व बौद्धतंत्र यामध्ये फरक काय ?

(ब) तंत्रशास्त्राचा समाजावर काय परिणाम झाला आणि सध्या कोणता परिणाम होत आहे ?

(क) तंत्रशास्त्राची मूलतत्त्वे कोणती ?

(ड) तंत्रशास्त्रामुळे अवगत झालेल्या ज्ञानाचा लोक प्रत्यक्ष व्यवहारात कोणता आणि कसा उपयोग करतात ?

( इ ) तांत्रिक योग आणि षट्चक्र भेद म्हणजे काय ?

( ई ) बौद्धधर्मात तंत्रशास्त्राचा कितपत प्रभाव पडला आहे ?

( उ ) तंत्रशास्त्र व श्रुति, स्मृति, पुराणे यांचा परस्पर संबंध काय ?

इत्यादि इत्यादि अनेक प्रश्नांचा ऊहापोह स्थलाभावी येथे करता आला नाही. त्याचा उलगडा मूळ ग्रंथ वाचूनच वाचकांना करून घ्यावा लागेल. तंत्रशास्त्रावरील अमाप ग्रंथांचा गोषवारा देण्याइतपत जागाही या ठिकाणी अडविणे अयोग्य वाटल्याने अगदी संक्षिप्तपणे माहिती देऊन या शास्त्राची वाचकांनी केवळ तोंडओळख करून दिली आहे शक्तिदेवतांची माहिती देताना तांत्रिक देवतांची माहिती अंतर्भूत करणे आवश्यक असल्याने तसा प्रयत्न केलेला आहे

## यंत्रदेवता

भारतातील अनेक शक्तिपीठांमधून देवतांच्या मूर्तींऐवजी यंत्रांची पूजा होते यंत्र हे त्या त्या देवतेचे प्रतीक मानले जात असल्याने देवतेच्या पूजनाने जेवढे फल साधकांना प्राप्त होते, तेवढेच फल यंत्राच्या पूजनानेही प्राप्त होते. त्यामुळे अनेक यंत्रे पूजेमध्ये प्रचलित आहेत. परंतु ह्या सर्व यंत्रांचा मुकुटमणी म्हणजे श्रीयंत्र हेच होय. तेव्हा त्या यंत्रासंबंधीचे छोटेसे विवेचन, शक्ति संबंधीच्या या ग्रंथात आवश्यक असल्याने ते येथे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**श्रीविद्या कशाला म्हणतात ?**— ब्रह्मांडपुराणामध्ये ( ललितोपाख्यान, प्रकरण ३९ ) या विद्येचा उगम वर्णन केला आहे हे स्तोत्र आदि-लक्ष्मी ऊर्फ कामाक्षी देवीला उद्देशून असून, ती त्रिमूर्तींची माता, असे सांगितले आहे (४-४०-१६ ) या स्तोत्रात ब्रह्मदेवाने आदिशक्तीची स्तुति केलेली आहे ही देवता मस्तकावर प्रकाशमान असून प्राणिमात्राचे हृदय प्रकाशित करते ती सर्व विद्यांची माता असून, जगन्माता, त्रिपुरसुंदरी व सर्वमंगला आहे विश्वाची उत्पत्ति, स्थिति आणि लय हे सर्व तिच्यामुळे होतात वेद आणि आगमानाही ती अगम्य आहे. ती स्वसंवेद्य आहे ऋषि मुनि तिलाच परब्रह्म म्हणतात ब्रह्मा, विष्णु, महेश, इंद्रादि देव तिचे पूजन करतात एका श्लोकामध्ये तिच्या स्वरूपाचे वर्णन केले आहे ते असे— ज्या देवतेचे श्वासोच्छ्वास म्हणजे वेद होत, नेत्र कटाक्ष म्हणजे पंचतत्त्वे आणि जिच्या हास्यामुळे सर्व विश्व रूप धारण करते, अशा त्रिब्रह्मस्वरूपाला माझा नमस्कार असो ज्ञानशक्ति तीच असून, सूर्यचंद्रादि तारे तिच्या आज्ञेत राहतात तिच्यामुळे अग्नि प्रज्वलित होतो पंचतत्त्वे आणि पाच माया कंचुक हे तिचेच प्रकटीकरण आहे सर्व प्राणिमात्राचा विश्वव्यापी

जीव तीच आहे. तीच अमर्याद आणि शाश्वत आनंद आहे. अशा या सर्वश्रेष्ठ शक्तीलाच श्रीविद्या असे म्हणतात

(ललिता कल्ट, ले. व्ही. आर. रामचंद्र दीक्षितार, पृ ७६)

यंत्र म्हणजे काय असे कोणी विचारल्यास त्याचे उत्तर संक्षेपात इतकेच की, अद्भुत आकृति या आकृति साधारणतः त्रिकोणाकृति ताम्र धातूच्या पत्र्यावर कोरलेल्या असतात आणि त्यामध्ये अनेक लहान लहान त्रिकोण असतात. या यंत्रामध्ये विश्वाच्या दैवी शक्तीचा संचय केलेला असून, मध्य भागीचे वर्तुळ अथवा त्रिकोण म्हणजे त्या त्या देवतेचे मुखकमळ होय.

शाक्त सांप्रदायाची उत्पत्ति शैव पंथामधून झाली आहे. अद्भुत सिद्धीच्या साहाय्याने देवता प्रसन्न होऊन साहाय्यकारी होतात, अशी त्या सांप्रदायिकांची श्रद्धा आहे. मंत्राची सिद्धि मंत्र तंत्र यंत्र पूजनाने होते अशी त्यांची भावना आहे

शाक्त पंथीयांनी चक्र पूजा सुरू केल्यानंतर, सौर सांप्रदायिकांनी सूर्य यंत्र तयार केले आणि पूजन चालू केले. मंगळाच्या यंत्रात मध्यभागी मंगळाचे चित्र आणि आजूबाजूला २१ त्रिकोण असून मंगळाच्या स्तुतीपर श्लोकही लिहिलेला असतो. वैष्णवाच्या यंत्रामध्ये विष्णुपद हेच प्रमुख यंत्र होय त्यामध्ये विष्णूच्या पदकमळाच्या आकृतीप्रमाणे शंख, चक्र, गदा, पद्म ही आयुधे कोरलेली असतात

काही शैव उपासक शिव कंगन नावाचे यंत्र हाताच्या मनगटावर बांधतात अथवा दंडावर धारण करतात. या कंगनावर चतुर्भुज शिव, नंदी व शिव लिंगाच्या बारीक बारीक आकृति कोरलेल्या असतात तुळजापूरचे भोपे अगर खंडोबाचे भक्त ही यंत्रे जास्त प्रमाणावर वापरतात. या यंत्राच्या धारणाने सर्व संकट निवारण होते, अशी त्यांची श्रद्धा आहे.

जैन पंथीयांमध्येही यंत्राची पूजा आहे, पण त्याला ते सिद्धियंत्र नावाने संबोधितात इतर यंत्रांप्रमाणे ती ताम्र धातूवर नसून कापड अगर कागदावर आकृति काढतात व त्याचे पूजन करतात

श्रीयंत्र हे सर्वोत्कृष्ट सिद्धियंत्र समजले जाते. त्याची रचना आद्य शंकराचार्यांनी केलेली आहे असे मानतात शंकराचार्यांनी धर्मप्रसार करीत असताना भारतामधील प्रसिद्ध चार मठामध्ये या यंत्राची स्थापना केलेली आढळते

तंत्रमार्गाने शक्तीची उपासना करणारे साधक या यंत्राची पूजा करतात यंत्र हे देवताचे शरीर समजले, तर मंत्र हा त्याचा आत्मा होय तेव्हा या पूजेमध्ये या दोघांची सांगड शुद्ध आचरणाने घालावयास पाहिजे. या श्रीयंत्राची

रचना बिंदु, त्रिकोण, रेषा, वर्तुळ इत्यादि साधनांनी बनविता येते या साधनांनी एका विशिष्ट तऱ्हेची रचना बनविणे याला भूमितिशास्त्र म्हणतात प्राचीन आर्यांना हे शास्त्र पूर्णपणे अवगत होते, हे इतर पुराव्यावरून दाखविता येते वेदकालातील यज्ञवेदीची व होमकुंडाची रचना ही त्या त्या प्रकारच्या यज्ञामध्ये निरनिराळी असते ह्या मांडणीत काही सिद्धांत व प्रमेये ठरलेली आहेत अर्थातच भूमितिशास्त्र अवगत नसते तर त्यांना ही मांडणी करता आली नसती

सांप्रत युक्लिडचे सिद्धांत हे सर्वश्रेष्ठ व सर्वमान्य आहेत पायथॅगोरसची भूमिति शास्त्रातील प्रमेये, ही सनपूर्व सहाव्या शतकात, त्याने भारतामध्ये १० वर्षे शाक्यमुनिबरोबर काळ घालविल्यानंतर ग्रीसमध्ये गेल्यावर, भारतीय प्रमेयांच्या आधाराने मांडलेली आहेत, असे बाबासाहेब म्हापणे यांनी प्रतिपादन केले आहे इतकेच नव्हे तर क्षेत्रफळाने मोजमाप करण्यास लांबी, रुंदी, उंची बरोबर जे 'फोर्थ डायमेन्शनचे' तत्त्व सांप्रतचे गणिती अवलंबितात, तेही त्याने भारतामधून शिकून नेले होते, असे त्यांचे प्रतिपादन आहे

(प्रसाद, डिसेंबर १९६७)

हे वरील विवेचनावरून दिसून येईल की, त्यांनी हे शास्त्र एका विशिष्ट पद्धतीने जगापुढे मांडले एवढेच म्हणता येईल असे सांगतात की, सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी प्लेटो याने आपल्या पाठशाळेच्या दारावर चक्क पाटी लिहिली होती की, 'ज्याला भूमिति येत नाही, त्याला या पाठशाळेत प्रवेश मिळणार नाही' अर्थात् प्लेटो हा पायथगोरसनंतरचा ग्रीक तत्त्ववेत्ता आहे

काही तंत्र विद्वानांचे असे मत आहे की, एका विशिष्ट मंत्राने आणि एका विशिष्ट क्रमाने आपल्या इष्टदेवतेचे पूजन केले, ध्यान केले, तर साधकाला जी तल्लीनता व तादात्म्य प्राप्त होते ह्यामुळे तो ते यंत्र अंतरिक्षामध्ये पाहू शकतो आणि त्या यंत्राच्या दर्शनात तो रमून गेला म्हणजे त्यामधूनच त्याला आपल्या इष्ट देवतेचे दर्शन घडते याला‌च साक्षात्कार असे म्हणतात याला‌च देवता दर्शन देते असे म्हटले जाते पण हे साध्य होण्यास खडतर तपश्चर्या लागते त्याचप्रमाणे साधनायुक्तताही लागते अशा अलौकिक सामर्थ्याचा एखादाच भाग्यवान साधक आपल्याला आढळून येईल रामकृष्ण परमहंसासारखे साधक त्यांना स्वत देवता दर्शन तर व्हायचेच, पण आपल्या भक्तांनाही ते देऊ शकत, असे त्याने अलौकिक सामर्थ्य होते विवेकानंदाचे उदाहरण तर आपल्या डोळ्यासमोर आहेच !

मानवी शरीर हे विशाल ब्रह्मांडाची प्रतिकृति अगर प्रतिमूर्ति मानतात यामुळे ज्या अनेक शक्ति महाविश्वावर नियंत्रण ठेवतात त्या सर्व मानवी शरीराचेही नियंत्रण करतात तांत्रिकांच्या मते अखिल महाविश्व हीच त्यांची इष्टदेवता स्वरूप

होय आणि यामुळेच मानवी शरीर हे अखिल विश्वाची प्रतिमूर्ति ठरते. यंत्र-पूजेच्या साहाय्याने साधकाला तादात्म्य साधता येते. 'देवो भूत्वा देवान् यजेत्' ही श्रुति याच कारणासाठी प्रचारात आली. मानवी शरीर ही इष्ट-देवतांची प्रतिमूर्ति मानली म्हणजे शरीराने आपल्या इष्टदेवताची पूजा करावयाची असा अत्यंत उच्च प्रकारचा गूढार्थ त्यामध्ये भरलेला आहे.

श्रीयंत्र हे महात्रिपुरसुंदरीचे प्रतीक आहे. ह्या देवतेचे ते मूर्त स्वरूप आहे. यासाठीच याला यंत्रराज म्हणजेच यंत्रांचा राजा अथवा सर्वश्रेष्ठ यंत्र मानले जाते. या यंत्रातील बीजमंत्र व मांडणी पाहिली म्हणजे समस्त ब्रह्मांडाची उत्पत्ति व विकास कसा झाला हे समजते आणि त्याबद्दल साहाजिकच आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. या यंत्रात मध्यबिंदु म्हणजे शक्तित्रिकोण होय. या मध्य बिंदूच्या चारी बाजूंना एकूण नऊ त्रिकोण असतात. त्यापैकी उर्ध्वमुखी पाच त्रिकोण हे शक्तिदेवतांचे द्योतक असून ते शिवयुवती या नावाने ओळखले जातात. उरलेले चार अधोमुखी त्रिकोण हे शिवद्योतक असून त्यांना श्रीकंठ असे म्हणतात. शिवयुवतींचे पाच त्रिकोण हे ब्रह्मांडातील पंचमहाभूते, पंच तन्मात्रा, पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये व पंचप्राण यांचे निदान समजले जाते. मानवी देहाबरोबर असलेले या त्रिकोणांचे साम्य त्वक्, असृक, मांस, मेद, व अस्थि या स्वरूपांशी दाखविले जाते. ब्रह्मांडातील चित्, बुद्धि, अहंकार व मन यांचे प्रतीकात्मक चार श्रीकंठरूपी कोन हे मानव देहांत मज्जा, शुक्र, प्राण व जीव या रूपाने वास करतात.

वर्तुळात व बाहेर मुद्राशक्ति, लोकपाल, मातृका, सिद्धि इत्यादिकांची स्थाने आहेत.

शंकराचार्यांनी श्रीयंत्राच्या रचनेचे वर्णन एका श्लोकात केलेले आहे. तो श्लोक असा:—

चतुर्भि. श्रीकण्ठैः शिवयुवतिभिः पंचभिरपि।
प्रभिन्नाभिः शम्भोर्नवभिरपि मूलं प्रकृतिभिः॥
त्रयश्चत्वारिंशत् वसुदलकलाश्रत्रिवलय।
त्रिरेखाभिः सार्धं तव भवनकोण परिणत॥

या यंत्रामध्ये एकूण त्रिकोणवल्यांचे स्थिती याचे काव्यमय वर्णन रुद्रयामल तंत्रामध्ये खालीलप्रमाणे आढळून येते—

बिन्दुत्रिकोणवसुकोणदशारयुग्मम।
मन्वस्त्रनागदलसंयुतषोडशारम्॥
वृत्तत्रयं च धरणी सदनत्रयं च।
श्रीचक्रराजमुदितं पर देवतायाः॥

या यंत्रामध्ये जी एकूण नऊ चक्रे रेखाटलेली आहेत, त्यांची नावे अशी—

(१) बिन्दु, (२) त्रिकोण, (३) आठ त्रिकोणसमूह, (४) दहा त्रिकोणसमूह, (५) दहा त्रिकोणसमूह, (६) चवदा त्रिकोणसमूह, (७) आठ पाकळ्यांचे कमळ, (८) सोळा पाकळ्यांचे कमळ, (९) भूपूर व त्यामधील इतर देवता. आता क्रमाने या नऊ चक्रांबद्दल सारांशरूपाने माहिती पाहू.

(१) बिन्दु — शक्तित्रिकोणातील हा बिन्दु म्हणजे महात्रिपुरसुंदरी अथवा ललितादेवीचे निवास होय. मणिद्वीप हे सुधा सागरामध्ये आहे असे तांत्रिक मानतात. तेव्हा बिन्दु हा द्वीपाचा निर्देशक होय असे काहींचे मत आहे

(२) त्रिकोण—हे चक्र त्रिकोणाचे बनलेले आहे. त्रिकोणाच्या तीन कोनांवर कामरूप येथील कामेश्वरी, पूर्णगिरी येथील वज्रेश्वरी (वास्तविक या पीठाच्या देवतेचे नाव कालिका असे आहे.) व जालंधर येथील भगमालिनी (या पीठाची देवता वज्रेश्वरी आहे) या देवता अधिष्ठित असून मध्यभागी उड्डियान येथील कात्यायनी देवता आहे.

(३) आठ त्रिकोणसमूह—या चक्रामध्ये आठ त्रिकोण आहेत यातील त्रिकोणाच्या बिन्दूवर क्रमश वशिनी, कामेश्वरी, मोदिनी, विमला, अरुणा, जयिनी, सर्वेश्वरी व कौलिनी या देवता असून त्या मानवी शरीरातील शीत, उष्ण, सुख, दु ख, इच्छा, सत्व, रज व तम या गुणाचे प्रतीक होत

(४) दहा त्रिकोणसमूह—या चक्रामध्ये दहा त्रिकोण आहेत त्यातील देवता सर्वज्ञा, सर्वशक्तिप्रदा, सर्वैश्वर्यप्रदा, सर्वज्ञानमयी, सर्वव्याधिनाशिनी, सर्वधारा, सर्वपापहरा, सर्वानन्दमयी, सर्वरक्षा व सर्वइच्छाफलप्रदा या होत या देवता मानवी शरीरातील रेचक, पाचक, शोषक, दाहक, प्लावक, क्षारक, उद्धारक, क्षोभक, जृम्भक व मोहक या गुणाच्या प्रतिमूर्ति होत

(५) दहा त्रिकोणसमूह—या चक्रामध्ये दहा त्रिकोण आहेत त्यातील देवता—सर्वसिद्धिप्रदा, सर्वसपत्प्रदा, सर्वप्रियकरी, सर्वमगलकारी, सर्वकामप्रदा, सर्वदु खविमोचिनी, सर्वमृत्युप्रशमनी, सर्वविघ्ननिवारिणी, सर्वांगसुदरी व सर्वसौभाग्यदायिनी या होत

(६) चवदा त्रिकोणसमूह—या चक्रामध्ये चवदा त्रिकोण असून त्यातील देवता मानवी शरीरातील रक्तवाहिन्याच्या निर्देशक आहेत या चौदा देवताची नावे पुढीलप्रमाणे— सर्वसक्षोभिणी, सर्वविद्राविणी, सर्वाकर्षिणी, सर्वाह्लादिनी, सर्वसमोहिनी, सर्वस्तभिनी, सर्ववशकरी, सर्वरजिनी, सर्वोन्मादिनी, सर्वार्थसाधिनी, सर्वसपत्तिपूरणी, सर्वमत्रमयी व सर्वद्वद्वक्षयकरी या देवता मानवी शरीरातील रक्तवाहिन्या अलबुषा, कुहु, विश्वोदरी, वारणा, हस्तिजिव्हा, यशोवती, पयस्विनी, गधारी, पूषा, शखिणी, सरस्वती, इडा, पिंगळा व सुषुम्ना याच्या प्रतीक होत

(७) आठ पाकळ्याचे कमळ—या चक्रामध्ये अष्टपत्रदल असून त्यामध्ये अनगकुसुमा, अनगमेखला, अनगमदना, अनगमदनातुरा, अनगरेखा, अनग वेगिनी, अनगमदनाकुशा, अनगमालिनी या देवता आहेत या सर्व देवता मानवी शरीरातील वचन, आदान, गमन, विसर्ग, आनन्द, उपादान, दान, उपेक्षा या गुणाच्या निदर्शक होत

(८) सोळा पाकळ्याचे कमळ—या चक्रामध्ये सोळादली कमळ आहे यातील देवता अशा—कामाकर्षिणी, बुद्ध्याकर्षिणी, अहकाराकर्षिणी, शब्दाकर्षिणी, स्पर्शाकर्षिणी, रूपाकर्षिणी, रसाकर्षिणी, गधाकर्षिणी, चित्ताकर्षिणी, धैर्याकर्षिणी आणि शरीराकर्षिणी या सर्व देवता मानवी शरीरातील मन, बुद्धि, अहकार इत्यादि गुणांच्या निदर्शक होत

(९) भूपूर व त्यामधील इतर देवता—या चक्राला भूपुरचक्र असे म्हणतात. यामध्ये चार भाग आहेत.

(अ) षोडशदल कमळाच्या बाहेरील तडागसदृश चार वर्तुळे.
(आ) षोडशदलाला लागून असलेली बाहेरची पहिली रेषा.
(इ) षोडशदलाच्या लागून असलेली बाहेरची दुसरी रेषा.
(ई) वरील रेषेच्या बाहेरचा भाग.

या चार भागामध्ये क्रमश: १० मुद्राशक्ति, १० दिक्पाल, ८ मातृका, आणि १० सिद्धि अधिष्ठित आहेत.

या यंत्राची मांडणी व विषय किती गहन आहे याची अधुकशी कल्पना वरील विवेचनावरून वाचकांना येईल असे वाटते. तसे पाहिले तर मुळात हा विषयच फारच गहन व समजण्यास कठीण आणि त्यातच तो सारांशरूपाने दिलेला. तेव्हा वाचकांना हा विषय कसा आणि कितपत आकलन होईल याबद्दल थोडी शंकाच वाटते. येथे विषयमांडणीचा प्रधान हेतु इतकाच की, यंत्रद्वारा ईश्वराची लीला, पिंडब्रह्मांडरूपी मानवी शरीरात कशाप्रकारे अंतर्भूत करून दाखविली आहे याचे दिग्दर्शन करणे. जीवात्म्याचा विकास व शैव-शाक्त तत्त्वाचा विस्तार यंत्रद्वारा कसा झाला हे यंत्रामुळे कळते. ज्याला या श्रीयंत्राचे संपूर्ण ज्ञान व्हावे असे वाटत असेल आणि तशी त्याची अतिशय प्रबळ इच्छा असेल तर त्याने त्रिपुरतापिनी उपनिषद्, त्रिपुरोपनिषद्, ललिता सहस्रनाम, तंत्रराज, कमलात्मिकातंत्र इत्यादि ग्रंथांचे वाचन व मनन करणे आवश्यक आहे. या विषयातील कोणी तज्ज्ञ गाठून त्याच्याकडून त्याने हे यंत्र समजावून घेतले पाहिजेत.

या देवतास्वरूप यंत्राची स्थापना अनेक शक्तिपीठामधून केलेली आढळून येते. उदाहरणार्थ, विंध्यवासिनी पीठामध्ये भैरव कुंडाजवळ, तिरवा (जिल्हा फरुकाबाद) येथे अन्नपूर्णा मंदिराच्या परिसरात, काशीविश्वेश्वराच्या मंदिरात, कोल्हापूर येथील महालक्ष्मीच्या मंदिरात, तुळजापूर येथे भवानी मंदिरात, कांजीवरम् येथे कामाक्षीच्या मंदिरात इत्यादि, इत्यादि मंदिरातून श्रीयंत्राची स्थापना केलेली आढळून येते. आदिशक्तीचे प्रतीक म्हणून तांत्रिक श्रीचक्र पूजीत असतात. मानवदेहातही त्यांनी अनेक चक्रे मानलेली आहेत. मायाचक्र, योग-चक्र, तालुचक्र, दीप्तिचक्र, शांतचक्र, आनंदचक्र, स्थितिचक्र, सहारचक्र, निर्वाणचक्र इ० इ० एकुण ३२ चक्रे मानलेली आहेत.

श्रीयंत्राप्रमाणे इतरही अनेक यंत्रांची पूजा केली जाते. त्यापैकी जी प्रमुख आहेत, त्यांची नावे पुढीलप्रमाणे— सर्वतोभद्र, यंत्रराज, स्मरहर, मृत्युंजय, कालीयंत्र इत्यादि इत्यादि. शंकराचार्य खरेशास्त्री यांनी जे मंत्रविद्येचे एक पुस्तक

लिहिले आहे, त्यामध्ये गायत्रीयंत्र, सावित्रीयंत्र, बगळामुखीयंत्र, प्रसूतियंत्र, सप्तशतीयंत्र कुबेरयंत्र, घंटाकर्णयंत्र, सूर्ययंत्र इत्यादि अनेक यंत्रांची मांडणी दाखविलेली असून त्यांची फलेही सांगितली आहेत.[1] श्रीयंत्राच्या त्रिकोणामध्ये व कमलदल पाकळ्यामध्ये बीजमंत्राचीही मांडणी केलेली असते. बीजमंत्राशिवाय मंत्राचा उच्चार केल्यास भयंकर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. अथर्ववेदामध्ये या यंत्रांचा उल्लेख अनेक ठिकाणी मिळतो. याचा अर्थ इतकाच की, यंत्रपूजा ही अतिशय प्राचीन आहे. काहींच्या मते तंत्रशास्त्र हा योगशास्त्राचाच विस्तार आहे. हे शास्त्र म्हणजे कोणत्याही प्रकारची जादुगिरी नव्हे. परंतु एवढे मात्र खरे की, यंत्राची पूजा केल्यावर त्याचे फल मात्र एखादी जादुगिरी केल्याप्रमाणे मिळते. या शास्त्राचा अभ्यास करणे पुष्कळशा साधकांना कष्टमय होते, या शास्त्राप्रमाणे आचरण करण्यास कठीण जाते. त्यामुळे ते या शास्त्राची हेटाळणी करतात. पण हे बरोबर नाही. ‘नाचायला येत नाही, तर अंगणच वाकडे आहे’ असे म्हणून अंगणाला दोष देणे हे बरे नव्हे.

श्रीयंत्राची कृति जर विधिलिखित नसेल तर कशी संकटे कोसळतात, याचे एक उदाहरण माझ्या निदर्शनास आले आहे. सुमारे पन्नास-साठ वर्षांपूर्वी विलेपार्ले (मुंबई) येथे केशवाचार्य नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांच्याजवळ स्फटिकावर कोरलेले एक श्रीयंत्र होते. संकेश्वर मठाचे अधिपति भूतपूर्व शिष्य स्वामी यांना एकदा योगायोगाने ते यंत्र केशवाचार्यांनी दिले. परंतु त्या यंत्राची स्थापना मठात झाल्या दिवसापासून अनेक कटकटी निर्माण झाल्या आणि मठाच्या सावकारांनी एकदम उठाव केला. ही संकटपरंपरा अशी एकाएकी का कोसळावी याची चौकशी करता त्यांना असे समजले की, ते ज्या श्रीयंत्राची पूजा करतात ते उर्ध्वमुख म्हणजे उर्ध्वरेखांकित आहे. शास्त्राप्रमाणे ते अधोरेखांकित म्हणजे खोदलेले पाहिजे. शेवटी संकटपरंपरा निवारणार्थ त्या यंत्राचे विसर्जन करण्याचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे एका आमावास्येच्या रात्री त्याचे पूजन होऊन पहाटेच्या सुमारास मुळामुठा नदीच्या संगमावर त्याचे विसर्जन करण्यात आले. त्या वेळी सरदार मुजुमदार, चित्रावशास्त्री इ० नामांकित गृहस्थ त्या ठिकाणी उपस्थित होते. असे समजते की या विसर्जनाचा परिणाम तावडतोब त्याच दिवशी झाला. एका सावकाराने आपल्या ४० ते ५० हजार रुपयांच्या येण्यावर उदक सोडून दिले व तसे स्वामींना कळविले.

संकटपरंपरा निर्माण करणारे श्रीयंत्र केशवाचार्यांनी जवळ का बाळगावे याचे कारण शोधता असे आढळून आले की, जनसमूहावर कोसळणारी संकटे

[1] टीप— मंत्रमहार्णव व मंत्रमहोदधी हे ग्रंथ अधिक माहितीसाठी पहावेत.

व त्यांपासून त्यांना होणाऱ्या यातना ग्ररा साधुपुरुष आपल्या स्वत च्या शिरावर घेतो व लोकांनी सुखात रहावे म्हणून स्वत आमरण भोगतो याच कारणा साठी हे औषध जेव्हा त्यांच्या एका भक्ताने त्याना दिले तेव्हा त्याचे दुष्परिणाम माहीत असूनहि, भक्ताचे सकट निवारण्यासाठी त्यांनी ते स्वीकारले होते आचार्यांनी स्वत चे शरीर जर्जर झाले असूनही भक्ताच्या सकटाची भर त्यांनी आपल्या अनत यातनामध्ये घातली होती योगी अगर साधुपुरुष यांचे वर्तन कसे असते ते पहा—

सम्मानना परा हानिं योगवृद्धे कुरुते यत ।
जनेनावमतो योगी योगासिद्धिं च विन्दति ॥ (विष्णुपुराण २ १३ ४२)

समाजात चांगला मानमरातब मिळविण्यात योगवृद्धीची मोठी हानी होत असते, त्याचे सामर्थ्य क्षणाक्षणाला क्षीण होत असते यास्तव तो योगी जनसमुदायाकडून अपमानिला गेल्यास, त्याचे सामर्थ्य कमी होत नाही, तर एक तऱ्हेने तो पूर्णत्वाला पोहोचतो यास्तव तुकामाई, अगर अक्कलकोट निवासिनी महाराज असे काही वर्तन करीत की, त्यामळे सर्वसाधारण समाज त्यांपासून दूर राहात असे इतकेच नव्हे तर ज्याला पूर्णता साधावयाची असेल, त्याने लोकांकडून अपमान होईल असेच वर्तन ठेवावे आणि आपले विहित धर्मकार्य चालू ठेवावे आपण निष्पाप असून लोकांकडून जर आपला अपमान होत असेल, तर शास्त्रकार त्याला अमृत पिण्याचा योग मानतात

(गुलाबराव महाराज चरित्र, ल मिलिंद, पृ २१२ )

वरील वचनाला अनुसरूनच केशवाचार्यांनी, भक्ताच्या सुखार्थ यत्राची पूजा आपल्याकडे घेतली आणि त्या पासून उत्पन्न होणारे दु ख भोगण्याची तयारी ठेवली साधकाची साधनाची दशा मात्र अशी नाही, अथवा सिद्धि प्राप्त झाली, म्हणजे त्यातच तो गुरफटून जातो आणि अतीम सुखाला आचवतो

असेच दुसरे उदाहरण वासुदेवानद सरस्वति तथा टेंबेस्वामी यांचे देता येईल एकदा बरेच दिवस या स्वामींचा मुक्काम ब्रह्मावर्त येथे असताना त्यांचा रोगाने जर्जर झालेल्या एका गृहस्थाला कोणी एकाने सांगितले की, 'तू स्वामींच्या चरणाचे तीर्थ घेतलेस तर तुझा रोग बरा होईल ' पण सहजासहजी हे तीर्थ मिळणार कसे ? एके दिवशी स्वामी आपला पाय पाटावर घालून लेखनकार्यात मग्न असताना त्या गृहस्थाने चटकन त्यांच्या पायावर पाणी ओतले आणि खाली वोघळलेले पाणी तीर्थ म्हणून प्राशन केले परतु दुसऱ्या दिवशी चमत्कार असा झाला की, महाराजांच्या सर्वांगावर फोड आले आपल्या पायावर फोड का आले

याचे कारण स्वामींना समजले. त्यांचे शिष्य जेव्हा औषधोपचार करण्याबाबत त्यांना विचारू लागले तेव्हा ते शिष्यांना म्हणाले, ' हे परेच्छा प्रारब्ध आहे. हे भोगूनच संपविले पाहिजे. जो जीवन्मुक्त असतो तो केवळ स्वतःचेच प्रारब्ध भोगून संपवितो, असे नव्हे, तर इतरांचेही प्रारब्ध तितक्याच निर्विकार मनाने भोगतो आणि हीच त्याच्या जीवनन्मुक्तपणाची व साधुत्वाची खूण असते.'

( वासुदेवानंद सरस्वति चरित्र ले. श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर, पृ. २४४ )

समर्थ रामदास स्वामींनीही अशा प्रकारे दुसऱ्याची दुःखे स्वतः भोगली असल्याची अनेक उदाहरणे सापडतात. असे सत्पुरुष या भारतभूमीत निर्माण व्हावेत आणि होत आहेत. यांतच भारताने श्रेष्ठत्व सामावलेले आहे.

देवीची मूर्ति दिसू लागे. मग मात्र त्या तस्करचोरांची तोंडे पहाण्यासारखी झाली आणि चेहरे करून ते निमूटपणे चालते झाले.

(वरील दोन्ही कथांचे निवेदक गोरेगाव येथील श्री दादा पेंडसे हे आहेत.)

श्रीमत् शंकराचार्यांनी ‘शतश्लोकी’ अथवा ‘सौंदर्यलहरी’ या नावाचा जो काव्यसंग्रह लिहिला आहे. त्याच्या प्रत्येक श्लोकावर एक एक यंत्रशक्ति निर्माण झालेली आहे, कोणत्या यंत्राच्या पूजनाने रोगमुक्त होता येते, अथवा कोणत्या यंत्राच्या योगाने लक्ष्मी प्राप्त करून घेता येते, हे मंत्रशास्त्रकर्त्यांनी आपल्या ग्रंथात दाखवून दिले आहे. याप्रमाणे अनेक यंत्रे व त्यांची पूजा होत असते. कोणी यंत्राचा ताईत करून गळ्यात बांधतो तर कोणी एखादा पहिलवानी पेशाचा ‘पट्टा’ तोच आपल्या दंडावर बांधतो अनेकांना या यंत्राचा गुण येतो, असा माझा स्वतःचा अनुभव आहे आणि अशी पुष्कळ माणसे माझ्या पाहण्यातही आहेत कित्येक वेळा हे ताईत सोने, चांदी, तांबे यांच्या पत्र्यावर कोरतात काही वेळा ते भूर्जपत्रावर अगर कागदावर लिहून पेटीमध्ये ठेवतात केवळ हिंदु लोकच हे ताईत बांधतात असे नव्हे तर मुसलमान लोकही हे ताईत वापरतात. कित्येक वेळा हे ताईत संकटात सापडलेल्या माणसाला संकट निवारणार्थ ते देतात, हे आपल्यापैकी बऱ्याच जणांनी ऐकले किंवा पाहिलेही असेल असो तेव्हा अशी ही तंत्र-मंत्र क्रिया आहे

(कल्याण शक्तिअंक, १९२४ मधील लेखावर आधारित)

सांप्रतच्या विसाव्या शतकातही अनेक मान्यवर व्यक्ति यंत्राच्या पूजक आहेत, हे लेखकाला माहित आहे. त्या पूजनाच्या गोष्टी, कारणे व परिणाम लेखकाने प्रत्यक्ष ऐकलेले आहेत भारताचे भूतपूर्व हिशेब तपासनीस सर नरहरराव सारखे गृहस्थ अमेरिकेत कामावर असतानाही दररोज सकाळी तीन तास यंत्र पूजेसाठी खर्च करीत असत, असे प्रत्यक्ष त्यांनी सांगितले आहे तात्पर्य पूजा अनेक करतात, पण दाखवीत नाहीत इतकेच ज्यांना शक्तीचे महत्त्व पटले, यंत्राची महती पटली, ते तो मार्ग अनुसरल्याविना राहात नाहीत हे सत्य आहे

---

# सामाजिक देवता

(१) श्रीकरणी देवी, (२) एकवीरा, (३) कन्यका परमेश्वरी, (४) कमलोबिबी (५) काळसुनाई (६) चिन्नम्मा (७) बांकळमाता (८) मायाराणी (९) यल्लम्मा (१०) रेणुका (११) डुनिनी (१२) सतीचे देवालय

देवतांचा इतिहास पाहताना त्यांची विभागणी अनेक थरामध्ये झालेली आहे, हे आतापर्यंतच्या वृत्तातावरून वाचकांच्या ध्यानी आले असेलच. वैदिक देवता अगर पौराणिक देवता या प्रकरणामध्ये आपण ज्या देवता पाहिल्या त्या सर्व स्वयंभू म्हणाव्या लागतील. अष्टभुजा देवीचा जन्म एका विशिष्ट दैत्याचा नाश करण्यासाठी झाला, तर महिषासुरमर्दिनीचा जन्म महिषासुराचा वध करण्याच्या हेतूमुळे झाला आणि त्यानंतरच त्या पीठस्थानी अधिष्ठित झाल्या. देवतांचा हा एक प्रकार झाला. पर्वतमाथ्यावर काही देवतांची स्थाने आढळून आली, म्हणून त्यांची माहिती देताना ती 'पर्वतीय देवता' या प्रकरणामधून दिली आहे.

आता, या प्रकरणामध्ये आणखी एका प्रकाराचे विवेचन करण्याचे योजिले आहे. या प्रकरणातील देवतांचा जन्म इतर सामान्य माणसांप्रमाणेच झालेला असून, आपल्याजवळील अलौकिक आध्यात्मशक्तीच्या जोरावर व त्यांनी केलेल्या अतिमानवी चमत्कारामुळेच त्या देवतास्वरूप पावल्या. एवढेच नव्हे, तर समाजाने त्यांना देवतास्वरूप मानल्या आहेत इतकेच! उदाहरणार्थ, श्रीकरणीदेवी घ्या. ती एका साध्या नि सामान्य अशा मानवकुळात जन्म पावली. त्यानंतर तिने केलेल्या चमत्कारामुळे ती साहजिकच देवीपदापर्यंत पोहोचली. तिच्या निर्वाणानंतर मंदिरामधून तिच्या प्रतिमांची स्थापना झाली आणि नंतर त्यांची पूजाअर्चा चालू झाली. ज्या घराण्यांना तिच्या श्रेष्ठत्वाची प्रचीति आली आणि तिने केलेल्या चमत्काराबाबत खात्री पटली होती, त्यांनी या देवीला आपली कुलस्वामिनी मानले. आज एका विवक्षित भागात ती प्रमुख देवता होऊन बसली आहे. ज्याप्रमाणे श्रीरामचंद्र अगर योगिराज कृष्ण आपल्या अलौकिक कृत्यांमुळे अवतारी ठरले आणि आज देवत्व पावले, त्याचप्रमाणे श्रीकरणी आज अवतारपदावर आरूढ झालेली आहे. तिच्यात आपण अशे

म्हणून की, काही भक्तगण असेही मानतात की, रामकृष्ण हे प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार होऊन जन्मले व ते देवस्वरूप होते.

कन्यका परमेश्वरी हिने एखाद्या अन्यायाच्या प्रतिकारार्थ बलिदान केल्यामुळे ती वैश्य समाजाची देवी बनली, तर कळमुदाई त्याच प्रकारच्या कारणामुळे कोळी समाजाची देवता बनली. रेणुका आपल्या चारित्र्यामुळे, विशेषतः तिच्या पुत्राने तिचे शिर उडविले आणि सांधून दिले, या कारणासाठी अद्वितीय ठरली. शिवाय ती एका युगपुरुषाची माता म्हणून समाजाने तिला देवतास्थानी बसविली.

वरील प्रकारच्या देवतांच्या समूहात अंतर्भूत होणाऱ्या देवतांसाठी हे प्रकरण तयार केले आहे. या प्रकरणात माहिती न मिळाल्यामुळे ज्यांचा समावेश झाला नाही, अशा अनेक देवता असण्याचा संभव आहे. या प्रकरणातील देवतांचे वर्गीकरण व त्यांची माहिती कोणत्या धोरणाने दिली हे वाचकांच्या ध्यानी यावे म्हणून उपनिर्दिष्ट दिलेली ही केवळ उदाहरणे आहेत. सामाजिक देवतांची संपूर्ण यादी नव्हे, इतके वाचकांनी आपल्या ध्यानी असू द्यावे.

राहाणारे जे लोक भक्त बनले असतील, ही गोष्ट जरी संभवनीय वाटत असली, तरी यामागे सर्व समाज एकसंध ठेवण्याची भावना नसेलच असे म्हणता येणार नाही. परंतु येथे एवढेच प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते की, हा विषय पूर्णपणे संशोधनाचा असल्याने कोणी तरी अधिकारी व्यक्तीने या विषयावर पुढेमागे जास्त प्रकाश टाकणे जरूरीचे आहे.

## ( १ ) श्रीकरणीदेवी

भारतवर्षात होऊन गेलेल्या सत्पुरुषामध्ये संत, महंत, परमहंस, महर्षि, अवधूत या पदापर्यंत पोहोचलेली अनेक मंडळी दिसून येतात. उत्तर भारतात अशी संत तुळसीदास, कबीर, मीराबाई, रामकृष्ण परमहंस ही वडी बडी मंडळी झाली, तद्वतच ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, नरसिंह मेहता, अक्कलकोटनिवासी स्वामी, स्वामीसमर्थ, वासुदेवानंद सरस्वति ही संतमहंतांची मालिका लागलेली होती. याच्याच पंक्तीला बसण्यालायक म्हणून श्रीकरणीदेवीकडे अंगुलीनिर्देश करावा लागेल. पूर्वकर्मानुसार जी जन्मतःच देवतारूप बनली आणि पित्याच्या कुळाचा उद्धार करण्यासाठी भूतलावर अवतरली अशी ही महान देवता आहे.

विवाहयोग्य वय झाल्यावर तिच्या वडिलांनी तिचे लग्न दिपोजी नावाच्या एका गृहस्थाबरोबर लावून दिले. लग्न झाल्यावर ती तिच्या सासरी राहाण्यास गेली काही दिवस ती शांतपणे सासरी नांदली. म्हणजे त्या काळात कोणताही चमत्कार तिने केला नाही आणि लोकांना आश्चर्याने तोंडात बोटे घालायला लावली नाहीत. पण जित्याची खोड मेल्याशिवाय जावी कशी? एकदा तिच्या सासूने तिला उपदेश केला की, ' बाई ग, या गावात विंचू पुष्कळ आहेत. तेव्हा कामधंदा करताना जरा जपून कर. ' त्यावर रिधुबाईने ठासून सांगितले की, ' या गावात एक देखील विंचू नाही ' आणि आश्चर्य असे की, त्या दिवसापासून आजतागायत त्या गावात एक देखील विंचू दिसत नाही. याचे असे कारण शक्य आहे की आपल्याजवळ आध्यात्मिक शक्तीच्या बळावर तिने या विंचवावर बंधन घातले असावे. अशाच तऱ्हेचे दुसरे एक उदाहरण लेखकाच्या वाचण्यात आहे. वासुदेवानंद सरस्वति टेम्बेस्वामी त्यांच्या लहानपणी माणगावी ( गोवा ) येथे असताना त्यांनी एका जहरी नागाला एका विवक्षित जागी आपल्याजवळील आध्यात्मिक शक्तीच्या जोरावर थोपवून धरले होते. देवगड तालुक्यात एका गावी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतावर चिमण्या अतिशय त्रास देत. तेव्हा एका मांत्रिकाने बंधनविद्येने त्या नाहीशा केल्या गावकऱ्यांनी नंतर त्या मांत्रिकाला ठार केल्यामुळे आजतागायत त्या गावी एकही चिमणी दिसून येत नाही.

जी मुलगी दैवीच्या रूपाने जगत्कल्याणासाठी जन्माला आली, ती संसारात कशी रमावी? एक दिवस तिने आपल्या पतीला आपले दिव्य आणि सत्य स्वरूप दाखविले. आपल्याबरोबर संसार करण्याचा मानस सोडून द्यावा असेही तिने त्याला विनविले. दिपोजीने तिचे सत्य स्वरूप ' चक्षुर्वै सत्य ' पाहिले असल्यामुळे त्याने तात्काळ या गोष्टीस होकार दिला. तिच्याच सांगण्यावरून रधूच्या दुसऱ्या बहिणीबरोबर त्याने विवाह केला आणि गृहस्थी बनला. हा विवाह झाल्यानंतर साधारणत आठ महिन्यांनी तिने संन्यासदीक्षा घेतली आणि संसारी रिधुबाई जोगीण झाली

संन्यासदीक्षा घेतल्यावर बिकानेरजवळील खाटिका जंगलात ती तपसाधना करण्यासाठी गेली सरकारी जागेवर मठवजा झोपडी बांधून त्यात ती राहिली बिकानेरच्या महाराजांच्या कानावर ही बातमी पोहोचली सरकारी जागेवर न विचारता सररता झोपडी बांधणाऱ्या या जोगिणीचा राजाला राग आला आणि त्याने ती झोपडी उठविण्याची नोकरांना आज्ञा केली. नोकरांनी तिची झोपडी तर मोडलीच, पण तिच्या सामानाची देखील वाटेल तशी विल्हेवाट लावली तिच्या सामानात तिची एक वजनी पेटी होती. परंतु ती पेटी शिपाई लोकांना

तर उचलेनाच, पण राजाला देखील ती उचलेना सर्व जण थकल्यावर शेवटी देवीने ती पेटी लीलया उचलून दाखविली ते पहाताच राजाचा आदर भाव जागृत झाला आणि तो तिचा भक्त बनला नंतर तेथे तिच्यासाठी कायमचा मठ बांधला गेला आणि कालांतराने आजूबाजूस वस्ती वाढल्यावर देशनोक या नावाने ते गाव प्रसिद्धीस आले याच ठिकाणी आपल्या उर्वरित आयुष्याची तिने सुमारे पन्नास वर्षे घालविली

एकदा साठिका गावी पर्जन्य पडला नाही आणि पशूनासुद्धा पाणी प्यावयास मिळेनासे झाले तेव्हा तेथील पशुधन जवळच्या राठोड गावी हलवि ण्यात आले तेथील विहिरी, तळी पाण्याने तुडुंब भरलेली होती पण राजबंधु रणमलजीने पशुधन हलविताना देवीची अनुज्ञा घेतली नसल्याने त्या गाई तेथे पाणीही पिईनात रणमलजीला आश्चर्य वाटले आणि त्याने झालेली हकीगत साठिका गावी येऊन देवीला कथन केली देवीने चाले गेले विचारून गाईना पाणी पिण्यास आज्ञा दिली तेव्हाच त्या राठोड गावी पाणी पिऊ लागल्या या वेळी देवीने रणमलजीला राजन् म्हणून संबोधले आणि कदाचित त्यामुळेच तो पुढे खराखुरा राजा झाला

(कल्याण मासिक, नारी अंक, १९४८, पृष्ठ ६६१)

बिकानेरनरेश तिचा भक्त बनल्यावर एकदा एक प्रसंग त्याच्यावर गुदरला की, ज्यातून या देवीच्याच कृपेमुळे तो वाचला बिकानेर शहरावर मुसलमानी (तुर्की) लोकांनी स्वारी केली त्या प्रबळ सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही, या विचाराने राजाचे धैर्य खचले या वेळी तो देशनोकला गेला आणि त्याने करणीदेवीला आपले सर्व संकट निवेदन केले त्या समयी प्रसाद म्हणून देवीने त्याला एक धनुष्यबाण दिला आणि त्याच्याच अद्‌भुत सामर्थ्याने राजाने शत्रूवर विजय मिळविला सन् १४७९ च्या सुमारास देवीने स्वत:च आपले एक मंदिर देशनोक या गावी बांधले या ठिकाणी तिचं वास्तव्य असताना एकदा जेसलमीरच्या राजाकडून तिला निमंत्रण आले कारण त्या राजाच्या पाठीवर एक मोठा फोड आला होता आणि कोणत्याही उपायाने त्याला आराम मिळत नव्हता एकदोन माणसे बरोबर घेऊन देवी जेसलमीरकडे जाण्यास निघाली सुमारे ३० मैल अंतर चालून गेल्यावर एका सरोवरातील स्वच्छ पाण्याने तिने स्नान करून घेतले आणि लगेच त्याच जागी बैठक मारून जठराग्नि पेटवून तिने स्वत:ला जाळून घेतले हा प्रकार चरणनासी गावी झाला या प्रकाराची स्मृति म्हणून त्या ठिकाणी करणीदेवीचा चबुतरा आहे तिला नेण्यासाठी पुनाजी नावाचा जो चाकर आला होता, त्याला हा सर्व प्रकार पाहून

अतिशय वाईट वाटले. तो आक्रोश करू लागला. तेव्हा देवी पुन्हा प्रकट झाली आणि त्याला म्हणाली, ' तू पुढे जेसलमीर येथे जा. मी तुला मागाहून येऊन भेटेन. ' जे योगी आपले आध्यात्मिक सामर्थ्य एका विशिष्ट पातळीवर आणू शकतात, त्यांना पुन्हा प्रगट होणे मुळीच कठीण जात नाही.

याच प्रकारचे दुसरे एक उदाहरण वासुदेवानंद सरस्वति यांचे वडील गणेशपंत यांचे देता येईल. आपला मरणकाल जवळ आला आहे, ही जाणीव होताच त्यांनी आपल्या जीवश्चकंठश्च मित्राला बोलावून घेतले आणि त्याला सांगितले की, ' मित्रा, चार-दोन मिनिटांतच आम्ही आमची इहलोकीची यात्रा संपविणार आहोत. पण मी गेल्यावर मात्र माझ्या घरातील कोणत्याही व्यक्तीला रडू देऊ नकोस अथवा शोक करू देऊ नकोस, तेणेकरून माझ्या आत्म्यास अतिशय यातना होतील. ' तो मित्र क्षणमात्र लघुशंकेच्या मिषाने बाहेर गेला असता गणेशपंतांनी जी मान टाकली, त्यांचे प्राण पंचतत्त्वात विलीन झाले आणि ते पाहून घरात रडारड सुरू झाली. तो मित्र परत आला नि घरात चाललेली रडारड पाहून त्याला गणेशपंतांच्या वचनांची आठवण झाली. तेव्हा आपल्या मित्राचे एवढे साधे काम देखील आपण न करू शकल्याबद्दल त्याला अतिशय वाईट वाटले. परंतु मृत्यु पावलेले गणेशपंत ह्या मित्राचे दुःख कमी करण्यासाठी पुन्हा जिवंत झाले नि त्या मित्राला म्हणाले, ' मित्रा, तू मला दिलेले वचन पाळले नाहीस. आता मी पुन्हा मरतो तरी ते नीट पाळ. ' असे म्हटल्यानंतर यमराजाच्या पाशाने पुनश्च त्यांच्या भोवती आवळले गेले. असेच आणखी एक उदाहरण पहा.

शिवाजीनगर ( पुणे ) येथे जंगली महाराज यांची समाधी आहे. यांचे मूळ स्थान बागलकोट आहे असे मानतात. जंगली महाराज हिंदु होते की मुसलमान होते याबद्दल तज्ज्ञांत वाद आहे, पण नक्की ते कोण होते हे ठरविणारा पुरावा मात्र उपलब्ध नाही. शके १८०२ साली त्यांनी समाधी घेतली. तेव्हा दोन्ही जमातींच्या त्यांच्या भक्तांनी त्यांची अंत्यक्रिया आपापल्या धर्माप्रमाणे करण्याचा हट्ट धरला. तेव्हा महाराजांनी पुनर्जन्माचा चमत्कार केला आणि ते आपल्या शिष्यांना म्हणाले, ' मला हिंदु आणि मुसलमान दोन्हीही सारखेच प्रिय आहेत. तेव्हा परस्परांनी सहकार्याची कास धरून माझा अंत्यविधि पार पाडा. ' शिष्यांना याप्रमाणे उपदेश करून पुन्हा ते पंचतत्त्वात विलीन झाले.

( केसरी, पुणे ४-११-१९६७ )

पतंजलीच्या योगसूत्राप्रमाणे पंचप्राणांपैकी उदान प्राणावर संयम ठेवल्यास मानव इच्छामरणी होऊ शकतो, या प्रमेयाची ही उदाहरणे आहेत. गुलाबराव

महाराज म्हणतात की एकच व्यक्ति दोन ठिकाणी दिसणे अशक्य नाही. डिग्रसी वळणत माधव केसरे यांचे घरी त्यांनी एकाच वेळी दोन निरनिराळ्या ठिकाणी दर्शन दिले आहे. समोर एखादा पुस्तक वाचीत असेल तर वाचणाराचे शरीरात आपले अर्धे शरीर मिळवून शिवाय बिछान्यावर पडून राहून, ते पुस्तक वाचू शकत असत. पण ते म्हणतात असे चमत्कार वारंवार करणे योग्य नाही.

(गुलाबराव महाराज चरित्र, ले. मिलिंद, पृ. २१४)

आता आपण आपल्या मूळ विषयाकडे वळू. देवीने वचन दिल्याप्रमाणे ती जेसलमीर येथे एकटीच गेली आणि तिने राजाचा रोग नष्ट केला. नंतर ती त्याच गावच्या बन्ना नावाच्या सुताराच्या घरी गेली. तिने त्याला आपली स्वत:ची एक उत्कृष्ट मूर्ति तयार करण्यास सांगितले. परंतु तो सुतार आंधळा होता. त्याला आपली प्रतिकृति नीट घडविता यावी म्हणून तिने दृष्टि दिली. मूर्ति तयार झाली की दुसऱ्या दिवशी ती देशनोक येथे पोहोचविण्यास तिने त्याला सांगितले. परंतु एका दिवसात—नव्हे एका रात्रीत—ते अंतर तोडणे अशक्य आहे, असे त्याने म्हटल्यावर ती त्याला म्हणाली, 'रात्री झोपताना तू ही मूर्ति उशाजवळ घेऊन झोप आणि काय चमत्कार होतो तो पहा.' बन्ना सुतार त्याप्रमाणे वागला. दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठल्यावर पहातो तो, तो देशनोक येथे येऊन पोहोचला होता. तेथील मंडळींना त्याने ही सर्व हकीकत सांगितली. ती गावकऱ्यांनी सत्य मानली आणि चुनामातीविरहित असे नुसते दगड रचून एक लहानसे मंदिर तयार केले. हेच तिने स्थापन केलेले मंदिर होय. पुढे मंदिराचा जीर्णोद्धार होऊन, मूळ मंदिर कायम ठेवून दुरुस्ती केलेली आहे.

प्राप्त झाले आहे. यामुळेच काही वेळा या देवीला 'चुहादेवी' या टोपण नावाने संबोधिले जाते. ज्याप्रमाणे आपण कुत्री मांजरे घरात पाळतो आणि त्यांना वाढवितो, पालन-पोषण करतो, तद्वत् येथे उदरांची व्यवस्था ठेवली जाते मंदिराच्या खर्चाने त्यांना दूध आणि मिठाई चारण्यात येते. यात्रेकरूंनी त्यांना तुडवू नये अथवा दुखवू नये म्हणून यात्रेकरूंना कडक शब्दात सूचना दिल्या जातात. कावळे, घारी इत्यादी पक्ष्यांकडून त्यांची हत्या होऊ नये म्हणून त्यांच्या राहण्याची सोय चोहोबाजूंनी जाळी मारून बंद केलेल्या पेटीत केलेली आहे मांजर आणि उदीर या दोघांचे सिल्यामोपळ्याएवढे सख्य! तेव्हा मांजराच्या तावडीत उदीर सापडू नये म्हणून मांजरांवर लक्ष ठेवण्यासाठी मंदिराच्या खर्चाने सतत एक पहारेकरी जागता पहारा करीत असतो. हे सर्व पाहून आपल्याला देखील प्रश्न पडतो की, इतकी जपणूक का करतात या प्राण्यांची? याचे कारण असे की, चारण लोक या देवीचे उपासक आहेत. त्यांची अशी इच्छा असते की, यमराजाने आपल्याला नेऊ नये वास्तव आपला मृत्यु समीप आला आहे अशी चाहूल लागताच ते मनात उदीर स्वरूपात तेथे वावरतात यमराजाने त्यांना नेऊ नये म्हणून ही व्यवस्था केला जाते.

या मंदिराच्या परिसरात योगमायेचे एक लहानसे मंदिर आहे रिधु-बाईच्या श्रेष्ठपणामुळे तिच्या उरलेल्या पाच बहिणींनाही श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे उत्तर भारतातही काही ठिकाणी त्यांची मंदिरे आढळतात श्रीकरणी देवीची अनेक मंदिरे त्या प्रांती आहेत. त्यापैकी अलवार येथील किल्ल्यामध्ये शाहपूरच्या राणीने बांधलेले एक मंदिर आहे. अशा रीतीने हिंगुळा देवीने मेहोजीला दिलेला 'कुल सदा भूतलावर नांदो' हा वर सत्यसृष्टीत अवतरला आहे चैत्र व आश्विन नवरात्रामध्ये यात्रा भरते

कामदा

देशनोक हे पुण्यग्रामसे । परिसरीं बिकानेरच्या वसे ।
करित साधना मेहुजी तिथे । देई हिंगुळे कुळ नांदतें ॥ १ ॥
पुत्र मागता कन्यका दिली । करणिदेवी ही जन्म पावली ।
जन्मल्याक्षणापासुनी तरी । चमत्कार ते देवता करी ॥ २ ॥
मावशी वदे बोट मोडुनी । दगड जन्मला तो पुरातनी ।
शब्द ऐकिला देवी कोपली । अंगुळे सदा वक्र ठेविली ॥ ३ ॥
जळसरोवरे उठविली कुठे । रोग दु:खही वारिले कुठे ।
सैनिकाप्रती देत भाकरी । सहाय्य दे नृपा युद्ध जइ करी ॥ ४ ॥

कीर्ति ऐकुनी नृपति-कूळही । पूजितो बिकानेर वंशही ।
उभवितो स्वयें देवि मंदिरा । करणीदेवीला नमस्कार हा ॥ ५ ॥

* * *

(२) एकवीरा

एकवीरेति विख्याता सर्वकामप्रदायिनी ।
अदितियोमदेवा सा संभविष्यति भूतळे ॥ १६ ॥
जनिष्यामि न संदेहः पंचपुत्रान्मनोरथान् ॥

(सह्याद्रिखंड, लेखक जे. नी. डिकुना.)

अदितीने तप केल्यावर शंकरानी तिला वर दिला की, 'तुझा अवतार भूतलावर इक्ष्वाकु वंशातील रेणुराजाच्या घरी होईल. त्या वेळी तुझे मूळ नाव रेणुका असे असेल. परंतु भूतलावर मात्र तू एकवीरा या नावाने विख्यात होशील. त्येच तुला पाच पुत्र होतील.' तेव्हा वरील श्लोकाच्या आधारे असे म्हणता येईल की, या देवीला एकवीरा हे नाव शंकरानीच देऊन ठेवलेले आहे.

या देवीच्या नावाबद्दलची दुसरी एक व्युत्पत्ति समजते. ती अशी की, द्रविडिअन लोकांची रेणुका ही अति प्रिय देवता असून तिचे नाव 'अक्का अव्वैयार' असे आहे. या शब्दाचा ते 'पूजनीय माता' असा अर्थ करतात. तेव्हा या द्रविडिअन नावापासून "एकवीरा' हा अपभ्रंश समजतो. दक्षिणप्रांती या देवतेला अतिशय महत्त्व आहे. दुसरी एक समजूत आहे की, रेणुकेच्या पोटी परशुराम हा एकच वीरपुत्र जन्म पावला म्हणून तिला 'एक-वीरा' हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. परंतु हे खरे नव्हे, कारण परशुरामाला आणखी तीनचार भाऊ होते.

मंडपाला अनेक स्तंभ असून त्यावर सुंदर चित्रे कोरलेली आहेत एका ४५ फूट उंचीच्या वर्तुळाकार सिंहस्तंभाच्या खोटा बाजू असून, तथे एक ब्राह्मी लिपीत शिलालेख आहे एका भिंतीवर तीन भव्य गजराज कोरलेले असून समोरील जाळीदार नक्षीकाम दिसते चैत्याच्या मागील बाजूस, पाया व कळस नसलेले स्तूप ... आहेत स्त्री पुरुष नर्तकांची अनेक जोडपी सर्वत्र कोरलेली दिसतात येथे एकूण वावीस शिलालेख आहेत या ठिकाणी ... मातीचा गिलावा करून त्यावर काही आकृति असाव्यात असे दिसून येते एकंदरीत हे शिल्प अतिशय प्रेक्षणीय आहे

या स्तूपाच्या बाजूला एका खडकामध्ये एकवीरा देवीचे शिल्प आहे या स्थानाचा उल्लेख पुराणातून मिळतो मूर्ति खडकावर कोरलेली असल्याने तिच्यावर आच्छादन म्हणून एक लहानशी गुहाही खोदलेली आहे या देवी भोवती पूर्ण प्रदक्षिणा घालणे भक्तांना अशक्य आहे मंदिराचा जीर्णोद्धार सन १८६६ साली झाला, अशी माहिती देणारा एक लहानसा शिलालेख तेथे आहे मंदिरातील घंटेवरील १८५७ ही अक्षरे, घंटा बरीच जुनी असल्याची ग्वाही देतात या देवीची जत्रा चैत्र शु० ८ पासून पौर्णिमेपर्यंत होते असे मानतात की, देवीच्या स्थानापासून खाली चार मैलावर एका गावी— ते गाव तिचे माहेरघर असल्याने— देवीच्या वार्षिक पालखीची मिरवणूक त्या गावापर्यंत नेऊन परत आणतात पालखी मिरवणुकीच्या वेळी देवीचे वारं अंगात आलेली नवी जुनी 'झाडे' मिरवणुकीत नाचत असतात यात्रेच्या वेळी कोंबड्या, बकऱ्या बळी दिल्या जातात

हरिवर्मा या हैहय वंशीय राजाला दोन स्त्रिया होत्या एकीचे नाव एकावलि आणि दुसरीचे नाव यशोमति या दोघीही एकवीरा देवीच्या भक्त होत्या, असा उल्लेख मिळतो म्हणजे यातून असा अर्थ निघतो की, हे स्थान अतिशय प्राचीन आहे हल्ली ठाणे, मुंबई, पुणे या भागात राहाणारे कायस्थ, पाठारेप्रभु व कोळी या जमातींची ती कुलस्वामिनी असल्याने यात्रेच्या वेळी या लोकांची विशेष गर्दी असते

'कायस्थ प्रभु समाचार' या मुंबई येथील मासिकात (दिनांक १५ ४ ६० च्या अंकात) अशी शंका प्रदर्शित केली गेली होती की कायस्थ प्रभूंची खरी कुलदेवता कोण ? कार्ले येथील एकवीरा की मातापूर येथील रेणुका ? यानंतर अशी माहिती उपलब्ध झाली की, 'सन १९०८ साली रामराव प्रधान, बडोदेकर यांनी 'प्रभुकुलदीपिका' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यात

त्यांनी रेणुकेची स्थाने कोठे कोठे आहेत त्याचा निर्देश केला आहे. तो खालील-प्रमाणे— कार्ले, माहूर, अमरावती, सोपारा ( ठाणे ), वेहेरगाव ( जुन्नर ), दिल्ली, नेमावर ( इंदोर ), चांदवड ( नाशिक ), चांदा, नागपूर इ० इ० ' याचा खुलासा करताना प्रस्तुत ग्रंथकार पुढे म्हणतात की,

कायस्थांची वस्ती बंगाल, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या भागात आजही भरपूर आहे. चित्रगुप्त हा ब्रह्मदेवाचे कायेपासून उत्पन्न झाला आणि यमराजाची खतेवही लिहिण्याचे काम त्याला मिळाले. वास्तव तो कायस्थ झाला आणि लिहिण्याची कामे करू लागला. हल्लीही लिहिण्याची कामे कायस्थ बहुधाने करीत असतात. गुप्त साम्राज्यात उच्च अधिकारपदे या जातीकडे होती ७ व्या शतकात बंगालमध्ये कर्ण सुवर्णे शशांकदेव राजा असताना, कायस्थांचे वर्चस्व होते. १२ व्या शतकापर्यंत कायस्थ शब्द जातीवाचक नव्हता

एक कथा अशी की, चित्रगुप्ताला १२ मुलगे होते आणि आर्यावर्तातील निरनिराळ्या प्रदेशात त्यांना गावे वाटून दिली होती. त्यांच्या राहण्याच्या स्थाना-वरून पुढे त्यांच्या बारा पोटजाति बनल्या. जसे मथुरेचे राहणारे माथुर, गौड-प्रांतीचे गौड, भटनागर, श्रीवास्तव, सक्सेना, वाल्मिकी, सूर्यध्वज इ० इ० यामुळेच त्यांच्या चालीरीति प्रांतपरत्वे भिन्न भिन्न आहेत. तसेच प्रांतपरत्वे ते दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी, शांभवी, महादेव, विष्णु, राम, गंगा यांचीही पूजा करतात.

'कायस्थांची' वस्ती पूर्वी बंगालमध्ये जास्त होती हे आपण वर पाहिले. कालांतराने ती सरकत सरकत खाली नागपूरप्रांती आली असावी. साहजिकच स्थानिक देवता रेणुका ही त्यांची पूज्य देवता बनली. पुढे ही उपासक घराणी आणखी खाली सरकून नाणेघाटमार्गे कोकणात उतरली. म्हणून नाशिक, जुन्नर, सोपारा ही गावे क्रमाक्रमाने या देवीची पूजा करू लागली. यासाठी कुलस्वामिनी म्हणजे एकाच क्षेत्राची देवता असावी, हे समीकरण बरोबर नाही. ज्या ज्या घराण्यांना जे जे स्थान जवळ पडले ते ते त्यांनी आपले कुलदैवत मानले किंवा भौगोलिक परिस्थितीमुळे पहिले स्थान सोडून दुसरे स्थान घेतले असावे असेही होण्याचा जास्त संभव आहे. रेणुका आणि एकवीरा या दोन्ही देवता एकच असल्याने काही कायस्थ घराणी या देवीची उपासक बनली असावीत.

रेणुका देवीसंबंधी सविस्तर माहिती त्या शीर्षकाखाली पहावी

वसंततिलका

क्षत्रीय वीर जगिं एक कुणा न ठावा ।
श्रीरेणुका परशुराम सदा स्मरावा ॥

क्षत्रीय जाति निपटीं एकवीस वेळां ।
की मातृ अत्यचना करि पूर्ततेला ॥ १ ॥
छोटोनि सागरतळीं मिळवील जागा ।
नामें तयासि अपरांत कुणी वदे गा ॥
विख्यात वीर परशूधर काळ वीरा ।
जन्माआर्धा शिव वदे तुज एकवीरा ॥ २ ॥
तें कारळे प्रथित पीठही देवतेचें ।
देवीस्वरूप खडकात स्वयभू साचे ॥
ना तेथ वाव मिळतोचि प्रदक्षिणेला ।
विस्तीर्ण मडप कुणी मग बांधियेला ॥ ३ ॥
कायस्थ, कोळी कुळ दैवत मानि कोणी ।
शेजार उत्तम मिळे बघ बौद्धलेणी ॥
आश्विन चैत्रि जमती जन उत्सवाला ।
त्या देवतेपुढती मीं नमवी शिराला ॥ ४ ॥

## (३) कन्यका परमेश्वरी

तेलगू भाषेत कन्यकापुराण या नावाचा ग्रंथ तिम्माया शास्त्री या गृहस्थाने लिहिलेला आहे त्यामध्ये कन्यका परमेश्वरी या देवीबद्दलची माहिती दिलेली आहे सहाव्या शतकात हर्षवर्धन याने ठाणेश्वर येथे राजसत्ता स्थापन केली या राज्यसत्तेचा त्याने दक्षिणेकडे राजमहेंद्री, गजमपेठ येथपर्यंत विस्तार केला साम्राज्यविस्ताराच्या काळी विष्णुवर्धन या त्याच्या पुत्राने राजमहेंद्री शहराजवळील वेनुगोंडा या गावातील एका वैश्य जातीच्या मुलीवर तिच्या मनाविरुद्ध आणि असहाय स्थितीत हा बलात्कार केला. यामुळे तिला अतिशय वाईट वाटले जीवन जगणे असह्य झाले आप्त आणि इतरेजनाना तोंड दाखवायलादेखील जागा उरली नाही या सर्वांकडून होणारी हेटाळणी टाळण्यासाठी तिने देहत्याग करण्याचे ठरविले त्याप्रमाणे एक दिवस तिने अग्निकाष्ठ भक्षण केले शेवटी व्हायचे तेच झाले विष्णुवर्धनाच्या दुर्वर्तनाने धगधगत असलेल्या चितेत त्या चिचाऱ्या निष्पाप आणि निरपराध अबलचा फुकटचा बळी गेला

त्या मुलीचा असा करुणामय अंत पाहून घरातील आणि नात्यागोत्यातील माणसाना अपार दु ख झाले या अजाण बालिकेला आपण देहत्यागापासून परावृत्त करू शकलो नाही, वेळीच प्राणार्पण करून जुल्मी विष्णुवर्धनाचा प्रतिकार न

ती जन्माला आल्यावर आपल्या आध्यात्मिक सामर्थ्याच्या बळावर अनेक चमत्कार केले, लोकोपयोगी कार्ये केली आणि देवपण प्राप्त करून घेतले. या देवीचा निश्चित काल कोणता याबद्दलचा पुरावा उपलब्ध नाही. परंतु साधारणपणे उत्तरप्रांती जे अनेक बुद्धधर्म प्रसारक राजे होऊन गेले, त्यांपैकी कनक अगर कनकवर्मा या राजाच्या वेळी ही स्त्री होऊन गेली असे म्हणतात. तिच्या मरणोत्तर एक मंदिर बांधून त्यात तिची प्रतिमा स्थापन करण्यात आली. या देवतापीठाला हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक भेट देतात आणि तिची आराधना करतात. विशेषतः पुत्रप्राप्ति व्हावी म्हणून भक्त तिला नवससायास करतात आणि पुष्कळदा भक्ताच्या कामना पूर्ण होतात.

या भागातील मुसलमान लोक 'पाच पीर' या नावाच्या एका ग्रामदेवतेची पूजा करतात.[1] वस्तुतः हे पाच पीर म्हणजेच मुहम्मद, अली, फातिमा, हसन आणि हुसेन या पाच व्यक्ति होत. पण आधुनिक काळात कोणीही मर्त्य मुसलमान फकिराचा या पाचांमध्ये समावेश करतात आणि तेच पाच पीर म्हणून मानतात. चांद सौदागर, शेख सद्दु, सुलतान शहीद इत्यादि फकिरांचा या पाचांमध्ये अंतर्भाव झालेला दिसून येईल. या मुसलमानी धर्मप्रसारकांची अशी एक रीत आहे की, हिंदूंच्या ग्रामदेवतेच्या मंदिराशेजारी पाच पीरांची स्थापना करावयाची आणि ग्रामदेवतेला भेटायला येणाऱ्या हिंदु भक्तांना आपल्या पीराकडे ओढून घ्यावयाचे. हे पाच पीर म्हणजे तुमच्यांच देवीचे रक्षक आहेत, असे त्या भोळ्या भाविक हिंदूंना भासवून आणि कोंबडे, बकरे त्यांना अर्पण करावयास लावून आपले उदरंभरण करावयाचे. ज्याप्रमाणे आपल्याकडे नंदीचे दर्शन घेतल्याशिवाय शंकराकडे जावयाचे नाही, त्याप्रमाणे या पाच पीरांचे दर्शन-पूजन केल्याशिवाय ग्रामदेवतेकडे जावयाचे नाही, असा दंडक क्रमाक्रमाने घालावयाचा. योगायोगाने म्हणा किंवा भक्तांच्या वा त्या धर्मप्रसारकाच्या कोणाच्या तरी एकाच्या सुदैवाने म्हणा, त्या भक्तांच्या इच्छा सफल झाल्या म्हणजे त्यांची श्रद्धा वाढल्यावर त्यांना आपल्या धर्मात ओढावयाचे असा त्यांचा मूळ हेतु असतो. अनेक भोळेभाबडे भक्त या फसवणुकीला बळी पडतात. यावरून मुसलमानी समाजाचे धर्मप्रसारतंत्र कसे असते याची वाचकांना कल्पना येईल.

## (५) कळसुबाई

सह्याद्रि पर्वतावरील इगतपुरी रेल्वे स्टेशनजवळील एका ५४२४ फूट उंचीच्या शिखरावर या देवीचे स्थान आहे. फार वर्षांपूर्वी या शिखराच्या

१. टीप — ग्रामदेवता प्रकरणात पंचपीर इतिहास पाहा.

पायथ्याशी इंदोर गावी एका कोळ्याची मुलगी फिरत फिरत आली. कामधंदा शोधीत असता तिला तिच्या एका जातभाईच्याच घरी नोकरी मिळाली. पण कामाला रहाताना तिने आपल्या मालकाला एक विचित्र अट घातली ती अशी की, 'भांडी घासणे व घरातील केरकचरा काढणे ही दोन कामे मी करणार नाही यांव्यतिरिक्त जी असतील तीच करीन.' मालकाने तिची ही अट मान्य केली. पुढे कालांतराने घरात पाहुण्यांची वर्दळ असल्यामुळे एकदा त्याने अनवधानाने भांडी घासण्यास तिला सांगितले. त्या वेळी तिने निमूटपणे ते काम केले आपल्या अटीची जाणीवही त्याला करून दिली नाही पण दुसऱ्या दिवशी पहाटे निमूट-पणे कोणालाही न कळविता तिने ते घर सोडले आणि ती घर शिखरमाथ्यावर जाऊन बसली मनाविरुद्ध झालेल्या वागणुकीचा तिच्यावर अतिशय परिणाम झाला कदाचित नियतीने ही घटना तिच्या भल्याकरिताच घडविण्याचा घाट घातला असावा त्या तशा विषण्ण मनस्थितीत ती त्या शिखरावर बसून राहिली मालकाने तिची आसपास चौकशी केली पण ही मुलगी इतक्या उंच शिखरावर जाऊन बसेल याची त्याला तरी काय कल्पना? शेवटी अन्नाभावी त्या मुलीचे प्राणोत्क्रमण झाले, अथवा तिने जाणूनबुजूनच इहलोकीची यात्रा संपविली

काही दिवसांनी जेव्हा तिच्या प्रेताचा शोध लागला, तेव्हा ती कोणीतरी पूर्वजन्मीची शापित देवता असावी, अशा कोळी लोकांचा समज झाला आणि तिचे स्मृति मंदिर त्याच शिखरावर उभारण्यात आले या देवतेचा पुजारी कोळी गावातच राहातो आणि दररोज तो डोंगर चढून जाऊन देवीची पूजा करतो कार्तिक यात्रेच्या वेळी या देवतासमोर कोंबडे-बकरे बळी देतात ती आता कोळीसमाजाची कुलदेवता बनली आहे मूर्ति म्हणून एक तांदळा उभारला आहे
(नाशिक जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४४६)

## (६) चिन्नम्मा

या देवीचे चरित्र म्हणजे दक्षिण प्रांतातील शैव व वैष्णव पंथांमधील वैरभाव दर्शविणारे उत्तम चित्र आहे सुमारे एक शतक वर्षे होऊन गेली. आंध्र देशात कदिरी या गावी अचम्मा नावाची एक बाई राहात होती ती परम विष्णुभक्त होती तिच्या घरची अत्यंत गरिबी त्यामुळे आपले गाव सोडून आपल्या परमपूज्य दैवताचे दर्शन घेणेही तिला अतिशय अशक्य झाले पोटी पुत्रसंतान व्हावे म्हणून तिने विष्णूची अविरत आराधना केली. अखेर तिच्या या खडतर तपश्चर्येला फळ येऊन तिने एका कन्यारत्नाला प्रसविले हे फळ तिने केलेल्या आराधनेचे होते त्यामुळे [illegible] जन्मास आलेली ती कन्या

विष्णुकृपेमुळे अतिशय निष्ठावान अशी निपजली होती. परमेश्वराने दिलेल्या या प्रसादावर समाधान मानून घरात आनंदीआनंद पाळला जात होता. त्या मुलीचे नाव चिन्नम्मा असे ठेवण्यात आले.

कालानुक्रमाने चिन्नम्माचे बालपण सरले. ती विवाहयोग्य झाली. एकुलत्या एका या मुलीचे सासर या गावातच किंवा शेजारीपाजारी आसपासच्या गावात असले म्हणजे वारंवार तिला भेटता येईल, तिच्या भल्या-बुऱ्याची थोडीशीतरी काळजी वाहाता येईल, तिला कुठे दुखले-खुपले तर तातडतोब तिला जाऊन पाहाता येईल, या व अशा अनेक हेतूमुळे तिच्या जन्माची गाठ शेजारच्याच गावातील एका कुटुंबातील मुलाबरोबर घातली गेली. त्या काळी शेतीवाडी भरपूर, ऐसपैस घर, सासु, सासरा, दीर, नणद, जावा यांचा भरपूर राबता असलेले घर एखाद्या मुलीस मिळाले, की ती भाग्यवान समजली जात असे. चिन्नम्माच्या सुदैवाने म्हणा किंवा श्रीशेषशायी भगवानाच्या कृपेमुळे म्हणा, चिन्नम्माला असे घर मिळाले आणि विवाहानंतर ती आपल्या नव्या घरी—सासरी—गेली.

परंतु मुलीच्या दुर्दैवामुळे तिच्या सासरचे घराणे शैवपंथी निघाले आणि हेच कारण तिच्या छळणुकीस कारणीभूत झाले. त्या घरात तिला आपल्या इष्ट देवतेचे मननपूजन करता येईना. त्याचे नावदेखील घेता येईना. तेव्हा मनातल्या मनात ती भगवान नारायणाचे चिंतन करी आणि चोरूनमारून त्याची जेवढी भक्ति करता येईल तेवढी करी. घरातील शैवपूजेत ती सहभागी होत नसे. या कारणास्तव घरातील सासू सासरे आणि जावा चिन्नम्माचा द्वेष करीत. तिला सहा दीर आणि सहा जावा होत्या. शिवाय सासू आणि सासरा हे दोघे होते. परंतु सकाळपासून सर्व कामाचा गाडा चिन्नम्मालाच ओढावा लागत असे. कष्टाची जेवढी म्हणून कामे असत ती सर्व तिच्याच वाटणीला येत. एवढी कामे करूनही पोटात एक भाकरीचा तुकडा जाणेही मुश्कील होत असे. घरातील स्वयपाक राधण्यास तिला अजिबात परवानगी नसे. तिच्या हातचे पाणी देखील कोणी पीत नसे. इतकी त्यांनी तिला वाळीत टाकलेली होती. कोणी एक गोड शब्द देखील तिच्याबरोबर बोलत नसे. परमेश्वर जणू तिची कसोटी पाहात होता. परंतु याही प्रतिकूल परिस्थितीत तिने विष्णूची आराधना चालूच ठेवली होती. पण नियतीला या तिच्या स्मशानवत् जीवनाचे नंदनवन करून टाकायचे होते. तिचा डाव ठरलेला होता.

एकदा तिच्या सर्व जावांनी कट करून तिला हुसकावून लावण्याचे ठरविले. नेहमीप्रमाणे पुरुषमंडळी शेतावर गेली म्हणजे दुपारचा भाकर-तुकडा कोणीतरी शिवभक्त जाऊबाई घेऊन जाई. पण एक दिवस त्यांच्यापैकी कोणीच

शिदोरी घेऊन गेले नाही वाट पाहून पाहून तिचा सासरा घरी आला आणि आज शिदोरी का आली नाही म्हणून त्याने प्रत्येकीला बोलावून विचारले त्यावर खोट्या सबबी आणि शरीरप्रकृति बिघडल्याच्या खोट्या तक्रारी करून त्यांनी 'आम्ही येऊ शकलो नाही' अशी वेळ मारून नेली आणि वर 'या भाकऱ्या जाउबाईंना सांगूनही त्यांनी जाणूनबुजून भाकऱ्या नेण्याचे टाळले' या वाक्याने सासऱ्याचे कान फुंकले त्यावर कोणताही विचार न करता सासऱ्याने तिला काठीने बडविले आणि भाकऱ्या घेऊन जाण्यास सांगितले त्यावर ती आपल्या सासऱ्यापुढे नतमस्तक झाली आणि अत्यंत विनम्रभावाने सासऱ्यास म्हणाली, 'मामजी, मी तुम्हाला पोटच्या मुलीसारखी भाकऱ्या नेण्याचे मी का टाळीन ? भावासारख्या असलेल्या दीरासाठी भाकऱ्या घेऊन जाण्यात मी कसला कमीपणा मानीन ? पण तुम्हीच सांगा मी विष्णूची उपासक आणि तुम्ही सर्व शिवभक्त माझ्या हातच्या भाकऱ्या तुम्ही कशा खाल्ल्या असत्या ?' परंतु या तिच्या मृदु बोलण्यावर विश्वास न ठेवता त्याने भाकऱ्याचा टोपली घेऊन जाण्याची तिला आज्ञा केली बिचारी चिन्नम्मा ! 'तुका म्हणे तया, दोहींकडे धका' अशी तिची दशा झाली ती नाईलाजाने निघाली आणि भाकरी घेऊन वाट चालू लागली या वेळी मात्र परमेश्वराने तिची कसोटी पाहाण्याचे ठरविले ती शेताकडे जात असता वाटेवरच एक साधु प्रकट झाला त्याने तिच्याजवळ भाकरीची याचना केली आधीच उशीर झालेला, त्यात सासऱ्याचे बागुबाग ऐकून तिच्या काळजाला चरे पडलेले आणि मधेच या उपाशी याचकाची भेट झालेली तरीपण परिणामाची चिंता न करता चिन्नम्माने या साधूला पोटभर जेवायास घातले त्याचा तोंडभर दुवा घेतला आणि आता पुढे काय वाढून ठेवले आहे ते पाहाण्यासाठी पुढील मार्ग आक्रमू लागली शेतावर पोहोचताच तिने कल्पना केल्याप्रमाणेच सर्व घडून आले शेतावर गेल्यावर या उशीराबद्दल तिला मार तर बसलाच, पण तिच्या हातचे अन्नदेखील कोणी खाल्ले नाही

इकडे तो साधु चिन्नम्माच्या घरी आला आणि घरातील माणसांचे सत्त्व पाहाण्याच्या दृष्टीने त्याने त्यांच्याजवळ भाकरीची मागणी केली पण भर दुपारच्या भोजनसमयी दारात अतिथी आला असताही त्याची कोणी चौकशी केली नाही, की कोणी घोळाभर अन्न दिले नाही श्रीमती अशीच माजोरी असते घरातील माणसे खायला मिळते म्हणून ते न खाता वाटेल तसे उष्टे टाकतील ते उष्टे वाटेल तसे गटारात फेकून देतील, पण दाराशी आलेल्या अतिथीला घासभर तुकडा द्यायला मात्र त्यांचे हात मागेपुढे होतील अर्थात याला ही काही अपवाद आहेतच स्वतः लेखकालाही त्याचे काही अनुभव आले आहेत माझ्या लहानपणी मोटारवाहतूक नव्हती त्या वेळी कोल्हापूर ते राजापूर

हे अंतर बैलगाडीने तोडावे लागे. २ दिवसांचा कंटाळवाणा प्रवास असे. त्या वेळी या मार्गावर भोगाव व अनसुरा येथे अशी दोन देशस्थ घराणी होती. खानावळीची सोय नसल्याने ही कुलकर्णी उपनावाची घराणी प्रवासी मंडळींची मोठ्या आदराने जेवणाची सोय करीत. मग ती मंडळी पाच असोत, दहा असोत. जो काही चटणीभाकर ते खात, तीच ते मोठ्या प्रेमाने वाटहरू पाहुण्याना देत आणि त्यांचा दुवा घेत. आजही त्या जेवणाची आणि अन्नदात्यांची आठवण झाली म्हणजे लेखकाचे हृदय भरून येते, डोळ्यात टिपे गोळा होतात. आता मात्र ती घराणी त्या रस्त्यावर दिसत नाहीत. जुन्याचा वारसा नव्याकडे कसा यावा ? आणि नव्याना तो आदर्श तरी कसा व्हावा ? नव्या पिढीला जुन्याची स्थावर-जंगम दौलत पाहिजे असते, हरप्रयत्नाने ते ती आपल्या ताब्यात घेतात, पण दुर्दैव असे की, जुन्याच्या घराण्याच्या चालीरीति, रूढि, अतिथीसत्कार इ० प्रकाराना मात्र ते जाणूनबुजून फाटा देतात. वास्तव भारतामधील जुन्या उत्तम रूढि भराभर नामशेष होत आहेत. ज्यासाठी भारतवासियांची नौबत निराशात झडत होती, ती पडावत आहे.

असो, आता आपल्या मूळ कथेकडे वळू. कोणीही विचारपूस न केल्यामुळे तो साधु कोपायमान झाला. त्याने चिन्नम्माच्या सासऱ्याला शाप दिला आणि त्याचे घर भस्मसात करून टाकले. इतकेच नव्हे तर घरातील सर्व माणसे त्याने पटकीच्या रोगाने आजारी पाडली. त्या सर्व आजाऱ्यांची शुश्रूषा करण्याचे काम अर्थातच चिन्नम्मावर आले. माणसाची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा होय, या भावनेने ती सर्व कामे करीत होती.

एकाएकी ही आपत्ति का कोसळावी याबद्दल चिन्नम्माच्या सासऱ्याला काहीच कळेना. यामागे कोणाचा कोप झाल्याचे कारण आहे किंवा काय याची त्याने एका ज्योतिषीबुवाकडे पृच्छा केली. ज्योतिषीबुवानी त्याला निक्षून सांगितले की, एका विष्णुभक्ताचा विनाकारण छळ केला गेल्यामुळे हे अरिष्ट ओढवले आहे जर तुम्ही सर्वांनी विष्णूचे दर्शन घेतलेत, त्याची पूजाअर्चा केलीत आणि त्याची करुणा भाकून क्षमेची याचना केलीत तर सर्व काही सुरळीत होईल. पण तो गाव शैवपंथी असल्याने विष्णूच्या दर्शनास थोडे लांब जावयास लागणार होते. पण ते व्हावे कसे ? माणसे तर सर्व पटकीच्या आजाराने अशक्त झालेली आणि त्यात वाहनदुर्भिक्ष्य. पण आपल्या बालबुद्धीस अनुसरून चिन्नम्माने गाडी आणण्याचे घरच्या माणसाना आश्वासन दिले. ती आपल्या माहेरी गेली आणि बालपणातील खेळातील लहान मातीची बैलगाडी घेऊन आली. ही गाडी आणताना तिच्या मनाला अशी कल्पनादेखील शिवली नाही

की, या छुटुकुट्या गाडीत मोठी माणसे बसतील कशी आणि विष्णुदर्शनाला जातील कशी? चिन्नम्माने आणलेली ही गाडी पाहून तिच्या सासरच्या माणसांना त्याही स्थितीत हसू आले आणि त्यांनी तिच्या अज्ञानाची कीव केली. या वेळी मात्र तिला ही हेटाळणी आणि त्यापासून होणारे दु:ख अतिशय असह्य झाले. तिने आपल्या आराध्यदैवताची आर्तभावाने करुणा भाकली आणि या संकटातून निभावून नेण्याची त्याला विनती केली. तिच्या त्या भोळ्याभाबड्या भक्तिभावाने दयाघन प्रभूला खरोखरीच तिची दया आली क्षणार्धात ती मातीची गाडी चालती झाली. मातीचे बैल हाडामांसाचे बैल झाले. हा चमत्कार पाहून मात्र सासरच्या लोकांची घाबरगुंडी उडाली आणि निमूटपणे ती मंडळी त्या गाडीत बसून विष्णुदर्शनास गेली. चिन्नम्मा आपल्या सासरच्या मंडळींना विष्णुदर्शन घडवीत असतानाच त्या मंदिरात तिचे पंचप्राण विलीन झाले. त्या मुलीची अलौकिकता अशा प्रकारे प्रकट झाल्याने नंतर त्या गावी तिची स्मृति म्हणून मंदिर बांधण्यात आले. आज या देवीचे अनेक उपासक आहेत.

('मीनाक्षी-कन्या', ले. प. महादेवशास्त्री जोशी)

या देवीचा स्मृति-उत्सव बंगलोर येथे बसवगुडी या भागात साजरा केला जातो, असे एका दक्षिणात्याने निवेदन केले. त्या भागातील कुमारिका एकत्र जमून हा उत्सव साजरा करतात. उत्सवाच्या पूर्वी दहा दिवस आधी घरोघर मुली मातीचे बैल बनवितात आणि त्यांची पूजा करतात. शेवटच्या दिवशी या सर्व बैलांच्या जोड्या एकत्र करून त्यांची मिरवणूक काढतात. समारंभाच्या शेवटी सर्वांना महाप्रसाद वाटला जातो. अनेक धनवान लक्ष्मीपुत्र या मुलींच्या कार्याला मदत करतात.

हरिणी

वदति कदरीं आम्रप्रांतीं वसे सति देवता।
तप बहु करी माता तीचीं मिळे मग कन्यका॥
वदति तनये चिन्नमा ती अती प्रिय हो जनीं।
सतत करिते विष्णूभक्ती तिच्या चरणीं नमी॥ १॥
पति तिज मिळे मोठा श्रेष्ठ, असे शिवभक्त तो।
बहुत छळिती सासू आवा, सदा उपवास तो॥
क्वचित सदनी साधू आला, म्हणे मज अन्न द्या।
परि न मिळतां अन्नी पोटीं, पडे घर ते तदा॥ २॥

अदय जन ते चिंताक्रांत कसे घडले तरी।
कुणि मग त्यां विष्णू-पूजा उपाय म्हणे करी ॥
नच भरंवसा शब्दा येता, कु-तापहि वाढता ॥
मनिं समजति सर्वनाशा अतीथि विमूढता ॥ ३ ॥
विनवि विनवी दीरा-जावा पहा तरि विष्णुला।
वृषभ शकटा मातीच्याही सजीव करी बला ॥
बघुनी वदती कर्तृत्वाला सती तर देवता।
नमन करिती चिन्नम्माला अजि जन पाहतां ॥ ४ ॥

( ७ ) चांकळमाता

कनोज शहरी राठोड राजवंशाचा पाडाव झाल्यावर त्यातील शेवटचा पुरुष मारवाड प्रांती, लुनी नदीच्या तीरावर वसलेल्या खेर या गावी वस्ती करून राहिला. त्या भागाला मेवो प्रांत असे नाव होते. त्या पुरुषाने तेथे राज्य स्थापन केले. त्याचा वंश पुढे मालानी वंश या नावाने प्रसिद्धीस आला. खेर या शहराचा मल्लीनाथ-राजाने पुढे बराच विस्तार केला आणि म्हणून सर्व प्रांताला मालानी हे नाव आले असावे. मल्लिनाथ आणि त्याची राणी रूपावती ही दोघेही देवीभक्त होती पापभीरू होती त्यामुळे त्याचे राज्य सुखाने चालले होते.

पुढे अशी कथा सांगतात की, मल्लिनाथ एका पर्वतावर साधना करण्यासाठी गेला असता आणि ती चालू असता तो एकाएकी वायुरूप बनला आणि आपल्या घोड्यावर बसून अंतरिक्षामध्ये अदृश्य झाला. मानवी शरीरात अपान, उदान, व्यान इत्यादि जे पाच प्राणवायु आहेत त्यांवर योगसाधनेने विजय मिळविल्यावर वायुतत्त्वात विलीन होणे ही गोष्ट सहजसाध्य आहे असे पतंजलीच्या योगसूत्रावरून दिसून येते. तेव्हा राजाने कदाचित् पर्वतशिखरावर साधना करून या पंचप्राणवायूवर विजय मिळविला असावा.

मल्लिनाथाचे अंतरिक्ष-गमन त्याची पत्नी रूपावती हिला कळताच, ज्या ठिकाणी पति अदृश्य झाला त्या पर्वतशिखरावर सती जाण्याचा हेतु बाळगून ती स्थानापासून निघाली परंतु आश्चर्य असे की, पर्वतशिखरावर पोहोचण्यापूर्वी स्थानातूनच ती अंतरिक्षात अदृश्य झाली महाराष्ट्रामध्ये श्रीसंत तुकाराम ज्या प्रमाणे सदेह वैकुंठाला गेले अशी भक्तांची श्रद्धा आहे, इतकेच नव्हे तर ते पुराणांत. नमूद आहे अशी ग्वाही महाराष्ट्राचे विद्वान मान्यवर श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांनी आपल्या श्रीअक्कलकोटनिवासी स्वामींच्या चरित्रात दिलेली आहे, त्याप्रमाणेच हा एकंदर प्रकार घडला असावा. त्यामुळे रूपावती राणी पुढे देवता पावली आणि

मालानी वंशाची दैवत बनली. तिची पूजाअर्चा होऊ लागली. या रूपादेवीलाच पुढे वांकळमाता असे नाव प्राप्त झाले आणि मालानी वंशाची ती कुलदेवता झाली. खेरगावी तिचे मंदिर आहे. कदाचित तिच्या पुत्राचे नावावरून तिला हे नाव प्राप्त झाले असावे. ( मारवार, मालानी जिल्हा गॅझेट, पृष्ठ १० ).

मानव अदृश्य होऊन वायुरूप होणे अशक्य नाही, हे खालील विवरणावरून ध्यानी यावे. योगशास्त्रदृष्ट्या विचार केला तर असे दिसते की, अष्टमहासिद्धि प्राप्त होण्यास दोन मार्ग आहेत. पहिला भक्तिमार्ग आणि दुसरा अष्टांग-योग; यौगिक प्रक्रिया भक्तिपंथात आपोआप आचरली जात असल्याने, योग्याला जे सामर्थ्य प्राप्त होते, ते भक्तालाही होते. अष्टांग-योगाचे आचरण करणाऱ्या योग्याला ज्याप्रमाणे अष्टमहासिद्धीची प्राप्ति होते, त्याप्रमाणे भक्तिमार्गाचे आचरण करणारालाही होते. पतंजली योगसूत्रातील हा उल्लेख पहा,

कायाकाशयोः संबन्धसंयमाल्लघुतूलसमापत्तेः आकाशगमनम् ॥
( विभूति पाद, ४२ )

याचे विवरण असे की, शरीर आणि आकाश यांचा जो परस्परसंबंध आहे, त्यावर संयम केल्याने आणि कापसासारख्या हलक्या पदार्थांवर समापत्तिरूप तन्मयता प्राप्त करून घेतल्याने, योग्याला आकाशगमन सिद्धि प्राप्त करून घेता येते. तसेच सूत्र २१ प्रमाणे मानव शरीरावर संयम केल्याने ते शरीर इतरांस नेत्रेंद्रियाद्वारा ग्राह्य व्हावे, अशा प्रकारची त्याच्या ठिकाणी जी शक्ति आहे, तिचे स्तंभन होते. त्यामुळे पाहणाऱ्याच्या चक्षुरिंद्रियाना जो प्रकाश असतो, त्याच्याबरोबर योग्याच्या शरीराच्या स्वरूपाचा संयोग होत नाही, म्हणजेच त्याच्या शरीराचे रूप पाहणाऱ्याला दिसत नाही. याच क्रियेला योगी अंतर्धान पावला असे म्हणतात. मृत्यु जवळ आल्याचे त्याला ज्ञान असते आणि अशा वेळी तो याप्रमाणे अंतर्धान पावतो.

उदानजयाज्जलपंककण्टकादिष्वसंग उत्क्रांतिश्च ॥ ३९ ॥

ऊर्ध्वगति असलेल्या उदान नावाच्या प्राणावर जय मिळविला असता भक्ताला आपले शरीर वाटेल तितके उचलून धरता येते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत तुकाराममहाराज सदेह वैकुंठाला गेले, म्हणून जी भक्तांची श्रद्धा आहे, ती याच तत्त्वाच्या आधारावर असली पाहिजे, यात संशय नाही.

डॉ. वि. म. भट यांनी 'योगसिद्धि आणि ईश्वरी साक्षात्कार' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे, त्यामध्ये त्यांनी योगसिद्धीचा अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीने विचार केला असून पौर्वात्य आणि पाश्चिमात्य साधुसंताच्या

पारमार्थिक अनुभवाच्या भरपूर पुराव्यानिशी, भक्ताला आपला देह पंचमहाभूतांमध्ये विलीन करून टाकता येतो, हेच सप्रमाण दाखवून दिलेले आहे. तात्पर्य, मल्लिनाथ व त्याची पत्नी अचानक वायुरूप का झाली आणि हे अशक्य नव्हे, हे समजून येईल.

(श्री द. वा. पटवर्धन, जीवन विकास मासिक, जून, १९६३ आधारे)

## (८) मायाराणी

नव्हे जाखाई जोखाई । मायाराणी म्हैसाबाई ॥ (तुकाराम)

तुकाराम महाराज आपल्या गाथेमध्ये मायाराणी या देवतेचा उल्लेख वरीलप्रमाणे करतात. तुकाराम रामदासाच्या काळी या नावाची देवता अस्तित्वात असावी, म्हणून याचा उल्लेख आलेला आहे. रामदासही हिचा उल्लेख करतात

जाखमाता मायाराणी । काळ्या बगुळा मानविणी ।
पूजा मागिणी जोगिणी । कुळधर्मे करावी ॥ (दासबोध ४–५–१६)

दासाच्या मते या सर्व ग्रामदेवता असाव्यात आणि त्यांचा कुळधर्म करावा असे सांगतात

करून देण्यासाठी हा विधि आचरणात आलेला असावा. बाल विधवेला सहसा स्वत:ची संतती नसते. पण घरातील इतर मुलालेकरावर ती माया करते म्हणून मायराणी हे नाव आलेले असावे. प्राचीन कालीही समाजधुरीण कसे प्रगत विचाराचे होते, हेच या रूढीवरून दिसून येते.

देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण घराण्यात एखादे शुभकार्य झाले म्हणजे त्यासाठी कुळधर्म आचरावा लागतो. नाशिक प्रांती राहणारी घराणी याच कुळधर्माला राजला देवीचा कुळधर्म म्हणतात आणि सात ग्रास मेहुणे जेवायला घालतात. सात नवरा बायको मेहुणे आणि एक विधवा मिळून साडेसातची संख्या पुरी करतात. या वेळी विधवेचे पूजन, भोजन व लुगडे-खण देऊन बोळवण केली जाते. यापैकी रा. कुलकर्णी उपनावाच्या ब्राह्मणाच्या घरात पूजनात असलेला टाक लेखकाच्या पहाण्यात आला. त्या टाकावर लहान लहान सात देवींच्या आकृत्या आणि एक वाघ सोपटी वर करून चितारलेला होता. सात या संख्येवरून ती प्रतिमा सप्तमातृकाची असावी, असा लेखकाने अदाज केला. त्याला राजला का म्हणतात, तिचे मंदिर कोठे आहे वगैरे पूजकाला सांगता आले नाही.

अहमदनगर भागात हाच कुळधर्म एक ब्राह्मण आणि एक विधवा याना भोजन घालून आचरला जातो. त्या वेळीही विधवेचे पूजन होते आणि राजला देवीचा कुळधर्म म्हणूनच आचरतात, असे एके वेळी भोजन केलेल्या एका वृद्ध ब्राह्मणाने लेखकाला सांगितले. नागपूरकडील काही घराण्यातही ही रूढि असावी. त्या ठिकाणी तो समानी देवीचा कुळधर्म म्हणून आचरला जातो. दोन विधवांचे पूजन व भोजन होते. नगरकडील मुळे उपनावाच्या वृद्ध स्त्रीने सांगितले की, बहुधा नवरात्रामध्ये अष्टमीच्या दिवशी हा कुळधर्म आचरण्याची वहिवाट आहे, पण त्या दिवशी विधवा न मिळाल्यास ती मिळेल त्या दिवशी तो आचरतात.

कर्नाटक, भागी, इल्कल व जवळपासच्या भागात राजला अथवा राजराजेश्वरी देवीच्या नावाने चपाषष्ठी नवरात्रात कुळधर्म आचरला जातो. त्या वेळी ६० भाज्यांचा नैवेद्य तयार करावा लागतो. येथे विधवा पूजन नाही, पण देवीचे नाव राजला आहे, म्हणून नोंद घ्यावी लागली.

श्रीधरकृत भक्तीविजय ग्रथामध्येही मायाराणीचा उल्लेख आहे.

जाखाई जोखाई मायाराणी। मारको मेसको यक्षिणी।
उच्छिष्ट चाडाळी रानसटवी जखिणी। भगळिनी काळरात्री॥
(अ १३।६६)

महानुभाव पंथाच्या देवता म्हणून एकवीरा, तुळजा, घोडाचोळी, ज्येष्ठा-गौरी, मायाराणी, भैरे, पंचकृष्ण, खंडोबा, विठ्ठल यांचा उल्लेख जैन यति गुणकीर्तींच्या धर्मामृत ग्रंथामध्ये आलेला आहे. तसेच जैन वाङ्मयामध्ये मराठी लोकतत्त्वाचे वर्णनही आढळते. ब्रह्मगुणदासाने आपल्या 'श्रेणिक' या चरित्र ग्रंथामध्ये 'मायाराणीची अथवा कन्हईची रोटी पूजण्याचा आणि पोवते परिधान करण्याचा उल्लेख केलेला आहे.' (रा. चिं. ढेरे, केसरी, दिपवाळी, अंक १९६७)

पोवते पौर्णिमा म्हणजे रक्षाबंधनाची श्रावण पौर्णिमा होय. कापसाचे सूत काढून केशर-हळदीने पिवळे करून हातात व गळ्यात बांधण्याची रूढी होती. लहानपणी कोकणात याप्रमाणे लेखकाने पोवते परिधान केलेले आहे.

तुकाराम, रामदास, श्रीधर यांच्या लिखाणावरून असे अनुमान करावेसे वाटते की, मायाराणी ही एक ग्रामदेवताच मानलेली असावी, कारण इतर देवता ग्रामदेवताच आहेत. ते कसेही असो, मायाराणीच्या कुळाचारावरून ती एक समाजामध्ये स्थान असलेली देवता होती, हे निश्चित.

## (८) यल्लम्मा

सौंदत्ती (कर्नाटक) या प्राचीन राजधानीच्या शहराच्या आग्नेय दिशेला पाचसहा मैल अंतरावर यल्लमा टेकड्या प्रसिद्ध आहेत. या टेकड्यांच्या माथ्यावरून सरस्वती नदीचा उगम होतो आणि ती खाली उतरल्यावर मलप्रभा नदीला मिळते. माथ्यावर सरस्वती नदीच्या पात्रातच हे देवीचे स्थान आहे.

या देवतेच्या उत्पत्तीसंबंधी अशी कथा प्रचलित आहे की, प्राचीन काळी रेणुका-जमदग्नि ऋषींचा आश्रम याच टेकडीवर होता. एकदा रेणुका मलप्रभा नदीवर पाणी आणण्यास व धुणी धुण्यास गेली असता त्याच वेळी त्या रम्य स्थळी विमानातून खाली उतरून जलविहार करीत असणाऱ्या चित्ररथ गंधर्वाचे प्रणयचाळे तिच्या दृष्टीस पडले. साहजिकच तिचे मन विचलित झाले. मनोनिग्रही तपाचरणी तापसीला ते योग्य नव्हते. आश्रमामध्ये योगसाधना करीत असलेल्या जमदग्नि ऋषींना अंतर्ज्ञानाने पत्नीची ही मनस्थिति कळून चुकली आणि पातिव्रत्यभंगाचे शासन म्हणून त्यांनी परशुरामाला तिचा वध करण्याची आज्ञा केली ही जी कथा आपण ऐकतो ती याच ठिकाणी घडलेली आहे. परशुरामाने नंतर आपल्या मातेच्या स्मरणार्थ या ठिकाणी मंदिर उभारले आणि त्यात रेणुकेच्या मूर्तीची स्थापना केली. याचाच अर्थ असा की, यल्लम्मा म्हणजेच रेणुका होय.[1]

---

१. टीप — रेणुका वधाचा इतिहास या क्षेत्री घडला, हे इतर ऐतिहासिक पुराव्यावरून खरे मानता येत नाही

मंदिराच्या परिसरात मध्यभागी प्रमुख देवालय आहे. पश्चिम दरवाज्याच्या गणपति मंदिराला दोन खांब दिसतात त्यांची घडण बेळगाव येथील किल्ल्यातील जैन मंदिराच्या खांबाशी जुळती आहे. एका खांबाच्या तळाशी कानडी भाषेतील एक शिलालेख असून 'शके १४३६, भावनाम संवत्सरे' ही अक्षरे त्याच्यावर कोरलेली आहेत. त्यामध्ये पुढे अशी माहिती मिळते की, भूमाप्पा नायक (बागी अगर रामनागचा) याने मंडपाचा वरील भाग जातक महामायेच्या चरणाखाली बांधला आहे. भूमाप्पा हा श्रीकृष्ण (सन १५०८ ते १५२९) राजवंशापैकी एक पुरुष होता असे म्हणतात या देवालयाची मूळ स्थापना केव्हा झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. पण मंदिराच्या बांधणीवरून ते तेराव्या शतकातील असावे असे वाटते कर्नाटकामध्ये सप्त-मातृकांना योल्लुमाता असे म्हणतात आणि त्याचाच यल्लम्मा असा अपभ्रंश झालेला असावा माता आणि अम्मा या दोहोंचा अर्थ एकच आहे. परंतु असे असले तरी सप्त मातृकामध्ये रेणुकेचा अंतर्भाव नाही. तेव्हा योल्लुमाता म्हणजेच यल्लम्मा हा संबंध जोडणे बरोबर ठरणार नाही यामुळे यल्लम्मा हे नाव का आले, हे निश्चित सांगता येत नाही कारण त्या बाबतची काहीच माहिती उपलब्ध नाही

सांप्रत हे देवस्थान अतिशय कडक व जागृत मानले जाते. तिचे भक्त सर्व ठिकाणी पसरलेले आहेत आणि प्रत्यही ते दर्शनाला येतच असतात. या देवस्थानाला लक्षावधी रुपयांचे वार्षिक उत्पन्न आहे देवीच्या अंगावर सुवर्णाचे अनेक अलंकार आणि शिरावर कांचनमुकुट आहे देवीचा लिंगायत पुजारी वर्ग आठ लिंगायत उपपथामध्ये विभागला गेला असून दर चवथ्या दिवशी देवीची व्यवस्था व पूजाअर्चा प्रत्येक घराण्याकडे बदलत असते आणि चार दिवस होणाऱ्या प्राप्तीवर त्याचा निर्वाह चालतो

मार्गशीर्ष व चैत्र महिन्याच्या पौर्णिमेला येथे मोठ्या यात्रा भरतात. त्या वेळी नवस फेडण्यासाठी दूर अंतरावरून भक्त येतात. पुत्रप्राप्ति होण्यासाठी वांझ स्त्रिया देवीला दिले, चांदीचे पाळणे व त्यामध्ये देवीची सुवर्णाची बालमूर्ति घालून ती देवीला अर्पण करतात कोणी एखादा हौशी भक्त मंदिराभोवती हजारो दीपही पाजळतो

काही वर्षांपूर्वी येथे नवस फेडणाऱ्या भक्तांच्या नग्न मिरवणुकीही निघत परंतु १८५८ पासून सरकारने या विधिनिषेधांनी बंद केल्या आता नवस फेडणारे स्त्री व पुरुष भक्त, मंदिराच्या पायथ्यापासून नग्न होऊन, गुप्त भागावर कडुनिंबाच्या डाळ्याचे आच्छादन घालून, अंगावर चंदनाचा लेप देऊन, मग

मंदिरात जातात. मंदिराभोवती त्याच स्थितीत प्रदक्षिणा घालतात, परंतु देवालयात दर्शनास जाताना मात्र संपूर्ण वस्त्रांकित होऊन मगच ते जातात.

येथील देवींचा नवस घेणे याला 'बगड' असे म्हणतात आणि 'बगड' या शब्दाचा खुलासा मागे केलेलाच आहे. असे सांगतात की, सन १८३४ साली वीस हजार भक्तांच्या मेळाव्यात ४० भक्तांनी बगड केला. एका ८० वर्षे वयाच्या बाईनेही त्यामध्ये भाग घेतला होता. परंतु तिने नवस केल्याप्रमाणे तिचे सुरकुतलेले कातडे फाटले नाही आणि तिला पाहिजे असलेले मरण मिळाले नाही. लोखंडी हुकावर टांगून घेण्याचे तिचे दिव्य पूर्ण झाले, पण देवीसमोर आपल्याला मृत्यु यावा ही तिची इच्छा मात्र अपुरी राहिली. बगडच्या वेळी झालेल्या शारीरिक जखमा लिंबाचा रस आणि भंडारा भरून पूर्णपणे बऱ्या होतात. त्याला दुसऱ्या कसल्याही वैद्यकीय औषधाची जरुरी लागत नाही. आजही येथे क्वचित् असे बगड घेतले जातात आणि तो सोहळा पाहाण्यास पुष्कळसा जनसमुदाय मुद्दाम उपस्थित असतो. कडकलक्ष्मी घेऊन गावोगावी व रस्तोरस्ती फिरणारे काही पोतुराज या देवींना मुखवटा आपल्या पेटीत ठेवून फिरत असतात.

( बेळगाव जिल्हा गॅझेट, पृष्ठे ६१२ ते ६३३ ).

यल्लम्मा देवीच्या उपासक वर्गाला जोगती आणि जोगतीण असे म्हटले जाते. हा वर्ग महाराष्ट्र व कर्नाटक या भागात जास्त प्रमाणात आढळतो. या देवीला नवसाला वाहिलेली मुलगी म्हणजे जोगतीण आणि वाहिलेला मुलगा म्हणजे जोगती होय. खंडोबाच्या वाघ्या-मुरळीचाच हा एक प्रकार समजावा. यांचा वेश म्हणजे गळ्यात कवड्याच्या माळा, कपाळाला भरपूर भंडार लावलेला आणि मस्तकावर देवीची मूर्ति असलेली टोपली होय. या वेषात ते गावोगाव फिरतात. देवीची गाणी म्हणताना ढोलके, तुणतुणे यांची साथही घेतात. यल्लम्मा देवीच्या मूळ स्वरूपाची उपासना याच वर्गाने सांभाळली आहे असे मानले जाते.

देवीच्या उपासकाचा जो एक दुसरा स्त्रीवर्ग आहे त्याना जोगणी असे म्हणतात. नवरात्राच्या दिवसात या स्त्रिया खाकेत भोपळ्याचे भिक्षापात्र अडकवून घरोघर फिरून जोगवा मागतात आणि मूठभर तांदूळ जमा करतात. काही घराण्यात या भोपळ्याची पूजा करण्याचीही रूढि आहे. काही पुरुष देवीच्या नावाने जोगवा मागतात. त्या वेळी तेही गळ्यात कवड्याची माळ घालून कपाळी भंडारा लावतात. काही घराण्यात कुलधर्मासाठी मंगळवारी अथवा शुक्रवारी जोगवा मागावा लागतो. 'अनादि निर्गुण प्रगटली भवानी' हा एकनाथ महाराजांचा जोगवा प्रसिद्ध आहे.

कर्नाटकामध्ये भूतपूजेचा जो प्रकार आहे आणि ह्या वेळी जी निरनिराळी लोकनृत्ये करतात, त्यामध्ये ' यल्लम्मन कुणि तु ' या नावाचे या देवीच्या नावाचे एक लोकनृत्य आहे. खंडोबाच्या वाघ्या-मुरळी नृत्याचाच हा एक देशपरत्वे थोडा निराळा प्रकार आहे. या वेळी देवदासी नृत्य करतात आणि पुरुषवर्ग त्यांना साथ देतो.

शालिनी

सौंदत्तीच्या दक्षिणें टेकडीला । यल्लम्माच्या पाहि शक्ती पिठाला ॥
कोणी केली स्थापना नाहिं ठावी । भूमप्पाने कोणि बोले असावी ॥ १ ॥
कोणी मानी रेणुका याच ठायीं । अर्पी प्राणा सशयो वाटण्याही ।
या कृत्याची जाण व्हाया सदाची । रेणूकेच्या मंदिरा स्थापिलेचि ॥ २ ॥
यल्लम्माही रेणुका रूप जाणा । श्रद्धास्थानीं पीठ लिंगायता ना ।
यात्रा चैत्री मार्गिसा पौर्णिमेला । यल्लम्माच्या वंदितो मीं पदाला ॥ ३ ॥

(१०) रेणुका

या देवीचा इतिहास व चरित्र म्हणजे एक कोडेच म्हणावेसे वाटते या देवतेसंबंधीची सत्य माहिती संकलित करून देणे अतिशय अवघड आहे. कारण या देवतेच्या मूर्ति भारतामध्ये उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सर्वत्र आढळतात आणि सर्वच प्रांतातील लोक ती आपली देवता मानतात व तिची उत्पत्तीही त्याच प्रांती झाली असा हक्क सांगतात कान्यकुब्ज, महेश्वर, मातापूर, मद्रास मधील काही स्थाने, कर्नाटक या सर्वच ठिकाणी तिची उत्पत्ति होऊन चरित्र घडणे शक्य वाटत नाही आणि म्हणूनच या देवीबद्दल पूर्णपणे छातीवर हात ठेवून काहीच सांगता येत नाही संशोधक श्री चापेकर तर म्हणतात की, ' रेणुराजाची कन्या रेणुका व परशुरामाची माता रेणुका याचा संबध मागाहून जोडलेला असावा ' जी काही माहिती हाती आली ती सुसूत्रपणे मांडण्याचा मी यथामति यथाशक्ति प्रयत्न केलेला आहे बाकीचा निर्णय वाचकांनी घेणे श्रेयस्कर !

मोठी झाली आणि तिचा स्वयंवर-समारंभ आयोजित केला गेला. स्वयंवरात उपवर रेणुकेने जमदग्नि ऋषींना वरले आणि तेव्हापासून ती त्यांची पत्नी झाली. रेणुकेचे पाळण्यातील नाव कामली असे होते. (रेणुका माहात्म्य)

महाभारतात रेणुकेची उत्पत्ति कमळापासून झाली असे दिले आहे. याचसाठी तिला 'कामली' हे नाव आले असावे. तसेच रेणु राजा हा तिचा भ्राता आणि सोमप राजा हा तिचा पिता असे सांगितले आहे. रेणुका ही विदर्भराजाची मुलगी असे कालिका-पुराण सांगते (अध्याय ८६ वा). या जोडप्याला एकूण पाच पुत्र झाले. त्या पाचांची नावे रुमण्वत, सुषेण, वसु, विश्वावसु व परशुराम अशी आहेत.

स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रि खंडातील रेणुकेबद्दलची ही कथा पहा. शंकरांचा वर प्राप्त करून घेऊन अदिति भूतलावर अवतरली. ह्या वेळी रेणुराजाने पुत्रप्राप्तीस्तव केलेल्या पुत्रकामेष्टि यज्ञाच्या यज्ञकुंडातून ती वर आली. स्कंदपुराणात 'वन्हिकुंडादयोनिजा' असा उल्लेख मिळतो. रेणुराजाने तिचे स्वयंवर मांडले तेव्हा 'प्रक्षिपद्रत्नपुष्पाढ्या मालां तु जमदग्नये ।' तिने जमदग्नि ऋषींच्या गळ्यात माळ घातली, हे पाहून स्वयंवरास आलेले इतर राजे खवळले. आपला अपमान झाला असे समजून रेणुराजावर हल्ला चढविला. आपल्यासारख्या पराक्रमी राजेरजवाड्यांना सोडून या राजकन्येने एका ऋषीच्या गळ्यात माळ घालावी हे त्यांना रुचले नाही. परंतु आता तर जमदग्नि हा रेणुराजाचा जावई झालाच होता आणि आपल्या सासऱ्याचे रक्षण करणे हे तर त्याचे कर्तव्यच होते. विनाविलंब जमदग्नीने धनुष्याला बाण लावला आणि 'शलभा इव पावका:' अशी त्या सर्वांची अवस्था करून टाकली. सर्व आक्रमकांना नंतर परतवून लावल्यावर पुढे मोठ्या समारंभाने 'रेणुकां जमदग्नये प्रददौ' ('सह्याद्रि-खंड' लेखक डिकुजा, १८७७).

स्कंदपुराणात एक कथा आली आहे, ती आपण पाहू. एकदा जमदग्नि ऋषि आपल्या आश्रमामध्ये ध्यानस्थ बसले होते, रेणुका त्या वेळी नदीवर स्नान करण्यासाठी व पाणी आणण्यासाठी गेली होती. त्याच वेळी चित्ररथ गंधर्व विमानातून त्या ठिकाणी आला आणि त्या ठिकाणी आपल्या प्रेयसीबरोबर जलविहार आणि कामुक जलक्रीडा करू लागला. त्या क्रीडा पाहून साहजिकच तरुण रेणुकेचे मन विचलित झाले 'चंचल ही मनः कृष्ण प्रमाथि दृढवत् बलम् ।' अशी गीतेमध्ये जी उक्ति आहे ती सार्थच आहे. मनावर आणि सर्व इंद्रियांवर ताबा मिळविणे यासाठी तर साधुलोकांची सारी धडपड चालू असते. कामभावना ही ईश्वरप्रणीत आहे. मेनकेच्या अतीवसुंदर लावण्याने तपोमग्न विश्वामित्र देखील वेडे झाले, मदनाच्या जाळ्यात अडकले. मग सामान्य

जनाची काय कथा ? आपल्या पत्नीचे विचलित मन जमदग्नि ऋषींना अंतर्ज्ञानाने कळले. ती घरी आल्याबरोबर त्यांनी या अपराधाची शिक्षा म्हणून तिला ठार मारण्याची आज्ञा आपल्या चार मुलांना दिली. परंतु त्या मातृभक्त मुलांनी पित्याची आज्ञा पाळण्याचे नाकारले. रेणुकेचा पाचवा पुत्र परशुराम बाहेर गेला होता. तो बाहेरून परत आल्यावर जमदग्नि ऋषींनी त्याला तीच आज्ञा केली. क्षणाचाही विलंब न लावता पितुराज्ञा म्हणून परशुरामाने आपल्या मातेचे शिर तत्काळ तरवारीने उडविले. पण या ठिकाणी असा विचार मनात येतो की, इतक्या तावडतोब परशुराम आपल्या मातेचे शिर उडविण्यास धजला कसा ? आपल्या मातेचा वध करण्यापूर्वी कुठलाही विचार त्याच्या मनात आला का नाही ? ही आपली जन्मदात्री, पूज्य माता आहे, तिचा वध आपण कसा करावा या विचाराचा स्पर्शदेखील त्याच्या मनाला झाला नसेल काय ? झाला असेल नक्कीच ! परंतु प्रेमापेक्षा त्याला कर्तव्य अधिक श्रेष्ठ वाटले असले पाहिजे इतकेच नव्हे, तर त्याने असाही विचार केला असावा की, आपला पिता अतिशय कोपिष्ट आहे आणि त्याचे वचन जर पाळले गेले नाही, तर शापाने तो सर्व मुलांचे भस्म करील, पर्यायाने कुळाचा नाश होईल. शिवाय 'पितृदेवो भव' हे वचन असत्य ठरेल. पित्याची आज्ञा मुलांनी पाळली नाही हा कलंक कायमचा राहून, भावी पिढीला तो उत्तम आदर्श राहणार नाही. तेव्हा पित्याच्या वचनाची बूज राखण्यासाठी, त्याप्रमाणे प्रथम वागावे आणि नंतर प्रसन्न करून घेऊन, आपला कार्यभाग साधून घ्यावा, यासाठीच त्याने आपल्या मातेचे शिर उडविले असावे. मुलाचा आज्ञाधारकपणा पाहून जमदग्नि ऋषि त्याच्यावर निहायत खूष झाले आणि त्यांनी त्याला वर मागण्यास सांगितले. परशुराम विचारी होता. त्याची मातृभक्ति जागी झाली. आपली आई पुन्हा जिवंत व्हावी म्हणून त्याने आपल्या पित्याजवळ वर मागितला. बोलल्याप्रमाणे जमदग्नि ऋषींना तो वर त्याला द्यावाच लागला.

India' या ग्रंथात पृष्ठ ४६७ वर म्हणतात की, 'रेणुकेचे मस्तक एका परक्या स्त्रीच्या शरीरावर परशुरामाने ठेवले आणि त्यामुळे ती अनार्य मानली गेली'

गणेशपुराणातील कथाभाग असा की, सहस्रार्जुन आपल्या सैन्यासह सर्व पृथ्वी पादाक्रांत करण्यासाठी निघाला. नर्मदाकाठची महिष्मती नगरी ही त्याची राजधानी. या शहराला सध्या महेश्वर हे नाव आहे रेणुका आणि सहस्रार्जुनाची पत्नी या दोघी सख्ख्या बहिणी बहिणी होत्या परंतु आपापल्या पतीदेवांच्या व्यवसायभिन्नतेमुळे त्यांच्या राहणीमानात जमीनअस्मानाचे अंतर होते. तरी देखील आपापल्या परीने त्या दोघी अतिशय सुखी होत्या. एकदा सहस्रार्जुन राजा सैन्यासह फिरत असता तो नर्मदा तीरावरील जमदग्नीच्या आश्रमावरून चालला असता आपल्या मेव्हण्याला पाहून रेणुकेने त्याला आपल्या आश्रमात बोलाविले. रेणुकेने कामधेनूकडून अतिशय सुग्रास असे पंचपक्वान्नपरिपूर्ण अन्न घेऊन त्याचे भोजन आपल्या मेव्हण्याला देऊन त्याचे आदरातिथ्य केले रानावनात राहणारी आणि एका तपस्व्याची बायको असलेली आपली ही मेहुणी, या अशा रानावनात देखील पंचपक्वान्नाचे भोजन घालू शकते, याचे सहस्रार्जुनाला अतिशय आश्चर्य वाटले अधिक चौकशी अंती या सर्व सुखसोयींचा 'बोलविता धनी' कामधेनु आहे असे त्याला कळून आले सहस्रार्जुनाला त्या कामधेनूचा लोभ सुटला आपल्या घरी कामधेनु खरी शोभून दिसेल या ऋषीच्या घरी कामधेनुसारखी गाय म्हणजे एखाद्या दरिद्र्याच्या झोपडीला सोन्याची दारे असण्यासारखेच होय असे त्याला वाटले अतृप्त वासना आणि लोभ याचे दोवाळे महस्रार्जुन राजाच्या विशुद्ध मनाच्या पाण्यावर तरंगत होते. त्यामुळे त्याच्या मुळातील वृत्तीचा लोप पावून सारासार बुद्धीलाही तो मोहून गेला एका गरिबाघरची ही कामधेनु आपण हिरावून नेतोय म्हणजे त्यांच्या तोंडचा घासच ओढून नेतो आहोत एवढा देखील साधा विचार त्याला राहिला नाही ती कामधेनु तो जबरदस्तीने आणि त्यात तिचा मालक ध्यानस्थ आहे, हे पाहून नेत आहे, हे पाहताच त्या कामधेनूने स्वतःच आपले रक्षण करावयाचे ठरविले तिने आपल्या शरीराच्या कपाने सहस्रावधि म्लेंच्छ उत्पन्न केले आणि त्यांच्या योगे राजाचा पराभव केला कालवेळ ओळखून राजाने माघार घेतली खरी परंतु अपमानाचे शल्य त्याला सतत बोचतच राहिले सर्व स्थिरस्थावर झाल्यावर कपटाने राजा जमदग्नीच्या आश्रमात शिरला आणि त्याने जमदग्नीचा वध केला रेणुका त्याचा प्रतिकार करीत असता तिलाही त्याने एकवीस वेळा एकवीस ठिकाणी जखमी केले त्याच वेळी रेणुकेच्या मुखातून शब्द बाहेर पडले', 'ठीक आहे माझा लाडका परशुराम एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय करील'

('उपासना खंड' अध्याय ७५ । ४६)

अशा विकट परिस्थितीत आता सहस्रार्जुनाचे हद्दीत राहणे कठीण आहे हे ओळखून वडिलांचे प्रेत एका बाजूला आणि शोकाकुल रेणुकामाता दुसऱ्या बाजूला घालून परशुरामाने एक कावड आपल्या खांद्यावर घेतली आणि वडिलांच्या कान्यकुब्ज आश्रमातून (रेणुकेच्या माहेरच्या गावाची स्मृति म्हणून हे नाव दिले गेले होते) नर्मदातटावरून तो निघाला ती कावड वाहून नेण्याचा त्याचा उद्देश आपल्या मर्त्य पित्याला सद्‌गति मिळण्यासाठी पवित्र आणि शुद्ध दहनभूमि शोधणे हाच होता फिरता फिरता तो माहुर (मातापूर) ऊर्फ मल्हकी या सह्याद्रि पर्वताच्या पायथ्यावरील एका स्थानी आला या ठिकाणी त्याचे नाव सिंहाचल अगर सैह्यचल असे होते

या क्षेत्रात आल्यावर आकाशवाणी झाली की, 'या ठिकाणी जमदग्नीला अग्निकाष्ठ दे ही जागा त्याचे दहन करण्यास अतिशय शुद्ध आणि पवित्र आहे' आकाशवाणीच्या आज्ञेनुसार परशुरामाने त्या क्षेत्री वडिलांच्या अग्निसंस्काराची सर्व तयारी केली चिता रचली रेणुकेने आपला सती जाण्याचा निश्चय त्याला बोलून दाखविला चितेला अग्नि देण्यापूर्वी ती आपल्या पुत्राला म्हणाली, 'आम्ही गेल्यावर तू आमची धर्मकृत्ये यथाविधि पार पाड वडिलांची नित्याची धर्मकृत्ये आश्रमात राहून करीत जा युद्धाचे प्रसंग ओढवून घेऊ नकोस अधर्मी आणि दुष्ट लोकांचे पारिपत्य मात्र जरूर कर आणि मातृभूमीचे देहार्पण करूनही, रक्षण कर आमच्या वधाबद्दल तुला कोणाचा सूड घ्यावयाचा असेल तर प्रथम ब्रह्मदेवाकडे जा, त्याच्याबरोबर विचारविनिमय कर आणि त्याच्या सल्लामसलतीने वाग' रेणुका पुढे म्हणाली, 'तुझ्या वडिलांच्या प्रेताला अग्नि दिल्यावर, विनाविलंब, शक्य तितक्या त्वकर शक्य तितक्या दूर जा आणि पुन्हा परत इकडे येऊ नकोस कारण सतीच्या चितेवरील यातना तुला पाहवणार नाहीत शिवाय मरणोत्तर काही काळ शांततेत गेला तर आम्हांला थोडे समाधान वाटेल'

(ब्रह्मवैवर्त गणेशखंड, २२।४८)

मातेच्या उपदेशाप्रमाणे वागण्याचे परशुरामाने कबूल केले कोणत्याही गोष्टीबद्दल आकांक्षा वा इच्छा न ठेवता पतीबरोबर सहगमन करण्यास त्याने आपल्या मातेला विनती केली चितेला त्याने अग्नि दिला आणि आईने सांगितल्या प्रमाणे तो दूर जाऊ लागला सहा योजने दूर तो कसाबसा गेला, पण त्यापुढे मात्र त्याला जाववेना मातृविरह त्याला अतिशय असह्य झाला लगोलग तो परत फिरला असे मत रा चंद्रकांत प्रधान (कायस्थप्रभु समाचार, मुंबई, दिनांक १५-५-१९६० च्या अंकात) मांडतात याचे कारण असे की, लांब गेल्यावर

परशुरामाला शंका आली की, मरतेसमयी मातेने प्यावयास पाणी मागितले तर तिला पाणी देण्यास तिच्याजवळ कोणीही नाही (पण ही विचारसरणी अयोग्य आहे असे वाटते कारण सतीने चितेमध्ये उडी घेतल्यावर तिच्या देहाचे भस्मच होणार तेव्हा ती पाणी मागेल असा प्रश्न उद्भवत नाही.) परशुराम परतला तोवर मातेचा देह जळून भस्मीभूत झाला होता आणि तिचे शिर मात्र शिल्लक उरले होते म्हणूनच माहूरला रेणुका देवीचा नुसता मुखवटाच दिसतो तिचे सर्व शरीर दृग्गोचर होत नाही

रा प्रधानानी मांडलेल्या मतापेक्षा रेणुका महात्म्यातील पुढील वर्णन सार्थ व मनाला पटणारे आहे. ते असे पाचसहा दिवसानी परशुराम क्रियाकर्म करण्यासाठी माहूर येथे परत आला सभात् दत्तात्रयाच्या हस्ते श्राद्धविधि करण्यात आला परंतु सातव्या दिवशी विधीच्या वेळी मातृस्मरणाने परशुराम भारावून गेला चंद्राला पाहाताच ज्याप्रमाणे सागर उफाळून वर येतो, तद्वत् आईरूपी चंद्राचे स्मरण होताच त्याच्या मनरूपी लाटा उचंबळू लागल्या, उफाळू लागल्या, उसळून वर आल्या एकदम दु खातिरेकाने त्याने 'आई, आई' असा टाहो फोडला पुनर्भेगामुळे रेणुका पुन्हा प्रकट झाली आणि आपल्या मुलाला म्हणाली, 'संपूर्ण क्रियाकर्मोतर होईपावेतो जर तू धीर धरला असतास आणि तुझ्या हाक मारण्यामुळे मला प्रकट व्हावे लागले नसते, तर पूर्ण काळाअंती तू माझे संपूर्ण रूप सर्व पाहू शकला असतास त्याच स्वरूपात मी या ठिकाणी वास्तव्य केले असते परंतु भस्मीभूत झालेले शरीर पुन्हा तयार होण्यापूर्वीच तू मला बोलावल्यामुळे माझा जेवढा भाग तयार झालेला होता तेवढाच तुझ्यापुढे आलेला आहे यामुळेच या क्षेत्री माझा कमरेपर्यंतचा वरील भागच दर्शनाला राहील'

मुखातून वेदपठण ऐकवील. वासना देहामध्ये जाणाऱ्या जीवात्म्याची ही स्थिति ठीक आहे. पण येथे रेणुका म्हणते की, पूर्ण कालानंतर माझे स्वरूप पूर्ण होऊन ते परशुरामाला दिसले असते. त्याने लवकर हाक मारल्यामुळे माझा अर्धाच तयार झालेला देह दर्शन घेण्यास उपलब्ध होईल. तेव्हा वरील वासनादेहाचे कारण जरी सत्य मानले तरी माहुरला देवीचा अर्धपुतळा का याचा उलगडा वरील विवरणावरून समाधानकारक होत नाही.

माहुर हे क्षेत्र वऱ्हाडात यवतमाळ शहरापासून दक्षिणेला सुमारे ४० मैल अंतरावर आहे. हे स्थान उंचावर असल्याने सुमारे दीड ते दोन हजार पायऱ्या चढून वर जावे लागते. पर्वतावर सर्वत्र पसरलेली कदंबवृक्षांची वनराजी त्या शैलाची शोभा अधिकच वाढविते. पर्वतपायथ्याजवळ जो तलाव आहे तेथे दत्तात्रयाचे शयनस्थान आहे, असे मानतात. सांप्रत हे स्थान महानुभावी पंथीयांच्या ताब्यात आहे. भारूड-संग्रह क्रमांक १८५ मध्ये म्हटले आहे की, दत्तात्रयाची भिक्षा कोल्हापूर क्षेत्री होते, पांचालेश्वरी जेवण होते, तुळजापूरला त्याचे हात धुतले जातात, शेषाचलावर भोजनानंतरची विश्रांति आणि रात्री त्याची शय्या माहुर येथे असते. त्यामुळे माहुर हे शय्यास्थान मानले असल्याने ते अतिशय पवित्र मानले गेले आहे.

माहुर गावची सांप्रतची वस्ती सुमारे २५० घरांची आहे. हे गाव माथ्यावर वसलेले असून प्राचीन काळी यालाच मातृघर, मातापूर, माहुर अशी नावे होती. रेणुका मंदिर जरी पूर्वीचे असले तरी देवदेवेश्वराचे मंदिर बाराव्या शतकातील असावे. कारण त्याच सुमारास चांगदेव राऊळ यांना दत्ताचा साक्षात्कार या क्षेत्री झाला आणि संवत १२१७ साली महंत मुकुंद भारती याने ते मंदिर उभारले. येथील दत्तमूर्ति एकमुखी आहे, हे विशेष होय. अशी दंतकथा आहे की, कैवल्य ऋषींना सगुण स्वरूपात दर्शन देण्यासाठी त्याचा या ठिकाणी या स्वरूपात अवतार झालेला आहे. औरंगजेब बादशहाने या क्षेत्राची जागृती पाहून, त्या वेळी दैनंदिन खर्चासाठी जहागिरी दिली आहे आणि त्याचे वार्षिक उत्पन्न सुमारे पन्नास सहस्र रुपयांचे आहे. परधर्मीय राजा असूनही, जागृत देवस्थान दिसल्यावर या बादशहाने जसे गाव इनाम दिले, तसे जेजुरीच्या खंडोबालाही सव्वा लाखाचा रत्नजडित मुगुट अर्पण केलेला होता. या पार्श्वभूमीवर इंग्रजांच्या काळीही जी ढवळाढवळ झाली नाही, ती सांप्रत स्वराज्यात घडून न यावी.

पायऱ्या चढून माथ्यावर गेल्यावर प्रथम मातंगीचे मंदिर आपण पाहतो. मुख्य मंदिरासमोर होमकुंड असून उजव्या बाजूला पिंपळाच्या पारावर जमदग्नीचे

लिंग, मागील बाजूस कोल्हापूरवासिनी, तुळजाभवानी आणि सप्तशृंगीची स्थाने आहेत. मुख्य मंदिर लहानसर आकाराचे असून त्यावर चौकोनी आकाराचे शिखर आहे. या शिखराचा एकंदर घाट गया बुद्धमंदिराच्या शिखरासारखा वाटतो (अमृत मासिक, जुलै १९६१). मुख्य मंदिरात रेणुका ऊर्फ एकवीरा देवीची मूर्ति आहे. मूर्तीबाबत काही मतभेद आढळून येतात. कोणी सांगतात की, ही मूर्ति तांदळास्वरूप असून तिला मानवी शरीराचे कोणतेही अवयव नाहीत. परंतु इतर माहिती व वर्णनावरून हे विधान सत्य मानता येत नाही. रा. चंद्रकांत प्रधान वर्णन करतात की, मूर्ति तांदळास्वरूप जरी असली तरी तिला नाक, कान, डोळे, मुख इत्यादि सर्व अवयव आहेत. तिच्या ओठांची लांबी सुमारे दोन फूट असून जाडी नऊ इंच तरी असावी. या देवीला महानैवेद्य अर्पण करावयाच्या वेळी एक सहस्र पानांचा तांबूल करून तो तिच्या मुखात भरविण्याचा प्रघात आहे. हा एवढा तांबूल संपूर्णतः तिच्या मुखात मावू शकतो. यावरून तिचा जबडा किती विस्तीर्ण आहे याची कल्पना येईल.

तसेच श्री. वाडेकर महाराज लेखकाला म्हणाले की, देवीचा देह इतका भव्य आहे की, तिला दोन नऊ वारी लुगडी एकत्र जोडून ती नेसवावी लागतात. एक वस्त्र अजिबात पुरत नाही. मूर्तीची उंची अंदाजे पाच फूट असून तिला दोन भुजाही आहेत.

मातापूर येथे राहून देवीची सतत सेवा करणारे एक भक्त श्री विष्णुदास यांनी 'रेणुका स्तुति' या नावाचे काव्य प्रसिद्ध केले आहे. त्याला क्वचित 'विष्णुदासाची कविता' असेही म्हणतात. त्यामधील एका आरतीमध्ये (पृष्ठ १०७ वर) देवीचे वर्णन केलेले आहे, ते असे. डोक्यावर सुवर्ण मुकुट, चिरी कुंकू, मळवट, कस्तुरी तिलक, सरल नासिका, शिरी भांगावली, पाठीवर कर्नाटक धाटणीची वेणी, कनकाची काकणे, बाजुबंद, मुद्रा, अंगावर पितांबर, पायात पैंजण इत्यादि इत्यादि. हे सर्व वर्णन बरोबरच आहे, असे समजणे सर्वस्वी चूक आहे. कारण कवीने केलेले ते काल्पनिक वर्णनही असू शकेल. जर देवीला केवळ मुखवटाच असेल तर तिच्या पायात पैंजणे, हातात कंकणे असणे अशक्य आहे. देवीचे जे मूळस्वरूपातील छायाचित्र डॉ. म. न. जोशी यांचेकडून लेखकाने मिळविले आहे, त्यावरून मुखभाग भयंकर भव्य, जबडा रुंद, नाकही उठावदार आणि दोन नेत्र असे स्वरूप दिसते पण हे स्वरूप मूळच्या तांदळ्यामध्येही दाखविता येणे शक्य आहे

या स्थानी परशुरामाचे एक मंदिर आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला किल्ला आणि त्याच्या आतमध्ये कालिकेचे स्थान आहे. ह्या ठिकाणी सह्याद्रीच्या रांगेला

दोन उपफाटे फुटतात. एका फाट्यावर रेणुकास्थान आहे, तर दुसऱ्यावर दत्तात्रय आणि अनुसया यांची स्थाने आहेत. या दोन पीठांच्या मधोमध खोल दरी आहे त्यामुळे एकाचे दर्शन घेऊन दुसऱ्याला भेटायला जायचे म्हटले म्हणजे दहा बारा मैलाचा वळसा घालावा लागतो (अमृत, जुलै १९६१) या ठिकाणच्या दत्तात्रयाच्या स्थानामुळेच नित्यकर्म पोथीमध्ये 'निद्रा माहुर देशी' असा उल्लेख मिळतो. अनुसया मंदिराच्या शेजारी अत्रि ऋषींचे दर्शन घडते. रेणुकेची वार्षिक पालखी व मिरवणूक या स्थानाप्रत आणली जाते. असे समजते की, दत्तात्रय अनुसया ही दोन्ही स्थाने सध्या गोरखपंथीय साधूंच्या ताब्यात आहेत आणि तेच त्यांची व्यवस्था पाहातात रेणुकेच्या मंदिराजवळ तिचा प्रतिनिधी अथवा रक्षक झपटनाथ हा आहे. (चंद्रकांत प्रधान)

वरील विवेचनावरून असा निर्णय घ्यावयास हरकत नाही की, माहुर हेच रेणुकादेवीचे प्रमुख स्थान अथवा मूळपीठ होय. इतर ठिकाणी जरी तिची मंदिरे आणि मूर्ति असल्या तरी त्या केवळ तिच्या प्रतिकृति आहेत, मूळस्थाने नव्हेत नारदीय सूत्राप्रमाणे या देवीला एकवीरा असेच मानतात परशुरामाने ज्याप्रमाणे आपल्या मातेचा शिरच्छेद केला, तद्वत् इजिप्तमध्ये इसीस या देवीचे मस्तक तिच्या पुत्राने तोडल्याचा उल्लेख मिळतो भृगुगण या देवीचा उपासक होता फिजिअन्स हेच भृगुलोक असावेत असा काही संशोधकांचा समज आहे ऋग्वेदामध्ये तुर्वसु, द्रुह्यु इ० पांच गोत्रे प्रथम उत्पन्न झाली आणि त्यापैकी भृगुगोत्राने लोक आनर्त देशामध्ये आले असा उल्लेख मिळतो त्यांनीच व्यापारादीसाठी भृगुकच्छ हे शहर वसविले. याच बंदरात व्यापारानिमित्त फिनिशिअन्स वरुणाच्या देशामधून आले असावेत आणि कालांतराने भृगुलोकांत मिसळून गेले असावेत. (दीक्षित, मातृशक्ति, पृष्ठे ५८ ते ६५) या असल्या विधानामुळेच संशोधक श्री चिं. ग कर्वे विचारतात, 'रेणु राजाबरोबर रेणुकेचा संबंध कोणी मागाहून जोडला आहे काय?'

-

आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी परशुरामाने किती रान किती केले असेल आणि केवढे शारीरिक कष्ट सोसले असतील याची कल्पना आजच्या तरुणांना यावी याचसाठी त्याने किती अस्त्रांवर प्रभुत्व मिळविले होते, त्याची यादी देणे अत्यावश्यक वाटते. ती यादी येणेप्रमाणे :—

( १ ) ब्रह्मास्त्र, ( २ ) वैष्णव, ( ३ ) रौद्र, ( ४ ) आग्नेय, ( ५ ) वासव, ( ६ ) नैर्ऋत्य, ( ७ ) याम्य, ( ८ ) कौबेर, ( ९ ) वारुण, (१०) वायव्य, (११) सौम्य, (१२) सौर, (१३) पार्वत, (१४) चक्र, (१५) वज्र, (१६) पाश, (१७) सर्व, (१८) गान्धर्व, (१९) स्वापन, (२०) आदित्य, (२१) रैवत, (२२) मानव, (२३) अग्निसंतर्जन, (२४) भीम, (२५) जृम्भण, (२६) रोधन, (२७) सौपर्ण, (२८) पर्जन्य, (२९) राक्षस, (३०) मोहन, (३१) कालास्त्र, (३२) दानवास्त्र, (३३) ब्रह्मशिरस, (३४) भौम, (३५) पाशुपत, (३६) ऐषिक, (३७) तर्जन, (३८) प्राश, (३९) मारुड, (४०) नर्तना, (४१) अस्त्ररोधन.

( विष्णु धर्मोत्तर पुराण, व्यंकटेश प्रेस, मुंबई )

याप्रमाणे ४० च्या वर अस्त्रविद्येत तो पारंगत झाला होता त्यामुळे अनेक प्रबळ राजांना त्याने जमीनदोस्त करून टाकले तेसुद्धा आपल्या स्वतःच्या एकट्याच्या हिंमतीवर ! हा मजकूर लिहीत असताना भारताच्या शेजारील देश, चीन याने भारताच्या ईशान्य सीमेवर आक्रमण केल्याला आठवडा लोटला आहे आणि भारतीय तरुण मोठ्या उत्साहाने मातृभूमीच्या रक्षणार्थ पुढे सरसावत आहेत पण त्या शत्रूचा नायनाट करण्यासाठी त्यांना केवढा त्याग सोसावा लागेल आणि किती परिश्रम करावे लागतील याची गणतीच नाही अशा वेळी परशुरामाचा आदर्श भारतीय बहादुरांना हितावह ठरेल यात शंकाच नाही.

धाराश झाव की, परशुराम क्षत्रिय युद्ध म्हणजे ब्राह्मण-क्षत्रिय वाद होता, असे मत प. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव पुणे, हे आपल्या कोशामध्ये देतात, ते खरे असाव

आपले कार्य संपल्यावर परशुरामाने पादाक्रांत केलेली सर्व भूमि यज्ञामध्ये काश्यप ऋषीला अर्पण केली आणि तो स्वत पश्चिमेकडे निघाला. जुन्नर ( पुणे ) जवळील नाणेघाट मार्गाने तो खाली तळकोकणात उतरला असला पाहिजे. कारण या घाटाच्या तोंडाजवळ दोन तादळे आढळून येतात. ते रेणुका आणि परशुराम यांचे आहेत. या देवीला कोकणदेवी असेही म्हणतात. नाणेघाट हा फार प्राचीन काळी व्यापारी मार्ग होता. इसवीसनापूर्वी अनेक शतके तो अस्तित्वात होता खिस्तपूर्व सुमारे तिसऱ्या शतकात कृष्णा नदीच्या मुखाजवळ आंध्रभृत्य या नावाचा राजा धरणीकोट येथे राज्य करीत होता आणि त्याची राजसत्ता नाणेघाटापर्यंत होती असा पुरावा मिळतो या ठिकाणी एक आंध्र शिलालेख असून त्यामध्ये वरील माहिती मिळते पुढे त्रिदेवी राजाच्या कारकीर्दीमध्ये चौल, कल्याण, सोपारा या बंदरातून परदेशाशी व्यापार चालत असे. उपरिनिर्दिष्ट शिलालेख अथवा जवळपासची बौद्धलेणी ही मागाहून आलेली असावीत. ( पुणे जिल्हा गॅझेट, पृष्ठ २१२ )

परशुराम नाणेघाट मार्गे खाली उतरल्यावर त्याने अपरांत प्रांतात वसाहत करावयाचे योजिले. याचा उल्लेख मात्र असा मिळतो की, परशुरामाने बाण मारून सागराला मागे हटविले आणि कोकण प्रांताची निर्मिति केली ज्याप्रमाणे सागरात द्वारका वसवितांना जागेची निर्मिति श्रीकृष्णाने केली, त्याप्रमाणे समजावे.

तथा रामस्तु संतुष्टो वरुणं चेदमब्रवीत् ।
जलाधिप महाबाहो कुरुष्वात्र ममालयम ॥ ( सह्याद्रि खंड )

वरीलप्रमाणे परशुरामाने सागराकडून भूमि मागून घेतली परंतु तिची मर्यादा किती असावी याचा हा उल्लेख पहा

वैतरण्या दक्षिणे तु सुब्रह्मण्यास्तदधोत्तरे ।
महासागरपर्यंतं शूर्पारकं व्यवस्थितम ॥
एतन्मध्ये निर्मितं क्षेत्रमर्यादा ।

भगवान परशुरामाबद्दलचा खालील प्रसिद्ध श्लोक मननीय आहे,

चत्वारोऽमतो वेदान पृष्ठत. सशर धनु' ।
इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥

अशा सिद्धीचा हा अवतार होता. रेणुका जिला ब्रह्मरूपिणी मानतात, काही ठिकाणी जिला अयोनिसंभवा मानतात, तिचा परशुराम हा पुत्र होय व त्याची कार्यव्याप्ति 'मातृदेवो भव।', 'पितृदेवो भव।', 'आचार्यदेवो भव।' वगैरे या वेदाज्ञेनुसारच ठरली यात भारतीय संस्कृति साठविलेली दिसते. अशी ही माता-पुत्र जोडी अविस्मरणीय झालेली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या श्रींची कमीतकमी औटशक्तिपीठे मानतात, ती म्हणजे मातापूर-माहुर (रेणुकादेवी), कोल्हापूर (महालक्ष्मी), आंबेजोगाई (जोगेश्वरी), सप्तश्रृंगगड (सप्तश्रृंगी). कोणी पहिली तीन पूर्ण शक्तिपीठे व सप्तश्रृंगी हे अर्ध शक्तिपीठ मानतात, तर कोणी सप्तश्रृंगी हे पूर्ण शक्तिपीठ मानून, कोल्हापूर हे अर्धपीठ मानतात हे नमूद करावयास हवे.

एकवीरा ही महाकवि एकनाथांची कुलस्वामिनी होय. एका स्तवनामध्ये ते 'ते एकरूप एकवीरा। प्रगटली रोध परशुधरा॥' असा उल्लेख करतात श्री गो मा कार्लेकर यांनी 'भजनी-भाण्ड' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये क्रमांक ३७ वर रेणुकेचे वर्णन आढळते. ते असे—

आई रेणुके मूळमाया सुंदरी।
नांदते तुळजापुरी॥
आई कल्होळाची आघोळ करी।
गायमुखास जाय झडकरी ग॥
आई रेणुके॥

येथे रेणुकेचे स्थान तुळजापूर दिले आहे, पण ते खरे नव्हे त्या ठिकाणी तुळजाभवानी अथवा अष्टभुजा देवी आहे. मग त्यांनी 'नांदते तुळजापुरी' असे का म्हणावे ते समजत नाही

रा मु श्री माटे आपल्या 'महाराष्ट्रातील देवळे' या ग्रंथात म्हणतात की, परशुरामाने पश्चिम किनाऱ्यावर आर्यांची वसाहत वसविली आणि ती खाली मलबार-केरळपर्यंत वाढविली कारण आजही मलबारमध्ये 'परशुराम शक' चालू आहे. कोणी म्हणतात की, हे आर्य त्याने उत्तर भारतामधून आणले तर काहींचे ठाम मत आहे की, हे आर्य त्याने पर्शियामधून आणले असावेत परशुरामाचा 'परशु' आणि 'पर्शिया' प्रदेश यांच्यातील नामसादृश्यामुळे ते दोन

शब्द परस्परसंबंधी आहेत असे त्यांना वाटते. परंतु त्यांनी केलेल्या परशुरामाच्या चरित्रवर्णनात रेणुराजा अथवा माहुरक्षेत्र यांचा संबंध मात्र कोठेच आढळत नाही.

महानुभव पंथात चक्रधराला फार महत्त्वाचे स्थान आहे. ते स्वत:ला शाक्तपंथी म्हणवितात आणि त्यांच्या पूजनात जे श्रीचक्र आहे, त्याचा मध्यबिंदु ते माहुर हे क्षेत्र मानतात. येथे रेणुकादेवीसमोर श्रीयंत्राची आकृति आहे, ती याच कारणामुळे असावी. हा पंथ दत्तात्रयाचा उपासक असल्याने हेच क्षेत्र तो पवित्र मानतो आणि दत्तात्रयाचे मूळपीठ याच ठिकाणी आहे अशी त्यांची भावना आहे. त्यांच्या पोथीपुराणांतून या देवतेचा उल्लेख आढळतो. पण तो पार्वती या नात्याने.

रेणुकेची मंदिरे भारतामध्ये अनेक क्षेत्री आढळतील आणि देवीची स्वरूपेही सर्वत्र सारखीच असणार नाहीत. कारण शिल्पकार हा प्रत्येक वेळी मूर्तीचे निदान पाळतोच असे नाही. आपली स्वत:ची कलात्मक दृष्टि आणि मूर्ति स्थापन करणाऱ्याच्या कल्पना या दोहोंची सांगड घालून तो मूर्ति बनवीत असतो. त्यामुळे इतर ठिकाणी जरी क्वचित वेगळी स्वरूपे आढळली तरी मूळ स्वरूप माहुर येथीलच मानतात.

पेडुवेडु (उत्तर अर्काट) हे गाव वेलोरपासून जवळच आहे. त्याला पूर्वी कुंडलीपूर असे म्हणत. सुमारे चाळीस पन्नास वर्षांपूर्वी या ठिकाणी उत्खनन झाले. त्या उत्खननामध्ये रेणुकेचे एक मंदिर आढळून आले आहे. त्यातील माहितीवरून आणि इतर ग्रंथांच्या आधारे श्री. टी नरसम्मा यांनी 'रेणुकादेवी चरितम्' या नावाचा तामीळ भाषेत एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. (तसेच त्या उत्खननामध्ये एक ताम्रपट असून त्यावर 'विष्णूचे मंदिर कसे बांधावे?' याबाबतची सर्व माहिती आहे. तो ताम्रपट दुसरा नंदीवर्मा या वेळेचा म्हणजे सन ४२० ते ४२५ या काळचा असावा असे वाटते.)

(ब्रह्मविद्या मासिक, अड्यार, मे १९६२.)

श्री. टी नरसम्मा यांच्या 'रेणुकादेवी चरितम्' या ग्रंथाचा सारांश खालीलप्रमाणे.

प्राचीन काळी कान्यकुब्ज शहरी रेणुधर्मा या नावाचा राजा झाला पुत्रप्राप्तीसाठी त्याने पुत्रकामेष्टि यज्ञ केला परंतु पुत्र होण्याऐवजी त्याचा लाभ झाला आणि त्या मुलीचे नाव रेणुका असे ठेवण्य उपवर झाल्यावर ती स्वत:च आपल्या वरसंशोधनार्थ निघाली आपल्याबरोबर तिने प्रधानाची मुलगी चामुंडा हिला घेतले आणि संरक्षणार्थ काही निवडक सैनिकही बरोबर घेतले. अनेक राजे आणि राजपुत्र यांचे निरीक्षण करता करता

ते सर्वजण दक्षिणेला पेद्दुवेटु येथे असलेल्या जमदग्नीच्या आश्रमापर्यंत आले. ऋषींच्या आश्रमात स्त्रियांना प्रवेश करण्यास बंदी असल्यामुळे जमदग्नींच्या शिष्यांनी तिला आत प्रवेश करण्यास मनाई केली. परंतु रेणुका आणि चामुंडा या दोघीही सशस्त्र असल्याने त्या शिष्यांचा काही उपाय चालेना. तेव्हा निरुपाय म्हणून त्यांनी आपल्या गुरूला हा सर्व वृत्तान्त निवेदन केल्यावर ऋषींनी मंत्र घालून थोडेसे उदक आपल्या शिष्याजवळ दिले आणि ते त्या स्त्रियांच्या अंगावर फेकण्यास सांगितले. शिष्यांनी तसे केल्यावर त्या सर्वांची शक्तीच क्षीण झाली आणि ऋषींचा प्रभाव रेणुकेसह सर्वांना कळून चुकला.[1] तरीही रेणुकेने जमदग्नींना भेटण्याबाबत उत्कंठा प्रदर्शित केल्यावर ऋषींनी आपल्या ज्ञानचक्षूद्वारे सर्व सत्य परिस्थिति जाणली आणि शिष्यांना तिला आत सोडण्यास सांगितले. दोघांची भेट होताच दोघेही परस्परांवर अनुरक्त झाली आणि त्यांनी मनोमन एकमेकांना वरिले. पुढे रेणुकेने वडिलांना आपली पसंती कळविल्यावर त्याने त्या दोघांचा विवाह लावून दिला. प्रभु रामचंद्रांनी लंकेकडे जाताना या स्थानाला भेट दिली होती असे म्हणतात. दक्षिणेत या पीठस्थानाला अतिशय महत्त्व आहे.

होसपेटपासून तीन मैल अंतरावर तुंगभद्रा नदीच्या किनारी व्याघ्रेश्वरी देवीचे एक स्थान आहे. परंतु नावावरून संगत होण्याचे काहीच कारण नाही. येथील स्थानाचे महत्त्व असे की, नदीच्या एका किनारी देवीच्या मुखवट्याची पूजा होते, तर दुसऱ्या बाजूला तिच्या धडाची पूजा होते. याचा अर्थ रेणुकेचे मस्तक एका बाजूला तर धड दुसऱ्या बाजूला असा होतो. या देवीला कोणी परशुराममाता असे म्हणतात, तर दुसरे कोणी रामचंडेश्वरी असेही म्हणतात. परशुरामाने मातेचे मस्तक तोडल्यावर तिच्या शरीराचे मस्तक आणि धड असे जे दोन भाग झाले त्याचे हे स्मृतिचिन्ह मानले जाते. वैशाख शुद्ध पंचमी या दिवशी या ठिकाणी वार्षिक यात्रा भरते.

(कल्याण शक्तिअंक १९५७, पृष्ठ ३०८)

सौंदत्ती (कर्नाटक) या ठिकाणी यल्लम्मा देवीचे मंदिर आहे. तिचे सर्व वर्णन रेणुकेला लागू पडते इतकेच नव्हे तर रेणुका पाणी आणण्यास गेली आणि चित्ररथ गंधर्वाच्या कामलीला पाहून तिचे मन विचलित झाले, ते याच ठिकाणी असे मानतात (यल्लम्मा पहा)

---

१ टीप—सप्तशतीमधमध्ये चंड दैत्यानंतर कौशिकीदेवी लढत असताना तिच्या मदतीला ब्रह्मशक्ती आली. शत्रूंचा पराजय करण्यासाठी तिने आपल्या कमंडलूमधील जलाचा वर्षाव केल्यावर ताबडतोब ते सर्व निर्वीर्य पडले, असा उल्लेख आहे.

सिमल्याजवळ ददाहू या गावाजवळ रेणुकातीर्थ आहे तसेच जवळच परशुराम ताल या नावाचे स्थान आहे. रेणुका या नावाचा एक ओढाही जवळून वाहात आहे. या ठिकाणी रेणुका परशुराम यांची मंदिरे आहेत. इतकेच नव्हे तर हा कथाभाग पूर्ण व्हावा म्हणूनच की काय जवळच्याच एका पर्वताचे नाव जमदग्निपर्वत असे ठेवले आहे. तेथील लोकांची अशी भावना आहे की रेणुकेचे चरित्र याच ठिकाणी घडले. (कल्याण क्षेत्रअंक १९५७, पृष्ठ ६८)

ढाका (पूर्व पाकिस्तान) पासून १८ मैलावर नारायणगंज आणि तेथून पाच मैलावर, ब्रह्मपुत्रा नदीच्या किनारी 'नागलबाँद' नावाचे क्षेत्र आहे. या शब्दाचा अर्थ असा की, 'नांगर भूमीत रुतून बसलेली जागा' येथील कथा अशी की, परशुरामाने मातेचा वध केल्यावर, तो परशु हातालाच चिकटून बसला मातृहत्या व ब्रह्महत्या या पातकांनी भारावलेला परशुराम, दुसऱ्या हातात नांगर धरून हिमालयाकडे, पापनिवारणार्थ चालला असता, वाणी आकाशगामी झाली की, 'हे परशुरामा, तू असाच नांगर चालवीत पुढे पुढे जा आणि ज्या ठिकाणी तो भूमीमध्ये रुतून बसेल, त्या ठिकाणी तू वास्तव्य करून जपजाप्य कर, म्हणजे पापनिवृत्ति होऊन मन शांति मिळेल.' याप्रमाणे चालत असता चैत्र व. ८ रोजी तो या क्षेत्री आला असता त्याचा नांगर रुद्ध झाला, म्हणून त्याने तेथेच वास्तव्य केले या दिवसाची स्मृति म्हणून, या क्षेत्री या दिनी स्नानासाठी मोठी यात्रा भरत असते

सरोवरात रूपांतर झाले. 'पुनः परशुरामके घाटपर वह सरोवरके रूपमें परिणत हो गई.' (घुमक्कड स्वामी, ले. राहुल सांकृत्यायन, पृ. ५४)

परशुरामचरित्र कसे सूत्रबद्ध आढळत नाही, याचा हा आणखी एक पुरावा होय. मातेच्या मृत्यूनंतर तो कोकणात गेला, केरळ प्रांती गेला, मग वरील ठिकाणी केव्हा गेला व कोणत्या स्थितीत गेला याचा सुलभ उलगडा होत नाही, असे म्हणावेसे वाटते.

याच देवतेचे एक लहान स्वरूप औरंगाबाद-जालना मोटारमार्गावर सुमारे २० मैल अंतरावर असणाऱ्या गोलट्या गावी डोंगरावर आहे. ते एका विशेष अर्थाने प्रसिद्ध असल्याने येथे देत आहे. सोळाव्या शतकामध्ये विठा रेणुकानंदन नावाचा एक संत या गावी होऊन गेला. त्याचा जन्म अकोळनेर (जिल्हा अहमदनगर) गावी नडवे कुळामध्ये झाला. वडिलांचे नाव मनोहरपंत. हे कुलकर्णीपण करून उपजीविका करीत असत. त्यांच्या घरात रेणुकादेवीची उपासना चालू होती. अर्थातच मुलाचा ओढा लहानपणीच या देवतेच्या उपासनेकडे लागला. ही त्याची निष्ठा पाहून एके दिवशी दृष्टांताने त्याला देवीने आदेश दिला की, 'तू माझे दर्शनाला माहुर येथे ये.' वडील जाण्यास परवानगी देईनात तेव्हा यात्रिकांच्या मेळ्याबरोबर अनुज्ञेविना तो पळून गेला. इतकी त्याला देवीच्या दर्शनाची आंतरिक ओढ लागलेली होती. मजल दरमजल करीत यात्रेकरू गोलट गावी आले असता विठूला त्याच्या मामांनी ओळखले आणि आपल्याच घरी ठेवून घेतले. पुन्हा तो निराश झाला. या वेळी त्याचे वय फक्त १४ वर्षांचे होते.

मामाच्या घरी इतर काही काम नसल्याने, त्याला गुरे चारण्याचे गुराख्याचे काम देण्यात आले. इतर गुराख्यांबरोबर जनावरे घेऊन तो रानात जाई. एके दिवशी गुरांचे मागे जात असता टेकडीवर त्याला रेणुका देवीचे मंदिर दिसताच अत्यानंद झाला. मूळ ठिकाणी नाही. तरी या ठिकाणी देवीचे दर्शन झाल्याबद्दल त्याला समाधान वाटले. त्याने याच मूर्तीची सेवा करण्याचे ठरविले. दररोज गुरे रानात आणल्यावर तेथून दोन मैल अंतरावर असलेल्या देवमुनीश्वर तलावामध्ये स्नान करी आणि घागरभर पाणी घेऊन येऊन देवीची मनोभावे पूजा करी. ही त्याची सेवा चालली असता त्याला पुन्हा दृष्टांत झाला की, 'मी येथेच आहे. सेवा चालू ठेव, माहूरला जाण्याची जरूरी नाही.'

पूजेचा नित्यक्रम चालू असता देवीने त्याची परीक्षा पाहण्याचे ठरविले एके वेळी हा पाण्याची घागर भरून घेऊन आला असता, एक वृद्ध मांगीण देवीच्या प्रवेशद्वारी बसलेली दिसली. तृषाक्रांत असल्याने तिने पाणी पिण्यास मागितले. विनित भावाने विठूने तिला पाणी पाजले. नंतर पुन्हा तलावावर

गेला, घागर भरून आणली आणि देवीचे पूजन केले. असे जेव्हा अनेक वेळा घडू लागले, तेव्हा शेवटी तो म्हणाला, 'आई, का माझी परीक्षा पाहते आहेस, तुझे पाषाणमूर्तीवर अभिषेक करण्यापेक्षा तुला प्रत्यक्ष पाणी पिण्यास देण्यास मला कष्ट मुळीच पडत नाहीत, तर परमोच्च आनंद मला मिळत आहे. कारण आई, तू पाषाणाची खोळ टाकून साक्षात् मजपुढे उभी राहून नित्य दर्शन देत आहेस आणि मातेला पाणी पाजण्याचा आनंद मला उपभोगू देत आहेस.' हे त्याचे भाषण ऐकून विठ्ठलाकडे प्रसन्न मुद्रेने कृपाकटाक्ष टाकून ती मांगीण तेथेच अदृश्य झाली.

असेच एकदा दरवाज्यावर व्याघ्ररूपाने देवता बसली होती. पण विठ्ठल मनात किंचित् शंका न धरता मंदिरात गेला. त्येच्च ते व्याघ्ररूप गुप्त झाले आणि आसनावर देवी स्थानापन्न झाली. देवीच्या परीक्षेत भक्त पारखून निघाल्यावर देवता प्रसन्न न झाली तरच आश्चर्य. त्याच दिवशी देवीने आपले सगुणस्वरूप प्रकट केले, विठूला आपल्या मांडीवर घेतले आणि स्तनपान देऊन तृप्त केले. त्या दिवसापासून तो अत्यानंदात राहू लागला आणि आपले नावापुढे रेणुकानंदन ही बिरुदावली जोडली. असा हा देवी आणि भक्ताचा गोड मधूर इतिहास आहे. देवाला मनोभावे सर्वस्व अर्पण केल्याशिवाय तो भक्ताला पूर्णपणे आपला म्हणणार नाही, हाच बोध या कथेतून घ्यावयाचा.

(रा. चिं. ढेरे प्रसाद, जानेवारी १९६५).

भगवान परशुरामाच्या चरित्रातील काही भाग मनाला खटकतो असे वर म्हटलेलेच आहे. विशेषत: रेणुकेचे मन गंधर्वाची जलक्रीडा पाहून विचलित होणे आणि त्यामुळे पतीने तिचे मस्तक तोडण्याची आज्ञा पुत्रांना द्यावी ही कृति आर्यवृत्तीला पोषक वाटत नाही. आर्य म्हणजे उदारवृत्तीचे, अनार्यांना आत्मसात करू निघालेले. आपला धर्म भारतामध्ये वसविण्याचा महान प्रयत्न करीत असताना आपल्या सतीबद्दल अशी शंका जमदग्नींना का यावी व आली तरी ती रास्त होती का? हा प्रश्न मन गंभीर बनवीत असे. त्याचे थोडेसे उत्तर रा. मनयाराल मुनशी यांनी सन १९६६ साली प्रकाशित केलेल्या 'भगवान परशुराम' या ग्रंथामध्ये पाहावयास मिळाले, यास्तव सारांश येथे देणे अप्रस्तुत होणार नाही. (याच संदर्भात परशुराम चरित्र, ले. श्री. म. माटे पहा).

आर्यांची प्रथम वस्ती सरस्वती नदीच्या काठी सप्तसिंधूमध्ये होती. भृगु व हैहय कुळातील पर्ते पुरुष त्याली दक्षिणेकडे सरकले आणि महिष्मत आर्यांनी नर्मदा किनारी नगरी वसविली, तीन माहिष्मती होय. या भागाला अनूपदेश म्हणत आणि त्याच्या चतुःसीमा उत्तरेस चर्मण्वती नदी, दक्षिणेस नर्मदा नदी

व पश्चिमेस समुद्र होता आनर्त म्हणजे गुजराथ काठेवाड भागाला नाव होते, तेथे यादव व शर्यात वश होते महिष्मताचा नातू सहस्रार्जुन फार प्रबळ होता आणि त्याने परशुरामाला लहानपणी बापाकडून आणून यादव घराण्याकडे ठेवले होते परशुरामाचे बाळपण व यौवनावस्था याचा इतिहास देताना रा मुनशी म्हणतात की, या काळात त्याने यादव व शर्यात यामध्ये फार जागृति केली आणि सहस्रार्जुनाचे जुलमाचा प्रतिकार करण्यास सिद्ध केले तसेच त्याने नागवंशीय आणि अघोर याना शस्त्राचे शिक्षण देऊन विद्यादान करून आर्यधर्माचे धडे देऊन आत्मसात करुन घेतले आर्यांच्या प्रसरण कालीचा हा इतिहास कादंबरी रूपाने अत्यंत मार्मिकपणे त्यानी रंगविलेला आहे

परशुराम जेव्हा पित्याची भेट घेण्यास सरस्वतीकाठी परत गेला, तेव्हा पिताजी अत्यंत म्लान वदन करुन आश्रमात एकटेच होते गंधर्वांची सेवा करण्यास रेणुका गेल्याने, ती स्त्रीधर्मापासून च्युत झाली, ती वधार्ह होय, असे ते म्हणाले परशुरामाला त्यानी सांगितले की, उत्तरेकडे ती गंधर्वाची सेवा करीत आहे तिचा वध करावा परशुरामाने आश्रम सोडला आणि मातेचा शोध घेत घेत उत्तरकडे गेला माता पुत्राची भेट झाली आणि सर्व तपशीलवार हकिगत त्याने समजून घेतली प्रत्यक्ष मातेचे म्हणणे असे की, एकदा काही कारणाने त्या प्रांती साथ उद्भवली आणि अनेक गंधर्व घराणी त्या साथीला बळी पडली कोणाचे हात गेले, कोणाचे पाय गेले, शरिरे दुबळ झाली आणि स्वत चे देहधर्म करण्यास निरुपयोगी झाली ही स्थिति तिने पाहिल्यावर आर्यांचे सेवाव्रत तिने प्रत्यक्ष आचरणात आणून सर्वांची मनोभावे ती सेवा करीत असे अंग साफसूफ करणे, भोजन देणे, इ० कामे ती करीत असे ही सेवा करीत असतानाही अनेक गंधर्व मृत्युमुखी पडले व पंचवीस तीस उरले आहेत रुग्णसेवा हीच परमोच्च सेवा असल्याने त्याना सोडून ती पतीकडे जाण्यास तयार होईना परशुरामाने मातेचा मातृभाव पाहिला, तिच्या शुद्धवर्तनाबद्दल त्याची पूर्ण खात्री झाली, पण रुग्ण गंधर्वांची धोंड मार्गातून दूर सारल्याविना ही परत येणार नाही अशी त्याची मनोमन खात्री झाली यासाठी मातेच्या नकळत एका रात्री रुग्ण गंधर्वांना यमसदनाला पाठविले आणि त्यांच्या यमयातनातून त्याची मुक्तता केली रेणुकेने मुलाला खूप दोष दिला, तेव्हा आपल्या कृत्याचे मर्म त्याने मातेला समजावून सांगितले

वडिलाच्या आश्रमाकडे येत असता वाटेत वसिष्ठ ऋषींची भेट झाली आणि सर्व हकीगत समजल्यावर रेणुकेच्या आदरणीय वर्तणुकीबद्दल तिचे कौतुक केले आश्रमी परत आल्यावर सर्व परिस्थिति परशुरामाने पित्याला कथन केली आणि माता निर्दोषी असल्याचे परोपरीने सांगितले वसिष्ठ ऋषींनीही भार्गव रामाला साथ दिली आणि जमदग्नीचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पारंपारिक

विचाराच्या त्या वृद्धाचे जेव्हा समाधान होईना आणि आपली आज्ञा मुलाने अमलात आणलीच पाहिजे, असा हेका त्यांनी धरला तेव्हा परशुराम विनम्रपणे म्हणाला, 'पित्याची आज्ञा म्हणूनच मी मातेचा वध करीन. पण त्यानंतर आपलाही शिरच्छेद करून घेऊन मातेबरोबर तिच्या लोकाला जाईन, पितृलोकाला जाणार नाही. बापाची चार मुलांनी अवज्ञा केल्यावर, त्याचे कर्तव्य होते की, आश्रम सोडून प्रत्यक्ष परिस्थितीचे अवलोकन करावयाचे, पण आपण ते केले नाही आणि आपलाच हेका धरून बसला वसिष्ठाचे समाधान झाले पण पित्याचे होत नाही, हे खरोखर आश्चर्य होय.' ही वाक्ये पित्याच्या वर्मी झोंबली, परशु-रामाचे नेत्र क्रोधाने लाल झाले आणि तो पुढे म्हणाला, 'अशाचारल्या सतीला आपण कुलटा ठरविलीत. गंधर्वांची सेवा करीत असताना जगत् तिने उज्वल केले आणि आर्यांना सेवाधर्म सर्वांना शिकविला हे आपण पाहिले नाही. आर्यधर्माचा प्राण आपण तिच्या सेवाधर्मात ओळखू शकला नाही.'

याप्रमाणे गर्जना करून परशुरामाने आपला परशु उचलून मातेच्या शिरावर घाव घालणार, इतक्यात जमदग्नि पुढे सरकले आणि थरथरत्या हातानी त्यांनी परशू धरला. मनाच्या कळवळ्याने पत्नीला म्हणाले, 'रेणुके, अगे, मी तुझा वध करावयाला सज्ज झालो, पण परशुरामानेच आपल्या उज्ज्वल सामर्थ्याने तुला जिवंत केले आहे राम, तो परशू फेकून दे, मी माझी आज्ञा परत घेतो' रेणुकेचे नेत्र ओले झाले, गळा दाटून आला. पतीने आपली आज्ञा परत घेतली या आश्चर्यकारक वागणुकीबद्दल तिच्या मुखातून एकही शब्द उमटेना विनाकारण ती पतीचे चरणी नतमस्तक झाली वृद्ध ऋषींनेही तिला वर उचलून घेऊन हृदयाला भिडविले, वसिष्ठाने तिला आशीर्वाद दिला की, 'या तुझ्या सेवाव्रताबद्दल कलीयुगात तुझी मंदिरे उभारली जातील आणि पूजन केले जाईल.'

याचा सारांश असा की, पुराणकारानी रेणुकेचे चित्र एक बाजूने रंगविले तर त्याची उलट बाजू या मुनशीजींनी दाखविली आहे आर्यांच्या श्रेष्ठ तत्त्वाचा यामध्ये उत्तम आविष्कार दाखविलेला आहे. पण हा सर्व प्रकार सरस्वती नदीच्या परिसरात झाला आहे. मातापूर व कर्नाटकभागी नव्हे.

एकवीरा देवीचे चरित्र पाहताना आपणास दिसून येईल की, रेणुका देवीची अनेक ठिकाणी मंदिरे आहेत अमरावती येथेही अंबाभवानी मंदिराच्या बाजूला जो ओढा वाहतो त्याच्या दुसऱ्या बाजूला या देवीचे विख्यात स्थान आहे.

वरील विस्तृत विवेचनावरून वाचकांच्या ध्यानी येईल की, प्रारंभी म्हटल्याप्रमाणे या देवीचे चरित्र म्हणजे एक गूढ कथे आहे. कारण तिच्या

जन्मकथेमध्ये, कार्यक्षेत्रामध्ये एकसूत्रीपणा कसा तो आढळत नाहींच. परंतु ते काहीही असो. सांप्रत या देवीचे अनेक भक्त आहेत. अनेक घराण्याची ती कुलस्वामिनी आहे. महाराष्ट्रात जशी तिच्यावर भाविकांची श्रद्धा आहे तशीच ती दक्षिणेकडेही आहे. आपणही तितक्याच श्रद्धेने आणि भक्तिभावाने या देवतेला वंदन करू या.

भुजंगप्रयात

चला शक्तिपीठासि मातापुराला ।
वदे कोणि हो माहुराही तयाला ॥
विदर्भांतरी दक्षिणेला रहाते ।
त्रिकोणांत जोगाई तुळजापुरातें ॥ १ ॥

रसना

आख्यायिका मुळाची ती रेणुके तुझी ग ।
समजे मला जशी ती, मीं ही तशी वदे ग ॥
सहस्रार्जुने ही केला तो घातकीच हल्ला ।
जमदग्नि मारियेला जखमी करून भल्ला ॥
त्या नर्मदातटींच्या सोडोनि आश्रमाला ।
जमदग्निपुत्र वीर घेऊंचि तो निघाला ॥
पितृकलेवराला घालोनि पीटिकेला ।
पसयीत वृद्ध दुःखी माता तुझ्या फडेला ॥
दहनास शुद्ध भूमी शोधीत परशुराम ।
येई प्रमाण मानें माहुरक्षेत्रीं जाण ॥
आकाशवाणी रूपें आज्ञाचि दत्त देई ।
ही शुद्ध भूमी पाही दे म्हणती पित्याही ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

अग्नीला शिलगायिण्या परि अग्नीं रामासि माता वदे ।
अग्नीला शिलगायितां त्वरितचि राहूं नको, धांव घे ॥
मातृप्रेमतया तो सुपुत्र जरिही गेला महा यौजनें ।
धर्मकृत्य कराययास प्रश्न मो होयानि ये पाईने ॥ ३ ॥

वसंततिलका

दत्तात्रयेचि स्वसुखें विधी बोलियेला।
रोधूं शके न परि अंतरिचा उमाळा॥
आई म्हणोनि मग हंबरडाचि फोडी।
अर्धेचि रूप अधुरें, प्रकटे तदाही॥ ४॥

पंचचामर

माहुरासि मुख्य मंदिरी तुम्हीं शिरा जरी।
भव्यमूख रेणुका दिसे कशी पहा तरी॥
नाक-कान-नेत्र-ओठ जाड भव्य शोभती।
*सहस्रपान तांबुली विडे मुखांत मावती॥*
सप्तशृंगी, तुळजासहित, महालक्ष्मी।
सांबलिंगरूप जमदग्निचा पिता मुनी॥
परशुराम, कालिका, त्रिमूर्ति दत्त तो पहा।
रेणुका, त्रिपुर-सुंदरी सखीसवें पहा॥ ५॥

कामदा

देवी रेणुके मूर्त्ति साजिरी। पुत्र स्थापितो माहुरा पुरीं॥
दान मेदिनी अर्पि ब्राह्मणा। लोटि सागरा स्थापि कोंकणा॥ ६॥

मंदारमाला

कान्यकुब्जापुरी, रेणुधर्मा करी राज्य दुःखी परी, नाहि संतान तें।
तारावया कूळ, आराधितो मूळ, नंदिवरा मूल वंशास दे।
शंभु संतोषता, देतसे कन्यका, ठेविलें रेणुका नाम ह्या बालिकां।
येतां विवाहास शोध वरां जाय तो घेऊन आपुल्या सैनिकां॥ ७॥
राजे तसे राजपुत्रादिकें देखिले बालिके कोणि ये ना मना।
सेनेसवें चालतां दक्षिणे पेढुवेढुचिया पातली आश्रमा॥
शिष्यायुता जमदग्निपिता युद्धपारंगता जिंकी देवी रणां।
योगीवरा, तूंचि योग्या वरा, सूत्र बांधा करां, लग्नपत्नि म्हणा॥ ८॥

ऐका कथा, चित्रगंधर्व यूथा, क्षणिं देखितां ती विचले मनीं ।
योगी सदा ध्यानमग्न तदां, पाप जाणीवतां, क्रोध ये मन्मनीं ॥
आज्ञांकिता पुत्र तोडी शिरा, मागुताही वरा, शीर जोडी धडा ।
माईा न ते दुःख, जाळीत तो देह अंगावरी फोड देति पिडा ॥ ९ ॥

वसंततिलक

क्रोधामुळे परशुराम मनीं अशांत ।
जोडी धडास दुसरे शिर मंत्रमेंच ॥
माता न साहि परि जाळीत देह तापें ।
फोडि अशुद्ध शरीरां दिसतां दुज्याचे ॥१०॥
फोडास देवि वदती मग लोक सारे ।
ती रेणुका स्तविति रोग करो बरा रे ॥
नांदे सु-मंदिरीं स्थळीं अजि रेणुका ही ।
वंदीत देवि बहु थोर पतिव्रता ही ॥११॥

## (११) लुंबिनी

मायावती आणि लुंबिनी या गौतमबुद्धाच्या माता होत. त्यांच्या मरणोत्तर बुद्धाने त्यांची पूजा करण्यास सुरवात केली आणि त्यांना मूर्त स्वरूप दिले. कपिलवस्तु ही बुद्धाची जन्मभूमि यासाठी त्यांची मंदिरे तेथे बांधलेली होती. परंतु कालौघात या मूर्तींची जागा आता रूमिनी देवींने घेतली आहे.

गौतमबुद्धाचा जन्म खिस्तपूर्व ५६० मध्ये झाला असे म्हणतात. सध्या ज्याला आपण दक्षिण नेपाळ म्हणतो तेथील तराईचा घनदाट भाग आणि उत्तर प्रदेशाच्या बस्ती जिल्ह्याच्या उत्तरसीमेवरील भाग जेथे जोडला जातो तेथे हे स्थान आहे.

या कपिलवस्तु शहराला आता तिलौरा कोट असे म्हणतात. या गावाला साक्षात् कोट आजही दिसत आहे. या ठिकाणी सन १८९६ साली आणि नंतर उत्खनन झाले. त्या वेळी असे दिसून आले की, बाणगंगेच्या पूर्व बाजूला एक शहर वसलेले होते. परंतु केव्हा तरी काळाच्या उदरात ते गडप झाले असावे. त्या ठिकाणी तांबड्या रंगाची चित्रणमातीची भांडी, मानवाच्या व पशूंच्या मूर्ति आढळून आल्या आहेत. ( लोकसत्ता, मुंबई, दिनांक १०–६–६२ ).

त्या उत्खननामध्ये एक अशोकस्तंभ सापडला आहे. त्यावरील शिलालेख जन्मग असून 'शाक्यमुनी या ठिकाणी जन्मले' असा मजकूर त्यावर आहे. ज्या वेळी अशोक राजाने त्या क्षेत्राला भेट दिली त्या वेळी त्याने गाव-खान्याचा आठवा हिस्सा लुंबिनी देवीच्या खर्चासाठी द्यावा असा आदेश दिलेला होता. हा शिलालेख पालीभाषेत असून त्यावर लुंबिनी आणि मायावती यांच्या मूर्तीही खोदलेल्या होत्या. (ज्ञानकोश २, पृष्ठ १२६).

महापीरनिब्बानसूत्त (५–१६–२२) प्रमाणे भारतामध्ये पवित्र बुद्धक्षेत्र म्हणून कपिलवस्तु, कुशीनगर, बुद्धगया आणि बनारस या चार स्थानांचा उल्लेख केला जातो. परंतु यापैकी कुशीनगर हे बुद्धाचे निर्वाणस्थान असल्याने ते जास्त महत्त्वाचे मानले जाते. चिनी प्रवासी फा-हियान ह्युएनत्संग यांच्या प्रवासी वृत्तामध्ये ही नावे आढळतात. (जेम्स धर्मकोश ८, पृष्ठ १९६).

उपेंद्रवज्रा

जाणा तिलौराचि कपीलवस्तू ।
तराई नि गोरखपूरी वास्तू ॥
बुद्धाप्रती मानीत जन्म-भू ही ।
वंदा इथे लुंबिनी देवता ही ॥ १ ॥

## (१२) सतीचे देवालय

भारतामध्ये सतीची अनेक मंदिरे आढळून येतात. केशोरई–पाटण (बुंदी संस्थान) येथे सतीचे देवालय आहे. सतीची दोन मंदिरे चंबळ नदीच्या काठी आहेत. त्यापैकी एका मंदिरात सन ३५ आणि सन ६२ सालचे शिलालेख आहेत.

रत्नपूर (बिलासपूर) या गावी सतीचे एक मंदिर आहे. राजा लक्ष्मणसहाय याच्या राण्या सन १६४० साली, ब्राह्मणांच्या अत्याचाराला कटाळून पतीबरोबर सती गेल्या, त्याची ही स्मृति आहे. असे सांगतात की, हयहय वंशीय दुसरा रत्नदेव याने हे गाव वसविले. या ठिकाणी प्राचीन शिल्प फार होते. परंतु आता त्यापैकी बरेचसे नष्ट होत आलेले आहे. या क्षेत्री एक महामायेचे मंदिरही आहे. या ठिकाणी रत्नदेवाला देवीचा साक्षात्कार झाला. बंद असलेल्या मंदिरात चाललेल्या देवतांच्या लीला त्याने शेजारच्या वडाच्या

शाखावर बसून चोळून पाहिल्या आणि देवतेचे महत्त्व वाढो म्हणून तिने मंदिरही बांधले. या ठिकाणी अंदाजे ३०० जुन्यापुराण्या सतींच्या स्मृति टिकतात. (बिलासपूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ २८९)

वरील मंदिराशिवाय अनेक ठिकाणी सतींची स्मृतिचिन्हे दृग्गोचर होतात. मध्यप्रदेशातील जोधपूर राजवाड्याच्या दर्शनी भागात सती गेलेल्या तीस स्त्रियांनी हस्तचिन्हे दिलेली आहेत व काही उरलेले चौथरे मोकळे ठेवले आहेत. प्रस्तुत मथलेखकाचे मूळ गाव ताम्हाने हे होय. हे गाव तालुका राजापूर व जिल्हा रत्नागिरी येथे आहे. बालपणी गावातील एका ठिकाणाला 'सतीचा अंबा' म्हणत, असे आठवते. कारण त्या ठिकाणी घराण्यातील पूर्वजांपैकी कोणी पतिव्रता सती गेली होती.

भारतामध्ये सतीची प्रथा पुरातन आहे. पांडवांचा पिता पंडुराजा मरण पावल्यावर त्याच्या पाठोपाठ त्याची पत्नी माद्री ही सती गेली. श्रीकृष्णाच्या निर्वाणसमयी त्याच्या चार स्त्रिया त्याच्याबरोबर सती गेल्या. या व अशा उदाहरणांवरून *सर्वसाधारण जनतेत असा समज उत्पन्न होतो की, सतीची रूढि* ही शास्त्राने मानलेली आहे, शास्त्रप्रणीत आहे परंतु मुळात हे खरे नाही.

ऋग्वेदामध्ये सतीचा उल्लेख आहे,

**उदीर्ष्व नार्यभि जीवलोकं गतासुमेतमुप शेष एहि ।**
**हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्जनित्वमभि सं बभूथ ॥**

(ऋग्वेद १०-१८-८)

वरील ऋचेचा अर्थ असा 'हे स्त्रिये, तू मृत पतीच्या समीप शयन केले आहेस, तर हा जिवंत लोकांचा समुदाय पाहून प्रेतापासून ऊठ आणि इकडे ये. तसेच पुनर्विवाह करू इच्छिणाऱ्या व पाणिग्रहण करणाऱ्या या पतीच्या वधूच्या भार्यात्वाप्रत मुख्यत्वेकरून तयार हो.

अथर्ववेदातील (१८-३-१) ऋचा म्हणते, 'पति परलोकनिवासी झाल्यावर त्याच्यासह सहगमन करणे हे जरी सौभाग्यवतीचे कर्तव्य असले तरी मृत पतीच्या चितेपर्यंत गेले तरी त्या कर्तव्यातून मुक्त होता येते म्हणून हे स्त्रिये, तू ऊठ. इकडे ये आणि जो तुझा हात आपल्या हातात घेण्यास तयार आहे, त्याची पत्नी हो,' ऋग्वेदाचाच सारांश अथर्ववेदात दिसतो

या वेदऋचाचे तात्पर्य एवढेच की, ती पति मृत झाल्यावर त्याच्या पत्नीने त्याच्या चितेपर्यंत जावे आणि परत येऊन आपल्या दिराबरोबर विवाह करून पुन्हा संसारसुख भोगावे.

पुढे वैदिक ब्राह्मणांनी आपल्या स्वहितासाठी आणि विधवांचा माल मत्तेचा अपहार करण्यासाठी म्हणून बसलेल्या आमिषानी एकमेकाशी संगनमत करून ऋचेतील शब्दामध्ये किंचित फरक केला कारण यथे वैदिक ब्राह्मणानी 'आरोहन्तु जनयो योनिमग्रे' (१-७-२६-३) म्हणजे 'आपल्या आसनावर (चितेवर) चढून बसोत' या सूत्राऐवजी 'आरोहन्तु जनयो योनिमग्ने' असा बदल करून विधवांना सती जाण्यास भाग पाडले. आनंदीबाईने जसा 'ध' चा 'मा' केला, तद्वत् या आपल्या आपमतलबी ब्राह्मणानी 'ग्रे' चा 'ग्ने' केला

वेदकाली आणि पौराणिक काली ब्राह्मण वर्गाचा दरारा चहूकडे असल्याने त्यानी केलेल्या या फिरवाफिरवीबद्दल कोणी ब्र देखील काढला नाही याचे कारण असेही असू शकेल की, त्या काळी वेदविद्या केवळ ब्राह्मणांच्याच मुखात होती आणि याबाबतीत इतरेजन अनभिज्ञ असल्याने ब्राह्मणांनी केलेला हा फरक त्यांच्या लक्षात देखील आला नसावा तसेच हे वेद लिखित स्वरूपात नव्हते. ते फक्त परंपरागत मुखोद्गत होते त्यामुळे ब्राह्मणांनी दर्शित दिशा इतरांना पूर्वदिशा मानणेच भाग पडत होते पाण्डव, श्रीकृष्णाच्या स्त्रियानी सतीचीच रूढि आचरली त्यामुळे ब्राह्मण सांगतात तोच अर्थ बरोबर असा सर्वांस समज रूढ झाला. उत्तर भारतात राजपुताना, औंध, बंगाल आणि गंगेचे खोरे येथे ही सतीची चाल अतिशय बोकाळली आणि तिचे चांगलेच प्राबल्य माजले दक्षिण भारतात मात्र ती तितकीशी जोरात वाढीस लागली नाही

वर म्हटल्याप्रमाणे सतीची रूढि बंगाल प्रांतात विशेष होती आणि त्याविरुद्ध पहिला आवाज कोणी उठविला असेल तर बंगालनेच होय. यामध्ये प्रमुख पुढारी राजा राममोहन रॉय होत. त्यालाच याची पोटतिडिक येण्याचे कारणही घरगुतीच होते. त्याचे वडीलबंधु मृत झाल्यावर वहिनी सती जाण्यास निघाली. सती न जाण्यासाठी त्याने मनापासून प्रयत्न केले. वहिनीची परोपरीने विनवणी केली, पण यश आले नाही. रूढीचा पगडा एवढा जबरदस्त होता. शेवटी बंधूच्या चितेमध्ये वहिनीने उडी घातली आणि देह होरपळू लागल्यावर तिने स्वाभाविकपणे किंकाळ्या फोडण्यास प्रारंभ केला. त्या ऐकू न याव्यात म्हणून ढोल-नगारे गर्जत होते. कदाचित् दाह सहन न झाल्याने, तिने बाहेरही येण्याचा प्रयत्न केला असावा. पण अशा वेळी जमलेल्या लोकांनी काठ्यांनी तिला पुन्हा पुन्हा आत ढकलले. कारण तसले वेडेविद्रे स्वरूप नंतर पाहणे हितकारक नव्हते. किंबहुना असेही म्हणता येईल की, सहगमन करण्याच्या तिच्या निश्चयात लोकांनी थोडीफार मदतच केली. राममोहनने तिला बाहेर येण्यास मदत करण्याचा प्रत्यन केला. पण लोकांनी त्याचे निवारण केले. त्याला लोटून दिले. तो बेशुद्ध पडला. *त्याला जाग आली, तेव्हा त्याला चितेचा पांढरा शुभ्र ढीग* फक्त दिसला. या प्रसंगाने त्याने दृढनिश्चय केला की, सतीची रूढि बंद झालीच पाहिजे. त्याने अनेक लेख लिहिले. दोन पुस्तकेही प्रसिद्ध केली, आपल्या परीने चळवळ सुरू केली. ही गोष्ट सन १८१८ मध्ये घडली. सतीच्या चळवळीविरुद्ध जे दंड थोपटले, त्याचे पडसाद भारतामध्येच नव्हे, तर इंग्लंडमध्ये उमटले. आधीच धुमसत असलेल्या अग्नीला फुंकर घातली गेल्याने, त्यामुळे चळवळ सुरू झाली.

इंग्लंडमध्ये विल्यम विल्बरफोर्स, ह्यूम, पिम सारख्या गृहस्थांनी एक सोसायटी स्थापन केली आणि कायदा करण्यासाठी पार्लमेंटात अर्ज दाखल केला. त्या अर्जावर भारतामधून राजा राममोहन रॉय, जगन्नाथ शंकरशेट यांच्याही सह्या घेतल्या हे नमूद करणे अवश्य आहे. हा अर्ज ता. १८ जून १८२३ रोजी दाखल झाला. त्याचा योग्य तो परिणाम झाला, कारण पुढे लॉर्ड विल्यम बेंटिक हे गव्हर्नर जनरल म्हणून आल्यावर, सतीबंदीची चळवळ हाती घेतली, व जनतेचा पाठिंबाहि मिळविण्याचा प्रयत्न केला. मुंबईप्रांती त्या वेळी सर जॉन माल्कम गव्हर्नर होते. नाना शंकरशेट यांनी त्यांना संपूर्ण सहकार्य दिले आणि शेवटी ता. ४ डिसेंबर १८२९ साली सतीच्या रूढीबंदीचा कायदा अस्तित्वात आला. असे सांगतात की, भारतामध्ये दरसाल सुमारे ७–८ शे स्त्रिया सती जात असत. इतर प्रांती या कायद्याविरुद्ध बरीच ओरड झाली, काही ठिकाणी प्रति-

काही झाला, पण मुंबई प्रांती नानाच्या मुत्सद्दीपणामुळे अनुचित प्रकार कोठे झाला नाही त्यांचे खंबीर नेतृत्व व धोरणच याला कारणीभूत होते

(नाना शंकरशेट चरित्र, ले पु बा कुलकर्णी, पृष्ठ ४२०)

यावरून असे दिसेल की, हा रूढि बंद करण्याची चळवळ भारतीयांनीच चालू केली, परकीयांनी नव्हे

एका पारसी कवीने सतीच्या आत्मयागाचे उत्कृष्ट वर्णन केलेले आहे 'जळत्या ज्योतीवर म्हणजेच जिवंत ज्योतीवर पतंग झेप घालून प्राणत्याग करतो, पण सती जाणारी स्त्री पतीच्या विझलेल्या प्राणज्योतीवर झडप घालून, त्यामध्ये देहार्पण करते आपल्या जिवंत ज्योतीने ती विझलेली ज्योत पेटविते आणि नंतर दोन्ही ब्रह्मधामामध्ये विलीन होतात या ठिकाणी सती जाणाऱ्या स्त्रीची भावना किती उच्च कोटीची असते हे दिसून येते ' सती ही आत्मार्पणाचे व आत्म बलिदानाचे अत्युच्च व आत्यंतिक प्रतीक म्हणून मानले जाते हा भारतीय स्त्रीने दिलेला एक सांस्कृतिक वारसा अनेक देशभक्तांनी भारत स्वातंत्र्य संग्रामात आचरलेला दिसून येतो

---

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २० | ९ | जीवोऽप शक्तिस्तन | जीवोऽप्यशक्तिस्तन |
| २४ | २४ | निमर्त्यरूपा | निमर्त्यैरूपा |
| ३२ | २३ | ...मतोरर्भेद: | ...मतोरभेद: |
| ३२ | ३२ | प्रधानशक्ति योगाचेत् | प्रधानशक्तियोगाचेत् |
| ८९ | ३० | शस्र | शस्त्र |
| ६३ | १९ | त्याच्या ठरतो | त्याचा भार ठरतो |
| ६३ | २७ | ८ सेकंद | एक कोटयांश सेकंद |
| ६३ | २८ | १० सेकंद इतका | अधिक |
| ६४ | ११ | पी. यू. | प्लुटोनियम |
| ६४ | २५ | १८६०० | १,८६,००० |
| १०३ | ३ | नमोऽस्तुते | नमोऽस्तु ते |
| ११९ | २१ | सम्प्रवयामि | सम्प्रवक्ष्यामि |
| १३९ | ३० | जीवो. | जीवो |
| १५० | ३० | समुर | असुर |
| १७२ | ३ | Elhot | Elliot |
| २१३ | १६ | ७५,००,००० | ७५,००० |
| २५७ | ६ | पात्रमर्ध्वे | पात्रमुर्ध्वे |
| ३०३ | २३ | कालिक | कालिका |
| ३६० | १४ | गाणगापूर | नरसोबाची वाडी |
| ३८८ | २४ | तस्य | तस्य |
| ३९० | २५ | नानालंकार भूषिताम | नानालङ्कारभूषिताम् |
| ३९० | २८ | मष्ट बाहु समन्विताम् | .मष्टबाहुसमन्विताम् |
| ४०१ | २५ | प्राक्तम ..उच्यते | प्रोक्तम. .उच्यते |
| ४५५ | २ | ३५५ | ४५५ |
| ४५८ | १५ | (८) यल्लम्मा | (९) यल्लम्मा |

# अधिकारी विद्वानांचे अभिप्राय

★

देवीकोश ग्रंथाच्या प्रथम खंडात खालील विद्वानांचे अभिप्राय आलेले आहेत—

श्रीमत् शंकराचार्य (द्वारकापीठ), श्रीमत् शंकराचार्य (संकेश्वरपीठ), पं. सातवळेकर, लोकनायक अणे, महामहोपाध्याय पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गुरुवर्य सोनोपंत दांडेकर, नामदार बाळासाहेब भारदे, म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पं. महादेवशास्त्री जोशी, डॉ. एम्. एम्. कर्वे इत्यादि.

त्यानंतर आलेले अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

## श्री श्रीशृंगेरी जगद्गुरु महासंस्थान (म्हैसूर प्रान्त)

श्रीयुतेषु प्र. कृ. प्रभुदेसाई महोदयेषु सादरं सनतिका विज्ञप्तिः भवद्भिः सादरं अर्पितं "आदिशक्तीचे विश्वस्वरूपापर नामक देवीकोशनाम्ना विराजमानं ग्रन्थरत्नं श्रीजगद्गुरुशंकराचार्याः अवलोक्य इत्थं अभिप्रयन्ति।

श्रुतिशिरस्सु तत्र तत्र उद्घुष्यमाणा, "परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते" इत्यादि वाक्यविशेषैः माया, शक्तिः, अक्षरं, आकाश इत्यादि नामभिः निरूप्यमाणा या देवी तस्याः स्वरूपं पुराणेतिहासादिषु विस्तृतं समस्ति, तत्स्वरूपं सर्वमपि महता प्रयत्नविशेषेण एकत्र सङ्कलितं भवद्भिः। एतद्दृष्ट्वा प्रमोदामहे वयम्। अनेन प्रयत्नविशेषेण देवीस्वरूपं जिज्ञासमानानां अत्यन्तमुपकारो भवत्येवेति। आशास्महे च, इदं ग्रन्थरत्नं श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरयोः कृपाकटाक्षपातैः देवीतत्त्वजिज्ञासूनां हस्तलम्बमङ्गीकृत्य चिरमानन्दभूमानमाकलयत्विति।

संदर्भ क्रमांक ८८०३/६७, दिनांक १७–११–१९६७

◆ ◆ ◆

## महामहोपाध्याय पंडित श्रीराजराजेश्वरशास्त्री द्रवीड, वाराणसी.

"श्रीगुरु शरणम्"

नाणाक्यकृतार्थशास्त्रव्याख्याता जयमङ्गलया नीतिस्वरूपविमर्शे—"प्रत्यक्षानुमानागमप्रमाणदेशकालाभिपुरस्सरार्थसाधनविनियोगलक्षणानीति" इति निरुक्तमस्ति । तत्र शक्तित्वमत्यन्तमन्वर्हितम् —

विष्णुहीनं रुद्रहीनं न वदन्ति नराधमम् ।
शक्तिहीनस्तु यो मर्त्यस्तं वदन्ति नराधमम् ॥ इत्युक्तत्वात् ।

तस्य परिष्कृतं स्वरूपं तु ईश्वरसमवेतस्य ज्ञानस्य जीवेषु या प्रभा तस्या मानन्दप्रभाक्रियाप्रभयोः सम्बन्धः । तदुक्तम्—

परस्मादात्मनो भाति ज्ञानानन्दक्रियाप्रभा ।
ज्ञानप्रभा च सानन्दा तस्याः सत्त्वं प्रजायते ॥
क्रियाप्रभा रजस्तमाभ्यामिति स्यादुत्तमाधमम् ॥ इति ॥

केवलं ज्ञानप्रभा शास्त्रविद्भिरुपासिता, अथवा सुखाकाङ्क्षिभिरानन्दप्रभैवोपासिता निर्भयं सोत्साहं च प्रकाशशाश्वित्वेन नीतिसचिवान् सर्वान् नीत्यर्थानुष्ठाने सदा प्रेरयितुं समर्था भवेदेवेति न । षोडशवर्षपर्यन्तं यावत्सुखाकाङ्क्षानोदेति, तावत्पर्यन्तमेव ओजःप्रधानो ज्ञानप्रकाशप्राप्तये नियमाणः शास्त्रप्रगतं तर्कप्रवाहं सत्त्वसंरक्षणाय काम समर्था भवतु, अतीते तु बालभावे तर्कोत्पत्तिः भिन्नविषयकप्रत्यक्षसामग्र्या इव सुखाभिलाषविशेषस्य प्रतिबन्धकत्वान्न भवति । इति तदानीमानन्दप्रभाया आस्वादपुरस्सरैव तर्कः सञ्चारणीयो भवति । तत्प्रवाहसुखेभ्य आनन्दप्रभाया उपयोगीकृते यद्यपि सुखोपलब्धाः पुत्राः पितरं नाभिद्रुह्युस्तथापि ते पुत्राः समयविशेषे कर्तव्येषु दृढाभिनिवेशाभावात् स्वाय वंशपरम्परागतं कार्यं निर्वोढुमसमर्था भवन्ति । तदुक्तम्—

काष्ठमिव हि घुणजग्धं राजकुलमविनीतपुत्रमभियुक्तमात्रं भज्येत ।
सर्वथा सुखाभिलाषित्वात् राजपुत्रः परित्याज्य इत्यपि न नीत्यनुमोदितम् ॥

राजपुत्रं सुदुर्वृत्तं परित्यागं हि नार्हति ।
दुष्टं गजमिवोद्धृत्तं कुर्वीत सुखबन्धनम् ॥ इति ॥

अतस्तस्य सुखाभिलाषाभावे ओज प्रधानेन तर्कप्रवाहेण सुखाभिलाषसत्त्वे आनन्दप्रभासंवद्धेन तेन सत्त्वगुणपरिणताशक्तिः कार्यकारणे समर्थत्वान्नीतिलाभाणे जयमङ्गलाकृता निवेशिता । अत एवोक्तम्, "काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् । विचारशिका अपि तर्कस्योपलब्धये शास्त्र, तदुष्णता निरासाय सुख लब्धये काव्य च स्वीकुर्वन्तो रमन्ते ।

पुराणस्यापि आनन्दप्रभासम्मिश्रितज्ञानप्रभाद्वारा शूद्रादीनां बोधाय प्रयतते । भागवतादि पुराणेषु सर्वेष्वपि ग्रन्थेषु अधिकारिभेदेन वैदिकी, तान्त्रिकी, मिश्रा चेति त्रिविधा पूजोक्तोपपद्यते ।

प्रस्तुतसमये सुकुमाराणा राजपुत्राणा साधर्म्य भजते जनसमुदाय तस्य तत्त्वाभिनिवेश विनाऽऽनन्दप्रभोद्बोधेन ज्ञानप्रभामात्रेण कार्यकारी न भवतीति पश्यन्त देवीकोशसम्पादका श्रीमन्त इमे प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई महाभागा कौशलेनामु ग्रन्थ प्रकाशितवन्त । येन आनन्दप्रभामिश्रिता ज्ञान प्रभा सुकुमार मतिभि राजपुत्रसदृशैराप्तु शक्यते, कुपथान्निवारण सुपथे प्रेरण चोपलभ्येत । अय ग्रन्थ इममेव रीतिमनुसरन् सपूर्णो भूत्वा नीतिप्रचार अङ्गत्व लभतामिति विश्वेश प्रार्थये । इति ।

(वरील अभिप्रायाचा भावार्थ असा की, प्राचीन काळी राजपुत्राना नीतिज्ञान शिकविण्यासाठी शुष्कचर्चा असलेले तर्कग्रथ उपयोगी होत नसत, तर त्याऐवजी त्यांच्या मनात प्रथम गोडी निर्माण करून नतर ज्ञान देण्याचे कार्य पुराणादि सुलभ ग्रथाच्या द्वारे करण्यात येत असे

आधुनिक युगात सर्वसामान्य जनता त्या राजपुत्राप्रमाणे आहे त्याना शक्तिमातेच्या सबधी स्वभाषेत माहिती देण्याचे दृष्टीने गोरेगाव (मुबई), येथील श्री प्रल्हाद कृष्ण देसाई, यानी आनदप्रभामिश्रित ज्ञानप्रभा देणारा व नीति तत्त्वाचे उत्तम विवरण करणारा, देवीकोश खडात्मक तयार केला असून, तो दुर्वर्तनाचे निवारण करून सुपथाचे आचरण करण्यास जनसमुदायाला कारणीभूत होवो, अशी त्या विश्वेशाजवळ प्रार्थना आहे )

◆ ◆ ◆

## महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास, नागपूर

गोरेगाव (मुंबई) येथील श्री प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यांनी यापूर्वीच देवीकोशाचा प्रथम खंड प्रकाशित केला असून आता ते द्वितीय खंडाचे प्रकाशन करीत आहेत. आणखी एका खंडाचे प्रकाशन झाले, की तीन खंडात हा संकल्पित कोश पूर्ण होईल. महाराष्ट्रात यापूर्वी ज्ञानकोश, चरित्रकोश, धर्मकोश इत्यादि कोश वाङ्मयाचे प्रकाशन झाले असून, आजही संस्कृतिकोशासारखे प्रयत्न चालू आहेत, पण हिंदुधर्म व भारतीय संस्कृति यांचा आत्मा जो देव त्याच्या वेगवेगळ्या आविष्काराची संपूर्ण माहिती देणारा कोश निर्माण करण्याकडे आजवर कोणी वळले नव्हते. देवतेची प्रेरणाच ग्रंथनिर्मितीस कारणीभूत झालेली आहे.

हे काम अतिशय कष्टाचेही आहे, कारण देवता म्हटली, की तिचा संबंध वेद, पुराणे व तंत्रविद्या यांच्याशी येतो. त्यातल्यात्यात तंत्रविद्या ही गूढ असून ध्वनिशास्त्रादि अनेक सूक्ष्मशास्त्रांबरोबर तिचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. याकरिता त्या शास्त्रातील माहिती संकलित करणे, उपासना विधीची माहिती एकत्रित करणे हे काम सोपे नाही.

श्री प्रभुदेसाई यांनी देवीची माहिती संकलित करताना अतिशय परिश्रम घेऊन तंत्र आगम इत्यादि साहित्याचे परिश्रमपूर्वक आलोडन करून, वाचकांपुढे मांडले आहे. शक्तिउपासनेचा संप्रदाय हा भारतातील अत्यंत महत्त्वाचा उपासना संप्रदाय आहे. आपल्या उपासना काण्डातील अत्यंत महत्त्वाचा उपेक्षित स्वरूपाचा हा कोश तयार करून, श्री प्रभुदेसाई यांनी फार मोठी धर्मसेवा केली आहेच, आणि धर्म व संस्कृतीच्या अभ्यासकांची फार मोठी सोय केली आहे. मी त्यांना हार्दिक धन्यवाद देतो.

दिनांक १-२-१९६८

## डॉ. नारायण भास्कर खरे, नागपूर

ग्रंथ संपादनासाठी आणि त्यात समाविष्ट करण्यासाठी, ग्रंथकर्त्यांने परिश्रमपूर्वक जी माहिती संकलित केली व हिंदूंच्या देवदेवतासंबंधी अनेक ग्रंथांच्या आधारे जी वास्तव माहिती सादर केली, ती अत्यंत महत्त्वाची आहे. मी तर असे म्हणेन की, अशा सर्वांग परिपूर्ण ग्रंथ तयार करण्यात श्री. प्रभुदेसाईंनी एक महान राष्ट्रीय कार्य केले आहे. कारण आमच्या देवदेवतासंबंधी परधर्मीयांकडून चुकीचा व प्रसंगी उपहासपूर्वक जो मोडसाळ प्रचार करण्यात येतो त्याला या ग्रंथातील साधार शास्त्रीय वचनांनी चोख उत्तर मिळाले आहे.

"आदिशक्तीचे विश्वस्वरूप" अर्थात देवीकोश हा ग्रंथ तयार करताना लेखकाने प्रचंड प्रमाणात धार्मिक वाङ्मय वाचकांना सादर करण्याची एक महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. देवीच्या उपासकांना हा ग्रंथ उपयुक्त व संग्राह्य वाटेल आणि ग्रंथकर्त्यांच्या परिश्रमाचे ते चीज करतील, अशी मी आशा करतो. केंद्र सरकारने या ग्रंथाची दखल घेऊन भरपूर द्रव्यसहाय करावे, अशा पातळीचा हा ग्रंथ आहे

देवीकोश हा ग्रंथ संशोधनपर असून, तो प्रकाशात आणण्यात टि. म. विद्यापीठाने जी तत्परता आणि गुणग्राहकता दाखविली, त्याबद्दल संस्थेचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. शेवटी श्री प्रभुदेसाई यांच्याकडून या विषयावरील उर्वरित सर्व खंडांचे प्रकाशन त्वरित होवो, अशी शुभेच्छा व्यक्त करून प्रस्तुत ग्रंथाबद्दलचे माझे 'दोन शब्द' मी येथे पुरे करतो.

## भारत–भारती ( ज. मा. कायंदे ), मुंबई

श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांच्या कुटुंबाचा परिचय मी गोरेगावी राहू लागल्यापासून झाला. प्रसंगाने परिचय, परिचयातून मित्रत्व, मित्रत्वातून दैवी प्रेमबंध असे निर्माण होतात. हा अनुभव प्रभुदेसाईंची येथील अंबामातेची सेवा सुरू झाल्यानंतर आम्हाला आला व आदिशक्तीचे विश्वस्वरूप जगासमोर मांडण्याच्या कल्पनेपासून, पुस्तकाचे प्रकाशनापर्यंत दृश्य वा अदृश्यरूपाने नित्य येत गेला.

इतके लिहिल्यावर ग्रंथाबद्दल व त्यातील गाभ्याबद्दल त्यांना व मला काय वाटते हे लिहिणे सोपे नाही पण काय वाटते ते खालील पद्यात वाचकांना खासच दिसेल––

धन्य आनंदाचा दिन । भाग्य आले उदया पूर्ण ।
भासे दाही दिशांभरून । माय माझी ॥ १ ॥
जेथें पाहीं तेथें आई । नित्य सांगाती मम होई ।
रिक्तता ठेवी न कोठेही । माय माझी ॥ २ ॥
घास घेता घोट गिळिता । शैयेवरी मी पहुडतां ।
घरीं दारीं झाली मूर्ता । माय माझी ॥ ३ ॥
वाळवंटी भरली आई । नभ नक्षत्रांत आई ।
सर्वांभूती शक्तीमाई । माय माझी ॥ ४ ॥
नाथदास म्हणे ध्यावे । विश्वरूप हे सद्भावे ।
तेणे कळवळोनिया धावे । माय माझी ॥ ५ ॥

दादा देसाईंनी हा ग्रंथराज लिहिला, सर्व-मंत्र-स्वतंत्र-तंत्राचार्य दादा पेंडसे तथा इतर महाराष्ट्रीय विद्वान मंडळींनी अंतरंग बहिरंगाबद्दल उत्कृष्ट अभिप्राय लिहिले व आनंदाचा अनुभव, देवीच्या कृपेची प्रचिती मला व माझ्यासारख्या अनेक शक्तीच्या उपासकांना येत आहे, ही साक्ष फक्त मी नोंदवू इच्छितो.

अभिप्राय लिहिण्याचा माझा अधिकार नाही याची जाणीव ठेवून, देवीयोग घराघरात प्रविष्ट व्हावा अशी आदिशक्तीचे चरणी प्रार्थना करतो

## कीर्तनरत्न लक्ष्मणबुवा निजामपूरकर, पुणे

भगवतीचे परम उपासक प्र. कृ. प्रभुदेसाई (गोरेगाव), यांचा-आमचा अनेक दिवसांचा ऋणानुबंध आहे आदिशक्तीचे महत्त्व, स्थानपीठे, प्राचीनत्वाचा इतिहास इत्यादि माहिती एकाच ग्रंथात उपासकांना समग्र लाभावी, या पवित्र हेतूने साक्षात् जगदंबेचीच त्यांना प्रेरणा झाली संस्कृत, इंग्रजी, मराठी इ० अनेक भाषांतील ग्रंथांचे सातत्याने परिशीलन करून, अविश्रांत परिश्रम घेऊन देवीकोशासारखी अमूल्य ठेवारूपी शाश्वत संपत्ति जनताजनार्दनाच्या हाती त्यांनी दिली, हे आमचे थोर भाग्य

भारतभूमीचे पुण्य फार श्रेष्ठ आहे, इतर राष्ट्राबरोबर त्याची तुलना नाही अनेक खंडांत प्रसिद्ध होणाऱ्या या ग्रंथराजाचे महत्कार्य, त्या आदिशक्तीच्या पूर्ण अनुग्रहावाचून शक्यच नाही किती अभ्यास करणार, किती वाचणार, कोठे कोठे हिंडणार ? पण हे सर्व त्यांनी केले आहे या ग्रंथामध्ये अनेक देवीभक्तांचे स्वानुभव व उपासनेचे प्रकार लेखकाने संग्रहित केलेले दिसतात. ते वाचीत असताना दैवीसामर्थ्य हे मनुष्यबुद्धीपलीकडचे आहे, याची खात्री पटते. अनेक प्रकारची देवीशक्तींची दर्शने लेखकाने श्रद्धाभावाने घडविलेली पाहून मन संतोष पावते. अनेक ग्रंथांची प्रमाणे देऊन प्रत्येक विषयाचा विस्तारपूर्वक साङ्गोपाङ्ग निःसंदेह ऊहापोह केलेला आहे. या ग्रंथाची कीर्ति ज्ञानेश्वर-तुकारामाप्रमाणे भविष्यकाळात निश्चितपणे होणार आहे

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

*

आगामी खंडात येणारे विषय पुढीलप्रमाणे:—

(१) देऊळवाडे, देवघर आणि देवता

(२) निग्रही देवता

(३) ग्रामदेवता

(४) जलदेवता, वृक्षदेवता, व्रत देवता

(५) उत्खननातील—शिल्पातील देवताचे स्वरूप

(६) देवी नामोत्पत्ति

(७) बौद्ध जैन-संकीर्ण देवता

(८) विभिन्न जाती-जमाती देवता

(९) पश्चिम आणि पूर्व गोलार्धातील देवताचे स्वरूप

(१०) देवी केकावली